खंड एक :
वऱ्हाडी शब्दकोश : भाग १
एकूण पृष्ठे : ३४६
किंमत : रु. ९६८/-

खंड दोन :
वऱ्हाडी शब्दकोश : भाग २
एकूण पृष्ठे : ३१८
किंमत : रु. ८९०/-

खंड तीन :
वऱ्हाडी वाक्प्रचार
एकूण पृष्ठे : १८८
किंमत : रु. ५२६/-

खंड चार :
वऱ्हाडी म्हणी
एकूण पृष्ठे : २२०
किंमत : रु. ६१६/-

- - - - - - - - - - - -

मुख्य संशोधक
प्रा. डॉ. विठ्ठल वाघ

सहायक संशोधक
प्रा. डॉ. रावसाहेब काळे

प्रकल्प संयोजक
डॉ. मनोज तायडे
मराठी भाषा विभाग प्रमुख
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

ज्ञान आणि भाषा या दोन संकल्पनांचा एकमेकींशी अत्यंत घनिष्ठ असा अन्योन्य संबंध आहे. कोणत्याही भाषेत ज्ञानाची वृद्धी होतानाच भाषेचा विकास होऊ शकतो. या तत्त्वानुसार राज्य मराठी विकास संस्थेचे काम चालत असते.

वऱ्हाडी बोली ही मराठीची एक महत्त्वाची बोली आहे. कोणत्याही भाषेचा, बोलीचा अभ्यास हा त्या भाषेचा परीघ वाढण्यासाठी व वाढलेला परीघ हा तंत्रशुद्ध होण्यासाठी महत्त्वाचा असतो.

प्रमाण भाषेच्या बाहेर असलेल्या भाषिक अंशांचा (शब्द, शब्दप्रयोग, वाक्प्रचार, म्हणी इत्यादी) तंत्रशुद्ध वेध घेऊन भाषेचे हे घटक एकंदरित समाजमानसात येण्यासाठी; तसेच ते पुढील पिढ्यांत संक्रमित होण्यासाठी असे प्रकल्प महत्त्वाचे ठरतात. कालांतराने हा भाषा-अंश मराठीच्या शहरी ललित साहित्यात येईल; तसेच व्यावहारिक मराठी भाषेत / प्रमाण मराठी भाषेत सामाविष्ट होऊन मराठी भाषेचा परीघ वाढू शकेल.

मराठीचा विकास - महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

ISBN : 978-93-85802-19-5

वऱ्हाडी बोली खंड २ वऱ्हाडी शब्दकोश : भाग २

वऱ्हाडी बोली खंड २
वऱ्हाडी शब्दकोश : भाग २

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

आभार :
- **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,**
  प्रभादेवी मुंबई
- **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,**
  अमरावती

- - - - - - - - - - - -

ग्रंथ मिळण्याचे मुख्य ठिकाण :
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय इमारत
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : (०२२) २२६५ ३९६६
इपत्ता : rmvs_mumbai@yahoo.com

वऱ्हाडी बोली

खंड २

वऱ्हाडी शब्दकोश : भाग २

मुख्य संशोधक

प्रा. डॉ. विठ्ठल वाघ

साहाय्यक संशोधक

प्रा. डॉ. रावसाहेब काळे

प्रकल्प संयोजक

डॉ. मनोज तायडे

मराठी भाषा विभाग प्रमुख
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

वऱ्हाडी बोली : खंड ०२ : वऱ्हाडी शब्दकोश : भाग २
(VARHADI DIALECT : VOL 02 : VARHADI SHABDKOSH : PART 2)

आय.एस.बी.एन. : ९७८-९३-८५८०२-१९-५

प्रथमावृत्ती : **२७ फेब्रुवारी २०२१ (मराठी भाषा दिन)**

© **राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.**

प्रकाशक :
प्रशासकीय अधिकारी
राज्य मराठी विकास संस्था,
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय इमारत,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : (०२२) २२६५ ३९६६
इपत्ता : vastra.rmvs@gmail.com
संकेतस्थळ : http : //rmvs.maharashtra.gov.in

मुखपृष्ठ : **सचिन भोसले**
पृष्ठयोजन : **मधुरा गणपुले**

मुद्रक :
आनंद लिमये
इंडिया प्रिंटींग वर्क्स,
इंडिया प्रिंटींग हाऊस, ४२, गं. द. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई -३१, दूरध्वनी : ०२२-२४१२ २७५५/५६
इपत्ता : anand@ipworks.in

किंमत : **रु. ८९०/-**

आभार

- **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,**
  प्रभादेवी, मुंबई.
- **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,**
  अमरावती.

निवेदन

- विलास शिरसाट
प्रकल्पप्रमुख

आपली मराठी भाषा ही साहित्य, नाट्य, काव्य, तत्त्वज्ञान, अध्यात्म, इतिहास, सामाजिक शास्त्रे अशा अनेक क्षेत्रांत विकसित झाली. मात्र, विज्ञान, लोकवैद्यक, वैद्यकीय क्षेत्र, विधी (कायदा), नैसर्गिक शास्त्रे, तांत्रिक विषय, वस्त्रनिर्मिती, संगणक शास्त्र इत्यादी क्षेत्रांत आपल्या मराठी भाषेला पल्ला गाठणे आवश्यक आहे, असा विचार संयुक्त महाराष्ट्राच्या यशस्वी चळवळीनंतर (इ.स. १९६०) पुढे आला. या संदर्भात इ.स. १९७९ मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे एक सुकाणू समिती स्थापन झाली. परिणामी, विज्ञान, लोकवैद्यक, वैद्यकीय क्षेत्र, विधी (कायदा), नैसर्गिक शास्त्रे, वस्त्रनिर्मिती, अभियांत्रिकी, संगणन शास्त्र इत्यादी क्षेत्रांत मराठी भाषा संपन्न व्हावी, या उद्देशाने ०१ मे १९९२ या दिवशी महाराष्ट्र शासनाद्वारे राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना झाली.

ज्ञान आणि भाषा या दोन संकल्पना वेगवेगळ्या आहेत. मात्र, या दोन संकल्पनांचा एकमेकींशी अत्यंत घनिष्ठ असा अन्योन्य संबंध आहे. कोणत्याही भाषेत ज्ञानाची वृद्धी होतानाच भाषेची वाढ/विकास होऊ शकतो. या तत्त्वानुसार राज्य मराठी विकास संस्थेचे काम चालत असते. गेल्या अठ्ठावीस वर्षांत या संस्थेने अनेक प्रकल्प यशस्वीरित्या पार पाडले आणि अनेक प्रकल्प सध्याही चालू आहेत.

जगातील अनेक देशांतील संस्कृतींप्रमाणे भारताच्या प्रत्येक राज्यातही संस्कृतींचे विविधांगी दर्शन घडते. भाषा व बोली हे कोणत्याही संस्कृतीचे महत्त्वाचे घटक असतात. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून अनेक बोली अस्तित्वात आहेत. वऱ्हाडी बोली ही त्यांपैकी एक महत्त्वाची बोली. ही बोली वऱ्हाड प्रांतात म्हणजे उत्तर महाराष्ट्रात अकोला, बुलढाणा, वाशीम, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांत बोलली जाते.

सामाजिक, प्रशासनिक कामकाज करताना प्रमाण भाषेला महत्त्व आहे. परंतु, प्रमाणभाषा ही बोलींतून आलेल्या शब्दांतून सिद्ध व संपन्न होत असते. जीवनव्यवहारातील भाषा ही ललित साहित्यात वापरली जाते व ललित साहित्याच्या भाषेचा परीघ हा तर फारच विस्तृत व व्यामिश्र असा आहे. या कारणांमुळे, कोणत्याही प्रदेशातील, कोणत्याही राज्यातील बोलींना महत्त्व आहे. परिणामी, या बोलींचा अभ्यास होणे हे महत्त्वाचे ठरते.

कोणत्याही भाषेचा अभ्यास हा त्या भाषेचा परीघ वाढण्यासाठी व वाढलेला परीघ हा तंत्रशुद्ध होण्यासाठी महत्त्वाचा असतो. भाषा-अभ्यास हा दोन दिशांनी होत असतो. एक : अग्रदिशा अभ्यास. दोन : पार्श्वदिशा अभ्यास.

जेव्हा राज्य मराठी विकास संस्थेद्वारे ***वस्त्रनिर्मिती माहितीकोश, यंत्रालयाचा ज्ञानकोश, विज्ञान संकल्पना कोश*** यांसारखे प्रकल्प राबविले जातात तेव्हा तो मराठी भाषेचा अग्रदिशा अभ्यास होय. जेव्हा सदर संस्थेद्वारे ***दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश, पालघर तालुका : बोली,***

समाज व संस्कृती, वऱ्हाडी बोली प्रकल्प यांसारखे प्रकल्प राबविले जातात तेव्हा तो मराठी भाषेचा पार्श्वदिशा अभ्यास असतो.

प्रमाण भाषेच्या बाहेर असलेल्या भाषिक अंशांचा (शब्द, शब्दप्रयोग, वाक्प्रचार, म्हणी इत्यादी) तंत्रशुद्ध वेध घेऊन भाषेचे हे घटक एकंदरित समाजमानसात येण्यासाठी; तसेच ते पुढील पिढ्यांत संक्रमित होण्यासाठी असे पार्श्वदिशा प्रकल्प हे महत्त्वाचे ठरतात. कालांतराने हा भाषा-अंश मराठीच्या प्रमाण शहरी भाषेतील साहित्यात येईल व व्यावहारिक मराठी भाषेत / प्रमाण मराठी भाषेत समाविष्ट होऊन मराठी भाषेचा परीघ वाढू शकेल, असे आम्हाला वाटते.

सदर प्रकल्प-अंतर्गत एकूण चार खंड आहेत. (१) ***वऱ्हाडी बोली : खंड १ : वऱ्हाडी शब्दकोश : भाग १,*** (२) ***वऱ्हाडी बोली : खंड २ : वऱ्हाडी शब्दकोश : भाग २,*** (३) ***वऱ्हाडी बोली : खंड ३ : वऱ्हाडी वाक्प्रचार,*** (४) ***वऱ्हाडी बोली : खंड ४ : वऱ्हाडी म्हणी.***

संपूर्ण महाराष्ट्राला परिचित ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. विठ्ठल वाघ यांनी या चारही ग्रंथांसाठी मुख्य संशोधक म्हणून योगदान दिलेले आहे; तर प्रा. डॉ. रावसाहेब काळे यांनी साहाय्यक संशोधक म्हणून कार्य केलेले आहे. श्री. सचिन भोसले यांनी मुखपृष्ठ केले; तर राज्य मराठी विकास संस्थेतील आमच्या सहकारी श्रीम. मधुरा गणपुले यांनी पृष्ठयोजन केलेले आहे.

मराठी भाषेचे संशोधक, अध्यापक, अभ्यासक, विद्यार्थी, सर्वसामान्य व्यक्ती; तसेच, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती यांच्या विकासासाठी काम करणाऱ्या विविध संस्था या सर्वांसाठी सदर ग्रंथ उपयुक्त ठरेल, अशी खात्री वाटते.

♦♦♦

अ नु क्र म

प्राक्कथन ..... सहा
संक्षिप्त रूपे ... अट्ठावीस
ध ०१
न १२
प ३०
फ ६३
ब ७८
भ ११५
म १३३
य १६४
र १६९
ल १८३
व १९८
श २१९
स २२९
ह २६०

संदर्भ ग्रंथसूची २८४
व्यक्ती परिचय २८७

टीप : `अ' ते `द' या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या वऱ्हाडी शब्दांचे अर्थ ***वऱ्हाडी बोली खंड : १, वऱ्हाडी शब्दकोश : भाग १*** या ग्रंथात समाविष्ट आहेत.

◆◆◆

प्राक्कथन

- प्रा. डॉ. विठ्ठल वाघ
मुख्य संशोधक
- प्रा. डॉ. रावसाहेब काळे
साहाय्यक संशोधक

वऱ्हाडी बोलीचे क्षेत्र :

भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे तीन प्रमुख विभाग होतात, - (१) पश्चिम विभाग - कोकणपट्टी, पश्चिम समुद्र व सह्याद्रीमधील अरूंद पट्टीचा यात समावेश होतो, (२) पश्चिम सह्याद्री व बालाघाट यांतील त्रिकोण. प्राचीन काळात यालाच 'कुंतल' असे नाव होते. हा कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेश होय, (३) अजिंठ्याचा घाट उतरल्यानंतर लागते तापी व पूर्णा या नद्यांचे खोरे. दक्षिणेला सह्याद्री, उत्तरेला सातपुडा अशा दोन समांतर पर्वतरांगांमध्ये या नद्यांचे खोरे आहे. यांतील तापीचे खोरे म्हणजे खानदेश हा प्रदेश होय. पूर्णेचे खोरे म्हणजे विदर्भातील वऱ्हाड होय. (पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास, डॉ. विठ्ठल वाघ, पृ. ५).

विदर्भात नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, वाशीम, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांचा अंतर्भाव होतो. या संपूर्ण विदर्भात वऱ्हाडी बोलीचे एकवीध स्वरूप आढळून येत नाही. मात्र, वऱ्हाडी बोलीच्या निखळ स्वरूपाच्या दृष्टीने यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम आणि बुलढाणा या भाषिक क्षेत्राची नोंद करता येते.

चार वऱ्हाडी जिल्ह्यांचे क्षेत्रफळ व लोकसंख्या :

जिल्हा	क्षेत्रफळ (चौ. कि.मि.)	लोकसंख्या : शहरी / ग्रामीण	शहरे	खेडी
अकोला	५४२८	११,८९,३५४/९५६५२१		
अमरावती	४६९१	१२,३२,७८०/९१०५८६	२५	१६०९
यवतमाळ	५२२१	१०,९८,४८०/९५९९४५	८	१९२२
बुलढाणा	९६६१	५४८८६०/९८४२६०	९	१२२५

नाव, व्युत्पत्ती व प्राचीन उल्लेख :

वऱ्हाड या भाषिक क्षेत्रात बोलली जाते म्हणून या बोलीला 'वऱ्हाडी' हे प्रदेशवाचक नाव मिळाले आहे. त्रिविक्रमाने या प्रदेशाचे गुण गाताना म्हटले आहे, -

''वीरपुरुषं तदेत वरदातट नामकं महाराष्ट्रम्
दक्षिण सरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र॥'' (नलचंपु)

विदर्भा नदी जेथे वाहते त्या भागाला वरदातट नामक महाराष्ट्र म्हणतात. 'वरदातट' या शब्दापासून 'वराड' हा शब्द व्युत्पन्न झाला, असे डॉ. सुरेश डोळके अनुमान काढतात व त्याच्या पुष्टीसाठी वररूचीच्या 'कगचजतदपयावां प्रायो लोपः' व 'टोड्' या सूत्राचा दाखला देतात. (वैदर्भीय शब्दकोष, उपोद्धात). कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' हे नाटक श्री. काळे यांच्या मते 'कल्पित नसून ऐतिहासिक सत्य' आहे. त्यात दोन भावांचे भांडण होते. अग्निमित्र स्वतः समेट घडवून 'वरदा'काठचे राज्य त्यांना वाटून देतो. त्याचे कवीने वर्णन केले आहे (५.१३). ते असे, - चंद्र व सूर्य ज्याप्रमाणे रात्र व दिवस असा काल वाटून घेतात, त्याप्रमाणे यज्ञसेन व माधवसेन यांनी वर्धेच्या उत्तर व दक्षिण काठावरील मुलुख वाटून घेऊन पृथक राज्य केले. यावरून वर्धा नदी ही विदर्भाचे दोन भाग करणारी मध्यरेखा ठरते', असे प्रा. डॉ. सुरेश डोळके सांगतात. काही लोक ती पूर्वमर्यादा मानतात. ते प्रा. डॉ. डोळके यांना चूक वाटते. त्यांपैकी एक भाग हा वरदार्ध म्हणजे वऱ्हाड असावा. ऐने अकबरीत अबुल फजलदेखील 'वर्धातट' असाच उल्लेख करतो. राजवाड्यांनी त्याची उत्पत्ती विदर्भ अपभ्रंश होत 'बिड्डर्र - बराड- वऱ्हाड' अशी लावली आहे. भाषाशास्त्रीयदृष्ट्या प्रा. डॉ. डोळके यांच्या मते ती वर्धाहार = वर्धाकाठचा प्रदेश, वर्धा आहार-वड्डार-वढार-वऱ्हाड अशी लावणे अधिक अचूक ठरते (वैदर्भीय मराठी शब्दकोष, उपोद्धात).

'श्रीकृष्णाच्या लग्नाचेवेळी विदर्भात जी वऱ्हाडी मंडळी आली ती इथेच स्थायिक झाली. त्यावरून या प्रदेशाला 'वऱ्हाड' हे नाव पडले, असा तर्क काहींनी काढला आहे. या तर्कात भाषाशास्त्रीयदृष्ट्या अस्तिपक्षही ध्वनित होतो, असे त्यांचे म्हणणे आहे. वर हाडी वराच्या हाडामासाची मंडळी. यासंदर्भात श्री. देशमुख एक पद्यही उद्धृत करतात- 'वऱ्हाड नोहे वर हाड आहे। अत्यादरा सर्वचि पात्र

आहे.' दुसरे म्हणजे वर हाट हे शब्द. वराकडून जो 'हाट' लग्नप्रसंगी येतो ते वऱ्हाड असे ते सांगतात. 'हाट' हा समुदायवाचक शब्द आहे. बाजारहाट इत्यादी शब्दांमध्ये तो येतो (वऱ्हाड इतिहास आणि भूगोल, डॉ. वाघ. ७-८).

वऱ्हाडचा इतिहास :

ज्या भाषिक समूहाचे राज्य असते त्या भाषिक समूहाच्या भाषेचा प्रभाव आपल्या भाषेवर पडत असतो. त्या दृष्टीने एखाद्या भाषिक समूहाच्या बोलींचा संग्रह करताना त्या भाषकच्या इतिहासाचा आढावा घेणे आवश्यक आहे. म्हणजे, कोणत्या भाषेतून शब्द का आला, याचे लगेच उत्तर आपल्या हाती येते; आणि तो शब्द केव्हा रूढ झाला असावा हे निश्चित होते. काही शब्द हे एक/दोन किंवा त्यापेक्षा अनेक भाषेत रूढ झालेले दिसतात. मात्र, त्यांपेकी कोणत्या भाषिक समूहाची सत्ता यापूर्वी असल्यास त्या संबंधित भाषेपासून तो शब्द घेण्यात आला असवा, असे निश्चित करता येते. हे ठरवताना फक्त सत्तेचाच विचार करावे, असे मात्र नाही. हेही नमूद करायला हवे की, भाषेत शब्द हे भौगोलिक समीपता, सांस्कृतिक संक्रमण, राज्यकर्ते इत्यादी कारणाने रूढ होतात.

वऱ्हाडचे राजवंश कोणते, ते कोणत्या कालखंडात होऊन गेले या संबंधी एक कोष्टक श्री. देशमुख यांनी त्यांच्या ग्रंथात दिले आहे. ते बघता महाभारत कालापासून इथे सूर्य व चंद्रवंशी राजे, क्षत्रिय राजवंश, आंध्र, चालुक्य, गुप्त, बलवंश, मौर्य, जैन राष्ट्रकूट, वाकाटक, यादव, मोगल, मराठे, ब्रिटिश इत्यादींचे राज्य इथे कालप्रवाहात होऊन गेलेली आहेत.

अनु. सुरू काळ	अखेर काळ	राजवंशाचे नाव
(१) रामायण काळ. इ.स. पूर्वी ३०००	महाभारत काळ इ.स. १२००	सूर्य व चंद्रवंशी राजे
(२) भारतकाल इ.स. पूर्व १२००	बौद्धकालापर्यंत, इ.स. पूर्व ५००	महाभोज, भोज इ.
(३) बौद्धकाल इ.स. पूर्व ५००	मध्यकाल इ.स. च्यसा प्रारंभापर्यंत	वल्लभी, अशोक, पवार, प्रतिहार, चव्हाण इ. क्षत्रियवंश
(४) पहिले शतक	चौथे शतक	आंध्रचालुक्य हे क्षत्रियवंश
(५) चौथे शतक	पाचवे शतक	गुप्तवंश, बलवंश, क्षत्रिय
(६) पाचवे शतक	सहावे शतक	वल्लर्भी, मौर्य, कदंब इ. क्षत्रिय
(७) सहावे शतक	इ.स. १०५८	चालुक्य कुल (कूळ)
(८) इ.स. १०५९	इ.स. १११३	जैन, इल व वंशज-एलिचपूर
(९) इ.स. १११४	इ.स. १३१२	जाधव (देवगिरी) चंद्रवंशी
(१०) इ.स. १३१३	इ.स. १३५१	खिलजी घराणे
(११) इ.स. १३५२	इ.स. १४८२	बहामनी मुसलमान राजे
(१२) इ.स. १४८३	इ.स. १५७२	इमादशाही
(१३) इ.स. १५७३	इ.स. १५९६	निजामशाही-अहमदनगर
(१४) इ.स. १५९७	इ.स. १७१७	दिल्लीचे मोगल, भोसले सातारा
(१५) इ.स. १७१८	इ.स. १८०४	नागपूरचे भोसले ६०, हैद्राबादचे निजाम
(१६) इ.स. १८०५	इ.स. १८५३	हैद्राबादचे निजाम
(१७) इ.स. १८५३	इ.स. १९४७	इंग्रज सरकार

यानंतर १९४७ साली भारत देश इंग्रजी छत्राखालून मुक्त झाला.

वऱ्हाडचे भौगोलिक विशेष

कृषिप्रधानता : विदर्भातील मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. काही ठिकाणी काळी (सुपीक) जमीन, तर काही ठिकाणी मुरूम असलेली. काही भागात बागाईत करता येते, तर काही भागात क्षारयुक्त पाणी असल्यामुळे पावसाच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागते.

ज्वारी, बाजरी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन इत्यादी कोरडवाहू पिके घेतली जातात. तसेच, रब्बी पिकात - गहू, हरभरा, करडी, जवस इत्यादी घेतली जातात. ज्या भागात शेतीला सिंचनाचा पाणीपुरवठा होतो त्या शेतात आज पपई हे मुख्य पीक झाले आहे. यांशिवाय, भाजीपाला, मिरची, ऊस, केळी, संत्रा, लिंबू ही पिके जमिनीचा पोत पाहून घेतली जातात.

पशुपालन : 'ज्याच्या घरी खुटा/ त्याच्या घरी धनाचा लोटा' या म्हणीप्रमाणे वऱ्हाडात एकही असे गाव नाही ज्या गावात गुरे नाहीत. प्रत्येक गावात एक/दोन घरे सोडली तर सर्वांजवळ गुरे आहेत.

शेतीसाठी बैलांची आवश्यकता आहे. सर्व कामे ट्रॅक्टर करू शकत नाही; आणि प्रत्येक शेतकरी ट्रॅक्टर विकत घेईल, हेही शक्य

नाही. आज बैलाच्या वाढत्या किमतीमुळे गाईचे महत्त्व वाढत आहे. मधल्या काळात गाई पाळण्याचे प्रमाण कमी झाले होते. आता मात्र, वाढत आहे. तसेही, दुधासाठी गाय पाळली जाते. त्यामागे धार्मिक संदर्भ आहेत. मुख्यतः, शहराजवळील गावात दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केला जातो. याशिवाय, प्रत्येक गावातील किमान दोन घरे तरी शेळ्या पाळताना दिसतात. एकूणच, यांसंदर्भातील शब्द वऱ्हाडी बोलीत अधिक आढळतात.

कुंभार, चांभार, लोहार, कोष्टी, सुतार, बेलदार, मातंग इत्यादी जाती आपापले परंपरागत व्यवसाय करतात. यांच्या व्यवसायानुसार अनेक शब्द वऱ्हाडी बोलीत आलेले आहेत. काही वाक्प्रचार, म्हणी तयार झालेल्या आढळून येतात.

सामाजिक चालीरीती

(१) जन्मप्रथा : वऱ्हाडी स्त्री बाळंत झाली की, तिला शेवया नाहीतर गव्हाची सोजी खाऊ घालतात. तिसऱ्या दिवशी उपवास करायला लावतात. उपवासात खोबरं, गूळ देतात. पाचव्या दिवशी पाची हा कार्यक्रम होतो. सुइणी रुईची, आंब्याची, शेमीची व पाच अंबाडीच्या फांद्या घेऊन येते. 'दिवे लाग्नी वेळेस' (सायंकाळी) पाटा मांडतात. एक भाकर, राळ, कापूर, अगरबत्ती, पाचीपुडा घेऊन येतात. बाजीच्या 'ठाव्याला' (बाजीची खुंटी) प्रत्येकी एक याप्रमाणे चार अंबाडीच्या फांद्या लावतात. प्रत्येकी एक याप्रमाणे उशाशी (डोक्याकडून) अशा फांद्या ठेवून त्यावर पाच चांदकी ठेवले जाते. पाट्यावर शेर, कोरा कागद, लाटणे आणि सुइणीने आणलेले सामान ठेवले जाते. त्याला असे म्हणतात की, 'बरम्याची रेग अन् सटीच् अक्शर् चुकत् नाई'. बाराव्या दिवशी बाळंतिणीस न्हाणतात. संध्याकाळी तुळशीजवळ विळा ठेवतात. बाळाची लंगोटी गरम पाण्यात धुतात. त्यावर बारा गोटे मांडतात. त्याची पूजा करतात. नंतर पाट्यावरील वरवंटा पाळण्यात ठेवतात. जमलेल्या स्त्रिया गाणी म्हणतात. एक स्त्री म्हणते, 'राम घ्या', दुसरी, 'लक्शिमन् घ्या', क्रमाने, 'भरत् घ्या', 'शत्रुग्न घ्या'. मग, पाळणा म्हणतात. ज्वारीच्या घुगऱ्या पाळण्याखाली ठेवतात. लहान मुले खातात. एक बाई तोंडात साखर घेऊन बाळाचे नाव ठेवते.

(२) विवाह प्रथा : मुलामुलींचे लग्न आईवडील ठरवतात. यामध्ये मुख्यतः घर/ कुटुंब पाहिले जाते. आजपर्यंत सौंदर्य, शिक्षण याला फारसे महत्त्व नव्हते. तरी त्यांचे संसार सुखाचा आणि शेवटावर जात होता. आज माणूस पाहिला जात नाही. मुलीची पसंती मुलावर अवलंबून असते. कदाचित म्हणून, एकापासून शंभर मुली पाहूनही लग्न जुळत नाही. मुलीचे सौंदर्य, शिक्षण, उंची, त्यात त्या मुलीच्या वडिलांची श्रीमंती या सर्व बाबी पाहिल्या जातात. तरीही घटस्फोटाचे प्रमाण वाढतच आहे. मुलाकडे नोकरी, जमीन आहे का, हे पाहिले जाते. दोघांकडील पसंती झाल्यानंतर मुलीकडे कुंकवाचा कार्यक्रम ठेवला जाते. यात हुंडा/ देणे घेणे, मानपान इत्यादी बाबी ठरविल्या जातात. जर दोन्ही कुटुंबाला मान्य असतील तर कुंकवाची वाटी बोलाविली जाते. सर्वांना कुंकू लावण्यात येते. आता सोयरीक पक्की झाली म्हणून निश्चित होते. यानंतर, कुंकवाचा एक कार्यक्रम होतो. आज श्रीमंत लोक लहान लग्नाच्या थाटात हा कार्यक्रम करतात. तर, जेमतेम परिस्थिती असलेले लग्नाच्या अगोदरच्या दिवशी कुंकवाचा कार्यक्रम करतात.

अशा प्रकारे मुलाचे लग्न ठरले की, भवानी करतात. सवाष्णी काढतात. वरमाय व पाच सवाष्णी मानाचे पदार्थ करतात. त्यात पापड, कुरड्या (कुरडई), शेवया व वड्या असे पदार्थ करतात. पाच सवाष्णींना बांगड्या भरतात. जेवणाच्या दिवशी सवाष्णीला न्हाणले जाते. सायंकाळी जेवणार निघते. 'जेवनार' (एक विधी) काढताना, पाच ज्वारीचे ताटे बांधलेल्या ताटात अंबाडी, वरण, कढी, भात, दिवा, दामण (मोठी सुई) आणि वरून काळे घोंगडे टाकले जाते. ती पाटी मरीमाय (ग्राम देवता) जवळ नेतात. पाटीच्या मागे गावातील प्रत्येक कुटुंबातील लग्न झालेला एक माणूस असतो. तेथे मरीमायची पूजा केली जाते. दुसऱ्या दिवशी पाच सवाष्णी नवरदेवाला तेल चढवतात, हळद लावतात. मग, नानमुख (एक विधी) करतात. नवरदेवाला न्हाणतात. वडीलधारे जोडपे व भटजी मिळून देवकुंडी करतात. बसवितात. नवरदेवाचे न्हाणे झाल्यावर पाच सवाष्णी त्याला काकण बांधतात. संध्याकाळी नवरदेव मिरवणुकीतून हनुमान मंदिरात नेतात. तेथे नवरदेवाचा मुक्काम असतो.

दुसऱ्या दिवशी नवरीकडे लग्न लागते. या लग्नात विविध विधी पार पाडले जातात. त्यात, कुंकू, होबास, पानेरी, लग्न, कन्यादान, बिदाई इत्यादी नवरदेवाच्या घरी येतात. सूनमुख पाहण्याचा, रास खेळण्याचा कार्यक्रम होतो. दुसऱ्या दिवशी मुलीकडील वराती येतात. मुलीला माहेरी घेऊन जातात. नंतर एखादा दिवस ठरून सत्यनारायण असल्यास मुलगा मुलीला आणायला जातो. नाहीतर घरातील वडीलधारा माणूस जातो. मुलीला सासरी आणले जाते. वधू, वर आणि त्यांच्यासोबत एखादा मुलगा किंवा मुलगी देऊन कुलदैवताचे दर्शन घेण्यासाठी पाठवतात. त्यानंतर शेगावला श्री गजानन महाराजांचे दर्शन घेण्यासाठीही पाठवितात. घरी आल्यावर सत्यनारायण पूजा होते. रात्री ओटभरणीचा कार्यक्रम होतो.

(३) अंत्यसंस्कार : विशेषतः, वृद्ध व्यक्तीचे प्रेत जाळण्याची प्रथा आहे, मात्र, दत्तमार्गात असणारे लहान असो वा वृद्ध असोत; ते मातीत मिठासोबत गाडतात. तसेच, लग्न न झालेल्या व्यक्तीचे प्रेत झोळीत नेतात. मातीत पुरतात. वृद्ध व्यक्तीचे प्रेत त्यावेळेस खाली टाकतात. म्हणजे, बाजीवर न ठेवता जमिनीवर सूर्यासमोर ठेवतात. त्या व्यक्तीचा मुलगा मांडी देतो. जीव जाण्याच्या वेळेस दूध, दही, सहद तोंडात टाकतात. जीव गेल्यावर बेंबीवर मिठाची पुडी ठेवतात. हातापायाला तूप लावतात. न्हाणतात. बाबूंची तिरडी करतात. ही

तिरडी बांधण्यासाठी सुतळी वापरतात. (म्हणून जिवंत माणसाला सुतळी बांधणे अशुभ समजतात). टिटवं बांधतात. त्यात पेटविलेल्या गोवऱ्या टाकतात. मुलाला धरायला लावतात. चार मुले किंवा नात्यातील इतर व्यक्ती खांदा देतात. तिरडी उचलताच स्त्रियांचा आक्रोश होतो. पारापुढे (हनुमानजीचे मंदिर) असते. तिथे प्रेताला विसावा देतात. त्याच्यावर पीठ टाकतात. डाळ टाकतात. एक रुपया तिरडीला बांधतात. 'राम बोलो' म्हणतात. तिरडी उचलतात. मुरमुरे, खोबरे, चिल्लर पैसे फेकत, 'राम बोलो' म्हणत स्मशानात नेतात. तेथे सरण रचतात. सरणात मेलेला माणूस ठेवतात. सरणाची दिशा उत्तर-दक्षिण असते. डोके दक्षिणेकडे ठेवतात. घासलेट टाकतात. राळ टाकतात. मुलगा सरण पेटवितो. सर्व जमलेले लोक गोवऱ्यांचा एक-एक तुकडा हाती घेऊन सरणात टाकतात. दर्शन घेतात. एक गोल फेरी मारतात. निघून जातात. काही दिवसांपूर्वी टकोरी (मेंदू) फुटल्याशिवाय स्मशानातून येत नसत. पण, आता वेळेचा अभाव असल्याने सरण पेटविल्यानंतर सर्व लोक परत येतात. परत आल्यानंतर एकेक कडुनिंबाचे पान तोंडात टाकून गुळणा करतात. चहा घेतात. आप-आपल्या घरी जाऊन (मात्र घरात न जाता, घराच्या बाहेरच) कपड्यांसह अंग धुतात. तिसऱ्या दिवशी दही, दूध, गोमूत्र व मरणाऱ्या माणसाला जे आवडत होते ते राखीवर टाकतात. राख गोळा करतात. पुढे ती राख आपल्या इच्छेने नदीत टाकतात.

दहाव्या दिवशी दसवे. याही दिवशी घरातील व इतर माणसे स्मशानात जातात. ते घराबाहेर निघाले की, उंबरठ्यावर सुपारी फोडतात. मुलाच्या जवळ काळे घोंगडे देतात. सोबत कणिक, डाळ, तांदूळ इत्यादी घेतात. स्मशानात जेथे जाळले तेथे तांदळाची पिंड पाडतात (मांडतात). घरी येतात. दसव्याचे जेवण करतात. नंतर, तेराव्या दिवशी तेरवी होते. यात शुद्ध पंगतीचा कार्यक्रम होतो. तेरा पितर जेवू घालतात. त्यांना स्टीलचे ग्लास, दुपटे देतात. यांचे जेवण झाल्यानंतर/ काही ठिकाणी यांच्या जेवणाला सुरुवात झाल्याबरोबर बाहेर पंगत बसते. यानंतर वर्षश्राद्ध केले जाते. मुलगा वर्षातून अक्षयतृतीया, सर्वपित्री अमावास्या या दिवशी आईवडिलांच्या नावाने देवापुढे जेवणाचे पान टाकतात (जेवणाचे ताट वाढतात).

वऱ्हाडी बोली - मराठीची मायकूस :

कोणतीही प्रमाण भाषा ही संबंधित बोलीपासून तयार होते किंवा एखाद्या बोलीलाच प्रमाण भाषेचा दर्जा प्राप्त होतो. आज प्रचलित असलेली प्रमाण मराठीचे पूर्वरूप वऱ्हाडी होते, असे डॉ. विठ्ठल वाघांचे मत असून ते वऱ्हाडीला 'मराठीची मायकूस' म्हणून संबोधतात (दै. लोकमत, २० सप्टें. २००४, पृ. ६.). प्राचीन काळी विदर्भात नाग लोकांची वस्ती होती. आर्य लोक महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी आपली पहिली वसाहत दक्षिणेस म्हणजे विदर्भात स्थापन केली. डॉ. सुरेश डोळके यांच्या मते, ''सप्तसिंधूचा प्रदेश - 'उदीच्य' देश हे असे भारतातील आर्यांचे उत्तरेकडील मूळ वसतीस्थान होते. तसेच, नर्मदा - गोदा यांच्या परिसरातील विदर्भाचा प्रदेश हे आर्यांचे दक्षिणेतील पहिले वसतीस्थान होय.'' ('वैदर्भीय बोलीचा शब्दकोश,' देवीदास सोटे, उपोद्धात : डॉ. सुरेश डोळके पृ.२५.) या आर्य लोकांची भाषा आणि येथील अनार्य (नागलोक) यांची भाषा मिश्रणातून 'अपभ्रश - महाराष्ट्री' भाषेचा उगम झाला. ही अपभ्रंशित महाराष्ट्री म्हणजे वऱ्हाडी बोली. वऱ्हाडी बोलीत 'देजो', 'जाजो', घोजो, करजो अशी भविष्यकाळी आज्ञार्थी रूपे भाषिक व्यवहारात वापरण्यात येतात. या रूपांचा उगम 'दिज्जइ, जाइज्जइ' इत्यादी अपभ्रंश रूपांत सापडतो.

शके ९३४ (प्राचीन मराठी कोरीव लेख, शं. गो. तुळपुळे, पृ. ४.) मधील मराठीतील अक्षी शिलालेखात कोरलेला 'आण' हा शब्द वऱ्हाडी बोलीत वापरला जातो. 'आण' शब्द प्राकृतमधील 'अण्ण' या शब्दापासून आला. 'आण' म्हणजे शपथ. शिलालेखात आणि वऱ्हाडीत याच अर्थाने आढळतो. मात्र, वऱ्हाडीत 'आण' या शब्दातील मूर्धन्य 'ण' चा दन्त्य 'न्' अशी स्वरप्रक्रिया होऊन 'आन्' रूढ आहे. दिवे - आगर ताम्रपटात 'श' ऐवजी 'स'चा वापर करण्याची प्रवृती वऱ्हाडी बोलीशी साम्य दाखविते. वऱ्हाडीत 'श्'चा 'स्' अशी उष्माची प्रक्रिया होताना दिसून येते. भांदकाच्या शिलालेखात लोणार आणि मेहकर या गावांची नावे आहेत. ही दोन्ही गावे वऱ्हाडातील बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. या लेखानंतर सुमारे दिडशे वर्षांनंतर लिहिलेल्या 'लीळाचरित्रा'त लोणार व मेहकर ही ग्राम नामे आली आहेत. 'आणि' या रूपाला 'क' हा अधिक प्रत्यय लागून 'आणिक' असे रूप या लेखात आहे (मराठी भाषेचा इतिहास, गं. ना. जोगळेकर, पृ. ११६). आज वऱ्हाडीत या 'आणिक' शब्दरूपाची 'आनिक्', 'आन्खि', 'आन्खिन्' अशी रूपे उच्चारात आहेत. पंढरपूर येथील शके १११९ मधील शिलालेखात 'श' कारा ऐवजी 'स' काराचे प्राबल्य, 'फेडी' हे क्रियारूप वऱ्हाडी बोलीशी नाते सांगणारे आहे. मात्र, वऱ्हाडीत आढळत नसलेला 'ण' हा मूर्धन्य व्यंजन या लेखात आला. पाटण येथील शिलालेखात 'पासी, घाणा, वाण, लोटी' यांसारखे शब्द, इतर लेखाप्रमाणे 'श'कारा ऐवजी 'स'काराचे प्राबल्य वऱ्हाडी बोलीशी संबंधित आहेत.

काही अभ्यासकांच्या मते आणि वरील विवेचनावरून वऱ्हाडी बोली मराठीची मायकूस असल्याचे ठाम मत मांडता येत नाही. वऱ्हाडी बोली किंवा मराठीची इतर कोणती बोली मराठीची मायकूस आहे, हे ठरविण्यासाठी सखोल संशोधनाची गरज आहे.

वऱ्हाडी बोलीतील वाङ्मय :

महानुभाव पंथाची स्थापना महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी यांनी बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात केली. या पंथाचा सर्व संसार वऱ्हाडीतील रिद्धपूर येथे थाटला गेला. रिद्धपूर हे गाव अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात आहे. महानुभावांपैकी

बहुतेक सर्व महंत, शिष्यवर्ग या गावात राहून धर्मकार्य करीत होते. वऱ्हाडात निर्माण झालेल्या या धर्मीयांचा वऱ्हाडी बोलीबद्दल अभिमान होता. चक्रधरांनी सर्वसामान्य माणसांपर्यंत धर्म जावा यासाठी लोकभाषेला धर्मभाषेचे स्थान दिले. त्यांच्या शिष्यांनीही लोकभाषेचा वापर केला. केसोबासांनी संस्कृतात केलेला ग्रंथ नागदेवाचार्यांना दाखविला तेव्हा नागदेवाचार्य म्हणाले, "पंडिता केशवदेया : तुमचा 'अस्मातकस्मात' मी नेणे गा : मज श्री चक्रधरे निरूपिली मऱ्हाटी : तियाची पुसा : मग तिही मानिले" ('स्मृतिस्थळ', पृ. २१.). असा लोकभाषेचा अभिमान असल्याने महानुभाव पंथातील ग्रंथ रचना लोकभाषा असलेल्या वऱ्हाडी बोलीत झाली. आज प्रमाणभाषेला जो ग्रंथनिर्मितीचा दर्जा मिळाला तोच दर्जा वऱ्हाडीला चक्रधरांच्या काळात प्राप्त झाला होता. वऱ्हाडीतील पहिले ग्रंथ म्हणून 'लीळाचरित्र' या ग्रंथांची नोंद करता येईल.

महानुभावांचा वारसा वऱ्हाडी जनजीवनाचे दुःख, दैन्य, आनंद, विनोद, शृंगार रेखाटण्यासाठी आधुनिक साहित्यिकांनी सांभाळला आणि तिला पुन्हा मानाचे स्थान मिळवून दिले. वऱ्हाडीतील गोडवा प्रा. डॉ. विठ्ठल वाघांची 'तिफण' सारखी कविता सांगून जाते. वऱ्हाडच्या शेतकऱ्यांचे दुःख त्यांच्या सूक्ष्म जाणिवेसह अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य असल्याचे प्रा. सदानंद देशमुख यांची 'बारोमास'सारखी कादंबरी सांगून जाते. अशा अनेक साहित्यकृतींचे दाखले देता येतील.

पां. श्रा. गोरे यांनी 'कात टाकलेली नागीण' ही कादंबरी लिहिली. तसेच, 'बोबडे बोल', 'वाणीचा हुरडा', 'बोरकुट', 'सखा', 'भिकेची भाकर' इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित केले. यांशिवाय, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांतील लोकगीतांचा संग्रह 'वऱ्हाडी लोकगीते' या नावाने प्रसिद्ध आहे.

कथा, कादंबरी लिहिणारे उद्धव शेळके 'धग'कार म्हणून ओळखले जातात. 'बाई विना बुवा', 'वळणावरंच वय', 'लेडिज हॉस्टेल', 'डाळिबांचे दाणे', 'डार्करूम', 'धग' इत्यादी एकूण तीस कादंबऱ्या. 'शिक्षण अधिक आठ कथा', 'वानगी', 'गरिबाघरची लेक' इत्यादी एकूण दहा कथासंग्रह त्यांनी लिहिले.

वऱ्हाडी जीवनातील अस्सल विनोद तेवढ्याच ताकदीने वऱ्हाडी बोलीत लिहिणारे बाजीराव पाटील. यांची 'भंडारवाडी' ही कादंबरी, 'मिरचीच्या खळ्यावर', 'दि ग्रेट झेड पी सर्कस' हे कथासंग्रह व वर्तमानपत्रात प्रकाशित झालेले लेख व कथा इत्यादी साहित्य लेखन आहे. वऱ्हाडच्या माणसामध्ये जी विसंगती आहे, त्यावर यांचा विनोद आधारलेला आहे. वऱ्हाडीतील दुःख, दारिद्र्य, अज्ञान, सोशिकता यांचे चित्रण त्यांच्या कथा - कादंबरीत दिसते.

लोकलयीचा आणि बहिणाबाई चौधरी यांचा वारसा लाभलेले प्रा. डॉ. विठ्ठल वाघांचे 'साय', 'काया मातीत मातीत', 'वैदर्भी', 'वृषभसूक्ते', 'पाऊसपाणी', 'कपाशीचे चंद्रफुले', 'पंढरीच्या वाटेवर', 'गावशिव', 'मायबाप', इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित आहेत. तसेच, 'डेबू' व 'डेबूजी' इत्यादी कादंबरी लेखन, 'अंधारयात्रा' नाटक, 'वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म', 'वऱ्हाडी म्हणी', 'वऱ्हाडीचा इतिहास' इत्यादी वऱ्हाडीवर संशोधनात्मक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

मनोहर तल्हार हे ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे 'बुंढीचे खाटलं', 'तेलरेघ', 'गोरीमोरी', 'निःसंग', 'कैन्सल', 'दुजा शोक वाहे' इत्यादी कथासंग्रह व 'माणूस' ही कादंबरी प्रसिद्ध आहे.

वऱ्हाडी बोलीचा लेखनासाठी प्रयोग करणारे पुरुषोत्तम बोरकर यांच्या 'मेड इन इंडिया' आणि 'आमदार निवास रूम नं. १७५६' या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. 'मेड इन इंडिया' या कादंबरीची भाषा ही आज इंग्रजी भाषेच्या प्रभावाने झालेल्या वऱ्हाडी बोलीचे रूप व्यक्त करणारी आहे.

सदानंद देशमुख यांनी 'अंधारबन', 'लचांड', 'उठावण', 'महालूट' या कथासंग्रहात दिवसेंदिवस बदलत चाललेल्या सामाजिक जीवनाचे चित्र रेखाटले आहे. ग्रामीण जीवन, आर्थिक ताणतणाव, संघर्ष ते कलात्मकतेने व्यक्त करतात. त्यांच्या 'तहान' कादंबरीमध्ये पाण्यासारखा महत्त्वाचा प्रश्न हाताळला. शेतकऱ्यांच्या जीवनातील बारोमास दारिद्र्य 'बारोमास' या कादंबरीत येते.

बाबाराव मुसळे यांनी वऱ्हाडी कथेप्रमाणे कादंबरीच्या दालनात मोठी भर घातली. 'मोहरलेला चंद्र', 'झिंगू लुखू लुखू', 'नगरभोजन' हे कथासंग्रह वऱ्हाडी संस्कृती साकार करतात. 'हाल्या हाल्या दुधू दे', 'पखाल', 'पाटीलकी', 'दंश', 'स्मशानभोग', 'वारूळ' इत्यादी कादंबऱ्यांतून विविध जातीतील जीवन त्यांच्याच बोलीभाषेत रेखाटलेले आहे.

कथाकार म्हणून विशेष प्रसिद्ध असलेल्या प्रतिमा इंगोले यांचे लेखन चौफेर आहे. कविता, कथा, कादंबरी, बालवाङ्मय इत्यादी विविध लेखनप्रकार त्यांनी हाताळले. त्यांचे 'हजारीचे बेलपान', 'अकसिदीचे दाणे', 'अंधारपर्व', 'सुगरणीचा खोपा', 'जावयाचं पोर', 'लेकभूईची', 'हिरवे स्वप्न' इत्यादी कथासंग्रह तसेच, 'उदयसोहळा', 'उद्‌कार' इत्यादी कवितासंग्रह, 'पार्ट टाइम' कादंबरी वऱ्हाडातील परिसर, येथील संस्कृती, लोकाचार, रीतीरिवाज, अंधश्रद्धा हे विषय घेऊन येतात.

वऱ्हाडी जनजीवन, वऱ्हाडी बोलीत आपल्या कवितेतून सादर करणारे शंकर बडे यांचा 'इरवा' हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, आणि अनेक संमेलनांतून त्यांच्या कवितेला प्रसिद्धी मिळाली आहे. सतीश तराळांचे 'आळ' आणि 'आग' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. परतवाडा जिल्ह्यातील अनिल पाटील यांचे 'बीजानं धरलाय कोंब' आणि 'आमी शेतकऱ्याची पोर' हे दोन कवितासंग्रह असून त्यांनी गझल हा काव्यप्रकार हाताळला आहे.

या साहित्यिकांप्रमाणे वऱ्हाडी बोलीत साहित्य लिहिणारे - वि. भि. कोलते (लव्हाळी), वामनराव चोरघडे (अम्मा), राष्ट्रसंत तुकडोजी व गाडगे बाबा (वऱ्हाडी बोलीतील समाजप्रबोधनपर भजने, कीर्तने), शरदचंद्र सिन्हा (वऱ्हाडमाती), देविदास सोटे, भाऊ मांडवकर (मेंगी), मधुकर वाकोडे (यांच्या कथा पेरणं, नंदी इत्यादी), अनुराधा वऱ्हाडे (आठवणीचा पाचोळा), बाबा मोहड (यमुनी), रफी अहमद बेग (धुयमाती), संतोष मुळावकर (तिबक सिक्सर), शैलजा गावंडे (मोगरा), मीरा ठाकरे (गाठजोळा-अप्रकाशित कवितासंग्रह), सुप्रिया अय्यर (ज्यांचं त्यांचं आभाळ), किशोर सानप (पांगुळवाडा), नरेंद्र इंगळे (पाचोळा), रमेश अंधारे (पागोरा), पुष्पराज गावंडे (यलाई), किशोर बळी (धुम्मस) या साहित्यिकांनी दर्जेदार लेखन केलेले आहे. वऱ्हाडी बोलीतील लेखनासंदर्भात या साहित्यिकांच्या लेखनाची दखल घेता येईल.

वऱ्हाडी बोलीचे संशोधन :

वऱ्हाडी बोलीचे स्वरूप प्रगट करण्याचे यापूर्वीचे प्रयात्न म्हणजे रामचंद्र आनंदराव उदास यांचा मराठी ज्ञानप्रसारकाच्या जानेवारी १८६५ च्या अंकातील 'वऱ्हाडप्रांताचे वर्णन' हा लेख (वर्ष १६, अंक १), त्याचप्रमाणे इतिहासकार या. मा. काळे यांचा 'वऱ्हाडातील मराठी भाषेचे स्वरूप' हा ग्रंथमालेतून प्रसिद्ध झालेला लेख (अंक १२६) व विचार - समीक्षा या लेखसंग्रहातील 'वऱ्हाडी लोकभाषा' हा श्री. वा. ना. देशपांडे यांचा मार्च १९२७ च्या विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झालेला लेख.

वऱ्हाडी बोलीतील लोकवाङ्मयाच्या अभ्यासकांनी वऱ्हाडी बोलीचा धावता आढावा घेतला आहे. प्रा. डॉ. विठ्ठल वाघांनी 'पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास' (अप्रकाशित प्रबंध, अमरावती विद्यापीठ, अमरावती) या प्रबांधातील प्रकरण दोनमध्ये परभाषांचा प्रभाव आणि सीमावर्ती भाषांचा प्रभाव या दोन उपविभागांत वऱ्हाडीवरील इतर भाषांचा झालेला परिणाम स्पष्ट केला आहे. शेवटी वऱ्हाडी बोलीचा शब्दकोश दिला आहे. डॉ. प्रतिमा इंगोले यांचाही प्रबंध वऱ्हाडीतील लोकवाङ्मयांतर्गत येणाऱ्या लोकगीतांवर आहे. 'वऱ्हाडी लोकगीताचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधात वऱ्हाडी लोकगीतात येणाऱ्या वऱ्हाडी बोलीवर बेतलेले एक प्रकरण आहे. 'वऱ्हाडी बोली' हा लेख 'भाषा आणि जीवन'मध्ये प्रकाशित झालेला आहे. ('भाषा आणि जीवन' : वर्ष २२, अंक १, हिवाळा २००४. पृ. १२.) यात विदर्भाची व्याप्ती, विदर्भाचा प्राचीन विस्तार, वऱ्हाडी बोलीत 'ण'चा अभाव, 'ओ' ऐवजी 'व' वापरतात, 'ला' विभक्ती प्रत्ययाऐवजी 'ले' वापरतात, असे काही वऱ्हाडीचे विशेष दाखविले आहेत. शेवटी वऱ्हाडी बोली उपेक्षित असल्याचे नोंदविले आहे. अशा स्वरूपाचे 'आजची वऱ्हाडी बोली स्वरूप व चिकित्सा' व 'वऱ्हाडी बोलीचा सामाजिक अनुबंध' असे दोन लेख प्रकाशित आहेत ('महाराष्ट्रातील समग्र बोलींचे लोकसाहित्यशास्त्रीय अध्ययन', २००६, पृ. १०६ - ११८). इंगोलेंचे 'वऱ्हाडी बोलीचा भाषाशास्त्रीय' अभ्यास हे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. मात्र, या पुस्तकाच्या शीर्षकाप्रमाणे त्या पुस्तकात काहीही नाही.

देविदास सोटे यांनी 'वैदर्भी बोलीचा शब्दकोश' निर्माण केला आहे. या कोशातील काही शब्द नागपूरकडील असले तरी आजही कितीतरी शब्द अकोल्याकडे उच्चारात आढळतात. या कोशातील, प्रा. डॉ. सुरेश डोळके यांची उपोद्धा उल्लेखनीय आहे (वैदर्भी बोलीचा शब्दकोश, देविदास सोटे, १९७४.).

'भाषाविज्ञान परिचय' या पुस्तकात प्रा. डॉ. स. गं. मालशे यांच्या मराठीच्या प्रमुख बोली या पुस्तकात वऱ्हाडीवरील एक लेख आहे. ('भाषाविज्ञान परिचय', १९८७, पृ. १०१). वऱ्हाडीचा धावता परिचय करून देण्यास हा लेख परिपूर्ण आहे.

Deccan College Post Graduate and Research Institute च्या प्रा. डॉ. माधुरी भागवतांनी "A Study of Varhadi Dialect in the neighbour hood of Akola' या विषयांतर्गत विदर्भातील अकोल्यापासून अठरा मैलांवरील असलेल्या म्हैसांग या खेडेगावात बोलल्या जाणाऱ्या वऱ्हाडी बोलीचा भाषाशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केलेला आहे. या प्रबंधाची भाषा इंग्रजी आहे. त्यामुळे 'Male' या वऱ्हाडीतील सर्वनामाचा उच्चार 'माले' होते की 'मले' होते, हे अमराठी अभ्यासकांच्या लक्षात येईल, असे वाटत नाही. तसेच, मूर्धन्य 'ण' चा उच्चार वऱ्हाडीत होतो. अशा वऱ्हाडी बोलीच्या उच्चार प्रवृतीशी विसंगत काही नोंदी आढळतात.

प्रा. डॉ. रावसाहेब काळे यांचे, भाषेसाठी वाहिलेल्या 'भाषा आणि जीवन'मधील 'वऱ्हाडी बोलीची उच्चार प्रवृती' व 'घाटावरील वऱ्हाडी बोली' हे दोन लेख महत्त्वाचे असले तरी, ते त्या विषयाला संपूर्ण न्याय देतील एवढे विस्तृत नाहीत. मात्र, डॉ. काळे यांनी 'वऱ्हाडी बोली व तिच्या स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास' हा संशोधनासाठी विषय घेऊन वऱ्हाडीचा भाषाशास्त्रीय अभ्यास केला आहे.

वऱ्हाडी बोलीतील कोश :

यापूर्वी वऱ्हाडी बोलीचा शब्दकोश देविदास सोटे यांनी १९७४ साली 'वैदर्भीय बोली' या नावाने प्रकाशित केलेला आहे. हा वऱ्हाडी बोलीभाषेचा एकमेव शब्दकोश आहे. नंतर, असा शब्दकोश कोणी काढण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. देविदास सोटे हे वर्धा येथील असल्याने त्यांच्या शब्दकोशात नागपुरी बोलीतील शब्द आले आहेत. डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांनी नागपुरी बोली ही एक स्वतंत्र बोली असल्याचे सिद्ध केले आहे.

वऱ्हाडी बोलीवर संशोधन करणाऱ्या अभ्यासकांनी वऱ्हाडी बोलीतील काही शब्द आपल्या कोशात दिलेले आहेत. यामध्ये, प्रा. डॉ. माधुरी भागवत यांनी `A Study of Varhadi Dialect in the neighbourhood of Akola' या विषयावर अभ्यास करताना वऱ्हाडी

शब्द वापरले आहेत. विश्लेषणात आणि सूचीत चार हजार वऱ्हाडी शब्द दिलेले आहेत. तसेच, वऱ्हाडी बोलीतील लोकवाङ्मयाचा अभ्यास कारणाऱ्या अभ्यासकांनी आपल्या प्रबंधाच्या शेवटी वऱ्हाडी शब्दांची सूची दिलेली आढळते. त्यात 'पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास' या आपल्या प्रबंधात डॉ. विठ्ठल वाघांनी काही शब्दचांची सूची दिली आहे. तसेच, वऱ्हाडीत लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या साहित्यात आलेल्या वऱ्हाडी शब्दांचा अर्थ वाचकांना कळावा म्हणून कादंबरी, कवितासंग्रह यांच्या शेवटी शब्दांची सूची दिली आहे. उदा., 'काया मातीत मातीत'- विठ्ठल वाघ, 'पागोरा'- रमेश अंधारे, 'भुलाई'-प्रतिमा इंगोले इत्यादी.

शब्दसंकलनाची पद्धती :

संकलित असलेल्या १२३४० शब्दांनंतर नवीन शब्द शोधण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रत्येक विषयाशी संबंधित सूची तयार करण्यात आली. वऱ्हाडामध्ये येणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील काही गावे निश्चित केली. ही गावे निश्चित करताना पुढील बाबी लक्षात घेतल्या, - (१) गाव किमान शहरापासून २०-२५ कि. मी. अंतरावर असावे, (२) इतर गावांपेक्षा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे गाव, (३) एखाद्या देऊळ, ठिकाण, ऐतिहासिक घटना/व्यक्ती या काही कारणाने प्रसिद्ध असल्यास त्या गावाची दखल घ्यावी, (४) अशा गावांची संख्या जास्त असली तरी ते ती गावे मुलाखतीसाठी निश्चित करावी, (५) एकाच तालुक्यातील दोन गावे निवडताना त्यातील अंतर १५ कि.मी. पेक्षा कमी नसावी, (६) ज्या गावात मित्र, नातलग, किंवा कोणत्यातरी कारणाने ओळखीचे असलेल्या गावांना प्राधान्य द्यावे, इत्यादी. तसेच, मुलाखत कोणाची घ्यावी हेही ठरविले होते. मुलाखती घेताना वय, लिंग व सामाजिक दर्जा या बाबी लक्षात घेतल्या. म्हणजे, २५ वर्षांखालील, ४० वर्षांखालील, ६० वर्षांखालील स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेतल्या. वेगळी जात, वेगळा व्यवसाय, त्यांनुसार मुलाखत अशा प्रकारे वरील तिन्ही वयोगटांतील स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखत ही लवचीक स्वरूपाची ठेवली. माहितगाराचा मानसिक कल पाहून मुलाखतींचे स्वरूप बदलविले.

वऱ्हाडी लोकवाङ्मयाचा अभ्यास करताना असे लक्षात आले की, काही शब्द आज वऱ्हाडी भाषिक व्यवहारातून नाहीसे झाले. माहितीगारांच्या मुलाखतीत ते आले नाही. 'कासोटा सुटला अबोला मिटला' ही म्हण वापरात आढळली मात्र, 'कासोटा' हा ४० वर्षांखालील माहितीगाराच्या उच्चारात आढळला नाही. त्यावरून काही शब्द हे ६० वर्षांखालील माहितगारांच्या उच्चारातून लुप्त झाले असल्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे वऱ्हाडी बोलीतील लोकवाङ्मयाचा या दृष्टीने अभ्यास केला. त्यात आढळणारे शब्द संदर्भांसह नोंदविले. त्या शब्दाचा उच्चार ध्वनिमुद्रित करण्यासाठी त्या अनुषंगाने मुलाखती घेण्याचा प्रयत्न केला.

काही मर्यादा :

वऱ्हाडी बोलीतील प्रत्येक शब्द येथे नोंदविण्याचा प्रयत्न केलेला असला तरीही हा कोश वऱ्हाडी बोलीतील परिपूर्ण कोश आहे, असे म्हणता येणार नाही. आज वऱ्हाडी बोलीत प्रचलित असलेले काही शब्द कोशात आले नसण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

(१) प्रमाण भाषेतील शब्द एखाद्या बोलीत उच्चारात असला तरी तो प्रमाण भाषेसारखा उच्चारात स्थिर असेल, असे निश्चित सांगता येणार नाही. कारण, त्या बोलीभाषेची उच्चार प्रवृत्ती त्या शब्दच्या उच्चारात बदल करू शकते. उदा., वऱ्हाडीत शब्दांतर्गत येणाऱ्या स्वराचा लोप होतो. यावरून कोणता > कोन्ता, सांगतो >सांग्तो, दुःख > दूख/दूक, स्वतः > सोता/स्वता, अशा सर्व शब्दांची नोंद येथे केली नाही.

(२) एखाद्या प्रदेशातील विशिष्ट बोली बोलणाऱ्या भाषकांच्या उच्चारात येणारा प्रत्येक शब्द हा त्या बोलीचा असतो. मग तो शब्द प्रमाण भाषेतील असो, त्या बोलीच्या संपर्कात येणाऱ्या कोणत्याही भाषेतील/बोलीतील असो; तो त्या बोलीचा होऊन जातो. आज जागतिकीकरणाने इंग्रजी भाषेचा प्रभाव हा इतर भाषांप्रमाणे वऱ्हाडीवरही पडलेला आहे. या दृष्टीने 'मेड इन इंडीया' या कादंबरीच्या भाषेचा उल्लेख करता येतो. या इंग्रजी शब्दांची नोंद या कोशात घेतली गेली नाही.

(३) काही शब्दांचा अर्थ एक पक्षी, एक वस्तू असा देण्यात आला आहे. वास्तविक एखादे चित्र देऊन त्या शब्दाचा अचूक अर्थ निर्देश करता आला असता. मात्र, कोशाचा मूळ हेतू व मर्यादा या लक्षात घेऊन, तसे करता आले नाही.

(४) भाषा/बोली ही प्रदेशानुसार जशी बदलते तशी काळानुसारही. आजच्या वऱ्हाडीत प्रचलित असलेले अनेक शब्द उद्या लुप्त होतील आणि त्याजागी दुसरे/ इतर भाषेतील शब्द रूढ होतील ही सगळी नोंद होण्यासाठी शब्दकोशाचे काम हे कधी न संपणारे आहे. पुढील काळात हा वारसा कोणी चालविला तरच या नवीन शब्दांची नोंद कोशात होऊ शकते.

शब्दकोशाचे स्वरूप :

हा शब्दाकोश वऱ्हाडी - मराठी अशा स्वरूपाचा आहे. यात वऱ्हाडी बोलीत उच्चारात व लेखनात आढळलेले शब्द देण्यात आले. वऱ्हाडी बोलीत उच्चारात असणारा शब्द त्यापुढे त्याचे व्याकरणविशेष दिले आहेत. प्रत्येक शब्दापुढे त्याच्या जातीचा उल्लेख केला आहे. नंतर, प्रमाण मराठीतील त्या शब्दाचा अर्थ देण्यात आला. वाच्यार्थासोबत काही लक्षणेने मिळणाऱ्या अर्थाची नोंद केलेली आहे. वऱ्हाडी बोलीतील शब्दाचा अर्थ अचूक लागावा म्हणून प्राचीन ते आधुनिक वाङ्मयात त्या शब्दाचा उपयोग असणारे संदर्भ दिले आहेत. तर कधी लोकवाङ्मयाचाही आधार घेतला आहे. त्यापुढे कंसात त्या शब्दाची उत्पत्ती आढळल्यास त्याची नोंद करून ज्या भाषेतून तो

शब्द आला त्या भाषेत त्याचा जसा उच्चार होतो तसा देण्यात आला.

महानुभवांपासून ते तुकडोजी महारांजांच्या ग्रामगीतेपर्यंत सर्व संतसाहित्याचा वऱ्हाडी शब्दकोशाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला. वऱ्हाडी उच्चारात आढळत असलेल्या शब्दापुढे त्या-त्या ग्रंथाचा संदर्भ देण्यात आला. याचा एक उद्देश हाही आहे की, अ-वऱ्हाडी भाषिकाला वऱ्हाडी शब्दाचा अचूक अर्थ लावण्यास या संदर्भाची मदत व्हावी.

वऱ्हाडी बालीत निर्माण झालेले लोकवाङ्मय आणि लिखित वाङ्मय यातील संदर्भांचाही उपयोग या कोशात केला आहे. म्हणी, लोकगीते, कथा यांतील आज लुप्त होत जाणारे शब्द आणि त्यांचा अर्थ संदर्भांसह देण्यात आला. तसेच, आज वऱ्हाडी बोलीत कविता, कथा, कादंबरीसारखे लिखित साहित्य विपुल प्रमाणत निर्माण होत आहे. त्याचेही येथे या शब्दकोशाच्या दृष्टीने अवलोकन करण्यात आले.

नामे व सर्वनामे यांना विभक्ती प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लावताना मूळ शब्दाच्या रूपात थोडा बदल होत असल्याने ते बदललेले रूप व क्रियापदाची वेगवेगळी रूपे यांचीही नोंद केली आहे. काही शब्दांचे अर्थ हे उपरोधिकपणे योजल्याने बदलतात. तेही अर्थ नोंदविले आहेत. तसेच, सामासिक शब्द, ध्वन्यानुकरणाने येणारे शब्द, प्रत्यय लागून तयार होणारे शब्द प्रस्तुत शब्दकोशात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

वऱ्हाडी बोलीचे स्वरूप

वऱ्हाडी बोलीचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी प्रमाण मराठी व वऱ्हाडी बोली यांतील साम्य-भेदांची नोंद केली आहे. तसेच, वऱ्हाडी बोलीवर झालेला अन्य भाषांचा परिणाम, घाटावरील वऱ्हाडी बोली, वऱ्हाडी बोली व नागपुरी बोली, वऱ्हाडी बोली व झाडी बोली या शीर्षकांतर्गत विवेचन करून वऱ्हाडी बोलीचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रमाण मराठी व वऱ्हाडी बोली :

वर्णविचार : प्रमाण मराठीतील 'ऋ', 'ऌ', 'ऐ', 'औ' हे स्वर तसेच, 'ञ्', 'ण्', 'ष्', 'क्ष्', 'ज्ञ्' ही व्यंजने वऱ्हाडी भाषिक व्यवहारात आढळत नाहीत. मराठीत जेथे या वर्णाचा अढळ होतो तेथे वऱ्हाडी बोलीत या वर्णांचे उच्चारसाम्य असणाऱ्या वर्णाचा उच्चार होतो (उदा., ष>श). संयुक्त वर्णांचे विभाजन करून उच्चार होतो (उदा., ऐ>अ + इ).

स्वरप्रक्रिया :

(१) प्रमाण मराठीत ज्या पदात 'आ', 'उ', 'ओ' हे स्वर येतात तेथे वऱ्हाडीत 'अ' या स्वराचा उच्चार होतो.

आ>अ : आकार>अकार, आकाशदिवा>अग्सदिवा, आखाडा>अखाळा, आळशी>अयदी,

उ>अ : लसून>लसन,

ओ>अ : ओझ>वझ, बोलावणे>बलाव, पोळपाट>पयपाट, फोटो>फटू,

(२) प्रमाण मराठीतील 'अ', विसर्ग याचा 'आ' होतो -

अ>आ : अजून>आजूक, वर्ण>वान, विसर्ग>आ : स्वतः>सोता.

(३) 'अ', 'ए', 'ऐ', 'उ' चा वऱ्हाडीत 'इ' होतो -

अ>इ : झरा>झिरा, खपली>खिपली, ए>इ : उजेड>उजीळ, घमेले>घमील,

ऐ>इ : नैवद्य>निवद, उ>इ : कैतुक>कवतीक, नुसते>निसत.

(४) 'ओ'चा 'उ' होतो -

ओ>उ : अगोदर> अगुदर, कोठे>कुठी.

(५) 'आ', 'इ'चा वऱ्हाडीत 'ए' होतो -

आ>अ : (मराठीतील द्वितीय व चतुर्थीचा 'ला' प्रत्यय वऱ्हाडीत 'ए' होतो.)
त्याला>त्याले, मला>मले,

इ>ए : दिले>देल, सेनिमा>सेनेमा.

(६) 'ओ', 'उ'चा 'ओ' होतो -

आ>ओ : पापुद्रा>पोपळा,

उ>ओ : झुंड>झोंड, नामुषकी>नामोसी.

क्वचित जोडाक्षरातील द्वितीय व व्यंजनाचा 'ओ' होतो स्वर्ग>सोर्ग, स्वतः>सोता. तसेच, 'अव', 'अवी'बद्दल 'ओ'चा आदेश होतो.

अव>ओ : जवळ>जोळ, भरवसा>भरोसा, अवी>ओ : डविला>उळोला, घडविला>घडोला.

वऱ्हाडीत नसणाऱ्या स्वरांची प्रक्रिया :

(१) 'ऋ'ची प्रक्रिया :

वऱ्हाडीत 'ऋ'चा 'अ', 'आ', 'इ', 'उ' + 'र्', 'र' + 'इ', 'र्' + 'उ' होतो -

ऋ>अ : बृहस्पतिवार>बस्तरवार, ऋ>आ : नृत्या>नाच, मृत्कीट>माकोळा,
ऋ>इ : कृष्ण>किसन, वृश्चिक>इचू, ऋ>उ + र : कृपा>कुरपा,
ऋ>र + इ : ऋण>रीन, ऋ>उ + र : कृपा>कुरपा.

(२) 'ऐ'ची प्रक्रिया :

प्रमाण मराठीतील 'ए' ह्या संयुक्त स्वराचा उच्चार वऱ्हाडीत 'अइ', 'अय्' होतो -

ऐ>अई : चैन>चईन, बैल>बईल, ऐ>अय : पैसा>पयसा, मैना>मयना.

(३) 'औ'ची प्रक्रिया :

प्रमाण मराठीतील 'औ'चा उच्चार वऱ्हाडीत 'उ', 'अउ', 'आउ', 'अव्', 'आव्', असा होतो -

औ>उ : पौष>पूस (/पुख्), औ>अउ : चौक>चऊक,
औ>आउ : औत>आऊत, औ>अव : कौतुक>कवतीक, चौथा>चवथा.

(४) विसर्ग :

दुःख>दूक, स्वतः>सोता अशा प्रकारे विसर्गाचा लोप वऱ्हाडीत होतो किंवा 'आ'चा आदेश होतो.

वऱ्हाडीतील व्यंजनप्रक्रिया :

(१) प्रमाण मराठीतील शब्दांतर्गत येणाऱ्या 'ख'चा उच्चार 'क' होतो -

ख>क : आणखी>आनीक, खिसणी>खिसनी, दुख>दूक, सुख>सूक.

(२) प्रमाण मराठीतील 'क'चा वऱ्हाडीत 'ख' होतो -

क>ख : चोकन>चोखान, साकर>साखर,

(३) प्रमाण मराठीतील 'क', 'ख', 'घ' बद्दल वऱ्हाडीत 'ग' येतो -

क>ग : भक्त>भगत, रक्त>रगत, ख>ग : खटपट>गटपट, खडीसाकर>गळीसाखर,
घ>ग : निघ>निंग, माघ>माग.

(४) प्रमाण मराठीतील शब्दांतर्गत 'चा' षष्ठी प्रत्ययापूर्वी येणाऱ्या 'ज', 'त', 'थ' या वर्णांचा उच्चार वऱ्हाडीत 'च्' होतो -

ज>च् : आजचा>आच्चा, रोजचा>रोच्चा, त>च् : रातचा>राच्चा, सातचा>साच्चा,
थ>च् : तेथचा>तेच्चा, येथचा>अच्चा.

(५) प्रमाण मराठीतील काही शब्दांतील तालव्य 'ज'चा उच्चार वऱ्हाडीत दंततालव्य होतो.

(प्रमाण मराठी) तालव्य (वऱ्हाडी) दंततालव्य

जगात : जगात, जन्म : जलम, जेवढा : जेवळा, जमते : जमते.

(६) प्रमाण मराठीतील 'झ', 'ज्ञ'चा उच्चार वऱ्हाडीत 'ज' होतो -

झ>ज : विझला>इजला, ज्ञ>ज : अज्ञान>अजान.

(७) प्रमाण मराठीतील दंत्य 'त' व्यंजनाचा मूर्धन्य 'ट्' उच्चार होतो -

त>ट् : भेटते>भेट्टे, वाटते>वाट्टे.

(८) प्रमाण मराठीतील 'थ', 'र', 'ष', 'ष्ण'चा उच्चार 'ठ्', 'ठ' होतो -

थ>ठ : अथी>अठी, मथाटी>मठाटी, र>ठ् : दारवंटा>दाठ्ठा, वरठी>वठ्ठी, ष्ण>ठ : विष्णू>विठू.

(९) प्रमाण मराठीतील 'थ'चा वऱ्हाडीत 'त' उच्चार होतो - थ>त : काथ>कात, येथून>अतून.

(१०) प्रमाण मराठीतील 'त' आणि 'स्त' ह्या संयुक्त वर्णाचा वऱ्हाडीत 'थ' होतो -

त>थ : कांत>कंथ, दातखिळी>दाथखाई, स्त>थ : स्तन>थान.

(११) प्रमाण मराठीतील 'ध' ऐवजी वऱ्हाडीत 'द'चा उच्चार होतो -

ध>द : अर्ध>अर्द, कधी>कदी.

(१२) प्रमाण मराठीतील मूर्धन्य 'ण' ऐवजी वऱ्हाडीत दंत्य 'न'चा उच्चार होतो. वऱ्हाडीत मूर्धन्य 'ण'चा उच्चार होतच नाही. - ण>न :

मध्यस्थानीय : आणिक>आनीक, कणीस>कनूस,

अंत्यस्थानीय : आण>आन, जोगीण>जोगन.

(१३) प्रमाण मराठीतील 'फ', 'ब'बद्दल वऱ्हाडीत 'प'चा उच्चार होतो -

फ>प : गंजिफा>गंजिपा, तडफ>तळप, ब>प : गायब>गायप, ट्युब (इं.)>टूप.

(१४) प्रमाण मराठीतील काही पदात येणाऱ्या 'व'बद्दल वऱ्हाडीत 'ब'चा उच्चार होतो -

व>ब : वखार>बखार, वरताव>बरताव.

(१५) प्रमाण मराठीतील 'फ', 'ब'बद्दल सजातीय 'भ'चा उच्चार होतो -

फ>भ : फतकन>भदकन, फुसकट>भुसकट, ब>भ : बगुणं>भगून, लुबरा>लुभरा.

(१६) प्रमाण मराठीतील शब्दांतर्गत 'म'चा होणारा अर्धउच्चार वऱ्हाडीत पूर्णउच्चार करण्याची लकब असल्यामुळे या पूर्णउच्चारित 'म'च्या प्रभावाने 'ब'चा लोप होतो -

कोंब>कोम, निंब>नीम, बोंब>बोम.

(१७) मराठीतील शब्दारंभी विशुद्ध स्वरूपात येणाऱ्या 'ए' या स्वराचा उच्चार वऱ्हाडीत 'य'चा आगम होऊन होतो -

ए>य : एक>येक, एवढा>येवळा.

'व' श्रृतीबद्दल 'य' श्रृती होण्याची वऱ्हाडीची प्रवृती आहे -

व>य : वेगळे>येगळे, वेल>येल.

महाप्राण 'ह' व मूर्धन्य 'ळ'चा उच्चार 'य' होतो -

ह>य : कहाणी>कायनी, पाहटी>पायटी, ळ>य : ओळख>ओयख, डोळा>डोया.

वऱ्हाडीत बहुवचनी सामान्यरूपाचा प्रभाव म्हणून 'य'चा आगम होतो -

माणसांनी>मान्सायन, लोकांसाठी>लोकायसाठी.

(१८) प्रमाण मराठीतील 'ऊ ', 'ओ', 'औ', 'ग', 'म', 'या' ह्या ऐवजी 'व' श्रृती येतो -

ऊ >व : भाऊ बीज>भावबीज,

ओ>व : ओटी>वटी, ओटा>वटा, औ>अव : कौतुक>कवतूक, नोकर>नवकर,

ग>व : जुगारी>जुवारी, म>व : आमंत्रण>आवतन, कुमारी>कुवारी,

य>व : उपाय>उपाव, भय>भेव.

प्रमाण मराठीतील 'इ' स्वरांतर्गत येणाऱ्या 'व'चा वऱ्हाडीत लोप होतो -

व>लोप : विसरणे>इसर, विंचू>इचू.

इतर ठिकाणी होणारा 'व'चा लोप -

उपवाशी>उपाशी, जिवंत>जितं, स्वभाव>सभाव, स्वस्त>स्सत.

(१९) प्रमाण मराठीतील 'क', 'ट', व 'र'बद्दल 'ल' येतो -

क>ल : इतक्यात>इतल्यात, जितके>जितलं, ट>ल : एकटा>येकला, एकटी>येकली,

र>ल : रड>लळ, रेवडी>लेवळी.

(२०) प्रमाण मराठीतील 'श', 'ष'बद्दल 'स'चा उच्चार होतो -

च>स : खचणे>खसनं, भाचा>भासा, झ>स : झटकन>सटकन, शरम>सरम,

श>स : नाश>नास, शाप>सराप, ष>स : पौष>पूस, मिष>मीस,

श्र>स : आश्रय>आसरा, श्रावण>सरावन.

(२१) मराठीत येणाऱ्या 'ह' युक्त संयुक्त व्यंजनातील 'ह'-कराचा लोप होऊन त्यापूर्वी उच्चारल्या जाणाऱ्या अल्पप्राणाचा पूर्ण उच्चार वऱ्हाडीत होतो - केव्हा>कवा, जिल्हा>जिला, ब्रम्हण>बामन, उन्ह>ऊन.

मराठीत काही पदात स्वरांतर्गत येणाऱ्या 'ह'चा लोप होतो. उदा.

तहान>तान, नाही>नाई, बहीण>बईन, विहीर>ईर.

मराठीत दोन अक्षरी शब्दांती स्वरयुक्त 'ह' आल्यास वऱ्हाडीत या दोन अक्षरी शब्दाचे संयुक्त किंवा स्वरयुक्त एकाच वर्णाचा उच्चार होतो - उदा.

चहा>च्या, दहा>दा, सहा>सा.

(२२) प्रमाण मराठीत येणाऱ्या काही शब्दातील 'ड', 'ढ'चा उच्चार वऱ्हाडीत 'ळ' होतो -

ड>ळ : अडाणी>अळानी, झाड>झाळ, ढ>ळ : केवढा>केवळा, पुढे>पुळे.

स्वरांतर्गत येणाऱ्या 'ळ'चा वऱ्हाडीत लोप होतो -

जाळी>जाई, विळा>इवा, वेटोळी>येटोई.

अनुनासिक : प्रमाण मराठीतील 'ङ्', 'ञ', 'ण', 'न', 'म' या पाच अनुनासिकांच्यापैकी वऱ्हाडीत 'ङ्', 'न', 'म', या तीन अनुनासिकांचा उच्चार होतो. 'ञ', आणि 'ण' या दोन अनुनासिकांचा उच्चार वऱ्हाडीत होत नाही.

ङ् : मंग (मघ), सांग (सांगणे), न : घंटा (घंटा), मुंदी (आंगठी),

म : उंबाळा (रडण्याची हबक), खांबा (खाम).

प्रमाण मराठीतील काही पदात उच्चारात आढळणारा अनुनासिक उच्चार वऱ्हाडीत लोप पावतो - उदा.

उंट>ऊट, ओंजळ>आजोई, चिंच>चीच, पंख>पख.

तर, काही पदात नसलेले अनुनासिक उच्चार वऱ्हाडीत होताना दिसते - उदा.

मधला>मंधवा, मध्ये>मंधी, मुद्रिका>मुंदी.

मराठीतील नामाच्या व सर्वनामाच्या सामान्यरूपाच्या अनेकवचनी प्रत्ययावर येणाऱ्या सानुनासिक उच्चार वऱ्हाडीत निरानुनासिक होतो. उदा. लोकांना>लोकाले, सर्वांना>सरवाईले.

संयुक्त व्यंजने : प्रमाण मराठातील काही शब्दांत येणारा संयुक्त उच्चार वऱ्हाडीत होत नाही - उदा.

आद्यस्थानी : ग्रहन>गिरान, प्रकार>परकार, प्रसंग>परसंग, भ्रम>भरम.

तर कधी, शब्दांतर्गत येणाऱ्या एखाद्या वर्णाचा लोप होऊन - म्हैस>मईस, व्यवसाय>येवसा, स्तोभ>थोब.

मध्यस्थानी : वर्णग्रमाद्वारे : कृष्ण>किसन, जन्म>जलम,

वर्णलोपाद्वारे : केव्हा>कई, नैवेद्य>निवद.

मराठीत ज्या शब्दांत संयुक्त व्यंजनाचा उच्चार होत नाही, तेथेही वऱ्हाडीत संयुक्त व्यंजनाचा उच्चार होतो.

आद्यस्थानी : महाजन>म्हाजन,

मध्यस्थानी : आजचा>आच्चा, हुरडा>हुळ्ळा.

प्रमाण मराठी ते वऱ्हाडी असा वर्णप्रक्रियेचा विचार करताना असे लक्षात येते की, प्रमाण मराठीतील एखाद्या वर्णाबद्दल येणारा वऱ्हाडीतील वर्ण हा सजातीय असतो. वरील सर्व प्रक्रिया विशिष्ट शब्दांत घडून येतात. फक्त मूर्धन्य 'ण'बद्दल दंत्य 'न्' होण्याची प्रक्रिया सर्वत्र आढळून येतो.

संधी : वऱ्हाडीत पूर्वरूप संधी व पररूप संधीचे विशेष असे मांडता येतात की, मराठीप्रमाणे वऱ्हाडीतही सजातीय स्वर एका पुढे एक आले असता, त्यामधील दीर्घ स्वर संधीत कायम राहतो. उदा.

पूर्वरूप संधी : गेला + असीन = गेलासीन (गेला असेल), दरवाजा + आत = दरोजात (दरवाजात).

पररूप संधी : दाना + ओळ = दानोळा (विखुरलेले दाणे), वयन् + आट = वयनाट (पाणी जाण्याचा मार्ग).

व्यंजन संधी : (१) पहिल्या शब्दांती 'त' दंत्य व्यंजनापुढे म्हणजे दुसऱ्या शब्दारंभी 'च' आल्यास 'न' लोप पावून 'च'चे द्वित्त होते.

उदा., बात् + चीत = बाचचीत (बोलचाल).

(२) 'न' ह्या व्यंजनापुढे कठोर वर्ण 'त', 'फ' आल्यास तेच संधीत कायम राहून 'न' या अनुनासिकाचा लोप होतो. उदा.,

तिन् + फन = तिफन (पेरणीचे औत).

तर, काही शब्दांत तो कायम राहतो. उदा., दोन् + तोंड = दुतोंड्या (दोन तोंड असलेला).

विसर्गसंधी : वऱ्हाडीत विसर्गोच्चार होत नाही. मराठीत विसर्गाचा संधी होऊन जे शब्द तयार झाले आहेत. त्यांच्यांत वर्णप्रक्रिया होऊन वऱ्हाडीत उच्चारली जातात. उदा.

दुः + काल = दुःकाल> दुकाय, पुनः + जन्म = पुनर्जन्म>पुनर्जलम.

अंतः संधी : मराठी शब्दांतर्गत 'अ' + 'व्' व 'अ'+ 'वि'यांचे वऱ्हाडीत 'ओ' असा दृढ संधी होतो. उदा.,

जवळ>जोळ, घडविला>घडोला.

अभ्यस्तता : प्रमाण मराठीत क्वचित आढळणारी शब्दयुग्मके वऱ्हाडीत विपुल प्रमाणात उच्चारली जातात. एकेरी शब्द जो अर्थ व्यक्त करतो त्या अर्थाचा परीघ शब्दयुग्मातून विस्तारित केला जातो. उदा.,

अलताभलता (कोणीतरी), ओयखपायख (ओळख), कातरकातर (हळूहळू), फुकफाक (पेटविणे), सकायवकाय (लवकर).

वर्णव्यत्यास : प्रमाण मराठीतील काही शब्द वऱ्हाडीत उच्चारताना वर्णव्यत्यास घडून येतो. उदा.,

अर्ध>अधुरं, ओंजळ>आंजोई, खांब>खंबा, नवतरुणी>नयतुरनी, पिशवी>पिवशी.

समवर्णलोप : प्रमाण मराठीतील काही शब्दांचे उच्चार वऱ्हाडीत होताना पुढील प्रक्रिया घडून येते.

ब : जबाब>जाब, य : अन्याय>अन्याव, दररोज>दरोज, स : खसखस>खाकस.

वर्णलोप : प्रमाण मराठीतील काही शब्दांचे उच्चार वऱ्हाडीत होताना वर्णलोप होतो. उदा.,

ख : दाखविणे>दाव, ड : इकडून>इकून, ण : कुंपण>कूप, त : मागितले>मांगलं,

द : चांदनी>चांनी, र : तर>त, व : सवटी>सटी, ह : काही>काई.

स्वरभक्ती : इ : ग्रहन>गिरान, लग्न>लगीन, व्याही>इवाई (/ इवाही), ए : ज्वरी>जेवारी.

स्वरलोप : अ : महाजन>म्हाजन, इ : अहिता (प्राचीन मराठी) > आयता, जोगीन > जोगन, ए : कित्येक>कईक, केव्हा>कई.

द्वित वर्ण : (१) मराठीतील शब्दांतर्गत 'अ' ह्या स्वराचा लोप झाल्याने पूर्वव्यंजनापेक्षा उत्तरव्यंजन प्रभावी ठरल्याने उत्तरव्यंजनाचे द्वित होते व पूर्वव्यंजन लोप पावते. उदा., आजचा>आच्चा, रोजचा>रोच्चा.

(२) पूर्ववर्ण प्रभावी ठरून उत्तरवर्णाला आपल्यासारखे करते. उदा., भेटते>भेट्टे, सुटते>सुट्टे.

(क) रूपविचार :

नामे : प्रमाण मरीठीतील 'ए'-कारांत आडनावे वऱ्हाडीत उपहसात्मकतेने उच्चारलेली असल्यास 'या' कारांत होतात.

उदा. काळे - काळ्या, बढे - बळ्या.

वचन : मराठीप्रमाणे वऱ्हाडीतही एकवचन व अनेकवचन अशी दोन वचने आहेत.

पुल्लिंगी नामे :

(१) प्रमाण मराठीतील 'अ'-कारांत पुल्लिंगी नामांचे अनेकवचन एकवचनाप्रमाणे म्हणजे, 'अ'-कारांत असते. वऱ्हाडीत 'अ'काराला दीर्घत्व देऊन अनेकवचन केले जाते. उदा., बईल - बईल (बैल), सरप साप.

(२) प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीतही 'आ'-कारांत नामांचे अनेकवचन 'ए'-कारांत होते. उदा.आंबा - आंबे (आंबे), मासा - मासे.

(३) प्रमाण मराठीप्रमाणे काही पुल्लिंगी नामाचे अनेकवचन केले जात नाही. तेही वऱ्हाडीत अनेकवचनी होताना दिसतात.

उदा., सल्ला - सल्ले.

स्त्रीलिंगी नामे :

(१) 'अ', 'आ', 'ई', 'ऊ'-कारन्त स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन मराठीप्रमाणेच होते. अनुक्रमे 'आ' / 'इ', 'आ', 'या', 'वा'-कारांत होते.

'आ'-कारांत स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन एकवचनासारखेच राहते. वऱ्हाडीत नामांतीचा 'आ' स्वराचा दीर्घ उच्चार केला जातो.

(२) प्रमाण मराठीत ज्या स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन होत नाही, ते नामे वऱ्हाडीत अनेकवचनी होतात.

उदा., भूक - भुका, लाज - लाजा, सरम - सरमा.

नपुंसकलिंगी नामे :

(१) प्रमाण मराठीत 'अ', 'ई', 'ऊ ', 'ए'-करांत नपुंसकलिंगी नामांचे अनेकवचन अनुक्रमे 'ए', 'ए' (विकल्पाने 'य'चा आदेश होतो), 'ए', 'ई'-करांत होते. वऱ्हाडीत अनुक्रमे 'अ', 'अ', 'ए'-करांत होते.

(२) प्रमाण मराठीत 'अ'-कारांत नपुंसकलिंगी नामांचे अनेकवचन 'ए'-करांत होते तेथे वऱ्हाडीत दीर्घ 'अ'- कारांत केले जाते.

(४) काही नामांचे वऱ्हाडीत अनेकवचन होते. उदा., रगत - रगती.

लिंग :

(१) प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीत पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिंगी अशी नामांची तीन लिंगे आहेत. प्रमाण मराठी व वऱ्हाडी यांच्यात लिंगव्यवस्था सारखीच आहे.

(२) जेथे प्रमाण मराठीत काही प्राणिवाचक पुल्लिंगी शब्दांना 'ईण' हा प्रत्यय लागून स्त्रीलिंगी रूपे होतात; तेथे, वऱ्हाडीत 'ईन' हा प्रत्यय लागून स्त्रीलिंगी रूप तयार होते. उदा., कलाल - कलालीन, सायब - सायबीन.

विभक्ती :

<u>कोष्टक क्र. १</u>

क्र. विभक्ती	प्रमाण मराठी विभक्ती प्रत्यय		वऱ्हाडी विभक्ती प्रत्यय	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
(१) प्रथमा	०	०	०	०
(२) द्वितीया	स, ला, ते,	स, ला, ना, ते	स, ले,	स, ले, ना,
(३) तृतीया	ने	नो	न	न,
(४) चतुर्थी	स, ला, ते	स, ला, ना, ते	स, ले	स, ले, ना,
(५) पंचमी	ऊन, हून,	ऊन, हून,	उन्, हुन्	उन् हुन्,
(६) षष्ठी	चा, ची, चे झा, झी, झे,	चे, च्या, ची, या, इ, य	चा, चि, चे, य, इ, या,	चे, चा, चे,
(७) सप्तमी	त, ई, आ	त, ई, आ,	त, इ, आत्,	न् इन्, त्,
(८) संबोधन	०	नो	रे, हो, व्,	हो.

(१) वऱ्हाडीत प्रथमा, द्वितीया, चतुर्थी, पंचमी, सप्तमी या विभक्तींचे प्रत्यय मराठीप्रमाणे आहेत.

(२) प्रमाण मराठीत द्वितीया - चतुर्थीचा 'ला' प्रत्यय वऱ्हाडीत 'ले' होतो. अनेकवचनात 'ईस'/ 'इले' असे प्रत्यय लागतात.
उदा., पोट्ट - पोट्ट्याले, पोट्ट्याइले.

(३) प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीत सप्रत्ययी व अप्रत्ययी अशी द्वितीया विभक्ती दोन प्रकारांनी येते.
वऱ्हाडीतील अप्रत्ययी द्वितीयेची उदा., (१) मी दई जेवतो (मी दही जेवतो.), (२) तो सयसंध्याकाईबंडी आनते/ (सायंकाळी बैलगाडी आणतो.).

(४) प्रमाण मराठीतील तृतीयेचा 'ने' प्रत्यय वऱ्हाडीत 'न' आहे. वऱ्हाडीत 'आ' हा तृतीयचा वैशिष्ट्यपूर्ण प्रत्यय आहे. एकवचनी 'न' प्रत्यय लागताना नामाचे/ सर्वनामाचे सामान्यरूप 'आ' स्वराचा आगम होऊन होते. अनेकवचनी 'न' प्रत्यय लागताना नामाचे/ सर्वनामाचे सामान्यरूप होताना 'ई' हा अधिकचा प्रत्यय लागतो.

(५) षष्ठी या विभक्तीचे प्रत्यय वऱ्हाडीत प्रमाण मराठीप्रमाणे आहेत. फक्त मराठीतील एकवचनी सर्वनामांना 'झा', 'झी', 'झे' लागणारे प्रत्यय वऱ्हाडीत येत नाहीत. त्यांची जागा 'या', 'ई', 'य' किंवा'ला', 'ली', 'ले' हे प्रत्यय घेतात. उदा.,

प्रमाण मराठी	वऱ्हाडी	
झा - माझा	या - माया	ला - माला,
झी - माझी	इ - माई	ली - माली,
झे - माझे	य - माय	ले - माले.

वऱ्हाडीत काही भागात माही, तुहा तसेच माह्यावालं (माझे), तुह्यावालं (तुझे) अशी रूपेही आढळतात.

सामान्यरूप :

(अ) 'अ'-कारांत पुल्लिंगी नामांचे एकवचनी सामान्यरूप मराठीत 'आ'-कारांत होते आणि अनेकवचनी सामान्यरूपांच्या वेळी अनेकत्वदर्शक अनुस्वार येतो. वऱ्हाडीत एकवचनी सामान्यरूप मराठीप्रमाणे अनुस्वार न येता त्या जागी वऱ्हाडीत विभक्ती प्रत्ययापूर्वी 'इ' या वर्णाचा आदेश होतो. 'आ', 'ई', 'ऊ', 'ओ'-कारांत पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप एकवचनात मराठीप्रमाणे अनुक्रमे 'या', 'या', 'वा'-कारांत होते. वऱ्हाडीत 'ए'-कारांत नामाचे सामान्यरूप न होता विभक्ती प्रत्यय लागतात. अनेकवचनी सामान्यरूप होताना वरीलप्रमाणे 'इ' या वर्णाचा आगम होतो. उदा., आ-कारांत : तवा (तावा) - ताव्याले, ताव्याइले,
इ-कारांत : वट्टी (परीट) - वट्ट्याले, वट्ट्याइले, उ-कारांत : भाऊ (भाऊ) - भावाले, भावाइले,
ए-कारांत : काळे (आडनाव) - काळेले, काळेइले, या-कारांत : पोया (पोळा) - पोया, पोयाची.

(ब) स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरूप :

मराठीत 'अ', 'आ', 'ई', 'ऊ ', 'ओ'-कारांत नामांचे सामान्यरूप मराठीत अनुक्रमे 'ए', 'ए', 'ई', 'ऊ', 'ओ'-कारांत होते. वऱ्हाडीत अनुक्रमे 'ई', 'ए', 'ई', 'ऊ', 'ओ'-कारांत होते. तर, अनेकवचन पुल्लिंगी नामाप्रमाणे 'ई'चा आगम होऊन होते.
उदा.,अ-कारांत : वाट (रस्ता) - वाटीनं, वाटाईनं, आ-कारांत : गरमा (उकाडा) - गरमीनं, गरम्याईनं,

ई-कारांत : साई (साळी) - साईले, सायाईले, ऊ-करांत : जाऊ (जाऊ) - जाऊले, जावाईले,
ओ-कारांत : बायको (बायको) - बायकोले, बायकाईले.

(क) नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप :

वऱ्हाडीत 'अ', 'ई', 'ऊ'-करांत नपुंसकलिंगी नामांचे एकवचनी सामान्यरूप मराठीप्रमाणे अनुक्रमे 'आ', 'या', 'आ'-कारांत होते. तर, अनेकवचनी सामान्यरूप होताना पुल्लिंगी, स्त्रीलिंगी नामाप्रमाणे विभक्ती प्रत्ययापूर्वी 'ई'चा अगम होतो.

अ-कारांत : वावर (शेत) - वावराले, वावराईले, ई-कारांत : पानी (पाणी) - पान्याले, पान्याईले,
ऊ-कारांत : वगारू (म्हशीचे स्त्रीलिंगी अपत्य) वगाराले, वगाराईले.

प्रमाण मराठीतील क्वचित 'आ'-कारांत पुल्लिंगी नामाचा उच्चार वऱ्हाडी नपुंसकलिंगी 'अ'-कारांत होतो. त्याचे एकवचनी सामान्यरूप वरीलप्रमाणे 'आ'-कारांत न होता मराठीतील 'आ'-कारांत पुल्लिंगी नामाप्रमाणे 'या'-कारांत होते.

उदा., घोळ (घोडा) – घोळ्याले, घोळ्याईनं.

विभक्ती प्रतिरूप अव्यये :

मराठीप्रमाणे वऱ्हाडीत प्रत्ययाऐवजी शब्दयोगी अव्ययांचा उपयोग होतो. प्रमाण मराठीतील काही जसेच्या तसे, काहींत वर्णप्रक्रिया होऊन, तर काही, 'लोक'सारखे वैशिष्ट्यपूर्ण शब्दयोगी अव्ययही वऱ्हाडी बोलीत आढळतात. उदा., पासून (पासून), बईर (बाहेर), मुचूक (शिवाय).

सर्वनाम :

वऱ्हाडीतील सर्वनामे प्रमाण मराठीसारखीच आहेत. काही खालील भेद आढळतात, -

(१) प्रमाण मराठीतील 'माझा', 'माझी' ह्या सर्वनामांच्या ऐवजी वऱ्हाडीत 'माहा', 'तुहा' ही रूपे प्रचलित आहेत ('भाषाविज्ञान परिचय', पृ.१०६). आज वऱ्हाडीतील सर्वनामांचा अभ्यास केल्यास वरील सर्वनामात वर्णप्रक्रिया होऊन 'ह' या महाप्राण वर्णाऐवजी 'य' ह्या अर्धस्वराचा उच्चार होतो. उदा., माया, तुया. तसेच, 'आमी', 'तुमी' ही अनेकवचनी रूपे वऱ्हाडीत आहेत.

(२) तृतीयेचे (प्र.पु.) 'म्या' (द्वि.पु.) 'त्या', 'त्वा', 'तुवा' (तृ.पु.) 'त्यानं' ही रूपे वऱ्हाडीत प्राचुर्याने वापरात आहेत. प्र. पु. वाचक 'मिनं' द्वि.पु. 'तुनं' ही रूपे काही भागात उच्चारली जातात.

(३) प्रमाण मराठीत 'आपूण' व 'स्वतः' या दोन आत्मवाचक सर्वनामांचा उच्चार वऱ्हाडीत 'आपून' व 'सोता' होतो. तसेच, 'खुद' हे हिंदीतील सर्वनाम काही वऱ्हाडी भाषकांच्या उच्चारात आढळते.

विशेषण :

मराठीप्रमाणे वऱ्हाडीत विकारी व अविकारी विशेषणे आहेत. विशेषणांचे साम्यभेद-

(१) सर्वनामिक विशेषणे प्रमाण मराठीप्रमाणे आहेत. भेद आढळतो तो वर्णप्रक्रियेत.

(२) प्रमाण मराठीत आढळत नसलेली काही गुणविशेषणे वऱ्हाडीत आहेत. उदा., अकऱ्या (बदमाश), गवसी (वेंधळी), भयान (उजाळ), माठं (थंड).

(३) पूर्णांकवाचकास 'पट' हा प्रत्यय जोडून दुप्पट (दुप्पट), तिप्पट (तिप्पट), चउपट (चौप्पट) ही तसेच, येकेरी (ऐकेरी), दुहेरी (दुहेरी), तिहेरी (तिहेरी), चाउपदरी (चौपदरी), पाचपदरी (पाचपदरी) ही आवृत्तिवाचक संख्याविशेषणे प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीत उच्चारात आहेत. मात्र, 'सुती', 'पेडी', 'घडी', 'गुणित', 'गुण' हे प्रत्यय संख्यवाचकास जोडून आवृत्त्यार्थी विशेषणे मराठीप्रमाणे वऱ्हाडीत नाहीत. या प्रत्ययाऐवजी 'खेप', 'डाव', 'दा', 'पन्या'/ 'पनी', 'रनी', 'वार', हे प्रत्यय संख्यावाचकास लागून आवृत्तिवाचक विशेषणे वऱ्हाडीत तयार होतात. उदा., खेप : येकखेप, दोनखेप, तिनखेप, डाव : येकडाव, दोनडाव, तिनडाव,
दा : येकदा, दोनदा, तिनदा, पन्या : येकवरन्या, दुसरपन्या, तिसरपन्या,
पनि : येकवरनी, दुसरपनी, तिसरपनी, रनी : येकसरनी, दुसरनी, तिसरनी,
वार : येकवार, दोनवार, तिनवार.

(४) वऱ्हाडीत संख्याविशेषणांपुढे 'क' हा प्रत्यय लागून अनिश्चितार्थक व्यक्त केला जातो. उदा., पाचकसे मान्साईले पत्रिका देल्या/ त्यातून चारकशे मान्सं येतीन/ (जवळपास पाचशे माणसांना पत्रिका दिल्या, त्यातून किमान चारशे माणसे येतील.)

(५) पावशेर, अस्सेर, अळसरी, पासरी इत्यादी वैशिष्ट्येपूर्ण अंशवाचके आहेत. तर, शेर, अदली, पायली, पवरा, मन, खंडी, कुळो ही पूर्णांकवाचक वऱ्हाडीत आहेत.

क्रियापद :

वर्तमानकाळ :

(१) प्रमाण मराठीत प्रथमपुरुषी, एकवचनी, वर्तमानकाळी क्रियापदरूपे कर्त्याच्या लिंगानुसार बदलतात. वऱ्हाडीत कर्त्याच्या लिंगानुसार बदलत नाहीत. वऱ्हाडीतील स्त्रिया बोलताना पुरुषी आख्यातरूपे वापरतात.

उदा., (प्र. पु.), निङ्ग (निघ), (पु.) निङ्गतो, (स्त्री.), निङ्गतो, (न.) निङ्गतो.

(२) द्वितीयपुरुषी एकवचनात मराठीत 'स'चा आगम होतो. वऱ्हाडीत असा 'स' प्रत्ययाचा आगम होत नाही. 'पेत्', 'निङ्गत्' अशी रूपे वऱ्हाडीत उच्चारली जातात.

(३) प्रथमपुरुषी एकवचनी व अनेकवचनी रूपे प्रमाण मराठीत वेगवेगळी होतात. वऱ्हाडीत असा भेद आढळत नाही.

(४) अनेकवचनी प्रत्यय प्रमाण मराठी व वऱ्हाडीत समान आहेत.

भूतकाळ :

(१) प्रथम पुरुषी स्त्रीलिंगी एकवचनी क्रियारूपे मराठीत 'सल्ये'-'ले' अशी 'ए' प्रत्यययुक्त येतात. वऱ्हाडीत 'ए' प्रत्यय न येता 'इ' प्रत्ययाचा आगम होतो. आजही वऱ्हाडी स्त्रिया 'बस्लो' अशी पुल्लिंगी क्रियारूपे वापरतात.

(२) मराठीत प्रथम पुरुषी नपुंसकलिंगी कर्ता असताना येणारी आख्यात क्रियारूपे ही स्त्रीलिंगी आख्यात रूपांसारखी उच्चारली जातात. मात्र, वऱ्हाडीत पुल्लिंगी आख्यात रूपांसारखी उच्चारली जातात.

(३) मराठीत द्वितीय पुरुषी अनेकवचनी तिन्ही लिंगांचे एकच क्रियारूप आढळते. वऱ्हाडीत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी क्रियारूप सारखे आहे. मात्र, स्त्रीलिंगी क्रियारूप वेगळे दिसून येते. उदा., (पु.) बस्ले, (स्त्री.) बसल्या, (न.) बस्ले.

(४) वऱ्हाडीत नपुंसकलिंगी अनेकवचनी कर्ता आल्यास त्याचे क्रियारूप हे पुल्लिंगी अनेकवचनी कर्त्याप्रमाणे तिन्ही पुरुषांत येते. मराठीत यासंबंधी क्रियारूपे वेगवेगळी येतात.

भविष्यकाळ :

(१) मराठीत सकर्मक धातू असला तर त्याची प्रथम पुरुषी एकवचनी कर्ता असताना क्रियारूपे 'इन्' प्रत्यय लागून होतात. तर, अकर्मक धातूची रूपे 'एन' प्रत्यय लागून होतात. वऱ्हाडीत सकर्मक / अकर्मक धातू असताना 'इन्' हा प्रत्यय लागतो.

(२) द. दि. पुंडे यांनी प्रथमपुरुषी सर्वनामांसमोर येणारे क्रियापद प्रमाण मराठीतल्याप्रमाणे नसते, असे सांगून 'मी म्हणेन' ऐवजी 'मि म्हणल' (मि म्हनल्), 'मी बसन' ऐवजी 'मि बसल' (मि बसल्) अशी उदाहरणे दिली आहेत (भाषाविज्ञान परिचय, पृ. २५९.). मात्र, आज वऱ्हाडीत ही रूपे सर्वत्र आढळत नाहीत. अकोल्याकडील भागात 'मि म्हनिन्', 'मि बसिन्' अशी रूपे येतात.

(३) मराठीत धातूला 'आल' हा प्रत्यय लागेन द्वितीय पुरुषी अनेकवचनी क्रियारूपे सिद्ध होतात. तर, वऱ्हाडीत धातूला 'सान्' हा प्रत्यय लागून क्रियारूपे तयार होतात.

(४) तृतीय पुरुषी अनेकवचनी 'तील' हा मराठीतील प्रत्यय वऱ्हाडीत 'तिन्' असा आहे.

काळाचे उपप्रकार :

अपूर्ण काळ : प्रमाण मराठीतील 'आहे' (वर्तमानकाळ), 'होता' (भूतकाळ), व 'असेल' (भविष्यकाळ) या काळसूचक साहय्यक क्रियापदांचा वऱ्हाडीत अनुक्रमे 'आय्', 'होतो', 'असन्' असा उच्चार होतो. 'अस्' या धातूला मराठीत 'ल' हा आख्यात प्रत्यय लागतो तर, वऱ्हाडीत 'न' हा आख्यात प्रत्यय येतो. प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीतही अपूर्ण काळ व्यक्त करण्यासाठी संयुक्त क्रियापदाचा वापर केला जातो.

पूर्णकाळ : वऱ्हाडीत पूर्ण भविष्यकाळात येणाऱ्या साहाय्यक क्रियापद 'आये'/ 'हाये' (आहे) येते. तसेच, मूळ धातूला 'न' किंवा 'ईन' हे आख्यात प्रत्यय लागतात.

रीतिकाळ : वऱ्हाडीत मूळ धातूचे 'त' कुदन्त रूप येऊन रीतिवर्तमान काळात त्यापुढे 'अस्' धातूची 'असतो' असे कालदर्शक रूप जोडले जाते. मात्र, रीतिभूतकाळ व रीतिवर्तमानकाळ 'अस्' धातूची रूपे येत नसून 'जा' धातूची अनुक्रमे 'जाय', 'जाईल' अनेकवचनात 'जात', 'जातीन' असे कालदर्शक रूपे जोडली जातात. वऱ्हाडीत कालवाचक क्रियाविशेषणे वाक्यात येत असतील तर, रीतिवर्तमान काळ व रीतिभूतकाळ व्यक्त करताना विकल्पाने संयुक्त क्रियापदाचा वापर केला जात नाही.

क्रियापदाचा अर्थ :

आज्ञार्थी :

(१) मराठीत आज्ञार्थी द्वितीय पुरुषी एकवचनी मूळ क्रियेच्या रूपाप्रमाणे असते. उदा., खा, गा, जा, इत्यादी वऱ्हाडीत मात्र, धातूच्या मूळ रूपाला 'य'/ 'जा' प्रत्यय लागतो. उदा., खाय/ खाजो, जाय/ जाजो इत्यादी अनेकवचनी प्रत्यय 'आ'/ 'जा' लागतात. उदा., खा/ खाजा, जा/ जाजा, साङ्गा/ साङ्गजा.

(२) आज्ञार्थी तृतीय पुरुषी एकवचनी रूपे वऱ्हाडीत मराठीप्रमाणे 'ओ'-कारांत आहेत. मात्र, अनेकवचनात त्यात 'त' हा अधिकचा प्रत्यय मराठीला लागतो. तो वऱ्हाडीत न लागता, ही रूपे एकवचनाप्रमाणे 'ओ'-कारांत राहतात.

विध्यर्थ : मराठीत कर्त्याच्या लिंगानुसार प्रत्यय विकार पावतात. वऱ्हाडीत एकवचनी व अनेकवचनी तसेच, तिन्ही पुरुषी व तिन्ही लिंगी प्रत्यय समान आहेत.

संकेतार्थ : संकेतार्थ होण्यास दोन वाक्ये 'जर', 'तर' ह्या उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. वऱ्हाडीत 'जर', 'तर'मधील 'जर'चा उच्चार 'न' होता 'तर'ऐवजी 'त' येतो. 'जरी', 'तरी'मधील 'जरी'चा उच्चार न होता 'तरी'ऐवजी 'तर्मा' येतो.

प्रयोजक व शक्यर्थी क्रियापदे :

(१) वऱ्हाडीत शक्यार्थ व्यक्त करण्यासाठी मराठीप्रमाणे 'अव' हा प्रत्यय न लागता शक्यार्थ संयुक्त क्रियापदाचा (करता येते, यंगता येते) उपयोग करून केले जाते.

(२) वऱ्हाडीत प्रयोजक क्रियापदे ही मूळ धातूला 'व' किंवा 'अवी' हे मराठीतील प्रत्यय लागत नसून 'ओ' हा प्रत्यय लागून प्रयोजक क्रियापद होते.

संयुक्त क्रियापदे : संयुक्त क्रियापदे मराठीप्रमाणे वऱ्हाडीत आहेत. शेगावकडील भागत 'देनं पळतं' (द्यावे लागते), 'करनं पळतं' (करावे लागते) अशी संयुक्त क्रियापदांची रूपे आढळतात.

निषेधबोधक : वऱ्हाडी बोलीत निषेधबोधक अर्थ व्यक्त करण्याच्या तीन पद्धती आहेत - (१) 'नाई' (नाही) यांच्या उपयोगाने, (२) क्रियापदामागे 'न' हे क्रियाविशेषण योजून (३) क्रियापदापुढे 'ना' हे क्रियाविशेषण योजून.

प्रमाण मराठीत 'नस्' धातूचे 'नाही', 'नव्हता', 'नव्हे', 'नसतो', 'नसेन', 'नको' इत्यादी रूपे वाक्यात योजून निषेधार्थ व्यक्त केला जातो. तर, वऱ्हाडीत निषधार्थी क्रियापदे प्रमाण मराठीप्रमाणे आहेत. मात्र, यांच्यात उच्चारभेद आढळतो. उदा., नाई, नवता, नसतो, नसीन/ नसील इत्यादी.

अव्यये :

(१) वऱ्हाडी बोलीत अभ्यस्त प्रक्रियेने अनेक क्रियाविशेषणे तयार झाली आहेत.

(२) लोक (पर्यंत), उपर (नंतर), बास्ता (नंतर), बाद (नंतर), आळोंगी (मागे), मुचूक (शिवाय), बिगर (शिवाय), वानी (समान), बी (सुद्धा) इत्यादी वैशिष्ट्येपूर्ण शब्दयोगी अव्यये वऱ्हाडीत आहेत.

(३) वऱ्हाडीत अन् (आणि), आनखी/ आनीक (आणखी), वाचून (शिवाय) ही समुच्चयबोधक आहेत.

(४) की/ का (अथवा, वा, अगर इ.साठी), नाईतर (किंवा) ही विकल्पबोधक अव्यये आहेत.

(५) पन (पण), तरमा (परंतु), बाकी (बाकी), इत्यादी न्युनत्वबोधक अव्यये वऱ्हाडीत आहेत.

(६) म्हनून/ म्हनूनसन्या (म्हणून), ता/ तवा (तेव्हा), त्याच्यानं (यामुळे) परिणामबोधक अव्यये आहेत.

वऱ्हाडी व फारसी :

राज्यकर्त्यांची भाषा या कारणामुळे फार्सी वऱ्हाडीवर परिणाम झालेला आढळतो. हा परिणाम यावनी काळात/ राजवटीत झाला. आज वऱ्हाडी भाषेत फार्सी भाषेचा प्रभाव सहज लक्षात येतो. तो पुढीलप्रमाणे -

- मराठीतील कण्ठ्य उच्चार संस्कृत वर्णामालेतील उच्चारासारखा आहे मात्र, काफर, तनखा यांसारखा शब्दातील घशातून उच्चारलेला कण्ठ्य रूढ झाला.
- शब्दसिद्धीचा विचार करता, खाना, गी, दान, वान, इत्यादी प्रत्यय लागून कारखाना, खानगी, पोटगी, गाळीवान, दवाखाना असे शब्द सिद्ध झाले.
- एकाच अर्थाचे फार्सी व मराठी शब्द एकत्र येऊन कागदपत्र, घरदार, जवानमरद, भिळमुरवत, शेतजमीन, सेवाचाकरी असे सामासिक शब्द रूढ झाले.
- अगर, व हे उभयान्वयी अव्यय, ता, दर, बे इ. फार्सी शब्दयोगी अव्यये नामापूर्वी लागून दरडोई, दरशेकळा, बेभरोसा, बेफिकीर असे शब्दप्रयोग आढळतात.
- बेल्याशक, वाहवा, शाब्बास हे उद्गारवाचके.
- खेरीज, बाबत, शिवाय ही क्रियाविशेषणे.
- अजून, जरूर, जलदी, मुद्दाम, यंदा, हमेशा ही क्रियाविशेषणे.
- आ (पन्हा), आई (नरमाई), ई (खुबी), ईन (रंगीन), कम (कमताकत), खाना (गिदाळखाना), खोर (हरामखोर), शाई (पोट्टेशाई), दान (पानदान), दार (रगदार, सालदार), दारी (रोजदारी), पोस (तखतपोस), बद (बदनाम, बदमास), बिन (बिनबुळा), बाज (नखरेबाज), बे (बेसरम), वाला (करनेवाला, पायनेवाला, बोलनेवाला), हर (हरदम).

अभ्यस्त शब्द :

अक्कलहुशारी (अरबी-फार्सी), दंगाफसाद (फार्सी-अरबी), धिंगामस्ती (हिंदी-फार्सी), बाजारहाट (फार्सी-मराठी), लाजसरम (मराठी-फार्सी), इत्यादी.

आज वऱ्हाडीतील भाषिक व्यवहारात फार्सीतील अनेक शब्द रूढ असलेले आढळतात - उदा.,-

अक्कल (बुद्धी), अगाजा (प्रसिद्धी), अनारसा (अनारसा), अन्दाज (कयास), इन्साफ (न्याय), कबजा (ताबा), करार (करार), कसाब (खाटीक), कागद (कागद), खबरबात (हालहवाल), खबरदार (सावध), गइरमरजी (नाराजी), गरीब (गरीब), गुन्हा (अपराध), चस्मा (चस्मा), जमीन (जमीन), जमाना (जमाना), जवान (तरुण), जिन्नस (वस्तू), जुलूम (अन्याय), तरीख (तारीख), तमाशा (तमाशा), तयार (तयार), दगेबाज (धोका देणारा), दरोज (दररोज), दुस्मन (दुश्मन), धोका (धोका), नजर (दृष्टी), नालस्ती (अपमान), मुर्दा (प्रेत), मुलुख् (प्रदेश), शरम (लाज), सगा (सग्गा), हिंमत (हिंमत).

वऱ्हाडी आणि इंग्रजी :

यादवांच्या ऱ्हासानंतर वऱ्हाडीवर अरबी-फारसी परिणाम झाला. त्यानंतर ब्रिटिश राजवटीसोबत आलेल्या इंग्रजीचा परिणाम तर आजही होत आहे. ०३ डिसेंबर १८०३ रोजी अंजनगाव येथे सुर्जीचा तह होऊन वऱ्हाड प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आला ('वऱ्हाडचा इतिहास', पृ. २३९.). वऱ्हाडातील समाज, संस्कृती आणि वऱ्हाडी भाषेवर परिणाम झाला. भाषेवरील परिणामाबाबत जित-जेत्यांच्या संबांधाचे कारण समोर येत असले तरी शिक्षणात होणाऱ्या इंग्रजीच्या वापरामुळे आज इंग्रजांचे राज्य नसूनही इंग्रजीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढतच आहे. नवीन संकल्पना प्रगतीच्या आवेगात इकडे येऊ लागल्याने त्यांना अनुसरून शब्दही येऊ लागले.

इंग्रजीत बोलणे, लिहिणे हे प्रतिष्ठिपणाचे लक्षण समजले जाते. त्यामुळे विद्याविभूषितांचीच नव्हे तर कमी शिकलेल्या भाषकांचीसुद्धा जास्तीत-जास्त शब्द वापरण्याची प्रवृती आढळून येते. आपरेशन, इन्जेकशन, इलक्टरी, क्यानसल, ठेसन, डाक्तर, नरस, पलाट, पार्टी, पार्टीशन, पोस्ट, फारम, बटन्, डिपाझिट, फिऊज, मिटिंगा, रिझरवेशन, ब्यानबाजा, मास्तर, मोटरगाळी, मोटर, म्याट, यस्टी, यच फोर, रेलवाई, लईन, वायरिंग, सोसायटी, होटिंग, इत्यादी असे कितीतरी भ्रष्ट रूपे वापरात आहेत.

इसट्यानवर गर्दीतं फुल्ल होती, काम तं गळ्या येवन जमलं, काल कटिंग करताना बिलेट लागल गळ्या, कोरटात केस टाकली, डाक्तरच्या हातान इन्जेकशन घ्यावं मान्सानं, तो पोलस ठेसनात गेल्ता, तो होपलेस मानूस आये, बस पकळली, मी इकून येतो तू डायेरेक ये, रिकशा धरली, यस्टी लेट झाली, लाईन गेल्ती बिना फ्यानचा झोपलो, अशी रचना वऱ्हाडी भाषक मोठ्या प्रमाणावर वापरत आहे. इंग्रजीने वऱ्हाडी भाषिक व्यवहारावर किती खोलवर परिणाम केला आहे, हेच यावरून कडते.

वऱ्हाडी आणि पोर्तुगीज :

पोर्तुगीजांची राजवट गोव्यापुरती मर्यादित होती. परंतु, त्यांच्या भाषेतील शब्द हे सह्याद्री ओलांडून सातपुड्यापर्यंत आलेले दिसून येतात. पुढील काही पोर्तुगीज शब्द वऱ्हाडी बोलीत आढळले - अन्नस, खमीस, घमेलं, जुगार, तिजोरी, तुरुंग, पगार, परात, पिस्तूल, पुरावा, पोपई, फाल्तू, बादली, बिजागिरी, बिस्कुट, भोपळा, शाबुदाना, साबन, सोळत, इत्यादी.

वऱ्हाडी आणि हिंदी :

वऱ्हाडातील सातपुड्याच्या पलीकडे हिंदी भाषिक मध्यप्रदेशाचे क्षेत्र आहे. उत्तरेतून दक्षिणेत जाताना यवनांचे मुख्य ठाणे असलेले बऱ्हाणपूर आहे. तसेच, पं. रवीशंकर शुक्ला व व्दारकाप्रसाद मिश्रा हे मुख्यमंत्री असाताना वऱ्हाडप्रांत मध्यप्रदेशाशी जोडलेला होता. त्यामुळे दोन प्रांतांच्या भाषा भिन्न असल्या तरी परस्परांत दळणवळण होतच होते. राज्यसूत्र हिंदी भाषकांच्या हाती असल्याने त्यांच्या भाषेशी वारंवार संबंध येत होता. यासोबत, वऱ्हाडात वास्तव्य करून असलेला मुस्लीम समाज. या साऱ्या कारणांमुळे वऱ्हाडीवर हिंदीचा परिणाम दिसून येतो.

- वऱ्हाडीतील अपूर्ण वर्तमानकाळ हिंदीतून (आ रहा है।, जा रहा है।) आला आहे.
  उदा., तो बोलून रायला, येऊन रायला, जाऊन रायला इत्यादी.
- वऱ्हाडातील शेगाव, खामगाव, नांदूर भागातील भाषिक उच्चारांत आढळणारी देनं पळतं, करनं पळतं, जानं पळतं, ही संयुक्त क्रियापदे हिंदीच्या संपर्कामुळे आली.
- नेहरूजी, गांधीजी अशी आदरार्थी संबोधने वऱ्हाडीने स्वीकारली.
- अभ्यस्त शब्दात येणारे हिंदी शब्द : धिंगामस्ती (हिंदी-फार्सी).

वऱ्हाडी बोलीत आढळत असलेला हिंदी भाषेतील शब्दसंग्रह :

अइदी, अक्कल, असर, उप्पर, कुत्ता, खिचळी, खोदा, चालचलाऊ, छप्पर, जलेबी, जवान, जिनगानी, टक्कर, नक्कल, नादान, परोठा, बच्चा, बरसात, बेहेत्तर, भला, भाबी, मतलब, मदान, मलई, मात, मोतिचूर, यार, रोटी, साला, सुरी इत्यादी.

वाक्प्रचार :

अड्डा जमवन, कामकाज पायनं, चुलीत जानं, तंग करनं, दम भरनं, पोल खुलनं, फन्दात पळनं, फिदा होनं, बाता मारनं, इत्यादी वाक्प्रचार हिंदीतून वऱ्हाडीने आत्मसात केले.

म्हणी :

अक्कल कोती/ तनका बळा, अपना हात जगननाथ, अल्ला देता हेय/ छप्पर फाळके, आप भला तं जग भला, आमो की कमाई/ जामोमे गमाई, आम खानेसे मतलब, आम के आम गुठलीयो के दाम, उप्परसे टामटूम अन्दरसे राम जाने, कहा गये तो कई नई/ क्या लाये तो कुछा नई, कहा राजा भोज्/ कहा गंगू तेली, कुनबी सरिका दाता नई लाताबिगीर देता नई, गधेको नई मिल्ता घास/ घोळे खा रहे हय चवनपास, घरकी मुरगी दाल बराबर, झ्याटमे झिंगा च्युतमे बारलिंगा, तकदीर हय गांडू तो क्या करेगा पांडू, तुरत दान महापून, तेली मारे धारोधार खुदा मारे येकईच बार, दाम करी काम बिबी करे सलाम, पायनेको भला अवर कंबरमे ढिला, येक नूर आदमी दस नूर कपळा, येक हमारी येक तुमारी/ चिपट मेल गुमारी, सऊ कलाल येक दलाल, इत्यादी.

वऱ्हाडी आणि कानडी :

वऱ्हाडीत कानडी शब्दांचा जो उच्चार आढळतो त्याचे मुख्य कारण 'ज्ञानेश्वरी' सांगता येईल. ज्ञानेश्वरीतील ओंव्यावरून वऱ्हाडीत कितीतरी उखाणे, म्हणी, वाक्प्रचार तयार होऊन उच्चारात आहेत. उदा., ज्ञानेश्वरीचे प्रत्यक्ष वाचन किंवा कीर्तनकार यांच्यामुळे सर्वसामान्य माणसापर्यंत ज्ञानेश्वरी पोहचली ती त्यातील कानडी व इतर शब्दासहीत.

- साद शब्दात येणारा 'गि' ('यादवकालीन मराठी भाषा', पृ.३४२.) : उदा., पानिगिनी, पायलंगियलं इत्यादी.
- वऱ्हाडीतील षष्ठीचा 'नी' प्रत्यय : उदा., येतानी (येता), जातानी (जाताना), त्यात्नी (त्यात), वाशीम मनोरा विभागात यात्नी (यात), दारात्नी (दारात) असा प्रयोग आढळतो.

वऱ्हाडीत उच्चारात असलेले कानडी शब्द :

अन्ना (अण्णा), अळकित्ता (अडकित्ता), आका (अक्का), आत्या (आत्ते), आप्पा (अप्पा), इकळे (इत्तकडे), उंडा, काका (कक्क), गुढा (एक दागिन), चव, टाळू (तले), डब्बा (डब्बा), तिकळे (तित्तकडे), नाना (नन्न), बग्गल (बगल), भीळ, मिरवन, मांडी, हुळ्ळा (हुरडा), हेवा इत्यदी.

वऱ्हाडी आणि तेलगू :

कोमटी, वडूर यां तेलगू जाती व तेलंगी ब्राम्हण, सोनार, शिंपी इत्यादी जमाती वऱ्हाडात येऊन राहिल्या. त्यांच्या सहवासातून भाषेची देवाणघेवान घडून आली.

- वऱ्हाडातील स्त्री ही पुरुषाप्रमाणे प्रथमपुरुषी वाक्यरचना करते. उदा., मी करतो. (मी करते.), मी जातो. (मी जाते.), मी येतो. (मी येते.) इत्यादी.
- वऱ्हाडीतील तृतीय पुरुषी एकवचनी वाक्यप्रयोग : उदा., राम जाते, तो जेवते इत्यादी.
- वऱ्हाडात खेड्यापाड्यातून मुले चेंडूदांडू खेळातात तेव्हा त्यांचे मोजमापाचे परिगणन वरवट, मुंड, नाल, अबीत, आहार, टेक्या असे असते. ही बाराखडी तेलंगणातून इकडे आली आहे ('पारंपरिकवऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास', पृ.७८.)

वऱ्हाडीत उच्चारात असलेले तेलगू शब्द :

अनारसा, अबारा (शिल्लक), करडा, किळूकमिळूक (किडुकमिडूक), चक, च्यावम्याव (च्यावम्याव), जाळ, टाळा, तूप (तूप), नाल (नाल), शिकेकाई (शिकेककाई) इ..

वऱ्हाडी आणि गोंडी :

वऱ्हाडाला लागून असलेल्या सातपुड्यातील चंद्रनखोऱ्यात गोंडी लाकांची वस्ती आहे. वऱ्हाडातील गुरेढोरे गोंडांकडे चारण्यासाठी पाठविले जातात. त्या मोबदल्यात त्यांना पैसा, अन्नधान्य दिले जाते. तसेच, ते सागवानी लाकडांची विक्री करतात. यामुळे व अन्य कारणाने गोंडाचा वऱ्हाडी लोकांशी संपर्क येतो. गोंडीवर वऱ्हाडीचा परिणाम झाला तसाच वऱ्हाडीवर गोंडीचा परिणाम झाला ('वऱ्हाडी शब्दांवर गोंडीचा प्रभाव', डॉ. भुजंग मेश्राम, युगवाणी मे. जाने. ०४, पृ. १७.).

- वऱ्हाडीतील मंग (मघ), मुंग (मुंग), रंग (ताल) या शब्दातील 'ङ्' हे अनुनासिक.
- काही अभ्यस्त शब्द : उदा., झावरझावर (अंधुक), वावरबिवर (शेत वगैरे), सकायवकाय (लवकर), इत्यादी.
- कारलं (कारले), खाल्लं (खालले), धरलं (धरले), इत्यादी शब्दांती योणारा 'ल' प्रत्यय आणि अनेकवचन दर्शविण्यासाठी शब्दांतीचा स्वराचा होणारा दीर्घ उच्चार. उदा., बईलं (अनेक बैल), सालं (वर्षे) इत्यादी.

- 'ऊक' हा प्रत्यय गोंडीत 'ते'साठी येतो. वऱ्हाडीत मुचूक (शिवाय), हिरूक (मोहाची फुले), पिळूक (चारोळ्या) इत्यादी .

गोंडीतील वऱ्हाडीत उच्चारात असलेले शब्द :

अगाजा (प्रसिद्धी), अदमुसा (थकलेला), अरकाट (बदमाश), आयतं (प्रयत्ना वाचून मिळालेले), इचोंडा (चिमकोडा), इसारा (अग्रिम), उबार (निरर्थक), कलाल (एक जात), कोंटा (कोपरा), घोयना (हरबऱ्याची पाने), घोर (काळजी), चकोट (चांगले), चोट्ली (शिश्न), झाल (सायंकाळ), टेस (अभिमान), डेंग (शिश्न), डोना (डवना), धुरा (मेर), नसान्या (चिडचिड करणारा), निपूर/ नुपर (कमतरता), निब्बर (घट्ट), बुल्ली (शिश्न), बेस (चांगले), बोंग्या (बालीश), भयताळ (मूर्ख), मांगलमेठ्या (मागे जाणे, यातील मांग हा शब्द गोंडीतील), मोदाळ (तोंड), येळी (वेडी), रट्टा (झोडपा), राजन (राजन), रेंगी (पटाचे छकडे), लय (पुष्कळ), लवनी (ओहोळ), लेड (वीर्य), सप्पा (सर्व), सळा (एकटा), सळघान (अस्तावेस्त) इत्यादी.

घाटावरची वऱ्हाडी बोली :

वऱ्हाडी बोलीचे प्रादेशिक भेद करताना 'घाटावरची वऱ्हाडी बोली' व 'घाटाखालची वऱ्हाडी बोली' असे दोन भेद केले जातात. मध्यप्रदेशातून विदर्भात येताना बुलढाणा जिल्हा लागतो. या जिल्ह्यात बोलली जाणारी वऱ्हाडी म्हणजे 'घाटावरची वऱ्हाडी बोली' (घाव). बुलढाण्याकडून पूर्वेस (अकोला जिल्ह्याकडे) येताना 'घाटाखालची वऱ्हाडी' (घाखा) सुरू होते. घाटावरच्या व घाटाखालच्या वऱ्हाडी बोलीत काही भेद आढळून येतात.

उच्चार प्रक्रिया :

(१) प्रमाण मराठीत जेथे 'अ' स्वर येतो तेथे घाव वऱ्हाडीत 'आ' येतो : अशी>आशी, अजून>आजून, असतो>अस्तो (घाखा)>आस्तो (घाव), अरे>आरे.

(२) काही शब्दारंभी येणाऱ्या 'अ' चा 'आ' होतो तेव्हा त्यानंतर येणाऱ्या स्वराचीही वृद्धी होतेः अजिबात>आजिबात.

(३) शब्दारंभी व शब्दांतर्गत येणाऱ्या 'ओ' या स्वराचा उच्चार घाव वऱ्हाडीत 'उ' होतोः भोंड>भुंड, आंगोळ>आंगुळ.
प्रमाण भाषेच्या वाढत्या अनुकरणामुळे घाखा वऱ्हाडीत 'आंगोळ' हा शब्द आढळतो. मात्र, खेडेगावातील भाषिक व्यवहारात 'आंग धुनं' येतो.

(४) घाखा वऱ्हाडीत शब्दारंभी येणाऱ्या 'वो' घाव वऱ्हाडीत 'आ' होतो : वोल्डून> आल्डून.

(५) शब्दांतर्गत येणाऱ्या अकाराचा एकार होतोः अपमान>आपेमान.

(६) क्वचित शब्दारंभी येणाऱ्या 'आ' चा 'अ' होतोः लागे> लगे.

(७) शब्दारंभी येणाऱ्या 'ओ' चा 'व' होतोः ओळख> वळक.

(८) स्वरांतर्गत येणाऱ्या 'ड' चा 'ढ' होतोः अडान> अढाण, वडून> वढून.

(९) शब्दांती येणाऱ्या 'स' चा 'व' होतोः टिकास> टिकाव

(१०) प्रमाण मराठीतील 'वेळ' याअर्थी घाखा वऱ्हाडीत 'वाकोळ' येतो तर घाव वऱ्हाडीत 'वाढून' येतो.

(११) प्रमाण मराठीतील 'वेगळे' याअर्थी घाखा वऱ्हाडीत 'वाले' हा शब्द उच्चारला जातो. तर, घाव वऱ्हाडीत शब्दांतर्गत 'य' चा आगम होऊन 'वायले' असा शब्द येतो. उदा.,
सागण्यासारखे> सांग्यासारखं> सांगायसारखं.

(१२) शब्दांतर्गत येणाऱ्या 'आ' चा 'उ' घाखा वऱ्हाडीत होतो. घाव वऱ्हाडीत ही प्रक्रिया कायम ठेवून 'क' चा आगम होतो.
उदा., एवळासा> एवढुसा > एवढुकसा.

(१३) 'वेळू' (बांबू) हा शब्दा घाखा वऱ्हाडीत 'येऊ' होतो. शब्दारंभी येणाऱ्या 'व' ह्या अर्धस्वराचा 'य' होऊन त्यानंतर येणाऱ्या स्वरमध्यस्थ 'ळ' चा लोप झाला. तर, घाव वऱ्हाडीत 'ळ' कायम राहतो. (येळू).

(१४) महाप्राणागम : कुस्ती> हुस्ती

(१५) महाप्राणलोप : आधार> अधार> अदार, बाहेर> भईर> भाईर इ.

व्याकरण प्रक्रिया :

घाटावरील वऱ्हाडीची व्याकरणप्रक्रिया घाटाखालील वऱ्हाडी प्रमाणेच आहे. फक्त खालील भेद आढळून येतात.

(१) घाव वऱ्हाडीत षष्ठीची प्रथम व द्वितीय पुरुषी सर्वनामांची रूपे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा.,
आपला>आप्ला>मापला, आपले> आप्लं> मापलं, तुझ्या> तुया/तुह्या> तुपला, तुझे> तुय/तुह्य> तुपलं

(२) एकवचनाचे अनेकवचन करताना 'ले' हा प्रत्यय येतो.
घाखा - खुटा (ए.व.) > खुटे (अ.व.) घाव - खुटा (ए.व.) > खुटले (अ.व.)

(३) घाखा वऱ्हाडीत सामान्यरूपाच्या अनेकवचनात 'इ' आणि 'ही' या स्वनांचा जेथे आगम होते तेथे या बोलीत (घाव) 'य' चा

आगम होतो. उदा. मजुराईत > मुजरायनं, ढोराईले > ढोरायले.

(४) प्रमाण मराठी व घाखा वऱ्हाडीपेक्षा घाव वऱ्हाडीत येणारी 'कायनू' व 'कान्नू' ही प्रश्नार्थक सर्वनामे वेगळी आहेत.

(५) चालू वर्तमानकाळ वैशिष्ट्यपूर्ण साधला जातो. उदा., करा लागलो, याय लागली, रडा लागली, निंधा लागलं.

(६) धातूला 'ये' हा आख्यात प्रत्यय लावून भूतकाळ साधला जातो. उदा., देये, धुये.

(७) अव्यये : वायले (वेगळे), आजून (अजून), तिकडी (तिकडे), इकडी (इकडे), तिथी (तेथे).

(८) शब्दयोगी अव्यये : बीन, कडी (कडे), वाढूळ

अपरिचित शब्द :

अनमान धपक्या - ध्यानी मनी नसताना, आखडने - अकडणे, आब - शांती, इवळणे - रडणे/केकाटणे, इसमने - विसरणे, उखारी - गोदरीतील घाण खाणारे जनावर, काटोळा - काटेरी, कराळ - कडाय, चालिंतर - चालचलन, झाकपाक - आवरासावर, झड - झडी, टाळसर - ठळक, तंगाडने - वाढ होणे, दुपवणे - गर्भपात करणे, निंदाबद्दी - निंदानालस्ती, पीप - पोहरा, पिदाडने - मारणे, फडताळ - स्वयंपाक घरातील लाकडी कपाट, बाईलबुग्या - बायला, बेकी - फूट, मेदार - सत्त्व असलेले, यूं - सहज, रासुंडा - खळ्यावर बळी देणे, वाढूळ - वेळ, वकट - वाईट, सूम - बाज विणण्यासाठी लागणारी दोरी, हायली - माडी, होटली - थोबाड, हूप - हपचक, हिडीस - कंटाळवाणे इत्यादी.

वऱ्हाडी आणि नागपुरी :

नागपुरी बोली ही मध्य व पश्चिम नागपूर जिल्हा, मध्य व पूर्व वर्धा जिल्हा व छिंदवाडा जिल्ह्याची सौंसद तहसील अशा क्षेत्रांत बोलली जाते (महाराष्ट्रातील समग्र बोलींचे लोकशास्त्रीय अध्ययन, प्रा. डॉ. बाबुराव देसाई, लेख : नागपुरी बोली, पृ. ३१२.). या बोलीवर डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांनी भाषाशास्त्रीय अभ्यास केला आहे. तो प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशित केला. त्या पुस्तकाचा आधार घेऊन पुढील विवेचन करीत आहोत.

नागपुरी ही वऱ्हाडीच्या सर्वात जास्त जवळची; पण वऱ्हाडीहून अनेक बाबतींत भिन्न असलेली व मराठीच्या मूल प्रकृतीचे दिग्दर्शन करणारी मराठीची एक प्रमुख उपभाषा आहे (वैदर्भी शब्दकोश प्रा. डॉ. सुरेश डोळके).

उच्चारविषयक भेद :

- वऱ्हाडीत 'ळ' चा प्राचुर्याने उच्चार होतो, काढ - काळ, झाड - झाळ इत्यादी. मात्र, नागपुरीत 'ळ' चा (घळ्ळीहा अपवाद सोडल्यास) उच्चार होत नाही. प्रमाण मराठीतील काही शब्दांत येणाऱ्या 'ळ' उच्चाराचा वऱ्हाडीत 'य' होतो तर, नागपुरीत गोंडीच्या प्रभावाने 'र' होतो.
- वऱ्हाडीत व नागपुरीत 'ह' या महाप्राणाचा उच्चार होतो. मात्र, पुढील काही शब्दांत नागपुरीत आढळणारा'ह' हा वऱ्हाडीत 'य' होताना दिसतो. उदा., राह्यला - रायला, मह्यने - मयने, आम्हाले - आमाले इत्यादी.

प्रत्ययविषयक भेद :

- वऱ्हाडीत 'म्या' हे प्रथम व 'तुया' हे द्वितीय पुरुषी सर्वनाम आढळते. नागपुरीत मात्र, 'तुया' हे रूप चुकूनही येत नाही. वऱ्हाडीत 'मायं, तुयं' सामान्यरूप 'माया, तुया' अशी आहेत. नागपुरीत फक्त 'महा, तुहा' हीच रूपे येतात.

विशेषणे - क्रियाविशेषणे :

- वऱ्हाडातील काही भागात - अकोटकडे अथुल्ल (येथील), तथुल्ल (तेथील), ही रूपे उच्चारांत आढळतात (अकोल्याकडे अच्चा, तच्चा). तशी ती नागपुरीत आढळत नाही. त्याऐवजी नागपुरी येच्चा (येथील), तेच्चा (तेथील), ही रूपे वापरत आहेत.
- शेगावकडे अठी (येथील), तठी (तेथील), अकोल्याकडे अनुक्रमे अती, तती, अमरावतीकडे अथी, तथी ही स्थानदर्शक क्रियाविशेषणे उच्चारांत आढळतात. मात्र, नागपुरीत येथी, तेथी, जेथी आदी रूपांचाच वापर होतो. 'पुळे' (पुढे) हे क्रियाविशेषणे वऱ्हाडीत नित्यप्रयुक्त दिसते. नागपुरीचा भर मात्र, 'सामने' या शब्दावर असतो.

क्रियारूपे :

- वऱ्हाडीत वर्तमानकाळी क्रियापदाला द्वितीय व तृतीय पुरुषी पुल्लिंगी सर्वनामांना एव. चा 'तो' आणि तृतीय पुरुषी सर्वनामांना बहुवचनाचा 'तात' हेही प्रत्यय आढळतात. नागपुरीत ते कधीच लागत नाहीत. ('नागपुरी बोली भाषाशास्त्रीय अभ्यास', वसंत वऱ्हाड पांडे, पृ.३०१).

वऱ्हाडी आणि झाडी बोली :

महाराष्ट्राच्या अतिपूर्व कोपऱ्यातील भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या झाडीपट्टी भागात झाडी बोली बोलली जाते. या बोलीवर डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी भाषावैज्ञानिक अभ्यास केला आहे. त्यावर त्यांनी 'झाडी बोली भाषा आणि अभ्यास' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाच्या आधारे व 'झाडी बोली - भाषाशास्त्रीय टिपण' (महाराष्ट्रातील समग्र बोलींचे लोकशास्त्रीय अध्ययन, प्रा.डॉ.

बाबुराव देसाई, 'लेख झाडी बोली भाषाशास्त्रीय टिपण', पृ.७९ ते ९०.) यावरून वऱ्हाडी व झाडीतील भेद पुढीलप्रमाणे -

वर्ण विचार :

- वऱ्हाडीत काही शब्दांत आढळणारा 'छ' या व्यंजनाचा उच्चार झाडीत होत नाही. उदा.,-
  छत्री (वऱ्हाडी) - सत्ता (झाडी) - छत्री (प्रमाण मराठी), छप्पर - सपपर - छप्पर.
- 'च्, ज्', आणि 'झ्' यांचे तालव्य व दन्त्यमुलीय दोन्ही उच्चार वऱ्हाडीत आहेत. झाडीत फक्त तालव्य उच्चार आढळतो.
- वऱ्हाडीत 'ड, ढ' चा उच्चार 'ळ' होतो. काही प्रमाण मराठीतील 'ळ' शब्दाचा उच्चार 'य' होतो. उदा., झाळ (झाड), काळ (काढ), काया (काळा) इत्यादी. झाडीत मात्र, 'ळ' चा उच्चार होत नसून त्या ऐवजी 'र' चा उच्चार होतो. क्वचित 'ड' किंवा 'ल' होतो. उदा., पार (पाळ), सव्वर (सबळ), खेल (खेळ).
- वऱ्हाडीत शब्दांती 'य' या अर्धस्वराचा उच्चार होतो. झाडीत 'राय' आणि 'पाय' या दोन क्रियापदांचा अपवाद सोडल्यास 'य'चा लोप होतो.

लिंगविकार :

- प्रमाण मराठीप्रमाणे वऱ्हाडीत पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी असे तीन लिंगे आहेत. झाडीत मात्र, पुल्लिंगी व स्त्रीलिंगी अशी दोनच लिंगे आहेत.

वचन विकार :

- झाडी बोलीत अनेकदा व्यंजनांत एकवचनी पुल्लिंगी नामांचे अनेकवचन होताना 'आ' स्वर येता.
  उदा., केसं - केसा, पानं - पाना, मानसं - मान्सा इत्यादी.
  वऱ्हाडीत मात्र, 'अ' स्वराचा आदेश होऊन त्याचा दीर्घ उच्चार केला जातो.
  उदा., केस - केसं, पान - पानं, मानूस - मानसं इत्यादी.
- झाडीत आकारांत पुल्लिंगी एकवचनी नामाचे अनेकवचन अंत्य 'आ' लोपा पावून 'अ' स्वराचा आदेश होतो. उदा., गोटा (दगड)
- गोटं, गोरा (गोऱ्हा) - गोरं, डोरा (डोळा) - डोरं इत्यादी.
  वऱ्हाडीत प्रमाण मराठीप्रमाणे ए-कारांत होऊन अनेकवचनी नाम तयार होते. उदा., गोटा -गोटे, गोरा - गोरे, डोया - डोये इत्यादी.
- झाडीत पुल्लिंगी उ-कारांत एकवचनी नामांचे अनेकचन होताना अंत्य 'ऊ ' लोप पावून त्याजागी 'वा'किंवा 'आ' येतो. उदा. इचू (विंचू) - इचवा, नातू (नातू) - नातवा, गेंड्र (गांडूळ) - गेड्रा, वारकू (वाळूक) - वार्का इ.
  वऱ्हाडीत मात्र, उ-कारांत नामे दोन्ही वचनात सारखीच राहतात. विकल्पाने 'वं'चा आदेश होतो.
  उदा., लय इचू निंगाले, लय इचवं नंगाले.
- झाडीतील काही ओ-कारांत स्त्रीलिंगी नामांमधील अंत्य 'ओ' या स्वराऐवजी 'वा'चा आदेश होतो. उदा., आतो (आत्या) - आतवा, फोटो (छायाचित्र) - फोटवा. वऱ्हाडीत दोन्ही रूपे समान आहेत.

सामान्यरूप :

- आ-कारांत स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरूप होताना झाडी बोलीत ग्रांथिक मराठीप्रमाणे 'ए' आगम न होता 'अ' हा स्वर येतो. उदा., कता (कथा) - कतऽ, पुंजा (पूजा) - पुंजऽ इ.

वऱ्हाडीत प्रमाण मराठीप्रमाणे 'ए'चा आगम होऊन सामान्यरूप होते. उदा., कथा (कथा) - कथे, पुज़ा (पूजा) पुज्ये इत्यादी.

विभक्तिविचार :

कोष्टक क्र. २ : विभक्ती व प्रत्यय

क्र. विभक्ती	वऱ्हाडी		झाडी	
	विभक्ती प्रत्यय		विभक्ती प्रत्यय	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
(१) प्रथमा	०	०	०	०
(२) द्वितीया	स, ले,	स, ले, ना,	ल	ल
(३) तृतीया	न	न,	ना	ना
(४) चतुर्थी	स, ले	स, ले, ना,	ल	ल
(५) पंचमी	ऊन, हून	ऊन, हून,	उन	उन
(६) षष्ठी	चा, ची, चे, आ या, ई, य	चे, चा, चे, य, ई, या,	चा	चा

(७) सप्तमी	त, ई, आत, न	ईन, त,	त	त
(८) संबोधन	रे, हो, व,	हो.	०, गा, वो,	उ, वा

सर्वनामे :

- झाडीत तृतीय पुरुषी व दर्शक स्त्रीलिंगी सर्वनामे ते (ती), हे (ही), जे (जी) अशी ए-कारांत आहेत. वऱ्हाडीत मराठीप्रमाणे ई-कारांत आहेत.

विशेषणे :

- कप्पा (ठार/ खूप), बुहु (खूप), मोट्यान (खूप) ही झाडीतील विशेषणे वऱ्हाडीत नाहीत.

क्रियापदे :

- वऱ्हाडीत आढळणारा कर्मणी प्रयोग झाडी बोलीत नाही.

- संयुक्त वाक्यात 'आवासिन' प्रत्यय लागून क्रियापदाची रचना सिद्ध होत असून क्रमाने घडणाऱ्या दोन क्रिया या रचनेत दर्शविल्या जातात. उदा., मी जावासिन् ते मरावासीन् (मी गेलो आणि ती मेली.), तोफोकावासिन् ना पानी येवसीन् (त्याने पेरले आणि पाऊस आला). वऱ्हाडीत 'आसी' प्रत्यय लागून वरील रचना सिद्ध होते. उदा., मी जासी ते मरासी, त्यानं पेरासी अन् पानी यासी इत्यादी.

क्रियाविशेषण :

- कडोकडो (कडाडून), झाडीतील झुंजरका (पहाटेस), ताडातुडी (त्वरीत), बारबंड (इतस्ततः), लवर्लवर् (भरभर), हाडाहुडी (अचानक), इत्यादी अनेक क्रियाविशेषणे वऱ्हाडीत आढळत नाहीत.

शब्दयोगी अव्यये :

- क्रियाविशेषणाप्रमाणे वैशिष्ट्येपूर्ण शब्दयोगी अव्यये झाडीत उच्चारात आढळतात. वऱ्हाडीत उच्चारात नसलेली काही उदाहरणे पुढीलप्रमाणे, - इसो (विषयी), कर (कडे), कुनाल (कडून), जरिये (कडून), परिना (अनुसार) इत्यादी.

उभयान्वयी अव्यये :

- अना (आणि), ना (आणि), बलकेस् (तथापि), मात्रम् (पण), मुहून् (म्हणून) इत्यादी.

केवलप्रयोगी अव्यये :

- अवा (काय), उम्मस् (छान), काहातऽ (का), खराच् (खरेच), माज्यागन्या (असेच्या), हुक्कू (छट), हेप्पन्रे (अरेच्या) इत्यादी.

झाडीत आढळणारे मात्र वऱ्हाडीत नसलेले काही शब्द :

अकन्ड (संपूर्ण), अजन्ट (खोडकर), अनुला (अळणी), आउट् (चिन्ह), कुइट् (भिंत), कुर् (आडनाव), खट्ना (खटकन), खलार् (घुसळणे), खव् (उग्र वास), खरा (खळे), गड् (रुतणे), गडा (खडा), गपइ (गुंडाळे), घप् (दाट), घुटि (लहान आंबा), घोर् (घोळणे), चक् (भूखंड), चट्नारि (चटकन), जट् (कृमी), जपान् (लुबाडणे), जोराव् (वाढ होणे), झलार् (तरंग), झाइ (भोवळ), झाल् (मोठे टोपले), टनस् (वाद), टुम् (पद्धती), टोल् (दगळ), ठक् (थकवा), ठस्का (ऐट), डूर (गढूळ), डग्लया (घरजावइ), डाचु (बूच), ढल् (हालणे), ढिक (गोंद), ढुटि (टोपले), तक् (नवस), तपेला (माठ), तव्ला (मातीचा गंज), थापल् (चाचपणे), दप्का (धाक), दातुन् (मंजन), दिस्रा (दुसरा), धकारा (भीती), धातू (वीर्य), नकुसा (थोडासा), नय्कत् (अकारण), पचुलि (छोटे धोतर), पद्मि (बरोबर), पाक्का (शिवाय), फर्दि (चोपडी), फलक् (वासणे), फुपु (आत्या), बाया (बाजूला), बेड्डा (मिश्रण), बोत्रि (वाकळ), भक्नारि (बदकन), भक्या (मोठे वानेर), मक् (लाजणे), मडा (अशक्त), मरार् (माळी), रजा (खत), रपत् (सवय), लग् (तुळई), लटारू (केसाळ), लिहिन् (सूक्ष्म), वगार् (फोडणी देणे), वट् (ओठ), वहरा (धुणे), सट्ना (सटकन), सराक् (सळई), हक्मा (अवश्य), हब्बा (नुकसान), हार्चा (वरही), हिर्दुक् (हुरहुर) इ.

◆◆◆

संक्षिप्त रूपे

(अ) जाती संदर्भ :

उ.	उभयान्वयी अव्यय
के.	केवलप्रयोगी अव्यय
क्रि.	क्रियापद
क्रि.रूप.	क्रियापदाचे भूत, भविष्य व वर्तमानकाळी रूपे.
क्रिवि.	क्रियाविशेषण
न.	नपुंसक लिंग
न.अने.	नपुंसक लिंगी अनेकवचन
पु.	पुल्लिंग
पु.अने.	पुल्लिंगी अनेकवचन
(ल.)	लक्षणेने आलेला अर्थ.
वि.	विशेषण
श.	शब्दयोगी अव्यय
सं.क्रि.	संयुक्त क्रियापद
संबो.	संबोधन
सर्व.	सर्वनाम
सर्व.रूप.	सर्वनाम रूप
स्त्री.	स्त्रीलिंग
स्त्री.अने.	स्त्रीलिंग अनेकवचन
?	प्रश्नार्थक वाक्याशिवाय अन्य ठिकाणी
'?'	या चिन्हाने अर्थाची संदिग्धता दर्शविली आहे.

(ब) भाषा संदर्भ :

अर.	अरबी
आ.	आसामी
इं.	इंग्रजी
ओ.	ओडिया
का.	कानडी
को.	कोरकू.
गु.	गुजराथी
ता.	तामिळ
ते.	तेलगू
पो.	पोर्तुगीज.
फा.	फारशी
बं.	बंगाली
मही.	मराठी हिंदी.
मात.	मातंग बोली
माबो.	मारवाळी बोली
हिं.	हिंदी
हिंम.	हिंदी, मराठी.

(क) संतसाहित्याचे संदर्भ :

अखे.	संत गाडगेबाबांचे अखेरचे कीर्तन
गाथा.	नामदेव गाथा
गोवि.	गोविंदप्रभू चरित्र
तुका.	तुकाराम महाराजांची अंभगगाथा
दास.	दासबोध
दृ.	दृष्टांतपाठ
धउ.	धवळे उत्तरार्ध
नद.	नलदमयंती
म.	महदंबेचे धवळे
मनो.	मनाचे श्लोक
रुक्मि.	रुक्मिणी गान
ली.	लीळाचरित्र
ज्ञा.	ज्ञानेवरी

(ड) आधुनिक वऱ्हाडी साहित्य संदर्भ :

अक.	अकशदीचे दाणे
अंधा.	अंधारबन
आ.	आरंबळ
अप्र.	वऱ्हाडीतील अप्रकाशित कविता
ऊ.	ऊठ आता गणपत
ऊन.	ऊन सावली
ए.	एक गाव सतरा लफळे
एक.	एक सावली कडुनिबांची
कळा.	कळा
कात.	कात टाकलेली नागीन
काया.	काया मातीत मातीत
काळी.	काळी माती निळी माती
कावू.	एक दिवशी कावू आला
खुं.	खुंदळघास
गय.	गयपातं
गाआ.	गावाच्या आकाभोवती
गा.	गावचावळी
गा.	श्री संत गाडेबाबा
गाका.	गावकळा
गागा.	गावगाळा
चंच.	चंचई
ज.	जवायाचं पोर
जटा.	जटायू
जां.	जांगळबुत्ता
जांग.	जांगडगुत्ता
झाहा.	झाला हाडांचा सापळा

झाली.	झाली बोंबाबोंब
झिं.	झिंगू लुखू लुखू
झेल.	झेलझपाट
ठ.	ठणक
त.	तहान
तित.	तितंबा
दि.	दिंडी
धग.	धग
धों.	धोंडी धोंडी पानी दे
धुम्म.	बळी किशोर.
ना.	नासोळा
नांबै.	नांगराचे बैल
निशा.	निशाणी डावा अंगठा
नोका.	नोका मारू पोटात
पख.	पखाल
पागो.	पागोरा
पाटी.	पाटीलकी
पाव.	पावसाचं पाणी
पाहु.	पाहुणचार
पोर.	जवायाचा पोर
पोळा.	पोळा आणि बाहुली
मिए.	मिर्साएक्सप्रेस
मिर्झा.	मिर्झायन
फीर.	फिरत्या चाकावर
बा.	बारोमास
बाख.	बारभाईचा खटला
भं.	भंडारवाडी
भीक.	भिकेची भाकर
भू.	भुलाई
मा.	माणूस
मा.	मातेरं
मे.	मेड इंन इंडिया
मोती.	मोती ज्याच्या पोटी
मे.	मेड इन इंडिया
रा.	राघववेळ
रूख.	रूखत
ल.	लचांड
लेक.	लेक भोईची
वलो.	लोकगाथा
वा.	वारूड
वि.	वाघ विठ्ठल. काया मातीत मातीत व इतर कवितासंग्रह.
ल.हाग	दंढार, इरिंग-मिरिंग
लोक.	वऱ्हाडी लोकगीते
शि.	शिलीपसेरा
शिली.	शिलीपसेरा
संगा.	संत गाडगे बाबा.
सि.	सिलीपसेरा
सित.	सितलालपनी
सुखो.	सुगरनीचा खोपा
सेल.	सेलझाडा
हज.	हजारीचे बेलपान
हा.	ड हाल्या हाल्या दुधू दे

◆◆◆

जैसें बिंब तरी बचकेचि एवढें ।
परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें ।।
शब्दाची व्याप्ति तेणें पाडें ।
अनुभवावी ।।

- ज्ञानेश्वरी ४.२१५

ध

धक (क्रि.रूप.) चालते व्हावे, निघून जा. 'अतून माया घरातून पयले **धक** तू.'

धकधक (स्त्री.) भयाकूल स्थिती. 'जोरजोराचे भांडन पाहून जीव तं निऱ्हा **धकधक** करे.' 'कायाकूट अंधार. जीव निऱ्हा **धकधक** करे.'

धकनं (क्रि.) १. चालू, सुरू होणे. 'वेळे आधी ठेसनातून गाडी **धकल्या** सारखी.' -मिए.३९. २. पुढे सरणे. 'शेवंतीकडे घटकाभर पायल्यापरता मानूस पुडी **धकतच** नोता इतकी सुंदर दिसे.' -दि.२३. ३. खाऊ शकणे. 'देवीच्या कुरपेनं गुन होता मले. भाकरबी **धक्याले** लागली व्हती.' -हज.३४. 'अनपानी **धकते** साराई माहा दुखते.' ४. भागणे. मले लुगडं नसलं तरी **धकते** माहा घरातल्या घरात थिगळंमिगळं लावून.' -पख.८३. 'गहूही मजुरीला जावू लागली. घर कसंबसं **धकतही** होतं.' -सेल.३३६.

धकळपकळ (स्त्री.) धाकधूक, भयाकूल. 'सरप पकळावं तं जीव **धकळपकळ** करे.'

धकवनं (क्रि.) कसेतरी भागवून नेणे. '**धकविला** कसा तरी गाडा.' -भीक.२१.

धकाधकी (स्त्री.) दगदग. 'आजकाल जगनं मोठं **धकाधकीचं** होयेल आये.'

धकोनं (क्रि.) १. भागवणे. 'मजुरीवर येवळं मोठं घर **धकोनं** पळते.' २. सुरू करणे. 'भलतीसा टाईम झाला गाळी **धकोनं** आता.'

धक्कन (क्रिवि.) एकदम, जोरात. 'तिले पाहून माहा जीव **धक्कन** उळाला.' -ना.२०.

धक्काबुक्की (स्त्री.) भांडण, एक दुसऱ्याला ढोसे मारणे. 'देवळातल्या गर्दीत **धक्काबुक्की** होतच असते.'

धग (स्त्री.) उष्णता. 'मानूस ऐदी निंगल्यावर संसाराची **धग** तं बाईमान्साले सोसा लागते.' (का.ढगे)

धगडा(ड्या/ळा) (पु.) यार, जार. 'ही चाल्ली माहं घर सोडूनसन्या तिच्या **धगड्याच्या** घरी.' -खुं.१६१. 'हाये तो त्या छिनालचाच **धगळ्या**.' -पागो.१०६.

धगवा (पु.) आस. 'चुलीतल्या जाळाचा **धगवा** जाणवला.'

धचका (पु.) धक्का, हिसडा. 'तितल्यात गाडीले बसला एक **धचका**/नाही म्हन्ताम्हन्ता होऊन गेला पचका.' -जांग.६७.

धच्चोट (वि.) आब/अब्रू नसलेला, लफंगा. 'त्या **धच्चोटाचं** काय खरं मानता तुमी?'

धज (स्त्री.) रुबाब, वजन, ऐट. '**धजीनं** घेते अन् अहेराले वाकय नेते.'

धजबाज (वि.) १. ताकद असलेले. 'जवारी **धजबाज** निंगली.' २. खर्चिक. 'टाईम पाऊन मान्साले **धजबाज** व्हाच लागते.'

धट (वि.) धीट, पक्के. 'गिरजाबाई बाईमाणूस असून **धट** हाये.' -पख.९५. 'शिव्याले **धटवट** दोरा पायजे.' (का.)

धटकट (वि.) धट्टेकट्टे. 'साठीले टेकूनई दोगंबी आजून **धटकट** व्हते.' -सित.६१.

धटकोंबळा (वि.) निर्भीड, ठाम, एक शिवी. 'बायकाईचा रस्ता सोळतच नाई **धटकोंबळा**.'

धटधांगडी (वि.) निलाजरी, भय नसलेला. 'लगनाची नार सदा मिरवे देवती/ **धटधांगडी** पाटाची हिंडे पलंगाभवती.' -लोक.८२.

धटवट (वि.) पक्का, टिकावू. 'तिफनीले दांडी चांगली **धटवट** पायजे, लेक.'

धटांग (वि.) १. मोठा, भव्य. 'जानराव पाय कसा **धटांगच्या** धटांग दिसते.' २. मजबूत. 'वारे वा! मस्त **धटांग** घर बांधलं राजे हो तुमी तं शहरातल्यावानी.'

धट्टाकट्टा (वि.) शक्तियुक्त, तरुण. 'ऐन पेरणीच्या घाती **धट्टाकट्टा** धावतापळता बैल गेला. कामाचा पचका झाला.' '**धटाकटा** आन् तेलाचा वटा' (त.कट्टु)

धड (वि.) १. चांगले. 'जयांचे ऐहिक **धड** नाहीं। तयांचें परत्र पुससी काई।' -ज्ञा.४.१५५. 'एकासी **धड** न बोले वाचा। एकासी ह्मणे मी तुझे बांदीचा॥' -तुका.४०४०.४. 'काम करता करता ह्या पाजनकरिनी मेल्या, आम्ही मजुरानं नाई **धड** झोपड्या बांधल्या.' २. देह, शरीर. 'माकोडा असेः ऐसाही झाडीजे तरि **धड** तुटे परि झडेनाः' -दृ.५६. ३. पूर्ण. 'पुरती रात सरली नाही. **धड** दिवस निघाला नाही. झुंजूमुंजूची घटका.' -डेबू.३१. (का.धाळि)

धडक (स्त्री.) ठोस, टक्कर. 'फटफटीची **धडक** लागल्यानं टंगळं मोळूं सायाचं.'

धडकं (न.) कापडी तुकडा. 'मायनं **धडक्यात** बांधून दिलेली भाकरी कधी संपत नाही.' -जटा.२२.

धडकं (वि.) चांगले, व्यंगहीन. 'तुका म्हणे माझें हितचि जालें। फाटकें जाउन **धडकेंचि** आलें॥' -तुका.१०८६.५. 'कोण्याबी लंगळ्या जिवाले **धडकं** व्हावं वाटते.' -खुं.२३०.

धडकनं (क्रि.) एकदम येणे. 'तेवढ्यात सदू येऊन **धडकला** तथी.'

धडधड (स्त्री.) भीती वाटणे. 'अंधारात माही छाती **धडधडत** होती.' (त.पडपडपु)

धडपं (न.) कापडी तुकडा. 'खुंटीवरचं **धडपं** खांद्यावर टाकून तो बाहेर गेला.' -अंधा.

धडपड (स्त्री.) त्वरा, घाई. 'असा तिचा धांदर झपका आवाज ऐकला आणि तो **धडपडत** बाहेर आला.' -खुं.२५३.

धडा (पु.) १. दहा शेरभराचे वजन. 'दगडा बाईनं शेतात दोनतीन **धडे** कापूस वेचला.' -भं.९. २. चांगले. 'फाटका नको देऊ **धडा** देनं कपडा.' ३. पाठ. 'काय **धड्यावरी** सारस्वतें। पढो सिकिजें॥' -ज्ञा.९.८.

धडाका (पु.) परिपाठ, एकसारखी तीच कृती. 'डबक्यात चिमण्यांनी सचैल स्नानाचा **धडाका** लावला.' -सि.४३.

धडाधडा (क्रिवि.) अव्याहत, सलग. 'संपर्क **धडाधडा** कार्यक्रम तडातडा.' -मिर्झा.१६८.

धडाल (क्रिवि.) भराभर. 'पाणी वरून पडते. काय पाहेता वावरात धरा **धडाल** डवरा.' -लोक.२२. 'पोट्टे नदीत **धडाल** उळ्या मारत रायतात.'

धडुतं (न.) अर्धेमुर्धे धोतर, पालव. 'नेस्याले धड **धडूतं** नाई मान्साले, गोठी करता मोठ्या.'

धत (न.) निर्भत्सना दर्शक शब्द. '**धत** तुह्या मायचं हे काम तं!'

धततेरेकी (स्त्री.) निर्भत्सना करणारा उद्गार. 'एवढं घमीलई उचलोत नाई **धततेरेकी** लेका!'

धतिंग (पु.) बनाव, देखावा, नाटक. 'त्याला लोकवर्गणी हे सरपंचाचं पैसे खाण्याचं **धतिंग** वाटे.' -पख.४१.

धतुरा (पु.) १. एक क्षुद्र फूल. २. हातात काही न पडणे. 'मोबदल्यात हाती **धतुराबी** येत नसल त मंग त्याचं मन जाग्यावर राहील का?' -पख.६०.

धन (न.) संपत्ती. 'पाया खांदताना मळकं दिसलं. म्हटलं रमश्या सापळ्ळं लेक **धन**.'

धनगर (पु.) शेळ्यामेंढ्या पाळणारी जमात. 'पराटीची उलंगवाळी झाली **धनगराच्या** गाई, बकऱ्या, मेंढ्या बसोल्या वावरात.' (का.धनगर)

धनगराचा बेळा (पु.) धगरांचा पडाव, छावणी. 'हरसाल आपल्या वावरात **धनगराचा** बेळा असल्यानं वावर खतोल्या जाते.'

धनधपट (वि.) उंचपुरा, ताकदवान जवान. 'हाळापेरानं पोरगी साजरी असल्यानं पोरगाई **धनधपटच** पाहा लागन.'

धनपायाळ (वि.) गुप्त धन शोधणारा पायाळू इसम. 'मी **धनपायाळ** हाये म्हणून मले हे धन सापडते.' -खुं.१९९.

धनमामलत (स्त्री.) पैसे वगैरे. 'मी इचारू का? इचारायले अशी का **धनमामलत** लागते?' -झिं.७९.

धनवर (वि.) संपन्न, भरपूर. 'मोकळ्या मनानं **धनवरवाणी** पाणी पीऊ दे.' -शि.८.

धना (पु.) कोथिंबिरीचे बी. 'संबारासाठी हरबऱ्यात **धने** पेरले.'

धना जानं - माजावर येणे. 'म्हैस **धना जायेल** आये. हेला पाहा लागते एखांदा.'

धनायेल (वि.) माजावर आलेली. 'म्हैस **धनायेल** असल्यानं हेल्या जोळ नेऊन सर देल्ला.'

धनावनं (क्रि.) गाई, म्हैस इ. माजावर येणे. 'समजा तुमची गाय हिटवर आली, म्हणजे **धनावली** समजा.' -झेल.७१.

धनावली (क्रि.रूप.) माजावर आली. 'गाय **धनावल्याच्यानं** आक्क्या तिच्या मांग लागला.'

धनी (पु.) मालक, स्वामी. 'आपल्या हाती काय हाय माय अन् आपल्या **धन्यापुळे** काई चालतबी नाई.'

धनीन (स्त्री.) स्वामिनी. 'आता चलाचला घरा, पन् **धनीन** है माहिरा जीव घाबरा जी.' -शि.३८.

धनुरवात (पु.) एक व्याधी. 'कैसा वारया **धनुर्वात** चढला। समुद्र कीं महापुरीं पडिला।' -ज्ञा.११.३५७.

धपकन (क्रिवि.) धप्प आवाज करीत, एकदम. 'पायजा आजोबा, शिळीवरून **धपकन** खाली पळसान.'

धपका (पु.) १. भार, ओझे. 'पंचान्नी टाकलेला हा शंबर रुपयाचा **धपका** तिच्या कुवती बाहेरचा होता.' -कात.२५३. २. धपका खानं - हाय खाणे, घाबरणे.

धपके (पु.अने.) धपाटा, मार. 'ते लळतलळत, हे तेईले **धपकेधपके** मारे.' -लेक.७७.

धपाटा (पु.) १. एक प्रकारची पोळी. 'शिदोरीवर मायनं **धपाटा** अन् ठेचा देला.' २. चापट. 'गुरुजीच्या हातचा **धपाटा** खाल्ला काय बे?'

धपाधप (अ.) एकसारखे. 'येवळी मोट्ठी मशीन असल्यानं **धपाधप** काम पुळे जाय.'

धपाल (क्रिवि.) सारखे, खूप. 'रस्त्यात चिखोल, त्यानं **धपाल** पाय फसत.'

धपाळकन (क्रिवि.) एकदम. 'कच्च्या डांगीवर चळू नको बावा, **धपाळकन** पळशील.'

धबधबा (क्रिवि.) पडण्याची जलद गती. 'मोटीतून पानी पळते तं **धबधबाच** पळते.' (का.दबदबि-बे)

धबाल (क्रिवि.) जोरजोरात. 'पयतापयता मी **धबाल** पळत जावो.'

धबाळकन (क्रिवि.) एकदम. 'शिवऱ्या तोंडावरच पळ्ळा **धबाळकन**.'

धमक (स्त्री.) १. क्षमता, हिंमत. 'बायको पोसाची **धमक** नाही सायाचेहो तुमच्यात त काहाले लगन करता?' -

एक. '**धमक** वाघाची, मिसी सोनतागाची.' २. दुर्गंध. 'पेवातल्या जवारीची भल्ली **धमक** येते.' (का.धमकु)

धमकन (वि.) एकदम आलेला- वास. 'धावत जाऊन त्येले उठोलं तं मले **धमकन** वास आला तोंडाचा तो ठॅ होता.' -दि.४७.

धमकारा (पु.) वासाचा भपका. 'गवळी ढाण्यात दुधा तुपाचा **धमकारा** तर कोरकू ढाण्यात दारूचा भपकारा.' -झेल.२१.

धमकावनं (क्रि.) सजम, धमकी देणे. '**धमकाऊनबी** माया बुड्याची ढाय काई गेली नाई.' -सित.११५.

धमकावनी (स्त्री.) धमकी. 'कोनाच्या **धमकावनीले** भेत नाई आपून हव.' (का.दमकु)

धमधम (क्रिवि.) भरपूर. 'म्हैस चारा खाते झमझम/ दूध देते **धमधम**.'

धमधमा (वि.) घायाळ, हैराण. 'संस्कृतीचा अभिमान इतिहास जमा झाला/ पैसा **घमघमा** अन् गरीब **धमधमा** झाला.' -जांग.७७.

धमा (पु.) आग्रह, धोषा. 'म्याच **धमा** लावला व्हता. म्हणूनसन्या आज आणली त्यानं बायको.'

धम्मक (स्त्री.) दुर्गंध. 'गटाराची **धम्मक** लयच येऊन रायली.'

धरजो (क्रि.रूप.) धरावे. 'कारोळले मांगून हाकालतो, तू पुळून **धरजो**.'

धरतई(री) (स्त्री.) पृथ्वी. 'सबसे बडा कोन? एक म्हने सबसे बडी **धरतरी**.' -अखे.

धरधर (वि.) चरचर, धारदार. 'नाक पाय लेकाचं कसं **धरधर** आये.'

धरन (न.) धरण. 'गावातनी नळ आले. त्या नळाले महानच्या **धरनाचं** पानी येते.' (का.धरण)

धरनं (क्रि.) १. मागण्यांसाठीचा सत्याग्रह. 'हाफीस बंद हाय. कारकून **धरनं** देऊन बसेल आयेत मांडवात.' २. पकडणे. 'पैसे काहाचेबे, चोमनं **धरनं** माहा.'

धरनी (स्त्री.) पृथ्वी. 'पहेलं पानी **धरनीवानी** कस्तुरीगंध पेरून गेलं.' -वि.

धरनी माय (स्त्री.) पृथ्वी. 'पोटाले घालनारी **धरनी** माय हाय.'

धरनीत (क्रिवि.) हिशोबात. 'तुया माथं हे उलीउली जीव आयेत बाई! बाप्पू काय **धरनीत** आयेत?' -धुम्म.

धरम (पु.) धर्म. 'दोन दाने मांगनाऱ्याईले देऊन कोनीबी **धरम** करतेच.'

धरमधपका (पु.) अकारण भुर्दंड. 'जपतीतून काही मिळायचे नाही आणि वरखर्चाचा **धरमधपका** नाहक मात्र बसावयाचा.' -कात.२२.

धरमधावनी (स्त्री.) दान, दातृत्व. '**धरमधावणी** करायची तर घेतले खाणाखराब्यानं.' -ऊन.१९४.

धरमशाळा (स्त्री.) प्रवाशांचा निवारा. 'वंकारेसराले आमी **धरमशाळेतच** मुक्कामी असतो.'

धरम्या (वि.) धर्म करणारा. 'नुस्तं हावनं तूं कसच म्हन्तू **धरम्यावानाच्या**.'

धरलाबांधला (वि.) अधिपत्याखाली असलेला. 'तुमचा का **धरलाबांधला** आहे मी? माझा मी मुखत्यार आहे.' -ऊन.४६.

धरेल (क्रि.रूप.) धरलेले. 'मासोई ज्यानं **धरेल** आये त्याची होते.' 'कोनीकोनाचं **धरेल** बांधेल थोळच अस्ते?'

धर्ती (स्त्री.) पृथ्वी. '**धर्तीमातेसाठी** आपून शईद झालो तरीबी चाल्ते.' (का.)

धर्माय(ळ) (न.) गुरांचा पाणी पिण्याचा लांबोळा सार्वजनिक हौद. 'गावातले ढोरं **धर्मावरच** पानी पेतात.' 'त्रिकाळ **धर्माळ** भरावा पाण्यानं, त्या बदल्यात इनामी वावरातलं पिकपाणी खावं असा रिवाज होता.' -सि.३९.

धवला (पु.) चळला, भडकला. 'निरूप ऐकताच माहा माथा **धवला**.' -लेक.७६.

धवस (स्त्री.) धमकी. 'जो ऐकत नाही त्याला **धवसा** देऊ लागला.' -ना.१६५. 'जाय रे खवसा, देऊ नको **धवसा**.'

धवसाळ्या (वि.) कोणतेही काम हिमंतीने करणारा. 'गोप्या लयच **धवसाळ्या** आय. लाखाचा सौदा तं बातन्याबात करते.'

धवसेल (वि.) कोणतेही काम हिमतीने करणारा. 'येवळं माग वावर घ्याले **धवसेल** कास्तकारच पायजे.'

धवस्या (वि.) हिंमतवान, धाडशी. 'पावना तं लयच **धवस्या** हाय कोनालेच आयकत नाई.'

धस (क्रि.रूप.) शिरावे. 'लेकरा, येस्टीत **धस** अन् जागा ठुजो.'

धस (वि.) धस्कट, फण. 'झाल्या **धस** काशा कुंदा, त्याला सहाय्य गोवींदा, नको भलत्याच छंदा.' -रुक्मि.२. 'जेवारी सोंगताना येखांद तरी **धसं** पायाले लागतेच.'

धसकट (न.) १. व्यत्यय. 'सोयरीक मस्त होती. पावन्यानं हुंड्यांचं **धसकट** नोतं काळा लागत.' २. ज्वारीचे खुंट. (का.दस्कु) ३. झाडाचा तुटका, अर्धवट खुंट. 'निंबाचं हे **धस्कट** छाटा लागते.'

धसकटं (न.अने.) खुडके झाड, ज्वारी कापणी नंतर उरलेले फणकट. 'गालावर केसांची **धसकटं** कडबा सोंगलेल्या वावरातील फनकटासारखी.' -झेल.५.

धसकटे (वि.) शेतीत राबणारे. 'आपल्या **धसकट्या** लोकास कुठी लागतात नवकऱ्या?' -ल.८.

धसकपसक (क्रिवि.) धसमुसळेपणाचे. 'पुंजाचं कोणतही काम किती **धसकपसक** असते ते तिला माहीत आहे.' -पख.७.

धसका (पु.) धाक, भीती. 'मायची आसन्नमरण स्थिती बघून मला तर **धसकाच** बसून गेला.' -फीर.१६३.

धसडा (पु.) मोठा धक्का. 'बैलानं **धसडा** देल्यानं कंबळकचं मुळूं माहा.'

धसतफसत (क्रिवि.) धवशीने, रेटून. 'अबे तेबी लय माजल्यावानी करायलं. चळवळ सुरू झाली तवापासून, लिंबा, बेल्या **धसतफसत** बोलला.' -वा.३९७.

धसंधसं (क्रिवि.) भीती न बाळगता त्वरेने, वेगाने. 'डेबूचा हात धरला. निंघाली **धसंधसं** पावलं टाकीत.' -डेबू.८.

धसनं (क्रि.) शिरणे, घुसणे. 'माय म्हणायची नको तिथं **धसू** नये, अविचारानं फसू नये.' -ठ.२७. 'गोन्यावरतं बसून पुडीपुडी **धसत** एक बोलाचं अन् घरात **धसून** दुसरं.' -ज.५०.

धसमुसय (वि.) धसमुसळे. 'जरा आरामानं, तुमचं भल्लं **धसमुसय** काम हाये.' -ना.५५.

धसमुसळा (वि.) आडदांड, मूर्ख माणूस. 'शंकरनं थयथयाट केला तसा शंकर **धसमुसळ्यासारखा** पुढे झाला.' -सि.३१.

धसली (क्रि.रूप.) घुसली, शिरली. 'बाकराची किंकाळी मनात **घुसली** उरात धसली.' -डेबू.४.

धसळफसळ (क्रिवि.) कसेतरी, अव्यवस्थित. '**धसळफसळ** केलं, पिठलं गोळ झालं.'

धसाड्या(ळ्या) (वि.) अविचारी. 'असे नाजूक कामं कोन्या **धसाड्याले** सांगू नोयेत.'

धसाळ (वि.) अविचारी. 'म्हणे ऐसा नाही देखिला। **धसाळ** कोणी॥' -ज्ञा.११.६१०.

धसाळा (पु.) १. जोराचा धक्का. 'ऐसा वनवासियासं सकळां। देतां एकचि तूं **धसाळा**।' -ज्ञा.११.१०४. 'हऱ्यानं त्याच्या छातीत आपल्या खुंब्याचा एक **धसाळा** दिला.' -डेबू.१२. २. घाईघाईने, निष्काळजीपणाने. 'बोलनं मायाऊपनाचं अन् चालनं **धसाळ्याचं**.'

धसीत धस (न.) कामात काम करणे. 'वखरन झाल्यावर **धसीत धस** कोपयाई तोळून टाकल्या.'

धसू (क्रि.रूप.) शिरू, प्रवेश करू. 'दारू जास्त चळल्यानं शाम्या भलत्याच गल्लीत **धसू** लागला.'

धसेल (वि.) शिरलेला. 'पायात **धसेल** काटा रातभर सल्ला.'

धसोनं (क्रि.रूप.) खचवणे. 'टेकळं **धसोनं** पळूं मातीसाठी.'

धस्कावनं (क्रि.) धास्तावणे. 'कुठ जायचं आहे या प्रश्नासरशी महादेव एकदम **धस्कावला**.' -धग.१२

धळ (वि.) नीट, व्यवस्थित, चांगले. 'राऊळोः **धड** होइल?' -गोवि.६१. 'अर्जुना आघवियाचि मातू अंतःकरणे। **धडोंता** आहासि॥' ज्ञा.१०.४९. 'तरी घरीं मातापितरां। **धड** बोली नाहीं संसारां।' -ज्ञा.१८.५९५. 'ते काट्टं कोन्तं **धळ** आये व?' 'एक ना **धळ**, भाराभर चिंध्या.'

धळ (न.) तोंड सोडून शरीराचा भाग. 'दोन्ही **धडे** तैसीचि मागौनि मिळालीः' -ली.१९८. '**धड** तुटलेयांही जीवें परमेश्वरातें न सोडावेंः' -दृ.५६.

धळंधळं (क्रिवि.) धाडधाड, जोराजोराने. 'पोट्ट्याले पैसे देले नाई तं त्यानं **धळंधळं** दरोजा आपटला.'

धळक (स्त्री.) ठोस, धडक. 'एकमेकीं घेती थडका। पाडी **धडका** देऊनि॥' -तुका.४३६५.१. 'बैलानं लेक मलेच जोऱ्याची **धळक** मारली.'

धळकनं (क्रि.) १. जोरात भिडणे, धडक लागणे. 'बंडी झाळाले **धळकली**.' २. एकदम येणे. 'बैठकीत हरी येऊन **धळकला**.'

धळका (पु.) जाळ, उबाळ. 'मंग पेटते **धळका/** सारे आंग शेकतात.' -काया. 'कचरं टाकलं तसा तापात एकदम **धळका** झाला.'

धळकी (स्त्री.) कापरे. 'पान्या पावसाची हिंडू नको पोरी/ **धळकी** भरते अभायाच्या उरी.' -काया.१८.

धळगत (स्त्री.) सुस्थिती. 'माझ्या अंगसंगे तुम्हांसी विश्रांति। मग **धडगति** नाहीं तुमची॥' -तुका.४२२३. 'आता काई आपली **धळगत** नाई. डेबूनं हेरलं.' -डेबू.१६.

धळधाकट (वि.) चांगले पक्के. '**धळधाकट** आहात ना तुमी, काम केल्यानं काय जीव जाते? अशी भीक मांगता.'

धळपळनं (क्रि.) धडपडणे. 'म्हणे पावो **धडफडील**। तरि स्वामीची निद्रा मोडैल।' -ज्ञा.१३.२५६.

धळपा (पु.) कापडाचा तुकडा. 'अरे पोरा बोळखं फिरू नाही. टोपी नाही तर मंग काही पालवाचा **धळपा** गुंडाळायचा.' -वा.१९. (मात.)

धळा (वि.) १. फुटलेला नाही असा. 'दोनी पवरे **धळे** असल्यानं त्याची कायळ केली.' २. एक मोजमाप. 'दोन पासऱ्या एक **धळा** कापूस भरला.'

धळा (पु.) बोध, पाठ. 'मारवाळ्या, शिंद्याई जोळून **धळा** घ्याव आपून.' 'शाळेत दोन **धळे** शिकवून झाले.'

धळाल (क्रिवि.) एक सारख्या, पाठोपाठ. 'तुहा गन्या भीतीच्या खांडाऊन **धळाल** उळ्या मारून राह्यला.' -

धुम्म.

धळाल(ळ)कन (क्रिवि.) जोरात. 'गोसावीयाची लेकि आलीः कीड्डी देखीलीः आणि **धडकरी** आंग टाकीलेः मुर्च्छना आलीः' -गोवि.३२५. 'गुन्या झाळावर चढे अन् **धळालकन** पळे.'

धळांग (क्रिवि.) धळांग आवाज करीत. 'पाटलीऊन **धळांगधळांग** भांडे खाली पळ्ळे.'

धळी (स्त्री.) १. डबकी. 'हे तेलाची **धळी** घ्या अन् दोन किलो तेल आना.' २. घरापुढील बांधलेली जागा.

धळ्ळा (पु.) मोठी फट, मोठा पोपडा. 'भीतीचे **धळ्ळेच्या धळ्ळे** पळ्ळे, गिलावा करा लागते आता.'

धंदा (पु.) व्यवसाय. 'करीत विश्वरुपदर्शनाचा **धंदा**॥' -ज्ञा.११.०१९. 'अहिंसेचा **धंदा**। करितें आहाती॥' -ज्ञा.१३.३०५ 'अखंड तुमचें **धंद्यावरी** मन। माझें तों हेळण करिती सर्व॥' -तुका.४२२३.

धा (वि.) दहा. '**धा** रुपयाची गोठ तं हाय, येवळा काय इचार करा लागते?'

धाऊत (न.) धावेतील पाणी. 'आपली **धाऊत** काय दोन पाटालेच आटणार हये का काय? त्याईच येगळं.' -सेल.२४.

धाक (पु.) दरारा, भीती. 'जैसा सिंहाचिया हांका। युगांतु होय मदमुखा। तैसा कौरवां अशेखां। **धाकु** तुझा॥' -ज्ञा.२.२१५. 'आह्मी सदैव सुडके। जवळीं येतां चोर **धाके**॥' -तुका.६०.१ '**धाक** पडे चोरट्यांचा। म्हणोनि पहारे देउळी॥' -ग्रा.२५.१५. 'मास्तर माऱ्याच्या **धाकानं** तो शाळेत ना जाये. **धाकाधाकांत** शाळा सुटली.' -धुम्म.

धाकंधाकं (क्रिवि.) भीतभीत. '**धाकंधाकं** इकळेतिकळे पाहात तो उभा रायला.' -सित.१०३.

धाकदरारा (पु.) दहशत, वजन. 'लोकाईवर आपला **धाकदरारा** ठेवला तरच ते सरळ वागतात.' -पाटी.

धाकधूक (स्त्री.) भीती, चिंता. 'तिले गाठोळं उचलून देताखेपी माया छातीत **धाकधूक** वाळ्ळी.'

धाकंभेणं (न.) भीती. 'तुमच्या मेळाव्याच्या **धाकंभेणं** वाशिमच्या सगळ्या दुकानदाराह्यनं आज दुकानं बंद ठेवायचं ठरवलं.' -वा.२४४.

धाकंमारं (क्रिवि.) भीतीने. 'पोट्टं लयच अयदी निंगलं. **धाकंमारं** काईतरमा करते.'

धाकमारी (क्रिवि.) भीतीमुळे. 'मी पाहो तं माया **धाकमारी** ते आपलंच बटण दाबत.'

धाकला (वि.) लहान. '**धाकला** देर भाभी म्हनाया लाजते/ खुटीचा शेला त्याच्या रानीले मांगते.'

धाकिजनं (क्रि.) भय, भीती वाटणे. 'बापाच्या मारझोळीपायी लेकरू केवळं **धाकीजलं** पाय बैना.'

धाकी (वि.) भयाकूल. 'माहा जीव त लयच **धाकी** पळला बाई या नावऱ्याले.'

धाकेजनं (क्रि.) चिंता, काळजी, भय वाटणे. 'पोराच्या चिंतेनं जीव **धाकेजला** होता तरीभी मन धट होतं.' -दि.८५.

धागधुगी (स्त्री.) थोडी भीती वाटणे. 'अंधार पळ्ळ्यानं मरगटीतून जाताखेपी **धागधुगी** वाटत होती.'

धागा (पु.) दोरा. 'सुईचं धाग्याबिगर अन् **धाग्याशिवाय** सुईच भागत नाई.' (हिं.तागा,धागा)

धागादोरा (पु.) १. धागा. 'डब्ब्यात सूई, गुंड्या, **धागादोरा** असं ठेवलेले असे.' २. सुराग, पत्ता. 'मर्डर झाला त्याचा अजूनबी **धागादोरा** लागला नाई.'

धागाधुगा (पु.) धागा वगैरे. 'फाटेल चोई शिवाची हाय, कुठी **धागाधुगा** असीन त पाय बरं.'

धाटनी (स्त्री.) प्रकार, वळण, चाल. 'कोनाची उनारी दाट तं कुनाची पतली आपआपली **धाटनी** अस्ते.' (का. धारि)

धाटा (पु.) फेटा. 'गोसावी मेघवर्णीए पागेचा **धाटा** घेतलाः फुटयाची तळसुती केलीः' -ली.५१३. 'डोक्याला दुप्पट्याचा **धाटा** बांधून केरू आईसकांड्या घेऊन आला.' -झेल.६४.

धाटी (स्त्री.) रीतीरीवाज. 'जा लागलं शेवटी ऑपरेशनसाठी तवा कुठं बुजली ढुंगणातली **धाटी**.' -मिर्झा.११५. 'जुन्या **धाटीची** बाई ते. नवऱ्याच्या अदुगर जियीन कसी?' -सित.३०.

धाड(ळ) (स्त्री.) कळपाचे आक्रमण, हल्ला. 'तवं **धाडि** आलीः टेकीचेनि राये धरूनि नेलाः डोळे काढिलेः' -गोवि.६९. 'गावात काल निम्मेरातीच **धाड** पळ्ळी पोलिसाईची.'

धाडधीड (क्रिवि.) एकदमच. 'किसना येते अन् **धाडधीड** घरातच घुसते.'

धाडतो (क्रि.रूप.) पाठवितो. 'तीन आने रोज देसीन त **धाडतो** माया भीमाले.' -धग.४१.

धाडनं (क्रि.) पाठविणे. 'चंद्र कमळणी नाही **धाडीत** सांगोनि।' -तुका. 'आवतन द्याले समदेईच्या घरी **धाडनं** पळतेच म्हाल्याले.'

धाड्या (पु.) मृगाचा पाऊस. 'लागत्या मिरगाचा **धाड्या** पाऊस आला.' -पख.८४.

धात (स्त्री.) हिंमत. 'त्याचा आजही हात धरावयास प्रत्येक्ष मालकाची **धात** पोहचत नाही.' -कात.५०६.

धादा(धा)न (क्रिवि.) प्रत्यक्ष, अमोरासमोर. 'पन **धादान** डोयानं दिसते ना ते वरई.' -भं.३६. '**धादान** खोटं बोलून

रायला लेका तू.'

धान (स्त्री.) १. जाड दोर. 'चार बैली नागराची आगूल लाव्याले तं मोठी **धानच** पायजे.' २. तांदळाची बोंडं. '**धान** उखळात मुसळानं दनदन कांडला, सुपानं पाखडला का घरीच तांदूर तयार.' -दि.६९.

धानघाटा (पु.) धानाचे चौकट, बांधाचे शेत. '**धानघाटा** फुटला आन् पानी सैरावैरा धावाले लागलं.' -दि.३७.

धानाडी (स्त्री.) धान पिकणारी जागा. 'भंडाऱ्याक्ळे सबन जमीन **धानाडीच** हाये.'

धाप (स्त्री.) हिमंत सुटणे, भीती धरणे, श्वास घ्यायला त्रास होणे. 'एकसारखा पयत सुटलो तं **धाप** लागली मले.'

धापनं (क्रि.) दडपणे. 'एकामांग तीन पोरी पाहून बापाचा जीव **धापनारच** नाई.' -लेक.३९. 'पोरगी दप्तर घेऊन **धापीनच** पडली.' -ना.८४.

धापळा (पु.) १. थर, खपली. 'तावनीतल्या दुधावर त लयच **धापळा** धरला असन.' -एक. २. थालीपीठ. 'मग तेही **धापडेयाची** दूरडी गोसावीयांपुढी ठेविलीः...हे लांकाचे धापडेः' -ली.५०५.

धापाळत (क्रि.रूप.) धापा टाकीत. 'भाकरी वळायला बसलेली शेवंता माय धावत, **धापाळत** बैठकीत आली.' -बा.२१०.

धापिजनं (क्रि.) धाप लागणे. 'रामदास **धापिजून** उठून बसलेल्या गौरीच्या जवळ जाऊन बसला.' -पोळा.

धापेल (वि.) भीती धरलेला. 'बैल गावातल्या आक्क्याले **धापेल** हाय. आक्क्या दिसला की हा हालतच नाई.'

धापोडा(ळे) (पु.) थालीपीठ, पीठ, कणिक, दही, बेसन, तिखट मिठाचा खाद्य पदार्थ. 'माय वऽऽ, शाळेत खायाले **धापोळे** बांधून दे.'

धाबं (न.) मातीचे जुने घर. '**धाबे** कराविया भट पींपळावरि फाटा मोडावेया वेंघलेः' -ली.४४५. 'मावदमाळी **धाब्याले** खंडारे/ गढ्याईच्या गोद्र्या झाल्या.' -गागा. 'शेतकरीबी चालला **धाब्यातून** टिनात.' -मिए.१२८.

धाबलं (न.) लहान घर, धाबे. 'पुस्तके बाहेर **धाबल्यावर** नेऊन हाताने झटकली.' -बा.१४०. 'मरतो मी देतो जीव असं म्हणून तो **धाबल्यात** गेला.' -खुं.२५३.

धाबाधुबी (पु.) एक खेळ. 'कपळ्याचा चेंडू करून लेकरं **धाबाधुबी** खेयत.'

धामतीरी (न.) धर्मकार्य. 'खाले त्याले याचं फक्त घरी/ बाहेरच सुरू बाकी **धामतीरी**.' -मिर्झा.४७.

धामधूम (स्त्री.) घाई. 'ओ रंगराव मामा, कुठंसा निंघाले एवढ्या **धामधुमीनं**?'

धामन (स्त्री.) सापाची गव्हाळ्या रंगाची एक जात. 'पान्यात असली सरप नाई, **धामन** रायते.'

धामना (वि.) १. गव्हाळ्या रंगाचा. 'हा **धामना** बैल घरच्याच गायीचा आये.' २. ज्वारीची एक जात. 'चांगली **धामणा** ज्वारी बियाणे म्हणून ठेवली होती.' -सेल.१०२.

धामी (क्रिवि.) नादी. 'बकरीच्या **धामी** लागलो तर तेवढाच टैम तरी पास व्हत जाईन लेकाचा.' -खुं.२३०.

धामुक्या (पु.) दामोटा, बाभळीचे बी. 'बैलाच्या मानेचे भरकट, **धामुक्यासारखे** गोचीड उपसायचो.'

धायेधुपनं (क्रि.) कामकाज, कष्ट करणे. 'सारजा आजीबी आबा संगन **धायेधुपे**.' -सित.१३.

धायेलधुयेल (वि.) धुतलेले. '**धायेलधुयेल** कपळे खराब केले लेका तुया.'

धार फोळनं (क्रि.) पहिल्यानेच व्यालेल्या गायीच्या दुधाची धार मोकळी करणे. 'पयलाळू गायीची **धार** फोळा लागन लेक.'

धार (स्त्री.) १. प्रवाह. 'नदीसि पुरु आलाः एकि आकासी धारः एकि पाताळी **धारः**' -ली.२०२. 'एक माहानुभाव म्हणतिः **धारेचा** घाटु बांधलाः' -ली.६१. २. तीर्थक्षेत्री दगडी गायमुखातून पडणारा पाण्याचा प्रवाह. उदा. लोणारगावी. (का.) ३. एक गावाचे नाव.

धार लावनं (क्रि.) पाजळणे. 'इव्याले खात्यानं **धार** लावून देली.'

धारजीनं (क्रि.) अनुकूल. 'लोकई चांगल्याले **धारजीन** नाईत.'

धारन (स्त्री.) मजबूत, जाड खांब. 'गौळणी बांधिती **धारणासि** गळा। खेळे त्या गोपाळांमाजी ब्रह्म॥' -तुका.१२१.१. 'आपल्याले काय **धारन** अन् ठुनीचं जेमतेच आपन काहाले बिब्बा घालाव.' -लेक.२५. '**धारन** आन् ठुनी, घरात पायजे नायी कुनी!' -अक.६५.

धारना (स्त्री.) १. निष्ठा. 'गजानन बॉवर ज्याचीत्याची **धारना** हाय.' २. समज. 'जीवीचिये ऐसी **धारण**। म्हणोनि पुसावया जाहले कारण॥' -ज्ञा.६.३३६. 'गोळ बोलते म्हनून तो आपला हाय अशी **धारना** झाली तुमची.' (का.)

धारय (न.) पेरणीमागील कोळपणी. '**धारय** जुतुनिया पयल्यानं पुढे चाले पाय टाकून.' -लोक.१५. 'सरत्यातून पळेल बी झाक्याले मांगून **धारय** धरा लागतात.'

धारवटून (क्रि.रूप.) वखराने स्वच्छ करून. 'जिमीन साजरी **धारवटून** काडाची, काडीकचरा येचून जायभाज कराचा.' -जटा.२७.

धारा (पु.) स्वभाव, नियत. 'तुमचं वावर गायलं अन् आमचं

वाह्यलं पाह्यजे असा काहून **धारा** हाये तुमच्या जोळ.' -भं.३६.

धारी (पु.) 'बाई मामाजी पुसती कोणाचा हा **धारी** वाडा, चित्र लिहिले कवाडा.' -लोक.५६.

धारीवर ठेवनं - गायी, म्हशी दोहण्यात खंड पडू न देणे. 'म्हैस **धारीवर** ठेवा लागतेच. येक दिवस कमी येक दिवस ज्यास्त दूध असं नस्ते जमत.'

धार्जिन(ना/नी) (वि.) अनुकूल. 'देशमुखाच्या वतनदाऱ्या आता मागासवर्गीयाले जास्त **धार्जिन** झाल्या.' -पाटी. 'कसायाले गाय **धार्जीनी**.'

धालं (वि.) तृप्त. 'आली तर बेस झालं आता **धाल्या** मनानं चाल्ली जाय माय.' -मोती.

धालीधन (वि.) श्रीमंत, सुखी. 'देखन्या राजोसीले कोनीबी पैयस्यावाला **धालीधन** पोरगा उचलून घीन.' -सित.२२.

धाल्या (वि.) दातृत्व असलेल्या, देणाऱ्या. 'जमिनीत हालचाल केली म्हणून हे पीक आलं. ही त्या **धाल्या** धरतीची माया.' -गा.२९.

धाव (स्त्री.) १. लाकडी चाकाभोवतीची वर्तुळाकार लोहपट्टी. 'गाडीची पडकी **धाव** तावून बसवणं होत नाही.' -बा.४४. २. बैल मोट ओढतात ती उताराची जागा. 'हातपाय धुऊन **धावेच्या** उतरणी जवळच्या आंब्याखाली सारे शिदोरी सोडून बसले.' -कात.५. ३. पळण्याची हद्द. 'सळ्ळ्याची **धाव** कुपालोक.'

धावणूक (स्त्री.) कष्ट, धावपळ. '**धावणूक** केली आन गणागोताची भर्ती केली.' -सेल.२२.

धावतधपाळत (क्रिवि.) त्वरेने धावत. 'कोणीतरी निरोप दिल्यासारखा **धावतधपाळत**, जोरात ओरडत तो आला.'

धावधूप (स्त्री.) धावपळ. 'गावकरी भजनाच्या मंडपात, कोनी वट्यावर **धावधूप** करू लागले.' -मोती.

धावनारे (पु.अने.) लग्नातील कामांसाठी धावपळ करणारे. 'प्रत्येकाला कामे नेमून दिली. **धावणारांचे** गट पाडले.' -भं.७२.

धावा (पु.) आर्जव. 'आपणही त्या आईसारखा महादेवाचा **धावा** करावा.' -पख.५१.

धावाधाव(वी) (स्त्री.) धावपळ. 'ऐसा तेयासि ज्वरु झालाः तेयाची माता **धावाधावि** करु लागलीः' -ली.५४. 'जीव विसंवावयाचिया चाडा। सौंध **धांवाधांवी** करितसे बापुडा।' -ज्ञा.११.३७३.

धावाले (क्रि.रूप.) धावायला. 'गावभर **धावाले** पायजे. काई सामानसुमान सांगलं का जीवावर येते.'

धास्तावनं (क्रि.) घाबरणे. 'या विचारानं सुमनचा जीव भलताच **धास्तावला**.' -पख.५४. 'पोट्टे तरास देतील ना? **धास्तावलेला** शेषा बोलला.' -सि.३१.

धास्ती (स्त्री.) भीती. 'त्याले नाही मरन्याची, जगन्याची **धास्ती**.' -मिए.१०८.

धाळ (स्त्री.) धाड. 'त्याले काय **धाळ** भरली.'

धाळजा (क्रि.रूप.) पाठविजा. 'तरी सासरा म्हने अरे त्या लामकानीच्या पावनेलेई **धाळजा** रे नियाले.' -लेक.१२.

धाळते (क्रि.रूप.) पाठविते. 'मले घरी **धाळते** अन् हा बिळ्या वळते.'

धाळधाळ (क्रिवि.) असा आवाज करीत, वेगाने. 'वावरातून घराकळे **धाळधाळ** बंडी आनली हकालत.'

धाळनं (क्रि.) गमावणे, पाठविणे. 'मग तेयाते बोला **धाडिलेः** ते नैएतीचिः' -ली.१९८. 'पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय **धाडिलें**।' -ज्ञा.२.१९७. 'याया कौरवांचिया घरी। शिष्टाई **धाडिलासि** दातारा॥' -ज्ञा.११.५४२. 'तुका म्हणे मज **धाडिले** निरोपा।' -तुका.२०१. '**धाडीधाडी** वो भातुके। रंजविल्याचे कौतुके।' -तुका.४९८. '**धाडा** बोलावणें गोरोबाला।' -नाथ.१३२७. 'दोयपारी माया घराक्ळे सखुले धाळजो.'

धाळू (क्रि.रूप.) पाठवू. 'तरि तीते बोलउ **धाडु** सर्वज्ञ म्हणीतलेः **धाडाः** मग तीही मोलकणी धाडिलियाः' -ली.४६१.

धाळेल (क्रि.रूप.) पाठविलेले. 'पावन्याले नदीवर **धाळेल** हाय आंग धुयाले.'

धांगड (वि.) १. वयाने मोठा, एक शिवी. 'काय वचवच बोलाय लागली आता ही **धांगड**?' -त.८. २. जाडेभरडे, खरबरीत असणे.

धांगडी (वि.) दांडगी, बेमुर्वत, स्वैर असणे. 'परी धर्मपत्नी **धांगडी**। पोसितां जरी एकी वोढी।' -ज्ञा.१८.९४२.

धांगधिंगा (पु.) स्वैर मस्ती. 'मले नाही जमे जरी **धांगधिंगा**.' -मिर्झा.४५.

धांगळ (न.) १. तीनचार डफडे एकदम जोरात वाजविणे. 'मांगाईची भलतीच जोरात **धांगळ** सुरू आये.' २. मुख्य पिकात दुसऱ्या प्रकारचे धान्य पीक पेरणे.

धांगळ (वि.) वयस्कर. 'तुका म्हणे **धांगळ** झाली। संतासंगं फुगळ्या घाली.' -तुका.

धांगळधिंगा (पु.) धिंगाणा, दंगामस्ती, गोंधळ. 'घर केलें दार केलें। दुकान केला मोटा। पाटाची राणी **धांगडधिंगा** तिचा मोटा॥' -तुका.४६४.३. 'गावात पिंगा नाचही नंगा, **धांगळधिंगा** सरत नाई.' -मा.३०.

धांडा (पु.) ज्वारीचे झाड. 'कसे जवारीचे **धांडे** वाऱ्यावर नाचतात/ दोन्यातून कनसही मस्त दात काढतात.' -

चंच. 'कणसासह कापून **धांड्याचे** पुंजके हारीने पडलेले असतात.' -फीर.२१.

धांडोळून (क्रि.रूप.) शोध घेऊन. 'तिने भानोस **धांडोळून** उडदाची दाळ काढली.' -सेल.१५.

धांद (स्त्री.) मोठे चऱ्हाट, दोर. 'अन् इदरफिसके पुन्ना तागाची **धांद** आटरल्यावाणी हुंड्यासाठी आटरून बसतीन.' -खुं.११७. 'कापूस भरला खचून गोणा बांधला हो धांदीनं.' -धों.३०. '**धांदी**, दोन **धांदी** अंतरावचं काहीच दिसत नव्हतं.' -मोचं.३. 'हाल्याच्या मानेवर सोनतागाच्या **धांदीचा** फासा फेकला.' -रा.१४१.

धांदरट (वि.) भित्रा, बावळट. 'राती घराभाईर पळत नाई असं **धांदरट** पोट्टं आये हे.'

धांदरनं (क्रि.) भयाकूल होणे, भीणे. 'जरा हासत जरा भिजत अन् आलीस **धांदरून** अशी पदर सावरून.' -अ.४७.

धांदरा (वि.) बावळट, ऐनवेळी काही न सूचणारा. 'एक आन्ते एक इसरते असा **धांदरा** मानूस आय हा.'

धांदरून (क्रि.रूप.) घाबरून. '**धांदरून** त्याची पावलं चिकण्या गाळावरून घसरली अन् बद्दकन पडला.' -पोळा.

धांदरेल (वि.) गोंधळलेला. 'हे करू का ते करू असं होते त्याचं. लयच **धांदरेल** हाय लेकाचा.'

धांदल (स्त्री.) गोंधळ, घालमेल, तारांबळ. 'शोभाला मरणाच्या **धांदलीत** लवकर सावरताच आलं नाही.' -अंधा. (का.दंदले)

धांदला (वि.) गोंधळलेला. 'हे **धांदलं** पोट्टं एक काम धळ करत नाई.'

धांदु(दो)टी (स्त्री.) कापडी तुकडा. 'सालंमहिने नसते धरले तर आताची **धांदुटी** तरी झाली आसती का वावराची.' -सेल.२२. 'धोतर, आंगडं जागजागी फाटून त्यांच्या **धांदूट्या** झाल्या होत्या.' -मोचं.२८.

धांनदरझपका (वि.) घाबरा, भयभीत. 'असा तिचा **धानदरझपका** आवाज ऐकला आणि तो धडपळत बाहेर आला.' -खुं.२५३.

धिपाळ (वि.) खूप मोठे. 'देवरामचा गोप्या काय **धिपाळ** हाय लेकाचा, निऱ्हा दोन मान्साचा एकच.'

धिमेधिमे (क्रिवि.) हळूहळू. 'त्यांच्या नजरेसमोर चिंतामण दुडकी चाल धरायचा. मग **धिमेधिमे** चालायचा.' -काळी..८.

धिरवा (पु.) आधार. 'आता मनाले समजवू लागली. आता **धिरवा** देला तं धिरवा रायते.' -लेक.२.

धिरा (पु.) गाडीचे धुरे ठेवण्यासाठी केलेला लाकडी टेकू. '**धिरा** तुटल्यानं धुऱ्याखाली मोट्ठाच्या मोठा गोटा लावा लागते.'

धिरे (न.अने.) आधार देणारे लाकूड. 'आज पडक्या वाड्यातील ढासळत्या खांबाला **धिरे** देण्याची वेळ आली.' -कात.३०३.

धिरेधिरे (क्रिवि.) हळूहळू. '**धिरेधिरे** चळा मंदिरावर, घाई नोका करू.' 'पिटालू नको **धिरेधिरे** जाऊ दे बंडी.'

धिंगाना (पु.) गोंधळ, उच्छाद. 'जो जो म्हणे तुम्हीच होऊ दिला। **धिंगाणा** या गावाचा॥' -ग्रा.६.७३. 'आमचा राहे **धिंगाना** कल्ला कचंकचं.' -मिर्झा.४३. (का.तिल्लाण)

धिंगामस्ती(स्त्री) (स्त्री.) गोंधळ. 'शाळेत शांतता होती. नेहमीप्रमाणे पोरं **धिंगामस्ती** करीत नव्हती.' -धग.११५. 'बंजारवस्ती **धिंगामस्ती**.'

धिंड (स्त्री.) लज्जास्पद मिरवणूक. 'तुका म्हणे काय वांयांविण **धिंद**। पति ना गोविंद दोन्ही नाहीं॥' -तुका.२१.३.

धिंडोरा (पु.) गाजावाजा. 'घरातल्या गोठीचा पुऱ्या गावात **धिंडोरा** पिटवाची काई गरज नोती.'

धुईदा(धा)नी (स्त्री.) सर्वनाश. 'पान्याले खुमखुमी आली त्यानं झळी लावून देली मुंगाची **धुईधानी** झाली.' -लेक.४. 'जत्रामे फत्रा बिठाया तीरथ बनाया पानी दुनिया भई दिवानी पैसे की **धुइदानी**.' -अखे.

धुईधाय (स्त्री.) धुणे वगैरे. 'शेवटी भांड्याकुड्याची साफसूफ, **धुईधाय** झाली.' -धग.३६.

धुईमाती (स्त्री.) धुळवड. '**धुईमातीच्या** रंगात कसं फुलारलं आंग/ तना मनाले पटला होता पयसाचा रंग.' -काया.

धुकट (न.) धूर, धुपुटयुक्त. 'दव पळ्ळ्यानं वावरातलं **धुकटधुकट** दिसे सबन.'

धुकधुक (स्त्री.) भय वाटणे, जीव खालीवर होणे. 'पोरीसंगं बोलावं तं जीव निऱ्हा **धुकधुक** करते राजा.'

धुकपूक (स्त्री.) भयभीत. 'पोलीस दिसला का माईतं **धुकपूक** करते गळ्या.'

धुकूडपुकूड (क्रिवि.) भयाकूल. 'तिचा जीव नाहाकच **धुकूडपुकूड** करू लागला.' -मीच.१७.

धुगधुगी (स्त्री.) छातीतील आवाज. 'आजीची **धुगधुगीबी** बंद झाल्याच्यानं बाया लळ्याले लागल्या.'

धुटूक (न.) थोटूक. 'बिळीचं **धुटूक** दिसलं की तोंडात धरून सिलगावत जावं.'

धुडं(डा) (वि.) मोडलेलं. 'थांबलो नसतो तर त्याचं मन त्याच्या **धुड्या** पायासारखं पार मोडून गेलं असतं.' -एक.

धुडूक (न.) लहान तुकडा. 'काडीचं **धुडूक** घेऊन भिंती-

जवळच वळवळल्या सापाजवळ गेलो.'

धुड्डा (पु.) धुरळा. 'गाळरस्त्यानं गाळे येतात जातात त सबन धुड्डाच **धुड्डा** उळत रायते.'

धुतकारनं (क्रि.) नाकारणे, झिडकारणे. 'गोरगरिबाले कोन हुंगते? जो तो **धुतकारत** रायते.'

धुतली (क्रि.रूप.) धुऊन काढली. 'धोत्रे बरवी **धुतली**ः ओपवीलीः मागुती धुनि वाळते घातलीः' -ली.१७४.

धुतल्या गांडीचं (वि.) शुद्ध चरित्र असलेले. 'पन मी म्हणतो या दुनियात कोन आये व **धुतल्यागांडीचं**?' -ना.१५०.

धुत्तुह्या (न.) धिक्कारदर्शक. 'तं भजे खात नाई म्हंते **धुत्तुह्या** तं बायल्या.' -धग.६३.

धुनं (क्रि.) १. धुणे. 'माय आताच नदीवर गेली **धुनं** धुवाले.' -अक.१७. २. धुण्यासाठी असलेले कपडे. 'सकाऊनपासून **धुनं** पळ्ळेलं हाय. **धुनं** धुयाले वखतच नाई भेटत.'

धुनकधानक (न.) खरडपट्टी काढणे. 'कवाबी पाहावं तं बुडा मले **धुनकधानक** करत रायते.'

धुनकनं (क्रि.) १. रागाने बोलणे, खरडपट्टी काढणे. 'जखम पाह्यली तसं डाक्टरनं तिले **धुनकून** काढलं.' -अंधा. २. पिंजून काढणे. 'पिंजारी रुई **धुनकून** सफा करून रायल्ता.'

धुनी (क्रि.) १. देवाचा धूप. २. विस्तवावर एखादा पदार्थ टाकून धूर नाकातोंडातून घेणे. 'हयदीची **धुनी** घेतली तवा कुठी नाकातली धार खंडली.'

धुन्नक (स्त्री.) तंद्री. 'घाईघाईत आपल्या **धुन्नकमंदी** सरू विंजनघरात घुसली.' -सित.८५.

धुपट (न.) धूर. 'फूक मारून मारून जाते **धुपट** डोयात.' -काया. 'ओल्या बाभळीचं इंधन असल्यानं साऱ्या घरात **धुपट** दाटलं.' -ना.१४.

धुपटाळनं (क्रि.) धुराने काळवंडणे. 'वरून गुंडाळलेल्या धळप्यावर धुळच धूळ असल्याने **धळपा** हलक्या हाताने सोडला तेव्हा सनई **धुपटाळलेली** दिसली.' -वा.४७३.

धुपाटनं (क्रि.) धुराने काळे होणे. 'चूल पेटोली का घर, कवलं **धुपाटनं** चालू होतात.'

धुपारत(ती) (स्त्री.) देव ओवाळण्यासाठी धूप, दीप इत्यादी ठेवून केलेली आरती. 'पुजा केलीः बरवे वस्त्र वोळगळीलेः मग **धुपारति** मंगळार्ति जालीः' -गोवि.२७५.

धुपारनं (न.) धूप असलेले पात्र. 'मानूस पाऊन वापरनं, देव पाऊन **धुपारनं**.' (त.दूपगडम, दूपक्काल)

धुपावनं (क्रि.) उजाड होणे. 'कईकईने सीतेला वनवास केला म्हणूनच रामाच्या रामटेकी बरड **धुपावला**.' -कात.३५०.

धुपूट (न.) धूर. 'धांड्यावर सयपाक करताना मायच्या डोयात **धुपूट** जात होतं अन् लागलीच पानी होऊनसन्या टपके.'

धुप्पल (स्त्री.) बनवाबनवी, फसवणूक. 'आवळा देऊन कोहळा घेतला, चालवली **धुप्पल**.' -मिए.३४.

धुमधडा(ळा)का (पु.) भव्य, वाजतगाजत, वैभवशाली. 'तेरवी केली असी **धूमधडाक्यानं/** गाव जेवलं सारं तुमतडाक्यानं.' -मिर्झा.१८७. 'हे कार्य असई **धुमधळाक्यानं** झालं पाह्यजे की ज्याचं नाव ते.' -भं.६७.

धुमबाज (वि.) चांगली, भव्य. 'एकट्या यावलीत अशी **धूमबाज** लग्नं दहाबारा होत.' -मोती.

धुमबित्ती (स्त्री.) वेगाने पळणे. 'वाघोबाच्या नाल्यातून त्यानं **धुमबित्ती** ठोकली.' -गय.११.

धुमाळ (स्त्री.) धमाल, वाजागाजा. 'आपलिया कार्याचा। **धुमाड** गांवीं देहाचा। माजवी तैं चिन्हांचा। उदयो ऐसा॥' -ज्ञा.१४.२२७. 'लग्नात पोराईनं नाच्याची **धुमाळ** केली.'

धुम्मट (क्रिवि.) जीव तोडून, जोरात. 'ती **धुम्मट** पळाली. दम दाटेस्तोर.' -मे.९७.

धुम्मस (स्त्री.) धुमस, जमीन दाबण्याचे एक साधन. 'पायात पानी टाकलं राती आता **धुम्मस** करतो दिवस मावेलोक.'

धुयधान (न.) सर्वनाश. 'भुलाईच्या खेयावानी तुह्या केली **धुयधान/** साऱ्या यसोदीच्या चांदन्या माह्या छातीत गोंदून.' -नांबै.

धुयधानी (स्त्री.) नासाडी. 'खरीपात नाई पानी/ रब्बीची रे **धुयधानी**.' -धों.२७. 'नवरा दारुबाज असला तं बाईच्या संसाराची **धुईदानी** झालीच समजा.'

धुयधाय (न.) कसेतरी धुणे. 'लगनाचे कपडे **धुयधाय** केले. वावू घातले.'

धुयनं (क्रि.) धुणे, धुवून घे. 'मा व हागू झाली माही. गांडू **धुयनं** आता.' 'पिळ्यावर येऊन बसला. हातपाय **धुयनं** आंदी उब्बाऱ्या.'

धुयमाती (स्त्री.) रंगपंचमी. 'पान्यात शेन कालोलं अन् वैनीची **धुयमाती** सुरू केली.'

धुयाले (क्रि.रूप.) धुण्याकरिता. 'आंग धुयाले पानी नोतं तं **घोटआंगोयच** केली बयना.'

धुयेल (वि.) १. धुतलेले. '**धुयेल** कपळ्याच्या घळ्या केल्या संदुकीत ठुयाले.' २. थकलेभागले. 'दोन रोजाचं काम आठ रोज करनारे **धुयेल** मजूर येतात कामाले.'

धुरकरी (पु.) बैलगाडी हाकलणारा. 'बैलाच्या खांद्यावर जू दिलं जातं. **धुरकरी** दोर लावतो.' -डेबू.६१. '**धुरकऱ्यानं** गाडीचे बैल सोडून गायवाड्यात नेऊन बांधले.' -काळी.९९. 'बैलाले आय अंधाररात, झपी गेले **धुरकरी**.' 'रोजचं गाळं चालूच आये कसंतरी.' -वि.

धुरजय(ड/ळ) (वि.) बैलगाडीत पुढील भाग वजनी होणे. 'तसा तो पुढे धुऱ्यावर **धुरजड** बसला.' -त.१. 'आजून तुह्या दोन मावशा बसल्या तरी **धुरजळ** होत नाई बाबू.' -ना.१३५.

धुरनं (क्रि.) अंगावर घेणे, राजी तयार होणे. 'लय मिन्ता केल्या पन कोनी **धुरलं** नवत.' -अंधा.

धुरपदा(दी) (स्त्री.) द्रौपदी. 'लेकीचं नाव **धुरपदा** ठुलं.'

धुरले (क्रि.रूप.) संमत, मान्य झाले. 'तीनतीनदा पोरीसाठी पदर पसरला आम्ही, पण नाहीच **धुरले** तुम्ही.' -सेल.२५२.

धुरा (पु.) १. बैलगाडीचे जू आडवे ठेवतात ते लाकूड. 'आयुष्य गाडीचे मोडले आहे **धुरे**, बैल डंगरे जागच्या जागी फुरफुरे.' -मिर्झा.१७. २. मेर, बांध, शेताची सीमा. 'धुऱ्यासी **धुरा** घेतसे खेटे रक्तानं लाल मेरीचे गोटे.' -काया. 'वावराच्या **धुऱ्याच्या** भानगडीवरून दोघांचे झगडे झाले.' -पख.२.

धुरेटन (न.) बैलगाडीचे जू बांधवयाचा दोर. 'जुवाचं धुरेटन ढिलं वाटे. **धुरेटन** अळसा लागते वाट्टे लेक.'

धुरोडा (पु.) धुराळा. 'दमनी पिटालत नेतो म्हनलं तं सबन **धुरोडा** उळते मांगं.'

धुलाई (स्त्री.) धुऊन काढणे, मारणे. 'लोकांनी धोंडबाची भरपूर **धुलाई** केली. सगळेईनं त्याच्यावर हात धुतला.'

धुल्डा (पु.) धुरळा. 'सडकेनं एक जीप **धुल्डा** उडवत गावाकडे जात होती.' -पख.१०४.

धुवा(व्वा) (पु.) १. धूर. 'बिळ्या फुकता अन् लेकराच्या तोंडाजोळ **धुव्वा** सोळता काय?' २. संपविणे. 'येवळ्या मोठ्या जमिनजुमल्याचा **धुवा** उळोला भाऊ पाटलानं.'

धुवाधार (वि.) मुबलक, अतिशय, ठोकाचा पाऊस. 'पावसाले जोर, येते **धुवाधार/** नाई आता घोर, पेरण्याले' -नोका.

धुवारी (स्त्री.) धुके. 'जियें घेतां होती **धुवारी**। नाकेंतोंडें॥' -ज्ञा.१७.१४६. 'डोयाच्या कराळीवर पान्याची **धुवारी** पसरली व्हती.' -अक.३९.

धुळं (न.अने.) झाडाचे लहान, उरलेले अंश. 'ढोरं चरले का लेक? पऱ्हाटीचे निऱ्हा **धुळंच** दिसून रायले?'

धुळनागीन (स्त्री.) सापाची एक जात. '**धुळनागीन** मारी कशी उसळी.' -भीक.८४.

धुळमाखल्या (वि.) धूळ असलेल्या. 'बैलगाडी चालू झाली **धुळमाखल्या** गाडवाटेने जाऊ लागली.' -फीर.१७६.

धुळ्ला (पु.) धूळ माती. 'धर्माचं नाव घेतेत खातेत शेन **धुळ्ला/** गध्यायची वस्ती मानूस झाला बेळ्ला.' -नांबै.

धुळ्ळा (पु.) धूळ. 'खैरीच्या रस्त्यानं **धुळ्ळाच** धुळ्ळा. **धुळ्ळ्याचे** ढग झाले. आभाळात झेपावत.' -डेबू.५२.

धुंडनं (क्रि.) शोधणे. 'आमी **धुंडून** रायलो या मातीची पुंजा करून येकमेकाले अधार देणारे खांदे' -नोका. 'आज कुणाला **धुंडत** आहे वादळवारा' -अ.३.

धुंडीभोंडी (स्त्री.) कापून, छाटून खुजी करणे. 'किती तरी पळसाची झाडे त्यांनी **धुंडीभोंडी** केली.' -रा.२५.

धुंदरनं (क्रि.) धांदरणे, घाबरणे. 'सेठचं नाव निंघताच तिचा चेहरा **धुंदरल्यासारखा** होत होता.' -धग.१२५.

धुंदा(धा)ळ (न.) वारंवादळ. 'आठोनीचं **धुंदाळ** सुटते. विचाराची वावटई उठते.' -धुम्म.

धुंदाड (न.) वादळ, हवा, पाणी येणे. 'ते आस्से कातावले माह्यावरतं- बह्याडे इतल्या **धुंदाडात** कायले मराले आली व तू.' -जटा.३९.

धुंधाळनं (क्रि.) शोधणे. 'गाव भर **धुंधाळनं** चालू हाय तरमा पोट्टं कुठी खेळाले गेलं काई दिसून नाई रायलं.'

धूकधूक (न.) भीती वाटून छातीत धडकी भरणे. 'काय होईल पुढं जीव करे **धूकधूक**.' -मिर्झा.१६८.

धूड (न.) १. शेंडा कापलेले. 'कांद्याच्या पालीवानी गहू होता पन सारे **धुडच** केले बैलाईनं.' -भं.१६. २. काहीतरी भले मोठे. 'बाजूच्या रुळावरून इंजिनाचे एक **धूड** चालत आले.' -धग.९ २. मेलेले ढोर. 'एखाद दुसरे गिधाड झाडावरून पुन्हा मेलेल्या **धुडावरच** येऊन बसायचे.' -रा.२२३. 'रानबोक्याच्या तंगड्या बांधून त्याचं **धूड** शिंगडूनं काठीला लटकावलं.' -सि.२६.

धूत (न.) नकारार्थी संबोधन. 'हेच इषय घोळत बसता नं तुमी नवरा बायको? **धूतऽऽ** तिच्या मायले.' -खुं.२१५.

धून (क्रि.रूप.) धुंद. 'तसा डागतर होता पन सदा दारू पिऊन **धून** राये.' -लेक.५१.

धूप (पु.) १. धूर. 'खापरा आंतु राखोंडीः ऐसे आलेः गोसावीयासि **धुपु** दाखौ लागलेः' -गोवि.१९. 'नाना **धुपाचा** अग्निप्रवेशु। कनकीं तुपाचा नाशु।' -ज्ञा.१६.१०७. २. सुगंधी धूर सोडणारा पदार्थ. (सं.)

धूर (पु.) धुवा, धुपट. 'बहुती **धुरा** देखीलीयाः परि ऐसा कापुरु घेत कव्हणी **धुर** देखीली नाही जीः' -गोवि.२६९. 'कां **धूं** न साहतां जैसी। वाती न लगें॥' -ज्ञा.१७.३११. 'हें असो दीपाचिये सिद्धी। अवघड धू आधीं।' -ज्ञा.१८.८८०.

धूर (न.) बैलगाडी हाकलणे. 'तैसाचि रघु आहे निवांतु। **धुरे** बैसला लक्ष्मीकांतु॥' -ज्ञा.११.६६२. 'डोळ्यातली आसवं पुसत तो **धुरीवर** गुमसूम बसून राहिला.' -त.१०१. 'मी मांगं बसतो रेंगीवर तू **धूर** हकाल.'

धेडगुजरी (वि.) अर्धवट, अशुद्ध. '**धेडगुजरीच** हायस वऽऽ? लागे माई मायबईन काळून रायली, चलवादी.'

धेडवाडा (पु.) महारांची वस्ती. 'मोकळीं गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें। **धेडवाडा** बैसली खोडा घेतली आपुल्या भावें॥' -तुका.४५८.१. (हिंम.)

धेन (न.) ध्यान, लक्ष. 'बंगईवर झुलताझुलता म्होरच्या दाट्ट्याकडं काहा **धेन** गेलं.' -जटा.४४.

धेला (पु.) पैसा. 'कोनाच्या दातावर माऱ्याले **धेला** नाई खिशात.'

धेळ (पु.) महार. 'पाटलाचे काई घरं, काई **धेळाचे** हायत.'

धेळगा (पु.) महार पुरुष. 'बाबासायबानं **धेळगा** येकदम सुदरोला अन् बौद्ध केला.'

धेळगुजरी (वि.) संमिश्र, बावळट दिसणारे. 'कोन्त्या बाईले आपला नवरा असं **धेळगुजरी** रूप लेवून जोळ आला तं बरं लागीन.' -हज.५५.

धेवपाट (पु.) सूड, बदला घेणे. 'आत्ता काऊन असा **धेवपाट** घेतल्यावाणी करायल्या वं? म्या काय तुमचे केळीचे बाग कापले?' -वा.१९७.

धेंडरवाई(डी) (स्त्री.) दिवाळीच्या वेळेस गुराखी गावातून काढतो ती आरती. गुराखी ही आरती कराष्टमीपासून दिवाळीपर्यंत रोज रात्री संपूर्ण गावात, प्रत्येक गोठ्यातून म्हणत फिरतात. 'इळा निंगो पिळा निंगा, बच्चोरा' असं म्हनत **धेंडरवाई** गावभरातून नाजूक गायकी काळते.'

धोकेबाजी (स्त्री.) फसवणूक. 'माया संगं काहाले अशी **धोकेबाजी** करता, सख्खा पुतन्या होना तुमचा.'

धोतर (न.) धोत्र, पुरुषाचे नेसू. 'तंव श्रीप्रभु गोसावी रामवीहीरा लक्ष्मणवीहीरा धोत्र धुतलेः' -गोवि.४५. 'हांगाः तुम्हा **धोत्रे** धूआवेया काई काज? तुम्ही येथ यावे कीः' -गोवि.३११. '**धोतरही** गळाले ढुंगणाचे।' -नाथ.२५. 'एक रोज ना तुहं **धोतर** सोळलं तं नाव बदलून टाकीन.' (का.दोत्र)

धोतरा(त्रा) (पु.) एक वनस्पती. 'माय ना बाप, **धोतरा** वाहाळ्ळा आपोआप.'

धोदरलं (क्रि.रूप.) व्याप्त. 'पोराचा आवाज दबका. थोबाड त्याचं घाबऱ्या आनंदानं **धोदरलेलं**.' -खुं.२१५.

धोपटनं (क्रि.) १. अवाजवी काम करून घेणे. 'तेथ आडवावया आले। दोषवैरी जे **धोपटिले**।' -ज्ञा.१८.१०५०. 'शंकऱ्याले तितली दारका काळालेई काई लागते. तसा तं त्या बईलाले वरीसभर **धोपाटून** घेतेच.' -अक.१८. २. बडविणे. 'नदीतल्या खडकावर कपळे साजरे **धोपटून** काहाळले.'

धोपटी (स्त्री.) न्हाव्याची पेटी. 'काखीत **धोपटी** घेतली की निंघते म्हाली करंकरं.'

धोपाट (वि.) आकाराने मोठा. 'वावराच्या वाटीनं जाता जाता **धोपाट** झाला सगर.'

धोबले (पु.अने.) झब्बा. 'साहेबासारखेच **धोबले** अन् कोट काही पाटीलही घालू लागले. ' -मोती.

धोबळ (वि.) ढोबळ. 'शेनसळा कुठेतरी ऐकमेकात मिसळलेला दिसायचा ती **धोबळ** सीमारेषा म्हनून ओळखू यायची.' -सुखो.३६.

धोबी (पु.) परीट. 'गाडगे बॉ धोबी असूनबी संत झाले.' 'मी जातीचा **धोबी** देवा धुईन कपळा मळलेला... गोपाला.' (का.धोबि-बे)

धोबीन (स्त्री.) परीटाची पत्नी, स्त्री. '**धोबीन** बाई वऽऽ, कपळे धुवाले नेतं काय मायावाले?'

धोरणी (वि.) व्यवहाराचे, चालीरीतीचे ज्ञान असलेला. 'आरं तू **धोरणी** माणूस, तुझ्यावरच आपली मदार हाय बाबा.' -सि.६५.

धोरन (न.) व्यवहार ज्ञान. '**धोरन** नाही ठेवलं, जास्त आठमुठं/ सोताच्या खार्चानंबी, गेलो कुठकुठं.' -मिर्झा.१६४. (का.धोरणि-णे)

धोरा (पु.) शोध. 'च्यासाठी गूई चोरून ठुला होता त्याचाबी **धोरा** लावला काट्ट्यानं.'

धोर्नाधोर्नानं (क्रिवि.) विचारपूर्वक, काळवेळ पाहून, युक्तीने, कलेने. 'म्या एखल्यानं **धोर्नाधोर्नानं** ते कमावलं.' -पागो.२९३.

धोसरा (पु.) ध्यास, धास्ती. 'लयेच **धोसरा** धरला नं म्या त्याईचा. या हरणापेक्षा भूतं परवडले.'

धोळ (वि.) वय जास्त असलेला, जरड. 'बायको **धोळ** काकळी साई कव्वं वाऊक असते/ एक गोल भोपया दुसरी बरबटी दिसते.'

धोंगया (पु.) घोळ, कालवाकालव. 'त्याच्या हेक्कळपनाच्या धसक्यानं आजीच्या जीवाचा अखीनच **धोंगया** झाला व्हता.' -सित.२७. 'काहाले माया जीवाचा **धोंगया** करता वायकरनी- दुखावली मामी बोल्ली.' -सित.७०.

धोंड्याचा मयना (पु.) अधिक मास. '**धोंड्याचा** मयना, अधिक नाही राह्यला/ बोलक्या बोंडाचा, बोल बाला रायला.' -झाली.९.

धोंडी (स्त्री.) पावसासाठीची प्रार्थना. दारोदार जाऊन

'**धोंडीधोंडी** पानी दे, हल की हलकी जेवारी दे, **धोंडीचं** पानी मोठं हिवसं, साळसुके, कोयडं भुके, कचकल बेंडकी पानी बलव....' अशी गाणी गात भिक्षा मागतात. 'पाऊस पडावा म्हणून **धोंडी** मागतात. धोंड्याखाली राहते म्हणून बेडकीला **धोंडी** म्हणतात.' -रा.२५. 'उघळी नागळी **धोंडी** पानी मांगे/ बेंडक्याले टांगे निंगासंगे. गागा.

धोंड पळनं - कमतरता भासणे. 'उसनंई देऊ नाई लागे. एवढी काय **धोंड पळ्ली** बापा त्याले.'

न

नई (स्त्री.) नळी. 'कुतऱ्याचं शेपूट **नईत** घातलं तरी हेकोळच रायते.'

नई (वि.) नवीन. 'तुहा सासरा दरोजची एकएक **नई** कह्यनात घेऊन याचा घरी.' -पख.२६.

नईन (वि.) नवीन. 'भांडनाची गोठ काई मायासाठी **नईन** नाई.'

नकटा (वि.) इज्जत नसलेला. 'सोता तं **नकटा** हाय लेकाचा. लेक गेल्ती ना येका पोरासंगं पऊन.' (का.)

नकल (स्त्री.) नक्कल. 'कोनाचीबी हुबेहूब **नकल** करते आमचा लेक.' (अर.)

नकल्या (वि.) नकला करणारा. 'कोनी करीन तसंच करते हरी, असा **नकल्या** आयतो.' (अर. नक्काल, त. नक्कलू)

नकित(त्त)र (न.) नक्षत्र. '**नकित्तरात** पानी सांगेल असल्यानं निंदन लावलं.'

नकित्तर (वि.) विक्षिप्त. 'नांगो म्हन्जे पुऱ्या गावात **नकित्तर**. कोनाच्याई वाटी जाते.'

नकुसलं (न.) नखाची व्याधी. 'बोटाले **नकुसलं** झाल्यानं वावरातलं कामधाम पळ्ळं.'

नकेतर (न.) नक्षत्र. 'पोरगी इचारसीन तं मस्त **नकेतरच** हाय.'

नकेल (न.) शेंडी, सूत्रं. 'त्याच्या हाती साऱ्या जगाची **नकेल** जमे. सम्राट युनो त्याची रखेल.' -मिए.११३.

नक्की (वि.) निश्चित. 'भावराव काका, उद्या **नक्की** येता ना डवऱ्यावर?' (अर.नकीह,का.नक्कि,फा.)

नक्शा (पु.) १. रेखाकृती, नकाशा, आराखडा. 'नव्या सुनीनं अशी मस्तं पोई केली जसा भारताचा **नक्शा** काहाळला.' २. तेज, पाणी. 'भल्ली हजामत करून म्या त्याचा **नक्शाच** उतरोला.' (अर.)

नक्शी (स्त्री.) वेलबुट्टी, चित्र. 'मराठीचे सर, बिल्लोराच्या काचाची मस्तं **नक्शी** काहाळतात भिताळावर.' (अर. नक्काशी)

नक्टं (वि.) इज्जत गेलेला. 'दर्पणासी बुजे। **नखटें** तोंड पहाती लाजे॥' -तुका.३७८८.१. '**नक्टीचे**, लय नाक लांबवून गोष्ट करायलीस.' -पख.१५७.

नक्तेर (न.) नक्षत्र. 'पुळच्या **नक्तेरात** पानी येत नाई म्हंता.'

नक्ली (वि.) कृत्रिम, बनावटी. '**नकली** नोटा तयार करून इकते का कदी कास्तकार?' (अर.नक्ल,फा.)

नखरचखर (न.) हालचाल, काहीबाही नखरे करणे. 'सम्दे विलासरावाचे लाड भवा लागले. त्याह्यचा पाठींबा नसता त त्यो काय **नखरचखर** करत होता.'

नखरा (पु.) मुरडणे, डामडौल, ऐट, नट्टापट्टा. 'पोरीनं पावने पायाले येनार होते म्हनूनसन्या लय **नखरा** केला.' (फा. अर.)

नखरेल (वि.) थाटमाट करणारे. 'शेतकऱ्याच्या पोरानं येवळं **नखरेल** असून चालत नाई.' (फा.)

नखलनं (क्रि.) नखाने पानावरील शीरा काढणे. 'मुलायम पान हळूवार **नखलले** पाहिजे नाहीतर ते फाटावयाचे.' -कात.१२०.

नखी (स्त्री.) १. कापसाची नख्खी, मिरचीचे देठ इ. 'बाया पऱ्हाटीच्या **नखीतून** कापूस काळून खंदाळीत टाकत.' २. पदाराच्या काठाचाही काठ.

नखितर (न.) नक्षत्र. 'मिरगाच्या **नखितराचं** पानी दळंदळं पळ्याले लागलं.' -सित.५३.

नखिऱ्या (वि.) गंमतीजमती, विनोद करणारा. 'गाडीचा ड्रायव्हर खूप **नखिऱ्या** माणूस होता.' -गय.

नखुलं (न.) नखाचे दुखणे, खांडूक. 'बोटाले **नखुलं** झालं की लय अगीन होते.' २. बोटाच्या **नखावरील** आवरण. 'वयाच्या दहाव्याबाराव्या वर्षापासून ती **नखूलं** घालून पानं खुळायला शिकली.' -हज.११.

नखोडे (पु.अने.) नखाने काढलेले ओरखडे. 'काही जण तर बारीक **नखोडे** घेण्यात भलतेच उस्ताद.' -एक.

नखोळा(रा) (पु.) नखाने काढलेला ओरखडा. 'पोट्टेईचं भांडन म्हन्जे येकामेकाच्या आंगावर **नखोळा** वळने.'

नख्खी (स्त्री.) कपासीच्या बोंडाची बैठक. 'पऱ्हाटीच्या **नख्खीतून**। आला कापूस फुलून॥' -काया.३. 'कपाशीची सर्व वेचे सुरू झाली. **नख्ख्या** उलवून मी कवडीबोंडंही काढत होतो.' -फीर.१५९.

नख्खी (वि.) निश्चित. 'इसारपावती करून वावर इकत घ्याचं **नख्खी** केलं.'

नग (पु.) १. डाग, जिन्नस. 'झोरे-पोट्या धरून आपले साहा **नग** झाले सम्दे.' २. दागिना. (फा.)

नग (वि.) १. नमुना. २. वल्ली. 'गोपाल म्हन्जे पुऱ्या गावात **नग** हाय.'

नगद(दी) (न.) रोकड, निवडक. 'अजून पिककर्ज भेटलं नाई अन् बियानं **नगद** आना लागते.' (अर.नक्द)

नगदमचगदम (वि.) रोख. 'परमोद दोन दिवस कामाला जातो. शंभर रुपये **नगदमचगदम** कमावतो.'

नगदीचगदी (न.) रोकळ, रोख. 'पैसे नाही दे कोनी मले नगदी/ मले पाह्यजे होते **नगदीचगदी**.' -मिर्झा.१८१.

नगारा (पु.) एक वाद्य. 'राजा गावात आला का **नगारे** वाजत जोरजोऱ्यात.' (अर.नक्कारः)

नगिना (पु.) नमुना. 'सातागावात नाई सापळील असा **नगिना** हाय गळी आमचा.'

नजर (स्त्री.) १. दृष्टी. 'म्हतारपनात **नजर** शाबूत थोळीच रायते. जवळचं झ्यावंझ्यावं दिस्ते.' २. धोरण, उद्देश. (अर.नझर,फा.)

नजरचूक (स्त्री.) दृष्टिदोष, अनवधान. 'घाई केल्यानं **नजरचूक** झाली राजा.'

नजरबंदी (स्त्री.) चातुर्याने दृष्टी बंद करणे. 'चौकात गारुळ्याचा **नजरबंदीचा** खेळ चालू होता.' (फा.)

नजरबाधा (स्त्री.) दृष्ट, दीठ. 'आता दिठीचा मणी बांधला का लेकराले **नरजबाधा** होणार नाही.' -सि.२७.

नजरभेट (स्त्री.) दृष्टभेट. 'तिची येक **नजरभेट** झाली तरीबी दिवसभर गमते मान्साले.'

नजरानजर (स्त्री.) दृष्टभेट. '**नजरानजर** झाली तर अश्रूशिवाय काहीच बाहेर पडत नव्हतं.' -फीर.१०१.

नजराना (पु.) देणगी, दक्षिणा. 'पयले लोकं राजेरजवाड्याईले **नजराना** देत जात.' (अर.फा.)

नजाकत (स्त्री.) नाजुकपणा, सुकुमारता. 'तुह्या या **नजाकतीवर** मी सात जन्म कुर्बान करीन वं म्हशे.' -कावू. (फा.)

नजाकतदार (वि.) सुंदर, सुकुमार. 'फिक्कट गुलाबी फुलं मोठी **नजाकतदार** दिसत होती.' -सि.२२.

नजारा (पु.) दृश्य, सुंदर. 'दऱ्याखोऱ्यातला हिरवागार **नजारा** पाहेतच राहाव.'

नजीक (अ.) जवळ. 'समदे वावरं गावच्या **नजीक** असल्याने आखरच म्हनत लोकं.' (फा.नज्दीक)

नटनं (क्रि.) १. हार खाणे, माघार घेणे. 'व्हऊनच जाऊ द्या काहीबी **नटू** नोका खोसा कंबर.' २. सजणे. 'पांडवे आग्रहो घेतलाः तै विश्वरूप देओ **नटलाः**' -ऋ.६७४. 'नवरीवानीच **नटली** तं पाय कशी लक्शमी दिसून रायली पोट्टी.'

नटवनं (क्रि.) दुसऱ्याला कमी समजणे, अपमानित करणे. 'पायलं काई नाई लेकाजोळ अन् रातदिवस दुसऱ्याले **नटवतच** रायते.'

नटवी (वि.) उगाच नटणारी, मिरवणारी स्त्री. 'बायको **नटवी** भेटली/ तिच्या रूपासाठी जमीन हटली.'

नटुरा (स्त्री.) लवकर येणारी ज्वारी. 'ढोरईसाठी **नटुरा** पेरली धुऱ्याकून तीन तास.'

नटूनथटून (क्रिवि.) थाटमाट करून. 'हयदीकुकाले बाया **नटूनथटून** तयार होत्या.'

नटोनं (क्रि.) १. सजविणे, शृंगार करून देणे. 'कुरळीनं नवरीनले **नटोनं** चालू केलं.' २. माघार घ्यायला लावणे, पराभूत करणे. 'आपल्याकून कोनाले **नटोनं** होत नाई तं बोलूनबी दाखू नाई.'

नट्टापट्टा (पु.) साज शृंगार. '**नट्टापट्टा** करून कुठी जा लागते माय आपल्याले, खुराटे धंदेच तं करा लागतात.'

नड (स्त्री.) गरज, अडचण. 'पेरन्यापारन्याच्या वक्ती अच्छकाले **नड** पळतेच पैस्याची.'

नडनं (क्रि.) जरूरत भासणे, गरज असणे. 'माहा काईच **नडत** नाई कोनावाचून.'

नड्डा (पु.) घसा, गळा. 'भाकरीचा घास मंग **नड्ड्यामंधी** अडला.' -मिए.१२८.

नतिजा (पु.) १. परिणाम. 'चांगल्या कामाचा **नतिजाबी** चांगलाच निंगते.' २. शेवट. 'कोनत्या गोठीचा काय **नतिज़ा** निंगीन याचा इचार कराच लागते.' (अर. फा.)

नथ (स्त्री.) स्त्रियांच्या नाकातील मोत्याचा दागिना. 'गिरजा गव्हायाची नार। तिच्या **नथनीचा** झनकार.' -लोक. (का.)

नथनी (स्त्री.) लहान नथ. 'नाकात लाल मण्यांच्या गोल **नथण्या** घातलेल्या गौळणी.' -झेल.२०.

नद (स्त्री.) नदी. 'आमच्या गावात काहाची **नद**. नाला होय ना तो?'

नदर (स्त्री.) नजर. 'त्या मुडद्याले तिथीसा बसू देऊ नका. त्याची **नदर** मले सुदी वाटत नाही.' -मोच.३७.

नदारद (वि.) लुप्त, बेपत्ता. 'श्याम्या गावात नाई. हत्यापासून **नदारत** आये त्यो.' (फा.)

ननंदुली (स्त्री.) लहान नणंद. 'नांदा भरून अंगणी चिमण्या पाणी पिती तोंड **ननंदुल्या** धुती.' -लोक.२.

ननद (स्त्री.) वन्स, नणंद. 'दुष्टव्रृति **नंदुली** सदा द्वेष करी। नांदो मी कोणां खालें कैसी आतां॥' -तुका.४२२३. 'चुन्यासंगं काथ, काथ कानपुरी/ **नन्दा** करतील नसती चिकोरी.' -काया.१४. 'वहिनी आपल्या **नणंदेसाठी** उबार काम करायला तयार नव्हती.' -मोती.४१.

ननदय (स्त्री.) वन्स, ननंद. 'दिवाईले **ननदय** अती येते अन् मी जाते माया माहेरी.'

नन्दोई (पु.) नणंदेचा पती. '**नन्दोई** पावना आला तं

त्याच्यासाठी पावनचार करा तं लागीनच ना.'

नफरत (स्त्री.) राग, द्वेष. 'लोकं वदरून शाबूत बोलतात अन् अंदरून **नफरत** करतात.' (अर.)

नफा (पु.) लाभ. '**नफाच** नाई धंद्यात तं करून काय फायदा.' (फा.अर.नक्अ)

नबर (वि.) तयार, बनेल, पक्व. 'जाऊ द्या त्या **नबर** पोरीच्या काय तोंडी लागता?' -कात.२५१.

नबाब (पु.) राजा, श्रीमंत. 'निंदायले कसा येसीन तू, **नबाबच** होयेस ना कुठोलचा!' (अर.)

नमक (न.) मीठ. 'या पातरावर **नमक** वाळ रे बाबू.' (फा.)

नमकहराम (वि.) कृतघ्न. 'लानपनापासून आट काहाळला पाय कसं **नमकहराम** निंगलं पोरगं.' (फा.)

नमतं (क्रि.रूप.) पडते, माघार घेणे. 'म्याच मंग **नमतं** घेतल्यानं भांडन टयलं.'

नमती (स्त्री.) माघार. 'भांडनापेक्शा **नमती** घेतली ते पुरते राजा.'

नमनं (क्रि.) वाकणे, पड खाणे, वंदन करणे. 'भांडनतंटा करन्यापक्षे **नमनं** बरं बावा.'

नमरी(र्मी) (वि.) धूर्त. 'याची टोपी त्याच्या डोक्शात घालनं येते लेकाले, लय **नमरी** हाय लेकाचा.'

नम्री (वि.) कावेबाज. 'उसने पैसे वापस करनारा दिसते का दिल्या, पक्का **नम्री** हाय तो.'

नमाज (पु.) दिवसातून पाच वेळा मुस्लीम करतात ती ईश्वराची प्रार्थना. 'मुसलमानाचं घर नव्हतं तं गावात **नमाज** पळ्याले मज्जितबी नोती.' (फा.अर.)

नमुना (पु.) आदर्श, मासला, वानगी, मासलेवाईक. 'गाडीचा ड्रायव्हार असा **नमुना** आणि कंडक्टरही **नमुनाच** होता.' -गय. (फा.नमनः)

नमूद (वि.) नोंदलेली, निर्दिष्ट. 'काका हरेक बाब वहीत **नमूद** करून ठुते.' (फा.)

नयकांडं (न.) नळी. 'वंगनासाठी एखांदं बास्याचं **नयकांडं** पाहा लागते.'

नयतुरना (वि.) तरुण. '**नयतुरन्याचं** मन हिर्व कच्चं.' -काया.१८.

नयपट (वि.) मोठ्ठी, भारदस्त. 'काई बकरी होती राजा **नयपटची** नयपट.' -गा.७९.

नयलं (न.) पत्त्यातील नऊ ठिपक्यांचे पान. 'येक **नयलं** आलं का नयल्याची परेल होते.'

नया (पु.) १. वंगण ठेवण्याचे बांबूचे साधन. 'काई नाई वंगनाचा **नया** पायतो.' -पागो.१०४. २. बीळ. 'सरप भितीच्या भोकदाळात धसला तथीच मामुजीचा **नयाबी** व्हता.' -लेक.२६.

नया (वि.) नवा, नवीन. '**नया** वळणी ओसरीला बसाया कोण दे बाजा' -भीक.८.

नर (वि.) पुरुष, मर्द. 'जुने मान्सं लय **नर** होते. कोनाचं जुमानत नोते.' (फा.नर)

नरक (पु.) नर्क. 'मेल्यावर काईबी भेटो, **नरक** काय अन् सरगं काय?'

नरकुडा(ळा) (पु.) विष्ठा. 'नाही तं लोक आमच्या तोंडात **नरकुडा** घालतीन काडीनं.' -पाटी.४७.

नरकोडा(ळा) (पु.) विष्ठा. 'त्या ते गोठ पसरून झनं **नरकोळा** खाल्ला.' -पागो.१००.

नरडं (न.) घसा, गळा, कंठ. 'वाघानं म्हने गपकन **नरडं** धरलं.'

नरद (स्त्री.) चौसरीतील सोंगटी. 'लेकानं बरोबर चिऱ्यावरच माही **नरद** मारली.' (फा.नर्द)

नरम (वि.) मऊ, मवाळ. 'तुका म्हणे नाहीं **नरमता** अंगी। नव्हे तें फिरंगी कठिण लोभ॥' -तुका.१४५१.५. (फा.नर्म)

नरमगरम (वि.) थंडउष्ण. 'अपके मायची तब्येत **नरमगरमच** रायते.' (फा.)

नरमनं (क्रि.) लीन, सौम्य. 'लगन झाल्यावर **नरमनं** पळतेच वाघासारख्या मान्सालेबी.' (फा.)

नरमाई (स्त्री.) मऊ, लीनता. 'तगळेच्या तगळे पयलवान पायल्यावर म्या म्हटलं लेका दिल्या **नरमाईनं** घ्याले पुरते.' (फा.)

नरवा (वि.) तीन दिवसा नंतरचा दिवस. 'तेरवा येऊ का मंग? नाही **नरवा** या. करूनच ठेवतो तव्हरक.' -सेल.२०२.

नरवाटी (स्त्री.) नारळाचे टक्कर, नरोटी. 'पानी प्याले काई नोतं तं मंदिरापुळच्या **नरवाटीनच** पानी पेलो.'

नरानी (स्त्री.) नखं काढण्याचे साधन. 'म्हाली **नरारनीनं** नखं काळून देत जाय आजाचे.'

नरांडी (स्त्री.) खोल नाली, नाला. 'औंदा पानी लय झाल्यानं वावरात **नरांडीच** पळ्ळी.'

नरोटी (स्त्री.) नारळाची कवटी, आवरण. 'बॉच्या जोळ तं **नरोटीबी** हाय, जादू करते का लेक?'

नल्डा (पु.) गळा. '**नल्डा** फोळूफोळू आवाज देऊन रायलो, कोन्यासकायचा.'

नवकरी (स्त्री.) नोकरी. 'एक इकते डिग्री दुसरा इके **नवकरी/** रिकामचोट सारे करते नेतागिरी.' -नांबै.

नवकर्की (स्त्री.) नोकरी. 'तू पाटील झाला आता, आमच्या

ट्रॅक्टरची **नवकर्की** खलास.' -पाटी.१४१.

नवखा (वि.) नवा, नवीन. '**नवखा** मानूस दिसून रायला कोन होय लेक?'

नवजवान (वि.) तरुण. '**नवजवानानं** तं कामात टरटर लांबाव.' (फा.)

नवटं (वि.) नवीन. 'विविध मार्गानी खेळ्यापाळ्यातील पैसा या **नवट्या** शहरात येत होता.' -खुं.२५५.

नवट(टा)क (वि.) एक माप. '**नवटाक** पोटात रिचोली की तो राजाच बनते.'

नवतिफनी (स्त्री.) नऊ दिवस पेरणे चालले अशा शेताचे नाव. 'पानी आलं का घरी पानी आलं का घरी असं नऊ दिवस पेरनं चाल्ल्यानं **नवतिफनी** हे नाव पळ्ळं.'

नवती (स्त्री.) नवी पालवी, विड्याची कोवळी पालवी. 'शब्द मोती सवातीचे थेंब टरारून ओल **नवतीचे** कोंब.' -रूख.

नवती (वि.) नवीन. 'भयभीत उतरला दूर नूर **नवतीचा**.' -अ.९७.

नवनवाळी (वि.) नवे पीक. 'वावरईनं **नवनवाळी** शाबूत असल्याने कास्तकार हरकात होता.'

नवरदेव (पु.) वर. '**नवरदेव** अन् त्याचं वऱ्हाड जानोस्यावर उतरलं.'

नवरा (पु.) पती. 'ऐसे च्यान्ही दीस उभयताचे वऱ्हाड जालेः चौथा दीसी नोवऱ्यासी **नोवरीएसी** साडे वाइलेः' -ली.६८.

नवरी (स्त्री.) नववधू. 'आवो मेली जायः हे **नोवरी** होए म्हणेः आवो हे नोवरी होएचि म्हणेः' -गोवि.११०. 'तुळसीची माळ **नवरीचे** कंठीं। नोवरा वैकुंठीं वाट पाहे॥' -तुका.४३३९. '**नवरी** भुलाई घरकुंड मांडे/ झाडपाला भाजी खापरखुटी भांडे.' -वि.

नवल (न.) आश्चर्य. 'मग अर्जुनातें म्हनितलें। आम्ही आजि हें **नवल** देखिलें॥' -ज्ञा.२.९१. 'म्हणे **नवल** केवढें भाग्य तुझे।' -नाथ.१५. 'कवतुक तुझें **नवल** यावरि। घेसील तें शिरीं काय नव्हे॥' -तुका.३६३८.

नवलाई (स्त्री.) नवल. 'खायाप्याची काई कोनाले **नवलाई** नाई रायली.'

नवशा (वि.) नवसाने झालेला. 'इरीवर काहाले चळतं बे? **नवशा** हायस ना लेका तू?'

नवशिक्या (वि.) नव्यानेच शिकलेला. '**नवशिक्या** लेकराले काई समजून नाई सांगा लागत.'

नवस (पु.) कार्यसिद्धीसाठी देवाची प्रार्थना व ते सिद्ध झाल्यावर काही वस्तू अर्पण करण्याची प्रतिज्ञा. 'आवो मेली जाएः **नवसीयाची** थेटरी दे ना म्हणेः' -गोवि.१५०. '**नवसियां** देती उंडी। बाळकांची॥' -ज्ञा.१७.९७. 'देवाचा **नवस** चुकली बहुतेक। चौथानांचे थान एक झालें।' -नाथ.२-८७. 'गोहो यावा गांवा। ऐसे **नवस** करी आवा॥' -तुका.३०७०. (फा. नवाझिश)

नवा (वि.) नवीन. '**नवा** कपळा कस्तुरीले घाल्याले देल्ला.'

नवाई (स्त्री.) अपूर्वता, नव्हाळी. 'तंव तुझी एकेकी **नवाई**। एथ उपदेशामाजिं गांवाई।' -ज्ञा.३.११. 'म्हणे पार्था तुझी **नवाई**। हें येतुलेंचि पुससी काई।' -ज्ञा.१४.३२३. '**नवाई** असी दिवाई जसी, न्यारीच खुसी घेऊन आली.' -काया.१२.

नवाकंच्यांग (वि.) कोराकरकरीत. 'बी-बियाण्याची चिंता मिटली तसा तो **नवाकंच्यांग** झाला.' -अंधा.

नवाजनं (क्रि.) स्तुती करणे, प्रसिद्धी होणे. 'माणिकराव पंचक्रोशीत **नवाजेल** मानूस आय.' (फा.)

नवाट (वि.) नवीन, जवान. 'एसटीच्या पिंजऱ्यात तर्ण **नवाट** पाखरू/ मनं घिरट्या मारते त्याले कसं मी आवरू?' -पाहु.१६. 'शिकताखेपी **नवाट** गोरे जू पाळतात खांद्याऊन.' -सित.१२२.

नवाटी (स्त्री.) नव्यानेच वहितीत आणलेली शेती. 'कईक सालापासून पळीत असल्यानं औंदा **नवाटीत** लय पिकलं.'

नवाडा (वि.) नवा. 'नवाड्या मान्साले गावात धसाची बंदी होती.' -दि.७५. 'ढोरबी **नवाड्या** कळपात आलं की बुजाडते.' -रा.६७.

नवार (स्त्री.) पलंग विणावयाची रुंद जाड सुती पट्टी. 'सोन्याचा पलंग चांदीची **नवार**/ त्याच्यावर बसले सावकार.' -लोक.६६. (फा.)

नवार (वि.) नवीन. 'कोळप्यानं वरची सोकट माती उलसून खाली दाबत होती खालची काळीभोर **नवार** ओली माती वर येत होती.' -फीर.१८०.

नवाळं (वि.) अपरिचित. 'कोनाचं होय ते पोट्टं. **नवाळं** दिसून रायलं गावात.'

नवाळी (वि.) नव्याने निघालेले पीक, धान्य, हुरडा. '**नवाळी** जवारी असली का भाकर बरोबर नाई थापता येत.'

नव्हाळी (स्त्री.) नवलाई. 'एरव्ही भांडणाची काही **नव्हाळी** नव्हती.' -झिं.१०६.

नशा (पु.) कैफ, धुंदी, उन्माद. 'गावरान दारूची **नशाबी** चळते अन् घमघम वासबी येते.' (अर.फा.नशः)

नशाले (क्रि.रूप.) नसायला. 'बरं **नशाले** काय झालं त्याले? धळधाकट तं आय.'

नशीन (क्रि.) नसेल. 'कोनाच्या कामाले गेला **नशीन** तं

चलना म्हना आजच्या रोज.'

नशीब (न.) दैव, प्रारब्ध. 'जमीनजुमला पिकाले **नशीब** पायजे चांगलं.' (अर.)

नस (स्त्री.) १. शीर, रक्तवाहिनी. 'इव्यानं **नस** कापल्यानं लयच रगत निंगालं.' २. दात घासण्याची तपकीर. 'नाकात **नसीचं** बोटं घालतं माय अदघळी अन् हासीकहासीक करते.'

नसंन (क्रि.रूप.) नसेल. 'गायीचा म्हैशाचा काय बकऱ्याचा असंन/ भंगाराचा विमा हाय शेतकऱ्याचा **नसंन**.' -जांग.४७.

नसंनसं (न.) तुसडे वागणे. 'पखाल्या दादा नोको करू नसनस कळत्या सवरत्या लेकाला **नसंनसं** करणं बरं नाही.' -हा.२६.

नसकुलनाग्या (वि.) चिडखोर, अधीर. 'आताच्या सुनाभी भायच **नसकुलनाग्या**.' -दि.२२. 'भायच **नस्कुलनागी** हाय वं तू? उद्यावर तुवाजीव मठ रायत नाई का?' -ज.८०.

नसट (वि.) चिडखोर. 'भागा आजी **नसट** असल्यानं लेकरं तिच्या घरी पापळ लाट्याले जात नव्हते.'

नसटल्याथुतराची (वि.) चिडखोर. 'कशी हेकळ हाय वं बुढी. तशीच हाय ते **नसटल्याथुतराची**. मेली तं कोनी मांगं जानार नाई लौंडीच्या.' -तित.१९.

नसनकुकड्या (वि.) चिडखोर, नसान्या. 'अरे म्हना येवळा काहाले **नसनकुकड्यावानी** वागून रायला तुलेबी लेकरं होतीलच ना?'

नसन्या (वि.) तुसडा माणूस, मारका बैल. '**नसन्या** मान्साच्या वट्यावर काहालेच बस्ता बाप्पा तुमी?'

नसफुक्या (वि.) १. नसनस, कुरकुर करणारा. '**नसफुक्या** डंभारे कोठीवान भारी घीसघिस्या, पन मालकाच्या हिताचा.' -दि.५.

नसल (क्रि.रूप.) नसेल. 'इतका भामटा दुसरा कोनी **नसल** बापा जगात.' (अर.नस्ल)

नसलू (वि.) हिकमती, हुशार, स्वार्थी. 'कोनी त्याले **नसलु** कोनी म्हने ईग्गर/ गमे नाही त्याले खोडी केल्या बिग्गर.' -मिए.१५१.

नसळफसळ (न.) तुसडेपणाचे अवमानित करणारे वर्तन. 'माहा मलेच वाटाले लागलं का सदाईच आपून पोरीले **नसळफसळ** करतो.' -लेक.३२.

नसानकुकळ्या (वि.) सहन न होणारा. 'पंची म्हणाली, तुम्ही त लय **नसानकुकड्या** अन् भाजी उकड्या हावं.' -झिं.५३.

नसानकोंबळा (वि.) चिडखोर. 'शेजारी भेटला **नसानकोंबळा** / रोज नवरा मारून येते बेवळा.'

नसाना (वि.) चिडखोर, रागीट. 'चिलाटीच्या झाळावर पाखरू बसेना, **नसान्यानारीले** मानूस सोसेना.' -लोक.१८६. 'देराचा अन् सासूचा सभाव तं लयच **नसाना** वाटते.' -अंधा.

नसियत (स्त्री.) उपदेश, समजावणी. 'आपन कुनाले फुकटची **नसियत** काहाले द्याव.' (अर.नसीहत)

नसीब (न.) दैव, भाग्य. 'आपल्या **नसिबातच** नाई पीक होनं त्याले जमीनमाऊली काय करीन.' (अर.फा.)

नस्तर (न.) 'तिच्या खेकसण्याला दाद न देता भाभीनं पुन्हा **नस्तर** मारलं.' -एक.

नस्ताच (वि.) अकारण. 'हा सत्याचा **नस्ताच** ताप झाला डोक्स्याभवती.'

नस्ल (स्त्री.) वंश, गोत्र, कुल. 'दुभतं जनवार साजऱ्या **नस्लीचच** पायजे.' (अर.)

नहाणी (स्त्री.) न्हाणी. 'उघड्यावर आंघोळ करणाऱ्या पोरीबाळी दिसल्या की पाटील मांगांना शिव्या घालत. त्यांना **नहाणीसाठी** तुराट्यापराट्याचे आडोसे करायला सांगत.' -वा.३३.

नहान (न.) अभ्यंगस्नान. 'लगनाच्या अगोदर येटायातल्या बायाईले **नहानं** पळतेच.'

नळ (स्त्री.) निकड. 'पन मायी एक **नळ** भागवा, तीनकसे रुपये अगल द्या.' -सित.१४.

नळ (पु.) आतडी फुगणे. 'आमुशा पोटी पाणी पिऊ नाही. **नळ** येतात नाही तर.' -ऊन.१०१.

नळग्या (स्त्री.अने.) पायातील हाड, पोटऱ्या. 'पायाच्या **नळग्या** गरम झाल्या.'

नळनं (क्रि.) अडणे. 'समदं टापटीपन बरोबर झालं आता कोनावाचून काई **नळनं** नाई.'

नळा (पु.) बांगड्या ठेवण्याची गोल नळी. 'कसारानं **नळा** भाईर काळून लालजरद बांगळ्या दाखोल्या.'

नळी (स्त्री.) १. मटणातील पोकळ हड्डी. '**नळ्ळी** फोळू तं दात गेले लेकाचे.' २. वंगण ठेवण्याची बांबूची **नळी**. '**नळीतलं** वंगन काळूकाळू चाकाच्या बुदल्यात घातलं.' ३. सरते- पेरण्याचे बांबूचे साधन. 'खत उनाराले बाया सांगल्या तरमा मायाजोळ **नळ्याच** नाईत.' (का. लळिगे, नळिगे)

नळ्ळा (पु.) नरडे, गळा. '**नळ्ळा** फोळूफोळू 'गनपती बाप्पा मोऱ्या' असं लेकरं म्हनत.'

नळ्ळी (स्त्री.) गळा. 'जास्त बोलशीन तं लेका **नळ्ळीचा** घोटच घेईन.'

नं (अ.) तृतीयेचा प्रत्यय. 'आतालोक आमीनं बंड्या भरल्या

कापसाच्या. **त्यानं** उसीर झाला.' -सित.३१. 'या गरिबीच्या पाई **आपुननं** पोरं कामात रपाटले.' -फीर.१४९.

नंगचोट (वि.) भिकारी, गरीब. 'ओ नवरीवाले, आमी पाह्यलं नाई काय फरायाचं? **नंगचोट** हावो काय?' -ना.३८.

नंगर (वि.) नगर, पूर्ण गाव. 'मुंगीबी उपाशी नाई रायली पायजे असं **नंगर** भोजन केलं.'

नंगा (वि.) १. नागवा, वस्त्रहीन. '**नंगा** मानूस दिसला का हा साधू बॉ हाय असं वयखाव.' २. संपत्ती नसलेला. 'फलाना **नंगा** मानूस हाय अन् त्याले लेक देतो म्हनता वा बे बाऽऽ'

नंगाट(ळ) (वि.) गरीब. 'दारू खोऱ्या नं इस्टेट इकून लेकरं **नंगाट** केले.'

नंगाफटींग (वि.) गरीब. 'पोरीच्या लगनायच्या घोरात त्याचे वावरं गेले. **नंगाफटींग** झाला तो.' -सित.१७.

नंगारा (पु.) नगारा. 'तुया नावाचा तं गावोगाव **नंगारा** वाजून रायला चोट्ट्या.'

नंगाळ(ळा) (वि.) पैसा नसलेला, निर्लज्ज, मवाली. 'तू गरम डोक्स्याचा अन् थो हा साऱ्या जमान्याचा **नंगाळ**.' -एक.

नंद(दो)ई (पु.) नणंदेचा पती. 'नदीच्या थडीनं उतरला कोण राजा, **नंदई** होये माझा.' -लोक.२.

नंदानंदई (पु.) नणंदा आणि त्यांचे पती. '**नंदानंदई** पावने आलते तं आमी वावरात जायेल होतो.'

नंदी (पु.) वळू. 'गावात दोन देवगाई अन् हा **नंदीबैल** हाय.'

नाइन्साफी (स्त्री.) अन्याय, जुलूम. 'दिवसभर राबून एवढीच मजुरी. हे तं **नाइन्साफीच** झाली मनाव.' (फा.अर.)

नाई (क्रि.) नाही. 'मी उठलीच **नाई** अथून बसेलच तं आये तवाची.' -धग.९५.

नाईतरमा (अ.) नाही तरी. 'आता गरम पान्यासाठी हिवायात **नाईतरमा** खाल्यानी येवा लागते.' -हज.२१.

नाईलाज (पु.) उपाय नसणे. 'पेरनं होऊन आठ रोज झाले तरमा पानी नाई. **नाईलाज** झाला लेक आता.' (फा.)

नाउ(वो)नी (न.) देवाला न्हाऊन घेतलेले तीर्थ. 'आताच देव न्हानले हे घ्या **नाउनी**.'

नाउमेद (स्त्री.) उत्साह नसलेला. 'कापूस ना झाल्यानं मानूस **नाउमेद** होतेच.' (फा.)

नाउम्मीद (स्त्री.) निराशा, नाउमेद. 'असं **नाउम्मीद** हून चालत नस्ते बाबू. अभ्यास कर होशीनच पास.' (फा.)

नाऊ (पु.) न्हावी. 'पाखरात काऊ नं मान्सात **नाऊ**.'

नाकन (न.) नाक, कडी. 'मिरच्याचे **नाकन** तोळूतोळू बोटं दुखून रायले.' '**नाकन** तुटेल सिंगल आन टिचरेल बशीत बिनदुदाचा च्याहा तिनं वतला.' -सित.३३.

नाकनिब्बर (वि.) नाकात पक्का, जबर. 'थो लाख्या बैल **नाकनिब्बर** हाय जी आन ह्या जांभा नाकात कच्चा हाय.' -दि.१६. 'एकानं शेपूट होडून खट्याईले उभं केलं. दुसऱ्या नं येसन धरली. अरे हा खड्या **नाकनिब्बर** हाय.' -जटा.५१.

नाकबूल (वि.) नामंजूर, अमान्य, अस्वीकृत. 'उडन त्यानं पैसे देनं कबूल केलं तरमा म्या **नाकबूल** केलंच ना.' (फा.अर.)

नाकमुष्ट्या ? '**नाकमुष्ट्या** हानते नाई म्हंतेत त्याईले ढोसू.' एक.

नाकाड्या (वि.) उंच नाकाचा. 'मोठा **नाकाड्या** गोठी करते. माईत हा म्हना तुयाबी घरातलं.'

नाकाबील (वि.) अयोग्य, अपात्र. 'कामाले कोन काबील, कोन **नाकाबील** हे कयलं पायजे आपल्याले.'

नाकाम (वि.) अयशस्वी, नापास. 'आपन कोनत्याच कामात **नाकाम** होत नाई.' (फा.)

नाकेबंदी (स्त्री.) अटकाव, मनाई. 'कापूस परप्रांतात जाऊ नये म्हणून सरकारने **नाकेबंदी** केली.' -फीर.२२८.

नाखू(श)स वि. नाराज, अप्रसन्न. 'येवळं शाबूत स्थळ असूनबी पोरगी **नाखूस** दिसून रायली?' (फा.)

नाग (पु.) फना असलेला साप. 'बिळातून लाल जरद **नाग** पान्यापावसातच बाहेर येते.'

नागझरी (पु.) नदीच्या पात्रातील झरा, एक गाव. 'शेगावच्यापाशीच तं **नागझरी** गाव हाय.'

नागडं (वि.) नग्न. 'मुलांना **नागडं** करून कमरेभोवती निंबाचा पाला.' -रा.२५.

नागड्डी (स्त्री.) नांगरलेले शेत. 'पायाले ठेस लागते **नागड्डीतून** जाता खेपी.'

नागपंचमी (स्त्री.) श्रावणातील पहिला सण, नागपूजा. 'त्यासाठी वारूळ धुंडा, पुंजा करा आन् दूद ठिवा घरातल्या भिंतीवरनं शायेत पाटीवरतं नाग काढून त्याची पुंजा करा.' '**नागपंचमीले** मांग गारुडी पेटाऱ्या त साप फिरविण्याची जोखीम घेऊन पोट भरतात' -दि.७०.

नागमनी (स्त्री.) कापडाचा एक प्रकार. 'पांढऱ्या सहनाचा हाफबाह्याचा शर्ट नि **नागमणी** धोती हा त्याचा पोषाख.' -काळी.४२.

नागऱ्या (वि.) गावठी, शेतकरी, अडाणी, नागर हाकणारा. '**नांगऱ्या** ले कोन दीन बायको?'

नागरमोथा (पु.) लह्याळी गवताची सुवासिक मुळे. 'वावरात गेली वावरात गेली **नांगरमोथा** आनला, कांडला कुंडला.'

-वि. (का.नागर)

नागवेल (स्त्री.) विड्याच्या पानाची वेल. 'कां न फळतांही सार्थका। जैसिया **नागलतिका**।' -ज्ञा.१८.६३२.

नागा (पु.) खाडा. 'हप्त्यातून दोन दिवस **नागा** करनं चूक आये.' (फा.)

नागाटी (स्त्री.) नांगरनी. 'जवाऱ्या बाजऱ्या सोंगल्या की लगेच **नागाट्या** सुरू व्हत.' -बा.६७.

नागीन (पु.) एक त्वचा रोग. 'तोंडावर **नागीन** झाल्यानं डोयाबी खराब होते का काय सांगावं.'

नागीन (स्त्री.) सापाचा एक मादी प्रकार. 'बिलनशी **नागीन** निंगाली, नागोबा डुलायला लागला.'

नागोबा (पु.) नाग, सर्प. 'भिंतीवरचा पोतरा सुकण्यापूर्वी तीनतीन बोटांनी भिंतीवर **नागोबा** काढले.' -सेल.२१९.

नागोळा (वि.) नागवा. 'एवढा मोठ्ठा वाहाळला, **नागोळाच** रायतं काय, चड्डी घाल.'

नाचक्की (स्त्री.) १. बदनामी. 'काट्टं जुगारी निंगल्यानं समद्या पंचक्रोशीत **नाचक्की** झाली.' २. अपमान. 'बैठकीत आपली **नाचक्की** नाई झाली पायजे.' (फा.नाचाकी)

नाचनं (क्रि.) १. नृत्य करणे. 'आमचाच सरपंच झाल्यावर **नाचनं** तं पळीनच ना भाऊ गावभर.' २. हट्ट करणे. 'गाळी पायजे म्हनूनसन्या पोट्टी निन्हा **नाचूनच** रायली.'

नाचनी (स्त्री.) १. एक धान्य. २. नर्तकी. '**नाचणी** नाचत येते बाई एका पायावर/ वहिनी डोळे मोडे कशी माह्या बंधूवर.' -लोक.१०३.

नाची (वि.) नृत्यांगना. 'शामराव भाऊ, तुमची नात तं निन्हा **नाचीच** दिसून रायली.'

नाचीत (वि.) व्यर्थ, मोल न झालेले. 'इतके दिस तुहं केलं ते सगळं **नाचीत** झालं आसा लोकाईचा बोल लागला.' -रा.२२३.

नाचुकला (वि.) क्षुल्लक. '**नाचुकला** सुईत दोरा घालता येत नाई आजून, कसं करसान पुढे.' -ना.५२.

नाचे (क्रि.रूप.) नाचत असे. 'झेल्याचं पोट्टं लुगडं नेसून दर दिवाळीत दंढारीत **नाचे**.' -मोती.३२.

नाचे (पु.अने.) नाच करणारे. 'सोंगं करो आमी तं **नाचे** ना सापळत गावात.'

नाचेल (क्रि.रूप.) नाचलेले. 'होईच्या दिवसात कोरकू संगं **नाचेल** हाव मी.'

नाचोत (क्रि.रूप.) नाचायला लावत. 'मोठे बॉ जमीन पाये तं माया मायबापाले **नाचोत** जाय.'

नाचोनं (क्रि.) नाचायला लावणे. 'बायकाईले बराबर जम्ते नवऱ्याले **नाचोनं**.'

नाच्या (पु.) १. नृत्यकार. 'पंचमीच्या वेळी नागोबाच्या पालखी समोर तिचा नवरा **नाच्या** होऊन नाचला.'- हज.५३. २. षंढ. 'गावातल्या बायका अन् दंढारीतले **नाचे** मले मायबहीनी सारखे.' -मोती.

नाजूक (वि.) मऊ, कोमल, सुकुमार. '**नाजूक** नाक ओढून ओढून अलवार व्हायचं एवढी थंडी.' -फीर.२९. (फा.)

नाट (पु.) अपशकून, अडथळा. '**नाट** लागलें संचिता। खेपा खुंटलिया॥' -तुका.३८९. 'निंघालो तं आता ज्याची **नाट** लावू नको. जाऊ दे मले.' (का.)

नाट (स्त्री.) खांब. 'सागवानी **नाट** बसली भितीवर आळवी.'

नाटाळ्या (वि.) खोडकर, कामात व्यत्यय आणणारा. 'माया कोनत्याबी कामात नाटच लावत लावते, **नाटाळ्या** हाय सायाचा.'

नाट्या (वि.) अपशकून करणारा. 'काई करतो म्हटलं का हा **नाट्या** ते तं होतच नाई म्हन्ते.'

नाठाळ (वि.) खोडकर, आडदांड. 'पाहता-पाहता **नाठाळ** माणसं वठणीवर येत होती.' -सि.११३.

नाडनं (क्रि.) फसवणे, लुबाडणे. 'दुकानदारानं चांगलच **नाडोलं** मले.'

नाडा(ळा) (पु.) १. मोटेचा जाड दोर. 'माळ्याच्या वाडीमंदी मोटीला हिरवा **नाडा/** जाते पाणी फुलझाडा.' -लोक.८५. 'तो मोट हाकत राहिला **नाड्यावर** बसून तोल सावरत.' -गाआ.१६. २. बंध. 'पयजाम्याचा **नाळा** तुटला म्हनून काय तिच्यात सुतई घालता, अपशकुन्यावानी.'

नाडापुडी (वि.) लहानसे. 'मांडून काय द्यावं? **नाडापुडी** इतकं असलेलं वावर?' -झि.५.

नाडी(ळी) (स्त्री.) शीर, नस. 'वैदाजोळ **नाळी** तपासून घेतली तं तो म्हने ठोके बरोबर वाजतात.'

नाडे (पु.) देवीच्या यात्रेत बैलगाडी कमरेला बांधून माणसे ओढत नेतात ते. 'जत्रेत अख्खी गर्दी डफडे, **गाडे**, नाडे, रिंगणावरची लोटांगणं.' -सि.५७.

नाड्यानवस (पु.) नाडे ओढणे व नवस करणे. '**नाड्यानवसानं** एखाद्या पाटलीनीची कूस उजवली की पंगती उठत.' -मोती.

नात (स्त्री.) मुलाची/ मुलीची मुलगी. 'बाप्पा, माई लेक नोय, **नात** होयना? सकूची पोरगी.'

नातं (न.) नाते. 'मामाच्या पोरीसंगं अल्लगच **नातं** अस्ते सायाचं, तिबी आपून गेलो का हरिकते.'

नातंगोतं (न.) नाते व रक्तसंबंध. '**नातंगोतं** पायाचं कामच नाई, मावशीची ननदच होय.'

नातजवाई (पु.) नातीचा पती. 'माई तब्बेत खराब होती तं नात अन् **नातजवाई** आल्ते भेटीले.'

नातरुंडपतरुंड (पु.अने.) मुला/ मुलीची अपत्ये, त्यांचीही अपत्य. 'आपल्या बापजाद्याच्या अंगी आठ्ठरपणा नव्हता म्हणून आपल्या पोरा, **नातरुंडापतरुंडात** पुढं येणारंच नाही याचा काय भरूसा.' -वा.११६.

नातलग (पु.) नातेवाईक. '**नातलग** हाय म्हनून भाकर तुकडा घालून रायलो आपून.'

नातसून (स्त्री.) नाताची पत्नी. 'काय बाप्पा नाता, कही दाखोतं **नातसून**?'

नातू (पु.) मुलाचा, मुलीचा मुलगा. '**नातू** बॉ, आजीले च्या कऱ्याले लावा.'

नात्यातला (वि.) संबंधित. 'संज्या तं काळमेघच्या **नात्यातला** हाय.'

नाथ (स्त्री.) वेसन. 'हे काइ तेयाचीये **नाथेचा** बैलुः ऐसे तेयाचिया बोलविलया येईलः' -ली.१०९. 'गोऱ्याले **नाथ** घातल्याबिगर बस्सर येनार नाई तो.' (का.नत्त)

नाथजोगी (पु.) पोपटाकडून चिट्ठीवरील भविष्य सांगणारी जमात. '**नाथजोग्यापासच्या** पिंजऱ्यातल्या पाखरानंही बराबर तेच चिठ्ठी काढळी होती. पोरगं होईन म्हनून.' -एक.

नाथनं (क्रि.) वेसन घालणे. 'चित्त देऊनि **नाथिलीया**। देहाभिमाना॥' -ज्ञा.६.७०.

नाथमथाटी (स्त्री.) बैलाचा श्रृंगार. 'काया बैल शिंगशिंगोटी/ त्याले नाई **नाथमथाटी**.' -लोक.

नाथी (क्रिवि.) वेसण घालण्या योग्य. 'गोऱ्ह आता नाथी आलं. **नाथ** घाला त्याले.'

नाथेल (वि.) वेसन घातलेला- बैल. '**नाथेल** गोरं लवकर हाती लागते.'

नाद (पु.) १. छंद. 'उत्तम **नाद** घेणेचि नाही।' -ग्रा.६.६०. 'तिनं मारवाड्याचा मनातून **नाद** सोडला.' -झिं.१०१. २. आवाज.

नादर (वि.) गरीब, चांगला, हलका. 'पोरगी **नादर** दिसते. करून टाकावं आपून.' (फा.)

नादान (वि.) अनभिज्ञ, अडाणी, वयाने लहान. '**नादान** पोरगं हाय. करा माफ येकडाव.' (फा.)

नादार (वि.) दरिद्री, निर्धन. 'मोठ्याचाई एखांदा सोयरा **नादार** असतेच.' (फा.)

नादारी (स्त्री.) गरिबी, दारिद्र्य. 'किती हातजोळू **नादारी** बाई तुले/ नको जाऊ माह्या बंधवाच्या जलमाले.' -लोक.१८७. 'शाळा सोळली व्हती त्यानं, घरच्या **नादारीनं**.' -सित.१६.

नादुरुस्त (वि.) बिघडलेले. 'ट्रॅक्टर **नादुरुस्त** असल्यानं जमीन पळीत पळ्यावर आल्ती.' (फा.)

नानं(ना)गुनं(ना) (न.) कां कू. 'म्याबी टाकला फासा तिनं **नानंगुनं** केलं नाई/ गाळं भल्लं पयत हाय कुठीसाच डग नाई.' 'गुरंढोरं रानावनात जायलाही **नानंगुनं** करू लागली.' -डेबू.४५. 'सुनंदा तुपला बाप काऊन आसा **नानागुना** करत रायते व? देणं म्हणा मागतात तेवढा हुंडा.' -खुं.१२५.

नानंधुनं (न.) स्नान वगैरे. 'सून अशी हल्की सकाऊनच **नानंधुनं** होत जाय तिचं.'

नानखटाई (स्त्री.) बेकरीतील एक खाद्यपदार्थ. 'च्यासंगं **नानखटाई** साजरी लागते.'

नानमुख (न.) लग्नाच्या एक दिवसा पूर्वीचा वराकडील जेवणाचा कार्यक्रम. '**नानमुखाच्या** रोजी अभाय आलं सनकून/ पाह्यता पाह्यता राजा पानी आलं दनकून.' -मिए.१४७. '**नानमुख** झालं अन् मले हयद लागली.' -सित.११८.

नाना (पु.) एक संबोधन. 'घरात **नानाचा** शब्द सारेच झेलनारे!'

नानावनं (क्रि.) ख्याती होणे. 'बंडोजी **नाणावलेला** भट म्हणून सर्वांच्या परिचयाचा होता.' -मोती.३४.

नानी (स्त्री.) आजी. 'नानाई घरी नाईत ना **नानीबी** नाई. भदाळंच्या भदाळं कुलूप लावून कुठी गेले लेकाचे?'

नानुटनं (क्रि.) १. छंदिष्ट होणे. २. गर्व होणे. 'वावरात बम पिकलं तं वाघमारे भल्ताच **नानुटला** होता.' ३. 'पोरायले त्यानं कब्बळीच्या खेळामंदी **नानुटलं** व्हतं.' -सित.३१.

नाप (न.) माप. 'शिप्यानं पयजाम्याचं **नाप** घेतलं माया.'

नापनं (क्रि.) मोजणे. 'मजुरीची जेवारी हाय ना. तशी काहाले नेतं **नापनं** पायलीनं.'

नापसंत(द) (न.) अप्रिय. 'पोरगी आताच पसन **नापसंत** असील तं सांग.' (फा.)

नापेल (वि.) मोजलेले. '**नापेल** कपडे अलग काळून गठ्ठा बांधला.'

नापिकी (स्त्री.) पीक न होण्याची स्थिती. 'दुकाय पळ्ळ्यानं औंदा **नापिकी** झाली.'

नामंजूर (न.) अस्वीकृत. 'खोटाळेईले हो म्हननं सपसेल **नामंजूर** हाय आपल्याले.' (अर.)

नामना (स्त्री.) नावाची ख्याती. 'चार सोयऱ्या धायऱ्यात आपलीच **नामना** जायची.' -झिं.१९.

नामर्द (वि.) भित्रा, नपुंसक, हिजडा. 'मानूस **नामर्द** काय कामाचा. शिवाजीवानी पायजे खरा मर्द.' (फा.)

नामी (वि.) १. नामवंत, नामांकित, श्रेष्ठ. '**नामी** आंबादेखील बाजारात विकण्याचं कोणी नाव घेत नव्हतं.' -मोती.

२. गुणकारक. 'डांग्या खोकल्यावर दारू **नामी** अवशीद हाय म्हने झॉगो बुडा.' (फा.नामी-श्रेष्ठ-कुरकुरीत)

नामुस्की (स्त्री.) बदनामी. 'माई काहाले **नामुस्की** करून रायले राजा, म्या काहाले तुमच्या लेकीचा हात धरला.' (अर.नामूस्,फा.)

नामोशी(सी) (स्त्री.) बदनामी. 'गावात **नामोशी** केली. सोयऱ्यात नाव गमावलं.' -ना.११२.

नाय (स्त्री.) नाळ. 'मायलेकराची **नाय** जुळेल असते. मांगीन कापते मंग ते.'

नायटा (पु.) त्वचारोग- गजकर्ण. 'बुवा बातच काट्याचा **नायटा** करते आन् घरवाले गंमत पायते.' -अक.६०. 'एका घरी भवानी, साता घरी **नायटे**.'

नायतीधुती (वि.) पाळी सुरू झालेली युवती. '**नायतीधुती** पोरीच्या देखत असं भलकाईच बोल्लं नाई पायजे.'

नायनाट (पु.) नाश, विध्वंस. 'घरातला कर्ता मानूस शाबूत नसला का घराचा **नायनाट** व्हाले टाईम लागत नाई.' (त. नयनट्टम)

नायब (वि.) दुय्यम. 'पोरगं **नायब** तयसीलदार म्हून लागेल हाय.' (अर.नाईब)

नायलान (स्त्री.) दोरी- कापडाचा एक प्रकार. '**नायलनचा** दोर अकोल्याच्या बजारातून आनला.'

नार (स्त्री.) स्त्री. 'अहुळी **नार** मेली गेला सरगात धुवा/ घात लेकराचा झाला कय केले तुवा देवा.' -लोक.८४. '**नार** केली हावसीनं/ रगत आटलं वावरानं.' (त.नार)

नारंगी (स्त्री.) दारूचा एक प्रकार. 'दारुच्या दुकानात जाऊन त्यानं **नारंगीचे** दोन प्याले पोटात रिचोले.'

नारनं (क्रि.) डाले, पाट्या विनणे. 'नवं डालं नारयाच्या दोरीनं **नारनं** पळते.'

नारय (न.) नारळ. 'जैसे **नारीएल** मुरले पाणी घे ते वरौते जाएः...बाहीरील कांटे नीबर होएः' -ली.२००. 'दर शनीवारी **नारय** हनुमानाले फोळो/ औंदा तरी शाबूत बायको मिळो.'

नाराज (वि.) नाखुष, उदास, दुःखी. 'सोन्याची मुंदी देली नाई तं पावना लयच **नाराज** झाला.' (फा.नाराझ),

नाराजी (स्त्री.) अप्रसन्नता, असंतुष्ट, नाखूश. 'तुमच्या मनासारखं हू द्या. **नाराजी** ना पायजे.' (फा.)

नारायन (पु.) सूर्य. 'सकाऊनच्या पारी उगोले **नारायन**/ आंगनात चाले सळा सारवन.' 'अभाय असल्यानं **नारायन** देवाच दर्शनबी नाई झालं.'

नारिंगी (वि.) केशरी, भगवा रंग. 'पोरीले **नारिंगी** रंगाची साळी भल्ली साजरी दिसते.' (फा.नारंज)

नारिंदी (वि.) नांदा लावणारी. 'पोर लय **नारिंदी** हाये. जे पायजे ते पायजेच.'

नारी (स्त्री.) स्त्री. 'देऊ नको देवा **नारीचा** जलम/घरादाराचा गुलाम.'

नारू (पु.) तंतूसारखा कीटक निघतो तो रोग. 'पाया जाला **नारू**। तेथें बांधला कापूरु। तेथें बिबव्याचें काम॥' - तुका.४३५५. (का.नाडु)

नाऱ्या (वि.) कोणीतरी एक. 'कोन्या **नाऱ्या** नं केला हा दानोळा?'

नाल (स्त्री.) जनावराच्या खुराला मारतात ती लोहपट्टी. 'घोड्याची अर्धवर्तुळाकार, लांबोळी **नाल** असते त्या आकाराचं देईचं देऊळ.' -डेबू.२. २. तमाशातील एक वाद्य- ढोलकी. ३. जुगार अड्डेवाल्याची मिळकत, भाडे. (फा.का.नालु-ल,अर.नअल)

नालकट (वि.) हलकट, पैशासाठी काहीही करणाऱ्या. 'दौलत जादा केल्यानं ज्या तुमच्या पुढे आदा करतील त्या **नालकट** रांडांपुढे खुशाल गोंडा घोळा.' -कात.७१.

नालगट (न.) नाला. 'नालगटात **घनदाट** गाजर गवत झालं.'

नालस्ती (स्त्री.) १. निन्दा, तक्रार, गाऱ्हाणे. 'पोटचं पोरगं महादेव पन गावभर मायची **नालस्ती** करीत हिंडत होता.' २. बदनामी. 'लोकईले काय हाय ते तं चांगल्याईची **नालस्ती** करतेत अन् वांगल्याचीई करतेत.' -लेक.७७. (फा.नारास्त)

नाला (पु.) ओढा, पाण्याचा प्रवाह. '**नाल्याच्या** काठावर येऊनच तर लुगडं नेसलतं.' -रा.१०६.

नालायक (वि.) निरुपयोगी, अपात्र, बदमाश. 'पोरगं **नालायक** निंगलं त बापाचं केवढं मन दुखते!' (फा.)

नाली (स्त्री.) सांडपाण्याचा प्रवाह. 'पावसाचं पानी **नालीत** मावलं नाई.'

नालेखोले (न.अने.) खोल चर. 'दळदळ पानी आल्यानं वावरात जसे **नालेखोलेच** पळ्ळे औंदा.'

नाव (स्त्री.) नौका. 'येवळी मोठ्ठी नदी का **नावच** पायजे या तिराहून त्या तिरावर जायाले.' (फा.नाव)

नावगाव (न.) लौकिक, प्रतिष्ठा. 'लोकानं आपलं **नावगाव** काहाळलं पायजे, असं वागाव मान्सानं.'

नावनाय (वि.) सर्व. 'लग्नासाठी **नावनाय** आल्तं, पाहा.'

नावबट्टा (पु.) दोष लावणे. 'नाही ते करून **नावबट्टा** लावनार नाही तर तो परशा कशाचा?'

नावबोट (न.) टीका करणे, दोष दर्शन. 'सगळं दहिगाव याला **नावबोटं** ठेवतं.' -खुं.१५४.

नावराशी (स्त्री.) अमुकाच्या नावे. 'आन् ते कणकेची भुलाई करून तुया **नावराशी** तुया दाट्ट्यात रोयेल हाय वऽऽ' -

हज.३२.

नावाजनं (क्रि.) प्रसिद्ध होणे. '**नावाजनं** नशिबात असलं तं येका 'तिफन' कवितेनंबी **नावाजते** मानूस.'

नावाट (वि.) नवीन. 'बुडा दूद पेल्या **नावाट** वासरावानी जागीच वयवय कऱ्याले लागला.' -सित.७१.

नावाडी (पु.) नाव चालविणारा. 'नदीतल्या नावेत बसला नाई अन् लोक मोठ्या मान्साले रेतीतला **नावाडी** हाय म्हनतात.' (का.नावाडिग)

नावे (वि.) नावाने मालकीचे. 'जमिनजुमला बापाच्या **नावे** असल्यानं भानगळ झाली.'

नास (पु.) नाश, तोटा, नुकसान. 'दोन दिवस नांदली नाई. पुऱ्या जवानीचा **नास** केला भोसळीचीनं माया.'

नासकं (वि.) नासलेले, कुजलेले. 'हे बेणं भोसळीचं भलतंच **नासकं** हाये. कव्हाच्यालेबी नसत्या भानगडी करीत रायते.' -वा.६१.

नासक्या (वि.) कांद्याची एक जात. 'औंदा **नासक्या** कांदा पेरतो वावरातनी.'

नासमज (वि.) समज नसलेला. 'लेकराले एवढं काय कयते? **नासमजच** असते ते.'

नासरू (पु.) नासूर, जखम वाढत जाणे. 'हायगय करसीन त या भदाडाचा एक रोज **नासरू** होईन.' -अंधा.

नासुकलं (वि.) १. थोडे, अल्प. 'खरं म्हणजे हे लय **नासुकलं** कारन हाये.' -पागो.७५. २. लहान. 'हे **नासुकलं** पोट्टुंई मले शिकोते, भोसळीचं.'

नासूर (न.) भगेंद्र. 'घरातच पळेल आय मामा, **नासूर** झाल्यानं पायात.' (फा.)

नासोडा (पु.) नास. 'हरणं सपनात येतात माह्या. पिकाचा **नासोडा** करणारे राक्षस होऊन.'

नासोनं (क्रि.) नासविणे. 'सरकं काम **नासोलं** भळविच्यानं.'

नासोळा (पु.) सत्यानाश. 'गारगोंडानं पिकाचा **नासोळा** झाला.'

नास्ता (पु.) फराळ. 'सकाऊनच भाकर अन् चटनीची न्यारी करो. पैसा आला तवापासून पोह्याचा **नास्ता** करतो.' (फा.)

नास्तापानी (न.) फराळ वगैरे. 'पावनेईले **नास्तापानी** करून वावरात नेतो चकराले.'

नाह(हा)क (क्रिवि.) उगाच, विनाकारण. 'वरच्याची गाठ भारी/ खालचे **नाहाक** बोंबा मारी.' 'वावर इकत घ्या, बैलखटे घ्या, औऊतफाटे करा, दोरखंड, चऱ्हाटं ओढा ह्या **नाहाकच्या** भानगडी कोण लावून घेईन.' -वा.८५. (अर.फा.)

नाहानी (स्त्री.) आंघोळीची जागा. 'आंगनात एका कोपऱ्यात तुराट्यापराट्याचा कूळ लावून **नाहानी** केली.'

नाळ (स्त्री.) गर्भाच्या बेंबीला जोडलेली नळी, दोरी. 'मान्साची **नाळ** पक्की पायजे, बेंबीतल्यावानी.' (का. लाह, त. नाट्)

नाळा (पु.) मोटेचा दोर. 'तयाचे म्हणीये करीः सींकेः नाडेः तुते करीः' -दृ.४८. 'मोटीच्या **नाळ्यासाठी** जाळंजुळं दोरखंडच लागते.'

नाळापुळी (वि.) अतिशय लहान. 'मांग वाड्यातले सगळेच घरं **नाळापुळी** इतकेच. धड आडवं झोपता येणार नाही ना उभं.' -वा.६६.

नांगर (पु.) जमिनीत घुसून ढेकळं काढणारे औत. 'तंव **नांगर** जुंतलाः तवं वांकलाः' -ली.४७७. (का.)

नांगरटी (स्त्री.) नांगरण्याची क्रिया. 'उलंगवाळी होता बरोबर **नांगरटी** केली वावराची.'

नांगरदडप्या (वि.) अडाणी, गावठी. 'म्याच बह्याड, तुमच्यासारख्या **नागरदडप्यावर** पिरेम केलं.' -ज.७१.

नांगरनं (क्रि.) नांगरून काढणे. 'तरी भूमि बीज **नांगरु**। यया भांडवलाचा आधारु।' -ज्ञा.१८.८८०.

नांगरमोथा (पु.) लह्याळी काळा सुवासिक कंद. 'वावरात गेली **नांगरमोथा** आनला कांडला कुंडला.' -काया.९.

नांगरेल (वि.) नांगरलेले. '**नांगरेल** वावरातून बंडी बैलं वळत नाईत.'

नांगी (स्त्री.) विंचवाचा फणा. 'तुका म्हणे विंच्वाची **नांगी**। तैसा दुर्जन सर्वांगी॥' -तुका.३९४३.४. 'गन्या लय वयवय करून रायला. त्याची **नांगी** ठेसाच लागते एकडाव.'

नांगीन (स्त्री.) १. नागीण. 'वैनी का बाई होय का **नांगीन**. फूसफूस करत रायते सदान कदा.' २. एक त्वचा रोग.

नांगील (न.) विड्याचे पान. 'धुनं धुताधुता कोन येक **नांगीलचं** पान अर्धअर्ध वाटूवाटू खाते. कोनाच्या मंदातून इस्तू जात नाई. हे सारंसारं समजे.' -लेक.३६.

नांगोबॉ (पु.) नाग, साप. 'आयत्या भोकातला **नांगोबॉ** म्हंजे घरजवाई!'

नांज (पु.) बैलाच्या गळ्यातील पितळीचा तोडा, गोफ. 'जोडीच्या गयातली **नांज** कस्सी चेमकली पायजेन, मान्सावानी थो तैयच्या गयातला गोफ होय.' -दि.११.

नांतंघर (वि.) नांदते घर, गजबजलेले, सुखी कुटुंब. 'पोरगी साजरी **नांत्या घरात** पल्ली.'

नांद (पु.) १. छंद, नाद. 'पोरायले गाठ्याच्या **नांदात** आबा घर ते पार, पार ते घर अस्या चकरा मारत फिरत.' -सित.१२३. २. ध्वनी. ३. पाण्याचे मोठे घंगाळ. 'बैल पाजनं झाले की त्या **नांदीत** पानी देजा भरून.' -भं.६६.

'काठोकाठ, डचांग पाणी मिळालं. **नांदीचा** जीव तृप्त झाला.' -डेबू.३२.

नांदकी(क्या) (वि.) लग्नविधीत मध्यस्थी करणारा. '**नांदक्यानं** केली घाई, माथी मारला भोई.'

नांदती (वि.) संसारात रममाण असलेली. '**नांदतीले** पळाय लावते अन् पळून चाल्लीं तिले नांद मनते.' -झिं.१२.

नांदनं (क्रि.) सासरी राहणे. 'तैसा शरीराचेनि आभासें। **नांदतु** जंव असे।' -ज्ञा.१८.२२२. 'सर्व सुख तेथे। असे सर्व काळ। ब्रह्म ते केवळ। **नांदतसे**॥' -ज्ञा.४.४६५. 'मले नाई वाटत ते पोरगी **नांदीन** म्हणून.' -ना.४०. 'मनी नाई **नांदनं**, पोवाळे बांधनं.'

नांदनूक (स्त्री.) वर्तणूक. 'कां कमलकंदा आणि दर्दुरी। नांदणूक एकेचि घरीं।' -ज्ञा.९.५८. '**नांदणूक** ऐसी सांगा। नाही तरी वांयां भागा॥' -तुका.६०. 'पोरीची **नांदनूक** साजरी नसीन त कोन वागोईन तिले?'

नांदा (पु.) टुमणे, हट्ट, तगादा, धोशा. 'शेजाऱ्याचा गॅस पाऊन इले हिरस आला/ आनाना व आपल्या घरी **नांदा** सुरू झाला.' -रूख. 'त्याईनं जेवाचा लयच **नांदा** लावला.' -मे.१३६.

नांदाळ्या (वि.) हट्ट करणारा. 'मले द्या, मले द्या असां **नांदाळ्यानं** नांदाच लावला.'

नांदावनं (क्रि.) गुंग, मग्न होणे, छांदिष्ट होणे. 'गंजिफा ख्याले भलतीसं **नांदावलं** पोट्टं.'

नांदी (वि.) छांदिष्ट. 'माय म्हने डाक्तरले घिऊन या आंदी/ नवसाचं पोरगं माहा लागीन भलत्याच **नांदी**.' -नांबै. 'जाऊ द्याना वं तुमी फारच **नांदी** येता गळ्या माय म्हणाली. ' -फीर.५९.

नांदुरी (स्त्री.) नांदुरा गावाकडील. 'या पठ्ठ्यात **नांदुरी** दमन्या नावाजेल आयेत.'

नांदे (क्रि.रूप.) नांदते, नांदायची. 'भावाचे शेजारात बहीण कशी **नांदे**, येता भावजय घरी आडवी कसू बांधे.' -लोक.७९.

नांदेल (वि.) नांदलेली. 'तिचं कोनाले सांगतं वं? दोनचार घरात **नांदेल** आये लौंडी. सात ना सूत!'

नांदोनं (क्रि.) नांदवणे, प्रपंचात वागवणे. 'बह्याळ बायको असूनबी **नांदोनं** पळ्ळी. दुसरी कुठी भेट्टे भाऊ.'

नांदोयाले (क्रि.रूप.) नांदायला. 'या बारीनं **नांदोयाले** घेऊन चाल्लो तुमच्या लेकीले. शाबूत राय म्हना.'

नांदोयेल (क्रि.रूप.) नांदवलेली, वागवलेली. 'मांगलमेठ्या झाळत येते बुहारी, हे पा अशी बायको म्याच **नांदोयेल** हाय.'

नांद्याले (क्रि.रूप.) संसार करायला. 'नवऱ्याचं मन पायजे बाईत. मंग बाईबी **नांद्याले** येते.'

नांदिक (वि.) छंदी. 'नाई त हे **नांदिक** पोरगं पुन्ना उचलून आनसान घरात.'

निआईकनं (क्रि.) ऐकून न घेणे. 'पण आपण आईकल्याचं **निआईकलं** केलं, बेसरमाचं सोंग घेतलं.' -सुखो.५३.

निउतीनं (क्रिवि.) शांततेने. 'मायीनं **निउतीनं** कडीचोट संसार सजवला.' -झा.२८.

निकट (अ.) जवळ. 'दुरचे जोळ करावं अन् **निकटचे** दूर लोटावं असं उल्टं काम आये त्याचं.'

निकड (वि.) अलिप्त. 'कोठ्यावर कोणाला रुंगळू देत नव्हता. या बाबतीत तो जरा **निकड** आणि एकलकोंडाच होता.'

निकर (पु.) अतिरेक. 'सहज गंमत केली पण गंमतीचा **निकर** झाला अगदी.' -कात.९२.

निकरंड (वि.) कुचकामी, मठ्ठ. 'सदाभाऊ एवढा काबील मानूस, पोट्टं पाहा कसं **निकरंड** निंगलं.'

निकरट (वि.) निष्ठुर. 'तुहे हाल मांडले तुह्या सासूनं?... इतकी कशी **निकरट** हाये म्हनावं माय.' -झिं.६१.

निकरडे (वि.) कठोर, दुष्ट. 'तुमी कायले इतलं मनाले लावून घेता? ते मुळातच **निकरडे** आयेत नवराबायको.'

निका (पु.) लग्न. 'सुलतानचा **निका** हाय दोन रोजानं.' (अर. निकाह)

निकाल (पु.) १. निर्णय. 'कोर्टाचा **निकाल** याचा आय आजून.' २. श्रीमंती जाणे. 'तमाशापायी सायबूच्या इस्टेटचा ताहाच **निकाल** लागला.' ३. शेवट. 'आज वखर धरतो अन् वाईचा **निकालच** लावतो.'

निके (वि.) चांगले. 'साकर खाईजे ते **निकेः** की साकर होईजे ते निकेः'

निक्षून (अ.) स्पष्टपणे, उघड. 'पुऱ्या गावाले **निक्षून** सांगलं आपल्या कोनी वाटी गेलं त्याची धळगत रायनार नाई.'

निक्सूनिक्सू (क्रिवि.) निवडून, पाहूपाहू. '**निक्सूनिक्सू** खाय, त्याच्या घाटीत केस जाय.'

निखपती (वि.) न खपणारी. 'आपली पोरगी **निखपती** थोळीच हाये आत्तापासून सोयरिकच्या मांगं लागा.' -हज.२०.

निखय (वि.) निखळ. 'पोराकळचे लोकंबी मले **निखय** सोनहरके दिसतात माय.' -सित.१४७.

निखालस (वि.) पूर्णतः. 'मन्या **निखालस** खोटं बोलत रायते.'

निखुंड (वि.) निव्वळ. 'तुम्हालेबी लेकीबाळी हायेत, **निखुंड** वांझोटे नाहा.' -पख.१६२.

निखुंडच (वि.) समूळ, सपशेल. 'तरी तुहं काहीबाही हाये. बा तुव्ह बलुतं **तिखुंडच** बंद झालं नाही.' -पख.१५६.

निखुळ्या (वि.) न खुडलेल्या. '**निखुळ्या** भाजीची कशी कराव भाकर?' -रा.३.

निखोर (पु.) निखारा. 'सासूले नका मनू उगाच हसल्याचा **निखोर** व्हायचा. काही व्हत नाही. भेवू नको इतली.' -पख.५२.

निगरगट (वि.) पाषण, कठोर हृदयाचा. 'खाटकावानी **निगरगट** काहाले वागून रायला.'

निगरानी (स्त्री.) देखभाल, जोपासना. 'अतुल कुठी जाते, कुठी येते याच **निगरानीवर** तो होता.' -सित.१०३. (फा.निगरान)

निगा (स्त्री.) दृष्टी, नजर, जतन करणे. 'मी गावा चाल्ली. **निगा** ठुजो आपल्या घरावर.' (फा.निगाह)

निगुती (स्त्री.) सांभाळून, व्यवस्थित, काटकसर. 'घ्या जि हेंगे क्षीर हाती। **निगुतिने** वाढावे॥' -तुका.२१७. 'ऐसीं बारा वर्षे क्रमिली निगुती।' -नाथ. 'मायीनं **निगुतीनं** कडीचोट संसार सजवला.' -झा.२८.

निघोती (वि.) सरस, कामाची. 'अशी सून **निगोतीची** पायजे. गॅस असूनबी चुलीवर सयपाक करते.'

निचकोळा (पु.) नखाने चिमटे घेणे, लिचोंडा. 'एवढे मोठे वाढोले बे? **निचकोळे** घ्यासाठी काय?'

निचनताई (स्त्री.) निश्चिंती, निष्काळजी. 'पानी पळ्याच्या अगुदोर सोयाबीन सोंगनं झाल्यानं **निचनताई** झाली.'

निचरनं (क्रि.) गळणे, झरणे. 'या वावरात पान्याचा **निचरा** पटकन होत नाई.'

निचंताईनं (क्रिवि.) सावकाश, हळू, निश्चिंतपणे. 'एवढी काय घाई आये? जेवा **निचंताईनं**.'

निजगळ (वि.) निश्चिंत, चिंता न करणे. 'काय **निजगळ** पोर्गी हाय खाण्यापिण्याच्या बाऱ्यात म्हणूनच आंग धरत नाई.' -खुं.२६०.

निजगळी (वि.) बेफिकीर, झोपाळू. 'माया गोप्या पक्का **निजगळी** हाय, आठ वाजेलोक तं उठतबी नाई.'

निजनं (क्रि.) झोपणे. 'आवघया बाजा घातलीयाः तयावरि न **नीजेतिः**' -गोवि.२४०. 'हाटवेळु नव्हे भणौनि वृक्षा एका तळीं **नीजेः**' -दृ.११.

निज्जूर (वि.) सत्त्व गेलेली. 'आपल्या वाड्यातली माती आता **निज्जूर** झाली.' -बा.३१२.

निटनेटकं (वि.) व्यवस्थित. 'पोरीसोरीनं **निटनेटकं** राव.'

निटोपाट (क्रिवि.) सतत, एकानंतर एक. 'मजुरीले **निटोपाट** जाऊन घर चालोनं पोरीच्या नसिबी आलं.' -सित.८५.

निठूर (वि.) क्रर, निष्ठुर. 'भागे केवढी **निठूर** आयेस वं तू? नवऱ्याची दयाई येत नाई तुले?'

निडारले (क्रि.रूप.) न भिणारे. '**निडारले** नेत्र जरी/ जाऊ कशी पैलतिरी.' -भीक.१२०.

निडुकरा (वि.) पाशवी, दुष्ट, क्रूर. 'शेरभर बोंडईसाठी काष्टा सोळ्याची पायी एका चलवाद्यावानाच्या **निडुकऱ्या** मान्सानं तिच्यावर आनली हुती.' -लेक.२८.

निढंगी (वि.) संसार करता न येणारा. 'येवळं हत्त्याचं मस्तक असूनबी **निढंगी** कास्तकार असला तं काय पिकोते.'

निढईच्या घामाचं - स्वकष्टाचे, स्वतः अंगमेहनतीने मिळविलेले. '**निढईच्या** घामाची कमाई आपली, हरामाची थोळीच आय?'

निढाल (क्रिवि.) सुखेनैव, निश्चिंत. 'ताप काहीसा उतरलेला. पोरगी **निढाल** झोपलेली.' -पोळा.

नितच्यापक्षी - नेहमीपेक्षा. 'तिचं असं हे हिडगावत चालनं लोकायले **नितच्यापक्षी** न्यारच दिसत व्हतं.' -सित.७२.

नितरनं (क्रि.) शेवटचा थेंब पडेपर्यंत दाबणे. 'लुगळं पिवून घे. अवघं पानी **नितरलं** पायजे.'

नितळकाच (वि.) स्वच्छ, पारदर्शी. 'सातपुड्यातून शिवारात उतरलेला नाला तर बारमाही **नितळकाच** पाणी घेऊन वाहणारा.' -फीर.१८८.

नितात (पु.) वैताग, कंटाळा, वीट. 'आता आपल्यालेई **नितात** आला ह्या साऱ्या गोठीचा.' -लेक.१०.

नितातनं (क्रि.) १. आसुसणे. 'भाकर खायाले जीव **नितातला**.' २. कंटाळणे. 'जीव **नितातला** नादारी बाई तुहा.' -लोक.७१.

नितातेल (वि.) १. त्रासलेला. '**नितातेल** पोरगी सासूसासऱ्याले.' २. अधाशी. 'भिकारी खायाले तं **नितातेल** असतेच तो.'

निथरनं (क्रि.) पाझरणे, ओघळे. 'शिवारातली काळी माती भिजून भिजून **निथरली** होती.' -फीर.१३१., 'खुलासा करताच पावने बुवाचा भेव **निथरला**.' -गा.२२.

निदंग्या (वि.) रीतभात, ढंग नसलेला. 'कोन्या **निदंग्याची** नार हिंडते घरोघर.' -लोक.१७४. 'तुहे पोरगं लय करीन्याचं हाय. पन बाप **निदंग्या** हाये. -ना.११.

निदान (न.) मूळ, रोगपरीक्षा. 'खानंपेनं धकत नाई अन् बिमारीचं **निदानबी** लागून नाई रायलं.'

निदान (अ.) केवळ, कमीतकमी. 'बाकीच्या कामठ्यात एकेकाची भर तर पडण **निदानची**.' -सेल.३८.

निदानशिरी - एवढे तरी, हे तरी. 'काम होत नाई तं **निदानशिरी** पोट्ट्याईले तरी घेऊन जा शाईत.' -धग.६०.

निदानी (वि.) दरिद्री. 'वळणीचा आंबा पाणी घालून मोठा

केला/ **निदानीला** कामा आला.' -लोक.६३. 'कसंही केलं, तरी **निदानीच्या** दोन पाथा तर लागतील.' 'आली सुगी फुगले गाल, **निदानीचे** तेच हाल.'

निदैवी (वि.) दुर्दैवी, अभागी. 'कां **निदैवाचां** घरीं। न राहे लक्ष्मी॥' -ज्ञा.३.१०९.

निनांदी (वि.) नांदत नाही अशी. **निनांदीले** एक घर काय सतरा घरं काय, फरक ना पळे.'

निपक (वि.) स्वच्छ. 'घरदारही **निपक** राहात होतं.' -ना.५३.

निपज (स्त्री.) उत्पादन, जन्म. 'नवीन पिळीची **निपज** काई धळी नाई निंगून रायली.'

निपजनं (क्रि.) जन्माला येणे, निर्माण होणे. '**निपजे** दिव्यान्न चोखट। परी माजीं असे काळकूट।' -ज्ञा.१८.१५०३. 'या घरात हेच असं कुचीन **निपजलंशीन** माय?'

निपजे (क्रि.रूप.) निर्माण होत असे. 'अग्नि संबंधे लोही **निफजे**.' -ऋ.८१०.

निपटनं (क्रि.) १. संपविणे. 'हे काम **निपटलं** का आलोच समजा.' २. साफ करणे. 'जें **निपटूनि** कर्म सांडिजे। तें सांडणें संन्यासु म्हणिजे।' -ज्ञा.१८.९२

निपटा(ट्टु)र (वि.) तुच्छ, हलकट. 'त्याहूनि **निपटारें** जाहलें। निवटीं आयितें रण पडिले।' -ज्ञा.११.४७०. 'वेश्येलाही देवाने सदगती दिली तिच्यापेक्षा तू काय **निपटार** आहेस?' -कात.७०५. 'आपण त्या अनपढ लभान्यांपेक्षा **निपट्टर** ठरू नये.' -मोती.

निपटारा (पु.) १. निकाल लावणे. 'त्याईच्या भांडनाचा **निपटारा** केला मंगच निंगलो तथून.' २. निर्णय, निरुपयोगी. 'आपून त्याईच्याई पेक्शा **निपटारे** झालो काय हो?' -पागो.२९०.

निपटावा (क्रि.रूप.) पूर्णतः पुसून टाकावे. 'बोटावर लेप घ्यावा. वाटीत **निपटावा**.' -डेबू.७.

निपटून (क्रिवि.) निरपून. 'अंगाला घाईनं निथळणारं पाणी तो हातानं **निपटून** काढीत राहिला.' -मा.१९.

निप(प्प)त्तर (वि.) क्षुद्र, कमी किंमतीचे, कमी महत्त्वाचे. 'जीव घिया गुलामगिरीऊनबी **निप्पत्तर** असं हे जगनं.' -सित.२७. 'लहू त किसन्याहून **निपत्तर** मानूस हाय.'

निपून (वि.) निष्णात, हुशार. 'कामाधंद्यात सूनवायरी **निपून** आय.'

निपूर (स्त्री.) तूट. 'लेकीच्या सासरी कोन्तीच **निपूर** नाई.'

निप्पक (वि.) स्वच्छ, निर्मळ. 'नावा परमानं निरमला आंगा बांध्यानं **निप्पक**, पाह्याले साजरी व्हती.' -सित.५५.

निफजनं (क्रि.) उत्पन्न, निर्माण होणे. 'तु अन **नीफजविः** मी गोसावीयासि नीमंत्रण देईनः' -ली.५.

निबटन (न.) घाण थर. 'वासराच्या पायाच्या खुरातलं मासल **निबटन** खरडून काढलं.' -पोळा.

निबर (वि.) जून व जाड, राठ, कठीण. 'हीच **नबर** कातडी मतलबाची झूल पांघरून आणखीनच **नीबर** होत जाते.' -ठ.३९. (का.निब्बर)

निबरदडक (वि.) मजबूत. 'पायात **निबरदडक** चप्पल असल्यावर डोळा वर करून कोण पाहील.' -पाटी.

निभनं (क्रि.) पार पडणे, भागणे. 'दुपार **निभे** तर संध्याकाळी एकादशी असा तो रंजीस झाला.' -मोती.

निभावनं (क्रि.) पार पाडणे. 'असंतसं करून लगन तं **निभावलं** कसंतरी.' (का.निबायिसु)

निभोलं (क्रि.रूप.) निभावले. 'मीच हो तं **निभोला** तुमचा संसार.'

निमकाळा (पु.) कडू लिंबाचा काडा. 'ताप आली तं **निमकाळा** घेनं बाबू.'

निमकाळी (स्त्री.) कडू लिंबाची काडी. 'गावात होतो तई सकाऊनच **निमकाळीनं** दात घासे.'

निमगोरा (वि.) काहीसा, थोडा गोरा. 'पाह्याले गेलो त पोरगी नाकीडोळी तरतरीत होती. तिचा वर्ण **निमगोरा** होता.' (फा.)

निमनी (स्त्री.) लिंबाचे झाड, निंब. 'आंगनात **निमनी**. तिले सटरफटर निंबच निंब लागेल.'

निमितं (न.) निमित्त. 'तुमी **निमताले** कारण म्हणून या वावराच्या माथं जे जे जगतील ते ते तुम्हाले जमवावं लागते.'

निमूट (क्रिवि.) चुपचाप. 'मायबापाचं बोलनं **निमूट** आयकाच लागते.'

निम्मं (वि.) अर्धे. 'बटाईच्या येव्हारात पीक **निम्मं** वाटून घेनं पळते.'

निम्मेशिम्मे (वि.) अर्धे. '**निम्मेशिम्मे** पिकातले पैसे पोरीच्या बायतिळ्यात गेले.' (फा.)

निम्मेबटाई (स्त्री.) अर्धी भागीदारी. 'वावर आपलं, मेहनत बटाईदाराची. पीक अर्धअर्ध, असा **निम्मेबटाईनं** हरबरा पेरला.'

नियत (स्त्री.) १. दैव, नशीब. 'कास्तकारीच्या डावात नशीब माह्य हारलं/ **नियतीच्या** ढोराईनं उभ्या पिकाले चारलं.' -अप्र. २. मनोवृत्ती, इरादा हेतू, इच्छा, संकल्प. 'रघू दिसते साजरा पन त्याची **नियत** साजरी नाई.' 'सुदीच्या या महादेवाची तिच्या माहेरच्यांनाही **नियत** होती.' -पख.५०. (अर.नीयत). २. दानत, नीती. (फा.अर.)

निया (क्रि.रूप.) नेया, न्यायच्या वेळी. 'कंडवाळ्यात

नियाच्या वाक्ती गाय चारचार मानसाले ना आटपे.' -फीर.१४०.

निरखनं (क्रि.) सूक्ष्मपणाने पाहणे, परीक्षा करणे. 'बुढा पोरीले **निरखून निरखून** पाहे, मंग काही इचारे.'

निरगुडी (स्त्री.) वृक्ष विशेष. 'ती हातात **निरगुडीचा** फोक घेऊन नागिणीसारखी फुत्कारत आली.' -पख.४४.

निरण (न.) योनी. 'हो घाल त्या दोघी मायलेकीच्या **निरणात**. जेवढी कमाई करशीन ते तेवढी घाल.' -ऊन.१८१.

निरधम (वि.) निव्वळ. 'राधा पिसी झाली. **निरधम** येळीपिसी.' -सित.१०३.

निरपनं (क्रि.) पुसून, निपटून काढणे. 'राघोजी बोटानं अंगावरचा घाम **निरपत** म्हणाला.' -त.७. 'माझा वर्णू फोडिलाः दुख **नीरपौनि** काढलेः' -गोवि.४४.

निरवानिरव (स्त्री.) समारोप. 'कामाधामाची **निरवानिरव** करून मंग माय दमनीत बसली.'

निरशन (वि.) काहीही न खाता उपवास करणे. 'मी **निरशन** एकादशी करतो. पानी नाई पेत त्यारोजी.'

निरशा (वि.) शुद्ध, पाण्याविरहित. 'चहा त पायजे पन तोबी **निरशा** दुधाचा पायजे.'

निरशी (वि.) गौण, दुय्यम, बेचव. 'गाय सस्ती हाय तं **निरशीबी** हायच ना?'

निरस (वि.) कमी प्रतीचा. 'पोरी पाह्यसान त्यात सरस **निरस** तं रायतीनच.'

निरसं (वि.) पाणी न घातलेले. 'ज्याच्यात्याच्या दारी म्हैसी हायत तरमा **निरसं** दूध तं कोनीच देत नाई.'

निरसनं (क्रि.) नाहीसे करणे. 'बापूः राउळी माझे दुख **नीरसीलेः**' -गोवि.४४.

निरा(न्हा) (वि.) निवळ. 'आइः कैसा बाइ **नीन्हा** तापसः आंगिची लोव पाहाळी गेलीः' -ली.२३. 'पाय त्यानं दूद कसं देल्लं. **निरा** पानीच होय जसं.'

निराधार (वि.) १. निराश्रित. 'एकटाच रायला बुडा मांगंपुढे कोनी नसल्यानं **निराधार** आये.' २. अवास्तव. '**निराधार** गोठी करण्यात काय मतलब आये?'

निरानाम (वि.) निव्वळ, अजिबात. 'तयात तं **निरानाम** पानी नाई.'

निराहार (वि.) काहीही न जेवता. 'आजीनं एकवीस **निराहार** गुरूवार करायचं कबूल केलं.' -गय.

निरी (स्त्री.) धोतर, लुगड्याची चिणी, घडी. 'बाइसी वस्त्र आणिलेः गोसावी वस्त्र उकलौनि **नीरीया** केलीयाः' -ली.१६७. 'धनीण धोतर घेऊन आली. **निऱ्या** घातल्या. खांडावर ठेवलं.' -डेबू.३१. (का.निरिसु)

निरुपनानं (क्रि.) आरामशीर हळूहळू. 'कोन्तबी काम **निरुपनानं** केलं पायजे, धावनं काई कामाचं नाई.'

निरुपाय (पु.) उपाय नसलेला. 'काळीमोळ केला आखर शेवटी **निरुपाय** झाल्ता, राजा.'

निरूप (पु.) निरोप, संदेश. 'आपलं जमत नाई असा **निरूप** धाळा. तुमची नामनाबी व्हनार नाई.' -सित.१५६.

निरेटिरे (न.) भागवणे, निस्तारणे. 'घरातल्या घरातच ती तिचं सारं **निरेटिरे** करायची.' -आ.२४.

निरेपिरे (न.) आवरासावर. 'तिनं जे कवाळ लावून घेतलं ते सारी **निरेपिरे** होयेलोक.' -लेक.७७.

निरोप (पु.) संदेश. 'आंब्याच्या रसाले येजो, असा लेकीले **निरोप** देजा माया.' (का.निरूप)

निर्गुडी(ळ) (स्त्री.) वृक्ष विशेष. 'ओले हिरवे बास आडवे टाकून **निर्गुडीच्या** पाल्यानं खड्डा झाकला.' -झेल.४९. (का.निर्गुंडी)

निर्घोर (वि.) काळजी, चिंता विरहित. 'सुमीचं लगन झालं अन् तुकाराम **निर्घोर** झाला.'

निर्जला (वि.) पाण्याशिवाय. 'आज तं किनाई मले **निर्जला** एकादसी हाय.'

निर्मळ (वि.) स्वच्छ. 'म्हणौनि तया **निर्मळा**। सुखज्ञानी सरळा।' -ज्ञा.१४.२६१. 'सर्वांगी **निर्मळ**। चित्त जैसे गंगाजळ॥' -तुका.६२.२. '**निर्मळ** चांगुना, कुत्रं हुंगे ना.'

निन्हा (अ.) निव्वळ, अगदी. 'द्वारकेची रचना देखौनि **नीन्हा** हरुबत भीमकुरावोः' -धऊ.५५. 'बुवा **निन्हाच** लोळण घेते का काय? आताच तर लडलड करा लागला.' -सेल.१२४. '**निन्हा** अंधार भरली बसे पखाल रिचोत/ काया म्हसीवानी रात नीत आमच्या दारात.' काया.२८.

निन्हानाम (वि.) निव्वळ. 'सुतक पळेल डोये **निन्हानाम** तरसले/ अंदरेच्या अंदरे भलकसे बरसले.' -काया.४. 'पोरीचं लगन झाल्यावर सखाराम **निन्हानाम** येखला रायला व्हता.' -सित.४३.

निलकी (स्त्री) (क्रिवि.) वेगळी. 'ते पाटाची रांड या दाट्ट्यात आनसान तं **निलखी** राईन मी.' -सित.६५.

निलगिरी (स्त्री.) वृक्ष औषध. 'डोक्सं दुखे तं जराक्सी **निलगिरी** चोपळली कपायाले.'

निलाजरा (वि.) लाज नसलेला. 'जनाचारामध्यें उडाला पोतेरा। जालों **निलाजिरा** ह्मणऊनि॥' -तुका.३६१४. 'आशाबद्ध बहु असे **निलाजिरें**। -तुका.३५५०. 'बाई दिसली का पायेतच रायते **निलाजऱ्यावानाचा**.'

निलाम (न.) हर्रास. 'जगन्नाथ पाटलानं आपल्याला जोड्यानं मारलं. आपली व्होती नव्हती इज्जत त्या दिवशी **निलाम** झाली.' -वा.१०५.

निवटनं (क्रि.) पैदा, उत्पन्न होणे. 'लेकरू तलतलीत **निवटलं** पायजे या गोठीवर त्याचा भर व्हता.' -सित.७५. 'पोर्गाबी देखना गोरागोरापान पत्नीच्या मुखोट्यावर **निवटला** व्हता.' -सित.६८.

निवत (क्रिवि.) थंड करून. 'तू जरा **निवतनिवत** खाय उतावळाबावळा व्हऊन नाहक तोंड जाळून घेशील.' -पाटी.

निवतन (न.) आमंत्रण. 'जेवाची वाटच पाहून रायलो. कई **निवतन** येते वाळ्यातून रामजाने.' 'आवतन पुऱ्या गावाले, निवद देवाले.'

निवते (न.) निमंत्रण. 'खेळ्यापाळ्यातले लोकं या सवळ्याले **निवते** दिऊन बलावले होते.' -सित.४३.

निवद (पु.) नैवद्य. 'देवतेसि **नीवदु** दाविलाः' -ली.२२२. '**नैवेद्यासी** म्हणें करावें पक्वान्न। पात्रासी दिव्यान्न परवडी॥' -तुका.७८४.५. 'पित्रं आलं नाही म्हणलं तरी **निवद** तर दाखवाच लागन.' -रा.३१.

निवनं (क्रि.) थंड, गार, शांत, तृप्त होणे. 'बाइला खीरि नीवो घातली होतिः **नीवो** घालीता पोळलीः' -ली.१३. 'बाइः चंद्राचा रश्मीकरुनि सीळापाषाण **नीवतिः** परि द्रवति नाः' -ली.२१७. 'आळंदा दुध **नीववीते** असेतिः ते दुध सुनासि गाडुगे वरि वाढीतिः' -गोवि.३८. 'चंद्राचा रश्मी करूनि सीळापाषाण **नीवतिः**' -दृ.९. 'आंता तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळु **निवेल**।' -ज्ञा.२.७९. 'कां जी तुह्मीं ऐसे न व्हा कृपावंत। **निवे** माझें चित्त ठायिंच्या ठायीं॥ 'तुका.३६८५.

निवली (क्रि.रूप.) शांत होणे, थंड होणे. 'पिकपाणी आल्यानं जमीन **निवली** होती.' -सि.१०.

निवळ (स्त्री.) निवड. 'मान्सं **निवळाताना** लय इच्यारआचार करा लागते.'

निवळनं (क्रि.) निवडणे. '**निवडावे** खडे। तरी दहण वोजें घडे॥' -तुका.२१२६.१.

निवा (पु.) ठिणगी, विस्तव. 'उकंड्यावर फेकेल राखडीत एकांदा बारीक **निवा** आसन. हवेच्यानं तो फुलला आन् उकंडा चेतला.' -दि.६६.

निवाई (स्त्री.) काडीला रूई गुंडाळून केलेला कुंचला. 'गेरूच्या वाटीत **निवाई** बुळोली अन् भितीवर पिठोरा काहाळला.'

निवाडा(ळा) (पु.) न्याय. 'तुमी काहाले आमचा **निवाळा** करता? तुमचीच तं खरखटी हाय?'

निवांत (वि.) शांत. 'घरात गेलं तं कटकट त्यापेक्शा बसा मंदिरात **निवांत**.'

निवारनं (क्रि.) दूर करणे. 'तेणें त्रिविध ताप **निवारले**।' -नाथ.. 'धन्य तुवां केले जन्मोनि सार्थक। शोक मोह दुःख **निवारिलें**।' -नाथ.

निशा (स्त्री.) नशा. 'एकदा मानसाले **निशा** चल्ली का मंग थे पनपनूच देत नाही.' -जटा.४२.

निशाणा (पु.) नेम. '**निशाणावर** वाकसाला धार काढीत बसलेल्या सुपाची नजर त्यावर पडली.' -सेल.३५.

निशान (पु.) १. चिन्ह, खूण. 'वावराचं **निशान** म्हून गोटा धुऱ्या वर ठुला.' २. डाग. 'माराचं **निशान** आजूक हाय हातावर' (फा.निशान)

निशान (न.) नेम. 'बेंग्यातल्या पकान्या गोईवर बराबर **निशान** लावलं.'

निशानी (स्त्री.) १. खूण. 'ज्या राजनात गरम तेल टाकाचं त्यावर **निशानी** केली होती.' २. पताका. 'घोड्यापुढे कामदार **निशाने**, डोलच्या बाग धरून चालले होते.' -भं.७३. ३. कुऱ्हाड, विळ्याला धार लावण्यासाठी ज्यावर घासतात तो दगड. 'त्याच्या हाती कुऱ्हाड, **निशान्यावर** घासून धार लावलेली.' -अंधा. ३. शिडी. 'टिनावर चळ्याले **निशानी** आन् घरातून.'

निसकाळ (पु.) तडजोड, बुद्धी चालवणे. 'लोकाइचे भांडनं मिटोतो पन माह्या घरातच मले **निसकाळ** नाई पाडता येत.' -भं.१७.

निसटनं (क्रि.) सुटणे. 'हातचं गोरं **निसटून** पयालं मोकाट.'

निसटली (क्रि.रूप.) सुटली. 'पोरीची जात एकदा हातातून **निसटली** की दुम्हाऱ्या हातात सापडत नाही.' -रा.५१.

निसटस (न.) निवडण्या, निसण्याची क्रिया. 'मीठ-मिरच्याईची **निसटस** कऱ्याच्या कामी लागा बायाईहो तुमी.' -सित.११४.

निसटीस (न.) निवडणे वगैरे. 'लगनाचं **निसटीस** येटायातल्या बाया घेऊन केलं.'

निसतं (वि.) निवळ. 'पान नोतं तं **निसतं** सुपारीचं खांड तोंडात टाकलं आजीनं.'

निसंतान (न.) १. निर्वंश, वंशक्षय. 'लेकरू ना बाकरू **निसंतानाले** काय मयादया अस्ते?' २. बेचिराख. 'चांगल्या वस्तूचा **निसनतान** करते लेकाचं पोट्टं.'

निसंतान्या (वि.) नाश करणारा. 'तुका म्हणे अरे धन्या। **निसंतान्या** विठोबा॥' -तुका.३९६४.

निसतूक (वि.) निवळ. 'सखा मामा असूनबी मायसोबत तं होट नाई उलवत **निसतूक**.'

निसनं (क्रि.) निवडणे. 'आणीकी वेळे चोखट **नीसीती** जीः' -गोवि.१४८. 'पहिलं सूप पाखडून ते तिनं **निसलं**.' -झि.२२.

निसपूस (स्त्री.) निसणे, पुसणे, स्वच्छ करणे. 'धान्याची **निसपूस** करायला शेतात काम करणाऱ्या राबतिनी

असायच्या.' -जटा.११.

निसवनं (क्रि.) १. कणीस पानातून बाहेर पडणे. 'कडब्याच्या वावरातील कणसं **निसवलेले** धांडे तासानं शिस्तीत उभे होते.' -काळी.१९. २. निपजणे. 'कित्येकपिढ्या जमिनीला उसवून **निसवत** राहिल्या.' -अंधा. ३. वाया गेलेला. 'उसवल्याले दोरा भरावं, **निसवल्याले** काय करावं?'

निसवला (वि.) लाजशरम नसलेला. 'नारायन म्हतारा झाला तरमा अजूनबी **निसवलाच** हाय लेकाचा.'

निसारी (वि.) सुस्त, झोपाळू. 'बिचारी अशी **निसारी** हाय का नाव नोका घेऊ. मले तिले रोजच आवाज द्या लागते.' -लेक.८०. 'आन् आपून **निसारे** आग लागली, चटके बसाले लागले का चेव येते आपल्याले. मंग जातो अळ खांद्याले.' -लेक.६८.

निस्टूक (वि.) जराही, पूर्णतः. 'शाईतले पोरं अन् वायतीचे ढोरं यात **निस्टूक** फरक नाई असं आबाले वाटे.' -सित.१२३. 'खोलीतलं सबन **निस्टूक** सरलं होतं.' -सित.१५.

निस्तं (वि.) निवळ. 'जीवान्सी मान्याचं रायलं **निस्तं** ऽऽ दमकोंडी केला यान माहाजीव' -सित.१२७.

निस्त(स्ता)ईनं (क्रिवि.) १. विचारपूर्वक. 'सोयरिकीचं काम हाय बाबू, तेबी लेकीच्या लय **निस्तईन** कर.' २. आरामाने, सावकाश. 'अवं बोंबलू नोको **निस्ताईन** बोल. भितींलेबी कान असतात.' -सित.३०.

निस्तरनं (क्रि.) चूक सुधारणे, पार पडणे, सावरणे. 'तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण **निस्तरे**॥' -ज्ञा.१४.३२१. 'आपणच बेंगवलं आपणच **निस्तरा**.' -मिर्झा.१६३. 'बरंच झालं गेल्तो. भांडन **निस्तराता** आलं दोघायचं.'

निस्ता (अ.) नुसते, केवळ. 'गनपतीची भक्ती कमी अन् **निस्ता** शक्ती प्रदर्शन जास्त.' -धुम्म.

निस्तारनं (क्रि.) पूर्ण करणे, आटोपणे. 'तिकळचं काम **निस्तारूनच** इकळे आलो मी.'

निहारनं (क्रि.) न्याहाळणे. 'तो सडकेला निराश नजरेने **निहारू** लागला.' -ए.१४.

निहारलं (क्रि.रूप.) न्याहाळले. 'केसाचा बुचडा, तिने स्वतःला आरशात **निहारलं**.' -पोळा.६९.

निहाल (पु.) आदिवासी जमात. 'सातपुळ्यात गोंड, कोरकू व **निहाल** आदिवासी लोक रायतात.'

निंगून (क्रि.) निघून. 'घरातून **निंगून** गेला रागंरागं.'

निंघाली (क्रि.रूप.) निघाली. 'जत्रेच्या दिवशी सकाऊनच देवाची पालखी **निंघाली**.'

निंघे (क्रि.रूप.) निघे, निघतो. 'दिवस **निंघेनिंघे** पोहोचतोच मी लगोलग.'

निंदन (न.) तण काढण्याचे कार्य. 'आज डवरे मारले. दोनतीन दिवसानं तन पालथं पळूं का **निंदन** लावतो.'

निंदनं (क्रि.) तन काढणे. 'तन झाल्यानं वावर **निंदनं** पळते.'

निंदा (स्त्री.) दोषवर्णन, निर्भर्त्सना. 'गुंफीबाईले सुनीच्या **निंदा** कऱ्याले सांगावं फक्त.'

निंदानालस्ती (स्त्री.) नाव ठेवणे, बदनामी करणे. '**निंदानालस्ती** निंदील हें जन सुखें निंदू द्यावें।' -नाथ.१८७८.

निंदी (स्त्री.) १. नाद, फेर. 'असक्याचं काम या बारीनं भलकसं **निंदीवर** येल आये.' २. गती. 'अस्सा फासू भवऱ्याले **निंदी** जानारच नाही.' -काया.१०.

निंब (पु.) वृक्ष विशेष. '**निंब** दिला रोग तुटाया अंतरी। पोभाळितां वरि आत चरे॥' -तुका.१३१.२.

निंबनी (स्त्री.) लिंबाचे झाड. 'आंगणातल्या **निंबणीची** पिवळीपिवळी लिंबं तोडून आणली.' -कावू.

निंबर (वि.) कडक, घट्ट. 'बटिकाः कोवळे इंद्रवण असेः ते तोडिजे तऱ्ही तुटेः तेचि देटी **नीबर** जालेया तोडीजे तऱ्ही न तुटेः' -ली.३७२. 'एकु दीसी कणिक मोवारेनाः तीया पोळया **नीबरा** कठीना जालीयाः' -गोवि.१४७. 'जयाचा रश्मिपुंजु **निबरु**। होतां स्वरूप-उखरीं स्थिरु।' -ज्ञा.१६.९. 'संपत्या पोरगी निऱ्हा दोन लेकराची माय दिसते लगन कर बापा मंग **निंबर** झाल्यावर आखीन भारी जाईन.' -लेक.३७.

निंबलोन (न.) लिंब इत्यादीने दृष्ट काढणे. 'करूं **भोगमोक्षनिंबलोण**। पायां तयां॥' -ज्ञा.१५.८. 'आपुलें ऐसें ह्मणावें। करितो जीवें **निंबलोण**।' -तुका.६४३.१. 'लेकुरवाई झाली नाही गेलं पोरपन/ माय करते **निंबलोन**.' -लोक.१९०.

निंबाळी (स्त्री.) कडू निंबाची गर्द राई. 'उन्हाचे ढोरंवासरं **निंबाळीत** जाऊन बसतात मस्तवाल.'

निंबू (न.) निंबाचे झाड. 'सर्वज्ञे म्हणीतलेः 'जाणा पागाः हा **नींबु** कडू की गोडू? ना जी कडूः' -ली.३१२.

निंबोई स्त्री. निंबोळी. 'कां **निंबोळियेचें** पिक। वरि गोड आंत विख। तैसें तें राजस देख। क्रियाफळ॥' -ज्ञा.१४.२६३.

निंब्या (पु.) एक नाव. 'मायने आवाज दिला- **निंब्या**, गुई कुटी ठुयला रे?' -फीर.८७.

नीच (वि.) खालचा, हलकट, दुष्ट. '**नीच** मान्साले काहाची इज्जत अन् बिज्जत.' (फा.न्युचु)

नीट (वि.) १. चांगले. 'दोघं झनं राहू, **नीट** दाय खाऊ.' २. घट्ट. ३. सरळ, थेट, योग्य. (का.नेट्टगे)

नीत (अ.) सतत, नेहमी. 'काय म्हसीवानी रात **नीत** आमच्या दारात.' -काया.२८. 'सकाऊन हो येलोग ते अशीच बोम्बले. तिचा तो **नीत** नेमच झालता.' -अक.६१.

नीम (पु.) कडूनिंबाचे झाड, निंब. '**नीम** तोळून त्याच्या लाकळाच्या दरवाजाले चौकटा बसवल्या.'

नीम (वि.) अर्धा, निम्मा. 'जानकाराकून इलाज करावं **निमहकीमाकून** नाई.' (फा.नीम)

नीर (पु.) घडी, मेळ. 'माया भावाले अठी बलाहुनसन्या हा **नीर** बसोल्याबिगर रायनार नाई मी.' -सित.६५.

नीलगाय (स्त्री.) काळवीट. 'बंदीतल्या **नीलगायी** वावरात चराले येत होत्या. ' (फा.नीलगाव)

नीळ (स्त्री.) निळ्या रंगाची भुक्टी, पावड. 'पयजामा, कुरतं **नीळ** लावून धुतलं.' (फा.नील)

नुकता (अ.) इतक्यात, आताच. '**नुकताच** तुमच्या घरी आलो अन् च्या केला वैनीनं.'

नुकसा (पु.) गोष्ट. 'येक **नुकसा** सांगतो आपल्या गावातल्या लफळ्याचा.'

नुकसान (न.) हानी, तोटा. 'गारपीट झाल्यानं कास्तकाराईचं लय **नुकसान** झालं.' (फा.अर.)

नुक्ती (स्त्री.) बुंदी. 'पंगतीत गोळ म्हून **नुक्तीच** केली.'

नुनी (स्त्री.) लहान मुलाचे शिश्न, इंद्रिय. 'चेड्डी फाटकी काहून घातली **नुनी** दिसून रायली ना लेका, पिंट्ट्या.' (का.तुंणि,त.नुनि)

नुपर (स्त्री.) तूट, टंचाई. 'हगामात कामाले काय **नुपर** आये वो?' -धग.२६.

नुपरसुपर (वि.) कमीजास्त. 'लग्नात काई **नुपरसुपर** झाली तं मी आओच ना मंग.'

नुस्तं (वि.) निव्वळ. 'तुनं **नुसतं** डवरं दाबून धरत चाल्याच.' -फीर.१८०. 'भाकरं सरली तं **नुस्तं** मटनच खाल्लं बेवळ्यानं.'

नूर (पु.) चेहऱ्यावरील तेज, कांती. 'कोनाच्या बी तोंडावर **नूर** दिसत नोता.' -सित.१६. (फा.अर.)

नेक (वि.) १. प्रामाणिक. 'आता पुंडलीक पाटील तसा **नेक** मानूस! आपलं घर बरं, आन् आपलं दार बरं.' -अक.८. २. '**नेक** कामाले उशीर काहाले पायेजे?' -सित.१४६. (फा.)

नेकानेकी (स्त्री.) सरळपणा, सत्य, खरे, सद्वर्तन. 'येव्हार **नेकानेकीचाच** केला पायजे.' (फा.)

नेकी (स्त्री.) चांगुलपणा, भलाई. '**नेकी** कर कुयेमे डाल.' (फा.)

नेखानेम (पु.) नियमित, नेम. 'माचा मोठ्या **नेखानेमाचा** असल्यानं एका सालासाठी पान सोळलं त्यानं.' -मोती.

नेजा (क्रि.रूप.) न्यावे. 'वावरात जासानं तं बईलई **नेजा** चाऱ्याले.'

नेजा (पु.) भाला. 'देवराच्या बंडीत कुदई फावडे अन् हाती **नेजाही** होता त्याच्या.' -एक.

नेट (पु.) १. आधार. 'कुणबिकीचं ओझं मोठ्या **नेटानं** पेलतो.' -झाहा.१३. २. कठीण जाणे, कष्ट. 'सुन्या दिसाचे डोंगर माय **नेटानं** चढली.' -गाक.३८. ३. जोर. 'मोठा **नेट** लावून हे काम झालं.' (का.नेट्टगे)

नेटं(टी) (अ.) जवळ, लागून. 'आपलं उपाशी पोट पाठीच्या **नेटं** उभं करत/ ढेरपोट्याईले पोसत असतात.' -काया.३८. 'झिंगऱ्याच्या आंगावर वाकय घालून सखू खांबाच्या **नेटं** बसली.' -डेबू.३०. 'घराबाहेर काळलं, **भीतीनेटं** बसवलं.' -लोक.४०.

नेटका (वि.) सुरेख, बांधेसूद. 'वयनीचा बांधा आय तसाच संसारई **निटनेटका** आय.' (का.नेट्टी)

नेटका (अ.) आताच, लगेच. 'कामावर जावाव म्हनून न्यायरी करून तो **नेटकाच** उठला.' -सित.१५.

नेटनं (क्रि.) पार पाडणे. 'मी कामे रोजच्यारोज **नेटून** नेतो.' -कात.३०७.

नेटपाट (क्रिवि.) हट्ट, आग्रह. 'इतका **नेटपाट** करून जायचं असंल तर खुशाल जा. मंग काही कमीजास्त झालं तं मले काही सांगू नका.' -वा.९१.

नेटा (पु.) १. आधार, टेकू. 'आभाळच पड्याले लागलं ते हाताच्या **नेटानं** थांबणार हाय का?' -अंधा.२२. 'कलत्या भीतीले ठुनीचा **नेटा** द्या लागते.'

नेटापाटानं (क्रिवि.) कष्टाने, व्यवस्थितपणे. 'तिच्या ताणंताणं सुरेखा मोठ्या **नेटापाटानं** पाथ घेत होती.' -शि.५०.

नेटून (क्रिवि.) खेटून, लागून. 'देवळाच्या **नेटूनच** आपलं घर आये.'

नेटोपाट (क्रिवि.) नचुकता, तयारीने. 'या मंग कालपासून **नेटोपाट** असं बाप्पूनं जगदेवले जतावलं.' -सित.१५.

नेत (क्रि.रूप.) घेऊन जात. 'समदं गाव माया इरीहून पानी **नेत** जाय.'

नेत (स्त्री.) नियत. 'मान्साले पैसा भेटला की हाव सुट्टे त्यानं त्याची **नेत** बिघडते.' -सुखो.३४.

नेपाळनं (क्रि.) वरपांगी गोड बोलणे. 'तुह्या वरपांगी **नेपाळण्यावर** भाळून मी दोस्त मानलं.' -झा.७८.

नेपाळून (क्रि.रूप.) गोड बोलणे. 'आजीचे **नेपाळून** बोलणे ऐकण्यासाठी ती मुद्दाम विषय काढायची.' -शि.५४.

नेभळट (वि.) ढिला, अव्यवस्थित, भ्याड. '**नेभळट** मानूस जागलच्या कामाचा नस्ते.'

नेम (पु.) नियम. 'मग तेणें **नेमुं** घेतला जें आधीं राउळासि अरोगणा देईन मग जेवींन ऐसा तयाचा **नेमु** देहपरीयंत सीधी गेलाः' -गोवि.७७. 'गन्या बराबर **नेम** धरते अन् गोटा माळून कऊठ पाळते.'

नेमका (क्रिवि.) १. पाहिजे तेवढा, नुकताच. 'हे खालीवर आले तेव्हा दिगू **नेमकाच** जेवायला बसला होता.' -गय.१९. २. निवडलेले. 'लगनाच्या पतरीका **नेमक्याच** सोयरेईले दिल्ल्या.'

नेमधरम (पु.) व्रत, नियम. 'सांगतो ते **नेमधरम** तू सव्वा मयना कर की झालं.' -गा.५२

नेमनं (क्रि.) नियुक्ती करणे. 'बाबूची मास्तर म्हनून **नेमनूक** होयेल आय.' (का.नेमिसु)

नेमानं (क्रिवि.) नियमित. 'बॉ तं **नेमानं** हरिपाठात येत जाय. देवधर्मी होता ना?'

नेमानेखाच (वि.) प्रमाणिकपणे. 'रोचं हे काम ठयरून गेलं होतं. त्यात हाका नोता का धोका नोता, **नेमानेकाचं** काम होतं.' -लेक.२८.

नेमेल (वि.) ठरलेले. 'जास्तीचं काहाले करावं **नेमेल** तेवढं काम करावं.'

नेया (क्रि.) न्यावे. 'सुमन दारची मैस चारायले **नेया** लागते मनाव.' -पख.४५.

नेरवा (अ.) तेरवाच्या आंधी, नंतरचा दिवस. 'परवा-तेरवा नाई पावने **नेरवा** येनार हैत.' (का.)

नेवता (पु.) आमंत्रण. 'तुमाले **नेवता** हाय. शामराव पाटालाच्या घरी जेवाले येजा उद्या संध्याकाई, महालक्शीम्याईचं.' (हिं.)

नेवनेटके (वि.) व्यवस्थित, नीट. 'घरादाराचं **नेवनेटकं** काम पायजे तवा लक्शमी नांदते घरात.'

नेवार (स्त्री.) चापट दोरी. 'पितळी पलंग **नेवार** रेशमाची/ शोभा रंगमहालाची.' -लोक.४८.

नेवाव (क्रि.रूप.) न्यावे. 'पखाल पुन्हा भरावी लागंल? मंग? रिकामीच **नेवाव** का काय?' -पख.४६.

नेश्याले (क्रि.रूप.) नेसायला. 'सदा उघडेनागडे मजुराईचे लेकरं / **नेश्याले** पालू कई नाई भेटे आंगभर.' -चंच.

नेस (क्रि.रूप.) परिधान करावे. 'लुगळ्यात पोरगी बाईमाणूस दिसते म्हणून लगना ठावरक परकरच **नेस** म्हंते माय.' -सि.३६.

नेसनं (क्रि.) परिधान करणे. 'पीतांबरु देवो **नेसले** सोनसळाः' -धउ.१९.

नेसवलं (क्रि.रूप.) परिधान करायला लावले. 'शांतीकाच्या दिवशी काकीनं तिला हिरवं लुगडं **नेसवलं**.' -मोती.३८.

नेसोनं (क्रि.) नेसवणे. 'दिवस भरत आले तं पोरीले लुगळं **नेसोनं** आय आज.'

नेस्तनाबूत (न.) नायनाट, नाट, नामशेष. 'येवळा जमिनजुमला असेल असामी बाईच्या नांदात **नेसतनाबूत** झाला लेकाचा.' (फा.नीस्त)

नैतुरनी (वि.) नवतरुणी, जवान. 'पमी पंचीसक वर्साची **नैतुरनीच** व्हती.' -सित.६२.

नैलं (न.) विझलेल्या बिडीचे अर्धवट थुटुकं. 'नाई बिडी तं उष्टाळेल **नैल्यावरच** आमी भागवून घेवो.' -अंधा.

नोक (न.) टोक, अग्र. 'बाबा माया पेन्सीलचं **नोक** तुटलं. काहाळून द्या.' (फा.)

नोकझोक (न.) १. थाटमाट, डौल. 'मामाच्या पंगतीत भास्याचा **नोकझोक** गळ्यात कंठी गोफ.' -लोक.५७. २. भांडणतंटा. 'मामभास्यात कालपर्वा चांगलीच **नोकझोक** झाली म्हंतात. (हिं.)

नोको (क्रि.) नको. 'मायबाई, इरीत लवून पाहेत जावू **नोको**. कितीखेप सांगू तुले.'

नोतं (क्रि.) नव्हते. 'या मेरीऊन त्या मेरीलोक म्या काय काय **नोतं** पेरलं.' -काया. 'दुपार झाली तरी आला **नोता** जेवून.' -मिए.१३६.

नोती (क्रि.) नव्हती. 'मावसीले तोंड दाखोयाले उजागरी राह्यली **नोती**.' -काळी.८८.

नौकर (पु.) सेवक, चाकर, दास. 'थैल्या उचलाले मी कोनाचा **नौकर** नाई का सालदार नाई.' (तु.फा.)

नौबत (स्त्री.) १. अडचण, संकट. 'पख तुटल्या पाखरा नाही कोनाची सोबत/ घेता उलीसा उजीळ कशी येत असे **नौबत'** -नोका. 'तं आमाले एकुलता एक हाय आमची सगळी नौबत तुयावरच हाय.' -फीर.८३. २. पाळी, प्रसंग, नगारा. '**नौबत** झडते पलटण लढते.' (अर.फा.)

न्या (क्रि.रूप.) न्यावे. 'तुमी भाईर पारापुळे जासान तं लेकराले **न्या** काखीत.'

न्यायइंसाब (पु.) न्याय. 'आजकाल जो तो आपलीच टापरते. कोनाजोळ काई **न्यायइंसाब** रायलाच नाही.'

न्यायरी (स्त्री.) सकाळचे अल्प जेवण. 'लोकू दूरिन पावलाः माणुसांची **नीहारि** जालीः गोरुवे गावाकडे नीगालीः' -ली.२७.

न्यारं (वि.) वेगळा, निराळा. 'येवेय कानी गावात वारं **न्यारच** वाहून राहलं.' -काया.१७६. 'आधीच आपत्तीने कोलमडलो, जर्जर झालो. त्या हा **न्याराच** मनस्ताप.' -फीर.१६९.

न्यारंन्यारं (क्रिवि.) वेगवेगळे. 'रोजच्या भांडनापेक्शा मायं येकडावचं **न्यारंन्यारं** करा.'

न्यारा (वि.) वेगळा. 'मोठा गळी तं **न्यारा** रायते. मांगल्यासालीच हिसेवाटनी झाली.'

न्याव (पु.) न्याय, शासन. 'तैसीचि महाजनांपासि **न्यावो** सांघावेया नीगालीः' -गोवि.८.

न्याहळनं (क्रि.) पाहणे. 'जंव मी नावेक। हे सकळ वी सैनिक। **न्याहाळीन** अशेख। झुंजते जे॥' -ज्ञा.१.१७०. 'इकडे तिकडे अशी **न्याहळत** लाजत मुरडत येऊ नको' -अ.१०.

न्याहाल (वि.) १. मानपान मिळविलेला, श्रीमंत झालेला. २. एक आदिवासी जात. 'सातपुड्यात गोंड कोरकू अन् काई घरं **न्याहाल** हायत.' (फा.निहाल)

न्याहाळनं (क्रि.) बारकाईने निरीक्षण करणे, बघणे. 'अगा दैत्यांचिया कुळीं। प्रल्हादु तो मी **न्याहाळी**।' -ज्ञा.१०.२४७. 'ना तरी आपण जळीं। बिंबलो तीरोनी **न्याहाळी**।' -ज्ञा.१४.२८९. 'होतासी अंतरें झाकिलिया डोळीं। तो मी हा **न्याहाळीं** धरुनी दृष्टी॥' -तुका.३४८७.२. 'लेकराकडं पाहाची. त्याह्यच्या तोंडाचा **न्याहाळ** धरायची.' -रा.१००.

न्योता (पु.) आमंत्रण. 'वाळ्यातला **न्योता** आनला बाबा म्हाल्यानं.'

न्हातल्याधुतल्या (स्त्री.अने.) आंघोळ केलेल्या. 'देई साजऱ्या **न्हातल्याधुतल्या** पुसल्यापासल्या.' -डेबू.३.

न्हाती (क्रि.रूप.) स्नान करतात. 'दोही कोपरिचेनि पाणीए भगतिजन **न्हातिः**' -गोवि.४८०.

न्हातीधुती (वि.) वयात आलेली. 'सरीवर सरी येती/ माती **न्हाती धुती** होते.' -काया. 'पद्मी दिसती **न्हातीधुती**. तिला तीन वर्षे ताटकळत ठेवणे जोखमीचेच होते.' -ऊन.२८१.

न्हान (न.) सचैल अभ्यंग स्नान. 'तव तेया ठाकुराची राणी **न्हाली** होतीः न्हाउनि चौरंगावरि बैसोनि केस वाळवीत होतीः' -ली.५६. 'एकि बाइल एकलि एकटीकः ते **न्हावो** बैसेः ते म्हणेः राउळ येते तरि माझी पाठ घासतेः' -गोवि.१२९.

न्हानावं (क्रि.रूप.) आंघोळ घालावी. 'लेकि उटावी म्हणेः **न्हाणावी** म्हणेः चीरचोळी घेयावी म्हणे.' -गोवि.१५६.

न्हानी (स्त्री.) स्नानघर. 'दिवस निंघेनिंघे वैनी **न्हानीत** कशा काय घुसता बॉ तुमी?'

न्हानोरा (पु.) वधूवरांसाठी चौरंग मांडून चहू बाजूना कळशाच्या उतरंडी ठेवून त्यांना सुताचे पदर वेढतात. वधूला चौरंगावर बसवून भोवती पाचसात तांबे-मडके दोऱ्याने सूतवून त्यात हळदकिक्स्याचे पाणी घालतात. त्याने आंघोळ केल्याने कांती सतेज होते, ही धारणा. 'स्त्रियांनी हावशीने **न्हानोरा** मांडून न्हानले.' -कात.३६८.

न्हाली (क्रि.रूप.) आंघोळ केली. 'गोसावीयांची राणी पुफवंती जाली होतीः तीये ते दीसीचि **न्हालीः**' -ली.१.

न्हाले (क्रि.रूप.) स्नान घातले. 'करुनी मर्दन सारिले पाणी। **न्हाले** देव अंग पुसे भवानी।' -तुका.४९७.

प

पऊळ (न.) छोटी भिंत. 'तो दगडं हाती घेतो. आपण दगडाची **पऊळ** घालतो.'

पकनं (क्रि.) पक्व होणे. 'झाळावरचठ्ठ फळाचं **पकनं** चालू होतं.'

पकपक (स्त्री.) भीती वाटण्याची स्थिती, एक आवाज. 'भूताचं नाव काहाळलं का आपली **पकपक** होते.'

पकली (क्रि.रूप.) पक्व झाली. 'मले कयेना कोनती सेंग अधीक **पकली**.' -काया.१६.

पक(ख)वाज (पु.) मृदंग. 'मंदीरात टाळ अन् **पकवाज** घेऊन हरिपाठ सुरू झालता.'

पकवान (पु.) पदार्थ. 'दिवाईत माई माय कानोले, अनारसे, कुरळ्या असे लय **पकवानं** करते.'

पकानी (वि.) मोठी. 'मग्गुला जोळची कांचाळी गोई माऱ्याले येक **पकानी** गोई पायजत होती लेका.'

पकेल (वि.) पक्व झालेला. '**पकेल** आंबे या डाल्यात टाक, अधरकच्चे तिकळे ठेव.'

पकोनं (क्रि.) पिकू घालणे. 'जवन घालून आंबे **पकोनं** चालू आयत आपल्या माळीवर.'

पकोयाले (क्रि.रूप.) पिकवायला. 'आंबे गवतात घातले **पकोयाले**.'

पकोयेल (वि.) पिकविलेले. 'हे आंबे कच्चे हात, हे **पकोयेल** हात.'

पक्कं (वि.) मजबूत, अखंड. 'आजोबाच्या हातची जुनी विहीर. तिला त्या काळात **पक्कं** पाणी होतं.' -पख.१४. 'पुढं उभा राय त्याची नाथ धरून **पक्की**.' -सित.१२६.

पक्टंडक (वि.) आंबट, उदास. 'यशोदा **पक्टंडक** तोंड करून उठली.' -झि.७.

पक्शी (अ.) यापेक्षा, ऐवजी. 'मोठं घर हाय तं कोन्तंच सूख नाई. **याच्यापक्शी** धावनं अन् खानं पुरते.' -लेक.१६.

पख (न.) पंख. 'शुकें नळिकेशी गोवियेले पाय। विसरोनि जाय पक्ष दोन्ही॥' -तुका.१३२.२. '**पख** मुळ्ळ्यानं चिळी उळत नाई.'

पखवाळा (पु.) पंधरवाडा. 'मांगलच्या **पखवाळ्यात** पानी

पळूंच नाई.'

पखाल (स्त्री.) पाणी वाहून नेण्याची चामड्याची पिशवी. 'तळाश्रीलरीचे उदके एका वाटलीः **पाखालाची** उदके एका वाटलीः' -ली.३४४. 'मग खुंटीची पाखाल काढीलीः येकी **आंखेयावरि** नीजवीलेः एक आंखे पांगुरवीले.' -गोवि.७. 'काया म्हसीवानी रात नीत आमच्या दारात/ निरा अंधार भरली बसे **पखाल** रिचोत.' -वि.

पखालपार्वती (वि.) आळशी, ऐदी. 'तुमी निरा **पखालपार्वतीवानी** येका जागी बसल्या त वावराची माती येते हाती.' -मे.७५.

पखाल्या (वि.) पखाल वाहणारा. 'सकाऊन **पखाल्याले** देयाले भाकर करून ठुली पाटलीननं.'

पखाळ (न.) पक्ष, बाजू. 'पांडूचं घर गावाच्या त्या **पखाळावर** आये.' 'या पखाळाऊन त्या **पखाळावर** असीच सारी रात गेली माही.'

पगडा (वि.) छाप, प्रभाव. 'गावावर भावरावचा मोठा **पगडा** आये.' (त.पगडु)

पगडे (न.अने.) कोडे. 'खेडवळ **पगडे** व म्हणीचे मंत्र भागाबुढीने सुरू केले.' -भं.३९.

पगयनं (क्रि.) वितळणे. 'आगी जोळ तूप नेल्यावर तं **पगयनंच** हाय त्याले.'

पगयेल (वि.) वितळलेला. '**पगयेल** तूप काहाळ बुटल्यात.'

पगर (पु.) १. सुताराचे छिंद्र पाडण्याचे साधन. २. झाडाला लागलेला स्त्राव. 'तो उभ्याउभ्या हिरव्या झाडाला **पगर** लाऊ शकत होता.' -एक. 'किती वसंत आले गेले लागला **पगर** मजला.' -सित.४९.

पगरनं (क्रि.) आळसावणे. 'तुमी खाऊखाऊ **पगरल्या** घरात.' -भं.३८.

पगला (वि.) वेडा. 'त्याच्याशी काय भांडतं? **पगला** हाय ना थ्यो.'

पगळी (स्त्री.) फेटा. '**पगळीची** इज्जत मान्साच्या डोक्स्यातच असते.'

पगांग (क्रिवि.) जलद, गती. 'दोन माणसायनं जरी वढली त गाडी **पगांग** पुढे पळलं.' -त.६५.

पगार (पु.) वेतन, तनखा. 'पावना तं लय मोठा सायेब हाय म्हनतात अन् **पगारबी** लाखलाख हाय म्हनतात.' (पो.पागा)

पघयनं (क्रि.) वितळणे. 'तयाही तळी **पघळे**। वेल पालवु॥' -ज्ञा.१५.१४५.

पघर (पु.) स्त्राव, झरणे. 'झाळाले कोनं तरमा **पघर** लावल्यानं सोकलं ते.'

पघोयलं (क्रि.रूप.) वितळविले. 'आहारावर बुटलं धरून तूप **पघोयलं**.'

पघोयेल (वि.) वितळवलेले. '**पघोयेल** तूप भरनीत भरून ठुई.'

पचकन (क्रिवि.) थुंकण्याचा गतीचा निदर्शक शब्द. 'पान खाऊन लोकं **पचकन** थुकतात.'

पचकपाला (वि.) हलक्या प्रतीचा. 'लगनात अयरात निऱ्हा **पचकपाला** देतात सोयरे.'

पचकली (वि.) हलक्या वृत्तीची, अतिकृपण. 'च्याच्या कपाले तोंड नाई उलवत **पचकली**.'

पचका (पु.) विचका, विरस, नाश. 'तो झटका तो ठसका डिस्कोत जमा झाला/ अभंगाचा लावणीचा **पचका** होऊन गेला.' 'ऐन पेरणीच्या घाती धट्टाकट्टा धावतापळता बैल गेला. कामाचा **पचका** झाला.' -खुं.५८.

पचकी (स्त्री.) १. एक पाव. '**पचकी** म्हणजे पावशेर ज्वारी दररोज प्रत्येक मुलाने गुरूजींना द्यावी.' -भं.५०. २. मध्येच बोलणारी, कामाचा विचका करणारी. '**पचकीनं** पाय अर्ध वावर सोंगलं अन् अर्ध देलं टाकून.'

पचकेल (वि.) क्षुल्लक वृत्तीचे. 'दोगेबी **पचकेल** हायत आता भांडतात अन् घळीभऱ्यानं बोलतात.'

पचकोळ (वि.) १. हलके, हीन. 'लग्नातच माईत पळ्ळा चुनखावरेपना. मानाचे लुगळे घेतले **पचकोळ** पालू.' -तित.५२. २. अपक्व. 'वखराची दांडी **पचकोळ** असल्यानं कटकन मुळ्ळी.'

पचक्या (वि.) शब्द न पाळणारा, मधेच तोंड मारणारा, काम बिघडून टाकणारा. '**पचक्यानं** उधळं काम घेतलं अन् देलं मंधातच टाकून.'

पचणार (क्रि.रूप.) गिळंकूत, फस्त होणार. 'हंगामावर काही भांडी दागदागिने सुटणार होते. काही **पचणार** होते.' -झेल.६३.

पचनं (क्रि.) पचन होणे. 'उनायात रोडगे, गावरान तूप असलं का काहाचं **पचनं** निऱ्हा जीव पानीपानीच करते.'

पचपच (वि.) पातळ, पदार्थातील पाण्याचे आधिक्य. 'काय बापा, निऱ्हा **पचपच** पानीच देता का दुधात?'

पचर(रू)ट (वि.) मिश्र, पाच जातीचे. 'गाव **पचरट** काय कामाचं. वतनदाराचं पायजे.' 'बोरगाव, बाळापूर हे **पचरट** वस्तीचे गावं हायत बावा.'

पचांगमळा (पु.) कामाचा रगाडा. 'पोळ्या अन् पापडाच्या खुड्याची चटणी दिवसभराच्या **पचांगमळ्यात** खाणंही झाली नव्हती.' -खुं.१६६.

पचोडा (वि.) मध्येमध्ये बोलणारा. '**पचोडा** भादरते अन् काम इचकोते.'

पचोनं (क्रि.) हडप करणे. 'सासऱ्याची येवळी मोठी इस्टेट **पचोली** लेकानं.'

पचोनी (स्त्री.) खाल्लेले पचावे म्हणून देण्यात आलेला द्रव, दवा. 'पोट डंबारलं त **पचोनी** द्या त्याले.'

पचोलं (क्रि.रूप.) फस्त केलेले, पचवलेले. 'व्याजातच वावर **पचोलं** हाय मायं त्यानं.'

पचोयाले (क्रि.रूप.) हडप, फस्त करायला. 'माया सह्या काहाले घेता. माई दोन आन्याची इस्टेट **पचोयाले**?'

पच्ची (स्त्री.) फजिती, पाणउतारा. 'चारचौघात **पच्ची** झाली तं काय रायली मान्साची.'

पचारनं (क्रि.) चव जाणे. 'रेटबोर्ड वाचल्यावर त माह्य जेवनच **पचारलं**.' -मे.१३६.

पछाळनं (क्रि.) चितपट करणे. 'एखाद्यानं खाजवलं का असा **पछाळा** का जलमभर आठोन ठेवीन तो.' -कावू. (हिं.)

पछाळेल (वि.) झपाटलेला. 'भूतागितानं **पछाळेल** आय का नामदेव?'

पछिना (पु.) घाम. 'उनात गेलं का **पछिनाबी** लय येते सायबाले.' (हिं.)

पजाय(या) (पु.) विटांची भट्टी. 'मरमर मरून **पजायावर** काय मजुरी भेट्टे?' 'चवट्ट्यात माया मामाचा इटाईचा **पजाया** होता.'

पजाव (पु.) विटीची भट्टी. '**पजावावर** विटाकौलं करणारे कारागीर असत.' -फीर.१६८. 'मग **पजावाला** बत्ती द्यायच्या दिवशी कुंभारांच्या आनंदाला उधाण आलं.' -फीर.२३.

पजावनं (क्रि.) मार देणे. 'भादरभादर करे तं भल्ला **पजावला** मंग म्या हऱ्याले.'

पजोनं (क्रि.) धार लावणे. 'कुऱ्हाळ बथ्थड झाली, **पजोनं** पळते खात्याजोळ नेऊन.'

पज्यावनं (क्रि.) मारझोड करणे. 'पोटच्या लेकरालेबी टाईमाटाईमानं **पज्यावनं** पळतेच.'

पज्यावलं (क्रि.रूप.) मारले. 'त्यानं तिले फटालफटाल **पज्यावलं** अन् कोंडून ठेवलं.' -मे.३२.

पट (पु.) बैलांची धावण्याची होड. '**पटात** नंबर मारावा म्हनूनसन्या सकाऊन बैलाले आंडे, संध्याकाई अलप असे.'

पट (स्त्री.) १. चितच्या उलट. 'चीत पळ्ळी तं तुया ढाव अन् **पट** पळ्ळी तं माया ढाव. आता फेक रुपया.' २. संख्या अधिक वा विस्तारून सांगण्यासाठी हा शब्द वापरतात. उदा. दुप्पट, चौपट.

पटकन (क्रिवि.) लवकर. 'दुकानातून एक शेटाक च्या आन **पटकन**.'

पटकनं (क्रि.) पाडणे, आदळणे. 'भीमा त मोठमोठ्या पोट्ट्याईले **पटकते** शाईत.' -धग.२४.

पटकनी (स्त्री.) उचलून आदळण्याची क्रिया. 'तो काय पहेलवान थोडाच आये? लुकड्याले येक **पटकनी** द्याले काय लागते?' -पोळा.

पटकपटक (क्रिवि.) खूप प्रयत्न. 'मतं मागासाठी तेईनं केली **पटकपटक**.' -ऊ.१९.

पटका (पु.) फेटा. 'लगनात काय समद्या लोकाईनं **पटके** घातले का?'

पटकावनं (क्रि.) मिळविणे. 'शिक्शनाच्या बाऱ्यात पयला नंबर **पटकावला** लेकीनं.'

पटकी (स्त्री.) एक रोग. 'कितीकई पटकपटक केलं तरमा **पटकी** त आल्यावाचून रायेत नाही.' -भं.१३६.

पटकीन्या (क्रिवि.) लवकर, अविलंब. 'जाय आता पन **पटकीन्या** वापस येजो.'

पटकूपटकू (क्रिवि.) वारंवारं, जीव तोडून. 'ज्यांनी म्हाताऱ्याची सत्तर शेराचा दगळी गोळा सहज उचलण्याची करणी पाहिली नाही त्यांना कितीही **पटकूपटकू** सांगितलं तरी ते पटणार नाही.' -वा.३०.

पटकूर (न.) जुने फाटके कापड, चिंधी. 'हिवायात येखांदं **पटकूरबी** आंगावर देत नाई माई सून.' (का.पटिके)

पटकोनं (क्रि.) मिळविणे, प्राप्त करणे. 'येसोंताच्या टीमीनं तठी पह्यला नंबर **पटकोला** व्हता.' -सित.३३.

पटच्या पट (वि.) लांबच लांब शेत किंवा जमीन. 'अथूनतथून वावराचा हा **पटच्या पट** आपल्यावालाच हाय.'

पटदिशी (क्रिवि.) लवकर, जलद. 'काम **पटदिशी** उरकून टाकावं मान्सानं.'

पटनं (क्रि.) मान्य होणे. 'कोनाले चांगलं सांगलं तं म्हननं **पटनं** नाईच.'

पटपट (क्रिवि.) लवकर-लवकर. 'मान हालो डगडग पाय कापो लटलट/ तरी करा लागते काम त्याले **पटपट**.' -जांग.५९. 'तुटकी स्लिपर हातात घेऊन तो **पटपट** चालू लागला.' -गय.५.

पटरनं (क्रि.) बोलणे, म्हणणे, पठण करणे. 'हयद वाहा, कुकू वाहा सांगत बोवा मंदातच मंतर **पटरत** होता.' -दि.८

पटरपटर करनं - जास्तीचे, आगाऊ, अधिक, सारखे बोलणे. 'दौलत्या हरहम्मेस **पटरपटरच करत** रायते लेकाचा.'

पटरून (क्रि.रूप.) मधेच भकलून. 'पेरन्या उरकल्या,

पान्यानं चाट देल्ली. तेच्यात बावा मंदात **पटरून** आग करे.' -जटा.३३.

पटवारी (पु.) तलाठी. '**पटावाऱ्या** जोळून सातबारा आनला अन् वायदाबी भरला मांगल्या सालचा.'

पटाईत (वि.) निष्णात. 'दोगा भावात भांडन लावाले तं **पटाईत** हाय बाबारावचं घर.' (का.पटायित)

पटाशी(स/सी) (स्त्री.) सुताराजवळचे एक अवजार. 'हे खरबळ्ळं लाकूळ **पटासीनं** चोपळंगीर करा लागते.' 'सुताराजोळ **पटास** नाई तं तो छिलछाल कायनं करीन बावा?' (का.पट्स)

पटापट (क्रिवि.) लवकर लवकर. 'पोरीचं या वयात **पटापट** लगनं उरकून टाकनं बरं पळते.'

पटाल (क्रिवि.) सारखे, जलद, गतीने. 'फटाल पाय फसत बैलाचे तं तिफनीचे बैल **पटाल** बसत.'

पटालकन (अ.) लवकर, त्वरित. 'असा जातो अन् असा **पटालकन** येतोच समजा.'

पटालपटाल (क्रिवि.) लगोलग. 'वानेरं **पटालपटाल** उड्या मारून झाडाईत गुडूप झाले.' -अंधा.

पटाळे (वि.) मोठे. 'अटाळ्या म्हशीचे **पटाळे** शिंग खायाले गेलं तं गुईगुई लेंड.'

पटेल (वि.) १. अनुकूल, संबंधित. 'तुयसी पाटलाले **पटेल** बाई आये.' २. पाटील. '**पटेल** तुमारे खेत का संतरा दोन लाख के उप्पर नई पुरता.'

पटोनं (क्रि.) गळी उतरविणे. 'आपलं सरकं व्हाव म्हनून कोनालेबी **पटोनं** पळतेच राजा.'

पटोयाले (क्रि.रूप.) आपलेसे करायला. 'भाचे बॉ, आमच्या पोरी **पटोयाले** आले काय?'

पटोयेल (क्रि.रूप.) अनुकूल, पटविलेला. 'गावातले अर्धे लोकं आपल्या इरोधात **पटोयेल** हायत बुहाऱ्यानं.'

पटोलं (क्रि.रूप.) पटविले. 'लय कायनूबायनू सांगून त्यायनं **पटोलं** होतं याले.' -अंधा.

पट्टा (पु.) मालकीचे अधिकार पत्र. 'जैयले जिमिनी भेटल्या त्यायले हातामंदी **पट्टे** आन जिमिनी ताब्यात देल्ल्या.' -दि.६२. (त.पट्टिगै)

पट्टी (स्त्री.) १. मोजमापाची पावती. 'मापाऱ्यानं जेवारी मोजून देली अन् मायाजोळ **पट्टी** देली.' २. लांबोळे सूती आसन. 'मंडपात तीन **पट्ट्या** टाक अन् भईर टाक गावातल्या लोकाईले बसाले.' (त.पट्टि, पट्टै)

पट्टीचा (वि.) पक्का, तरबेज. 'मनोहर **पट्टीचा** पोयनार आय.'

पट्टीपास (स्त्री.) वाहीचा एक प्रकार. 'जांबोई वाई बैलानं मारल्यापेक्शा टॅक्टर सांगून **पट्टीपासच** मारावं.'

पट्ठा (वि.) बंदा. 'मी काय कोनाले समजतो? हा **पट्ठा** भेत नाई कोनाच्या बापाले.' -धग.१८. (अर.)

पट्ठा (पु.) परिसर, विभाग, प्रभाग. 'या पुऱ्या **पट्ठ्यात** शुछ्याच्या बाऱ्यात तुमचं नाव आये.' -गा.१९.

पड (स्त्री.) १. ? 'वालंबी पनाळ्यांचा **पड** वळीत बसली.' -रा. २. लवती, नमती, माघार. 'पैसा नसल्यानं हर्रासीत **पड** खाल्ली आपून.'

पडदपोशी (स्त्री.) छत असलेले. 'या गावात **पडदपोशीचं** तसं देऊळ नाही मारुतीचा पिवळा पार आहे.' -कात.३१४.

पडन (स्त्री.) १. सणाच्या पूर्वीचा दिवस. २. लोखंडावर पुन्हा लोखंडाची भर टाकणे.

पडपा (पु.) पडदा. 'पार्वतीनं डोळ्यांना झडपा अन् कानांना **पडपा** लावल्यात.' -काळी.४६.

पडलती (क्रि.रूप.) पडली होती. '**पडलती** जराशी आरामाले, येनं काय म्हंतं?' -सेल.४५.

पडाचं (क्रि.रूप.) पडायचं. 'समजत नाही काई कायच्यासाठी लडाचं/ कोना समोर सांगा उबळं आता **पडाचं**.' -जांग.४८.

पडायलं (क्रि.रूप.) पडून राहिले. 'उनाऱ्याच्या हातून मस्त बी चाळ्यावर **पडायलं**.'

पडी (स्त्री.) १. पडतीचा काळ. 'आमचं आयुष्यचं राह्यलं किती, **पडीचे** दिवस घातल्यासारखं.' -पख.१६७. २. झाडावरून आपोआप गळून पडलेले अर्धपक्व आंबे. 'आमराईत हिंडल तर टोपलंभर **पडीचे** आंबे सापडतीन.' -सेल.१९८. ३. पडलेल्या मासाचा. 'सखारामची गाय मेली. काकाले **पडीचा** हिस्सा आणाले लवकर पाठून द्या.' -वा.९.

पडीक(त) (वि.) वहिती न केलेली जमीन, पीक घेतले जात नाही ती जमीन. 'शेतकऱ्याजवळ शेती पाह्यजेच, ती **पडीक** असली तरी चालते.' -खुं.५. 'गावातले सबन ढोरं पडीतात जातात चऱ्याले.'

पडीपसारा (वि.) विखुरलेले- सामान. 'वस्तू सापडण्याची साली वाट असा सगळा **पडीपसर** पसारा.' -बा.११०.

पडील (क्रि.रूप.) पडेल. 'घळ्ळी **पडील** बरं डोक्स्याऊन पायजो.'

पडूय (न.)? 'टिचभर देश असे पल्ल्यावर सुटते/ आपले लोकं बिब्याचं **पडुयच** कुटते.' -जांग.१११.

पड्याल (अ.) पलीकडे. '**नदीपड्यालचं** वावर भल्लं पिकते बरं.'

पड्याळ (न.) गवताचा एक प्रकार. 'तासातलं **पड्याळ** निंदून काहाळलं.'

पढून (क्रि.रूप.) शिकवून. 'काय **पढून** रायली व माया सुनीले तू? आं?'

पढोनं (क्रि.) शिकविणे. 'हे **पढविलो** जी स्वामी निवृत्तिदेवी।' -ज्ञा.१२.२४७. 'मन आय तं **पढोनं** पोरालं लयमोठं.'

पढोयेल (वि.) शिकविलेले. 'मिठ्ठू **पढोयेल** हाय वाट्टे लेक, राम राम म्हनून रायला.'

पण (न.) ?. 'दोन लेकरांचं **पण** जावंस्तव काही कळतच नव्हतं?' -मोच.२३.

पणती (स्त्री.) १. नातवाची किंवा नातीची मुलगी. 'आबा, **पनतीच्या** लग्नाले गेल्ते काय रायखेळ्याले?' २. खापराचा दिवा. '**पणतीत** तेल टाकून ठेव संध्याकायचं.' (का.)

पत (स्त्री.) इज्जत, अब्रू, इमानीपणा. 'निंघे अर्थाचं दिवाय शब्दाची तं **पतं** गेली.' -काया.३३. 'वावरात खत अन् गावात **पत** पायजे मान्साची.' (का.पतिकरिसु)

पतनं (न.) पाप. 'त्याह्यचे शिव्यासराप भेटतील अन् **पतनं** भोगावं लागतील.' -त.९०.

पत(त्त)रवाई (स्त्री.) पत्रावळी. 'मग तीया **पातळी** काढीलीयाः तवं पाचसे पातळी नीगालीयाः' -ली.५. **पत्तरवाई** स्त्री. पत्रावळी. 'तो अवघा मढु पाणिये भरलाः पातळी उदकावरि तरंगो लागलियाः' -गोवि.७१. 'वडाच्या पानाच्या **पतरवाया** मस्त शिवता येतात.'

पतलं (वि.) पातळ. 'भीमा पोया लाट पन **पतल्यापतल्या** लाट.' -धग.३७.

पतांग (स्त्री.) दरवाजा तयार करताना लाकडाला पाडलेली खाच. 'पयले किकऱ्यानं भोक पाळ्ळं अन् मंगसन्या पटासीनं **पतांग** पाळ्ळी.'

पताका (स्त्री.अने.) ध्वजा. 'बापाबापा दिंडीत भजनं, पालख्या, किती **पताका**, गनतीच नाई.' (त.पताकै)

पतोर (अ.) पर्यंत. '**आतापतोर** आसं कधी झालं नव्हतं. मंग आताच काऊन झालं?' -अंधा.

पत्त (न.) १. पान. 'वरनात लिंबाचं पत्त पळ्ळं काहाळ बरं ते.' २. ब्लेड. 'दाळी करतो म्हटलं तं **पत्त** नाई, आंग धुयाले बसलो तं पानी नाई.' ३. जुगारातील पान. 'गंजिफ्यात बावन **पत्ते** रायतात, जोकर सोळुनसन्या.'

पत्ता (पु.) ठावठिकाणा. 'पत्रावर **पत्ता** बराबर टाकजो.'

पत्ती (स्त्री.) चहा पूड. 'येक शेटाक **पत्ती** आनली तं दोघातिघाचा च्या होते.'

पत्न (न.) पाप. 'माह्या दुःखाचे **पत्न** भोगाले थे जरूर जिते राह्यालेच पाह्यजे.' -कावू.

पत्र (न.) १. चिठ्ठी, लेखा. '**पत्र** घेती ज्ञानिये जया। मूळ घरासी॥' -ज्ञा.१५.२७९. २. टीन. 'घरासाठी **पत्रफाटे** कुठून आणसाल अरे भगवान पाटील सलामत तर पत्रं पच्चास.' -वा.१०८. (अर.)

पत्राई (स्त्री.) पत्रावळी. '**पत्राईवर** संदुरी वाहाळा बे आंदी.'

पत्री (स्त्री.) १. पूजेची पानेफुले. 'हरताईले लय फुलं, **पानपत्री** जमा करा लागते.' २. गुरे, घोडे यांच्या पायाला ठोकतात तो लोखंडी तुकडा. 'बैलाच्या पायात **पत्री** ठोकली कालदी.' (का.पत्रे)

पथ (स्त्री.) वर्ज्य, पथ्य. 'अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी **पथ्यासि** नाहीं म्हणितलें।' -ज्ञा.२.१८४. 'कां रोगु न गणिजे घरीं। **पथ्याचिया**॥' -ज्ञा.१६.६९. 'मले तिखटाची पथ सांगेल आये वैदानं.'

पदर (पु.) १. लुगडे दुपट्ट्याचा डोक्याहून घेतलेला भाग. 'श्रीकरे करूनि तोंडावरीला **पदरू** परता केलाः' -गोवि.२४५. २. स्वतःजवळचे. 'नव्हे माझी वाणी **पदरीची**।' -तुका. १००१. 'माया **पदरचे** पाचपन्नास रुपये खर्च झाले राजा.' (का.पदरू)

पदा(द्दा)वनं (क्रि.) मारणे. 'लेकरं नाई खेळतीन तं कोन खेळील? येवळं काय **पदावनं** चागलं हाय लेकराले.'

पदी (वि.) आळशी, बिनकामी. 'मावसीची सूनवारी निरा **पदी** निंघाली.'

पदोनं (क्रि.) मारझोड करणे. 'चरकचरक करते त **पदोनं** सायाले साजरं एकडाव.'

पद्धत (स्त्री.) चाल, रीत. 'पद **पद्धती** खेवणे। प्रमेयरत्नांची॥' -ज्ञा.१.५. 'ज्या त्या घाराची एक **पद्धत** असते भाऊ.'

पधाळ (न.) एक गवत. 'धुऱ्यानं निन्हा **पधाळ** वाहाळलं.'

पनजा (पु.) आजी, आजोबाचे वडील. 'तुज देखताचि माझा। बाप मेला आजा **पणजा**।' -तुका.१४२९.२.

पनजी (स्त्री.) आजोबाची आई. 'बाप्पा, तुले काय **पनजीबी** हाय काय, लय वय अशीन तिचं.'

पनती (स्त्री.) देवापुढे लावावयाचा दिवा. 'हाती ताट. ताटात **पनती**. त्यात मस्त दिवा झयके.' (का. पणते, हणते)

पनपनं (क्रि.) जोमाने वाढ होणे. 'मांडवावर जाऊन झेपावणारी वेल तिनं **पनपूच** दिली नव्हती.' -खुं.१२७. 'एकदा मान्साले निशा चल्ली का मंग थे **पनपनूच** देत नायी.' -ज.३६.

पनपेल (वि.) वाढलेली. 'वावरात गवत लय **पनपेल** आये, निंदा लागते.'

पना (पु.) कापडाची लांबीरुंदी. 'पयज्याम्याले किती **पन्याचा** कपळा पायजे हो.' (फा.)

पनाजा (पु.) आजोबाचे वडील. 'आजा मेला तरमा त्याचा

बाप, **पनाजा** अजूनबी टनक हाय.'

पनाया (पु.) छतावरील पाणी जाण्याचा मार्ग. 'वसरीचं पानी जायाले रंधावनाच्या वर **पनाया** लावला.'

पनाळी (स्त्री.) फांदीची लांब चिरोटी. 'शिंदीची फांदोरी उलवून तिने लुसलुशीत **पनाळी** काढली.' -रा.२२३

पनावनं (क्रि.) म्हैस, गाय दूध देण्याच्या तयारीत येणे, पान्हा येणे. 'सकाऊनच दाबारा म्हैशी **पनावनं** पळते रोज.'

पनावेल (वि.) पान्हा आलेली. '**पनावेल** म्हैस मोठा गळी पायते आपला. आपून **पनाऊन** द्या फक्त.'

पनाव्याले (क्रि.रूप.) पान्हा यायला. 'म्हैस **पनाव्याले** टाईम आये जराक्सा.'

पनोती (वि.) दलिंदरी, दारिद्र्य. 'चोई घीऊ नाई एवढी **पनोती** आली भॉले.'

पन्नावनं (क्रि.) मारणे. 'लोकाईचे भांडनं पाऊनसन्या पोलिसाईनंच **पन्नावनं** लावलं येकायेकाले.'

पन्नी (स्त्री.) प्लॅस्टीकची पिशवी. 'आता झोरा कोनाजोळ नाई दिसत. बजारात गेलं का घेतलाच होय **पन्नीत** भाजीबजार.'

पन्हं (न.) कैरीचे सरबत. 'उनायाच्या घाती **पन्हं** बरं मानते जीवाले.'

पन्हलं (पु.) वळ. 'तोड्यांनी तिच्या पायाभोवती काळसार **पन्हलं** उमटला.' -काळी.१०६.

पन्हा (पु.) कापडाची रूंदी. 'या कपळ्याचा **पन्हा** किती आये दादा?' (फा.पहना)

पन्हाय(या) (पु.) पन्हाळे. 'डोळ्याच्या पापण्या **पन्हाया-सारख्या** वाहू लागल्या.' -गा.११५.

पन्हाळी (स्त्री.) टोकदार काडी. 'कोपऱ्यात उभ्या **पनाळ्याच्या** भाऱ्यातील पाचसहा **पन्हाळ्या** तिनं उपसल्या.' -ऊन.१५६.

पन्हावनं (क्रि.) पान्हा येणे. 'माझी विठ्ठल माउली प्रेमपान्हा **पान्हावली**॥' -ज्ञा.६.८११. 'गाय **पन्हावली** नाही मुके वासरं निजले.' -वि. (फा.)

पपई (स्त्री.) एक फळ. 'औंदा वावरातनी **पपई** लावली. आता टोंगयाटोंगया दिसते.' (का.पप्पायि हण्णु, त. पप्पधि)

पयजन (न.) पायातील अलंकार. 'पोरीच्या पायातले **पयजनं**, वाजती झुनझुनं.'

पयतं (वि.) धावत असलेले. '**पयतं** ढोर नाई शेपाटता येत लवकर.'

पयदल (क्रिवि.) पायी. 'अथी तं हाय हाकीवर गाव. **पयदलच** जाऊ गळ्या.'

पयदाईस (स्त्री.) निर्मिती. 'मान्साची **पयदाईस** झाली राक्शसाची.'

पयनं (क्रि.) धावणे. 'भूत दिसला का **पयनं** तं आलंच मान्साले.'

पयपाट (पु.) पोळपाट. 'पमीनं एकदोन पापड लाटले. तशी वंदू **पयपाट** बेलनं घेऊन आली.' -ना.६१.

पयलं (वि.) प्रथम क्रमांचे. 'दुधासाठी **पयलं** पोट्टं घासून मेलं हातपाय.' -काया.३५. 'आपलं पोरगं वर्गात **पायलं** आलं.'

पयलच्या (वि.) पूर्वीसारखे. 'नद्या कोळ्ळ्या झाल्या त्यानं तं थळीचं पीक **पयलेच** पयल्याच्यासारखं येत नाई.' -लेक.६४.

पयलमपय(र)ता (वि.) पहिल्या वेळेस. 'पोरगी घायबरतच असते **पयलमपरता**, बस बाई खाली.' -सित.१४९.

पयलमपयला (वि.) प्रथम. 'मा वऽऽ, मी वर्गात **पयलम-पयला** आलो.'

पयलमसुट्टा (वि.) प्रथम, प्राधान्याने. 'त्याची गुल्लेर अद्र चोरा लागते **पयलमसुट्टा**.' -डेबू.५१.

पयलमसूट (वि.) पहिल्या प्रथम. 'आमच्या अथी तं कोनीच शिकलं नवतं. मीच **पयलमसुट्ट्या** शाईत जाले लागली.' -लेक.५५.

पयलाळू (वि.) पहिल्या वेळेस बाळंत झालेली. '**पयलाळू** असलं की तरास होतेच.' -ना.१५२.

पयले (वि.) पहिले, प्रथम. 'जैसा निंब जिभे कडवटु। हिरडा **पहिले** तुरटु॥' -ज्ञा.१८.१८६. '**पयलेच** आम्ही याचं थिगय त्याले आन त्याचं थिगय ह्याले लावतो.' -लेक.६४. 'काय काम आये ते मंग सांगतो **पयले** तवलीभर पानी सांगा पाय धुयाले.' -निशा.

पयल्यांदार (वि.) पहिल्या वेळेस. 'पावनचार जेवून जा पावनेबॉ. **पयल्यांदारच** आले ना तुमी.'

पयल्यानं(नी) (क्रिवि.) पहिल्या वेळेस. '**पयल्यानच** आले तं राहा दोन रोज अथीसा.'

पयवास्थ (वि.) कुचकामी, जुनाट. 'दुकानदाराईनं उरल्यासुरल्या, मांगच्या सालच्या, **पयवास्थाच्या** थैल्या माथी मारल्या.' -जटा.३४.

पयस (पु.) पळस. 'धुईमातीले **पयस** डांगोडांगी फुलून येते.'

पयसपापळी (स्त्री.) पळसाचे बी, पळसाच्या झाडाची शेंग. 'काही दुखन्यावर **पयसपापळी** लय गुनकारी रायते.'

पयसफुली (वि.) पळसाच्या फुलासारखी किंवा त्या रंगाची. 'करू शिमगा साजरा लावू मनातला रंग/ तू माई **पयसफुली** येनं माया संगंमंगं' -नोका.

पयसा (पु.) पैसा. '**पयसा** कसा मोळू, जिवाले येते लळू.'

पया (क्रि.रूप.) पळावे, धावावे. 'गंजिपत्यावाले हो **पया**, पोलिसं येऊन रायले इकळे.'

पयाटी (स्त्री.) पऱ्हाटी, कपाशीचे झाड. '**पयाटी** तं औंदा डोक्स्यावधर गेली गळ्या.'

पयापय (स्त्री.) पळापळ. 'भलकसे पावने आल्यानं लय **पयापय** झाली नवरीच्या बापाची.'

पयार्थ (वि.) पराधीन. 'थकती **पयार्थ** झाली का आसंच व्हते.' -सेल.२०.

पयाले (क्रि.रूप.) पळायला. 'वावरातून आळवे ढोरं **पयाले**. लय तुळोन झालं.'

पयेत (क्रि.रूप.) पळत. 'बायाईनं कल्ला केला. दोन तीन मानसं **पयेत** आले.' -ना.५८.

परकं (वि.) दुसरा, नातलग नसलेला. 'ज्यासि तुझे दर्शन घडले। त्यास **परके** राहिले?' -ग्रा.१.११.

परकंपरकं (वि.) तिऱ्हाईत वेगळे. 'घरात आम्हाला उपरंउपरं आणि **परकंपरकं** वाटू लागलं.' -फीर.१७५.

परकर (पु.) लहान मुलीचा घागरा, नेसू. '**परकरातली** पऱ्हाटी जसी लुगळ्यात आली.' -काया. ३. (का. परकार, फा.पर्कार)

परका (वि.) दुसरा, तिऱ्हाईत. '**परका** मानूस घराच्या दा हात दुरच पायजे.'

परकार (पु.) प्रकार. 'तुका म्हणे अवघे गव्हांचे **प्रकार**। सोनें अलंकार मिथ्या नावं॥' -तुका.२४१७.

परकोट (पु.) गावाभोवतीची उंच, भक्कम भिंत. 'आता कुठी गावाले **परकोटा** रायल्या? पयले असत.'

परख (स्त्री.) ओळख. 'मान्साची **परख** पायजे. वयखता आलं पायजे कोन आपला कोन परका.'

परखाटी (स्त्री.) पऱ्हाटी. 'पाच येक्कर **परखाटी** अन् दोन येक्कर मुंग पेरला औंदा.'

परखून (क्रि.रूप.) पारखून. 'वसद घ्याची इकत तं अरखून **परखून** घ्यावं बाबू.'

परगना (पु.) तालुका, मुलुख. 'आपला **परगना** पयले निजामशाईत मोळे.' (फा.पर्गनः)

परगस (स्त्री.) आख. 'मोठ्या गड्ड्यात झटका बसला तं बंडीचा **परगस** तुटला.'

परजनं (क्रि.) धार लावणे. 'कैसेनि कर्णावरी। **परजू** हे न म्हण॥' -ज्ञा.९.४७२., 'तो जैसा आठहो पाहर। **परजूनि** असे॥' -ज्ञा.१३.५५०.

परजना (पु.) दुसरे, परके लोक. 'मांगे कार्य **परजनाचा** याप नसल्यानं तो पयस्यावाला झाला व्हता.' -सित.१८.

परणू (पु.) वराचे निघणे. '**परणू** गेला दूर, मेण्याला भोई बारा, हाती सोनेरी कट्यारा.' -लोक.३१.

परण्या (स्त्री.) नवरदेव लग्नासाठी निघणे बाहेर काही बाधा होऊ नये म्हणून लिंबू नारळ उतरतात. 'राघो नवरदेव **परण्या** निंघाला दुपारा/ त्याची आत्या करे लिंबा नारळाचा उतारा.' 'किती हात जोडू पांढरीच्या हनुमंता, खेळते नमस्कार **परण्या** निंघता.'

परत (अ.) १. प्रत्येकी. 'बैलाईले तुरीची दाय पायजे, जोडी **परत** अधलीभर.' -भं.७५. 'बोला **परत** उत्तर देत रायते झवाळी.' २. वापस. 'गावा गेल्तो आजच **परत** आलो.'

परतन (न.) शेतीचे मोजमाप. 'आबाजीची दहा **परतन** जमीन होती.'

परतनं (वि.) १. तव्यावर सराट्याने उलटपालट करणे- पोळी, भाकरी इ.. 'इकळे लाटनं चालू अन् मंधातच ताव्यावरची भाकरबी **परतनं** पळतेच.' २. मागे फिरणे. '**परतले** यादव कवण साहातसे घावोः' -मउ.३.

परतपाय (पु.) परतफेड, सेवा. 'मायबापाचा जीव हाये तेदलोक जगनं हाये आपल्याले मंग कोन हाय **परतपाय** कराले?' -लेक.९.

परता (अ.) खेरीज, शिवाय. 'माह्या कपायचं कुकू कायम ठेव **ह्यापरता** काहीच मांगनं नाही देवा.' -कावू. 'आत्ता माही बायको खोबऱ्याच्या **तेलापरता** वासाचं तेल ठिवते.' -दी.२ 'मायं लेकरू **मायापरता** राहू शकत नायी.' -जटा.६.

परताळा (पु.) पारखणे, प्रमाण पाहणे. 'बरवे केले गोमटदेव होः आपुलेया अपत्यास **पडिताळिलेः**' -ली.१७६. 'राउळ आताचि **पडीताळावया** आले होतेः श्रीकरे कपाळ स्पर्सीलेः' -गोवि.१०९. 'ऐसा मागील **पडताळा** घेउनी। पुढा अभिप्रावो दृष्टी सूनी॥' -ज्ञा.७.२०२. 'म्हणोनि एकवेळ देवा। तोचि **पडताळा** घेयावा।' -ज्ञा.५.१६७.

परती (क्रिवि.) परत येण्याची क्रिया. 'एकी तन धैलिया भूमी...कासीया **परतीया** सांडीजतिः तियास नांगरी जातेः' -गोवि.४७२.

परतून (क्रि.रूप.) मागे फिरून. '**परतून** ये म्हना माया सामने मंगसन्या दाखोतो हिसका.'

परतेक (अ.) प्रत्येक. 'मरन **पर्तेकाले** लांबोनार. ते जगात कोनाले ठेवत नाही.' -अखे.

परदा (पु.) पडदा. 'बायईमान्साले असं **परद्यात** ठून काय फायदा?' 'दमनीले नवाच **परदा** शिवेल आये.' (फा.)

परदी (स्त्री.) लहान भिंत. 'मातीच्या भीतीले इटाईची **परदी** घेतली.' (फा.)

परदेशी(सी) (वि.) परमुलुखातील. 'आतां **परदेशी** तुका। जाला लोका वेगळा॥' -तुका.४१२०.३.

परपंच (पु.) प्रपंच, संसार. 'जगू अदमेला झाल्ता **परपंचात**, फाटे संसार सावरूसावरू.' -सित.१३.

परपज (पु.) दुजाभाव. 'सावतर पोराले असं **परपज** ना करावं बाईच्या जातीनं.'

परपर (क्रिवि.) भयग्रस्त होणे. 'जो जिथं उभा तिथच करे टरटर/ सरकारची करून राह्यली **परपर**.' -मिर्झा.१०४.

परपोज (पु.) दुजाभाव. 'मामामामीनं आपल्यातुपल्याचा कदी **परपोज** केला नोता.' -सित.५०.

परपोळ ? 'बिबुड्याचा **परपोळ** दे मनलं माय तं देला नाही.' -झि.५४.

परचित्ती (स्त्री.) प्रचीती. 'अवं देवाचा बोल तो देवाचा बोल. पाय तुले **परचित्ती** येते का नाई.' -हज.१८.

परदिसपाण(न)गा (वि.) परावलंबी. 'तो असता तर असं **परदिसपाणग्याचं** जीणं नाशिबी आलं नसतं.' -झि.८९.

परभायऱ्या (अ.) परस्पर. 'पुरुषाचा मामा लग्नापुरता **परभायरेच** आला होता.' -ना.३९. (का.परभारेयागि)

परमगस (वि.) भरपूर. 'वावर हाय हेल्याचं मस्तक त्यात त्याले **परमगस** पानी भेटलं.' -हज.१७.

परमानं (अ.) प्रमाणे. 'माया मता **परमानं** आयीकता तं हे पाई नस्ती आली.'

परलपरल (न.) जास्त बोलणे, भादरणे. 'ह्यो परबत लयच **परलपरल** करायला.' -पाटी.८५.

परवंट (स्त्री.) लुगड्याची दुमडेली घडी. 'तिच्या ओटीपोटावरील लुगड्याच्या **परवंटास** पकडून तिला अधांतरी उचलली.' -सि.१२.

परवंडा (पु.) दुर्दशा. 'आपल्या घरादाराचा **परवंडा** करून काय मिळणार ह्ये तिले?' -रा.

परवर (न.) चुली समोरची जागा. 'चुलीजवळ **परवरात** तापायला ठेवलेला दुधाचा गडवा घेतला.' -सेल.१२९.

परवा (स्त्री.) काळजी, चिंता. 'मी काय **परवा** करतो कोनाची बे?'

परवा (अ.) कालच्या आधी, दुसऱ्या दिवसा नंतर. 'काल नोतं भेटलो तुमाले. **परवाच्या** रोजी भेटलो होतो ना?' (सं.)

परस (अ.) पेक्षा. 'आईच्या **परस** सासूबाईचा उपकार/ माह्या गयामंदी घातला चंद्रहार.' 'काय इच्यारता राजेहो पुऱ्या गावाले **मायापरसई** तिचं कवतूक वाटे.' -हज.२५.

परसंग (पु.) प्रसंग. 'मायले मांग लागो तं. आडमुठासंगं **परसंग** पडला भोसडीचा.' -झिं.६४.

परसट्टी (स्त्री.) ओसरी. 'भाऊबयनी, माय **परसट्टीत** अंधारामंदीच बसेल व्हते.' -सित.१६.

परसडी (स्त्री.) पेंढ्यांची ओळ. 'कडब्याच्या गोलाकार पेंढ्या लावल्या खळ्याची **परसडी** तयार झाली.' -रा.४३.

परसाकडं(ळं) (स्त्री.) संडास. 'फोडातून जसा निंघून गेला रंद/ **परसाकडचा** माहा त्रास झाला बंद.' -मिर्झा.११५. 'येतो मी **परसाकडून** म्हणत डबा घेऊन बाहेरच्याला गेली.' -सेल.१३.

परसाद (पु.) प्रसाद. 'अकरा रुपयाच्या पावतीत त गनपनीचा **परसादई** होत नाई.' -धुम्म.

परसूद (स्त्री.) बाळंत. 'आली **परसुदाची** वेळा/ जन्म मारोतीचा झाला.' -लोक.३३. '**परसूद** हुवून चवथा दिवस उगयला.' -सित.५४.

परस्थी (स्त्री.) परिस्थिती, अवस्था. 'काय देवा अपली हे **परस्थी** त्याच्या डोयाले धारा लागल्या.' -सित.१६.

परहेज (पु.) पथ्य, संयम. 'कांदा नाई खात मी. **परहेज** आय त्याचा.' (फा.)

पराई (वि.) परकी. '**पराई** बाई, धन आपल्या काई कामाचं नस्ते राजा.'

पराटी (स्त्री.) कपाशीचे झाड. 'तिथे पेटत्या उन्हात पोर वेचते **पराट्या**.' -भीक.११७. 'पयले हातानच **पराट्या** उपळत.'

पराडं (न.) उंचसा बांध. '**पराड्यावरून** एकामागे एक टोळदगड लोटले.' -ल.५०.

परात (स्त्री.) मोठे ताट. 'भुवाच्या घरी बहीन पावनीनं/ **परातीत** पाय धुतले वयनीनं.' -लोक.१९१. 'यजमानानं **परातीत** देवाचा नैवेद्य आणला.' -सि.७५. (का., तु. तबाक)

पराय (स्त्री.) काळवेळ. 'आज्याची उतरती **पराय** झाली व्हती.' -सित.११६. 'या उतरत्या **परायमंदी** हातानं कच्च बाभळं करून खात दिवस काढू लागला.' -सित.४३. 'या उतरत्या **परायमंदी** डिगु घरी रायला त निभाव हुईन आपला?' -सित.२०.

परायत्या (क्रिवि.) परभारे, परस्पर. 'कमलाकर **परायत्याच** दुकानवर गेला.' -सित.१४६. 'रामदास देराइकळेच थांबलत्या वाट्टेऽऽ तिकडे **परायत्याच**, आजीन इचारलं.' -सित.२१

पराया (वि.) दुजा, दुसरा. 'आपुलां **परावां** देहीं। दुःख देती जें जें कांहीं। मज आत्मया तेतुलाही। होय शीणु॥' -ज्ञा.१७.१०५. '**पराव्याचे** भार पाहुनियां दृष्टी। कांपतसे पोटी थरथरा॥' -तुका.४२४२. '**पराया** संबर पोरीबाळीनं असं उभं राहू नाई.'

पराळ (अ.) पलीकडे. 'त्या **टेकळ्यापराळ** आमचं गाव आये.'

परीशान (वि.) विस्कटलेला, दुःखी, त्रस्त, चिंतित. 'पानी नाई पाऊस नाई. कास्तकार तं निन्हानाम **परीशान** हाय.' (फा.परीशॉ)

परीनं (क्रिवि.) तऱ्हेने, कुवतीने. 'आपल्या **परीनं** जेवळं होते तेवळं काम करावं मान्सानं.'

परीपरी (वि.) नानाविध. 'बाया **परीपरीच्या** अस्तेत सारख्या नस्तेत.' (का.परिपरि)

परिचेव (पु.) परिचय. 'पंचक्रोशीत **परिचेव** हाय पाटलाचा.'

परिपाठ (पु.) रीत, चाल, पद्धत. 'आमच्या गावचा तोच बलुत्याचा **परीपाठ** आजून सुरू हाये.' -सित.१३५. 'पोरासोरांकडून पाठ खाजवून घेण्याचा **परिपाठ** चालूच ठेवला.' -काळी.५२.

परिवार (पु.) कुटुंब. 'फांकलिया इंदिवरा। **परिवारू** नाही धनुर्धरा॥' -ज्ञा.१३.३६१. 'पाटीलबॉचा **परिवार** म्होटाधाटा हाये.'

परेशान (वि.) त्रस्त. 'निषेध करासाठी बंदचा आधार/ लोक **परेशान** जनता निराधार.' 'या बिमाऱ्यानबी **परेशान** करून टाकलं मले.' -धुम्म.

परेशानी (स्त्री.) काळजी, चिंता. 'पिकपानी नसल्यानं समदी **परेशानी** झाली लेकाची.' (फा.)

परोळ (स्त्री.) १. मातीचे एक भांडे. 'नरसिंहासि बोनीयाचे सात **परीयळ** येतिः' -गोवि.१११. 'कौतिक आपल्या **परोळ्यात** भाकरी शेकायची.' -धग.४. २. सापाची जात. 'मावदात **परोळ** निंगल्यानं शांताबाई बोबलत घराभईर आली.'

पर्चा (पु.) कागद, पेपर. 'आज **पर्चा** भऱ्याची आखरी तारीख आये.'

पर्ची (स्त्री.) कागद, पेपर, पावती. 'मन्यानं कागदाची **पर्ची** माया हातावर ठुली अन् गेला निंघून.'

पर्दा (पु.) पडदा, आडोसा. 'दरोज्याले येक **पर्दा** शिवून घेतला.' (फा.)

पर्पज (न.) भेदभाव. 'कापसाले भाव देण्यातबी **पर्पज** करतात. कोणाले किती तर कोणाले किती.'

पर्मा (पु.) जननेंद्रियाची व्याधी, रोग. 'गंगाराम पार सडला त्याला **पर्मा** झाला.' -काळी.८०.

पर्र (क्रिवि.) गतीने, भराभर. 'त्याला जरा धमकावलं तर **पर्र** लेंड्या टाकते.' -खुं.१७५.

पर्वा (स्त्री.) तमा, फिकीर. 'कोनाची **पर्वा** आपून काहाले करावं.' (फा.)

पऱ्हाटी (स्त्री.) कपाशीचे झाड. '**पऱ्हाटीच्या** डांगोडांगी रंगारंगाईचे फुलं/ पोरीसोरींच्या कानात जसे डुलतात डुलं.' -वि. 'पोरांकडून काशा काढवायची. **पऱ्हाट्या** गोळा करवायची.' -धग.५२.

पऱ्ह्या (पु.) दुरावस्था, फजिती. 'जवारी नाही झाली तर **पऱ्ह्या पऱ्ह्याच** हये म्हणायची.' -सेल.१४९. 'नवरा अस्ता तर ही **पऱ्ह्या** व्हती का?' -रा.५.

पलंग (न.) मंचक. 'पावने बॉ तुमी **पलंगावर** झोपा मी खाली झोपतो.' (फा.)

पलंगपोस (पु.) मोठा पलंग. 'मोठीधाटी बैठक अन् त्या बैठकीत सागाचा **पलंगपोस** ठुयेल होता.' (सं. पल्यकंक, फा. पोश)

पलटनं (क्रि.) परत फिरणे. 'आपून आवाज देल्यावर तं अच्छकाले **पलटनं** हाय.'

पलटवनं (क्रि.) परतविणे. 'चालत्या मान्साले **पलटवनं** बरं नाई, भाऊराव.'

पलटावणे (क्रि.रूप.) परतून लावणे. 'पोरीच्या छेडीला साधी चकार शब्दाचीही **पलटावणी** न देता ती पुढे निघाली.' -पोळा.

पलटी (स्त्री.) १. उलटेपालटे होणे. 'म्हैस अशीच घसरली अन् **पलटी** खाऊन खाली नदीत मानेवर पडली.' -पख.४६. २. एका जवळून घेऊन दुसऱ्याला विकणे, परस्परात बदलून घेणे. 'पाचश्याले घेतलेले **पलाट** पलटी करताना सहाश्याले इकतीनच ते.'

पलटून (क्रिवि.) फिरून. 'मी काई बोल्लो नाई ना. तोच **पलटून** माऱ्याले आला ना माया आंगावर.'

पलटोनं (क्रि.) परत फिरवणे. 'तेवळी होंडी गाय **पलटोनं** वावराकून.'

पलपल (वि.) नरम. 'अशी कशी पपई देली निऱ्हा **पलपल** हाय ना?'

पलपल (स्त्री.) भीती. 'अंधारात तं माही निस्ती **पलपल** करते गळ्याहो.'

पलाट (पु.) प्लॉट. 'आखरातनी **पलाट** पाळ्ळे. येका लाखाले येक गुंठा भाव.' (इं.)

पलाळ (अ.) पलीकडे. '**पलाळ** वावराच्या तुयं आखर पिकावर/ माया जीव रमे ना भरल्या ताटावर.'

पलिता (पु.) १. मोटेचा दोर ज्या लाकडाहून येतो ते तिरपे गोल लाकूड. २. मशाल. (फा.पलीत)

पले (वि.) दुर्बळ, कमकुवत. 'पण हेबी निंघाले त्याहीच्यावानीच **पले/** भरोशाच्या म्हसीले होऊन गेले हेले' -मिए.१३८.

पल्डं (क्रि.रूप.) पडले. 'गेल्यासाली काय ठोंग बसली सम्द वावर आंगावर **पल्डं**.' -बा.१०.

पल्याड(ळ) (अ.) पलीकडे. 'अल्याळ डोंगर **पल्याळ** डोंगर,

मध्ये बाई रान ग.' 'ते मंदिर दिसून रायलं ना. हो तेच. त्याच्या **पल्लाळ** जा तुमाले नदीच दिसते.'

पल्ला (पु.) १. अंतर, लांबी. 'लय **पल्ला** गाठा लागते आजून, मंग यीन गाव.' २. जोराचा दौड, चौखूर धावण्याची गती. 'टप्प्याचा टांगा तिकडून **पल्ल्यावर** येत होता.' -भं.७२. 'बैल पयले दुळकीवर मंग **पल्ल्यावर** येते.' -डेबू.५६. ३. तराजूच पारडं, पदर. 'दोन **पल्ले** कापूस गंजीवर टाकला.' ४. प्रगतस्थिती. 'अवधूतची गाळी सध्या **पल्ल्यावर** आये.' (फा.)

पल्ला (क्रि.रूप.) पडला. 'रातच्यानं उठला, झोपेत चाल्ला, **पल्ला** मंग पाण्यात.' -जटा.५४.

पल्ली (स्त्री.) गोणपाटाचा खोलगट थैला. 'आपल्या जवळील काटापट्टीवर तेवीस **पल्ली** छेत्तीस किलो कापूस मापाऱ्यानं लिहिला.' -सुखो.६५.

पवच्या (पु.) तळपायाचा पुढील भाग. '**पवच्या** नरम पळ्ळ्यानं गोटे पायाले रुतत.'

पवटा (पु.) शेणाचा गोळा. 'गरिबाईची इज्जत तुमाले काय शेनाच्या **पवट्यासार्की** वाट्टे का?' -पागो.७१. '**पवटा** पळते त् माती घेऊनच उठते.' (त.पोर)

पवनं (क्रि.) पोहणे. 'नदीकाठच्या लेकराईले **पवनं** असतेच.'

पवना (पु.) सर्वोत्तम चारा, गुरांची पुरणपोळी. 'कुंद्यापेक्शा **पवना** गवत बैलं मस्त खातात.'

पवनी (स्त्री.) पोहणी. 'बैल **पोहणी** द्यावे काळेशार डोह पाहुनी.' -भीक.१८.

पव(व्ह)रा (पु.) १. पाणी काढण्याचे साधन, डबा. 'कायेळले **पवरा** लटकून पान्याच्या दोन खेपा केल्या सकाऊनच.' २. धान्याचे माप. काही ठिकाणी एक **पव्हरा** हा चार तर काही ठिकाणी पाच किलोचा असतो. 'येक येकर वावर सोंगाचे दोन **पवरे** गहू सांगतले मुकरदमीननं.'

पवाडनं (क्रि.) चटकणे. 'पखाल आणू नको म्हनलं त **पवाडलाच** पखाल घेऊन.' -पख.१५४.

पवाडा (पु.) पोवाडा. 'तयाचा **पवाडा** पढेतिः तेणे तो नांदेः प्रसिद्धी होय.' -ली.१३५. '**पवाडा** तुवां केला। गंधर्वासी॥' -ज्ञा.२.१०.

पव्वा (पु.) एक पावटी. 'दारूचा येक **पव्वा** मारून आलो लगनात नाच्याले.'

पव्हरी (स्त्री.) ? 'टोपलं डोक्स्यावर ठेवून दुसऱ्या हातानं तिनं **पव्हरी** गुंडाळली.' -पख.५४.

पव्हा (पु.) भक्तांचा समूह, यात्रेकरुंचा थवा. 'तवं म्हाळसी **पव्हा** अपार आला असेः यात्रा थोरि भरली असेः' -ली.२३४. 'एका दीसा कार्तीक मासी मातापुरा **पव्हा** नीगालाः' -ली.२.

पसंती (स्त्री.) स्वीकृती, मान्यता. 'पोरानं **पसंती** कळोली पोरीची.' (फा.)

पसन (न.) पसंत. 'पाहुणे म्हणाले पोरगा **पसन** हाये आमाले.' -भं.६५.

पसर (पु.) पसारा, विस्तार. 'पुत्र पत्नी सहोदर। मायबाप गोताचा **पसर**।' -तुका.६३४. 'वाऊ घाल्यासाठी गहू पसरला.'

पसरट (वि.) पसरलेले. '**पसरट** भांड्यात दूध ठुलं का तुरत निवते.'

पसरनं (क्रि.) १. झोपणे. 'दिवस निंघाला. केळाजी अजून **पसरलेलाच** होता.' -ना.१२७. २. फैलणे. 'अवघ्या घरात कांदे **पसरले**.'

पसरमांडी (स्त्री.) ऐसपैस मांडी मारणे. 'बोलताबोलता थांबून गिरजापुढे मंजुळा **पसरमांडी** घालून बसली.' -कात.१६१.

पसरले (क्रि.रूप.) फैलविले. 'पोत्यातले हरबरे आंगनात टाकून **पसरले**.'

पसरेल (वि.) झोपलेला. 'आठ वाजून गेले तरीबी **पसरेलच** हाय बुहाऱ्याखानीचं.'

पसरोनं (क्रि.) फैलविणे. 'सोयाबीन ओलं असल्यानं **पसरोनं** पळ्ळं.'

पसा (वि.) अर्धी ओंजळ. 'पाइलीएचे **पसेया** का ऐईल?' -ली.४३७. 'मा **पसाभरि** कवडे श्रीदोवेसी धरिले असतिः' -ली.२८. '**पसाभरि** साकर काढीलीः आणि आबाइसाचीया थाळा घातलीः' -गोवि.१२३.

पसाखं(खां)ड (वि.) थोडेफार. 'कसेबी मुंगटुंग आले आस्ते रोजीनं **पसाखंड**.' -रा.४.

पसामूठ (वि.) थोडेसे. 'नित करून मोलमजुरी पाडितो **पसामूठ** पदरी.' -भीक.३९.

पसारा (पु.) १. अस्ताव्यस्त सामान. 'ते उटिलीः अवघा **पसारा** माथां घेतलाः' -ली.३४. 'पहिलटकरीण लोफाचा **पसारा** पडला.' -सेल.४६. २. विस्तार, व्याप, फैलाव. 'म्हणौनि वाचेचा चौबारा। घातलिया धर्माचा **पसारा**॥' -ज्ञा.१६.२२३. 'गोसांवी खाटीकांचेया घरांसि बीजें करीतिः **पसारां** बैसतिः' -गोवि.४९. 'कां समुद्राचेनि पैसारें। वरी तरंगता असारे।' -ज्ञा.१५.१०७. 'मांडिला **पसारा** सदाशिवीं।' -नाथ.१२३२.

पसिना (पु.) घाम. 'उनायात **पसिना** सुटूनसुटून कपळे ओलेगच्च होतात लेकाचे.' (फा.)

पसेरी (स्त्री.) पाच शेराचे वजन. 'पायली नाई पायजत. **पसेरी** देना?'

पस्तावनं (क्रि.) पश्चात्ताप करणे. 'बुद्धीनं काम केलं का **पस्तावनं** नाई पळत मान्साले.'

पस्तावा (पु.) पश्चात्ताप. 'अस्तावा जाते अन् पस्तावा येते.' 'झालं ते झालं. आसा **पस्तावा** करून काय फायदा?'

पस्तुरी (स्त्री.) वाढावा, वरताळा, ज्यास्तीचे. 'शंभर पुड्यांवर पाच पुडे **पस्तुरी** द्यावे लागायचे.' -सेल.२०९. 'येले झाले जीवाचे वरून **पस्तुरी**.' -मिए.१५९.

पहाडी(ळी) (वि.) पहाडातील. '**पहाडी** बाया, मान्सं, ढोरं मोठे काटक रायतात राजा.'

पहार (पु.) १. प्रहर. 'दोन **पहार** झाले का शिदोरी काहाळून खाल्लीच समजा.' २. सब्बल. 'तुका म्हणे खोरीं **पाहारा** जतन। जोंवरि हे धन हाती लागें॥' -तुका.११३५.३. '**पहारीच्या** साहाय्याने तळाच्या खडकात सुरुंग केल्या गेले.' -सेल.३२२. (का. पारे, पहरे)

पहारा (पु.) रखवाली. 'गावातनी **पहारा** द्याले येक गुरखा होता.' (फा.त.पारा)

पहाळपट्टी (स्त्री.) पहाडा लगतची सपाट नसलेली जमीन. '**पहाळपट्टीनं** देऊ नये लेक बाय/ गोट्यावर पळे पाय, तथी आठवते माय.' -लोक.१८९.

पहिलवान (पु.) मल्ल. '**पहिलवान** हावं आपून. तेबी फक्त घरात अन् बायकोच्या सामने.' (त.पैलवान)

पहेराव (पु.) पोशाख. 'मान्साच्या घरी खाले नसलं तं चालते **पहेराव** मोठा रुबाबाचा पायजे राजा.'

पह्यले (वि.) पहिल्यांदा, प्रथम. '**पह्यले** लागे बियर आता देशी मारते/ पोरीच्या मांगं मांगं हूपहूप करते.' -नांबै.

पह्याटी (स्त्री.) कपाशीचे झाड. '**पह्याटीवर** माह्याबी बोंडअळी पडली.' -मिर्झा.१७.

पळकनं (क्रि.) चटावणे, सरावणे. 'चुलतेईच्या घरी दुभतं होतं त्याला चटावून एक बोक्या **पळकला** होता.' -सुखो.३९.

पळनातू (पु.) नातवाचे अपत्य. '**पळनातू** झाले मंग आठनऊदा, पाटलाची घरची सर्कस चला पहा.' -ऊ.६७.

पळसाळी (स्त्री.) पळसाचे बन. 'नाईलाज म्हणून तो पडला व **पळसाळीच्या** पार झाला.' -कात.२७७.

पळी (स्त्री.) खोलगट चमचा. 'तो थाळा घालौनि उन्हउन्ह ठोंबरा घेउनिएः **पळिए** वीतीगी करीः' -ली.५०५.

पंग (क्रिवि.) जलद, गतीने. 'चलवाद्यावाणाची **पंग** पळून गेली पाह्यजे.' -खुं.२१५.

पंगत (स्त्री.) जेवणावळीची रांग. 'गोसावियाचीये **पंगती** कोथळोबासि वाढीलेः' -गोवि.२४६. 'सुखी लोक तर नेमानं आंब्यांच्या रसाच्या **पंगतीच** करून टाकत.' -मोती.

पंगाडी (वि.) दारूचे व्यसन असलेला. 'आमचा भाऊ होता **पंगाडी** महामंडळ.' -ल.३७.

पंच (पु.) पाच लोकांचा समूह. 'गावातलं खरंखोटं तपासाले **पंच** हाय ना?' (फा.पंज,का.)

पंचकमेटी (स्त्री.) न्यायनिवाडा करणारी समिती. 'एकटा जीव. अदेवळाच्या **पंचकमेटीनं** त्याला राहायला एक खोली दिली.' -काळी.९१.

पंचनामा (पु.) घडले त्याचे वास्तव, जसेच्या तसे लिहिणे. 'गावात खून झाला. **पंचनामा** कऱ्याले पोलीस आले.' (सं.पंच,फा.नामः दस्तऐवज, का.पंचनामे)

पंचमी (स्त्री.) नागपंचमी. 'मांगल्ल्या साली **पंचमीले** माया हातानं भीताळावर नागाचे चित्रंगं काहाळले होते.'

पंचर (न.) चाकातील हवा जाणे. 'अबे तुमच्या गाळेईपेक्शा माई बंडी बरी. कधी जलमात **पंचर** नाई होत.' (इं.)

पंचाई (पु.) एक जात- लोहार. 'झिंगाभोई, वडर, **पंचाई**, पिंजारी, फासेपारधी सारे कुंभाराला काका म्हणतात.' -फीर.११. '**पंचायाचं** पाल बजारात.'

पंचाईत (स्त्री.) अडचण, द्विधास्थीती. 'नाहीं पुराणाची प्रीति। ठायीठायी **पंचाइती**॥' -तुका.४२३२. 'दोघाच्या भांडनात आपली मोठी **पंचाईत** होते कधीकधी.'

पंचारती (स्त्री.) पाच दीपांची आरती. 'वा वाऽऽ असं करतूत केल्यावरतं तुमची **पंचारतीनं** आरतीच काहाळा लागीन.'

पंजा (पु.) १. हाताचा पंजा. 'कोरकूच्या हाताचा **पंजाबी** ह्या खपाट्याचा खपाट्या रायते.' २. पत्यातील पाच ठिपक्याचे पान. '**पंजा** आला तं माई परेल लागते लेक.' (फा.)

पंदा(धा)ळ (न.) एक गवत. हे गवत ढोरं खात नाहीत. 'पिकात कंबरे एवढं **पंधाड** झालं उपटाले पैसे देऊन मजूर येत नाहीत.' -खुं.५

पाऊ (स्त्री.) जात्याचा एक भाग. 'लायन्या जात्यावर दयतो मायलेकी/ चंदनाची **पाऊ** भरली एकाएकी.' -लोक.१९१.

पाऊपाऊ (क्रिवि.) पाहूपाहू. 'तुही वाट **पाऊपाऊ** जीव थकला वाकला/ मैदीच्या पानावर सारा हिसोब चुकला.' -नांबै.

पाऊलसगर (पु.) पायवाट, लहान रस्ता. '**पाऊलसगरानं** गेलो तं लवकर जानं होईल.'

पाऊळ (न.) पायातील बोटांच्या आधारे तागाचे दोर विनणे. 'कामाची काहूर/ शेटाचे घालते **पाऊळ**.'

पाक (पु.) गोड द्रव. 'गुळपट्टी कऱ्याले दोन किलो गुळाचा **पाक** केला.' (का.पाक,त.पागु)

पाकोई (स्त्री.) १. फुलाची पाकळी. 'बुहाऱ्याखानीचेईनं सकाऊनच झाळाचे फुलं नेले. आता देवाले वायाले फुलाची **पाकोईबी** नाई.' २. भिरभिरणारा एक पक्षी.

पाखं (न.) कवेलू घराची एक बाजू, पक्ष. 'कवलं फेराचे येवळे पयसे सांगता काय राजे हो. येक **पाखे** घराचे?'

पाखंड (वि.) सोंग ढोंग वरपांगी. 'तपश्चर्या मनोरथा। **पाखंडियावरी** आस्था।' -ज्ञा.६.१६७. 'आंगी भरुनिया **पाखांड**। नास्तिकपणाचे हाड॥' -ज्ञा.१६.३१५.

पाखडी (स्त्री.) वृक्षविशेष. 'त्याईनं तिथीसा **पाखडीच्या** झाडाच्या सावलीत बसोलं.' -दि.२७.

पाखरू (न.) पक्षी. '**पांखीरूं** मारिलें म्हणेः' -गोवि.२५३.

पाखळनं (क्रि.) साफ करणे. 'एक कशी **पाखडी**। दुसरी निवडी।' 'बाईले हेच काम- निसनं, टुसनं, **पाखळनं**, दयनं, रांधनं.'

पाखळपुखळ (न.) साफ करण्याची क्रिया. 'मांगीन म्हन्ली का सळासारोन, निसटूस, कांडकुंड, काई **पाखळपुखळ** हे तं आस्ते आस्ते आलंच.' -लेक.२६.

पाखळापाखळ (स्त्री.) साफ करण्याची क्रिया. 'लगनाच्या दयनाची **पाखळापाखळ** झाली अन् रुखवताचं सामानबी झालं.'

पाखळेल (वि.) पाखडलेले, साफ केलेले. '**पाखळेल** गहू अल्लंग ठुजा. नाईतन करसान येकात.'

पाखोटं (न.) पाखे. 'भलीमोठी वावटळ आली झोपडी समोरचं एक **पाखोटंच** उलथून दूर फेकलं.' -फीर.२४३. (सं.दक्ष)

पागलपना (पु.) वेड्यासारखे वागणे. 'बाबू, असा **पागलपना** काहाले करतं पऱ्हाटीत कोन सोयाबीन पेरते काय?'

पागो(टं)टी (स्त्री.) फेटा. 'गांवींची आंडोरें गोसांवी बारवेसि बीजें करीतिः आंडोरें नेऊनीं **पागोटीं** थडीएसि ठेवीतिः' -गोवि.१५९.

पागोर(रा) (पु.) अंकूर, नवी पालवी. 'तृणांतीचा **पांगोरा**। वरी पैं गा॥' -ज्ञा.१५.४७८. 'वायल्या झाडाले **पागोरा** फुटाव तसा होनार नाई होणार नाई करता करता तिले पोरगा झाला.' -लेक.४७.

पाचक (न.) पचनक्रियेस सहाय्यभूत. 'बाप्पा, लयच डक्कर देऊन रायले **पाचक** देऊ काय?'

पाचकट (वि.) बेचव. 'तिचं वागनं, बोलनं असंच रायते **पाचकटलीचं**.'

पाचताळ (वि.) पाच माळे. 'माणसं जर बारचलवादे असले त काय उभ्यानं फुकून देयाचं **पाचताळाचं** घरं?' -पख.४८.

पाचपांड (पु.) पाचवा पाय काढणे, घातक वागणे. 'लग्नाले वरीस झालं नाही आजून आन काढले त्यानं घरादाराचे **पाचपांड**.' -सेल.२२.

पाचपोच (पु.) वागण्याबोलण्याची योग्य जाणीव. 'भादऱ्या लोकाले बोल्याचा काही **पाचपोच** नसते.'

पाचर (स्त्री.) भेगीत ठोकलेला लाकडी तुकडा, आडखुटी. 'खुटा ठोका **पाचर** ठोका/ जातं मातर दयतं ठेवा.' -काया.२९. 'दिवसे दिवस त्याचं मांगं चाल्ल खाचर/ चाक झालं वांढाय मारूमारू **पाचर**.' -मिर्झा.१०४.

पाचरनं (क्रि.) १. पाचर ठोकणे. 'जात्याचा ढिल्ला खुटा **पाचरनं** पळते. २. खरडपट्टी काढणे. 'तुक्याच्यानं काम बयेकलं त म्या त्याले भल्ले **पाचरलं**.'

पाचसहाक (वि.) पाचसहा. 'दोन लेकरात सतरा अठराचा येसोंता अन् **पाचसहाक** वर्साची लायनी पोरगी सीली.' -सित.३१.

पाची (स्त्री.) जन्मानंतर येणारा पाचवा दिवस. 'पाट्या-वरोट्यावर कायकाय ठून **पाचीची** पुंजा केली जाते.'

पाची (क्रि.रूप.) पाहण्याची. 'आमच्या खानदानाची रीतच होती ईस वर्सानं पोराचं मुख **पाची**.' -हज.२५.

पाचुळा (पु.) पाला. 'डांब्यात जाईल पण आंगाले **पाचुळा** नाही लागू देयाची.' -सेल.१५.

पाचोई (स्त्री.) पान. 'जोंधयात जाते पन **पाचोई** लागू देत नाई आंगाले.'

पाजनं (क्रि.) पाजणे. 'बारा वाजून गेले. आता तं बैलाले पानी **पाज**.'

पाजवत (क्रि.रूप.) धार लावत. 'मिटे नाही खाज मी बसो खाजवत/ बोथट पास खात्यावानी **पाजवत**.' -मिर्झा.१४८.

पाजवनं (क्रि.) धार लावणे. 'केळाजी खरपाच्या गोट्याला इवा **पाजवत** होता.' -ना.१७. 'आलंच एखादं खुरपं भात्यावर तं खाती बुवा चारआठ रोज **पाजवत** नाही.'

पाजी (वि.) बदमाश, नीच, अधम, हलकट. 'सोयरा तं असा **पाजी** भेटला राजा, दा दोराईनंबी बांधोल्या जात नाई.' (फा.)

पाजोनं (क्रि.) धार लावणे. 'गोट्यावर कोपई लागल्यानं धार बसली तिची. **पाजोनं** पळते तिले आता.'

पाजोयाले (क्रि.रूप.) धार लावावयाला. 'खाती बॉ जोळ कुऱ्हाड, इवे, पासा **पाजोयाले** लोकाईनं आनल्या.'

पाजोयेल (वि.) धार लावलेले. '**पाजोयेल** इवा हाय भाऊ, मासी बसली का दोन तुकडे होतात.'

पाझर (पु.) झरा. 'इरीले मस्त **पाझर** लागल्यानं पानी

खंडतच नाई.'

पाट (पु.) १. नाला. 'एकु दी देमाइसे झोळी धूआवेया **पाटासि** आलीः' -ली.४३३. 'बांधल्या तळ्याचा फुटलासे **पाट**। ओघ बारा वाटे मुरडताती।' -नाथ. २. पुनर्विवाह, दुसरे लग्न, मोहतीर. 'पमी असी हेंबाळी, दुसरपनी कोन लाईन तिच्यासी फुकाफुकी **पाट**.' -सित.६३. ३. सलग पिकात बरबटी, भेंड इ. टाकतात तो भाग. 'ज्याच्या त्याच्या वावरात बरबटी, भेंडी, वांज़ाच्या शेंगाचा **पाट** राये.' ४. पिढे. 'मा घरोघरी **पाटपीढी** बैसो घालीतिः पाए धूतिः टीळे करीतिः' -ली.५०. (फा.पात-चोईंग) ६. अवजाराची पाटली.

पाट (स्त्री.) पहाट. '**पाटपासून** काई खाल्ल नाई...भाकर दे मावशी राच्ची.' -खुं.२५८.

पाटं (न.) पहाटे. 'वावरात जाले **पाटंच** मी घरून निंगतो.'

पाटकर (वि.) पुनर्विवाह करणारे. '**पाटाच्या** धांगडीला **पाटकर** म्हणू नका/ सुखी लगनाचा जोडा तिच्या कपाळी पारखा.' -लोक.८२.

पाटगाळं (न.) लहान मुलाचे तीन चाकाचे लाकडी खेळणे. 'रामगोपाल महाराजच्या जत्रेतून लेकराले **पाटगाळं** इकत आनलं.'

पाटपिळं (न.) पिढे. 'ते वळी विजयश्रियेच्या पाटी। एकुचि बैसे॥' -ज्ञा.७.१२. 'आल्यागेल्या पावन्यारावन्याई-साठी घरात **पाटपिळे** तं पायजेच राजा.'

पाटली (स्त्री.) १. बांगडीचा चापट प्रकार. 'हातात चांदीच्या **पाटल्या**, दंडात वाक्या, कानात झुंबरासारखे चांदीचे झुमके.' -झेल.२०. २. लाकडाची फळी. 'दोन **पाटल्याच्या** भेगीत विळा खुपसला.' -ना.१३४. (त.पाट्टिल,का.)

पाटा (पु.) १. चटणी वाटण्याचे दगडी साधन. 'काई जिमीन हितभरावरचं **पाटा** हाय, फरशीवानी.' -दि.५५. २. पऱ्हाटी तुरीच्या ओळीत चवळी, भेंडी इ. पेरण्यासाठी ओल असलेली जागा.

पाटानं - भाव, वृत्ती. 'आपण भोळ्या **पाटानं** पखाल द्यायला जावावं अन् आपल्यावर भलताच आळा घ्यावा.' -पख.१८.

पाटारेडा (पु.) क्षुल्लक, शिल्लक वस्तू. 'होता नव्हता तो **पाटारेडा** विकून काही ताडामोडा केला.' -कात.५७०.

पाटावरोटा (पु.) वाटघाट करण्याची दगडी साधने. '**पाटेवरवंटे** वस्तुमात्रालागीं। जीव त्या प्रसंगीं येता झाला।' -नाथ.२५. 'मसाला वाट्याले **पाटावरोटाबी** नाई घरात.'

पाटी (स्त्री.) १. डाले, टोपले. 'गोसावी तेयाचीए डोइएची पाटी उतरिलीः' -ली.४७६. '**पांटीए** कापुसाचें पाहाळ होतेंः' -गोवि.९. २. फळी. 'बंडीची येक मुळेल **पाटी** बसोयाचे वाळ्यानं दोनशे रुपये सांगले.' ३. निरगुळीचे टोपले. '**पाटीभर** शेव्ह्या वावू घातल्या होत्या बुहाऱ्या कुत्र्यानं तोंड लावलं.'

पाठीपोटी (न.) भावंड व अपत्य. 'आह्मीं आतां वडील धाकुटी। नाहीं पाठी **पोटी** कोणी दुजे॥' -तुका.१५.१.

पाटील (पु.) गावचा प्रमुख कारभारी. 'कोपला **पाटील** गांवचे हे लोक। आता घाली भीक कोण मज॥' -तुका.६७२.

पाटीलकी (स्त्री.) पाटलाच्या वृत्तीने वागणे. 'पंगतीत अती वाळ, तती वाळ अशी **पाटीलकी** कऱ्याले सांगाव फक्त.'

पाटोडी(ळी) (स्त्री.) बेसनाच्या वड्या टाकून केलेली भाजी. 'तेला भरली साटोडी/ केली उत्तम **पाटोडी**.' -लोक.३६.

पाट्ट (वि.) अपक्व. 'फय कितीई पोकलं आन् आपून आंदीच तोळ्ळं तं अंदरून **पाट्टुंच** निंगते. ज्यास्त दिवस लावले तं अंदर इखरते.' -सुखो.२१.

पाठ (स्त्री.) १. बकरीचे स्त्रीजातीय पिलू. 'बजाराच्या दिसी दोन्ही बकऱ्या अन् **पाठ्ठा** इकून टाकल्या.' -लेक.७५. २. पाठ. 'कोनाच्या **पाठीवर** मारावं पन पोटावर मारू नाई.'

पाठ (न.) १. पाठांतर. 'दोन कविता **पाठ** केल्या कालपासून.' २. धडा. 'मुलांनो 'आई' हा **पाठ** आता सुरू करू.'

पाठकुळी - पाठीवर. 'मनाच्या सुतानं लेकरं झाल्यावर तं कोनी मानीवर, कोनी **पाठकुळीवर** बसीनच.'

पाठकोई (स्त्री.) पाठीवर बसविणे. 'हे माते **पाठकुळीए** वाउनि पाणीयावरि चालत घेउनि आलेः' -ली.२०२. 'सोभागाते **पाठकुळीए** घालुनि आणाः' -ली.३८१. 'एवळ्या मोठ्या घोळमीले **पाठकोई** बसोता? लान हाये का ते?' -अक.४५.

पाठचंपोटचं (वि.) भाऊ, मुले वगैरे. 'आपल्या मांगं **पाठचंपोटचं** कोनी नाई भाऊ.'

पाठपूजा (स्त्री.) मार. 'कौतिकला हसणाऱ्या भीमाची **पाठपूजा** केरून चूप बसवले.' -धग.९.

पाठमवरा (वि.) पाठीकडून उभा असलेला. 'जेथ भ्रू पल्लवा पडे गाठी। तेथ **पाठिमोरी** दिठी॥' -ज्ञा.५.१५२. 'कळों नये तों चि चुकवितां बरें। मग **पाठमोरें** काय काज॥' -तुका.३४८७.

पाठी (अ.) च्यामागे. 'गर्जत धावत **पाठी** सैन्य दंतवक्रु, जारासंदु वीरः' -मउ.२.

पाठीपोटी - मागेपुढे. 'तरी वस्त्रासि **पाठीं** पोटीं। नाहीं सुतावांचूनि किरीटी।' -ज्ञा.१४.३४९.

पाठून (क्रिवि.) मागाहून. 'तू पुढे होय मी **पाठून** येतो.'

पाठून (क्रि.रूप.) पाठवून. 'पोरगी तं कालच **पाठून** देल्ली सासरी.'

पाठोनं (क्रि.) पाठविणे. 'पंगती बसल्या ना. लेकराले **पाठोनं** ज्याले.'

पाठोयाले (क्रि.रूप.) पाठविण्याकरिता. 'तुमच्या घरी **पाठोयाले** मी काय येवळी हलकी दिसली का तुमाले?'

पाठोली (क्रि.रूप.) पाठविली. 'डमनी **पाठोली** सकाऊनच बईनीले न्याले.'

पाठुं (पु.) १. चाकाच्या धावे आतील अर्ध वर्तुळाकार लाकडी तुकडा. 'चाक मुळं तं सबन **आरेपुठ्ठे** जमा झाले.' २. कुवत, ताकद, पाठ. 'त्याचं **पाठुंच** पायतो मी आता, किती दम आये त.'

पाठ्या (वि.) भाकड होण्याआधी अखेरी दूध देणारी. '**पाठ्या** म्हसीचं दुधई घट.' -लोक.११०.

पाड (स्त्री.) १. तुलना, योग्यता, बरोबरी. 'हे खरुज न खाजवी ऐसा कव्हणी देखोनाः विश्वामित्रे खाजवीलिः मा आमचा कवण **पाडः**' -ली.५६. 'द्रोणाचा **पाडु** न करी। भीष्माचे भय न धरी॥' -ज्ञा.११.४७२. २. झाडावर अर्धवट पिकलेले फळ. 'नाजूक फुलाच्या शेंदरीला गोड **पाड** गवसला नव्हता.' -कात.३५१. 'आंबराईतला एक ना एक आंबा पाडाला आलेला असायचा.' -खुं.२२७. 'अष्टमा सिद्धींचा कोण आला **पाड**। वागों नेदी आड कोणी तया॥' -तुका.१२३७.

पाडाय (क्रि.रूप.) पाडायला. 'लोकांनी त्याची टिंगल केली ह्यो आला आता देव व्हवून पाऊस **पाडाय**?' -वा.२२५.

पाढा (पु.) बाराखडीशी संबंधित क्रम. 'बे एक बेचा **पाढा** पाठ आय मावाला.' (त.वाय्पाडु)

पाणढाळ -? 'गुरूनं इद्या देली आपल्याले. **पाणढाळ** करत जाय म्हणले.' -सेल.२२२.

पात (स्त्री.) १. मजुरांची रांग. '**पातीवरच्या** पोरीबी मले नाही पटल्या.' -मिर्झा.१७८. २. पान. 'भाकरीसंग कांद्याची हिरवी **पात** आनजो संगं.' ३. खळ्यात मेढीभोवती फिरणारी बैलांची दावण. 'मध्ये मेड रोवून चऱ्हाटाने एकाला एक बांधून बैलाची **पात** तयार करायची.' -ज.१०.

पातं (न.) नवीन पान. 'तैशी **पातियांचिये** कवळिये न समाये॥' -ज्ञा.६.१६७. २. **पाते**, लोहपट्टी. 'हे चाकूचं **पातं** धारदार आय.' ३. गयपाताचा खालचा भाग.

पातणी (स्त्री.) पापणी. 'तिला पाहून बाजूस उभा असलेल्या तरुणाच्या डोळ्याची **पातणी** जराही हालत नव्हती.' -कात.१४.

पातय (वि.) १. द्रव, पाण्याचा अंश अधिक असणे. 'दाय लय **पातय** झाली वं, घट लागत व्हती जरा.' २. लुगडे. 'माय माय आज तू जरीचं **पातय** नेसली जशी.'

पातयरोटी (स्त्री.) गव्हाच्या कणकेपासून उलट्या घमेल्यावर केलेल्या पोळीचा पातळ प्रकार. 'रसा संगं जेवायले पोया, **पातयरोट्या**, मांडे काय न काय.' -डेबू.५५.

पातर (न.) पात्र, पत्रावळी. 'पूजेसाठी पुन्हा आवाज दिला, **पातर** भरा आत्या.' -रा.३६. 'कुळ पाहून मातर पोट पाहून **पातर**, जावयाले सतरंजी सायाले पोतं आथर.' -मिए.४८.

पातळ (न.) लुगडे. 'पाय माय, लेकीनं कसं साजर **पातळ** घेतलं बयना.' 'माह्या दाराहुनी गेली **जरीपातळाची**, माळ गळा पुतळ्यांची.' -लोक.२७. (का.पत्तळ)

पातळी (स्त्री.) एक लोखंडी अवजार. 'कुऱ्हाड, वाकस, करवत, किकरे, **पातळी** इ. अवजारे आणून कामठ्यावर ठेवली.' -सेल.१४४.

पाती (स्त्री.) पऱ्हाटीला लागणारे फुलापूर्वीचे कोवळे बोंड. 'पऱ्हाटीले **पाती** तं लयच लागली बाप्पा, कोनता फवारा मारला?'

पातोडी (स्त्री.) एक मसाल्याची भाजी. 'पोरगी पसन असल्यामुळे सारे फुरक्या मारूमारू **पातोळीची** भाजी जेवले.' -तित.७.

पातोन (न.) पऱ्हाटीला आलेला पान, फूल, बोंड्यांचा बहर. 'पऱ्हाटी मस्त **पातोनावर** आली.'

पातोळा (पु.) पोपडा, पापुद्रा. 'तैसा आहाच वरी कोरडा। त्वचेचा असे **पातवडा**॥' -ज्ञा.६.२५२.

पातोळी (स्त्री.) भाजीचा एक प्रकार. 'जिजीले **पातोळीच्या** भाजीले फोळनी देयाचं सांगतलं.' -भं.६२.

पाथ (स्त्री.) १. पिकांच्या दोन ओळीतली फट, रिकामी जागा. २. निंदायला घेतलेले तास. 'साधीभोई माही माय **पाथ** निंदत चालते/ पिकं साजरं पाहून मनी बंगले बांधते.' -नोका. ३. मजूर स्त्रीपुरुषांचा समूह. 'आवघे मोलकै **पांथैसि** लाविलेः चणेयाचीए **पांथेसिः**...एराचिया **पांथा** चालतिः गोसावीयाची पांथ राहिलीः' -ली.५९. ४. मळणीच्या वेळेस एकानंतर एक बांधलेले बैल. '**पाथीतला** मेळीजोळचा बैल चांगला पायजे मंग बाकीचे कसेबी चालतात.'

पाथर (न.) शेतातील गवत. '**पाथर** पाय ससा कसा खाऊन रायला.'

पाथरवट (पु.) दगड फोडणारी जमात. 'दगळातून जाते, पाटे, मूर्त्या घळोनारे **पाथरवट** हायत आमच्या गावात.'

पादनं (क्रि.) पादणे. 'तोंडे खाये फार। **पादे** बोचा करी मार।' -तुका.१६१५. 'निजसेजेची अंतुरी। **पादलिया**

कोण मारी॥' -तुका.३९७२.

पादरं (वि.) भित्रा. 'कायलेबी भेते. लयच **पादरं** हाय लेकाचं.'

पादरं मीठ (न.) काळे मीठ. '**पादरं** मीठ आनलं निंबाचं शेरबत कऱ्याले.'

पादरघाई (स्त्री.) उगाच घाई. 'थांबनं आजच्या रोज, येवळी **पादरघाई** काहाले करून रायली.'

पादरफुसक्या (वि.) १. भित्रा. 'हात **पादरफिसक्या**? त्याहीच्या गावात आहो म्हनून भेतं का?' -सि.३१. २. पोचट. 'चढवत राहा **पादरफुसके** हल्ले.' -गागा.

पादरा (वि.) १. पादणारा. '**पादरा** हायस का बे, निऱ्हा पादत रायतं?' २. भित्रा. 'दाम्या लयच **पादरा** हाय. सळ्ळ्यालेबी भेते.'

पादऱ्या - भोकाचा वि. भित्रा. 'एका नेमें कोठें दुसरा पालट। **पादिर** तो धीट ह्मणती त्यासी॥ -तुका.३५७७. 'अरे म्हना, **पादऱ्या** भोकाचे हो. आता निंगना घराच्या भाईर लपता काहून आता?'

पादवनं (क्रि.) मारझोड करणे. 'काल एवढं **पादवलं** भडव्याले तरी अज भेटलच म्हंते तुले.' -पोळा.

पादवून (क्रि.रूप.) मारून, झोडून. 'चोर मालूम अस्ते मले त ऐकेकाले धरून म्याच **पादवून** नसतं का काहाळलं त्याईले?' -ज.५२.

पादेल (वि.) पादलेला. 'कोनीतरमा **पादेल** हाय. लयच कुयट वास येऊन रायला राजे हो.'

पादोनं (क्रि.रूप.) खूप मारणे. 'तुमच्या देव मानसाच्या खोळ्या केल्या तं माही माय **पादोनार** नाही मले?' -डेबू.२४.

पादोयाले (क्रि.रूप.) मारायला. 'रन्नावलं पोट्टं, साजरं **पादोयाले** पायजे.'

पादोयेल (वि.) मारलेला. 'म्या त्याले लयखेप **पादोयेल** आय.'

पान (न.) १. विड्याचे, झाडाचे पान. '**पान** नाई पान, त्यात माहा मन.' -वि. २. **पान** लागनं - सर्पदंश. 'तांबाकळस भरीलेः कावडीसि घातलेः घेउनि नीगालीः तंव **पान** लागलेः' -गोवि.१३१. (फा.पानः)

पानकोंबळी (स्त्री.) पाण्यात राहणारा पक्षी. 'जंगलात आता फक्त वान्नेर दिसतात. **पानकोंबळ्या** तं दिसतबी नाई.'

पानगा (पु.) आहारोळी. 'लोकाचं काईबी हो, आपला **पानगा** शिजला म्हंजे झालं.' (त.वोनगम)

पानगे (पु.) लहान पोळी. 'मिया अन् बिबी, घरात दोघच. दोन **पानगे** थापले की झालं मावलीच काम.' -पख.१६.

पानगोबी (स्त्री.) एक भाजी फूल. 'सकाऊन आलूची अन् आता **पानगोबीची** भाजी केली.'

पानचट (वि.) १. चव नसलेले. 'भाजी निरानाम **पानचट** लागून रायली.' २. अश्लील. 'लयच **पानचट** मानूस दिसून रायला. बायाईच्या सामने माजेल बोलते.'

पानचोपन (वि.) पाणी धरून ठेवणारी- जमीन. '**पानचोपनची** जमीन असल्यानं ओवानी लवकर नाई येत.'

पानठेला (पु.) पानाची लहान दुकान. 'खऱ्याचा गुटख्याचा जसा **पानठेला**.' -मिर्झा.१७.

पानताडं (न.) विड्याच्या पानांचे शेत. 'गावा भवताल सबन **पानतांडेच** आयेत.'

पानपुडा(ळा) (पु.) पानाचा पुडा. 'सोन्याचा **पानपुडा/** लाडकी देते विडा.' -लोक.१०४. 'ही सुकली पाने उघड पहा **पानपुडा**.' -भीक.२७.

पानफसन (वि.) पावसाच्या पाण्याने ज्या जमिनीत पाय फसतात ती. पाण्याचा निचरा न होणारी जमीन. '**पानफसनच्या** वावरातनी जिपसन खत टाका लागते लेक.'

पानफुखनी (पु.) एक खेळ. 'लानपनापासून आपून लफाछप्पी, **पानफुखनी**, नवराबायकोचा खेये खेवो का नायी?' -दि.३२.

पानपिशी (स्त्री.) दाणे नसलेले कणीस. '**पानपिशी** ते जवारीनं, तूर खाल्ली खुरपळीनं, येनं रे पावसा येनं.' -पाव.

पानबाई (स्त्री.) स्त्री अलंकार. 'आईबाई नाळवली, **पानबाई** घळवली.'

पानबीबी (स्त्री.) चिबाडीतील गवत. 'थंळी पळ्ळी का **पानबीबी** माजते अन् पीक मार खाते.'

पानभरे (वि.) पाण्याने डबडबलेले. 'मायच्या डोळ्यात पाणी आलं माझेही डोळे **पाणभरे** झाले.' -फीर.१३४.

पानवटा (पु.) नदीवरील धुणे वगैरेसाठीची जागा. 'बोभाट वेसदारा जाईल। बायकांच्या **पाणवठ्या**।' -नाथ.१८६५.

पानसरवा (पु.) सरवा वेचल्यानंतरही उरलेले शेतातील धान्य. 'घरच्या बायाईनं **सरवा** येचला अन् पानसरवा तसाच राऊ देल्ला.'

पाना (पु.) पान्हा. 'मोटका **पान्हा** ए आणि ते जाणे तें भुकैलें असैलः' -दृ.३८.

पानावनं (क्रि.) गाय, म्हैस दूध देण्याच्या अवस्थेत येणे. 'वासरू उपाशी असलं का गायले **पानावनं** पळतेच राजा.'

पानी (न.) पाणी. '**पानी** पाहाव मंग पोहाव.'

पानीबाज (वि.) पाणीदार, कर्तबगार. 'पानी मारनं कोनाचं

पानीबाज काम नाई/ पानीदार डोयातई उरलेला राम नाई' -नोका.

पानेरी (स्त्री.) पाणपोई. 'पानी पाजनं हा धर्म असते म्हनून मोठेमोठे लोक **पानेऱ्या** लावतात.' -डेबू.४८. २. लग्नातील व्याह्यानी पाय धुण्याचा विधी. 'अबे लेका, लगन काहाचं लागलं. आजून तं **पानेरीच** बाकी हाय ना?'

पानोई(ळी) (स्त्री.) नदीकाठचे गवत. 'घराचं छप्पर **पानोईनं** छाकारलं होतं.'

पानोठा (पु.) पाणवठा. 'तंव **पाणिवठाचिया** बाइला पुसो लागलीयाः आजि लवकरि आलीयातिः' -ली.२२८. 'सावळापुरी गोविंदप्रभुची लेकि होतीः ते पाणीया गेली होतीः तेथ **पाणिवठा** आईकीलेः' -गोवि.१९. 'देवाच्या विभुती न पाहे सर्वथा। करी **पानवथा** नेत्रभिक्षा॥' -तुका.४२७४. 'काल **पानोठ्यावरती** बाई गेली मी पान्याले.' -काया.११.

पान्चटपना (पु.) सैल, स्वैर वागणे. 'चाल **पान्चटपना** नको करू कमिना. नाई तं देईन एक होतकाळीत ठेवून.' -धग.१६६.

पान्हा (पु.) पान्हा. 'तीची चुची त्याचा तोंडी घातली आणि त्रहाटीत **पान्हावो** आलाः' -गोवि.८. 'पाजुं आतां पान्हा कोणालागीं।' -नाथ.२-११७. 'वोसंडतो **पान्हा** नित्य नवा।' -नाथ. ४३१.

पापड(ळ) (पु.) उडीदमुंगाचे तोंडी लावणे म्हणून केलेला पातळ पोपडा, पोळी. 'तो **पापड** उन्ह करुनि ओळगिविलाः' -ली.५८५. 'भाकर अन् **पापळाचा** खुळा आनला शिदोरीवर.' (का.पप्पळ, हप्पळ, त. पप्पडम्)

पापडकूट (न.) पापडाचे कूट करून केलेला एक पदार्थ. 'सकाऊनच मस्त **पापडकूट** खाल्लं तिखटवखट.'

पापडी (स्त्री.) बेसनाचा एक खाद्य पदार्थ. 'येक छेटाक **पापडी** खाल्ली, हटेलातनी.'

पापुडा (पु.) पापुद्रा. 'पान्याचा सळा टाकून वसरीतले **पापुडे** काळून टाकले.'

पापा (पु.) मुका. 'बाबू, येक गोळगोळ **पापा** देनं?' (का.)

पाय (क्रि.रूप.) पाहा. 'पायन्यातून काहाळली त पोट्टी **पाय** केवढी टेंभलून राह्यली.' -धुम्म.

पाय (पु.) पाऊल. 'देवळातनी जाताना **पाय** धून जाऊ.' (का.)

पायउचल (क्रिवि.) निघणे, चालू लागणे. 'काय ऐकाचं त्याचं? असं म्हणून मी एकटाच **पायउचल** झालो.' -खुं.१८१.

पायखाना (पु.) संडास. 'वाड्यात पाव्हने खूप पन दोनच **पायखाने** हुते.' -दि.२.

पायखुटी (स्त्री.) गुराच्या मान व पायाला बांधलेली दोरी. 'बिचाऱ्या गायीला गच्च दाव्यानं **पायखुटी** घालतोस.' -शा.८०.

पायखुरी (स्त्री.) गुरांच्या पायाला होणारा एक व्याधी. 'बैल **पायखुरी** आले, महा वढून वखर.' -गाक.३१. 'बैल **पायखुरी** आल्यानं लंगळत चालून रायला.'

पायखोरी (वि.) पाय ओढणारा, तोट्यात आणणारा. 'वावराच्या **पायखोरी** धंद्यात कितीभी हातपाय ताणले तं रिंगणा बाहीर जातच नाई उडी.' -खुं.२०९.

पायगून (पु.) अस्तित्वाचा बरावाईट परिणाम. 'सुनबाईचा **पायगून** भाग्याचा लागला. पाय केवळा कापूस पिकला औंदा.' 'गंग्या आला अन् लाईन गेली. पाहा त्याचा काय **पायगून** आय तं.'

पायगोवा (पु.) पाय गुंतवून ठेवणारा व्याप, बंधन. 'संसाराचा **पायगोवा** ठेऊन परमार्थाचा ठेवा हाती लागत नाही.' -कात.२०.

पायघोय (पु.) जमिनीपर्यंत आलेले नेसू. 'पोरी, लुगळं साजरं **पायघोय** नेसाले पायजे.'

पायजा (क्रि.रूप.) बघाल. '**पायजा** बरं निप्पक निघालं का नाई तं?' -पागो.३१.

पायजात (क्रि.रूप.) पाहिजेत. 'वैनी पोराइकळच्याईची अशी येवस्था करा का ते खुसस झाले **पायजात**.' -हज.२०.

पायजामा (पु.) पैरण. 'नीळ लावेल मनीला अन् **पायजामा** घालून निंगलो.'

पायजीब (स्त्री.) पायातील दागिना. 'खुळखुळवी **पायजिबा** बसलिस का धरुनि दबा.' -भि.७९. 'पायात **पायजीबा** बांधीन चांदराती.' -मा.६०. 'बैलाईले **पायजीबा**, तोडे, पिंपळपान, सर्वा चांदीचा साज राहे.' -दि.७१.

पायजे (क्रि.) पाहिजे. 'पैशाची काय गोठ हाय रे. आपल्याले सनक **पायजे**.' -ना.११८.

पायजेत(न) क्रि.रूप. पाहिजेत. 'सोड म्हटलं ना? देवीच्या देवळात असे ढंगरे ना **पायजेत**.' -सि.५९. 'रायत्याचे आंबे कसे आंबटडक **पायजेन**, साजरे दात आंबाले पायजेन ना?' -दि.३.

पायजो (क्रि.रूप.) बघशील. '**पायजो** बाप्पा, गाळी आनशील आंगावर.'

पाय(ये)ट (स्त्री.) पहाट, सकाळ. 'राती मांगून **पायट** आली, दुखल्या मनाले ढिवसा देऊन गेली.' -भू.८५. 'तुया पायानं **पायेट** सयसध्याकाई येते.' -काया.१६.

पायटवा (पु.) सकाळीच जागे होणे. 'शेनपानी करा लागते तं सकाऊनच **पायटवा** येते.'

पायटांगी (स्त्री.) १. पायी चालणे. 'बससाठी पैसे नाहीत. चला आपली **पायटांगीच** बरी.' -कावू. २. लहान छकडा, रेंगी. 'आपली **पायटांगी** बरी. बैलं जुतले का निंगले.'

पायठुनी (स्त्री.) पाय ठेवण्याचे शिडीचे लाकूड. 'भीतीवर चळ्याले पायठुनी **पायजत** होती राजा.' (का.)

पायतं (क्रि.रूप.) पाहा. 'कोन आलं बाहीर **पायतं** बाबू.'

पायतं (न.) बाजेची पायाकडील बाजू. 'एकि उसिसा सगडीः एकि **पाइता** सगडीः' -ली.४३९. 'तुटकी भेटते खाट तिले **पायतं** नाई/ कधी येते बायको कधी येत नाई.' पाव.

पायतदार (पु.) पाळत ठेवणारा. 'आमच्या **पायतदाराच्या** तोंडाची शियं आली तसं मंग आमी तट्ट्या पयालो.' -दि.४८.

पायतो (क्रि.रूप.) पाहतो. 'कोन काय करते ते मी **पायतो**.'

पायथं (न.) बाजीचा पायाकडील भाग. 'धार दिधलीः **पाइता** करा फोडिलाः' -गोवि.१३८.

पायथार (वि.) पाय थारेल असी -जमीन. 'पानी पळून आठ रोज झाले तरमा पाय फसतात. **पायथार** नाई झाली अजून.'

पायथ्याशी (क्रिवि.) पायाच्या बाजूने. 'सेवा करन्यात आपून पटाईत. बिमार अन्नाच्या **पायथ्याशी** असतो.'

पायदनी (क्रिवि.) पायाखाली तुडवण्याची क्रिया. 'अन्नधान्य असं **पायदनी** तुळू नाई बाबू.'

पायधुनी (स्त्री.) पाय धुण्याचा विधी. 'नवरीकडच्या मंडळीने नवरदेवाच्या वऱ्हाडी मंडळीची **पायधुनी** करून गुलाल लावून स्वागत केले.'

पायनं (क्रि.) पाहणे. '**पायनं** माय केवळा मोठा लालभळक सरप हाय वऽऽ.'

पायना (पु.) पाळणा. 'झानू पोरक्या पोराले **पायन्यात** घालत हावो असं बनाबुडीले वाटे.' -सित.७७.

पायनासी (स्त्री.) उघळ्यावर शौच्यास बसावयाची जागा. 'काळी पायजे माय हाती. **पायनासीत** निऱ्हा डुकरंच झाली.'

पायनी (स्त्री.) मुलगा, मुलगी पाहणे. '**पाहेच्याच** अगुदर राग करे तिचा बाप/ घरी जलमली पोट्टी केल्त कोन्तं पाप?' 'पोरीची पयली **पायनी** झाली. आता काका अन् मामा जातीन पाह्याले.'

पायनीतली (वि.) पाहिलेली, परिचयातील. '**पायनीतली** त वाट आये. बात त पोहोचू जाऊन.' -धग.१२

पायपांड (स्त्री.) बैलाची थोडी गतिमान चाल. 'बैलाले दोर लावला की वजेवजे पाय टाकनारा **पायपांडावर** येते.' -डेबू.५६.

पायपीट (स्त्री.) खूप फिरणे. 'गाय मोकाट गेल्यानं सकाऊनपासून **पायपीट** झाली लेक.'

पायरस्ता (पु.) पाऊलवाट. 'इतल्यात **पायरस्त्यानं** मले गोंडाचा देव्या येतानी दिसला.' -जटा.६७.

पायरा (पु.) १. प्रहरी. 'मी आता **तिसरापायरा** घरी यीन.' २. पार. 'नवरदेव वाजत गाजत मारुतीच्या **पायरावरतं** आला. आहेर झाले.' -दि.१९. ३. पाया. 'भितीच्या **पायऱ्यात**, गोटेच जीरवते.' -मिए.२४. ४. पहारा.

पायरो (पु.) मुलाला होणारा एक रोग. 'चाल धावत गळनी दीठ तान्ह्याले लागत, पाय गलीचे आपुले **पायरो** होईल त्यात.' -भू.२२. 'दिठावली असन लेक **पायरोमायरो** काहाळून पाहाचा होता का नाई.' -धग.७१.

पायली (स्त्री.) पाच किलोचे माप. काही ठिकाणी धान्य मोजण्याच्या दोन, चार, पाच किलोच्या मापाला **पायली** म्हणतात. दोन किलोच्या **पायलीला** 'लायनी पायली' म्हणतात.

पायवा (पु.) पाया. 'उभे तेईचे महाल रंगरंगाई करून/ **पायव्याच्या** दगडाले देती माती पांघरून.' -ऊ.३९. '**पायवाच** खोदनं झाला नाही माडीचा, पेरलच नाही वखत उलंगवाडीचा.'

पायवाट (स्त्री.) पाऊलसगर. 'रिगे आसताचिये **पाऊलवाटे**॥' -ज्ञा.६.५५. '**पायवाटेनं** जायचं म्हटलं की आलं पाय फसनं.' -ना.८१.

पायवासी (वि.) कुलटा. 'ज्याच्या त्याच्या खाली पळते **पायवासी**.'

पायसं (न.) बाजीचा पायाकडील भाग. 'बाज झाली विनून राह्यलं **पायसं**.' -मिर्झा.१४६.

पायसगर (पु.) पाऊलवाट. 'वावरातून पडलेल्या **पायसगराने** गागरा तुडवत तो जात होता.' -कात.१.

पायसर (वि.) तयार, जाण्यास लायक. 'गांजऱ्या सर्व्या जोळ्या **पायसर** हाय ना?'

पाया (पु.) भिंतीसाठी जमिनीत केलेली चर. 'जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं। खोल **पाया** भिंती न खचेसी॥ -तुका.३५०३. 'तीन फूट **पाया** खांदला अन् रेतीमातीनं भरून काहाळला.'

पायाऊ(ळू) (वि.) पायाकडून जन्म झालेला. 'सदैवा आणि **पायाळासी**ः जरी अंजन मिळे नेत्रांसिः तरी निधी दिसतीं तयासीः दृष्टीपुढेः' -ऋ.८०६. 'तेथ सदैवा आणि **पायाळा**। वरि दिव्यांजन होय डोळा॥' ज्ञा.६.४५८. 'जें **पाताळींचेंही** निधान। दावील कीर अंजन। परी हाआवे लोचन। **पायाळाचे**॥' -ज्ञा.१५.३४. 'धन फक्त **पायाऊ** मान्सालेच दिसते. त्याले काजय लावल की.'

पायाळनं (क्रि.) 'सारं शिवार **पायाळून** गेलं होतं.' -ल.४९.

पायी (अ.) मुळे. 'त्याच्या **नादापायी** बायजा त्याच्याशी अनेकदा भांडली.' -झिं.१०६.

पायीपायी (क्रिवि.) पायदळ. 'मामाजी घोड्यावर चाले, भासा **पायीपायी**, मुजरा का घेत नाही?' -लोक.५७.

पायेलदेखेल (वि.) नेहमीच्या पाहण्यातील. 'निमी आपली **पायेलदेखेल** आये. आपल्याले कबूल आये.' -सित.५८.

पार (पु.) १. हनुमांनजीचे मंदिर, ओटा. 'तव गाविचे लोक **पारी** बैसले होतेः' -ली.३३. २. प्रहर, पहार, दिवसाचा आठवा भाग. ३. समूह, गट. 'संत गाडगे बाबा यांचाही जन्म डेबू नावाच्या ढोरकी **पारात** अजून झाला नव्हता.' -गा.२६. ४. मागे पडणे. 'कोणतीही तोशीश न पोहोचता आमचा उन्हाळा **पार** झाला होता.' -फीर.११७. 'घडीले **पार** अन् कळाण्याले दुपार.'

पार (स्त्री.) गड्डा करण्याची बारीक व लांब लोखंडी दांडी. '**पार** देजा बरं तुमच्या घरची. खुटा ठोक्याले दर करतो.'

पार (अ.) पलीकडे. 'मार्केचे घर हरीजाधवाच्या घराच्या **पार** दुसऱ्या टोकाला.' -रा.१३.

पारखनं (क्रि.) परीक्षा, तपासणी. 'म्हणोनि फुडे। **पारखावे** खरे कुडे॥' -ज्ञा.८.२४२.

पारगं (न.) अर्ध्यादिवसाचे काम. '**पारगं** झाल्यावर बायका पुनः पाथंवर भिडल्या.' -मोच.२.

पारगंपारगं (क्रिवि.) कितीतरी वेळ, प्रहर. '**पारगंपारगं** नंबर लावून बसती आमची सून हापशीवर.' -त.१५.

पारगा (पु.) प्रहर. '**पारगालोक** माहा फवारणं व्हत नाही.' -पख.१०२. 'शेतातील काडीकचरा फणे गोळा करायला मजुरी **पारगाला** आस्तेर ज्वारी.' -सेल.२१३.

पारगी (स्त्री.) प्रहर, अर्धा दिवस. 'कोनी एक **पारगी** करते कोनी दोपारगी.'

पारथा (पु.) पारोसा, कालपासूनचा. 'अंबाबाई आज तं तुया **पारथा** धंदाई व्हुयाचा हाय. काई दुखते वाट्टे?' -लेक.७१.

पारधी (पु.) एक भटकी जमात, जात. 'जैसा कवळोनिया **पारधी**। घातेचिये संधी। आणि मृगाते बुद्धी। साधावया।' -ज्ञा.३.२१६. 'कसा एक एक डोळा बाई हरिणाई तुहा/ लप शिकारीले गेला **पारधी** बंधू माहा.' -लोक.५१.

पारनं (न.) १. उपासा नंतरचे भोजन. '**पारणे** तेही अलणी ताकभाताचे कीजेः' -ली. ३२५. 'दे रायारंका **पारणें**। आमोदाचें॥' -ज्ञा.१०.१२७. 'तें मज **पारणें** करवी आजी।' -नाथ. 'उपवास व्रत न करीं **पारणें**। रामकृष्ण म्हणें नारायण॥' -तुका.३४०१०. २. तृप्ती. 'घाली गा देवा आंग उघडेः हो देई डोळा **पारणेः**' -ली. ३२५.

पारंबी (स्त्री.) वडाच्या फांदीतून निघालेला दोरदोरीसारखा लांब अंश. 'वडाची **पारंबी** धरुनि गोसावी खेळु करीत असेतिः' -गोवि.७५. 'पिंपळा कां वडाचिया परी। जे **पारंबियांमाझारीं**। डहाळिया असती॥' -ज्ञा.१५.५८. 'झेंडा फडकत नाही त पडन झेंडी, जोर लावला **पारंबी** तुटो वा शेंडी.' -मिर्झा.७२. '**पारंबी** होजो लेका, वळाले देजो टोका.'

पारशी दोडका (पु.) एक फळभाजी. 'भंडाऱ्यात पोया अन् **पारशी दोडक्याची** भाजी होती.'

पार(री)स (पु.) एक गोल दगड. 'सरोसतीनं **पारिसावर** सुंठ उगाळली.' -भं.१३७.

पारसं (वि.) शिळे, पारोसे. 'का नित्य वाहतया गंगाजळा। **पारसेपण** आहे।' -ज्ञा.१०.२०२., 'मग हळूहळू **पारिसिने** पाणिये स्तर्पण करीः **पारिसीची** फुले वाहेः' -दृ.९४.४८. '**पारुशला** संवसार। मोडली बैसण्याची थार॥' -तुका.९७५.२.

पार(रो)सा (वि.) १. शिळा, जुना. २. आंघोळ न करता. 'आंग नाई धुतलं वाट्टे अजून, **पारसाच** आला का बे?'

पारावार (पु.) मर्यादा, अंत, शेवट. 'मग तीएचेया दूखासि काही **पारावारु** नाहीः' -दृ.९१.४६. 'तैसे विवेकाचिया गाठी। उभे ठाकलेया किरीटी। **पारावाराचिया** गोठी। करणे वेद॥' -ज्ञा.१५.५३७. 'मायबापाच्या आनंदाला तर **पारावार** नव्हता.' -फीर.५०.

पारी (क्रिवि.) जरड, धोड. '**पारी** आला दोळका भाजीचा ना बियाचा.'

पारिजातक (न.) एक फूल विशेष. '**पारिजातकाचं** झाळ असलं का सरपं येतात आंगनात.'

पारोळं (न.) तराजूतील दोन पारडी. 'एका पारोळ्यात कापूस एका **पारोळ्यात** वजनाचा गोटा.'

पाल (स्त्री.) १. भिंतीवरील प्राणी. 'ताट झाकून ठेव माय. भीतीवर पायनं केवळी **पाल** हाय वऽऽ' २. तंबू, डेरा. 'धर्माळाजवळ.. गाईच्या गोठाणावर **पालं** पडली होती.' -सि.९.

पालई (स्त्री.) पालवी. 'पानी पळलं का वठेल झाळालेई नई **पालई** फुटते.'

पालखंड (स्त्री.) मांडी मारून बसणे. 'गोसावीयापुढे **पालखति** घालुनि बैसलेः' -ली.४४२. 'पंगत बसली की पोरं **पालखंड** मारून बसलेच.' -डेबू.४२.

पालखट (स्त्री.) मांडी मारून बसणे. 'पान खाय म्हटलं तशी ती **पालखट** मारून बसली.' -धग.४३.

पालट (पु.) बदल. 'भूतमात्रासी सदयता। आणि **पालटु** नाही चित्ता। कवणे वेळे॥' -ज्ञा.२.२९८. 'नमन ते नम्रता अंगी। नेये रंगी **पालट**॥' -तुका.६२९.३ 'सहज गुण जयाचिए देही। **पालट** तो काहीं नव्हे तया॥' -तुका.६६.२०२. (का.पल्लट)

पालटनं (क्रि.) परिस्थितीत बदल होणे. 'लेकरं कळोते निंगले तं कोनाचंबी **पालटनंच** हाय.' 'पोराले नवकरी लागली अन् रामभाऊचं नशीब **पालटलं**.'

पालटीन (क्रि.रूप.) परिस्थिती बदलून जाईल. 'पोरगा सिकीन आपलं **पालटीन** असं आबाले वाटे.' -सित.१४.

पालटेल (क्रि.रूप.) परिवर्तन होईल. 'गावाचे **पालटेल** जीवन।' -ग्रा.१९.१०९.

पालथं (वि.) पाठीवर झोपलेले. 'तेलाचा बोळा दीधलाः ढीडरे घातलेः **पालथु** बैसली तंव ते मोडलेः' -ली.५८२.

पालमांड्या (वि.) बोभाटा करणारा, अब्रू वेशीवर टांगणारा, विकणारा. 'गुपीत गोठ **पालमांड्या** मान्साले सांगू नोये.'

पालवं (न.) जुन्या कपड्याचा तुकडा. '**पालवांआतु** झांकुनि बहीरवाचेया देउळा घेउनि आलीः' -ली.१६७.

पालवी (स्त्री.) १. नवीन अंकुर. 'पावसाच्या पयल्या पान्यानं आठा रोजात झाळाईले नवीन **पालवी** येते.' २. कोपळा, लहान बाभुळीचे रोप. 'सकाळीच **पालव्या** खोदाय म्हणून शेतात गेला होता.' -त.६.

पाला (पु.) १. पाने. 'आंगनात झाळ असल्यानं पुंज्यात निन्हा **पालाच** येत जाय.' २. धान्य एकत्रित करणे. 'मातेन्याचं येक पोतं अन् दा गव्हाच्या चांगल्या पोत्याचा **पाला** करून टाकला.'

पालुखोशा (वि.) भित्रा. '**पालुखोशा** हाय तो. त्याच्या बायकोचा कोनं हात धरला तं त्याची हिंमत नाई काई म्हन्याले.'

पालू (पु.) फडके, पालव. 'आता बाबाते देखौनि आड **पालऊ** करुनि गेलाः' -ली.३५. 'अग्नीचे सौजन्य। शीतनिवारण **पालवी** बांधोन। नेता नये॥' -ज्ञा.६७३२. 'शिदोरीचा खरकटा **पालू** वाहत्या धारेत बुचकडून स्वच्छ धुतला.' -कात.१२. 'आमची फाटल्या **पालवासारखी** टुरटुरते .' -मिर्झा.४८.

पालोई (स्त्री.) पालवी. '**पालवी** जैसे मूळसिंचने सहजे। शाखापल्लव संतोषती॥' -ज्ञा.१.२५.

पालेगळ (स्त्री.) खूप पाने असणे, गळणे. 'उनायात सागाची **पालेगळ** होते.'

पालोनं (क्रि.) पालविणे, बियांना माती वगैरे लावणे, नवी पालवी येणे. 'तो **पालविजेल** मुडा। प्रमेयबीजांचा॥' -ज्ञा.६.४८९. 'हो कां जे शारदियेचिये वोले। चंद्रबिंब **पाल्हैलें**।' -ज्ञा.६.२५८.

पाल्ळं (न.) पारडे. 'एक **पाल्ळं** वधर एक पाल्ळं खाली होत असते कधीमंधी.'

पाव (क्रि.रूप.) १. प्रसन्न होणे. 'देवा औंदा तरी **पाव** रे. पिकू दे रे पोटी.' २. चौथा भाग. 'तीसरे दीसी तीने घांसू रीगालेः हळूहळू **पाउ** आहारावरि आलेः' -ली.५७५.

पाव (स्त्री.) ब्रेड. 'सकाऊनच आमी भाकर खावो आता तुमाले **पाव** पायजे नाई?' (इं.)

पावंड (न.) बैलाची सामान्य चाल. 'रस्ता सुदा हाय **पावंडावरतं** जोळ्या हाना मना.' -दि.१६.

पावंडा (पु.) पायवाट. 'वाटच्या वाटसरा नको लावू पाप तोंडा/ जाय आपल्या वाटेनं नाही गोरीच्या **पावंडा**.' -लोक.७१.

पावशी (स्त्री.) भाजी कापण्याचे साधन, लहान विळी. 'रंधावनातली **पावशी** आन वांगे काप्याले.'

पावटनी (स्त्री.) पावलाच्या ठशामुळे तयार झालेली वाट. 'तुका म्हणे **पावटणी**। करू स्वर्गाची निशाणी॥' -तुका.१३१. 'जनमन आम्हा समानचि झाले। कामक्रोध केले **पावटणी**।' -तुका.६४१. २. पायरी. 'आईके प्राणाचा हात धरुनी। गगनाची **पाउटी** करूनी॥' -ज्ञा.६.२७१.

पावटी (स्त्री.) १. दारूची शिशी. 'रोज संध्याकाई शाम्या एक **पावटी** मारतेच मारते.' २. पावाचे माप. 'पावटणी केली काळ। जया बळ होते ते.'

पावतं (क्रिवि.) पोहोचते, प्राप्त. 'अंगावर असलेलं वाघामायचं बोनं तिचं तिला सारजानं आज **पावतं** केलं.' -कात.६४.

पावतर (अ.) पर्यंत. 'त्या रोजी जेवतांनी, काला **करेपावतर**.' -मिए.६८. 'दोन प्रहरपावेतो आटोपलें भोजन।' -नाथ. 'कामाची दिसते, ऊन पळेपावतर निजते.'

पावनं (क्रि.) १. प्रसन्न होणे. 'म्हणोनि अवसरे। जे जे **पावे**। की तेणेचि तो सुखावे॥' -ज्ञा.४.१.९. 'दिला या काळें अवकाश। नाही **पावलें** आयुष्य नाश।' -तुका.६४०. २. प्राप्त होणे. 'देखे इंद्रिया आधिन होईजे। तै शितोष्णाते **पाविजे**।' -ज्ञा.२.११९. 'तुका म्हणे ऐशा जाति। काय उंचपण पावती॥' -तुका.४४०३.

पावनचार (पु.) पाहुणचार. 'कायेसेनि पाहुणेरु क्षिरसागरा।' -ज्ञा.१०.११. 'पावने आले का **पावनचार** तं कराच लागते.'

पावनपन (न.) पाहुण्यांची सरबराई. 'इवाई पावने आले **पावनपन** तं कराच लागीन भाऊ.'

पावना (पु.) पाहुणा. 'आजि **पाहुणे** आले असतिः मज काही प्रयोजन असेः' -ली.११५. 'नवाळा **पावना** आला का

येटायातल्या पोरी टकटक पायतातच लेक.'

पावनीन (स्त्री.) पाहुणी. 'मामबईन **पावनीन** आली/ आतेभॉची मजा झाली.'

पावनेआठ (वि.) नपुंसक, षंढ. 'तवाच मले वाटे तू होशीन **पावनेआठ/** जल्मभर करशील शंभराचे साठ.' -ऊ.१५.

पावलं (क्रि.रूप.) प्राप्त झालेले. 'दान **पावलं** रे दान **पावलं**.' 'कालच पोराचं पत्र पावलं.'

पावला (क्रि.रूप.) प्रसन्न झाला. 'नानमुखाच्या रोजी मुख नाई दिसलं अन् आताच कोन्ता देवा **पावला**.' -भं.७४.

पावली (स्त्री.) १. टाळाच्या तालावर पाय टाकणे. '**पावल्या** खेळत मागं माणसे नाचत होती.' -ना.१७ २. प्रसन्न झाली. 'अशी देवी **पावली/** घरी लक्शमी आली.' ३. प्राप्ती झाली.

पावशेर (वि.) शेराचा एकचतुर्थांश भाग. '**पावशेर** तीळ घेऊन जा घरून जाताखेपी.'

पावसी (स्त्री.) विळी. 'धार बसून जशी बोथट झाली **पावसी/** मले म्हने डॉक्टर बिमार पल्डी मावशी.' -जांग.४४.

पावोत (क्रि.रूप.) पाहवत, पाहू शकणे. 'मायची असी हे घान **पावोत** नाई मायाकून.' -सित.४७.

पाव्याले (क्रि.रूप.) प्रसन्न होण्यासाठी. 'देव **पाव्याले** रातदिवस घोक करा लागते नामस्मरनाचा.'

पाव्हणीन (स्त्री.) स्त्री अतिथी, नातेवाईक. 'घरात **पाव्हणीनी** सोबत गावातल्या बायकांचाही दाटुळा वाढला.' -पाटी.

पाव्हना (न.) पाहुणे. 'जेथ शांताचिया घरा। अद्भुत आला आहे **पाहुणेरा**॥' -ज्ञा.११.२.

पास (स्त्री.) कुळवाचे पाते -लोखंडी. 'बाजीखाली ठेविलीः **पासुः** फाळुः तुताः' -ली.४७७. 'तुमचीं जेतुली लोखंडें आहाति तेतुलीं बांधौनि आमुचीये बाजेबुडीं ठेवाः **पासः** फाळः इळाः कुऱ्हाडः' -दृ.५४. 'सासवाच्या शब्दांनी हृदय पोखरलं/ वखराच्या **पासीनं** शेत जनू वखरलं.' -रुक्मि.७४.

पासंग (पु.) दोन्ही पारडी सारखी करण्याकरिता वापरलेली वस्तू. 'पोरीच्या त **पासंगातबी** बसत नाई पोर्ग.' -सित.१४६. (फा.पारसंग,पासंग)

पासट (वि.) पासष्ट. 'दोनशे देले आता फक्त **पासट** रुपये रायले काय?'

पासपूस (स्त्री.) साफ. 'बापाचं जगणं आला दिस गेला दिस/ मळालेलं जिणं किती करा **पासपुस**.' -ठ.८५.

पासरी (स्त्री.) एक माप, धड्याचा चौथा भाग. 'सेंरू पाउ-सेरूः **पासेरीः** पालडां घालीतिः केणें तुकीतिः' -गोवि.५३. 'हंगामात कोणत्या वावरातून **पासरीभर** कापूस वेचून आणतात.' -भं.४३. 'करे **पासरी** वजन कोण्या नारीचा सजण.' -लोक.३६.

पासलं(ली) (वि.) पालथे. 'गच्ची धरून भिमानं **पासलाच** पाळ्ळा नांगोले.' 'डोयानं दिसला असता त त्याची मायच **पासली** पाळली असती.' -डेबू.२७.

पासलचं (अ.) जवळचं. 'बुलढान्या **पासलच्या** वरवंडाले म्याचा सुरू झाल्ल्या.' -सित.३३.

पासलता (क्रिवि.) कलता, वाकडा. 'धुऱ्यावरचा निंब वायदनानं **पासलता** पळला.'

पासल्यापायरी (अ.) अवेळी. 'आता आले काय राजे हो **पासल्यापायरी**. पंगताबी झाल्या मान्साईच्या.'

पासल्ल्या (वि.) पासच्या, जवळच्या. 'पुरापान्याचा धोका असल्यानं गाव उठवून **पासल्ल्या** आखरात आनलं.' -कावू.

पासाठी (क्रिवि.) पाहण्याकरिता. 'आपली चाड **पासाठी** पार अशी वर्ह्या व्हते न माणसाची.' -ऊन.१९४. 'भासा आला तं मी भॉच्या घरी गेल्ती भास्याले **पासाठी**.'

पासी (अ.) जवळ. 'गोविंदाः एथ एक पुरुख आले असतिः तेयापासि तू जासी होः **तेयापासौनि** एक वेध होतातिः' -ली.६५. 'हावो! राऊळी लेकरु **तुम्हापासि** दिधले?' -गोवि.७. 'जरी थोरी तुझी पाहत आहों। तरी **पासीं** उभें हाकावयाही। योग्य नोहो॥' -ज्ञा.१०.१८२. 'पापपुण्ये अशेषे। **पासीचि** असतु न देखे॥' -ज्ञा.५.८०. 'मग **पासिच** असता न दिसे। वस्तुजात।' -ज्ञा.२.५६. 'आम्ही **कोणापाशी** तोंड वासूं।' -नाथ.१५७०.

पासुळ्या हाडाचा वि. कृश, सडपातळ. 'पोट्टं काई खातेपेते का नाई. लयच दिसून रायलं **पासुळ्या** हाडाचं.'

पासोंग (पु.) दोन पारड्यातील वजन सारखे करणारी वस्तू. 'जगात जेवढे थोर महात्मे होऊन गेले त्याहीच्या मानान आपून **पासोंगातई** नाई.' -ना.८४. 'पाल्डं वधरखाली असते तं सारखे कऱ्याले एकात **पासोंग** टाका लागते कव्हातरी.' (फा.)

पासोई (स्त्री.) बरगडी, हड्डी. 'हड्ड्या **पासोया** मोजोनी घ्याना/ बेमार खे रोगी खोकलत पाहाना.' -रूख.३५.

पाहाय (क्रि.रूप.) १. बघ, पाहा. 'तुया बायकोनं बेळ्ळी कुठी ठुली तं **पाहाय** बरं.' २. बघायला. 'आमचा तमाशा **पाहाय** आल्ते वाट्टे तुमी?'

पाहार (पु.) प्रहर. 'ऐसे चाऱ्ही **पाहार** दुःख भोगिलेः' -ली.१०९. 'च्याऱ्ही **पाहार** चहु खांबा भंवते भंवते भवंत होते.'

पाहार (स्त्री.) खोदकामाची लोखंडी कांब. 'आणि गोसावीयाते देखिलेः **पाहार** सोडिलीः' -ली.३४.

पाहेजो (क्रि.रूप.) बघशील, पाहशील. 'तुहे नटलेलं रूप माया डोयात **पाहेजो/** केला कायजाचा खोपा येऊन त्याच्यात रायजो' -अप्र.

पाहेटं - पहाटे. '**पाहेटं** ह्या बाया, पोरी, हिची मिरोनूक पाहासाठी झाल्या जमा.' 'मी **पाहेटचं** गावा गेल्तो.'

पाहेलदेखल (वि.) चिरपरिचित. 'लहानपनापासून तुमी मले **पाहेलदेखेल** हाये.' -भं.८९.

पाहोल्या (क्रि.रूप.) बघवल्या. 'मायबापाचे हाल डिगुच्यानं **पाहोल्या** जात नोते.' -सित.१६.

पाह्यजो (क्रि.रूप.) पाहशील. 'बायकोले म्हने जागा माही **पाह्यजो/** कुनी बसला तं उभी नको राह्यजो.' -जांग.२९.

पाह्यनीतली (वि.) परिचयातील, पाहिलेली. 'एखांदी पोरगी सांगा बरं **पाह्यनीतली** आपल्या पोरासाठी.' -धुम्म.

पाह्यरी - प्रहरी, वेळी. 'लाईनच्यानं लोकं असे आले आह्यरी/ लाईनच पायजे आता तीन **पाह्यरी**.' -मिए.७३.

पाह्यलं (क्रि.रूप.) पाहिले. 'जवा पाह्यलं तवा, गुतलीच्या गुतली.' 'म्या **पाह्यलं** तं कोनीच नोतं जाग्यावर.'

पाह्याली (क्रि.रूप.) बघत आहे. 'आपल्या देशाचा कारभार इंदिरा गांधी म्हणजे एक बाई **पाह्याली** म्हणून हे असं व्हयालं.' -वा.१४५.

पाह्याले (क्रि.रूप.) पाहावयाला. 'नेत्याच्या मांग नाई आले काई. हिरोईन **पाह्यालेच** लोक जमले.'

पाळ (पु.) पाड. 'कसा उदासला जीव झाला बाई पुरा वेडा/ म्हण जाऊ कोण्या झाडा आली आमराई **पाडा**.' -लोक.४५.

पाळवा (पु.) प्रतिपदा. '**पाळव्याले** सोनं खरेदी करतात लोक.'

पाळी (स्त्री.) १. वेळ, खेप. 'दुसकाळानं आदीच लोकं गांजून गेले त्यात भल्याभल्या पक्क्या पाण्याच्या विहरी कोरड्या पडाची **पाळी** आली.' -वा.१६१. २. मासिक स्राव. (का.वारि)

पाळूं (न.) पारडे. 'मंग माय बाप्पू **पाळूं** आनत, मंग कापूस मोजनं चालू करत.' -लेक.४६.

पांगनं (क्रि.) १. पसार होणे. 'पोलिसाईनं येकयेकाले धरूधरू मारनं लावलं तसे लोकं **पांगले**.' २. अस्ताव्यस्त होणे. 'जे जाळ जळी **पांगीले**। तेथ चंद्रबिंब दिसे आतुडले॥' -ज्ञा.९.१३८. 'स्थिरावली गंगा। **पांगविली** ह्मणे उगा॥' -तुका.१८४.२.

पांगरनं (क्रि.) पांघरणे. 'काइ **पांगुरला** असेः काई नसला असे ऐसें नेणें॥' -दृ.१०३.

पांगले (क्रि.रूप.) अस्ताव्यस्त झाले. 'गाडी जागेहून हालत नाही असं पाहून सारे **पांगले**.' -झेल.६२.

पांगळा (वि.) लंगळा. 'एथ वेद मुके जाहाले। मन पवन **पांगुळले**॥' -ज्ञा.१०.६४.

पांगापांग (स्त्री.) धावपळ, पळापळ. 'मास्तर आल्याबरोबर गावातल्या पोराईची **पांगापांग** झाली.'

पांगेल (वि.) अस्ताव्यस्त झालेले. '**पांगेल** गोया जमा करून डबलंनं मग्गुलात फेकल्या.'

पांगोनं (क्रि.) अस्ताव्यस्त करणे. 'बराबर येका नेमात दोनच्यार गोट्या **पांगोनं** पळतेच.'

पांचट (वि.) लाजलज्जा नसणारे. 'येवळं पंगतीतून उठून देल्यावरबी **पांचटलं** जेवाले जातेच.'

पांजर (वि.) अशक्त, हडकुळे. 'झरझरून **पांजर** शरीर चिंतनि झाले.' -भीक.४३. 'झुरूझुरू **पांजर** निपट झाली हाडे.'

पांजरपोळ (स्त्री.) लंगड्या पांगळ्या गुरांना ठेवण्याची जागा. 'गाळं संड भरून गेलं व्हतं **पांजरपोळ**.' -सित.१२४.

पांजरायचे - 'कोनाच्या खयामंदी बिगर **पांजरायचे** गाळे सोळेल होते.' -सित.१३.

पांड (पु.) चालतानाचे दोन पावलातील अंतर. 'पाचदाहा **पांडावर** तं घर आय श्याम्याचं.'

पांडरंफटक (वि.) अधिक पांढरे. 'हिर्व्याकच दान्यातून निंघानरं **पांडरंफटक** दूध पाहून कचकनारे तुहे हात.' -काया.३०. 'मी दाटला तसा त्याचा चेहरा **पांडराफटक** पळ्ळा.'

पांडरपाई (वि.) अभद्र, विधवा. 'मी **पांडरपाई** मेली पातकी.' -भीक.५२. 'हे पांढरपाई आली अन् घराचा धिंगाना झाला.'

पांडू (वि.) षंढ, कुचकामी. 'वाटलं भल्लं कामाचं असीन, पन हे पोट्टं निराच **पांडू** निंगलं.'

पांडेपन (न.) तलाठी, पटवाऱ्याचे काम. 'शेट्या ना चौधरी। **पांडेपण** वाहे शिरी॥' -तुका.४००२.

पांडेबुवा (पु.) पटवारी. '**पांडेबुवाच्या** जवळून सातबाऱ्यावर बोजा चळून आना लागते म्हने सायेब.'

पांड्या (पु.) १. पांडुरंग. 'घरचा **पांड्या**, गावचा पालमांड्या.' २. पटवारी. 'दोन रोजापासून **पांड्याची** भेट नाई. सातबाराबी नाई भेटला ना त्याच्यानं?'

पांढं (वि.) पांढरे. '**पांढं** लुगळं काहून घातलं वऽऽ माय मावले. तुया नवरागिवरा मेला की काय?'

पांढरपायी (वि.) अपशकुनी, विधवा. 'पायाची **पांढऱ्या पोर**, भोवली थोर' -भीक.३४.

पांढरी गुंजाय (स्त्री.) एक वेल. 'आंगनात **पांढरी गुंजाय** पाय कशी हिरवीकच पळ्ळी.'

पांढरी (स्त्री.) १. गाव वसलेली जागा, गढीची जागा. 'मर्जी बसली त्यांचं भलं, मनातून उतरला की त्याचं **पांढरीवरचं** नाव निशाण मिटायचं.' -पख.५. '**पांढरीवर** घर नाई काईवर वावर नाई.' २. घरे, वस्ती. ३. शेतीचा एक प्रकार. काही जमीन पाण्याचा निचरा होऊन नरम राहते तर काही कडक राहते. पाण्याचा निचरा होऊन नरम राहते त्या जमिनीला 'धेड **पांडरी**' असे म्हणतात. 'मग गोसांवीं मातुळ ग्रामासि बीजें केलेंः तेथ **पांढरीयेवरि** कडु भोपळीया नीगालीया होतीयाः' -गोवि.२३१.

पांढासोम्मार (पु.) कधीही न येणारा वार, दिवस. 'कधी देता राजा पैसे आमचे **पांढ्यासोम्मारी**?'

पांढीढर्रक (वि.) अतिशय पांढरे. 'राधी **पांढीढर्रक** पळली व्हती सर्वी बिमारीनं.' -सित.१५९.

पांदन (स्त्री.) वाट, रस्ता, छोटा मार्ग. 'लेकरू सरलेः ते नेउनि वाजेस्वरा इसान्य कोणी **पांनंदी** पुरीलेः' -गोवि.८. 'धावो आवडे पाणधी। शून्याचिये॥' -ज्ञा.१६.१८८. 'रस्त्यानं चिखल गाटा, पाणी होतं. **पांदीतून** तर तिला चालता येणं शक्यचं नव्हतं.' -झिं.९७.

पांदवाट (स्त्री.) अरुंद वाट, मार्ग. 'तेवढ्यात कल्याणीच्या मळ्याकडे जाणारी **पांदवाट** लागली.'

पांधन (स्त्री.) रस्ता, वाट, मार्ग. '**पांधनीतली** चिलाटीची झाडं आल्यागेल्यावर फांद्या उगारून उभी. ' -मोती.

पिकनं (क्रि.) पक्व होणे. 'वय झाल्यावर तं केसं **पिकनं** हायतच ना राजे हो?'

पिकपानी (न.) हंगाम, स्थिती. 'तुमच्या आंगल्लं कसं हाय **पिकपानी**?'

पिकलंहूअ (क्रि.रूप.) पिकलेले. 'वावर बंबाट पिकून रायलं/ **पिकलंहूअ** इकून रायलो आता हासत हासत जिकून रायलो' -नोका.

पिकलो (क्रि.रूप.) पक्व झालो. 'माचात टाकल्यासारख्या आंब्यालेकं **पिकलो**.' - मिर्झा. ५१.

पिकेल (वि.) पिकलेला. '**पिकेल** आंबा पिवूला की खाल्लाच होय.'

पिकोता (क्रि.रूप.) पिकविता. '**पिकोता पिकत** नाई हरसाल कसी दीठ/ काल छापूनई आली पेपरात हेच गोठ.' -नांबै.

पिकोतो (क्रि.रूप.) पिकवितो. 'वावर **पिकोतो** म्हटलं तं **पिकते** नाई तं काय खरं हाय.'

पिकोनं (क्रि.) पिकविणे. 'पोरीचं लगन असल्यानं जमीन औंदा **पिकोनं** तर हायच.'

पिकोयेल (वि.) १. पिकविलेले. 'बैलाईवर आमी जमीन **पिकोयेल** हाय.' २. पक्व झालेले. 'जवनीतले **पिकोयेल** आंबे दे लेकीच्या थैलीत टाकून.'

पिक्चर (पु.) चित्रपट. '**पिक्चर** सुरू झाला अन् छक्यानं माह्या मांडीवर हात ठेवला.' -गय. (इं.)

पिघयनं (क्रि.) वितळणे. 'डांबर उनायत **पिघयते**. चपलीले चिटकते.'

पिच(स)नं (क्रि.) वरखाली करून पत्ते मिसळणे. 'नौकरी बरी दौरा टाकून घरी बसा पत्ते **पिचत**.' -गय.

पिचकपाचक (स्त्री.) गळ्याला फास लावणे. '**पिचकपाचक** एकमेकाची नड्डी.' -मिर्झा.४४.

पिचकलं (क्रि.रूप.) बिघडणे, फास लावणे. 'चालताचालता काम मंधातच इचकलं/ माणसाच्या धर्मानं माणसालेच **पिचकलं**.' -मिए.४९.

पिचकांड (न.) फास. 'कायच्यासाठी ठेवावं मांगं हे लचांड सोडून टाक म्हनलं मांगचं **पिचकांड**.' -मिर्झा.१४५.

पिचकी (स्त्री.) फास. 'शेतकऱ्याच्या नरडीले लागली **पिचकी**.' -मिए.१४२.

पिचकून (क्रि.रूप.) पिरगाळून, फास लावून. 'जीव घ्या त्याचा. **पिचकून** टाका आमच्याही नळल्या?' -एक.

पिचपिच (वि.) माती ओलीचिंब होणे. 'झळी लागल्यानं वावर निऱ्हा **पिचपिच** झालं.'

पिच्छा (पु.) तगादा, धोशा, पाठलाग. 'मायं येक तरी पोरगा लावा असा **पिच्छा** पुरोला सायबा जोळ.'

पिच्छे (अ.) प्रत्येकी. 'पुरं गाव काहाले बोलवा लागते. **घरपिच्छे** येक मानूस गंज झाला.'

पिटकून (क्रिवि.) काळजीपूर्वक. '**पिटकून** केली कुणबीक गेलं सगळं वायफळ.' -हा.३४.

पिटनं (क्रि.) ठोकणे, मारणे. 'गोसावीयांची घणी **पीटीली** ऐसी श्रीमूर्तीः' -ली.२९. 'परिते ऐसें पंडुसुता। तातले लोह **पिटिता**॥' -ज्ञा.१३.१०१५. 'परिते ऐसें पंडुसुता। तातले लाहे **पिटिता**॥' -ज्ञा.१३.१०१५.

पिटालनं (क्रि.) खूप पळविणे. 'बैलांना झुला घालाव्या व मोठ्या ऐटीत दमणी **पिटलीत** गावात शिरावे.' -भं.१४.

पिटालेल (क्रि.रूप.) पळविलेले. '**पिटालेल** बैल पतले हागून रायले.' 'हे घोळं म्या लय **पिटालेल** आये.'

पिटाळनं (क्रि.) पळविणे. 'बनीनं घेतलं गधळू, चला म्हने आता पल्ला **पिटाळू**.' -लोक.१६५.

पिटुकला (वि.) लहान. 'काय आंबानतन देल्ला रे निऱ्हा **पिटुकला**.' (का.पुट्ट)

पिटोनं (क्रि.) जोरात पळवणे. 'गोऱ्हे नवेच असल्यानं भल्ले **पिटोत** आनले.'

पिठोरा(ळा) (पु.) पोळ्याला भिंत सारवून त्यावर चुन्यागेरूने काढलेले चित्र. 'करा भिंतीस गिलावा अन् शेणानं सारवा/ पोळा सणाला **पिठोरा** गेरू चुन्यानं रंगवा.' 'पोयाच्या दिवसी बहीन भावाची उपासी/ **पिठोळा** पूजते मोकया केसासी.'

पिठुं (न.) कष्ट, श्रम होणे. 'कावो वैनी दयन दयतादयता लयच **पिठुं** पळत असीन?' -काळी.५३.

पिठ्ठी (स्त्री.) करंजीत भरण्यासाठीचे रवा-साखरेचे सारण, चूर्ण. 'कानोले कऱ्याले **पिठ्ठी** केलती मामीनं. मंगसन्या दही अन् **पिठ्ठीच** खाल्ली पोट भरून.'

पिढं (न.) पाट. 'वरि तुपा भरुनि वाटीः **पाटीपीढी** बैसावेयाः' -ली.३१४. 'चौरंग नसीन तं **पिढंच** टाका नवरदे आंग धुयाले.' (त.पीडिगे)

पिढी(ळी) (स्त्री.) कूळ, वंशातील पुढील खोप. 'आमचीच **पिळी** शौकीन नाई. आताचे काय बोला लागते.' (का. पीडि)

पितय(यी) (स्त्री.) लहान ताट. 'बाप्पूले पितयी वाहाळल्यावर आवाज दे- ''**पितय** वाहाळली.'' -अक.४६.

पितय (न.) पितळ. 'सोनं होय काय बे? **पितय** हाय ना लेका हेंबाळ्या?' (का.हित्ळे)

पित(तू)र (न.) स्वर्गस्थ पूर्वज. 'तरी **पितर** काय करिती। कैसेनि स्वर्गी वसती॥' -ज्ञा.७.२५५. 'आहाकटा त्याचे करिती **पितर**। वंशी दुराचार पुत्र जाला॥' -तुका.७५.१. 'मी म्हनो **पितर** अन् तो म्हने इपित्तर.'

पितांबर (न.) पूजेत नेसावयाचे मूल्यवान रेशमी वस्त्र. '**पितांबर** झळके कैसा। उजळल्या दाही दिशा॥' -तुका.१५९१.५.

पित्त (न.) एक शरीर दोष. 'आणि जंगमाटी हात। लाऊनि काढिले **पित्त**॥' -ज्ञा.१३.२२९. 'सखाराम दिसला का माहा **पित्त** खवयते.'

पित्तरचा (वि.) एक शिवी. 'चल निंग. नाई तर रिपोट देईन सायाच्या...तुह्या **पित्तरचा** तं.' -ना.५७.

पित्तू (पु.) पोटगडी. 'तुमी सात झाले अन् आमी सहा. असं नाई, येक **पित्तू** द्या आमाले.'

पिदवनं (क्रि.) ठोकणे, मारणे. 'पिंट्यानं श्या देल्या तं पोट्टेईनं **पिदवनं** चालू केलं.'

पिदाड्या(ळ्या) (वि.) दारू पिणारा. 'या **पिदाड्याजवळ** आणखी बसण्यात अर्थ नाही म्हणून तो उठला.' -पाटी. 'जवाई निंगाला भारीच **पिदाळ्या/** दारूसाठी इकते नव्या साळ्या.' -जांग.१८.

पिदाळनं (क्रि.) मार देऊन पळविणे. 'चोर समजून घरातली माणसं पाठवून काढायचा **पिदाडून**.' -बा.१०८.

पिद्दा (पु.) पाला पाडणे, राबवून घेणे. 'आता डंगऱ्या सासूचा अन् शिंगऱ्या लेकराईचा **पिद्दा** पाडणार आहे ही.' -खुं.१६३.

पिन्नक(की) (स्त्री.) नशा, धुंदी, लहर. 'त्या पोट्ट्याची सोयरिक कामून करून रायले तुमी **पिन्नक** मारते ना तो. दारूच्या दुकानात पळेल असते.'

पिन्नवनं (क्रि.) मारणे. 'मनात आलं काढायचं कोणी **पिन्नावून** चोर समजून.' -त.१९१.

पिपय (पु.) पिंपळ. 'आणि अश्वत्थु येणें नांवें। **पिंपळु** म्हणती स्वभावें। परी तो अभिप्रावो नव्हे। श्रीहरीचा॥' -ज्ञा.१५.११५. 'गाव सोडून चालली तुहा पालखीत पाय/ मैना उडून गेल्यानं माहा उदास **पिपय**' -वि.

पिपा (पु.) डब्बा. 'तेलाचा येक **पिपा** आनला ना. निऱ्हा तेलाची भाजी करा.'

पिरकनं (क्रि.) पातळ शौचास होणे. 'पावने बॉ, सरमू नका, अती **पिरकल्यापेक्शा** टमरेट घेऊन नदीवर जा ना?'

पिरगया (पु.) पीळ बसणे. 'पायन्याले असा **पिरगया** बसू नको देऊ फासी लागते बाबू.'

पिरगाव(ळ)नं (क्रि.) पीळ देणे. 'त्यानं बैलाचं शेपूट **पिरगाळलं**. बैलांनी पल्ला धरला.' -ना.१७५.

पिरपिर (स्त्री.) १. सतत हळूहळू पडणारा पाऊस. 'पावसानं आपली **पिरपिर** सुरू केली होती.' -मा.१९. २. सततचे रटाळ बोलणे. 'आजी आली की भलतीच **पिरपिर** लावत रायते.'

पिरसनं (क्रि.) गोंजारणे, लाडाने पिळणे. 'नामा गाल फुगवून बसला. कौतिकनं त्याचे गाल **पिरसले** डोळे कुर्वाळले.' -धग.३५.

पिरीकपिरीक (वि.) रिमझिम. 'रातभर **पिरीकपिरीक** पानी पळनं चालूच होतं.'

पिरेम (न.) प्रेम. 'म्याच बह्याड, तुमच्यासारख्या नागरदडप्यावर **पिरेम** केलं.' -जटा.९१.

पिलपिल (वि.) अतिशय नरम. 'रस पिळल्यावर आंबा लुळूमुळू, **पिलपिल** झाला.' -अंधा. 'डोक्यावर मशीन आणताना बंडोजी पुरा **पिलपिल** झाला होता.' -मोती.

पिलमपोया(ळा) (पु.) १. ढोलाच्या भजनातील पावा. 'ढोलकी, झांजा, **पिलमपोव्याचा** एकच धुमाकूळ उडालेला.' -सेल.११७. २. उपेक्षेने हस्तक, चापलूस. 'गनपत आमदाराचा पक्का **पिलमपोया** आये.' (इं.पेनल्टी)

पिलांटी (स्त्री.) दंड, शिक्षा. 'एकडाव म्या होळ पाळली अन्

बेज्या **पिलांटी** बसली राजेहो.' -मे.१२१.

पिलिया (पु.) हळद्या रोग. '**पिलिया** झाल्यावर पिव्वच दिसते राजा.' -भू.८३.

पिली (न.अने.) लहानलहान पिल्लं. 'एवढी **चिलपिली** घिऊन कुठी जावाव बापा रंडवाय बाईनं?'

पिलुकथारी (स्त्री.) वृक्षविशेष, झाडोरा. 'हिरव्यागार **पिलुकथारीतून** कंबर येवळाले दोन लांडगे बिफरून बाहीर पळले.' -सित.४९.

पिलू(ल्लू) (न.) लहानगे अपत्य. '**पिलूं** वाट पाहे उपवासी।' -नाथ.१५४६. 'मांजरचं **पिलू** वागोलं म्या एक.' (का. पिल्ळे)

पिवई (स्त्री.) १. एक वेल. 'एक खाटलं टाकलं त्यावर **पिवई**, पिठोळ, अबाटा असा चारा घातला.' -गा.५७. २. मुरूम असलेली जमीन. 'औंदा **पिवईत** तूर बेज्यानं पिकली.'

पिवई (वि.) पिवळ्या रंगाची. 'दोन पोथातली एक काई, दुसरी **पिवई** आय.'

पिवतं (न.) हळदीत भिजविलेला दोरा. 'आयतं वायतं, नागोबॉचं **पिवतं**.'

पिवनं (क्रि.) पिळणे. 'बाइसे **पीळिते** होतीः तंव तेया आंबेया रसु न नीगेः' -ली.१९३.

पिवय (वि.) १. पिवळे. 'हयद्या झाल्यावर मान्साले **पिवयच** जग दिसते.' २. पाणी येता तुपासारखी नरम होणारी जमीन. 'पानी जास्त झाल्यानं **पिवय** चिबळ्ळी लेक.'

पिवशी(सी) (स्त्री.) १. स्त्रियांचा बटवा. 'मग बाईसे **पिसवि** सोडूनि पाहाति तंव तीयाचि आसूः' -ली.२२७. 'मग **पीसवीएचे** सोळा दाम काढिलेः ते गोसावीयांपुढे ठेउनि दंडवत घातलेः' -ली.१७२. 'तिनं कमरीची **पिवशी** काढून खांड काहाळलं.' -धग.१५. 'दोळ्याचा वास येते **पिवसीचा/** पती मोठा हौसीचा.' -लोक.२४१. 'काम करनं नाई सुसे, **पिवसी** घेऊन बसे.' २. पिशवी.

पिव्व (वि.) पिवळे. 'पोरगा तं येकदम गोरापान, **पिव्वाधम** हाय लेक.'

पिव्वासट (वि.) आजारी. 'मानगीनं लेकरू **पिव्वंसट** पळ्ळं.'

पिशा (वि.) दाणे काढलेले कणूस. 'कणसातले दाणे खाऊन फक्त **पिशा** करून ठेवू नयेत म्हणून मचाण करून कारभारीण गोफणीने पांखरं उडवून लावते.'

पिशा(सा)ब (स्त्री.) लघवी. 'जथी लियेल अस्ते **पिशाब** करू नाई. तथीच लेकाचे मुत्तात लोकं.' (फा.पेशाब)

पिशी (वि.) १. दाणे काढल्यानंतर उरलेले कणूस. 'येकच जवारीचं वावर असल्यानं पाखरानं कन्साच्या **पिशाच** केल्या.' २. पागल, वेडी. 'येवळी चांगली बाई. निन्हा **पिशीच** झाली वऽऽ बयना.' (त.पिच्चि) ३. केस विसकटलेली.

पिसं (न.) १. वेड. 'तरि एथिचेया दरीसनासि आणाः मां वेडेयाचि वेडेपण जाइलः **पीसेयाचे** पीसेपण जाइलः' -ली.३५५. ''हावोः राउळा हाती लेकरू कैसे दीधलेः'' राउळ वेडेः राउळ **पीसेः**' -गोवि.७. 'जात्यंधा लागे **पीसे**। मग ते सैरा धावे जैसे।' -ज्ञा.२.९३. '**पिसे** आणि न भुलवी। तरी तेचि काई॥' -ज्ञा.६.१२४. 'आम्हां सोडोनिया तूं रे कैसा जासी। तुजवीण **पिशी** आम्हीं सर्व।' -नाथ.२८७. २. ध्यास. 'आम्हां देवपणाचे **पीसेंः** वायांविणः' -ऋ.६९०. 'आमुचे कुळीं नव्हतें ऐसें। हेचि **पिसें** निवडलें॥' -तुका.४१४८.३. 'आता त कसं, साऱ्याले जसं, **पिसंच** लागून राहेलं.' -काया.१७.

पिसंग (वि.) सरळ, गुण्यात नसणे. 'भीतीले **पिसंग** आलं वाट्टे. राजानं बरोबर तं गोला लाव्याले पायजे.'

पिसन (स्त्री.) पत्ते लावण्याची पाळी. 'घ्या, तुमची पिसन हाय ना? आताच तं म्या **पिसलं**.'

पिसन (न.) दळण. 'चक्कीवर **पिसन** घेऊन चाल्ली मी.'

पिसनं (क्रि.) पत्ते लावणे. 'अबे पत्ते **पिसनं** तं चालू हायत अन् बिल्यांगबी लावून रायला.' (का. टिपायिसु)

पिसा (वि.) वेडा. 'येवळा साजरा येकुलतायेक पोरगा अन् **पिसाच** झाला लेक.'

पिसाई (स्त्री.) दळण्याची क्रिया, मजुरी. 'चार किलो **पिसाईचे** दोन रुपये देल्ले चक्कीवाल्याले.'

पिसाट (क्रिवि.) वेड्यासारखे, जोरात -धावणे. 'पोऱ्या काहीबी **पिसाट** धंदे करते. निरा बावरट झाला.' -अ.८७.

पिसाट (वि.) वेडा. '**पिसाट** होयेल पोट्टं राजा, आंगावर कपळेबी नाई ठूत.' (त.पिच्चाट्टु)

पिसाटनं (क्रि.) वेड लागणे. 'पोरगी **पिसाटल्यावानीच** करून रायली कालपासून.'

पिसाटेल (वि.) वेड लागलेले. '**पिसाटेल** कुत्रं डसलं का घ्या मंग बोंबीत सुया टोचून.'

पिसाळ (वि.) दाणे नसलेली. 'जवारी आपली म्हनलं कशी होते **पिसाळ**.' -मिर्झा.१०७.

पिसी (वि.) वेडी. 'खवळली **पिसी**। हाता झोंबे जैसी लांसी॥' -तुका.५६८.२.

पिसीखपत्ती (स्त्री.) वेडी, पागल. 'त्या दिवसापासून ते निन्हा **पिसीखपत्ती** झालती. तिनं जसे तिट्टीचे आंडे खाल्ले व्हते.' -लेक.५३.

पिसेल (वि.) १. पत्ते खालीवर करणे. 'पानं **पिसेल** हायत तू फक्त वाट.' २. दळलेले. 'आता काय **पिसेल** आटाबी

रेडीमेट भेट्टे.'

पिसोनं (क्रि.) दळणे. 'गहू **पिसोनं** पळतात भंडाऱ्याचे.'

पिसोळ (पु.) गुराच्या अंगावरील बारीक गोचीड. 'म्हैस भादरा लागते लेक अरमान्नं **पिसोळ** झाले.'

पिळं (न.) पाट. '**पिळ्यावर** भावाले बसून भाऊबीज केली.' (त.पीणि)

पिळकनं (क्रि.) अचानक पातळ शौचास होणे. 'कोणाच्या धमकावणीले भिऊन धोतरात **पिळकणारे** आमी धोतर पिवळं करणारे है.' -खुं.८३.

पिळा (स्त्री.) पिडा. 'ऐसा अवघा लोकु पीडा मुतलाः'' -गोवि.११५. 'इळा निंगो **पिळा** निंगो.'

पिंकर (पु.) स्प्रिंकलर. 'वावरात हरबरा पेऱ्याले **पिंकरानं** पानी लावलं.' (इं.)

पिंग (क्रिवि.) वेगाने. 'कसं फेडायचं देणं, **पिंग** पळत्या व्याजाचं.' -गाक.३५.

पिंगटं (वि.) पिवळसर. 'इचे डोये कसे **पिंगट** दिसून रायले व?'

पिंगाट (क्रिवि.) वेगाने. 'कावं बने खेयसीन पोरीत. काळी आपटली तं कसं **पिंगाट** पयालं भोसळीचं.'

पिंजनं (क्रि.) धुनकून रूई मोकळी, स्वच्छ करणे. 'हबीब मियॉनं अख्खी रूई **पिंजून** काहाळली.'

पिंजारनं (क्रि.) अस्ताव्यस्त होणे. 'येनी घालनं पोट्टे, केसं केवढे **पिंजारले** पाय तुहे.'

पिंजारी (स्त्री.) कापूस, रूई धुनकणारा. 'गाद्या भऱ्याले कापूस **पिंजाऱ्याजोळ** न्या लागत होता.' (का.पिंजार)

पिंजारेल (वि.) पसरलेले. 'पोट्टीचे **पिंजारेल** केसं इचरून काहाळ बाई.' 'सायेळचे **पिंजारेल** काटे खतरनाकच रायतात.'

पिंड (स्त्री.) १. महादेवाचे लिंग. 'मग तिये लेकरुवे **पींडीएजवळि** हागतिः मुतीतिः' -ली.०६२४. २. मृत्यूनंतर ठेवलेला भाताचा निवद. 'तो की एका ब्राह्मनासि दीधलाः तेया करवि **पिंडू** पाडवीत असेः' -ली.९९. ३. 'भुके नाहीं अंन्न। मेल्यावरी **पिंडदान**॥' -तुका.२७०४.१.

पी (क्रि.रूप.) प्यावे. 'एल्हो तोंड कोमाइलेः आधी पाणी **पी**ः' -गोवि.१७४.

पीक (न.) शेतातील उत्पन्न. 'येका वावरात चांगलं **पीक** झालं. येकात तं निऱ्हा गांजर गवत झालं.' (का.पिक्कु)

पीच (क्रि.रूप.) पत्ते लावावे. 'गजानन तुई **पिचन** हाय तूच पीच.'

पीट (स्त्री.) तगादा, ध्यास. 'यानं भलकसी **पीट** घेतली रामाच्या घराची.'

पीठ (न.) गव्हाज्वारीची दळलेली पूड, चूर्ण. 'मग गोसावि आंगणा बिजे केलेः **पीठ** ऐसे चांदिणे पडत असेः' -ली.२२१. 'अशा इच्याराइच्यारानं तिचं डोक्स **पीठ** होये मंग ते सारा ताव दूर्गीवर काळे.' -लेक.५३. (ना. पिट्टट, त. पिट्टु)

पीन (स्त्री.) टाचणी. 'केसं बांध रेबिननं नाई तं **पीन** लाव.' (पोर्तु.आलपीन)

पीप (पु.) पोहरा. 'दोन **पिपाची** येक कायळ केली पान्याले.'

पीर (पु.) १. सिद्धपुरुष, महात्मा. २. सोमवार. 'आमच्या गावात **पिराचां** उरूस भरते.' (फा.)

पुकपुक (क्रिवि.) घाबरणे. 'सायबाच्या पुळे तं मंग **पुकपुक** होते राजा तुमची.'

पुकारनं (क्रि.) नावाचा हाकारा करणे. 'बहेरा झाला का बे तू? किती वारखोळचा **पुकारून** रायलो तुले.'

पुकारा (पु.) नावाने मोठ्याने बोलावणे. 'कोर्टातल्यावानीच **पुकारा** केला.'

पुख (पु.) पुष, पौष्य नक्षत्र. 'गावची जत्रा **पुखातच** भरत अस्ते.'

पुख्खा (पु.) मिष्टान्न. 'ऐदी पण शिरापुरीशिवाय दुसरा **पुख्खा** न मागवणारेही गुरू त्यांना माहीत होते.' -गा.४९. 'रंगरावने वाड्यात **पुख्खा** झोडणेच नव्हे तर पथारी पसरायलाही सुरुवात केली.' -कात.११४.

पुख्ता (वि.) पक्का, भाग, अंश. 'त्याच्या लुचाटपनाचा **पुख्ता** सबूत आये मायाजोळ.' (फा.)

पुचाट (वि.) पोचट, नामर्द, भित्रा. 'हा **पुचाट** काय मोहो झाळीन हो?' (का. पुक्कन)

पुची(च्ची) (स्त्री.) स्त्री योनी. 'ऐका क्रोध बुचबुची। भुंके **पुची** व्यालीची।' -तुका.७९२. 'उपट झगळा **पूची** लगळा.' (फा.पूच,का.पुचुक)

पुचूपुचू (वि.) हलके. 'आपला वखर **पुचूपुचू** चालायचा त मातीबी जुमाणायची नाई.'

पुजेल (वि.) पूजलेले. '**पुजेल** देव दिसून रायला. आपल्या आंदी कोनीतरमा येऊन गेलं.'

पुज्यापाती (स्त्री.) पूजा वगैरे. '**पुज्यापाती** झाली का येतो म्हना दादाले.'

पुटोळी (स्त्री.) पुरचुंडी. 'काहाची **पुटोळी** हाय व तुया हातात. संड भरेल दिसते.'

पुठ्ठं (पु.) पृष्ठ, पार्श्वभाग. 'एक लाथ हानीन तुह्या **पुठ्ठ्यात**.' (फा.पुश्तः)

पुडकं (न.) बंडल, गठ्ठा. 'मामा आला रे, हाती भात्क्याचं **पुडकंई** दिसून रायलं.' (त.पोदि)

पुडी (स्त्री.) १. वस्तू गुंडाळतात ती कागदी घडी. 'दुकानातून चाची **पुडी** घेऊन ये.' 'फुलाची **पुडीच** दिसली नाई तं पूंजा कसी करू?' २. खोटी गोष्ट. 'धोंडबाला **पुड्या** सोडायची सवय आहे, हे सर्व गावाले माईत होतं.'

पुडी (अ.) समोर, पुढे. 'तिरीप निंगाली आन् वरात वडगावात **वाड्यापुडी** आली.' -दि.२२. 'मंग थो लागला तिच्या मांगं, थे **पुडी** आन् ह्या मांगं.' -जटा.९४. (त.पुडम् -द्रोण)

पुतनसून (स्त्री.) पुतण्याची पत्नी. '**पुतनसून** घरात आल्यावर म्हातारीचं काय चालीन?'

पुतना (पु.) भावाचा मुलगा. 'भावाचे असले तरी नांगोले **पुतनेपुतन्या** आपलेच लेकरं वाटत.'

पुतनी (स्त्री.) भावाची मुलगी. '**पुतनी** हाय ना लगनाची. पा नोकरीवाला पोरगा.'

पुतया(यी/ळा) (स्त्री.) स्त्रियांच्या गळ्यातील एक दागिना. '**पुतळ्याची** माळ म्या लेऊन पायली/ हाऊस गोफाची रायली.' -लोक.१४०. 'गळ्यात **पुतळ्या** पदी साखळ्या करात कुलपी चूडे, काय तू राजकुमारी गडे' -भीक.१९.

पुदाक (स्त्री.) १. ब्याद. 'आली **पुदाक**, नाई बसू देत लोकं सुखानं. -त.६. २. पंचाईत, अडचण. 'काय बाई **पुदाक** झाली. आमी तं आता बकरीलेबी मूठभर चारा आणू शकत न्हाई या दोघायच्या पायी.'

पुदालनं (क्रि.) फुकटात जास्त काम करून घेणे. 'मजुरी द्याच्या नावानं बोम अन् **पुदालनं** चालूच हाय आठ दिवसापासून.'

पुन(नी)व (स्त्री.) पौर्णिमा. '**पुणिवेचां** दीसीं केसव-नाएकु आंडोरांसि नीरोपु देतिः' -गोवि.३५. '**पूनिवें** चंद्र सोळा कळीं परी द्राभो सोनकांत शिळीः गुल्मलता शिलातळीः हाओ नाहीं॥' -ऋ.८०८. 'तुया मुचूक **पुनिव** माही होनारच नाही.' -काया.१५.

पुन्य (न.) पुण्य. '**पुण्य** माहात्मे होः हे परिवारु कवणी ठाउनि एत असेः ऐसे तुम्ही जाणत असा?' -ली.४८५.

पुयका (पु.) पुळका, प्रेम. 'मामीले भासीचा तं लयच **पुयका** येते माय.'

पुरं (वि.) पूर्ण. 'काम हाती घेतलं का **पुरं** करावं मान्सानं. नाईतन हातचं टाकू नाई.'

पुरथई (स्त्री.) पृथ्वी. 'अवतरली गाडग्या घडा। **पृथ्वी** अनोळख जाली मूढा॥' -ज्ञा.१८.५४३. '**पुरथई** पैदा झाली तहापासून देव कोनं पाह्यला नाही.' -अखे.

पुरन (न.) साखर, गूळ घालून शिजविलेला दाळीचा पदार्थ. 'एल्हो एल्होः कैसे उंदिराचे पुंसः **पुरण** सीजे ऐसे सीजले असेः' -ली.९९. 'इव्हायाजवायाले **वरनापुरनाचा** पावनचार कराच लागते.'

पुरनं (स्त्री.) १. गाडणे. 'औतकरी झाडाखाली भाकरी **पुरुन** ठेवायचे अन् औतं हाणायचि.' -झिं.९६. २. परवडणे. 'आजकाल तं वावरं ठोक्यानं केले तरीबी **पुरतात**.' ३. तुल्यबळ असणे. 'या लखुमेयासी कोण्ही धावता **पुरैलगाः**' -ली.१०३. 'त्याले तो उरून **पुरते**. ४. अखंड सुरू राहणे. 'संध्याकायलोक पंगताच **पुरल्या**.'

पुरनपोई (स्त्री.) पुरण घालून केलेली पोळी. 'पावनाचार **पुरनपोईचा** असे. आता कोनी नाई करत कुटाना.'

पुरनी (स्त्री.) १. पोकळ नळी. 'पयल्या पंगतीत बोट्या भेटतात. **पुरनी** सापळून जाते. भांडणानं बाजूचे कावले. कातावले.' २. फुंकणी.

पुरली (क्रि.रूप.) १. परवडली. 'ताबेदारी करनं **पुरली**. हक्कानं आपलं थे मांगता आलं असतं.' -धग.३. २. शेवटपर्यंत जाणे. 'इरीच्या पान्यालोक दोरी **पुरली** नाही.'

पुरवीत (क्रि.रूप.) देत, पुरवठा करीत. 'माय गारा मळून पेंड बनवून बापाला **पुरवीत** होती.' -फीर.११.

पुरा (वि.) पूर्ण. 'बुगदा झाला खड्याचा आतल्या आत **पुरा**.' -मिर्झा.११६.

पुराणी (वि.) जुनी. 'सरपंच अन् दशरथ पाटलाची **पुराणी** दुश्मनी.' -पख.२.

पुरान (न.) प्राचीन ग्रंथ, अठरा पुराणे. 'अष्टा दहा **पुराणे**। तीचि मणिभूषणे॥' -ज्ञा.१.५.

पुरानं (न.) १. टोकदार आरू असलेली काठी, पराणी. 'भरतीच्या बंडीले सुस्त बैल असला का **पुरानं** पायजे टोचाले.'

पुरानं (वि.) जुने. 'नाव नातं **पुरानंच** हाय.' '**जुनंपुरानं** वैभव आता कुठी रायलं?'

पुरानी (स्त्री.) पराणी. 'सहजचि गाडी जुंपती। **पुराणी** हाती धरोनि टोचती॥'

पुराव (क्रि.रूप.) दफन करावे. 'बाकरू मेलं तं वावरात नेवून **पुराव**.'

पुरी (स्त्री.) तेलात तळलेली लहान पोळी. '**पूरी** काढीता पोळलीः ते तोंडी आंगुळी सूदलीः' -ली.१४. 'मग तीही वडेः मांडेः अमृतफळेः खीरिः घारीयाः **पुरीयाः** उंबरेः फेणियाः साकरमांडे खीरि ऐसा बरवा पदार्थु उत्तमु नीफजवीलाः' -गोवि.२४६. (का.डूरि,त.पूरि)

पुरील (क्रि.रूप.) १. परवडेल. 'वावर केवळ्याचंबी इकत घेतलं तरमा **पुरीलच** पायजा.' २. पूर्ण होईल. 'मग तया मार्गाची धाव। **पुरेल** प्रवृत्तीची हाव॥' -ज्ञा.६.५९.

पुरुष(स) (वि.) माणसाच्या उंचीएवढे माप, अंतर. 'फलाटाच्या काठापासून नामा **पुरुषभर** अंतरावर उभा होता.' -धग.८. '**पुरुसभर** उच्च्या भीतीऊन उळी मारते

का काय बापा?'

पुरूपुरू (स्त्री.) १. थेंबथेंब. 'पहिल्या दिवशी धार दुसऱ्या दिवशी **पुरूपुरू**.' -मिर्झा.१३१. २. पुरवून. 'भाकरी लय, चून उलसक. तेच मंग **पुरूपुरू** खाल्लं.'

पुरे (अ.) १. परवडत असे. 'पयले पाच रुपये मजुरी **पुरे**, आता जमते काय तेवढ्यात.' २. पुरत असे. 'या इरीले हातभर दोरई **पुरे**, आता त दोरखंडच लागते पानी काढ्याले.' (अण्य त.पूरै)

पुरोठा (पु.) पुरवठा, सहाय्य. 'सासऱ्याच्या घरून लय **पुरोठा** होते.'

पुरोती (क्रिवि.) पुरेपूर. 'बुंदी कमी नाई पळत पंगतीले, **पुरोती** आय.'

पुरोती (वि.) पुरवणारी. 'भागुबाई **पुरोती**, सदा दवळी रीती.'

पुरोनं (क्रि.) परवडणे, पुरवणे, पूर्ण करणे. 'तयाची ते चाड **पुरी**। पुरविता मी॥' -ज्ञा.७.१४३.

पुरोनी (स्त्री.) पुरवणी, पुरवठा, जोड. 'औषधाचिया कडुवटपणी जैसी अमृताची **पुरवणी**॥' -ज्ञा.२.८९.

पुरोयाले (क्रि.रूप.) पुरवायला. 'सालभर आमालेच अनाज **पुरोयाले** लावते पोट्टी.'

पुरोलं (क्रि.रूप.) पुरविले. 'येक किलो तेल पुऱ्या पंगतीले **पुरोलं** उलीउली वाळून.'

पुर्जा (वि.) तुकडा, सुटा भाग. 'बंडीत बसून **पुर्जापुर्जा** ढिला झाला.' 'कोनीबी एक **पुर्जा** पळला का मशीन बंद!' (फा.)

पुर्भा (स्त्री.) पूर्वा नक्षत्र. 'धाऊधाऊ मेला पन **पुर्भी** नाई जेवला.'

पुसत (क्रि.रूप.) विचारत. 'पुत्रोत्सव कोठें लोकांसी **पुसत**।' -नाथ.२३. 'घर ठाऊक नोतं. **पुसतपुसत** आलो बापा.'

पुसतपास (स्त्री.) विचरपूस, शोध. 'फौजदार आले. पंचनामा केला. **पुसतपास** सुरू केला.' -भं.१०. 'आगीमुळे झालेल्या हानीबद्दल घरोघरी जाऊन तिने आस्थेने **पुसतपास** केली.' -कात.५८०.

पुसती (क्रि.रूप.) विचारती. 'वृक्ष आणि पक्षी **पुसती** तयांसी।' -नाथ.२-१५२.

पुसनं (क्रि.) १. विचारणे. 'मज काही पुसीलेयावीण काही करू नैएः' -ली.२३७. 'धृतराष्ट्र असे **पुसतु**। म्हणे संजया सांगे मातु।' ज्ञा.१.८५. २. घासून नाहीसे, साफ करणे. 'ते उगाणिले मज कर्म। तेव्हाचि **पुसिले** मरण जन्म॥' -ज्ञा.९.४०४. ३. मिटविणे. 'भीतीवरचे पोरापोरीचे नावं **पुसनं** पळतातच.'

पुसपरात (स्त्री.) विचारणा. 'आंधी त्याले पुसा लागते. तव्हा करायची तर **पुसपरात** करते माणसाची तो.' -सेल.११०.

पुसपास (स्त्री.) १. विचारणा. 'ठाऊक नसीन तं **पुसपास** करावं कोनाजोळ.' २. साफसूफ. 'टेबलावरचा धुळ्ळा फडक्यानं **पुसपास** केला.'

पुसलं (क्रि.रूप.) विचारले. 'मग तेणे **पुसिलेः** ''जी जीः गीतू कैसा जाला?'' -ली.४. 'तेथ जात्यंधु आला होताः तेणं **पुसीलेंः** हां गा दूध ते कैसेः' -दृ.४१. 'ते उगाणिले मज कर्म। तेव्हाचि **पुसिले** मरणजन्म॥' -ज्ञा.९.४०४. 'कुळवृत्ति नाम पुशिलें मज तिहीं।' -नाथ.

पुसा (क्रि.रूप.) विचारावे. 'नामा म्हणे स्वामी विठोबासी **पुसा**।' -नाथ.११. 'तुका म्हणे नव्हें दिसतों मी तैसा। पुसणे ते **पुसा** पांडुरंगा॥' -तुका.५३७.३.

पुसापुसी (स्त्री.) विचारपूस. 'होईल तरी **पुसापुसी** उत्तर त्यासी योजावे।' -तुका.३०८.

पुसाय (क्रि.रूप.) विचारावयाला, विचारण्यासाठी. 'सायबाले चहापाणी देताना काय त्याची जात **पुसाय** जमते.' -वा.१३१.

पुसावं (क्रि.रूप.) विचारावे. 'तुवां नेणोनि **पुसावें**। मग आम्हीं परिसऊं बैसावें।' -ज्ञा.१५.४५४.

पुसू (क्रि.रूप.) विचारू. 'जी जी! तरि मीं **पुसुं** जी?'' ''आवो ए ए ना म्हणेः **पुसि** नां म्हणेः'' -गोवि.९१. 'हें काइ वो! काइ केलें?'' म्हणौनि आवघीं देमाइसातें **पुंसों** लागलींः' -गोवि.१४६.

पुसून (क्रिवि.) १. विचारून. 'बंडी लागो, डवरंडुब्ब लागो मी मामाले **पुसूनच** नेतो.' २. साफसूफ करून. 'सायकल **पुसूनपासून** ठेवेल आये.'

पुसूपुसू (क्रिवि.) विचारूविचारू. 'मा ते वेव्हारे जे भलतेही गोसावीयाते **पुसपुसो** करीतिः' -ली.३२. '**पुसूपुसू** गामनं, कुठी नेरधामनं?'

पुसेल (वि.) विचारलेले. 'बैलगाळीचं कालपासून **पुसेल** हाय म्या.'

पुस्ती (स्त्री.) पुरवणी, अनुमोदन. 'रामरावच्या बोलण्याले शामरावनं **पुस्ती** देल्ली.' (फा.का.पुस्ति)

पुस्याले (क्रि.रूप.) पुसायला, विचारायला. 'सख्या सोबतीनी साऱ्या मले लागल्या **पुस्याले**.' -काया.११.

पुळका (पु.) उमाळा, अती प्रेम. 'बापा तुले लयच व **पुळका** आला त्या पोराचा?'

पुळा (पु.) पुडा. 'मंग भात्क्याचा **पुळा** झोऱ्यात ठुला.'

पुळे (अ.) पुढे, समोर. '**पुळे** पाठ मांग सपाट.' (त.पुडै)

पुंगई (स्त्री.) पोकळ नळी. 'या कागदाची **पुंगई** कर अन्

घाल तुयाच गांडीत.'

पुंगी (स्त्री.) वाजणारी नळी. 'यादो **पुंगी** भल्ली साजरी वाजोते.' 'गुंडाय आपला **पुंगीपेटारा** अन् निंग अथून.'

पुंजा (पु.) १. कचऱ्याचा ढीग. 'सुपी **पुंजे** भरीतिः' -ली.३. 'मज चुलीची राख **पुंजा** सांडुं देयावाः' -गोवि.९७. 'तेथे **सेणपुंजीया** सेणे टोपले भरीलेः उचलु बैसलीः तव नुचलेः' -१९९. २. ढीग, गंज. 'ऐसे चिंचोरेया दामौटेयाचे **पुंजे** जालेः' -ली.७८. 'का वाक्ये म्हणिजती **पुंजे**। अक्षरांचे॥' -ज्ञा.१३.१५२.

पुंजा (स्त्री.) पूजा. 'चांगली खेट्टानं **पुंजा** करा लागते वाट्टे जवायाची.' 'मावशीची हरहमेशा पुंजापातीच सुरू रायते.'

पुंजाणा (पु.) केरकचऱ्याचा ढीग. 'डाक्टर जवळून गोळ्या आणल्या त त्या तिनं हिगं **पुंजाण्यात** फेकून दिल्या पण घेतल्या नाहीत.' -झिं.६१. 'दिला गुरू बावाजीनं नको फेकू मंत्र एक **पुंजाण्यामधी** राख.' -लोक.१८.

पुंजापाती (स्त्री.) पूजा वगैरे. 'सकाऊनच **पुंजापती** केली का पोटो बॉ?'

पुंजाय (क्रि.रूप.) पूजा करायला. 'सून आली त उलुक्सं तरी सूक देनं मनावं बिच्चारे! तं ती चाल्ली घर **पुंजाय**.' -झिं.१२.

पुंजी (स्त्री.) संपत्ती, ठेव, साठा. 'वाढत्या खर्चामुळे त्यांच्या हातची **पुंजी** झिरपत चालली होती.' -कात.३८६.

पुंसी (स्त्री.) फुणशी, लहान फोड. 'काय डसलं काय सांगावं माय. हाताले **पुंसी** आली.'

पूख(स) (पु.) पौष- एक नक्षत्र. 'जवळपासची गावं चारही **पुसातल्या** इतवारी यात्रेला जातात.' -डेबू.५८.

पूड (स्त्री.) खण. 'बटव्याच्या एका **पुडात** सुपारी एकात तमाखू एकात पान.' (त.पूळि,पोडि)

पूत (पु.) मुलगा, पुत्र. 'धरतरीच्या **पुता**, आरती ववाळू.' '**पूत** मंगने गयी, खसम खोके आई.'

पूर (पु.) नदीतील पाण्याचा चढता, वेगवान प्रवाह. 'जीः चाला चालाः **पुरु** आलाः ...देऊळ बुडालेः दीसा दो **पुरु** ओसरलाः' -ली.६७. (सं.पुर)

पूर - शहर, गावास '**पूर**' हा प्रत्यय लावतात. उदा. दानापूर, नागपूर, हयापूर.

पूर्भी (स्त्री.) पूर्वा नक्षत्र. 'धाऊधाऊ मेला **पूर्भी** नाई जेवला.'

पूस (क्रि.रूप.) विचारावे. 'लेक जन्मते वेसवा आईची रे तिच्या कूस, तिच्या पित्याला जा **पूस**.' -लोक.७२.

पे (क्रि.रूप.) पी. 'खोकला बसत नशीन तं दारूचा येक घोट **पे**.'

पेच (पु.) संकट, द्विधास्थितीत पकडणे. 'सत्तेचाहि पाठिंबा सतत। घेवोनि आणिती **पेचात**॥' -ग्रा.११.८. 'झोप येत नाही उठावं तर काय करावं अशा **पेचात** तो पडला.' - गय. २. डावपेच, कुस्तीचा डाव. (फा.)

पेचकस (पु.) स्क्रू ड्रायव्हर. 'नट कच्याले **पेचकच** दे बरं बाले.' (इं.)

पेचकाड(ळ) (न.) कंबर. 'लग्न, हुंडा यामुळे रामकिसनाचं **पेचकाड** मोडलं.' -झिं.५.

पेचपाच (पु.) कट, बनाव, डाव. 'सज्जनाले **पेचपाच** जमत नाईत.' (फा.)

पेचा(च्या) (पु.) पतंगीचा दोराचा गुंता. 'तुई पतंगई आकाशात घिरट्या घेत होती. मंग म्या अल्लगद **पेच्या** टाकला.'

पेट (वि.) खामीचा, विश्वासू. 'हरी तात्याचा **पेट** मानूस आय.'

पेट (क्रि.रूप.) पेटावे. '**पेटपेट** इस्त्या, भागाईच्या काष्ट्या.'

पेटकाड(ळ) (न.) पोट, पोटातील आतडी. 'दारू पेल्यानं **पेटकाड** सळ्ळं.'

पेटनं (क्रि.) पेटणे. 'कापसाले येक चिनकी काफी हाय. मंग त त्याले यॅटोम्याटीक **पेटनं** हाय.'

पेटवन (न.) जळाऊ लाकडे. 'उनायात पऱ्हाट्या, तुराट्या असं **पेटवन** जमा करून ठुवा लागते.'

पेटवनं (क्रि.) पेटविणे. 'लय भूक लागली, **पेटवनं** व चूल.'

पेटवापेटवी (स्त्री.) पेटविण्याची क्रिया. 'उनायात कास्तकाराले धुरेधारे गवतकाळ्याची **पेटवापेटवी** करनं हायच.'

पेटा (पु.) १. काट्यांचा ढीग. 'पोरु जीउ कांटेचिया **पेटेयावरि** बैसोनि विखए वेवस्था करीः' -ली.५९९. 'कईचा काटा, बोराटीचा **पेटा**.' २. महाल, तालुका. 'मु. भोटा, पेटा एदलाबाद.' ३. तुरीची पेंडी. (का.पेटा)

पेटारा (पु.) काट्यांचा ढीग. 'पालव्या तोळून त्याचे **पेटारे** लावजा अन् मंग वायल्यावर फुकून टाकजा.' (क. पेटारि)

पेटारी (स्त्री.) काटेरी झुडूप. 'वावरात **पेटाऱ्याईचा** बजारच निंगला. तोळा लागतीन कोपईनं.'

पेटी (स्त्री.) १. लहान संदूक. 'नवरदेवाच्या सामानासाठी येक **पेटी** घे संग.' २. बैलगाडीच्या आसावरचे लाकडी आवरण. 'आखीच्या वरची **पेटी** मुळ्ळी.' ३. एक वाद्य. 'कोणीही उस्तादाची मदत न घेता बंडोजी **पेटी** वाजवायला शिकला.' -मोती.४१. ४. दोन भोपळ्याची सांगड. ५. माचीस. 'बिळी तोंडात ठुली अन् खिशातली **पेटी** काळून चेतवली.' (का.पेट्टिगे)

पेटेल (वि.) पेटलेला. 'चूल **पेटेल** हाय. फुकनीनं फूक मार

थोळशीक.'

पेटो (क्रि.रूप.) पेटवावे. 'मौत हाय सस्ती अथी मुरद्याले भाव/ जातीवर जात घास **पेटो** सारं गाव.' -नांबै.

पेटोन (न.) इंधनाची जळाऊ लाकडे, काड्या, कचरा. 'बुढा होता तं **पेटोन** तोच जमा करून ठुये.'

पेटोनं (क्रि.) १. पेटविणे. 'वावरातले काळ्याफनाचे गंज **पेटोनं** झाले की मंग येजो घरी.' २. पहिल्यांदाच गोऱ्हा जुंपणे, सुती लावणे. 'थे गोऱ्याईची जोळी जूत. मांगल्ल्या हप्ती **पेटोली** थे.' -काळी.१२. 'एक गाय एक म्हैस दोन **पेटोनचे** गोरे, असा बुढ्याकडील ढोराचा परिवार.' -ए.३६.

पेटोनी (न.) सुती लावणे, जुतण्याचा सराव करणे. 'घरच्या गाईचे गोरे **पेटोनी** लावले.'

पेटोय(ये)ल (वि.) पेटविलेले. 'तुकाराम्या त्याच तं **पेटोयेल** हाय ना हा धुरा?'

पेटोयाले (क्रि.रूप.) पेटवायला. 'गूळ **पेटोयाले** अथीसा ताप केला का राजे हो?'

पेटोलं (क्रि.रूप.) पेटविले. 'वावरातले फनं, काळी कचरं **पेटोलं**.'

पेठ (स्त्री.) व्यापारीशहर, बाजार. 'रीधपूर तो **पेठेचा** गाऊः तेळीणी तेल वीकीत असतिः' -गोवि.२८. 'प्रणवाचिये **पेठे**। जाहले शब्दब्रम्ह माजि॥' -ज्ञा.६.१०९. 'तुका म्हणे **पेठ**। भूमिवरी हे वैकुंठ।' -तुका. ११३. (का.)

पेढी (स्त्री.) १. एका नदीचे नाव. २. सावकाराची जागा, बैठक. 'पैशाअदल्यासाठी सावकाराच्या **पेढीवर** तं जा लागतेच भाऊ.'

पेदाड(ळ)नं (क्रि.) मारणे. 'संत्या मंधात पडला असता त **पेदाडनारच** होतो भडव्याले.' -पोळा.

पेदाळ (न.) कंबरडे. 'त्याच्या **पेदाळात** एक लाथ हान सायाच्या.'

पेन (पु.) १. भोई लोकांच्या जाळ्याचा दोर. २. लिहिण्याची झरणी. 'आमी शाळेत होतो तं लिहाचा **पेन** एका रुपायात भेटे.'

पेनं (क्रि.) पिणे. 'ठसका बसला तं पानी **पेनं** घोटभर.'

पेन्चीस (स्त्री.) पकड. 'नट धऱ्याले **पेन्चीस** पायजे लेकाची.' (इं.)

पेयेल (वि.) पिलेला. 'दारू **पेयेल** हाय वाट्टे सोयरा. घमकन वास आला.'

पेर (न.) १. पेरावे. 'चौऱ्यायशी लक्ष योनी। तियें कांडां **पेरां** सांदणी।' -ज्ञा.१४.१०७. २. तुकडा. 'उसाचे दोन **पेरं** कर.' ३. केलेले पेरणे. 'पानी पळलं नाई तं **पेर** काई उगोत नाई दादा.'

पेरकुंड (न.) उसाचा, ज्वारीच्या धांड्याचा तुकडा. 'करावी वाटते **पेरकुंडाची** बैलगाडी/ मातीच्या बौलांची जोडी.' -धों.४४.

पेरतो (क्रि.रूप) पेरणी करतो. 'आज पानी आलं का वावर **पेरतो**.'

पेरनं (क्रि.) पेरणे. 'गावात तं सगळेईनं पेरनं धरलं. आपलई येखांदं वावर **पेरा**.'

पेरनी (स्त्री.) पेरणी. 'हरबऱ्याची **पेरनी** अटोपली, गव्हाची रायली अजून.' (का.पैरू)

पेरलं (क्रि.रूप.) पेरणी केली. 'सगळं वावर सयसंध्या-कायलोक **पेरलं**.'

पेरा (पु.) पेरण्याची क्रिया. 'कालच माहा **पेरा** अटपला.'

पेरा (क्रि.रूप.) पेरावे. '**पेरा** म्हना आता धुऱ्याधुऱ्यानं बल्लम काटे.'

पेराले (क्रि.रूप.) पेरायला. 'चांगलं मुरतोनी पानी आल्याशिवाय वावर कुठी **पेराले** पुरते.'

पेरू (क्रि.रूप.) पेरावयाचे आहे. 'गावाचे **पेरने** झाले की मंग आपुनई पेरू.' (का.पेरलं)

पेरे (क्रि.रूप.) पेरणी करत असे. 'नगदी पैशाईसाठी तो पराटी **पेरे** अन् आयतीच चोट्ट्याईची सादे.' -लेक.२४.

पेरेपत्रक (न.) शेताचा दस्तऐवज. '**पेरेपत्रक** भरणाऱ्या तलाठ्यालाच शेतमालकाचं खरं नाव कळतं.' -काळी.४२.

पेरेल (वि.) पेरलेले. '**पेरेल** वावरातून आळवं गाळं नेता का राजे हो?'

पेल (न.) परिपूर्ण, भरमार. 'जेथे संपत्तीचा **पेल** झाला॥' -ग्रा.२५.५.

पेलनं (क्रि.) तोलणे, सांभाळून धरणे. 'तंव पुढा वाढी **पेले**। नवेया देहाची॥' -ज्ञा.१५.१६०.

पेलांटी (स्त्री.) दंड, शिक्षा. 'जेवाले आला नाई तं **पेलांटी** बसीन तुयावर काय?'

पेलून (क्रि.रूप.) १. तोलून. 'एक खांबानं घर **पेलून** धरेल आये.' २. शिक्षा देणे, अद्दल घडवणे, हानी करणे. 'साजरं पाचशानं **पेलून** देलं सायानं मले.'

पेलेल (क्रि.रूप.) तोललेले, सावरलेले. 'या ठुनीनं भीत **पेलेल** आये.'

पेलो (क्रि.रूप.) प्यालो. 'तान लागली तं पोटभर पानी **पेलो** मी.'

पेलोलं (क्रि.रूप.) तोलले. 'म्हताऱ्याले एवढं वझं **पेलोलं** नाई तं देलं टाकून खाली.'

पेल्लम (पु.) आदिवासीच्या लग्नातील एक रिवाज. 'अरे लगनात **पेल्लमसाठी** किती पैसा मोजा लागते आपल्या जातीत?' -सि.७८.

पेव (पु.) धान्य साठविण्यासाठी जमिनीत केलेले विहिरीसारखे विवर. 'तेथ चणेयांची **पेवें** नीगतिः तेया पेवाचीए पाळी बैसोनि गोरेगोरे चणे गोसावीया लागौनि वेचीतिः' -ली.३५८. 'गावी एकचि **पेव** निघालेः ते सारिखेचि जोन्हळेः' -ली.४३७., 'राउळ पीसेः...एका एकाधीए पेवी घालीतिः तेहवळी काइ करीसी?' -गोवि.९. 'का **पेंव** करूनि आइतें। पेरूं जाइजे॥' -ज्ञा.१७.२८५. 'नका काढू माझीं **पेवें**। तुह्मीं वरला भूस खावें॥' -तुका.५१८.२. 'धनाढ्य शेतकऱ्यानी ज्वारीची देवाणघेवाण बंद केली. **पेव** जसेच्या तसे ठेवले.' -फीर.९९.

पेवन्दी (वि.) १. कलमी. २.- आंबा पु. तोतापुरी आंबा. ३.- बोर न. मोठे गोड बोर.

पेवबूड (न.) धान्य ठेवण्याच्या जागेचा खालचा भाग. 'मडक्याच्या मोबदल्यात मातेरं, **पेवबुडाचं** धान्य इ. मिळत असे.' -फीर.१०५.

पेवली (स्त्री.) खाण. 'सासू रतन मांडली, नवरत्नांची **पेवली**.' -लोक.१.

पेशा (पु.) व्यवसाय, धंदा, व्यापार. 'भांडनं पेटोनं हा त वकिलाचा **पेशाच** आये.' (फा.)

पेशी (स्त्री.) खटल्याची सुनावणी, पुढे मांडणे, ठेवणे. 'सकाय कोर्टात माही **पेशी** आय.' (फा.)

पेसान (क्रि.रूप.) प्याल. 'अरे मद्यावरल्या पयशाचीई दारू **पेसान** रे तुमी.' -लेक.२२.

पेहेराव (पु.) नेसू, पोषाख. 'एक रेशमी **पेहेरावातला** माणूस बाबांची चिलीम पेटवायचा.' -मोती.

पेळ (स्त्री.) कुंदा, हराळ असलेली जागा. 'दोनफाळी नांगरानं **पेळ** नांगरून काहाळली.'

पेंगाटू (क्रि.रूप.) पेंगू, झोपू. 'वखरतांनी वावरातच, ढेकलात **पेंगाटू**.' -मिए.३१.

पेंड (पु.) १. गोळा. 'मातीकाम होत असेः लखुबाइसे **पेंड** देत असतिः' -ली.०१९१. 'तुळसानं मसाल्याचा **पेंड** गंजात टाकून फोडणी दिला.' -ना.१४. (का.हिंडि) २. राखीव. 'घरातलंच **पेंडाचं** बी काढनं टरटर पेरून काढा.' -अंधा. ३. नदी काठचा चढ. 'पाण्याला गेली गोंडीनं नदीच्या **पेंडावर/** वाटच्या वाटसरा नजर का गोंड्यावर.' -लोक.७१. 'वठ्ठीन धुनं धुते नदीच्या **पेंडावर/** पाप्याची नजर तिच्या गोंड्यावर.' 'गेले अंदुऱ्या **पेंडाले**, त्याईन दमनी सोळली.' -लोक.४२. ४. जात्यावरचे वजन. ५. उंचवटा. 'पायऱ्याले लावेल टोंगयाभर खांडई तसंच होतं. त्यावर धसून दरोज्यावरल्या **पेंडावर** जाता ये.' -लेक.४९. 'लाजेचा **पेंडवळा**। खाणोनि घालीः' -ज्ञा. १३.६९५. ६. वखर जुंपण्याचा जाडसर दोर.

पेंडकं (न.) लहान भारा. 'समोरची जागा फक्त चार फूट असल्यानं डोक्यावर गवताचं **पेंडकं** घेऊन जानही मुसकील होतं.' -सुखो.३६.

पेंडकोनी (वि.) पायाला चिखल लागेल एवढा -पाऊस. 'रातभर पानी मस्त **पेंडकोनी** आलं.'

पेंडखजूर (पु.) ओला खजूर. '**पेंडखजूर** तर फुटक्या पितळी भांड्यांच्या भारोभार विकला जाई.' -मोती. (का.पींडिखर्जूर)

पेंडरोग (पु.) स्थूल, आळशी, ऐदी. 'ही लहानपणापासूनच अशी **पेंडरोग** आहे. बसल्या जागी काडी उचलणं जड.' -कात.८२.

पेंडी (स्त्री.) बांधलेला गठ्ठा, भारा. 'वासरुवालागि गवत आणु जातिः ते येकि येकि दो दो **पेंडीया** घेतीः' -गोवि.३. 'डोइए वानेराची **पेंडीः** ते ठेवीलीः' -दृ.५४. 'तुमी गवत कापान त मले **पेंडी** बांधाची कायची सरम आये?' -धग.७.

पेंद्या (वि.) तमाशातील विनोदी पात्र. 'बाई नाचते अन् **पेंद्या** भल्ला हासोते तमाशात.'

पै (स्त्री.) जुने, कमीतकमी मूल्याचे नाणे. तीन '**पै'चा** एक पैसा होतो.

पैकाट (न.) कंमर. '**पैकाटात** लाथ हाणली.' -झिं.९६.

पैज (स्त्री.) होड, शर्यत. 'परि अमृतातेही **पैजासि** जिंके॥' -ज्ञा.६.१४. 'म्याच **पैज** लावली पन मीच हारलो.'

पैजामा (पु.) चोळणा, विजार. 'बाप्पा काका! तुमी तं धोतर घालत होते ना अन् हा **पैजामा** कधीपासून. पायली वाट्टे दुसरी काकू?'

पैदल (वि.) पायदळ. 'गजाननाचे भक्त **पैदल** देवाची वारी करतात.'

पैदा (वि.) निर्माण केलेले. 'कोन्या नकीतरात हे पोट्टे **पैदा** झाले देव जाणे.' -काळी.१०. (फा.)

पैदाईश (स्त्री.) १. उत्पत्ती, उपज, जन्म. 'आजकालची **पैदाईश** काई खरी नाई निंगून रायली.' २. कमाई. 'पोलिसात असल्यानं पोराची **पैदाईस** चांगली आये.' (फा.)

पैदास (स्त्री.) उत्पन्न. 'बापा, डुकराची तं भलकसी **पैदास** रायते.' (फा.पैदाईश)

पैदाशी (स्त्री.) मिळकत, कमाई. 'कर्मचाऱ्याईच्या **पैदाशीले** काय पाहा लागते.'

पैपावना (पु.) पाहुणे. '**पैपावना** घरी आला तं च्यापानी कराच लागते.'

पैय्या (पु.) पाया, पायवा. '**पैय्या** खोदनेकू लेते क्या सगन भाऊ?' 'घराच्या **पैय्यात** गोटे भरले.'

पैरवी (स्त्री.) वजन, चालती. 'वाड्यात ज्यांची जल्मात **पैरवी** नव्हती त्यांची आता रोज पायधूळ झडू लागली.' -कात.३८५.

पैल (अ.) पलीकडे. 'दिव्य तू प्रकृतिभाया। **पैलीकडील**॥' -ज्ञा.१०.१५०.

पैलवान (पु.) मल्ल. 'आमच्या गावात दोन पैलवान हाय. ते गावातच **पैलवानकी** करतात.' (फा.)

पैसा (पु.) तांब्याचे नाणे. '**पैसे** भेटले तं कशीबी लेकराची थोडी थिटकी तरी बुजाबूज व्हते.' -ऊन.१५८. (फा.पैसः, त.पैशा)

पोई (स्त्री.) पोळी. 'बाइः यासि तुपे माखूनि पोळी देयाः' -ली.४९८. 'पळीभरि तुपः दोनि **पोळिया** मोडिलीयाः' -ली.०५६५., 'मग **पोळीया** केलीयाः ताटी वोळगवीलीयाः तीया गोसावी ऐसीया पाहीलीयाः' -गोवि. १४६. 'गरमागरमा **पोई** अन् तिच्यावर गुईतुपाचा वत्तर.'

पोकनं (क्रि.) १. पक्व होणे. 'बासा फुसका हाय, **पोकेल** नाई वाट्टे. २. लठ्ठ होणे. 'भाऊ तं लयच **पोकला**. काजू, खुरमाचा अलप अस्ती काय वैनी भॉले.' ३. हुकवणे, चुकवणे. 'जोळची कॅच **पोकली** सायाच्यानं.'

पोकय(ळ) (वि.) पोकळ. 'तुत्याची काळी **पोकय** असल्यानं येका झोळप्यात फाकली.' (का. टोकळु, पोळळु,त. पळुक्काय)

पोकलं (क्रि.रूप.) परिपक्व होणे. 'सातआठ महिन्याचं लेकरू चांगलं **पोकलं** होतं.' -सि.२६.

पोकाड्या (वि.) भित्रा, ढिला. 'राती घराभाईर जात नाई असा **पोकाड्या** आये जानराव.'

पोक्त (वि.) लठ्ठ, प्रौढ, निपुण. 'अन्याजी खोटं नाई बोलनार **पोक्त** मानूस है.' (फा.पुख्त.)

पोक्या (वि.) बिनकामाचा. 'घरात बसून खाते **पोक्या**. कामाच्या नावानं हीव वाजते.'

पोखरनं (क्रि.) खणून, उकरून, कोरून काढणे. 'मामोज्याईनं अवघ्या भीती **पोखरल्या**.'

पोखरेल (वि.) उकरलेली, कोरलेली. '**पोखरेल** भीताळाईत इचू काटाबी रायते.'

पोगंडी (स्त्री.) एक गवत. 'भाराभर **पोगंडी** गवत निंगल धुऱ्यावर.'

पोगर (पु.) लाकडाला छिद्र पाडण्याचे साधन. 'बंडीच्या पाटलीले भोक पाळ्यासाठी **पोगर** आन वाळ्याच्या घरून.'

पोगरी (वि.) पोकळ. 'ही इकडली **पोगरी** मिरची नाही सिमलावाली. बेजाच तिखट आहे हे.' -कावू.

पोघाडा (पु.) एक वाद्य. 'सनई, चौघडा, **पोघाडा**, डफडं अंगणात आणून स्वतःच्या हातानं फोडलं.' -मोच.४६.

पोचं (वि.) पोकळ, न भरलेले. 'कनूस भरलं नाई आजून **पोचच** आये.'

पोचट (वि.) १. निकस. २. पोकळ, ठिसूळ. 'कोमळ कंटक तीक्ष्ण अगरी। **पोचटते** वरी अंगकांती।' -ज्ञा.१७४६. ३. लेचापेचा. '**पोचट** मान्साले भारी काम सांगू नोये?'

पोचन (क्रि.) पोहाचेल. 'बारा वाजेलोक मी बैठकीत **पोचनच**.'

पोचनं (क्रि.) पोहचणे. 'ऊन व्हाच्या आंदी गावात **पोचनं** पळते राजा.'

पोचा (वि.) कमजोर. 'नांगरटी करनं पोच्या मान्साचं काम नाई.'

पोछा(च्छा) (पु.) पोतेरा, पुसावयाचे कापड. 'रंधावन गदादलं. **पोछा** मारून सफा करून टाक.'

पोटखराबा (वि.) निकस, पिकाऊ नसलेली. 'काई काई जमीन **पोटखराबा** हाय.' -दि.५५.

पोटगंज (वि.) खाण्यावरच लक्ष असलेले. 'हे निलाजरे असे, काई मनाबोला पन पोटाले घाला आस्से **पोटगंजे**.' -दि.६०.

पोटगी (स्त्री.) खावटी. 'बायको टाकून देताना मजा वाट्टे आऽऽ. आता भर म्हना **पोटगी**.' (का.पोटगि)

पोटजन (न.) संतती, अपत्य. 'पोटी **पोटजन** नाई म्हून पुतनीले दत्तक घेतलं त्यानं.' -सित.१९.

पोटदलाल (पु.) दलालाचा साहाय्यभूत दुसरा दलाल. 'तुझ्यासारखा **पोटदलाल** मिळाल्यावर चिकणा बकरा हलाल करावयास वेळ लागणार नाही.' -कात.४४२.

पोटपाटाचं (वि.) अनैतिक संबंधातून गेलेला गर्भ. 'मायं काय **पोटपाटाचं** लेकरू हाय हे असं काईच्या काईच बोल्याले.'

पोटपाडी (वि.) अनैतिक संबंधातून राहिलेला गर्भ पाडणारी. '**पोटपाडीच** पोटपाडी पण केवढी टेक?' -पख.१०८.

पोटपोशा (वि.) केवळ स्वतःचे पोट भरणारा. '**पोटपोसी** एकला। भूती दया नाही ज्याला॥' 'संसार करिता म्हणती हा दोषी। टाकिता आळसी **पोटपोशा**।' -तुका.२५९.

पोटभऱ्या (वि.) स्वतःचे पाहणारा. 'हे तक्याले रेटून भागोत करनारे एक नंबरचे स्वार्थी...**पोटभरे** आहेत.' -ना.७०.

पोटरकी (स्त्री.) पायाचा मासल भाग. 'पहिल्यानं गरवार म्हनते नाईनाई, पायाची **पोटरकी**, डायी मिरी देते गाई.' -लोक.१५९.

पोटरकी (क्रिवि.) पक्व दशेला आलेले न उकललेले कणीस. 'हाब्रीडची त गच्चीच दाबली. कणसं **पोटरकीतच** अटकले.' 'गर्भार बाह्याईले म्हने **पोटरीवरले** धांडे.' -ऊ.५९.

पोटरजाडी (वि.) पायाच्या पोटरीच्या आकाराचा. 'त्याने निर्भयपणे काळा आठ फुटी लांब आणि **पोटरजाडी** नाग पाडला.' -खुं.२२.

पोटरलेली (वि.) पानाच्या पोंग्यात असलेली. 'पावसाने दडी मारली. **पोटरलेली** ज्वारी पोटऱ्यातच अडली.' -सेल.१४९.

पोटरी (स्त्री.) १. पाऊल व गुढघ्यामधील मांसल भाग. 'माया **पोटरीत** जशा बेंडक्या पऊन रायल्या.' २. निसवण्याच्या स्थितीतील कणसे. 'जेवारी **पोटरी** आली. आठदा दिवसात कन्सं निसयतात.'

पोटलावगन्या (वि.) फुकट खाणारा. 'माही पखाल बंद झाली तं मी का इतल्याभार **पोटलावगण्या** झालो.' -झिं.६७.

पोटली (स्त्री.) पिशवी, थैल. 'मग दोन्ही **पोटलीया** प्रसादाचीयाः लाडुवाचीचाः' -ली.५८५.

पोटात पोट (न.) एकात दुसरे. '**पोटात** पोट तीनंक पायल्या उडीद धरता आले तर कशीबी दिवाळी व्हते.' -ऊन.१७३.

पोटाळी (वि.) अनैतिक संबंधातून गरोदर असलेली. 'नवरा टाकला अन् आता बसली घरात **पोटाळी**.'

पोटाळे (वि.) अनैतिक वृत्तीचे. 'चरित्रवान ठरते समाजात **पोटाळे**.' -मिए.६८.

पोटासी (क्रिवि.) जवळ. 'मग उचलोनि ओसंगा धरिला **पोटासी**।' -नाथ.१२५०.

पोटीपाटी (न.) पाठपोटचे अपत्य. 'त्याच्या **पोटीपाटी** काई हाय की नाई? की वांझोटा हाय?' -फीर.१५.

पोटीशी (वि.) पोटुशी, गर्भार. '**पोटीशीला** मुशाफरी नको असं गावात बाया सांगू लागल्या.' -मोती.४१.

पोटुसी (वि.) गर्भ धारण केलेली. 'जाणेवीणे कळा **पोटुसीया** जालीया जीः' -ली.१२१.

पोट्टं (न.) मुलगा. 'महादेव बिथरायचा अवं काय मारून टाकतं थ्या **पोट्ट्याले**?' -धग.५.

पोट्टपोट्टी (स्त्री.) मुलगा मुलगी. '**पोट्टी** बनते माधुरी पोट्टं बनते सलमान; बापाच्या पैशावर मारत रायते शान.' -नांबै.

पोट्टी (स्त्री.) मुलगी. 'खेळण्याच्या दुकानांमुळे निदान **पोट्टी** खुशीत आहे.' -मोती.

पोट्टेपाट्टे (न.अने.) लहान मुले. '**पोट्टेपाट्टेईले** द्या जेवाले बसून. नाईतन रुंगरांगय करतात.'

पोट्टेल (वि.) पोरकट. 'भगवंता तं निऱ्हाच **पोट्टेल**. दिवसभर काई चेंडायन्या करे.' -लेक.६५.

पोट्टेशाई (स्त्री.) पोरकट वागणे. 'भारमसूत मान्साले असं **पोट्टेशाई** वागनं सोभते का?'

पोट्या (वि.) केवळ पोटावर लक्ष देणारा, फुकट खाऊ. '**पोट्या** बसला खायाले अन् कंजूस बसला वाळ्याले.'

पोड (पु.) १. कोलामांची वस्ती. '**पोडावरचा** एक आंधया कोलाम पोराले काई इच्चारत होता.' -दि.१७. २. तागाला पिळा देणे.

पोत (स्त्री.) पोथ, मंगळसूत्र. '**पोत** तुटली तं वऊन घ्याव. असं भोंड्या गयानं नाई रावं.'

पोत (पु.) १. काकडा, मशाल. २. कापडाची जाड-पातळ वीण. 'दुकानात आला कपळा घ्याले, काई **पोत** पात कयते बाबू?' (का.पोत्तु, होत्तु)

पोतं (न.) गोणी, धान्य भरण्याचा गोणपाटाचा थैला. 'मग बाईसि कणीकीचे **पोतेः** तांदुळाचे पोतेः एकवट वाढु जगा घातलेः' -ली.२२१. (फा.)

पोतडी (स्त्री.) पिशवी, पुरचुंडी. 'आतां कृपाभांडवल सोडीं। भरीं मति माझी **पोतडी**।' -ज्ञा.१४.१७. 'येणें जाला तुमचे **पोतडीचा** झाडा। केलासी उघडा पांडुरंगा॥' -तुका.३६८०. (फा.)

पोतर (न.) पात्र. 'मांगणीच्या हातानं कुणबी दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी **पोतर** भरतात. यात पात्रावर भाकर ठेवतात.' -वा.३५.

पोत(ता)रनं (क्रि.) सारवणे. 'भांगापुरतं इचरलं, चौक्या-पुरतं पोतारलं.'

पोतरा (पु.) पोतेरा. 'आंगन सारोतो म्हतलं पन **पोतराच** दिसून नाई रायला कुठी पळ्ळा तं.'

पोतारलं (क्रि.रूप.) सारवले. 'उकरेल भीत शेनामातीनं साजरी **पोतारली** पायजे आता.'

पोतारेलं (क्रि.रूप.) सारवलेली. 'चित्रंगच काढाच आय तं साजरं **पोतारेल** भीतीवर काढ माय.'

पोतीरा (पु.) मातीचे घर शेणामातीने सारविण्याचा कपडा. 'नाहीं तरि जातयां पाट्यां मुसळा गवसनीचां होतिः **पोतेरीं** होतीलः' -गोविं.१२२. 'तिच्या हातात सारवणाचे **पोतेरे** होते.' -कात.३३४.

पोत्रे (पु.) पोतीरा. 'मातीचं घर असूनबी **पोत्रे** दिसून नाई रायले माय.'

पोथ (स्त्री.) गळ्यातील मण्यांचा सर. 'गयात घाल्याले तं काया मन्याची **पोथई** नाई उरली.'

पोथी (स्त्री.) धर्मग्रंथ. '**पोथी** सोडिलीः दोनि एक श्लोक वाखाणिलेः आणि मागौती **पोथी** बांधलीः' -ली.११५.

पोदाळ्या (वि.) भित्रा, आळशी, मंद, लठ्ठ. 'या **पोदाळ्याले** तं बसल्या जागी खाले द्या.'

पोनकार (वि.) पोहण्यात पटाईत. 'पुरात पोहून औत लाकडं काढून देणारे **पोहनकार** गावात होते.' -पख.८४.

पोपई (स्त्री.) एक फळ, पपई. '**पोपईचबी** पीक मस्त हाय. लवकर येतेबी दोन पैसे उरतातबी.'

पोपळा (पु.) पापुद्रा. 'मातीच घर होत तं बातन्याबात **पोपळे** निंगत अन् सारवाच लागे माय.'

पोफळी (स्त्री.) लोखंडी एक अवजार. 'त्याने बाजूला पडलेली दांडा नसलेली **पोफळी** उचलली.' -सेल.३१५.

पोबारा (पु.) निघून जाणे, पळ काढणे. 'ममीनं गावातून **पोबारा** केल्याची सबन गावामंदी हुकात उळली.' -सित.८३.

पोयनं (क्रि.) पोहणे. 'ऐसे अवघेचि वीहीरीआतु **पव्हावेया** रीगालेः' -ली.५३. 'तळेयाआंतु **पव्हायेया** रीगालेः तव कमळे बरवी देखिलीः' 'जैसा आब्रम्ह पूर्णेदकी। **पव्हे** मार्कंडेय एकाकी॥' -ज्ञा.११.१८७.

पोयनी (स्त्री.) पोहण्यात मग्न. 'वारीले डोहात बैल मस्त **पोयनी** लागतात.'

पोया (पु.) पोळा. 'बैलाचा **पोया** झाला की दुसऱ्या दिवशीचा तान्हा **पोया**.' -डेबू.३६. 'पोयाले ठोंबरा, बाकी दिवस हंबरा.'

पोयी (स्त्री.) १. पोळी. 'आजकाल **पोयीच** पायजे. भाकर तं निऱ्हा तोंडालेच डसते.' २. मधाची पोळी. 'सयद तू खातं अन् मले म्हनत हे खाय **पोयी**.' ३. गुरांच्या माने खालचा मांसल भाग. 'बैलाच्या माने खालचे गोचीड मारायचो मानेखालची **पोळी** खाजवायचो.' -खुं.४७.

पोयेल (वि.) पोळलेला. 'माहा जीव लय **पोयेल** होता म्हून मी बोल्ली एवढं!'

पोर (न.) मूल. 'खाजगी शाळा होत्या त्या पाटील, पांड्याह्याच्या **पोरायसाठी**. मांगामहाराच्या पोराह्यले तिथं मुभा नव्हती.' -वा.८. '**पोरवयात** काय कयते हो लकराले.'

पोरंसोरं (न.अने.) मुले. '**पोरंसोरं** कसेबी वागले कोनी काई म्हनार नाई पन मान्सानं रीतिभातीनंच वागावं.'

पोरगं (न.) मुलगा. '**पोरगं** मनातून डुख धरून बसलं होतं अन् माय विषारी दंश झाल्यावानी तडफडत होती.' (का.)

पोरगी (स्त्री.) मुलगी. '**पोरगी** साजरी निंगली अन् शिकलीबी पंधरावी लोक.'

पोरजन (पु.अने.) पोरवयातील मुलेमुली. '**पोरजनाचा** भरुसा देता येते का कोनाले?' -रा.१३.

पोरबूद (स्त्री.) बालबुद्धी. 'जवान रगत या पोरायीचं, काई **पोरबुद** त केली नसीन.' -सित.८५. 'चोरीची **पोरबूद** अन् समद्या संसाराचा सत्यानास.'

पोरसवदा (वि.) मुलासारखा, अल्पवयीन. 'त्याले काय मोठं येठन हाय? **पोरसवदा** पोट्टं ते.'

पोराया (पु.) चुलीच्या आणि उल्यामधील भाग. 'सयपाक कऱ्याच्या आंधी चूल, **पोराया** सारवाच लागते माय.'

पोरी (स्त्री.अने.) मुली. 'शाळेतल्या **पोरी** भलकशा हुशार. म्हताऱ्या आजीले तं युऽऽ शिकोतात.'

पोल (स्त्री.) गूढ, गुपित. 'जास्त भारदशीन तं अवघी **पोल** खोलन तुही!'

पोलकं (न.) १. पळसाच्या फांद्यांचा भारा. 'गोंडाईचे खोपडे गवताचे आन **पोलक्याचे**, भीती मेड्याच्या, कुडाच्या.' -दि.६५. २. चोळीसारखे स्त्रीचे अंगवस्त्र.

पोवच्या (पु.) तळपाय. '**पवच्या** मोठा असल्यानं हा जोळा दाटते लेकाचा.'

पोवा (पु.) महादेवाच्या भक्तांचा थवा. 'कार्तिक मासा मातापुरा **पव्हा** निगालाः' -ली.२.

पोवाडा(ळा) (पु.) प्रशंसागीत. 'मृत गुरूपुत्र आणिला। तो तुवा **पवाडा** देखिला।' -ज्ञा.३.१६३. 'पुराणीं जे तुझे गर्जती **पवाडे**। ते आह्मां रोकडे कळों आले॥' -तुका.५४४. (का.पवाड)

पोवाळनी (स्त्री.) पोहण्याची क्रिया. 'मासोई पान्यात पळली की मस्त **पोवाळनी** लागते.' -डेबू.१७.

पोव्हरा (पु.) पाणी वाहण्याचा पिपा, डबा. 'घातला दोर **पोव्हरा** पानी नाही विहिरीत/ तशी आईविना कोणाच्या मनी नाही प्रित.' -रुक्मि.१४. 'शेत आंधळी इहीर, मीही फुटका **पवरा**.'

पोशिं(सिं)दा (पु.) पोसणारा, देव. '**पोसिंद्याचे** पडिलों हातीं। वोझें माती चुकली॥' -तुका.३७२७.२. (सं. पोषितृ,पा.पोशिन्दा)

पोषणे (वि.) पोसावे लागते ते. 'रंगराव म्हणजे बाळासाहेबांचे आवडचे **पोषणे** होते, राशीला लागलेला गुरूग्रह.' -कात.३८६.

पोसनं (क्रि.) पालनपोषण करणे. 'कांडाः दळाः तथा करांडा करौनि तयाते **पोसीः**' -दृ.९१. 'कामधेनु दवडिजे। न **पोसवे** म्हणोनी।' ज्ञा.९.६२६. 'कां पितृपक्षु पोषितां ऱ्हासु। चंद्राचा जैसा॥ -ज्ञा.१६.१०७.

'मायबापाले तं पोरानच **पोसनं** असते म्हतारपनी.'

पोसनीचे (वि.) पोसलेले. 'काम आलं काम आलं आमी अलप चाटतो/ झाले **पोसनीचे** वाघ दात पाळून जगतो.' -नांबै.

पोसन्या (वि.) पोसलेला. 'उठ पसरला काय **पोसण्या**?... बिनफिकऱ्या.' -बा.१७.

पोसेल (वि.) पोसलेले. 'लय गावं **पोसेल** आयेत तात्याजीनं.'

पोसो (क्रि.रूप.) सांभाळत असो. 'कोंबड्या कापासाठी घरी आमी **पोसो/** राती सकायी सोडाचा त्रास सोसो.' -मिर्झा.११२.

पोहनकर (पु.) पोहणारा. 'नदले आला महापूर चालल्या काट्याकुट्या/ **पोहनकऱ्या** खोस तुया वट्या.' -लोक.७३.

पोहाळनी (स्त्री.) पाण्यात पोहायला लावण्याची क्रिया. 'पोळ्याच्या वेळेस सगळ्या गावाचे बैल याच रामडव्हात **पोहाडणी** लागतात.' -पख.८७.

पोहोच (वि.) पोहोचवणारा, ठिकाणापर्यंत. 'फाट्यावर उतरल्यावर पश्चिमेकडे **पोहोच** रस्ता जातो.' -काळी.७.

पोहोनी (स्त्री.) पोहण्याची क्रिया. 'पोयाच्या रोजी नदीत बैलं **पोहोनी** लावलते.'

पोह्या (पु.) भक्तांचा थवा. 'महादेवाच्या **पोह्यासोबत** कासम सालबर्डीच्या जत्रीले गेला.' -धग.१३६.

पोळा (पु.) बैलांचा सण. 'पोळेयाचीये अवसेचा दिसी गावीचे बैल श्रींगारीतिः' -गोवि.३०९.

पोळी (स्त्री.) बैलाच्या मानेखालचा मांसल भाग. 'बैलाच्या मानेखालचे गोचीड मारयची, माने खालची **पोळी** खाजवायची.' -खुं.३०., (का.होळिगे, त.पोळि)

पोंगा (पु.) १. भोंगा. 'सकाऊनपासून **पोंगा** लावला लेकरानं खेळन्यासाठी.' २. खाण्याचा पोकळ नळीसारखा पदार्थ, पोकळ नळी. 'दोन रुपयाचे **पोंगा** अन् गोया द्या इकत.' ३. एक वाद्य. ४. कणीस ज्यात असते ते पानांचे आवरण. 'आता कुठी कनसं **पोंग्यातून** भाईर इवून रायले.'

पोंगाउपसी (स्त्री.) पानातून वर येण्याची क्रिया. 'जवारीले **पोंगाउपसी** चालू झाली.'

पोंगाडा (पु.) एक वाद्य. 'हिसोबानं वाजवा नाईतर सैनी एकीकडं, **पोंगाडा** दुसरीकडं आन दफडं तिसरीकडं जाचं.' -दि.१४.

पोंगापंडीत (पु.) खाण्याचा पोकळ नळीसारखा पदार्थ. 'घाण दारू पोटात गेल्यावर बायामाणसं **पोंगापंडित** कुरतडत होते.' -झेल.२१.

पोंगापंडीत (वि.) महामूर्ख. 'दिप्यावानी **पोंगापंडीत** म्हन्जे पक्का भोकभुल्या.'

पोंगाळ (पु.) कमी समज असलेला. '**पोंगाळ** पोट्ट्याईच्या देखत अशा रातीबेरातीच्या गोठी नोका सांगत जाऊ.'

पोंगाळा (वि.) १. लठ्ठ. 'हरामाचं खाऊखाऊ **पोंगाळा** झाला लेका दिप्या.' २. मांगाचे वाद्य. ३. मूर्ख, बेअकली. 'सरकं तास काहाळनं लेका. तू तं निऱ्हा **पोंगाळाच** दिसून रायला.'

पोंढळले (क्रि.रूप.) पेंग येणे. 'शिणता तुजसाठी **पोंढळले** हे डोळे.' -भीक.४३.

पोंध्या (वि.) लठ्ठ. '**पोंध्या** मानूस असला तं टांग्यात येकच बसे.'

पौंना (पु.) एक गवत. 'कव्वालच **पैंना** बैलाईले लय मानते.'

पौळी (स्त्री.) बांधाचा उंचवटा. 'ना धड जमिनीत ना धड बांधावरच्या **पौळीत**.' -ल.८.

प्यांड (पु.) पँट. 'एका हातात दप्तर दुसऱ्या हातानं खाली सरकनारा **प्यांड** वरते करत तो निंगाला.' -सित.६०. (इ.)

प्याले (क्रि.रूप.) प्यायला. 'मंग ते पानी पिंट्याले **प्याले** लावलं.' -धुम्म.

प्रालब्ध (न.) नशीब. 'शेवटी **प्रालब्धात** असते तेच घळते. देवाच्या मनात असीन तेच घळून आलं.' -तित.३०.

पॅक (वि.) गच्च, भरलेले. 'सर्व्या खोल्या जावया इवायानं **पॅक** झालत्या.' -दि.१. (इं.)

फ

फक (न.) पंख. 'रंजोलं गांजोलं दुख सांगे आपले/ पिंजऱ्यातल्या मिठ्ठूचे जसे **फकं** कापले.' -रूख.

फकडी(ळी) (स्त्री.) १. फुलपाखरू. 'रुईच्या झाडाच्या दोडीतून **फकड्या** उडाव तसं जमिनीच्या आधर चालल्यासार्क वाटते.' -सेल.३०८. २. फुलाची एकेरी पाकळी. 'गुलाबाच्या फुलाले भलकशाच **फकळ्या** असतात.'

फकत (क्रिवि.) फक्त, केवळ. '**फकत** रिपोट आला का झालं.' -अक.९. '**फकत** दोन आन्यात झोरा भरून बाजार होय पयले.' (अर.अण्य)

फकनचोट (वि.) फुकटा, दरिद्री. 'मोठ्या माणसायच्या वादात आपल्यासारख्या **फकनचोटायनं** पडू नाही.' -पोळा.

फकनाळ्या (वि.) बिनकामाच्या गप्पा मारणारा. 'तुले तं बाप्पा मुलखाचे कामं आयेत आमच्यावानी **फकनाळ्या** थोळीच हायस.'

फकन्या (वि.) कफल्लक, निर्धन. 'गोईंदराव ढन असामी होता पयले, आता झाला **फकन्या**.'

फकफक (न.) घाबरणे, भयाकूल. 'दाटवाट झाळोनात तं घुसलो पन भल्ली **फकफक** करे मायाली.'

फकरूट (वि.) गरीब, फुकट लाभ करून घेणारा. '**फकरुटाच्या** घरी काय अशीन दोन धबाळाईशिवाय.'

फकस्त (वि.) फक्त, केवळ. '**फकस्त** हो मना मंग पा आपलं काम.' (फा.)

फकांतं (वि.) फाकलेले. 'सकाऊनच येक पाय **फकांता** करावं अन् डोक्स आंगोठ्याले लावाचा व्याम सांगला, तसा मले हासाच आला बयना.' 'पाय जोळून काबा बसला रे, **फकान्ते** करून बसनं.'

फकानतं (वि.) पसरलेले. 'पायातले तोळे दिसावेत म्हून नवरी **फकाणते** पाय करून बसली होती.' -काळी.९९.

फकाल (क्रिवि.) खूप जोरात. 'बैलाले गाईगवारात काय भेट्टे. संध्याकाई खुट्यावर **फकाल** कुट्टी खातात.'

फकीर (पु.) मुसलमान, भिक्षेकरी साधू. '**फकीर** झाले जास्त कमी झाला आटा.' -मिए.११६. (अर.फा.)

फक्कड(ळ) (वि.) उत्साहाने स्वतंत्र वागणारा, सुंदर. 'पोरगीऽऽ काटेबाज हाय. येकदम **फक्कळ**.'

फक्कन (क्रिवि.) एकदम. 'घमेले उचलनं काय लेखनी चालोनं हाय काय? **फक्कन** वाळ देते.' -फीर.१४९.

फक्का (पु.) तोंडात मावेल असा भुकटीचा घास. 'पिठ्ठी मुठ्ठीत धरली का मारला **फक्का**.' (फा.)

फक्की (स्त्री.) बारीक पूड. 'गव्हांचिया होती परी। **फके** वरी खाऊं नये।' -तुका.७०. २. चूर्णाचा लहान घास. 'चंचई काढली. तंबाखाला चुना लावला. **फक्की** मारली.' -डेबू.१४. (फा.)

फगवा (पु.) कोरकूंची एक रीत, सण- फाग. '**फगव्याच्या** सणासाठी कापडचोपड दाळदाणा घेण्याचा विचार घोंघावला.' -झेल.१२.

फजूल (वि.) निष्कारण, व्यर्थ. '**फजुलच्या** बाता मत कर, पैसे निकाल पयले.' -धग.३२. 'तू **फजूल** तरास देतं गळ्या मले.' (अर.फा.)

फज्जी (स्त्री.) फजिती. 'सोयरिक मोळ्ळ्याच्यानं लयच **फज्जी** झाली लेकाची.' (फा.)

फट (स्त्री.) दोन वस्तूतील अवकाश. 'कडब्याच्या **फटीतून** जाताजाता पाटील थांबले.' -काळी.१५. 'कुठं पडली **फट** कुठं पडली ऊल.' -मिर्झा.१५. (त.पोटटु)

फटक (वि.) अत्यंत. हा स्वतंत्र शब्द नाही. अभ्यास्त शब्दात येतो. 'नवरा मेल्यानं गोऱ्यापान बाईचं कपाळ अधिकच **पांढंफटक** दिसत जाय.'

फटकन (क्रिवि.) लगेच, एकदम. 'आपून काई म्हनलं का माऊलीनं **फटकन** उत्तर देलंच पायजे, वारे सून.'

फटकनं (क्रि.) विनाकारण फिरणे. 'काऊन इनाकार **फटकून** रायला बे इकळेतिकळे.'

फटकफटक - चालताना होणारा आवाज. 'कोनी बाई **फटकफटक** चाल्ली का आबानं हटकलीच समजा.'

फटकळी (स्त्री.) १. जोड्याचा एक प्रकार. म्हातारे वापरत असत. २. धांडा चिरून, त्या दोन तुकड्यांचा **फटफट** आवाज करणारे खेळणे.

फटका (पु.) १. तडाखा, प्रहार. 'बंडीवर चाल्लो होतो तं काटीचा **फटकाच** लागला डोयाले.' २. नुकसान. 'जवारी सस्त्यात गेल्यानं चांगलाच **फटका** बसला मले.'

फटकारनं (क्रि.) बोलणे, मारणे. 'वलवल करे तं पोट्टं साजरं **फटकारलं** म्या.'

फटकावनं (क्रि.) फटके मारणे. 'पोट्ट्यानं श्या देनं सुरू केलं का आपलं त्याले **फटकावनं** चालू होते.'

फटंफटं (क्रिवि.) लवकर लवकर. '**फटंफटं** चाला अंधार पळ्याच्या आंधी पोहचलो पायजे.'

फटफटी (स्त्री.) दुचाकी, मोटरसायकल. 'सर्कशीतल्या हत्तीभोवती जमा व्हावीत तशी **फटफटी** भोवती मुलं जमली.' -झेल.६९.

फटफजिती (स्त्री.) अत्यंत निकृष्टावस्था. 'दा मान्साईत **फटफजिती** केली बायकोनं.'

फटाकडी (वि.) छेलछबीली युवती. 'गावातल्यापेक्शा शहरातनी मस्त **फटाकड्या** पोट्ट्या दिसता राजा.'

फटाका (पु.) बारूद भरलेली कागदी नळी. 'नवरदेव बॉ, कधी फोळता बापा **फटाके** का आनता तशीच उचलून?' (का.पटाकायि, हि.पटाका)

फटांग (वि.) निव्वळ. 'इथं त पाणीच नाई. सम्द **कोल्डफटांग** हाये.' -त.२४.

फटाड्या (वि.) अस्ताव्यस्त, पसरलेल्या, मोठ्या. 'अंगणात बासाच्या तट्ट्यांची बाज आणि समोर सोडलेल्या शिंगाड्या **फटाड्या** बंड्या.' -झेल.४.

फटाफट (क्रिवि.) लवकर. 'चला बसा **फटाफट**. गर्दी काहाले करता आजीबाई?'

फटारनं (क्रि.) भयभीत होणे. 'सरप दिसला की त्याची धुमधुम **फटारते**.' -मे.९५.

फटारे (क्रि.रूप.) 'नदीच्या घाटात का नाई पावन्याईची भायच **फटारे**.' -दि.१.

फटाल (क्रि.रूप.) पटपट. 'भरतीची बंडी. त्यात चळ लागला. होंडा बैल निऱ्हा **फटाल** बसेच राजा.'

फटालफटाल (क्रिवि.) लवकर लवकर. '**फटालफटाल** काम करून मोकय व्हाव मान्सानं.'

फटालकन (क्रिवि.) लवकर. 'ह्या मोठ्ठा सरप दिसता बराबर **फटालकन** पाय उचल्ला.'

फटालकनी(न्यी) (क्रिवि.) त्वरित, लगेच. 'हुषार असल्याच्यानं त्याले **फटालकनी** नवकरीबी लागली.' -सित.५५.

फटाळी (वि.) मोठे पण वाकडेतिकडे शिंगे असलेली. 'माई आयनी जीक रे पोरा, अटाळ्या म्हैशीचे **फटाळे** शिंगं, खायाले गेलं तं गुईगुई लेंड.'

फटिंग (वि.) एकटा, व्यवहारापासून आलिप्त. 'बायको मेल्यापासून तो **सडाफटिंग** आये.' (का.फटंग)

फटी (स्त्री.) पिकाच्या दोन तासाच्या अंतराची जागा. 'भागरतानं **फटीतल्या** तुरीखाली घळ्ळी ठुली.'

फटीचर (वि.) दरिद्री, भणंग. 'अभ्यासाचं काम असं होत गेलं **फटीचर**.' -मिर्झा.१५३. 'माही पोरगी मी काय कोन्या **फटीचराले** थोळीच दीन?'

फटुकनं (क्रि.) झपाटणे. 'त्या भुताच्या **फटुकन्यात** येऊ नये, त्याच्यावर एकच उपाय पेटीत पैसे टाका.' -गय.१०.

फटू (पु.) फोटो. 'मराच्या आंधी माया येखांदा तरी **फटू** काहाळला काय तुमी? काहाले हार टाकसान मंग.'

फट्टा (पु.) गोण्याचा तुकडा. 'मी **फट्टाच** अंथरला. त्यावर सगळे बसले.' -ल.५७.

फट्टे (पु.अने.) पट्टे, फट, अंतर. 'तासात **फट्टे** पडतात नाही तर मोघच बेरते.' -सेल.८९.

फड (पु.) ढीग, गंज. 'सिंहासारखे सिंह गेले आला नाई गड/ कुटारचं भेटल उपसून सारा **फड**.' -जांग.६९. 'खळ्यावर घोसदार कणसांचा उंच **फड** पडला होता.' -कात.५०२. 'संपूर्ण **फड** नळ्यांनी भरायचा.' -फीर.८०.

फडकं (न.) चिरगूट, कापडी तुकडा. 'कापसाले खंदाळी करतो म्हटलं तं येक फळकं नाई सापळत घरात.'

फडकत (क्रिवि.) ठुमकत, नखरे करीत. 'तुमी हात शहरचे, पॅन्ड तुमी घालता/ गाभन म्हशीसारखे **फडकत** चालता.' -ऊ.७६.

फडतूस (वि.) हलक्या दर्जाचा. '**फडतूसासंग** काहाले बोलावं बे. अपमान होते चांगल्या मान्साचा.'

फडतोडलं (वि.) फडतूस. '**फडतोडलं** माहा जुनाटलं खोड' -मिर्झा.१५८.

फडपंचाईत (स्त्री.) नसती उठाठेव. 'त्या सासासूना पाह्यतील. आपल्याले काय करायची नसती **फडपंचाईत**?' -झि.५३.

फडफडणे (क्रिवि.) रागावणे. 'तुया नावानं नाजुकराव भल्ला **फडफड** करून रायल्ता काल.'

फडा(ळा) (पु.) केरसुणी, झाडणे. 'मांगाचा धंदाच हाय, सूप, टोपल्या, **फडे** इनाचा.'

फडी (स्त्री.) लहान केरसुणी. 'जाते झाडायच्या व पीठ फेडायच्या **फडीने** जाते झटकून घेतले.' -सेल.१७१.

फणकटं (न.) जोंधळाचे बूड. 'कडबा सोंगलेल्या वावरात **फणकटं**, तशी केसांची धसकटं दिसत होती.' -सि.८९.

फण्टा (पु.) काटेरी वनस्पती. 'रानकेळीला गावठी **फण्टा** जहरी असतो हे माहीत नसतं.' -झेल.१६.

फतकन (क्रिवि.) १. बसण्याचा आवाज. २. लगेच. 'गंमतगंमत म्हटलं च्या घेऊन जा ना आत्याबाई तं **फतकन** बसलीबी.'

फतकल (स्त्री.) मांडी मारून बसणे. 'राधी जो **फतकल** मांडून बसली तं उठेच ना जागची.'

फतफत (वि.) चिंबचिंब. 'घामाने तिचे कपाळ **फतफत** झाले.' -झि.१०८.

फतरं (न.) फोलकट. 'बायको हो ना बाप्पा तुमची, मगजमगज तुमी खा अन् **फतरं** ठेवा मायासाठी.' 'एवढं राबूनबी हातात काय येते **फतरं**?'

फतरा (पु.) दगड. 'रस्त्यात टाक्याले सरपंच्यानं टरकभर **फतरा** आन्ला.' (हिं.)

फतवा (पु.) लेखी आदेश, आज्ञा. 'बुरखा घाल्याचाबी **फतवा** निंगते म्हनतात पाकिस्तानात.' (अर.)

फताडा(ळा) (वि.) पसरट, बेडौल, विस्तारलेले, लठ्ठ. 'दोन **फताळे** असले का भरला रिक्शा.'

फत्तर (न.) १. साल. 'लोकं केवं खातात अन् **फत्तरं** रस्त्यावर फेकतात.' २. दगड. 'नाव दयाराम पन निरा **फत्तरदिल** मानूस.'

फत्ते (स्त्री.) सरशी, काबीज, विजय, यश. 'सीमेवरची मोहिम **फत्ते** झाली होती.' -सित.३९. (अर.फा.)

फत्या (वि.) नपुसक, बुळा. 'त्या **फत्याले** बायकात भल्लं गमते.'

फदकफदक (क्रिवि.) तसा आवाज करीत चालण्याची तऱ्हा. 'ह्या निरवास्यावानी बोदली बाई अन् चालेबी मस्त **फदकफदक**.'

फदफद (क्रिवि.) नासणे, सडणे. 'दाय शिपाती हाय पन कसी **फदफद** झाली पाय.'

फदरफिसके (वि.) कुचकामी, भित्रे. 'आईबाप, भावंड दूर गेले आणि हे **फदरफिसके** लोकं वाट्याले आले.' -खुं.१५७.

फदाडं (वि.) मोठे. 'गिरजाबाईचे नाक **फदाडे** अन् डोळे गिजरे.' -कात.१६१.

फदाडाकफदाडाक (क्रिवि.) चालण्याची तऱ्हा. '**फदाडाक-फदाडाक** चालताना रेंदा कपड्यावर उडत होता.' -खुं.१००. 'म्हैस कसी **फदाडाकफदाडक** पयेत निंगली माय.'

फद्दकपालू (वि.) टाकाऊ, निकृष्ट. 'साळी तं लयच **फद्दकपालू** झाली माय, देनं टाकून किती रोज घालतं अजूक?'

फद्या (पु.) १. पैसा. एक नाणे, पन्नास फद्ये, एक रुपया. '**फद्या** नाई जोळ अन् बजारा चाल म्हंते.' २. कुचकामाचा, मूर्ख. 'अशा **फद्या** मान्साले कोन्तंच काम सांगू नाई.' (का.पेद्द)

फन (पु.) सापाचा फणा. 'सरप राजा अन् त्याचा **फन** तं निऱ्हा सुपा येवळा, खोटं काहाले बोलू?'

फन (न.) १. कापणी नंतर धांड्याची उरलेली बुडं. 'तीन दगडांची चूल मांडली. चुलीत **फणं** कोबले.' -धग.२६. 'मंग सोंगेल फनाची अनी होते धारदार.' -वि. २. औताचा एक दाता. 'तीन **फनं** असतात म्हनून ते तिफन.'

फनकट (न.) बूड, धस. 'जवारी सोंगताना हाताले इवा लाग्याचा भेव अन् पायाले **फनकट** लागाचा भेव.'

फनकटी (स्त्री.) ज्वारी काढल्यावर कापलेल्या धांड्याचे राहिलेले अणकुचीदार अंश असतात ते शेत. '**फनकटीचं** आखर जल्मात ना वखरलं'

फनका (पु.) राग, तापाची तलखी. 'असा कसा बाईले **फनका** आला बेज़ाच. म्या तं म्हटलं देते ताटावरून उठून.'

फनकारा (पु.) राग. 'काहाले येवळ्या **फनकाऱ्यानं** बोलून रायली वऽऽ चलवादे?'

फनफन (क्रिवि.) संतापण्याची क्रिया. 'खोळी केली म्हनून साई **फनफन** करू लागली/ बाप्पूची तं जिरोतोच बहिनीले सांगू लागली.' -चंच. 'असा पाणउतारा केल्यामुळे तो आतून **फणफण** झाला.' -ना.४४. 'गोऱ्या भावजई नको करू **फनफन**, सांगीन तुहं गुन भाईयाला.'

फनफननं (क्रि.) संतापणे. 'बाप्पा, बायकोनं तं मान्साच्या आंगावर **फनफननं** चालू केलं.'

फना (पु.) सापाचा फणा. 'पाऊल सगरावर सरप बसेल, असा **फना** उगारून!' (त.पणम्)

फनान (क्रिवि.) वेगाने, गतीने. 'रखवाली आला तसे अंबराईतून पोट्टे **फनान** पयाले.'

फनायला (वि.) वाकडा दात असलेला. 'कोन्ता संजा तो काय **फनायला**?'

फनाया (पु.) तिफणीचा फणा. 'खोळाले लागून **फनाया** मुळ्ळ्याच्यानं काम आपटी पळ्ळं लेकाचं.'

फनी (स्त्री.) १. स्त्रियांचे केस विंचरण्याचे साधन. 'विंचरिती वेणी तेथें राहे **फणी**।' -नाथ.२-१२६. 'सिंगडीच्या केसाचे **फणीनं** गुचके तुटू लागले.' -सि.९२. २. केळीचा गुच्छा. 'कोणे नेणो केळे दरीसना केली होतीः मग ते **फणी** गोसावी आपुलेनि श्रीकरे दीधलीः' -ली.७१. (का.हनिगै)

फन्ना (पु.) फडशा, नाश. 'दोन येक्कर वाईचा **फन्ना** पाळ्ळा.' (अर.फा.)

फपुला (वि.) फुगीर. 'गरम पानी पळ्ळं तं आंगावर ह्या फपुलेच्या **फपुल्ले** उठले.'

फपुळ्ळा (पु.) धुरडा, धूळ. 'खोलवाटीनं बंडी **फपुळ्ळा** उळवत चाल्ली होती.'

फपूट (न.) धूळ. 'रस्त्यानं निऱ्हा **फपूट** उळून रायलं राजा.'

फफुले (पु.) फोडागत त्वचा फुगणे. 'कातणी रगडल्यावर त्वचेवर बुडबुड्यासारखे **फफुले** उठतात.' -झेल.१३.

फजितखोर (वि.) फजिती करणारा. 'नाक गेलें तरि लाज ना विचार। हिंडे **फजितखोर** दारोदारीं॥'-तुका.१०४४.२.

फजितवाळा (पु.) फजिती. 'पानी आल्यानं पंगतीचा **फजितवाळा** झाला निरानाम.'

फजिता (स्त्री.) अपमान, अप्रतिष्ठा, पच्ची. 'न करी **फजिती** जनांमध्ये।' -नाथ.६. (अर.फझीहत,फा.)

फय (न.) फळ. '**शिताफय** शिल्लक नाईत रायत बनात.' -पागो.२०.

फयकाळ (पु.) गाय, म्हैस फळण्यास योग्य वेळ. '**फयकाळ** पाहूनसन्या हेला दाखवा लागते म्हैशीले.'

फयनं क्रि. फळणे, माजावर येणे. 'हेला म्हैशीत चऱ्याले असला का म्हैशीले लवकर **फयनं** हायच.'

फयफय (क्रिवि.) जोरात. 'दटावला तसा नाम्या **फयफय** मुताले लागला.'

फयलतं (वि.) पसरट, विखुरलेले. 'जवारी **फयलती** टाक म्हंजे लवकर सोकते.'

फयलनं (क्रि.) पसरणे. 'गांजर गवताचं दरसाल **फयलनं** चालूच हाय.'

फयली (क्रि.रूप.) माजावर आली. 'गाय **फयली** तं आक्क्या तिच्या मांगच राये.'

फयलेल (वि.) पसरलेले. 'खयाच्या भोवती **फयलेल** दाने सबन येचून काहाळले.'

फयलोनं (क्रि.) पसरविणे. 'कळक उनात दोनतीन दा हातानं जवारी **फयलोनं** पळतेच.'

फयाले (क्रि.रूप.) माजावर यायला. 'म्हैस **फयाले** डॅक्टरले दाखोलं. जंताच्या गोया देल्या तरमा नाई फयली लेकाची.'

फये (न.अने.) ज्वारीच्या पिठाचा वाफावलेला पदार्थ. 'मग ताट केलेः वाटी भरूनि तुपा ठेविलीः ताटी अमृतफळे ओळगवीलीः' -गोवि.८९. 'मायलक्षीम्याईले जवारीचे **फये**, कथली अन् आंबील करतात.'

फयेल (वि.) माजावर आलेली. '**फयेल** गाय भाऊ. कसे आक्के गोठ घेतीन?'

फयोनं (क्रि.) फळविणे. 'दानापुरले हल्याजोळ नेऊन म्हैस **फयोनं** आय मले.'

फरक (पु.) भेद, भिन्नता, अंतर. 'आवळ्याजावळ्या दोन भावात तीळा येवळाबी **फरक** नाई.' (अर.फर्क,फा.)

फरकफासा (पु.) दोरीची एक गाठ. '**फरकफास्याची** गाठ पाळजो गोन्या बांधता खेपी.'

फरकांड(डी) (स्त्री.) ओरखडा, साप गेल्याचे दाखणारी जमिनीवरील रेष. 'सरप जिवंत निसटल्यावर त्या **फरकांडीवर** रट्टे मारन्यात काय मतलब.' -मे.९३.

फरके (पु.अने.) झपके. 'पानी घेतलं मंतरलं तोंडावर दोनचार **फरके** मारले.' -धुम्म.

फरदळ (वि.) १. कापूस वगैरे पिकाचे शेवटी होणारे उत्पन्न. 'बापलेकं तूर सोंग्याले गेले. याची माय **फरदळच्या** कापसाले गेली.' -तित.६१. २. पाऊस आल्याने कापलेल्या धसांना फुटणारी पालवी. 'ढोरासारखे कोंडले श्वास मोकये झालेत/ वाटे **फदळं** येतीन सोंगलं त्या वावरात.' -वि.

फरपट (स्त्री.) १. ओढाताण. 'मोठ्यामोठ्या मान्साईत गरिबाची लय **फरपट** होते.' २. जमिनीवरून ओढत नेल्याची खूण. 'माया लेकीले मारलं तं मारलं अन् घरातून आंगनालोक **फरपटत** नेलं.'

फरफर (क्रिवि.) जोरजोरात ओढणे. 'गाईनं **फरफर** ओळत नेलं कोठ्याच्या भाईर.'

फरमान (पु.) हुकूम. 'आजच्या सारके काहाचे कायदे अन् फायदे. राजाच **फरमान** सोळे मनात ईन तसा.' (फा.)

फरयाद (स्त्री.) दावा, तक्रार. 'बाश्शाच **फरयाद** आयके अन् तोच न्याव करे.'

फरशी(सी) (स्त्री.) १. कुऱ्हाड. 'वावराचं राखन कऱ्याले जाठ लोकं बोलावले. तेईच्या जोळ **फरशी** कुऱ्हाडीबी होत्या.' २. दगडी लादी. 'मावसे केवळी होय व तुया नवऱ्याची? **फरशीबी** बसोली घरात.' (फा.)

फरस (पु.) मोठी फरशी, फरशी सारखे बांधकाम. 'वर घरी जाण्यासाठी दगडी फाळांचा **फरस** बांधला होता.' -गय. (अर.फर्श)

फरसडी (स्त्री.) खळ्याभोवतीच्या गोलाकार पेंढ्या. 'खळ्यातली रास कर्जाच्या **फरसडीलाही** पुरणार नाही.' -हा.२२.

फरसबंदी (स्त्री.) फरशी बसवलेली जमीन. '**फरसबंदीत** पोते टाकले का उकीर निंगत नाई फरशीच्यानं.'

फरळ(ळ्या) (स्त्री.अने.) विस्तारलेल्या फांद्या. 'धुऱ्यावरच्या वाळलेल्या बेहड्याचे **फरळं** मोडून त्याच्या पाचसहा मोड्या तयार कर.' -वा.४५.

फरा (पु.) बैलाच्या पायाचे वरचे हाड, मांडीचे हाड. 'आंगाच्या वर भरती नाई पायजत बैल **फरातून** जायाचा भेव रायते.'

फराक (पु.) मुलींचे अंगवस्त्र. 'पोरीले **फराक** अन् बायकोले साळी दिवाईले घेतली.' (इं.फ्रॉक)

फराट (स्त्री.) लाकडी पाटली. 'रासण्या मोडासाठी सुताराकडून तिफणीच्या सव्याचं **फराट** करून घ्या.' -बा.२३५.

फरार (पु.) बेपत्ता, देशत्यागी, गुन्हा करून पळणे. 'त्यानं चोरी केली. तो **फरारबी** झाला तं आमाले काहाले तरास देऊन रायले चीप सायब?' (फा.)

फरारा (पु.) विस्कटल्याच्या खुणा. 'मस्तकावर कुंकवाचा **फरारा** उमटला होता.' -एक. (अर.)

फरारी (वि.) फरार, बेपत्ता झालेला. 'पोलिसाच्या मनात आलं ना कोनी कितीबी **फरारी** असला तं शोधून काहाळतातच.' (अर.)

फराऱ्या (पु.) मोठा वखर. 'तिफनीमांगं धारय कऱ्याले **फराऱ्या** वखर धरला.'

फर्ज (पु.) कर्तव्य. 'भावाचं लगन करून देनं मायच **फर्ज** होतं, पन त्याचा संसार चालोनं नाई.' (फा.)

फर्दळ(ळी) (स्त्री.) चिरल्याने होणारे तुकडे. 'गारपीटीनं पानांच्या **फर्दळ्या** झाल्या होत्या?' -झेल.१.

फर्मा (पु.) साच्या. 'भुलाया, खेयने बनवाचा एक **फर्मा** असते. त्यानं सबन सारखे दिसतात.'

फर्मान (न.) आज्ञा, हुकूम, राजाज्ञा. 'अन्याजीनं **फर्मान** काहाळल्यावर कोनाची टाप हाये आईकनार नाई म्हून.' (फा.)

फर्मावनं (क्रि.) सुनावणे. 'सजा **फर्मावली** गेली.' -डेबू.६६.

फर्मावला (क्रि.रूप.) आदेश इ. सोडला, दिला. 'बापुसाहेबांनी सखारामला जरबेच्या आवाजात हुकूम **फर्मावला**.' -कात.१६

फर्याद (स्त्री.) १. तक्रार. 'गरिबाची **दादफर्याद** कोन घेते आजकाल?' २. मदतीसाठी दिलेली हाक, धावा. (फा.)

फर्रा (पु.) मांडीचे हाड. 'बैल पळ्ळा तं एका पायाचा **फर्राच**

मुळ्ळा.'

फलकट (न.) टरफल. 'संतापाशी बहु असावे मर्यादा। **फलकटाचा** धंदा उर फोडी।' -तुका.१२३४.

फलांजी (पु.) अनामिक, कोणी तरी. 'रोजच्या रोज तुमाले भल्ले **फलांजी** भेटाले येतात?'

फलाना (वि.) अमुक, कोणी. 'माया नवरा होयना माय. कोनत्या **फलान्या** मान्साले काहाले आनू संगं?' (फा.)

फलानाबिस्तान (वि.) अमुक, कोणी, तिऱ्हाईत. 'पाय माय, डोयानं पावोल्याबी जात नाई. **फलानाबिस्ताना** चालूच रायते बाईच्या घरी.' (फा.अर.)

फल्लास (पु.) पत्याच्या खेळातील फ्लॅश. 'सत्तं, अठ्ठं, नयलं तेबी बदमाचं हाय. **फल्लास** हाय **फल्लास** भाऊ.'

फल्ली (स्त्री.) शेंग. 'भुईमुंगाच्या **फल्ल्या**त त्या संग गुई पायजे मंग.'

फवरन (क्रिवि.) लवकर, जलद. 'आपून घरातून पऊन जावू तू **फवरन** तयारी कर.' -सित.१४५. 'मी काय गेलो अन् फवरनच्या **फवरन** वापस आलो.'

फवारनं (क्रि.) तुषार उडवणे, स्प्रे करणे. 'बारा रोजानं पऱ्हाटी **फवारनं** पळते.' (अर.)

फवारा (पु.) तुषार. 'बाजीराव पान खाये अन् तोंडातला **फवारा** आपल्या आंगावर सोळे.' 'पान्याचा **फवारा** आंगावर उळाल्यानं मनिला ओला झाला.' (फा.अर.)

फवाऱ्याले (क्रि.रूप.) तुषार उडवायला, स्प्रे करायला. 'औषद **फवाऱ्यालेई** मजूर सापळता सापळत नाई.'

फशा(सा)टनं (क्रि.) कोळपणी जमिनीत न धसणे, वरवर फरफटत जाणे. 'तनकट लागलं का वखर कचत नाई **फशाटत** जाते.'

फशा(सा)टी (स्त्री.) काटेरी फांदी. 'शेतातल्या **फसाटीला** अडून कचरा तिच्या मागे फरफटत जावा तसा उत्तम त्याचे मागे निघाला रूस्तम.' -सेल.३२९. 'येकच जोळी असल्यानं दुपारलोक पेरनं करो अन् दुपारी त्या पेरन्यावर काटीची **फशाटी** मारो.'

फशी (पु.) १. फासले, फसवले जाणे. 'मी तिरमुकच्या बोल्यालेच **फशी** पळ्ळो.' 'सारं गाव पाळलं **फशी** अन् तरीई मी अशी. २. पत्यातील एक खेळ.

फसकन (क्रिवि.) जोरात. 'म्या पोत्यात **फसकन** हात घातला तं हे चुंबळी लागली हाताले.'

फसकलास (वि.) प्रथमश्रेणीचे. 'शिरा **फसकलास** झाला भाबी.' (इं.फर्स्टक्लास)

फसगट्टी (स्त्री.) फसविण्याची क्रिया. 'अरे असमानीसुलतानी पुरली पण आपल्याच कापसाचे पैसे आपल्यालेच ना देनारी ही आची **फसगट्टी** पुरली नाई.' -लेक.६९.

फसन (स्त्री.) दलदलीचा भाग. 'अबे हेंबाड्या येवळ्या **फसनीतून** बंडी हाकल्ली? फसली तं मंग?'

फसनं (क्रि.) १. फसवले जाणे. 'बदमास लोकाईच्या नांदी लागल्यावर **फसनं** हायच येखांद्या रोजी.' २. चिखलात पाय खोलवर जाणे. 'पानचिपनचं वावर असल्यानं दोन दिवसाची उघाळ असल्यावरबी **फसनं** चालूच रायते.'

फसफस (वि.) दलदल. 'पानी पळ्ळ्यानं सबन रस्ता **फसफस** झाला.'

फसंफसं (क्रिवि.) भराभर. 'चुलीवरच्या दुधावर ध्यान नोतं तं ते **फसंफसं** उतू गेलं पाय.'

फसफसनं (क्रि.) फसफस आवाज करणे. 'कालची दाय आय हे. आंबूस वास मारते अन् तिचं **फसफसनं** तं पाहून घे तू.' (त.पोंगुदल)

फसल (स्त्री.) हंगाम, पीक. 'पोरगा कळोता झाल्यानं वावरातनी **फसलबी** चांगली निंगून रायली.' (अर. फस्ल)

फसली (स्त्री.) हाड. 'भीतीऊन पळ्ळो तं **हड्डीफसली** एक हून गेली सायाची.'

फसवा (वि.) फसविणारा, खोटा. 'भरोसा ठुवावं तं कोनावर सारे **फसवेच** निंगले आजकाल.'

फसवा (क्रि.रूप.) फसवून टाका. 'खूप हासवा अन् मंग **फसवा** लेकाले.' 'हे बल्ली त्या भितीत **फसवा**.'

फसाट(टी) (स्त्री.) पेरणीनंतरचे बी झाकले जावे म्हनून त्याहून ओढतात ते लाकडी, फांद्याचे साधन. 'येक जोळी माया जोळं. अर्धा दिवस पेरो अन् दुपारपासून **फसाटी** मारो.'

फसाद (पु.) दंगा, भांडण, बंड. 'आमच्या गावाले दंगा **फसाद** ठाऊकच नाई.' (अर.)

फसून (क्रि.रूप.) १. फसवून. 'दिवानजी आप्पाले लय रोजाचा **फसून** रायला.' २. फसले जाऊन. 'म्हैस गाऱ्यात **फसून** गेली, काढा त लागीनच.'

फसेल (क्रि.रूप.) फसलेले. 'दुश्मनाचीबी **फसेल** गाय काहाळाच लागते, गळ्या.'

फसोत (क्रि.रूप.) फसवत. 'गरिबाले **फसोतं** काय बाप्पा या येव्हारात.'

फसोनं (क्रि.) १. फसविणे. 'या भानगळीत मले काहून **फसोलं** राजा इनाकारन.' २. चिखलात फसणे. 'चालतं गाळं **फसोनं** पळते कुटन्या लोकाईचं.'

फसोयाले (क्रि.रूप.) फसविण्याकरिता. 'मले **फसोयाले** पायते मादरचोद कुठोलचा तं!'

फसोयेल (क्रि.रूप.) फसवलेला, खोचलेला. 'शिंगाळा पाटलीत चांगला **फसोयेल** आये. हाले ना डुले आता.'

फळ (न.) १. कुंभारा जवळील लाकडाचे थापटण्याचे साधन. 'घमीलं त्यात गवत. त्यावर कच्च्या मातीची घळ्ळी. कुंभार लेकराले थापटावं तसं **फळानं** घळ्ळीले आकार देत जाय.' २. महालक्ष्मीला ज्वारीच्या पिठाचे **वाफाळून** करतात ते वाटीसारखे अर्धगोलाकार पदार्थ.

फळकं (न.) फडके. 'इतुलेनि कपाळावरि **फाळुके** घालौनि जावो लागिजेः' -ली. ०६१६. 'वरि चोखट **फाळोके** घातलेः' -गोवि.८९.

फळकते (क्रि.रूप.) फडकतो. 'निंबाच्या शेंड्यावर मारोतीची झेंडी पाय कसी **फळकते** बाबू.'

फळकनं (क्रि.) १. फडकणे. 'कुठी ना कुठी आपलाबी झेंडा **फळकनं** हायच.' २. फाकणे. 'हा बासळा कसा काय **फळकला** मनाव?'

फळतूस (वि.) टाकाऊ, गचाळ. 'चांगल्या खांदानी लोकाईच्या नांदी लागावं, **फळतूस** लोकाईच्या नाई.'

फळंफळं (क्रिवि.) उडण्याचा आवाज. 'गुल्लेरचा गोटा झाळाले लागता बरोबर पाखरं **फळंफळं** उळून गेली.'

फळवनं (क्रि.) गर्भधारणेस प्रवृत्त करणे. 'दोघांच्या म्हशी **फळवायला** आल्या म्हणून जमलं.' -पख.९९. 'तीनदा **फळवली** हल्याखाली, पण तीनदाही उलटली.' -पख.३४.

फळी (स्त्री.) १. लाकडाची पाटली. '**फळीवरचे** अवघे डब्बे धबाधब खाल्ली पळ्ळे.' २. छोटा फडा. '**फळी** घेऊन जात्याभवतीचं उरलंसुरलं पीठ सावटू लागली.' -डेबू.३४.

फळ्ळोक (न.) भानगड. 'आपुन अशा **फळ्ळोकात** पळत नसतो.' -ना.२३. 'हे पाय वच्छे! तू आमच्या **फळ्ळोकात** पळू नोको.' -पागो.७१.

फंकी (स्त्री.) कोरडा बारीक चुना. 'येकदम सरक्या रेषेत **फंकी** मारली.'

फंटूस (वि.) लोफर, चावट. 'भरीस भर म्हणून मुलगा **फंटूस** आहे' -फीर.२४१.

फंटे (पु.) शेतीच्या कामाकरिता ट्रॅक्टरचे एक अवजार. 'फनकटीचं वावर **फंटेईनच** मस्त तयार होते.'

फंद (पु.) छंद, नाद, खोड. 'पोरगा चांगला आये भाऊ. लंद नाई **फंद** नाई. एकदम निप्पक आये.' (फा.)

फंदा (पु.) दोर. 'लेकानचं माया गयात फासीचा **फंदा** टाकल्यावर कोनाले अवाज देता राजे हो?'

फंदाळनं (क्रि.) केवळ फांद्या उरणे. 'पाने झडतात तेव्हा मीही जातो **फंदाळून**.' -गाक.११७.

फंदाळात (क्रिवि.) भानगडीत. 'आपून कोनाच्या **फंदाळात** पळत नाई. आपलं काम भलं आपून भलं.'

फंदी (वि.) नादिष्ट. '**लंदीफंदी** मान्साच्या नशिबात सुख नसते लेहेल.' (फा.)

फाक (स्त्री.) १. फोड. 'आईने तपेलीभर रायतं चुलत्याकडे पाठवलंच तर चुलती तिच्याकडे चारदोन **फाका** पाठवित होती.' -सुखो.३४. २. स्त्री योनी.

फाक (वि.) दरिद्री. 'आपून हे असे **फाक**. दिवसरात हाळं कूट करून डेर्ग भरत नाई आपलं.' -सित.३३.

फाकनं (क्रि.) १. दुभंगणे. 'पुढे वाट फांकलीः' -ली.३६३. २. पसरणे. 'ते आता वाक्य सूर्यकर तुझे **फांकले**॥' -ज्ञा.१०.१६३. 'एऱ्हवी जाईचिया फुला **फांकणे**॥' -ज्ञा.१८.२५७. 'दर्शनी रत्नकीळ तेज **फांके**।' -नाथ. 'पुढे त्या निबापासून रस्त्या जेवन्याआंगं **फाकेल** आये.'

फाका (पु.) उपवास, निराहार. 'ज्यानं पेरून काढलं त्याच्या माथी **फाके** आले.' -काया.३१. (अर.फा.)

फाकाफाक (स्त्री.) विस्कटलेली, विखुरलेली स्थिती. 'दहन झालं तसे सबन लोकं **फाकाफाक** झाले.'

फाकेल (वि.) फाकलेले. 'कोपऱ्यातल्या **फाकेल** बास्याची कंमची आन मोळून.'

फाकोई (स्त्री.) १. पाकोळी. 'राती या खोलीत एक **फाकोई** चकरा मारत फिरत रायते.' २. फोड. 'संत्र्याची एक **फाकोई** नाई देली मले.'

फाकोनं (क्रि.) फाकवणे. 'काका आपल्या आंगावर बेत **फाकोल्याशिवाय** राहणार नाहीत.' -गय.

फाकोयाले (क्रि.रूप.) फाकवायला. 'हे डांग **फाकोयाले** लय जोर पायजे.'

फाकोयेल (वि.) फाकविलेले. '**फाकोयेल** बास्यात आळवी कांबट घाल मंग आंबे तोळता येतात.'

फाग (पु.) फाल्गुन मास. 'धुईमाती **फागातच** येते.'

फाज(जे)ल (वि.) फाजील, फाल्तू. 'मिसूर नाई फुटली आजून पोर्ग लयच **फाजेल** दिसते.'

फाजील (वि.) वाजवीपेक्षा जास्त वायफळ बोलणारा, चावट. 'कामाचं बोलावं **फाजील** काय कामाचं?'

फाट (पु.) तेढ, फूट, विभक्त होणे. 'झगळ्याझगळ्यातच नवराबायकोमंदी **फाट** पळला.' -सित.६२.

फाटक (न.) बाहेरील दरवाजा. 'येता जाता **फाटक** बंद करा असंच लियेल असे शेहरात.'

फाटकं (वि.) फाटलेले. '**फाटकं** नेसावं पन नेटकं राहावं.'

फाटका (न.) १. फाटलेले. '**फाटका** पाओ सों नकाः' -गोवि.९१. '**फाटका** जोळा पायात घालावच कसा?' २. दरिद्री. '**फाटक्याची** सगाई होनंई कठीनच रायते.'

फाटकी (वि.) १. गोधडी. 'बाज देली टाकून, **फाटकी**

आथरली झोप गेली लागून.' -रूख. २. विरळ. 'गुळ्याले खार लाऊनसन्या फोन्डेशन पराटी पेरली. दोन येच्यातच **फाटकीफाटकी** दिसून रायली.' ३. फाटलेली. '**फाटेल** साळी, शिवाव किती? बठ्या नवरा, राबाव किती?'

फाटनं (क्रि.) १. फाटणे. 'जुने कपळे **फाटनं** चालू हायत अन् नवे घ्याले पैसे नाईत.' २. नासणे. 'च्या तं निरा आंबटडक झाला. कालचं **फाटलं** दूद टाकलं वाट्टे?'

फाटफूट (स्त्री.) वेगळे होणे, जूट न राहणे. 'गावातनी जिगरी दोस्त होते नोकरीच्यानं **फाटफूट** झाली लेकाईची.'

फाटलंतुटलं (वि.) फाटलेले वगैरे. 'येवळी शिरिमंताची लेक असूनबी **फाटलंतुटलं** तानतून करून संसार केला.'

फाटा (पु.) १. फांदी, शाखा. 'झाळाले **फाटा** नाई फुट्टू देल्ला तं ते लंबसाठ वाळूं.' २. फुटलेला रस्ता. 'ते वेळी दृष्टीसी **फांटा** फुटे।' -ज्ञा.१.२३. 'आमच्या फाट्यावर बस थांबते.' ३. लांब, जळाऊ लाकूड.

फाटे (पु.) बेफाटा. 'दर भऱ्याले तेल्या बाभुयचे **फाटे** पाहयजात.'

फाटेल (वि.) फाटलेले. 'सगळे **फाटेल** कपळे गिऱ्हान मांगनाऱ्या बाईले देऊन टाकले.'

फाटेलोक (क्रिवि.) भयाकूल अवस्था. 'पोलीस दिसले तसे चोर **फाटेलोक** पयाले.'

फाडकन (क्रिवि.) - तोंडावर जोरात मारणे. 'येवळा मोठा मानूस येक नाई दोन नाई **फाडकन** तोंडात मारली बॉ.'

फाडा (पु.) आंब्याचे मोजमाप. सहा आंबे म्हणजे एक फाडा. 'मामा दोन चार **फाड्या** आंबे टोपल्यात टाकतो. हे याले दे ते त्याले दे.' -डेबू.६३.

फाडाय (क्रि.रूप.) फाडायला. 'लोक मले मेले ढोरं **फाडाय** लावतात.' -पाटी.

फाडी (स्त्री.) घडीव, चौकोनी दगड. 'या भीतीले पाहा केवळी साजरी **फाळी** वापरेल आय.'

फाडे (क्रि.रूप.) फाडीत असे. 'यमी पिसी झाली तं आंगावरचे कपळेच **फाडे**.'

फात्या (स्त्री.अने.) लांबलचक मुस्लीम प्रार्थना. 'मुसलमाना-वानी **फात्या** नोको पाडत बसू.' -ऊन.१८१.

फांदीचं (वि.) फुकाचे. '**फादीचं** असलं ना तं काईबी चालते आमाले.'

फाना(नो)फान (स्त्री.) पांगापांग, अस्ताव्यस्त, इतस्ततः विखुरणे. 'गरिबीचा एकेक पीळ उसवत गेला. विचाराचे अनेक तुंतु **फानोफान** उडत गेले.' -एक.

फापटपसारा (पु.) एकापेक्षा जास्त, विखुरलेली कामे. 'येक काम कर पुरं. असा काहून **फापटपसारा** मांडून ठुला?'

फाफू (क्रिवि.) तापाने फणफणणे. 'म्हतारी तं राजा **फाफू** पळेल आये खाटल्यावर.'

फाय (पु.) नांगराचे लोखंडी पाते, फाळ. 'फारच कळक असलं वावर तं **फाये** लपकतात.'

फायकांब (न.) तिफनच्या फाळाचे लोखंडी आवरण. '**फायकांबीनं** तिफनीचा फाया पक्का रायते.'

फाया (पु.) १. फाळ. 'लोहाराकडून तिफणीवे **फाये** पाजवून घेतले.' -भं.१०६. २. अत्तराचा बोळा. 'मला तुमी आना राया, अत्तराचा **फाया**.' 'गयात गोफ, बोटात मुंद्या, कानात अत्तराचा **फाया** असा थाटमाट.'

फारकत(ती) (स्त्री.) सोडचिठ्ठी, ताटातूट, घटस्फोट. 'आपल्या लताची आताच **फारकती** झाली. गंधर्वानं करा तिले.' -सेल.५७.(फा.)

फारी (स्त्री.) एका पल्ल्याचा गोणा, ज्युटाची सतरंजी. 'घरात नाही **फारी**, आंगावर सफारी.' -मिए.६१.

फारीफार (क्रिवि.) फार झाले तर. 'हजार तं नाई, **फारीफार** सातशे रुपये दीन बकरीचे.'

फारोळे (पु.अने.) ओरखडे. 'गोऱ्यापान देहाच्या भूईवर बोटाची नखे म्हणजे तिफणीच्या फणाचे **फारोळे**.' -बा.१४१.

फाऱ्याफुऱ्या (स्त्री.) गोण पाटाचा तढव. 'इथं कुटार भरासाठी **फाऱ्याफुऱ्या** नोत्या/ तिथं गाद्यादुलईत नोटा भरून होत्या.' -जांग.१५८.

फालकं (न.) एका बाजूचे झाकण. 'टालीचे **फालकं** उघळे करून चालू टॅक्टरातून खत टाकता येते वावरात. मंग फैलवाच काम नाई.'

फाल(ल्)तू (वि.) १. निरर्थक, विनाकारण, जरुरीहून जास्त. 'हे करून ते करून **फालतूच** दोन वर्ष वाया घालवले.' -गय.१८. 'अरे ही बायाची जात मानसाची **फाल्तू** नामुस्की करते.' -काळी.८५. २. अश्लील, असभ्य. (हिं.फा.)

फावडं(ळं) (न.) फावडे. 'खताची बंडी भऱ्याले **फावडं** पायज होतं, हाय काय?'

फावडा(ळा) (वि.) पायात हेकड, दोष असलेला. 'कसं वऽऽ माय, पोरगी तं येका पायानं हेसकत हेसकत चालते. पाय **फावडा** हाय जनू माय.'

फावडी (स्त्री.) लहान खोरे. 'नालीतलं कचरं **फावडी** आनून काहाळलं.'

फावनं (क्रि.) १. मानविणे. 'ते शब्दातीत स्वभावे। ते बोलिचि जरी **फावे**॥' -ज्ञा.५.६८. 'प्रेमसुख गोडी तुजची

फावली। वासना मावळली सकळ तुझी॥' -नाथ.११. २. सवड, मोकळीक. 'मांगल्या हप्ती मले येनं **फावलंच** नाई.' ३. प्राप्त होणे. '**फावली** ते बरवी संधी। सावधान करू बुद्धी।' -तुका.२३१.

फावलं (क्रि.रूप.) फळास आले, प्राप्त झाले. 'जे आठमुठी तत्त्व **फावले**॥' -ज्ञा.६.४. 'जो तो संवादु **फावला**। कृष्णार्जुनाचा॥' ज्ञा.-६.८

फावली (क्रि.रूप.) सवड मिळणे, प्राप्त होणे. 'यालागी त्रिवेळी हे उचित **फावली** बापा॥' -ज्ञा.११.७.

फाशी (स्त्री.) गुराच्या पोटातील एक भाग. 'म्हशीचे पोट फाडून त्यातील बोके, हेळ, **फाशी**, चरबी अल्लादं बाजूला काढली.' -रा.१५.

फास (पु.) १. सरकगाठ, पाश. 'गुरूगुरू फिरू जीव येळापीसा/ मानीच्या भवती चऱ्हाटाचा **फासा**.' -काया.२६. २. काट्यांचा ढीग. 'मळ्याले कुपाटी लावायसाठी काट्याचे **फास** तोडायचे.' -बा.५२.

फासकट (न.) बाभळी बोराटीचा काटेरी पुंज. 'कुपाची हे खिंड भुजोयाले **फासकट** आना लागते.'

फासनं (क्रि.) १. फसविणे, गुंतविणे. 'फासता फासता **फसली** तू बैना.' -वि. २. लावणे. 'ज्याले शेंदूर **फासला** निंघे दगूळ तो देव.' -काया.३२.

फास(से)पारधी (पु.) पशुपक्षी जाळे टाकून पकडणारी जमात. 'तिटीबाटी पकळ्याले **फासपारधेईनं** जायं लावलतं नदीच्या काठानं.'

फासलता (वि.) उतार असलेला. 'नदीकाठाच्या **फासलत्या** भागातून बंडी धिरेधिरे नेजो.'

फासलता (क्रि.रूप.) फासला होता. 'घळ्ळीले दोर म्या पक्का **फासलता**.'

फासला (पु.) अंतर. 'दोगाईत लय फासला पळ्ळा राजा.' 'दोन गावात तीन कोसाचा **फासला** आये.' (अर.)

फासा (पु.) १. द्युतातील सोंगटी. 'गोसावी सारी खेळो जाणतिः दोही स्त्रीकरी **पांसे** घेउनि चोळु लागलेः' -ली.३४९

फासाट (स्त्री.) गाडीची मागची लाकडी पाटली, फळी. 'गाड्याची हारणी, **फासाट** पायजो रस्त्यात पुन्ना वांदा नको.' -दि.१२.

फासी (स्त्री.) फाशी. 'मालाले भाव नसल्यानं कर्जबजारी कास्तकार **फासीच** घेऊन रायले.'

फासेल (वि.) फासलेला. 'कर्ज देऊ देऊ सावकारानं सबन गाव आपल्या आटीत **फासेल** आय.'

फासोयाले (क्रि.रूप.) फासायला. 'मले काय मालूम हा आपल्याले **फासोयाले** घेऊन चाल्ला म्हून.'

फाळ (पु.) लोखंडी पाते. 'लोखंडे बाजेखाली ठेविलीः पासुः **फाळुः** तुताः कुऱ्हाडिः इळाः' -ली.४७७.

फाळकन (क्रिवि.) जोरात, लगेच. 'म्या त्याच्या गालात एक लगावली **फाळकन**.'

फाळतात (क्रि.रूप.) फाडतात. 'चोर खातात माल, रखवाली कमीशन/ लोकं **फाळतात** कल्ला, झाल्यावर इलंक्शन.' -नांबै.

फाळत्या (वि.) आगाऊ माणूस. '**फाळत्या** मान्साच्या नांदी लागनं म्हन्जे आपलीच ऐसीतैसी करनं हाय.'

फाळनं (क्रि.) फाडणे. 'आणि गोवी गेलिया जवळी। झगटलिया अंग **फाळी**॥' -ज्ञा.१८.५५.

फाळा (पु.) १. फळी, पाटली. 'गहूच्या मदतीने लाकूड चिरायला घेतले. दोन **फाळा** चार **फाळा** झाल्या.' -सेल.३७. २. **फळे** मोजण्याचे माप, सहा नग म्हणजे एक **फाळा**. 'तीन फाळे आंब्याचं रायतं घातलं, उरलं ते जवनीत टाकलं.'

फाळानिवाळा (पु.) निर्णय, चिकित्सा. 'आता या साससुनाईच्या भांडनाचा **फाळानिवाळा** कोनं करावं?'

फाळेल (वि.) फाडलेले. '**फाळेल** कपळा कोनताच दुकानदार वापीस घेत नाई.'

फांक (स्त्री.) १. विस्तार. 'तेथे कथेसि **फांकु** होईल॥' -ज्ञा.५.१७३. २. फोड. 'भाकरीसंगं रायत्याची एक **फाक** घेतली.'

फांज (स्त्री.) डहाळी, डांग. 'उघड्या पोटऱ्यावर **फांजऱ्याचे** ओरखडे उमटले.' -झेल.५.

फांजी (स्त्री.) एक भाजी. 'गरीब लोकं नुसतीच **फांजीची** भाजी उकडून खाऊ लागले.' -अ.१०७.

फांद (स्त्री.) १. फांदी, डहाळी. 'कुऱ्हाळ नेसान तं रस्त्यात येलं **फांद** तोळजा.' २. एक भाजी.

फांदा (पु.) फासा. 'सर्व भुलोन गुंतला नादा। गारूडिये **फांदा**। घातलासे॥' -तुका.७५०.

फांदोरा (पु.) फांद्यांचा गुच्छ. 'शिंदीच्या **फांदोऱ्यापासून** बनविलेला बारकुसा झाडू तिने बाजूला ठेवला.' -सेल.१७१.

फिकर (स्त्री.) काळजी, चिंता. 'ज्यानं जन्माले घातलं त्याले इतली **फिकर** आफून काय करतं?' -धग.१८ (अर.फिक्र,फा.)

फिकरीनं (क्रिवि.) काळजीपूर्वक. 'जोखमीचं काम तो डोस्कं लावून **फिकरीनं** करे.' -सित.३७.

फिकीर (स्त्री.) काळजी, चिंता. 'मांगे कोन्ती **फिकीर** नसल्याच्यानं त्यानं आंग धरलं व्हतं.' -सित.७९. (अर. फिक्र, फा.)

फिक्क (वि.) १. कमी तिखट असलेले. 'भाजी तं बामनावानीच **फिक्की** केली.' २. रंग उडालेले. 'उनात काहाले ठेवतं येवळी महाग गाळी, रंग **फिक्का** पळते ना?'

फिक्कट (वि.) १. कमी तिखट असलेले. 'भाजी **फिक्कट** नाई चालत चांगली तेज पायजे.'

फिचर (पु.) सट्टा, जुव्याचा प्रकार. 'कुठून आनसान पैसे लाटरी भेटली का वरली? **फिचरचा** आकडा लागला?' -एक. (इं.)

फिजूल (वि.) व्यर्थ, वाया. 'एवढी मागामोलाची वसद आनली अन् **फिजूल** वाया घालोली.'

फिटकरी (स्त्री.) तुरटी. 'गढुयल्या पान्यात **फिटकरी** फिरोली की गायवाय सबन बुळात बसते.'

फिटनं (क्रि.) १. मुक्त होणे. २. बरोबरी होणे, फेडणे. 'पयले पन्नास अन् हे ईस रुपये घ्या, म्हंजे **फिटले** सारे.'

फिटंफाट (न.) बरोबरी. 'देऊनियां प्रेम मागितलें चित्त। जाली **फिटाफिट** तुह्यां आह्यां॥' -तुका.३८०५. 'काल दा रूपये देल्ले अन् आज ही पन्नासी. झाले ना **फिटंफाट**?'

फिटाफीट (न.) परतफेड करून बरोबरी होणे. 'शंभर नेल्ते शंभर आन्ले सबन **फिटाफीट** झालं.'

फिटेल (क्रि.रूप.) फिटलेले. 'मांगले पैसे **फिटेल** हायत. आता द्या येक शंबरी.'

फिटोनं (क्रि.) १. हानी करणे. 'दिन्यानं या सौद्यात सदूले चांगलं **फिटोलं** म्हंतात.' २. परतफेड करणे. 'कोनाचाबी घेतला पैसा **फिटोनं** तं हायच ना?'

फिटोफीट (क्रिवि.) तंतोतंत. 'हे कमीज माया आंगाले **फिटोफीट** बसते.' (इं.फिट)

फिटोयेल (वि.) फिटलेले. 'नेले तेवढे पैसे त म्या **फिटोयेल** आयेत, आता काहाचे मांगता बापा?'

फितनं (क्रि.) विरुद्ध पक्षाला जाऊन मिळणे, फितुरी करणे. 'एकजन **फितल्यानं** पार्टी हारली आपली.' (अर.फित्न)

फितवते (क्रि.रूप.) एका पक्षाकडून दुसरीकडे वळवणे, आपल्या बाजूचा करणे. 'त्याला कोणी **फितवते** की काय असं एक टेन्शन निर्माण झालं.' -खुं.६.

फितून (क्रिवि.) फूस लावून. 'गोप्यानं मायले **फितून** नेलं असा रिपोट त्यानं केला.' -सित.१०३.

फितोनं (क्रि.) दुसऱ्या पक्षातून आपल्या पक्षात ओढणे. 'एक्करभर वावर दे अन् **फितोनं** त्याले आपल्या पार्टीकून.'

फिदकन (क्रिवि.) एकदम हासणे. 'आपून काई म्हटलं का **फिदकन** हासते लेकाची पोरगी.'

फिदा (पु.) आसक्त, अनुरक्त. 'पोरगा पोरीवर **फिदा** हाय तं मायबापानं नाई नोतं म्हना लागत.' (फा.अर.)

फिदीफिदी (क्रिवि). खिदीखिदी- हासणे. 'दोन बाया जमल्या की लोकाईच्या उन्यादुन्यावरून **फिदीफिदी** हासनं चालू होते.'

फिपुली (स्त्री.) पाकोळी. 'पख तुटल्या **फिपुलीवानी** पल्ली हाये पोट्टी कालपासून.' -पोळा.

फिरकनं (क्रि.) फिरणे, भटकणे. 'घराकून **फिरकलोच** नाई ना. नाई तं मी च्या घ्याले आलोच अस्तो.'

फिरकी (स्त्री.) गंमत, चेष्टा. 'वैनीची मस्त **फिरकी** घेतली म्हटलं, वैनी तुमचे भाऊ तं म्हनत करा तुमी दुसरीबी बईन.'

फिरतं (वि.) १. फिरत असलेले. 'जात **फिरतं** असलं का पळनाऱ्या पांढऱ्या पिठासंगं गानंबी होटावर येत जाय.' २. लाटणे. 'पोया लाट्याले साजरं गोलगुटूक **फिरतच** पायजे बैना.'

फिरती (वि.) १. फिरत असलेली. 'चोरचिलटाची **फिरती** असताना संगतीले हा तगडा माणूस भेटला.' -मोती. २. गोल फिरणारी. 'लेकराले भिंगरी कशी **फिरती** पायजे.'

फिरनं (क्रि.) १. वळणे, पलटणे. 'माया संगंमंगच होता पन मंधातूनच मोतीराम **फिरला**.' २. भटकणे. 'हारपलं ढोर पाहाले लय **फिरनं** पळते.'

फिरस्ता (वि.) भटक्या. 'तिथं कोणी **फिरस्ता** आला त्यानं चिलम पेटवली.' -मोती.३१.

फिरस्ती (स्त्री.) भटकण्याची क्रिया. 'धंद्यापान्यासाठी **फिरस्ती** करा पण कुठीतरी बुड टेकवाच.' -सि.७३.

फिराक (स्त्री.) चिंता, काळजी. 'आजकाल तू नाराज दिसतं रे, कोन्त्या **फिराकमंदी** आयेस तू?'

फिराफिरी (स्त्री.) भटकंती. 'उनायाभर पोरं पोरीसाठी अन् पोरीचा बुडा पोराईसाठी **फिराफिरी** करत रायते.'

फिरायला (क्रि.रूप.) फिरत आहेस. 'म्हाताऱ्यानं हातातील काठी परभूच्या डोक्यावर हलकेच हाणून विचारले, 'बोडखा काऊन **फिरायला**? कोणाचा हायस.' -वा.१८.

फिरिस्ती (वि.) फिरणारा. 'आत्या मामा लय दिवस झाले दिसून नाई रायले का **फिरिस्ती** हाय काय?' (अर.)

फिरेल (क्रि.रूप.) फिरलेले. 'मोठमोठ्या शेहरातनी कोन भेते रे. आपून तं भलकसं **फिरेल** हाव.'

फिरोत (क्रि.रूप.) फिरवत, आशेवर ठेवत. 'मंत्रीसंत्री लोकाले भल्ले **फिरोत** रायतात. मारत बसा त्याईच्या मांग चकरा.'

फिरोनं (क्रि.) फिरवणे. 'लेकराले आमासीक भाईर **फिरोनं** व शांते, मुकं तरी राहीन.'

फिरोयाले (क्रि.रूप.) फिरवायला. 'लेकरू सयसंध्याकाय-

पासून लळून रायलं **फिरोयाले** घेऊन जा बरं.'

फिरोयेल (क्रि.रूप.) फिरवलेले. 'सायबानं मले सबन जंगल **फिरोयेल** आय त्याईच्या संगं.'

फिरोलं (क्रि.रूप.) फिरविले. 'निंबू फोळून पोराच्या आंगाऊन **फिरोलं**.' -धुम्म.

फिर्याद (स्त्री.) न्यायाची मागणी. 'गावाचा पाटील बदमास असला तं **फिर्याद** कोनाजोळ करावं?'

फिसकटनं (क्रि.) मोडणे, बिघडणे. 'दा हजाराच्यानं सवदा **फिसकटला**.'

फिसकनं (क्रि.) निसटून जाणे. 'इकडचे धरले तर तिकडचे **फिसकतात** तिकडचे धरले तर इकडचे **फिसकतात**.' -खुं.१३५.

फिसकायनं (क्रि.) निसटून जाणे. 'हेवेदावे करायले लागले म्हणून नवरा **फिसकायची** भीती नव्हती.' -अंधा.

फिसाद (स्त्री.) दंगल, भानगड. '**दंगलफिसाद** झाल्ती गनपतीत ताहापासून गाव बयेकलं.' (अर.)

फिस्कटनं (क्रि.) विस्कटणे, हुकणे. 'वक्तावर छातीले माती लावली अस्ती तं काम **फिस्कटलं** नसतं.'

फीट (स्त्री.) अपस्माराचा झटका. 'नवरदेव असा हार टाक्याले गेला अन् नवरीन **फीट** येऊनच पळ्ळी राजा.' (इं.)

फीत (स्त्री.) सूती पट्टी. 'सरकारी कामं **लालफितीत** अटकतात म्हंतात बॉ.' (फा.फीतः)

फुईबईन (स्त्री.) आत्याची मुलगी. 'मले फुईच नाई तं **फुईबईन** कुठून येईल राजा.'

फुईभाऊ (पु.) आतेभाऊ. '**फुईभाऊ** आल्ता बैलजोळी मांग्याले.'

फुईसासू (स्त्री.) पतीची आत्या. '**फुईसासूच्या** अतचं लगन असल्यावर भर अहेर तं न्याच लागीन ना?'

फुकटचोद्या (वि.) पैसे खर्च न करता काम साधू पाहणारा. '**फुकटचोद्याले** काय मायं वावरबी हळप कराचं हाय?'

फुकटझऊ (वि.) कंजुष, फुकट्या. 'कदीबी भेटो आपल्या-लेच च्या पाज्याले लावते **फुकटझऊ** लेकाचा.'

फुकटफाकट (वि.) पैसे खर्च न करता मिळालेले. '**फुकटफाकट** कामाले लावता काय मामा?'

फुकट्या - भोकाचं वि. पैसा खर्च न करता लाभ करणारा. 'स्वतःचा पेनबी खिशात ठेवत नाही **फुकट्या** भोकाचा.' -ना.१०७.

फुकट्या (वि.) काहीही खर्च न करता लाभ करून घेणारा. '**फुकट्या** लोकाईची काई कमी नाई. घे म्हनाची देर हाय.'

फुकनं (क्रि.) १. फुंकणे. 'चुलीपासी बसून मायचं उभाय **फुकनं** चालू होतं.' २. पेटविणे. 'धुरे धारे **फुकनं** पळतात उनायाच्या वक्ती.'

फुकनी (स्त्री.) १. जाळ फुंकण्याची बांबूची पोकळ नळी. 'निखाऱ्याच्या आशेनं राखेले **फुकनी/** घरासमोर बसो लागल्यावानी टुकनी.' -मिर्झा.१६५. २. टंचाई, कमतरता. 'पोरीची काई **फुकनी** नाई पळेल. लय हायत लगनाच्या.'

फुकपानी (स्त्री.) जंतरमंतर. 'गावगाड्यात असं **फुकपानी**, अंगारेधुपारे काही नवीन नाही.' -पोळा.

फुकफाक (न.) पेटविणे वगैरे. 'वावरात डब्बी घेऊन गेलो अन् काळीकचरं **फुकफाक** केलं.'

फुकलं (क्रि.रूप.) १. पेटविले. 'कोनीतरी खोळसाळपना केला राजा. मायं कुटार **फुकलं**.' २. फुंकले. 'तोंड वासूवासू **फुकलं** तरमा ओलं इंधन चेतलं नाई.'

फुकून (क्रि.रूप.) फुंकून. 'गरम आय दूध, **फुकूनफुकून** पे बाबू.'

फुकेल (क्रि.रूप.) फुंकलेले, पेटवलेले. 'वावरात गेलो तं काळ्याफनं कोनीतरमा **फुकेल** दिसले.'

फुकोयाले (क्रि.रूप.) पेटवायला. 'काळीकसदन सबन असीन ते **फुकोयाले** चाल्लो मी.'

फुक्याले (क्रि.रूप.) फुंकायला. 'कचरं पेटोयाले, **फुक्याले** माचीसची डब्बी लागत होती लेक.'

फुगट (वि.) १. फुगीर, सुजलेलं. 'गोमाशी डसली ना तोंडाले. असं **फुगट** तोंड घेऊन कुठी जाता पावन्याच्या घरी.' २. रागीट. 'माही सासू अशीच आये **फुगटल्यावानाची**.'

फुगटनं (क्रि.) रागे भरणे. 'याच्यात्याच्यावून हरहम्मेस **फुगटनं** बरं दिसते काय बाई?'

फुगनं (क्रि.) १. हवा भरणे. २. रागे भरणे. 'नाई म्हटल्यानं नामा **फुगला**. रूसून बसला.' -धग.४२ ३. जेवण करणे. 'तुहा बाप येतेच जराकभऱ्यानं **फुग्याले** ताटपाट करेलच आये.' -धुम्म. (का.पोंगु)

फुगवाफुगवी (स्त्री.) रागलोभ. 'लगनात कितीकई करा बायकाची **फुगवाफुगवी** रायतेच रायते.'

फुगवाय (क्रि.रूप.) फुगविण्या, खाण्याकरिता. '**फुगवाय** तिथं अन् उगवाय इथं.' 'दिवसभर भाईर पोट **फुगवाय** घरी.'

फुगारा (पु.) १. फुगलेला भाग. २. राग. 'पायजे ते भेटलं तरी अंजीचा **फुगारा** गेला नाई आजून.'

फुगीर (वि.) फुगलेला. 'ते **फुगीर** गालाची पोरगी मले नाई पसन.'

फुगेल (वि.) १. भरलेले. 'पोट लय **फुगेल** आय. भूक नाई आताशीक.' २. राग आलेला. 'मामी तं लयच **फुगेल** होती लेक. जेवबी नाई म्हटलं.'

फुगोटा (पु.) सूज, फोपसेपणा. 'लय केला आटापिटा, बाईचा गेला नाई **फुगोटा**.'

फुगोनं (क्रि.) हवा भरणे. 'तोंडानं नाई तं पंपानं तरी **फुगोनं** हा फुगा.'

फुगोयाले (क्रि.रूप.) हवा भरण्यासाठी. 'मंग म्या अन्नालेच फुगा **फुगोयाले** सांगला.'

फुगोरा (पु.) राग, नाराजी. 'एवढं मनाभावानं करूनबी इहिनीचा **फुगोरा** काईमच!'

फुगोलं (क्रि.रूप.) फुगवले. 'आग्रो करूकरू पावन्याचं हॅ पोट **फुगोलं**.'

फुग्या (पु.) एक गवत- शेतातील तणाचे नाव. 'बराबर निंदा बाई. **फुग्या** नोकं सोळू.'

फुटकर (वि.) १. थोडे. 'गावात बाऱ्याईचे फुटकर घरं आयेत.' २. फुटलेले. 'घळ्ळी साजरी आनजो, **फुटकर** ना पायजे.'

फुटका (वि.) १. फुटलेला. '**फुटकी** सांगडी। तुका म्हणे न पवे थडी॥' -तुका.११४३.५. 'पावनेईले **फुटक्या** कपात च्या नको देऊ.' २. आंधळा. 'रखवाली, डोयानं अख्खम व्हयेल तिचा **फुटका** बाप करत जाये.' -सित.८५.

फुटक्या डोया(ळ्या)चा (वि.) एक शिवी. 'खर्चा नाई दिसत **फुटक्या डोळ्याच्यायले**. फक्त माई कमाई दिसते.' -त.७०.

फुटफाट (स्त्री.) फुटणे, विलग होणे. 'थोळसाक धक्का लागल्यानं घळ्ळी **फुटफाट** झाली.' २. बेबनाव. 'जबर दोस्तानी होती आता **फुटफाट** झाली आमच्यात.'

फुटवा (पु.) पालवी, नवती. 'गंधर्व केलं त तुह्या रंडक्या कपाळालेबी पुन्हा कुकवाचा **फुटवा** फुटीन.' -अंधा. 'आपल्या मातकट मनाला **फुटवे** फुटण्याचे वासंतिक दिवस.' -गाक. १०२.

फुटाफूट (स्त्री.) विलग होण्याची क्रिया. 'खुर्चीसाठी जसी खसदाराची **फुटाफूट/** तसी झाली दोस्तान्यात आमची ताटातूट.' -मिए.११८.

फुटेलं (वि.) १. फुटलेला. 'अवं दाळभद्रे, **फुटेलं** आरसा कोनी घरात ठुते तरी काय वऽऽ?' २. विभक्त झालेला. 'येका पार्टीतून **फुटेलं** शामराव दुसऱ्या पार्टीले भेटेल हाय.'

फुटोनं (क्रि.) उपेक्षा करणे, वाटेला लावणे. 'आल्ता भावराव पैशे मांग्याले, **फुटोला** म्या, लावला रस्त्यानं.'

फुडक्या गालाची (वि.) गोबरे गाल असलेली. 'ती **फुडक्या** गालाची तं लयच चबरकुटी हाय माय.'

फुदकनं (क्रि.) उड्या मारणे, नाचणे. 'सिग्रेटीचे झुर्के घेत गान्यावर मस्त **फुदकून** राह्यला व्होता. नाचत व्हता.' -पोळा.

फुदकन्या (स्त्री.अने.) उड्या. 'आजच्यासारख्या कधी तिनं **फुदकन्या** घातल्या नाहीत.' -झि.९०.

फुनगनी (स्त्री.) लहान फोड. 'उलचीक **फुनगनीत** हाय व डाक्टर सायब अन् तुमी कॅन्सर झाला म्हन्ता राजा?'

फुनसी (स्त्री.) लहान फोड. 'पाय मायऽऽ, उलच्याक **फुनसीचं** केवळं भद झालं वऽऽ.'

फुपोल्डा (पु.) फुफाटा. 'रडार बसोलं नस्तं शेगावले तं संम्दा **फुपोल्डा** उल्डा आस्ता गावभर.' -खुं.१०२.

फुफरूट (न.) धूळ. 'बाजीराव काही तरी केलंच पायजे **फुफरुटासारखं** पडून रायनं आता जमत नाही.' -पाटी.

फुफाटा (पु.) गरम धूळ, माती. 'आगीतून निंगालो अन् **फुफाट्यात** येऊन पळ्ळो.'

फुफूट (स्त्री.) फुफाटा. 'आंगनात येवळं **फुफूट** कायचं झालं?'

फुया (पु.) आत्याचा यजमान. '**फुयानं** टॅक्टर घेतला औंदा तं आपलेबी वावरं नांगरून घ्या लागतीन.'

फुरका (पु.) भाजीचा रस्सा तोंडात जोराने ओढणे. 'पातोळीची भाजी अशी लावूलावू जेवतात काय सायब? **फुरके** मारा मस्त.'

फुरताई (स्त्री.) त्वरा, तातडी. 'ठाणबंदी घोडे **फुरताईनं** उडी मारून टाच देणाऱ्या स्वाराची जणू वाटच पाहत होते.' -कात.३९.

फुरफुर (क्रिवि.) राग व्यक्त करणे. 'डोम्या नागासारखा **फुरफुर** करत रायतं काय बे बायकोवर?'

फुरफुरी (स्त्री.) हळूहळू पडणारा पाऊस. 'काबे, धोंडी मांगता लेकहो? आता आठ रोजापासून **फुरफुरी** बंदच नाई होऊन रायली ना?'

फुरसत (स्त्री.) सवड, उसंत. 'आईबापास **फुरसत** नाही। कामास जाता अडचण येई॥' -ग्रा.१९.५०. (फा. अर. फुर्सत)

फुरसांड (न.) पुरासोबत वाहणारा कचरा. 'थळीवर निऱ्हा **फुरसांड** येऊन पळ्ळं.'

फुरसी (स्त्री.) लहान पुटकळी. 'तोंडावर **फुरसी** काहाची झाली वऽऽ? पावने नापसन करतीन ना अशानं.'

फुर्र (अ.) भर्रकन. 'चाय आल्या बरोबर चिमनी **फुर्र** उळाली.'

फुलका (पु.) लहान पोळी. 'पोयाईपक्षे आजकाल पोरीसोरी

फुलकेच पसन करतात.' (अ.फुल्कः)

फुलगोबी (स्त्री.) एक भाजी. 'पानगोबीच्या भाजीपेक्शा **फुलगोबी** बरी लागते.'

फुलचं (न.) चिंचेचा एक खाद्य पदार्थ. 'पंगतीत पोऱ्या, भात, तिराची चटणी, चिचीचं **फुलचं** राहे.' -दि.१०.

फुलपाती (स्त्री.) कपाशीचा **फुलपानाचा** बहर. 'पाय वरच्या पान्याचा कसा फरक पळते. कशी लवंडली पराटी **फुलपातीनं**.'

फुलफुल (स्त्री.) कुजबूज. 'दोघांच्या संबंधाची संपूर्ण गावातूनही **फुलफुल** पसरली होती.' -कात.२१३.

फुलबकरा (पु.) बळी द्याचा बोकड. 'दुसमान दावा सादेल हाय वं जाई. आमचा **फुलबकरा** घिऊन जाय वं जाई.' -हज.३१.

फुलबिसण(नी) (वि.) फुलासारखी सुंदर तरुणी. '**फुलबिसण** चमेली, कोण बसून दुकानी, दोडे विकत बसली.' -लोक.४१. '**फुलबिसन्या** बायका असल्याबिगर मानसाईची जात बधतच नाई नावं.' -कावू.

फुलारी (पु.) फुलांचा व्यापारी. '**फुलाऱ्या** जोळ नवरा-नवरीचे हार सांगतले.'

फुलारी (स्त्री.) फुलांची परडी. 'तरूलतिकांची बाग बहरली, मधुर फुलांनी **फुलारी**.' -अ.१०४.

फुली (स्त्री.) १. निशाणी. 'जथी चुकलं तथी **फुली** मारून ठुली लाल पेनानं.' २. बुरशी. 'डब्ब्यातलं वरन काहाळाची आठवनच नाई, **फुली** आलं लेकाचं.'

फुलोर (पु.) फुलांचा बहर. 'डांगोडांगी **फुलोर** आला पऱ्हाटीच्या अन् पयल्या बोंड्याबी पकेल हायतच.'

फुलोरा (पु.) देवाच्या डोक्यावर लाडू, करंजी, कुरड्या अनारसे, टांगतात ती चौकट. 'पुरीयाः घारीयाः सोवाळीः सेंगळीः बुड्डीः ऐसा **फुलउरा** केलाः' -ली.९५. 'घटु मांडीला...नवधान्ये पेरीलीः **फुलौरा** बांधलाः माळ लाथीलीः' -गोवि.१०२.

फुल्ली (स्त्री.) निशाणी. 'वयखू याव म्हून पोत्यावर एक **फुल्ली** मारून ठेवली.'

फुल्लोर (पु.) फुलांचा बार. 'चिच नदीच्या काठची तिची मायाळू सावली/ तिचा गयता **फुल्लोर** एकडाव तरी पाय.' -काया.२१.

फुशी (वि.) १. फुसका बार. २. पोकळ. 'तुत्याची काळी **फुशी** निंगल्यानं येका रप्पक्यात फळकली.'

फुसकं (वि.) १. पोकळ, ठिसूळ. 'गावरान जवारीवानी गोळ धांडे नाईत. आता **फुसकेच** रायतात.' २. भुसभुशीत. 'वावर **फुसकं** असल्यानं औत निऱ्हा जमिनीत घुसूनच चालते.' ३. पक्व नसलेला. 'बासा **फुसका** निंगल्या-च्यानं तटकन तुटला.'

फुसकट (न.) फेस. 'वखरनं, नांगरनं मान्साचं भल्लं **फुसकट** पाळते.'

फुसकारनं (क्रि.) १. जोरात दम, श्वास सोडणे. 'गाईच्या मांग लागलो. **फुसकारनं** चालू अन् पयनं चालूच.' २. रागावणे. 'गोठ सांग्याले गेलो तं हऱ्या मायावरच **फुसकारला**.'

फुसकी (स्त्री.) १. बारीक आवाजात पादण्याची क्रिया. 'हिडीओत बेज्याची गर्दी अन् त्यात पोटे **फुसक्याबी** सोळत निऱ्हा कुयट.' २. खोटी- बातमी. 'हल्याच्या टकरीत मरत असते म्हसकी/ खरं मी सांगतो समजू नका फुसकी.' -मिए.१३५. 'तलाठ्यानं आनलेली बातमी काय लेक **फुसकी** अस्ते?' -झेल.८०. ३. चुगली. 'कोनाकोनाले **फुसकी** सोळून सवच अस्ते भांडनं लावाची.'

फुसकी (वि) पोकळ. 'आमची जमीन कळक नाई. **फुसकी** आये.'

फुसफास (क्रिवि.) काल्पनिक गोष्ट, थापा. 'कवी, लेखक लोकाहीची मशाल आता पेटन/ **फुसफास** माराची संधी आता भेटन.' -ऊ.३८.

फुसांडनं (क्रि.) श्वासाची गती वाढणे. 'बैल जीव तोळून पयतात बिचारे! केवढे **फुसांडतात**. दम टाकतात.' -डेबू.३९. 'उमदे गोऱ्हे नुकतेच पेटवलेले. धावण्यापेक्षा त्यांचं **फुसांडनंच** जास्त.' -काळी.१४.

फुसांडा (पु.) श्वासाची वाढलेली गती. 'पळण्याचा वेग कमी झाला तरी त्याचा **फुसांडा** बराच वेळ गेला नाही.' -गय.११.

फुसांडूफुसांडू (क्रिवि.) हुंदके देत, हुमसूहुमसू. 'तो मटकन मायच्या खाटीजोळ बसून **फुसांडूफुसांडू** लळ्याले लागला.' -सित.४७.

फुसाळकी (स्त्री.) थाप, गप. 'पहावं ताहा नांग्या **फुसाळक्या** मारत रायते.'

फुसाळी (स्त्री.) खोटी बातमी. 'अद्रक काहाले येते आपल्या जमिनीत सायबानं **फुसाळी** सांगितली बंडू भाऊ.'

फुसाळ्या (वि.) १. थापा मारणारा. '**फुसाळ्या** संत्या, येकरी दा किंटल पिकले म्हने हरबरे.' २. कल्पित, खोट्या गोष्टी. 'खरं त्याचं आडनाव ढोरे. त्याला लंब्याचौळ्या बाता करून **फुसाळ्या** सोळण्याचा छंदच असल्याने लोक त्याला भगवान **फुसाळे** नावनं हाक मारत.' -तित.१०७.

फुसूफुसू (क्रिवि.) हळू आवाजातील बोलणे. '**फुसूफुसू** करे याच्या त्याच्या कानात/ रामदास भाऊची मशीन दुकानात.' -मिर्झा.१९५.

फुस्कट (न.) फोलकट, कचरा. 'गहू आनले त त्यात निन्हा **फुस्कटच फुस्कट**.'

फुंडकं (न.) डाळीचा वाटून केलेला पदार्थ. '**फुंडकं** नाई येत लाखाचं/ बोलनं मोठं दिमाखाचं.'

फुंडकी (स्त्री.) विस्तवाची उडालेली ठिणगी. 'कापूस पेटाले तं **फुंडकीबी** बस करत.'

फूई (स्त्री.) आत्या. '**फुई** तसी भासी, हात धरून जासी.' (हिं.)

फूक (स्त्री.) फुंकर. 'दुकावर **फूक** मारावं का मीठ चोळावं?'

फूट (स्त्री.) अंतर- पडणे. 'दोघ भाऊ येका ताटात जेवत, आता लय **फूट** पळ्ळी.'

फूल (वि.) पूर्ण. 'राजन फूल भरून ठुला.' 'भावराव एकदम **फूल** मॅट आये.' (इं.)

फूलबाई (स्त्री.) स्त्रीच्या कानातील दागिना. 'तुया कानातली **फूलबाई** सोन्याची हाय का वऽऽ?'

फूस (स्त्री.) कळ. 'आमच्या घरात चलवादीनं **फूस** लावली.'

फूसफूस (क्रिवि.) हळू आवाजात- बोलणे. 'दोघी जावाची कानाजोळ **फूसफूस** चालूच असते.' (का. गुसगुस)

फेकझोक (स्त्री.) आदळउपट. 'उचलतो ना बापा आमीच, पन सामानाची असी **फेकझोक** करू नोका.' -सि.३०.

फेकता (क्रि.रूप.) १. फेकत राहता. 'माया आंगावर रंग **फेकता** काय तुमी?' २. खोट्या गोष्टी सांगता. 'वाघाले गुदगुल्या केल्या म्हंता राजा, काईबी फेकता काय हो?'

फेकनं (क्रि.) टाकणे, फेकणे. 'खराब गोठी **फेकनं** पळतातच राजा.'

फेकाफेकी (स्त्री.) थापा मारून प्रयत्न करणे. 'असं नोतं झालं एकाएकी, याच्यासाठी केली म्या लय **फेकाफेकी**.' -मिर्झा.१६३.

फेकेल (क्रि.रूप.) फेकलेले, टाकलेले. 'रस्त्यावर **फेकेल** पैसे उचलतं काय बोहाऱ्या?'

फेक्कस (पु.) खिळे, गज खुपसण्याचा खेळ. 'उनायात कांचाळ्या अन् पानी पळ्ळं का **फेक्कस** खेळनं चालू होय.'

फेक्याले (क्रि.रूप.) फेकायला. 'फुटक्यातुटक्या कपबशा सासू बाईनं भाईर **फेक्याले** लावल्या.'

फेड(ळ)नं (क्रि.) दूर सारणे, काढणे. 'वसीष्ट करी सावधान ब्रह्मेणि ओंकारें अंत्रपट **फेडिलाः**' -धउ.३२. 'लीलानं कौतीकचा काष्टा अन् ठुशीचा पदरही फेडला.' -मोच.७३.

फेतका (पु.) गोळा. 'शेनाचा **फेतकाही** उडू देत नसे.' -पागो.१५.

फेदका (पु.) चिपडाचा गोळा. 'डोयावरतं **फेदकेच्या** फेदके, असे डोये आले होते.'

फेदम्मा (वि.) लठ्ठ पण ठेंगणी स्त्री. 'येवळ्या पोरी पायल्या अन् हे काय **फेदम्मा** करून आनली बावा.'

फेदोड(ळ) (पु.) चिपड, गोळा. 'नाक धारदार पण नाकपुड्याला लागत थोडे **फेदोड**.' -काळी.४२. 'आपल्या गांडीचे **फेदोड** पुसनं होत नाई तर लिहायला वेळ काढाव कुठून.' -खुं.७.

फेपरं (न.) मुर्च्छा, झटका. 'या देवाचे भरेना वारे। अंगी प्रेमाचे **फेंपरे**।' -तुका.४६६.

फेर (पु.) पाळी. 'मुंगाले काय दोन डवऱ्याचे **फेर** देले का झालं.'

फेरकाकळा (पु.) पेरण्यातील बदल. 'सुलतानीत **फेरकाकळा** पेरला होता. येकरी मुंग चार झाले अन् दा किंव्टल कापूस पिकला.'

फेरनं (क्रि.) कवेलू व्यवस्थित लावणे, अदलाबदल करणे. 'मिरूग लागाच्या अगोदर घर **फेरनं** पळतेच राजा.'

फेरफटका (पु.) येखादा चक्कर. 'वावरात **फेरफटका** पायजे. चोर दबकतात मंगसन्या.' (का.फेरूफटका)

फेरफार (स्त्री.) बदल. 'औताचे बैल जेवनं झाल्यावर **फेरफार** करा लागतात. धूर बदला लागतेच.' (फा.)

फेरा (पु.) चक्कर. 'इकून आलो तं लय **फेरा** वाचला.'

फेरी (स्त्री.) चक्कर, येरझार. 'कसार भाऊ, येवळ्यात गावातनी **फेरीबी** नाई मारली राजा.'

फेरेल (वि.) फेरलेले. 'यासालीच **फेरेल** घर असूनबी टपटप गऊन रायलं.'

फेऱ्याले (क्रि.रूप.) फेरायला. 'कौलं **फेऱ्याले** जानकार मानूसच पायजे.'

फेल (न.) १. नापास. 'पोट्टं दहावीत फेल झालं.' २. अयशस्वी. 'सोयाबीन पेरलं तेबी **फेल** झालं.'

फेसकट (न.) तोंडातील लाळ. 'जेरशी बैल, गाय उनायात लय **फेसकट** गायते.'

फेसरी (स्त्री.) दम लागणे, फेस येणे. 'दोन्ही पाटर्या कोर्टकचेऱ्या करता करता **फेसरी** येतीन.' -त.२४.

फेसोफेस (क्रिवि.) बरोबर. 'कपळे तं येकदम **फेसोफेस** झाले.' (इं.)

फेळनं (क्रि.) बाजूला सारणे. 'याचा आंगी ग्रहो असे तो **फेडिजो** जीः तीही गोसावीयाते देखीलेः येइजो जीः' -११४. 'दगड **फेडीलेः** उकरीलेः मग काढीलेः झाडीलेः पुसीले.' -गोवि.८.

फेंकाळ (स्त्री.) ढुंगणाचा एक भाग. 'खातंपेतं घर

भेटल्यावर तं बाईचे बातन्याबात **फेंकाळं** निंगतात, नाई?'

फेंगडा(ळा) (वि.) समोरचे पाय फकाट असलेला. 'ते हेंगडत चाले त तैयाले पाहून लोकं मनाचे सर्वे पावने **फेंगडे** कामून आनले बा?' -दि.१३. 'नुकतच जन्मलेलं वासरू **फेंगड्या** पायावर उभं राहण्याचा प्रयत्न करते.' -गाआ.६६.

फेंड (स्त्री.) ढुंगणाचा एक भाग. 'मरतुं मरतुं फेंडीः बोबातुसिकाः म्हणौनि **फेंडेवरि** हाणीतलेः आणि हास्य केलेः' -गोवि.१०१.

फेंडी (स्त्री.) ढुंगण. 'बसेल होतो लेंडीत, तं गोटा बसला **फेंडीत**.'

फेंदरा (वि.) पसरट, चपट्या नाकाचा. 'त्या **फेंदऱ्याचं** लगन जुळता जुळून नाई रायलं भाऊ.'

फेंदाड्या (वि.) पायात वाक असलेले. 'एक वयस्क **फेंदाड्या** बाई गवती झोपडीत राहात होत्या.' -झेल.२६.

फैल (पु.) मोहोला. 'मी आकोट **फैलात** रायतो.' (अर.)

फैसला (पु.) १. निवाडा, निर्णय, निकाल. 'आता कोर्ट काय **फैसला** करीन ते समजीनच.' २. अंतर. 'दूरचा **फैसला** असल्यानं कमलाकर वरीसभऱ्यात गावाकळे गेला नाई.' -सित.१४०. (अर.फा.)

फोक (पु.) हिरवी सरळसोट लांब काडी. 'आप पृथ्वी हे पांच **फोंक**। महाभूतांचे सारोख। सरळे होती॥' -ज्ञा.१५.९८. 'दोनतीन झाडे भोंडी करून तिने त्याचे **फोक** काढले.' -रा.

फोकटा (पु.) ओली फांदी. 'शिंदीच्या **फोकट्यानी** कुंपणाची फाटकी तयार केली.' -पोळा.

फोकणीचं (वि.) एक शिवी. '**फोकणीचं** मॅड हाय कारे हे? डोळ्यात गुलालाचा बकाणा गेला.'

फोकनं(नी) (न.) स्त्री योनी. 'कामाचं दुखनं, काय खाशील **फोकनं**?' 'घाल तुह्या मायच्या **फोकन्यात**!'

फोकनंवासी (वि.) एक शिवी, व्यभिचारी. 'ते **फोकनंवासी** गिऱ्हाईकच धुंडत राहते जशी.'

फोकनाड(ळ) (स्त्री.) खोटी गोष्ट, थापाड्या. 'बाजीराव गावात फुशारक्या मारे. रुपयातल्या चौदा आने **फोकनाड्या**.' दि.६१. 'काही **फोकनाळा** मारतात लिहिणारे.' -बा.१७४.

फोकनाड्या (वि.) थापाड्या, अवास्तव गप्पा मारणारा. '**फोकनाड्याले** काय बापा. उचल्ली जीभ लावली टाळ्याले.'

फोका (स्त्री.) फुशारकी, थापा. 'खरं ते सांग, **फोका** नको मारू.'

फोकांडनं (क्रि.) बरसणे. 'तिच्या तोंडाचं झडीच्या पावसागत **फोकांडणं** सुरू होते.' -ल.११५.

फोकाटा (पु.) फांदी. 'कवलारू छपराच्या वर गेलेल्या कडुनिंबाचा नुसता **फोकाटा** तेवढा उन्हात जळत होता.' -एक.

फोकाड्या(ळ्या) (स्त्री.अने.) गप्पा, बाता. '**फोकाळ्या** तानाची सव बरी नाई.'

फोगा (पु.) धूर. 'चिलमीचा दम मारला तसा वाऱ्यावर **फोगा** तरंगू लागला.' -सि.३५.

फोडफाड (स्त्री.) विलगीकरण. 'पैशासाठी करा लागे मोडतोड जोडजाड/ कवा तोडताड कवा कवा **फोडफाड**.' -मिर्झा.१९०. 'सारखी चाले ओढवाढ/ आई करे आमची पाठ **फोडफाड**.' अर.४३.

फोतर (न.) १. टरफल, सालपट. 'केळाचं **फोतर** कोनं टाकलं बे अथी. पळ्ळो ना लेको हो गांडीवर.' २. मुलगा. 'या बिल्लसभर **फोतराले** काय कयते वऽऽ?'

फोतरी (स्त्री.) टिंगल, फजिती, टर उडवली जाणे. 'लागे मळक्याले मळकं असं भांडे माहे गाव/ सुद्या मानसाची **फोतरी** त्याचे उतरले भाव' -नोका. 'गल्लीत मार खाल्ला त लेकाची काई **फोतरी** व्हायची आपली.' -त.१९१.

फोदरी (स्त्री.) स्त्री योनी. 'तुया मायची **फोदरी** झवं तं, मले शिकोतं का बे तू?'

फोदा(दी) (पु.) स्त्री योनी. 'रुक्याची आस धरुनि। हालवी ती **फुदी**।' -तुका.४६३. 'फुकटची **फोदी**, कोन झवली सुदी.' 'अळान्याचं झवनं, **फोद्याचा** नास.'

फोदाळी (वि.) व्यभिचारी. 'अवं **फोदाळे** माया नवऱ्याले उरावर घ्याच्यावाक्ती मजा वाट्टे अन् आता काहून ठनकून रायली तुई.'

फोदीचा (वि.) एक शिवी. 'मारतं का तू? **फोदीच्या** कशाले चटका देला मंग?' -सेल.३१६. 'जनाची नाई त का मनाचीबी इतलुसीक ठेवली नाही **फोदीच्याहीनं**.' -ना.७०.

फोनाफोनी (स्त्री.) दूरध्वनीवरील सारखा संवाद. 'गावात मारामारी झाली तसी **फोनाफोनी** सुरू झाली. (इं.)

फोन्टोन (पु.) फाऊन्टन पेन. 'आबा माया हाती सेकाट्याच्या जागी **फोन्टोन** आला.' -सित.११७.

फोन्नी (स्त्री.) फोडणी. '**फोन्नीचं** वरन कराव त सांबाप्पानंच.' -दि.३.

फोफशा(सा) (वि.) लठ्ठ. 'जेवनाझोपन्याबिगर काही काम नसल्यानं तुम्ही नुसते **फोफशे** झाले.' -कावू. (का. वोंपळे)

फोफेदार (वि.) फुगलेली. 'केली बारीक पिठाची भाकर ती

फोफेदार.' -लोक.१.

फोया (पु.) फाया. 'माणिकरावच्या कानात अत्तराचा **फोया** असेच असे.'

फोरा (वि.) पोकळ. 'आढ्याच्या लाकडास गुर्रगुर्र करीत भुंगे **फोरा** करून टाकतात.' -ल.७३.

फोलकट (न.) टरफल. 'भुईमुंगाच्या शेंगाईचे **फोलकटं** ढोराईसाठी ठुले.'

फोशा (वि.) पोकळ. 'पप्या **फोशा** हाय. कामाचा नाई. हुलुंपुलुं पायजे त्याले.'

फोस (वि.) बी नसलेले, शून्यवत, निरर्थक. 'विस्तारिली वाचा फळेंविण वेल। कोरडे चि बोल **फोस** वांझे॥' -तुका.३७७४.

फोसं (वि.) फुसके. 'वरि बोला रस। कधी ज्ञानामाजी **फोस**।' -तुका.७४३.

फोसकट (न.) पोकळ, फुसका, फोल. '**फोसकट** काळी काय कामाची बातन्याबातच मुळते.'

फोळ (पु.) उलगडून स्पष्ट करून सांगणे. 'रामराव साधुबॉ पोथीची **फोळ** करून सांगत.'

फोळ (स्त्री.) फोड. 'कैरीची एक **फोळ** मलेबी देनं.'

फोळनी (स्त्री.) फोडणी. 'भाजीले चांगली रस्सेबाज **फोळनी** द्या सुनबाई.'

फौजदारी (स्त्री.) खून, मारामारी इ. गुन्ह्याची कडक कारवाई. 'तुमच्यावर कधी खटला भरला तर **फौजदारी** होते.' -अखे.

फौरन (क्रिवि.) लवकर, त्वरीत, ताबडतोब. 'तुमी तोंडातून शब्द काहाळा आपून ते काम **फौरन** करतो.' (अर. अण्य)

फौरन (स्त्री.) टपालाची एक तऱ्हा. '**फौरन** पोहोचून देईपर्यंत महाराने उभे राहावे असा नियम होतो.' -भं.१२५.

फ्यारनं (क्रि.) बदलणे. 'कळ **फ्यारनं** चाललं रातभर, डोयाच ना लागे.'

ब

बईन (स्त्री.) बहीण. 'मले येक **बईन** अन् येक भाऊ हाय.'

बईल (पु.) १. बैल. '**बैलातळीं** लागले। गोचिड जैसें॥' -ज्ञा.१८.६६८. 'मोठा पोया झाल्यावर लहान पोया अस्ते. त्यात लेकरं मातीचा **बईल** घेऊन घरोघर हिंडतात.' २. सरत्याचा एक भाग. 'मुईखंडाले लागून सरत्याचा **बईल** मोळ्ळा.'

बईलगाळं (न.) बैलगाडी. '**बईलगाळीची** खी काहाले मांगता, बंडीचं नेना.'

बकत (क्रि.रूप.) बोलत. 'गोप्या काईबी **बकत** रायते तोंडात येईल ते.'

बकनं (क्रि.) बरळणे. 'गोप्याचं काईबी **बकनं** चालूच अस्ते.'

बकबक (स्त्री.) वायफळ बोलणे. 'सोप्यानं पारावर जमीनजुमल्या संबंधी **बकबक** चालू केली.'

बकबक (वि.) भरपूर. 'जी मालक, भीतीपेक्षा कुडच बरा. **बकबक** हवा लागती.' -खुं.२.

बकरकसाई (पु.) खाटकाचे काम करणारा. 'शेलगावचे **बकरकसाई** पण बाजारा येतात.' -सेल.१०.

बकरा (पु.) बोकड. 'कोरकूचा सन म्हनजे **बकरा** कापनं अन् खानं.' (फा.)

बकरी (स्त्री.) शेळी. 'येक **बकरी** इकत आन्ली. तिचा येल वाळत गेला तं लेकीच्या लगनालेच इका लागल्या.'

बकला (क्रि.रूप.) काहीतरीच बोलला. 'मंधातच तुयशा काईतरमा **बकला**.'

बकळं (न.) बोकूड, शेळी. 'आठदहा **बकळल्या** होत्या. त्यातले दोन सटकर **बोकळे** इकून खाल्ले व्हते.' -सित.४४.

बकळ्ळी (स्त्री.) बकरी. 'च्या मायची **बकळ्ळी** तं. अती पाला नाई खात तिकळे मरते.'

बकवा (पु.) बडबड. 'तेव्हा या **बकवा** करण्यात काय अर्थ?' -कात.२७७.

बकवास (स्त्री.) बडबड, खोट्या गोष्टी. 'दा पोते हरबरा झाला म्हने. आपून काय खळसात रायतो आपल्या सामने **बकवास** कराले.'

बकान (न.) वृक्षविशेष. 'पौर्णिमेच्या चांदण्यात **बकानच्या** झाडाला बांधलेले झोके उंचउंच जात होते.' -एक.

बकाबक (क्रिवि.) एक सारखे. 'साखर दिसली का बबन्या **बकाबक** फक्के मारत रायते.'

बकाबका (क्रिवि.) जोरात, वेगाने. 'हराळी लव्हाळी जमीन धरून **बकाबका** वाढणारी, आतल्या आत बंदावर बंद करून दाट होणारी.' -खुं.१४६.

बकाया (पु.) बाकी उरलेला. 'आता शंभर देल्ले तरी ईस रूपये तुया आंगे **बकाया** रायतात.' (अर.)

बकाल (वि.) घाणेरडा. 'शेहराईनं आजकाल भल्ल्या **बकाल** वस्त्या झाल्या.' (फा.)

बकाल (क्रिवि.) जोरात. 'साताकायातून सुटल्यावानी तो **बकाल बकाल** खाऊ लागला.'

बकाव (क्रि.रूप.) बोलावे. 'काई तोंडात यीन ते **बकाव** काय?'

बकून (क्रि.रूप.) बोलून. 'काम ना धाम गोप्या मंधातच **बकून** गेला.'

बकेट (स्त्री.) बादली. 'इरीतून **बकेट** पान्यानं भरून काळ्ळी. पाथीवरच्या बायेईची घागर भरून देली.' (का. बकीटु)

बकेल (क्रि.रूप.) बोललेले. 'चारचौघात तोच **बकेल** आय, आता कसा पलटतं म्हना?'

बक्कल (न.) १. केसाला लावावयाची पीन. 'मा वऽऽ मायत्त् केसाले लावाचं **बक्कल** कुठी ठुलं वऽऽ' २. पट्ट्याची हूक. '**बक्कल** तुटल्यानं पट्टाबी बांधता येत नाई.'

बक्कळ (वि.) भरपूर, खूप. 'कास्तकाराले लळ्याची सवयच हाय, दरसालच **बक्कळ** पीक होते.' (का.कबह)

बक्का (पु.) तोंडात एकदम टाकलेला घास. 'कारे तुया बापाची ठेव आय काय? येवळा साखरेचा **बक्का** मारतं.'

बक्याले (क्रि.रूप.) बोलायला. 'तुले मंधातच **बक्याले** कोनं सांगलं होतं बे?'

बख (न.) हाताची एक बाजू. 'नांगराचं खोळ वाहूवाहू **बख** दुखून रायलं.'

बखई (स्त्री.) पेरलेल्या बियात काही बी न निघाल्याने रिकामी राहिलेली जागा. 'पेरन्यावर पानी आलं नाई तं पर्हाटीच्या वावरात लय **बखया** पळ्ळ्या.'

बखयनं (क्रि.) उगवलेल्या रोपात अंतर पडणे. 'डुंगं लय **बखयलं**, अंधामंधातबी टोपा लागन आता.'

बख्खर (पु.) कोळपे. 'अबे तं वखरालेच मुसलमान **बख्खर** म्हंतात ना.' (अर.)

बखाड(ळ) (स्त्री.) १. अवर्षण, पावसाळ्यातील उघाड. 'तशी **बखाड** पल्ड्यावरच माणूस आभाळ न्याहाळते.' -त.१३५.

बखाड(ळ) (न.) १. शरीराची एक बाजू. 'रूस्तमानं गणेशचं **बखाड** धरलं.' -पख.८८. २. कड, बाजू. 'गावाच्या त्या **बखाळावर** देऊळ हाय.'

बखाडी (स्त्री.) पाऊस थांबलेला काळ. 'उरेलसुरेल काम **बखाडीत** उरकता येतात.'

बखेरी (स्त्री.) धान्य ठेवण्याची खोली. 'वाड्यातल्या **बखेऱ्या** गहू, तांदूळ आन तुरीच्या दाईनं गच्च भरून होत्या.' -दि.५

बखेळा (पु.) तंटा, भांडण. 'रायखेळ्याले काई तंटा **बखेळा** झाला म्हंतात बॉ.'

बखोटं (न.) खांद्याचा भाग. 'आत्ता कसं जावावं रे गणपा या गर्दीतून? बुढीनं गणपाचं **बखोटं** धरलं.' -झि.११३.

बख्खळ (वि.) भरपूर, मोठी. 'गजबजेल लाजबाब चौकामंदी नजुलची **बख्खळ** जागा आबाले भेटली.' -सित.१३७.

बगदं (न.) भुकटी, पूड. 'पुडी उघडून पावडर पाहून म्हतारी म्हणाली डाक्टर सायब हे **बगदं** काय कराव? खावाव काय?' -मामा.२८.

बगर (अ.) शिवाय. 'पेरनीच्या मांगं खत पायजेच. **त्याबगर** कसं काय पिकेल वावर.' (फा.)

बगल (स्त्री.) १. कूस, काख. '**बगलीत** हात घालून गुदगुल्या कऱ्याले कासाबुडी पटाईत.' '**बगलीतली** काहाळली अन् बाजारात मांडली.' (फा.) २. बाजू. 'बैल संध्याकाळचे पाण्याहून परतत होते म्हातारीने त्यांना **बगल** दिली.' -सेल.१०.

बगलनं (क्रिवि.) बाजूला, वेगळे. 'जाऊ द्या, बरं तुमच्या हातून सडकं वांग **बगलणं** झालं त्याच्यावर तुम्ही ध्यान देऊ नका.' -वा.१०३. 'सरका रे **बगलनं**, या भाबीले आत जाऊ द्या.' -पख.५५.

बगलबच्या (वि.) दुसऱ्याच्या तंत्राने वागणारा. 'मानक्या म्हंजे सरपंचाचा **बगलबच्याच** हाय पुरा.' (फा.)

बगाईत (न.) ओलीत. 'माया घरी दा येकर **बगाईत** अन् बारा येकर कोरळवाहू जमीन हाय.'

बगायती (वि.) ओलीताची- शेती. 'आता काय समदीकडेच **बगायती** जमीन होऊन रायली.' (फा.)

बगारनी (स्त्री.) फोडणी. 'रंगारी मामाले बोलाव येवळ्या लोकाईच्या भाजीले **बगारनी** द्याले.'

बगावत (स्त्री.) बंड, विद्रोह. 'आकोटातल्या कास्तकारईनं अळत्याच्या इरुद्ध **बगावत** केली. येकाची तं गाळीबी पेटोली.' (अर.)

बगाळ (न.) शरीराची एक बाजू, भूज. 'उचल्ता कलोता/ दुखती **बगाळं/** ढगाचे भदाळं वाजतात' -गागा.

बगुला (पु.) बगळा. 'सोंगीढोंगी असल्याने साधूबॉले लोकं **बगुलाभगतच** म्हंतेत.'

बग्गल (स्त्री.) काख, बाजू. '**बगलीत** हात घालून पक्कपक्क वाजोते, नांगो बुडा.' (फा.)

बग्गी (स्त्री.) घोड्यांचा टांगा. 'रंगरावनं वावरात जायाले **बग्गी** केली.' (का.बगि)

बघारनी (स्त्री.) फोडणी. 'निऱ्या **बघारनीचा** वासच इतका ठसकेबाज त भाजी कशी अशीन?' -एक.

बचक (वि.) थोडे, अल्प, मूठभर. 'जैसे बिंब तरी **बचकें** एवढें। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे। शब्दाची व्याप्ती तेणें पाडें। अनुभवावी॥' -ज्ञा.४.२१५. 'रमीनं **बचकभर** कस्तुरी देली. तिले म्हना मा बाई उलच्याकतिलच्याकडे

पाऊ नाई.'

बचकभर (वि.) थोडे. 'कमलीले पीठ मांगावं तं देते **बचकभर** सुमळ्यावानाची.'

बचका (वि.) अल्प, कमी प्रमाणात. 'दडप्यातील भुईमुंगाचं कुटार दोनदोन **बचका** गोऱ्ह्यासमोर टाकलं.' - काळी.१५

बचपना (पु.) पोरकटपणा. 'एवढं वय वाहाळलं पन बाळ्याचा **बचपना** गेला नाई आजून.'

बचबच (स्त्री.) बोलबाला, चर्चा. 'वेटाळात त्या गोष्टीची **बचबच** झालीच.' -रा.१०७.

बचबच (वि.) जास्त, मोठ्या प्रमाणात. 'पिठात केवढं **बचबच** उनोनी टाकलं व बोहारे!'

बचरनं (क्रि.) मधेच काही बोलणे. 'दोघाईच्या मंधात **बचरनं** साजरं नसते बाबू.'

बचरबचर (वि.) जास्त- बोलणे. 'येवळं खुळनं झालं तरमा शांताचं **बचरबचर** करनं जात नाई बयना.'

बचाऊन (क्रि.रूप.) सांभाळून, जपून. 'जाय एकला, पन चोराचिल्टापासून **बचाऊन** रायजो.'

बचाक (वि.) लहान. 'ठेचल्यामुळे बचाकभर तालेवार आंडाची गोटी घोऊन **चिंबल्या** आंब्यासारखी जांघेत संकोचून बसते.' -खुं.४५.

बचाबच (क्रिवि.) खूप, भराभर. 'नदीच्या काठाने भलतीच घाण. लोकांचे **बचाबच** पाय भरायचे.' -खुं.९२.

बचाव (पु.) संरक्षण. 'जागल असली की कोरकू शेगोटी पेटून आपला **बचाव** करतात.'

बचावनं (क्रि.) वाचणे. 'इचूकाट्यापासून कास्तकाराले **बचावनं** पळतेच.'

बचावलो (क्रि.रूप.) वाचलो. 'सरपावर पायच पळत होता थोळशाकनं **बचावलो** बावा.'

बचावेल (क्रि.रूप.) वाचलवलेले, साचवलेले. 'पै-पैसा जमा करून शंभरेक रूपये **बचावेल** आयेत म्या.'

बचासान (क्रि.रूप.) बसाल, बसले तर. 'तुमी गावात ह्या सभा ऐकत **बचासान** तं तिकडी वानरं सम्दं सफाचट करतान.' -खुं.९१.

बचेकुचे (वि.) उरलेले. 'मांगल्ल्या पंगतीत **बचेकुचे** लोकं जेवले.'

बचेलकुचेल (वि.) उरलेले. 'पंगता सरल्यावर **बचेलकुचेल** अनाज गोरगरबाले वाटून द्याव.'

बचोनं (क्रि.) वाचवणे, शिल्लक ठेवणे. 'लगनात लय खर्च **बचोला** बरं तुया.'

बचोयाले (क्रि.रूप.) वाचवायला. 'खर्चापक्षे पैसे **बचोयालेच** पायजे कधीबी.'

बच्चमजी (पु.) तान्हुल्याचे लाडीक संबोधन. 'या **बच्चमजी**, बसा आमच्या मांडीवर.'

बच्चा (पु.) लहान मूल, पिलू, अजाण. '**बच्चा** हायस तू बाबू, तुले नाई कयेत डावपेच.' (फा.)

बच्चू (वि.) लहान. 'तुले नाई कयत बाबू. तू **बच्चू** आयेस अजून.'

बच्या (पु.) दंड. 'हे कांची सांगली तं त्या ते मारली. **बच्या** टाक आता.'

बच्याव (पु.) संरक्षण. 'पोरीनंबी सोताचा **बच्याव** सोता करावं भाऊ, काहाले रातीबेराती हिंडावं.'

बछडा(ळं) (पु.) लहान गोरं, पिलू. 'गाय व्याली. पांढऱ्या शुभ्र सुंदर **बछड्याला** तिने जन्म दिला.' -फीर.१३९.

बजबज (वि.) भरपूर, लदबद. 'अंगावरचे केस कमी एवढं बहुतेकांवर **बजबज** कर्ज आहे.' -पख.९८.

बजा(ज़ा)ळनं (क्रि.) मारणे. 'येवळं वावरात काम आय तरमा दिसत नाई पोट्ट्याले. असं **बजाळनं** पळते की बसं.'

बजार (पु.) १. बाजार. 'भरल्या **बजारी** जाईन मी' - जनाबाई २. गोंधळ. 'पारावर गावातल्या लेकरईचा **बजार** भरला होता.'

बजारहाट (पु.) बाजार वगैरे. 'हाटा बाजारासी जाय।' - नाथ.१२९०. 'सुक्करवारी **बजारहाटाले** माळेगावले जा लागते.'

बजावनं (क्रि.) १. वाजविणे. 'नवरदेव जानोस्यावर आला अन् मांगाईनं डफळे **बजावनं** लावले.' २. मारणे. 'लोकाईच्या अंबराईतून आंबे चोरसाल तं कोनी **बजावनं** चालू केलं तं सांगू नको.' ३. ताकीद देणे. 'तरी म्या शामाले **बजावून** सांगलं होतं, हे वागनं बरं नाई.'

बजावेल (क्रि.रूप.) इशारा, समज देऊन. 'भलतेसलते नखरे ना पायजे. म्या त्याले आंधीच **बजावेल** आय.'

बजेट (पु.) अर्थसंकल्प. 'देशाचं **बजेट** असते ना तसंच घराचबी पायजे राजा. निऱ्हा खाऊन गांडीले हात पुसनं काय कामाचं.' (इं.)

बज्जड(ळ) (वि.) १. धार बसलेले. 'हे वांगे द्या चिरून एवढ्या **बज्जड** पावशीनं मले नाईत चिरता येत.' - ना.१२५. २. संवेदनाहीन. 'तेच ते ऐकून तुमचं डोक्स **बज्जड** झालं नाही काय?' -ना.१८.

बज्जात (वि.) १. बदमाश. 'हे इमली लयच **बज्जात** आये लौंडी.' २. हलक्या जातीचा.

बज्याळनं (क्रि.) मार देणे. 'काई बोलता काय हो? पोट्टे **बज्याळतीन** ना तुमाले.'

बट (स्त्री.) १. केस, लट. 'पोरीच्या **बटा** पाहूनच कयते पोरीची चाल कशी हाय ते?' २. वरण शिजविण्याचे भांडे. 'दाय शिज्याले भगुन्यापक्षे **बटच** साजरा रायते.'

बटकी (वि.) क्षुद्र, क्षुल्लक अर्थाची शिवी. 'मनूनच **बटकीचीनं** आत्ता आपल्याले पखाल मांघतली नाही.' -पख.२५. 'आरं बुहार **बटक्यायहो**, मपला जयताळा कावून करता रे?' -त.१२८.

बटकुरा (वि.) लहानसा. 'उभा जन्म का ह्या भकास गावात अन् अशा **बटकुऱ्या** धंद्यात घालवू का.' -खुं.१७२.

बटक्या (वि.) एक शिवी- खालच्या जातीचा ह्या अर्थी. 'मायच्या हांडीचं राजकारण करते. गद्धडीच्यानं सरपंच व्हयासाठी या **बटक्या** लोकायले उरावर बसवून घेतलं.' -पख.१३.

बटक्याखानीची (वि.) एक शिवी. 'अरे त, ते **बटक्याखानीची** आपलं घर निंघतो मंते!' -पागो.६८.

बटन (न.) गुंडी. 'मनील्याचं **बटन** तुटलं. हे घे, दे बरं लावून.' (पोर्तु.)

बटबट (वि.) खूप, फार. 'चिखोलात हात पाय कसे **बटबट** भरोले.' २. असुंदर. 'रंगारूपानं पोर बरी आये पन तिचे डोये निऱ्हा **बटबट** आयेत गळ्या.'

बटलं (न.) लहान तेलाचे भांडे. 'हरेकाच्या घरी जेवताना तेलाचं **बटलं** म्होरं रायतेच.' -दि.१०.

बटल(लो)ई (स्त्री.) चरवी, पाणी तापविण्याची तपेली. 'चूल पेटवली. चुलीवर **बटलोई** ठेवली.' -ना.१४०.

बटवा (पु.) पिशवी. 'आजी, तुया **बटव्यातली** चिकन सुपारी देनं वऽऽ.' (का.बटवे)

बटवाई (स्त्री.) वाटणी. 'जमत नसीन आपसात तं **बटवाई** करून टाका भॉ भॉची.'

बटवाडा(रा) (पु.) वाटणी, वाटप. 'कालच दोघा भावाचा **बटवाडा** झाला.' (हिं.)

बटा (संबो.) बेटा, पोरी. 'मोठ्याईचं आईकलं पायजे **बटा** समजलं?'

बटाई (स्त्री.) अर्धा वाटा, भागीदारी. 'पुढच्या वर्षी त्याचंच वावर करतो **बटाईनं**.' -ना.१०२.

बटेर (न.) एक रान पाखरू. 'काकाले तितरं, **बटेर** खाचा भल्ला नांद.'

बटोये (स्त्री.) गव्हाचा एक पदार्थ. 'उनायात **बटोये** करून ठुले का पोट्टेईले करून द्याले बरे होतात.'

बट्टा (पु.) कलंक. 'साजऱ्या पोरीले **बट्टा** लावला उबाऱ्यानं.' -ना.९९. 'रंडकीच राहून जाते **बट्टा** लागली बाई.' -ऊ.३१.

बट्टी (स्त्री.) वडी. 'धुपदिप, पंचारती, कापुराची **बट्टी**, उदबत्ती लावली, मनानं भरारी मारली.' -रूख.५.

बठा(ठ्या) (वि.) १. बसणारा. 'घरचं चांगलं गोरं इकलं अन् हे **बठ्या** बैल घेऊन आला.' २. ऐदी. 'येक भाऊ लय कामाचा हाय अन् येक तं निऱ्हा **बठ्याच** हाय राजा?'

बठी (वि.) बसून राहणारी, आळशी. 'सूनवायरी तरतर पायजे, **बठी** काय कामाची व?'

बठूर (वि.) निब्बर, राठ. 'बैलाला आरुनं टोचल्यानं त्याच्या शरीरावर गाठी चढल्या **बठुर** झाल्या.' -काळी.१०७.

बठ्ठुर (वि.) जरड, कुचर. 'काल रातीच तुरी भिजू घातल्या. काई दाने **बठ्ठुर** असल्यानं भिजले नाईत.'

बठ्ठुल (न.) वस्तूचा गठ्ठा असलेली पुडी. 'बांडीसाच्या खिशातील पानाचं **बठ्ठुल** चाचपून पाहिलं.' -काळी.१३.

बठ्ठुस (वि.) बसक्या आंगाचे. 'म्हैस उच्चीपुरी नाई, आय जरा **बठ्ठुसच**.'

बडगं (न.) ऱ्हास. 'आपल्या धंद्याचं **बडगं** बसते का काय?' -त.१५५.

बडगर (न.) तुकडे. 'या डायऱ्यात इटाचे **बडगरं** टाका लागतेत.'

बडगा (पु.) १. मारण्याचे साधन. 'घी देखा मगर **बडगा** नही देखा बे.' २. नागपूर भागात पोळ्याचा एक विधी. 'तान्या पोळ्याले **बडगा** काहाडते तवा मनते-माह्या कुशा रोगराई घेवून जा रे **बडग्यो**.' -दि.७२. (का.)

बडदास(स्त) (स्त्री.) चांगली व्यवस्था. 'इनइवायाची साजरी **बडदास** ठेवजा बरं लेकहो.' (फा.)

बडबड (स्त्री.) विनाकारणचे बालणे. 'काहाची **बडबड** लावली कालपासून, कोनी काई म्हनत नाई तं निऱ्हा घनघनीच लावतं काय?' (त.वळवळप्पु)

बडबडी(ड्या) (वि.) फार बोलणारा(री). '**बडबड्या** मान्सावर काहाले भरोसा ठेवावं.' 'सुमी **बडबडी** असल्याच्यानं तिच्या पोटात काई रायत नाई.' (त.वायाडि)

बडवनं (क्रि.) १. वाजविणे. 'नंदी झुलतात वाजतात ते घाटरू/ मले भास होते जसा **बडविती** ते डमरू.' -सित.२५. २. मार देणे. 'आयके ना त पोट्टं साजरं **बडवून** काहाळलं.'

बडवाचा (क्रि.रूप.) वाजवायचा. 'शेतकरी मेल्यावर ढोल नसते **बडवाचा**/उंदराच्या कातळ्यानं नगारा काय मडवाचा.' -जां.१७६.

बडवाले (क्रि.रूप.) १. मारायला. 'दांडगट पोट्टे भल्ले **बडवाले** पायजे सायाचे.' २. वाजवायला. 'किसनाभाऊ ढोल **बडवाले** एक नंबर आये.'

बडा (वि.) मोठा. 'शामराव पाटील तं **बडा** असामी हाय

राजा.' 'एक होता राक्केस, एक होता **बडा** बाक्केस.'

बडाबाक्केस (पु.) मोठा राक्षेस. 'बाबू झोप नं, लय रात झाली रे. नाईतन **बडाबाक्केस** ईल बरं.'

बडी (वि.) मोठी. 'नांगोराव सदाकदा **बड्याबड्या** बाता मारत रायते.' 'च्या पाजनं हे काय मोठी **बडी** बात आय हो?'

बडोनं (क्रि.) १. मारणे. 'बाप दारू पिऊन झोपला, असा **बडवा** की त्याच्या बापाच्या बापानं पाहिलं नसील.' -अखे. २. वाजवणे. 'झिंग्या मांगानं घाईघाईत सनईचौघडा **बडोला**.' -काळी.९०.

बडोयाले (क्रि.रूप.) बडवायला, ठोकायला. 'खयात कन्सं **बडोयालेच** त दुपार झाली मले.'

बड्डुं (वि.) बरड जमीन. 'बैल देले सोळून **बड्डावर** चऱ्याले.' (का.)

बढ (स्त्री.) वाढ. 'कापसाच्या भावात **घटबढ** सुरूच रायत असते.'

बढत (स्त्री.) प्रगती. 'तीन वर्स झाले पन कमाईत काई **बढत** होयेल नाई.'

बढती (स्त्री.) पदोन्नती. 'चपरासी होता तं आता बाबू म्हनून शालक्याले **बढती** भेटली.'

बढाई (स्त्री.) १. बडेजाव, फुशारकी. 'जे हाय ते सांगावं मान्सानं, **बढाई** करूनबी लोकाईले कायी समजत नाई काय.' (का.बडायि) २. 'काही नाही शेतीची **बढाईच** जास्त घडाईपेक्षा जशी मढाईच जास्त.' -मिए.१५९.

बढूनचढून (क्रिवि.) मोठी, विस्तार करून. 'मामुली गोठी पन **बढूनचढून** सांगावं नांगोरावनंच.'

बढोत्री (स्त्री.) वाढ. 'या हप्त्याम्दी जवारीच्या भावात बरीच **बढोत्री** होयेल आये.'

बढ्याचढ्या (वि.) वाढत्या. 'घरात नाईत वड्या अन् बाता **बढ्याचढ्या**.' 'आंधी ना घेतल्यानं आता **बढ्याचढ्या** भावानं सारकी घ्या लागली.'

बतकऱ्यावानाचं (वि.) एक शिवी- निकम्मेपणा. 'काई कामधाम काऊन नाई करत काऱ्ह **बदकऱ्यावानाचं**?' -खुं.१८६.

बतरा(ला)वनं (क्रि.) वेडगळ वागणे. 'असा **बतलावल्या-वानी** काहून करत बे? दिवसभर उनातानात भंटोला-वानी फिरतं अन् राती बतलावतं.'

बतायेल (वि.) वेडसर. 'पोरगा तं **बतायेल** दिसून रायला. जेवते खावते बरोबर?'

बताल (वि.) बेताल, लबाड, लुच्या. 'आमच्या घरची त **बतालच** आये.' -ना.७. 'काय हेच गाय **बताल** हाय? घरी ढोरं हात त्याले आईकनं पळते.' -फीर.१४१. (अर.)

बतावनी (स्त्री.) सोंग, नाटक. 'पोट दुख्याची **बतावनी** करून ते काम टायत रायते.'

बत्तर (वि.) निकृष्ट, निरुपयोगी. 'अशा भलकाईच **बत्तर** गोठी नको करत जाऊ गळ्या.' (फा.बदतर)

बत्ता (पु.) मुसळी. 'मिरीचा संसार म्हंजे खल आये त **बत्ता** नाई, बत्ता आये त खल नाई.'

बत्ता(त्ती)सा (पु.) साखरेचा एक गोड पदार्थ. 'दिवाईसाठी लाया, **बत्तासे** इकत आनले आकोल्यातून.' (का. बत्तासु)

बत्ती (स्त्री.) गॅसबत्ती, दिवा. 'गावात दंढार होय तं **बत्त्याच** लावत असत पयले.'

बथ्थळ (वि.) १. टणक. 'हरबऱ्याचं वावर **बथ्थळ** असल्यानं नांगरटीच घाला लागते वाट्टे वावरात.' २. धार गेलेले. 'इंधन फोळू फोळू कुऱ्हाळ लयच **बथ्थळ** झाली.' 'भांडूभांडू डोक्सं **बथ्थळहून** गेलं माहा.'

बद (वि.) आवाज न करणारा. 'हा रुपया **बद** आये, आपटला तरी आवाज नाई करत.'

बदकन (अ.) एकदम, धपकन. 'चालता चालता काकी **बदकन** पळ्ळी राजा.'

बदकाड(ळ)नं (क्रि.) मारणे. 'गवगवा केल्यास **बदकाड्याची** धमकी पोरांना द्यायची.' -धग.५.

बदकिस्मत (वि.) दुर्दैव. 'आपून कितीबी आपटूआपटू टोले घ्या **बदकिस्मत** असली का सरकच होत नाई, राजा.' (फा.अर.)

बदचलन (वि.) दुराचारी, वाममार्गी, व्यभिचारी. '**बदचलन** बाई भेटली का कामधाम सोळून तिच्यावरच राखन रा लागते.' (फा.हिं.)

बदजात (वि.) पाजी, अकुलीन, लबाड. 'नईनवाळी सून आये पन लय **बदजात** आये गळ्या.' (फा.अर.)

बदडनं (क्रि.) मारणे. 'गुरूजी रागंरागं वर्गात आले अन् मलाच **बदडनं** लावलं.' -गय.

बदतमीज (वि.) अशिष्ट, असभ्य. 'आपून **बदतमीज** मान्साच्या सावलीतई उभं राऊ नाई.' (फा.अर.)

बदनजर (स्त्री.) वाईट नजर. '**बदनजर** होऊन त्याच्या पोटात जहर उतरले हे मंजुळाने ताडले.' -कात.६९.

बदनाम (वि.) कुप्रसिद्ध, निंदित. 'साता गावात **बदनाम** होयेल हायस बे तू नाक नको लाऊ.' (फा.)

बदनामी (स्त्री.) कुप्रसिद्धी. 'तू बनेल खे बिगळू नोको अन् समाजात माई **बदनामी** करू नोको.' -सित.१५०.

बदफैली (वि.) व्यभिचारी. 'मानूस तं लयच **बदफैली** दिसून रायला, निऱ्हा घरातल्या बायाईच्या थुथराकळे पाहून रायला.' (फा.)

बदबद (वि.) भरपूर, सारखे. 'गाईसी देखोनी **बदबदा** मारी। घोड्याची चाकरी गोड वाटे॥' -तुका.३८१६.२. '**बदबद** मुसयधार बाजूच्या शिवारात/ थेंब नाही एखादा अलीकडं आवारात.' -मिए.१७०. '**बदबद** आंगावर घेतो डंकिनीचं पानी.' -मा.४.

बदंबदं (वि.) जास्त, खूप. 'पिकही तवा म्हणान असं **बदंबदं**/ कोनी नाही रडे सारे हासे **खदंखदं**.' -मिर्झा.३८

बदमाशपना (पु.) बदमाशी. 'येटायातल्या येटायात **बदमाशपना** काहाले करता राजा.'

बदमास (वि.) वाईट, गुंड. 'शायन्या मान्साच्या लाथा खाव तरमा **बदमासाच्या** जवळबी नाई बसाव.' (फा.)

बदमासी (स्त्री.) वाईट कृत्य. 'मले हो हो म्हटलं अन् मायासंगं **बदमासी** करून टमक्याले वावर इकलं लेका.'

बदरा (पु.) पैशाची पिशवी. 'मग कुणी सावकार **बदराभर** रुपये घाट बांधण्यासाठी देऊ लागला.' -संगा.५२.

बदल (पु.) परिवर्तन, फेरफार. 'घरात लय **बदल** होयेल दिसून रायला अपके.' (फा.अर.)

बदलबादल (स्त्री.) एका जागी दुसरे. 'लग्नाच्या गर्दीत माहा जोळा **बदलबादल** होयेल दिसते.'

बदला (पु.) सूड, भरपाई. 'बराबर दोघाचं भांडन जुतून **बदला** घेतला लेकाचा.' (फा.)

बदलाबदल (स्त्री.) एक घेऊन दुसरे देणे. 'दोघाईनं त्याईचे वावरं **बदलाबदल** केले. याचं त्याले. त्याचं याले.'

बदलामी (स्त्री.) अपकीर्ती. 'लफडं करसाल तं **बदलामी** होईल ना भाऊ.' (फा.)

बदलायलं (क्रि.रूप.) बदलत आहे. 'माणसाची नियत **बदलायली** तसा निसर्गसुद्धा **बदलायला**.' -वा.१०१.

बदली (स्त्री.) १. ढगाळ. 'दोन दिवसापासून **बदली** हाय तरमा पान्याचा थेंबबी पळून नाई रायला.' २. स्थानांतर. 'भलत्या ठिकानी **बदली** झाली. आता करा अपडाऊन.' (फा.)

बदलेल (क्रि.रूप.) बदल केलेले, झालेले. 'हे माहं आंगरखं **बदलेल** दिसून राह्यलं.'

बदलोत (क्रि.रूप.) बदल करीत. 'लोकं कोर्टात देल गवाई **बदलोतच** रायतात.'

बदलोयाले (क्रि.रूप.) बदल करायला. 'पांडेबॉले रेकाड **बदलोयाले** कोनं तरमा नख्खीच भाग पळेल दिसते.'

बदलोलं (क्रि.रूप.) बदलवले, पलटले. 'कोर्टात उत्तम्यानं त्याचं बयान **बदलोलं**.'

बदल्याले (क्रि.रूप.) बदलायला. 'धुळ्यानं कपळे लय गादले, **बदल्याले** पायजात.'

बदवकऱ्या (वि.) गैर लागू, अवाजवी बोलणारा. 'निरा **बदवकऱ्यावाणी** बोलत राह्यतात मेले.' -बा.९५.

बदसल्ला (पु.) चुकीचे मार्गदर्शन. 'कोनाले असा **बदसल्ला** काहाले देता राजा, चांगलं सांगावं मान्साले.'

बदसुरत (वि.) कुरूप. 'काईकाई बायका **बदसूरत** असतात पन कामाले काटक.' (फा.)

बदसूर (वि.) आवाज चांगला नसलेला. 'जील ओळनारेच **बदसूर** होते. मंधातच टेंबलत लेकाचे.'

बदहजमी (स्त्री.) पचन न होणे. 'वैनी, मले आता सुखाची **बदहजमी** होऊन राह्यली.' -मोती.

बदहाल (स्त्री.) दुरावस्था. 'म्हतारा **बदहाल** पळेल आये घरात कईचा.'

बदळनं (क्रि.) मारणे. 'कान धरून आनला, शेपूट धरून **बदळला**.'

बदाड (न.) शेताचा खोलगट भाग. 'बायाले सरसर मुठी चालवा म्हना, **बदाडात** वळ्ं हाय तिथीसा सरत्यावर ध्यान ठुवा म्हना.' -दि.६८.

बदाबद (क्रिवि.) सारखे. 'पाय घसरून लोकं **बदाबद** पळ्ळे उतारीवर.'

बदाबदा (क्रिवि.) जास्त प्रमाणात. 'डांग हालोली तं **बदाबदा** बोरं पळ्ळे खाली.'

बदालकन (क्रिवि.) पडण्याचा आवाज, एकदम. 'पाय घसरल्यानं आजी **बदालकन** खाली पळ्ळी.'

बदाळत (क्रि.रूप.) मारठोक करीत. 'बायकोले हरदम **बदाळत** रायनं बरं दिसते का बाई, तूच सांग.'

बदाळनं (क्रि.) मारणे. 'उनात पोट्टं दिसलं का **बदाळनं** चालू करतो आपून.'

बदाळो (क्रि.रूप.) मारत असो. 'घरी आलो म्हून ताव ना काळो तो मांगलचा, मले **बदाळो** ना अठी आलो तं.' -सित.८५.

बदाळ्याले (क्रि.रूप.) मारायला. 'त्याईले येऊ दे घरी, तुले **बदाळ्यालेच** लावतो साजरं.'

बदी (स्त्री.) १. वाईट वृत्ती, कपट. 'देवरामच्या घराची आपल्यावर पयलमपासूनचं **बदी** हाय.' २. आळ, बदनामी. 'मनी नाई नादनं न दादल्यावर **बदी** आननं.' (फा.)

बदोकरी (स्त्री.) चहाडी, बदनामी. 'काही जणांना सुनेचा वा सासूचाही काही दोष नसताना **बदोकरी** करायची आदत असते.' -पख.४८.

बद्दल (स्त्री.) १. ढगाळलेले. 'आज **बद्दल** असल्यानं लय गरमास हून रायली.' २. च्यासंबंधी. 'कोना **बद्दल** आपून काहाले खराब बोलावं?' (फा.)

बद्दी (स्त्री.) बदनामीची पाळी. 'साजरी रायजो. आमच्यावर **बद्दी** ना आली पायजे.'

बद्दू होनं - कलंक, डाग लागणे, बदनाम होणे. 'साऱ्या गावात लफळेलपनापायी लेकाचं नाव **बद्दू** होयेल आये.'

बधनं (क्रि.) जुमानणे, सांगितलेले मान्य करणे. 'बाइ आता हा तुमते न **बधी** होः' -ली.३३९. 'पुष्कळ लुंघळलांघळ केली पण कलावती **बधेना**.' -काळी.७८. 'गावात गोप्या कोनालेच बधत नाई.'

बनगिधनगर (पु.) धनगरातील एक जात. 'बकऱ्यामेंढ्या घेऊन उनायात **बनगिधनगर** येतात वावराईनं.'

बननं (क्रि.) १. पटणे. 'शेजाऱ्याचं आपलं लय रोजापासून बनत नाई.' २. होणे. 'हे काम **बननं** ना **बननं** काय आपल्या हातात आय?'

बनवाबनवी (स्त्री.) फसवणूक, बहाणेबाजी. 'शालक्या **बनवाबनवी** कऱ्यात पयला नंबर.'

बनात (स्त्री.) पांघरलेले कापड. 'रंगीत पलंगाला हिरवे गात, रेशमी नोवारीवर उदी **बनात** होती.' -कात.५२४.

बनाव (पु.) कट. '**बनाव** करनं अन् लोकाईले फसोन्याचं काम हाय भाउराव तुयं.'

बनेन (स्त्री.) बनियन. '**बनेन** म्हंसान त भोकं पळूनपळून चायनी होयेल.' -धुम्म.

बनेल (वि.) टग्या, बेमुर्वत. 'मोत्या पक्का **बनेल** मानूस आय, तो काय हातात येते कोनाच्या.'

बनोनं (क्रि.) १. तयार करणे. 'तो चहा **बनोतेई** असा फसकलास की इचारू नका.' -धुम्म. २. फसविणे. 'कितीकई हुशार मानूस आननं मन्या **बनोतेच** बराबर त्याले.'

बनोयाले (क्रि.रूप.) १. तयार करायला. 'शंभर मान्साईचा सयपाक **बनोयाले** आचारी काहाले पायजे राजा.' २. फसवायला. 'मले **बनोयाले** पायतं का तू हरामखोरा?'

बनोयेल (क्रि.रूप.) १. तयार केलेले. 'सयपाक तं सकाऊनच **बनोयेल** हाय, तुमचीच तं वाट पाहून रायलो.' २. फसवलेले. 'मानक्यानं गोळ बोलून कईकाईले **बनोयेल** आये.'

बनोलं (क्रि.रूप.) १. तयार केले. 'हाळाचे काळ करून लेकराले सायब **बनोलं**.' २. फसवलं. 'म्या दिलप्याले यू **बनोलं**. बस म्हना बोंबलत.'

बन्यान (स्त्री.) बनियन. 'एवढी **बन्यान** फाटली, आंग दिसते अवघं त्यातून.'

बन्शी(न्सी)गहू (पु.) गव्हाची एक जात. 'महा येवळा जेलम गेला पण **बन्शी** गव्हाशीवाय दुसऱ्या गव्हाची कव्हा पोळी म्या खाल्ली नाही.' -वा.१०१. '**बन्सीगव्हाच्या** रंगालाही लाजवील अशी शरीराची पिवळी कांती होती.' -कात.१३.

बफरनं (क्रि.) चिडणे. 'बाप रातदिवस **बफरते** म्हनून मंग असं दारू पेनं वावरातनी चालते.'

बफरेल (वि.) रागावलेले, चिडलेले. '**बफरेल** मायबापाच्या नांदी लागल्यापेक्शा घराच्या भईर जानं पुरते.'

बम(म्म) (वि.) पुष्कळ. 'मार खाल्यानं तो कन्हारत होता. पाय हत्तीच्या पायावानी **बम** सुजला होता.'

बय (स्त्री.) बाई, स्त्री, आजी. 'म्हंतात ना, बय गेली अन् **बयची** वाकयई गेली.'

बयकट (स्त्री.) मजबूत, पक्के. 'धरुनी शंभूची जट, गळ्याला बांधली **बयकट**.' -लोक.८२. 'त्या अज्जात म्हसीले **बयकट** बांधजो बापा.'

बयकनं (क्रि.) बिघडणे. 'जियें नानार्थरसें रसाळे। **बहकाते** आहाती परिमळें। भावाचेंनि॥' -ज्ञा.७.१८६.

बयकबायक (न.) बिघडणे. 'सुदराले काई नाई तरमा दुसऱ्याची वस्तू **बयकबायक** झाली तं काय करावं बाप्पा.'

बयकला (क्रि.रूप.) बिघडला. 'एकुलता एक पोरगा पन सून आलीना आली पोरगा **बयकला**.' -सुखो.१०.

बयकाले (क्रि.रूप.) बिघडायला, विचकायला. 'बाबू **बयकाले** जान्याची संगतच भोयली.'

बयक्याले (क्रि.रूप.) बिघडायला. 'मानसाले **बयक्याले** काय टाईम लागते.' -ना.७४.

बयकू (न.) मापूल, मातीचे छोटे भांडे, बोळके. '**बयक्याची** तिनं घातली उतरंड.' -भू.

बयकून (क्रि.रूप.) बहकून. 'कसे **बयकून** गेले तुहे सूर तुहे ताल/ माह्या होटाले डसले आज भैरवीचे बोल.' -नांबै.

बयकेल (वि.) बिघडलेले. 'पोरगं तं लयच **बयकेल** निंगल राजा. दारूबी पेते, गंजिफाबी खेयते.'

बयकोनं (क्रि.) बिघडविणे. 'कोनाचं घर पुळे जाताना दिसलं का त्याचं पोरगं **बयकोनं** चालू होते गावातनी.'

बयखट (स्त्री.) बैठक, बसण्याची खोली. 'गोपाले धाळून दे. **बयखटीतून** म्होटे बाचा आवाज आला.' -सित.८५.

बयखट (वि.) मजबूत, पक्का. 'खुट्याले बैलाचा दोर **बयखट** बांधजो.'

बयगान्या (वि.) नेभळट, बावळट. 'कास्तकारीतबी हुशारी पायजे. **बयगान्याचं** काम नाई रायलं ते.'

बयगुनं (न.) गंज. 'ते भाजीचं **बयगुनं** आन व इकळे.'

बयठक (स्त्री.) बसण्याची खोली. '**बयठकीत** गाद्या टाकून पावनेईची तयारी केली.'

बयतन (न.) इंधन, सर्पण. 'कालपास्रं मले त **बयतन** नाई सापळलं. माई चूल नाई पेटली.' -काळी.८.

बयद (न.) बळद, घरातील एक खोली. 'आठ वखरं अन् आठ जुवं काहाळा आपल्या **बयदातून**.' -सित.१२४.

बयना (संबो.) बाई, बहीण या अर्थी स्त्री संबोधन. 'जुटलं बिचारीच लगन. बरं झालं माय. हो **बयना**.' -लेक.३८.

बयनोई (पु.) बहिणीचा नवरा. '**बयनोयाचा** कुठीसा अपिमान होवो ना म्हनून मले बलायाच्या फाकात पळत नाई तो.' -सित.२३.

बयरा (वि.) बहिरा. '**बयरं** म्हन्ते वाजते काय अन् फुटकं म्हन्ते नाचते काय?'

बयरीजनं (क्रि.) संवेदनाहीन, जड होणे. 'माहे हात किनाई त **बयरीजल्यावानी** लागते.' -धग.१२८.

बया (स्त्री.) बाई, स्त्री. 'शेजलची **बया** का गरीब हाय काय? निन्हा इस्तोच आय म्हन.'

बया (वि.) उगाच, खोटे. 'पोट्टे मांगतात दूध दई माय लावते **बयाच** रई.' -काया. 'कोनी भंग कोनी दंग तू तं **बयाच** हासली परदुनी.' -नांबै.

बयादाटून (क्रिवि.) विनाकारण. 'यासाली लगन जमतच नाई. **बयादाटून** जबरदस्ती काहाले करावं.' -लेक.२. 'दिलप्या मायांसंगं **बयादाटून** खेटे घेते.'

बयान (पु.) कथन, जबानी, विवरण. '**बयानात** खोटी नस्ती बोल्ली मी त गेल्ता ना तू बाराच्या भावात.' -पोळा. (अर.फा.)

बयाबया (अ.) १. खोटे खोटे, उगीच. 'तुमी मासोया खाल्या म्हंतात? खुरूमुरू का **बयाबया**?' -काळी.४७. २. जरासुद्धा, जराही, गंमत म्हणूनही. 'मोठ्या वाड्याचा आसरो लाभला आन् तिनं तो दाठ्ठा धरला तिथून **बयाबया** हटली नाही.' -लेक.२६.

बयेकबायेक (न.) बिघाड झालेले. 'होतं काम बोहाऱ्यानं **बयेकबायेक** करून टाकलं.'

बरं (वि.) स्वस्थ, चांगले. 'पोरीचं लगन झालं ते बरं झालं बापा. आजीले **बरं** नाई हप्याभऱ्यापासून.'

बरकत (स्त्री.) भरभराट, कमाईत होणारी वाढ. 'कामाचा हंगाम म्हणजे आपल्यावाल्या गरिबाईची **बरकत**.' -आ.४२. (फा.अर.)

बरगंड (न.) भार, ओझे. 'लय उलाय जाते, इतकी **बरगंड** नोका देऊ मले.' -भं.१२०

बरगांड (स्त्री.) संकट, आफत. 'सरकारचा खिसा झाला म्हन्ते खाली/ **बरगांड** त्याची मातर आपल्यावर आली.' -जांग.८२.

बरड (पु.) माळरान. 'आता थोडं रायलं बाबू हा **बरड** वलांडला की आलं आपलं गाव.' -धग.१७.

बरडनं (क्रि.) झोपेत, नशेत बडबडणे. 'मदिरा न घेतां डुले। सन्निपातेंवीण **बरळे**।' -ज्ञा.१४.२५२.

बरडी (स्त्री.) बरड, माळरान. 'पुराने **बरड्या** वाहून खोल दरड्या पडल्या.' -कात.२५.

बरतन (न.) भांडे. 'जुनेपुराने **बरतन** आयत ते इकून टाका लागतात.'

बरताव (पु.) वर्तन, सवय. 'एकदा **बरतावा** झाला की मंग काई वाटणार नाई.' -ल.१४. 'सुनबाईच्या **बरतावाले** काय पाहा लागते. एकदम मानमानुसकीचा.'

बरदास (न.) सहन. 'आपल्याले काई कोनाची वाईट गोठ **बरदास** होत नाई राजा.'

बरदास्त (स्त्री.) आतिथ्य, व्यवस्था. 'सोयरीकच्या पावन्याईची **बरदास्त** ठेवाच लागते साजरी.'

बरनी (स्त्री.) भरणी. 'देशाचं लोणचं झालं देशाची **बरनी**.' -मिए.५४. (का.बरणि)

बरपूनचरपून (क्रिवि.) ओरबडून. 'तोंडाकडे पाहावसं वाटत नाही. कसा आतला आत बरपून **चरपून** घेतल्यासारखा झाला.' -पख.१३९.

बरफ (न.) बर्फ, हीम. 'आपल्या अती गारगोंड होते. **बरफ** नाई पळत कधीच.' (फा.)

बरबटी (स्त्री.) एक धान्य- चवळी. 'वावरातनी **बरबटी** पेरली त बजारातून इकत आन्याचं काम नाई पळ्ळं.'

बरबाद (पु.) नाश, उध्वस्त. 'जी हुजूर म्हणत ज्यांच्या पिढ्यानपिढ्या आतापर्यंत **बरबाद** झाल्या ते आता वरचढ म्हणवणाऱ्याच्या मांडीला मांडी लावून बसू लागले.' -वा.१८१. (फा.)

बरबादी (स्त्री.) विनाश. 'कोनाची दीठ झाली म्हनाव अन् अशी **बरबादी** झाली सबन.' -डेबू.३०. (फा.)

बरंवाईट (न.) चांगलेखराब. 'कोनाबद्दल **बरंवाईट** बोल्याले कोनं सांगलं बे तुमाले?'

बरसकाला (पु.) पावसाळा. '**बरसकाला** झाला का मुंग येतात तोळ्याले.'

बरसनं (क्रि.) वर्षाव होणे. 'राती जमके पानी **बरसलं**.'

बरसली (क्रि.रूप.) तुटून पडली, चिडली. 'कप फुटला तं आत्या मायावरच **बरसली**.'

बरसात (स्त्री.) पाऊस, पावसाळा. '**बरसातीच्या** अखंड वर्षावाने हातचा नांगर सुटला.' -भीक.१३. (फा.)

बरसेल (क्रि.रूप.) पाऊस पडलेला असणे. 'सकाऊनच पानी **बरसेल** हाय लेक.'

बरळ (वि.) हलकी जमीन, बरड. '**कुसळे** कोरडी। वारेनि

जाती बरडी।' -ज्ञा.१३.५६६.

बरळनं (क्रि.) बडबड करणे. 'सांडावी हे भीड अधमाचे चाळे। मद्यपीर **बरळे** भलत्या छंदें॥' -तुका.४०२५.१.

बरा (वि.) चांगला. 'बरवा बरवा रे देवा तू।' -तुका.६७८. 'औंदा हरबरा **बरा** झाला.' 'तो आताआता बिमारीतून बरा झाला.'

बराबर (वि.) समान, सारखा. 'सोयरा **बराबरीचा** पायजे, कोनीबी अलताभलता नाई पायजे राजा.' (फा.)

बराबरी (स्त्री.) सारखेपणा. 'देशील देवा सोनंतानं **बराबरी/** सोनं ठुतो खाली, तानं घेतो मांडीवरी.' (फा.)

बरास (वि.) खोदाई, भराईचे दहाबाय दहाचे माप. 'दहाबाय दहाची पुरी झाली **बरास**.' -मिर्झा.११६. 'कामावरची माणसं **बरासामागून** बरासा माती खोदत होती.' -सि.९८.

बरोबर (वि.) १. सोबत. 'तू माया **बरोबर** चाल बजाराले.' २. योग्य. 'तू बोल्ला ते **बरोबर** बोल्ला राजा.' (फा.बराबर)

बरोबरी (स्त्री.) समानता. 'काल तुया लेकरानं मारलं आज माया लेकरानं मारलं आता भांडू नको मायमावले **बरोबरी** झाली.' 'गरिबाकून मोठ्याची काय **बरोबरी** होते.' (फा.हिं.बराबरी)

बर्ताव (पु.) वर्तन. 'घरी आला त नवऱ्याचा **बर्तावई** असा की, कामाले दंदी अन् खायाले आंदी.'

बर्बर (वि.) बरोबर. 'मायनं सेन आन्याचं म्हंता **बर्बर** पयतच सीली बाहीर गेली.' -सित.३०.

बर्राड (न.) संकट. 'घरी तीस पस्तीस एकर जमीन असली की येऊ देनं कोन्चबी **बर्राड**.' -पोळा.

बलबल (वि.) सट, पुष्ट, तरुणी बद्दलचे एक संबोधन. 'काय पोरगी होती लेका? बाप रे **बलबल** होती.'

बलबल (क्रिवि.) रूप, तारुण्याचे प्रदर्शन. 'आजकाल हे पोरगी लयच **बलबल** करून रायली गळ्या.'

बलवनं (क्रि.) बोलाविणे. 'उटनं कऱ्याले **बलवला** म्हाली.' -लोक.१५०.

बलवले (क्रि.रूप.) बोलाविले. 'सारे लोकं एका जागी **बलवले /** वावरात पसरले ढोरं सारे कलवले.' -मिर्झा.१४३.

बला (स्त्री.) संकट, आपत्ती. 'भलत्या बाईसंगं **बोल्लं** का नस्तीच बला येते.' (फा.अर.)

बलाऊन (क्रि.रूप.) बोलावून. 'माया भावाले अठी **बलाऊनसन्या** हा नीर बसोल्याबिगर रायनार नाई मी.' -सित.६५.

बलामत (स्त्री.) संकट. 'घर पुसत एखांदी **बलामत** आली तर काय करावं मंग?' -रा.२२१.

बलाय (वि.) निःसत्व, बेचव. 'कुतळ्ळं काहीबी **अलायबलाय** खात रायते.' (अर.)

बलायाले (क्रि.रूप.) बोलवायला. 'बाबाले **बलायाले** चाल्लो मी देवळात.'

बलायेल (क्रि.रूप.) बोलावलेले. 'पर्वा म्या पावने **बलायेल** आयेत पोरगी पाह्याले.'

बलाव (क्रि.रूप.) बोलव. 'सुमे जाय मायले **बलाव** पटकन. पावने येऊन राह्यले तुले पायाले.' -तित.७६.

बलावनं (क्रि.) बोलावणे. 'बा तुले **बलावनं** आलं वाळ्यातून.'

बलावलं (क्रि.रूप.) बोलाविले. 'लहानी माय व, मायनं **बलावलं** तुले' -ऊन.६. 'आता तेईले **बलावलं** अशीनच ना? का दोगी बईनी तशाच आल्या आपलमती.' -लेक.१३.

बलावाले (क्रि.रूप.) बोलवायला. 'हे पहा आपआपले कपडे अन् सामान घेऊन सात वाजता तयार रहा कोनी **बलावाले** येणार नाई.' -तित.७६.

बली (पु.) बळी. 'नवस केल्ता म्हनून बयरम देवावर बकऱ्याचा **बली** देला.'

बलुतं (न.) बलुतेदाराना द्यावयाची मजुरी. 'आणि प्राणी हा **बलौता**। म्हणोनि जागे।' -ज्ञा.१३.३४. 'एका पखालीचं **बलुतं** घेत व्हतास इतके दिवस.' -पख.३५.

बलुतेदार (पु.) केलेल्या कामासाठी वर्षातून ठरावीक धनधान्य मिळते तो कारागीर वर्ग. न्हावी, वट्ठी, कुंभार, सुतार, महार, मांग इत्यादीना खळ्यातून धान्य दिले जात असे. 'कास्तकाराची ठाकुरकी **बलुतेदारामाथंच** अस्ते.'

बल्लम (वि.) मोठी. 'गाववालेभी भाले, काठ्या, **बल्लम** गोटे घेऊन गावाभवताल पहारा देत होते.' -दि.७५.

बल्लमकाकळी (वि.) मोठी काकडी. 'बजारातून ह्या मोठ्ठीच्या मोठ्ठी **बल्लमकाकळी** आनली खायाले.'

बल्लमखुटा (पु.) मोठा खुंटा. 'येसोंताच्या गांडीत **बल्लमखुटा** ठोकल्याबिगर त्याची वयवय थांबाची नाई.'

बल्ला (पु.) मोठा खांब, फळी. 'खेयेता खेपी हातातला **बल्लाच** सुटला भावरावचा.'

बल्ली (स्त्री.) गोलाईत छोटा खांब. 'तमाशाच्या तंबूच्या **बल्ल्या** रोवून दोन पैसे कमावत होता.' -धग.८३.

बल्वा (क्रि.रूप.) बोलवा. 'एखांद्या आन्याचं तेल **बल्वा** दुकानातून.' -धग.२१. 'गुळाले आग लागल्याची **बल्वा** आये बॉ.'

बवनी (स्त्री.) मालाची पहिली विक्री, बोहणी. '**बोहणियेसीचि** एवढे। भारी जेथ॥' -ज्ञा.१८.७८४.

बवलं (न.) बाहुले. 'हा नवरदेव होय का **बवलं** बसोलं बावा अथी.'

बव्हारा (वि.) अभद्र, एक शिवी. '**बव्हाऱ्याईले** सग्यामायची कदर नाई रे, रांडायचे सांडे झाले ते आता.' -सील.४६.

बशा (वि.) आळशी, ऐदी. 'दिप्या अतची काळी तती नाई करत निरा **बशा** आये लेकाचा.'

बशी (स्त्री.) कपबशी मधील **बशी**. 'कपातला गरम च्या हाय ना व मायऽऽ बशी दे बरं.'

बशी (वि.) १. आळशी, ऐदी. 'सून **बशी** भेटली. बिचारी नाकावरची माशीबी नाई हाकलत. कामधामबी मलेच करा लागतात बैना.' २. बसलेली. 'आमची **बशी** कोल्ही जितून दे.' ३. उंच नसलेली.

बशेल (क्रि.रूप.) बसलेला. 'बुढा आता मारोतीच्या पारावरच **बशेल** हाये.' -धुम्म.

बस (स्त्री.) १. प्रवाशी वाहून नेणारे वाहन. 'कोन्तीच **बस** टायमावर येत नाई गावात.' २. बेस. '**बसनं** व घळीभर पानमान खानं.' (इं.)

बस (अ.) पुरे, पुष्कळ. '**बस**, आता याच्यापुळे येक शब्दबी नाई काळाचा तोंडातून.' (फा.)

बसकं (वि.) चापट, बसलेले- नाक. 'शामराव पाटील कोन्ते हो? ते काय **बसक्या** नाकाचे?' 'हा गंज लय उच्चा झाला. **बसका** कर आमासाक.'

बसनं (क्रि.) १. बसणे. 'कस्तुरे, **बसनं** वऽऽ घेनं अर्ध पान.' २. मासिक पाळी येणे. 'ती म्हणे दोन महिन्यापासून **बसली** नव्हती.' -भं.९२. ३. सामावणे. 'हे ठुनी या दरात काई बसत नाई भाऊ.' 'झोऱ्यात आखीन सामायेन **बसते**.'

बसर - जुमानणे, आटोक्यात येणे. 'पैशाच्या जोरावर कुणाला कसा म्हणून तो कधीच **बसर** गेला नाही.' -कात.५५३.

बसलं (क्रि.रूप.) बसले, बंद झाले, बुडीत. 'त्याचं दुकान तं कईचंच **बसलं** राजा.' 'कालपर्वाचा दनदन खटला आज पुरा **बसला**.'

बसलती (क्रि.रूप.) बसली होती. 'वांझ थानालेच लेकरू लावून **बसलती** बायको.' -सेल.१३१.

बसल्याबसल्या (क्रिवि.) बसलेले असताना. '**बसल्याबसल्याच** माहे डोये लागून रायल्ते.'

बससाल (क्रि.रूप.) बसाल. 'मीच मले पेटवून घेईन अन् तुमीच जाळूं असं पोलिसात सांगीन. **बससाल** मंग जेहलात खळी फोडत.' -वा.४४४.

बसायले (क्रि.रूप.) बसायला. 'अर्जुन्याचा बाप मेला तं त्याच्या घरी **बसायले** गेल्तो जराभर.'

बसाले (क्रि.रूप.) बसायला. 'म्याच देवकीले अथी **बसाले** सांगलं.'

बसीन (क्रि.रूप.) बसेन. 'आता मी निवळून येईन रे बाप्पा/ दिल्लीच्या खुर्चीत **बसीन** रे बाप्पा.'

बसून (क्रि.रूप.) बसवून, बसल्यावर. 'जखमीवरची खिपली काळून अल्लदच रायता/ खुर्चीत **बसून** शिन्या आमचे येले पायता' -नोका. 'पावने लय वारखोळ **बसून** ठुले होते.'

बसूबसू (क्रिवि.) बसूनबसून. 'एकसारखं **बसूबसू** माहा कंबळूं दुखून रायलं.'

बसे (क्रि.रूप.) बसत असे. 'आवताले फटाल **बसे** बैल, आता नाई बसत.'

बसेबसे (क्रिवि.) बसता बरोबर. 'पावने **बसेबसे** तं फरायपानी झालं खपकन.'

बसेल (क्रि.रूप.) बसलेला. 'सीरपत बाप्पू हयलीत **बसेलच** व्हते.' -सित.१४.

बसोत (क्रि.रूप.) बसवीत. 'धनगर आले का आबा आखरात मेंढ्या **बसोत**.'

बसोनं (क्रि.) बसविणे. 'लेकराच्या घरी गनपती **बसोनं** पळतेच राजा.'

बसोयाले (क्रि.रूप.) १. बसवायला. 'पावने **बसोयाले** बैठक झाळून ठुवा.' २. लावायला. 'म्याच आलमारीले काच **बसोयाले** सांगतला.'

बसोयेल (वि.) बसविलेले. 'सुमन, तुया लगनाले तं येक सालबी नाई झालं वऽऽ अन् **बसोयेलबी** हाय त्या गनपती.'

बसोलं (क्रि.रूप.) बसवले. 'लेकराले आताच ज्याले **बसोलं** म्या.'

बस्तं (क्रिवि.) बसण्याची स्थिती. 'उठून **बस्तं** होत सीरपत बाप्पू बोलले, या या आबा.' -सित.१४.

बस्तर (वि.) १. धार नसलेले. 'उस्तरा **बस्तर** झाला तं म्हैस कशी भादरू?' २. निकृष्ट दर्जाचे. 'वावरं ठोक्यानं निऱ्हा **बस्तर** भेटतात.' 'काय **बस्तर** कपळा घेत्ला हो नवरदेवाले?'

बस्तरवार (पु.) गुरुवार. 'शादलबॉच्या नावानं पाच **बस्तरवार** कबूल केले.' -धग.७२.

बस्ता (पु.) गठ्ठा, लग्नाच्या कापडाचा गठ्ठा. 'आजच त्यांनी लगनाचा **बस्ता** बांधला होता. मुलीचा कपडाही तोलामोलाचा खरीदला होता.' -लेक.७३. (त.बस्ता)

बस्तान (न.) बिऱ्हाड, जम, ठाणं. 'धुरपदीच्या लेकीनं केलं मले पसन/ चाला म्हटलं आपलंबी **बस्तान** बसन.' -पाव. (फा.)

बस्ती (वि.) बसलेली. 'जुनी बुडी, ताप्पळ रगत. सकाऊनच आपलमती **बस्ती** झाली.' -सित.४७. (का.बस्ति)

बस्या (वि.) आळशी, कामचुकार. 'गनपत कामाधामाचा नाई, निरानाम **बस्या** बैल हाय त्यो.'

बस्याले (क्रि.रूप.) बसायला. 'चंदनाचे ताट बस्याले दिले.' -लोक.१५७. 'खिनभर **बस्याले** फुरसद नाई मले.'

बस्स (पु.) पुरे. '**बस्स** झाली रे तुई बळबळ, मुका राय आता.' (फा.बस)

बस्सर (न.) कह्यात, आटोक्यात. 'खेटराचा देव कुठी तोंडानं **बस्सर** याले बसला.' -एक.

बहकावा (पु.) दुसऱ्याच्या सांगण्यानुसार वागणे. 'आमदाराने शासकीय अधिकाऱ्याच्या **बहकाव्यात** येऊन अतिक्रमन हटवण्याचा प्रयत्न केला.' -खुं.१०१.

बहळ्ळं (क्रि.रूप.) वाढले. 'लगन झालं तरी घरात ना कोनी **बहळ्ळं** ना कोनी घटलं.' -सित.५९.

बहाडा (वि.) लालपांढरे ठिपके असलेला. 'हे **बहाडे** गोरे जरासा का नेट लागला का हेवड पळते.' -दि.११. 'रेंगीला जुंपण्यासाठी खास **बहाडे** गोऱ्हे होते.' -जटा.९.

बहादूर (वि.) शूर, वीर. 'रातभर एकलाच जागल करते असा **बहादूर** आये शेषराव.'

बहाद्द(द्दू)र (वि.) शूर. 'हा **बहाद्दर** वावरातून शाळेत जातो अन् शाळेतून वावरात जातो.' -निशा.३६. (तु.)

बहाना (पु.) सोंग, मिष, सबब, निमित्त. 'पोरीवाले तं काईबी **बहाने** सांगतात अन् शिळा संबार इकतात.' (फा.)

बहार (पु.) बहर. 'आंब्याले चांगला **बहार** येल आये औंदा.'

बहार (स्त्री.) आनंद, मौज. 'तुमी आल्याच्यानं कार्यात **बहार** आली.'

बहाल (न.) १. अर्पण. 'अखेर नशिबात फुटके खापरच **बहाल** की नाही?' -कात.६. 'ज्याची वसद त्याले **बहाल** केली पायजे राजा.' २. अजून कायम. 'गरिबीचा कुंदा खंदून रायलो/ तरी कर्जाचं तनकट **बहाल** हाय.' -नोका. (फा.बहाल)

बहालमर्जी (स्त्री.) कृपा, अनुकूल इच्छा. 'यांची कुणावर **बहालमर्जी** झाली तर ते त्यास कंबरेचे धोतरही सोडून देतील.' -कात.१८.

बहावा (पु.) पिवळ्या फुलांनी उन्हाळ्यात **बहरणारे** झाड.

बहाळा (वि.) ठिपके असलेला. 'बैल **बहाळा** पायजत होता. घरचा गोऱ्हाबी **बहाळाच** हाय.'

बहिरम (पु.) भैरव. 'परतवाळ्याजोळ **बहिरमबोवाची** भल्ली मोठी जत्रा भरते.'

बहुतकरून (अ.) शक्यतोवर. 'म्हणोनि करु म्हणसी ते नव्हे। **बहुतकरुनी**।' -ज्ञा.९.४९३. 'बस्तरवारी **बहुतकरून** मी जाईनच शेगावले.'

बहुतेक (अ.) कदाचित. 'सकाय पर्वा म्हना, **बहुतेक** पावना येनारच आय.'

बहुबेटी (स्त्री.) सून आणि मुलगी वगैरे. 'तुही नजर पापाची/ भल्याची **बहुबेटी** काय तुझ्या रे बापाची?' -लोक.७१.

बहुबोल्या (वि.) बडबड्या. 'आज जरी मी दिसतो **बहुबोल्या/** त्यावेळी होतो मात्र मी गब्बुगोल्या.' -मिर्झा.४७.

बहुमोल (वि.) किंमती. 'फळा म्हन्जे **बहुमोल** वसद हाय. आपलं घर सपा ठुते.'

बहुरूपी (पु.) सोंगाड्या. 'जैसी **बहुरुपियाची** रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं॥' -ज्ञा.३.१७६.

बहेकनं (क्रि.) बिघडणे. 'रातच्यानं पुन्ना पाटलाची तब्बेत **बहेकली**.' -दि.८७.

बहेकावा (पु.) बिघडवण्याचा प्रयत्न. 'आपून कोनाच्या **बहेकाव्यात** येऊ नाई बेटा.'

बहेरम (न.) विदर्भातील एक यात्रेचे ठिकाण. ते उंच टेकड्यावर असल्याने, अतिश्रम झाले तर 'घ्या **बहेरमबॉचे** टोले' असा वाक्प्रचार वापरतात.

बहेरमबॉचेटोले (पु.अने.) खूप कष्ट पडणे. 'लगन अन् घर म्हटलं का **बहरमबॉचेटोले** पळतातच मान्साले.'

बह्यताडावानी (वि.) वेंधळ्या, मूर्खाप्रमाणे. 'आवं असी काय करतं **बह्यताडावानी**.' -त.२८.

बह्यताळ (वि.) मूर्ख. 'आव तं **बह्यताळ** थुतराचे तुले एवळंबी समजत नाई.' -त.९०.

बह्यताळबेलनं (वि.) मूर्ख, अडाणी. 'धुरई जुतता येत नाई असं **बह्यताळबेलनं** आये पोट्टं.'

बह्यनी (स्त्री.अने.) बहिणी. 'उमा अन् रमा दोघी **बह्यनी** बह्यनीच आयेत.'

बह्याळ (वि.) वेडपट. '**बह्याळ** हाय भोसळीचं कालपासून बोंबलून रायलं. मिसूर नाई आली अन् लगनच द्या म्हन्ते करून.'

बह्याळबेलनं (वि.) बावळट, नासमज, अडाणी. 'बायको पाह्यली अशी **बह्याळबेलनं**? एकटी काय करीन ते?' -कावू.

बळजबरी (स्त्री.) जबरदस्ती. 'अशा गोठी निरुपमानं घ्या लागतात **बळजबरी** नाई चालत.'

बळद (न.) धान्य ठेवण्याची जागा. '**बळदात** दोन पोते गहू भरून ठुले अन् येक आंगनात वऊ घातलं.'

बळनं (क्रि.) वाढणे. 'आज ना सकाय कांद्याचे भाव **बळनच** आयेत.'

बळबळ (स्त्री.) बडबड. 'काम कवळीचं करत नाई फक्त **बळबळ** करत रायते.'

बळी (पु.) देवाच्या नावाने भोग देण्यासाठी कापणे. 'मनोमहिषाचेनि मुंडे। दीधली **बळी**॥' -ज्ञा.१२.५३.

बळी (वि.) शक्तिमान. '**बळी** अबळाते खाय॥' -ज्ञा.१६.३०२. '**बळी** तो कान पिळी.'

बळोनं (क्रि.) वाजविणे. 'जसजसी दारू चळे तसंतसं डफळ **बळोनं** वाळत जाय.'

बळ्या (पु.) बडवा, पंढरपूर मंदिरातील साधू, पूजारी. 'मुक्कामासाठी पंढरपुरात आपलं **बळ्याचं** घर ठयरेल आय.'

बळ्ळं (न.) बरड. 'गावाले गेलो की संध्याकाई **बळ्ळावर** बसो.'

बळ्ळा (पु.) केसातील ऊचे अंडे. 'माय मायऽऽ मिना? तुया डोक्शात **बळ्ळे** पायनं किती झाले वऽऽ? फनीनं इचर माय.'

बंगई (स्त्री.) लाकडी झोपाळा. 'आमच्या घरची **बंगई** न्या अन् खुशाल जोड्यानं झोके घ्या.' -पख.१२८.

बंगरशा (वि.) बावळट. 'दिप्या म्हन्जे पक्का **बंगरश्या** हाय. येवळी जमीन पन काई पिकोता नाई येत लेकाले.'

बंगाली (स्त्री.) बाभळीचा एक प्रकार. '**बंगालीचे** काटे मोठाले. जसे दामन होयत लेकाचे.'

बंगालीकाटी (स्त्री.) बाभळीचा प्रकार. 'बंदीत तं निरा **बंगालीकाट्याच** आयत. त्याले बाकोलच्याबाकोल काटे.'

बंगाल्या (वि.) १. मूर्ख. 'डवऱ्यावर असा **बंगाल्या** मानूस सांगत असतात काय?' २. **बंगाल** प्रदेशातील. '**बंगाल्या** लोकाईनं आताचे समदे धंदे जिकून घेतले. आपून बसलो रुमने धरत.'

बंजाडनं (क्रि.) तनधैले, गवताळ होणे. 'निंदणावाचून आपलं वावर कितीदा **बंजाडून** जाते.' -बा.८६.

बंजाळेल (वि.) खराब झालेले. '**बंजाळेल** बंडी, तसाच वखर. असा शामराव पाटलाचा कारभार.'

बंटाठार (न.) सर्वनाश. 'होते म्हनलं आता आपला **बंटाठार**.' -मिर्झा.११६.

बंड (वि.) पाजी. 'निंदनाऱ्या बायाईचे इवे धरते. आपून त्याले उचलून घ्यावं तं टेंबलते. असंकसं **बंड** पोट्ट मायऽ?' (का.बंडण)

बंडल (न.) पुडके. 'सात नंबर बिळ्याचं येक **बंडलं** घेऊन तो आवतावर आला.'

बंडल (वि.) खोटे. 'आता तुमचे पयसे आनून देतो म्हनून गेला तं अजून आला नाई. लयच **बंडल** मानूस हाय गळ्या.'

बंडा (पु.) गोदाम. 'माल ठेवण्यासाठी दोन मजली बांधकाम केलेला मोठा **बंडा** होता.' -कात.६०.

बंडाळनं (क्रि.) घाट्यात, तोट्यात येणे. 'याचा कारभार आताच खांदी आला. कुणबिक **बंडाळली**.' -बा.१९१.

बंडी (स्त्री.) १. बैलगाडी. '**बंडीभर** गवत कापलं. धुरीवर बसला तं बईल काई **बंडी** ओळत ना.' (का.) २. विशिष्ट प्रकारचे शर्ट. 'जुन्या काळी काय येक **बंडी** असली की दोघं तिघं भाऊ तेच घालत.'

बंडींग (न.) खोदून भाराव टाकणे. 'तुमच्या आमच्या वावरात सरकारनं कशा **बंडींग** नाल्या तयार केल्या.' -वा.१०२.

बंद (पु.) १. बांधण्याचे साधन. 'वासनच्या **बंदानच** तं भारा बांधतात गवताचा.' २. कैद. 'चोर म्हून पुंड्या अंदर **बंद** आये होयेल.' (फा.)

बंद (क्रिवि.) काम थांबवणे. 'मजूर नसल्यानं निंदन **बंद** ठेवा लागलं.' (फा.)

बंद (वि.) खूप. 'हराळी, लव्हाळी जमीन धरून बकाबका वाढणारी. आतल्या आत **बंदावर बंद** करून दाट होणारी.' -खुं.१४६.

बंदं (वि.) पूर्ण. 'गढी एवढी मोठी का **बंदं** गाव मावे.' -मिर्झा.१९.

बंदा (पु.) दास, भक्त, पट्ठा. 'हा बंदा जाते एकटा जंगलात. लाव शर्यत.' 'गोपाल पैलवानाचा **बंदा** आय तुक्या.'

बंदा (वि.) पूर्ण. 'साथीत यादवराव पाटलासारखे काही **बंदे** रुपयेही हारवले.' -मोती.३१. 'येक **बंदा** रुपया होता तोबी मोळून चिल्लर केली त्याची.' (फा. बन्दः,अर.)

बंदा(धा)टी (स्त्री.) कुडाचे आडवे लाकूड. 'येल्या मांडवाची उच्ची घेजा **बंदाटी/** मैनाचे मामा येती त्याले मुंडाले शिंदती.' -लोक.२२५. 'तुराटेईचा कूळ घेतला. बंदाट्या आपल्या **बंदीतल्या** बंगालीच्या आनल्या.'

बंदी (स्त्री.) १. गर्द झाडीचा पट्टा, जंगल. 'अलीकडे नाल्यात तर सोडूनच द्या पण **बंदीतही** वाघ दिसत नाही.' -गय.२. २. मनाई. 'माहेरी याजाले पोरीले **बंदी** घातली सासरवाल्याईनं.'

बंदी (वि.) कैदी. '**बंदी** मानूस असला का त्याले मनावानी फिरता येत नाई.' (फा.)

बंदोबस्त (पु.) व्यवस्था. 'हजार पावनेईचा **बंदोबस्त** केला आपून येकल्यानं.' (फा.बंदओबस्त)

बंदोबस्ती (स्त्री.) व्यवस्था. 'मंत्रीसंत्री आले तं **बंदोबस्ती**

मायाआंगच असते बाप्पू.'

बंदोरी (स्त्री.) स्त्रीसाठी उपहासात्मक संबोधन. 'राजाच्या घरी कंदोरी, कुठी गेली **बंदोरी**?'

बंधारा (पु.) बांध, मोठा पाट. 'वावराले पानी द्यासाठी जथीतथी **बंधारे** बांधले.'

बंब (वि.) खूप. '**बंब** पराटी फुटली. लय कापूस पिकते का कायजून?'

बंब (स्त्री.) एक भांडे. 'अवघ्याईच्या आंगधुयाले गरम पान्यासाठी **बंब** आये आमच्या घरी मोठाधाटा.'

बंबाट(ळ) (वि.) खूप, भरपूर. '**बंबाळ** दीवा पाजळत असेः' -गोवि.२६५. 'मळ्याची जमीन पैसा कम, घराचे हाल काय **बंबाट** होते एकदम.' -अंधा. 'कामाला न जाता पानपंट्यांवर उभं राहून पोट्टे **बंबाट** चर्चा करतात.' -खुं.७. 'हरबऱ्याचे **बंबाळ** घाटे पळ्ळे गारगोंडाच्यानं.'

बंबुरा (वि.) लठ्ठ. 'निरवाशी काय **बंबुराच्या बंबुरा** आय. बंडीत बसला तं बैलच कचमोळन लेक.'

बंबुऱ्या (पु.) १. लठ्ठ, मोठ्ठा. 'बाई बारकीचिरकी अन् बॉ म्हनसीन तं हॅ **बंबुऱ्याच्या बंबुऱ्या**.' २. पुरुषी जननेंद्रिय या अर्थी. 'नळ योजनेनं पखालीचा धंदा बंद झाल्यावर कोणाचा **बंबुऱ्या** खाशील?' -पख.४२. 'ढोरं घेऊन जा म्हणलतो तर **बंबुऱ्याकडे** पाहू लागलतं.' -सेल.११४

बंबुऱ्यामारी (न.) बेफिकिरी दाखविणारे संबोधन. 'मला पटेल तेच करीन, नाही बोलले भावबंद तर नाही बोलले **बंबुऱ्यामारी**.' -खुं.१३५.

बंबू (पु.) बोऱ्यातून धान्य काढण्याचे साधन. 'हरबऱ्याच्या पोत्यात **बंबू** खुपसखापस करताना कुनब्याच्या जिवाची चायनी झाली.'

बंब्या (वि.) लठ्ठ. 'काय **बंब्या** मानूस आहे तो सखाराम.'

बा (पु.) बाप, वडील. 'निघता घरी आई **बा** वाटी। तुजसवे का आलिए हरी।' -तुका.४०४. 'ह्मणता राम राम। तुझ्या **बाचे** काय वेचें॥' -तुका.२७४५. (अर.)

बाइज्जत (क्रिवि.) सन्मानाने. 'सलमान **बाइज्जत** बरी झाला खटल्यातून.' (फा.)

बाई (स्त्री.) १. कानातील आभूषण. बाळी. 'वांझेघरी बाळ तान्हा। एक **बाळी** दों कानां॥' -तुका.२३०४. २. स्त्री. '**बाई** तं लयच खुपसुरत दिसून रायली कोनाची होय लेक.' ३. मोठी बहीण. 'मा वऽऽ **बाई** कुठी गेली? राखी बांधनं म्हना मले?' ४. बाही- शर्टाचा हातावर येणारा भाग. 'मग गोसावी आंगीयाचीया **बाहीया** ऐसीया वरतीया करीतिः' -ली.३१.

बाईनवार (क्रिवि.) तपशीलवार. 'तिनं सरावनला सारं **बाईनवार** सांगितलं.' -पाटी.

बाईबटा (संबो.) स्त्री, पोरीचे लाडीक संबोधन. 'चुलत्याची **बाईबटा** भरला त्यानं ओटा.' -लोक.७५.

बाईरचं (न.) बाहेरचे, करणी वगैरे. 'डाक्तरच्या हातातलं दुखनं नोय हे. **बाइरचंच** होय.' -धुम्म.

बाईलबुगा (वि.) बाईसारखा, बायकी. 'तुमचं तं लयच **बाईलबुगे** काम हाय वं, कवाबी पाहाव तं फाशी घेतो हेच चालू रायते.' -खुं.२४५.

बाईलभानुशा (वि.) भित्रा, बायकी स्वभावाचा. 'मल्ले का येवळं भेव दाखून रायला? आन् मी तुया सांगळ्या **बाईलभानुशाले** दबतो.' -त.१२४. 'मल्ले गा एवढं भेव दाखवून राह्यला? आन् मी तुह्यासांगड्या **बाईलभानुशाले** दबतो?' -धग.१२४.

बाईलभोक्या (वि.) भित्रा. '**बाईलभोके** हो, घराच्या भोकात काहून बसता. ये ना मयदानात.'

बाईलवेळा (वि.) स्त्री लंपट. 'मान्सानं मान्सासंग बोलाव, निन्हा बायाईतच रायते. **बाईलवेळा** हाय काय लेक पावना?'

बाऊ (पु.) १. लहान फोड. 'बाप रे, हाताले **बाऊ** झाला काय रे?' २. लहान मुलाला भीती दाखविण्यासाठी वापरावयाचा शब्द, भय, धास्ती. 'बाबू तिकळे राती जाऊ नाई, **बाऊ** असते.' ३. छोटी गोष्ट मोठी वाटून भिणे. 'एवढ्यातेवढ्या गोठीचा **बाऊ** करून बसतात का?'

बाक (पु.) वाक, वक्र. 'या ठुनीले **बाक** आहे जराक्सा, सरकीतीर पायजे होती.' (का.बाकु)

बाकनं (क्रि.) माघार घेणे, वाकणे. 'पोरगा लयच कामाचा हाय. कोनत्याबी कामात घाला **बाकनं** नाईचं.'

बाकर (स्त्री.) भाकर. 'पाटपासून काही खाल्लं नाही...**बाकर** दे मावशी राच्ची.' -खुं.२५८.

बाकरू (न.) लहान बोकूड. 'नारळ फोडा. शेरनी वाटा. आता **बाकरू** आना.' -डेबू.३.

बाका (वि.) १. कठीण. 'राती **बाका** परसंग गुदरला राजा. च्याकू घेऊनसन्या चोर दिसला.' २. कामाचा, कार्यक्षम. 'आपला गळी कामाले तसा **बाका** आये.' ३. फाकडा, नटवा. (का.बाक,हिं.बॉका)

बाकी (वि.) शिल्लक, थकीत. 'तुमच्या आंग माये काईच पैसे **बाकी** नाईत. फिट्टंमफाट झाले.' (अर.फा.)

बाकेल (वि.) वाकलेला. 'बंडीचा धुरा **बाकेल** आय बरं, अरामानं हानजो गाळं.'

बाकोनं (क्रि.) वाकवणे. 'ते डांग खाली **बाकोनं** आमासीक.'

बाकोल (वि.) मोठे आकडेबाज. 'म्या पाह्यला व्हता. काळीला लांबलांब **बाकोल** मिशाचा.' -पख.११४.

बाक्कन (स्त्री.) १. गुप्त जागा. 'बाक्कन दाखोली की कुठीसाई येते तो.' -ना.८४. २. वस्तू. 'माही एक **बाक्कन** हारपली सायाची.'

बाक्कोल (न.) चिंचेचा आकडा. 'लागे चिचीची समाधी झाले बेभान **बाक्कोल**.' 'चिचीले ह्या **बाक्कोलच्या बाक्कोल** चिचा लागेल हायत.'

बाखरू (न.) लहान बोकूड. 'ते **बाखरू** आता म्होट्टा गपक्या बोकळ्या झाल्ता.' -सित.११२.

बाग (पु.) १. वक्रता, वळण. 'सलाखले **बाग** पळ्ळा, बंडीचं चाक त्याच्यावरून गेल्यानं.' २. कोंबड्याचे आरवणे. 'कोंबळ्यानं **बाग** नाई देला म्हनून काई दिवस निंग्याचा थांबत नाई.'

बागन (क्रि.रूप.) वाकेल. 'भाईजी त्याले पोरासारखा वागवे/ कमचीवानी **बागन** तसा **बागवे**.' -मिर्झा.१९६.

बागनं (क्रि.) वाकणे. 'कष्टाफुडं **बागनं** माह्या जंत्रीत नाही बसत.' -पोळा.

बागल (स्त्री.) रवंथ. 'गवानीतला चारा संपवून गुरं **बागल** करीत होते.' -ए.३९.

बागल्या (क्रि.रूप.) वाकल्या. 'पाणी वरून पडते तूर बारावर आली, **बागल्या** फांद्या खाली.' -लोक.२१.

बागशाही (स्त्री.) सुसंपन्न बाग. 'जावया बापुजीच्या अंगणात **बागशाही** फुले, हलक्या हातांनी तोडे, रोज मैनाबाई.' -लोक.५९.

बागाईत (स्त्री.) ओलीताचे शेत. 'दा येक्कर **बागाईत** खाता खावोल्या जात नाई.' (फा.हिं.बाघाती)

बागूल (पु.) लहान मुलांना भीती दाखवणारी काल्पनिक व्यक्तिरेखा. 'का बाळत्व निघोनि जाय। तै **बागुला** नाही माय॥' -ज्ञा.१८.४०७. 'काय बाळा **बागुल** देशें। दवडावा आहे॥' -ज्ञा.१५.२१४. 'तुका म्हणे साचें। भय नाहीं **बागुलाचें**॥' -तुका.७३७.३.

बागू(गो)ल (स्त्री.) रवंथ. 'दावणीला चारा खात औताचे बैलं **बागूल** करीत बसायचे.' -खुं.२२७. 'ढोराईचं मस्त अस्ते लेक, दिवसभर चरतात, रातभर **बागोल** करतात.'

बाचकं (न.) लहान गोठोडे, पोते. 'डाव्या कोपऱ्यात जवारीचं अर्ध **बाचकं** ठेवलेलं होतं.' -खुं.२११.

बाचकायलं (वि.) ठाम नसलेला, चंचल. 'याचा सौदा त्याले इकते लयच **बाचकायलं** पोट्ट हाय.'

बाचट (वि.) बाष्कळ. 'तो लय **बाचट** गोष्टी करत होता.'

बाचटलं (वि.) बाष्कळ. 'मंग पयले नाई समजलं काय **बाचटल्या** थुतराच्या?' -ए.२५.

बाचला (वि.) मध्येच बोलणारा, अविश्वसनीय बोलणारा. 'रामा लय **बाचला** पोरगा आहे.'

बाचाबाची (स्त्री.) शाब्दिक भांडण. 'एसटीत पुंजा अन् रघ्याची जागेसाठी **बाचाबाची** झाली.' -पख.५८.

बाच्छा (पु.) बादशहा. 'मोठा आला **बाच्छ्याच्या** पोटचा, अथी भाकर नाई अन् याले पोई पायजे.'

बाज (स्त्री.) खाट. 'तुटकी ऐसी **बाज** होतीः तीएवरि वाकळ आंथुरिलीः तेथ नीजैलाः' -ली.४७७. 'आवघया **बाजा** घातलीयाः तयावरि न नीजेतिः' -गोवि.२४०. 'हें असो शब्द्रब्रम्ह जिए **बाजे**। शब्द मावळलिया निवांतु निजे।' -ज्ञा.९.२२. 'बाकरू **बाजीच्या** ठाव्याला बांधलेलं.' -डेबू.३.

बाजत (अ.) नंतर. 'पंगता सारल्या मंग त्या **बाजत** निंगलो आमी गावाक्ळे.' (फा.)

बाजरं (न.) धान्य विशेष. 'तिबार पेरणीत आता सूर्यफूल पेरायचं का **बाजरं**?.' -खुं.२०८.

बाजरी (स्त्री.) एक धान्य. 'घरी भाकरी खाले आळतासानं **बाजरी** पेरली उलचीक.'

बाजलं (न.) लहान खाट. 'तेयालागी **बाजुले** घातलेः' -ली.५७. '**बाजुलेयापासी** पीढे घेउनि बैसेः वोणवौनि **बाजुलेयाखालि** वोडवण असे ते घेः' -ली.५०५.

बाजागिरी (स्त्री.) जादूगिरी. 'पिसांची पाटवी। करोनि **बाजागिरी** दावी।' -तुका.१८०१.

बाजार (पु.) व्यापारपेठ. 'दर गुरवारी **बाजार** अस्ते दर्यापुरचा.' (फा.)

बाजारबसवी (स्त्री.) वेश्या. 'गावातल्या लोकाईले **बाजारबसवी** बाईच्या घरी चक्कर माऱ्याले सांगाव.' (का.बसवि)

बाजारबुनगे (न.) फौजे बरोबरची प्रमुखाशिवाय अवांतर माणसे. 'लग्नासाठी ठईक पावने न्यावं, **बाजरबुनगे** काले न्यावं?' (का.बुनुगु)

बाजारहाट (पु.) किराणा, भाजी इ. 'हप्ताभर मरमर राबा अन् बस्तरवारी त्या पैशाचा **बाजारहाट** आना.'

बाजिंदी (वि.) बदमाश, चावट, दुटप्पी. 'केवढ्या **बाजिंद्या** आहा वं तुमी...हे टप्पर पाह्यत बसता अन् भागोतात येता.' -ना.६२. 'ही नायका म्हणजे मदनधुंदीची गरमी आणणारी नटचंचल **बाजिंदी** आहे अगदी.' -कात.३९४. (फा.बाझिन्दा)

बाजी (स्त्री.) डाव, पैज, शर्त. 'दोघातिघाच्या दाळीतून वावर इकत घेतलं राजा तुमी लयच **बाजी** मारली हो.' (फा.)

बाजुबंद (पु.) स्त्रीचा दागिना. 'राहिली उभी गोरी/ **बाजुबंद** लह्यरा मारी.' -लोक.३. 'पहिल्यानं गरवार मराठमोळा लेणं/ दंडाला **बाजूबंद** हाती गुलाबी काकण.' -लोक.१००.

बाजू (स्त्री.) १. कड. 'दोही बाजूनं आखर निंदून झालं.' २. पक्ष. 'आपली **बाजू** पक्की आये तं काऊन भ्या?' 'रामा आपल्याच बाजूनं रायते सदाई.' ३. बाहू, भूजा, दंड, बाही. 'माही **बाजू** पकळून वढत नेलं तिकळे.' (फा.बाझू)

बाजोळ (पु.) ढेकूण. 'बाजीत भलकसे **बाजोळ**. काहाची झप लागते मंग रातभर?'

बाट (पु.) विटाळ. 'पराविया नारी माउली समान। परधनीं **बाटों** नेदीं मन।' -तुका.४५०. 'मी खुशाल खाते, पिते, मज दिसे न कोठे **बाट** ग.' -भीक.९८. 'ब्राम्हण लोक इतर जातीच्या लोकांचा **बाट** ज्यास्त प्रमाणात पाळतात असं ऐकलं होतं.' -वा.२५.

बाटचीट (स्त्री.) शिवाशिव. 'लोकायले असंच पाह्यजे लय **बाटचिट** धरतात फोदीचे.' -रा.१५३.

बाटनं (क्रि.) विटाळ होणे. 'तुका म्हणे धनमाने। माह्या **बाटलो** मीपणे।' -तुका.३२५२.

बाटम (स्त्री.) पँटची पायाकडची बाजू. 'मापाचे कपडे अन काल्लर, सोल्डर, कप, **बाटम** ऐकालाही भारी होते.' -मोती.

बाटली (स्त्री.) कुप्पी. 'दारूची **बाटली** होय ते. आमाले शिकोता काय? दवाईची बरोबर ओयखू येते.' (पोर्तु.)

बाटवनं (क्रि.) विटाळ करणे, धर्मांतर करणे. 'जुन्या काळी हिंदू लोकाईले **बाटवलं** अन् मुसलमान केलं.'

बाटवली (क्रि.रूप.) विटाळली. 'सिदनाक येस्कराच्या सुनीनं इहीर **बाटवली बाटवली** असं बोंबलत बायका गावात आल्या.' -पख.१२.

बाटाळलं (वि.) संमिश्र, विशुद्ध नसलेली. '**बाटाळल्या** भाषेतले कर्कश कर्णकटू गाणे.' -गाक.२४.

बाटाळी (वि.) बाटलेली. 'त्या **बाटाळ्या** राधीच्यासंगं राहत नको जाऊ गोदे तू.'

बाटी (स्त्री.) १. एक पक्षी, तितर. 'पहाळपट्टीनं आता तितूर, **बाटी** खायाले भेट्टे, इकळे तं डोयानबी नाई दिसत.' २. वाफाळून करतात ते पानगे. '**दायबाटीच्या** जेवनात तूप तं पायजेच राजे हो.'

बाटुकलं (वि.) लहानसा, ठेंगू. 'पोरगी पायली पाच फूट अन् पोरगा **बाटुकला** दाखून रायले राजा तुमी.'

बाटूक (न.) १. ज्वारीच्या शेतातील लहान धांडे. '**बाटूक** धांडे कापून आनले बैलईसाठी.' २. लहान तुकडा. 'उलचक दोराचं **बाटूक** असलं का येठन होते त्याचं.' ३. ठेंगू. 'पोट्टं वाळून नाई रायलं माय. निन्हा **बाटूकच** दिसून रायलं.' ४. लहान चिंच. 'हे वच्छी चिचीचं **बाटूक** काहून चोखत असीन मनाव?'

बाटून (क्रि.रूप.) बाटवून, विटाळून. 'पयले तं कोनाचा हात लागला तरमा मानूस **बाटून** जाय.'

बाटेल (वि.) बाटलेले. 'देशमुख अळनावाचे मुसलमान **बाटेल** हायत ना. ते पयले हिंदूच होते.'

बाटोनं (क्रि.) विटाळणे. 'पाटलाच्या इरीवर जाऊन ईर **बाटोनं** बरोबर नाई.'

बाटोयाले (क्रि.रूप.) बाटवायला. 'हिन्दूले **बाटोयाले** मुसलमान राजे टपूनच रायेत.'

बाटोयेल (क्रि.रूप.) बाटवलेले. 'भलत्याच जागी सगाई करून यानं आपलं कुय **बाटोयेल** आय.'

बाटोला (क्रि.रूप.) बाटविलेला. 'वंक्यानं हाती घेऊन **बाटोला** आपला तांब्या.'

बाटोळी (वि.) बाटलेली, कलंकित. 'अवऽऽ **बाटोळ्याखानाचे** म्हना लय वयवय करून रायली वऽऽ.'

बाठ (पु.) आठोळी. 'आंब्याच्या **बाठा** भुजून खाल्ल्या की झकास सुरूस लागतात.'

बाड (न.) १. पोथी. 'म्हशी हरवल्या. **बाड** पाहा. बाडवाला बराबर सांगते अतापता.' -पख.११३. २. व्यंग. 'गाडीच्या चाकाला **बाड** काढून चाकोलीनं चालवतोस.' -झा.६१.

बाड (वि.) तालेवार. 'माडीवरती माडी माडी उंच ही **बाडाची/** माडीवर उभी माझी लेक ही लाडाची.' -रुक्मि.१०.

बाडगा (वि.) विटाळ झालेला, वाळीत टाकलेला. 'तो **बाडगा** मानूस आहे अथी काहाले येईन.'

बात (अ.) लवकर. 'तुहा मामा **बातच** येते अन् **बातच** जाते.' -गा.१०१.

बात (स्त्री.) गोष्ट. 'कोनतीबी **बात** मान्सानं कान देऊन आयकाव.' 'बुढ्याची **खबरबात** घ्याले गावाले गेल्तो.'

बात(ता)खबाल्या (वि.) गप्पिष्ट. 'याच्यावर कसा इसवास ठेवाव **बाताखबाल्या** हाय हा.' -खुं.२८. 'त्याच्या या **बाताखबाल्या** गोठीनं आबाच्या तयपायाची आग मस्तकात गेली.' -सित.२५.

बातन्याबात (अ.) लवकरात लवकर. 'मी जाना आजीले घिऊन येतो **बातन्याबात**.' -डेबू.६.

बातमी (स्त्री.) खबर, वार्ता. 'मरनाची **बातमी** द्याले धोरनीच मानूस पाठोयाले पायजे.' (का.वार्ते)

बातल (वि.) व्यर्थ, वाया, खाली. 'रंगराव गोष्ट **बातल** तर होणार नाही ना? बणीबात बिघड नाही जाना' -कात.४५५.

बातला (वि.) अवाजवी गोष्टी करणारा. 'आपून भरोसा ठू नाई **बातल्या** मान्सावर.' (अर.)

बाताड्या(ळ्या) (वि.) थापाड्या. '**बाताड्या** मानूस काय बोलील काई सांगोल्या जात नाई.' (का.माताळि)

बातायेल (वि.) गप्पिष्ट. '**बातायेल** मान्साच्या पोटात कोन्तीच गोठ पचत नाई राजा.'

बाताळनं (क्रि.) निरर्थक बोलणे. 'पुढं जाऊनच नाई राह्यली काठी, मी उगीचच **बाताळलो**.' -खुं.२११.

बातेखपाल (वि.) केवळ मोठ्या गप्पा मारणारा. 'जिवाचा मित्र उरला नाही. **बातेखपाल** केवळ पंगतीचे पठान यांना मात्र तोटा नाही.' -कात.५०५.

बातेल (वि.) गप्पा, बाता, थापा मारणारा. 'काईबी पुळ्या सोळत रायते **बातेल** पांड्या.'

बातोनी (स्त्री.) गप्पा, गोष्टी, बाता करणारा. 'लीलाबाई भल्तीसा **बातोनी** बाई आय. बळबळतच रायते हरदम.'

बाद (न.) रद्द, काढून टाकणे. 'मले खेळातून **बाद** करता मंग माया आखरात नोका खेळू.'

बाद (अ.) नंतर. 'गोविंद्या इथंच उभा राहाय मी **गेल्याबाद** येजो.' -निशा.९४. 'घरी येऊन पडल्याच्या **बादबी** मले कशीच झप आली नाही.' -गय. (फा.)

बादली (स्त्री.) बकेट. '**बादली** इरीत पळ्ळी तं गय टाकून काहाळा लागीन.'

बाधनं (क्रि.) १. बाधा होणे. 'भगति जनासरिसे वाढाः बाइसे म्हणीतलेः बाबा **बाधीलः** सर्वज्ञ म्हणीले न **बाधीः**' -ली.४४०. 'जैसा मंत्रज्ञु न **बधिजे**। भूतबाधा॥' -ज्ञा.२.२३४. 'अहो ज्या नरा रामविश्वास नाही। तया पामरा **बाधिजे** सर्व काही॥.' -मनो.७८.

बाधा (स्त्री.) १. उपद्रव, व्याधी. 'वीट नेघे ऐसे रांधा। जेणे **बाधा** उपजेना।' -तुका.३४०. २. अडथळा. 'मेरीवर सरबांड टाक्याले शेजलच्यानं **बाधा** आन्ली.'

बाधील (क्रि.रूप.) उपद्रव होईल. 'जिवावर खासीन तं **बाधील** ना तुले.'

बान (पु.) बाण. 'डोळे गुंजदार काळे कशा भिवया कमान दोघांचाही एक **बान**.' -लोक.५७.

बाना (पु.) १. वेश. 'शाईतला पांडाबक **बाना** माल्या आंगावर भल्ताच खुलून दिसे.' -सित.११५. 'राघूची लाल चोच मैनाचा हिरवा **बाना**.' -लोक.१०९. २. निश्चय. 'मरीन पन सुदरनार नाई असा झानु त्यानं काईम **बाना** धरेल व्हता.' -सित.१३२.

बानी (वि.) बाणेदार, पाणीदार, शब्द पाळणारा. 'येवड्या **बानीचा** मानूस राजा पन हारला जिंदगीले.' -पोळा.

बानी (स्त्री.) १. सत्त्व, अस्मिता. 'बरसते रिमझीम सरसर येते पानी/ सारे झाले रे फितूर आता राखजो तू **बानी**' -नोका. २. शब्द. 'मंग सांगा तुमाले माही **बानी** ठेयाची हाये की गमायाची हाये.' -भं.४२. ३. शर्थ. 'हे काम तं तुया मोठ्या **बानीनं** केलं गळ्या.'

बाप (पु.) वडील. 'तव नोवरीएचा **बापु** सीते उरली होतीः तो बाहीरि नीगालाः' -ली.६९. 'मग न सुटे **बापा** रुदता।' -ज्ञा.३.११५. 'तुका म्हणे पाप। माय नावडे ज्या **बाप**॥' -तुका.३४९.३. (फा.)

बापजादे (पु.अने.) वाडवडील, पूर्वज. 'खंडताखंडता झयकती सोन्याची भरेल घागर/ नेऊन देल्ली मालकापाशी **बापजाद्याची** धरोवर.' -रूख.

बापझईचा (वि.) एक शिवी. 'अरे म्हना **बापझईच्या**, आमच्या नांदी काहाले लागतं. म्हना नामुनिशान मिटून टाकीन.'

बापलेक (पु.अने.) मुलगा आणि वडील. 'शांता व माय कणसे कापणीला, आम्ही **बापलेक** कणसाचे हारे वाह्यला.' -फीर.१९१.

बापा (संबो.) भल्या माणसा या अर्थी. 'पुरुखाः पेसा पींडु का उपेखिला **बापेया**?' -ली.२५. 'स्वधर्मु जो **बापा**। तोची नित्ययज्ञु जाण पां।' -ज्ञा.३.८१. 'आपून तं हारलो **बापा** या काट्ट्याले.' (फा.)

बापुया (पु.) पाऊस पक्षी. 'भरले सरिता समुद्र चहूकडे। परि ते **बापियासी** कोरडे।' -ज्ञा.१०.१८३. 'बेभान **बापुया** झाला, चोचीत झेलत पानी.'

बाप्पूजी (पु.) आदरार्थी संबोधन. 'तुमी कायले देता **बाप्पूजी**. आमची नोट घातली त्याच्या मढ्यावर.' -धग.३४.

बाप्या (वि.) वयस्क, बाप झालेला. 'तुया सांगळ्या **बाप्यालेई** समजू नोये हे? कमाल आये.'

बाफळे (पु.अने.) ज्वारीच्या पिठाचा वाफाळून केलेला पदार्थ. '**बाफळ्यासंग** तुरीची दाय, वांग्याची भाजी अन् ठेसा पायजे खायाले.'

बाब (स्त्री.) १. गोष्ट. '**बाब** पायली नासुकल्या च्याच्या पान्याची. या बसा. प्या इथंच.' -धग.१४. २. विषय, मामला, प्रकार. (अर.)

बाबत (अ.) संबंधी. 'सगाई **बाबत** बोलनं होयेल आये मामासंगं.' (फा.)

बाबळं (वि.) १. व्यर्थ, अबोल, वांझ. 'जातीसमोर सारे मंतर झाले **बाबळे**/ लागत नाई हाती किती रचा सापळे.' -जांग.५८. 'काय राजे हो आजकाल माई इद्याच **बाबळी** झाली.' -काळी.१९. २. अर्ध कच्चे. 'वरन शिजलं नाई पुरं, **बाबळच** आये आजून.'

बाबा (पु.) पिता, बाप. 'माये **बाबा** होयत ना आता गेले ते.' 'मले भात्कं आनलतं बजारातून बाबानं.' (अर.)

बाबीन (स्त्री.) शिलाई मशीनचा दोरा गुंडाळतात ती गोल डबी. '**बाबीन** मधला दोरा सुटल्यानं शिवणकाम थांबवाव लागलं.' -धग.९९२.

बाबुन्या (पु.) लहानग्याचे प्रेमळ संबोधन. '**बाबुन्यासाठी** भात्कं घ्या लागीन बाजारातून.'

बाबू (पु.) १. मुलगा. 'बाबू रे, दुकानातून गूई अन् च्यापत्ती आन बरं.' २. लिपिक. 'आपलाई **बाबू** कचेरीत **बाबू** आये ना!'

बाबूई (स्त्री.) बाभूळ. 'वाकळीतिकळी **बाबूई**, तिचा हिरवा हिरवा पाला/ तुकाराम पाटील मेला तं सखाराम पाटील केला.' '**बाबूईच्या** वनात काट्याची काय वान?'

बाबे (संबो.) मुलीचे संबोधन. 'पाय धुयाले पानी आन बरं **बाबे**.'

बाभरे (वि.) जाड ओठ. 'चाभऱ्या मान्साचे **बाभरे** होट.'

बाभळ (स्त्री.) बाभूळ, वृक्ष. '**बाभळच्या** इंधनाचे कोयसे साजरे पळतात.'

बाभळी (वि.) अर्धकच्ची. 'दाय तुरीची **बाभळी** त्यात मिरचिचा ठेचा.'

बाभूई(ळ) (स्त्री.) बाभुळी. 'कोळवीहीरीचेया वेसीदारा-समीप **बाबुळ** होतीः ...तीचा कांटा श्रीकरे मोडीलाः' -गोवि.१००. 'काय सुरतरू। म्हणोनि **बाबुळ**। सेविली करी॥' -ज्ञा.९.४७. 'परी सीनानिचि ते **बाबुळी**।' -ज्ञा.१८.२७२. 'तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाति। **बाभळा** राखती करूनि सार॥' -तुका.१७९२. 'आलो **बाभुईच्या** बनात, काटेच सावली नाही.'

बामन (पु.) ब्राह्मण. 'लगनाची घटका अन् **बामन** झाला फुटका.'

बामनचोद्या (वि.) अतिशहाणा. 'मले झऊ शिकोते **बामन-चोद्या**.'

बामनाच्याचोद्याची (वि.) उच्चकुलीन, एक शिवी. 'मांगटी-चमांगटी तीबी निर्मळपणा कराह्य पायते. अशी कोणत्या **बामणाच्या चोद्याची** हाय?.' -वा.१९७.

बामनी (वि.) ब्राह्मणी. 'मराठा असूनबी वामनरावचा बर्ताव, वागनं बोलनं **बामनीच** आय.'

बामनीन (स्त्री.) ब्राह्मण स्त्री. 'अव अवदसे तू काय **बामनीन** हायस कावं, राजनाले हातबी नाई लावू देत.'

बायकी(क्या) (वि.) स्त्रियांसारखा वागणारा. '**बायकी** गजा खटल्यात भांडे घास्याचं काम करते.'

बायको (स्त्री.) पत्नी. 'कधी आई त्याच्या **बायकोवर** कातावयाची.' -सेल.५०.

बायजा (स्त्री.) स्त्री. 'या आल्या **बायजा** आता, आमचं गास बसोयाले.'

बायतपन (न.) प्रसूती, बाळंतपण. 'पोरीचं पयलं **बायतपन** मायबापा घरीच होत असते.'

बायतीन (वि.) बाळंतीण. '**बायतीन** झाली सून, सासू गाते गून.' (का.बाणंति)

बायतिळा (पु.) बाळंतविडा. 'तिचं सारं गणगोत पोराले पायाले अन् **बायतिळा** घेऊघेऊ आलं.' -लेक.४७. '**बायतिळ्याकरता** यक सोन्याचा करदोळा आनून ठिवला.' -सित.७६.

बायना (पु.) निमित्त, कारण, बहाणा. 'गुलबासाचा **बायना** तुले बरा सापळते.' -काया. 'कामधाम जीवार येते. तो हा ना तो **बायना** सांगतच असते.' (फा.)

बायलबुद्या (वि.) स्वतःची बुद्धी नसलेला, बायकोचे ऐकणारा. '**बायलबुद्याची** अक्कल चुलीजोळच गहान पळेल अस्ते.'

बायला (वि.) नामर्द, बायक्या, षंढ. 'मानसात नाही म्हने तू हाय **बायल्या**.' -मिर्झा.१७८. 'नामावानी बायल्या थोळा आय, सम्दे गाठोळे नेतो पठ्ठ्या.' -धग.१८.

बायसिक्कल (स्त्री.) सायकल. 'येवजाव कऱ्याले **बायसिक्कल** घ्या लागते आता.'

बाया (स्त्री.अने.) स्त्रिया. '**बाया** गाठोळे घेऊन निंगतात घराकळे/ तुया पालवाची गाठ रोज मायासाठी अळे.' -वि. '**बाया** संध्याकाळी इजळेल आंब्यावानी चिमून जायच्या.' -निशा.२४४. '**बाया बाया**, गेल्या वाया.'

बायेलभोक्या (वि.) षंढ, भित्रा. 'जागलचं काम काय करीन वावरात, हा **बायेलभोक्या**.'

बार (पु.) १. फुलोर, बहर. 'दारी सेवंतीचे फुलं रातरानी बहरली/ येता **बार** पुसीन तं सांग त्याले सांगू काय' -वि. 'माघफाल्गुनात **बार** आल्यापासूनच त्या आंब्याला चेडे लागत.' एक. २. लोखंडी सळई. 'गच्चावर कठड्याचे बार बसवा लागतेत, लोखंडी.' ३. वेळी, खेपी. 'एक **बार** कोनीही माफ करीन चूक. दुसऱ्यानं कसी करीन.' ४. ? 'तिचं मन या गोष्टीला **बार** देत नव्हतं.

बारं (न.) शेताला पाणी देण्याची क्रिया. 'गव्हाले पंधाराक दिवसानं **बारं** धरा लागते.'

बारकशी (स्त्री.) बारा बंद असलेला अंगरखा. 'जुने म्हतारे लोकं **बारकशीच** घालत आंगात.'

बारका(कू) (वि.) काटकुळा, रोड, अशक्त. 'येवळा काहून **बारका** झाला रे खातपेत असतं का नाई?' (फा.)

बारकाई (स्त्री.) कंजुषपणा. 'खायापेयात काहाले **बारकाई** पायजे? का गाठोळं बांधून नेता सरगात.'

बारकावा (पु.) सूक्ष्म, महत्त्वाचा तपशील. 'तरी तेईच्या गोठीतला **बारकावा** माया लक्शात आल्ता रे.'

बारकी (वि.) १. कंजुषी, कमी. 'पुयनाची पोई, तूप कित्तीभी खा कोणत्याच गोष्टीत **बारकी** नायी.' -दि.७२. २. हडकुळी, कृश. 'सई लयच **बारकी** दिसून रायली एवढ्यात, का बा?'

बारकेचिरके (वि.) लहानसहान. 'जाड अन् लांब फोक अलग केले. **बारकेचिरके** अलग केले.' -पाटी.

बारगन (न.) बारी समाजाचा वेटाळ. 'मालं घरई **बारगनाले** लागूनच आय ना भौ.'

बारगळ (वि.) सैल, स्वैर बोलणारा. '**बारगळीचे** लेकी. आसच बोलतात का सासऱ्याले.' -ऊन.२०८.

बारगोळी (स्त्री.) सारखा मारा. 'सारखी **बारगोळी** केली तर मगदूर आहे ती इंगळी नांगी टाकणार नाही.' -कात.१२६.

बारचलवादे (वि.) कामुक, निढंगे. 'महालाएवढं घर, पन त्यातले मानसं **बारचलवादे** असले तं.' -पख.४८.

बारदाना (पु.) १. सामानसुमान. 'घरात अवघा **बारदाना** भरेल आये.' २. तागाचे पोते. '**बारदानाच्या** दोनतीन खाली चुमड्या घेऊन तो वसुली करायला निघाला.' -झेल.१७.

बारनी (स्त्री.) पाने विकणारी स्त्री. '**बारनी** व **बारनी** नवती दे नवती.' -वि.

बारनी (अ.) खेपी, वेळी. '**दुबारनी** पाय ठेव म्हना दरुजात, मंग दाखोतो त्याले गंमत.'

बारबंड (न.) नको ते गलिच्छ. 'दोघांना एकांतात बोलताना तिसऱ्यानं पाहिलं असतं तर त्याचं तोंड गावात **बारबंड** बरडलं असतं.' -कात.६५. 'दीनभर धाव, **बारबंड** आव.'

बारबार (अ.) नेहमी. 'त्या आपल्या सासासुनांच्या अवगुणाचे धुणे याच विहरीवर धुऊन **बारबार** वाळू घालतात.' -पख.४९.

बारंबार (अ.) वारंवार, वेळीवेळी. 'सांगूनसवरूनई तेच ते चूक कसी काय होते मनाव **बारंबार**?' (फा.)

बारमाही (अ.) वर्षभर, सतत. 'सातपुड्यातून शिवारात उतरलेला नाला तर **बारमाही** नितळकाच पाणी घेऊन वाहणारा.' -फीर.१८८.

बारव (स्त्री.) पायऱ्यांची विहीर. '**बारवे** जळमांडविए श्रीमुख प्रक्षाळीतिः' -ली.७५. '**बारवेच्या** काठावर तुझी भेट झाली होती.' -अ.१२.

बारस (स्त्री.) द्वादशी. 'आम्ही एकादसीचा दीसी चोरुनि जेउः आणि **बारसिचा** दीसी पारणे करुः' -ली.३३१. 'कालची **बारस** होती आज तेरसं.'

बारशिंग्या (वि.) बारा शिंगे असलेला काळवीट. 'हरनाईच्या कयपात एकच **बारशिंग्या** रायते.'

बारसं (न.) जल्माचा बारावा दिवस. 'ऐसा प्रसुति जालीः पुत्रु जालाः **बारसे** जालेः' -ली.३०. 'मग तीही **बारसे** केलेः रीधौरे बेलौरे जेववीलेः' -गोवि.९१.

बारादी (पु.अने.) बारा दिवस. 'पैसे ऱ्हावू द्या. **बारादी** झाल्यावर मले नेयाले या.' -रा.२१९.

बाराने (वि.) जुने बारा आणे. '**बाराने** देतं काय? अबे रूपयाच देनं सरकासरका.'

बाराबंदी (स्त्री.) बारा नाड्यांचा सदरा. 'हातामध्ये विना अंगी **बाराबंदी** कंठे तुळशीमाळा अभंगवानी तोंडी.' -रुक्मि.४३.

बाराबलुती (पु.अने.) शेतकऱ्याला साहाय्यक ठरणारे, उद्योजक, कामगार. '**बाराबलुत्या** माथंच गाव चालत असते.' (का.बाराबलूति)

बारावाटा (स्त्री.अने.) दाही दिशांनी, चौफेर. 'तैसें आत्मभ्रांतीसाठी। वस्तु विखुरली **बारावाटीं**।' -ज्ञा.१५.२९८. 'जरा भरली कनगी, तिच्या पायी **बारा वाटा**.' -वि.

बारिणी (स्त्री.) पानाचा व्यवसाय करणारी स्त्री, तांबोळी. 'सेवाभार **बारिणीला**, पानं पुरव पिकले, रोज रामाचे विड्याला.' -लोक.११.

बारी (पु.) १. पानाचे उत्पादन व विकणारी जमात. 'पान खाया शिकली, **बाऱ्याले** इकली.' '**बाऱ्यात** कोनीसुद्धा फारसं शिकत नव्हते सगळे पुरुष तांड्यातच राबायचे.' -पोर.१२.

बारी (स्त्री.) १. शेतात पाणी देण्याची पाळी. 'माझे पती आहेत संसारी भारी/ म्हनती हानतो मोट तू धर **बारी**.' -रुक्मि.३७. 'हातपाय गाऱ्यानं भरेल दिसतात. **बारी** धरून आले काय वावरातून? २. क्रमाने येणारी पाळी. 'पाहे पा दिवसु आघवा सरे। मग रात्रीची **बारी** उरे।' -ज्ञा.१३.६५४. 'येवळ्या **बारीनं** जाऊ द्या. पाया लागतो मेरबानी करा.' -फीर.१४०. 'मायावरचं राज फिटलं आता दिप्यावर **बारी** हाय.' ३. गायनाचा प्रकार. 'शामराव भाऊ, होऊ द्या पयले नमन धरतीला ही **बारी** म्हना.' ४. **बारी** म्हणजे नागोबाची पाटी. 'लाकडीबारीवर नागोबांच्या आकृत्या रेखलेल्या.' -सेल.२२०.

बारीक (वि.) पातळ, लहान, सूक्ष्म, नाजूक. 'सुईचं भोक लयच **बारीक** आय व? कसा घालू दोरा त्यात?' (फा.)

बारीकचिवळ (स्त्री.) एक भाजी. 'उन्हायात **बारक्या-चिवळची** भाजी थंडीगार रायते म्हून खातात पाय.'

बारीकशी (वि.) अतिलहान, सूक्ष्म. 'माया बोटात निरा **बारीकशी** सुयटी टोचली पाय.'

बारीकसारीक (वि.) किरकोळ, सटरफटर. 'घरातल्या **बारीकसारीक** गोठीत लक्ष कोन देईल राजा.' (फा.)

बारीन (स्त्री.) पाने विकण्याऱ्याची पत्नी. 'ती **बारीणला** जोंधळे देई अन् पानं घेई.' -धग.५१.

बारीनं (क्रिवि.) क्रमाने. 'सगळे काहाले सायबापुळे उभे रायता. **बारीनं** म्हन्नं मांडा आपलं.'

बारीबारीनं (क्रिवि.) क्रमाने. '**बारीबारीनं** एकेक झन घुसा देवळात.'

बारीश(स) (स्त्री.) पाऊस, वर्षा. 'मिरगात **बारीश** झाली का पेरनी सादते अन् पिकबी येते.' (फा.)

बारुलं (न.) कोळ्यांची अकोल्यातील बारा गावे. 'अख्ख्या **बारुल्यातले** मतं एका आंगच पळत अस्तात.'

बारे (संबो.) एक लाडिक संबोधन. 'काहून असा करतं **बारे** तू?'

बारोमास (अ.) बाराही महिने. 'जी जीः मज एकादसिः आम्हा **बारमासिया** एकादसिः मी न खाएः' -ली.३०५.

बाऱ्यात (क्रिवि.) च्याविषयी, संबंधी. 'लय मतलबी हाये माणसाची जात जनावराच्या **बाऱ्यात**.' -त.१३१. 'माया **बाऱ्यात** गन्याचं मत साजरं नाई.'

बाल (पु.) केस. 'माया डोक्स्याच्या **बालालेई** हात लावाची कोनाची हिमंत नाई.'

बालंट (न.) संकट, आरोप, आळ. 'तुई नथ गेली तं मायावर **बालंट** घेतं काय तू वैनी?'

बाल(लं)बाल (क्रिवि.) थोड्याने. 'काल राती वावरातून येता खेपी सरपावर पाय पळ्ळा. **बालबाल** वाचलो गळ्या.'

बालस्टर (पु.) १. बॅरिस्टर. 'परस्नाचं उत्तर परस्नात देनारा तू त लयच **बाल्स्टर** आये.' -मोती.३१. २. एक किडा. 'मानीले काय झालं रे. कायचे फोळं होयत. **बालस्टर** मुतलं वाट्टे लेका.'

बाली (स्त्री.) मुलगी. 'बंधू बोळवण, करी गंगासागर **बालीची**, हिंडे पेठ नगरीची.' -लोक.५०.

बालीग (वि.) वयात आलेला. 'मतदान त गळ्या तू **बालीग** झाल्यावरच करता यीन.' (फा.)

बालोरा (वि.) खोटा, लुच्चा. 'सुधीऱ्या लयच **बालोरा** हाय. काल म्हने पैस्याचं काम करतो, आता घरीबी नाई.'

बाल्टी (स्त्री.) बकेट. 'इरीतून पानी काहाळाले खिराळीवरून **बाल्टी** खाली सोळ्ळी.'

बाल्या (पु.) मुलगा. '**बाल्या** होय का लेक, कोन्त्या वरगात अस्तं गळ्या तू?'

बाव भरनं - वारे शिरणे. 'हरणं **बाव** भरल्यासारखे धुम्म पळत गेले.' -खुं.५१.

बावचळनं (क्रि.) बुजणे, दचकणे, बुजाडणे. 'पहिल्या दिवशी थोडं **बावचळल्यासारखं** केलं म्हशीनं.' -पख.४६.

बावटा (पु.) ध्वजा. 'पतित पुरातन, पुन्हा आज हा उंच धर **बावटा**.' -अ.११३. (का.बावटे)

बावडनं (क्रि.) गोंधळणे. 'कमशीलाच्या पोटी जशा **बावडल्या** तुम्ही, शीलवंताच्या पोटी चारित्र्याची मातबरी' -रुक्मि.९२.

बावंडळ (वि.) वेंधळी. 'त्याची **बावंडळ** बायको अन् तिचा पहेलवान भाऊ.' -ल.१३.

बावंडे (वि.) वेडपट, वेंधळे, उनाड, स्वैर. 'आजकालचे पोरं लय **बावंडे** झाले.' -त.४१.

बावतं (न.) तान्ह्यामुलाचे ढुंगणाचे फडके. 'तुह्या बायतपनाले त्यालेच ठिऊन घेजो. बस म्हना **बावते** धूत.' -ना.७८.

बावनकशी (वि.) शंभर नंबरी, सत्य, खरे. 'अन्वरशाचं गावावरील प्रेम **बाबनकशी** होतं.' -काळी.३१.

बावनचंदन (न.) चंदनाचा एक प्रकार. 'तापलेल्या तेलात **बावनचंदनाचा** थेंब उगाळून टाकला म्हणजे ते थंड होते.' -कात.४.

बावनचावरा (पु.) एक मुलुख, इलाखा. '**बावनचावऱ्याचे** देशमुख हा अधिकार फार जुण्याकाळी आम्हाला प्राप्त झाला.' -कात.२८३.

बावनची (स्त्री.) लहान बाभुळीची रोपे. 'मांगल्ल्या साली बकऱ्या वावरात बसोल्या तं औंदा **बावनच्याच** निंगल्या.'

बावनबावन (न.) १. वेळ काढुपणा. 'पटकन भरनं पानी, इरीवर **बावनबावन** का करून राह्यली तू?' २. न सूचण्याची स्थिती, विचार करणे. 'राती तुयावानीच मानूस होता रे असं म्हनता बरोबर सोप्या **बावनबावनच** करे.'

बावनी(न्या) (स्त्री.अने.) लहान बाभुळीची रोपे. ही इसबगोलावर इलाज म्हणून वापरतात. 'तासातासानं **बावन्याईनं** लय माजोन आनलं.'

बावरट (वि.) बावळट, वेंधळा. 'तुक्याची बायको निरा **बावरट** बाई दिसते.'

बावरटपना (पु.) वेडेपणा. 'रावजीनं **बावरटपनापायी** जमीनजुमला गमावला अवघा.'

बावरनं (क्रि.) घाबरणे, विचित्र प्रकारची कृती करणे. 'मंग मी **बावरल्यावानी** करो/ उतारात कासरे आवरल्यावानी करो.' -मिर्झा.१९३.

बावरली (क्रि.रूप.) घाबरली. '**बावरली** कशी मनी नवाट हरनी.' -भीक.८८.

बावरा (वि.) १. घाबरलेला. 'सरप दिसला तसा तो **कावराबावरा** हून गेला.' २. बावळट. 'त्या **बावऱ्याले**

वखर कसा जुतता यीन राजा.'

बावरी (स्त्री.) १. चौसर खेळातील शब्द. २. बावरलेली, वेडपट. 'लेकरू गेल्याच्यानं काशी एकदम **बावरी** हून गेली सुलू.'

बावरेल (वि.) घाबरलेला. 'नवाट गोऱ्ह भाऊ त्यात **बावरेल**, डमनी मोळेलोक पयत सुटलं.'

बावलं (न.) चित्र, बाहुले. 'का तणाचा **बाहुला**। जो आगरामेरे ठेविला॥' -ज्ञा.१८.४३८. 'पाय व सोनीची माय, तुया लेकीनं पाय कसं मस्त **बावलं** काहाळलं भीतीवर.'

बावलं (वि.) बावळट, वेडे. 'देव बावळा देव **बावळा**। भावें जवळा लुडबुडी॥' -तुका.१८५९. 'लळकोंडी आन्लं या **बावल्या** थुतराच्यानं मले.' -सित.१२७.

बावली (स्त्री.) बाहुली. 'बजारा चाल्ले तं मायासाठी एक **बावली** आनजा बाबा.'

बावळी (स्त्री.) देहयष्टी. १. 'भिमा आबा उघळेबंम गावातनी **बावळी** दाखोत फिरतात.' (इं.) २. विहीर. 'मयातल्या **बावळीले** डचांग पानी रायते.'

बावळी (वि.) वेडी. 'सुमन लयच **बावळी** पोरगी आये.'

बावा (संबो.) बापा. 'अरे **बावा**, माई गाय काहाले होय. ते तं ठानबंदी बांधेल हाय.'

बावाच्याना(वा)ना (संबो.) एक संबोधन. 'अहो **बावाच्यानाना** तुमी तं मले आसं सांगा लागले की मी लयच रिकामटवळा हाय.' -खुं.५४.

बावाजी (संबो.) संबोधन. 'वयानं मोठे आहा म्हून आमी मानपान ठेवतो तुमचा **बावाजी**!'

बाशीकुशी (वि.) शिळी वगैरे. 'गोदावरीच्या घरी जाजो अन् तिले बाई **बाशीकुशी** भाकर मांगून आनजो.' -फीर.१०१.

बाशिंग (न.) नवरदेव नवरीच्या कपाळावरील मुंडावळी. बैल आणि वर दोघे पृथ्वी अन् स्त्रीला सुफलित करणाऱ्या सामर्थ्याने युक्त असतात. पोळा आणि लग्नात ते दोघांनाही बांधले जाते. नवरदेवाचे तोंड झाकून जाईल असे कागदाचे सुशोभित टोप बाशिंग, द्विशिंग असेलेले प्राणी पौरुषाचे द्योतक आहेत. 'राघो नवरदेव यांच्या **बाशिंगाले** जाई/ नवरीसाठी परण्या जातो मेहकर गाई.' 'उतावळा नवरा, गुढग्याले **बाशिंग**.' (का.बासिंग)

बाशिंगबळ (न.) लग्नायोग्य स्थिती. 'काय बाई सुनंदा तुहं नशीबच फुटकं हाये. **बाशिंगबळच** जोरावर नाई तुहं.' -खुं.१३७.

बास (पु.) बांबू. 'ओले हिरवे **बास** आडवे टाकून निर्गुडीच्या पाल्यानं खड्डा झाकला.' -झेल.४९.

बासं (वि.) शिळे. 'बास्या पोळ्याचा चिवडा खासच लागते गळ्या.' -गय. '**बासं** वरन कळोलं का मस्त सुरूस लागते.'

बासंकुसं (वि.) शिळेपाते. 'उरेल सारं **बासंकुसं** तेच घेऊन जाऊ/ संगंमंग बराबर गपरगपर खाऊ.' -झाली.९.

बासकं (न.) गाठोडे. 'कपळ्याचं **बासकं** संगं मिरोल्यापेक्शा देऊ येखांद्याच्या घरी ठून.'

बासट (वि.) बासस्ट. 'तीन इसा अन् दोन म्हंजे **बासट** रूपये जमले धिकेधिके.'

बासन (न.) १. साधन, साहित्य. 'खोदकाम करायचे सम्दे **बासणं** इकडी आणा.' -बा.४१. २. दागिना. 'दोन हजाराचे तं **बासनंच** झाले नवरीचे.'

बासबन (न.) वेळूंचे जंगल. '**बासबनात** बसलेल्या सात बायांनी एकेकटीने उडून जावं.' -झेल.११.

बासरी (स्त्री.) पावा. 'जत्रेतून लेकराईनं **बासऱ्या** आनल्या अन् धूम वाजोनं चालू केल्या.'

बासल्या (वि.) सतत, खोटे बोलणारा. 'कायची सूद नाई त्याले, मजाका करत रायते **बासल्याखानीचं**.'

बासळा (पु.) वेळू, वासा. 'सपरीचा एक **बासळा** सळ्ळा वाटते, बदलून नवा घाला लागते तथी.'

बासा (पु.) बांबू. '**बास्याचं** येक सोयकं चारशे रुपयाचं भेट्टे.'

बासिंग (न.) मुकुट. 'गोविंदप्रभूनी **बासिंग** बांधलं अन् त्यांना विवाह प्रवृत्ती जाहली. त्यातून ढवळ्याची निर्मिती झाली.'

बास्कुटलं (न.) गठडी. 'एवळसक **बास्कुटलई** भारी होते काय गा तुले?'

बास्ता (अ.) नंतर. 'तुईशीच्या **लगनाबास्ता** लगन केलं तं आजच कपडे, डाग घ्याले पैसा पायजे.' -लेक.४.

बाहार (पु.) १. बहर. 'केवढा **बाहार** आला चिचीले पाय.' २. मौज. 'मामाच्या घरी आंबे खाची **बाहार** असते.'

बाहाळा(ळी) (वि.) लालपांढऱ्या ठिपक्याचा. '**बहाळ्या** गाईले पूजलं गाईगोंदनाच्या दिसी.'

बाही (स्त्री.) १. दाराची चौकटीची एक बाजू. 'दाराची **बाही** लोटनं जराशी.' २. शर्टाचा हात. 'सदऱ्याची **बाही** वधर कर आमासीक.' (का.बावलि)

बाहीर (क्रिवि.) बाहेर. 'रचिला म्हणऊनि **बाहिंरे**। पाऊल न घली॥' -ज्ञा.५.१०६. 'प्रेत **बाहिरे** घालिजे।' -ज्ञा.१०७. 'ओ पोट्टे हो पानी आना रे तवलीभर **बाहीर**.' -निशा. (अर.बाहिर)

बाहीरबाधा (स्त्री.) बाहेरची करणी. '**बाहीरबाधा** झाला त्याह्यले.' -सेल.६२.

बाळ(ळो)तं (न.) बाळाच्या ढुंगणाचे कापड. 'मी तं त्याले पश्याच म्हणाची **बाळत्यात** असल्यापासून.' -खुं.१८८.

बाळतकाढा (पु.) बाळंतीणीस द्यावयाचा काढा. '**बाळंतीन बाईले काढा** द्याच लागते माय.' (का.बाळंतिगे)

बाळनिंदन (न.) पहिले निंदण. 'कोवळ्या पऱ्हाटीला **बाळनिंदन** देण्यास बाया सांगितल्या.' -कात.१५७.

बाळबिस्तरा (पु.) सामानसुमान. 'पावने बॉचा **बाळबिस्तारा** सासूनच गोल केला.' (फा.)

बाळापुऱ्या (पु.) बाळापूर या गावाकडून येणारे आभाळ. 'चला रे अटपा लवकर. **बाळापुऱ्या** उठला. पाच मिनिटात येते पानी; हाना तिफन जोरात.'

बाळी (स्त्री.) कानातील अलंकार. 'पोराच्या कानात **बाळी** घाला लागते.' (का.बिल)

बांगडी(ळी) (स्त्री.) बिल्वर. '**बांगड्या** तशा तोरड्या हातिपायात/ घालूनि मिरवीले जिला चारचौघात' -भीक.३. 'सुवासीनीले लालजरद **बांगड्या** बऱ्या वाटतात.' (का.)

बांगरू (वि.) निर्बुद्ध. 'काय **बांगरू** पोरगं आहे रे हे.'

बांगा (वि.) तिरळा. 'लहूचा एक डोया **बांगा** आय.'

बांड (स्त्री.) दुष्काळी वर्ष, नापिकीची स्थिती. 'येनं गा शामराव काढनं खांड, तुही गेली **बांड**, बावा माही गेली बांड.' -दे.सोटे. 'ज्वारी **बांड** गेल्यामुळे चार मनही दाणे पदरात पडले नाहीत.' -कात.३१.

बांडगा (वि.) भ्रष्ट, उर्मट. '**बांडग्या** लोकाले भांडनतंट्यातच मजा वाटत असते.'

बांडबुहाऱ्या (वि.) अभद्र. 'आला का तू **बांडबुहाऱ्या**... उब्बगवानाच्या, निस्ता खेयेत रायते अन् फिरत बसते.' -सित.३५. '**बांडबोहाऱ्यावानाचं** हे पानीच कसं फिरलं.' -वि.

बांडा (वि.) १. शेपूट तुटलेला. 'म्हन्याले **बांडा** बैल, नांगरन्याच्या लय कामाचा आय.' २. आखूड, तुटका. '**बांड्या** बोटानं तिच्या मस्तकाला लेप लावत धीर देऊ लागला.' -एक.

बांडी (स्त्री.) १. आखूड. 'आता कुचीच आपून **बांडी** केली. त्यांची शेपूटच तोडली.' -सि.६४. २. टंचाई. 'कास्तकारायची **बांडी** पळली तरी नवकरीवाल्याचं खुळन सुरूच असते.' ३. धांड्याला कणसे न पडण्याची स्थिती. 'वांजेच्या मैथुना परी गेलें वांयां। **बांडेल्याचें** जायां जालें पीक॥' -तुका.२६२६. 'चारी मेरीवर **बांडी** पीक गेलं करपून' -वि.

बांडीश(स) (न.) बिनबाह्याचा आखूड अंगरखा. 'पन्नास रुपये **बांडसाच्या** खिशात खोसले तोच खिसा कापला होता.' -फीर.१८२. 'नेसे फाटकं धोतर, चिंध्या **बांडीस** सदरा.'

बांडुकला (पु.) मुसलमान. 'आमच्या गावात पाटील, बुद्ध, मांग हायत तरमा **बांडुकल्याईचं** येकबी घर नाई.'

बांडुकला (वि.) १. आखूड. '**बांडुकला** प्यान्ड घालून पावनेईत जाऊ काय?' २. लहान, ठेंगणा. 'या बांडुकल्याचा हात कसा काय पुरीन **डांगीलोक**?'

बांड्यापंचायती (स्त्री.) नसत्या चौकशा. 'मी सांगतो तेवढं कर नसत्या **बांड्यापंचायती** कराचं काम नाई.' -अंधा.

बांद (क्रि.रूप.) बांध, बांधणे. 'हे भोरी म्हैस खुट्याले **बांद**.'

बांदबंदिस्ती (स्त्री.) बांधण्याची क्रिया. 'पान्यापावसा आंदी वयनाची **बांदबंदिस्ती** करनं पळीन ना भौ.'

बांदर (न.) माकड, वानर. 'रंगाचा रंग बापा उधळून गेला/ धुईमाती खेयता **बांदरच** झाला.' -झाली.९.

बांदरतोंड्या (वि.) माकडासारखे तोंड असलेला. 'त्या **बांदरतोंड्यासंगं** बोलत नको जाऊ बाई तू.'

बांदरला (वि.) विचित्र, कुरूप, हलका. 'अहीर पाय कसा आनला निरा **बांदरला** बोंदरला.'

बांदरा (वि.) माकडासारखा. 'देखना आय म्हने पोरगा, चेरा पायला तं **बांदरावानी**.'

बांध (पु.) छोटे धरण. 'कर्माकर्माचे गुंडे। **बांध** घातले दोन्हीकडे।' -तुका.१३.४७. 'या पाटाच्या तोंडावर माती टाकून **बांध** घाला लागन.'

बांधजो (क्रि.रूप.) बांधशील. 'बैल आनून घरी खुट्याले **बांधजो**.' -जांग.४०.

बांधनं (क्रि.) बांधणे. 'आपलं नवं घर **बांधनं** सुरू आये पलाटात.'

बांधबुंध (स्त्री.) आवरासावर. 'लगेच जाऊन वाड्यात केलं **बांधबुंध/** इकडली गय तिकडे केली सांधसुंध.' -मिर्झा.१९०.

बांधाबांध (स्त्री.) सामान आवरणे, बांधणे. 'कपळेलत्ते **बांधाबांध** करून गाठोळे बंडीत टाकले.'

बांधेल (वि.) बांधलेला, हक्काचा. 'मी काई कोनाचा **बांधेल** नाई गळ्या. वाटलं तं जाईन, नाई त ना जाईन.'

बांध्याले (क्रि.रूप.) बांधायला. 'मी बैल **बांध्याले** वाळग्यात गेल्तो.'

बिक्कट (वि.) बिकट, कठीण. '**बिक्कटातलं** बिक्कट गनित काय असेना ते बराबर सोळ्ळच म्हून समजा.' -सित.८५.

बिगबाई (स्त्री.) कानातील एक अलंकार. 'डोक्स्यावर पोठं पागोटं, कानात **बिगबाया**, आप्पाजीले मस्त सोभत.'

बिगर (अ.) शिवाय, खेरीज. 'मी काय **बिगर** बलावल्या

त्याच्या गवानीतले धांडे सामरा करू?' -सित.२३. (फा.अर.अण्य)

बिगार (वि.) १. वेठीस धरलेला मजूर. 'केली रातरी दिवसा सतत **बिगार/** कधी नाही काम चुकार.' -भीक.१०५. (फा.)

बिगार (न.) चिल्लर काम. 'ठोकठोक नाई भेटलं तं मी **बिगार** कामबी करतो.'

बिगारभरती (स्त्री.) निकामी, जास्तीचे लोक. 'पावनेरावने न्याव, नाहाक **बिगारभरती** काहाले पायजे कुकाले.'

बिगारी (पु.) वेठीस धरलेला. 'मोठ्या वाळ्यात कई सालचा मी **बिगारी** म्हून राबतो.' (फा. बेगारी, त. बेगारि)

बिघळनं (क्रि.) बिघडणे. 'चालू टिवीत अस्या इचक काळ्या केल्यावर त्याले **बिघळनं** हायच.' (का. बिगडिसु)

बिघळबाघळ (न.) बिघडविणे. 'आपल्याले येत नाई ना तं, हात लावून कोनाची वसद **बिघळबाघळबी** करू नाई.'

बिघळोनं (क्रि.) बिघडविणे. 'केली **बिघडाबिघडी** आम्हां तुम्हां।' -नाथ.१३०१. 'कोनाचं होतं काम **बिघळोनं** लय खराब गोठ.'

बिघाळा (पु.) विचका. 'तीन तिघाळा म्हंजे कामाचा **बिघाळा** होनच आये.'

बिचकनं (क्रि.) दचकणे, बिघडणे. 'भक्तीगीताला **बिचकून** लावणीचे भोंगे चूप होतात.' -मोती. 'होता होता काम **बिचकलं** सायाचं.'

बिचकबाचक (न.) बिघडविण्याची क्रिया. 'कोन्तबी काम तुमाले **बिचकबाचक** करनं सांगावं राजा.'

बिचका (पु.) विचका. 'चांगल्या कामात **बिचका** आन्याचं काम नोतं तुमचं.'

बिचकाऊन (क्रि.रूप.) विचकावून. 'कोनाचं काम होत असीन तं झांगो **बिचकाऊन** देतेच देते.'

बिचकोनं (क्रि.) बिघडविणे, विचका, बिघाड करणे. 'गरिबाचं काम **बिचकोनं** बरं नस्ते भाऊ.'

बिचकोयेल (क्रि.रूप.) विचका केलेले. 'आमचा होयेल सौदा यानं **बिचकोयेल** आय.'

बिचवा (पु.) छोटा सुरा. 'खरपाच्या दगडांवर **बिचव्याला** धार लावायला बसला.' -एक.

बिचवे (पु.) मधातल्या बोटात घालाचा दागिना. 'सुमनसाठी **बिचवे** घ्याले सोनाराक्ळे गेल्तो.'

बिचारा (वि.) गरीब, असहाय. 'नापिकीनं **बिचाऱ्यानं** फाशी घेतली. येक पोरगंबी हाय लेक त्याले.' (फा.बे अ चारः आधार)

बिछाईत (स्त्री.) बसण्याची व्यवस्था. 'पावने येऊन रायले म्हनूनसन्या बैठकीत **बिछाईत** केली.' (फा.अर.)

बिछाना (पु.) अंथरूण. 'पावने बॉ **बिछाना** घालेल आये, आंगमांग टाका निचंताईनं.' (हिं.बिछौना)

बिजली (स्त्री.) वीज. 'अभाय भरून आल्यानं लाहान **बिजल्याहून** रायल्या.' '**बिजली** गेल्यानं अंधारघूप झालं सबन.'

बिजवर (वि.) विधूर नवरदेव. 'नवरदेव उमाइसे धाकुटीचि **बिजवरासी** दिधलीः' -ली.१२२. 'हीनवर **बीजवर** दोघी त्या गडणी। अखंड कहाणी संसाराची॥' -तुका.४४७१. '**बिजवर** असल्यानं कुणी पोरगी देईल की नाही ही शंका होती.' -मोती.३२.

बिजवाई (स्त्री.) बियाणे. 'बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजी सामाये॥' -ज्ञा.१७.५९. 'काकरात **बिजवाई** जसं हासरं चांदनं.' -काया.१. 'मिरूग लाग्याच्या आंधी **बिजवाईची** सोय लावून ठुवा लागते.'

बिजाई (स्त्री.) बियाणे. 'घरची राहे तं काई वाटे ना, आता **बिजाई** केवढी माहाग झाली.'

बिजागिरी (स्त्री.) इंजिस. '**बिजागिरी** तोळून दरवाजा उघळ्ळा माया देरानं अन् इकला कापूस.'

बिजामपट्टी (स्त्री.) मार खाण्याची वेळ. 'नाही त माह्यावर यायची **बिजामपट्टी**.' -बा.१०१.

बिटीबिटी (क्रिवि.) टुकूटुकू. 'येत्या जात्या वाहनाला **बिटीबिटी** पाहू.' -गाका.९. 'बायका स्टॅण्डवरच्या महामूर गर्दीकडे **बिटीबिटी** पाहत राहतात.' -खुं.१७६.

बिट्ट्या (पु.अने.) कणकीचे गोळे पाण्यात, तुपा तेलात तळून केलेला पदार्थ. 'रोडगे मस्त लागतात. हे काय **बिट्ट्या** म्हन्जे तेलातून काळलेले कनकीचे गोये.'

बितनं (क्रि.) आपत्ती, कठीण परिस्थिती येणे. 'आपल्यावर लयच **बितली** राजा. असं नोतं व्हा लागत लेकीचं.'

बितेल (क्रि.रूप.) ओढवलेले, संकट. 'जंगलातून जाता-जाता मायावरई भल्तीच **बितेल** आय एकदा.'

बितोनं (क्रि.) संकट आणणे. 'साध्यासरक्या मान्सावर अशी भल्तीच **बितोनं** साजरं नसते.'

बित्तंबातमी (स्त्री.) गुप्त, संपूर्ण खबर, बातमी. 'झाल्या प्रकारची **बित्तंबातमी** तिला आधीच कळली होती.' -धग.४. (का.बित्तु)

बित्ती (स्त्री.) खेळातील पाळी. 'राज आलं का **बित्ती** असं म्हनत जा लागते घटालोक.'

बिथरनं (क्रि.) रागावणे, संतापणे. 'बुढ्याले पिकात बैल दिसले का **बिथरून** शिव्याच देत राहे.'

बिथरेल (वि.) संतापलेला. 'जुव्यात मी हारल्यानं बुढा भलकसा **बिथरेल** आय.'

बिथरोनं (क्रि.) संतप्त करणे. 'उतार वयात म्हताऱ्याचं डोक्सं **बिथरोनं** आपल्याले नाई पटत.'

बिदा (स्त्री.) पाठवणे. 'नवरी **बिदा** झाली ताहा कुठी बापाचा जीव भांड्यात पळते.'

बिदाई (स्त्री.) रवानगी. 'पोरीच्या **बिदाईले** थांबा लागीन, मामा होना आपून तिचे.' (फा.)

बिदागी (स्त्री.) मानधन, बक्षिस. 'मांगाची ठरोयेल कमाई अल्लग अन् **बिदागी** भेटते ते अल्लग.' (अर.)

बिदागिरी (स्त्री.) निरोप समारंभ, बोळवण. 'दुपारी पाहुण्यांची **बिदागिरी** झाली.' -भं.६९.

बिदी (स्त्री.) रस्ता. '**बीदीनं** खेळते कोनाच्या गनपती/ गळा साखळ्या दुमती.' -लोक.५२. 'सबन **बिदी** गोद्र्यानं गाळगेबॉचा खराटा चाले साफसफाईले.'

बिद्या (स्त्री.) पाठवणी. 'गाळीचा वखत झाला वयनी खुसीराजी करा बरं **बिद्या** येसोंताले.' -सित.३६.

बिनअधारी (वि.) आधार नसलेले. 'मारुतीच्या पारावर उतरनारे सारेच **बिनअधारी**, पोरके जीव असतात.' -कावू.

बिनकामी (वि.) उपयोग नसलेली. 'हे **बिनकामी** पोट्टे अती काहाले उभे ठुले?'

बिनगी (वि.) चपटी, बसकी. 'त्याने पाण्यात बुडवून ठेवलेली तांब्याची **बिगनी** लहान घागर काढली.' -सेल.२९०. (का.)

बिनघोर (वि.) निश्चिंत. 'मिल्ट्रीमन गावात राह्यल्यानं सारे लोकं **बिनघोर** झाले.' -कावू. (फा.)

बिनदिक्कत (वि.) बेफिकीर, निश्चिंत. 'त्याईच्या हातात कशीबी जोडी द्या अन् तुमी गाडीत **बिनदिक्कत** आरमशीर नीजा.' -दि.१.

बिनफिक्री (स्त्री.) काळजी संपलेली स्थिती. 'तरी मले वाटे नाही **बीनफिक्री/** मोठ्याच्या शेताले लागली डिक्री.' -मिर्झा.१९२.

बिनसनं (क्रि.) न पटणे, संबंध बिघडणे. 'एवढा झोपून राह्यतं म्हंजे वडिलांशी काही **बिनसलं** वाटते?' -गय.

बिन(न्दे)ले (न.) हातातील बाळ लेणे. 'नातासाठी आजीनं मनगटी, हस अन् **बिन्दलेतन** केले.'

बिनाबोलानं (क्रिवि.) नकार न देता. 'खातं का नाई आता **बिनाबोलानं** आ?' -धग.५.

बिन्या (पु.) दरवाजा मजबूत ठेवणारा लाकडी भाग. 'दरवाज्याला **बिन्या** बसवाव्या म्हणून सुपा लाकूड कापायला बसला.' -सेल.२८.

बिफरनं (क्रि.) रागावणे. 'तिच्या बरोबरचे प्रकरण माहीत झाल्यापासून तो चांगलाच **बिफरला**.' -पोळा.

बिफरली (क्रि.रूप.) रागावली. 'नवऱ्याचं बोलणं संपताच बायको घरातून येत **बिफरली**.' -ए.१६.

बिफरून (क्रि.रूप.) रागावून. 'आबावर **बिफरून** पुना बुडीचा येड्याराग सुरू झाला.' -सित.२३.

बिफरेल (वि.) रागावलेला. 'आक्क्या **बिफरेल** हाय. त्याच्या तोंडापुळून नको येऊ मारीनगिरीन.'

बिबट्या (पु.) अंगावर काळे ठिपके असलेला वाघ. 'राती वाळग्यातलं एक बाकरू लांबोलं वाट्टे **बिबट्यानं**.'

बिबळ्या (पु.) ज्वारीचा पापड. 'भाजेल **बिबळ्यावर** तेल टाकून खाल्ल्या तं खमंग लागतेत.'

बिबा(ब्बा) (पु.) औषधी फळ. 'पाया जाला नारू। तेथें बांधला कापूरु। तेथे **बिबव्याचें** काम॥' -तुका.४३५५. 'काट्यानं कोरलं **बिब्यानं** भरलं। **बिब्याचा** काय डाग जातो।' -नाथ.१८४३.

बिबूड (न.) मुळापासून नष्ट करणे. 'हरायकुंदा बिबूड खांदून काढा लागते त्याबास्ता निंगत नाई.'

बिब्बी (स्त्री.) बुरख्यात राहणारी श्रीमंताची, मुसलमानाची सुंदर पत्नी. 'दाम करे काम **बिब्बी** करी सलाम.'

बिभरन (न.) पेरणीचे बी वगेरे. '**बिभरनाले** पैसा नोता म्हनून पिककर्ज काहाळलं.'

बिमार (वि.) आजारी. 'लय दिवसापासून **बिमार** हा ना तुमी. येखांद्या डाक्टरले दाखोना?' (फा.)

बिमारी (स्त्री.) व्याधी, रोग. 'कोन्ती **बिमारी** हाय याचं निदानच नाई लागून रायलं लेकाचं.' (फा.)

बिरडं (न.) गुरे बांधावयाचा दावणीचा दोर. 'गायीची पूजा केली मग सगळ्यांना दावणीच्या **बिरडातून** मोकळं केलं.' -खुं.२४३. (त.बिरूडै)

बिरवांग (न.) टोमॅटो. 'उलीउलीसे लालजरद **बिरवांगे** आनले चटनीसाठी.'

बिराणी (वि.) दुसरी, परकी. 'सगी राणी दूर झाली आणि बाजारबसवी ती **बिराणी** मात्र जवळ केली.' -कात.५४६.

बिरादर (पु.) नातेवाईक. 'नवरा बायको कामात गढल्याचं पाहून **बिरादर** आपापल्या पालाकडे वळले.' -सि.१४.

बिरादरी (स्त्री.) नातेसंबंधी. 'तांड्यातल्या तांड्यात लग्न म्हणजे **भाईबिरादरीत** शरीरसंबंध.' -मोती.

बिराना (वि.) परका. 'भीम्या बस एका जागी. **बिरान्या** जागी हिंडू नोको भूता खेतावानी.' -धग.१३

बिरी (स्त्री.) स्त्रियांचा एक अलंकार. 'कानातल्या **बिन्या** काढून पूजेच्या ताटात ठेवल्या.' -धग.३९.

बिरीसबिरीस (क्रिवि.) वणवण. 'असा जीव तुटते माहा

शिकेल सवरेल पोर **बिरीसबिरीस** हिंडताना पाहून.' -बा.१४६.

बिरेक (पु.) ब्रेक. 'तुमी दिसता बरोबर येकादमानं **बिरेक** लावला राजा.'

बिरोबा (पु.) धनगरांचा देव. 'धनगरलोकं वर्गनी करून रायले **बिरोबाच्या** देवळासाठी.' (का.बीरे देवरू)

बिऱ्हाड (न.) बिढार, प्रपंच. 'इचवाचं **बिऱ्हाड** पाठीवर.' (का. बिडार, बिराड)

बिऱ्हाडघर (न.) आश्रय, निवाऱ्याचे ठिकाण. 'झाकट पळ्ळी तसं **बिऱ्हाडघर** जोळ करनं बरं रायते.'

बिर्यानी (स्त्री.) पुलाव. 'तू दिंडीत चालला होता ताहा मी **बिर्यानीवर** मस्त ताव मारत होतो.' -वि. (फा.बिर्यानी)

बिलकूल (अ.) पूर्णपणे, अत्यंत, मुळीच, अगदी. 'तुहं म्हन्नं मले **बिलकूल** पटलं नाई.' (फा.अर.अण्य.)

बिलगनं (क्रि.) विळखा घालणे. 'धुऱ्याकून चालताना झिंगुळ्ळे आंगाले **बिलगनं** चालू झाले.'

बिलबिल (वि.) अति पकलेले. 'एवढा **बिलबिल** आंबा कसा खावावं रे?'

बिलंदर (वि.) बदमाश. 'ही गवंड्याची जातच मुळी **बिलंदर**. हाताशी म्हातारी नको. तरण्यापोरी हव्या.' -झेल.७७.

बिलाई (स्त्री.) काटेरी झुडूप. 'जाइमोगरा एक करा, **बिलाई** धोत्रा दूर करा.'

बिलांग (स्त्री.) पत्याच्या खेळात पान न पाहता लावलेले पैसे. 'नाऱ्या दाहाची **बिलांग** चाले तं हऱ्या पंधराची चाले.'

बिलामत (स्त्री.) आळ, अकस्मात आलेली आपत्ती. 'वाघांना मारल्यानं गाव उठण्याची **बिलामत** आली.' -झेल.८१. (फा.)

बिलायती (स्त्री.) एक काटेरी वनस्पती. 'धुऱ्यानं हे काय **बिलायती** लावली काय तुमीनं?'

बिलेट (न.) ब्लेड. 'दाळी कऱ्याले **बिलेट** नोतं तं तसाच गेलो दुकानात.' (इं.)

बिलोरी (वि.) काचेचे. 'शेज फुलाची जाईच्या, आत छपर पलंग, छत आरसे **बिलोरी**, महाल लाल रंग.' -लोक.१०३.

बिल्डं (न.) दोराची पुरवणी. 'बैल कितीबी हुशार झाले तरी ते आपल्या व्हटानं **बिल्डे** ऐसनीले बांधून घेणार नाहीत.' -खुं.४.

बिल्लस (वि.) वीत. 'पोट्टं पायलं त **बिल्लसभर** पन बापालेई भेत नाई बोहारं.' -धुम्म. 'हितभर पोट्टी म्हंते मैने प्यार किया/ **बिल्लसभर** काट्टं म्हंते दिल तुझको दिया.' -पाव.

बिल्लोर (पु.) बांगडी. 'मंग अंधारात बाई तुहा **बिल्लोर** फुटला.' -वि. 'वैनी, लगन घरी तुमाले **बिल्लोर** भऱ्याले बलावलं आय.' (फा.)

बिवड(ळ) (पु.) बिवड, आधीच्या पिकांपासून मिळणारे खत. 'आता श्रीकृष्ण वाक्यबीजा निवाडु। आणि संजय सात्त्विकाचा **बिवडु**॥' -ज्ञा.९.५३३. 'मुंगाचा पेराई **बिवळ** म्हनून साजरा फायद्याचा रायते.'

बिवाई (स्त्री.) बियाने. 'घर्ची **बिवाई** पेरतो म्हनलं तं तेबी वावरात वाकोल्या दाखोते आता.'

बिशाद (स्त्री.) १. हिंमत. 'रिती कशा खानदानी. **बिशाद** नोती पोराची बिडी ओढायची.' -मोती.३१. 'आपण आपलं नीट रस्त्यानं चालल्यावर कोणाची **बिशाद** आहे डोळा वाकडा करून पाह्याची?' -पाटी. २. चिंता, पर्वा. 'लोकांनी वेड्यात काढले परंतु शामाला त्याची खंत ना **बिशाद**.' -सेल.१५४. (अर.बिसात)

बिसं (वि.) सरसे. 'धनजीपेक्षा होतं माणिकवाडा **बिसं**, एका गोष्टीनं मात्र वाटे थोडं वन्नीसं.' -मिर्झा.२३.

बिसमिल्ला (पु.) मुसलमानी नाव, आरंभ. 'मुसलामन तं जेवताखेपी म्हंतात **बिसमिल्ला** करा.'

बिसमी (स्त्री.) दिमाख. 'मुलखाची **बिसमी**, तमाखू उसनी.'

बिसिनी (न.) एक फूल. '**बिसिनीच्या** फुलाप्रमाणे कोमल.' -लोक.४१.

बिसी (वि.) सरस. 'रायखेळवालीपक्षे हनवाळीची पाहेल पोरगी **बिसी** वाटते.'

बिस्त(स्ता)रा (पु.) अंथरूण. 'थकल्याभागल्यानं कई **बिस्तरा** टाकतो अन् कई आंग टाकतो असं झाल्तं मले.' (फा.बिस्तर)

बिस्तानं (न.) हे, ते. 'अमकं करू टमकं करू, फलानं करू **बिस्तानं** करू.' -गागा.

बिस्मी (स्त्री.) कमाई. 'पाटलाचं घोळं कामदाराची **बिस्मी**.'

बिहाडा (पु.) वृक्ष, फळ. 'मोह म्हनून चोरानं **बिहाडाच** जायला.' -मिए.७९.

बिळ्ळं (न.) गुरांना बांधण्यासाठी दोराचा समोरील भाग. 'जेणे बीरडे लावीले तो सोडी, तै सुटेः' -ली.५८८.

बिंडं (न.) १. तिफनचा एक भाग. २. जळावू लाकडाचा लहान भारा. 'ईस रूपयाले येक **बिंडं** इकलं का झाला आपला बजार.'

बिंडल (न.) पुडा. 'बिळीच्या एका **बिंडलावून** तो दोन बिंडलायवर आल्ता.' -सित.७४. 'दुकानातून एक सुताचं **बिंडल** देतं रे आनून?' -धग.९४.

बिंडा (पु.) गवताचा लहान भारा. 'गवताचा **बिंडाई** भारी वाटे एवढा तो गयाठला होता.'

बिंदले (न.) एक बाळ लेणे. 'बहिणीच्या पोटी जन्मला बाळ मोती/ सोन्याचे **बिंदले** घालीन मी त्याच्या हाती.' -लोक.९८. 'हातात केलेसे **बिंदले**, पायात केलेसे कळे.' -लोक.४४. 'तिने सोनारा हातून घडवून आणलेले सोन्याचे **बिंदले** नातवाच्या हातात घातले.' -कात.५३४.

बिंदी (स्त्री.) टिकली. 'नवरीननं **बिंदी** तं अशी साजरी लावली कपायाले की बसं. तिले दिसेबी शाबूत.'

बी (न.) बियाणे. 'की शेती **बी** विखुरीजे। परी पिकी लक्ष॥' -ज्ञा.१६.१००. 'एका **बिजा** केला नाश। मग भोगले कणीस॥ -तुका.

बी (अ.) ही, सुद्धा, देखील. 'खानी तशी बानी. आज्यानं तेच केलं **बापबी** करायला. पुढं **तुबी** कर.' -वा.४५०.

बीज (न.) १. बियाणे. '**बीज** तैसे फळ.' २. द्वितिया. 'आज तुकाराम **बीज** आये.' 'पोरीले न्याले **बीज** झाल्यावरच ईन.'

बीट (न.) एक कंद. 'पंगतीत काकळी, लिंबू, मुया अन् **बीटबी** होते.'

बीड (न.) शेतातील एक भाग. 'शेतातल्या धुऱ्यावर, **बिडात** बैल मनसोक्त चरत असलेले.' -पोळा.

बीद (स्त्री.) नवरानवरीची मिरवणूक. 'नवरदेवनवरीच्या **बिदांनी** त्यांना चांगली कमाई होऊ लागली.' -सि.१०८. 'राती नवरदेव नवरीनची **बीद** काहाळत मस्त डमनीतून.' (फा.)

बीळ (न.) १. भोक, विवर. 'ते सर्पचि करी **बिळी**। निरुंधला॥' -ज्ञा.१६.४१०. २. एक धातू. 'लोखंडी अवजार मजबूत रायते, **बिळाचं** कटकन मुळते.'

बुआ (पु.) साधू. '**बुआ** महाराजाचं गावात कीर्तन हाय संध्याकाई.'

बुकणा(ना) (पु.) भुगा, पीठ. 'हार्वेस्टरनं **बुकणा** करेल कांडोराचं चांगलं सेंद्रिय खत पळते.' -गाक.५७.

बुकणी (स्त्री.) पूड. 'ती आपल्या लेकरापुढं जवासाचं तेल अन् तिखटाची **बुकणी** मांडायची.' -धग.५.

बुकलनं (क्रि.) बुक्के मारणे. 'होगेची बायको तिच्या बारक्या पोराला **बुकलत** होती.' -त.१५.

बुकलून (क्रि.रूप.) तुडवली, मारली जाऊन. 'बैलाच्या लाथांनी म्हातारी चांगलीच **बुकलून** निंघाली होती.' -सेल.१०.

बुक्का(क्की) (पु.) बोटांची मूठ करून मारलेला ठोसा. 'मग लागले जुझोः ते भट **बुकीया** हाणतिः कोपरे हाणतिः' -ली. .१७४.

बुखार (पु.) ताप, ज्वर. '**बुखार** तं लयच चळ्ळा माय, आंगाचे निऱ्हा चटकेच लागून रायले.' (फा.)

बुगडी(ळी) (स्त्री.) कानातील स्त्री अलंकार. 'भोंडे कान कसे दिसतात व? काई **बिरीबुगळी** घालनं बैना.' (त.बोगलि)

बुगदा (पु.) बारीक पूड, चूर्ण. '**बुगदा** झाला खड्याचा आतल्या आत पुरा.' -मिर्झा.११६.

बुगदी (स्त्री.) चूर्ण. 'खाकरीची पिवळी **बुगदी** बोटानं दाबून चिलमीत भरली.' -झेल.१७.

बुचकई (स्त्री.) बुचकळी. 'बाइसांसि गळेया इतुके पाणी जालेः बाइसे नावेक **बुडकळो** लागलीः' -ली.३४७. 'जो **बुडकळी** दे तीते म्हणेतिः ''सचील स्नान जालेः'' गोवि.७८. 'वान नदीच्या काठानं घसरत गेला. **बुचकई** देली. त्याले मरयचा पट्ठा केला.' -रूख.४२.

बुचकन (न.) झाकन. 'कुप्पीचं **बुचकन** लयच पक्कं बसलं व, काढून दे बरं.'

बुचकनं (क्रि.) बुजणे, दचकणे. 'मले पाहून शिवा **बुचकला** अन् तसाच वापस फिरला.'

बुचकनी (स्त्री.) बुडी. 'जग चंद्रावार चाल्लं आपून गटारातच **बुचकन्या** घिऊन रायलो.' -धुम्म.

बुचकयनं (क्रि.) वरखाली करून पाण्यात बुडवण्याची क्रिया. 'पुरी घेतलीः काढलेयातु **बुडुकुळलीः** आणि खाओ लागलीः' -ली.२०.

बुचका (पु.) गुंता होणे. 'तुया केसाचा केवळा **बुचका** झाला वं, इचरतई नाईस का?'

बुचकांडी (स्त्री.) पाण्यात बुडवणे, गटांगळी. 'नदीच्या पुरातल्या धारीत तं अच्छक पोहेनकाराले **बुचकांडी** बस्ते.'

बुचकोनं (क्रि.) १. लक्ष विचलित करणे. 'बराबर ध्यानात येयेल होतं माया यानच लेकानं **बुचकोलं**.' २. पाण्यात बुडवून काढणे. 'घमिल्यातले कपळे घेऊन नदीत **बुचकून** काढले.'

बुचडा(ळा) (पु.) अंबाडा. 'तुह्या **बुचळ्यात** काल होता गुलाबी गजरा/ आता सुटेल मोकया सांगे रातचा नखरा.' -पाव. 'केसाचा **बुचळा** पाह्याले छान, त्यात उवाचं रान.' 'गळ्यात मण्यांची माळ केसाचा **बुचडा** बांधलेला.' -झेल.४. (त.मुडिच्चु)

बुचन (न.) झाकण. 'वॉकमनची **बुचणं** कानातून उपसली जातील.' -गाक.२६.

बुचळी (स्त्री.) लहान गाठोडी. 'हे मोठं गाठोळं मी उचलतो. तू हे **बुचळी** घे.'

बुचा (वि.) १. लहान केस असलेला. 'बाईच्या जातीनं **बुची** काहाले करावं मस्त केसं वाळू द्याव.' २. फांद्या छाटलेला. 'लिंबाच्या झाळाचा येवळा छाट काहाळला. झाळ निऱ्हं **बुचं** करून ठुलं.'

बुचाडून (क्रि.रूप.) बुडवून, फसवून. 'त्याने आतापर्यंत धन्याला मन मानेल तसे **बुचाडून** चमन उडविली.' -कात.२४.

बुचूबुचू (क्रिवि.) विपुल, भरपूर, खूप. 'आपरेशन केलं नस्त तं डुकरीनीवाणी **बुचूबुचू** पैदास करून ठेवली आस्ती तुमी.' -खुं.१०९.

बुच्चा (वि.) निच्च, खालचा, हलका. 'गावात उच्च्या जातीचा **बुच्च्या** जातो तस्याचा द्वेष करतो.' -खुं.१५३.

बुजगावनं (न.) मडके, कापड घालून शेतात उभारलेले मनुष्याकृती सोंग. 'तृणाचे **बुजवणे**। आंदोळे वारेगुणे।' -ज्ञा.१३.५६९. '**बुजगावणे** चोरा। रक्षणसें भासते।' -तुका.४५.२. (का.बेच्चु)

बुजबुज (क्रिवि.) जास्त. 'टॅक्टराची काई वान नाई रायली, **बुजबूज** झाले जथीतथी.'

बुजरूक (वि.) अनुभवी, वृद्ध. 'एक **बुजरूक** माणूस पंक्तीतून हिंडत सूचना देत होता.' -डेबू.४३. (फा.)

बुजाडं(ळं) (वि.) बुजणारा. '**बुजाड्या**, इचक्या, मारक्या, लाथझाड्या कसाही अवगुणी बैल, हात फिरवला की शांत.' -जटा.९.

बुजाळनं (क्रि.) १. बुजणे, भिऊन दचकणे. 'तंव सापु आलाः तेयाते देखौनि वासरु **बुजालेः**' -ली.४१५. 'मांगून हाल्या आल्यानं म्हैस **बुजाडल्यासारखी** झाली.' -पख.४६. २. बुजगावणे. 'पोलीस खातं म्हन्जे शेतातलं **बुजाडनं**, काम त्याहीचं एकच गरिबाहीले खेदाडनं.' -ऊ.९.

बुजाळले (क्रि.रूप.) दचकले. 'पायातले जोळे वाजू नाई देले/ बावाजीचे नंदी पाणी पेता **बुजाळले**.'

बुजाळून (क्रि.रूप.) बुजून, भिऊन, घाबरून. 'आणि होकारुनि उठीतिः तीया गाइ **बुजौनि** पळेतिः' -गोवि.६०. 'बकऱ्याईनं धूम ठोकली **बुजाळून** पयत सुटल्या गावा आंगं.' -सित.४८.

बुजुर्ग (वि.) १. श्रेष्ठ, प्रतिष्ठित. २. वयोवृद्ध. 'माणसानं **बुजुर्गाना** मान त द्यावा पन तोंडबोलल्या पुरता.' -काळी.८६. (फा.)

बुझाडलं (क्रि.रूप.) बुजले, भ्याले. 'भविष्याच्या भेवानं मन माहा **बुझाडलं**.' -मिर्झा.१४६.

बुटका (वि.) ठेंगू. 'घरच्या बैलाच्या मानानं हा बैल **बुटका** झाला लेकाचा.'

बुटलं (न.) तुपा, तेलाचे लहान भांडे. 'नवरदेव निघताना कमलानं तेलाचं **बुटलं** आणून उंबरठ्यावर ठेवलं.' -ना.३६.

बुटली (स्त्री.) तेलाचे लहान भांडे. 'माय माय माय, पाय व चंपीनं **बुटलीभर** तेल उलंडलं बैना.'

बुटी (स्त्री.) बैलगाडीच्या पुढे लावण्याचे लाकडी खुटे. 'गाड्याचे धुरे, उभार पाटल्या, बाह्या, **बुट्ट्या** पायजो रस्त्यात वांदा नको.' -दि.१२.

बुड(ढ)ई (स्त्री.) जमिनीत पडलेली भेग. 'ठायन्यात पानी दाटे **बुडईत** दांड वाहे.' -रूख.

बुडगं(गा) (वि.) १. म्हातारे. 'रात दिवस खोकलत रायते **बुडग्या** खानीचं.' २. वडील. '**बुड्यानं** च्या घेतला काय वऽऽ? आपला बाप हाय ना तो चागलं लक्श देत जाय.'

बुडता (वि.) बुडणारा. 'मग **बुडतयाचा** धावा। जीवे केला॥' -ज्ञा.१८.२८८.

बुडपाणी (न.) तळातील जिवंत झरे. 'जुनी विहीर होती. जी कधीच आटायची नाही त्या विहिरीला **बुडपाणी** होतं.' -खुं.१९८.

बुडबाकी (स्त्री.) बुडीत, तोट्याची. 'मालक सोता राबत आसन त खेती चालते नसन तं **बुडबाकी**.' -दि.६९.

बुडबुडा (पु.) वर्तुळाकार, पोकळ पाण्यावरील फुगारा. 'मग केवळ देहखोडा। अमेध्योदकाचा **बुडबुडा**॥' -ज्ञा.१६.३१७.

बुडवो (क्रि.रूप.) बुडवत असो. 'एकमेकाच्या टोप्या डोबऱ्यात **बुडवो**.' -मिर्झा.४९.

बुडी(ळी) (क्रिवि.) तळाशी. 'आणि तेणे बुडि सीते उरली होतीः' -ली.३५. 'दाय **बुळी** लागली वऽऽ शांते.'

बुडी(ळी) (स्त्री.) डुबकी. 'सकाऊनच नदीत येक **बुळी** घेतली का झाली आंगोळ.'

बुडूख (न.) तळभाग. 'बीज न पेरावें खडकीं। ओल नाहीं ज्याचे **बुडखी**।' -तुका.२२८०. 'हातातल्या फोकाचे **बुडुखं** खालून धारदार कोयत्यानं छाटले.' -पाटी.

बुडून (क्रि.रूप.) डुबून. 'का **बुडोनि** प्राण गेले। ते अधरदकी निमाले॥' -ज्ञा.१८.१९४.

बुड्या (स्त्री.अने.) जमिनीला पडलेल्या भेगा. 'मिरगातलं पयलं पानी मुरतोनी झालं का **बुड्या** बुजतात.'

बुढकलं (न.) म्हातारा माणूस. '**बुढकलं** हागाले रस्त्यावरच बस्ते. थोळसक पुळेबी जात नाई.'

बुढकली (स्त्री.) १. म्हातारी. 'तुया **बुढकलीची** बाज राती कुरकुरत होती.' -वि. 'माई **बुढकली** काल राती जागरनात आल्ती ना?'

बुढा(ळा) (पु.) १. बाप, वडील. 'आमच्या घरात **बुढ्यामवरे** कोनीच बोलत नाई.' २. म्हातारा. '**बुढा** बकन बकन आन तोंड थकलं म्हंजे आपलमती चूपचाप बसनं.' -धग.९७.

बुढापा (पु.) म्हातारपण. 'येक डाव **बुढापा** आला का

मान्साच्या इकून काई होतई नाई अन् कोनी आइकतबी नाई.'

बुढाबुढी (स्त्री.) आईवडील, म्हाताराम्हातारी. '**बुढाबुढी** मेलती एकटाच होता संट्या/ गावात फिरे डरकत जसा भिलाचा तंट्या.' -मिए.१५१.

बुढी(ळी) (स्त्री.) १. आई. 'म्या बायकेले सांगलं. माया **बुढीपुढे** अवाज कराचा नाई.' २. म्हातारी. 'मायी आजी आता लय **बुढी** होयेल आये.'

बुढीचं खाटलं (न.) आकाशातील सप्तर्षी. 'बाजीवर पळल्यापळल्या मी **बुढीचं** खाटलं पायेत रायतो.'

बुण(न)गाळ (स्त्री.) भणभण. 'बऱ्या घरची पोरं मानधनाचं **बुणगाळ** मागे लावणार नाईत.' -ल.२४. 'जा. इथच **बुणगाळ** नका लावू.' -बा.७१.

बुदला (पु.) चाकाचे आरे खोचतात ते गोल लाकूड. 'कोंडबा मामा, गाड्याचे निस्ते चाकं पाहू नको, आरे, पुठ्ठे, **बुदल्यात** पक्के हाय का नायी थे पाय.' -दि.१२.

बुदली (स्त्री.) तेलाची डबकी. 'अबे त **बुदली** घेनं संग, तेल काय तोंडात आन्सीन लेका?' (का.बुद्दलि, बुद्दलिगे)

बुद्दू (वि.) मूर्ख. 'येवळं साजरं वावर पळीत पाळ्ळं लेकानं **बुद्दू** हाय लेकाचा.' (अर.बदू- गावंढळ)

बुधला (पु.) १. तेलातुपाचे भांडे. 'चंदन बेलाचे लाकडं, तेलातुपाचे **बुधले**.' -लोक.३३. 'सुनेच्या निमित्तानं घरी तुपाच्या तावण्या, तेलाचे **बुधले** पोहेचवले.' -मोती. २. चाकाचे आरे तोलणारे गोल लाकूड. 'मोडक्या चाकाच्या **बुधल्यातून** झटाझोंबी करून आरेपाटे बाहेर काढले.' -बा.१३२.

बुनकर (पु.) विणकाम करणारी जमात. 'अचलपुरले **बुनकराईची** मोठी वस्ती आय.'

बुबा (स्त्री.) आत्या, वडिलांची बहीण. '**बुबा** तुही सिंधू देसीन त मी बायको करते तिले.'

बुबूई(य) (न.) बुबूळ. 'जिव्हे आपली चवी चाखणें। चक्षू निज **बुबुळ** देखणें॥' -ज्ञा.२७२.

बुरं (न.) बाईट. '**बुरं** काम झालं सायाचं. असा हरबरा आल्ता डांगोडांगी अन् गारगोंडच झालं लेकाचं.'

बुरगुंडा (न.) तान्हुले. '**बुरगुंड्याची** माय व भाकरभाजी देव.' असं म्हनत पारधीन गलोगलीनं हिंडे.' (ते.बूल)

बुरबुंडे (पु.) कपड्याचे निघालेले तंतू, वळ्या. 'मनील्याचे **बुरबुंडे** निंगले इस्तरी करा लागते वाट्टे.'

बुरशी (स्त्री.) बुरा. 'किती रोजाची भाजी आये व हे. पायनं कशी **बुरशी** चहळली सारी.' (का.बुजू)

बुरा (पु.) - ? 'आंब्याच्या डांगीले धरून कस्सा **बुरा** पायजेन.' -दि.३. '**बुरा** असणारा, आखूड शेपटीचा बैल शंकररावच्या गोठ्यात दिसणार नाही.' -जटा.९.

बुराई (स्त्री.) निंदा करणे. 'कोनाची **बुराई** आपून काहाले कराव राजा, जो तो आपल्या निशिबानं खाते.'

बुराट (वि.) वाईट. 'चोरी एकदम **बुराट** गोठ भाऊ.' -डेबू.६७.

बुरांड (वि.) १. अतिशय वाईट. 'दुसरं लग्न करणं बुऽऽबुऽऽ **बुरांड** गोष्ट आहे रे भोऽऽ' -गय. २. खूप जास्त. 'पऱ्हाट्या **बुरांड** पिकल्या औंदाच्या साली.'

बुरी (स्त्री.) सरकीची एक जात. 'तव्वा सरकीच्या इतल्या जातीभी नोत्या. **बुरी** नायी तं जरीला.' -जटा.३४.

बुरी (वि.) वाईट. 'बरं तर बरं नाही तर केवढी **बुरी** गत व्हती.' -रा.२२३.

बुलं (न.) गोलाकार कुंपण. घरासमोरच्या मोकळ्या जागेत काट्याकुट्याचं **बुलं** दिसलं.' -एक.

बुलंद (वि.) १. कायम, चढता. 'येसोंता आपल्या सैनिकायचा हवसला **बुलंद** ठेवत व्हता.' -सित.३९. २. मोठा. 'आप्पाचा आवाज केवढा बुलंद आये.' (फा.बलन्द)

बुलाखं (पु.) घोड्याचा संयोग टाळण्यासाठी घोडीच्या योनीवर ठेवलेले आवरण. 'माजेल घोळं असलं का घरच्या घोळीले **बुलाखं** बांधाच लागते.'

बुलावा (पु.) आमंत्रण, बोलाविण्याची क्रिया. 'रायाला कोनी तरमा **बुलावा** पाठवा.'

बुलूट (न.) नटबोल्ट. 'वखराची पाटली फाकू नाई म्हून सुतारानं **बुलूटानं** फीट करून देल्ली.' (इं.बोल्ट)

बुल्ला (पु.) शिश्न. 'माहेच पैसे मांगाले गेलो तं म्हने घे माहा **बुल्ला**.'

बुल्ली (स्त्री.) लहान मुलाचे शिश्न. '**बुल्ली** धरून मुत्तं काय बाबू माया सामने?'

बुवा (पु.) महाराज, साधू. 'भगत **बुवा** डाफरे वाटे नाही सरम.' -मिर्झा.४६.

बुवाजी (संबो.) आदरार्थी संबोधन, साधू. '**बुवाजी**, चला ताट वाळ्ळं.'

बुहाऱ्या (वि.) अभद्र, लाडीक शिवी. 'या पोरी पानी नेतात दोन घागरी पन सांडतातच जास्त **बुहाऱ्यावानाच्या**.'

बुहारबटक्या (वि.) एक शिवी. 'आरे **बुहारबटक्याईहो** मपला जयजयकार काऊन करता रे.' -त.१२८.

बुहारा (वि.) अभद्र, दुर्दैवी. 'आपला जलम काय घोराघोरात जाईन **बुहाऱ्यावानाचा**.' -अंधा.

बुळनं (क्रि.) मावळणे, डुबणे. 'पोयनं नसलं का मामाभाशाच्या डोवात तं **बुळनं** हायच मंग वारीले.'

बुळबुळ (क्रिवि.) संख्येने अधिक. '**बुळबुळ** वाढणाऱ्या वावरातल्या उंदराईले ते सापच गळेगूप करतात.' -खुं.२२.०

बुळीत (क्रिवि.) नुकसानकारक, बुडालेला. 'राजकारनाच्या मांगं लागून कारभार **बुळीत** निंगला.'

बुळूख (न.) झाडाचा तळभाग, मूळ. 'जैशा खांडुनिया शाखा। मग तयाचिया **बुडुखाचे** कुंप किजे।' -ज्ञा.१३.२१८.

बुळूबुळू (क्रिवि.) हळूहळू, मंदमंद. 'अंगणात लिंबाचा फुलोर **बुळूबुळू** गळून पडत होतो.' -त.१३०.

बुंद (पु.) थेंब. 'झोंबू नोको तान्ह्या थानी नाही **बुंद/** कुस झालं बेईमान, उगा रे माझ्या गोईंद.'

बुंदका (पु.) ठिबका. 'वकिलाच्या गळ्यात सुबक **बुंदक्याचा** गळपट्टा, पोशाख उंची होता.' -कात.४२५.

बुंदडपणा (पु.) बारीकी, कंजुषी. 'माय कशाला करतं व हा **बुंदडपणा**?' -रा.१५३.

बुंदा (पु.) एक स्त्री अलंकार. 'लग्नात हरवला कानातला **बुंदा**.' -मिर्झा.११३.

बुंदी (स्त्री.) गोड, तळीव एक खाद्य पदार्थ. 'गावाले मस्त पंगत द्या नानमुकाची **बुंदीची**, लगनाची वरनभाताची.' -काळी.९३. (त.बूंदी)

बुंधा (पु.) मूळ. 'झाळ गांडपाल्यासहित तोळाले घे नाई तं **बुंधा** तसाच ठुशील.'

बूच (न.) झाकण. 'भाजीची तऱ्हीच पेसील तं **बूच** निंगील बाबू मांगलचं.'

बूड(ळ) (न.) तळ, तळाचा भाग. 'आणि तेणे **बुडि** उरली होतीः तो पाउनि तारप्रसादु घेतलाः' -ली.३५. 'रांजणाचीए **बुढी** उरले पाणी तेया आंतु गोसावी श्रीकर श्रीमुख प्रक्षाळीलेः' -गोवि.२३. 'पाहे पां आंरभीं बीज एकलें। मग तेंचि विरूढलिया बुड जाहालें।' -ज्ञा.१०.९८. 'ठाव नाहीं **बुड**। घरे वसविसी कुड।' -तुका.१८०७. 'धंद्यापान्यासाठी फिरस्ती करा पण कुठीतरी **बुड** टेकवाच.' -सि.७३. (का.बुड)

बूड(ळ) लागनं (क्रि.) १. करपणे. 'पाणी आटल्यामुळे गंजाला **बूड लागलं**. वरणाचं खरळ झालं.' -ना.२५. २. संपणे. 'भाजीले तं **बूड लागलं**, काय वाढान आता?'

बूद(ध) (स्त्री.) बुद्धी. 'तूतं यशोदा म्हननं बाई/ तुया किसनाले सांग **बूध** काही.' -लोक.९७. 'गू खायाची **बूद** नाई लेकाले अन् मले शिकोते.' (अर.)

बे (उप.) अभाव, नकार, निषेध दर्शक उपसर्ग. पूर्वपदी येऊन अनेक सामासिक शब्द होतात. (फा.)

बेअकली (वि.) बुद्धी कमी असलेला. '**बेअकली** मान्साले रातभरबी समजून सांगलं तरमा तो आइकत नाईच.'

बेअक्कल (वि.) कमी बुद्धी असलेला. 'मूर्ख शिकलासवरला नाई, रतन **बेअक्कलच** रायला लेकाचा.'

बेअदब (वि.) असभ्य, अशिष्ट. 'दिनकरचं लायनं पोरगं निव्वळ **बेअदब** आये.' (फा.अर.)

बेअदबी (वि.) बदनामी, अपमान. 'मरावं पन आपली **बेअदबी** हू ना द्यावं.'

बेअधार (वि.) आधार नसलेली. 'सासुरवासीन निऱ्हा **बेअधार** होते नंदचा तोरा, सासूचा पारा अन् घरधन्याचा मारा.' -लेक.१७.

बेअबरू (स्त्री.) नाचक्की, बेइज्जती. 'बाईची भानगळ मान्साची **बेअब्रू** करते.'

बेअसर (वि.) परिणाम न होणारे. 'दवा घेऊन फरक पळ्ळा नाई. **बेअसर** निंगली ते.'

बेआबरू (वि.) बदनाम, अपमानित. 'घरात नाई येऊ देल्लं तं केवढी **बेआबरू** हून गेली.' (फा.)

बेइज्जत (वि.) इज्जत नसलेला, अप्रतिष्ठित. 'दोन पिळ्यापासून आमी पाऊन रायलो ना. लय **बेइज्जत** घर हाय ते.'

बेइज्जती (स्त्री.) अपमान, मानहानी. 'हाल्या विकला असता तर चांभारानं आपली केवढी **बेइज्जती** केली असती.' -पख.

बेइन्साफी (स्त्री.) अन्याय. 'मोठ्याले पंधरा अन् मले अकरा एक्कर, हे तं लेक **बेइन्साफीचं** झाली मनाव.'

बेई (स्त्री.) वरच्या टोकाला दोन फाटे असलेली काठी. 'छळी नोती तं म्हतारा **बेई** धरूनच चाले.'

बेईमान (वि.) कृतघ्न. 'अरे खाल्ल्या मिठाले तरमा जागाव रेऽऽ येवळं **बेइमान** ना व्हाव मान्सानं.'

बेकदर (वि.) दया नसलेला. 'व्याजाच्या दरात गरजूच्या घरावरून **बेकदर** नांगर फिरवता तुम्ही.' -कात.४४६. (फा.)

बेकदरी (वि.) कठोर, दयामाया नसलेला. 'निमीचा सासरा निऱ्हा **बेकदरी** मानूस आये.'

बेकसूर (वि.) निर्दोष. '**बेकसूर** असूनबी मले फसोलं खुनाच्या गुन्ह्यात.' (फा.)

बेकाबू (वि.) निरंकुश, स्वैर. 'नवाळे गोऱ्हे **बेकाबू** झाले तं झ्याट आवरत नाहीत कोनाले.' (फा.)

बेकाम (क्रिवि.) १. विनाकारण. '**बेकाम** आलो राजे हो तुमच्या घरी. तुमी वयखत नाई म्हन्ता?' २. काम नसलेला. 'अबे तं ज्याले कामधाम नाई तो **बेकाम** हिंडत रायते गावभर.'

बेकामी (वि.) १. कामाचा नसलेला. 'कुऱ्हाळ बथ्थळ झाल्यानं **बेकामी** आये ते.' २. खराब झालेले. '**बेकामी** वसद घरात ठुल्यापेक्शा भंगारवाल्याले इकून टाकावं.'

बेकायदा (पु.) कायदे भंग. 'कोनाचा वटा खसोनं हे तं **बेकायदाच** काम झालं मनावं.' (फा.)

बेकार (वि.) निरुद्योगी, वाईट. 'आजकालचे शिकेल पोट्टे **बेकार** रायतात अन् फिरतात गल्ल्या हुंगत.' 'शालक्याचा दिन्या एकदम **बेकार** पोट्टा आये.' (फा.)

बेकारी (स्त्री.) बेरोजगारपणा. 'गावात काई काम नाई समदी **बेकारीच** हाय.' (फा.)

बेकी (स्त्री.) फूट, बेबनाव. 'गावात **बेकी** असली तं गाव नासते, एकी पायजे.'

बेकूब(फ) (वि.) निर्बुद्ध, मूर्ख. '**बेकूब** हाय का राजे हो मी, माई बईन अशा बेवळ्याले द्या म्हनता.' (फा.)

बेकुबी (स्त्री.) मूर्खपणा. 'मोठी **बेकुबी** झाली. अशा पोरीसंगं सोयरिक नोती करा लागत होती.' (फा.)

बेखबर (वि.) गाफील. 'लोकं बातन्याबातच डाव सादतात आपूनच **बेखबर** असता कामा नाई.' (फा.)

बेगड (वि.) चमकते आवरण. 'पोयाले बैलाच्या शिंगाले **बेगड** मस्त दिसते.' (त.बेगडम्)

बेगडी (वि.) नकली, खोटे, दिखाऊ. 'खुल्लमखुल्ला मानूस पुरला. **बेगडी** लय घातकी बावा!'

बेगनी (पु.) टेकू, ठुणी. 'भितीनं जागा सोडल्यानं घर सागाच्या फाट्याईच्या **बेगन्यावरतं** कस्स तरी ऊभ हाये.' -दि.७७. '**बेगन्यांचा** आधार घेऊन वाडा उभा. खोल्यांवरील कौलं वाऱ्यानं उडालेली.' -जटा.२६.

बेगमी (स्त्री.) तरतूद, संचय. 'घरोघर मोहाची **बेगमी** करण्यात बाया गुंतल्या.' -झेल.१२. 'रात्रीच्या भाकरीची **बेगमी** जमली तर जमली म्हणून बाया गावात गेल्या.' -सि.४०.

बेगळ (न.) चमकीचे आवरण. '**बेगळही** पीवळं आणि सोनेही पीवळेः' -ली.४५४.

बेगार (स्त्री.) कमी पैशात काम करून घेणे. 'जमीन ना जुमला, कसीही **वेठबेगार** करून पोट भरा लागते.' (फा.)

बेगारी (वि.) वेठीस धरलेला. 'तू लेका **बेगारी**, सोताले काय मालक समजतं काय?' (फा.)

बेगुना (वि.) गुन्ह्यापासून मुक्त, निरपराध. 'मी **बेगुना** साबीत झाल्यानं सहीसलामत सुटलो.' (फा.)

बेगुमान (वि.) उन्मत्त, बेपर्वा. 'दाम्या लयच **बेगुमान** आये, सांगूनई आयकत नाई थो.' (फा.)

बेचव (वि.) चव नसलेले. 'पानी जास्त टाकल्यानं भाजी निऱ्हा **बेचव** लागून रायली.'

बेचा (पु.) मध्य, फट, फास. 'गोठीगोठीत सदूले बराबर **बेचात** पकळलं म्या.'

बेचारा (वि.) दुःखी, असहाय. 'बिमारीनं लय घांगायला **बेचारा** अपकेबाऱ्या.' (फा.)

बेचिराख(ग) (न.) उध्वस्त. 'वरलीमटक्यात मोहाला बळी पडून अनेकांचे संसार **बेचिराख** झाले.' -फीर.११२. (फा.बे अ चिराघ)

बेचीत (क्रिवि.) दोघांच्या मध्ये. बे म्हणजे दोन, चीत् - मध्ये आत. 'लाकळाच्या **बेचीत** माहा खेटर अटकून पळ्ळं.'

बेचेन (वि.) उदास, अस्वस्थ. 'पोट्टी आजून घरी आली नाई तं सारजाचा जीव **बेचेन** झाल्ता.' (फा.)

बेच्छुट (वि.) बंध नसणे, स्वैर. 'बापाचा धाकदरारा नसला तं लेकरं **बेच्छुट** वागतात.'

बेजबान (वि.) वाचा, जबान नसलेला. 'जनावराची भुकतान बरोबर ओळखा लागते बिचारे **बेजबान** असतात.'

बेजबाबदार (वि.) जोखीम न ओळखणारा. 'काकाच्या तीन तीन पोरी लगनाच्या असूनबी **बेजबाबदार** असल्यावानी वागतात.'

बेजा (वि.) १. खूप, जास्त. 'मंग काय आखीनच भडकून गेला भेजा/ बायकोवर भिडला कातावून **बेजा**.' -मिए.९२. 'ते मनातून सोतावरच **बेजा** कातावली. तिच्या जिवाचा निऱ्हा संताप झाला.' -लेक.३४. २. अयोग्य. 'हू नोये ते झालं, हे तं **बेजाच** गोठ झाली मनावं.' (फा.)

बेजान (वि.) निर्जीव. 'झाळं **बेजान** नसतात तेइलेबी जीव असते.' (फा.)

बेजानं (क्रिवि.) जोराने. 'वखराची दांडी **बेजानं** लागली मांडीले.' 'नवऱ्यानं बेजानं मारलं रुखमाले.'

बेजार (वि.) उदास, नाखूष, हैराण, त्रस्त. 'दुखानं **बेजार** सिताबाई रातभर जागली. झाकुल्यात उठली.' -लेक.८. (फा.)

बेजारी (स्त्री.) गरिबी, फजितवाडा. 'शायेत गेलं की माह्यावाली लयच **बेजारी** निंघत जाये.' -अंधा.

बेजोळ (वि.) जोड लागत नसलेले, एकमेव. 'होंडा बैल बेजानं खस्सर, **बेजोळ** होता.'

बेज्जा (वि.) खूप, फार, अतिशय. 'पोरगी म्हने सुखदुखी बाप बरा होता, सासुरवासानं जीव **बेज्या** कावला होता.' -पाहु.

बेटा (पु.) मुलगा. 'बापसे बेटा सवाई. बाप म्हने माहा आईक **बेटा**, भल्तंसल्तं असं काई करू नाई.'

बेटाईम (क्रिवि.) अवेळी. 'असे काहून **बेटाईम** घरी येऊन

रायले तुमी? गंजिफ्याच्या डावात जात अस्ता वाट्टे.' (फा. अ इं.)

बेटाबेटी (स्त्री.) मुलगामुलगी. 'दोघांही **बेटाबेटीला** माझे आशीर्वाद आहेत.' -मोती.

बेटी (स्त्री.) मुलगी. 'पयली **बेटी** अन् तुपरोटी/धनाची पेटी.'

बेट्टा (पु.) मुलगा. 'तुका म्हणे **बेट्या**। भांडवल न लगे खट्या॥' -तुका.३१६४. 'ऐसा काम मिलनेको किस्मत होना समझा **बेट्टा**?' -धग.९२.

बेठाड (न.) टेकडे. '**बेठाडावरच्या** या वदरल्या वाड्यात एक घर पडेल होतं. आता जुनं घर ते.' -लेक.४९.

बेडर (वि.) निर्भय. 'लानपनापासून वावरातच जिंदगी गेल्यावर मानूस **बेडर** होतेच राजा.'

बेडी (स्त्री.) शृंखला. 'लगनाची **बेडी** हातात पळ्ळी की बरोबर मानूस खुट्यावर येते.' (का.बेडि)

बेडुकनं (न.) पायात बेंडकी, गाठ येणे. 'माहे पाय **बेडुकले** राजा. आता पयनं नाई होत.' -गा.२६.

बेडौल (वि.) कुरूप. 'बाप्पा, तुमी असे **बेडौल** अन् लेकरं तं नक्षत्रावानीच झाले.'

बेड्डा (वि.) मूर्ख, अडाणी. 'अबे तो **बेड्डेके** बच्चे इसकूई क्याट बोलते.' -धग.११८.

बेढंग (वि.) स्वैर, बेकार. 'रावजीच्या खटल्यातला कारोबार निरा **बेढंग** आये.'

बेढंगी (वि.) रीतभात नसलेला. 'येवळं चांगलं घरदार भेटलं. नवराबी सज्जन मानूस हाय हेच लेकाची **बेढंगी** निंगली.'

बेढब (वि.) ओबडधोबड, कुरूप. 'जंगलातलं काम केल्यावर मानूस **बेढब** दिसतेच.' 'घोळा ऐटबाज, ऊट कसा **बेढब**.'

बेणं(नं) (न.) बीज, उसाचे कांडे, खानुटा. 'हे उसाचं **बेणं** कोल्हापुराऊन आनेल आये.'

बेत (पु.) १. विचार, हेतू. 'आपला **बेत** असा होता की तुमी म्हनसान तेच करू.' २. काठी. 'काई काम हाय राजे हो तुमचं? बायको **बेतानं** झोळ्ळी म्हनतात.'

बेतनं (क्रि.) वाईट अनुभव येणे, प्रसंग येणे, गुदरणे. 'एकदा माह्यावरी अशीच **बेतली** होती गळ्या छक्यापायी.' -गय. (का.)

बेतला (वि.) मोजमाप घेतलेला. 'कपळा **बेतला** बातला असला तं कमीज पायजे तसं बसते.'

बेतली (क्रि.रूप.) अंगावर संकट येणे. 'पोरीची गंमत केली तं मायावर भलतीच **बेतली** होती.'

बेताक्कद (वि.) शक्ती नसताना. '**बेताक्कद** मायले बकऱ्या चाऱ्याचा रोगच लागला व्हता.' -सित.४७.

बेताचा (वि.) मापाचा. 'सदरा बराबर मायाच **बेताचा** निंघला.'

बेताल (वि.) स्वैर वर्तन असलेला. 'शामराव भाऊ, असं **बेताल** वागू नको. जेवान पोराच्या आंगावर हात घालता काय?'

बेतासबात (वि.) योग्य माप नसलेले. 'काहीचे कपडे एकाच जातीचे, एकाच शिवणीचे बाकीच्यांचे **बेतासबात** होते.' -धग.१५३.

बेतते (क्रि.रूप.) माप घेते, शिवते. 'शिंपीण सयाबाई लाव मोती शिवणीला, चोळी **बेतते** मैनेला.' -लोक.७६.

बेतेल (क्रि.रूप.) १. गुदरलेले. 'जंगलात मायावर भल्तीच **बेतेल** आये एकडाव.' २. मोजमाप घेतलेला. 'आंगरखं **बेतेल** असल्यानं फिटाफिट बसलं आंगात.'

बेतोड(ळ) (वि.) अतुलनीय, बेजोड. 'तुया हे काम मातर मस्त, **बेतोळ** केलं गळ्या.'

बेतोनं (क्रि.) संकट आणणे. 'याच्यावर चांगली **बेतोनं** पळते एखांद्या वक्ती.'

बेदखल (क्रिवि.) दखल न घेणे. 'जगताना काई लोकं **बेदखल** कराच लागतात मान्साले.' 'पोरानच बापाले घरातून **बेदखल** केलं.'

बेद(द्द)म (वि.) हैराण, श्वास लागणे. 'निंद्याले बाया भेटत ना त्यानं बिचारा जनकराव **बेदम** झाला.' -लेक.३. 'कुंदा खंडता खंडता **बेद्दम** झाला मानूस.' (फा.)

बेदरकार (वि.) निर्भय, स्वैर. 'सज्जनाच्या पोटी असं **बेदरकार** बेनं कसं निपजलसीन मनावठ्ठ लेक.'

बेदरद (वि.) निर्दय. 'सासरचे लोकं भलकसे **बेदरद**, सुनवायरीचं काहीच सुखदुख नाई.' (फा.)

बेदाग (वि.) निष्कलंक. 'मी **बेदाग** असल्यानं काहून कोनाले भीन.' (फा.)

बेदिमाख (वि.) दिमाख नसलेला, मूर्ख. 'डांगीवर बसून कुऱ्हाळ चालोत, **बेदिमाख** हास काय बे तू?'

बेद्दम (क्रिवि.) दम निघेपर्यंत मारणे. 'लेकरू म्हना का ढोर म्हना धाकानंच पयालं पायजे असं **बेद्दम** मारन्यात काय अर्थ.'

बेन्द्रा (वि.) सावळा. 'मायबाप **बेन्द्रे** अन् लेकरं कापसावानी गोरेपान होते.'

बेधळक (वि.) निर्धास्तपणे. 'मनात येईल ते **बेधळक** करावं मान्सानं.' (फा.)

बेनं (न.) बियाणे. 'अद्रकाचं **बेनं** वावरात लावाले लय खर्च लागते म्हनतात.'

बेनं (वि.) आखूड नाक असलेले. 'फक्त गोरं कातळ हाय. नाक तं निऱ्हा **बेनंच** दिसते माय.'

बेनाक (वि.) अकारण. 'दारू पेते अन् बायकोले झोळत रायते **बेनाक**.'

बेनाम (वि.) नाव नसलेले. 'दिसते त्याहून रावबादुराची **बेनाम** संपत्ती लय मोठी आये.'

बेनाहक (क्रिवि.) विनाकारण. 'काम नस्ताना **बेनाहक** फिराले नाई पुरत.'

बेनी (वि.) चपट्या नाकाची. 'पैशासाठी तं लोकं **बेनीचपटी** पोरगीबी करून आनतात.'

बेनूर (वि.) सुंदर चेहरा नसलेले. 'कपळेलत्ते उच्ची अन् नवरी पायली तं **बेनुरी**.'

बेपट(टी) (स्त्री.) बोळ, लहान रस्ता. 'तो रामू तेल्याच्या चार फुटाच्या **बेपटीतून** घुसला.' -ना.१२३. 'आकू आकूची हाळी येताच **बेपटी**, सामटीतली कुत्री धावतपळत येत.' -काळी.४३.

बेपर्वा (वि.) निर्धास्त. 'सोप्याचं लयच **बेपर्वा** काम हाय. येवळं अभाय दिसून रायलं तरमा पोते झाकले नाईत लेकानं.'

बेपार (पु.) व्यापार. 'तुकाराम महाराजानं मिरचीचा **बेपार** केला होता.'

बेपारी (पु.) व्यापारी. 'पाचा पानाचा ईडा त्यावर सगई सुपारी, आधी नमीला गणेश **बेपारी**.' 'सरकार भाव देत नाई तं **बेपाऱ्याले** देऊन टाकला कापूस बेभावानं.'

बेफजूल (क्रिवि.) विनाकरण. 'म्या मनलं देवा माली इलुसीक भूक/ **बेफजूल** कायले करू मी भलतीच चूक.' सित.

बेफाट (वि.) विस्तीर्ण, मोठे. 'पोटी तुमच्या कपट, नोहे माहेरची वाट, वन धावडा **बेफाट**.' -लोक.११.

बेफाटा (पु.) दोन फाट्याचे लाकूड. 'गुळाभवती कूप घातला. या जाले एक **बेफाट्याचा** रस्ता ठुला.'

बेफाटी (स्त्री.) दोन फाटे असलेली काठी. 'धारन लवला तं त्याच्या जागी **बेफाटी** लावून अधार देला.'

बेफाम (वि.) धुंद, अनावर. 'नदीले **बेफाम** पूर आला.' 'हे घोळमं तं बेफाम पयते लेकाचं.' (फा.)

बेफिक(की)र (वि.) निष्काळजी. 'दौडवीत गेला वारु कोण **बेफिकीर**?' -भीक.४७. (फा.) 'विनोद जेवढा नीटनेटका वागायचा तेवढाच दिगू **बेफिकीर**.' -गय. १७.

बेबनाव (वि.) वितुष्ट. 'तीन भावात या ना त्या कारणावरून **बेबनावच** होता.' -फीर.१६८.

बेबस (वि.) १. उदास. 'कारे बाबूराव, कायं झालं? लयच **बेबस** दिसून रायला ना गळ्या तू?' २. हतबल. 'या वांढाय पोरापुढे तं **बेबस** झालो आपून. हात टेकले आता.'

बेबाकी (स्त्री.) चुकती. 'हे पहा सालगुदस्ताची खंडणी **बेबाकी** करून टाक.' -कात.३०.

बेबूद (वि.) निर्बुद्ध. 'वंधाई घालता येत नाई एवढा कसा रे, तू शिवऱ्या **बेबूद**.'

बेबुध्या (वि.) बुद्धी नसलेला. '**बेबुध्याई** काम सांगनं म्हंजे कामाचा नासोळाच.'

बेबूळ (न.) पूर्णतः नष्ट करणे. 'तुका म्हणे जरीं योगाची तांतडी। आशेची **बीबुडी** करीं आधीं॥' -तुका.१४३१.३.

बेभरोसा (वि.) अविश्वास. 'चंद्रभानजीनं कधी सावकारावर **बेभरोसा** दाखवला नाही.' -संगा.३४. '**बेभरोशाचा** हेला देत होता वगार कार्यक्रमातून पडत होता पगार.' -मिर्झा.१६५.

बेभरोसी (वि.) विश्वास नसलेली. 'अशी कशी व देवके तू **बेभरोसी**? जरा धीर धरा लागते बरं.' -एक.

बेभान (वि.) भान नसलेला. 'गाव पेट्टा बरोबर लोकं **बेभान** होऊनसन्या पयाले लागले.' (फा.बेफहम)

बेभाव (वि.) दर, भावात न बसणारे, कमी दराने. 'बुढ्याची अळ्ळी पाहून घेनारेई वावर निऱ्हा **बेभाव** मांगत होते.' -लेक.५७.

बेभुली (स्त्री.) अनवधान. 'म्या तुमाले सांगायला नको पाहिजे होतं पण **बेभुलीत** बकून बसलो.' -अंधा.

बेमतलब (क्रिवि.) विनाकारण. 'दारूळ्याले **बेमतलब** बलावलं. धिंगाना केला लेकानं.'

बेमान (वि.) धोकेबाज, कृतघ्न. 'भाचे बॉ, असे **बेमान** नका होऊ. करून टाका लायन्या मामाची लेक.'

बेमानी (स्त्री.) धोकेबाजी. 'येका ताटात खाल्लं भोसळीच्यानं अन् मायाच संग **बेमानी** केली.'

बेमार (वि.) आजारी. 'घरात **बेमार** मानूस असलं का लय आब्दा होतात.'

बेमारी (स्त्री.) आजार. 'आजीची **बेमारी** कोनाच्या ध्यानातई इवून नाई रायली.'

बेमालूम (क्रिवि.) नकळत. 'न्यान्या खोळ्या तं करते पन **बेमालूम** करते. वयखूई पळत नाई.' (फा.)

बेमिसाल (वि.) उत्तम, अजोड. 'राजकपूर नर्गिससारखी ही देखील एक **बेमिसाल** जोडी वाटू लागली.' -सि.८६.

बेमुर्त (पु.) मुहूर्त नसताना. 'आजकाल सारे लग्नं **बेमुर्तावरच** लागतात. पंचांग गेलं खड्ड्यात.'

बेमुर्वत (वि.) उद्धट, मुलाहिजा न ठेवणारा. 'त्या **बेमुर्वत**

मान्सासंगं समजुतीच्या गोष्टी कोनं करावं बापा?'

बेमौत (स्त्री.) हाल होऊन मरणे. 'आपून गरीब मान्सं **बेमौत** मरून जाऊ.' -आ.४७.

बेय्या (वि.) निलाजरा, मूर्ख. '**बेय्या बेय्या** लाज नाई कालचा कोडगा आज नाई.'

बेय्यी (स्त्री.) अग्रभागी दोन फाटे असलेले लाकूड, काठी. 'गुळालोक जाले कुपात एक **बेय्यी** ठोकून रस्ता ठुला.'

बेरंग (वि.) योग्य रंग नसलेला. 'काय साळी घेतली माया भावानं, निऱ्हा **बेरंगी**. पचकपालू.'

बेरड (वि.) निर्भय, निर्लज्ज, आडदांड. 'बायकोले भलकसा मारझोळ करते सद्या, निव्वळ **बेरड** आये तो.'

बेरडी (स्त्री.) बैल जुंपण्यासाठीचा जुवाचा चामडी, सूती पट्टा. 'बावाजीच्या घरी शिवाया **बेरड्या** बराबर बांधून खुटीले टांगेलच असतात.'

बेरनं (क्रि.) बी अडकणे. 'वल्ल्या बदाडात सरतं **बेराचं**, मंग आरपे पडाचे.' -दि.६८. २. ? 'तरीही रामकिसनाचं मोघं **बेरलेलंच** राहिलं.' -झिं.६.

बेरहम (वि.) काळीज नसालेला, निरंकुश. '**बेरहेम** मान्सापुळे हात जोळून काय फायदा?' (फा.)

बेरात (स्त्री.) अपरात्र. 'भजनाचा नाद लागला. गावोगाव **रातीबेराती** भजनाले जाऊ लागले.' -एक.

बेरी (स्त्री.) १. मळी. 'तूप तपोलं अन् **बेरीची** भाकर केली नरमनरम.' २. नाकातील दागिना. 'नाकात **बेरी**, भूषण भारी.' (फा.)

बेरू (वि.) निर्ढावलेला, कृतघ्न. 'रमश्या. लयच **बेरू** हाय. म्हना का बोला, त्याले फरक पळत नाई.'

बेल (न.) एक वृक्ष. 'सकाऊनच्या पायरी चिमन्याची चिवचिव/ **बेलाच्या** डांगीवर पोथी वाचे सदाशिव.'

बेलगाम (वि.) स्वैर, मोकाट. 'घोळं **बेलगाम** झाल्यावर बसनारा ढुंगनावरच पळ्ते.' (फा.बे अ लगाम)

बेलटांग्या (वि.) बायकी पुरुष. '**बेलटांग्याचं** लगन करून द्या आपूनच अन् त्याच्या बायकोलेबी आपूनच पोसा नाई?'

बेलदार (पु.) मातकाम करणारा. 'घासाघीस न करता विहीर खोदण्याचा ठेका **बेलदारांना** दिला.' -काळी.११०. 'मोठ्यामोठ्या भीता घातल्या **बेलदारानं**.' -लोक.९०.

बेलनं (न.) लाटणे. 'पापळ लाट्याले पयपाट अन् **बेलनं** घेऊन ये वैनी जोळून.'

बेला(ल्या)शक (क्रिवि.) बिनधास्त. 'हनुमान जयंतीले **बेलाशक** येत जा. आपल्याच घरी पंगत अस्ते.' (अर.)

बेलाजी (वि.) १. लाज नसलेला. 'असा **बेलाज्या** मानूस त एकई नाही पाह्यला.' -ना.१६७. २. अकारण, उगाच, हकनाक. 'भरावर आलेला उडीद **बेलाजी** गेला.' -सेल.१२१.

बेलाफुलाची गाठ (स्त्री.) योगायोग. 'गणपतनं म्हटलं अन् बुढी तयार झाली. **बेलाफुलाची** एकच गाठ पडली.'

बेल्डी (स्त्री.) बिरडे. 'चढाला मात्र बैलांच्या गळ्याला **बेल्ड्या** लागल्या.' -त.१.

बेल्या(ली) (पु.) पेरणीच्या वेळेस दोन तासातील अंतर. 'फेडरेशन वाल्यानं पाडला **बेल्ल्या**/ व्यापाराले पाहान तं तो होईन **बल्ल्या**.' -जांग.८८. 'तिफनीचे तुले तिनशे रुपळ्ळे पायजात ना. घे. पन पायरे बॉ माया वारात तासाले मुरगी नाई पळ्ळी पायजत अन् दोन तासातला **बेल्या** बरोबर आला पायजे.'

बेवजा (वि.) निष्कारण. 'काम ना धाम **बेवजा** भांडन केलं लेकानं.' (फा.अर.)

बेवळा (वि.) दारू पिणारा. 'रात दिवस दारू पेते **बेवळ्या** खानीचं.'

बेवारस (वि.) पालक, मालक नसलेले. '**बेवारस** वस्तू दिसली तं उचल्तेच मानूस.'

बेशक (क्रिवि.) निःसंदेह, अवश्य. '**बेशक** हो म्हना. घरदार, सोयरेधायरे चांगले हायत ना.' (अण्य. फा. अ.)

बेशरम (वि.) लाज नसलेला. 'तुका म्हणे **बेशरमा**। श्रमावरी पडिभरू॥' -तुका.३६१०.

बेशुमार (वि.) असंख्य, अनंत, फार. 'लगनाले म्हंसीन तं **बेसुमार** लोकं आल्ते.' 'पोलिसाईचा **बेसुमार** मार खाल्ला चोट्ट्यानं.' (फा.)

बेस (वि.) चांगले, उत्तम. 'लगनात पंगत **बेस** होती. दा तं गुलाबजामुन झोळ्ळे आपून.' (फा.)

बेसखुशाल (न.) सुखचैन, आनंद. 'इकूनतिकून **बेसखुशा-लीचे** निरूप जात होते.' -गा.३२. (फा.)

बेसखुशाली (स्त्री.) सुखचैन. 'कारडातून गावाची **बेसखुशा-ली** पुसे, तालतूल इच्यारत जाये.' -सित.३७.

बेसन (न.) पिठले. 'ताकाचं **बेसन** अन् भाकर शिदोरीवर असल्यानं वळा आला.'

बेसनवळी (स्त्री.) बेसन टाकून तयार केलीली वडी. 'बुंदी चांगली दिसत नाई तं नानमुखाले **बेसनवळी** केली.'

बेसब्री (वि.) अधीर, आतूर. 'कोन्याई कामाले सबुरीनं घ्या लागते, असी **बेसब्री** नाई चालत.' (फा.अर.)

बेसर (स्त्री.) नाकातील अलंकार. '**बेसरच्या** आकाराची बाभळीची फुलं ओल्या मातीवर पसराली.' -सि.४३. 'आताच्या दोरीचा वापर दुसरा, नथन्या टाकून लेतात **बेसरा**.' -लोक.१४३.

बेसरम (वि.) १. लाज नसलेला. 'कैसा जालासे **बेश्रम**। लाज नाही न म्हणे राम।' -तुका.८९१. २. एक वृष विशेष. 'लेंडीच्या काठानं **बेसरम** वाळ्ळ्यानं पुराचं पानी गावात घुसलं.'

बेसरमाच्या पोटचा (वि.) ज्याला लाज नाही असा. 'कारे **बेसरमाच्या** पोटच्या, तुले काही लाजसरम वाटते?' -पख.७४.

बेसहारा (वि.) आधार नसलेला. 'आपल्यासारख्या परगावच्या **बेसहारा** माणसाची काय कथा?' -फीर.२२९.

बेसुमार (वि.) अधिक, अमर्याद. 'औंदा जत्रेत **बेसुमार** मान्सं आलते.'

बेसूत (वि.) योग्य विचार नसलेला. 'ती क्रांती **बेसूत** लोकायची आसलं.' -बा.५८. 'काकाचं पोरगं निन्हा **बेसूत** निंगलं.'

बेसूद (वि.) बेशुद्ध. 'जास्त ढोसली का वंक्या **बेसूद** हून पळते कुठीसाबी.' (फा.)

बेहतर (वि.) चांगले, वरचढ. 'धर्माय बांधला, हे तुया **बेहतर** काम केलं सयदेव!' 'सावतर अन् गुवाहून **बेहतर**.'

बेहतरीन (वि.) सुंदर, अप्रतिम. 'क्यो बोस कैसी लगी गझल? दिगू म्हणाला, **बेहतरीन**!' -गय.१६.

बेहद (वि.) असीम, अमर्याद. '**बेहद** मारलं हो सरूले, पाहा ना कसे वय उठले तं.' (फा.अर.)

बेहाडा (पु.) वृक्षविशेष. 'नदीच्या दोन्ही काठावर किर्र झाडी...सादुडा, अंजन, **बेहाडा**, उंबर, पळस, सालई.' -पख.८४.

बेहाडे (वि.) औषधी फळ. 'एकदाचे झाले दाणे, झाले **बेहाडे** टणक.' -गाक.३३.

बेहाल (पु.) दुर्दशा, बेशुद्ध, हलाखीतील. 'आबाचा आठनऊ मयन्यात हालाचा **बेहाल** झाला व्हता.' -सित.१५७. (फा.अर.)

बेहिसाब (वि.) असंख्य, अगणित. 'काय भाऊचा थाट, लयच **बेहिसाब** इस्टेट जमोली भाऊनं.' (फा.अर.)

बेही (स्त्री.) मूर्ख स्त्री. 'वच्छी निव्वळ **बेही** आय, कनिकई नाई भिजोता येत अजून.'

बेहेतर (वि.) उत्कृष्ट. 'असा **बेहेतर** पोरगा कुठी भेटनार नाई मामा पोरीसाठी.' (फा.)

बेहोश(स) (वि.) बेशुद्ध, धुंद. 'दारू पिऊन **बेहोस** पळेल आये मानक्या झाळाखाली.' (फा.)

बेह्या (वि.) निर्लज्ज. 'कितीकई टरकोलं तरी वसुदेव **बेह्यासारखा** येऊन बसतेच.' (फा.अर.)

बेळ (न.) चाक असते ते लाकूड. 'बाया विहिरीचं पाणी ओढताना **बेळावर** पाय ठेवतात.' -धग.१४९.

बेळका (पु.) बेडका, थुंकी. 'अती काहून **बेळके** टाकून रायले तुमी जाना मरना कोठ्यात.'

बेळफाटा (पु.) मुख्य फांद्यातील निघालेली दुसरी फांदी. 'इज बरोबर **बेळफाट्यात** पल्डी.' -बा.२३२. 'खैराच्या लाकडाला खालच्या अंगाने एक आडवा **बेडफाटा** फुटलेला.' -खुं.९.

बेळल्यामेळल्या (स्त्री.अने.) बेरड्या वगैरे, इतर गोष्टीही. 'सिवायामिवाया, **बेळल्यामेळल्या**, जुपनेगिकने, कोंडके-मोंडके सबन टाका गाळ्यात.' -सित.१२४.

बेळ्ळा (वि.) मूर्ख. 'संसार काय असते ते हा **बेळ्ळा** काय समजीन?'

बेळ्ळी (स्त्री.) बैलाच्या गळ्याभोवती असलेली चांमड्याची पट्टी, बेरडी. 'म्हणे कै हे बिरडे फिटेल। कै तो स्वामी भेटेल।' -ज्ञा.१३.३७८. '**बेळल्या** लावुनिया जुवाशी, उचलून द्या खांद्याशी.' -लोक.८५. 'पुरसूनं सिवामंदी **बेळळ्या** आळकोल्या.' -सित.१३०.

बेंगनं (क्रि.) १. बिघडणे. 'गर्दीच्यानं कामं सारे **बेंगून** रायले/ रस्त्याने लोक येकमेकावर येंगून रायले.' -जांग.३३. 'पन मंधातच सारं काम **बेंगलं**.' -मे.३२. २. साध्य होणे. 'आपलेवालं काम कवरीक **बेंगन/** कोन्या कुपाटीवर आपली येल येंगन.' -मिए.१५०.

बेंगरूळ (वि.) विचित्र, अशोभनीय. 'टपऱ्यासारखा **बेंगरूळ** पोशाख केल्यानं नाचक्की होत नाही काय?' -मोती.

बेंगलं (क्रि.रूप.) बिघडले. 'चालू काम **बेंगलं** या पान्यानं.'

बेंगवलं (क्रि.रूप.) बिघडवले. 'आपणच **बेंगवलं** आपणच निस्तरा.' -मिर्झा.१६३.

बेंगा (पु.) गोट्या एकाला एक लागणे. 'आन रे गोट्या, **एंगाबेंगा** खेऊ आपून.'

बेंगून (क्रि.रूप.) बिघडून. 'पैदलवाल्याची गोठ खरी नाई/ **बेंगून** जाते काम पैशाबगर होत नाई.' -नांबै.

बेंगोनं (क्रि.) बिघडवणे. 'कोनाचबी सरकं काम **बेंगोनं** युसुफ्याले बराबर जमते.'

बेंग्या (पु.) गोट्याचा खेळ. 'कांच्या नाई बे. आज **बेंग्या** खेळू. आन पखान्या गोया.'

बेंड (न.) १. गुह्य. 'वायद्याची अखेरची मुदत टळल्यामुळे सारे **बेंड** बाहेर पडले.' -कात.५२९. २. टेंगूळ. 'त्यांच्या चेहऱ्यावरील सत्तेची घमेंड **बेंडासारखी** ठसठसत होती.' -झेल.६०. ३. उंच भाग.

बेंडका (पु.) बेडूक. 'धोंडी मांग्याले येका काळीले **बेंडका** बांधला.'

बेंडकी (स्त्री.) १. बेडूक मादी. 'पानी पळूं का **बेंडकोया** डराव डराव करतात.' २. बैलगाडीचा एक भाग. ३. हातातील दंडात आलेला गोळा. 'दंडावर भुक्की मारली का पाय कशी मोठीच्या मोठी **बेंडकोई** निंगते.'

बेंडबाजा (पु.) वाजंत्र. 'गावातले भादग्याईचे डपडे सोडून मोठेपनानं **बेंडबाजा** ठरोला.' -जटा.४३.

बेंडल्या (स्त्री.अने.) बेंडकी. 'संघटना अन् पाटर्या जोरजोरानं बोंबलत होत्या/ डाल्यात **बेंडल्या** कोंबल्यानं टेंबलत होत्या.' -जांग.१०७.

बेंडाळ (न.) टेकडीचा उंच भाग. 'टेकळीच्या **बेंडाळालोक** बकऱ्या चऱ्याले जात.'

बेंडी (स्त्री.) लहान टेकडी. 'ढोराबॉच्या **बेंडी** आंगून कसा ढग निंघाला पाहा.' -गा.१०८.

बेंदर (न.) भगदाड. 'कोन्या **बेंदरात** राह्याले जा लागते कायजून?' -भं.१३१.

बेंदरा (वि.) काळा, सावळा. 'नवरी गोरीपान्सी अन् नवरदेव पायसान तं निऱ्हानाम **बेंदरा**.'

बेंदाड (न.) चिखल, गारा. 'चप्पल अन् फुलपॅटचा बॉटम **बेंदाडानं** पार भरला.' -निशा.

बेंदाळ (न.) खड्डा. 'आंधयानं धरले बहेऱ्याचे हात दोघई पळले **बेंदाळात**.'

बैंगन (न.) वांगे. 'हाती नाई कवळ्या अन् **बैंगन** केवढ्या?' -डेबू.२४. (हिं.)

बैगुनं (न.) गंज किंवा गंजासारखे भांडे. 'या **बैगुन्यात** पानी घेऊन ते तपो आमासक.'

बैजवार (क्रिवि.) तपशीलवार. 'राती त्याले **बैजवार** सांगतो सारं.' -सि.१२७.

बैतन (न.) सर्पण. 'डोसक्यावर **बैतनाचं** पेंडकं असल्यानं वझ्यानं तिची मान खुलूखुलू हालत व्हती.' -सित.४५.

बैना (स्त्री.) बाई, बहीण ह्या अर्थी स्त्री संबोधन. 'काल माया सपनात आले राघुमैना/ तुले कसं सांगू **बैना**.' -वि. 'या बाब्यानं माही पोथच तोळली **बैना**.' -ना.१४५.

बैरागन (स्त्री.) साधू स्त्री. 'वटी पुत्रासाठी नार झाली **बैरागन/** संगं भरतारा घेऊन बाई हिंडे देवांगन.'

बैरागी (पु.) संन्यस्त. 'बायकोपोरं टाकले अन् आता **बैरागी** हून बसला.'

बैल (पु.) शेतीत कसणारा पशु, वृषभ. 'साकरेच्या गोण्या **बैलाचिये** पाठी। तयासी सेवटीं करबाडें॥' -तुका.३०६०.

बैलआंग (न.) बैलासारखी शरीरयष्टी. 'गोऱ्ह्याचं खाणंपिणं वाढलं आन् त्याह्यले **बैलआंग** आले.' -खुं.२०.

बैलआळी (स्त्री.) बैल बांधण्यासाठी खुंट्याला दोर बांधण्याची पद्धती. '**बैलआळी** बांधजो नाई तं बैल सुट्टे रातीबेराती.'

बैलकी (पु.) बैलाची देखभाल करणारा. 'दहा जोड्यांची देखभाल करायला गोठ्यात दोन **बैलकी** असायचे.' -जटा.९.

बैलगाठ (स्त्री.) बैल बांधण्यासाठी बांधतात ती गाठ. 'गोठ्यातून वारंवार सुटून जाणाऱ्या ओढाळ ढोराला **बैलगाठ** मारून खुंट्याला बांधणं.' -गाआ.२२.

बैलतगाई (स्त्री.) बैल विकत घेण्यासाठी भेटणारे कर्ज. 'पिकासाठी भेटते ना तसी **बैलतगाईबी** देते सरकार.'

बैलबारदान (पु.) गुरेढोरे इत्यादींचा पसारा. '**बैलबारदान्या-सगट** हरचंदनं गाव सोळूं.'

बैलबुध्या (वि.) बैलाच्या बुद्धीसारखा. '**बैलबुध्याले** नांगराचं खोळई धरता येत नाई.'

बॅ बॅ (न.) ओरडण्याचा आवाज. 'दिना बंदीत गेला तरी त्याले बाखराचा **बॅ बॅ** अवाज काई आला नाई.' -सित.४८.

बो (न.) १. केसाले लावावयाचे रब्बर. 'इस्नू, **बो** पोरीच्या संगच रायतात.' २. माजावर आलेल्या बोकड्याचे ओरडणे. 'बोकळ्या तं बकरी पायली रे पायली की **बो बो** करते.'

बोकणा(ना) (पु.) १. घास. 'त्यांनं खोबऱ्याच्या चटणीचा **बोकना** भरला तसा तो झोंबला.' -मोती. 'मशिनीत येका दमानं गाला नाई लोटा लागत, **बोकना** धरते.' २. तोंडभर ढोसलणे. 'डबीतली बरीच सुपारी रंगरावनं तोंडात **बोकणली**.' -कात.५७.

बोकनला (पु.) तोंडभर खाल्ला. 'मूठभर साकऱ्या एका दमात **बोकनला** भळव्यानं.'

बोकळा(ळ्या) (पु.) १. बोकड. 'उरी आड चोहोटांची जखीणि होउनिः मग मेंढे **बोकडे** खाओ पाहाति असेः' -ली.४०. 'तुकयाबंधु म्हणे **बोकड** मातलें। न विचारी आपुले तोंडी मुतें॥' -तुका.३०१६. 'माल मोंढ्यात चालला तं सत्यानाश झाला/ मरीमायच्या समोर जसा **बोकळ्या** कापला.' २. बोकडाचे मटण. 'बजारच्या दिवसी घराघरात **बोकळ्या** शिजत असते.'

बोकळ्या (वि.) वयाने वाढलेला. 'अरे **बोकळ्या** म्हना लगन करनं, माया पोरीच्या काहाले वाटी जातं रे.'

बोकांडनं (क्रि.) बिथरणे, उधळणे. '**बोकांडल्या** म्हसी शब्दात कोनी पन्हावली नाही.' -वि.

बोकांडलं (क्रि.रूप.) बिथरले. 'डफडं वाजलं. पाठीवर काडी बसताच **बोकांडलं** आणखी उचांगलं.' -डेबू.४.

बोकांडी (स्त्री.) मानगुटी. 'उंदीर बसले **बोकांडी**, पिकाले देते

झोकांडी.' -मिए.६९. 'बयराम पाटील गेले तसे मुसंडी मारून भरत पाटलाच्या **बोकांडी** बसले.' -भं.४८.

बोके (पु.) एक भाग, अवयव. 'म्हशीचे पोट फाडून त्यातील **बोके**, हेळ, फाशी चरबी अल्लादं बाजूला काढली.' -रा.१५.

बोक्या (पु.) नर मांजर. 'कायाभोर **बोक्या** आळवा गेल्यावर कोनतं काम करावं वाट्टे काय मान्साले?' (का.)

बोख(खा)रनं (क्रि.) ओरबाडणे, बोचकारणे. 'मांजर कावरते, खांबाले **बोखरते**.'

बोखरू (क्रिवि.) ओरबाडू, ओरखडू. 'पोरी भांडतात अन् एकमेकीले **बोखरू** लागतात.'

बोखारा (पु.) १. गुप्तांगा जवळील भाग. 'बाई दिसली की तो समोरून **बोखारा** खाजवीन.' -ना.७. 'होनं जानं सुपारा, खाजो माहा **बोखारा**.' २. ओरखडा. 'हातावर पाय केवळा **बोखारा** वळ्ळा काट्टीनं.'

बोगस (वि.) खराब, निरर्थक, निरुपयोगी. 'असली सरलं की दुकानदार **बोगस** बियानंई माथी मारतात.' (इं.)

बोगी (स्त्री.) कबड्डीत एकदम चारसहा गडी मारणे. 'तगळ्या शंकऱ्यानं **बोगीच्या बोगीच** आनली इरुद्ध पार्टीची.'

बोचकं (न.) गाठोड. 'कापसाचे लानमोठे **बोचके** बंडीत टाकले.'

बोचकारनं (क्रि.) ओरबाडणे. 'मांजरनं **बोचकारलं** त्याचे वरखंडे होयेत हे.'

बोचरा(री) (वि.) दात खुडलेला, धार गेलेला. 'पाहे पा लोहाचे चणे। जै **बोचरिया** पडती खाणे।' -ज्ञा.१२.७०.

बोचवनं (क्रि.) बोथट करणे. 'कुणी लाकडावरच काय दगडावरही घाव घालून सगळी कुऱ्हाड **बोचवून** टाकतं.' -खुं.५२.

बोचा (पु.) स्त्री योनी. 'वखत गेल्यावर आन्लं आता, घाल तुया मायच्या **बोच्यात**.'

बोची (स्त्री.) ढुंगण. 'मिराच्या लग्नानं टेलरच्या **बोचीचे** कातडे निघाले.' -झि.१२६.

बोजड (वि.) जड असलेला. 'एवढं **बोजड** गाठोळं पन आनलं बॉ डोक्स्यावर उचलून.' (का.)

बोजा(झा) (पु.) ओझे. 'घरीच तं किती मान्साचं करा लागते. त्यात पावन्याचाबी **बोजा** वाळ्ळा.' 'माया डोक्स्यावर कर्जाचा लय मोठा **बोजा** आय.'

बोटचेप्या (वि.) स्पष्ट भूमिका न घेणारा. 'किसना दोहीकून हव, ना करत रायते, भल्ला **बोटचेप्या** मानूस.'

बोटनी (स्त्री.) स्तनाचे टोक. 'लेकरू **बोटनी** तोंडात धरून दूद पेतानाचं मस्त चित्र काळलं.'

बोटाईच्या - बोटांच्या. 'दोन **बोटाईच्या** मंधात सुई पक्की धरली.'

बोटी (स्त्री.) मटनातील मांसल तुकडा. 'काबे **बोटी** येकयेकच वाळतं काय? अन् ढोमनभर रस्सा काहाले टाकला?'

बोटूक (न.) थोटूक. 'पावने गेले की बिळीचं **बोटूक** उचलून आमी दम मारो.' (का.गोटु)

बोटोळे (पु.) एक खाद्य पदार्थ. 'आंब्याच्या रसासंगं सरोये धुमधाम हानो सारे.'

बोडका (वि.) उघड्याडोक्याचा. 'भर रस्त्यावरून बापमेल्यासारखा **बोडखा** चालला तू.' -मोती.३२. (का.बाक्क,बांडकि)

बोडी (वि.) एक शिवी. 'माही हलकट जाऊ काईकाई वाईटवाकडं बोलत राह्यते **बोडी**.' -अंधा.

बोतल (स्त्री.) शिशी. 'दारूपिदाळा बाप असला का शागलोछ आईसकांड्या खाची लय मजा. येक **बोतल** झाली का दुसरी.'

बोदला (वि.) लठ्ठ. 'नवकरी लागली तं लयच **बोदले** झाले तुमी तं.'

बोध (पु.) धडा, ज्ञान, शिकवण. 'मन बोधिता **बोधिता बोधताहे**.' -मनो.१५१. 'नानाचं आयकून सुरूचे मंतर **बोध** झाले.' -सित.८५.

बोधा(द्या) (वि.) लठ्ठ. 'मानूस पायला त हॅ **बोधा**. कसा काय घ्याव बंडीत याले.' (का.बोदु)

बोनं (न.) दहीभाताचा नैवद्य. 'सर्वज्ञ म्हणीतलेः ए देवतेसि हस्तीवरि **बोणे** ए गाः' -ली.२१२. 'तंव बडवेयाचे आंडोर गोपाळासि **बोणे** घेउनि आलेः' -गोवि.२२९. 'मज अमृताहूनि सुरसे। **बोनी** वोगरिली बहुवसे॥' -ज्ञा.९.३९३. 'तरी जेवणाराचिया रुची। निष्पत्ति की **बोनियांची**॥' -ज्ञा.१७.१२१.

बोपला (पु.) उभा खांब व आडवी नाट तोलून धरणारा लाकडी तुकडा. 'खांब सागाचा असून लागे **बोपला** आळ्याले/ कोनाच्यानं काय अळे गुर्मी वांझोटी काहाले.' -वि. 'रिकामा वाळी **बोपले** घळी.'

बोप(फ)ली (स्त्री.) १. एक गवत. 'वावरात **बोपली** झाली. पिकालेबी वाळू नाई देऊन रायली.' २. स्त्री योनी. 'मारली हेपली, सुजली **बोपली**.' 'त्याइले आवतन द्याले कोणाची **बोफली** फुली आली हायं?' -पाटी.

बोबडा (वि.) तोतरा. 'नातरी बालक **बोबडां** बोलीं। का वांकुडां विचुकां पाऊली॥' -ज्ञा.९.७. (का.बग्गडे)

बोबो (न.) गाजावाजा, चर्चा. 'घरातल्या गोठीची भाईर

बोबो व्हाले ना पायजे.'

बोभाटा (पु.) गाजावाजा. 'गोसावी उदास्य स्वीकरुनि बीजे केलेः ऐसा **बोभाटु** जालाः' -ली.७७. 'जैसी पिकली द्रुती आदरे। **बोभात** निघे॥' -ज्ञा.१३.३०४. 'देव होः बोभाटु काइसाः नेणा?' -ली.३६. 'झणी तूं आपुला करिसी **बोभाट**।' -नाथ.१२६१. (का.बोब्बाट)

बोमठस (वि.) निर्बुद्ध. 'आता या **बोमठसाले** अक्कल नाई त्याले आपून काय कराव?' -मोती.

बोय (स्त्री.) आजी, म्हतारी. 'अपके **बोयचं** खानंपेनं कमीच होयेल आय.'

बोयकं (न.) लहान गाठोडे. 'आता **बोयकं** घेऊन गावाले गेलं तं लोकं हासतील.'

बोया (पु.) बोळा. 'तेलाचा **बोळा** दीधलाः' -ली.५८२. 'लहान आयेस का तू आजून, का **बोयानं** दूध पेतं बापा?' 'साऱ्या मेहनतीवर या दारुळ्यानं **बोया** फिरोला.'

बोर (स्त्री.) एक झाड. '**बोरि** डीरैली होतीः तीए हातुहातु कोंभ नीगाले होतेः' -ली.१४१.

बोर (न.) बोरीचे फळ. 'हीरौरीचीया माळीणी **बोरे** विकावया रिधपुरासि येतिः' -गोवि.११६. 'आंबे **बोरी** वड बाभुळा चंदन। गुणागुणें भिन्न अग्नि एक॥' -तुका.१४६७.३.३. (का.बोरेगिड)

बोरकूट (न.) बोराची पूड. 'नवऱ्यानं बोरं येचून आनले तं बायकोले **बोरकूट** करनं आलच ना, हो की नाई परभा वैनी?'

बोरबन (न.) बोराच्या झाडांचे जंगल. '**बोरबनात** बकळ्ळ्या मस्त खुसाखुस रायतात.'

बोरमाळ (न.) स्त्री अलंकार. 'अहो दागिने करा मला म्हणे **बोरमाळं**, कर्जानं तोंड काळं, तुझ्या घराचं फिरलं गाडं.' -रुक्मि.८६.

बोरा (पु.) पोते, गोणा. 'चार **बोरे** हरभरे इक्याचे रायले आजून.' (हि.बोरा,फा.बुर्दहा)

बोराटी (स्त्री.) बोराचे झाड. 'आणि गोवी गेलिया जवळी। झगटलिया अंग फाळी। फळ तरी आनु मोळी। **बोरांटीजैसी**॥' -ज्ञा.१८.६५५.

बोरी (स्त्री.अने.) १. पोते. 'खटल्याच्या घरात दोनतीन **बोरी** साखऱ्या लागते. गुई अल्लग.' २. बोरीचे झाड. 'नाल्याच्या काठानं **बोरीच बोरी** लायेल आयेत.'

बोरू (पु.) तागाचे झाड. 'बिओळ व्हाव म्हनून **बोरू** पेरला वावरात.'

बोऱ्या (पु.) १. सर्वनाश. 'गावाचा तं निर्रा **बोऱ्या** वाजणार हाये पाणीटंचाई पायी.' -त.११. २. गोणा. 'पंगतीले एकांदा **बोऱ्या** साकर तं लागीनच.' 'बस्याले **बोऱ्याच** आथरला का बे?'

बोऱ्याबिस्तार (पु.) अंथरूणपांघरूण. 'त्यानं तीन टपरं, चार पुस्तकाचा **बोऱ्याबिस्तर** गुंडायला अन् तो घरी आला.' -सित.१६.

बोऱ्याबाज (वि.) गरिबी. 'अधात्री आलं राज, इसरले **बोऱ्याबाज**.'

बोल (पु.) शब्द, बोलणे. 'तुका म्हणे **बाळ** मातेपुढे नाचे। **बोल** आणिकांचे नावडती।' -तुका.१६१६. 'आपला **बोल** खाली ना गेला पायजे.'

बोलचाल (स्त्री.) १. संवाद. 'दोघा भोवाची **बोलचाल** एवढ्यात बंद आय.' २. वाद, भांडण. 'दोघा भावाची खूप **बोलचाल** झाली.'

बोलबाला (पु.) गाजावाजा, प्रसिद्धी. 'आन्याजीच्या नावाचा गावोगाव मोठा **बोलबाला** आये.'

बोलबोलता (क्रिवि.) सहज. '**बोलबोलता** त हे काम हून जाते हातासरसं.'

बोलभाषण (न.) बोलचाल. '**बोलभाषण** नाही का रातपासून तुमचं?' -रा.१२४.

बोलल (क्रि.रूप.) बोलेल. 'घाई करतील लोक, **बोलल** माही जाऊ, तिचा येऊ द्या भाऊ.' -लोक.७७.

बोलवा (पु.) बोलबाला, चर्चा. 'रमोती सोमाच्या घरात घुसली तशी गावात **बोलवा** झाली.' -झेल.११.

बोलवाकासारकी (स्त्री.) भरभर वाढणारी वेल. 'किस्न देवापास्न ही जनावरं **बोलवाकासारकी** वाढत आली ना.' -झेल.८१.

बोलाचाली (स्त्री.) वादविवाद. 'बापलेकाची खूप **बोलाचाली** झाली म्हंतात.'

बोलायले (क्रि.रूप.) १. बोलवायला. 'शाम्याले **बोलायले** पाठवलं येतीनच ना.' २. बोलत आहात. 'लयच **बोलायले** तुमी बाप्पू आबाले? कामून?'

बोली (स्त्री.) १. बोलभाषा. 'वऱ्हाळी **बोलीत** 'ड'चा 'ळ' अन् 'ळ'चा 'य' होत असतो. उदा. झाळ, गाय असं.' २. भाव बोलणे, ठरविणे. 'कास्तकाराच्या पिकाची **बोली** लावाले मारवाळी, शिंदी असतात राजा.'

बोले (क्रि.रूप.) बोलत असे. 'रस्त्यात थांबून कोनासंगंबी **बोले** लेकाचं.'

बोलेल (क्रि.रूप.) बोललेले. 'म्या तं दीडशाचा भाव **बोलेल** आये जवारीचा.'

बोलोलं (क्रि.रूप.) बोलले गेले. 'तुयाकून सासूले असंकसं **बोलोलं** व बाई?'

बोल्याच (क्रि.रूप.) बोलायचं. 'एवढं सांगून आता काय

रायलं **बोल्याचं**.'

बोल्यात (क्रि.रूप.) बोलण्यात. 'खोटं **बोल्यात** नित्याचा पयला नंबर.' -धुम्म.

बोल्याबोल्यात (क्रिवि.) बोलण्याबोलण्यात. 'कुकून आपून हव म्हनलं असं तिला झालं. आपून **बोल्याबोल्यात** फसलो.' -लेक.३३.

बोल्याले (क्रि.रूप.) बोलायला. 'आपून **बोल्याले** बसलो का कोनाची खाल्लीपिल्ली काहाळल्याशिवाय रायत नाई.'

बोल्ली (क्रि.रूप.) रागावली, बोलली. 'मंग मी भलकसी **बोल्ली** तात्याले.'

बोल्लीसीन (क्रि.रूप.) बोलली असेन. 'ते खरंच असी **बोल्लीसीन** की गंमतच खेसर कऱ्याम्हून त बोल्ली नसीन.' -सित.६४.

बोल्लेस्तीन (क्रि.रूप.) बोलले असतीन. 'मामामामी **बोल्लेस्तीन**, खिजरू धावलेस्तीन पन तो उलटून बोल्ला नाई.' -सित.५०.

बोल्लो (क्रि.रूप.) बोललो. 'खरं मी **बोल्लो** राग नको घीऊ/ आखरी सांगतो भाऊ तू पैसे नोको खाऊ.' -नांबै.

बोव(ह)नी (स्त्री.) पहिली विक्री. 'दुपारी चार वाजता गिऱ्हाईकानं बोहणीचा कलदार हातावर ठेवला.' -धग. १००. 'सकाऊनपासून **बोवनी** झाली नाई अन् तुमी उधार मांगून रायले.' (त.बोणी)

बोवा (पु.) बुवा. '**महादेवबोवाचं** कीर्तन झकास रायते.' (का.)

बोवाजार (पु.) जोहार. '**बोवाजार** आप्पाजी, पाया लागतो मामाजी, महारनी म्हणाल्या.' -भं.१०५.

बोव्हा - कव्हाचा सादशब्द. 'व्हते चुकी कवा **बोव्हा**.' -ऊन.१०.

बोहरी (पु.) कुंकू, फणी, काजळ, भांडी विकणारा. 'आता गावात **बोहरी** आला की काजय घीन तुले.'

बोहला (पु.) वधूवर उभे राहतात ती जागा. 'नवरदेवनवरी **बोहल्यावर** चढले तशी भटजीनं गोफण्या हाणण्यास सुरुवात केली.' -काळी.९९.

बोहारा (वि.) अभद्र. '**बोहाऱ्यानं** काळ्ळी खोट. कायलेबी नाव ठेवत रायते भोसळीचं.'

बोहाऱ्यावानाचे (वि.) अभद्र, अपशकुनी. 'हीट **बोहाऱ्यावानाचे**, थ्या बिमार लेकराले असं भलतंसलतं नोको बोलू.'

बोळ (पु.) बाळंतीन आणि लहान मुलाला द्यावयाचे आयुर्वेदिक औषध. 'क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें **बोळ**। थितेंचि वोंगळ कैसें केलें॥' -तुका.३८२६.

बोळखी (वि.) केशवपन केलेली. '**बोळखी** बाई दिसली का अपशगून होते राजा.'

बोळखं(खी) (वि.) १. केस नसलेला(ली). 'केस ना मेस माही **बोळखीच** बेस.' २. विधवा. '**बोडख्या** बाईले काहाले लग्नात बोलावा लागते बाई?' ३. म्हाताऱ्या स्त्रियांचे पादत्राणे. (का.बोक्क) ४. डोक्यावर पदर न घेता डोके उघडे असलेली. 'नव्या सुनवाईरीनं शेवापदारत राव बाई असं **बोडखं** नाई रायलं पायजे.'

बोंगा (वि.) मूर्ख, बावळट. 'पोरगा पायला त असा **बोंगा**, कोन पसन करीन त्याले?'

बोंगारनं (क्रि.) सुजणे, विस्तारणे. 'फेकून मारल्या दगडाच्या घावानं पाय सूज धरून **बोंगारत** होता.' -पोळा.

बोंगाळनं (क्रि.) उधळणे. 'बैल कुणीकडच्या कुणीकडे **बोंगाळत** जाऊन रायले.'

बोंगाळा (वि.) वेडपट, निर्बुद्ध. 'राजाराजा म्हनून वानोतात तुले/ रातदिवसा **बोंगाळ्या** घेण्ण रे टोले.'

बोंगाळाय (क्रि.रूप.) उधळायला. 'म्हशी गोठाणावर नेऊन पाडव्याला त्यांना **बोंगाळायला** भाग पाडायचं.' -पख.१२४.

बोंगाळेल (वि.) उधळलेला(ली). 'पावणा रावणा कोणी असा तोंड सोडते **बोंगाळेल** म्हसीवानी.' -निशा.२०.

बोंग्या (वि.) मूर्ख, वेडपट. 'पक्का **बोंग्या** हायस कारे लेका, नाचुकलं पावनेईले वाळताई येत नाई.'

बोंड (न.) आत कापूस असते ते पऱ्हाटीचे फळ. '**बोंड** उलून बाहेर तोंड काढता कापूस/ वेचायाची कोण हौस.' -भि.४९.

बोंडं (न.अने.) भजी. 'सनासुदीले तं **बोंडं** खाची मजा असते.'

बोंडाळ (न.) पऱ्हाटीच्या बोंडीची संख्या. 'पऱ्हाटीले तं लयचं **बोंडाळ** झोंबलं लेक.'

बोंडाळी (स्त्री.) टरफल कायम असलेले दाणे. 'जवारीत त आजून लय **बोंडाळी** आये. मोंगरीनं कांडून काढा लागते.'

बोंडी (स्त्री.) १. पऱ्हाटीचे बोंड. 'पऱ्हाटीच्या **बोंडीतून** आला कापूस फुलून/ पाची बोटावर किस्न लोनी रायला झेलून.' -वि. २. **बोंडासारखी** गाठ. 'चुलतीनं कपाई टीका लावला. त्याले **बोंडीचा** करदोळा अन् अधेलीबी देल्ली.' -लेक.२१. ३. शिश्नाचा वरचा भाग. ४. अग्र भाग. 'तुळसी खोवी कानी दर्भ खोवी शेंडी। लटिकी धरी **बोंडी** नासिकाची॥' -तुका.७८२.

बोंडूस (न.) गाठीचा भाग. 'त्या कासऱ्याचं **बोंडूस** धरनं बे.'

बोंदर (न.) फाटके जुने वस्त्र. 'घरातले **बोंदरं** देऊन टाकावं,

नाईतन पेटून द्यावं.'

बोंदरला (वि.) हलका, निकृष्ट. 'नवरदेवाले असा **बोंदरला** कपळा घेते का कोनी?'

बोंदरी (स्त्री.) पोत्याचा तुकडा. 'न्हानी जोळ **बोंदरी** टाकावं सुनबाई. ओले पाय रंधावनालोक येतात ना.'

बोंद्री (स्त्री.) गोणपाटाचा तुकडा. 'भराट्याईले **बोन्द्र्या** लावल्या का कन्सं सांडत नाईत मंग.'

बोंद्र्या (वि.) अति सामान्य, क्षुल्लक. 'त्या **बोंद्र्याले** कोनं उभं करते दारात?'

बोंब (स्त्री.) १. अफवा. 'फिरविला घट फोडिला चरणी। महावाक्य जनी **बोंब** जाली॥' -तुका.२६५८. 'जगबुळीची **बोंब** गावोगाव पसरल्यानं सारे हबकून गेले.' (का.बोब्बे) २. ओरडा, गाजावाजा. 'तव एकी गाविची गोवळरुवे **बोबाईलीः**' -ली.२६.

बोंबलता (क्रि.रूप.) ओरडता. '**बोंबलता** कायले वोऽ तुमच्या टेंभल्यान्यानं पोरगं उठलं माह्यावालं.' -सि.२६.

बोंबलनं (क्रि.) ओरडणे. 'आणि लेकरुवे बोबातिः तयांची माए म्हणेः ''का **बोबाते** असा? जेउ देयाः' -गोवि.५. 'खेळे जुतकर्म। मग **बोंबली** जुलूम॥' -तुका.१६१५. (का.बोब्बेयिडु)

बोंबललं (क्रि.रूप.) १. ओरडले. 'ओढल्यानं बाकरू बॅ बॅ **बोबललं**.' -डेबू.३. २. नासले, बिघडले. 'गळी गावा गेल्यानं आता नांगरनं **बोंबललं**.'

बोंबलायली (क्रि.रूप.) ओरडून राहिली. 'काऊन **बोंबलायली** रे ती भागी? भांबळ्याच्या बायकोनं विचारलं.' -पख.२०.

बोंबले (क्रि.रूप.) ओरडत असे. 'मार खाल्ल्यावर देवकी भलकसी **बोंबले**.'

बोंबलेली (क्रि.रूप.) ओरडली. 'शंभराची नोट पायजे म्हने रोजंदारी. जे देलं कानी डालं भरून पोट्टी **बोंबललीच** लेकाची.'

बोंबलोनं (क्रि.) विचका करणे. 'वक्तावर गावा जातो म्हंत तू, म्हंजे तुले माहा पेरनं **बोंबलोनं** आये वाट्टे.'

बोंबाबोंब (स्त्री.) ओरड, गाजावाजा. 'बापलेकाच्या शागायाईची गावभर **बोंबाबोंब** झाली.' (का.बोंबाळ)

बोंबी (स्त्री.) बेंबी. 'म्हणौनि बोंबीएवरि श्रीकरीचे बोट ठेवीले आणि **बोंबीएहुनि** चापेल निगालेः' -ली.११. 'मग माहादाइसी दीवयावरि हातु सेकिलाः आणि **बोंबीएवरि** ठेविलाः' -गोवि.८७.

बोंबूट (न.) बेंबी. 'वऱ्हाळची नार चांगट ग, खाली लुगळं वर **बोंबूट** ग.'

बौद्ध (पु.) एक धर्म, समाज. 'बाबासायेबाच्यानं महार लोकं आता **बौद्ध** हून गेले.'

बॉ (पु.) महाराज, बुवा. 'दंतमंजन म्हणून चिलमीतल्या गुलाचा वापर **बॉ** करीत.' -काळी.८२. '**बनुबॉ** पवारच्या तोंडावर पान्याचे सपके मारत होता.' -बा. ९४९.

ब्याद (स्त्री.) कटकट, लचांड. 'मान्सामांगं **ब्याद** लागली एखांदी की त्याचं डोक्सं मॅटच व्हते.' (अर.)

ब्यालिस्टर (वि.) कायदेपंडित, हुशार. 'पंजाबराव देसमुख लंडनहून **ब्यालिस्टर** हून आल्ते.' (इं.८)

ब्यालिस्टरीन (वि.) विद्वान, हुशार. 'भक्कम मान्सं नाच्याले जातात, त्याईच्या बायका काई नाई म्हनत, तूच मोठी **ब्यालिस्टरीन** हायस.' -पोर.५३.

भ

भईन (स्त्री.) बहीण. 'मले येक भाऊ अन् दोन **भइनी** हायत.'

भ(भा)ईर (अ.) बाहेर. 'तरि आतांचि ये संहारबाहरे। तुम्ही पांडव असा **बाहिरे**।' -ज्ञा.११.४५४.

भक (वि.) पुष्कळ. 'कंदीलाचा तं **भक** उजीळ पळून रायला. केवळ्याचा आनला माय.'

भकनं (क्रि.) बडबडणे. 'मग वीष्णुस्वामी **भको** लागलेः ''हे काइ जाले या गोवींदासि?'' -ली.६५. (का.बगूळ)

भकभक (क्रिवि.) अधिक प्रमाणात. 'लाईट मालो रे, एवढा **भकभक** उजीळ ना पायजे मले.'

भकंभकं (क्रिवि.) झरझर, जोरजोरात- पडणे. 'सकाऊन बांगळ्याईच्या अवाजात अवाज मिसळनाऱ्या जात्यातून पीठ **भकंभकं** पळू लागलं.'

भकलनं (क्रि.) काहीही बोलणे. 'गावात पीक होते कमी, अन् लोकाईचं **भकलनं** असते लंबंसाट.'

भकल्या (वि.) काहीही बोलणारा. 'पायजो बापा, तू हायस मुलखाचा **भकल्या**, देसीन गोठ सांगून.'

भकाभक (क्रिवि.) जोरात. 'मोठ्ठाल्या मशिना निंगल्या, **भकाभक** गाला वळतात.'

भकाल(ळ) (क्रिवि.) खूप, जोरात. 'हे मोठ्ठीच्या मोठ्ठी मशीन. हरबऱ्याचे कळपच्या कळप **भकाल** वळते.' 'पांडुरंगाले औंदा **भकाळ** पीक झालं आये.'

भकाल्या (वि.) फुशारक्या मारणारा. 'दामू **भकाल्या** काईबी भकलत रायते, शेंडा ना बुळूख.'

भकास (वि.) निर्जन, उदास, भयाण. 'लेकरं घरी नसले तं घरबी लय **भकास** वाट्टे अन् खायालेबी सुट्टे.' (का.बक्क)

भकेल (क्रि.रूप.) बोललेले. 'संत्या **भकेल** अशील ना तुयाजोळ मायाबाऱ्यात.'

भक्कम(ळ) (वि.) खूप, जास्त, मजबूत. '**भक्कम** पीक झालं का कुनबी गोठ नाई घेत.' (अर.मुहकम्)

भग (पु.) बळी. 'देईपुढे बाकराचा **भग**. त्यावर कुत्री तुटून पडली.' -डेबू.५. 'मोरणा नदी दरवर्षी एक तरी **भग** घेतच असते.' -गय.

भगक्कन (क्रिवि.) अचानक. 'श्रीमुर्तीवरि भगकरि प्रकासु पडिलाः मग देखो लागलेः' -ली.१८१. 'चिळीचं तेल टाकलं तसा चुलीत **भगक्कन** उबाय झाला.'

भगटनं (क्रि.) पळून जाणे. 'आबा ईन अथी, तू आंधीच **भगटनं** लेका.'

भगत (पु.) भक्त. '**भगत** बुवा डाफरे, वाटे नाही सरम.' -मिर्झा.४६.

भगभग (न.) जळजळ, पेट. 'त्यांच्या जळत्या हृदयात निराशा व अपमान यांची असह्य **भगभग** होत होती.' -कात.६२२.

भगर (पु.) १. एक धान्य. 'उपास असल्यानं **भगरच** केला सकाऊन अन् आता शाबुदान्याची उसळ केली.' २. उदास, केविलवाणा. 'काईची वरवर, काईले हुंगनई नाई. त्यानं केसरचा जीव निऱ्हाच **भगरभगर** झाल्ता.' -लेक.१४.

भगवान (पु.) देव. '**भगवान** कोनालेबी पावत नाई लय सत पायजे मान्साचं.'

भगाळ (न.) फट, चीर. 'मातीचा पेंड घेऊन भीतीचं हे **भगाळ** भुजून घे.'

भगीनदर (पु.) एक व्याधी. '**भगीनदरात** होनारा तरास सांगोल्या जात नाई.'

भगुनं (न.) गंज, भांडे, पातेले. 'मटनाचे **भगुने** येका थैलीत भरून ठुयेल असतात.' (का.बोगुणि)

भगूट (न.) भुगा, पूड. 'भाजी नोती तं जरासक **भगुटच** घेतलं भाकरीसंगं.'

भगोळा (वि.) पळून जाणारा. 'बरे **भगोळे** हो, लेकराच्या वाटी जाता अन् मी आलो का पयता.'

भग्गल (न.) खड्डा. 'बाळ्यानं **भग्गल** पाहून इटी ठुली, मंगसन्या टोलोली.'

भजनं (क्रि.) आराधना, गुणगान करणे. 'माते पुजावया, **भजावेया** काही नाहीः मिया परमेश्वरू काइसेनि पुजावाः भजावाः' -ली.६०. 'भक्तिकरणे पै राजमुद्रा आथिलीया। प्रजा **भजे** भलतया॥' -ज्ञा.१८.८४९

भजा (पु.) बेसनाचा एक पदार्थ. 'राजानं खाल्ला **भजा** मंग काय पायता राजा पाद्याची मजा.' (का.भज्जि)

भट (पु.) भटजी. 'माहादेव ओरायाचे श्राध होत होतेः तेयांचे **भट** मुक्ष पीतरीए केलेः' -ली.४५०. '**भटाले** देली वसरी.'

भटकनं (क्रि.) उगीचच फिरणे. 'औंदा खातरीच्या बियान्यासाठी **भटकनं** पळ्ळं.' (सं.अभ्यटक)

भटकुला (वि.) भटकणारा, वाट चुकलेला. 'गन्या पुरा **भटकुला** आये. काचा जागीवर सापळते.'

भट्टा (पु.) ढीग, रास, गंज. 'भारी कामाचा बैल नांगरावखरला वाहा, कडब्या तुरीच्या **भट्ट्याला** ओढा.' -पोळा.

भट्टी (स्त्री.) मोठी चूल. 'सखूनं **भट्टी** पेटवली. पाण्यात कपडे टाकले?' -डेबू.१. 'बालू नदीवर गेला होता. **भट्टी** लावून दारू गाळून घरी नेत होता.' -सेल.३१२. (का.बट्टि)

भड (पु.) तुरीच्या ओळीतील टपोरे ज्वारीचे धाट. 'उभ्या **भडाच्या** गयात असे बर्बटीचा येल.' -वि.

भड(ळ)कोनं (क्रि.) पेटविणे. 'पोरं त्यात चिळीचं तेल टाकतात. आग **भडकवतात**.' -डेबू.२४.

भडभड (क्रिवि.) सारखे मोठ्याने. 'थे बाई सारखी बडबड करत आस्ती. **भडभडत** आस्ती.' -खुं.१९४.

भडभडनं (क्रि.) वाटेल तसे बडबडणे. 'हा गोसावीयांचे काही आइकैलः आणि पैऱ्हा जाउनि **भडभडैलः**' -ली.२.

भडभुंज्या (वि.) हरभरे भाजून फुटाणे करणारा. 'कढईतल्या रेतीत **भडभुंज्यानं** फुटाणा फोडावा तसं आंग फुफाटलं.' -मोती. 'चंदी **भडभुंज्याच्या** कढईतल्या फुटाण्यासारखी तडकली होती.' -सि.७९.

भडमुंजा (वि.) एक शिवी. 'त्या **भडमुंजानं** काय केलं आपल्यासाठी? चांगला पटवारी गमावला.' -ना.६४.

भडवा (वि.) वेश्या व्यवसायाचा दलाल. 'कारे **भडव्या** तू तं म्हनस मले पाहाले आले पावने.' -ना.३३. (सं.भर्याट)

भडाभड (क्रिवि.) भरभर. 'जानराव न्हानीत गेला सदरा काढून अंगावर **भडाभड** तांबे घेतले.' -तित.२.

भडू (पु.) वानरातील प्रमुख. 'भूक मारण्यासाठी एकाकी **भडू** सारखं बसणं.' -झेल.५३.

भणकं (वि.) १. भलतीसलती बाब. 'कमाई थोडी खर्च झाला जादा. ते **भणकं** नको लावू.' -त.११५. २. निरर्थक, व्यत्यय. 'आधीच टाईम झाला पुन्हा म्हतारीनं हे चहाच **भनकं** आणलं मंधात.' -अंधा.

भणकनं (क्रि.) चिडणे, संतापणे. 'मी मात्र गोदा काकी आली की, **भणकून** जातो.' -खुं.१८६.

भणका (पु.) गर्दीचा ताप. 'गावातला घराशेजारचा **भणका**, नंतर देशातील लोकांची वस्ती.' -खुं.८.

भत्ता (पु.) १. भाता. 'जानबा खात्यानं एक **भत्ता**, भट्टी, चारदोन आवजारं इतलंच काय थे पोरासाठी मांगं

ठेवलं होतं.' २. वेतनाशिवायची रक्कम. 'माहागाई **भत्ता** भेटते बापा तुमाले, आमच्या तं पोटात **भत्ता** पळत नाही दुपार टयली तरी.' (का.भत्ते)

भद (न.) फोड, जखम. 'इचवाचं मोठं दुखू झालतं. बोटात पानी गेल्तं अन् तथी मोठं **भद** पळ्ळ व्हतं.' -लेक.५८.

भदंभदं (क्रिवि.) जोरजोरात. 'उनायातबी **भदंभदं** पानी पळ्ळं.'

भदकनं (अ.) धाडकन. 'पाय घसरल्यानं सुमी **भदकन** पळ्ळी.'

भदभद (क्रिवि.) एकामागून एक. 'एक गोटा मारला तं **भदभद** आंबे पळ्ळे.'

भदरपिळा (स्त्री.) अभद्र. 'हाता नाई चुळा, कुठून आली **भदरपीळा**.'

भदाड(ळ) (न.) भांडे. 'एवढे **भदाडं** घासून घ्याव. मंग आंग टाकाले मोकयी.' -मोती. (सं.भद्ररम)

भदाडं (न.) छिद्र. 'माशायनं **भदाडं** टोकरून काढू नाई म्हणून वर चिंधी बांधली.' -अंधा.

भदाडं (वि.) मोठे. 'अशा काही ओळी **भदाड्या** अक्षरात भिंतींवर उमटल्या.' -मोती.२.

भद्दा (वि.) मंद, फिक्कट. 'हा रंग लयच **भद्दा** दिसते, जरा उजय दाखवा.'

भनक (स्त्री.) खबर, सुराग. 'पोरीचं चालचलन ठीक नाई याची **भनक** लागल्या बरोबर सोयरिक थांबोली भाऊ.'

भनकं (न.) बिनकामी बाब. 'अरे काय लावलं रे, तुयं **भनकं** फेक बरं तिकळे.'

भनकनं (क्रि.) संतापणे, चिडणे. 'घरात बसून विचार करताकरता तिचं डोकं **भनकायला** लागलं.' -पाटी. 'याच्या त्याच्याऊन **भनकनं** साजरं नसते.'

भनकलं (क्रि.रूप.) संतापले. 'ऐकून माहेवालं, डोक्सच सनकलं, केवढ्याची आली, भलतच **भनकलं**.' -मिर्झा.११७.

भनक्या (वि.) कःपदार्थ, कवडीमोल वस्तू. 'त्या **भनक्या** तुयशाले घेऊ नका आपल्यासंगं.'

भनंग (वि.) भिकारी, दरिद्री. 'एवढा मोठा सावकार पन **भनंग** हून गेला.' (का.बनगु)

भनभन (क्रिवि.) उदासवाणे. 'बेकारीच्या सगरानं, **भनभन** पोरं हिंडतात/ काई डाकू गुंडे, तं काई चोर बनतात.' -चंच.

भनभनी (स्त्री.) १. उदासी. 'बायको घरत नसली का मान्साले लयच **भनभनी** लागते.' २. तगादा. 'पायेटपासून काय **भनभनी** लावली बे तुया?'

भनान (क्रिवि.) जोरात. 'टेंपं हाती घेतलं का लेकरं **भनान** पयतात.'

भनानेल (वि.) तापलेले, त्रस्त. 'काशाचं डोक्सं **भनानेल** आय इचाराइचारानं.'

भनाभन (क्रिवि.) जोरात. 'पोलिसं दिस्ता बरोबर दारूळे **भनाभन** पयाले लागले.'

भन्नवनं (क्रि.) मारणे. 'हे कुचीन पोट्टं **भन्नवनं** पळते कुठीतरी.'

भन्नाट (क्रिवि.) सुसाट. 'एवढे लोडिंगचे ट्रक पण साले **भन्नाट** पळत जातात.' -त.४.

भन्नावनं (क्रि.) मारणे. 'आयकत नाई तं **भन्नावनं** सायाले.'

भन्नावून (क्रि.रूप.) १. त्रस्त होऊन. 'या गोठीनच तं माहा डोक्सं **भन्नावून** गेलं.' २. मार देऊन. 'दयारामाले साजरं **भन्नावून** काहाळलं वाट्टे कोनं.'

भपकन (क्रिवि.) एकदम. 'काळी लावली तसा **भपकन** ताप पेटला.'

भपका (पु.) १. ज्वाळाचा लोट. 'वनवा पेटला. जागो जागी **भपका** दिसे.' २. मोठेपणा. 'काई नाई भाऊ सगळा **भपका** हाय, येकात असल्यावर तं दिसतेच ना?'

भपकारनं (क्रि.) दर्वळणे. 'शेणमुताचा वास वाडाभर **भपकारत** होता.' -धग.१३४.

भपकारा (पु.) १. मोठेपणा. 'गनेसरावचा **भपकाराच** पाहून घ्या. जोळ दमळी नाई.' २. वासाचा झोत. 'गवळी ढाण्यात दुधा तुपाचा धमकारा तर कोरकू ढाण्यात दारूचा **भपकारा**.' -झेल.२१.

भपक्या (वि.) बडेजाव आणणारा. 'दिप्या **भपक्या** हाय. त्याच्या लंब्या गोठीच आयकून घ्या फक्त.'

भपारी (स्त्री.) थाप. 'नांग्यानं भलतीच **भपारी** देली ठोकून.'

भपाऱ्या (वि.) १. बडेजाव, मोठेपणा सांगणारा. 'नंगचोट हाय सायाचा अन् **भपाऱ्या** तानते माया घरी घोळं हाय म्हन्ते.' २. थापा. 'मोठमोठ्या **भपाऱ्या** माराले सांगा गनशाले.'

भबुती (स्त्री.) राख. 'बॉनं आंगाले केवढी **भबुती** फासेल आय पाय.'

भयतानं(ळा) (वि.) वेडगळ, वेंधळा. 'गोविंदाचं **भयतानं** म्हने माया वावरात शाबुदाना पेरला.'

भयताळबेलन्या (वि.) वेडगळ. 'काय झालं काय पुसतं **भयताळबेलन्या**.' -सील.५७.

भयान (वि.) भीतीदायक, ओसाड. 'देशाचं कसं पाहा रूप झालं **भयान**/ तरी आजून म्हणता देश मेरा महान.' -ऊ.६. 'ऊन तपते **भयान** झाली कोरडी जमीन, भेगा पडल्या त्यात पीक गेलं करपून.'

भयानक (वि.) भयावह. 'माहा आंधरी रात्र, **भयानक** वन देखौनि नाम आठवीले.' -ली.६९७.

भयानकोंबळा (वि.) विसराळू, वेंधळा. 'पाय **भयान कोंबळा** दुपट्टं इसरून गेला अथी.'

भयानतोंड्या (वि.) बावळट. 'अबे वो **भयानतोंड्या**, कोनत्या शोळेत शिकून रायला बे तू?'

भयानथुतरा (वि.) वेडगळ, वेंधळा. 'तीही अशी **भयानथुतरी** उष्टाखरकटा आंबा खात बसली.' -मोती.४१.

भयाना (वि.) वेंधळा. 'ड्रायव्हर नमुना आणि ड्रायव्हर खूपच **भयाना'** -गय. 'मान्साईच्या गोद्रीत परसाकळे गेल्ती **भयान्यावानाची**.' -ना.

भयाभया (क्रिवि.) मोठ्याने. 'बनाआजी **भयाभया** लळतच दारात आली.'

भयासान (वि.) भयावह. 'अशा **भयासान** पुरात काही सोडलं, वाह्यलं नाही त कोप व्हते नदीचा.' -कावू.

भयासूर (वि.) भयावह. 'तैसी अद्भुते **भयासुरे**। तेथ वदने देखिली वीरे।' -ज्ञा.९.२०१. 'जन्याचं तोंड पाय केवढं **भयासूर** दिसून रायलं.'

भर (पु.) बैलगाडीतून आणलेला कडबा, तुराट्या. 'किती रोजची म्हनून रायली पऱ्हाट्याचा **भर** आना.' -ना.१४. 'झाली बैलाची गत **भर** वाहण्या हजर/ उमाळा ऐकण्याला कोणा फुटेना पाझर.' -रुक्मि.७५.

भर (वि.) ऐन. '**भर** हगामात अशा होते पारखी भाकरं.' -काया.२८. 'आता तं भर दिवसा चोराय सुटलं.'

भर (अ.) संपूर्ण. 'माया सासूनं तं **जलमभर** माया काट केला बाई. बायतपनात काळ्याफनं येचाले लावल्या.'

भरअईर (पु.) सर्व कुटुंबाला लागणारी वस्त्र देणे. 'केसरच्या मायबापानं तिच्या घरच्या साऱ्या लगनाईत **भरअईर** केले.' -लेक.११.

भरकन (क्रिवि.) जोरात. 'चिमनी ये, दाना खाय अन् **भरकन** उळून जाय.'

भरकाची - पिकानंतर उरलेली धाटं. 'उलंघवाडी पटकन होते जशी **भरकाची**.' -मिर्झा.३९

भरकाडी (वि.) कमी, हलकी ज्वारी, कापूस. 'हे कुठून आनली रे **भरकाडी** जवारी.'

भरकात (न.) शेवटचे पीक. '**भरकात** कापूस फुटल्यानं येचून घ्याची घाई झालती.' -दि.७७. 'ज्वारीचे फडे जसे **भरकात**.' -मिए.१३४.

भरके (वि.) माखलेले, भरलेले. 'बारी सोडून गुलाबराव **भरके** हात घेऊन इरीवर आला.' -अंधा. 'तिथेच हौदावर शेणाचे **भरके** हात धुतो.' -खुं.१४८.

भरडजाड (वि.) जाड. 'काहीकाही बटा पऱ्हाटीतल्या कोंबड्यासारख्या **भरडजाड** झाल्त्या.' -मोती.

भरडनं क्रि. जाड दळणे. 'मग बाइसी तेयातुनी चणे घेतलेः **भरडिलेः** डाळिः' -ली.३१४.

भरतार (पु.) नवरा. 'तंव तयाचा **भातारू** बाहीरीलाकडौनि आलाः' -ली.१०९. 'जैसी **भार्तारेहीन** वनिता। उपहति पावे सर्वथा॥' -ज्ञा.२.१९९. 'याचसाठी सांडियेले **भरतार**। रातलों या परपुरुषाशीं॥' -तुका.१६.२. 'दुबळा **भरतार** नको करू तू हेळना/ कुंकू कपाळाचे लाल सोनं दिल्यानं मिळेना.' -लोक.६९. 'सकाऊनच्या पायरी गानं म्हंतात पाखरं/ सोभे पायेटनवरी अन् सूर्य **भरतार**.' (सं.भ्रतार)

भरताळ (वि.) जास्तीचे, बिनकामी. 'मुद्याचं बोल, **भरताळ** नको लावत बसू.'

भरती (स्त्री.) ओझे. 'बंडीत **भरती** ज्यास्त झाल्यानं बैलं मेट्यावर येऊन रायले लेकाचे.'

भरदट (वि.) शक्तिशाली. 'बैल तं लय **भरदट** दिसतात अन् चार पोतेबी नाई वळत बंडीले?'

भरन (न.) काट्यांचा कुंपणासाठी घातलेला गंज, फास. 'कूप घाल्याले **भरन** पायजे तं गजाननले तोळाले सांगजो.'

भरनं (क्रि.) पूर्ण करणे, आत ओतणे. 'चौकरंग माळिका **भरितिः** गुळुभेलीएचा नीवदू दाखवीतीः' -ली.५८१. 'सिंधू कवण **भरी**।' -ज्ञा.१३.५६. 'इरीवर पानी **भरनंच** आये नसिबात माया.' (सं.भरव)

भरनं (न.) भरणे, कळशी. 'मग भटोबासी **भरणुके** कानोडे केलेः मग स्वानाचेया ऐसी खीरि खादलीः' -ली.१९. '**भरणा** रिचवोनी बाहेर आली माता।' -नाथ.२-८७.

भरनसूद (वि.) भारदस्त, अनुभवी. 'बुडा **भारनसूद** हाये, इमानदार हाये, घ्या अटकून.' -सित.१४.

भरना (पु.) पैसे इत्यादी जमा करणे. 'पिककर्जाचा **भरना** कराले पैसे नोते ना? म्हनून इकलं सोयाबीन.'

भरनी (स्त्री.) वस्तू भरण्याचे साधन. 'मीठ, चटनी भऱ्याले **भरनीच** केली.' 'रायत्याची **भरनी** कुठी ठेवू काकी?'

भरपेट (वि.) पोटभरून. 'काजू, बदाम, मनुका असा सुका मेवा तो **भरपेट** खायला लागला.' -खुं.२०४.

भरभक्कम (वि.) पुरेपूर. 'जेवन **भरभक्कम** झालं काई लोकाईचं अन् काई उपाशीच गेले.' (फा.फरफर, का.बिरिबिरि)

भरभराट (स्त्री.) प्रगती, वृद्धी. 'दोन पोरं नवकरीवर लागले अन् दाम्याच्या घरी **भरभराट** झाली.' (त. बर्बराट्टु)

भरम (पु.) भ्रम. 'तुमचा **भरम** झाला राजे हो. ते बाई लगन

होयेल हाय ना?'

भरमसूद (वि.) अनुभवी, रीतभात जाणणारा, वयस्कर. 'तू शाळा शिकनारा चांग्ला **भरमसूद** पोर्गा हे गिदाळे कामं काहाले करसील?' -पागो.९७.

भरमाचा भोपया (पु.) मुळात नसलेल्या गोष्टीचे प्रदर्शन, आव. 'बेज्या शायने झालो रे खोटं सांगत नाई, **भरमाचा** भोपया होबासकीले वान नाई.' -रूख.

भरला (क्रि.रूप.) रित्या अवकाशात काही टाकले. '**भरला** आपला जेथे डेरा तोच म्हनावा का गाव बरा?' -भीक.१२९. 'राजन पान्यानं सट **भरला** आय.'

भरलापुरला (वि.) अवकाश व्यापून उरलेला. 'जोडणी नाही टाकत वाटते चांगला **भरलापुरला** हये न त्यो.' -सेल.३१३.

भरंवसा (पु.) विश्वास. '**भरवसा** काय आतां। कोण आणि अवचिता।' -तुका.४२४.४. (हि. भरोसा, का. भरवसे)

भरसान (क्रि.रूप.) भरणार, भराल. 'अरे येवळं पाप करसान ना तं याच जेलमात **भरसानबी**.'

भरळ (स्त्री.) जात्यातून निघणारे जाड कण. 'पीठ वालं ठेव, हे **भरळ** वाली ठेव.'

भरळनं (क्रि.) भरडणे, दळणे. '**भळ्ळाव** तेदलोक अळ्ळावः मंग तेही सोंडीएवरि चणे भरडिलेः' -ली.४११.

भरळमुंजा (पु.) फुटाणे भाजणारा. 'शान लखपत्याची धंदा **भरळमुंज्याचा**.'

भराई (स्त्री.) भरण्याची मजुरी. 'खोदाई सोळून **भराईचे** पैसे अल्लग द्या लागतीन भाऊ.'

भराटा (पु.) बैलगाडीच्या खुटातील आडवे बांबू. '**भराट्यांवर** तक्क्या टेकवून ताता रेलून बसला होता.' -सि.११०.

भराटी (स्त्री.) एक वृक्ष, याच्या काड्या टिपऱ्या म्हणून वापरतात. 'तूर देते भुत्ता तुह्या हाती तुऱ्हाट्या/ कूप करासाठी भेटत नाही **भराट्या'** -ऊ.३२. 'काल सरपण गोळा करताना पायात **भराटीचा** काटा मोडला.' -जटा.३८.

भरात (क्रिवि.) ओघात, जोशात. 'जवानीच्या **भरात** होतात चुका काई ना काई.'

भरानं (क्रिवि.) वेळाने. 'बलुतं मागावं तर जो तो आता नाही गड्या **जराभरानं** ये म्हणत होता.' -सेल.१३७.

भराव (पु.) भर टाकणे. 'खांडवाहिंगोली रेल्वे लाईनचा **भराव** टाकणं सुरू होता.' -सि.९३.

भरी (स्त्री.) १. गढी. 'पांडेबॉचं घर भरीवरच त आये.' २. गढीचा **भराव**. 'गढीच्या भरीकडून वाड्यात फुलझाडं लावली.' -खुं.१८५.

भरीत (न.) भाजून केलेला पदार्थ. 'चुलीतल्या इस्तोवात वांगे टाकून त्याचं **भरीत** कर साजरं.'

भरीत(स)भर (क्रिवि.) मुळात आणखी दुसरे आलेले. 'येक वावर उलटलं अन् **भरीतभर** बायकोबी बिमार पळ्ळी.'

भरीव (वि.) पक्व, पोकळ नसलेले. 'पुरान्याची काळी **भरीव** पायजे. पोकय तं बातन्याबात फाकते.'

भरीस (क्रिवि.) भिडीस. 'हे कऱ्याले नांगोनच **भरीस** पाळलं मले.'

भरुसा (पु.) विश्वास. 'आपून डोये लावून **भरुसा** ठुतो तं लोक मान काप्याले पायतात.'

भरून (क्रि.रूप.) १. म्हैशीला हल्या, सर देऊन. 'म्हैस निंगली तं हेल्याच्या जोळून **भरून** आना लागते लेक.' २. भरपाई करून. 'गिलास फोळ्ळा तं दाहा रुपये **भरून** घेतले मायाकून.'

भरे (क्रि.रूप.) भरायची. 'आदित्यवाराचा दीसी परसरामापुढे यात्रा **भरेः**' -गोवि.१४३. 'गोदी मायाच इरीवर पानी भरे.'

भरेल (क्रि.रूप.) भरलेले. 'सून होती तं पान्याचे राजनं **भरेल** रायत वऽऽ कुसूम.'

भरोता (क्रि.रूप.) भरविता. 'कास्तकारासारखे हात **भरोता** काय चिखोलानं तुमी नवकऱ्यावाले.'

भरोते (क्रि.रूप.) भरविते. 'हे लेकरू सेनानं हात **भरोते** वाट्टे माय.'

भरोले (क्रि.रूप.) भरवले, लिप्त. 'यानं गुवानं पाय **भरोले** केवळे.'

भरोसा (पु.) १. विश्वास. 'मी सर्वथा न झुंजे तेथे। **भरंवसेनि**॥' -ज्ञा.२.८२. 'हा मज **भरंवसा** आहे तुझा।' -नाथ. 'मानी **भरंवसा** हा बोलण्याचा।' -नाथ.१०. 'कुलूपकिल्लीचा विटाळ असल्यानं झोपड्यांचा माणसावरील **भरोसा** कायम होता.' -झेल.४. २. आधार. 'जमिनीच्या **भरोशावरच** या लोकांची ठाकुरकी होती.' -झि.८७.

भर्न (न.) भरणे, घडा. '**भर्न** न्हानीपासी ठिवलं आन ते रंदावनीत घुसली.' -सित.२९.

भर्मिष्ट (वि.) भ्रमिष्ट. 'देव कसा असील कधी भेटील अशा कल्पना करनारा मानूस **भर्मिष्ट** आहे.' -अखे.

भऱ्याले (क्रि.रूप.) भरायला. 'रागं **भऱ्याले** तुल काय झालं रे?' 'पोरीले घळ्ळी **भऱ्याले** लावली म्या.'

भर्रकन (क्रिवि.) जोरात उडणे, जाणे. 'चिळीजोळ गेलो. ते भर्रकन उळ्ळी. रामा आला तसाच **भर्रकन** गेला बी.'

भलं (वि.) चांगले. 'तुज कोणी ना म्हणें **भलें**।' -नाथ.१२७६.

'**भलं** केल्यानं **भलंच** होते.' (का. भलभल, भला, भलरे)

भलकई (वि.) अशिष्ट, मनास न पटणारे. 'बाईमान्साच्या देखत **भलकई** बोलू नाई बाबू.'

भलकशी (क्रिवि.) अतिशय, खूप. 'मले कयलबी नाई थांबा आला घंटी झाली/ तिनं खाली उतऱ्याले **भलकशी** घाई केली.' -पाहु.१७. 'औंदा पऱ्हाटी **भलकशी** पिकनार हाय, आपल्यावाली.'

भलकसं (वि.) खूप. 'जेवनखान म्हटलं की **भलकसा** दांगळो होते.' -डेबू.६९. 'काल **भलकसं** पानी पळूं.'

भलकाई (वि.) काहीच्या बाही. 'हा तर लेक **भलकाईच** आरोप झाला.' -फीर.१६९.

भलकुकळे (क्रिवि.) भलतीकडे. 'लोकं जे पायजे ते करत नाईत अन् **भलकुकळेच** घोळे उळोतात.' -ना.६४.

भलकेदाया (क्रिवि.) मुख्य वेळ सोडून. 'नवीन लगन होयल दाम्याच्या घरी **भलकेदाया** जानं काई बरोबर नाई.'

भलकोंतं (वि.) भलतेच. '**भलकोंत्या** वावराईच्या आंगं बोट दाखून आपलं म्हटल्यानं थोळीच जमते राजा.'

भलकोनी (वि.) भलता. 'माया घरी तू येत जाय आऽऽ असं **भलकोनी** संगं आन्याचं काम नाई, काय?'

भलतंसलतं (वि.) अयोग्य, न पटणारे, वाईट, काहीतरीच. 'चिन्हावर **भलत्यासलत्या** शिक्का मारून देशील/ सरप मेल्यावर नाई तं रट्टे मारशील.' -रूख. 'या मव्हरे सावध राहाय. **भलत्यासलत्या** टायमाले अशी एकटी घराबाहीर पडू नको.' -पख.५५. 'सासू **भलतंसलतं** बोलत रायते तं आपून काहाले मनावर घ्यावं.'

भलता (वि.) १. तिऱ्हाईत. 'ते आपुला अलंकारितु। **भलतयापरी**॥' -ज्ञा.१.८२. २. वेगळी, अजब. 'पाव्हण्यानं त्यादिवशी **भलतीच** शक्कल काढली.' -पख.१२८.

भलतीसं (क्रिवि.) प्रमाणाबाहेर. 'दोघायचा जोळाघोळा मस्त झाला म्हून ते **भलतीसा** खूस झाली.' -सित.५९.

भला (वि.) चांगला, प्रामाणिक. 'देवधरम करनारा **भला** मानूस अस्ते असं काई नाई राजा.' (अण्य, छान,त.बले)

भलाई (स्त्री.) हीत, कल्याण. 'जवायाची **भलाई** कऱ्याले गेलो तं जवाई म्हने होतो सासरे बॉ आता घरजावईच.'

भलाईत (वि.) चांगल्या, घरंदाज. 'नायकीन ही **भलाईत** गरतीला देखील लाजविते कारण तिलाही इज्जत असते.' -कात.४१४.

भलाबुरा (वि.) चांगला वाईट. 'तुक सकळांचे गोविंदाचे हाती। कोण कोणे गती **भलाबुरा**॥' -तुका.४५०६.

भलेभले (वि.) मोठेमोठे. '**भलेभले** शहाणे सुरते मधे पडले. भांडण सावरत गेलं.' -डेबू.११.

भल्तं (वि.) वेगळे. 'कऱ्याले गेलो चांगलं अन् झालं लेकाचं **भल्तंच**.'

भल्या (वि.) ऐन, एकदम. 'लग्न **भल्या** पहाटे गोपाळमुहूर्तावर करण्याचं ठरलं.' -काळी.९९.

भल्यामानशिनी (वि.) सभ्य स्त्री. 'तुले दोन जीव वागवा लागतात **भल्यामानशिनी**. तू पह्यलटकरीन व्हयस.' -भं.१३०.

भल्यामानसा (वि.) चांगल्या माणसा. 'असं करावं काय **भल्यामानसा**? अन् येधवा आला. राती इरतीचं वरून अभाय.' -फीर.१४७.

भल्लं (वि.) खूप. 'म्हसाळीच्या जातीचाच मले **भल्ला** राग आला.' -वि.

भवताल (वि.) सभोताल. 'कायचा वास येते, कोण **भवताल** बाई, माप पलंगाचं देते.' -लोक.४१.

भवरा (पु.) १. फिरणारे पाणी. 'जनकराव पुराच्या कोंडीत सापडला व्होता. नदीच्या **भवऱ्यात** सापळावं तसाच.' -लेक.५. २. एक खेळणे. 'भ्रम हा **भोंवरा** फिरवी गरगरा।' -नाथ. 'निंदी आलेल्या **भवऱ्याची** आरू एकाच ठिकाणी घर करते.' -सि.६१.

भवांडनं (क्रि.) भोवणे. 'आपल्याच चुका आता आपल्याले **भवांडल्या**.' -सित.७१.

भवाडे (स्त्री.अने.) वाईट अवस्था. 'त्याच्यात नाही वात काय **भवाडे** आणले व माय?' -बा.५५.

भसक (अ.) खूप, अधिक. 'पोट्टं तापीनं **पांडंभसक** पळूं लेक.'

भसकट (न.) भुस्कट. 'दिलेली भाकरही जळकी, करपलेली, पीठ कमी **भसकट** जास्त घालून केलेली.' -पख.१५३.

भसकनं (क्रि.) खाणे, गिळणे. 'कामावर नाई जात. वारा **भसकतो** नाई तं ढेकलं घालतो पोटात.' -धग.७३.

भसकन (अ.) एकदम, अचानक. 'तिच्या मनाचाई फुगा **भसकन** फुटला/ अन् गवताचा भारा हातचा सुटला.' -नांबै.

भसकभर (वि.) थोडे. 'पीठ मांगलं तं पाय केवढसक देलं **भसकभर**.'

भसकभसक (क्रिवि.) थोडेथोडे. '**भसकभसक** काय वाहाळतं पीठ, एकदम टाकनं सारं झोईत.'

भसका (वि.) खाणारा. 'मन्या लय **भसका**, लाळू हानतच रायते.'

भसक्या (वि.) मोठेपणा करणारा. '**भसक्या** मान्साले हीत नाई समजत कोनालेबी देत रायते.'

भसभस (क्रिवि.) सारखे. 'धाब्याची माती पाय कसी **भसभस** पळून रायली.'

भसंभसं (वि.) खूप, विपुल, जास्त. 'तरी बरं दोनच लेकरावर भागलं, माह्यावानी **भसंभसं** नाई झाले.' -धग.२३

भसमनं (क्रि.) भंगणे, नाश, भस्म होणे. 'येवळं गर्व करू नाई मान्सानं. केलं तं मंग **भसमनं** आलंच.'

भसाड्या (वि.) जाडा बेसूर. 'भलामोठा कर्कश रेडिओ **भसाड्या** आवाजात ओरडत होता.' -मा.१९.

भसाभस (क्रिवि.) भरपूर. 'सासऱ्याच्या घरी जाऊ अन् **भसाभस** खाऊ.' -ऊ.२५.

भसाळा (वि.) धसमुसळा. 'निंबाजी **भसाळ्यासारखा** चालू नोको. खाली पाऊन पाय टाक.' -फीर.२३५.

भस्काभर (वि.) खूप जास्त. 'भाजीत तिखट म्हनानं त हॅ **भस्काभर**.' -एक.

भळ (पु.) तासातील एकट ज्वारीचे धाट. 'दिसते कसा तुरीतला भळ जसा.' 'उभ्या **भळाच्या** गयात असे बर्बटीचा येल'

भळकन (क्रिवि.) लगेच, त्वरित. 'बस असा **भळकन** जातो अन् **भळकन** वापस येतो.'

भळकनं (क्रि.) १. पेटणे. 'कापसावर चिनकी पळ्ळी तं **भळकनं** तं हायस राजा.' २. रागावणे. 'तरन्याताठ्या लेकावर बापाचं असंच **भळकनं** चालू रायते.'

भळका (पु.) आगीचा लोट. 'फनाच्या गंजावर घासलेट टाकून पेटोलं अन् **भळकाच** झाला.'

भळंभळं (क्रिवि.) जोरात, सारखा. 'वंका पाय कसा **भळंभळं** वकला.'

भळमुंज़ा (वि.) एक शिवी. 'इसलो पायझन हा एकच विलाज राह्यला त्या **भळमुंजाची** थंडी कऱ्याले.'

भळवा (वि.) वेश्या व्यवसायातून दलाली घेणारा ह्या अर्थी एक शिवी. 'चेंढायन्या अन् खोळ्या कऱ्याचं त **भळविच्यानं** कोनीच शिल्लक नाई सोळलं.' -पागो.३६.

भळवी (वि.) एक शिवी. 'लाता मारते **भळवीची**, मोठी पतीवरता झाली शिनाल.' -ना.५७.

भळाल (क्रिवि.) जोरात. 'येका बुक्कीत तोंडातून **भळाल** रगत पाळील लेका.'

भळालकनं (क्रिवि.) धाडदिशी. 'मी दिसल्या बरोबर आनंदातिरेकानं ते भूईवर **भळालकन** आंग टाकून दे.' -मे.६७.

भळास (वि.) मनातील सुप्त राग. 'त्याले बोलून मनातली अवघी **भळास** काहाळली म्या.'

भळू (पु.) वानराचा नायक. 'हात नाई धुतला पाय नाई धुतला **भळू** जेवू घातला.'

भळ्या (पु.) वानराचा नायक. 'वान्नेराच्या कयपात एकतरी **भळ्या** असतेच.'

भळ्ळून (क्रि.) भरडण्याची क्रिया. 'एवढं **भळ्ळून** झालं का जातं मोकय होते तुयासाठी.'

भळ्ळा (पु.) भरडा. 'पावने आले तं **भळ्ळा** पाखळाचा रायला माय.'

भळ्ळेल (क्रि.रूप.) भरडलेले. 'हे **भळ्ळेल** तूर डब्ब्यात भरून ठेव.'

भंग (वि.) १. भग्न. 'मंदीर **भंग** पावलं. कोनीच नाई जात त्याच्यामंदी.' २. अवकळा. 'जोरदार खटला होता, **भंगला** आजकाल.'

भंगनं (क्रि.) भंग पावणे. 'देवाचं देऊळ **भंगनं** म्हंजे अपशकूनच.'

भंगारनं (क्रि.) १. भंग होणे. 'घरात कोनी बाईमानूस नसला का घर **भंगारनं** आलंच.' २. दारिद्र्य, गरिबी येणे.

भंगारेल (वि.) १. भंग पावलेले. २. गरिबी आलेला. 'इतक्या दिवस त आपून **भंगारेलच** व्हतो.' -त.२९. 'पाटील बॉ काई सांगू नोका लय **भंगारेल** हा तुमी माईत हाय आमाले.'

भंटोल (वि.) काम नसलेला, लुच्चा, लफंगा, लोफर. 'अजूनही उभे हावो रांगीत कंटोलाच्या/ बसलो आहो कहीचे कंपनीत **भंटोलाच्या**.' -मिए.११९. 'नाव निंघाले पाह्यजे असं वागावं. **भंटोलाच्या** संगतीत राहू नये.' -ना.१४.

भंड (पु.) नाश. 'आमच्या पैशाचा **भंड** पडू दे पण तुव्हा संसार मोडू देऊ नको.' -पाटी.४७.

भंडवाडा (पु.) सर्वनाश. 'कसं व्हईल ते व्हवो माय हिचं? का **भंडवाडाच** करते संसाराचा ते?' -रा.६७.

भंडार (न.) कोठार. 'होती चौऱ्याशीं लक्ष थरा। येरा मितीं नेणिजे **भांडारा**।' -ज्ञा.७.२४. 'धान्यांची **भांडारे**, होती ती फोडिली, पंढरी रक्षली, दुष्काळात॥' -तुका.४३३३.

भंडारखाना (पु.) स्वयंपाकघर. 'आमच्या घरचा **भंडारखाना** सुरूच रायते दिवसभर.' (फा.)

भंडारा (पु.) देवाच्या नावाचे गावजेवण. 'शेराचा **भंडारा**, गावभर ढिंडोरा.'

भंडावनं (क्रि.) फसविणे, ताप देणे. 'शिकुस्ना काई काम करत नाई अन् लोकाईले **भंडावनं** चालू रायते लेकाचं.'

भंडोनं (क्रि.) फसविणे, त्रास देणे. 'बंद कर **भंडोनं** समजू नको चिवत्या/ खोटे हायत कामं तुहे, खोट्या साऱ्या पावत्या.' -नांबै.

भंपक (वि.) पोकळ, असत्य. 'गणू म्हनान निव्वळ **भंपक** गळी. खरं काहीच नसते.'

भाई (पु.) भाऊ. 'अपना तो **भाई** निकला यार तू. संकटात कामा पळ्ळा रे बापा.'

भाईर (क्रिवि.) बाहेर. 'वसरीत लेकरं नको जमवू. **भाईरच** खेयेजो.' -धग.४२.

भाईरलं (न.) भूत वगैरे. 'शांते मले वाट्टे हिले काहीतरी **भाइरलच** हाये.' -ना.५४.

भाईस (क्रिवि.) मते, मताने. 'तिच्या डोयातून नवरा मरून टिपूस गयलं नाई. तिच्या **भाईस** झानू काई झालच नोतं.' -सित.७८.

भाऊबंदकी (स्त्री.) परिवारातील कलह. '**भाऊबंदकी** पायी लय खटले बुळले.' (फा.)

भाऊबीज (स्त्री.) बहिणीने भावाला ओवाळण्याचा विधी, बलिप्रतीपदा. 'जी जी आजि गोसावी राहावेः मी गोसावीयांचा ठाइ **भाउबीज** करीनः' -ली.४८३.

भाकड(ळ) (वि.) दूध न देणारी गाय, म्हैस. 'कां चिखलीं रुतली गाये। **धडभाकड** न पाहे।' -ज्ञा.१६.१४२.

भाकर (स्त्री.) ज्वारीच्या पिठाची जाड चपाती. 'तेयासि भीक्षेसि मांडेः पोळी ढीडरेः **भाकरी**ः दीवसेः वर्णभातुः खीरि साकवतीयाः' -ली.५१०. 'आबाइसी म्हणीतलेः ''जीःजीः वऱ्हाडी **भाकरी** कैसीजी?'' -गोवि.२२४. 'आतां खाईन पोटभरी। ओल्या कोरड्या **भाकरी**॥' -तुका.५७०. (का.भक्करि, भक्कि)

भाकरभाजी (स्त्री.) भाकर वगैरे, गरिबाचे खाणे. 'नशिबात नसलं का **भाकरभाजीबी** भेटत नाई येकटाईमची.'

भाग (न.) १. निकडीचे. 'घरात अंधार पडला. दिवा लावनं **भाग** होतं.' -पख.१६५. २. देवासमोर ठेवावयाचा भात. 'इतवारी पारसच्या देवाले **भाग** दाखवाले जातो.' ३. हिस्सा. 'ते म्हणेः राउळोः आपला भागौ सांडौनि लेकरुवांचा **भागु** का जेवीतु असा?' -गोवि.५. ४. प्रदेश. 'कळासपट्टीच्या **भागात** संतरा लय होते.'

भागडी (वि.) भाकड. 'एकमेकाले शिव्या देऊन बनोता/ म्हैस हाय **भागडी** कवा तिले जनोता.' -जांग.८३.

भागनं (क्रि.) निभणे. 'चालते तसं चालू द्या. आजचा दिवस **भागला**, लोटला. शुक्रिया.' -गय. (का.भगिसु)

भागमभाग (स्त्री.) पळापळ. 'कोरटकचेरीच्या कामात लय **भागमभाग** करा लागते.'

भागर्ता (स्त्री.) एक स्त्री नाव- भागीरथी. 'तेवढ्यात **भागर्ता** बुढीनं भलताच अकात मांडला.' -धुम्म.

भागवान (पु.) दैव, नशिबवान. 'देवाचा देवपाट फुलानं शोभीवंत नार पुत्रानं **भाग्यवंत**.' -लोक.३३. 'जमीनजुमला, पोरं, पोरी सबन असल्यानं जानराव लय **भागवान** मानूस.'

भागवाभागवी (स्त्री.) कसेतरी निभवणे. 'पैसा नसला का **भागवाभागवी** कराच लागते.'

भागीदार (पु.) व्यवसायातील वाटेकरी. 'दिसते तसं नस्ते राजा. दोन पैसे येतात त्यात **भागीदाराचा** हिस्सा द्या लागते.' (फा.)

भागेल (क्रि.रूप.) निभलेले. 'कुळवभर गव्हात तं पंगत **भागेल** आये कालची.'

भागोनं (क्रि.) निभविणे. 'बाई समजदार असली का **भागोनं** आलंच तिले.'

भागोयाले (क्रि.रूप.) निभवायला. 'पगारात मयना तं **भागोयालेच** पायजे.'

भाजकं (वि.) भाजलेले. 'हे लय **भाजकं** कनूस आये, साजरं आन्नं एखांदं पाहून.'

भाजनं (क्रि.) भाजणे. 'भरतासाठी एक वांगं **भाजनं** पोरी.'

भाजनी (क्रि.रूप.) भाजलेले. 'उकळपेंडीले **भाजनीचं** पीठ कनीक पायजे.'

भाजभूज (स्त्री.) भाजण्याची क्रिया. 'गावरान जेवारीचं कनूस **भाजभूज** केलं अन् खाल्लं.'

भाजेलं (वि.) भाजलेले. 'हरबरे कच्यापेक्शा **भाजेल** बरे लागतात.'

भाज्याले (क्रि.रूप.) भाजण्यासाठी. 'कनसं **भाज्याले** वायेल गवत आन धुऱ्यावरून.'

भाट (पु.) वंशावळीचे जतन करणारी एक जमात. 'ओवाळणिया पडतिः पुढे **भाट** पवाडे पढतिः वाजंत्राचा एकनादुः' -ली.७४. 'दिगंतीचे भूपति। **भाट** होऊनि वाखाणिती।' -ज्ञा.२.२१२. 'तुका म्हणे नरस्तुति। करितो **भाट** त्रिजगतीं॥' -तुका.४०९३.४. 'कोन्त्याई लग्नात तुमच्या शिवाई दुसरा **भाट** दिसते काय? ' -मोती. (सं.भट्ट)

भाट (वि.) बडबड करणारा. 'गोप्या म्हन्जे पक्का **भाट**. निऱ्हा बळबळ करत रायते सावा.'

भाटगिरी (स्त्री.) १. भाटाचा व्यवसाय. '**भाटगिरीपेक्षाही** कपडे शिलाईत मस्त पैसा सुटत होता.' -मोती. २. प्रशंसा करणे. 'याची त्याची **भाटगिरी** कराले सांगा लक्शाले.'

भाड(ळ) (स्त्री.) वेश्या व्यवसायातून मिळणारी दलाली. 'कीर्त्तनाचा विकरा मातेचें गमन। **भाड** खाई धन विटाळ तो॥' -तुका.४३८७.

भाडखाऊ (वि.) वेश्या व्यवसायाची दलाली खाणारा ह्या अर्थी एक शिवी. '**भाडखाऊचे** हो नाकानं काहाले गोठी करता बे.'

भाड्या (वि.) नवऱ्या व्यतिरिक्त परपुरुष. 'घरातलं तिचं

सामान देलं फेकून, दुसरा पाह्य **भाड्या** घे म्हने शेकून.' -मिए.७५.

भाडोळा (पु.) भाडोळा म्हणजे महादेवाची बहीण पृथ्वी आणि जीव सृष्टी निर्माण केल्यावर त्यांना अनाज खायला लागेल. तेव्हा **भाडोळाने** अठरा प्रकारचे धान्य तयार करून दिले. चंद्रसूर्याला ग्रहण लागेल तेव्हा त्याचे वाटप करायला सांगितले. म्हणून मांतग ग्रहण मागतात. या **भाडोळाची** आरतीही गायली जाते.

भातकं (न.) खाऊ. '**भातुके** वाटा घातलेः तीही खादलेः' -ली.३१३. 'रुसला ध्रुव कवतिकें। बुझाविला देऊनि **भातुके**।' -ज्ञा.१०.१८.

भातकंद (पु.) भातासारखे कण यामधून निघतात. 'जमीन खोदून **भातकंद** काहाळला.'

भातवाढी(ळी) (स्त्री.) भात वाढण्याचे साधन. 'गिदाळ्यावानी हातानं काहाले भात वाळून रायला. **भातवाळी** घेनं भांड्यातली.'

भाता (पु.) लोहाराची हवा सोडणारी चामडी पिवशी. 'आणि फुंके **भाता** फुगे। रेचिलिया सवेचि उफगे।' -ज्ञा.१३.६६४. 'कधी लोहार आपला **भाता** तिथंच फुंकत बसायचा.' -काळी.९.

भात्क (न.) खाऊ. 'हातीं प्रेमाचे **भातुकें**। मुखीं घाली कवतुकें।' -तुका.१०६९. 'बुढा कई **भात्क** आनत नाई मंग लेकराईनं त्याचं काम काबा करावं?' -धग.९५.

भादव्या (वि.) वृद्ध. 'बायकात जशा **भादव्या**, म्हाताऱ्या होत्या तशा तरण्याही होत्या.' -पाटी.

भादरकथा (स्त्री.) मनात येईल त्या गोष्टी. 'मास्तरीन तिचंच पुरान, आपली रोज तेच **भादरकथा** लावत बसे.' -लेक.७५.

भादरनं (क्रि.) १. केस कापणे. 'हे काइ ओ माएः याची डोइ कालि **भादरिली** होतीः आजि इतुके केस कैचे?' -ली.२५८. २. अवेळी बोलणे. 'असं मंधात **भादरनं** बरोबर नाई. लेकराच्या जातीनं मुकाट्यानं आईकावं.'

भादरपंचाईत (स्त्री.) नसती चौकशी. 'तुले काय **भादरपंचाईत** करा लागते. मी शेंडी कापो का बुच्ची कापो.' -ना.९९.

भादरपट्टी (स्त्री.) अधिकचे, नसते बोलणे. 'कामाचं सोळून याले **भादरपट्टी** कराले सांगा बेकामी.'

भादरभादर (न.) विनाकारण बोलणे. 'निऱ्हा कतवारखाना हाय सायाचा. ऐन पावने आले का येईच **भादरभादर** करनं सुरू होते.'

भादरलं (क्रि.) काहीही बोलले. 'शाळेत जाऊन या भादऱ्याहीनं काय **भादरलं** ते पाहू.' -निशा.११८.

भादरं (वि.) विनाकारण बोलणारे. 'एक **भादऱ्या** त म्हने ऐकत नसल त पोलिसात कंम्प्लेट द्या.' -ना.११२. 'मंधामंधा बोलत रायते. हे **भादरं** पोट्टं कोनाचं होय रे?'

भादरेल (क्रि.रूप.) बोललेले. 'माया बापच **भादरेल** हाय. कईबी काम पळो आपली बंडी नेत जाय म्हने.'

भादऱ्या (पु.) म्हशीचे केस काढणारा. 'या भागात म्हशी भादरणारा कोणी **भादऱ्या** नाही.' -खुं.२.

भादऱ्यापंचायती (स्त्री.) नसती विचारपूस. 'म्या इचारलं त मने तुले काय **भादऱ्यापंचायती** करायच्या?' -पख.९९.

भादवी (वि.) वयस्कर. '**भादव्या** बाईनं पोरकटपनानं वागू नाई.'

भादवे (वि.) सूज्ञ, वडील, अनुभवी, वयस्कर. 'गर्दीत जसे पोरंसोरं होते तसे **भादवे** माणसंही होते.' -पख.१४६.

भादव्या (वि.) अनुभवी. 'जिथं रेणू पाटलिनीसारख्या **भादव्या** बायकांना पुंजाच्या हाकेमुळे दुपवा जातो.' -पख.१८.

भादा (वि.) म्हातारा, अनुभवी. 'तिफनीवर नवाट गोऱ्हे नाईत पायजत मस्त **भादे** बैल पायजात.'

भाद्रं (वि.) विनाकारण बोलणारा. '**भाद्रे** शायने झाले सदा म्हनत फिरते, सोता चिनकी टाकून वालावाला रायते.' -रूख.

भान (न.) लक्ष, अवधान, शुद्ध. 'मोपाला ढास लागल्यानं ती **भानावर** आली.' -झेल.७८.

भानगड(ळ) (स्त्री.) कटकट. 'नाहाकच आपण या माणसाला बोलावलं. नाही त हे **भानगड** झाली नसती' -पख.२३. (सं.भंगळ)

भानचोद (वि.) एक शिवी. 'साले सारे **भानचोद** आहेत कोनीच खरं बोलत नाही.' -एक.

भानवसा (पु.) चुलीच्या मागील जागा. 'आबै मज राखपुंजा सांडु देयाः आणि चुली **भनवसी** सारउ देयावीयाः' -ली.५७५.

भानामती (स्त्री.) अघोरी विद्या. 'भूत **भानामती**, नवसाच्या वट्या साऱ्या बाता खोट्या मायबापो.' -गागा. 'अजूनही गावतली अंधश्रद्धा नाही गेली, काम्प्युटरच्या युगातही म्हणतात म्हातारी **भानामतीनं** मेली.' -प्रा नंदू वानखडे.

भानू(नो)स (पु.) चुलीमागची भिंतीपर्यंतची जागा. 'तेयाचा **भानवसी** गोसाविलागी उपहारु होए।' -ज्ञा.४२४. 'तिने **भानोस** धांडोळला. परंतु चहा गूळ काही सापडला नाही.' -ऊन.१५८. (सं.महानस)

भाप (स्त्री.) वाफ. 'उकळत्या दुधाची साय काळाले गेली तं **भापच** हाताले लागली माय.'

भापनं (क्रि.) अंदाज घेणे, ओळखणे. 'शामा कसा आये ते

म्या पयलेच **भापलं** होतं.'

भाबी (स्त्री.) भावजय, वहिणी. 'जाय दादा, **भाबीचं** दर्शन घेऊन ये' -ऊन.३. 'गरिबाची बायको समद्याची **भाबी**.'

भामटं (वि.) निर्लज्ज. 'माय अत्यंत लीन होऊन गेली मी **भामट्यासारखा** उभा होतो.' -फीर.१४०.

भाय (न.) १. आपत्ती, संकट. 'कुठी गेलीसीन माय हे हेळंबा? काय घेऊन आलीसीन **भाय** हे?' -सित.७२. २. खूप. 'एकाऱ्यापल्ल्यानं **भाय** हिसोबानं गाड्या हाना लागे.' -दि.१.

भायच (वि.) खूपच. 'आजकाल लोकंबी **भायच** बहेकल्यावानी करत हाय.' -जटा.३२.

भाया (पु.) भासरा. 'गवनाला मारणाऱ्या साधनाचा **भाया** माजी सरपंच लिंबा किंवा त्याचा एकही भाऊ तिला भेटायला आले नाही.' -वा.२०१.

भायाभीत(न) (क्रिवि.) भयाकूल, चिनभीन. 'ह्या वाईट संगतगुणापायी माहा लेकरु **भायाभीत** झाले रे देवा.' -बा.५५.

भायाभीन (क्रिवि.) भयाकूल, चिनभिन, भयभीत. 'इतकी गर्दी पाहून पाय लटपटत होते. **भायाभीन** झालो होतो.' -खुं.१८०.

भायी - मतानुसार, मताने, विचाराने. 'मी काय त्याच्या **भायी** बाजारातला बैल वाटलो काय?' -कावू.

भारंभार (वि.) भारोभार. 'शिवरामच्या **भारंभार** रुपये दीन तरी त्याचं वावर घीनच.'

भारशिं(सिं)ग (न.) हरणाचे शिंग. '**भारसिंगाचे** चाटन लेकराले देल्ले का तीन टकीतच खोकला रायत नायी.' -कावू.

भारन(म)सूद (वि.) भारदस्त. 'मोठ्ठुंच्या मोठ्ठुं पोट, भरलेला शाता, सुटलेलं अंग, **भारनसूद** दिसते जशी.' -सेल.४४. 'गुरुजीच्या **भारमसूद** दिसल्यानं लोकं दबून व्हते.' -अक.४३.

भारनं (क्रि.) मंतरणे, भारावणे. 'तरी पढीयंतयाची कहाणी। हे भुलीची **भारणी**॥' -ज्ञा.१२.१५८. 'मायच्या पदराआडून मी आपली पायत उभी होती **भारल्यावानी**.' -लेक.८६.

भारा (पु.) गवताचा गठ्ठा. 'कडपांचे **भारे** बांधलेः' -ली.३. 'म्हसीले बंदा **भारा** गवत लागते.'

भारी (वि.) १. अतिशय, खूप. 'काकांना बायकोचं गोत **भारी** गोड आहे.' -फीर.१७४. २. वजनदार. 'पान्याचे दोन दोन गुंड भरून आननं बाईमान्साले **भारी** जातेच.'

भारूळ (न.) एक लोकनाट्य, लांब गुंतागुंतीचे गाणे. संत एकनाथांचनी या लोकनाट्याचा प्रभावी वापर केला आहे. 'जत्रा असली का तमाशा येत जाय अन् राती मंदिरापुळे **भारूळ** होत जाय.' (सं.बहुरुडम)

भारेलं (वि.) मंतरलेले. 'तुका म्हणे देह **भारिला**। विठ्ठल कामक्रोधे केले घर रिते॥' -तुका.१३३१.

भारोभार (अ.) वजनाएवढे, प्रमाणात, सारखे. 'पेंडखजूर तर फुटक्या पितळी भांड्यांच्या **भारोभार** विकला जाई.' -मोती.

भालकं (न.) भारा, पेंडी. 'बास्याचं **भालकं** उचलून आनलं डोक्स्यावर.'

भाला (पु.) समोर लांबकाठी असलेले हत्यार. 'काठीयाचे **भाले** केलेः अर्ध दांडीये पुढेः अर्ध मागेः ऐसे बीजे केलेः' -गोवि.२२५. 'नामघोष बाण साचे। **भाले** तुळसी मंजुरेचे॥' -तुका.३९६७. (सं.भल्ल)

भालू (पु.) अस्वल. 'वसो डरतातिः **भालुवा** भूंकतातिः बाइला लेकरुवा परियंदतिः' -ली.१८०. '**भालूत** अन् लालूत काही फरक आता दिसत नाई/ कोनी खाते युरिया, कोनी चारा सोळत नाई.' -चंच. (सं.भल्लूक)

भालेराई (स्त्री.) वर्चस्व, शौर्य. 'सूर लागेल तिकडे मोहीम करून **भालेराई** गाजवीत होता व लाग साधेल तसा उगवून घेत होता.' -कात.३८८.

भावकी (स्त्री.) भातृभाव, नातेवाईक. '**भावकीले** जेवण देणं आपल्या ताकती पलीकडची गोठ व्हती.' -रा.३३.

भावजई(य) (स्त्री.) मोठ्या भावाची पत्नी. '**भावजैया** चर्येसि सोल लाविलीः' -ली.१७२. 'तव भाउजैः वहीले पाणी नाणिचीः' -ली.२४५. 'मोठी **भावजई** आपल्या मायवानीच रायते.' (सं.भातृजाया)

भावजी (पु.) दिराचे संबोधन. '**भावजी**, तुमचे भाऊ कुठी दिसले तं जेवाले बोलावलं म्हना.' (सं.भ्रातृःकहा)

भावटाव (पु.) मूल्य वगैरे. 'बजारात जाऊनसन्या **भावटाव** विचारा लागीन.'

भावडी -? 'तोंडाच्या **भावडीनं** काहीबी बोलावं का?' -सेल.२१७. 'चलवादे तोंडाच्या **भावडीनं** काहीबी बोलतं का?' -रा.११३.

भावहिस्सा (पु.) संपतीतील भावाचा वाटा. 'देतो त्याची त्याले वाटून. **भावहिस्सा** का चुकणार हाये का?' -बा.१९७.

भावसासरा (पु.) पत्नीचा मोठा भाऊ. 'बायकोचा शिवसोयरा असलेला हा माणूस माझा **भावसासरा** लागत होता.' -काळी.१०१.

भावसून (स्त्री.) लहान भावाची पत्नी. 'लग्नात मी, माया घरची अन् **भावसून** येतो.'

भावोजी (पु.) नवऱ्याचा मोठा भाऊ. 'घराचा कारोबार

भावोजीच पायतात.' (का.भाव)

भास (पु.) भ्रम. 'लेक मरून दोन सालं झाले अजूनबी त्याचा **भास** होतच रायते बैना.'

भासजवाई (पु.) भाचीचा पती. 'भासी अन् **भासजवाई** आल्यानं रोडग्याचं जेवन केलं.'

भासनं (क्रि.) नसून अस्तित्व जाणवणे. 'घटाचिया योगें प्रतिबिंब **भासे**।' -नाथ. 'गायी जमल्या सगळ्या **भासे** गोकुळ गोठान.' -धों.२९.

भासपाला (पु.) भाजी इत्यादी. 'आंधी अनाज घेऊन मंग **भासपाला** खरीदला.'

भासरा (पु.) नवऱ्याचा मोठा भाऊ. 'नवऱ्यावानी वागाले पाहे माहा **भासरा**.' -मिए.१५८.

भासा (पु.) भाचा. 'मग तेयाचा **भासा** सांघावेयालागि आलाः' -ली.३. 'सारंगपंडित सोएरेः तेया **भासे** होतिः तेयासि भेटलीः' -ली.२१७. 'भावापरीस **भास्याले** मया फार.'

भासी (स्त्री.) भाची. 'ताए आंबडीहुनि दांडीए बैसोनि पदुमना **भासि** नेयावेया आलीः' -ली.४१२. '**भासी** होय आपली. मोठी बईन सुमनची लेक होय.'

भाळखाऊ (वि.) वेश्या व्यवसायातील दलाल. 'तोही तसाच आये **भाळखाऊ**. येरीच दरसाल वावरं घेऊन राह्यला काय.' -ना.१०४.

भाळखानं (क्रि.) वेश्या व्यवसायातून पैसा मिळविणे. 'कीर्तनाचा विकरा मातेचे गमन। **भाड खाई** धन विटाळ तो॥' -तुका.४३८७.

भाळझोकनं (क्रि.) उगाच, नसते काही करणे. 'तुले वाटते त तथी जाऊन **भाळझोकनं** तू बिनकामी.'

भाळंतोळं (न.) प्रवास भाड्याची रक्कम. 'शेलाटोपी, नारय, शिदोरीची आठोन ठेव, एसटीचं **भाळंतोळं** यादीनं ध्यानी ठेव.' -पाहु.

भाळ्या (पु.) वेश्यांचा दलाल. 'ते तशीई रांड हाय लवंडी आन् अशीई रांड हाय. आवं हा तुयावाला **भाळ्या** जाते ना तथी.' -पोर.६९.

भांगपट्टा (पु.) केस विंचरून भांग करणे. 'पावने येतात तं पायनं पोरीनं काय **भांगपट्टा** केला.'

भांचोत (वि.) एक शिवी. 'मा, मा मले त्या **भांचोतानं** मारलं व इनाकारन.' -धग.४५.

भांड (वि.) बेशरम. 'पुत्र झाला म्हणे रांड। तंव तो झाला **भांड**॥' -तुका.५२.

भांडं (न.) १. पात्र, भांडे. 'गंगोदक जरी जाले। तरी मद्य **भांडा** आले॥' -ज्ञा.१७.५२. २. दागिने. 'तिचे लग्नातले सारे **भांडे** तं यानं दारूच्या खर्चापायी मोळ्ळे.' -पोर.५.

भांडकुदळ (वि.) भांडखोर. 'बायको **भांडकुदळ** भेटल्यानं दारू प्याची पंचाईत झाली सायाची.' (म. भांडणे, त. कुंदलै)

भांडखोर (वि.) सतत भांडण करणारा. 'लाज ना विचार। बाजारी तू **भांडखोर**॥' -तुका.१८०६. 'तुक्या नाई **भांडखोर** त्याची बायको हाय बावा.'

भांडगोळं (वि.) भांडण करणारा. 'बयादाटून म्हनाले आमी काई **भांडगोळ** नाई.' -हज.३३.

भांडभुंड (स्त्री.) भांडण वगैरे. 'ऊन खाऊ द्यावं मग करावं कांडकुंड/ तवरीक करावं कुठतरी **भांडभुंड**.' -मिए.१२४.

भांडलं (क्रि.रूप.) भांडले. 'कुठंही जाऊन परिस्थिती बदलणार नव्हती. मग हे गावं काय **भांडलं**?' -फीर.२१२.

भांडवल (न.) मुद्दली रक्कम. 'तरी भूमी बीज नांगरू। यया **भांडवलाचा** आधारू॥' -ज्ञा.१८.८८०. (का.बंडवल, बंडवाळ)

भांडाफोड (पु.) परिस्थिती उघड होणे. 'भाकर घेतली असती तर माझा **भांडाफोड** झाला असता.' -फीर.१४३.

भांडे (क्रि.रूप.) भांडत असे. 'राती बापाले उशीर झाला का माय लयच **भांडे**.'

भांडेल (क्रि.रूप.) भांडलेले. 'अर्ध गाव **भांडेल** हाय माय संगं.'

भांब (पु.) मोठा जलाशय, तलाव. 'पंचवीस हाताचा घेर असणारी ती विहीर म्हणजे मोठीच्या मोठी **भांबच** होती.' -झिं.७१.

भांबळ (वि.) भयासूर स्त्री, हडळ. 'साजरी रायत जाय नं माय, कसी **भांबळ** दिसून रायली.' (सं.भर्भ)

भांबायेल (क्रि.रूप.) चकित झालेला. '**भांबायेल** पोरगी हाय. पानी पाज पयले.'

भांबावनं (क्रि.) भांबावलेला. 'श्रुतीवरी रचिली पुराणेंः ते बोलों नेणती अज्ञानेंः **भांबावली** षटदर्शने जयासी पाहाता॥' -क्र. 'जैसा का हिरवे चारी। भांबावे पशु॥' -ज्ञा.१३.११८. 'बापाचं रौद्र रूप पाहून क्षणभर **भांबावला**.' -ना.१५.

भिकबाई(ळी) (स्त्री.) कानात घालावयाचा अलंकार. 'धनगर लोकाईच्या कानात **भिकबाळी** असते.'

भिका(क्का)रचोट (वि.) दरिद्री, भिकारी वृत्तीचा. 'अबे म्हना **भिकारचोटा** निन्हा हरामाचं दिस्ते काय तुले?' 'या **भिक्कारचोट** गावात कुठचं व दुकान.' -धग.१३.

भिकाळ्ळा (पु.) भिकारी. 'बजारात **भिकाळ्ळा** बसेलच रायते अन् काई खाले गेलं का टुकूटुकू पायते.'

भिजनं (क्रि.) ओले होणे. 'पयल्या पान्यात **भिजनं** आमच्या मायले लय आवळते.'

भिजली (क्रि.रूप.) ओली झाली. 'सरीवर सरी आल्या. त्याचीच झड झाली. सखू चिंब **भिजली**.' -डेबू.१८.

भिजवो (क्रि.रूप.) भिजवत असे. 'पोळ्यासाठी कणीक **भिजवो/** भाजी वरन मीच शिजवो.' -जांग.२१.

भिजेल (वि.) ओले झालेले. 'पान्यानं भिजेल दुलई सुकोल्यानं **सुकतच** नोती.'

भिजोनं (क्रि.) ओले करणे. 'हरबरे पान्यात **भिजोनं** पळतात अन् मंगसन्या गरम रेतीत फोळा लागतात.'

भिजोयेल (वि.) ओले केलेले, भिजविलेले. '**भिजोयेल** गऊ जात्यावर दऊन आनले.'

भिजोलं (क्रि.रूप.) भिजवले. 'शेत घामानं **भिजोलं** काई नाई उरलं/ देवा तुह्या देवपन कसं काय सरलं.' -नांबै.

भिडस्त (वि.) भीड असलेला. 'गाव चोटेल अन् पोरगी **भिडस्त**.' (का.)

भिडस्तपणा (पु.) भीड, आदर ठेवणारी वृत्ती. 'आता बुढ्याचा **भिडस्तपणा** चेपला होता. तो खुल्लमखुल्ला बोलू लागला.' -काळी.९४.

भितखंड (न.) लहान भिंत. 'गूळ काढून कागद घेऊन दारी **भितखंडावर** वाचायलाही बसलो.' -फीर.८७.

भितर (अ.) आत. '**घराभितर** लपेल असीन कोंडू.'

भिताड(ळ) (न.) लहान भिंत. 'म्हतारा न्याहाळू लागला, मशीनकडे, मातीच्या **भीताडाकडे**.' -धग.२४.

भिनभिन (स्त्री.) एकाच गोष्टीची वारंवारता, भुणभुण. 'बुडीच्या मांगं बुड्यानं दारू प्याले पैस्याची **भिनभिन** लावली.'

भिनसनं (क्रि.) भांडण जुंपणे, होणे. 'शरीराची रचना एकसारकी केली/ आपसात फालतूच **भिनसून** दिली.' -जांग.७४.

भिनाभिन (वि.) अतिशय कंटाळवाणे. 'बुढी आली का डोक्सं **भिनाभिन** करत रायते.'

भिनाभिन (क्रिवि.) जोरात, वेगाने. 'गोटे मारले तसे वान्नेरं **भिनाभिन** पयाले.'

भिन्न (क्रिवि.) वेगाने. 'रागानं पाय आपटले तं पोट्टं पाय कसं **भिन्न** पयालं.'

भिन्नावनं (क्रि.) मारणे. 'आपल्या येटायात येऊन आपल्याच पोरीले कोनी काई म्हनलं तं ते **भिन्नावनं** पळतेच ना राजा.'

भिरकंगन (न.) पंचधातूचे कडे. '**भिरकंगण** म्हन्जे सात धातूची बनावट.' -बा.४०.

भिरकावनं (क्रि.) जोऱ्यात फेकणे. 'अन्नाचं ताट असं **भिरकावनं** चागलं नाई.'

भिरड (न.) एक किडी. 'आळ्याला खूप **भिरड** लागला होता. जागोजागी किड्यांनी बारीक छिंद्र पाडली होती.' -ए.७५.

भिरडलं (वि.) कीड लागलेले. '**भिरडलं** लाकूड राहीन कसं तगून.' -मिर्झा.१७.

भिरु(र)ड(ळ) (न.) वृक्षाचा रोग. 'या खोडाले **भिरुड** लागला हाय थे आता जरास्या वाऱ्यानं मुयासगट उलथून पडनार हाय.' -दि.८७.

भिलावा (पु.) बिबा. 'पायातला काटा निंगला का **भिलावा** घेऊन चटका दे व धरून.' (सं.भल्लातक)

भिल्ले (क्रि.रूप.) सुरू झाले. 'डेरीचे दर कराले गावातले तरनेबांड पोट्टे **भिल्ले** होते.' -जटा.१२.

भिस्त (स्त्री.) आधार, मदार, विश्वास. 'शेतकऱ्याची सारी **भिस्त** पेरणीपूर्वीच्या मशागतीवर.' -ऊन.१४८. (फा.बेहेस्त)

भिळमुर्वत (पु.) मुलाजा. 'व्यवारात नात्यागोत्याची **भिळमुर्वत** ठेवा नाई लागत. नाई तं भीळ भिकीले लावते.'

भिळमुलाजा (पु.) मान, आदर. 'सरकारी नवकर मोठ्याईचा तरी आमासाक **भिडमुलाजा** ठेवतेत पन गरिबाले तं निऱ्हा आळव्या हातानंच घेतेत.' -लेक.६७.

भिळस्त (स्त्री.) भीड असलेले, मुलाजा असलेला. 'सदा कोनाले नाई म्हन्नार नाई. लय **भिळस्त** आये तो.'

भिळीचा (वि.) मुलाजा असलेला. 'रामराव **भिळीचा** मानूस आये, भलतच बोलनार नाई तो.'

भिंग (पु.) १. एक हिरवट किडा. 'हिरवाकच **भिंग** पाय केवढा चमकते.' २. आरसा. ३. काच. 'का **भिंगारी** दीपु ठेविला। बाहेरि फांके।' -ज्ञा.१३.१८२. '**भिंगाचेनि** घरें। दीपप्रकाशु नावरे।' -ज्ञा.१४.३०८. 'देऊनियां **भिंग** कमाविले मोतीं। पारखिया हातीं घेतां नये॥' -तुका.४०८१.३.(का.बिंगार, बिंगु)

भिंगरी (स्त्री.) चक्री. 'पैं भिंगोरी निधिये पडली। ते गमे **भूमीसी** जैसी जडली।' -ज्ञा.१५.१३६.

भिंगा (पु.) गिधाळ. 'ठाकणठोकण गंगा, जिथं दिसल **भिंगा**, तिथं उतर रंगा. ढोरं सोलायची हत्त्यार घेऊन जिथं आभाळात गिधाळ उडताना दिसतील तिथं गंगा तू ये.' -वा.१५२. (माबो.)

भिंगारी (पु.) कुंकू-डाबल्याचा व्यापारी. 'काजय कुकू लेली, **भिंगाऱ्याच्या** संगं गेली.' (का.बुगुरि)

भिंगूर (वि.) कणीदार, रवाळ माती. 'भिरूड लागलं झाडं. खोडावर **भिंगूर** मातीचे थर. तरतरत पडणाऱ्या उधळ्या.' -खुं.२५०.

भिंगोटा (पु.) हिरवा किडा. 'या येवात कोरून **भिंगोट्यानं** घर करेल दिसते.'

भिंगोटी (स्त्री.) एक किडा. 'बटिकाः **भींगरुटी** असेः ते कीटकीतें पाहेः धरीः कांटा रोवीः' -दृ.९६. 'छोट्या देशाले कोट भारताले लंगोटी/ गरुडाच्या पुढं निंगून गेली **भिंगोटी**.' -जांग.७९. 'सर माह्या शर्टात **भिंगोटी** गेली व्हती म्हून म्या शर्टं कहाळला आंगातून.' -फीर.९४. (सं.भृंगहा)

भीड(ळ) (स्त्री.) १. मुलाजा. 'तुमची म्हणौनि एणे **भीड** राखिलीः' -ली.३३८. 'आजि आर्तीधणी कां न करूं। एथ **भीड** कवणाची धरूं।' -ज्ञा.३.२१. २. भिंत. 'गेल्यावर्षी गढीच्या पश्चिमेकडचा **भीड** खचला.' -काळी.७. ३. गर्दी. 'भरला सारा वाडा, लाडाची आली मैना, दारात **भीड** सोडा.' -लोक.६८. (का.भिडिय)

भीत (स्त्री.) भिंत, माती विटांची उभी रचना. 'बापा तुमच्यावानी आमच्या घराले काय इटाईच्या **भिती** हायत?' (सं.भित्ति)

भीन (क्रिवि.) १. कंटाळणे, वैताग. 'किती वारखोळचं लेकरू एकलच आये. **भीन** झालंसीन.' -डेबू.१४. 'तर्कवितर्क त्याचा त्यालाच **भीन**, चिनभिन करू लागला.' -डेबू.२७. २. पूर्णपणे, ठार आंधळा. 'एकदा माणसाले खुर्ची भेटली की त्याचे डोळे **भीन** आंधळे व्हतात.' -पाटी.१२४.

भीनभीन (क्रिवि.) कंटाळवाणे, अस्वस्थ. 'लगन लागलं बारा वाजता. मानसाले निऱ्हा **भीनभीन** वाट्टे.'

भील (पु.) आदिवासी जमात. 'नोव्हे तयाचा प्रादुर्भावो। तो साभिलाष **भिल्लांचा** गांवो।' -ज्ञा.१८.६७४.

भीळभाळ (स्त्री.) १. गर्दी. 'कुठीबी जा निऱ्हा लोकाईची **भीळभाळ** असतेच सायाची.' २. मुलाजा. 'वासू अजाबच आये. कोनाचीच **भीळभाळ** ठूत नाई.'

भुईखोळ (न.) जमिनीतील लाकडी खोड, मूळ. 'दुनिया टिचका बिल्लोर, घळीभराची सोबती/ **भुईखोळाचे** कळप फाळ कितीक तुटती.' -नांबै.

भु(भू)ईशेवरा (पु.) एक गवत. 'गवताचा भारा, सावरा नोत्या तं **भूईशेवऱ्यानं** बांधला.'

भुईशें(सें)ग (स्त्री.) भुईमूग. '**भुईशेंगीचं** आखर त्यात तुही रखवाली.' -वि. 'येकरी दा किंटल **भुईशेंग** झाली औंदा.'

भुईनळा(ळी) (स्त्री.) जमिनीतील भेगा, छिद्र. 'एकदा झड लागली की **भुईनळ्यातून** घुसते पाणी पायव्याच्या बुडात.' -खुं.११४.

भुईलोन (न.) लोणा. 'भरोशाच्या मान्सानं घात केला की मान्साले अखळते निऱ्हा त्याचं लाईलोन अन् **भूईलोन** हुऊन जाते.' -लेक.७२.

भु(भू)ईसपाट (न.) जमिनीसारखे होणे, उद्ध्वस्त होणे. 'पण भुईसाठी **भुईसपाट** होणं वाया जाणार नाही.' -गा.३६.

भुकनं (क्रि.) कुत्र्याचे ओरडणे, भुंकणे. 'राती खुळकून वाजलं अन् कुत्र्यानं **भुकनं** चालू केलं.'

भुकि(के)जनं (क्रि.) भूक लागणे. 'बायकोनं शिदोरी आनली नाई अन् वखर हाकलूहाकलू मानूस **भुकिजला**.'

भुकीला (वि.) भूक लागलेला. 'बा मौन्यदेवहोः आजि **भूकेलेतिः** जेउ बैसाः' -ली.१०४.

भुकेल (क्रिवि.) भुंकलेले. 'ते कुत्रं माया आंगावर **भुकेल** आये सायाचं.'

भुकेलं (वि.) भूक लागलेला. 'वाढ पटकन लेकरू **भुकेलं** आये.' २. भुंकलेले.

भुक्कळ (वि.) फुकट खाणारा, दरिद्री. '**भुक्कळ** पार्टी हाय राजा, कशीबशी खायाची सोय लागते.' '**भुक्कळ** घरात लेकबाय देता काय राजा?'

भुगटी (स्त्री.) चूर्ण. 'पिंट्याच्या बाबाचे दात पळ्ळे तं सुपारीची **भुगटी** करून ठुली.'

भुगा (पु.) पूड, पावडर. 'सासू सुनाचं भांडनं लेक दारी उभा/ अस्तुरीले मुभा कर म्हतारीला **भुगा**.'

भुगी (स्त्री.) पूड. 'किळ्यानं कोरेल नाटीतून भुरभुर **भुगी** पळून रायली.'

भुगूट (न.) पूड, पावडर. 'असा मिक्सर चोखट माय लौकर **भुगूट** होते/ पाटा उरोटा घासाघूस घुमनं कमी होते.'

भुगोरा (पु.) मिरची पूड. 'धंदा म्हन्ला का काहीही करा लागते निसटिस, **भुगोरा** भागोरा, कांडकुंड हे आलीच.' -लेक.२७.

भुजनं (क्रि.) १. भाजणे. 'हुळ्ळ्याचे दोनचार कनसं **भुजनं** रे आहारावरतं.' २. बुजणे, रित्या जागेत काही टाकणे, भरणे. 'वर खताच्या आगीनं वाफा चालला सोकून, बुड्या **भुजल्याबी** नाई मोट सोळता काऊन?' -पाहु.

भुजेल (वि.) भाजलेले. 'वांगे चुलीत **भुजेल** हायत ते घे अन् भरीत करं माय लेकासाठी.'

भुजोनं (क्रि.) १. भाजणे. 'सयपाक करताखेपीच मिरच्या **भुजोनं** चांगलं. साराई चूल पेटवाचं काम नाई.' २. रित्या जागेत काही घालणे, बुजवणे. 'मातीचा पेंड घेऊन भीतीचं भोक **भुजोनं** तेवळं.'

भुट्टा (पु.) कणीस. 'अबे हेंबाळ्या, मक्याच्या कन्साले **भुट्टाई** म्हंतात.'

भुडकं (न.) खबदाड. 'विहिरी भवताल, पडक्या **भुडक्यात**, काठावर कुठेच बाटली नव्हती.' -पाटी.

भुडकी (स्त्री.) ढुंगण. 'आपून मातर चाललो व्हतो **भुडकी** उतानी करून.' -ऊन.६६.

भुडाई (स्त्री.) भूईत पडलेली फट. 'पीक विमा येऊन निगून गेला घाईत/ दांडातलं पानी जसं जिरलं **भुडाईत**.' -जांग.१०७.

भुतखाना (पु.) पोरवडा. 'आंगन उखरलं अन् आता वसरीत बसला **भुतखाना** खेळत.' (फा.)

भुतपलीत (न.) भूत वगैरे. 'रातीबेराती फिरलं का असं **भुतपलीत** दिस्ते म्हनतात.'

भुताळा(ळ्या) (वि.) भुतासारखा. 'मातीत लोयल्यानं कसा दिसते पाय **भुताळा**.'

भुताळी (वि.) शेतीमातीचा एक प्रकार, पिवळी, चुनखडीची. 'मुंग उळीद **भुताळीत** किती येतीन?'

भुभू (न.) कुत्र्याचा आवाज. 'कुतळ्ळं रातभर **भुभू** करत रायते.'

भुमका (स्त्री.) अफवा. 'गाईच्या चिंतेनं वाघाला एंड्रीन टाकून मारल्याची **भूमकाही** उठली.' -झेल.५६.

भुमका (पु.) कोरकू जमातीतील पूजाविधी करणारा. 'आता थो गोंडपुऱ्यात धसला. सुंगा **भुमकाच्या** घरी आला.' -दि.६. (को.)

भुमकीन (स्त्री.) भुमकाची पत्नी. 'दांडी फुटलेल्या कोपात काराच्या घेऊन सावीत्रा **भुमकीन** आली.' -दि.६. (को.)

भुयार (न.) जमिनीतील, मानवनिर्मित विवर. 'नां **भुयारी** अमुकीये मांदुसेः अमुकीये पेटी असेः' -गोवि.२९३. 'यात्रा आली खोदनं सुरू **भुयार/** ते दिसे रंगात जे होते मुयार.' -मिर्झा.१९८.

भुरं (वि.) राखाडी रंगाचा. 'हसऱ्या तोंडाची बाई **भुऱ्याभुऱ्या** जावळाच्या हसऱ्यापोराला खाऊ घालत होती.' -एक.

भुरकं (वि.) पांढुरक्या रंगाचे. 'ओ काका, मायं **भुरकं** गोऱ्ह दिसलं काय तुमच्या वावराकून?'

भुरकट (वि.) पांढऱ्या रंगाचा. 'उताण्यात पडलेल्या **भुरकट** चिखलाचे मिचमिचतात डोळे.' -अ.६१.

भुरका (पु.) मिरची पूड. 'भाकरीवर चटनी तरी गोळ लागते, निस्ता **भुरका** खावं तरी वाट्टे काय?' (का.)

भुरकाटरक (वि.) लाल, पांढुरका. 'राखेचा ढीग जिकडेतिकडे पसरला होता. त्या राखेने केशव **भुरकाटरक** झाला होता.' -वा.४१०.

भुरभुरी (स्त्री.) हळूहळू पडणारा पाऊस. 'बुरुंगाळि बुरुंगाळि पाणी येत होतेः तो चीखलु जाला होताः' -गोवि.१६८. 'फुलं आंगावर पळावं तसी पावसाची **भुरभुरी** सुरू झाली.'

भुलक्कळ (वि.) विसराळू. 'मन्याले काहाची याद रायते. निरा **भुलक्कळ** आये तो.'

भुलजा (पु.) बाहुला. 'संसार म्हंजे काय **भुलजाभुलजीचा** खे असते का बावा?'

भुलजाभुलजी (स्त्री.) बाहुलाबाहुली. 'तुया **भुलाईसी** लागे माय भुलजाचं लगन/ तुवं हासलं कपाय माया हातच्या कुकानं.' -वि.

भुलजी (स्त्री.) बाहुली. 'मा वऽऽ या शकूनं माई **भुलजी** घेतली पाय.'

भुलथाप (स्त्री.) गप, खोटे बोलणे. 'वक्तावर **भुलथाप** देल्ली ठोकून राजा, खरं कोनाले ठाऊक?'

भुलनं (क्रि.) विसरणे. 'भ्रांत गर्वराशी भुलले सदा।' -नाथ.१५८४. 'झालं गेलं सारं **भुलनं** आता तू.'

भुला (वि.) विसरणारा. '**भुला** भटका संध्याकाई तं घरी येतेच.'

भुलाई (स्त्री.) बाहुली, भुलाबाई. 'बाले, हे तुई **भुलाई** घरकुंडात ठुनं तुयाल्या.'

भुलाबाई (स्त्री.) बाहुली. 'आज कोजागिरी पौर्णिमा. अंगणात **भुलाबाईची** गाणी गाऊन पोरी रिझवीत होत्या.'

भुलाभटकला (वि.) चुकून आलेला. '**भुलाभटकला** सोयरा आला ना आपल्या घरी तं च्या पाज्याले कप नाई.'

भुलावणी (स्त्री.) भूल. 'बायकाच्या नजरेत खेळणारे पाणी माणसाला सहज **भुलावणी** पाडते.' -कात.४५.

भुलावनं (क्रि.) मोहविणे. 'नखरे करून पोट्ट्याईले **भुलावनं** कासीले बराबर जमते.' (का.भुल्लवि)

भुली (वि.) विसराळू. 'सुली म्हंजे **भुली** पक्की. भाजीत मीठच नसते तिच्या.'

भुलीत (वि.) अनवधानाने, लक्ष नसताना. 'काय लेक शंबराले गच्चू बसला. **भुलीत** दोन नोटा देल्या गेल्या.'

भुले (क्रि.रूप.) विसरत असे. 'निवळून देलं ज्याले तो जनतेले **भुले/** गरिबाच्या सनाले जयत नाईत चुले.' -नांबै.

भुलेल (क्रि.रूप.) विसरलेले. 'मांगचं झालंगेलं सारं **भुलेल** आवो मी आता.'

भुलोते (क्रि.रूप.) भूल पाडते. 'जवानीचा साज तुजा असा **भुलोते** जगाले/ पोटातल्या कस्तुरीचा नाई ठाव हरनीले.' -नांबै.

भुलोनं (क्रि.) भुलविणे. 'नेणो कवण्या गुणें **भुलविले** याते।' -नाथ.१२५०. 'ते गोळबोली दारच्या मान्साले गोठीत भुलोते. गनगोताले **भुलोलं** तुले तं ते बातच **भुलोईन**.' -अक.६६.

भुल्याले (क्रि.रूप.) विसरायला. 'हे ना ते वसद **भुल्याले** तुले काय झालं व?'

भुसकून (क्रिवि.) पटकन. 'लान लेकरू **भुसकून** धसून येस्टीत जागा ठुते.'

भुसा (पु.) धान्याचे टरफल. 'दोन गोने **भुसाचं** कुटार निंगलं.'

भुसार (पु.) किराणा. 'रघ्या **भुसार** मालाचं दुकान चालोते.'

भुसारी (पु.) एक जात. '**भुसाऱ्याकून** चागूई घेऊन ये जाय.'

भुसी (स्त्री.) भूस. 'खयात जावं तं आंगावर **भुसी** उळते सारी.'

भुस्कट (न.) भूस. 'जवारीचे कन्स खयात टाकले अन् मेळीभोवती बैल फिरू लागले का **भुसकटानं** आंग खाजोते.'

भुंडंभुंडं (स्त्री.) भोंडं. 'आपण वखर हाणायला गेलो तर वावर भलतच **भुंडंभुंडं**.' -बा.१००.

भुंडा (वि.) डोक्यावर काही टोपी इत्यादी नसलेला. 'अरे काई टोपीमोपी घालावं असा **भुंडा** काहून हिंडतं?' (का.बोडुअ)

भूई (स्त्री.) जमीन, पृथ्वी. 'दंडवताचेति प्रसंगे। **भुयी** हन अंग लागे॥' -ज्ञा.१८.१०२८. '**भूईच्या** पोटातच सापळली होती सीतामाय.'

भूज (पु.) बाहू. 'पोते उचलताखेपी झेटका पळ्ळा तं डावा **भूज** दुकूनच रायला.'

भूत (पु.) १. पिशाच्च. 'आजि भूत चतुर्दसुः **भूते** सैरा वीचरतातीः' -ली.११. 'पंढरीचें बा **भूत** मोटें। आल्या गेल्या झडपी वाटे॥' -तुका.४०३१.१. २. भोत. 'वगाराचं **भूत** मोवरे ठेवल्याबिगर म्हैस दूद देत नोती.'

भूनभून (न.) सारखा तगादा. 'भिस्कीटासाठी पोरानं सारखी **भूनभून** लावेल आय कईपासूनची.'

भूर (अ.) लांब, दूर. 'आमी तुया भावाले घेऊन **भूर** चाल्लो.' 'चिमनी आली दाना खाल्ला अन् **भूर** उळाली.'

भूरभूर (क्रिवि.) हळूहळू- पाऊस पडणे. 'अभाय भरून आल्तं. **भूरभूर** पानी सुरू झाल्तं.'

भूल (स्त्री.) विसर. 'पाय माय, तुमाले फोन कऱ्याची मलेच कशी **भूल** पळ्ळी.'

भूलचूक (स्त्री.) व्यवहारातील चुकभूल. 'दुकानदारबी **भूलचूक** झाली का पैसे वापस देतात.'

भूस (पु.) कंणसातील झोंबणारे कूट. 'मशीनच तोंड आमच्या घराकून काहून ठुलं? भुसानं आंग खाजून रायलं ना लेकोहो.' 'खयातल्या **भुसानं** सारं आंग खाजोत रायते.'

भूसभूस (वि.) पोकळ. 'पाया खांदताना **भूसभूस** माती लागली अन् मले वाटलं धनाचा हांडा दिस्ते वाट्टे.'

भेकना (वि.) तिरळा. 'डोयापुळचंबी दिसत नाई **भेकन्याले**.'

भेकाडखानीचे (वि.) भित्रे, एक शिवी. 'म्या झेंडा नाई सोळला. **भेकाडखानीचे** सारे पोरं पायाले.' -एक.

भेकाळ(ळं) (वि.) भित्रा. 'संपत्या म्हने हाट रे तू तं लेका **भेकाळच** हायंस बांगळ्या भर बांगळ्या.' -हज.३८.

भेग (स्त्री.) फट, रेषा. 'उनायात जमिनीले **भेगा** पळतात अन् पयल्या पान्यानं त्याच्याच बुडाया होतात.'

भेगाळ (न.) मोठेछिद्र. 'भितीले मोठ्ठुंच्या मोठ्ठुं **भेगाळ** पळ्ळुं.'

भेगाळनं (क्रि.) भेगा पडणे. '**भेगाळली** माती झाली गलगल/ अवघच भलं, पावसानं' -नोका.

भेगाळेल (वि.) भेगा पडलेले. '**भेगाळेल** वावरात बैलाचा पाय मुळ्याचा भेव लागते.'

भेजा (पु.) मेंदू, डोके. 'मंग काय आखीनच भडकून गेला **भेजा/** बायकोवर भिडला कातावून बेजा.' -मिए.९२.

भेट (स्त्री.) गाठ. 'तुईमाई **भेट** अशी घळ्ळी/ साता जलमात नाई कोनं तोळ्ळी.' (त.बेट्टि)

भेटनं (क्रि.) गाठ पाडणे. 'प्रतिष्ठानासि आलीएः तेथ भाचे सारंगपंडीत **भेटलेः**' -ली.२१७.

भेटभलाई (स्त्री.) चांगल्या भेटीगाठी. 'मानापानाचे सारेच सोवळे संपल्यानंतर **भेटभलाईने** दिवस माथ्यावर आला.' -कात.३६७.

भेटे (क्रि.रूप.) भेटत असे. 'काम होतं तं **भेटे**, आता तं तोंडबी नाई दाखोत.'

भेटेलं (वि.) भेटलेले. 'आंधी **भेटेल** पोट्टे खाली बसा अन् आजच आले ते येऊन भेटा हापिसात.'

भेट्टेत (क्रि.रूप.) भेटतात, मिळतात. 'पाऊस पान्याच्या सवाऱ्या भेट्टे अन् पैसेय् बरे **भेट्टेत**.' -मा.१७.

भेट्याले (क्रि.रूप.) भेटायला. 'बाप्पा तुमी आता सायब झाले. आमाले **भेट्याले** तुमच्या जोळ टाईमतरी अस्ते काय?'

भेद (न.) १. जखम. 'या पायाचं **भेद** आजून काई बसलं नाई.' २. फरक, भिन्नता, वर्ग, प्रकार. 'जरी वेदे बहुत बोलिले। विविध **भेद** सूचिले॥' -ज्ञा.२.२६०.

भेदरं (न.) टमाटे. 'सारं काही आठवते **भेदरं** अन् वांगं.' -मिर्झा.१५.

भेदरनं (क्रि.) घाबरणे. 'मरणाच्या पंगती बाहेर **भेदरलेला** बामन उभा असतो दूर.' -मोती. (का. बेदरीसू)

भेदरेल (वि.) घाबरलेले. '**भेदरेल** पोट्ट्याचे त्याच्या मायनं

कान फुकले.'

भेदारनं (क्रि.) भयभीत होणे. 'कुत्र भुकलं तसं पोरगं एकदम **भेदारलं**.'

भेदारेल (वि.) भीती लागलेला. 'तो नाई येत आता रातीबेराती. काल मातीवर आल्ता ना तईचा **भेदारेल** हाय.'

भेदाळ (न.) खबदाड. 'भीतीच्या या **भेदाळात** सरप घुसेल आय.'

भेद्र्यावानाचे (वि.) एक शिवी. 'मानसही कसे व माय **भेद्र्यावानाचे** चांगलं घालावं तेवढे चवने करतात.' -एक.

भेनं (क्रि.) भीती वाटणे. 'ऐकोनियां ऐसें अतिथी तो भ्याला।' -नाथ.५४. '**भेनं** पळाले ब्राह्मण दैत्यां भोणें।' -नाथ.७. 'भेईल जीव हें देखोनि कठिण। केला जातो सीण तो तो वांयां॥' -तुका.३५९२.

भेरकं (वि.) तिरळा. '**भेरकं** भज्याच्या आंगं पायते अन् जिलबी मांगते.'

भेरी (स्त्री.) कोहळे. 'महालक्शमीची पंगत अस्ते आमच्या येटायात तं मायाच घरच्या **भेरीची** भाजी करतात.'

भेलकं (न.) १. गुळाची लहान पेंड. २. लहान पेंडी. 'गावात येताना त्याच्या डोक्यावर हिरव्या पाल्याचं **भेलकं** असायचं.' -खुं.१३२.

भेलकांडनं (क्रिवि.) इकडूनतिकडे हलणे. 'गारेगार हवा सुटली. झाडंझुडं **भेलकांडाय** लागली.' -त.२२.

भेलकांडली (क्रि.रूप.) ढळली, तोल गेला. 'एकदोनदा तर ती अडून **भेलकांडली**. पडतापडता सावरली.' -सेल.१०९.

भेलकी (स्त्री.) पेंड. 'हे गुयाची **भेलकी** डोक्स्यावर ठुई.'

भेलं (क्रि.रूप.) भीती लागलेला. 'हें जाणोनि पार्थु बिहाला। मग पुनरपि बोलों लागला॥' -ज्ञा.२.५१. 'लेकरू **भेलं** तं त्याचे कान फुकावं.'

भेली (स्त्री.) १. गुळाची पेंड. 'आसनावरि वीडेः गुळाचे **भेले** ठेविलेः' -ली..८२१२. 'गोड आहे म्हणेः म्हणौनि दुसरेनि श्रीकरे **भेली** श्रीमुखी घातलीः' -गोवि.५९.

भेली (क्रि.रूप.) भ्याली, घाबरलेली. 'सर्वज्ञ म्हणीतलेः ''बाइः ते असे कीः'' आणि तीए **बीहालीः**' -ली.६४. 'गोरीनं केला छंद छंदाला नाही **भेली/** निंबाचा पाला पेली.' -लोक.४२. (का.बेल्ल)

भेलोंड (पु.) मातीचे मोठाले पेंड, ओझे. 'वखराले मातीचे भेलोंडच्या **भेलोंड** चिपकल्यानं वखर चाल्ला नाई.'

भेलोडनं (क्रि.) मातीचे पेंड चिकटणे. 'वल्या वावरात पास **भेलोंडते** तं भारी जाते मंग.'

भेव (पु.) भीती. 'तंव आंतु वाटेसि सुने उभे होतेः ते देखौनि गोसांवी **भेओ** लागलेः' -गोवि.५९. 'ना तरी पवनु मेघासी **बिहे**॥' -ज्ञा.२.१४. 'पाठीपोटी देव। कैसा हरिदासा **भेव**।' -तुका.७२८. 'आतां मज **भय** नाही पै कोणाचें।' -नाथ.१३७०. 'सत्य आठवितां देव। जातो **भेंव** पळोनि।' -तुका.३६२४. 'वर्‌हाडी मानसाच्या मांगं उभा महादेव/ कोनाच्याही धवसीचा नाही त्याच्या मनी **भेव**.'

भेवाडायले (क्रि.रूप.) भीती दाखवून राहिले. 'तुह्या केसाले धक्का कोनी लावनार नाही. ते उग्गेच तुले **भेवाडायले**.' -पख.९५.

भेवाळनं (क्रि.) भीती दाखविणे. 'लेकराले **भेवाळनं** काय कामाचं बापा?'

भेवाळनी (स्त्री.) भयभीत करण्याची क्रिया. 'हे सायबलोकं लयेच माजले लवंडीचे जो भेते त्याले निऱ्हा **भेवाळनीचं** पानी देतेत.' -लेक.६६.

भेवाळून (क्रि.रूप.) भीती दाखवून. 'येकडाव **भेवाळून** पाव म्हटलं जमलं तं जमलं.'

भेसूर (वि.) भयावह. 'सांडियेले रूप विक्राळ **भ्यासुर**। झाले सुकुमार कोडिवाणें॥' -तुका.४२१७.

भेंड (न.) एक भाजीपाला. 'कोरडा ना ओला। उपेगा आधी गेला। तो वाढोनि मोडला। **भेंड** जैसा' -ज्ञा.१८.५७५.

भेंडी इलाईची (स्त्री.) विलायचीचा एक प्रकार. ही भाजीच्या मसाल्यात वापरतात. 'आचाऱ्यानं **भेंडी** इलाईचीबी भाजीत टाक्याले लेऊन देली.' (का.बेंडे)

भेंडोई (स्त्री.) गुंडाळी. 'ते दोराची **भेंडोई** उचल अथून, तथी ठुई.' (का.बेंडोळे)

भेंबावनं (क्रि.) भांबावणे. 'चाळीसपन्नासाच्या गराळ्यात लेकरू दिसलं नाई त सारेच **भेंबायले**.' -सित.५२.

भैतान्या (वि.) बावळट, वेंधळा. 'आरे **भैतान्या**, जे तुझ्यापुढं दिसून रायलं तेचं खरं आस्ते.' -खुं.३६.

भैताळबेलन (वि.) मूर्ख. 'काय झालं? काय झालं? काय पुसतं असं **भैताळबेलन्या**?' -सित.५७.

भो (अ.) जोराने. 'ज्याचे त्याचे पैशे खातं अथी इकतं **भोपया/**लाताखाची आली म्हन्जे तुही अस्ते भोऽऽपया.' -नांबै.

भोई (पु.) १. कोळ्याची एक जात. '**भोयांचं** पोरांना साधत नाही. मासे धरण्याची त्यांची शक्कल वेगळीच.' -डेबू.१५. 'जातचा **भोई** धरते मासोई.' -डेबू.१६. २. फुटाण्याचा व्यवसाय करणारी एक जात.

भोक (न.) छिद्र. 'दरोजाले **भोक** पळ्ळ्यानं पंचाईत झाली सायाची.' (का.बोक्के)

भोकंपाळ्या (वि.) नुकसान काढणारा. 'तो काय कामाचा **भोकंपाळ्या**?' -ना.८३.

भोकझया (वि.) एक शिवी. 'अरे म्हना **भोकझया** तुयासारखे तं पायलीचे पन्नास पायले म्या.'

भोकदाळ (न.) मोठे छिद्र. 'पईपाले **भोकदाळ** पळ्ळ्यानं पानी येंगत नोतं.'

भोकनं (वि.) आंधळा. 'काहो **भोकने** झाले का? रस्त्यात बसेल लेकरं दिसत नाही.'

भोकनटिक्ली (वि.) आंधळी. '**भोकनटिक्ले**, दिसत नाई काय, इकळे पायनं.' -धग.३०.

भोकन्या (वि.) आंधळा या अर्थी शिवी. 'अरे म्हना **भोकन्या** खानीच्या, तुई बायकोच पाय म्हना काय ढंगरे करून रायली तं.'

भोकर (पु.) एक वृक्ष. 'घ्या रे **भोंकरे** भाकरी। दहींभाताची सिदोरी।' -तुका.२०७.१.

भोकरडोयी (वि.) मोठ्या डोळ्याची. 'मायाआंगं कसी पायते पायनं **भोकरडोयी**.'

भोकांड (न.) तोंडाचा जबडा. 'माय दिसत नाई तं लेकरू कवाचं **भोकांड** पसरून रायलं.' (का.बोक्क)

भोकाड(ळ) (पु.) मोठे छिद्र. 'पखालीला लहान सहान **भोकाड** पडलं तर त्यात एखादं चिंदूक घालू तं जमते.' -पख.१००.

भोकावर (क्रिवि.) जिवावर. 'पयले तं मोठी गोंडा घोयसं. आता हात धरला तं **भोकावर** आली.'

भोक्या (वि.) एक शिवी, क्षुल्लक. 'जाऊ द्या त्या **भोक्याचा** काय इचार करा लागते.'

भोक्सं (न.) छिद्र. 'चोरानं रातीबेराती येऊन भितीले **भोक्सं** पाळून सोनंलानं लंपास केलं.'

भोगूळ (पु.) एक कीडा. 'रक्ताळल्या जखमेवर **भोंगुळासारख्या** टप्पोर रानमाशा तुटून पडल्या.' -पोळा.

भोगोटा (पु.) वाट्याला आलेला भोग, दुःख. 'माह्याच नसिबात हा **भोगोटा** काहून आलासीन मनावं.'

भोजारा (पु.) जेवणातील खाद्य पदार्थ, भेटवस्तू, बक्षीस. 'पोळा फुटला की पाच घरी जोळ्या फिरे. बैलाले पुयनाची पोयी, मान्साले **भोजारा** भेटे.' -दि.७१. 'वाड्यात येणाऱ्या कास्तकारांच्या जोड्यांना **भोजारा** देणारा दातृत्वाचा हात पांगळा नोता.' -जटा.१६.

भोट (वि.) पक्का, वस्ताद. 'बालचंद पुरा पुरा **भोट** आये सायाचा.'

भोपंजी (पु.) काही नसताना ऐट आणणारा. 'शामराव पाटील लेकाच्या भरोस्यावर **भोपंजीपना** करून रायले.'

भोपयसुत्या (वि.) असमंजस, एक शिवी. 'गुलाबले काय समजते **भोपयसुत्याले** त्यातलं?'

भोपया (पु.) भोपळा. 'याना व बाया तुमी मळकं घेऊन ताकाले/ येलावरचा **भोपया** न्या बैना कथलीले.' -रूख.३५.

भोप्या (वि.) मठ्ठ, मंदबुद्धी, अडाणी. 'बैल बांधता येत नाई असा **भोप्या** आये जानराव.'

भोबळं (वि.) दात पडलेला. 'बाप्पा, गंगुआजी तू तं **भोबळी** झाली वऽऽ. सगळे दात पळ्ळे वाट्टतात.'

भोभो (न.) १. दिवस उजाडणे. 'झाकटीत वखर घेऊन जा लागते उनायात. असं **भो भो** झाल्यावर ऊन लागते.' २. प्रसिद्धी. 'या गोठीची साऱ्या गावात **भोभो** हून गेली पाय.'

भोय (स्त्री.) जमीन. 'अंगाचे भोंवंडी। **भोय** झाड फिरती धोंडी॥' -तुका.२४८.२. '**भोय** फाकून भोईनं गिळून घेतल्यावाणी हल्या म्हशी गायब झाले.' -पख.११२.

भोयदांड (पु.) शेत, जमिनीवरून जाणारा पाण्याचा लहान पाट. 'या ओढ्यावर वडगावच्या शिवारात धरण झालं तर नुसत्या **भोयदांडनं** देशमुखाचं सारं रान ओलं होते.' -वा.२७३.

भोय(व)नं (क्रि.) परिणामाची झळ पोहचणे. 'नाहीतरि दया केली। उलट आपुल्यासचि **भोवली**॥ -ग्रा.११.४८. 'लगनाले जानं लय **भोयलं** पाच हजाराले गच्चू बसला.'

भोयभोय (पु.) गाजावाजा. 'घरातल्या गोठीची भाईर **भोयभोय** ना व्हाले पायजे.'

भोयसट (वि.) भोळा. 'वामनराव साधा, **भोयसट** मानूस. डावपेच नाहीच कधी.'

भोया (वि.) भोळा. 'खरं कोनं सांगावं, दिसते तं **भोया** मानूस!' 'दिसते **भोया**, बाईवर डोया.' (त. वेळ्ळै, हि. भोला).

भोयी (पु.) मासे पकडणारी, पालखी खांद्यावर वाहणारी जमात. 'जायं टाकून काठावर बसेल हाय **भोयी**.' -ऊ.५.

भोर (अ.) अतिशय. '**कायंभोर** अभाय हून गेलं अवघं.'

भोरं (वि.) पांढरा लालसर. 'गणेश पुराच्या **भोऱ्या** पाण्यात गडप झाला.' -पख.८९. 'मुर्रा जातीची म्हैस **भोऱ्या** रंगाची अस्ते.'

भोरकळी (स्त्री.) दोराला आड्या पडू नये म्हणून गोलाकार फिरणारी कडी. 'खुट्याभवताल फिरनाऱ्या ढोराच्या दोराले **भोरकळी** पायजे.'

भोरट (न.) पक्वतेस आलेले. 'मुंग **भोरट** झाला, या हप्त्यात येते तोळ्याले.'

भोरटनं (क्रि.) परिपक्व होणे, **भुरकट** होणे. 'येकडाव कन्सं

पकले का मंग **भोरटनं** चालू होतात.'

भोरटलं (वि.) पूर्ण पक्व झाले. 'हरबरा **भोरटला** आता खायाले गोळ नाई लागत.'

भोरटेल (क्रि.रूप.) पक्व झालेले. 'उया भाज्याले **भोरटेल** हरबरा उपळ्ळा मूठभर.'

भोरड (वि.) पक्व झालेली. 'हुरड्याची कोवळी कणसे तर नाहीत पण **भोरडलेली** कणसे जरा भाजतो.' -कात.५१९.

भोरी (स्त्री.) कपोत प्रजातीतील एक पक्षी. 'आणि झा **भोरडीए** म्हणौनि गोफणीतिः' -ली.७९. 'शरीरसंबंधाचें नातें। भोरड्या बुडविती सेतातें॥' -तुका.३१०५. '**चिडीभोरीच्या** चालीनं अशी रात उतरली/ उद राईच्या वासानं घरीदारी पसरली.' -वि.

भोवरा (पु.) १. वाटोळे फिरणारे पाणी. 'नदीत **भोवरा** असला का पोहेनकारालेबी अंदर ओहळते.' २. गोल फिरणारे खेळणे. 'अस्सा फासू **भवऱ्याले** निंदी जानारच नाई.' -वि. (का.बुवरि)

भोवांडा (पु.) चक्राकार स्थिती. 'एक मोठा गरगरता **भोवांडा** त्याने सोबत आनला होता आणि त्यातच गरगरत होता.' -सुखो.५७.

भोसकं (न.) छिद्र. 'मनिल्यावर इस्तू पळ्ळा तं मोठ्ठं **भोसकं** पळ्ळं.'

भोसडीच्या (वि.) एक शिवी. 'हे **भोसडीच्या**, बैल अंगावर येवालाना- रुस्तुमा शिवी देत ओरडला.' -पख.८६.

भोसडीचा (वि.) एक शिवी. 'तो मिठ्ठू मले डसला अन् उडून गेला **भोसळीचा**.' -धग.३०. 'काय मारकंडी म्हसाड पदरात पडली **भोसडीची** जव्हा पाहाव तव्हा हिचं शिंगं वरच.

भोसळा(ळी) (पु.) १. स्त्री योनी. 'कोनाच्याबी पुळे **भोसळा** उघळा करून बसते **भोसळीची**.' २. एक शिवी. 'वासुदेव पाटलाशी खेटे घ्याची कोणाची हिंमत झाली **भोसळीच्याची**.' -गय. 'मोळते काय कूळ **भोसुळीची**... तन्नावली ते.' -ना.५४.

भोसोळचोदी (वि.) एक शिवी. 'माझ्या बायकोले रंडकाळ म्हणता **भोसोळचोदीच्या** हो?' -ए.१७.

भोळ्यापाटानं (क्रिवि.) साधेपणाने. 'मी सांगीन **भोळ्या-पाटानं** अन् हकनाक माहा संसार वाया जाईल.' -पाटी.

भोंडीबुची (वि.) रिक्त. 'इनीनं पसाभर दाने वट्यात टाकले आन् ते तशीच **भोंडीबुची** हात हालोत वापस आली.' -लेक.३२.

भोंगई(य) (वि.) नग्न. 'नवं धोतर कोनं देल्ल त ते सोडून तसेच **भोंगय** राहातात ते.' -मोती. 'नेसीन तं पितांबर नाई त **भोगई**.' '**भोंगयपनी** उनपाऊस कमी.'

भोंगरे (वि.) बोडखे. 'तुरी ठोकून बंड्यात आल्यानं वावर **भोंगरे** दिसाले लागले.' -दि.८२.

भोंगळसुती (वि.) अव्यवस्थित, भोंगळ. 'अनागोंदी व **भोंगळसुती** कारभारामुळे शेतीचे तेव्हाच बारा वाजले.' -कात.५६९.

भोंगा (पु.) १. इंजिनाची शिटी, मोठा आवाज करणारा कर्णा. 'कारखान्यातला **भोंगा** वाजला का मायबाप हातचं काम टाकून कामावर जात.' २. मोठा लाऊडस्पीकर. 'देवस्थानच्या लाउडस्पीकरचा **भोंगा** सारखी भक्तीगीतं ओकतो.' -मोती. (गु.भूंगळु)

भोंगाल्ले (क्रि.रूप.) दिले, ठेवले. 'चांगले साडेचार हजार **भोंगाल्ले** ना त्याच्या हातावर, कोन्ते कष्ट केले त्यानं.' -पोळा.

भोंगाळ (वि.) शिस्त नसलेला कारभार. 'दाबारा गळी कामावर अस्तात तरमा काई मेळ नाई. लयच **भोंगाळ** कारभार हाय.'

भोंगाळी (वि.) भोळसर, वेंधळी. 'डिग्याची बायको निरा **भोंगाळी** आये, ठेल वसद आठोत नाई तिले.'

भोंगाळ्या (वि.) असमंजस, शिस्त नसलेला. 'हर्राम **भोंगाळ्याले** येव्हार काय जमीन तं जमो बॉ.'

भोंगूळ (न.) धान्य पोखरणारा किडा. 'जवारीचं पीठ करून टाकलं **भोंगुळानं**.'

भोंड (स्त्री.) भोवळ, चक्कर. '**भोवंडींसरिसें**। अवघें भोंवत चि दिसे॥' -तुका.१३५८.१. 'हे असो आंगी भरलिया **भवंडी**। जैशा भोंवत दिसती अरडीदरडी॥' -ज्ञा.९.८१. 'उभ्याउभ्या दोनचार गिरक्या घेतल्या त **भोंड** येते आपल्याले.' -डेबू.३४.

भोंडं (वि.) बोडखा. 'लाकडांची तोड केली. नदीचे काठ **भोंडेभोंडे** झाले.' -पख.८५.

भोंडका (वि.) डोक्यावर काही नसलेला. 'बाईच्या जातीनं **भोंडकं** काहाले रावं. शेवापदरानं बा ई चांगली दिस्ते.'

भोंडनी (स्त्री.) चक्रात टाकणे. 'या बेपटीनंच साऱ्या गावाले **भोंडनी** आनलं.'

भोंडंबुचं (वि.) पर्णहीन, बोडखे. 'पानं तोडल्यानं एवढं मोठं झाड **भोंडंबुचं** होऊन गेलं.' -कावू.

भोंडा (वि.) च्यावाचून असलेले, बोडखा. '**भोंडा** गळा मायचा, नसे फुटकाही मणी.'

भोंडी (वि.) १. अंगावर दागिने नसलेली. २. डोक्यावर पदर नसलेली, बोडखी. 'का ही गाळी अशी **भोंडी**, पुरा अनाळी धुरकऱ्या.' -भीक.१०१.

भोंड्या (वि.) कपाळावर कुंकू वगैरे लावलेले नसणे.

'कपाळाला कुंकू नसलं तर ते ओरडत कोनाची बायको होय रे हे **भोंड्या** कपायाची.' -काळी.१०.

भोंबारा (पु.) अव्यवस्थित स्थिती. 'दोन दिवस पाव्हणपणाले जावाव तर घराचा **भोंबारा** व्हते जसा.' -सेल.१९३.

भौ (पु.) भाऊ, एक संबोधन. 'काई सांगता येत नाई **भौ**.' -खुं.२३७.

भौजी (पु.) पतीच्या मोठ्या भावाकरिता वापरावयाचे संबोधन. '**भौजी**, तुमी असे हत्तीडोहासारखे गहन गंभीर, लडू नका.' -मोती.

भॉची (वि.) भाऊची. 'माह्याबाद अशी पाटी माह्या लाहान **भॉची** लागीन.' -मे.१.

भॉक (न.) घाबरविण्यासाठी काढलेला आवाज. 'मेलेल्या सापाला निरखून पाह्यला लागले **भॉक** करून एकमेकांना दचकावयाला लागले.' -खुं.३७

म

मइनदार (पु.) महिन्यावारी काम करणारा मजूर. 'आबाच्या कारभारात **मइनदार** भेटत. आता कोनी रोजारोचीच तं येत नाई राजा.'

मइना (पु.) महिना. 'येक **मइना** झाला पोरीले सासरी जाऊन आजूनबी चैनखुशाली काई समजली नाई.' (फा. माहीनः)

मइंदमुका (वि.) आतल्या गाठीचा, धूर्त. '**मईंद** अन् पक्का गोईंद.'

मइमा (पु.) महिमा. 'फकीरबॉचा **मइमा** काय सांगू राजा तुले!' (फा.)

मई (स्त्री.) नदीकाठाचे शेत. 'ज्याच्या गांडीत अई, त्यानंच वाहाव **मई**.'

मईस (स्त्री.) म्हैस. '**मईसीचं** गाव असूनबी दूध भेटेना च्याले.'

मकदूर (पु.) कुवत, ऐपत. 'लोक आपल्या **मक्दुरानुसार** शालदुपट्टे घेऊन अंगं झाकत.' -मोती.

मकरी (वि.) ढोंगी, कपटी. 'सुधीऱ्या लय **मकरी** हाय. बोलत तं नाई अन् डाव तं सोळत नाई.' (फा.)

मक्का (पु.) मकई. 'दोन येक्कर जेवारी अन् दोन येक्कर **मक्काबी** पेरला.' (त.मक्काच्चोळम्)

मक्कार (वि.) धूर्त, लबाड, कपटी. 'भासा पक्का **मक्कारच** निंगते, बाबू म्हनगतच हाय ना 'जवायाचं पोर अन् हराम खोर.' (अर.)

मक्ता (पु.) ठेका. 'शेती सारी नगदी **मक्त्याने** लावून त्याने वाड्याला कुलूप ठोकले.' -कात.५३२. (फा. मक्तअ)

मक्सद(र) (पु.) हेतू, उद्देश, ध्येय, इच्छा. 'डायरेक्ट राजा घरीच येता तुमी? तुमचा **मक्सद** काई बरोबर नाई दिसून रायला मले?' (अर.फा.)

मखतूर(ल) (वि.) रेशमी, मुलायम. 'पाठीवर झूल रंगित **मखतूल**, वर कला कुसर.' -भीक.६९.

मखर (पु.) नक्षीकाम. '**मखर** कमटचा उंचवटा, वर फना, पंचमीला आधी पाच दिवस बाऱ्या.

मखरं (पु.अने.) तेज, वैभव, रूप, साज. 'पाह्यनं एका रोजातच वखरानं पोराचे **मखरं** लवले चिमनीवानी तोंड झालं.' -भं.३८.

मखऱ्या (वि.) १. आतल्या गाठीचा. २. बैलाचे नाव. '**मखऱ्या**, भोवऱ्या, गोम्या, पांढरपिशा सर्व बैल देवमण असणारे.' -जटा.

मख्खं (वि.) १. गप्प, चूप. 'काई इचारलं तरमा हा **मख्खच्या मख्खं**.' २. अचपळ, चपळ नसलेला. 'पोरगं असं **मख्खं** निंगल्यावर आमच्यासारख्या म्हताऱ्यानं जोर तरी केदलोक मारावं.'

मख्खा (पु.) गोट्यांच्या खेळातील खड्डा. 'आंगनात **मख्खा** केला तं कंच्याईनं आंगन उखरते अन् पाय सोलते ना बे, चला भाईर.'

मख्खी (स्त्री.) मर्म, खोच, आशय. 'त्या भांडनातली **मख्खी** माईत नाई कोनाले.'

मख्खीचूस (वि.) अत्यंत कंजुष. 'माय बिमार असूनबी **मख्खीचूस** तिले दवापानी करून नाई रायला.' (हिं.)

मगज(स) (न.) १. डोके, मेंदू. 'आता चूप राह्यतं का देऊ रट्टा? काहून माह्य **मगज** गरम करतं?' -एक. (फा.) २. गर, गाभा. '**मगज** तू खात अन् आठोई चोकाले मले देत काय?' (फा.फइझ)

मगजदार (वि.) भरपूर गर असलेले. 'रायत्याले आंबा **मगजदार** नसला तरी चालते तरमा आंबट पायजे.'

मगज(स)मारी (स्त्री.) एकच एक वारंवार समजाऊन सांगावे, करावे लागणे. 'सातबारा आना, आठ अ आना अन् सायबानं केस पुळेच नेली नाई. आपली झाली **मगजमारी**.'

मगदम (वि.) भरपूर. 'राच्चेबेराच्चे चोर वावरात घुसले आस्ते, **मगदम** माल त्याह्यनं कापून नेला अस्ता.' -खुं.२२.

मगदूर (पु.) कस, कुवत. 'लोकांनी मेहनत करून जमिनीचा **मगदूर** वाढविला.' -कात.२५. 'बरं आपल्या **मगदुरापरमानं** करा. कौलं टाका का पत्रं टाका.' -सि.११६. (अर.)

मगन (वि.) मग्न. 'कालू त्याच्या कामातच **मगन** असते.'

मगम (वि.) पुरेसे. 'जेवन तं मस्त **मगम** झालं. झोप येऊन रायली लेकाची.'

मगर (अ.) पण, परंतु. 'अगर, **मगर** बंद करा अन् पेरून टाका सोयाबीन.' (अण्य.फा.)

मगरी (स्त्री.) एक दाताची व्याधी. याने दात पडतात. 'दाताले **मगरी** लागल्यावर भोबळं व्हाची पाळीच हाय.'

मगरूर (वि.) गर्विष्ठ, अशिष्ट. 'आजकालचे पोट्टे **मगरूर** निंगले मायबापाचं आयकत नाई तं आपला काय केवा.' (अर.मघ्री)

मगसपच्छी (स्त्री.) समजावण्याचा आटापिटा. 'लय **मगसपच्छी** करा लागली ताहा यादो समजला.'

मग्गम (वि.) मजेत, आनंदात. 'मजूर बाई माणसास पन्नास शंभर रुपये मिळतात. मस्त **मग्गम** राह्यतात तेवढ्यात.' -खुं.५७.

मग्गूल (पु.) गोळ्या खेळण्याचा छोटा खड्डा. 'बराबर येकच कांची **मग्गुलात** पळ्ळी पायजे रे शाम्या.'

मघा (स्त्री.) नक्षत्र. '**मघा** वरतं बघा, नाई त पोरई चुलीपासी हागा.'

मघ्यम (वि.) पुरेपूर. 'अधिकारी लोकाईले काय हाय? खायाले **मघ्यम** पैसा भेटला की झालं.' -लेक.६७.

मचकनं (क्रि.) खुरटणे, वाढ न होणे. 'पाण्याचा शितोडा नाई पल्डा. सोयाबीन दोनदा पेरून **मचकलं**.' -खुं.२०८.

मचकमचक (न.) चावतानाचा आवाज, खाण्याची क्रिया. 'अशी कशी माई सून खायगोबरी हाय बैना. सयपाक करतानाबी **मचकमचक** चालू रायते तिचं.'

मचकूमचकू (क्रिवि.) मिटक्या मारीत. 'तो घेवंदे **मचकूमचकू**, गुडघ्यातून लचकूलचकू सायबाची वाहवाही सांगत होता.' -खुं.६७.

मचक्या (वि.) आवडनिवड ठेवणारा, नखरेल. 'तो असंतसं खाते काय? लय **मचक्या** आये तो.'

मचनं (क्रि.) मातणे, कोंदणे, होणे. '**मचला** घरात सोर/ तुकडा शिळा न कोर.' -भीक.६५.

मचमच (न.) खातानाचा आवाज. 'खाते तं खाते **मचमच** अवाजई करत रायते.'

मचमचनं (क्रि.) किळस वाटणे. 'खाल्लेलं अन्न मले नाही पचे/ वान्ती व्हाची जीव **मचमचे**.' -मिर्झा.११२.

मचवनं (क्रि.) उभे, आरंभ करणे, काही करण्याचा गाजावाजा करणे. 'पोरानं पंगतीचं **मचवलं** तं आपल्यालेबी हातभार लावाच लागीन.'

मचांग (न.) मावचा. 'कवा बांधन सरकार फेडरेशनची **मचांग**.' -मिए.१४२. 'रात्रीच्या सोकारीसाठी लाकडी ठुण्यांचं **मचांग** वावराच्या मध्यभागी उभारलं.' -झेल.६७.

मचांगमळा (पु.) शेतीतील कामाचा व्याप. 'पोळ्या अन् पापडाच्या खुड्याची चटणी दिवसभराच्या **मचांग मळ्यात** खाणंही झाली नव्हती.' -खुं.१६६.

मचान (न.) मावचा. '**मचान** बांधून हे सावध सावज लक्ष्यावर आणून तुमचा हेतू साधवतो.' -कात.११८.

मचाळा (पु.) पसारा, गोंधळ. 'चौकात सर्वत्र हॉटेल, पानपट्ट्या, कसलेकसले दुकानं असा सगळा **मचाळा**.' -खुं.१७४.

मचेल (वि.) साठलेल्या. 'कुयट वास येते डबरातल्या **मचेल** पान्याचा.'

मचोनं (क्रि.) उपस्थित करणे, माजविणे, गाजावाजा. 'काय माजोन **मचोनं** असं दिवस निंघेनिंघे?'

मच्छर (न.) डास. 'बाइः गावाआंतौनि विसदेओ आणाः आणि या बींबकाडिया वेचाः आणि कवाड घालौनि धूंकराः आणि हे अवघे मसक जातीः' -ली.३६७. (सं. मशक)

मच्छरगवत (न.) डास पळवणारे गंधीत गवत. 'दरोजात टांग हे **मच्छरगवत**.'

मच्छी (स्त्री.) मासोळी. 'खारा पावनचार कऱ्याले **मच्छी** आनली.'

मजगनमजगन (क्रिवि.) मधेमधे करणे. 'सुमीले **मजगनमजगन** कऱ्याची मोठी खराब सव आये.'

मजगममजगा (पु.) भाऊगर्दी. 'इथं आणखी **मजगममजगा** वाढला असता तर त्याला बरंच होतं.' -खुं.१८०.

मजबुरी (स्त्री.) अगतिकता, विवशता. '**मजबुरीनं** सोयाबीन पेरलं पावने बॉ. आपल्या जोळचा पैसा सरला होता पऱ्हाटी पेरतो म्हटलं तं.' (फा.)

मजबूत (वि.) बळकट, पक्का. 'कोठ्याले **मजबूत** ठुनी पायजे ढोरवासरू रेट्टे त्याले.' (अर.मझबूत)

मजबूर (वि.) अगतिक, नाइलाज झालेला, विवश. 'कास्तकार **मजबूर** असल्यानं काईबी भावात पीक इकून टाकते.' (अर.)

मजमा (पु.) कार्यभाग, साधनसामुग्री. '**मजमा** जमवासाठी फक्त नाव घेतो/ रेंगाटलं कोनी तुमच्याकडं धाव घेतो.' -मिए.४७. 'झोपड्यासाठी लागणारा सगळा **मजमा** तयार करून ठेवला होता.' -पख.७९.

मजरा (वि.) सारखा, सामील, समान, गणतीत. 'शेतकरी तं असा ढोरातच **मजरा/** बायकोनं त्याच्या पायला नाही गजरा.' -जांग.८२. 'दिसे ढोरत **मजरा** जिता जागता किसान.' -मा.४४. 'काय मानूस म्हनाव याले निरा ढोरात **मजरा** आये बापा.'

मजल (स्त्री.) अंतर, टप्पा, न थांबता चाललेले अंतर. 'अर्धी **मजल** तं गाठली. आता थोळं रायलं अंतर.' (अर. मन्झील)

मजला (पु.) माळ, मंझिल. 'औंदा तयकूट बांधू, पुढल्या साली **मजला** अन् तिदस्ता बांधू वधर.' (फा. अर. मन्झिल)

मजा (स्त्री.) मौज, गंमत. 'चाराने लेकरं शिकतात अन् बाराने करतात बापाच्या पैस्यावर **मजा**.' (फा.मझा)

मजाक स्त्री. थट्टामस्करी. 'उठ्ठा बसता कोनाची **मजाक** करनं बरं नस्ते.' (फा.अर.)

मजाकबाजी (स्त्री.) थट्टामस्करी. 'बुढ्याचं लग्न म्हणजे काहीतरी **मजाकबाजी** आहे अशी कांहीची शंका.' -काळी.९९.

मजाकी (वि.) विनोदी. 'डिगांबर आबा भल्लाच **मजाकी** हाय. हासूहासू पोट जाते मान्साचं.'

मजाल (स्त्री.) ताकद, हिमंत, बिशाद. 'कोनाची **मजाल** नाई आपला उंबरठा ओलांडाची.' (बिशाद, अर. मजाल)

मजीत(द) (न.) मुस्लिमांचे धर्मस्थळ. 'मारोतीचं देवूळ अन् **मजीत** लागूनच आये अथी.'

मजुरी (स्त्री.) श्रमिकाचे वेतन. 'धन्याला बाई रोज **मजुरी** आणे बारा/ संसार त्यात सारा बोरकूट' (फा.अर.)

मजूर (पु.) कामावरील गडी, कामगार. 'हरबऱ्यातलं गांजर गवत कापाले दा **मजूर** लागले.' (फा.)

मजूरदार (पु.) मजुरी करणारे. 'पाऊसपानी नवता म्हनून **मजूरदाराच्या** कामाचाबी वांधा झाला.' -अंधा.

मजेदार (वि.) रंजक. 'पेरलं का पानी येत नाई अन् वावर सोंग्याले आलं का गारगोंड होते, असं कास्तकाराचं काम **मजेदार** हाय.' (फा.)

मज्जावनं (क्रि.) माजावर येणे. 'फुकणीचा रट्टा रेणुकेच्या पाठीवर हाणत देवकी खेकसली लय **मज्जावली** ऑ शाळेतली खिचडी खाऊन खाऊन.' -एक.

मट (वि.) गप्प, विसावा. 'हा घनघोटा असला तरी आपल्या पोटच्या गोयासाठी **मट** म्हना लागते.' -सुखो.१९. 'बाईची जात घरी ऱ्हावो का रानात जावो, तिच्या हाताले **मट** आस्ते का कव्हा.' -सेल.२३४.

मटकच (अ.) नुकताच. 'म्या म्हनलं **मटकच** पेपर्स उरकले.' -मिए.१६७.

मटकन (क्रिवि.) लगेच. 'वडाखाली डोक्यावरची पखाल फेकून तो **मटकन** बसला.' -पख.९२.

मटकनं (क्रि.) मिरवणे. 'नवरीनपेक्शा तं कुरळीनाच **मटकून** रायल्या.'

मटकनं (क्रि.) शृंगार करणे, मुरडणे, हिडगणे, मिरवणे. 'जुनी साडी फेकून नवी साडी नेसली. आरशात पाहून **मटकली**.' -ना.८५.

मटका (पु.) १. घडा. 'पान्याचा **मटका** तेवढा सावलीत ठुई.' २. एक जुगार. (मडके,हिं.मटका,त.मुट्टि)

मटकावनं (क्रि.) गिळणे. 'सुलीले आयतं **मटकावनं** जमते, कामधाम नाई जमत.'

मटकी (स्त्री.) कडधान्य. 'घरात उसळ कऱ्याले **मटकी** पायजे म्हनून इरवा टाकला तुरीच्या वईनं.' (का. मडकी)

मटकी (वि.) नखरेल, मिरवणारी. 'पोरीची जात **मटकी** असली का लवकर उजवून टाकावं बापानं.'

मटकेच (अ.) नुकतेच, लगेच. 'कव्हाशीक आले पाव्हने? **मटकेच** आले.' -अंधा.

मटन (न.) शेळीबकीचे मास. 'बहेरमच्या देवाले **मटनाचा** निवद अस्ते.'

मटमट (क्रिवि.) सारखे, टक लावून पाहणे. '**मटमट** पाहेतात उगेमुगे जुने खोडं.' 'चल बई तिकळे. पोरं पाय कशी **मटमट** पाहून रायली.'

मटमिंगळ्या (वि.) मौन पण टक लावून बघणारा. 'तो **मटमिगंळ्यासारखा** झुमा-गप्प-गप्प.' -अंधा.

मटामटा (क्रिवि.) भराभरा. 'मी ती भाकर **मटामटा** खाऊन टाकली.' -फीर.१४४.

मट्ठ (वि.) गप्प, शांत. 'बाप बोलू बोल्ला तं आपून लेकराची जात **मट्ठ** रावं नाई तं भाईर जावावं.'

मठ (पु.) साधूसंताचा निवारा. 'मढु उघडिलाः घागरि मागीतलीः मढु आतू बाहीरि धुतलाः' -ली.२२३. 'तेथ निगूढ **मठ** होआवा। का शिवालय॥' -ज्ञा.६.१७९.

मठ (स्त्री.) एक कडधान्य. 'सकाऊनच **मठीची** उसळ केली तं म्या म्हटलं या **मठीनफठीनं** काय होते सूनबाई दे भाकर वाळून.'

मठाटी(डी) (स्त्री.) बैलांच्या शिंगाचा तागाचा साज. 'रेड्याला **मठाठी** घालताना कसरत करावी लागत होती.' -सि.१०.

मठान (न.) कुंभाराच्या घरी जिथे माती भिजवितात ते ठिकाण. 'गोरा कुंभार **मठानावर** माती भिजोताखेपी देवाचे गाने म्हनात गुंग.'

मठारनं (क्रि.) १. सुस्त, मंद होणे, आंग भारी पडणे, मठ्ठपणा. 'मार खाल्यानं **मठारून** गेलेलं अंग गोळा करीत तो उठून अभा राहिला.' -खुं.११४. २. दंड, नुकसान. 'शहादेवनं माही साजरी पाचशानं **मठारली**.'

मठारेल (वि.) सुस्त असलेला, अंगातील कणकण. 'काल पोते उचल्ले तं गळी **मठारेल** हाव म्हने.'

मठ्ठ (वि.) १. मूकपणे, स्तब्ध. 'आपलं गाळं फसलं का

काळाले कोनी येत नाई अन् **मठ्ठ** उभे राऊन पायतात.' २. निर्बुद्ध. 'तुक्या निरा **मठ्ठ** मानूस आये. झाट समजत नाई काईच.' (का.मुट्ठाळु)

मठ्ठा (पु.) मसाल्याचे ताक. 'उनायात जेवन झाल्यावर **मठ्ठाबी** पायजे.'

मडकं (न.) मडके. 'एकांचें **मडकें** धों लागेतिः एकांचे मुसळ धरीतिः' -गोवि.४०.

मढं (न.) प्रेत. '**मढे** झाकुनिया करिती पेरणी। कुणबियाची वाणी लवलाहें॥' -तुका.८१७.१.

मढवाचा (क्रि.) मढवायचा, सजवायचा. 'उंद्राच्या कातळ्यानं नगारा काय **मढवाचा**.' -जांग.१७६.

मढाई (स्त्री.) मढविण्याची मजुरी. 'घळाई **मळाईतच** सोनाराची कमाई असते.'

मढी (स्त्री.) गावलोकांची बसण्याची जागा. 'म्हातारे दोयपारचे **मढीत** येऊन पसरतात.'

मढोनं (क्रि.) १. सजविणे. 'पोयाले बैल **मढवाच** लागतात.' २. तबला, मृदंगाला चांमडे चढविणे. 'मुदुंग **मढोनं** हाय तं तुमी दोनशे वर्गनी द्या.'

मढोयेल (वि.) मढवलेले. 'न्यानदेवकूनच ढोल मुरदंग आजलोक **मढोयेल** आयेत.'

मणकी (वि.) शंभर किलो धान्य. 'मांगल्यासाली दा **मनकी** जवारी पिकली.'

मणीमणमुला (पु.) लेणे, साज, कपडे इ.. 'हो व ऽऽ **मणीमणमुला** नवरदेवाचा सोताचा आसावं.'

मण्डी (स्त्री.) बाजार. 'काम भेटणार, हॉटेल, **मण्डीत** माणसं लागणार.' -सि.८३.

मतलब (पु.) १. आशय, अर्थ. 'त्याच्या बोलण्याचा **मतलब** कोणाच्याच ध्यानात येईना.' -पख.६. २. हेतू. 'तिच्या बोलण्याचा **मतलब** सुमनच्या ध्यानात आला नाही.' -पख.५३. (अर.)

मतलबी (वि.) स्वार्थी. 'दिलप्या लय **मतलबी** हाय. कोनाच्या आंगं काम असलं का लाळीगोळी लावते नाई तं तोंडबी उलोत नाई.'

मती (स्त्री.) बुद्धी. 'तेथ व्यासादिकांचिया **मती**। तेचि मेखळा मिरवती।' -ज्ञा.१.९.

मत्ता (पु.) सल्लामसलत, गुप्त विचार. 'तुमाले गप्पाईत गामन ठुवाचं अन् तिकडे डांगरं लाबंवाचे असा **मत्ता** केला त्याईनं.' -डेबू.२४. (फा.)

मथली (क्रिवि.) अनुकूल, फितूर झाली. 'तोंडाने नाही म्हटले, मनाने **मथली** नाहीस तरी तुझा होकार माझ्या हातात आहे.' -कात.२७३.

मथवनं (क्रि.) फितूर करणे. 'अन पुन्हा लेकाच्या, खाल्ल्या ताटात हागून ठेवतू. माया बायकोले **मथवतू**?' -खुं.१९.

मथाटी (स्त्री.) बैलांच्या शिंगाचा तागाचा साज. 'काया बैल शिंगशिंगोटी/ त्याले नाई **नाथमथाटी**.' 'बैलाच्या कपाळावरील रंगीत **मथाट्या** भिंगाच्या उनात झळकत होत्या.' -कात.२.

मथारपन (न.) वार्धक्य. '**मथारपन** ते कुतरपन म्हंतात ते खरंच आये.'

मथारा (वि.) म्हातारा. 'मांडवाच्या दारा। पुढे आणिला **म्हातारा**।' -तुका.१२१. 'कोतवाल **मथारा** झाल्यावर त्याच्या पोराले ही नोकरी मिळलं.' -पाटी.

मथारी (स्त्री.) वृद्धा, आई. '**मथारी** काय भारी होते मान्साले तेबी निसटीस करतच रायते ना?'

मदन (न.) भुस्कटासहित धान्य. 'तू वं सजली धजली जशी तुरीचं **मदन/** खय देऊळच वाटे वावरात दनदन.' -नोका. 'रात्रभर फिरणाऱ्या गाड्याच्या चाकांमुळे कणसाचा भुगा होऊन जे **मदन** तयार होईल ते दिवसा उपणायचं. रात्री पुन्हा मळण.' -वा.५१.

मजबूत (वि.) दृढ, पक्का, शक्तिशाली. 'कवलाचं पाखं तोलासाठी **मजबूत** खांब पायजे.' (अर.)

मदार (स्त्री.) भिस्त, आधार, आश्रय, आस. 'मिर्झा एक्स्प्रेसवर होती सारी **मदार/** नेरले आलतो जीवावर होऊन उदार.' -मिर्झा.७२. 'आरं तू धोरणी माणूस, तुझ्यावरच आपली **मदार** हाय बाबा.' -सि.६५. (फा.अर.)

मदारी (पु.) गारूडी. 'सरपंच पक्का **मदारी**. उभं गाव फिरोते आपल्या भवती.'

मधघर (न.) घरातील मधली खोली. 'तो पुढे आम्ही घरात त्याच्या मागे. **मधघरात** गेलो. दार लावलं.' -खुं.२१५.

मन (वि.) चाळीस शेर, मण. 'जुन्या काळी काय पीक होये? गावरान जवारी राये, येकरी चारपाच **मन** पिके' (का. सं.मस्तक ताटी)

मनका (पु.) १. मानेचा कणा. 'मोया वायल्या आयुक्शभर अन् आता **मनका** दुखते भाऊ.' २. रंगीत गालाकार खडा. 'बैलाच्या गयात **मनके**, शिंगाले गोडे असा मस्त साज.'

मनगट (न.) हात पंजाचा दुवा. 'मान्साच्या **मनगटात** दम पायजे मंग पाय कोन्तबी संकट येवो, निभोता येते.' (त.का.)

मनगट्या (पु.) लहान मुलांच्या हातातील अलंकार. 'आजीनं नातासाठी **मनगट्या** आनल्या हातात घाल्याले.'

मनचं (वि.) मनाचे, मनातले. 'पुरी गोठ माईत नस्ते कस्तुरीले निन्हा **मनचं** लावत रायते.'

मनत (क्रि.रूप.) म्हणत, म्हणाले. 'मंग काय **मनत** पाटील?' -वा.२०.

मनतं (क्रि.रूप.) म्हणतोस. 'मंग तू काय **मनतं** ते सांग.'

मनताव (क्रि.रूप.) म्हणतो. 'मुग, उडीद इकून लेकराईले दिवाईले कपडे घ्याव **मनताव**.' -दि.७९.

मनथरपणा (क्रिवि.) मंदी, सुस्ती. 'रतिरति वाढत असलेल्या पोटामुळे तिच्या गतीला **मनथरपणा** आला होता.' -कात.२२२.

मनमानी (स्त्री.) मनात येईल तसे. 'पैसा होता तई **मनामानी** केली अन् आता बसले घरात तोंड लपून.'

मनमान्या (वि.) मनाला वाटेल तसे वागणारा. 'गना लय **मनमान्या** हाय. कुनाच्या म्हटल्यानं नाई आईकत **मनानच** करत रायते.'

मनमुराद (वि.) मनसोक्त. 'अनेक तोंडं मनाला येईल ते **मनमुराद** बोलत होते.' -खुं.३९.

मनलं (क्रि.) म्हटले. 'कोणत्याही बाईच्या आंगाले एकाएकी हात लावाले कुशाएवढे हात पाह्यजे **मनलं**.' -पख.२७.

मनवनं (क्रि.) मन वळवणे, समजूत घालणे. 'सासरी जायाचं आपून **मनवावं** अन् तती जाऊन तिनं जीवाचं काई बारवाईट कराव.'

मनसा (स्त्री.) इच्छा. 'जावांसारखंच आपलंही घर असावं अशी तिची **मनसा** होती.' -सि.५९. 'नारीची झाली **मन्सा**, जाऊ देते अनारसा.' (अर.मन्शा-इरादा)

मनसुबा (पु.) मनोरथ, बेत, इरादा, संकल्प. 'तितराने केला **मनसुबा** संगे बाट्या घेऊनी.' -लोक.१०६. 'पोराचे दोनाचे चार हात करन्याचे मायबापाचे **मनसुबे** चाल्ले होते.' -सित.३९. (अर.मनसूबःउद्देश)

मनहूस (वि.) अपशकुनी. 'सगाई मुळल्याची **मनहूस** गोठ सांगाव तं कसी सांगाव हा पेच पळला.' -सित.१४४.

मना (क्रि.रूप.) म्हणा. 'या मना माह्या दाठ्ठ्यात पाय तं ठेवून पाहा **मना**.' -धग.४२.

मना (स्त्री.) अमान्य, नाकारणे. 'पाखराईले तं **मनाच** नोती तुमची नवी भागीदारी.' -काया.२९. (अर. मन, फा.)

मनाई(ही) (स्त्री.) अमान्य, नकार, प्रतिबंध. 'सायबाच्या घरात येकदम जायाची **मनाई** असल्यानं नांगो बुढा फाटकापाशी उभा होता.' (अर.मन्शा,फा.)

मनाजोगतं (क्रिवि.) मनासारखे. 'भोवाचीच पोरगी लेकासाठी केल्यानं मायच्या **मनाजोगतंच** झालं.' -कावू.

मनायली (क्रि.रूप.) म्हणत होती. 'पुंजादा दारून हाका मारायले अन् मी त्याह्यले आली आली **मनायली**.' -पख.१७.

मनायले (क्रि.रूप.) म्हणत होते. 'माहा सुदामा सांगे गावातले लोक **मनायले** मनं आसं.' -पाटी.

मनाव (क्रि.रूप.) म्हणावे. 'दूधच नाई पेत पोट्टी दिठावली काय **मनाव**.' -धग.७१.

मनी (पु.) मणी. 'गयातील पोथ तुटल्यानं काये **मनी** हारपले वऽऽ बैना.'

मनुका (पु.) काळे वाळलेले द्राक्ष. 'लय सोय केली पावन्याची. चांगला **मनुके** टाकून गावरान तुपातला शिरा केल्ता.' (अर.मुनक्का)

मनोती (स्त्री.) ठरलेल्या व्याजापेक्षा अधिक व्याज. 'सावकाराले याजा वधर **मनोतीबी** द्या लागत असते.'

मन्नत (स्त्री.) नवस. 'लेक व्हावं म्हनूनसन्या देवापुळे **मन्नत** मांगली. लेक पाय कसा निढंग्या निंगला.' (फा.)

मन्नार (क्रि.रूप.) म्हणणार. 'तोंडावरच **मन्नार** होतो तरमा म्हटलं काय मोठ्या मान्साले खाली पायाले लावता.'

मन्यार (पु.) सर्पविशेष. 'जलाल मण्यार। भडकवी अंगि अंगार.' -भीक.११. '**मन्यार** बेमालुम दंशिता जिव्हारी.'

मन्शा(न्सा) (स्त्री.) ईच्छा, मनिषा. 'पहिल्यानं गरवार **मन्सा** खाण्यावर नाही/ पुरवतो भरतार नऊ महिने मिठाई.' -लोक.१००. 'मान्साची **मन्शा** तं काईबी अस्ते म्हनूनसन्या तसं होत नस्ते.' (अर.मन्शा-इरादा)

मन्हूस (वि.) अशुभ, उदास, दुर्दैवी. 'तुवं **मन्हूस** तोंड घेऊन काले आला अथी?' (अर.)

मपलं (सर्व.) माझे. '**मपलं** गाव बुलढान्याच्या आंगच हाय.'

मफलर (न.) ऊब देणारी पट्टी. 'हिवायातबी कानाले **मफलर**, आंगात स्वेटर कास्तकाराले काहाले पायजे?'

मरिमाय (स्त्री.) एक गावदेवी. 'आजची अखाडी आये **मरिमायले** निवद घिऊन जा लागन.

मलिदा (पु.) १. मिष्टान्न. 'काम म्हटलं का आंग दुकते अन् सकाऊनच **मलिदा** खायाले पायजे.' (फा.) २. लाभ. 'कष्ट आपले अन् **मलिदा** सायबाचा वारे वा न्याय?'

महिनदार (पु.) मासिक वेतनावरील मजूर. 'दहा एकरातला मुंग कालपासून **महिनदार** डवरीत होते.' -रा.१२३.

महिनदारी (पु.) संपूर्ण महिनाभर काम करण्याची स्थिती. '**महिनदारीपक्षे** रोजंदारी पुरते भाऊ.'

महिमा (पु.) थोरवी, मोठेपणा. 'एकु दी गोसावी श्रीप्रभूगोसावीयाची **महीमा** नीरोपीत होतेः' -ली.१९४. 'ऐका **महिमा** आवडीचीं। बोरें खाय भिलटीचीं॥' -तुका.२९६.१. 'डेबूचा आजवरचा **महिमा** असा की त्यानं कधी मुक्या जनावरालाही भांडन उकरून काढलेलं नाही.' -संगा.३५.

महिमान (क्रिवि.) महात्म्य. 'देवाचें **महिमान** पाहोनि यां। स्तुति तरी येइजे सांगावया।' -ज्ञा.१६.१८. 'पायरी प्रतिमा एक चि पाषाण। परि ते **महिमान** वेगळालें॥' -तुका.५६०.२. 'बंडूभटाचा ह्या बंडू शिंपी झाल्याचं बायकोले केदलं **महिमान** झालं.' -मोती.

मयक (स्त्री.) मळक, हुली. 'पानी खारं असल्यानं चिकट दई होते तं लेकराईनं त्याची **मयकच** धरली माय.'

मयकं (वि.) मलीन. 'राणाइसाची बहीणीः तीये **मैळके** ऐसे साउले नेसली असतिः' -ली.४४. 'हे असं **मयकं** लुगळं देतं का नेसाले? भल्लीच दिसतं वं!'

मयकनं (क्रि.) मळणे. 'बंडीत बसून वावरात येतो म्हता राजा तं तुमचे कपळे **मयकतील** बरं.'

मयकली (वि.) वेंधळी, मलीन. 'ते दारकी असीच रायते **मयकली**, करकटली.'

मय(य्य)त (स्त्री.) मरण, मृत्यू. 'असा पाऊस पाऊस माया बरसे डोयात/ जितेपनी काळू नको आमच्यावाली रे **मयत'** -नोका. 'तुहा चुलता गेला न बापा. **मयतबी** झाली त्याची.' -ऊन.२३९.

मयनदार (पु.) महिन्याचा गडी. 'आबा आंगच मी **मयनदार** आवो.'

मयना (पु.) महिना. 'नोकरीवाल्याचं बरं रायते **मयना** पुरला का हातावर पैसे.' (अर.माहिनः)

मयनाकखांड (पु.) सामान्यतः, महिन्याचा काळ. 'कई आला तू? झाला **महिनाकखांड**.' -धग.३५.

मयन्यावारी (क्रिवि.) १. प्रत्येक महिन्याला. 'तुले काय करा लागते म्हना पिकापाण्याचं? तुले **मयन्यावारी** पगार भेटते बापा.' २. महिन्याच्या काळासाठी. 'मी वाळ्यात **मयन्यावरी** काम करतो.'

मयमय (स्त्री.) मळमळ. 'दादा रोज आंग नाई धूत, आपल्यालेबी **मयमय** होते लेकाची.'

मयलं (वि.) मळलेले. 'मोह-अज्ञान-प्रमादां। ययां **मैळेंया** दोषवृंदा।' -ज्ञा.१४.२६७. 'खाल्यानी बसलो तं धोतर **मयलं** माहा.'

मयलोगनती (वि.) कित्येक मैल. 'नदीच्या पान्याले खेटून हिरव्या येलाच्या **मयलोगनती** धळ्याच धळ्या.' -सित.५६.

मयवट (स्त्री.) शेतीचा एक प्रकार. नदीनाल्याच्या किनाऱ्यावरील गाळाची शेती. '**मयवटीत** केळी, आलू, टमाटे, ऊस, अद्रक, हळद पिकं मस्त येतात.'

मया (पु.) मळा. 'रस्त्यावर संत्राचे झाळं दिसले ना येतानी, तोच आपला **मया** होय.'

मया (स्त्री.) माया, प्रेम. 'ज्याची होती त्यानं नेली/ आपली **मया** वाया गेली.'

मयाऊ (वि.) मयाळू. 'माय **मयाऊ**, बाप रागीट अन् पोट्टं निंगलं गयबानं.'

मयाल (स्त्री.) आडवी लाकडी नाट. '**मयालीला** चऱ्हाट बांधून केलेल्या झोळीच्या पाळण्यात तान्हूलं.' -जटा.२०.

मयी (स्त्री.) गाळाची शेती. 'नदीच्या काठानं बारा एकराची **मयी** आय आपल्यावाली.'

मरगंती (स्त्री.) मरणासारखी वेळ. 'गारगोंड सुरू झाल्तं आपली तं **मरगंती** आल्ती.'

मरगट (न.) मशान. 'शेवटी परतेकाले **मरगटीत** जा लागते तेबी दुसऱ्याच्या खांद्यावर.'

मरगट्टी (स्त्री.) मरणासारखी वेळ. 'रातीबेराती इचूकाट्यात फिरतो म्हटलं तं नस्ती **मरगट्टी** व्हाची पायी.'

मरगत (स्त्री.) मरणप्राय यातना. 'निढईचा घाम जाहा बुढईत जाते बायतीनवानी ताहा **मरगत** होते.' -गागा.

मरगत्ती (स्त्री.) मरणासारखी वेळ. 'अमृत पाटलाची तथी **मरगत्ती** होनार हाये.' -भं.४३.

मरजी (स्त्री.) इच्छा, संमती, कृपा. 'सायबाची **मरजी** झाली अन् गांडीवरून गंगा वायली.' (फा.)

मरणरडं (वि.) कुणाच्या मरणसमयी रडतात तसे अति रडणे. 'काळूबा **मरणरडं** रडत होता आणि सगळे त्याच्या रडण्याला हसत होते.' -खुं.३९.

मरतबा (क्रिवि.) खेप, वेळ. 'किती **मरतबा** येऊन गेलो मी तुया घरी.' (फा.)

मरतीक (वि.) मृत्यूचे. 'बापू दारका लायनीमायची पोरगी मेली मंग तिचं मढं नेतानी **मरतीकाचं** वाजवा लागते?' -वा.६९.

मरतुकळं (वि.) रोड, हडकुळं. '**मरतुकळं** पोट्टं पोते उचल्याच्या कामाचं नाई.'

मरत्या अंगी (न.) नाजूक जागा. 'एखादा दगड जर त्या दोघांपैकी एखाद्याच्या **मरत्या** अंगी लागला, तर पटकन डोळे पान्डे होतील.' -मोच.१३.

मरद (पु.) १. पुरुष. 'पयलवाना संगं टक्कर घेनार **मरद** मानूस हाय हा.' २. नवरा. 'अंगाला एकाची हळद लागली म्हणजे जातीत दुसरा **मरद** करता येत नाही.' -कात.३४८.

मरद (वि.) शूर. 'वाघाले चीत करनारा गन्या खरा **मरद** मानूस हाय.' (फा.)

मरनगाठ (स्त्री.) मरणाची स्थिती. 'तलवार घेऊन तो रागंरागं निंगला अन् मी समोर दिसलो, म्हटलं याले म्हनतात लेक **मरनगाठ**.'

मरमर (क्रिवि.) जीवतोड कष्ट. 'किती **मरमर** सोसावी पुढती। राहिली सांगाती विठोबाचे।' -तुका.३६९७. '**मरमर** मरून बाई, उसाचं पीक काढायचं.' -वि.

मरम्मत (स्त्री.) दुरुस्ती, जीर्णोद्धार. 'दिवाई जोळ आल्यानं घराची **मरम्मत** केली.' (फा.अर.मरम्मत)

मराची (क्रिवि.) मरण्याची. 'अशी माय! काय गरदी होय का काय होय बापा! इथसा त **मराचीच** पायी हाये.'

मरातब (स्त्री.) मान, सन्मान. 'पावन्याईचा मान **मरातब** करनं पोरीवाल्याईचं कामच आये.' (अर.मरातीब)

मरामत (स्त्री.) दुरुस्ती. 'राहत्या विशाल वाड्याला वाळवी लागून **मरामत** न झाल्यामुळे तो पडका झाला.' -कात.५६८.

मरी (स्त्री.) जीवघेण्या रोगाची साथ. 'आपल्या गावात **मरी** आल्ती तावक्ती पटापट उंदरावानी लोकं मेल्ते.'

मरीआई(माय) (स्त्री.) ग्रामदेवता. 'बुबानं माही कापेल शेंडी **मरीमायपुळे** ठिवली.' -सित.११४. (त.मारि)

मरे (क्रि.रूप.) १. कष्ट करीत असणे. 'मरमर **मरे** तरी पोट ना भरे.' २. मरत असे.

मरेल (क्रिवि.) मरणार. 'हां गाः म्हातारी **मरैलः** तरि तुम्ही काइ कराल?' -ली.३१७.

मरेल (वि.) १. मेलेला. '**मरेल** ढोराचं कातळ मांगानं काळून नेलं काय अन् सळूं काय सारखंच.' २. अशक्त. 'काई खात पेत अस्त का नाई? निन्हा **मरेल** दिसून रायला बे?'

मरेलमुरदा (वि.) मृतप्राय. 'त्याचं तोंड पाहा, **मरेलमुरद्यावानी** जसं दोन दिवसापासून काई खाल्लं नाई.'

मरेस्तोवर (क्रिवि.) मरेपर्यंत. 'भिका भांबळ्याला **मरेस्तोर** मारलं. नशीब म्हणून वाचला.' -पख.३.

मरेळ (वि.) मळलेले. 'त्या **मरेळ** कपड्याचा रोगट वास कोणालाच जाणवत नसे.' -मोती.

मर्जीखोर (वि.) इच्छा, मनाप्रमाणे वागणारा. 'सुपा बरा हये. **मर्जीखोर** हये.' -सेल.२६२.

मर्जीमुलाजा (पु.) मुलाहिजा, इच्छा, कृपा. 'खायाप्याचा कोनाचा **मर्जीमुलाजा** अस्ते म्हनून का कोनी इस्टेट नावनं करते?'

मर्द (पु.) मनुष्य, मानव, नर. 'खरा **मर्द** हो मी त्याच्यावानी बायल्या थोळीच आवो.' -धग.१८. (फा.)

मर्दानगी (स्त्री.) शौर्य, पौरुष. 'पयलवानाच्या गावात जाऊन त्याले झोळूं अशी **मर्दानगी** दाखोली आपून.' (फा.)

मर्दुमकी (स्त्री.) शौर्य. 'घरात **मर्दुमकी** दाखून काय फायदा? लफाडात जानं जरासाक.' (फा. मर्दुम, मुर्दुमी)

मर्सान (क्रि.) मरून जाल. 'अबे **मर्सान** ना सायाचेहो हराममौतीनं.' -धुम्म.

मलई (स्त्री.) साय. 'दुधावरची **मलई** शहरातले लोकं खातात अन् आमी पेतो ताकाचं पानी.' (फा.बालाई)

मले (सर्व.) मला. '**मले** एकदा थुकलेला थुका दुम्हार चाटायची आदत नाही.' -पख.४२.

मवं (सर्व.) माझे. '**मवं** खरं काय अन् खोटं काय ते सुलीलेच माईत हाय.'

मवका (पु.) संधी, वेळ. 'येक **मवका** भेटला ना मान्साले मंग मांगं हटाचं कामच नाई.'

मवजुदगी (स्त्री.) हजर असणे. 'पोलीस पाटलाची **मवजुदगी** असली का गावठी पयलवान बोलत नाईत.' (फा.)

मवजूद (क्रिवि.) हजर. 'मी सोता **मवजूद** होतो भांडनाच्या टाइमाले.' (फा.)

मवटी (स्त्री.) १. बैलगाडीतील खुंटापासून पुढे आलेला तढवाचा भाग. खत, कुटार बैलगाडीत ज्यास्त बसावे म्हणून केलेला. 'बंडीचा हळ्या धरून **मवटी** वर उचल्ली.' -सित.१३०. २. पावसाचे पाणी आत येऊ नये म्हणून दरवाजावर केलेले अरुंद छप्पर.

मवतीर (न.) पुनर्विवाह. 'आपल्या खानदानीत काई कोनाचं **मवतीर** नाई झालं बुवा. देशमुखाईतबी **मवतीर** लावत नाईत.'

मवनी (स्त्री.) मोहिनी. 'गव्हान्या नारीनं **मव्हनी** घातली दह्यात, लोकाचा भरतार इनं घेतला कह्यात.'

मवरं (अ.) पुढे. 'गावामंदी **मवरच्या** शिक्षेनाची सोय नोती.' -सित.१३.

मवरा (पु.) १. रोख. 'निगिजे पूर्वीलिया **मोहरा**। कीं येईजे पश्चिमेचिया घरा।' -ज्ञा.६.१५९. २. दर्शनी भाग. ३. पुढाकार. 'त्यानं **मवरा** काळला मंग सारं गाव त्याच्या मांगं गेलं.'

मवरी (स्त्री.) मोहोरी, मोहरी. 'तथा लहान खांड ते **मुहुरी** एव्हडे करावेः' -दृ.१३. '**मोहरी** कांदा ऊंस। एक वाफा भिन्न रस॥' -तुका.१८७४. 'पिवळ्या बारीक फुलायनं लदबद होयेल **मव्हरीचे** झाडं हाळद लावेल नवरीवानी दिसत.' -अंधा. (अर.मआली)

मवरून (अ.) पुढून. 'दुकाना **मवरून** ते निस्त्या चकरावर चकरा मारत जाये.' -सित.८०.

मवरे (अ.) पुढे. 'मार्गाधारें वर्तावें। विश्व हें **मोहरें** लावावें।' -ज्ञा.३.१७१

मवलत (स्त्री.) सवलत. 'तुया गोठीचा इचार कऱ्याले मले आमासीक **मवलत** दे बाई.' -सित.२२.

मवारून (क्रि.रूप.) मोहरून जाने. 'पावसानं धरती सुबक

मवारून हिरवी चबूक दिसायला लागली.' -कात.१५६.

मवाली (वि.) गुंड. '**मवाली** पोट्टे रातदिवस गंजिफा खेळतात. राती पारावर चिलम्या गोठी करतात.' (अर. मआली, मौलाचे, फा.)

मव्हं (सर्व.) माझे. 'हे वावर **मव्हं**, तिकळचं लायन्या भॉचं.'

मव्हतीर (न.) पुनर्विवाह. 'दगडे आता तुई तुह **मव्हतीर** अटपून घे.' -भं.७.

मव्हरं (अ.) पुढे. 'याच्या **मव्हरं** मले इच्यारल्याबिगर पखाल देऊ नको.' -पख.२५.

मव्हरका (पु.) मोऱ्हाके, गुराच्या नाकाला छिद्र न पाडता वेसण लावण्यासाठीचा दोराचा फास. 'महादेवानं मळ्याले वरदान देलं 'इथून मव्हरं तूच गोऱ्हा ठेससील त्याले **मव्हरका**, येसन घालसील.' -वा.४२.

मव्हरे (अ.) पुढे. 'पोरीच्या जातीनं **मव्हरे-मव्हरे** करू नये लयमोठं.' 'मांगून येऊन तो माया **मव्हरे** गेला.'

मशहूर (वि.) प्रसिद्ध. अन्वरशा खऱ्या अर्थानं गुल्लरशा होता. त्याचा अचूक नेम **मशहूर** होता.' -काळी.२५. (अर.मशघुल)

मश्गूल (वि.) तल्लीन, कार्यमग्न. 'चंद्रभान पेरन्यापारन्यात **मशगूल** आये अपके.' (अर.)

मशागत (स्त्री.) शेती कसण्याची प्रक्रिया- नांगरणे, वखरणे, पेरणे, वेचणी इ.. 'काय करील भूमाता भली। **मशागत** नसता जतिनीची?' -ग्रा.१८.४५. 'कास्तकार कास्तकार काया मातीचा हालाल/ करे किती **मशागत** फेळे माऊलीचं रिन.' -चंच. (अर.मशक्कत)

मसंटी (स्त्री.) स्मशान. 'सव्वासीन झाल्या/ वाजतगाजत **मसंटीले** नेल्या.' -लोक.४२.

मसगूल (वि.) मग्न. 'कोनाच्या अंधात ना मंधात, आपल्याच कामात **मसगूल** राहावं मान्सानं.' (फा.)

मसडी (स्त्री.) म्हैस. 'काहून बोकांडलीसीन हे **मसडी**.'

मसन (न.) स्मशान. '**मसणासि** आणिलीः सरणावरि घालु आदरिलीः' -ली.६४. 'नेऊनि निजविलें **स्मशानी**। माणसे जाळी ते ठिकाणी॥' -तुका.१३९८. 'हॉटेली खाणे, **मसणा** जाणे।' -ग्रा.१४.११.

मसनखाई (स्त्री.) स्मशानभूमी. 'छाछूवाले रातीबेराती **मसनखाईत** चकरा मारत रायतात.'

मसनखुरी (स्त्री.) मशान. 'मानसात मानुसकी मुळीच नाही उरली माणसाच्या मढ्यासंग **मसनखुरीत** पुरली. -मिए.२०

मसनवटा (पु.) स्मशान. 'गावचा **मसनवटा** नदीकाठीच आये.'

मसनवटी (स्त्री.) स्मशान. 'घर सोळून का **मसनवटीत** जातं राहाले बापा?'

मसन्या ऊद (पु.) प्रेत उकरणारा **ऊद** स्मशानात असतो. त्यावरून भयंकर हानी पोहोचवणारा.

मसन्याउदाच्या (वि.) एक शिवी. 'कोन्त्या **मसन्याउदाच्यानं** कन्सं खुळूखुळू नेले सबन.'

मसन्या (वि.) एक शिवी. 'काय कराव माय या **मसन्याचं**, जितं खाते तितचं हागते मुर्दा.' -धग.१७३.

मसमस (क्रिवि.) सौष्ठव, शक्तीचे प्रदर्शन. 'अपके फुली लयच **मसमस** करून रायली गळ्या.'

मसलत (स्त्री.) खलबत, विचारविनिमय. 'काहीतरी **मसलत** करून ही जवानीतली छैलछबीली गवसली पाहिजे.' -कात.५४. (अर.मसलहत)

मसला (पु.) समस्या, घटित. 'दोघातला **मसला** समजला तं काही उपाय करता यीन.' (फा.अर.)

मसुदा (पु.) मजकूर. 'कावेरीला **मसुदा** सांगून त्यानं पत्रक तयार केलं.' -सि.७६. (अर.)

मसूर (स्त्री.) डाळीचा एक प्रकार. 'काईबी कुवतीच्या पार गोठी करतं राजा तू! ए मू और **मसूरकी** दाल?' (का. मसूरि)

मसोबा (पु.) एक ग्रामदेवता. 'होईले शेनाचा **मसोबा** करून त्याच्या बोंबीत ताक टाकत जावो आमी.'

मस्कऱ्या (वि.) थट्टा करणारा. 'एकनाथ लय **मस्कऱ्या** गळी, हासोतच रायते सदाई.' (अर.मस्खरः)

मस्करी (वि.) थट्टा, चेष्टा. 'पोरं बुढ्याची **मस्करी** करतात, ढवाई करतात, खिजोतात.' -डेबू.२४. (अर.मस्करा)

मस्का (पु.) लोणी. '**मस्का** लावल्याबिगर कोन्तंच काम होत नाई आजकाल.' (फा.मस्कः)

मस्त (वि.) १. धुंद. 'सदू आपल्याच कामात **मस्त** रायते.' २. छान, सुंदर. 'तारीफ करताच तो इतका **मस्त** लाजत असे की मुलीहून टॉप.' -गय.१७. (फा.मस्त)

मस्तंग (वि.) मस्त, छान, चांगले. 'आपून निवडून देतो ते **मस्तंग** मुंबई दिल्लीत मजा मारतात.' -त.७५.

मस्तक (न.) डोके. 'कौतिकनं विचारलं का बा **मस्तकगिस्तक** दुखतं का?' -धग६ 'तुका म्हणे विटेवरि जी पाउलें। तेथे म्या ठेविले **मस्तक** हे॥' -तुका.१९०३.

मस्तन (वि.) छान, साजरा. 'सागरची पुडी लय **मस्तन** लागते. खातु का?' -निशा.९४. 'बायको काय **मस्तन** भेटली भावड्याले ज्याचं नाव ते!'

मस्तवाल (वि.) मातलेला, उन्मत्त. 'मातलेल्या सांडावानी नोका होऊ **मस्तवाल**.' -नांबै.

मस्ताड(ळ)नं (क्रि.) मस्ती करणे. 'वान्नेराचे पिलं घूम **मस्ताडतेत** आमराई डोक्यावर घेतेत.' -निशा.

मस्तावनं (क्रि.) अंगात आणणे, रगेली करणे. 'जवानीतलं **मस्तावनं** पुढे लय भारी जाते बाबू.'

मस्तावला (वि.) माजला, रगेल. 'यादो लय **मस्तावला**, त्याची जिरोली पायजे कोनं तरमा.'

मस्ती (वि.) नशा, धुंदी, उन्माद. 'चढली व्यायामाची **मस्ती**।' -ग्रा.६.४८. 'मास्तर नसला का पोराईची **मस्ती** सुरू होते.' (फा.)

मस्त्रे (वि.) एक शिवी. 'झोपतून उठवून कौतिक पोरांना म्हणाली, चाला **मस्त्रेहो** उठा, उतरा आता.' -धग.९.

मस्त्या (वि.) एक शिवी, स्मशानात राहणारा म्हणून भूत. 'काय कराव माय या **मस्त्याचं**. जिथं खाते तिथंच हागते मुरदा.' -धग.१७६.

महंबी (सर्व.) माझेही. 'तुमचं ठीक पण **महंबी** म्हणणं तुम्हाले ऐकावं लागनं.' -निशा.१८६.

महशूर (वि.) प्रसिद्ध. 'पावने बॉ तुमी नाई ओळखत मले मी काय तुमच्यावानी **महशूर** हाव.' (अर.)

महाग (वि.) मूल्यवान, दुर्लभ. 'जो जन्मसहस्रा-चियासाठी। इंद्रादिकांही **महागु** भेटी॥' -ज्ञा. ६. १४६.

महागाई (स्त्री.) मूल्यवृद्धी. '**महागाई** काहाची वाळ्ळी राजा? शौकापान्याच्या जिनसाईची, आपल्या अनाजाले काय भाव हाय फतराचा.'

महागरी (वि.) महाग, मूल्य असलेली. 'तळानची **महागरी** जमीन विकून तिच्याऐवजी सस्तात तिकडे घ्या.' -दि.६८४.

महाबुरांड (वि.) महाभयानक, वाईट, कठीण. 'मातर या चोद्या बैलाले आवरनं म्हंजे **महाबुरांड** काम.' -सित.१२१.

महामारी (स्त्री.) प्लेगची साथ. 'रामलक्ष्मणासारखी दोनी पोरं **महामारीत** दगावली.' -कात.३१६.

महामुरी (स्त्री.) आधिक्य, विपुलता. 'कचेरीच्या कामात ज्याच्या जवळ धनाची **महामुरी** त्याची अखेरी होणार.' -कात.५७३.

महामूर (वि.) विपुल. 'चार साला आंधी **महामूर** कांदा पिकला व्हता.'

महारवाळा (पु.) महारांची वस्ती. 'एरएर गोसावी सरिसेचि नीगालेः **मान्हावडेयासि** वाट फांके तवं बोळवीत आलेः' -ली.१००.

महारोग (पु.) कुष्ठरोग. 'मोहाचा फिटो। **महारोगु**॥' -ज्ञा.१४.४१२. 'पुंडा आबाचे सारे बोटं झळ्ळे महारोगाच्यानं.'

महाली (पु.) न्हावी. 'गिरजा **महाली** सकाई धोपटी घेऊन वाड्यात येये.' -दि.५.

महाळ्या (पु.) वानरातील प्रमुख. 'वानरातला **महाळ्या** तिच्याकडी पाहून दात इचकत व्हता.' -अंधा.

महावार (वि.) प्रत्येक महिन्याला. 'काई काई लोकं तं **महावार** पंधरावीस हजार रुपये पगार घेतात.'

महुशार (वि.) मऊ. 'नाल्याच्या काठाला मोळ गवत वाढते रेशमासारखे लांबच लांब **महुशार**.' -रा.२४.

महूळ (न.) मोहळ, मधाचे पोळे. 'त्यातच एखाद्या बुडखातून **महूळ** उठायचं. त्याच्या माशा चावायच्या. तोंड अंग सुजायचं.' -वा.२६७.

महेमान (पु.) पाहुणे. 'मोठ्या घरी **मेहमान** येल दिसतात कोनी तरमा.'

महेमानबाजी (स्त्री.) आतिथ्यशिलता. '**मेहमानबाजीतच** तं वऱ्हाडची सोन्याची कऱ्हाड पितयची हून गेली.'

म्हार (पु.) महार, एक जमात, गाव कामगार. 'चोखामेळा बंका जातीचा **माहार**। त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी॥' -तुका.४२७६.

मळं (न.) प्रेत. 'मग **मढावरि** वोळावुनि रडों लागलेः' -गोवि.१३८. ''मेल्या तुझें गेलें मढें...''।' -नाथ.१८६५. 'गावात पळलं **मळं** अन् पाटलाले पळ्ळं कोळं!' -अक.७३.

मळकं (न.) मडके. 'मग नवा **मडका** घालीतिः पाणी घालीतिः तोंड गुंडूनि ठेवीतिः' -ली.५८१. 'तुम्हां घरीं सुवर्ण **मडकी**।' -नाथ.१७३९. 'फोडावें **मडकें**। मेलें लेखीं घायें एकें॥' -तुका.१०६.२. 'कुंभाराच्या घरी काय गाळगे अन् **मळक्यांचा** बजार.'

मळण (न.) मळणी. 'मंग काय? त्या घरात दोघंच. रातभर **मळण** धरा का दळण दळा कसं?' -पख.५३.

मळनं (क्रि.) मळणी करणे. 'जे नाई ते करतं, कांद्यावर **मळन** धरतं.'

मळवट (न.) कपाळावर कुंकू व अक्षद लावणे. 'लावीएलें पाए एकी **मळिवटु** देखीतिः' -धउ.१६. 'कपाळावर लालभडक **मळवट** भरलेला पोर्गा.' -पागो.१७.

मळा (पु.) ओलिताचे शेत. 'गावा पसीमे **मळा**ः तेथ गोसावी बीजे केलेः' -गोवि.२३४.

मळी (स्त्री.) १. मळ. 'तळीं अग्नि जाळीः रस कढेः चाटसीए करुनि **मळी** वेगळी करीः' -दृ.६७. २. नदीकाठचे शेत. ३. मढी.

मंग (अ.) मग, नंतर. '**मग** तीही वडेः मांडेः अमृतफळेः खीरिः घारीयाः पकुरीया उंबरेः फेणियाः साकरमांडेः खीरि ऐसा बरवा पदार्थु उत्तमु नीफजवीलाः' -गोवि.२४६. '**मंग** तू इतली डोये सुजेठावरोक काम्हून रडलीस व?' -पख.२४. 'तू होय पुढं, मी येतो **मंग**.'

मंगन (अ.) नंतर. 'मामामामीपासी आता बोलू, **मंगन** बोलू,

असी मनात घासाघीस चाल्ली व्हती.' -सित.१३९.

मंगयसूत्र (न.) मंगळसूत्र. 'ज्याच्या नावाचं **मंगयसूत्र** माया गयात हाय ना त्याले कायजी, तुमी नोका करू.'

मंगसन्या (क्रिवि.) काही वेळानंतर, त्यानंतर. 'मालकाची पेटी फोडून पैसे चोरले त **मंगसन्या** आहेच पोलीस ठाणे. जेल.' -अंधा.

मंगानी (अ.) मघांशी, थोड्या वेळापूर्वी. 'कवा आला रे? **मंगानीच** आलो बाप्पा.' -पोळा.

मंघवासी (अ.) मघां, थोड्या वेळापूर्वी. '**मंघवाशी** लोनी गाडग्यातून काढतानी म्या पाह्यलं.' -अंधा.

मंघा (अ.) मघांशी, थोड्या वेळापूर्वी. 'आताई तेच मंत, **मंघाई** हेच मनत होती तू.' -धग.१७.

मंजिरा (पु.) छोटा टाळ. 'ढगाची ढोलक वाऱ्याचा **मंजीरा/** इजीचाई तोरा काय सांगू' -नोका. (सं. मंजीर)

मंजुरी (स्त्री.) १. मंजुळी, तुळशीचा मोहर. 'तुयसाबाईले डांगोडांगी **मंजुऱ्या** लागल्या.' २. मान्यता. 'सायेबाची सई म्हंजे कामाची **मंजुरीच** समजा.'

मंजूर (न.) मान्य. 'चांगल्या मान्साचा शब्दनशब्द आपल्याले **मंजूर** अस्ते.' (फा.अर.मंजूर)

मंजे (क्रि.) म्हणजे. '**म्हंजे** वाघाचे पंजे, कुत्र्याचे कान, नाजूकचं लगन, सावधान.'

मंडई (स्त्री.) १. भाजीपाल्याचा बाजार. २. मंडळी. 'काहाळा कपळे **मंडई**, चाला ज्याले.' (हिं.मंडी)

मंडप (पु.) मांडव. '**मंडपाची** रचना हरुषे करी वीस्वकर्मा निंदानीः' -धऊ.१४.

मंतर (न.) मंत्र. 'पोट्टं राती भेलं तं मनू आबानं पान्यावर **मंतर** मारून तोंडावर मारलं.'

मंतरनं (क्रि.) भारणे. 'साधू बॉनं **मंतरून** देयेल ताईत हातात बांधला.'

मंता (क्रि.रूप.) म्हणता. 'इथं दुकानच नाई, मंग काय कर **मंता** मले.' -धग.१३.

मंते (क्रि.रूप.) म्हणते. 'तात्याजी उठा, माय **मंते** सकायवकाय निंघू आपून.' -धग.१६.

मंदरा (पु.) कापडाचा प्रकार. 'किन्हाटलेल्या **मंदऱ्यात** कधी काळी आज्यापणज्यानं बांधून ठेवलेल्या पोथ्या, दररोजचे अष्टगंध, कुंकू पिऊन पिऊन कुजून गेलेल्या.' -मोच.६८. 'बुढ्यानं **मदऱ्यातून** पोथी सोळली.' -काळी.९५.

मंदल्या (वि.) मधांतील. 'कोनं इकत घेतली रे जागा? काकाचा प्रश्न. म्हाच भावानं, **मंदल्यानं** बाप म्हणाला.' -फीर.१७१.

मंदवा (वि.) मधला. 'तुयशीरामच्या **मंदव्या** पोराचं कालच लगन झालं.' -धुम्म.

मंदा (वि.) फिक्कट. 'साळीचा रंग असं **मंदा** काहून घेतला वऽऽ? चकचक घ्या लागत होता.'

मंदातनी (अ.) मध्ये. 'आता काय दिवाई ना मिवाई, **मंदातनीच** आले बइनीच्या भेटीले?'

मंदी (अ.) मध्ये. 'मीबी फीच्याच **फिकरमंदी** हाय पण आजून ढंग नाई लागला.' -फीर.१११. 'मोठ्यांच्या बातचीत **मंदी** पडू नोको रे पोरा.' -सि.१४०.

मंदील (पु.) फेट्याचा पदर. 'बाई घरचा पाटील, गोफ गळ्यात सोन्याचा, डोई जरीचा **मंदील**.' -लोक.३१.

मंधची (वि.) मधली. 'हे पिवळी **मंधची** गोई मार. नेम धर बरोबर.'

मंधवा (वि.) मधला. 'मोठा जमिनजुमला पायते अन् **मंधवा** शिकून मोठा सायब झाला.'

मंधांत (अ.) मध्ये. 'तू बोलली **मंधात**, देलं आपल्यालेच कोलून बुवानं.' -सेल.४३.

मंधांतरा (वि.) मध्यस्थ. 'पावन्याईचं मत जाणून घेण्यासाठी आपल्यालेच पुन्ना **मंधांतऱ्यायच्या** घराशी चकरा मारा लागतात.' -खुं.१३९.

मंधी (अ.) मध्ये. 'तुले **मंधीमंधी** बोलाची खराब सव आये गळ्या.'

मा (स्त्री.) आई. 'वाढून दे वं **मा**, भलकसी भूक लागली मले.'

मा (सर्व.) माझे. 'गोसावीयांचे सेवादास्य कीजेः **मा मा** काई म्हणत असे?' -ली.९७. 'आता **मा** कसं होईल हो काका? माय बाप गेल्यानं उघळीच पळ्ळी मी.'

माई (सर्व.) माझी. 'लेका **माई** बंडी असूनबी मले लोकं इच्यारत नाई अन् घेऊन जातात परभायऱ्या.'

माई (स्त्री.) माळी. 'माजला **माई**, गांड पुसते केई.'

माईन (स्त्री.) १. माळी जातीची स्त्री. 'बुधवारी **माईन** बसते भाजीपाल्याचं टोपलं घेऊन.' २. मांजोळी. 'नाकात काय **माईन** झाली का व तुया? फुलाचा वास घे, जाते मंग ते.'

माऊ (पु.) स्तन. 'असे धरूधरू त बाईचे **माऊ** मोठे झाले नस्तीन ना?' -रा.५६.

माऊ (स्त्री.) मांजर. 'अले अले, ते पाय म्यावऽऽ म्यावऽऽ करत **माऊ** आली.' असं म्हनत आजी लेकराले वागवते.'

माकन (न.) केरमिश्रित धान्य. 'तुरीचं **माकन** वावरातच पळेल हाय.'

माकोळा (पु.) मुंगळा. '**माकोडा** असेः तो झाडिता झडेनाः तोडिता तुटे नाः ऐसा ही तोडिजे तरि धड तुटेः परि न सोडीः' -ली.३७५. '**माकोडा** असेः तो जीवन पाहेः' -दृ.५६.

माखन (न.) वंगण. 'कुठंही जायच्या आंधी आसकुडा भोवती चाकांना **माखन** लावल्या जायचं.' -जटा. 'ये देव्या **माखनात** कापसाचे बोये साजरे भिजवून चाकाच्या आवनात दाब.' -दि.१२.

माखनं (क्रि.) चोपडणे. 'बाइः यासि तुपे माखूनि पोली देयाः बाइसी ते यासी तुपे **माखूनि** पोळी दीधलीः' -ली.४९८.

माच (न.) १. राखणीची झाडा, खांबावरील बैठक. 'जे बांधोनियां **माच**। क्रिया धांवे।' -ज्ञा.१३.१२०. २. आंबे पिकवण्याची अढी. '**माचात** टाकल्यास आंब्यालेकं पिकलो.' -मिर्झा.५१.

माचका (पु.) नाश, तुडवण. 'हरणाच्या खुराखाली पेरलेल्या पिकाचा **माचका** होतो.' -खुं.४४.

माचनं (क्रि.) आंबा चोळून नरम करणे. 'जवनीतले आंबे घेऊन **माच** साजरे अन् रस खात बसं.'

माचेल (वि.) पिळले, चोळलेले. 'आंबे **माचेल** असतीन ताहाच रस निंघीन्ना भौ.'

माच्यानं - माझ्याच्याने. 'सदाचं टोचून बोलनं **माच्यानं** काई आईकल्या जात नाई.' -फीर.१४३.

माज (पु.) संभोगासक्ती. 'म्हैस **माजावर** आल्यानं हेल्याजोळ नेऊन सर देऊन आनला.'

माजनं (क्रि.) मस्तावणे. 'अज्ञानामुळे विकार **माजती**।' -ग्रा.१.२६.

माजर (स्त्री.) मांजर. 'उघळं नको ठू व माय. **माजर** तोंड घालते कायच्यातनबी.'

मांजरझाक (स्त्री.) संधिप्रकाशाची वेळ. '**मांजरझाक** होत नाई त गावात येऊन टेकलोबी.'

माजरचोद (वि.) एक शिवी. '**माजरचोद** हाय भोसळीचा. आपल्याजोळचं खाल्लं अन् मत फलान्याले देलं.' (फा.)

माजरा (वि.) माजलेला. 'जो सावध घे मदिरा। तो होउनि ठाकें **माजिरा**। तियेचि क्षणीं॥' -ज्ञा.१७.११३.

माजरे (पु.अने.) बेरडी, जुंपण्याचे साधन. '**माजरे** लावुनिया जुवाशी, बोला आगोल्याशी.' -लोक.८५.

माजले (क्रि.रूप.) बोकाळले, स्वैर झाले. 'तरी सिंधूचेनि माजें। जळचरां भय नुपजे।' -ज्ञा.१२.१६५. 'पापी जे अभक्त दैत्य ते **माजले**॥' -नाथ.७. 'नाना तऱ्हेचे तमाशे **माजले**। गावामाजी॥' -ग्रा.५.१११.

माजल्या - थुतराचं वि. माजावर आलेले, एक शिवी. 'समोर बिस्कुट पडलेली असतात तरी **माजल्या** थुतराचं तिकडे पाहात नाही.' -एक.

माजेल (वि.) माज आलेला. ' **माजेल** गांड शेव्व्या खाये.'

माजेलपना (पु.) मस्ती, शक्ती दर्शक वर्तन. 'गजा लय **माजेलपना** करून रायला आपल्यासंगं.'

माजोन (न.) १. गोंधळ. 'लेकराले येवळं मारसान त शाळेत येऊनच **माजोन** आनीन, माय म्हणाली.' -फीर.१५. २. भांडण. 'कापसाच्या येचाइसाठी **माजोन** हाजोन ना करता राधाले समजून सांगू.' -सित.८५. ३. भरपूर असणे. 'उभ्या रस्त्यानं झाडं. बोरी बाभळी हिवराची. त्यांचच **माजोन** फार.' -डेबू.८. ४. मोह सडविण्यासाठीचे विरजन.

माजोनं (क्रि.) माजविणे, काम जागवणे. 'आणिके द्रव्ये सेविलिया **माजवीतिः** स्त्री दर्शनमात्रेचि माजवीः' -ली.

माजोन्या (वि.) भांडकुदळ. 'अशाकशा बाया निऱ्हा **माजोन्या** हायत. सकाऊनच येकीमेकीले श्या देऊन रायल्या.'

माजोरी (स्त्री.) माज, मस्ती. 'एवढ्यात तुमची **माजोरी** फार वाढली.' -झेल.६०.

माटं (वि.) एकटक पाहणारा. 'हे **माटं** पोट्टं सदा न कदा पोरीसोरीकळेच पाहेत रायते.'

माटा (पु.) गप्प आणि एकटक पाहणारा. '**माट्यासारखा** काय पाह्यतं माया तोंडाकळे, तोंडानं बोलसीन काही.'

माट्या (पु.) मोठी कांचाळी गोटी. 'चल कांच्या खेळू. माया जोळ कांचीले नेम लावाले मस्त **माट्या** हाय.'

माट्या (वि.) १. एक शिवी, भामटा. ३. एक टक पाहणारा. 'डब्यात काहीच दिसलं नाही तं पाह्यना कसा मटमट पाह्यते **माट्यावानी**.' -एक. (का. माट)

माठ (पु.) १. मोठा राजन. 'उनायात जमिनीत रोयेल **माठातलं** पानी थंडगार लागते.' (त.मडा) २. एक व्याधी. 'एकाएकी बेमारी झालती त्याले **माठ्याची**.' -ऊन.१८९. '**माठ्याचं** दुखच लागट एकदा झालं का तीन खेप व्हतेच.' -ऊन.१९३.

माठं (वि.) खारं, हलकं. '**माठं** पानी पेयानं पोटच दुखत रायते.'

माठनं (क्रि.) ठोकणे, लावणे. 'लोखंडी दरवाजाला ठिकठिकाणी पितळी, लवंगी खिळे **माठले** होते.' -कात.६०.

माठी (वि.) मठ्ठ, मंद. 'निरक्षर माय/ विचारानं **माठी**/ कष्टाचीच रोटी/ मुखामंधी.' -झा.२९. 'पोरगी पाया देख्याले **माठी** अन् बोल्याचाल्यातबी हेंबाळी व्हती.' -सित.२२.

माठ्या (वि.) ठोंब्या. 'शालक्याचा पोरगा निव्वळच **माठ्या** निंगला लेकाचा.' (का.माट)

माड (न.) सरण. 'मसनवट्यातई आंधी कामं करा लागतील तव्हा **माडावर** ठेवतील.' -झि.११.

माडा (स्त्री.) ज्वारीची जात. '**माडा** जवारीच्या जागी पेरली बिव्हड.' -मिर्झा.१३९.

माडी (स्त्री.) घरावरील दुमाला. 'दखिणिले दारवठां **माडी**ः पहीलीए खणावरि गोसावी उभे राहीलेः' -ली.२३०. (त. माडि, गच्ची)

मात (स्त्री.) १. गोष्ट. 'आइकिली **मातु** परिसो जाणे जाणेः परि सांघो नेणे तो मुकाः' -ली.५९५. (का.) २. पराभव. 'तुका म्हणे केली **मात**। लाज राखिली तयांची॥' -तुका.३९४.

मातकट (वि.) मातीच्या रंगासारखे. 'असा काहून **मातकट** रंग देला बे. झयकनारा द्या लागत होता.'

मातकाम (न.) मातीचे बांधकाम. 'एक वेळ भट **मातीकाम** करीता भुकैलेः' -ली.७. 'घरादाराचं **मातकाम** बेलदारा आंगच रायते.'

मातकिडा (पु.) मातीतील किडे. 'रेवदार मातीचे ढीग साचल्याने **मातकिड्यांची** जागोजाग घरं तयार झाली होती.' -सि.३४.

मातड (न.) मातीमिश्रित धान्य. 'पोटाचा भरण्या खाडा, पचविलाहि **मातड** कोंडा.' -भीक.२१.

मातब्बर (वि.) मात करणारा, वरचढ, श्रेष्ठ. 'तात्यासारख्या **मातब्बर** मान्सासंग आपून खेटे घेनं आंगलट येईल बरं.' (अर.)

मातर (अ.) मात्र. 'धुरकरी व्हा कोनी राजा गाळं **मातर** चालत ठेवा/ आरे बदला पुट्ठे बदला चाक **मातर** फिरतं ठेवा.' -काया.२९. 'मामा **मातर** गादी लोड थाटामाटात टेकून बसलेला.' -डेबू.६७.

मारत (स्त्री.) मात्रा. 'किसनावर माहीच **मातर** लागू पळली म्हून आईकलं त्यानं आपलं.'

मातरं (न.) माती मिश्रित धान्य. 'बायजा गव्हाहरबऱ्याचं मातरं सुपानं घोळू लागली. **मातऱ्यात** असणारे मातीचे खळे, काड्या सुपाच्या घोळात, पुढच्या भागात, येत होत्या.' -वा.१२४.

माता (स्त्री.) देवी निघणे. 'गेली बिचारी सारं सोडून साधं **माताचं** निमित्त झालं.' -मोती.

मातामाय (स्त्री.) ग्रामदेवता, तोंडावरील देवीचे व्रण. 'पोटावर, मांड्यावर, तोंडावर **मातामाय** वस्तीले आली.' -मोती.

माती (स्त्री.) अंत्यविधी. 'कुणी मेल्यावर लोकंही काय म्हणतात, अमक्या अमक्याच्या **मातीवर** चाललो.' -डेबू.६४.

मातुडा (पु.) धान्यात माती मिसळणे. 'वारंउधानं सुटल्यानं पिकाचा **मातुडा** झाला बावा.'

मातेरं (न.) खळ्यावरील माती मिसळलेले धान्य. 'स्त्रवुनिया नरा। केला आयुष्याचा **मातेरा**।' -तुका.३२६१. 'तुका म्हणे तेव्हा नरदेह नरा। तयाचा **मातेरा** केला मुढे।' -तुका.४४२०.

मातोडा(ळा) (पु.) माती मिश्रित धान्य. 'ही **मातोड्याची** धुळधान किती दिवस सन करणार हाय आपूण?' -खुं.११०.

मात्रंम (अ.) मात्र. 'पोटाच्या आगीनं खटे **मात्रंम** औत वहडतच मले मोहाखाल्तं घेऊन आले.' -जटा.४१. '**मात्रम** त्येयची खरी आफत होये सकाई पळसाकळं जाची.' -दि.२.

माथं (क्रिवि.) आधारे, भरोशवर. 'बैलाच्या **माथच** आपली जिनगानी आहे किस्तकाळी आहे.' -डेबू.३६. 'लोकाच्या **माथं** तुयजापुरा जातो.'

माथन (क्रि.) मातीचे मोठे भांडे. 'संक्रातीचं सुगळ्याचं वान म्हनून दिलेली मडकी, घरी विकत घेतलेली **माथन** असा खापराच्या भांड्यांचा भरना जास्त होता.' -सुखो.६.

माथनी (स्त्री.) माठ. 'रांजणी अथवा **मांथणीसी** सुर्याचेया चक्रीचे बींब देखेतिः' -गोवि.२६०. 'बारीक तांदुळ ठेवले **माथनीत'** -लोक.५१. '**माथनीतल्या** पाण्यानं कौतिकनं पाय ओलावले.' -धग.७१.

माथा (पु.) १. उंच, शीर्षभाग. 'सकाळपासून दिवस **माथ्यावर** येईपर्यंत धुणं धुणाऱ्या बायांची झुंबड गर्दी असती.' -पख.४८. २. कपाळ. 'उपाधीयेहो! गुंडाचा **माथां** होउनि प्रकासु नीगतु असेः' -गोवि.४. 'उगियाचि **माथा** ठेविजे चरणीं। हेंचि भलें।' -ज्ञा.१०.१५. 'वागविला **माथां** नसतां चि भार। नव्हे तें साचार जाणील तों॥ -तुका.३५०५. 'होते गाठी तें सरलें येतां। आणीक **माथां** रीण जालें॥' -तुका.१२०२. 'बाकराच्या **माथ्यावर** तितऱ्या रंगाचे ठिबके.' -डेबू.३. २. चढत जाणारा भाग. '**माथा** लागला का बैल बंडीले येनाटतात मंगसन्या सेनाची ऊट भारी जाते.'

माथी (न.) डोक्यावर. 'मी दुपारी सोसले ऊन **माथी**, ऊन माथी रे.' -शि.३५.

मादगी (पु.) चाकर जमात. 'जांभयीचे डालं घेऊन खासरं येत होते. **मादगी** तयार होते.' -दि.७.

मादरचोत(द) (वि.) एक शिवी. 'भीमा एकदम चवताळला ऊस **मादरचोतके** बच्चोको मै देखते बैठा क्या?.' -धग.११९. '**मादरचोद**, आता कुठं जातं ते मी पाह्यतो.' -झिं.९३. (मात्रागमनी,फा.मादर,हि.चोदना)

मादा(दी) (स्त्री.) स्त्री जात. 'मुंगी असो का मानूस देवानं

मादी नर असा जोळा तयार केला.' (फा.मादहा, मादीन)

मादावनं (क्रि.) मादक होणे. 'वसंताच्या उन्मादक वैभवाने सभोवतालचे सारेच वातावण **मादावले** होते.' -कात.१४.

माधोगिरी (स्त्री.) भिक्षांदेही. 'पंढरपुरात जाऊन **माधोगिरी** मांगून देवधरम शिकला.'

मान टाकनं (क्रि.) मरणे. 'पायतापायता बुढ्यानं माया मांडीवरच **मान** टाकली.'

मान (पु.) १. आदर. 'नंदी आला घरा, त्याचा आदर **मान** करा.' २. प्रमाण. 'जुन्या काळात पावसाचं **मान** खूप होतं. आता पाव्हण्यासारखा येतो अन जातो.' -पख.३३.

मानगी (स्त्री.) आजारी. '**मानगीत** तुमी किती रातरात जागोलं.' -धों.३५. 'एका जागी बसून राय मुकामुका. तुही **मानगी** गेली नाही अजून.' -डेबू.८.

मानजाळं (पु.) बैलाच्या मानेवरील जुवाची चौकट. 'पऱ्हाटीतल्या भडाच्या धांड्याला ताशा हाणताना **मानजाळाचा** धक्का लागल्यानं तो बराच वेळ हेलकावत राह्यला.' -खुं.६१.

मानता (स्त्री.) मान्यता, श्रद्धा. 'लोकाईची **मानता** असते देवाधरमावर म्हनून करतात नवससायास.'

मानदार (वि.) प्रतिष्ठित. 'गावात पांडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख असे दोन **मानदार** आहेत.' -रा.८.

मानना (स्त्री.) समजूत, मान्यता. 'सनवारी नारय फोळ्ळं तं मारोती पावते असी लोकाची **मानना** आये.'

मानपान (पु.) आदर, सन्मान. 'गाडीचा बसणेवाला आला माह्या घरी पायी/ माह्या बावाजीला बाई **मानपान** गर्व नाही.' -लोक.५४.

मानभाव (पु.) महानुभाव. 'रिधपुरले **मानभावाची** मोठी जत्राच भरत असते.'

मानमरातब (पु.) प्रतिष्ठा, मान, आदर. 'जमाना बदलला. पहिल्यासारखा **मानमरातब**, धाक राहिला नाही.' -पख.६९.

मानमोया (पु.) अनमान. 'दिवलीतल्या वातीले तेलाचा **मानमोया/** रुसू नका दिवाकरा लक्शमीचा काना डोया' -नोका. 'वयरी होते तेबी दरशन घेया आले. **मानमोयाचे** कळूमळू दोन शब्द झाले.' -पाहु.

मानमोवा (पु.) अनमान. 'काय बाई लडत, **मानमोवा** करतं?'

मानमोळी (स्त्री.) १. पळसाच्या पानांसोबत कुसाचे गवत असलेले बैलाची पूजा करण्याचे साधन. २. मान धरणे, सुजणे, वाकडी होणे असा एक व्याधी. 'एका वर्षी भंडारवाडीवर **मानमोडीची** साथ आली होती.' -भं.३.

मानमोळ्या (वि.) लुबाडणारा, फसविणारा. 'लक्शीमन **मानमोळ्या** हाय. सख्या जवायाले फसवून आपलं घर भरलं.'

मानलं (क्रि.रूप.) १. मानवले. 'खोटं नाई काई. कयसाचं पानी **मानलं** तुमाले.' -ना.६२. २. मान्य केले. 'एवढं मोठं बिकट काम तुया केलं, **मानलं** गळ्या तुले.'

मानवाईक (वि.) मान्यवर. 'जेवढ्या जास्त मळक्या व वळीदार कोट उपरण्याचे, ते तेवढे अधिक **मानवाईक**.' -मोती. 'अशा मामुली मान्सानं **मानवाईक** मान्साचा अपमान करावा ही काही साधी गोष्ट नव्हती.'

मानी (वि.) स्वाभिमानी. '**मानी** हाय तो. आवतन नाही देलं तं आता येतच नाई तो जेवाले.'

मानी (पु.) जात्यात भरडताना वापरावयाचे गोल कडे. 'जात्यावर **मानी** ठुली की पीठ बारीक पळते.'

मानूस (पु.) माणूस. 'कसा झाला हा **मानूस** कळू निंबाचा रे पाला.' 'असं मस्त गुंगतं **मानूस** मस्त, डावला झाल्यावानी वाटते.' -निशा.९४.

मानोनं (क्रि.) मानवणे, अंगी लागणे. 'सासरचं खानंपेनं **मानोलं** पन जवायाले.'

मान्गी (स्त्री.) आजार. 'अवधूत काय **मान्गी** पळला काय?' -पागो.९.

मान्नं (क्रि.) मानविणे, लाठी लागणे. 'अन्न **मान्नं** ना **मान्नं** खायावर रायते बॉ.'

माप (न.) मोजण्याचे साधन, प्रमाण. 'तुका म्हणे जिव्हाश्रवणाच्या द्वारे। **माप** भरा वरे सिगेवरि।' -तुका.१४७०. 'म्हणे सिगे भरू आले **माप**। विद्वेग संताप झाला तुझा॥' -तुका.१९४. (का.मापु)

मापनं (क्रि.) मोजणे. 'लोक मतलबी झाले अन् ताकबी **मापनं** सुरू झालं.'

मापलं (सर्व.) माझे. '**मापलं** मापलं केलं अन् चोरानं गाठोळं नेलं.'

मापलं (न.अने.) मातीचे बुटले. 'दिवाईले **मापलं**, उजयन्या डजनडजन आनल्या इकत.'

मापली (सर्व.) माझी. '**मापली** बायको येळीभोळी/ शेवयासंगं वरपते कळी.'

मापाई (स्त्री.) मोजणी. 'हर्रासी झाली राजे हो आता **मापाईले** चार वाजतात का पाच वाजतात.'

मापारी (पु.) माप करणारा, मोजणारा. 'ज्याचे तोचि जाणे। मी मापाडे तुका म्हणे।' -तुका.९४६. 'कांदा बजारात **मापाऱ्याईचा** संप सुरू आये.'

मापासी (सर्व.रूप.) माझ्याजवळ. '**मापासी** धन नाई असच

सबन पोरीवाले टेंभलत असतात.' -सित.११७.

मापू(फू)ल (न.) मातीचे बुटले. 'मायबापाच्या रांजणातून सासरच्या **माफूलभर** वैभवात आपण येऊन पडलो.' -गा.१९.

मापेल (वि.) मोजलेले. '**मापेल** नोटाईत येक नोट कमी भरली म्हनजे काय झाली वऽऽ सूनबाई.'

माफक (वि.) अल्प प्रमाणात. 'आपल्याजोळ **माफक** रायते. लागलं तं अगोदर सांगजा.'

माबाई (संबो.) एक स्त्री संबोधन. '**माबाई**, आपून नाई पायलं असं लगन व्हाचं हाय अन् जवायासंग पोरगी फिरालेबी जाते.'

मामलत (स्त्री.) दौलत, संपदा. 'कोणत्या मांगाजवळ पाचदहा एकर जमीन आहे? दुसरी **धनमामलत** तरी आहे का?' -वा.६६. (अर.)

मामला (पु.) गोष्ट, भानगड. 'कारे काहून लोकं जमले? काय **मामला** हाय?' (फा.)

मामसासरा (पु.) पती वा पत्नीचा मामा. 'सकाऊनच सासूबाईले **मामसासरे** आले न्याले.'

मामसासू (स्त्री.) पती वा पत्नीची मामी. 'लुगळ्यावाली बाई ना? माई **मामसासू** होय.'

मामा (पु.) आईचा भाऊ ह्या नात्याने. 'लग्नाची वेळ झाली नाही होऊ द्यानं/ पाठी **मामा** येऊ द्यानं.' '**मामा** म्हने भाचे बॉ. तुमीच व्हा राजा आमचे जवाई बॉ.' '**मामापुढे** टाकलं गवत, भासा बसला झवत.' (का. माम)

मामाजी (पु.) सासऱ्यासाठी वापरावयाचे संबोधन. '**मामाजी**, जेवन करून घ्या ना? ते आले का तेईले वाळा लागीन अजूनसन्या.'

मामी स्त्री. मामाची पत्नी. 'कामी ना धामी, मुक्या बसा **मामी**.' (त.अम्मामि)

मामु(मो)जी (पु.) उंदीर. 'भीताळाईनं भलकसा उकीर काहाळतात **मामोजी**.'

मामुली (वि.) सामान्य, क्षुल्लक. 'चारचिल्यापिल्याले मजुरीवर पोसनं **मामुली** गोठ हये का?' -रा.३३.

माय (स्त्री.) आई. 'आवो! आवो! राउळीं लेंकरुवासि जतन केली असेः राउळ माएः' -गोवि.७. 'म्हणे **माए** बळिए पाए देवकी रोहिणी सुभद्रा चाले रळींयाः' -धउ.२७. 'असी कायी माती माही साता जलमाची **माय'** -काया.२.

मायं (सर्व.) माझे. 'आजकाल **मायं** पोरगं, माई पोरगी झाला गोतावळा. ना कोनी मामा ना मावसा.'

मायआंग (न.) गर्भपिशवी. 'म्हैस जनली का तिचं **मायआंग** भाईर येते.'

मायआज्या (पु.) आईचे वडील. 'लेकराच्या **मायआज्याहून** बापआज्यानं जास्त देवाव का?' -रा.२०८.

मायकूस (स्त्री.) ओटीपोट, सृजनकेंद्र. 'वऱ्हाडी बोली ही मराठीची **मायकूस** आहे.' -वि.

मायगन (न.) १. मळ्यातील भाजीपाला. 'भावाले निरूप धाळला **मायगन** इकनाऱ्या किसनाच्या हातानं.' -सित.६५. २. माळी समाजाचा वेटाळ. 'आपलं घर गेलं, का पुढे **मायगनच** लागते.'

मायगोटा (वि.) कुत्सितपणे माळी. 'शामराव पाय कसा भाजी इक्याले बसाला तं **मायगोट्यावानी** दिसून रायला.'

मायघर (न.) आईचे घर, जीवाभावाचे घर. 'आपघर ना बापघर, खरं एकच **मायघर**.'

मायचा मी तं (वि.) एक शिवी. 'तुह्या **मायचा मी त**, दाखवू का तुले नाक खुपसनं कसं असते ते?' -पख.२२.

मायची हांडी (स्त्री.) स्त्री योनी. '**मायच्या हांडीचं** राजकारण करते. गब्दडीच्यानं सरपंच व्हयासाठी या बटक्या लोकाइयले उरावर बसवून घेतलं.' -पख.१३.

मायची तं (वि.) एक शिवी. 'मुकी तुह्या **मायची तं** म्हणून पुनः तिच्या पाठीत दणके घातले.' -रा.१११.

मायझवा (वि.) एक शिवी. 'तुका म्हणे निंदे संताची मर्यादा। तोचि निंदा **मायझवा**।' -तुका.८३०.३. '**मायझवा** खर गाढवाचे बीज। ते ऐसे सहज कळो येते।' -तुका.३०१७.

मायंदळ (वि.) भरपूर. 'पीक अता **मायंदळ** लक्ष्मी बसल्या घरी.' -भीक.११२.

मायना (पु.) अर्थ. मजकूर लेखन. 'डिगूनं पत्रिकेतला **मायना** वाचून दावला.' -सित.१७. (अर.मअना)

मायपोटं (न.) आईचे गर्भ, घर. 'पन तो सबन **मायपोटीच** सिकून आला असं आमाले वाटे.' -सित.१२२.

मायची मी (वि.) एक शिवी. 'बायको बेमानी करून राह्यली आपल्याशी **मायची मी** बेमान!' -अंधा.

मायबाई (स्त्री.) आई, स्त्री संबोधन. 'तू माया **मायबाईले** सांग समजून मंग आईकीन.' 'काय **मायबाई** तुयाई मायासंगं असं करावं का?'

मायबाप (पु.) आईवडील. 'जैसा स्वभावो **मायबापांचा**।' -ज्ञा.१.६४. '**मायबापासी** टाकिले। ध्यान देवाचें लागलें॥' -नाथ.१२८३. '**मायबापाची** सेवा संतती ना करीन तं मंग कोनं करावं?'

मायबोडी (वि.) एक शिवी. '**मायबोडीनं** तेच केलं व्हतं, पोरगी कशी मांघं राहील?' -पख.१०७.

मायमका (पु.) आईसारखा निवारा. 'आत्याबाई तुमी माई **मायमकाच**. हा तुमचा आसरा लाभला तं मले गंगन

भेटलं.' -लेक.२८.

मायमाजे (संबो.) माझे आई. '**मायमाजे**, आता काय तुले डोक्स फोळून सांगू. तुया पोरगा दारू पिऊन पळ्ळा गटारात.'

मायरूख (न.) महारूख, एक वृक्ष विशेष. '**मायरुखाचं** लाकूड बॅट कऱ्याले वाळ्या जोळ नेलं.'

मायलेक (स्त्री.अने.) आई आणि मुलगा. 'लगना तुमी नोतं या लागत काय बाबूराव. फक्त **मायलेकाले** पाठून देलं?'

मायहरने (संबो.) एक संबोधन. 'त्याचं असं हाय **मायहरने**, आमा जुन्या मान्साईले हाय पायी चालाची आदत. कोन येस्टीची वाट पायत बसीन?' -लेक.८१.

माया (सर्व.) माझ्या. 'आता **मायाकून** चालनं होत नाई म्हनून. नाईतर मी काय बस्सर जात होती व तुमाले.' -ना.९८.

माया (स्त्री.) १. प्रेम. 'कवण तो शत्रु मैत्रु **माया** करीति अविद्या हे स्वप्नः' -धऊ.९. 'हे सकळ तुझी **माया** भुललों पंढरीराया।' -नाथ. 'उगीच वरवर **माया** अन् चालली जीव देया.' २. धनसंपत्ती. 'कवळी कवळी **माया** जोळी.' (फा.)

मायाअठुल्ला - माझ्या येथील. 'आताच तं बाप्पूनं जेवारी आनली मीच कुठी जेवलो **मायाअठुल्ला** तं सयपाकच हुयाचा आये.' -लेक.५१.

मायाऊ (वि.) मायाळू. 'कासाबुडी लय **मायाऊ**. लेकराचा लाडबी करे अन् खाऊबी घाले.'

मायांग (न.) गर्भपिशवी. 'मंग म्या संघटनेतून काढलं आंग/ लोक म्हने काहून पडलं काय **मायांग**.' -मिर्झा.१४१.

मायालं (सर्व.) माझे. 'खन्तीपायी **मायालं** सारं आंग ठनकून रायलं.'

मायी (सर्व.) माझी. '**मायी** बायको भलकशी कळोती. घरचं करून वावरातबी जाते.'

मायी (पु.) माळी- एक समाज. '**मायी** माजला की केईले गांड पुस्ते, पाटील माजला की पदराले तोंड पुस्ते.'

मायीन (क्रि.रूप.) मावेन. 'कोठ्यात कुटार **मायीन**. आना तं खरं तुमी.'

मायेना (क्रि.रूप.) मावत नसे. 'असा कसा पायना? आगासी **मायेना**.' -काया.८.

मारकं (वि.) मारणारा. '**मारकं** ढोर कोनी खुट्यावर नाई ठूत बातन्याबात गुल करते.' (फा.)

मारकंडी (वि.) मारणारी. 'हे बायको म्हंजे **मारकंडी** म्हसाड पदरात पडली भोसडीची.' -निशा.२०.

मारकुंडं (वि.) मारणारे. 'पंधरा हजार मोजून हे ठेंगणं तिरप्याचालीचं, **मारकुंडं** जनावर आणलं.' -पोळा.

मारजो (क्रि.रूप.) मारशील, टाकशील. 'बायकोले म्हने वावरात चक्कर **मारजो**/ संध्याकाई धुऱ्यानं बैलं थोडे चारजो.' -जांग.४०. 'गन्या दिसला त साजरं टेम्प्यानं **मारजो** त्याले आता.'

मारफत (वि.) द्वारा, तर्फे. 'धोरनी मान्साच्या **मारफत** सोयरिक व्हाले पायजे.' (अर.फा.)

मारमुंधाड (न.) मार, चोप. 'लोकाईनं थोडंस **मारमुंधाड** केलं. पोलिसानं धरून ठाण्यामंदी नेलं.' -ऊ.८८.

मारवाळी (पु.) राजस्थानातील **मारवाड** प्रदेशातून आलेला धनिक समाज. 'एवढी मिजास होती त **मारवाड्याच्या** पोटी जल्मा लागत होतं.' -धग.५.

माराकु(पि)टी (स्त्री.) मारामारी, भांडण. 'कोनोड्यात पालवात बांधली हुई डबी सापडली तवा कुठी हे **माराकुटी** बंद झाली.' -हज.४८. 'पैशांसाठी **मारापिटी**। करिती कोणी' -ग्रा.१४.६८.

मारायले (क्रि.रूप.) मारीत आहेत. 'पुंजादा दारून हाका **मारायले** अन् मी त्याह्यले आलीआली म्हनायली.' -पख.१७.

मारू (क्रि.रूप.) पाडू, घालू. 'महादेव खांबाला चऱ्हाटाची बैलगाठ **मारू** लागला.' -धग.८४.

मारे अ. आवेशाने. 'आपून **मारे** दनके घेतो अन् पिकल्यावर मातीमोल इकतो.'

मारे (क्रि.रूप.) मारत असे. 'म्हैस येताजाता लोकाईले **मारे**. इकली सायाची बस्तरवारच्या बजारात.'

मारेल (स्त्री.) एक गवत. 'मुंगात **मारेल** झाली. कापूकापू ढोराले टाकली.'

मारेल (क्रि.रूप.) मारलेला. 'हाच बैल मले **मारेल** हाय.'

मारोती (पु.) हनुमान, गावसंरक्षक क्षेत्रपाळ देवता. ही वृषाकपी देवता आहे. तीर्थसिंचन करणारी. वीर्य प्रदान करणारी. लग्नमंडपात जाण्याआधी नवरदेव **मारोतीच्या** पारावर जाऊन दर्शन, आशीर्वाद घेतो. वीर्य याचना करतो. 'राघो नवरदेव **मारोतीच्या** पारावरी/ सोन्याची अब्दागिरी मामा धरे भाच्यावरी.' 'गावभर फिरलेला काकडा शेवटी **मारोतीच्या** देवळावर येतो.' -काळी.६१. 'गाव जयते, मारोती चीत पायते.'

मारोळा (पु.) १. महारावाडा. 'सकाय आखीन **मारोळ्यातले** रोजदार आनतो दहापंधरा.' -भं.३७. २. गाजावाजा, गोंधळ. 'पंद्रा दिसापासून सबन **मारोळा** माजला गावाम्दी. तुमच्या मौतीराचा.' -सित.६५.

मान्या (पु.) मोठी कंचाळी. 'कांच्या हायत मायाजोळ **मान्या** नाई.'

मान्याले (क्रि.रूप.) मारायला. 'माह्या नाताले **मान्याले** सरका झालता तो पोरगा.' -गय.

माल (पु.) द्रव्य, वस्तू. 'शेतकऱ्याचा **माल** खंडीनं येते, मोंढ्यात जाते, मालामाल मात्र दुसराच होते.' (अर.)

माल(ली)क (पु.) १. स्वामी. 'या इस्टेटीचा **मालक** मीच आवो आता.' २. पती. '**मालक** गावा जायेल आयेत. येतीन सकाय.' (फा.अर.)

मालकीन (स्त्री.) मालकाची पत्नी. '**मालक** घरी नोते मालकीन जोळून उसनी आनली शंभरी.'

मालजादी (वि.) धनावर टपलेली. 'हे **मालजादी** माया नवऱ्याचं घर निंगतो म्हंते पमीकडे हात दाखोत बुडी बोल्ली.' -सित.६६.

मालटाल (पु.) धान्य वगैरे. '**मालटाल** ठुयाले घर नोतं म्हनू कोठं बांधलं.'

मालत्या (स्त्री.अने.) रव्याचा आठ आकड्यासारखा पदार्थ. 'गव्हाच्या वाटोळ्या **मालत्या** करण्याकरिता मानाच्या चुलत्या केव्हाच आल्या होत्या.' -कात.३५७.

मालदार (वि.) श्रीमंत. 'कालच्या उकीरड्याची दशा पालटून आज तोच मोठा **मालदार** बनला आहे.' -कात.५०६. (फा.)

मालधनी (पु.) संपत्तीचा, मालाचा स्वामी. 'भूमि पुत्रा नाममात्र **मालधनी**, तुला विचारत नाही कोणी.'

मालन (स्त्री.) तरुणीचे लाडिक संबोधन. '**मालनी** व **मालनी** माया जीवाच्या सजनी, तुले कसं सांगू बैना.' -वि. 'जावया बापुजीला गावा घोड्यावर जाणं, बसे मेण्यात **मालन** लाल पडदे सोडून.' -लोक.५९.

मालपानी (पु.) पैसाअडका. 'सासऱ्याच्या घरी **मालपानी** भेट्टे म्हनूनच जवाई चकरा मारते, मामाजी मामाजी करते.'

मालपुवा (पु.) मिष्टान्न. 'जळे घरात दिवसा दिवा, अवदिसीच तो **मालपुवा**, आज उपाशी जाळते जीवा' -भीक.३७.

मालमत्ता (स्त्री.) संपदा. '**मालमत्ता** कमावाले हाळाचे काळं करा लागतात.' (फा.अर.माल ओ-मताल)

माला (सर्व.) माझा. '**मालाच** काय पन पुऱ्या सोनगावाचा तो मैतर व्हता.' -सित.८५.

मालामाल (वि.) समृद्ध, संपन्न, भरपूर. 'लाटली लागीन तं **मालामाल** होसीन बापा तू.' (अर.फा.)

मालीश(स) (स्त्री.) मर्दन. 'लान लेकराची तेलानं **मालीश** कऱ्याले मांगीन येत जाय.' (फा.)

मालुमात (स्त्री.) माहिती, पारख, ओळख. 'खरी मानसाईची **मालुमात** आपल्यालेच हाय.' -दि.६२. 'च्या झाल्यावर त्यायनं त्यायची सर्वी **मालूमात** करून देल्ली.' -जटा.४४.

मालूम (न.) माहीत, ज्ञात. 'आयाबायायच्या तोंडून बना बुडीले हे गोठ **मालूम** पळली.' -सित.७६. 'सोनायाचा रस्ता मले **मालूम** हाय.' (अर.फा.)

मालोनं (क्रि.) विझविणे. 'कां प्रभा जाय दीपें। **मालवलेनि**॥' -ज्ञा.१५.२२८. 'मले झप नाई येऊन रायली. तेवढा दिवा **मालोनं** व बाई.'

मावं (सर्व.) माझे. 'काटीत अडकल्यानं **मावं** कमीजच फाटलं सायाचं.'

मावंदे (पु.) तीर्थयात्रे नंतरचे जेवण. 'बाइः मार्कंडु एथ **माउंदी** न करी? ''बाबा काइसेन करील? बापडे नागवलेः' -ली.२२७. 'बापूजी पंढरपुराहून आले ते उद्या थाटात **मावंदे** करणार आहेत.' -कात.१४६. (का.मावने)

मावचा(च्या) (पु.) झाडावर बांधलेली बैठक. 'नातरि संहार ते जाचिया ज्वाळा। तोडोनि **माचु** बांधला अंतराळा।' -ज्ञा.९.३०२. '**मावच्याऊन** वावराची राखनी साजरी होते.

मावत (क्रि.रूप.) सामावत. 'मेंढरासारखे लोकं भरले दवाखान्यात, **मावत** नोते तं मैदानात नेऊन बसोले.'

मावद (न.) घराचा मधला भाग. 'पानी पळते मोठ्या थेंबाचं/ **मावद** गळते बत्तीस खांबाचं.' -लोक.७१. '**मावद** मोठे घर पुढं वसरी/ तारांची आत बैठक सख्याची.' -लोक.२. 'मग गोसावी बीजे करिता तीनि वेळ **माळवधा** आतु गेलेः' -ली.२०.

मावनं (क्रि.) १. सामावणे. 'त्रैलोक्यांत जो न माय।' -नाथ.१५. २. मावळणे, अस्तास जाणे. 'दिवस **मावल्यावर** अंधारात झळ्यापळ्या कोन देईल.' (का. मडगु)

मावलं (क्रि.रूप.) सामावले. 'एवढं पीठ तं या डब्ब्यातच **मावलं** व.'

मावली (स्त्री.) १. आई. 'फुलवल्या कापसाले चंद्र चोरूचोरू पाहे/ तरी माय **मावलीची** मांडी उघळीच राहे.' -काया.२८. २. स्त्रीचे संबोधन. 'जानं **मावले**, काहून डोक्सं खातं माहा इनाकारन.'

मावसभाऊ (पु.) मावशीचा मुलगा. 'जी जीः हा मज **माउसभाउ** होएः उठिः मज खेव देः' -ली.२६७. 'मावशीचा लेक **मावसभाऊ** येते/ दिवाईले येते चोई बुगळ्याची घेते.'

मावसा (पु.) मावशीचे पती. 'तुया ढोराईनं पऱ्हाटी खाल्ली तं कोन्ता तुहा **मावसा** भरून दीन.'

मावसी (स्त्री.) आईची बहीण. 'वरीखा दीसा मातापीता अपरोक्ष जालीः मग मामेनि **माउसीया** वाढविलेः' -गोवि.१. 'माय मरो अन् **मावसी** जगो.'

मावालं (सर्व.) माझे. 'आता तरी आयका **मावालं**, नुसत्या अवशदावर नोका बसू झोका असा लावून.' -पोळा.

मावाला (सर्व.) माझा. 'गोपा शाळेत गेला की इकळे **मावाला**, माल्या जिनगानीचा पंचनामा झालाच समजा.' -सित.८५. 'दत्तू नानाचा गोपा **मावाला** जिगरी मैतर.' -सित.८५.

मावेना (क्रि.रूप.) मावत, सामावत नसे. 'पुंजाही आज आपल्यासारखाच धट झाला, हे पाहून तिचा आनंद पोटात **मावेना**.' -पख.१०.

माशी (स्त्री.) मक्षिका. 'अन्नजाता न सुये तोंड। **मासिये** जेवी॥' -ज्ञा.१७.१९२. 'घ्या पटकन च्याहात **माशी** पळीन.'

माशूक (वि.) प्रेमपात्र. 'बगीच्यात संध्याकाई सारे **आशुक** माशुकच बसेल रायतात.' (अर.मअशुक)

मास (पु.) महिना. 'तीयेसि तीयेचि दीसी गर्भसंभुति जालीः नवा **मासा** तोः' -गोवि.९१. 'अधिक **मासात** माहे उपास असतात.'

मासकंड (न.) मासाचा तुकडा. 'मटन येवळं महाग हाय का कुत्र्याले येक **मासकंड** टाकोल्या जात नाई.'

मासऱ्या (स्त्री.अने.) मासळ्या. 'बाप दारू पिऊन आला की मटन **मासऱ्यावर** तुटून पडे.' -अंधा.

मासला (पु.) नमुना, वानगी. 'भगवान पाटलाच्या बैठकीत चाललेल्या गप्पाही वाडासान, घोडासान याच **मासल्याच्या** होत्या.' -वा.६२. (फा.अर.)

मासा (पु.) आठ गुंजांचे वजन. 'तब्येत पाय कसी **तोळामासा** हून गेली त्याची.' (फा.माशः)

मासाळ (वि.) मास असलेला, मांसल. 'त्याने दोन काठ्या त्याच्या **मासाळ** माठीत मारल्या.'

मासाळनं (क्रि.) अंगावर मास होणे. 'बकरी बरीच **मासाळली** आये. तिच्या अंगावर तकतकी आली आहे.' -खुं.२३१.

मासुंडनं (क्रि.) अंगावर मास येणे. '**मासुंडलेल्या** न फळणाऱ्या म्हशी लोक कोळ्याकडे पखाल वाहण्यासाठी देतात.' -पख.३४.

मासुळ्या (स्त्री.) मासोया. 'भोयाचे पोरं डव्हात **मासुळ्या** धरून रायलते.'

मासूम (वि.) निरागस. 'अशा **मासूम** लेकरावर भलतच तुफान घेता का राजे हो?'

मासोंडनं (क्रि.) लठ्ठ होणे, मास येणे. 'एके पीनावयव **मांसाळे**। एके शुष्के अतिविक्राळे॥' -ज्ञा.११.१३९. 'आपल्या नफ्यावर मुंगावानी **मासोंडले/** पुंजा आपली नारय तेईनं फोडले.' -जांग.१०१. 'पिकला आंबा खाऊनखाऊन खालच्या जमातीही **मासोंडून** जात.' -मोती. 'मुंग चांगला **मासोंडला** आता.'

मासोंडेल (वि.) लठ्ठ झालेले. 'निरवासी म्हनजे खाऊखाऊ **मासोंडेल** मान्स.'

मासोई (स्त्री.) मासोळी. 'नदीतली **मासोई** पकळ्ळी का टाकलीच टोपल्यात.'

मासोळ (न.) माश्यांची अधिक संख्या. 'गोळ खाल्ल्यानं घरात **मासोळ** झालं.'

मासोळा (पु.) महिना. 'पहिल्या मासी पहिला **मासोळा/** गर्भ नारीचा रंग पिवळा/ दहाव्या मासी आल्याली कळा.' -सित.

मासोळी (स्त्री.) स्त्रीचा दागिना. 'पायाच्या बोटात चांदीच्या **मासोळ्या** व हातात पाटल्या. कपाळी पैशा एवढं कुंकू.' -कात.७९.

मास्तर (पु.) गुरूजी. '**मास्तर** शाळेत कमी अन् वावरात जास्त रायते पठ्ठ्या.' -निशा.४१. (इं.)

माहं (सर्व.) माझे. '**माहं** वावर तयार हाय. फक्त पानी पळ्याचा अवकास हाय.'

माहवारी (स्त्री.) महिन्याच्या बोलीने. 'सालानं नाई जमत, **माहवारी** रायतो म्हन्सान तं.'

माहा (सर्व.) माझे. 'तुले सोडणार नाही. काय करसाल **माहा** -पख.७०. 'माहा कोनी गुरू नाई **माहा** कोनी चेला नाई.' -ना.६५.

माहारवाडा (पु.) महारांची वस्ती असलेला वेटाळ. 'गोसावी **माहारवाडेयासि** बीजे करीतिः उतरडी उतरीति.' -गोवि.४६.

माहारोग (पु.) कुष्ठरोग. 'तुमते **माहारोग** न बधीति की गाः' -ली.४१८. 'गाळगे बाबा **माहारोग्याईची** सेवा करत असत.'

माहावारी (स्त्री.) महिन्याच्या बोलीने. 'मी वाळ्यात काम करतो ते **माहावारीच** करतो.'

माही (सर्व.) माझी. 'झालंगेलं त्यात **माही** काहीच चूक नाही.' '**माही** चप्पल कोनं तरमा लांबोली राजा.'

माहीर (वि.) प्रसिद्ध, ख्यात. 'बेईमानी करण्यात **माहीर**, नंबर एकचा वस्ताद आहे तो.' -पोळा. (अर.)

माहूल (न.) एक वनस्पती. '**माहुलच्या** वेलीची नि पळसाच्या पानाची पत्रावळी तो तयार करी.' -झेल.९.

माहे (सर्व.) माझे. '**माहे** पैसे कई देतं ते सांग मले.' '**माहेवाले** बैलच कोन सोळून नेले.'

माहेर (न.) स्त्रीच्या आईवडिलांचे घर. 'मी आपुलेया **माहीयरा** जाती असेः के असे तुझे **माहीयर**? रीधपुरीः' -गोवि.१५६. '**माहेरी** देशमुखी घरी तुझ्या पाटीलकी/ नको निघू एकाएकी.' -लोक.७३.

माह्या (सर्व.) माझ्या. '**माह्या** वावरात तिफनकरी किस्न,

उनाऱ्याले पारबती.'

माह्याकून (सर्व.रूप.) माझ्याकडून. 'येतीन लय गुण्या होईल **माह्याकून** पेलनं.' -नोका. '**माह्याकून** हे असं काम होनं नाही.'

माह्यालं (सर्व.) माझे. 'इवा तुमाले लागते मनं **माह्यालं** कापते.' -चंच.२६.

माळरान (न.) मोकळे, नापिकीचे पठार. '**माळरान** वर **मुरमाळ** जमीन सारी खळकाळ' -भीक.३६.

माळवद (न.) घरातील आतला भाग. '**माळवद** असं जुनाट झालं म्हणून पाटलांनी खालचं घर बाधलं.' -मोच.३९.

माळा (पु.) १. मजला. 'दोन **माळ्याचं** मकान आये मामाचं.' २. माच. 'निंबावर राखनीसाठी **माळा** बांधा लागन.' (का.)

माळी (पु.) बागाईत करणारी एक जात. 'आणि पाणिये प्रयत्ने **माळी** अखंड जचे झाडाफुळी।' -ज्ञा.१८.८४४. '**माळियें** जेउतें नेलें। तेउतें निवांतचि गेलें।' -ज्ञा.१२.१२०. (का.)

माळी (स्त्री.) १. कोजागिरी पौर्णिमा. '**माळीभोळनीच्या** राती तुले फुगळी जमेना.' -वि. २. घरावरील मजला. 'काही पाव्हने खाली झपा काही **माळीवर** वधर झपा.'

माळीचोळी (वि.) दुमजली, धनिक. 'गुड्याले खार लावून घेतला व्हता पन पोरीले हे **माळीचोळीचं** घर पायलं व्हतं.' -लेक.१०.

माळीन (स्त्री.) माळी या समाजाची स्त्री. 'सेजा गावीचीया **माळीणीः** वांगीः गाजरेः भाजीः फुलेः ऐसे घेउनि येतीः' -गोवि.११.

माळीभोळनी (स्त्री.) माडीपौर्णिमा. '**माळीभोळनीच्या** राती तुले फुगळी जमेना/ जोळे अभायासी नातं माहा हाताचा पायना.' -काया.

माळोचा (पु.) राखणीसाठी चार खांब, ठुण्यावरील बैठक, मावंचा. 'जरी बांधला **माळोचा** दाट जवारीच्या आत.' -गाक.३३.

माळोद (न.) माळवद. 'होत्याचे नवते होऊन जाऊ आपूण **माळोदाच्या** ढिगाऱ्याखाली दडपून.' -खुं.२१०.

मांग (पु.) मातंग- सुखदुखःच्या प्रसंगी डफडे वाजविणारी हलकी समजली जाणारी एक जमात. ती शिंदीच्या फोकाचे टोपले, दुरड्या, फडे तयार करते. त्यांच्या अठरा जाती मानल्या जातात. मांग, मातंग, दखनीमांग, मांगमशी, मदारी, गारुडी, मांगगारुडी, चांभारमांग इत्यादी. 'हा मातांगुः याने अवघा गांओ वीटाळीलाः' -गोवि.७३. 'तेथ विभांडुनियां जग। आणिले पदार्थ अनेग। तेणें घालूं लागें **मातंग**-। गवादीसी तैसा॥' -ज्ञा.१७.२९९. 'आजि शिवला **मांग**। माझें विटाळलें आंग॥' -तुका.४२२८.

मांगं (अ.) मागे. 'ही नळ योजना आपल्या **मांगं** एखाद्या कैदाशिनीसारखी लागली.' -पख.४०.

मांगंमांगं (अ.) मागेमागे. 'असा **मांगंमांगं** काहून रायतं राजा पयनं जोऱ्यानं.'

मांगच्यामांग (क्रिवि.) मागच्या मागे. 'रामा जराभर संगं आला. मंग **मांगलच्या मांगच** पलटून गेला.'

मांगझवाळीचा (वि.) एक शिवी. 'अबे, **मांगझवाळीचे** हो. रुबाब कोनावर टाकून रायले बे तुमी?'

मांगटं (न.) मांग (तुच्छेतेने). 'त्या **मांगट्याचं** डफळं फुटलं वक्तावर. आता काय तोंड वाजोता आपून देईम्होरे.'

मांगटांग (स्त्री.) मागणी. 'जशा प्रकारचे पाहुणे येणार असतील तशा प्रकारची **मांगटांग** घराला गावभर करावी लागली.' -खुं.१३७.

मांगता (क्रि.रूप.) मागता. 'मी लान असूनबी माया जोळचे पैस **मांगता** काय राजा?'

मांगनं (क्रि.) मागणे. 'दलपतचं सदा न कदा हे ना ते काहीतरी **मांगनं** सुरूच रायते.'

मांगलं (क्रि.रूप.) मागितले. 'म्या तुले कई काई **मांगलं** व बाई सांग बरं?'

मांगलची (अ.) मागील. 'डिगुच्या **मांगलची** भोवाबहिनीची फौजबी म्होट्टी व्हत व्हती.' -सित.१७.

मांगलमेट्या (क्रिवि.) उलटपावली चालणे. 'बंडी **मांगलमेट्या** घ्याले बैल लय सुतावर पायजात.' '**मांगलमेट्या** चालनई एक कलाच आय भौ.'

मांगलरोजा (पु.) मागील दिवस. **मांगररोजा** तुनं पाडला होता ना बरव्हाडा कितीक रोज गेल्ता तो शाईत?' -धग.१३९.

मांगल्या (अ.) मागील. 'किती रे हा कायजीचा कळोता. आबाचा आबा असीन **मांगल्या** जलमात.' -सित.१३०. 'अवं, मी त्याईचाई उसना व्हयेल हाय. **मांगल्लेच** पैसे बाकी हायेत.' -फीर.११३.

मांगा(गो)ळ्या (वि.) मांगासारखा या अर्थाने. 'काय कपळेनतन घातले पायनं एखांद्या **मांगाळ्या** सारके.'

मांगीन (स्त्री.) मांग समाजाची स्त्री. 'मद्यभक्षण **मांगिण** जाती। विटाळ चित्ती सांटविला॥' -तुका.७८५.३.

मांगीन (क्रि.रूप.) मागणार. 'लागले वक्तावर पैसे तं मी **मांगीन** तुमाले काका.'

मांगुडा (पु.) मातंगाचा वेटाळ. 'आमच्या गावातबी एवढा पंचवीस घराचा **मांगुडा** पण एक पोरगं शाळेत जात नाही.' -वा.३९.

मांगून (अ.) मागून. 'म्हणौनि मागुती लोटीति आंणि चाक **मागुतें** वाजेः' -गोवि.९८. 'तू पुढे होय मी आलोच तुया **मांगून**.'

मांगून (क्रि.रूप.) याचना करून. 'धाबारा रुपये काकीजोळून **मांगून** आन बरं.'

मांगेल (क्रि.रूप.) मागितलेले. 'कालपासून बैलजोळी **मांगेल** हाय बाप्पूजीले वखरासाठी.'

मांगलदिसा - मागील काही दिवस. '**मांगलदिसा** पळूं अन् आता देली पान्यानं चाट.'

मांग्याले (क्रि.रूप.) मागायला. 'आपून **मांग्याले** जाव अन् त्यानं नाई म्हनावं केवढी पंचाईत मंग!'

मांघं (अ.) मागे. 'वासरू तं गाईले सोळतच नाई, **मांघं** मांघंच रायते तिच्या.'

मांघतात (क्रि.रूप.) मागतात. 'अबे, हे सरकारी कामं सुदे नसतात. ते भग **मांघतात**.' -पख.७०.

मांघनं (क्रि.) मागणे. 'आपूनच तर धाडलं त्याले धोंडी **मांघायले**.' -रा.८३.

मांघपुढं (अ.) मागेपुढे. 'गणानं जे केलं ते चुकीचं केलं गाववाले याचा डाव **मांघपुढं** काढल्याशिवाय राहणार नाहीत.' -वा.३११.

मांघल्लं (अ.) मागील. '**मांघल्लं** चित्रंगबी बरोबर पायजे. पोरीचा बाप तं दारू पेते म्हनतात राजा.'

मांघावं (क्रि.रूप.) मागावे. 'जोड्यालेच सुख **मांघावं** आपल्या. त्याच्या कष्टाले बरकत **मांघावं**.' -सेल.२४०.

मांजरं (न.) लोंबकळणारी आगोल बैलांच्या पायात अडकू नाही म्हणून वापरावयाचे साधन.

मांजरझाक (स्त्री.) सायंकाळ. 'पाय जरा झरझर टाका, पडली बघ **मांजरझाक'** -भीक.३६. 'दबकत अंधाराची पावलं पडू लागली. **मांजरझाक** व्हायला आली.' -डेबू.२६.

माजा (पु.) पंतगीचा दोरा. 'अस्सल **माजा** इकत आनला. पेच्या टाकल्याबरोबर पतंग काट्टे.'

मांड (क्रि.रूप.) १. रच. 'हे तुहे मापलं घरकुंडात नेऊन **मांड** बाई.' २. लिही. 'सुदामा याचे सात रुपये **मांड** रे.' -रा.४४. ३. मांडी. 'तुकारामची घोळ्यावर साजरी **मांड** बसेल आय.'

मांडगं (न.) बैलगाडीची मधातील एक पाटली. 'खुमटाचं खोळं टाकल्यानं **मांडग्याचा** तुकळाच पळ्ळा.'

मांडनं (क्रि.) १. लिहिणे. 'हिसापटिसाप लक्शात ठुल्यापेक्शा **मांडनंच** चांगलं.' २. रचणे, मांडणे. 'हे डब्बे एका रांगीन **मांडून** ठेवा.'

मांडना (स्त्री.) मांडणी, स्थापना. 'आसराईची **मांडना** कुठीसाई पान्याच्या जोळच असते.' -गा.६१.

मांडलं (क्रि.रूप.) १. सांगितले. 'म्या देवाजोळ कितीखेप गर्‍हानं **मांडलं** असीन तरमा तोबी झोपला का काय काजनं?' २. ठेवले.

मांडव (पु.) मंडप. 'मांडौ घालावा म्हणेः' -गोवि.२२४. 'सबन वऱ्हाळ या **मांडवात** मावून जाईन.'

मांडवस (स्त्री.) गुढीपाडवा. 'सनामंदी सन **मांडवस** भारी. पिवळापिंतांबर दारी उभरली गुढी' -व.१५४.

मांडवादारी (न.) लग्नप्रसंगी. 'आता **मांडवादारी** अन् तोरनादारी लेकबाईले तं आनाच लागते बापा.' -लेक.१३.

मांडा (पु.) भिजवले, ओलवले गहू दळायचे. बारीक चाळणीने काढलेल्या पिठाचा उंडा तीनचार तास मुरवून पालथ्या खापरावर पातळ **मांडे** शेकतात. 'तुका म्हणे किती ठकली बापुडी। नव्हा गाहे गोडी मांडे पुऱ्या॥' -तुका.४०५३.३. 'ऐन वक्तावर **मांडे** कसे करू ते का रोट्या करनं व्होय.' -वा.६७. (का.मंडिगे)

मांडी (स्त्री.) दोन पायाची विशिष्ट घडी करून बसणे. 'आमचेया गोसावीयासि श्रीप्रभूपुढा **मांडेखुंटी** आसन जालेः' -ली.३८. 'लगेच भास्कर **मांडी** मोडून कोलटेकनीवर येऊन बसला.' -गा.२४.

मांडे (पु.) पोळीसारखा पातळ एक खाद्य पदार्थ. 'मग गोसावीयासि बाइसी **मांडे** केलेः आंबे पीळिलेः वेळेवळाः रसु वाढवीतिः' -ली.४३०. 'आंबे माचो घातलेः मग आबैसे **मांडे** केलेः आंबे पीळीलेः' -गोवि.२२०. 'मग तीही वडेः **मांडेः** अमृतफळेः खीरिः घारीयाः पुरीयाः उंबरेः फेणियाः साकरमांडे खीरि ऐसा बरवा पदार्थु उत्तमु नीफजवीलाः' -गोवि.२४६. 'जेविल्याचा कैसा अनुभव अंतरी। म्हणता **मांडे** पुरी काय होते।' -तुका.२७१. 'रसासंगं जेवायले पोया, पातयरोट्या, **मांडे** काय न काय.' -डेबू.५५.

मांडेल (क्रि.रूप.) १. ठेवलेले, रचलेले. 'पुंजापातीचं सबन सामायेन देवऱ्यापुढे **मांडेल** आय.' २. लिहिलेले. 'तुया नावावर पन्नास रुपये तं आंधीचेच **मांडेल** आयेत.'

मांडो (पु.) मंडप, मांडव. 'जवा सासरी जाईन **मांडो** हुंदके देईन/ दाट्ठा उसासी घेईन' -नोका.

मांडोस (स्त्री.) चैत्रशुद्ध प्रतिपदा, गुढीपाडवा. 'रेणूकेलाही आता ह्या **मांडोसपासून** चौथं वर्ष लागणार होतं.' -एक.

मांदा (वि.) निस्तेज, फिक्का, दुय्यम. 'आपल्या बाहाळ्यापक्षे हा बैल **मांदाच** वाटून रायला.'

मांघारी (अ.) मागे. 'मी घरी नोतो. माया **मांघारीच** पावना येऊन गेला.'

मांधी (वि.) मंद, उरक नसलेली. 'कामाधंद्याले पोरगी

मांधीच दिसते गळ्या.'

मिचकोनं (क्रि.) डोळे बारीक करणे. 'डोये **मिचकोत** जबरदस्ती च्याचा कप तिनं कमलाकरच्या हाती देला.' -सित.१४१.

मिचमिच्या (वि.) बारीक डोळ्याचा. 'लेकरू मायवरच गेलं अन् डोये बापावानी **मिचमिचे** हायत.'

मिजमाशी (स्त्री.) पिकावरील एक रोग. 'हायब्रीडवर **मिजमाशी** पडलेली.' -मिर्झा.१६.१७.

मिजाईस (स्त्री.) आवडनिवड बघणे. 'कसंबसं खाले भेट्टे तं त्यातई हा मानूस **मिजाईस** करते.' (फा.)

मिजास (स्त्री.) ऐट, दिमाख, मिजाईश. 'गावाची येवळी **मिजास** मिरोता तर कहाले आले मंग या गावात राह्याले?' -फीर.२२२. 'अक्कल नाई कवळीची, **मिजास** करते गाळीची.' (फा.)

मिटकनं (क्रि.) गिळणे. 'कामधाम काई नाई करत अन् दिवस भर काईबी भेटो **मिटकनं** चालूच रायते.'

मिटक्या (स्त्री.अने.) चवीने खाणे. 'तुका म्हणे हाता चढे जीवाचिये साटी। **मिटक्या** देतां गोड मग लागते शेवटी॥' -तुका.२२८.३.

मिटनं (क्रि.) बंद होणे. 'लेकाचं लगन झालं का बापहो कसंबी वागा आपलं डोये **मिटनं** बरं रायते.'

मिटेलं (क्रि.रूप.) मिटलेले. 'आबाचे डोये तं **मिटेल** दिसून रायले, गचकला का बापा?'

मिटोनं (क्रि.) मिटवणे. 'गावातले भांडन तंटे **मिटोनं** काकाजीचं आवळीचं काम.'

मिटोयाले (क्रि.रूप.) १. मिटवायला, बदं करायला. 'डोये **मिटोयाले** सांग त्याले, आपच झप येते मंग.' २. पुसायला. 'फळ्यावरचं लेलं गुरजीनं **मिटोयाले** लावलं.'

मिटोलं (क्रि.रूप.) मिटवले, बंद केले. 'मंगास्री लय वातरत होता आता का बा तोंड **मिटोलं** राजा.'

मिठास (स्त्री.) गोडवा. 'भाईजीचं बोलनं पाय केवळं **मिठास** रायते.'

मिठ्ठू (पु.) पोपट. 'आता कोनी पिंजरा आनत नाई अन् त्यात **मिठ्ठू** कोंडत नाई.'

मिडकनं (क्रि.) आतुरणे. 'बाप झडीमधी सडकतो/ उलुस्यासाठी **मिडकतो**.' -झाहा.१५. 'घरची इतक्या वर्साची लेकरासाठी **मिडकायली** ते थोडीच दिसते तुमाले.' -पाटी.

मिनंमिनं (वि.) अंधूक. 'चिळी **मिनंमिनं** पेटली. कामापुरता अंधार दूर झाला.'

मिनतवारी (स्त्री.) आर्जव. 'जमिनीवर बिडी घासताना महादेव **मिनतवारीनं** पुटपुटला- मी काय म्हंतो.' -धग.१४

मिनता (स्त्री.) विनवणी, विनंती. 'लाखलाख **मिनता** केल्या पन ननद जियाले उठे ना.' -अक.६८.

मिनमिन (क्रिवि.) रेंगाळत- राहणे, तेच ते राटळा बोलणे. 'मनातलं सांगून टाका एकडाव उगीच **मिनमिन** कायले पायजे?' -धग.२.

मिन्त्या (स्त्री.अने.) आग्रह. 'दुसरा नवरा कर म्हनते तिच्या **मिन्त्याबी** करते.' -सित.८५.

मिन्नतवारी (स्त्री.) मनधरणी. 'कोनाची काहाले **मिन्नतवारी** करावं.' (फा.)

मिमता (स्त्री.) विनंती, काकुळती, मनधरणी. '**मानमान मिमता**, घोळं कुठी बांधता.' 'लयलय **मिमता** केल्या ताहा बुढी राजी झाली पीठ द्याले.' (फा.)

मियाद (स्त्री.) मुदत. 'तुले आखीन किती **मियाद** द्यावं, कई फेळसीन कर्ज?' (फा.)

मियॉ (पु.) मुस्लीम पुरुष. 'खाली **मियॉ** क्या करे, इधरकी टोकरी उधर करे.' '**मियॉ** मूठभर, दाढी हातभर.'

मिरकूट (न.) चटणी पावडर, मिरचीची पूड. 'भाकरीवर **मिरकूट** घेतलं, तेल नोतं तं पानीच टाकून भिजोलं.'

मिरगी (स्त्री.) घुरं. 'असीकसी पोरगी गयात बांधली हो आमच्या. तिले तं **मिरगीची** बेमारी आय.'

मिरग्या (पु.) मृग किडा. 'पानी पळ्ळ्यावर लाल **मिरगा** दिसला की बाया त्याले हयद कुकू वायतात.'

मिरचीकंद (पु.) एक वेल. 'आंगनात पाय कसा साजरा **मिरचीकंद** निंगला बैना.'

मिरवनं (क्रि.) दाखवणे, प्रदर्शन करणे. 'कैवल्या पुतळा सुंदराचा रावो चरणी तो डरु रुळे वरि **मीरवते** वांकिः' 'युगायुगी प्रौढी हेचिं **मिरवी**॥' -नाथ.११. २. डौलाने जाणे. 'सुटे न कंठाळीची मेख/ अहंपनाची **मिरवी** टेक' -भीक.१२८. (का.मेरेसु)

मिरादानी (स्त्री.) उंची नेसू. 'खोडेल देर पुरा टाके अंगावर पाणी/ भिजे साडी **मिरादाणी**.' -लोक.१. '**मिरादानी** साडी नेसायला असली तरी धनी नसता ती नेसण्यात गोडी नसते.' -कात.१०.

मिरास (स्त्री.) वारसाहक्काची मालमत्ता, वतनदारी. '**मिरासीचे** म्हूण सेत। नाही देत पीक उगे।' -तुका.८१.२. 'हितभर शेतावर उभ्या घराची **मिरास**.' (अर.)

मिरी (स्त्री.) लुगड्या, साडीची निरी. 'आठव्या महिनी हिची उंच **मिरी** दिसे ग/ गोऱ्या मालनीला कंथ हितगूज पुसे.'

मिरूग (पु.) मृग नक्षत्र. '**मिरुगाच्या** घाती, बरसती मोती, वल्लीवल्ली होते माती.' '**मिरूग** लागते ना लागते, पेरन्याची धांदल सुरू व्हते.'

मिरे (पु.अने.) मसाल्याचा एक पदार्थ. 'बाइसी घरी रंधन केलेः गुळ **मीरीयांचीया** पोळीयाः तांदुळ वेळिलेः' -ली.२२४. 'वरि एळा मीरीया लवंगाची पुडी घातलीः' -गोवि.८८. 'का **मिरयामाजी** तिख। ऊसी गोड॥' -ज्ञा.१७.६८. (त.मिरीयम)

मिरोनं (क्रि.) मिरविणे. 'तैसी बाहुप्रदेसी **मिरवतीः**' -ली.२१. 'की पांखाचा मेरू जैसा। रहंवरू **मिरवतसे** तैसा॥' -ज्ञा.१.१३९. 'पोरीसोरीले **मिरोनं** सोबते, मथाऱ्याईले तं लोकं हासतीन माय.'

मिरोनूक (स्त्री.) मिरवणूक. 'निवळून जे आले त्याची **मिरोनूक** काहाळली अन् जे पळ्ळे तेईचं सांतवन केलं.' (का.मेरवनिगे)

मिलाप(फ) (पु.) संयोग, मिलन. 'चांगदेवाजोळ पुर्ना तापीचा **मिलाप** होयेल आये.' 'सग्यासोयऱ्यासंगं **मेलमिलाप** ठुवा लागते राजा.'

मिलावट स्त्री. भेसळ, मिसळ. 'कास्तकार पिकोते. व्यापारी त्यात **मिलावट** करते.'

मिलीटरी (स्त्री.) मिल्ट्री. 'गावातले दोन पोट्टे **मिलीटरीत** भरती झाले.'

मिलीभगत (स्त्री.) हातमिळवणी. 'दाम्याले फसवाची गावातल्या लोकाईनं **मिलीभगत** केली.'

मिवून (क्रि.रूप.) मिळून. 'ते पाचसात झनं **मिवून** तुलेच टिमकारत व्हते तं?' -भं.११५.

मिसक्या (वि.) बहाणा करणारा. 'वखरावर जाऊ नोये म्हून **मिसक्यानं** बिमारीचं सोंग घेतलं.'

मिसखोर (वि.) बहाणा करणारा. 'पोट दुखून रायलं वाट्टे पोराचं का पोरगच **मिसखोर** हाय?'

मिसन (स्त्री.) मशीन. 'गऊ काहाळाले **मिसन** आनली सरदारजीची.'

मिसय (स्त्री.) मिसळ. 'तांदूय दाय **मिसय**, शिजो का झाली खिसळी तयार.'

मिसयचं (वि.) दोनतीन कडधान्याचे मिश्रण. '**मिसयची** हो भाकर/ हिर्व्या **मिरचीचा** ठेचा.' -धों.३१.

मिसयनं (क्रि.) मिसळणे. 'पाला करनं म्हनजे चांगल्यात खराब धान्य **मिसयनं**.'

मिसया (पु.) मिश्रण. 'सोर्ग अन् नर्क याचा **मिसया** करून देवानं मले त्याच्यात ढकललं.' -मोती.

मिसाल (स्त्री.) उदाहरण, आदर्श. 'मानूस कसा असावं याची **मिसाल** म्हंजे पंजाबराव.'

मिसी (स्त्री.) मिशी. '**अर्धमीसी** भादरुनिया देवे अर्ध भागी करवीले क्षौरः' -मउ.७.

मिसुऱ्या (वि.) मिशी असलेला. 'तो ना बे, **मिसुऱ्या** रामभाऊ नाई का हं तोच.'

मिसूर (स्त्री.) मिशी. 'तैसा **मिसुरू** भिहाला कवतिकेंः मिसे लावण्यचेनि' -ऋ.७२४. '**मिसूर** तं काही ठुली पुंड्यानं खपालची खपाल.'

मिस्टिक (स्त्री.) चूक. '**मिस्टिक** झाली मान्साच्या हातून तं निदान मुकाट्यानं तरी राहावं.' (इं.)

मिस्तं (सर्व.) मीच तर. '**मिस्तं** सगोन पाह्यतो त बुढा चेंढायन्या करते.' -ना.५९.

मिस्तरी (पु.) सुतार, गवंडी. 'डवऱ्याले दाता बसवाव म्हटलं तं **मिस्तरी** घरी नाई.' (फा.)

मिस्सी (स्त्री.) काळे दंतमंजन. '**मिस्सीनं** घासते तं दातई काये मिटूक हून गेले.' (फा.मिस्सी)

मिळखत (स्त्री.) कमाई. '**मिळखत** नाई कवळीची, खर्स पायला तं भलकसा.' (अर.)

मिळावा (पु.) प्रेम, एकमेकांबद्दलची ओढ. 'हैलीला अत्तराचा गिलावा असला तरी बायको नवऱ्यात **मिळावा** असतोच असे नाही.' -कात.३३५.

मिंधा (वि.) दबलेला. 'दिठी नोहे **मिणधी**। बोलणें नाही संदिग्धी।' -ज्ञा.१३.३६४. 'बाईची गरज साधून आपण तिला चांगलीच **मिंधी** केली पाहिजे.' -कात.१२२.

मीनमीन (स्त्री.) सतत. '**मीनमीन** मिन्ता अन् घोळं कुठी बांधता.'

मीनं (सर्व.) मी. '**मीनं** तोंडातून शब्दबी नाई काहाळला.' '**मीनं** तुले आंदीच सांगलं होतं. तुया आईकलं नाही माहं.'

मीर (वि.) श्रीमंत. 'असा कोन **मीर** लागून गेला तू? मोठाल्या गोठी करतं एवढ्या?'

मीस (न.) बहाणा. 'हो आइः मज सुळवेथेची संवे असेः तरि तेयाचे **मीस** करिः' -ली.३९९. 'जरी चित्त पाहसी माझे। येणे मिषे॥' -ज्ञा.३.१५. 'येर पत्र पुष्प फळ। ते भजावया **मिस** केवळ॥' -ज्ञा.९.३९६. 'पाठीं उत्तमपुरुष। शब्दाचें करूनि **मिष**। दाविलें चोख। आत्मतत्त्व॥' -ज्ञा.१६.४४. 'भरिला उलंडूनि रिता करी घट। **मीस** पाणियाचे गोविंदाची चट।' -तुका.३७९. 'देवाधर्माच्या गोठी पोथीच्या **मिसानं** ऐकता येतीनं.' -सेल.२३३.

मुकद(द्द)मा (पु.) खटला, दावा. 'भानगळीच्या वावराचा **मुकदमा** लय रोजाचा सुरू आये कोर्टात.' (अर.)

मुकन (न.) चांगल्यातील निरुपयोगी धान्य. 'अर्ध पोतं तुरीच **मुकन** निंगलं.'

मुकन्या (स्त्री.) किडलेले तुरीचे दाणे. '**मुकन्याची** काई दाय होत नाई ना काई नाई. त्यापेक्शा देले बैलाच्या अलपात टाकून.'

मुकरदम (पु.) मजुरांचा म्होरक्या, प्रमुख. '**मुकरदमाले** भेटून निंदाले बाया सांगा लागतीन अन् रोजदारी कबूल करा लागीन.'

मुकरनं (क्रि.) नाकारणे, अमान्य करणे. 'पयले यादोनं शब्द देल होता पन आता **मुकरला** लेकाचा.'

मुकऱ्या (वि.) गालातल्या गालात. 'नंदूची माय **मुकऱ्यामुकऱ्या** हासत रांधनीतल्या रांधनाची तारीफ आयकून तरंगत राह्याली.' -एक.

मुकळी (स्त्री.) चुप्पी. 'मुके तं गड्या माह्या तोंडात **मुकळी** गेली बरं.' -रा.६३.

मुका (पु.) चुंबन. 'घेतला सखूचा **मुका**, हं, कुणास सांगू नका, हलताच जराशी मका.' -शि.४४. (का.अंमिक्कू)

मुका (वि.) वाचा नसलेला. '**मुकेनि** घेतेलें। मौन जैसें।' -ज्ञा.१३.२७९. '**मुका** नारायन हातानं गोलगोल करून म्हने 'लाळू कदी चारतं?'

मुकाट्यानं (क्रिवि.) काही न बोलता. 'भीमा बापामांगं **मुकाट्यानं** चालू लागला.' -धग.६१.

मुकाबला (पु.) सामना, लढाई. 'आल्या आयुक्शात तं कोन्त्याबी परसंगाचा **मुकाबला** कऱ्याची ताकद पायजे मान्सात.' (अर.)

मुकामार (पु.) न दिसणारा मार. 'गाळीवरून पळ्ळो तं रगताचा थेंब नाई निंगला तरमा **मुकामार** लागला.'

मुकामैंद (वि.) अबोल, न बोलणारा. 'माणूस **मुकामैंद** असला तर त्याचे बन्सीगहूही पडून राहतात.' -कात.४४.

मुकी पाऊ (स्त्री.) जात्याची खालची पाऊ, दगडी बैठक. 'जात्याची वरची पाऊ फिरते ते बोलकी. खालची हालत डोलत नाही, म्हनूनसन्या ती **मुकी**.'

मुकी (वि.) गप्प, अबोल, वाचा नसलेली. 'बारगळीचे माह्या माय बहिणीले बदनाम करू नोको **मुकी** राहाय.' -रा.१११.

मुक्काम (पु.) मुकाम, निवास, थांबण्याची जागा, घर. 'काल मोठ्या बाईच्या घरीच **मुक्काम** केला.' (अर.)

मुक्याभोकाचं (वि.) एक शिवी. 'काय मी मी लावलं? कोण हाये कान्नू **मुक्याभोकाचं**?' -बा.७८.

मुक्यामुक्या (क्रिवि.) चोरून, गुपचूप, मारून. 'काई उघळ उघळ बदमास असतात तं काई **मुक्यामुक्या** चोरी करतात.'

मुक्रर (पु.) ठरविणे, निश्चित करणे. 'मग पोरगा पाहायला जाण्याचा दिवस **मुक्रर** करण्यात आला.' -भं.६५. (अर.)

मुखजळ (वि.) अबोल. 'मायबोडीसारखीच **मुखजड** रांड हाये मेली.' -झि.११२.

मुखत्यार (वि.) स्वतंत्र, स्वामी. 'तुमचा का धरलाबांधला आहे मी? माझा मी **मुखत्यार** आहे.' -ऊन.४६.

मुखरण (वि.) ? 'राधिका प्यार गोकुळिची **मुखरण** नार.' -भीक.११.

मुखरोग (पु.) १. मुखाचा एक व्याधी. 'सोडेना देव कधी ज्याचे त्याला भोग/ आंब्याच्या वेळी कावळ्याला **मुखरोग**.' -रुक्मि.९४. २. शब्दही न बोलणे.

मुखळा (पु.) चेहरा. 'विश्व हे रुप तुझे। हस्तपाद **मुखडे**।' -तुका.१५७५. 'आरशात **मुखळा** पाय, कसा दिसून रायह्याला तं?'

मुखिया (पु.) मुख्य, प्रमुख. 'माणसं लाकडं घेऊन आले आणि **मुखियानं** होळी पेटविण्याचा आदेश दिला.' -झेल.४९. 'गोंड कोरकू **मुखियाच्या** मताबाहीर जात नाईत.'

मुखी (क्रिवि.) तोंडी. 'भलतंसलतं माया **मुखी** घालून बदनाम नको करू मले.'

मुखोटा (पु.) मुखवटा, चेहरा. 'माहा जीव जाऊ द्या/ जेठाले येऊ द्या/ **मुखोटा** पाहू द्या.' 'मले आपला रातीदिसा मले पाहून गेला त्या पोराचाच **मुखोटा** दिसे.' -हज.९. (का.मुखवाड)

मुगऱ्यामुगऱ्या (क्रिवि.) गालातल्या गालात. 'आता पायनं कसी **मुगऱ्यामुगऱ्या** हासून रायली ते.'

मुगजळ (न.) मुखजड, स्तब्ध, स्तंभित. 'बईनभावाच्या गोठी ते **मुगजळापरमानं** आयकत व्हती.' -सित.२०.

मुगलाई (स्त्री.) बेबंदशाही. 'कसंई वाग्याले हे काय **मुगलाई** लागली काय?' (फा.)

मुशाफर (पु.) प्रवासी. 'वाटच्या **मुशाफरा** जाय तुया वाटी, थांबला का कोनासाठी?' (अर.)

मुशाफिरी (स्त्री.) देशाटन, प्रवास. 'हुशारी त्याची **मुशाफिरी**.' 'काशीरावची **मुशाफिरी** सरीन ताहा घराक्ळे ध्यान दीन का नाई?'

मुशाहिरा (पु.) बक्षिस, देणगी. 'नाचगानं करनाऱ्याईले साजरा **मुशाहिरा** भेट्टे.' (अर.)

मुश्किल (वि.) कठीण, अवघड. 'मानगीनं बसनंउठनं **मुश्किल** झालं लेका पोरा.' (अर.)

मुचकं (न.) मुसके. 'साहेबराव गपागपा माल खा लागला. त्याले **मुचकं** घाला लागन कानी.?' -सेल.२५९.

मुचकाड (न.) तोंड, थोबाड. 'एका रट्ट्यात इकडचं **मुचकाड** तिकडं फिरवतो.' -पख.७४.

मुचमुच (स्त्री.) घाबरगुंडी. 'गर्दीपायी बस फुटून लोकं बाहीर पडते का याची मले भीती वाटून भायच **मुचमुच** करे माही.' -दि.५.

मुचूक (अ.) शिवाय. 'ढगा **मुचूक** अभाय/ कुकू पुसलं कपाय.' -वि. 'तुहं माहं जमेना, **तुयामुचूक** गमेना.'

मुजरा (पु.) बैठकीतील गाणे, सलाम, नमस्कार. 'पंढरीला जाता लाल मारुती साजरा/ दोन्ही हातांचा **मुजरा**.' -लोक.७. (अर.)

मुजरीम (पु.) गुन्हेगार. 'भलकोनाले सजा नाई होत राजा, **मुजरीम** अशीनच तो.'

मुजारद (वि.) प्रभावी, असरदार. 'तुमच्याजवळ एवढे काहाकाहाचे **मुजारद** औशीदं हायेत तं मलेबी द्या.' -पाटी.

मुजोर (वि.) शब्दास शब्द देणारा. 'सासू **मुजोर** तं सुनीनंबी **मुजोरावानी** वागावं.' (फा.मुँह-जोर)

मुजोरी (स्त्री.) उर्मटपणा, तोंडोतोंडी येणे. 'तुह्यी टिक्कर लगोरी हार खाऊन **मुजोरी/** शेतात संगंमंगं दोघं जेवलो शिदोरी.' -नांबै. 'शिक्षा झाली चोराले **मुजोरी** केली म्हनून.' -मिए.१३२. (फा.)

मुटकळे (न.अने.) बांधलेले गाठोडे. 'मेटॅडोरात भरून आरडते ओरडते डुक्करांचे **मुटकळे** कुठंतरी नेऊन विकले.' -खुं.११.

मुठके (न.अने.) डाळीचा पदार्थ. 'उडदाच्या दाळीचे शिजवलेले **मुठके**.' -फीर.३१.

मुठवाभर (वि.) मूठभर, लहान. 'लाकडील गाभ्यात घोडेस्वार, पितर आणि **मुठवाभर** नृत्य करणाऱ्या आकृती कोरलेल्या दंडात चांदीच्या वाक्या.' -झेल.२.

मुठा (स्त्री.अने.) गड्ड्या, मुठभर पेंड्या. 'निंदण न करता काढलेल्या तणाच्या **मुठा** गोळा करून मी बांधावर टाकायचा.' -फीर.१३५.

मुठा धरनं (सं.क्रि.) निंदणाच्यावेळी **मुठीत धरून** बुचके धरून गवत टाकणे.

मुठ्ठी (स्त्री.) १. मूठ. 'हाताची **मुठ्ठी** करून पोटात मारली लक्ष्यानं.' २. हस्तमैथून. 'झवनं झवनं नानापरी, खेट्टापरीस **मुठ्ठी** बरी.'

मुडकनं (क्रि.) मुरडणे. 'आजकाल चंद्री लयच **मुडकते** पाय.' (का.मडेकु)

मुडदा (पु.) प्रेत, शव. 'आता दुम्हार त्यानं हात उचलला तं **मुडदाच** पाडतो त्याचा.' -पाटी.

मुडदूस (पु.) लहान मुलाचा पोटफुगीचा रोग. 'निंबाचा फोकाटा बिचारा **मुडदूस** झालेल्या केविलवाण्या लेकरासारखा.' एक.

मुडद्या (वि.) मृत व्यक्ती सारखा. 'अरे सांगतं **मुडद्या** काही भागनड केली का काय तुवा?' -पख.१०९. 'पाहाय ना त्या **मुडद्याचे** जणू डोळे फुटले. सरकी आंगावर जीप आणली काळतोंड्यानं.' -पख.४.

मुडून (न.) औताची फेरी. 'माहे आखीन वखराचे दोन **मुडून** हानाचे बाकी होते.' -जटा.४१.

मुतखडा(ळा) (पु.) एक व्याधी. '**मुतखड्याचा** विकार आहे त्यानं हे चाटण घेतलं की त्याची लघवी मोकळी.' -झेल.४७.

मुतनं (क्रि.) लघवी करणे. 'आढदळ काढिले अंगणीः मग तीयें लेकुरुवें पीडी जवळि हागतिः **मुततिः**' -दृ.९४. 'वरी **मुते** चक्रपाणी।' -नाथ.२५. 'हुतुहुतू अन् कुठे मुतू.' 'जायनं, भिती आळं जाऊन **मुतनं**.'

मुतरं (वि.) लघवी करणारा. 'निऱ्हा मुतरं पोट्टं हाय माय, राती गोधळीतच **मुतत** रायते.'

मुतरी (स्त्री.) १. मुतारी. 'शहरात गेलं का **मुतरी** दिसत नाई लवकर अन् आपली तं आफत होते सायाची.' २. शेतातून पाणी जाते तो खोल भाग. 'बाया फनं येचत अन् मी डाल्यानं **मुतरी** बुजवाले नेऊन टाको.'

मुतू (स्त्री.) लघवी. 'रात्री भाइदेवासि लघुनीति लागलीः आणि म्हणतिः मुनिदेव होः **मुतुः**' -ली.३५६.

मुत्तामारी (स्त्री.) बेफिकिरीसाठी संबोधन. '**मुत्तामारी**, झाली नळ योजना तं काय कपायाचं कातळं नेणार आये?' -पख.१०.

मुदई (वि.) ऐदी, आळशी. 'घरचा **मुदई** लक्का ढाई.'

मुदपाकखाणा (पु.) स्वयंपाक घर. 'फरायाची व्यवस्था सांगण्याकरिता ते **मुदपाकखाण्यात** गेले.' -कात.३०९.

मुदबक्क्या (वि.) एक शिवी. 'भीमावर कौतिक खेकसायची, ये **मुदबक्क्या** ऊठ. नको बसू इथी.' -धग.१३. 'कौतिक नामावर वसकन ओरडली, 'तं **मुदबक्क्या**, तुले आताच लागते का पैसे?' -धग.२०९.

मुद्दल (स्त्री.) मूळ रक्कम. 'स्वयंभू मुख्य **मुदल**। चारी मवु॥' -ज्ञा.१०.९३. 'याज तं देतच नाई लेक, **मुद्दलई** बुळोते का काय?' (त.मुदल)

मुनादी (स्त्री.) घोषणा, दवंडी. 'त्याच रात्री नानाजीने **मुनादी** देऊन ग्रामसभा बोलावली.' -कावू. (अर.)

मुनाफा (पु.) नफा. 'धंद्यात **मुनाफा** झाला तं धंदा करावं वोट्टे.' (फा.)

मुनारी(दी) (स्त्री.) दवंडी. 'गावात काहाची **मुनारी** हून रायली रे, डफळं वाजून रायलं जसं.' (फा.)

मुनीम (पु.) कारभारी, चिटणीस. 'ते वाड्यात आले तसा **मुनीम** उठून उभा राहिला.' -डेबू.६७. 'रावसायबाच्या खटल्यात **मुनीम** म्हनून काम करतो.' (फा.अर.मुनीब)

मुन्नं (अ.) म्हणून. 'गोटा मारला **मुन्नच** बोक्या मांगं लागला तुह्या.' -धग.१८.

मुन्शी (पु.) गद्यलेखक, कारकून. 'वाळ्याचा कारभार **मुन्शीच** पायतात.' (अर.)

मुन्सरीम (पु.) पटवाऱ्याचा अधिकारी, मुख्य कारकून. 'काका आता पटवाऱ्याचे **मुन्सरीम** झाले.' (अर.)

मुबोल (वि.) तोंडून निघाल्यानुसार. 'मालाची स्तुत्ती केली म्हणून काय गिऱ्हाईक त्याचे **मुबोल** दाम देणार आहे.' -कात.४४४.

मुभा (स्त्री.) सूट, मोकळीक, परवानगी. 'शेजी देते शिव्या तुझ्या तुले **मुभा/** नेणंता बाळ कडुनिंबाखाली उभा.' 'कोनाच्याई वावरातून शेंगाभेंडं आन्याची आपल्याले **मुभा** देल हाय.' (फा.अर.)

मुमकीन (वि.) संभवनीय, शक्य. 'नईमुद्दीन साहाब स्वर्गात मुक्कामी असणं **मुमकीन** होतं.' -मोती. (अर.)

मुया (पु.) १. मुळा. 'एकीचे **मुळे** घेतिः तेथचि आरोगण करीतिः... तीखट आहे म्हणेः' -गोवि.३०७. 'काकडी, **मुया** असं काईतरी पायजे जेवासंग.' '**मुयाभर** इकडे, गाजरभर तिकडे' २. मूळ. 'चांगलं विटांचं घर बांधलं पन तेच परलादच्या **मुयावर** आलं.' (त.मुळा)

मुयार (वि.) उच्छृंखल. 'यात्रा आली खोदनं सुरू **भुयार/** ते दिसे रंगात जे होते मुयार.' -मिर्झा.१९८.

मुरकनं (क्रि.) मुरके मारणे, इतरावणे. 'शेजीचे मोती **मुरकसील** किती, घटकाभऱ्यानं काढून नेती.'

मुरका (पु.) नखरा. 'नवऱ्याचं नाव तिनं घेतलं तसा लाजून **मुरकाई** मारला.' (त.मुरुकु)

मुरकुटं (न.) व्याधी, दुःख. 'पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी पहाटे माहा **मुरकुटं** घेऊन जाय ओ मारबत असं मोठ्यानं म्हणत.' -धग.१५३.

मुरगळनं (क्रि.) पीळ पडणे. 'हाते **मुरगाळितां** कान। नाही भिन्न वेदना॥' -तुका.६७८१.२.

मुरड (स्त्री.) पीळ. 'हाताले **मुरड** पळ्ळ्यानं सुजलाच लेक.' (का.मुरीगे)

मुरडका (पु.) कणा. 'नापिकीनं शेतकऱ्याचे **मुरडके** मोडले होते.' -ल.३१.

मुरडनं (क्रि.) पीळ पडणे. 'चोपळ्यागीर फळशीवरून चालताना वाटे सायाचं पळ्ळो ना तं पायचं **मुरडीन**.' (का.मुरि)

मुरदंग (पु.) मृदंग. 'टाळ नको, **मुरदं** नको, घेता येईल त्या मार्गानं देवाचं नाव घ्या.' -अखे.

मुरदा (पु.) प्रेत. 'मशानखाईत नेऊन **मुरदा** रोयला.' (फा.)

मुरदाडावानाच्या (वि.) मृत, एक शिवी. 'तं बोलालेई तोंड सिवलं का **मुरदाडावानाच्या**, कौतिक खेकसली.' -धग.१४२.

मुरदाळ(र) (वि.) प्रेतवत, साहस नसलेला. '**मुरदाळ** पोट्टं काय कामाचं. येका जागीच बस्ते म्हैशीवानी.' (फा. मुरदार)

मुरनं (क्रि.) १. जिरणे. 'उतरले देखौनी समीपः **मुरालें** अच्युताचरणीः' -ऋ.५९५. २. नरम होणे. 'बदमास किसन्या आता बराच **मुरला** दिसते.'

मुरब्बा (वि.) साखरेच्या पाकातील फळे, मुरंबा. 'आंब्याचा **मुरब्बा** आशूले लय आवळते.' (अर.फा.)

मुरब्बी (वि.) अनुभवी, मुरलेला. 'यानं आपल्याले इच्याराव एवढे कोन आपून **मुरब्बी** लागून गेलो.' -सित.८५. 'चोपड्या दगडावर पाय हळू ठेवावा लागतो याची **मुरब्बी** जाणीव त्याला झाली.' -झेल.२४. (अर. फा.)

मुरमाटी(ळ) (वि.) मुरूम असलेली शेती. या जमिनीत संत्रा, टमाटे येतात. 'माळरान वर **मुरमाळ** जमीन सारी खळकाळ' -भीक.३६. 'पयसोचं वावर पायाले **मुरमाटे** हाय तरमा येका तासाले येक पोत तूर पिकते.'

मुरमुशा (वि.) मिष्किल. 'तिचा यात हात असल्या बिगरच का **मुरमुशा** हासत गेली ते?' -रा.९३.

मुरलं (क्रि.रूप.) जिरले. 'नाना दूध **मुरालें**। तेंचि दहीं॥ -ज्ञा.१४.३७६.

मुरवत (स्त्री.) भीड, संकोच. 'श्यामा कोनाचीच **भीडमुरवत** ठेवत नाई, उद्धट आये लेकाचा.' (अर.)

मुरळशेंग (स्त्री.) पिळदार औषधी शेंग. 'हे शहर दवाखाने असल्यानं **मुटळशेंग** सागरगोट्या कुणी घेणार नाही.' -सि.८२. (फा.मुर्दारसंग)

मुरादी (स्त्री.) दवंडी. 'अजूनही जंगल खात्याची कोणतीच **मुरादी** झडली नव्हती.' -झेल.८३.

मुराळी (पु.) माहेरचा निरोप देणारा. 'सन आला ग दिवाळी। कोन येनार **मुराळी**.'

मुरूम (पु.) लालपिवळसर कणखर माती- दगडी ढिसूळ. 'कचरा साफ झाला रस्ते **मुरुमाची** भरती होऊ लागले.' -मोती.

मुरेलचुरेल (वि.) अनुभवी, तावूनसुलाखून निघालेले. 'आजा **मुरेलचुरेल** बुडा व्हता.' -सित.११७.

मुर्गा (पु.) कोंबडा, पक्षी. 'पोयाच्या करीले येक **मुर्गाच** इकत आनला.' (फा.)

मुर्दा (पु.) प्रेत, शव. '**मुर्दा** झाकून ठिवा लागते आन् पेरणी करा लागते बापा.' (फा.)

मुर्दाळी (वि.) मेलेली. 'मरू दे **मुर्दाळीले** उद्या मराची आज का मरेना?' -धग.१७५. 'तं बोलालेई तोंड शिवलं का **मुर्दाळ्यावानाच्या**? कौतिक खेकसली.' -धग.१४२.

मुलखान्यारं (वि.) जगा वेगळे. 'तुह पाऊलई पाय

मुलखान्यारं असं सकवार/ या चिक्कन मातीचे ढेकलई खन्नकच फार.' -काया.६.

मुलखोडी (स्त्री.) खोडकर मूल. 'घरधनी डोक्स मोडी/ येस्वदे तुझा **मुलखोडी**.'

मुलाकात (स्त्री.) भेट, मुलाखत. 'बजारातच गनेसरावची **मुलाकात** झाल्ती माही.' (अर.मुलाकात)

मुलाजा (पु.) भीड, पर्वा, गय. 'माह्या चांगुलपनाचा केला ना कोनं **मुलाजा**.' -मा.४२. 'खरं तं पयलं बायतपन त्याईचच अस्ते आपून **मुलाज्या** खातर केलं.' -लेक.३१. 'जगाची काय त्या पर्वा **मुलाजा** ज्यास ना माझा.' -भीक.८२. (अर.फा.)

मुलाहिजा (पु.) भीड मुर्वत. 'आपल्यासाठी कुणीच काही केलं नाही मग गाववाल्यांचा एवढा **मुलाहिजा** का बाळगायचा.' -वा.२०६.

मुलामा (पु.) एकावर दुसऱ्या धातूचे आवरण. '**मुलाम्याचे** नाणें। तुका म्हणे नव्हे सोनें॥' -तुका.१५६१. (अर.)

मुलायम (वि.) कोमल मऊ. '**मुलायम** चंद्रकळेला पिडा घालताना हात दुखावा इतकी तू नाजूक.' -कात.७

मुलूक(ख) (पु.) प्रदेश, देश, राष्ट्र, प्रांत. 'अख्खा **मुलूक** पायदनी घातला तरी असं ढोर नाई सापळनार.' (अर.)

मुसंडी (स्त्री.) जोराची धडक. 'गोरे **मुसंडीमारून** कुटार खाऊ लागले सोनाबैल मात्र मिचकमिचक खाय.' -ए.३८.

मुसकं (न.) बैलाने पीक खाऊ नये म्हणून लावावयाचे दोरीचे जाळे. 'एक तं पुऱ्या लगनात तिनं तोंडाले **मुसकं** बांधून ठिवलं व्हतं. ते काईच बोलत नव्हती..' -लेक.१६. (हिं.मुस्क)

मुसय (न.) मुसळ. 'परि सातपाच **मुसळे** मेळौनि लाडु फोडिजे ऐसी सुगरणि कोण्ही नाही देखिलीः' -ली.४०२. 'धैर्याचें उखळ वैराग्य **मुसळ**।' -नाथ.४०

मुसलमान (पु.) इस्लाम धर्मीय. 'अर्धी वस्ती तं आमच्या गावात **मुसलमानाचीच** आये.' (अर.)

मुसलमानी (स्त्री.) मुस्लीम धर्म, इसमासंबंधी. 'हे काय **मुसलमानी** टोपी घातली रे त्या.'

मुसलीम (पु.) इस्लाम धर्मीय. '**मुसलीम** बायका बुरख्यातच रायतात हरहम्मेस.'

मुसळ (न.) उखळात कांडावयाचे साधन. 'सोंड देखीली तो ह्मणे **मूसळा** सारीखाः' -दृ.४३. '**मुसळाला** बेंडकी बांधतात. मुसळधार यावी म्हणून **मुसळ** व ते धरणाऱ्या पोरावर पाणी.' -रा.२५.

मुसळी (स्त्री.) लहान मुसळ, एक शेती उत्पादन. 'यंदा पाच एकर **मुसळीच** लावली म्या. लय भाव आय तिले.'

मुसळ्ळा (पु.) तुच्छतेने मुसलमान. '**मुसळळ्याईच्या** संख्या दिवसेनदिवस लय वाढून रायली.'

मुसाफर (पु.) प्रवासी. 'नदीच्या वाटीवर। कोन भेटे **मुसाफर**.'

मुसाफीर (पु.) प्रवासी, पार्थिक. '**मुसाफिराले** काय, आज अठी तं सकाय तठी. चाल्ला हिंडत.' (अर.)

मुसाफिरखाना (पु.) प्रवाशांचे निवासस्थान. 'बेघराईले राहासाठी **मुसाफिरखाना**, शायेचे बंडे, कोठे खुले करा.' -दि.६६.

मुसिबत (स्त्री.) संकट, आपत्ती. 'कवाकवा **मुसिबत** येते/ घर बसल्या आफत येते.' -जांग.१८. 'धुरा पेटतपेटत गव्हाच्या गंजीलोक गेल्ता. मोठी **मुसिबत** आल्ती.' (अर.)

मुस्क (न.) बैलाच्या तोंडाचे जाळे. 'बेरड्या, **मुसके**, दोर बनविले। जाळे उतारी सहित॥' 'धुरकऱ्याच्या तालानं किती बैलानं चालावं। असे **मुस्क्याचाही** भेव कसी तक्रार करावं.'

मुस्काट(ळ) (न.) तोंड. 'येका रट्ट्यात लेका **मुस्काटच** फोळीन म्हना.'

मुस्कील (न.) कठीण, अवघड. 'पैसा नाई, कोनी उस्ना द्याव असा सोयरा नाई, लय **मुस्कील** काम झालं सायाचं.' (फा.)

मुहलत (स्त्री.) फुरसत, अवधी, मुदत. 'सायेबाकून आठारोजाची **मुहल्लत** मांगून घेतली म्या.' (अर.)

मुहूरत (पु.) मुहूर्त. 'गाठीभेटीची घटका मायासाठी **मुहूरत**.' -काया.१५. 'लग्नाचा **मुहूरत** भटजीकूनच काढा लागन.'

मुळउपट (न.) मुळापासून उपटले जाणे. 'जयंताच्या खमक्या बोलण्यानं पुढचा माणूस **मुळउपट** होऊन सुकून चिरपडून जायचा.' -खुं.६१.

मुळकी (वि.) मोडलेली. 'या **मुळक्या** बाजीवर नका बसू तुमी.'

मुळखांड (न.) मुळे. 'जांभळीची **मुळखांडं** आप्पाच्या काळजातूनच फुटली आहेत असं वाटायला लागलं.' -अंधा.

मुळदा (पु.) प्रेत. 'अबे ते **मुळद्याहून** फेकेल आयना, ते घेत नस्तात नं!' -पागो.१२.

मुळहारी (पु.) माहेरचा निरोप्या. 'वर्ततें वर्ष जाये। तें पुढिला **मुळहारी** होये।' -ज्ञा.१५.१३०.

मुळ्ळन (न.) कोळपणीचा एक फेर. 'दिवस निंग्याच्या आंधी दाबारा **मुळ्ळनं** वखराचे झाले तं काम उरकते.'

मुंग (पु.) मूग. 'पऱ्हाटीत **मुंग** पेरला तं हरनाईनच खाल्ला.' (त.मुंगी)

मुंगटी (स्त्री.) मुंगासारख्या शेंगा येणारे पीक. 'धुऱ्यानं निंगेल **मुंगटीच्या** शेंगा तोडून निंदनाऱ्या बाया खात.'

मुंगना (पु.) शेवग्याचे झाड. 'भाता बरोबर **मुंगन्याच्या** शेंगाईची भाजी फरंफरं ओरपली.' -कावू.

मुंगफल्ली (स्त्री.) भुईमुगाच्या शेंगा. 'गरम **फल्लीऽऽ** मूंगकी फल्ली' फेरीवाला खारावल्या शेंगा विकत होता.' -एक.

मुंगवळा (स्त्री.) मुगापासून करावयाची वडी. 'येक **मुंगवळा** अन् येक समोसा द्या अतीसा खायाले.'

मुंगा (स्त्री.) आब, अब्रू. 'मंग बसतील **मुंगा** मेल्यावानी इरमून.' -पख.११. 'आताच पाहा ना कसा त्याचा जणू **मुंगा** मेला.' -पाटी.

मुंगूस (न.) सापाचा वैरी प्राणी. 'सर्प आणि नाग **मुंगसे** बैसती।' -नाथ.२-१२६. (त.मुंगा)

मुंजा (वि.) लग्न न झालेला. 'देवी ह्मैसासुर **मुंजिया** खेचर। लहान हि थोर देव हरि॥' -तुका.४५०९. 'त्याचं राक्षसी शरीर पाहून कोणत्याही सोयऱ्यानं त्याला मुलगी दिली नाही. जानू मेला जेव्हा **मुंजाच** होता.' -पख.३.

मुंडकं (न.) डोके. 'कोनी पोरं जेवारीच्या रासीत **मुंडक्यालोक** दळेल.' -सित.१३.

मुंडन (न.) टक्कल. '**मुंडन** कऱ्याले बाप मेला का रे तुया?'

मुंडा (वि.) १. अर्ध्या हाताऐवढे. 'जवारीले **मुंडाहात** कन्सं पळ्ळे.' २. फांदी, खोड. 'सालईच्या **मुंड्याले** पालवी फुटली का घराण्याचा वंश आबादित रायते मंते.' -दि.८. 'सालईचा **मुंडा** गावाच्या शिवंपासून मांडवावरी वाजतगाजत आला.' -जटा.१२. (का.मोटी)

मुंडाल(लं) (स्त्री.) भिंतीचा वरील निमुळता भाग. '**मुंडालीवर** बसून हळ्या करे काव काव/ लाजी सरमीची ननद घे ना येनाराचं नाव.' -काया.४०.

मुंडासं (पु.) डोक्याला गुंडाळलेले दुपटे. 'अंठोनी वेंठोनी बांधला **मुंडासा**। फिरतसे म्हैसा जनामधी।' -तुका. ३.७२. (का.मुंडासु)

मुंडाहात (वि.) हात दुमडून होईल तेवढी लांबी. 'बैठकीतल्या गाद्याही कशा **मुंडाहात** जाडजूड.' -मोती.

मुंडी (स्त्री.) मुंडके, शिर. 'मनोमहिषाचेनि **मुंडे**। दिधली बळी॥' -ज्ञा.१२.५३. 'थंडीत **मुंडीवर** भरजरी हिरव्या रंगाची शाल लपेटली.' -कात.४६१. 'प्राणशक्तिचा **मुंडे**। प्रहारूनि संकल्पमेंढे।' -ज्ञा.१२.५३.

मुंढालं (न.) मोठी भांडी. 'बाया बापड्याईच्या कमरीवर पाण्याचे **मुंढालं** नाहीत.'

मुंदण(न) (न.) १. बोट जाईल अशी पोकळ गोल कडी. 'कलदार चांदीच्या रुपयाला **मुंदण** जोडून बोटात घातलेल्या अंगठ्या.' -झेल.२. २. अंगठी. 'माया बोटातली **मुंदनच** पळ्ळी कुठी तरमा.'

मुंदाटी (स्त्री.) कुऱ्हाड, फावडे इ. बसण्याचा गोल पोकळ भाग. 'हा दांडा जाळा झाला. **मुंदाटीत** बसत नाई.'

मुंदी (स्त्री.) अंगठी. 'हाती सोनेयाचे दोरे होतेः ते स्त्रीकरी घातलेः **मुदीया** अंगुळीया घातलीयाः' -ली.४७३. 'भिन्नाभिमान सूदलिया। **मुदिया** तेथें॥' -ज्ञा.१४.१०९. 'पितयाच्या **मुंदीले** म्हनत नाही सोन्याची.' -मिए.६३.

मूई (स्त्री.) मुळी. 'कोन्त्यातरी झाळाची **मूई** समाधीत ग्यानबॉच्या मानी भवती गुंडायली म्हनतात.'

मूटमूट (क्रिवि.) निमूटपणे. 'लेक अन् आईकत नाई तं आपून काहाले बोलाव, **मूटमूट** पाहाव.'

मूठ (स्त्री.) १. मिठमिरची इ. वस्तू, मंत्रून मुठीत धरणे. '**मूठ** मारे लोकाले अशी करे करनी हागवन लागून लोकं लागे मरनी.' -मिर्झा.२१. २. पाचही बोटे तळहाताकडे वळवून त्यात सामावते तेवढे धान्य, माती इत्यादीचे प्रमाण. 'हाताच्या **मुठीत** मावेल ऐवढे. '**मुठभर** तुराट्या पायाखाली दाबून कळाल मोळल्या आन् तेच मूठ चुलीत लावली.' -अक.६३.

मूठपसा (वि.) थोडे, अल्पस्वल्प. 'बायको नवऱ्याच्या चक्कीतलं **मूठपसा** पीठ काढू लागली.'

मूठमाती (स्त्री.) मरणानंतरचा विधी. 'विठूला पुढे करून संपतच्या **मूठमातीची** तयारी केली.' -झेल.३७.

मून (अ.) म्हणून. 'वावरात तरास देत होती **मून** आफू जरा जास्तच देल्ली तिल.' -धग.७२.

मूर (स्त्री.) पिकावरील एक रोग. 'आमच्या आरतीचा हाये येगळाच सूर/ बरसातीनं ज्यादा लागे धांड्याईले **मूर**.' -सित. 'गावरान जेवारी पेऱ्याले उशीर झाला तं त्या अगाईतावर **मूर** गेली.'

मेकनी (स्त्री.) नाकातील मळ. '**मेकनी** काळता काळता नाकातून रगतच निंगलं.'

मेकळी (स्त्री.) नाकातील मळ. 'नाकातल्या **मेकळ्या** काळून रायलं गिदाळावान्याचं.'

मेख (स्त्री.) १. खुंटी, खिळा. 'वृक्ष करसी तरी मंडप **मेखाचेनि** मिषें।' -नाथ.१६९४. 'देवाने मारली **मेख**। ती निघू शकेल॥' -ग्रा.१४१. (फा.) २. मर्म. 'दृष्टि येता लोकांसि दुर्जन। **मेख** गडवू न शकती॥' -ग्रा.१०.४१. 'त्याईच्या बोलन्यातली **मेख** तुमाले समजली नाई राजा.' (त.मेक्कु)

मेज (स्त्री.) विटासाठीची घट्ट माती. 'सकाळी उठून पजावावर जायचं. गारा तुडवून **मेज** करायचा.' -फीर.७९.

मेजवानी (स्त्री.) पाहुणचार. 'काल मयात मस्तं **मेजवानी**

देली सायबाले.' (फा.)

मेटं (न.) गुडघे, बसण्याची एक पद्धत. 'तसाच बुढा चार पायाचे **मेटं** मारून बसलेल्या बैलाजोळ आला.' -ए.३८. 'नाही गाडी लागली तर बसा लागन तुले जागीच **मेटं** मोडून.' -ऊन.५९.

मेटा (पु.) गुढघा. 'नदीच्या चढावर म्हैस **मेट्यावरच** येते.'

मेटाकुटी (क्रिवि.) खूप दमणे, थकणे. 'लांबलांब पहारींनी मुरूम फोडताना कोरकूंचा जीव **मेटाकुटीस** येत होता.' -झेल.६३.

मेठोनी (वि.) मठ्ठ. 'जगू बांध हे बैल. या **मेठोन्याईले** पानीच पाज्याचं नाई आज.' -सित.१२६.

मेडी (स्त्री.) खांबासारखे उंच लाकूड. 'पोळ्याच्या दिवशी घरोघरी पळसफांदीच्या **मेडी** येतात.' -सेल.११३.

मेढ (स्त्री.) खळ्यातील उभा मधला खांब. 'हा छेचोर शेतीत घुसला तर पुढील हंगामात पळसाची **मेढही** गाडावयाचे काम नाही.' -कात.५१३. (का.मेटी)

मेणकापड (पु.) पाण्याचा प्रभाव न होणारे रबरी कापड. 'आंब्याखाली ठेवलेले पोतडे, **मेणकापडं** आणायला सांगितले. त्यांचे वोंगते घोंगते करून अंगावर घेतले.' -मोचं.३.

मेणघुणे (वि.) आतल्या गाठीचा, शांत पण कोत्या मनाचा. 'किती आशा होती आम्हाला...असे कसे **मेणघुणे** निघाले तुम्ही.' -खुं.१६८.

मेतकूट (न.) सख्य. 'रामा नामाचं येवळ्यात भलतच **मेतकूट** जमेल दिसून रायलं.'

मेन (न.) मधमाशाच्या पोळ्यातील चिकटावा. 'कपायाले लाव्याले **मेन** नाई बुव्हाऱ्याच्या घरी.' (फा.)

मेनघुना(नी) (वि.) आतल्या गाठीचा, शांत पण कोत्या मनाचा. '**मेनघुनी** देव न्हानी.'

मेनपटी(ट्टी) (स्त्री.) मधापासून तयार केलेला चिकट पदार्थ. 'सहेद विकणारा बायकांना कुंकू लावण्यासाठी **मेणपटी** फुकट देत असे.' -काळी.३०.

मेना (पु.) मोठी पालखी. 'पयले नवरदेवनवरी **मेन्यात** बसूनच जात असत.' (फा.तियानः)

मेमटी (वि.) अबोल. '**मेमटी** घे चिमटा, बळबळीचा बोभाटा.'

मेर (स्त्री.) धुरा, बांध. 'कोण्हाचीए सेती रीगो नेदावीयाः कोण्हाचीए **मेरे** चारावीया नाः' -ली.६०. 'मधी वावरात आंबा चारी **मेरीनं** कनसं.' -काया.२. 'या मेरीऊन त्या **मेरीलोक** म्या काय काय नोतं पेरलं.'

मेरबानी (स्त्री.) मेहरबानी. 'येवळ्या बारीनं जाऊ द्या. पाया लागतो **मेरबानी** करा.' -फीर.१४०.

मेरोटा (पु.) मेरे, धुरा, बांधाचा भाग. 'वावरात तूर अन् **मेरोट्यानं** ती टाकेल आये.'

मेलजोल (पु.) मिळूनमिसळून वागणे. 'पयले दोघाचं बनत नोतं पन आता चांगला **मेलजोल** आये त्याईच्यात.'

मेलंमढं (वि.) अशक्त. 'कुटार आन्याले **मेलंमढं** सांगलं काय? डालं उचलता येते त्याले?'

मेलमिलाफ (पु.) संगम, गाठभेट. 'बजारात गेलं की अवघ्याचाच **मेलमिलाफ** हून जाते.'

मेली (क्रि.रूप.) मरण पावली. '**मेली** तरी तिच्या मुडद्याला मातुडा लोटायला जायचं नाही, असं देवकीनं मनाशी पक्कं ठरविलं होतं.' -झिं.२९.

मेवन (न.) भिजविलेली ढेप. 'करोळोच **मेवन** खाईन/ पंचवार्षिक योजनेच्या पायानं येईल.' -काया.३४. 'दोहासाठी म्हसीपुढे **मेवन** मांडा लागते.'

मेवनगंड्या (वि.) पौष्टिक, मूल्यवान बळकावणारा. 'असंतसं जमते का राम्याले. पुरा **मेवन गंड्या** आये तो.'

मेवा (पु.) मिष्टान्न. 'कामाच्या वक्ती पया अन् खायाच्या वक्ती **मेवा**.' 'सेवा करीन तो **मेवा** खाईन असी रीत आये आजकालची.' (फा.मेवाः)

मेस्काई (स्त्री.) ग्रामदेवता. '**मेस्काईले** नाई नवरा म्हसोबाले नाई बायको.'

मेहतर (पु.) भंगी. '**मेहतराला** एक चीड होती ढपुरा दाखवायची.' -फीर.७०. '**मेहतराईनं** काम बंद केल्यानं आकोल्यात अवघा गिदाळा पळेल आये.' (अर. मेहनतानः)

मेहनत (स्त्री.) श्रम, मजुरी. 'हरामाचं खाऊ नाई, आपल्या **मेहनतचं** खावावं.' (अर.)

मेहनती (वि.) परिश्रम करणारा. 'पोरं **मेहनती** निंगले म्हनून सुखाचे दिवस दिसून रायले.' (अर.फा.)

मेहमान (पु.) अतिथी, पाहुणा. 'सेजारी पाजारी कोनी **मेहमान** आला रे की बलावला च्या प्याले अन् काहाळली लेकाच्या सोयरिकीची गोठ.' (फा.मेहाम)

मेहरबान (वि.) दयाळू, कृपाळू. 'बुढा लय **मेहरबान** दिसते तुयावर, नवे कपळेनतन शिवले लागे.' (फा.)

मेह(हे)रबानी (स्त्री.) कृपा, दया, करुणा. 'सायबानं **मेहरबानी** केली अन् माया मोटरपंपाच्या लोनकेसच काम झालं.' (फा.)

मेहेरनजर (स्त्री.) कृपादृष्टी. 'हात शिखराला पोहचल्यामुळे पोटासाठी कुणाची **मेहेरनजर** संपादण्याची गरज नाही.' -कात.५१५.

मेळ (पु.) १. मेढ, खळ्याच्या मध्यभागाचा खांब. 'चाले खयवाळी/ मेळीच्या भवती फिरे बैलजोळी.' -काया.

'खंदाळीत तीन कन्सं **मेळ** कुठं रोवू?' २. दीलजमाई, समेट, संगम. '**मळौनि** इया ज्ञाना। बोंबावें हो॥' -ज्ञा.१४.३९. 'दलालानं बेपाऱ्याशी **मेळ** करून दोन मण कापूस झोल्यात टाकला.' -मोती. (का.मेळ) ३. व्यवस्था. 'पिंजरा राहू द्या इथी. म्या लावतो उंदराचा **मेळ**.' -खुं.३२.

मेळताळ (पु.) जुळवाजुळव, व्यवस्था वगैरे. 'असा केला **मेळमाळ** बिया भरणाचा.' -गाक.३३. 'पेरणीचा **मेळताळ** लावायला म्हणून घरी आलो.' -खुं.२०५.

मेळवनं (क्रि.) अतिथ्य करणे. 'च्या करून **मेळवतो**. तो गोड करून घ्या.' -रा.३३.

मेळा (पु.) समूह, मिलाफ. 'पंढरीले संताचा **मेळाच** असते मोठा.' (का.मेळाकट्टु)

मेळीचा बैल (पु.) खळ्यातील मध्यभागी असलेल्या **मेळ्या** जवळील बैल. '**मेळीचा** बैल भादाच पायजे गोरप्याचं काम नाई.'

मेळ्या (वि.) प्रमुख, मेढीस लागून जुंपलेला बैल. 'गावचा **मेळ्या** जबर आये म्हून समदं सुदं आये.'

मेळ्यानं (क्रिवि.) मिळूनमिसळून. 'शेताच्या बांधानं/ जावा चालल्या **मेळ्यानं/** पाटी भरली इळ्यानं.'

मेंगनी (स्त्री.) सर्व्याची वेचाई. '**मेंगनीच्या** कापसाचे पैसे घेतले म्या माह्यावाल्या पिशवीत.'

मेंगलमाट्या (वि.) मागे सरकणारा, चालणारा. 'अस्सा **मेंगलमाट्या** हायगा तू.' -दि.११.

मेंगला(ली) (वि.) अचपळ, सुस्त, संथ. 'नवरदेवात जराई चैतन नाई, निरानाम **मेंगला** दिसते बावा.'

मेंगी (स्त्री.) कापणीनंतरचे पडलेले उरलेले धान्य. 'दुसऱ्या दिवशी बायको गेली **मेंगीले/** म्या मंग गोऱ्हे जुतून पायलं रेंगीले.' -जांग.१६९.

मेंघल्या (वि.) ढिल्ला. 'नांगरन काय **मेंघल्याचं** काम रायते काय? जबर मानूस पायजे त्याले.'

मेंघ्या (वि.) एक शिवी. 'सुरत पाहा पोसणाराची **मेंघ्या** तोंडाची.' -त.१०.

मेंडकोई (स्त्री.) बेडकी. 'डबरोनात रातभर **मेंडकोया** अळ्ळावत रायतात.'

मेंडुलं (न.) अंगाला झोंबणारे गवताचे कणीस. '**मेंडुले** डिकते चिलाटी वरपते येरवाकय गुत्ते/ बाभुईच्या भराटीचा काटा खपकन रूत्ते.' -जांग.१०१.

मेंढा (पु.) मेंढरू. '**मेंढा** मारावा लोवाळ। पूजा पावली सकळ॥' -तुका.४१७.

मेंढावर - कडेला. 'वावराच्या त्या **मेंढावर** रावनकाटी आय.'

मेंढी (स्त्री.) शून्य, वरली, मटक्यातील शब्द. 'येक अन् **मेंढी** आली काल. तुवा कोन्ता लावल्ता आकळा.'

मेंढीप(पा)ळन (न.) एकाचेच अनुकरण इतर सर्वांनी करणे. 'आपल्या गावचे लोकं भलकसे **मेंढीपळन** हायत. जे ते नरसाबाई धरली तिचाच पिच्छा घेतात.' -तित.९४.

मेंढीवळनं (न.) एकाचे इतरांनी केलेले अनुकरण. 'एकानं घेतली की दुसरे घेतात. **मेंढीवळण** हाय नुस्तं.' -त.६६.

मेंढू (न.) मेंढरू. 'हे एकलच **मेंढू** भटकलं वाट्टे खांडातून.'

मेंथल (न.) बत्तीतील प्रकाश देणारा फुगा. 'बत्ती सूसू करू लागली. **मेंथल** पांढराफेक उजीळ फेकू लागलं.' -सि.४२.

मेंदघुना(नी) (वि.) चपळ नसलेला. 'मी असी तुमच्यावानी **मेंदघुनी** कुठी आये?' -धग.१४.

मेंद(दा)ळ (वि.) अचपळ, मठ्ठ. 'काहीच येत नाई तिले. फारच **मेंदळ** आये पोट्टी.' -ना.१४७.

मेंदाट (वि.) सुस्त, मठ्ठ. 'चपळाईचं काम **मेंदाट्याले** कसं जमीन?'

मैजद (स्त्री.) मशीद. 'देव हजरतच्या **मैजितीत** नाही. हिंदूच्या देवळात देव नाही.' -अखे. (अर.मसजिद)

मैदी (स्त्री.) मेंदी. 'तुया हाताची **मैदी** आजून सोकली नाई.' -काया.६. (का.मदरंगि)

मैने (पु.अने.) महिने. 'पोरीचं लगन होऊन आजून धळ तीन **मैनेई** तं नाई झाले.'

मैयत (स्त्री.) मृत्यू, शव. 'गावात **मैयत** झाली का भकास गाव वाट्टे.' (अर.)

मैल (वि.) अंतराचे माप. 'सासर दा **मैलावर** हाय म्हनून बरं नाई तं ही उठल्यासुठल्या गेल्ली अस्ती पयेत.' (अर.मील)

मैला (पु.) मळ. 'कुठी लोयले होते बापा? कपळ्यातला **मैला** तं साबनानबी निंगून नाई रायला.'

मैंदार (पु.) माहवार काम करणारा नोकरगडी, मजूर. 'पहिले होती सालदार **मैंदाराची** पद्धत. पण, बंद झाली ती आता.' -खुं.५८.

मो (न.) मोह, मोहोळ. 'धुऱ्यावरच्या काटोनात **मो** बसलं. सयदाचं काम होतं तं अंधारात झाळून काढलं.'

मोई (स्त्री.) लाकडाची मोळी. 'तुका म्हणे एक वाहती **मोळिया**। भाग्य आगळिया घरा येती॥' -तुका.२०३५. 'इंधनाची **मोई** उचलून डोक्स्यावर ठेवली.' (का. मोळीगे)

मोकई (वि.) मोकळी. 'इकळेतिकळे फिरोफारो करून तो मान **मोकई** कऱ्याले लागला.' -सित.१२६.

मोकय (वि.) सैल. 'ढोरासारखे कोंडले, श्वास **मोकये** झालेत.' -काया.३२.

मोकाटं (वि.) बंधन नसलेले. 'त्या तं **मोकाट्यावानी** सम्द्या गावात चरत राह्यतात.' -त.११४.

मोक्का (पु.) संधी. 'येक **मोक्का** भेटला का झालं, गेला मानूस पुळे.' '**मोक्का** पाहून काम साधा लागते.'

मोक्यावर (क्रिवि.) वेळेवर. 'सगाई पाह्याले चाल्लो आमी. तू बरा **मोक्यावर** आला. चाल.'

मोगरा (पु.) वजनदार वखर, कोळपणीचे साधन. 'भारीच्या भारी लाकडी **मोगरा** दोन बैलांना ओढनं कठीन जातं म्हणून पुढे आणखी दोन बैलांची आगूल लावली होती.' -वा.४३.

मोगरी (स्त्री.) धान्य कुटण्याचे लाकडी साधन. 'म्हणौनि चाटेयांची सुत बरवी **मोगरी** होती ते श्रीकरि घेउनि आलेः' -ली.१६६.

मोग्या (पु.) मोठे कवेलू. 'कवलं सेकारल्यावर नाटीवरच्या जोळावर एकामागून येक **मोग्या** ठुला.'

मोघं (न.) सरते. 'तासात फट्टे पडतात नाही तर **मोघच** बेरते.' -सेल.८९.

मोघम (क्रिवि.) अनिश्चित, संदिग्ध, अंदाजे. 'त्याला **मोघम** आठवत होतं की हाच तो वाडा आहे.' -गय.१९. (फा.अर.मुब्हंम)

मोघा (पु.) दोन पाखी घराच्या मधोमध कौलांवर टाकावयाचे मोठे, जाड कवेलू. 'कौलाईच्या जोळावरचे काई **मोघे** फुटल्यानं पानी गयीन घरात.'

मोजमाप (न.) मोजणे. 'मोकया जागेचं **मोजपाप** घेतलं अन् कसं घर बांधावं ते पाहू लागलो.'

मोजेल (वि.) मोजलेले. 'माया हातानं पैसे **मोजेल** होते अन् घटकाभऱ्यात येक नोट कमी भरून रायली.'

मोज्याले (क्रि.रूप.) मोजायला. 'पंगतीत बायामान्सं किती बसतात ते **मोज्याले** येक पोट्टं ठुलं.'

मोट (स्त्री.) पाणी काढण्याचे चामड्याचे साधन. 'अशा मशनऱ्या नोत्या तं तुया बुढा अन् मी सकाऊनच **मोटीनं** पानी काहाळो इरीचं.' (का.मट्टे)

मोठाधाटा (वि.) मोठा, ज्येष्ठ, वयस्क. 'ब्राम्हणे म्हणीतलेः **मोटेधाटेः** भीक्षा का मागत असाः' -ली.६०. '**मोठाधाटा** असल्यानं साऱ्याईले पोटाशी धरावं तं तोच रुसून बसला.'

मोठीमाय (स्त्री.) वडिलांच्या मोठ्या भावाची पत्नी. 'फाटक्या मुलामुलींची ती **मोठीमाय** लागते.' -काळी.२४.

मोठेधाटे (वि.) मोठे वगैरे. '**मोठ्याधाट्या** मान्साईपुढे लहानसं लेकरू काय करीन?' -धग.७५.

मोठेबा (पु.) वडिलांचे मोठे भाऊ. '**मोठेबा**, आता या वगारले ताकच पाजाव.' -ए.३६.

मोड (स्त्री.) कोंब येण्याची क्रिया. 'घटाखालच्या धान्याला **मोड** येऊन ते टरारून वाढू लागले.' -रा.३५.

मोडशी (स्त्री.) लहान लेकराला होणारी हागवण. 'तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख। **मोडसीचे** दुःख गांड फाडी॥' -तुका.१२०७. 'मी जेवनार नाही मंग पोराले दूध येणार नाही. मंग त्याले **मोडशी** व्हईल.' -सेल.३३६.

मोडतोड (क्रिवि.) मोडणे, तोडणे. 'जवळचं बिंडल केलं **मोडतोड**.' -मिर्झा.१५७. 'बंडी उलटली तं सबन **मोडतोड** झाली.'

मोडी (स्त्री.) १. पाठीचा कणा. 'म्हशीनं कुचराई केली तर आपण तिच्या **मोडीवर** चऱ्हाटाचे सपकारे देतो.' -पख.९९. २. विकण्याकरिता असलेले सोने वगैरे. 'भावच काय आसन **मोडीचा**? हांडा **मोडून** किती पैसे येतीन?' -ऊन.१९६.

मोत (स्त्री.) मरण. 'बगळ्याची संगत खेकळ्याला प्राणघातक ठरणार आणि तो आपल्या **मोतीने** मरणार.' -कात.५१०.

मोतद्दार (पु.) घोड्यांची निगा राखणारा. 'घोड्यांच्या तजविजीसाठी एक **मोतद्दार** असे.' -भं.७१.

मोताद (वि.) वंचित. 'याबास्ता का इतरावला तं अनाले **मोताद** व्हशीन बाबू.' -मे.१५. 'कष्टकरी भाकरीच्या तुकड्याला **मोताद** झाला.' -फीर.११२. (अर.मुहताज)

मोतीर (पु.) दुसरा विवाह, पुनर्विवाह. 'पयली मेली तं **मोतीर** लावून हे दुसरी केली.'

मोतीहार (पु.) मोत्यांचा हार, कंठा. 'माह्या दाराहुनी गेला एक सरदार/ कंठी त्याच्या **मोतीहार**.' -लोक.२७.

मोप (न.) तुकडा. 'कुऱ्हाडीनं लंब्या दांडक्याचं **मोप** करा लागते.'

मोफत (वि.) फुकट, विनामूल्य. 'काम ना केलं त **मोफतचं** कोन खाऊ घालते?' (अर.मुक्त)

मोमना (पु.) थंड्या पाण्याची जाड भाकर. '**मोमना** टाकला का झालं. दोघच दोघं अन् खाटलं उभं.'

मोयतीर (पु.) मुहूर्त. 'मांडवस होऊन आमचे देवकारण सरले का पैला **मोयतीर** धराव मन्तो.' -दि.७ 'मारोतीच्या पायऱ्या वरतून नवरदेव येऊन **मोयतीरावर** तं लगन लागलं.' -जटा.१३.

मोरकं (न.) दोराचा फास. 'धुरकऱ्याच्या तोंडाले येसन अन् **मोरके/** हेल्याचं मस्तक बैल झाले म्होरके.' -नांबै.

मोरचूत (पु.) एक रसायन. 'दुधाच्या हांड्यात **मोरचुताचा** कण टाकला तर ते नासून जाते.' -कात.१०.

मोरट(ठ) (न.) कपाळभर लावलेले कुंकू. 'घाला पायावर

पाणी माथी कुंकाचे **मोरट/** गोड पुरणाची पोळी घास भरवा चोखट.'

मोरा (वि.) पांढऱ्यावर काळसर ठिबके असलेला बैल. 'आपुला मंत्र नव्हे खरा। माझा बईल चुकला **मोरा**।' -तुका.४१०१.२.

मोरी (स्त्री.) शोषक खड्डे, नाली. '**मोऱ्या** करोनि। सांडपाणी थांबवावे॥' -ग्रा.१३.६६. (का.)

मोवरी (स्त्री.) मोहरी, एक तेल बियाणे. 'तथा लाहान खांड ते **मूहुरी** एव्हडें करावेंः' -दृ.१३.

मोस (पु.) शरीरावरील चामखीळ, काळसर गूथ. 'मध्यमबांधा, सावळा वर्ण, उजव्या गालावर गोचिडासारखा **मोस**.' -काळी. ७.

मोसम (पु.) १. हवामान. '**मोसम** खराब हाये. मुसळधार पानी होईल असं टिवीवर सांगून रायली ना बाई.' २. मोटारगाडीचा वेग. 'काय झालं इच्यारत विस्रू उठला, म्या म्हटलं गाडीचा **मोसम** तुटला.' -जांग.६४. (अर.मौसम)

मोसमी (वि.) हवामानानुसार. '**मोसमी** पीक घेतो आपून, ज्यास्त जमिनीच्या नांदी नाई लागत.'

मोह (पु.) १. वृक्षविशेष. या वृक्षाच्या फळाफुलांपासून मद्य, पानांपासून पत्रावळी करतात. 'ऐसे अवघे टोपलेही भरि **मोहाळु** आरोगु सरलेः' -गोवि.१७२. 'आता **मोहफुलावरच** त्यांची मदार होती.' -झेल.१२. ३. लोभ. 'येवळा **मोह** चांगला नाई.'

मोहतीर (न.) पुनर्विवाह. 'आठ लग्न, एक **मोहतीर**, एक तेरसं करणं तोंडाचा खेळ व्हता का?' -सेल.२२.

मोहतुंबी (वि.) धुंद. 'प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आपणच निवडून आल्याचा **मोहतुंबी** भाव दिसत होता.' -खुं.१०४.

मोहन (पु.) १. तळावयाच्या पदार्थात टाकलेले कणकेतील तेल. 'गूळ कणकेत घातला, **मोहन** म्हणून तेल मीठ घातलं.' -धग.३७. २. श्रीकृष्ण.

मोहपान (न.) मोहाच्या झाडाचे. 'आरे ऊठ ना **मोहपानाले** जा लागत नाही का?' -रा.२३.

मोहबत (स्त्री.) प्रेम. 'आपून **मोहबत** कऱ्याले जावं तं लोकं लफळं म्हनतात.' 'प्यार **मोहब्बत** मोठी गोठ असते बाबू.' (अर.मोहबत)

मोहरकी (स्त्री.) पशूच्या तोंडाला बांधलेली दोरीची जाळी. 'म्हसाळीले **मोहरकी** पायजे नाई तं मान्साले फरफर ओळत नेते आवरत नाई.'

मोहरन (स्त्री.) मोहर, बहर. 'दोनच वर्षात फुलझाडांची **मोहरन** झाली.' -खुं.१८४.

मोहरम (पु.) मुसलमानांचा एक सण. 'मुसलमानाच्या घरी दूध होतं आपलं ते **मोहरम** सनाच्या दिवसी बोलावत मले.' (अर.)

मोहरा (पु.) पुढे जाण्याचा कल, रोख. 'हसतच त्याचा **मोहरा** तिच्याच दिशेने वळला.' -रा.१०५.

मोहरी (स्त्री.) नथीवरील साज, टिकल्या. 'नथ नाकातली बाई नाकाला झाली भारी/ नका वहिनी लावू सरजे **मोहरी**.' -लोक.१०१.

मोहलत (स्त्री.) सवड, अवधी. 'म्या म्हनलं देवा **मोहलत** तरी दे/ थोडीसी मले बापा सवलत तरी दे.' -ऊ.१७.

मोहल्ला (पु.) वेटाळा. '**मोहल्ल्यात** येकजूट असली ना दुसरे ठाकत नाईत.' (अर.महलः)

मोहागी (वि.) कमी जाळ देणे. 'गोवऱ्या घातलेल्या अढीत जाळ **मोहागी** जळत असला तर दुधावर साय घट्ट येते.' -कात.३४२.

मोहीम (स्त्री.) लढाई, महत्त्वाची कामगिरी. 'सीमेवरची **मोहीम** फत्ते झाली होती.' -सित.३९. (फा.)

मोहुतीर (न.) पुनर्विवाह. 'बायकोची सख्खी चुलतबहीण त्याने **मोहुतीराने** घरात आणली.' -सेल.५३.

मोहो (पु.) मोहो. 'चीरुनि **मोहोळाचेया** पानाची पातळी करितीः' -ली.४१. 'ऐसे अवघे टोपलेही भरि **मोहाळु** आरोगु सरलेः' -गोवि.१७२.

मोहोर (पु.) १. शिक्का. 'तुया नावाची **मोहोर** माया मनावर उमटली.' २. बहर. 'आंब्याले आला **मोहोर** अन् हळ्याले झाला मुखरोग, अशी गोठ हाय राजा तुमची.' (फा.)

मोहोरा (पु.) रोख. 'वसुदेव वावराच्या **मोहोऱ्यानं** जायेल दिसलता मले.' (फा.)

मोहोळ (न.) मधपोळे. 'नाहाक आपण **मोहोळाच्या** माशा उठवल्या.' -झिं.१०१.

मोह्य (न.) सरते, बी जमिनीत पडावे म्हणून बांबूची केलेली पोकळ नळी. 'ती तिफणीच्या मागे बांधलेल्या **मोह्यावर** रक्त पेरीत होती.' -अंधा.

मोळ (स्त्री.) १. चालण्याच्या खुणा, पाऊल खुणा. 'आखरामदी डुकराच्या पायाची **मोळ** दिसली मले.' २. पेरलेले बियाणे निघणे. 'आताआता गव्हाची **मोळ** दिसून रायली तासाईनं.' ३. मोडीत काढणे. 'खरेदी केलं तं सोनं, विकली तर **मोळ**.' -मिए.१७२. ३. वळण.

मोळताळ (न.) मोडणे. 'बायकोचे भांडेकुंडे **मोळतोळ** करून पैशाची सोय करा लागली.'

मोळनं (क्रि.) मोडणे. 'राहियेले यज्ञ, **मोडिली** कीर्तने।' -नाथ.७.

मोळसी (स्त्री.) शौच्याचा त्रास. 'अन्नाची **मोळसी**, तोंडघसी पळसी.'

मोळा (पु.) विरोध, अडथळा. 'आत्यानं उचलाव तं हुंडा मांगून तिनंच लगनात **मोळा** घातला अन् मामानं **मोळा** घालाव तं त्यानं उचलून धरलं.' -लेक.५९. (का.)

मोळे (क्रि.रूप.) मोडत, थांबवत असे. 'म्हणौनि मनपण **मोडे**। तैं इंद्रिया वाहे। जीवु गेलिया आहे।' -ज्ञा. 'काका होता तं तोच गावातले तंटेबखेळे **मोळे**.'

मोळोनी (स्त्री.) सोंगनीवर आलेले पीक. हाताने मोडता येईल अशी स्थिती. 'दोनतीन रोजात गहू **मोळोनी** आला का लावतो सोगनं.'

मोंगडा(ळा) (पु.) चार बैली वखर. 'उनायात वावर फुटावं म्हनून सायळ लावून **मोंगडा** धरो.'

मोंगरा (पु.) मोगरा. '**मोंगऱ्याचा** वास मले लय आवळते.'

मोंगरी (स्त्री.) धान्य कुटण्याचे लाकडी साधन. 'त्यानं कोपऱ्यातली **मोंगरी** उचलली अन् धाडकन तिच्या पाठीत घातली.' -ना.१५.

मोंगलाई (स्त्री.) मुसमानांची राजवट. 'एवढी जोरजबरी? हे तं **मोंगलाईच** दाटली लेक.' -फीर.५४.

मोंगळन (न.) लाकडी नागराने भुसभुशीत करणे. 'नांगरनं, **मोंगळनं** झाली वखराची वाई/ लये झाले वासरं गोठी हंबरती गायी' -नोका.

मोंढा (पु.) १. पखालीत पाणी टाकण्याचे तोंड. 'पखाल भरली तशा पुंजानं **मोंढ्यात** अटकविलेल्या चापट लाकडी चिपळ्या काढून टाकल्या.' -पख.३२. २. बाजार. 'उतरात पेठाच्या **मोंढ्यात** मुगाचा भाव पंधरावीस हजार झाला.' २६८.

मोंढी (स्त्री.) एक पादत्राण. 'काट्याकुट्याची चंभाराजोळ पिवर चांबळ्याची **मोंढी** कऱ्याले टाकली.'

मौजूद (वि.) विद्यमान, हजर. 'भांडन झालं ताहा मीबी तथी **मौजूद** होतो.' (अर.)

मौट (स्त्री.) ? 'चाकावर तयार केलेले जाडजूड ओलं मडकं. चाकावर हात घालून पाय. **मौट** घळून पाय.'

मौत (स्त्री.) मरण. 'देता घेता मंदी होते गरिबाची **मौत/** बनते ते रुमनं दाबनाराची फौज.' -सित. '**मौत** झाल्यासारखी सगळ्या घरावर सुतकी अवकळा दाटाळून साय झाली होती.' -खुं.१४१.

मौताज (वि.) अभावग्रस्त, गरजू, गरीब. 'हात रिकामे होतात कसे **मौताज** पोटाला.' -मा.२७. 'लक्ष्मी जन्माले आली तेव्हा तिचा बाप खाले **मौताज** होता.' (अर. मुहताज)

मौसम (पु.) ऋ तू, हंगाम, योग्य वेळ. 'बरसाती **मौसम** आये, पानी तं पळीनच राजा.' (अर.)

म्या (सर्व.) मी. 'ते मिया गुरुकृपा नमिले॥' -ज्ञा.१.२०. 'तरी आता जाण **म्याचि**। उक्त दोन्ही॥' -ज्ञा.३.३४. '**म्या** जे काही विवरुनि पुसावे। आधीची कळिले देवे॥' -ज्ञा.५.१६४. 'एथ आले असती आघवे। परी कवणेसीं **म्यां** झुंजावे।' -ज्ञा.१.१७१. 'तो म्हणे अवधारी देवा। **म्या** पाहिला हा मेळावा॥' -ज्ञा.१.१९३. '**म्या** काय तुया केईचे खांब कापले बापा?'

म्याचा (स्त्री.अने.) स्पर्धा. 'बुलढान्या पासलच्या वरवंडाले **म्याचा** सुरू झालत्या.' -सित.३३. (इं.)

म्याट (वि.) वेडा. 'मी काय **म्याट** झालो राजा तुमाले उसने पैसे द्याले.' (इं.मॅड)

म्याटरीक (स्त्री.) मॅट्रिक. 'पोरगी **म्याटरीक** तं हाय ना तुमची. दिसाले थोळसीक बरी हाय तं भाव खाता.'

म्याबी (सर्व.) मीसुद्धा, मीही. '**म्याबी** बोलून दाखोलं. पावने बॉ तुमी बोट घातलं ना? बोला आता.'

म्हणवा (पु.) म्हण. 'खरूजाच्या कुत्र्याची दोन दिवस वचवच. **म्हणवाच** ह्ये न.' -ऊन.३५.

म्हणसान (क्रि.) म्हणाल. 'घरी जाऊन **म्हणसान** जवाई म्हतलं पण सतरंजी नाई टाकली सासरे बुवानं बसवाले.' -गय.

म्हणूनशिन्या - म्हणून. 'खोली हाय **म्हणूनशिन्या** काय झालं? आता जेवूनच जा तुमी.' -गय.

म्हतारा (वि.) म्हातारा, वृद्ध. 'म्हणे **म्हातारा** मोहे नाहीला॥' -ज्ञा.६.६.

म्हतारी(ल्डी) (वि.) म्हातारी. '**म्हताल्डे** असा कसा सपूत जंदली तू.' -खुं.१९०. 'आजी आता लय **म्हतारी** झाली.'

म्हंती (क्रि.रूप.) म्हणत असते. 'आज आणू उद्या आणू तू सदाई असंच **म्हंती**.' -धग.५३.

म्हनगत (स्त्री.) म्हण. '**म्हननाराची** म्हनगत हायेच का ठसन पाटलाची अन् वोवायनी काचकोराची.' -अक.५०.

म्हनलं (क्रि.रूप.) म्हटले. 'जे आपल्याले दिसलं, जे आपून सोता डोयानं पायलं ते **म्हनलं**.' -अक.५३.

म्हनलते (क्रि.रूप.) म्हणाले होते. 'हो न **म्हणलते** न सव्वा महिना झाल्यावर येतो म्हून.' -रा.

म्हनवा (पु.) म्हणणे. 'वाडवडिलाचा **म्हनवाच** हाय ना जी, कुणबी जैसा दाता नही, मारे बिगर देता नही.' -वा.४५.

म्हनसानं (क्रि.रूप.) म्हणाल. 'पाय जा, मंग **म्हनसानं** म्याच कऱ्याले लावला सवदा आताच नाई म्हना वाटलं तं.'

म्हनाय (क्रि.रूप.) म्हणायला. 'गाणं तुला म्हण म्हणलं तर पोरीलेच **म्हणाय** लावलं.' -रा.३५.

म्हनू (अ.) म्हणून. 'आलिचे धावती धावति भेट होईल म्हणू।' -तुका.४०९. 'तुया हो **म्हनलं** म्हून म्याबी म्हनलं.'

म्हनून (अ.) म्हणून. '**म्हणौनि** आंगणी चौंडका ऐसे उडतीः' '**म्हणौनि** मनपन जै मांडे तै इंद्रिय आधीचि उबडे।' -ज्ञा.१३.३०१.

म्हनूनस्त - म्हणून तर. 'नऊ मयने सोसून मले दुनिया दावली/ **म्हनूनस्त** माय मले तुयी याद आली.' -पाव.

म्हन्ता (क्रि.रूप.) म्हणता. 'मले जेवाले नेवून रायले तं माया भावालेबी चल **म्हन्ता**?'

म्हवरा (पु.) पुढील भाग. '**म्हवरा** पकळाव अन् पुढे येंगावं.'

म्हशासूर (पु.) महिषासूर, झोपाळू. 'सर्व गाव जागं झालं अन् हा कोन **म्हशासूर** झोपला?' -मोती.

म्हसकी (स्त्री.) म्हैस. 'हल्याच्या टकरीत मरत असते **म्हसकी/** खरं मी सांगतो समजू नका फुसकी.' -मिए.१३५

म्हसकी (वि.) म्हशीवळणारा. 'म्हशी राखण्यासाठी स्वतंत्र **म्हसकी** असायची.' -जटा.१०.

म्हसन्या (वि.) मसण्या, एक शिवी. 'संगंमंगं राह्यनं म्हंजी खेटे घेणे होते काय? रे **म्हसण्या**?' -सि.१०३.

म्हसाळतोंडी (वि.) एक शिवी, म्हशीसारखे तोंड असलेली. 'हं काय म्हंत व **म्हसाळतोंडे** सांग पटकनं.' -कावू.

म्हसाळा (स्त्री.अने.) म्हशी. 'पान्यातून जशा, उठत नाही **म्हसाळा**.' -मिए.२७.

म्हसाळी (वि.) म्हैशीसारखी या अर्थी एक शिवी. '**म्हसाळीचे** आंधी लेकराईले छंद लावलेत खिचळीचा. मग सुट्टीत काय?' -एक.

म्हसोबा (पु.) एक देवता. '**म्हसोबा** केला. त्याची मोठ्ठीच्या मोठ्ठी बोंबी केली. त्यात दूध टाकलं अन् ते दूध पिताखेपी सरपबी काहाळले.'

म्हंशील (क्रि.रूप.) म्हणू लागशील. 'मंग तूच **म्हंशील** मले का बा नाई सांगलं म्हून.'

म्हा (सर्व.) मी. 'कोनं इकत घेतली रे जागा? काकाचा प्रश्न. **म्हाच** भावानं मंदल्यानं बाप म्हणाला.' -फीर.१७१.

म्हाग (वि.) महाग. '**म्हाग** झाले पुस्तक, बाप घेते मस्तक.' -नांबै.

म्हालगोटा (पु.) न्हावी. 'आठ रोजापासून **म्हालगोटा** नाई आला. दाळीचे खुटं खुपून रायले.'

म्हालपंचायती (स्त्री.) उगीचची विचारपूस. 'फालतूच्या **म्हालपंचायची** सांगा त्याले, कामाच्या नावानं बोंब.' -काळी.११. 'हाती ना दाती फुकाच्या **म्हालपंचायती**.'

म्हाली (पु.) न्हावी. 'बाइसी **म्हाला** बोलावीलाः मग गोसावीयांचे क्षौर केलेः तेयासि एकु दामु दीधलाः' -ली.३४४. 'इमलीच्या लगनाचं जेवन आये चाला. **म्हाली** बल्लायाले आला. गिलासं घेऊन गेला.' -रूख.

म्हून (क्रिवि.) म्हणून. 'इचकवांगं घर हाय **म्हून** आपून बोलत नाई जादा.'

म्हैस (स्त्री.) म्हैस. 'जी जीः माते साकरी नावे **म्हैसि** असेः तीचा तांबीयाभरि दुधा मी प्रतिदीनी आणीनः' -ली.३२८.

म्हेळी (वि.) म्हैस. 'सराड देता चुके तेथ कोले हाणेः **म्हेळीएचि** सळी देः' -ली.२२.

म्होटी (वि.) मोठी. 'येवळी **म्होटी** जमीन गळीमानसावर सोळा लागते.' -फीर.१७२.

म्होटेम्हाटे (वि.) मोठेमोठे. 'जे **म्होटेम्हांटे** घरं हाये आपल्या घरोब्याचे त्याईच्या घरी देऊ भरने.' -फीर.१०५.

म्होट्टा (वि.) मोठा. 'मकानाभवती **म्होट्टा** कलमाहलमा चालला व्हता.' -सित.१०४.

म्होरं (अ.) पुढे, समोर. 'हातातला तुत्या कोपऱ्यात ठेवला/ माझ्या **म्होरं** बसून सपसप जेवला.' -मिए.१५६. 'तशीच तिनं ताथ्या पान्याची बादली त्याच्या **म्होरं** ठिवली.' -अक.६३.

य

यक (वि.) एक. 'अंधारातच घासलेटची डबकी **यका** हातानं चाफल्ली.' -सित.२९.

यकखट्टा (क्रिवि.) एकत्रित. 'दोनी पोरीचे लगनं **यकखट्टा** उरकून टाकले.'

यकयक (वि.) एकएक. '**यकी येकी** दो दो पेंडीया घेतिः आवघे डोइय ठेवुनि घेउनि यतिः' -गोवि.३. '**यकयक** बोल पंचायाच्या घनापरमानं त्याच्या छातीवर आदळत व्हता.' -सित.१४४.

यकरवके (क्रिवि.) एकत्र. 'घराबाहीर वळेल लोकं देवळामंदी रातच्यानं **यकरवके** झाले व्हते.' -सित.५४.

यकीन (पु.) दृढविश्वास, खात्री. 'बेवळ्या मान्सानं डोक्सं आपटूआपटू सांगलं तरी **यकीन** होत नाई.' (अर.फा.)

यचाई (स्त्री.) वेचण्याची क्रिया. 'तो चिक्कटभेंड हीराब्बॉ, त्याच्या **यचाईले** गेलती माय आज.' -सित.२९.

यत (क्रि.रूप.) येत. 'बिरान्याजागी मले जप **यत** नाई.' -सित.१०९.

यताईबॉ (पु.) वेताळ. 'रोडग्याचा भंडारा आये इतवारी **यताईबॉवर**.'

यल्लावनं (क्रि.) मुरडून बोलणे. 'बुड्यासंगं आज ते लाळीगोळीनं, लयच **यल्लावत** बोलू लागली.' -सित.७१.

यवग (पु.) योग. 'मामाजी मंधात असल्याच्यानं हा **यवग** आल्याशिवाई रायनार नाई.' -सित.५५.

यवस्थित (वि.) व्यवस्थित. 'दा तिफनची जमीन, खंडीभर ढोरं, गाळ्या घोळं असं समदं **यवस्थित** हाय अन् तुमी नोकरीवालाच घेऊन बसले राजे हो.'

यसालास (क्रि.रूप.) येत आहेस. 'अरे येस्या मेल्या डोळे फुटले कारे तुहे? सरका अंगावर **येसालास**?' कवताबुढी कचकचली' -वा.१००.

यस्वार (पु.) मसाला, सार. 'महिनाभर **यस्वार** खाऊ घालाव पुन्हा सुकामेव्याचे नाव काढणार नाही.' -निशा.२३१.

यंदा (अ.) यावर्षी. '**यंदा** पन्हाटी लावाव म्हटलं दोनक येक्कर.'

यंधवा (अ.) यावेळी. 'तुमचं ध्यान कुठीसा हरपलं **यंधवा**? सुमनला विचारावसं वाटलं.' -पख.८. 'काय हाये ह्यो धिंगाणा. लय पेली का काय **यंधवा** तुम्ही?' -पाटी.

या लागले क्रि.रूप. यायला लागले. 'गाडी चुकली तं काय सांगाव बॉ, येतीनबी **या** लागले तं आखरी गाडीनं.' -अंधा.

याआंगं (अ.) या बाजूने. '**याआंगं** सरकजा. कुटाराची बंडी येऊन रायली मांगून.'

याईनं (सर्व.) यांनी. 'मी लयलय सांगो पन **याईनं** आईकलं नाई मावालं.'

याचे (सर्व.) यांचे. '**याचे** ढोरं मोकाट असतात. काल आखरात आल्ते.'

याचे (क्रि.रूप.) यायचे, येत होते. 'मोठमोठाले लोक आमच्या घरी **याचे**.'

याज (न.) व्याज. 'याजाले लखली, मुदलाले चुकली.' 'मुदलापचे तं याजच **जास्त** हून रायलं बापा.'

याजबट्टा (पु.) भरपूर व्याजाचे दर असलेला व्यवहार. '**याजाबट्ट्यानं** आनेल पैसे त्यानं पोराच्या हाती ठिवले.' -सित.१४०. '**याजबट्ट्यानं** पैसा घ्याची सवय हाय तेईले म्हनूनसन्या पुरी पळत नाई.'

यातनी (अ.) यामध्ये. 'त्या डब्ब्यात नशीन तं **यातनी** पाय बरं.'

याद (स्त्री.) आठवण. 'तुही **याद** आली तसा उठलो झाकटीत आन् निंघालो.' -सि.१३८. 'घडीघडी ग बाई येते **याद** घरधन्याची/ बोलबोलण्याची, त्याच्या चाल चालण्याची.' -भीक.७५. (फा.)

यादगार (वि.) स्मरणात ठेवावे असे. 'कापूस येच्याले सखू आली अन् तो दिवस आपला **यादगार** दिवस झाला.'

यादगिरी (स्त्री.) आठवण. 'येवळा मार खाल्ला पन याले **यादगिरी** रायली नाई.' -सित.१३०.

याददास्त (स्त्री.) स्मरणशक्ती. 'का हो डाक्टर **याददास्त** जायेल मान्साले बोलता कसं येते हो?' (फा.)

याप (पु.) व्याप. 'बूड टेकवाले टाईम नाई राजा, लय **याप** झाला माया मांगं.

यायची (क्रि.रूप.) येईल. 'कासम कसा मेला ते सांगताही येत नाही. बिलामत **यायची**.' -झेल.७८.

यायलं (क्रि.रूप.) येत आहे. 'पहिलं जे जे साजरं व्होतं ते ते कापसासारखं उपकायलं. निकस ते जल्माले **यायलं**.' -वा.१०१.

यायलो (क्रि.रूप.) येत आहे. 'मी पंचायतच्या आफिसातून **यायलो**.' -पख.८.

यार (पु.) १. मित्र, प्रियकर. 'आपले जवळचे **यार** दोनतीन, बाकी बोलाचालाचे.' २. जार. '**यारासंग** फिराची लाज नाई वाटली अन् आता बामानाजोळ योग पायते सायाची.' (फा.)

याराना (पु.) दोस्ताना. 'शायन्यासंगं **याराना** पायजे नाई तं येकलंच बरं.'

यारी (स्त्री.) मैत्री. 'आपून **यारी** कऱ्याले जातो अन् लोकं आपल्याले वापरून घेतात.' (फा.)

यीन (स्त्री.) विहीण. '**यीनबाई** येऊन राह्यल्या सकाय, त्याचीच तयारी सुरू आये.'

यीन (क्रि.रूप.) येईन. 'माय म्हनीन पोट्ट्याले काहून करतं भीन/ गुपचूप नीज बाबू नाईत इरप्पन **यीन**.' -नांबै. 'आजून दोनक कोस चाला लागन मंग गाव **यीन**.' -धग.१७.

ये (क्रि.रूप.) १. येत असे. 'कोनी टोचूनटाचून बोल्लं का तिच्या डोयात लागलीच पानी **ये**.' २. यावे. 'अय पोट्ट्या, इकडे **ये** बे.'

येऊ (पु.) वेळू, बांबू. 'कल्पवृक्षाते पावो काइ वेव मागावे?' -ली.३८७. 'परि **वेळु** न वेधेः कां तो अंतरसारू नव्हेः' -दृ.३. 'किळी कऱ्याले **येऊबी** दुसऱ्याच्या घरून आना लागतात.'

येकदानी (स्त्री.) स्त्रियांच्या गळ्यातील हार. 'अई माय! कई केली व **येकदानी**. जाळीजुळी हाय वऽऽ.'

येकरी (वि.) प्रत्येक एकरात. '**येकरी** वीस किंटल कापूस पिकवाची आपली जीद हाय.' (अर.)

येकलं (वि.) एकटे. 'लोकाईच्या मानमान मिंता केल्यापेक्शा आपून **येकलं** भरभर निंगलं ते बरं पळते.'

येकवरनी (वि.) पहिल्या लग्नाची. '**येकवरन्याले** येकवरनी भेटून नाई रायली राजा अन् तुमी दुसरपन्याले **येकवरनी** पोरगी पाहून रायले.'

येकसरनी (वि.) पहिली पाळी. 'वखराची **येकसरनी** वाई झाली. घरचं लगन झालं का दुबारनी धरतो.'

येकसोय (क्रिवि.) एक सारखे, सलग. 'औंदा तुरीच्या वया नाई टाकत. येकसोय **सोयाबीन** पेरतो.'

येकाकानी - एक-एक करून. 'मल्ल्या आले का सर्व्या गावाचे ताफे? **येकाकानी** येत हाय.' -दि.१४.

येकात (अ.) एकत्रित. 'निसेल गहू अन् बिननिसेल गहू **येकात** केले ना तुमी?'

येकायक(की) (अ.) एकाएकी, अचानक, अकस्मात. '**येकायकीच** पोरीले फिट आली अन् भदकन खाली पळ्ळी.' (फा.अण्य)

येकायेकी (अ.) अचानक. '**येकायेकी** तब्बेत खराब झाली. डोयेबी फिरोयाले लागली काट्टी.'

येकारी (स्त्री.) रस्त्याच्या येका बाजूला खोलगट तर दुसऱ्या बाजूला उंच भाग तयार होणे. 'पावसाळ्यात गाड्या चालल्यानं **येकाऱ्या** पल्ल्या हुत्या.' -दि.१.

येकेक (वि.) एक एक, प्रत्येक. 'हे या अल्कोहोलिक नपुंसक ढिवश्यानं **येकेक** दिवस ढकलून आहेत.' -म.८७.

येकोपा (पु.) ऐक्य. 'भावाभावातला **येकोपा** तोळ्याले बायाच कारनीभूत रायतात.'

येखंड (न.) एक औषधी द्रव्य, मूळ, **वेखंड**. वात कृमी नाशक असते.

येगरी (वि.) वेगळी. 'रायत्या आंब्याची तं जातच **येगरी**.' -कात.३. 'शिवलालने मुलांचे **येगरे** चार केले. आठआठ एकर रान दोन मुलांना दिले.' -सेल.६.

येच (क्रि.रूप.) वेचावे. 'सकाऊनच वावरात जाऊन कापूस **येच** मी येतोच घळीभऱ्यानं.'

येच ये (क्रि.रूप.) येतच असे. 'इकळे डोयाचा मिरूग आपला भरू भरू **येच ये**.' -अक.३३.

येचन (न.) वेचण्याची क्रिया. 'पऱ्हाटी मस्त परमगज फुटली, बाया पाहून **येचन** धाळा लागते.'

येचनं (क्रि.) वेचणे, टिपणे, गोळा करणे. 'बाइसे गोसावीयासि **वेचुवेचु** गुंडे देतिः भक्तजन भटा **वेचुवेचु** गुंडे देतिः' -ली.२२६. 'आज कापूस **येचनं**, मंग सर्वा **येचनं** असं काई सुरूच रायते.'

येचा (पु.) कापूस वेचण्याची क्रिया, वेचण्याची खेप. 'कापसाचा हा **येचा** किंटलचा तरी यीन.' 'लदबद बोंड्या पकल्यानं आठा दिवसात **येचा** ये.'

येचाई (स्त्री.) वेचण्याची मजुरी. 'कापूस पिकते हो तरमा **येचाईनं** मान्साचं टकुरं लाल होते.'

येजा (क्रि.रूप.) यावे, याल बरे. मामाजी आले नाई त तुमीच **येजा** इकडी झोपायले.' -अंधा.

येजा (स्त्री.) येण्याजाण्याची स्थिती, परिपाठ. 'आणि गुणाचा **यावाजावा**। ढळे चळे ना पांडवा।' -ज्ञा.१४.३४०. 'सळकीनं रातभर गाळ्याईची **येजा** सुरूच असते.'

येट (पु.) जाड दोर. 'दगुडानं हरेक गाडीच्या चाकाले ठोकून थे **येटात** पक्के हाय का नाई याची तसल्ली करून घे.' -कात.१२.

येटं (पु.) चाकाची धाव. 'माया बायकोले करू लागतं काई धंदा? त्यावक्ती तुये **येटं** पळतात.'

येटपट्टे (पु.) चाकाची लोखंडी धाव, पट्टा. 'ओसरीतला पसारा जुनेतुटके **येटपट्टे**, आरेपुठ्ठे सारं सावडून घेतलं.' -धग.१३३.

येटा (पु.) वेढा. 'दोर ढिला झाला. आखीन एक **येटा** मार खुट्याले.'

येटा(टो)ई (स्त्री.) वेटाळी, गुंडाळी. 'भवताली गाव अन् गावावर **येटोई** घालून बुढा.' -मे.२९. 'काय सांगू गळ्या, हे मोठ्ठा सरप त्यानं **येटाई** घातली ना तं घमील्या येवळी होईल.'

येटाय(या) (पु.) वेटाळ, मोहल्ला. 'बैलाचं फाटे सायळ तुटे, **येटायातून** इस्तो ना जाते.' काया.२३. 'साऱ्या **येटायाले** सांगे भाऊ आला भाऊ आला/ त्याच्या दमनीत बसून मी जाईन माहेरा.' -पाहु.२१. 'गावात इकळे टाकूनकाराचा येटाय तिकळे कुंभाराचा **येटाय** आये.'

येठ (पु.) १. चाकाभोवतीची लोखंडी धाव, वाट. 'जनतीले दाबून टाकलं जशी पाचर ठोकली **येटात/** पाठी मंदी मारा आमच्या, नोका मारू पोटात.' -नोका. २. गवताचा जाड दोर. 'भारा बांध्याले वासनचा **येठ** केला अन् बांधला.'

येठन (न.) बैलगाडी, औताला जू बांधण्याचा दोर. 'त्यानं वखराले **येठन** गुंडायलं, पास बांधली अन् कढोन लावलं.' -भं. ३५.

येठन (वि.) निर्बुद्ध. 'समाधान्या निराच **येठन** मानूस आय, समजावून समजत नाई त्याले.'

येठनं (क्रि.) विनणे. अंगी टोपरं कुंची गोंड्यानं **येठली**.' -लोक.६१.

येठारोक (अ.) येईपर्यंत. 'द्या सायाची तन्नाऊन जोर्दार वोपन **येठारोक**.' -मे.२०.

येड (न.) बुद्धीभ्रंश, वेड. 'वावर खरळलं तं **येड** लाग्याचीच पाई आये.'

येडझव्या (वि.) व्यवहार शून्य, निर्बुद्ध. 'गनपतसारख्या **येडझव्या** मान्साले कोन्तच काम सांगू नोये.'

येडपट (वि.) वेडा. 'तू का **येडपट** आये का बे? हेला कसा गामन दिसते तुले?'

येडबडनं (क्रि.) गडबडून जाणे. 'काई नाई काई नाही आपासायेब' बबन **येडबडून** गेला.' -त.१०३.

येडबाडनं (क्रि.) व्यापणे. 'ढगानं आभाळ **येडबाडलं**.' -झि.९७.

येडा(ळा) (वि.) वेडा, मूर्ख. '**येडा** झाला काय रे! माया जागेत पाया खांदून रायला लेका?'

येडाहेंद्रा (वि.) कसाही, वाईटसाईट, क्षुद्र. 'पाल, मुंगी, गोचीड कशाचाबी जन्म भेटते मंग **येडाहेंद्रा**.' -खुं.१८८.

येडीबांगडी (वि.) अडाणी, साधी. 'बाप्पा सादलबुवा माया **येडीबांगाडीचं** आयकत जा.' -धग.५८.

येडेचाये (पु.अने.) वेडगळ चाळे. 'येस्टीतून विस्रू प्रवासाले जाये/ तवा थो करे **येडे** चाये.' -जांग.६४.

येणे (स्त्री.अने.) वेणा. 'तेव्हा सारं जोरात केलं पण आता **येणे** द्यावे लागत आहेत.'

येत (न.) वेत, विणे, जनावरांची प्रसूती, प्रसूतीची खेप, वेळ. 'दहाबारा वर्षानं गरोदर राह्यल्यानं बाया तिला वाघाच्या **येताची** म्हनत.' -सि.३२.

येतत जातंत (क्रि.रूप.) येतात जातात. 'टकमक पाहे डोया ढगं **येतत** जातात/ घरी उसन्याचे दाने कधी पेरू वावरात.' -नांबै.

येतवरी - येईपर्यंत. 'घेते बंधु बाई. साडी, भावजय मोडी/ पिता **येतवरी** चाट्या उकलू नको घडी.' -लोक.२९.

येताई (स्त्री.) एक ग्रामदेवता. 'दर सोम्मारी मी **येताईबॉच्या** पाया पळाले जातो.'

येताळ (पु.) पिशाचांचा राजा. '**वेताळेफेताळे** जळो त्यांचे तोंड काळे॥' -तुका.२३७४.

येताव (क्रि.रूप.) येतो, येईन म्हणतो. 'टोबाची दोनशे रुपये मजुरी द्याल तं **येताव**.' -जटा.३२.

येतीन (क्रि.रूप.) येतील. 'हे गाडी चुकली त मांगलच्या गाडीन **येतीनच** पावने.' -अंधा.

येदलोक (अ.) आतापर्यंत. 'काय राहेते कोनाचं बाई **एदलोक** पानी?' -काया.१६. 'मांगल्ला पराभव काळाच्या धारीत **येदलोग** बोथट होयेलच असते.' -मे.२७.

येधवा(या) (अ.) यावेळी. 'गोसावीयाचेया दरीसना जाओः एल्हो **एधवांचि** कैसी जाओः रात्रि वडील असेः' -ली.७७. '**येधवा** साऱ्याईचे जेवनं झालते.' -ना.१५२. 'असं करावं काय भल्यामानसा? अन **येधवा** आला. राती इरतीचं वरून अभाय.' -फीर.१४७.

येधाऊन (अ.) आतापावेतोर. '**येधाऊन** अर्धा येक्कर वाई घेतली अस्ती.'

येधाय (अ.) यावेळी. '**येधाय** आला काय? मान्साच्या पंगता तं सरल्या आता बसं बायाईत.'

येधोक (क्रिवि.) आतापर्यंत. '**येधोक** पावनेईनं या लागत होतं.'

येन (क्रि.) येईल. 'भाषणाले तं राजे हो ऊत **येन** असा, का जो थो देन भाषण आवरूनशानी कसा.' -ऊ.३८.

येना (स्त्री.अने.) प्रसव वेदना, वेणा. 'जन्ते तिची तान्ते वांझोटी रिकामी **येना** देते.'

ये ना - येत नसे. 'पैसे घ्या डाक्टर म्हटलं की तोच उल्टा दटावे, पन **ये** ना.' -लेक.५१.

येनी (स्त्री.) वेणी. '**येनी** कर फनी कर हातामंदी चुळा भर/ पाहे त्या जीवाचा जीव जावो घळीभर.' -वि.

येनीफनी (स्त्री.) वेणी घालणे इ. 'सयसंध्याकाई झाळझूळ झाल्यावर **येनीफनी** केली.'

येयाले (क्रि.रूप.) येत आहेत. 'दरोज कायदे बदलून **येयाले** गडे हो जग कसं बदलायलं हे तुमालेबी कळायलं.' -वा.१४०.

येये (क्रि.रूप.) येत असे. 'देव पुंजा करून पाटील गावखारीतल्या कोठ्यावर हिंडून **येये**.' -कात.२.

येयेल (क्रि.रूप.) आलेला. 'इओ सायेब रातची शाळा पाहायले पाळावर **येयेल** हायेत.' -निशा.५४. 'तो डॉक्टर जिंदगीत पयल्यांदाच **येयेल** आमच्या गावात.' -मे.९.

येर (पु.) वेळू, बासा. '**येरवाचे** वाकानं साजरे काचवे घेऊन जेवनरातवरी मांडवपुरा झाला.' -दि.७.

येर (वि.) दुसरा. 'आकोसाचे माहादेवोबा ते गोरेः ते **येरी** दीसी गोसावियाचीया दरीसना आलेः' -गोवि.३०५. 'तुका म्हणे तूं चि खरा। **येर** वाउगा पसारा॥' -तुका.४०३८.३.

येरझार (स्त्री.) जा ये, येणेजाणे. 'ऐसे तेयाचेया **एरझारांचे** दूख देखौनि मग गोसावी तेयांची सुस्युख करीतिः' -ली.५१. 'तूपाची धार, तती साधूची **येरझार**.'

येरंड (न.) तेल बी असलेले झाड. 'ऊंसाचे शेजारी **येरंडाची** झाडे।' -नाथ.१३२२.

येरंडी (स्त्री.) येरंड झाडाची बी. '**येरंडीचं** तेल लय गुनकारी रायते काईकाई बिमाऱ्याईवर.'

येरवाळी (अ.) अवेळी, वेगळ्या दिवशी. 'जातंपाटं जत्रेतच भेट्टे. **येरवाळी** नाई भेटत.'

येरागबाळा (वि.) गैर, असातसा, दुबळा. 'तुका म्हणे तेथे पाहिजे जातीचे। **येरागबाळाचे** काय काम॥' -तुका.३११८. 'मले का तू **येरागबाळा** समजतं का बे? दोन ठून दीन होतकाळीत.'

येरी (वि.) उगाच. 'हा म्हंते असं त थो म्हंते तसं/ इचारलं त म्हंते **येरी** मंग कसं.' -मिए.१३०.

येरेफेरे (पु. फेरबदल, हेराफेरी. 'माहा वऱ्हाडी बापाचं ठसक्याच बोलनं/ ना शब्दाचे **येरेफेरे** नाई कुथनं येलनं.' -नोका.

येऱ्याबेऱ्या (वि.) बेरकी, धूर्त. 'राजकारणी देवाणघेवाण समजण्याएवढा तो **येऱ्याबेऱ्या** नव्हता.' -पोळा.

येल (स्त्री.) लता, वेल. 'कसा झाला हा मानूस कळू निंबाचा रे पाला/ **येल** काकळीचा होता बार कारल्याचा आला.' -वि.

येल (क्रि.रूप.) आलेले. 'नोको घिवू. म्हा काई वर **येल** नाई.' -फीर.२२. 'या गावात मी कैक खेप **येल** आओ.'

येलशे(से)ल (वि.) येथून तेथपर्यंत. 'कोनी मुंग टाकत नाई ना जवारी पेरत नाई निऱ्हा **येलशेल** सोयाबीनच दिस्ते राजा.' 'पूर्णेच्या काठानं **येलसेल** रेऊ पसरलेली आहे.' -ना.१४८.

येलनं (क्रि.) हिडगणे, लाडावणे, ठाकणे. 'पोट्टी होसात आली वाट्टे लयच **येलनं** चालू हाय तिचं.'

येलपाळनं (क्रि.) नखरे करणे. 'नको **येलपाळू** मांगंमांगं अळू/ मनातून हासा वरवर लळू.' -वि. '**येलपाळी** गौरा, म्हतारा नवरा.'

येलपाळ्या (वि.) नखरे करणारा. 'दिप्या **येलपाळ्या** अशीन तरमा तुमच्या लेकावानी घुयऱ्या नाई.'

येलातर (स्त्री.) एक वनस्पती. 'खांदून **येलातर** काळ्ळी तं निंगत नाई. वरवर तोळ्ळी तं येका पान्यात वर निंगते.'

येली (क्रिवि.) व्याली. 'काऊन बाई पळली लाल, भोरी म्हैस **येली** काल.'

येले (पु.अने.) हालअपेष्टा. '**येले** झाले जीवाचे वरून पस्तुरी.' -मिए.१५९. 'लयच **येले** हायेत रे बाबू बुढ्याचे.' -ए.१८.

येल्या (वि.) वेलासारखा वाढलेला. 'मुंगाले युरीया टाकला तं **येल्या** जाते तो.'

येल्याकेना (पु.) पिकातील गवत. '**येल्याकेना** झाला तं पिकाले वाळू नाई देत. तोच पसरते वावरभर.'

येल्ला(ल्हा)वनं (क्रि.) नखरे करणे. 'मुंज्या काय **येल्लावन** हो आपल्या सामने.' -गा.२२.

येल्हे (पु.अने.) त्रास. 'काय पावसापाण्याचे **येल्हे** चालले माय पुंजादाच्या जिवाचे?' -पख.८५.

येवजाव (स्त्री.) येणेजाणे अशी क्रिया. 'वेसि पडैलः मग **एओजाओ** नैएः' -ली.८५. 'गाव रस्त्यावरून बायामाणसांची **येवजाव** सुरू होती.' -ए.१५. 'घरातून बैठकीत अन् बैठकीतून घरात मुकिंदाची **येवजाव** चालली व्हती.' -सित.८५.

येव(वो)त (क्रि.रूप.) येणे होणे. 'तवं आत्सिद्धि न ठकेचि। आणि मागुतें न **येववेचि**।' -ज्ञा.६.४३३. 'भॉले तं बईनीच्या भेटीलेई येवोत नाई.'

येवय - आताशा, अलीकडच्या काळात. '**येवय** कानी गावात वारं न्यारच वाहून राहेलं.' -वि. 'आपल्या घरी त **येवय** कोनी आलंगेलंई नाई मामाच्या घरचं.'

येवसा (पु.) व्यवसाय. 'निदैव्याचे व्यवहास। तैसे ठाकती हातपाय।' -ज्ञा.१३.५५६. 'आला भागासी तो करी **वेवसाव**। परि राहो भाव तुझ्या पायी॥' -तुका.१४२०.१. 'थट्टा करण्याबिगर तुम्हाले दुसरा **येवसा** नाही.' -पख.७. 'निंगनिंग दिवसा, खायाचा **येवसा**.'

येवस्था (स्त्री.) व्यवस्था, तजबीज. 'तरी अझुनिवरी पार्था। सांडीसांडी हे **व्यवस्था**॥' -ज्ञा.११.६३१. 'पावन्याईची **येवस्था** बैखटीतच करेल आये.'

येवा (पु.) येण्याची शक्यता. 'येईल घरा देव न धरीं संदेहा। फकिराचा **यावा** व्हावा जेव्हां॥' -तुका.४४१९. 'पावन्याईचा **येवा** आये पर्वादिसी.' -सित.११७.

येवा (क्रि.रूप.) यावे. 'आता मले कितीक रोज **येवा** लागन भाऊ? आंगाऊन लिंबू उतरून टाक्याले.' -हज.३१.

येव्हार (पु.) व्यवहार. 'सर्वज्ञे म्हणितलेः वानरेया यासी **वेव्हारु** सांघीजाः' -ली.२७७.

येव्हारी (वि.) व्यवहारी. 'मज ग्रंथोद्यमु फळावया। वेव्हारा होई।' -ज्ञा.१४.१६. 'पैसा अदला **येव्हारी** मान्सापासीच रायते भाऊ.'

येस (न.) जय, यश. 'कोन्तबी काम हाती घेतलं का **येस** भेट्टेच राजा आपल्याले.'

येस (स्त्री.) वेस, गावद्वार, गावाची सीमा. 'तव **वेसीसि** कुंचीटाळे पडिलेः' -ली.८०. 'तरि रात्री मज एथ एता अवघडः **वेसि** पडैलः मग एओजाओ नैएः' -ली.८५. 'उतरीली वेसिदारे नगरा आतु रीगतिः पूर्वीले **वेसिदारे** नीगतिः' -ली.३८. 'मग नगर श्रींगारीलेः **वेसिदारी** तोरण बांधलेः' -गोवि.१०५.

येसकर (पु.) गावकीचे काम करणारा महार. मर्तीकाचे निरोप देण्यापासून ते लग्नाची लाकडे फोडण्यापर्यंत सारीच कामे त्याला करावी लागत. 'जोहार मायबाप जोहार। सारा द्यावया आलो **वेसकर**॥' -तुका.१२७. 'येसाजी **येसकर** होता त्यामुळे अनसिंगच्या पोलीस ठेसणात जाणंयेणं असे.' -वा.१०. 'पाटील खाते पांड्या खाते, **येस्कराचं** काय जाते?'

येसन (स्त्री.) नाथ, वेसण. 'नोका दाखू घमेंडी आमच्या हातात **येसन/** जनतीच्या जोरावरच कमावलं आसनं.' -नोका.

येसन (न.) व्यसन, चट, नाद, छंद. 'जो गुरुसेवा **व्यसने** सव्यसतु निरंतर॥' -ज्ञा.१३.४४३. 'दारुजुगाराचं **येसन** लागलं का बरबाद होनंच आये मंग.'

येसवा (स्त्री.) वेश्या. 'पुंड्या तं रातदिवस **येसवेच्या** घरीच पळेल अस्ते.'

येसान (क्रि.रूप.) याल. 'तुमी भलेही **येसान** दुबारा पन हे पावने येतीन काय?' -गय.

येसाल (क्रि.रूप.) याल. 'तुम्हाला यावं वाटते पण **येसाल** अन् नाहाक एखांद्या बैलाचा धक्का लागन. घेसान हातपाय मोळून.' -वा.३९६.

येसोंता (पु.) यशवंत. 'दौलतरावच्या **येसोंतालेच** माई पोरगी देल आये.'

येळ (पु.) वेळ. 'कोणाले पडली **येळ** अन् कोणाले सापडलं केळ.'

येळं (वि.) वेडा. '**येळं** हाय लेकाचं. भावाले मायबापावरून श्या देऊन रायलं.'

येळझया(व) (वि.) वेडपट, एक शिवी. '**येळझया** खानीच्या, काहाले कुथून रायला बे माया नावानं?'

येळनी (स्त्री.) १. आधारासाठी केलेले गोलकडे. 'तीची **वेळणी** श्रीकरि घेतीः ते आवघीया उतरंडीसि लावीतिः' -गोवि.७२. २. मातीचे भांडे.

येळपट (वि.) वेड्यासारखा. '**येळपटच** हाय लेकाचं हल्लीनं पराटी पेरतो म्हन्ते बावलं.'

येळवखद (स्त्री.) काळवेळ. 'तुमाले तं काईच **येळवखद** नसते कोन्या कामाले.' -ना.१४०. '**येळवखाताचा** काही नेम नसते तो भारीच इचित्तर असते.' -सित.११५.

येळाबह्याळा (वि.) वेडा. 'डवऱ्यादुंड्यावर सुदा गळी पायजे, **येळाबह्याळा** तं तासंच मोळाचा होय.'

येळावाकळा (वि.) सरळ नसलेला. '**येळावाकळा** दांडा असला का कुऱ्हाडीचा घाव लागत नाई.'

येळीपिशी (वि.) वेडीपिशी. 'पमीच्या भादऱ्या गोठीनं बुडा **येळ्यापीस्यावानी** झाल्ता.' -सित.६२.

येळू (पु.) बांबू, वेळू. 'वावरातली जेवारी **येळवावानी** ऊच वाढायची.' -जटा.११.

येव्हा (पु.) वेढा. 'तैसा मूळअहंते वेढिला। तो म्हणौनियां।' -ज्ञा.१४.३०२. 'सबन गावाले नदीच्या पुराचा **येव्हा** पळेल आय.'

येंगत (क्रि.रूप.) चढत. 'नाही **येंगत** पायरी, रूसे आपल्या मानाला, कंठी मागते सोनेरी.' -लोक.३२.

येंगन (क्रि.रूप.) चढेल. 'आपलेवालं काम कवरीक बेंगन/ कोन्या कुपाटीवर आपली येल **येंगन**.' -मिए.१५०.

येंगनं (क्रि.) चढून जाणे. 'आहोणिचेया खांदावरुनि दुर्ग **वेंघलाः**' -ली.३७२. 'राउळ आलेः...कवाड उघडिलेः माळवंचेयावरि वेंघलेः' -गोवि.८२. 'ऐसिया **वेंघौनि** स्वप्ना। धांवत भरस्वर्गाचिया राणा॥' -ज्ञा.१५.४९३. 'वरती **वेंघोनि** घातली उडी। कळंबाबुडीं यमुनेसी॥' -तुका.२३६. '**वेंघलो** वरि खोंडा भाव धरुनि टेका।' -तुका.४२८. 'भिंतीवर **येंगनाऱ्या** ज्या दिसते पाली.' -मिए.१४४.

येंगरट (वि.) स्वच्छ न राहणारा, बावळट. '**येंगरट** लेकरू कुठी न्याची सरम लागते माय.'

येंगरठी (वि.) अडाणी. 'मी काय साहेबाची बायको हो? चपराशाची बायको, मी आहो **येंगरठी**.' -कावू.

येंगाबेंगा (पु.) मुलांचा गोट्यांचा खेळ. '**येंगाबेंगा** खेळताखेळता चड्डी सावरणाऱ्या पोरांच्याही तोंडी तोच विषय घोळत होता.' -एक.

येंगे (क्रि.रूप.) चढत असे. 'रोज विठोबाची माडी **येंगे** रुक्मिणी दमाने.' -लोक.१०.

येंघनं (क्रि.) ? 'गोसावी तेयापाठी धांव घेतलीः तवं ते नारायणाचेया देउळावरि **वेंघलेः**' -ली.३५५.

येंदवा (अ.) यावर्षी. 'वाट तरी किती दिवस पाह्यती **येंदवा** पाच दिवस झाले पाण्याचा थेंब खंडला नाही.' -वा.५३.

येंदा (अ.) यावर्षी. '**येंदा** पान्यानं च्याट नाई देली तं सोयाबीन न्याल करते मान्साले.'

यॅव - १. लगेच. 'यॅव गेलो अन् यॅव आलोच मी.' २. थक्क करणारे. 'तो असा काही लचकत चाले की **यॅव**? ' - मोती.

र

रई(ई)स (वि.) श्रीमंत. 'बस झालं ना आता **रईस** बापाच्या पोरा/ कुठलक दाखवतं सांग आपला तोरा?' -झाली.९. 'भावराव पाटलाचं मस्त **रईस** काम हाय कोनतीबी गोठ तोंडातून काळता बरोबर हजर.' (अर.)

रई (स्त्री.) रवी. '**रवी** फिरवित गरगरां।' -नाथ.२-८८. 'सकाऊनच **रई** लावून ताक वाटून देलं.'

रईगाडगं (न.) रवी आणि मडके. 'दिवस निंघाला का **रईगाडगं** दिसते माया मायले.'

रईसज्यादा (वि.) अतिशय श्रीमंत. 'माणूस कितीबी **रईसज्यादा** झाला तरी दोनच टैम खाते ना.' -खुं.२३६.

रईसी (स्त्री.) श्रीमंती. 'हाय म्हनून **रईसी** करू नाई. भाकरीपुरतं काम केलं पायजे.' (फा.)

रकाणा (पु.) कक्षेत. 'मंग म्या तेले घोटत बसलो. आखरी थो **रकाण्यात** आला.' -जटा.६७.

रक्तातोळ (वि.) रक्तबंबाळ. 'लांडग्यानं लचके तोळल्यानं दिनाचं सबन आंग **रक्तातोळ** झालं व्हतं.' -सित.४९.

रक्ताभांबय (वि.) रक्तबंबाळ. 'आरूनं तं आपली गळ्या बेजा **रक्ताभांबय** केली.'

रक्ती (स्त्री.) रक्त. 'कुऱ्हाळ पायाले लागल्याबरोबर **रक्ती**

भरभर निंगली.'

रक्सा (पु.) कडब्याची अवाजवी भुकटी होणे. 'कळब्यावर पानी टाकून ठुवा नाई तं कुटी करताखेपी कुटीत निऱ्हा **रक्सा** होते.'

रखरख (क्रिवि.) अति कोरडेपणा. 'उनायाच्या घाती सगळीकळे कसं **रखरख** वाट्टे.'

रखवाल(ला) (पु.) रक्षण करणारा. 'दोन वावरामिळून येक **रखवाल** ठुला सस्तामस्ता.'

रखवालदार (पु.) राखण करणारा. 'आजकाल काय बापा, **रखवालदारावरच** राखन बसा लागते.' (फा.)

रखवाली (स्त्री.) राखणी. 'आज काल वावराची **रखवाली** कऱ्यालेबी मानूस भेटत नाई.'

रखेल (स्त्री.) ठेवलेली स्त्री. 'एक दिवय असी वीज पडली येऊन/ नवऱ्यानं **रखेल** घरी घेतली ठेवून.' -मिए.७५.

रग (पु.) १. शक्ती. 'आंगात **रग** हाय तथलोक होईन ते होऊ द्याव.' २. कांबळे. 'हिवायात आंगावर घ्याले **रगच** पायजे.' (फा.)

रग (स्त्री.) गुर्मी, मस्ती. 'येवळं पोट्टेईनं झोळ्ळं तरमा **रग** नाई गेली आंगातली.'

रगत (न.) रक्त. 'काटा पायाले रुतते लाल **रगत** सांडते/ हिरव सपन फुलते.' -काया. 'वावराची मशागत कऱ्याले लय **रगत** आटवा लागे.'

रगतपिती (स्त्री.) एक त्वचा रोग, महारोग. 'शेतकऱ्याच्या मांगं कर्जाची **रगतपिती**.' -मिर्झा.१४१. 'आवळीनं केला पती अन् त्याले फुटली **रगतपीती**.'

रगताभांबय (वि.) रक्ताने माखणे, रक्तबंबाळ. 'पटाच्या बैलाले पुराने टोचतात. ढुगनं **रगताभांबय** होतात.' -डेबू.३९.

रगदार (वि.) कस, सत्त्व असलेले. 'बागायत असल्यामुळे ज्वारीचे पीक खूप **रगदार** होतं.' -फीर.१९१.

रगसून (क्रि.रूप.) रागावून, रगेलपणे. 'माझी मधली काकू एवढ्यात **रगसून** म्हणाली. ' -फीर.४९.

रगळा (पु.) पसारा, व्याप. 'दुपार झाली बयना, तरमा कामाचा **रगळा** तसाच पळेल हाय वऽऽ.'

रगाडा(ळा) (पु.) आत्यंतिक कष्टाचा व्याप. 'पोटापान्याचा **रगाडा** मारे झुलोत राहेते.' -मा.४५. 'माया मांग लय **रगाळा** हाय घळीभर रिकामपन नाई.'

रगे(ग्गे)ल (वि.) मस्तवाल. 'असंतसं खायाले नाई चालत लय **रग्गेल** पोरगी हाय.'

रग्गेलपणा (पु.) मस्ती, माज. 'आपला **रग्गेलपणाच** आपल्याले भोयला.' -पाटी.

रघत (न.) रक्त. '**रघत** लागलं बा दाताले, दगडू म्हणाला.' -पख.४७.

रचत (क्रि.रूप.) कल्पनेतून मांडणे. 'माय काहून काहीच्या बाही झोलांड **रचत** आसन ती.' -रा.

रचनं (क्रि.) मांडणे, रचणा करणे, व्यवस्थित लावणे. 'घरकुंडात पोरीसोरी खापराचे भांडेकुंडे **रचून** ठुतात.'

रचला (क्रि.रूप.) मांडला, ठेवला. 'कळबा आनून आखरात गूळ **रचला**.'

रचून (क्रि.रूप.) मांडून. 'पजायावर इटाया **रचूनच** ठुल्या असतात.'

रचेल (क्रि.रूप.) रचलेले. 'गव्हाचे पोते वसरीतच एका दोरीत **रचेल** हायत.'

रचोयेल (क्रि.रूप.) रचलेले, मांडलेले. 'आखरात कळब्याच्या पेंड्या **रचोयेल** हायत.'

रज(जो)ई (स्त्री.) दुलई. 'घामानं गिलगिली माह्या बंधूची **रजई**/ घाला आंगणात वाळू नका उभ्या राहू बाई.' -लोक.१०२. 'आंधनात तं बापा पलंग, गादी, **रजई** सारंच भेटलं जसं.' (का.)

रजाकार (पु.) हैद्राबादच्या निजामाचे शिपाई. 'हे **रजाकार** रात्रीबेरात्री येऊन गावावर हल्ला करत.' -वा.१०७. 'हैद्राबादच्या निजामाच्या **रजाकारांनी** वऱ्हाडातली निजाम सरकारच्या हद्दीला असणारी गावं लुटण्याचा सपाटा लावला होता.'

रजाकारी(ळी) (स्त्री.) मोगलाई. 'हे काही **रजाकारीचं** राज नाही, मनमानी करायले.' -पाटी.

रजामंद (स्त्री.) संमती. 'लगनाची घरून भेटली बापा **रजामंदी**/ घोळ्यावरून यावे कुनीतरी नटूनथटून बसली घरामंदी.'

रट (स्त्री.) तगादा. 'येकाचयेकाच गोठीची **रट** लाव्याची काहीकाहीले सवच असते.'

रटनं (क्रि.) पुढे नेणे. 'पुरं कराचं तं काम पुढे **रटनं** पळतेच.'

रटरट (क्रिवि.) शिजताना होणारा आवाज. 'चुलीवरच्या बटात दाय **रटरट** शिजून रायलती.'

रटरटनं (क्रि.) शिजत असणे. 'इटोल्यावर जर्मली गंज **रटरटत** होता.' -झेल.२१.

रटेल (क्रि.रूप.) पुढे नेलेले. 'पंजाबनं **रटेल** होतं मून हे काम झालं.'

रट्टा (पु.) दणका, झोडपा. 'सारजाबुढीच्या उळतोंड्या बोलण्यावर शामरावने असा **रट्टा** मारला.' 'दांडूक घेऊन म्हसीच्या पाठीवर एक **रट्टा** मारला.'

रट्टाऊ(वू)न (वि.) जास्त, खूप. 'मायनं वाढून देलं नामा

रट्टावून जेवला.' -धग.७४. 'सकाऊनच **रट्टाऊन** जेवलो आता जेवाचं काम नाई.'

रट्टावनं (क्रि.) मारणे. 'बिडीपेताखेपी पोट्टं दिसल्याबरोबर **रट्टावनं** चालू केले.'

रट्टे (पु.अने.) मार. 'धाळतं काय मले बिनभाळ्याच्या घरात, लावतं **रट्टे** खायाले.' -सित.८०. 'नाम्याला ती बदडू लागली. पाठीवर **रट्ट्यावर रट्टे** मारू लागली.' -धग.५.

रट्टेघट्टे (पु.) चांगले वाईट अनुभव. 'एवढे **रट्टेघट्टे** पडूनही शेवटी येरे माझ्या मागल्याच ना भिका सुधारला ना त्याचा बाप.' -वा.५९.

रठ (वि.) टणक, राठ. 'भाजीपाला **रठ** झाल्यावर कोनी इकत घेत नाई.' 'गेंड्यावानी काशीरामची कातळी **रठ** होयेल आये जशी.'

रडा (क्रि.) रडायला. 'काळुबा **रडा** लागला. कोणं मारला त्याले?' -खुं.३९.

रडायलं (क्रि.रूप.) रडू लागले. 'त्या लेकराजवळ ना त्याची माय ना त्याचा बाप. लेकरू एकटंच **रडायलं**, भुकेजलं.' -वा.१५.

रडे (क्रि.रूप.) रडत असे. 'घरातली बाई इंधनासाठी **रडे**/ दासीच्या आवारात सूड चंदनाची पडे.' -लोक.८९.

रड्डाभड्डा (पु.) रडापड. 'लाखाचा पोसिंदा गेला अन् वाड्यात **रड्डाभड्डा** सुरू झाला.' -दि.८७.

रतन (न.) रत्न. 'मोलाच्या सोन्यासाठी चिंधी करावी जतन/ आपल्या भावासाठी वैनी म्हनावी **रतन**.' 'पोरगा निंगला **रतन**/ बाप करे वतन.'

रताऊ(य) (न.) रताळे. '**येकादशीले** रतायाचा शिरा असला की जमलं.'

रत्तल (पु.) चहाचा पुडा. 'जाय अन् दुकानातून चहाचा **रत्तल** घेऊन ये.' (अर.)

रत्ती (वि.) अत्यल्प माप. 'डिग्याची गोठ **रत्तीभर** खरी नाई.' 'धर्माले सोळाव हत्ती, हिसोबात ना सोळाव **रत्ती**.'

रद (न.) रद्द. 'बुढी बिमार असल्यानं म्या गावाले जानं **रद** केलं.' (फा.)

रद (वि.) हीन, कमी. 'आपल्या पोरीमोहरं साऱ्या पोरी **रद** हायत.'

रद्दाड (वि.) उपयोगी नसलेला. 'गोट्यावर कुऱ्हाड लागल्यानं **रद्दाड** झाली.'

रद्दी (स्त्री.) खराब, निरुपयोगी. 'या **रद्दी** इव्यानं कसा काय निंदसीन बे तू?'

रनी - रणात. 'सकाऊनपासनं कुठी **रनी** पळ्याले गेल्ता तू.'

रन्नावनं (क्रि.) १. मस्ती चढणे, माजावर येणे. 'काया वावरात वासन **रन्नावली**, बुढी तन्नावली.' 'गोऱ्ह्याइले ठेचा लागते त्याईचं **रन्नावनं** कमी व्हाव म्हनून.' -मे.२०. 'डफडं चांगलंच तालात आलेलं. **रन्नावलं**. तन्नावलं.' -डेबू.१. २. खूप, जास्त, मोठ्या प्रमाणात. 'ज्या दिसी **रन्नावून** झाकट होती तहापासूनच लगन मांडवात भोंगा सुरू झाला.' -लेक.४१.

रपकन (क्रिवि.) जोरात. 'कोनतरी मायाच पाठीवर **रपकन** काळी मारली.'

रपका (पु.) मार, झोडपा. 'गुरूजीच्या हातचे पयले लय **रपके** खा लागत.'

रपकावनं (क्रि.) मारणे. 'आता आंबे चोरले तं साजरा **रपकाईन** लेका.'

रपके (क्रिवि.) सपाटून, खूप. 'वच्छीन भाजी फोडणी दिल्यावर दोघांनी **रपके** खाल्ली.' -ना.१०६.

रपटा (पु.) १. नाला, ओढ्यावरील छोटा पूल. 'काही बाया रस्त्यावर बांधल्या जाणाऱ्या **रपट्यांच्या** कामावर.' -झेल.५२. 'नाल्यावर **रपटा** असला तं याजाले बरं होते.' २. झोडपा. 'बैल मांगंमांगं रेटे तं येक ओल्या काळीचा **रपटा** दिला लेकाच्या पाठीवर.'

रपरप (क्रिवि.) सारखा, जोरात. 'विजा कडाडल्या. **रपरप** करीत पाऊस सुरू झाला.' -फीर.२७.

रपस (स्त्री.) दगा. 'ज्याच्या जीवावर उड्या, त्यानं दिलीय **रपस**.' -हा.३८.

रपसप (क्रिवि.) १. अवाढव्य. 'नामदेवराव आंगापेंडानं **रपसप** मानूस हाय.' २. जोरजोरात. 'काल लयच **रपसप** पानी पळ्ळं.'

रपाटनं (क्रि.) लावणे, गुंतवणे. 'या गरिबीच्या पाई आपुननं पोरं कामात **रपाटले**.' -फीर.१४९.

रपाटा (पु.) झोडपा. 'आभाळात काळोख दाटला. पावसाचा **रपाटा** सुरू झाला.' -सि.४२.

रपारप (क्रिवि.) जोरजोरात. 'जळतं कांडूक घेऊन **रपारप** दोनचार झपक्यात आडवी पाडाव तिले.' -निशा.२०.

रपे(प्प)ट (स्त्री.) १. थापड. 'तुमचीच पोरगी होय असं आईकता बरोबर येक **रपेट** दिली मुसकाळात हानून.' २. फेरी, चक्कर. 'घोळ्यावर बसून **रपेट** मारून येतो.'

रप्पेस (स्त्री.) पत्त्यातील एक खेळ. 'दोयपारचे आमी मढीत **रप्पेस** खेत बसो.'

रफू(फ्फू) (न.) कापडाचे छिद्र बुजविण्याचे थिगळ. 'भोकंभाकं पळेल जिनगानीले **रफ्फू** करत करत कास्तकार दिवस काढतात.' -मे.७५. 'काटीचा खोसका लागल्यानं **रफ्फू** करनं पळते.' (फा.)

रफतार (स्त्री.) वेग. 'घोळं कुठी लावलं बे आगगाळीइतली **रफतार** काहालेच नस्ते.'

रफात(द)फा (न.) नाहीसे. 'चोरेल सोनंलानं येका सालात **रफातफा** केलं.' 'त्याच्यात भेटला बऱ्यापैकी नफा/ दोन घेतल्या म्हसी केल्या **रफादफा**.' -मिर्झा.१०३. 'पाह्यटी झाडं तोडून रात्रीच **रफादफा** करते ठेकेदार.' -बा.१०१. (फा.)

रबदा (पु.) वर्दळ. 'बगीच्यातल्या हिरिले प्या पुरतं पाणी होतं पुऱ्या गावाचा **रबदा** तिथीसा.' -दि.६५.

रबळी (स्त्री.) दूध आटऊन केलेले मिष्टान्न. 'घरी गायीम्हैसी असल्या की **रबळी** करण्यात उल्लास येते.'

रब्बल (न.) रबर. 'केसाले लावाचं येखांदं **रब्बल** दे बरं नोटाच्या गड्डीले लावाले.' (इं.)

रब्बी (स्त्री.) पावसाळ्याच्या शेवटी उन्हाळ्याआधी येणारे, वैशाखातील पीक. 'खरीप पीक चांगलं झालं. **रब्बीनं** च्याट मारली. त्यात गारगोंड झाल्यानं हरबरा तं सोगाचबी काम नाई पळ्ळं.' (फा.अर.)

रमतगमत (वि.) गप्पा वगैरे करत, आरामशीर, शांतपणे. '**रमतगमत** काम केलं का आठवत नाई.'

रमताराम (वि.) आरामशीर, कुठेही रमणारा. 'भास्करदासारख्या **रमतारामाले** घाईचं काम सांगू नाई.'

रमनं (क्रि.) रमणे, गमणे, करमणे. 'आपल्या अथी रामाचा जीव **रमते**.'

रमलं (क्रि.रूप.) करमले. 'मामाच्या गावात माहा मन **रमलं** होतं.' (अर.)

रमले (क्रि.रूप.) गुंग झाले. 'तिने पुस्तकाच्या झोऱ्यातले चिचोके काढून घट मांडले, बहीण भाऊ त्या खेळात **रमले**.' -एक.

रमी (स्त्री.) पत्त्यातील एक खेळ. 'राती गनशा **रमीत** लय हारला लेका.'

रमोनी (वि.) रमविणारी. 'आपली जांभाची वाळी मस्त मन **रमोनीच** हाय.'

रम्पुट (न.) फेसकट पडणे. 'नांगरन म्हटलं का मान्साचं पुरं **रम्पुट** पडते.'

रयपट (स्त्री.) चापट. 'येक मुसकाळात **रयपट** हानली जोऱ्याची.'

रयपाट्या (वि.) मोठा, भव्य. 'शामराव बाप्पू लयच **रयपाट्या** मानूस आये, जंबोच्या जंबो.'

रया (स्त्री.) कळा. 'लेकरं शिकले त त्याहीची **रया** बदलून जाईल.' -सि.११६. 'म्हातारी होती तोवर बरं होतं. ती गेली आन् घराची **रयाच** गेली सबन.'

रयारया (स्त्री.) हालहाल. 'बारकीचिरकी पोरं अन्नासाठी **रयारया** होऊन दारोदारी फिरतील'

रवखानं (क्रिवि.) रोखाने, दिशेने. 'हिम्मत धरून दीना अवाजाच्या **रवखानं** दाहा पांड मवरे गेला.' -सित.४८.

रवन (पु.) रात्रीची वेळ. 'रातचा **रवन** त्यात कीर्र अंधार.' -सित.५३.

रवरवनं (क्रि.) गलबलणे. 'ते मुकीच रायली तिचा जीव अंदरल्याअंदर **रवरवून** आला.' -लेक.३१.

रवंद (न.) पुन्हा पुन्हा चावण्याची क्रिया, रवंथ. 'बैल मानगी हाय काय लेक **रवंदबी** नाई करून रायला.'

रवंदळी (स्त्री.) तुडवण. 'फुलांची या **रवंदळी** फुलविता कशी कळी?' -भीक.१०८.

रवा (पु.) गव्हाच्या कणांची पूड. 'किंबहुना जैसे पांडवा। सोनेचि सोनयाचा **रवा**॥' -ज्ञा.१३.८९४. 'जैसा सैंधवाचा **रवा**। सिंधूमाजीं पांडवा॥' -ज्ञा.१४.३९३. 'उल्साक **रवा** भाजला. पोरासाठी शिरा केला.'

रवाटनं (क्रि.) खपणे, कष्ट करणे. 'हंगाम येईस्तोवर आता सांज सकाळ वावरातच **रवाटा** लागलं मले.' -बा.९४.

रवाटून (क्रि.रूप.) खूप राबवून. 'मजुरी कमी पन **रवाटून** घेनं कसंच्या कसंच.'

रवानगी (स्त्री.) प्रस्थान, प्रयाण, पाठवणी. 'पावन्याईची **रवानगी** केली का मी मोकयाच आवो मंग.' (फा.)

रवाना (पु.) पाठवणी, निघालेला, पाठविलेला. 'आताच पावने **रवाना** केले अन् ठायकेच आंग टाकलं.' (फा)

रवाय (क्रि.रूप.) रोवण्यासाठी. 'तो यंका काही उद्या येणार नाही. तोरणाचे जाळे **रवाय**. तुम्हीच मारुतीपुढं आपल्या वाट्याचे दोन जाळे **रवा**.' -वा.३९१.

रवैया (पु.) वागणूक, पद्धत. 'जवाई चांगला हाय म्हनता राजा तरमा मलेकानी त्याचा **रवैया** काई बरोबर नाई वाटत.' (फा.)

रसरस (न.) कंटाळवाणे, कणकण. 'हप्ताभर झालं, पानी निऱ्हा चालूच हाय. घरात बसून आंग **रसरस** झालं.'

रसाई (स्त्री.) आंब्याच्या रसाचा मोसम. 'सकाऊन रस, संध्याकाई रस, रसच रस, त्यालेच म्हंतात **रसाई**.' -डेबू.५५.

रसातळ्या (क्रिवि.) वेदनेची पराकाष्ठा. 'त्या लहान लेकराचा जीव किती **रसातळ्या** गेला असेल मार खाऊन?' -पख.४४.

रसीद (स्त्री.) पावती. 'कोनाच्याबी वावरातले शेंगाभेंडं आन्याची गुरूजीनं **रसीद** फाळेल अस्ते जशी.' (फा.)

रसुली (स्त्री.) फोड, एक व्याधी. 'त्याच्या डोक्यावर **रसुली** झाल्यागत सुपारी एवढं बेंड होतं.' -ना.३२.

रसोई (स्त्री.) १. स्वयंपाक. २. स्वयंपाक खोली. 'शकूचा अवघा दिवस **रसोईतच** जाते.'

रसोडा (पु.) स्वयंपाक घर. 'रात न् रात होते तरी आमचा **रसोडा** सुरूच रायते.'

रस्तासुदरनं (क्रि.) चालू, मार्गी लागणे. 'बुढी त्याच्यावर खेकसली जारे **रस्ता सुदर** ना मुडद्या तुहा.' -अंधा.

रस्तोरस्ती (क्रिवि.) प्रत्येक वाटेवर. 'कुठी बस्याले **रस्तोरस्ती** झाळ ना झुळूप.' (फा.)

रस्म (स्त्री.) परंपरा रिवाज. 'देन्याघेन्याची **रस्म** पुरी करून पोरगी उजवून टाकली.' (अर.)

रस्सी (स्त्री.) बारीक दोरी. 'पोत्याचं तोंड बांद्याले **रस्सी** झांबलून रायलो.'

रहदारी (स्त्री.) वाहतूक. 'राती बारा वाजेलोक रोडनं **रहदारी** रायते.'

रह(हे)म (स्त्री.) दया, कृपा. 'चुकी झाली हातून, **रहेम** करा मायबाप.'

रह(हे)मदील (वि.) दयाळू. 'मानूस **रहेमदील** असला तं त्याले सारेच च्याहतात.' (अर.)

रहाटगाडगं (न.) विहिरीतून पाणी काढण्याचे डब्यांचे चक्राकार साधन. 'तुका म्हणे माळ गुंतली **राहाटी**। **गाडग्याची** सुटी फुटलिया॥' -तुका.१४३५.

रहिशी (स्त्री.) श्रीमंती, रुबाब. 'कमाणदार भिवया आणि पिळदार मिशा पाहताना त्यांचा **रहिशी** उमदेपणा मनात भरत होता.' -कात.२७८.

रहीत (न.) रद्द. 'पोट्टं बिमार पळ्ळ्यानं गाळी घ्याचं **रहीत** केलं राजा.'

रंग (पु.) १. वर्ण, रंग. 'गोऱ्यापान **रंगाच्या** पोरीले तं काईबी दंडते.' २. मूळ गुण. 'लग्न झाल्यावर चार दिवस सुखाचे गेले नंतर नवऱ्यानं आपला **रंग** दाखोनं सुरू केलं.' (फा.)

रंगढंग (पु.) गुण, कला कौशल्य. 'किती किती ग। अंगी त्याच्या भरुनि **रंगढंग**/ भुरळ पाडुनि तो भुलवी सरळ अंतरंग.' -भीक.७६.

रंगणे(नं) (क्रि.) पाण्यातील मासळ्यांच्या क्रिडा. 'पाण्यात पाठ फिरवून **रंगणे** मारताना क्षणात होणारी माश्यांची चांदीसारखी पलट लक्ष वेधून घेई.' -कात.१५. 'एखाद्या दिवशी तिच्याविषयीचा त्याचा लाड असा **रंगण्या** येतो.' -पाटी.८५. 'धुईमातीत **रंगनं** कोनाले चुकते?'

रंगत (स्त्री.) मौज. 'वरनावर गावरान तूप असलं का **रंगत** येते.'

रंगत (क्रिवि.) तल्लीन, मग्न, गुंग. 'रात चढत गेली तसं भजन **रंगत** गेलं.'

रंगदंग (पु.) नखरे. 'काजळ, उलटा भांग, केले सारे **रंगदंग**.' -लोक.४३.

रंगदानी (स्त्री.) पोत्यावर नाव टाकण्याचे साधन. 'अळतीत माल उतरला का मापारी **रंगदानीनं** नाव लिये रमेश कास्तकार हिंगनी.'

रंगबाज (वि.) आनंद घेणारा. '**रंगबाज** मानूसच मौजमजेनं राहू शकते.'

रंगबाजी (स्त्री.) श्रेष्ठत्वाचे प्रदर्शन. 'सरपंच झाल्यापासून तो लयच **रंगबाजी** करून रायला.'

रंगरंगोटी (स्त्री.) नक्षी वगैरे, रंगकाम. 'दिवाईले घराले **रंगरंगोटी** केली.'

रंगली (वि.) रंगलेली. 'धुईमातीच्या रंगानं कसा पदर भिजते/ **रंगली** भोई सुरत तुई माया डोयात निजते' -नोका.

रंगारी (पु.) रंगकाम करणारी एक जात. 'गेला कपड्याचा रंग पुन्हा देईल **रंगारी**/ आला चौऱ्याशीचा फेरा नरदेह गेल्यावरी.' -रुक्मि.८८.

रंगिला (वि.) हौसमौज, रंगबाजी करणारा, रंगेल. 'हात टाकताना माझ्या प्रीतिने गळ्यात/ सांगू काय **रंगील्याची** एकएक रीत.' -भीक.७५. 'सदू सदाई हासतच रायते, लय **रंगिला** पोट्टा.'

रंगून (क्रि.रूप.) रमून. 'वसुदेव भजनात **रंगून** जाते.'

रंगेल (वि.) विलासी जीवन जगणारा. 'शामरावले तमाशाचा लय भारी शोक. लय **रंगेल** मानूस.'

रंज (पु.) व्यथा, दुःख. 'गडगंज संपत्ती असूनही बापूले एका गोष्टीमुळे **रंज** पैदा झाला होता.' -कात.२७.

रंजीस (वि.) १. दुःखी, थकलेला. 'सुनीपाई बुडीचा जीव **रंजीस** आला पाय.' २. भंडावून सोडणे. (फा.)

रंजोनं (क्रि.) १. गांजणे. 'सुनच राजा सासूले **रंजून** रायली.' २. करमणूक करणे. 'जीव **रंजोनं** असील तं तमाशात जावाव.'

रंडका (वि.) एकटा, पत्नी नसलेला. '**रंडक्याले** काय बाप्पा, मांगं ना पुळे अन् धुळ्ळा उळे.'

रंडकाळ (वि.) एक शिवी, वेश्या. '**रंडकाळीनं** सतीसावितरीच्या गोठी सांगू नये.' 'ते **रंडकाळ** लय अज्जात आय बरं.'

रंडकी (वि.) पती नसलेली, विधवा. '**रंडकी** बाई असली का मदत करावं, तरास ना द्यावं.'

रंडरू (वि.) विधवा. 'तुह्या मायची मी **रंडरु** तं. थांब दावतो तुले असं दातओठ खात तो निंघाला.' -पख.३९.

रंडवा (वि.) विधूर. 'हातानच भाकरतुकळा करा लागते

रंडव्या मान्साले.'

रंडवाय (वि.) विधवा. 'दोन लेकरं वागोनं **रंडवाय** बाईले भारीच जाते.'

रंडवी (वि.) विधवा. 'मैना **रंडवी** बाई, तिच्याच भवती आलं सारं.'

रंडव्या (वि.) एक शिवी. 'चाल **रंडव्या**, माई आन नोको खाऊ.' -धग.१५४.

रंडी (स्त्री.) १. वेश्या. २. कोणी एक स्त्री. 'इंधनाले **रंडी** येत जायं तं पोट्टईले निन्हा हागोनाच लागल्या होत्या. घेतलं टपर का निंगले.' ३. पत्त्यातील राणी. 'तुया गुल्ल्यावर हे घे माही **रंडी**.'

रंडीखाना (पु.) वेश्यालय. 'अरे हे घर होय का **रंडीखाना**. पदर त सावरत जा पोट्ट्याईहो.'

रंडीबाज (वि.) वेश्यागन करणारा, स्त्रीलंपट. 'जुने मान्सं होते **रंडीबाज**. बयरमच्या जत्रेत दोनतीन दिवस मुक्काम करत.' (फा.)

रंद (पु.) पू. 'आणि धूमकोनि हाणौनि वर्णू फोडिलाः गोसावी **रंदासि** तोडलेः' -गोवि.४४. 'फोडातून जसा निंघून गेला **रंद/** परसाकडचा सारा त्रास झाला बंद.' -मिर्झा.११५.

रंधा (पु.) सुताराचे लाकूड गुळगुळीत करण्याचे साधन. 'माहा सारं लक्ष राहे माह्या धंद्यावर/ वाड्यासारखं वासल्यावर **रंध्यावर**.' -मिर्झा.११६. 'खळबळ लाकूळ **रंधा** मारून चिकनचोपळं केलं.' (फा.)

रंधावन (न.) स्वंयपाक खोली. 'ऐसे दोही आळी जेतुकी **रांधवनघरे** तेतुकेया घरा ऐकुदी आरोगण होएः' -ली.२८. 'पिठामिठाचे डब्बे **रंधावनातच** पायजे.'

रंधावनी (स्त्री.) स्वंयपाक घर. '**रंधावनीच्या** भाईर बाईचं निंगनचं होत नाई.'

रंधावन्या (वि.) बायकी पुरुष. 'मान्साईत बस्याची त्या **रंधावन्या** शामाले कुठी सवळ भेट्टे.'

रंपूट (न.) लहान दांडा. 'पुरानं दिसून नाई रायलं तं येखाद **रंपूट** तं पायजे भरतीच्या बंडीवर.'

राई (स्त्री.) मोहरी. '**राई** राईपण बीजीं। सांठवूनियां अंग त्यजी॥' -ज्ञा.१४.२५६. (का.)

राकट (वि.) धष्टपुष्ट, ताकतबाज, कणखर. 'बंदीतले खोळं काळाले **राकटच** मानूस पायजे.'

राक्केस (पु.) राक्षस. 'भ्रष्टाचरी **राक्केसायचा** करून टाका संहार/ मंगच या देशाचा होईन देवा उद्धार.' -चंच. 'कसा **राक्केसाच्या** अवलादीचा असन तं कोन जाने माय.' -धग.११३.

राक्केसीन (वि.) राक्षसी. 'लेकराच्या कणवेनं महादेव बिथरायचा तिच्यावर, तू **राक्केसीन** आये, मारून तरी टाक थ्या पोट्याले.' -धग.४०.

राक्सेसाच्या पोटचा (वि.) एक शिवी, दुष्ट, क्रूर. 'सम्दा चारा जाळून खाक केला रे...कोण्यातरी **राक्सेसाच्या** पोटच्यानं दावा साधला.' -त.७०.

राख (स्त्री.) वस्तू जळल्यावर राहिलेली पूड. 'मग थाळेयाति **राख** लावलीः बरवा चोखटु धुतलाः' -गोवि.३७. 'कळब्याचा अख्खा गूळ जऊन **राखराख** झाला.'

राखत (क्रि.रूप.) रखवाली करत -असे. 'तयाचा दारवंठा ब्राह्मण **राखत** असतिः' -दृ.५७.

राखन (न.) रक्षण. 'गोसावी येती तरि पाक परीछेदु करीतिः नासीतिः म्हणौनि साधे **राखण** ठेवीलीः' -गोवि.१८०. 'मीच मज **राखण** जालों। ज्याने तेथें चि धरिलों॥' -तुका.७०१. 'वानेराईपासून वावराचं रातदिवस **राखन** करनं पळते.'

राखनं (क्रि.) रक्षण करणे. 'भीक्षा का मागत असा? कोण्हाचीया गाइ का **राखा** ना?' -ली.६०. 'जी जीः तीए मज नीगो नेदीतिः दारवठां **राखणे** घातलिः बाहिरे नीघोः नेदितीचिः' -ली.३७२.

राखनदार (पु.) रक्षण करणारा. 'येवळी पराटी फुटली तरमा **राखनदार** नाई ठुला.'

राखनवट (स्त्री.) राखणीचे काम. 'मी पडली पोर्गी गोंडीन, गायकीन गोहनाच्या **राखनवटीवर** पोट पोसणारी.' -पोळा.

राखनी (स्त्री.) राखण करण्याची मजुरी. 'हप्ता झाला तरमा **राखनी** नाई देली. आता काहाले वावरात जातो जागल कऱ्याले.'

राखन्या (पु.) रक्षण, राखण करणारा. 'रामद्रणेनि चहु वाटा **राखणे** घातलीः दोघं दोघंः' -ली.७७. 'येक पोरगा वावरात **राखन्या** म्हनून काम करते, माहा.'

राखरांगोई(ळी) (स्त्री.) सर्वनाश. 'ढोरं घुसले पिकात सबन **राखरांगोई** केली.'

राखळ (स्त्री.) राख. 'भांडे उट्याले गवऱ्याईची **राखळच** लागते.'

राखी (स्त्री.) रक्षा. 'भावाले **राखी** बांध्याले बईनीचा जीव हरखीजेल असते.'

राखीपोरनिमा (स्त्री.) रक्षाबंधन. 'दर **राखीपोरनिमेले** माया भाऊ नेमानं येत जाय. लगन झालं तापासून नाई येत.'

राखून (क्रि.रूप.) सुरक्षित ठेऊन. 'तुले लग्नाले लागले तं पाचदा हजार **राखून** ठुले म्या.'

राखोई (स्त्री.) राखन करणे. '**राखोईच्यासाठी** झाल्या कुपाले कुपाटी.' (बहिणाबाई)

राखोळा (पु.) राखड. 'गावात आग लागली जरा, **राखोळा** गाव जऊन झालं.' -काया.

राखोंडी(ळी) (स्त्री.) गोवरीची राख. 'देखें अग्नि विझोनि जाये। मग जे **राखोंडी** कवळु होये॥' -ज्ञा.५.२३. 'काय **राखोंडी** फुंकिता। दीपु लागे॥' -ज्ञा.९.४९७. 'आजीनं चुलीतली **राखोंड्याची** चिमूट घेऊन लेकराच्या डोसक्याले, पोटाले लावली.'

रागट (वि.) रागीट, संतापी. 'लेकराले येवळं मारतात का बाप्पा. तुयावानी कोनी **रागट** नाई पायला.'

रागटपना (पु.) संतापी वृत्ती. 'जिवून घे मुकाट्यानं **रागटपना** करून उपासी नको झोपू असं भरल्या घरात.'

रागरंग (पु.) स्थितीचा अंदाज. 'डेबूनं **रागरंग** पाहून विचारलं.' -डेबू.३४.

रागंरागं (क्रिवि.) संतापात, रागात. 'जरासक पोट्ट्याले बोल्लं का पोट्टं **रागंरागं** घरातून निंगून जाते.'

रागेजनं (क्रि.) रागाविणे. 'हेच तर हये तुहं. **रागेजतंबी**, चोंभाळतंबी.' -रा.२०८.

रागोनं (क्रि.) रागाविणे. 'लान लेकाराले हरहमेस्या असं **रागोनं** बरं नस्ते.'

राघू(घो) (पु.) पोपट. 'जीव मयनाचा **राघोनं** गोठीगोठीत गोयला.' 'मया जीवाच्या **राघूनं** कुठी मारली भरारी.'

राच्चं (क्रिवि.) रात्रीचे. 'आता **राच्च्या**-इराचा कुठी चाल्ला इच्चू काट्याचा?' -खुं.२०८.

राज (पु.) १. रहस्य, मर्म, गुपित. 'म्या जर का तुयं **राज** खुलं केलं ना तं तुया कोनीच वाली नाई.' २. डाव. '**राजी** आले नाव। फेरा न चुकेची धाव॥' -तुका.२०१. २. बांधकाम करणारा कुशल कारागीर. '**राज** साजरे भेटल्यानं मकान मस्त बांधल्या गेलं.'

राज (न.) राज्य. 'या **राजात** कोणीच सुखी नाई.' (फा.)

राजकाम (न.) बांधकाम. 'राजासंगं जाऊजाऊ **राजकाम** शिकलं माय लेकरू.'

राजन (पु.) मातीचा मोठा माठ. 'सातरा घेउनि **राजणी** घातलाः **राजणासि** वीटाळु केलाः' -गोवि.१६. 'बसकोळ्या घागरी। डेरे रांजण गाडगी॥' -तुका.४१९. 'उन्हायात झाळा खालच्या **राजनातलं** पानी पिऊशान वाटते.'

राजनी (स्त्री.) लहान माठ. 'जुने लोकं **राजनीतच** मीठ भरून ठूत.'

राजमा (पु.) एक पंजाबी द्विदल धान्य. 'आता आता वऱ्हाळतई **राजमा** आला.'

राजरोस (अ.) दिवसाढवळ्या. '**राजरोस** चोरीचपाटी करतात भोसळीचे.' (फा.)

राजी (स्त्री.) मान्यता, होकार. 'कशी गं होशिल खाया **राजी**/ सात दिवसांच्या शिळ्या कण्या.' -भीक.१५०. 'ओवीत मन गुरफटलं ते बाहेर पडायला **राजीच** होत नाही.' -डेबू.३५. 'येक नाई दाहा पोरी पसन करतीन फक्त तुमची **राजी** पायजे.' -सित.६३. (अर.फा.)

राजीखुशी (वि.) आनंदात. 'हेंगेतेंगे करतकतर दीळक वरीस **राजीखुसीत** भुर्रकन निंगून गेलं.' -सित.६८.

राजेशाही (स्त्री.) वैभवशाली. 'माझ्या जातीतलं पाहण्यातलं हे पहिलं **राजेशाही** थाटाचं लग्न.' -फीर.८१.

राजोट (स्त्री.) कारभार पाहण्याचे कार्य. 'अमृताले सर्व्या गावाची **राजोट** येते पन घरी दिवा नाई लावत.' -भं.३७.

राजोट्या (वि.) कारभार करणारा. 'वाळ्यात गजाभाऊ **राजोट्या** मानूस हाय.'

राज्या (संबो.) एक संबोधन. 'समाजाची सेवा कऱ्यासाठी कोण राजकारण करते **राज्या**.' -धुम्म. 'काया **राजा**, काई गोठ करता तुमी तं?'

राठिया (पु.) आदिवासी जमात. 'सातपुळ्यात गुरेढोरे पाळणारी **राठिया** जमात आहे.'

राठोळ (पु.) एक जमात. '**राठोळाईची** जमात रजपुतातचं गनल्या जाते.'

राणीराऊताणी (स्त्री.) राजाराणीसारखी वैभवाची, सुखाची स्थिती. '**राणीराऊताणी** ही हातची नसते हे मलाही कळते तरीही मन आशा करतेच.' -कात.६.

रात (स्त्री.) रात्र. 'सूर्योदयासरिसा। **रात्री** पळोनि जाय आपैसी।' -ज्ञा.१५.२९०. 'झोपा लागलं बाहीर. **राती** पाणी आलं नाही. नाही तं केवढ्या व्हतं.' -ऊन.१७२.

रातअंधारी (स्त्री.) रात्री न दिसणारा डोळ्याचा आजार. 'बैलाले **रातअंधारी** असल्यानं गड्डेगाड्डे काई दिसत नाईत.'

रातचांदण्या (वि.) रात्री ज्याला दिसत नाही असा. 'वाड्याच्या रखवालीले माणूस पाय कसा धुंडला **रातचांदण्या**. उरावरतून कोनी गेलं तं दिसाचं नाई.' -दि.५९.

रातच्या पायरी (क्रिवि.) रात्रीच्या वेळेस. 'चोर **रातच्या** पायरीच कापूस येचतात.'

रातच्यारोनी (क्रिवि.) रात्रीच्यावेळी. 'बरं कुठी जात असतील लेकाचे एवढ्या **रातच्यारोनी**?' -ना.७३.

रातदिवस (अ.) रात्रंदिवस. 'आपून लेकाचे **रातदिवस** टोले घेतो.' -ना.२७.

रातबेरात (क्रिवि.) अपरात्री. 'वावरात तं **रातबेरात** चक्कर टाका लागते.' (फा.)

रातीबेराती (क्रिवि.) अपरात्री. 'आता एवढ्या **रातीबेराती** कुठी जातं बावा घरसोळून.'

रातोरात (क्रिवि.) एकाच रात्रीतून. 'निरूप आला तसा बुढा **रातोरात** पोरीच्या घरी गेला.'

रानभर (वि.) विपुल, पुष्कळ. 'चंगळ, चांगलं चांगलं खायाप्याची **रानभर** झाली व्हती नाना बुड्याची.' -सित.६९.

रानगवरी (स्त्री.) रानातील गायी, म्हैशीचे सुकलेले शेण. 'विटा आनून चूल केली. चारदोन काटक्या, काळ्या, **रानगवऱ्या** आनून चुलीजोळ ठेवल्या.' -लेक.८.

रानगाय (स्त्री.) जंगली गाय. 'जंगलंच नाई रायले त काहाचे मोर अन् काहाच्या **रानगाया** बावा.'

रानडावा (पु.) खेळी, कावा. 'उद्या त्यानं तुह्यासंग एखांदा **रानडावा** खेळला त तुहा जीव जाईन. ' -पख.२३.

रानपालवी (स्त्री.) जंगलातील नवती. 'चैत्रापूर्वीच ही **रानपालवी** अधिक मिजास मिरवू लागली.' -झेल.२५.

रानबाऊ (वि.) फक्त शेतीत लक्ष असलेला. 'गावातील उलाढाली संभाला माहीतच नव्हत्या तो आपला **रानबाऊ**. वावर अन् घर याच्याशिवाय तिसरं काही माहीतच नाही त्याला.' -वा.३२२.

रानबोका (वि.) लठ्ठ, फुकटचे खाणारा. 'फुकाचे खाऊन मस्तवाले **रानबोके**.' '**रानबोके** खाता अन् मिजास दाखोता? हॉटेलवाला चिडला.' -सि.४२.

रानभेंड (न.) रानात उगवणारी भेंडी. 'तांदुळीच्या कन्नोरात फांजीची, **रानभेंडाची**, अंबाडीची भाजी उकडून टाकायची.' -फीर.१८५.

रानवा (पु.) धनगराकडून गावकऱ्याना दिलेली कंदुरी. 'त्याच्या विचारांनी **रानवा** घेतला होता.' -ऊन.६९.

रानवांगे (न.अने.) जंगलातील वांगे. '**रानवांगे** काहाले इकत आनले? आपल्या धुऱ्यानं तं हायत ना?'

रानशेणी (स्त्री.) सोकलेले शेण. 'शेणाचे पोवटे तसेच्या तसे जागच्या जागी वाळले तर **रानशेण्या** तयार व्हायच्या.' -खुं.२२४.

रानहेला (पु.) रानातील रेडा. '**रानहेला** जाळीत घुसावा तसा म्हैसा पालात घुसला.' -सि.१२.

रानीछाप (वि.) राणीचा छापा असलेले नाणे. 'छन्न **रानीछाप** झेलनारानं वावरं सोंगाले कणसं खुडाले जाव?' -मोती.

रान्नी (स्त्री.) रांधणी. 'जाय बरं, **रान्नीतून** जल्मनी गंज आन मांगून.' -धग.२६.

रापी (स्त्री.) चांभाराचे हत्यार. 'झाडाच्या बुडाला टेकून चांभार **रापी** चालवायचा.' -काळी.९.

राब (पु.) दरारा. 'लेकावानी लेक तरमा बापावर **राब** दाखोत रायते बुहाऱ्या खानीचा.'

राब (न.) कष्ट. 'आमी तं रातदिवस राबराब **राबतोच** बापा.' (फा.)

राबता (स्त्री.) वर्दळ, आवकजावक. 'वाळ्यात लोकाईचा सारखा **राबता** रायते.' (फा.)

राबनं (क्रि.) कष्ट करणे, जमिनीची मशागत करणे. 'जया प्राणाचे घरी। अंगे **राबते** भाऊ चारी॥' -ज्ञा.१३.२८. 'न पेरितां सैंघ तृणें। उठती तैसें साळीचें होणें। नाहीं गा **राबाउणें**। जयापरी॥' -ज्ञा.१८.९५. '**राबनं** त्याचच पीक घेनं असते.' (फा.)

राबस (क्रि.रूप.) कष्ट करीत होतीस. 'राबायची मा तू दिवसभर. वावरात **राबस** तुहा जीव आमच्यात नाई.' -धुम्म.

राबून (क्रि.रूप.) कष्ट करून. 'आयुक्शात **राबून** पैसा कमावला अन् संसार साजरा केला.'

राबोनं (क्रि.) कष्ट करून घेणे. 'सावतर लेक हाय म्हनून काय झालं असं **राबोनं** चांगलं नाई बयना.'

रामकाटी (स्त्री.) सरळ वाढणारी बाभूळ. 'वावराच्या धुऱ्यानं **रामकाटीची** सावली शिदोरीमिदोरी खायाले चांगली होती.'

रामजाने (वि.) कुणास ठाऊक. 'राती गावात काय झालं **रामजाने** बॉ!'

रामटोला (पु.) बोचणारे बोल. 'यालेच ढकला पुरात हा शिपायाचा **रामटोला** म्हाताऱ्याच्या वर्मी बसला.' -काबू.

रामनोमी (स्त्री.) रामनवमी. '**रामनोमीले** जत्रा अस्ते ना माया माहेरात. रामाचं देवूळ हाय ना तथी.'

रामपहार (स्त्री.) सकाळ, प्रभात. 'उगवता **राम पहारा**, सुटला शीतल पहाटवारा.' -भीक. ९५.

रामपाह्यरी (क्रिवि.) पहाटे. 'नळ आले त अशा बटक्या लोकाह्यचे **रामपाह्यऱ्यात** तोंडं तरी पाहायची वेळ येणार नाही.' -पख.१९.

रामभरोसे (वि.) परमेश्वराधीन. 'वावरात कोन जाईल राखन कऱ्याले आपलं काम **रामभरोसे** अस्ते राजा.'

रामरगाडा(ळा) (पु.) कामकाजाचा व्याप. 'अथुल्ल्या लळक्या **रामरगाळ्यातून** मोकया होईन माहा लेक.' -सित.१९.

रामरट्टा (पु.) प्रभावी इलाज, समज. 'एकडाव **रामरट्टा** देल्याबगर समजनार नाई त्यो.'

रामराम (पु.) नमस्कारासाठी वापरावयाचे देवाचे नाव. 'आम्ही जातो आमुच्या गावा। आमुचा **रामराम** घ्यावा॥' -तुका.४४४८.

रामरोठ (पु.) जाड भाकरी. 'तिनच दिसाचा सयपाक, थोबी व्हते तिले भारी/ अशी **रामरोठ** थापते कळोनी जातात भाकरी.'

राय (स्त्री.) १. राळ. 'चिळीभोरीच्या चालीनं असी रात उतरली/ उद **रायीच्या** वासानं घरीदारी पसरली.' -वि. 'जयत्या गवरीच्या खांडावर **राय** टाकून देवाले धूप दाखोला.' २. सल्ला. 'आपून कोनाले **राय** मांगत नाई अन् देतबी नाई. मनाले वाटील तसं **रायतो**.'

राय (क्रि.रूप.) राहा. 'माय वऽऽ, तू घरी **राय** आमी जातो निंदाले.'

रायजो (क्रि.रूप.) राहाशील, राहावे. 'तुहं मन अशीन तं चार रोज माहेरी जाऊन **रायजो**.'

रायत (क्रि.रूप.) राहात. 'आमाले वावरात धाळत अन् सासूसासरे घरीच **रायत**.'

रायतं (न.) लोणचे. 'खांडी करावे म्हणेः **राईते** करावे म्हणेः' -गोवि.१८०. 'हे असो उगे आगितें। म्हणे तैसे **राईते**। पढियें प्राणापरौते॥' -ज्ञा.१७.१४७. 'क्षीर मागे तया **रायतें** वाढी। पाधानी गधडी ऐशा नांवे॥' -तुका.२४०४. 'चिचाबोरानं तोंड करा गोड अन् तोंडी लावा **रायत्याची** फोड.' -गागा.

रायनं (क्रि.) राहणे. 'मामाच्या घरी उनायात दोनदोन मयने **रायनं** पळे.' '**रायनं** आच्या रोज जाजो सकायपर्वा.'

रायनी (स्त्री.) राहण्याची, पेहरावाची पद्धत, रीत. 'मानूस गरीब असो का शिरिमंत असो **रायनी** शाबूत पायजे.'

रायनीमान (न.) राहण्याची पद्धत, रीत. 'बापा, नवकरी लागली तं तुयं **रायनीमानबी** बदल्लं लेक.'

रायलं (क्रि.रूप.) राहिले. 'आवरता-आवरता धुरकऱ्याच्या तोंडाले फेसरी ना आली तं **रायलंच** काय?' -सित.१२१. 'तुहं **रायलंसुयलं** सामायेन पाठवून देऊ मांगून.'

रायलता (क्रि.रूप.) राहिला होता. 'मले पाहून गालातल्या गालात मुगऱ्यामुगऱ्या हासून **रायलता** तो.' -सित.१२४.

रायलती (क्रि.रूप.) राहिली होती. 'आत्याच्या भेटीले मोठ्या वाड्यात गेली तं बुढी तिची वाटच पाहून **रायलती**.' -लेक.३२. 'आठ रोज मी मामाच्या घरीच **रायलती**.'

रायला (क्रि.रूप.) राहिला. 'कारे होंडा बैल नाई आनला चाऱ्याले का घरीच **रायला**?'

रायलो (क्रि.रूप.) राहिलो. 'गावात शाळा नोती तं मी अनपळ **रायलो**.'

रायेल (वि.) लोकात वावरलेला, लोकव्यवहार जाणणारा. 'दादाराव पाटील **रायेल** मानूस हाय. सोयरिक संबंधातला जानकार मानूस हाय.'

रायेल (क्रि.रूप.) राहिलेला. 'घोळेगावाचा पावना काय? अंऽऽ तो तं आपल्या घरी आठ रोज **रायेल** हाय.'

राव (वि.) राजा, सन्मानदर्शक संबोधन. '**गोविंदराव**, **नामदेवराव**, नागोराव सारेच आल्ते काल.'

रावकळी (स्त्री.) वैभव, श्रीमंती. 'धनमंतरावच्या राज्यात **रावकळी** चढतीबढतीला पोहचली.' -कात.५१८.

रावटी (स्त्री.) कापडाची पाल, झोपडी. 'बयरमच्या जत्रेत येकयेक मयना **रावटी** टाकेल राये आमची.'

रावसायब (पु.) देशमुखांमध्ये जावयासाठी वापरावयाचे संबोधन. 'पोरगी अन् **रावसायब** कालच आले लगनासाठी.'

रावाव (क्रि.रूप.) राहावे. 'तिले जसं वावरात जावाव वाटे ना, धाऊधाऊ घरीच **रावाव** वाटे.' -लेक.४५.

राशी (क्रिवि.) अनुकूल, प्रसन्न. 'आपून कोनाच्याबी कामी पळतो तरमा आपल्याले कोनी **राशी** नाई राजे हो.'

राष्ट्रान (पु.) मुलूख, परिसर. 'हरणाचे अनेक कळप या **राष्ट्रानात** शेतीचा तुडवा करत फिरतच होते.' -खुं.५६.

रास (स्त्री.) धान्याचा ढीग. 'माझा जोंधळा बरवा पीकावाः **रासि** घरासि यावीः' -गोवि.१५०. 'आणि कणांचा आपैसा। **राशिला** जोडे॥' -ज्ञा.९.४५. 'पहिली लक्ष्मी घरात आली ती धनधान्याची **रास** घेऊनच.' -मोती. (फा.)

रासणी(नी) (स्त्री.) पेरलेले बियाणे झाकण्यासाठी माती लोटण्याची प्रक्रिया. 'तिफणी मांघं **रासणीसाठी** वखर नाही का लागत?' -सेल.३४. 'सुभानराव अन् खंडू **रासण्या** मोडायसाठी तिफणीच्या मांगं वखर हाणायचे.' -बा.९१.

रासी (वि.) लग्नापूर्वीचा वर निघण्याचा विधी. 'नवरदेव सजोयेल घोळ्यावर, सामने बँडबाजा लावून **रासी** निंगाला.' -लेक.४२.

रासोंडा (पु.) खळे संपल्यावरचे जेवण. '**रासोंडा** म्हनून कोंबडाही रांधला.' -मिर्झा.१९०. 'ज्वारीची रास खळ्यात पडल्यावर राती गोड जेवण, याला **रासोंडा** म्हणायचे.' -जटा.११. 'खळ्यावर ना **रासोंडा** व्हत, ना खंळपूंजन व्हत.' -बा.६६.

रास्त (वि.) योग्य, वाजवी. 'तुही माही दोस्ती येव्हार ठेवा **रास्ती**.' 'तुमाले हा बैल **रास्त** भावात भेटला.' (फा.)

राहाट (न.) पाणी काढण्याचे चक्राकार साधन. '**राहाटी** घडी बांधली असेः ते येः जायेः करे रीचवेः' -ली.३८७.

राहाटी (स्त्री.) रीत. 'जग **राहाटी** सोळून वागता नाई येत भौ.'

राहाय (क्रि.रूप.) राहावे. 'काय घाई लावली, **राहाय** नं

आजच्या रोज.'

राहू (क्रि.रूप.) वास्तव्य करू. 'तीर्थाले जाऊ अन् तथीच दोन रोज **राहू**.'

राहे (क्रि.रूप.) राहत असे. 'आपन जेवाले बसलो की हा समोर टुकनी लागत **राहे**.' -मे.७०.

राहोल्या (क्रि.रूप.) राहिल्या. 'ते जाता माह्याच्यानं नाई **राहोल्या** गेलं/ शांतीच्या मावशीचं म्या गाव जवळ केलं.' -नांबै.

राह्यतात (क्रि.रूप.) राहतात. 'सारंगपुरवासी पाण्यासाठी रातंदिवस तरसत **राह्यतात**.' -त.११३.

राह्यनं (क्रि.) राहणार, राहील. 'गिला आटा गरिबीचा, तुही **राह्यनं** पडती, तुले पाहून सारे लोकं देतीन झडती.' -ऊ.१५.

राह्यसान (क्रि.रूप.) राहणार, राहाल. 'गरिबीचं गऱ्हानं कितीक दिवस सांगत **राह्यसान** तुमी?' -धुम्म.

रांगयरुंगय (न.) घुटमळणे. 'हा जातई नाई, अथीच **रांगयरुंगय** करून राह्यला लेक.'

रांगरंग (पु.) वास्तव स्थिती, परिस्थिती. 'घरातला **रांगरंग** बरोबर असला का पैसे मांगाचे.'

रांगली (क्रि.रूप.) लहान लेकराचे गुढग्यावर चालणे. 'धावली नाही तरी टोंघळ्यावर **रांगली**.' -मिर्झा.१६३.

रांगीनं (क्रिवि.) ओळीने, सलग. 'खिसळीसाठी पोरंपोरी एका **रांगीनं** बसतात शाळेत.'

रांजण (पु.) पाण्याचा साठा करण्यासाठी मातीचे मोठे भांडे. 'विहिरी खोल जाऊन त्यांच्या **रांजण्याचे** खडक उघडे पडले होते.' कात.११२.

रांजन्या (स्त्री.अने.) लहान माठ. 'जत्रेसाठी हटकून विक्रीला खोबऱ्या कलश, **रांजण्या** कराव्या लागतात.' -फीर.७२.

रांड (स्त्री.) १. स्त्री. 'करसीन तं खासीन **रांडे**, नाई तं उपासी मरसीन.' -धग.१६०. 'मडं जाओ त्या **रांडचं** डंगडंग वाजत. तिचे मांघल्ले मव्हर्ले समदे सप्पा होवोत. गिरजानं कडाकड बोटं मोडले.' -पख.१०९. २. पत्यातील राणी. 'पयले गुल्लं आलं मंग आला बादशा मले वाटे आता येते **रांड**.' ३. वेश्या. 'फुकाजीनं या म्हतारपनातई **रांड** ठुली म्हंतात.'

रांडपन (न.) वैधव्य, विधवेचा काळ. 'नाताचं तोंड पाहील अन् त्याच्यावरच माहा **रांडपन** काढीन.' -भं.७.

रांडमुंड (वि.) विधवा. 'अवो मेली जायः दासि पडदासिः **रांडमुंडः** खापरखंडः ऐसे गो कोपलेः' -गोवि.३१७.

रांडवी (वि.) विधवा. 'लग्न होऊन सा महिनेही झाले नसतील तोच मी **रांडवी** झाले.' -कात.४०८.

रांडसांड (वि.) अनाथ, टाकलेले. 'कौसा **रांडसांड** लेकरू कोणाच्याबी डोळ्यात टचकन बसते.' -रा.४८.

रांडाय (वि.) रांड, विधवा. '**रांडायच्या** बोलण्यावर ध्यान देऊ नाई, अन् इतल्याराती अशा आवाह्यच्या घरात जाऊ नई.' -पख.२०.

रांडुळ्या (वि.) विधुर, एक शिवी. 'अरे **रांडूळ्या**, बांगड्या भरेल हिजड्याच्यापोटच्या.' -पख.१४८.

रांधजो (क्रि.रूप.) रांधशील, स्वयंपाक करशील. 'तुह्या पुरताच फक्त सयपाक **रांधजो**.' -जांग.४०.

रांधणी (स्त्री.) स्वयंपाक खोली. 'म्हतारा दिसताच कौतिक **रांधणीकडे** चूल पेटवायला गेली.' -धग.२३.

रांधन (न.) स्वयंपाकाची क्रिया. 'नावेक राहेः **रंधन** जालेया मग तुज जेवु घालीनः' -ली.७. '**रांधणाचे** काजळ डोळा भरीलेः कुंकुमाचा कपाळ भरि थेबडु लाविलाः गोवि.१५३. 'ते **रांधने** घेउनि कुंपा आतु घातलेः तो कुंपु जळो लागलाः' -गोवि.३४९. 'अमृत का **रांधूनि** अर्धे करावे॥' -ज्ञा.१०.३१४. 'पैं जळालिया इंधन न होय। **रंधन** जेवीं॥' -ज्ञा.१८.४०७.

रांधनं (क्रि.) स्वयंपाक करणे. 'आमचीए आकडसासुवेचे गुरु आवंतिले असतिः तेयालागी **रांधिजत** होतेः' -ली.५०३. 'आजि तेतुके तु **रांधु** जाणसि तेतुके रांधि होः' -ली.३४. 'तेणे पुसिलेः तुमचा घरी रात्री **रांधिकांडि** थोर ऐसी होत होतीः' -ली.५०३. 'जे विषें **रांधिली** रससोये। जैं जेवणारा ठाउवी होये।'

रांधनी (स्त्री.) स्वयंपाक घर. 'जैसी **रांधवणी** रससोय निकी। करूनियां मोलें विकी॥' -ज्ञा.२.२५४. '**रांधवणी** चुलीपुढे। पऱ्हे उन्मादती खातवडे॥' -ज्ञा.१३.५६२.

रांधा (पु.) कांडून केलेला भुगा. 'त्याचे शीर उखळात कांड. त्याचा **रांधा** कर. तेच खाईन मी.' -सेल.२३१.

रांधाव (क्रि.रूप.) स्वयंपाक करावा. 'चंदनातें कायसेनि चर्चावें। अमृतातें केउतें **रांधावें**।' -ज्ञा.१०.१२

रांधावाढा (पु.) स्वयंपाक करा, जेवायला वाढा. 'बायकाचा जलमच अस्ते **रांधावाढा**, उष्टं काढा.'

रिकामचोट (वि.) काम नसलेली. 'ती बाई **रिकामचोट** अन् त्यो साहेब तिताल.' -निशा.१३४.

रिकामटेकळा (वि.) काम नसलेला. 'मी का **रिकामटेकळा** दिसलो का तुमाले? उटसूट काम सांगत रायता राजा.'

रिकामपन (न.) सवड. 'मरालेबी टाईम नाई मान्साजोळ तरमा कार्यपरसंगाले **रिकामपन** काहाळाच लागते मान्साले.'

रिकामं (वि.) १. कामी नसलेले. 'गाळं **रिकामं** हाय काय तुमचं, भरन आन्याले पायजे आजच्या दिवस?' २. रिते. 'हे भरनं **रिकामच** आय, थेंब पानी नाई त्याम्दी.'

रिचवनं (क्रि.) ओतणे. 'भाऊजी तुमाले तं चालताबी नाई येऊन रायलं. पुऱ्या इस्टेटीची दारू **रिचवनं** चालू हाय वाट्टे?'

रिचवू (क्रि.रूप.) ओतू, टाकू. 'एकामागून एक पव्हरे तो पखालीत **रिचवू** लागला.' -पख.४७.

रिचोनं (क्रि.) रिचविणे, रिते करणे. 'तेयावरि पाखाला **रिचवीलियाः**' -ली.२७. 'हे घळ्ळी **रिचोनं** राजनात.'

रिछ (न.) अस्वल. 'सायबाऽऽ आरे **रिछ** बरा जानवर बाबा.' -झेल.१३.

रिझोनं (क्रि.) रिझवणे, रमवणे. 'भजनात जाऊन मन **रिझोनं** बरं वाट्टे.'

रिझोयाले (क्रि.रूप.) रिझवायला. 'जत्रीत लोकं मन **रिझोयालेच** जातात काईकाई.'

रिझोयेल (क्रि.रूप.) रिझवलेले. 'नाम्यानं काल लय हासोयेल, मन **रिझोयेल** आये सर्वाचं.'

रिझोलं (क्रि.रूप.) रिझवले. 'गंमतागमता सांगून रातभर **रिझोलं** गंग्यानं.'

रिठा (पु.) कापड धुण्याचे फळ. '**रिठ्यांच्या** फेसात धुऊन गच्च पिळून कपडे वाळत घातलेले.' -गाआ.४३.

रितभात (स्त्री.) पद्धत. 'खळसपट्टीत काई **रितभात** नाई. जवाई आला काय अन् गेला काय काई सोय ना फोय.'

रितसर (क्रिवि.) रीवाजानुसार. 'पोरगी पायाची ना तुमाले तं भाईर काहाले, **रितसर** नेम घेऊनसन्या पायना?'

रिनकरी (पु.) कर्ज असलेला. 'उंबरठ्यावर काहाले बस्तं बावा, आमी काय तुये **रिनकरी** हाव?'

रिपटं (न.) लहान भाकर. 'आजी येकटीच असल्यानं येक **रिपटं** टाकलं का झालं तिचं रांधनं.'

रिपेरी (स्त्री.) दुरुस्ती. 'सध्या घराची **रिपेरी** सुरू आये.' (इं.)

रिपोट (पु.) पोलिसात तक्रार. 'नवरा होय ना तुया तो, त्याचाबी **रिपोट** देतं का?' (इं.)

रिवाज (पु.) प्रथा, परंपरा, रूढी. 'पोयाले घरोघरी पाया लागाले जाचा **रिवाज** हाय आमच्या गावातनी.' (अर. रवाज)

रिश्ता(स्ता) (पु.) सोयरीक, संबंध, नाते. 'चिचगावाचा **रिस्ता** जुटला वाट्टे. बरं झालं बापा चिचगावाचा जवाई अन् त्याले मिरचीची नवाई.' (फा.)

रिश्वत (स्त्री.) लाचलुचपत. '**रिश्वत** घेनाऱ्याचं मुसकाळ अन् रेल्वाईत भीक मांगनाऱ्याचं मुसकाळ सारकंच दिस्ते.' (अर.)

रिस्तेदार (वि.) नातलग. 'वतनदार पाटील असला ना का तो बरोबर आपला **रिस्तेदार** लागतेच कुठून तरमा.'

रिहा (न.) मुक्त होणे, सुटणे. 'चंदन कालच कैदखान्यातून **रिहा** झाला.'

रिंग (स्त्री.) कानातील गोलाकार लेणे. 'कानातली येक **रिंग** पळ्ळी वाट्टे कालच्या झटापटीत.'

रिंगन (न.) आखलेले, वर्तुळ. 'वारकरी माळकरी दिंडीच्या रस्त्यानं मेंढराचं **रिंगण** खेळवतात.' 'भग्गुलाभोवती येक **रिंगन** केलं अन् त्या रिंगनातबी कांची पळ्ळी ना तं ढाव आपला.'

रिंगनी (स्त्री.) १. एक वृक्ष. 'साधे स्नानासि गेलीः तव तेथ **रींगणीची** फूले देखिलीः तीए घेउनि आतुः' -ली.४०१. २. बैलाच्या वेसनीच्या दोरात अडकविण्याचा लाकडी तुकडा.

रिंगरिंग (क्रिवि.) रडण्याचे सातत्य. 'लेकरू **रिंगरिंग** करायला लागलं, तेव्हा भावाजोळ आणून घातलं.' -सेल.१८७.

रिंगी (स्त्री.) धावण्याच्या शयतीत वापरावयाची लहान बैलगाडी. 'पट भरला. अलबांड गोऱ्हे. सरपंच्याची **रिंगी** मागून नंबर पटकावला.'

रीत (स्त्री.) चाल, रूढी. 'घराची **रीत** आये, मोठ्याईच्या पाया पळाव.'

रीतभात (स्त्री.) चालीरीती. 'देनंघेनं सरू दे/ **रीतभात** मरू दे.' -वि.

रीन (न.) ऋण. 'बाप हो! **रीन** काहाळून लगन करून नका. असं गाडगे बाबा सांगत कीर्तनातून.'

रीप (स्त्री.) लहान पाटली. 'येक **रीप** असती ना तं बंडीचं ढासं झालं अस्तं बसोनं.'

रीस (स्त्री.) किळस. 'कमाइस मोल येथे नका **रीस** मानू॥' -तुका.१४२. 'कोरकू बायांना मात्र बेडुकाची **रीस** वाटत नव्हती.' -झेल.७६.

रुकते (क्रि.रूप.) थांबते. 'आता माही मलेच मालूम कुठी माही दुखते/ अन् छातीचा ठोका काहून घळीघळी **रूकते**.' -नांबै.

रुकनं (क्रि.) थांबणे. 'आपून कोनत्याबी गाळीले हात दाखोला का तिले **रुकनं** हाय राजा.'

रुका(खा)वट (स्त्री.) अडथळा. 'इटा सरल्यानं बांधकामात **रुकावट** आली.'

रुख(खो)त (न.) वधूच्या भेटवस्तू, रुखवंत. '**रुखत** आणलं नुसत्या साखर फेण्या, नवरी राजकन्या.' -लोक.४५. 'वाजतगाजत आली **रुखोताची** पाटी.' -ना.२३. (फा.)

रुखवत (न.) वधूच्या भेटवस्तू, रुखवंत. 'लग्नाच्या दिवशी मांडवात **रुखवत** मांडल्या गेला.' -झिं.१८.

रुखंसूकं (वि.) वाळलेले, निःसत्त्व. 'गरिबाले काईबी **रुकंसुकं** खाऊन दिवस काढनं असते.'

रुगयनं (क्रि.) रेंगाळणे. 'कालेजातले पोरबी बाई यायच्या टाइमाले स्टॅडलागी **रुंगळतेत**.' -निशा.१४०.

रुग्गे (पु.) धक्के. 'बोलतांनी लेकाचे एकमेकाले झोंबे! **रुग्गे** मारून चिमटे घे कवा दे कोंबे.' -मिए.५१.

रुजवनं (क्रि.) लावणे, भरवणे. 'कोनाच्या मनात काई **रुजवनं** बरं आय का?'

रुजवाई (स्त्री.) रूजवात. 'रातच्या सपनाची कशी करू **रुजवाई/** नेम घेतल्या दिसाले तू त दिसलीच नाई.' -नांबै.

रुजवात (स्त्री.) कबुली, शहानिशा. 'खोटं वाटत असीन तं रामाकून **रुजवात** करून घे तू.' (फा.)

रुजामा (पु.) गालिचा. 'मलमली बैठक सजविताना गुडघाभर उंच पराचा **रुजामा** टाकला जाईन.' -कात.२८२. (फा.)

रुजोनं (क्रि.) रुजवणे. 'मनात नाई ते **रुजोनं** कलीले बराबर जमते.'

रुटूखुटू (क्रिवि.) अडखळत, संथ गतीने. 'पैशाच्या अभावी संस्था **रुटुखुटू** चालली होती.' -कात.४७८.

रुतनं (क्रि.) टोचणे, बोचणे. 'वावरातनी टायवरी चप्पल असली का बंगाली काटाबी **रुतनं** नाईच.'

रुतणी (स्त्री.) रुतलेली जागा, जखम. 'पानाचा चीक जखमेवर सोडला तसं रक्त **रुतणीतून** पुन्हा वाहू लागलं.' -पोळा.

रुतबा (पु.) दर्जा, अधिकार, थाट. 'आमच्यावर काहाले येवळा **रुतबा** दाखोता बावा म्हना.' (फा.)

रुतवनं (क्रि.) रुतविणे. 'पैसा तं लागन भाऊ गुतवासाठी/ पायजे सुई **रुतवासाठी**.' -जांग.४६.

रुतेल (क्रि.) रुतलेला. 'काटा पायात **रुतेल** असल्यानं कुरूप झालं.'

रुतोनं (क्रि.) रुतवणे. 'बाभुईखालून जानं अन् पायात काटे **रुतोनं** बिनकामी.'

रुपगून (पु.) सौंदर्य व गुण. 'सून **रुपागुणाची** पण ती नवऱ्याच्या आटोक्यात नव्हती.' -मोती.३५

रुपल्डं (न.) रुपये. '**रुपल्डे** पायता का मानमानुसकी पायता राजे हो?'

रुबाब (पु.) थाट, प्रतिष्ठा. 'आपल्या दोस्ताचाही **रुबाब** हिणकस राहायला नको.' -मोती. (फा.)

रुमनं (न.) औतावरील जोर देण्यासाठी मुठीचा दांडा, **रुमणे**. 'एकु दीसी तेणे **रुम्हणे** कोठा देखिलेः हातु वाकुडा करुनि पाहीलेः' -ली.३१०. 'बव्हे ते **रुभणेया** सारिखीः रुंभणे ते कैसे.' -दृ.४१.२१.

रुमाल (पु.) चौकोनी दुपटे, दस्ती. 'तोंडाचा घाम **रुमालानं** पुसून घे.' (फा.)

रुयाळी (स्त्री.) रुईचे बन. '**रुयाळीचे** फुलं आनून मारोतीले हार केला.' 'नदीच्या काठानं बम **रुयाळी** आये.'

रुसेल (क्रि.रूप.) रुसलेला. 'कालपासून चोईसाठी मनी **रुसेल** आये.'

रुसोनं (क्रि.) रुसवणे. 'खेयेन्यासाठी लेकराले **रुसोनं** बरं नसते, घेऊन द्याव.'

रुसोलं (क्रि.रूप.) रुसवले. 'अले अले अले, बाबूले कोनं **रुसोलं** बरं आमच्या?'

रुस्तम (वि.) वस्ताद, धाडसी, पराक्रमी. 'पुरशा लयच **रुस्तम** गळी आये, तो काय समजते कोनाले?' (फा.)

रुंगयनं (क्रि.) घुटमळणे, रेंगाळणे. 'हळ्या नियतीचा मानूस **रुंगवू** देऊ नाई घरात.' -गागा.

रुंगयरुं(रां)गय (न.) रेंगाळणे, घुटमळणे. 'आजून भाकर व्हयाची हाय? आज तं तू जशी **रुंगयरुंगयच** करून रायली.' -लेक.६९.

रुंगून (क्रि.रूप.) घुटमळून. 'कुतळ्ळ मंघापासून का बा **रुंगून** रायलं अथी?'

रू (पु.) सरकी काढल्यानंतर शिल्लक राहिलेला कापूस. 'वाता कऱ्याले **रू** नाई सापळत घरात.'

रूई (स्त्री.) १. एक झुडुपी झाड. 'गुढिया उभारलीयाः **रुइचेया** डेंसेयांचे तोरण बांधलेः -ली.३८६. 'कल्पतरू **रुया** नव्हती बाभुळा। पुरविती फळा इच्छितिया॥' -तुका.९८४.१. २. सरकी काढलेला कापूस. 'कापूस वटा लागते. गादी कऱ्याले **रूई** पायजे.'

रूख (पु.) रोख, दिशा, कल, ओढा. 'महादेवानं त्याच्या तोंडाकडे पाहिलं पन भीमानं **रूख** मिळू दिला नाही.' -धग.१४२. 'मान्साचा **रूख** बरबर ओळखू येते राजा जबरदस्ती काहाले करावं कोनाले.' (फा.)

रूत (स्त्री.) बारीक काडी वगैरे रुतणे. 'काट्याची **रूत** पायात सल्ली आज औतावर.'

रेऊ (स्त्री.) वाळू. 'रेऊ असी सन्न तपेल. इस्तोच होय जसा.' -डेबू.१७.

रेक(ग)डी (स्त्री.) हातगाडी. 'बरीच गर्दी **रेकडीच्या** मागेपुढे जमा झाली.' -त.१२७.

रेघ (स्त्री.) रेषा. 'अन्नाचं बोलनं म्हन्जे काया दगळावरची **रेघ** हाय.'

रेघाट्या (पु.) लाकडावर रेषा पाडण्याचे सुताराजवळील साधन. '**रेघाट्या** असला का सरकीटिपोर रेघ पाळता

येते मंग लाकूड कापाले हलकं जाते.'

रेच्या (पु.) रूई काढण्याचे यंत्र. 'तिखटाचा कापूस पोटाचा **रेचा**.' -मिर्झा.११२.

रेजाडी (स्त्री.) रेजर. 'संदुकातला **रेजाडीचा** तुकडा काय झाला मनाव?' -धग.९५.

रेट (पु.) १. भाव. 'कापसाचा काय **रेट** हाय तुमच्या आंगं?' २. तंतोतंत. 'सदरा आंगात **रेट** बसला.' (इं.)

रेटनं (क्रि.) खाणे, ढकलणे. 'ठेशासंगं नाही त मिठासंगंबी भाकर **रेटता** येते.' -अंधा. 'हातानं त्या फाद्यांना **रेटलं** नाही तर रक्तबंबाळ होण्याची खात्री.' -मोती.

रेटमी (वि.) जाडीजुडी. 'झाकटीतच रेटमीच्या **रेटमी** भाकर टाकली.'

रेटराट (स्त्री.) ढकलाढकली. 'गर्दीत **रेटराट** करून कसातरी अंदर गाडीत घुसलो अन् जागा धरली.'

रेटारेटी (स्त्री.) लोटालाटी. '**रेटारेटी** करून दोघेही कसेबसे आत घुसले.' -ना.४९. 'बिरादर मंडळी दर्शनासाठी **रेटारेटी** करीत होती.' -सि.६८.

रेटून (क्रिवि.) टेकून. 'पावने बॉ मस्त बसा तक्याले **रेटून**.'

रेडू (पु.) रेडीओ. 'बुडत्या मनाले धिरवा दियाले तेईनं **रेडू** चालू केला.' -लेक.३५.

रेत(ती) (स्त्री.) वाळू. '**रेती** वाटच पाहेते आला पूर कुठी गेला?' -वि.

रेता(तो)ळं (वि.) वाळू असलेले. 'वावर **रेताळं** असल्यानं ओवानी लवकर येते.'

रेपट (स्त्री.) थापड, मार. 'भादरे तं म्या एक **रेपट** देली ठेवून थोबाळीत.'

रेबीन (स्त्री.) कापडी, नायलॉन पट्टी. 'आरशाडाबल्यावाल्या जोळून केसाले बांध्याले दोनतीन **रेबीना** घेतल्या इकत.' (इं.रिबन)

रेमस (स्त्री.) मार. 'भांडखोर म्हनून थो होता फेमस/ काम त्याचं एक धर का **रेमस**.' -मिए.१५१.

रेमसनं (क्रि.) ठोकणे, मारणे. 'हे पाऊस बरसते आता बापा! चांगलाच **रेमसते** ह्यो.' -पोळा.

रेमसलं (क्रि.रूप.) जोरात पडले. 'रातच्याले ह्या पानी **रेमसलं**. वावराच्या बांद्यागिंद्या फोडूनशान लोट वाह्यले.' -जटा.३३.

रेम्पूट (न.) कष्ट, त्रास होणे. 'पगाराचं काय करतं? दहा पासून पाच वाजेपर्यंत **रेम्पूट** निघते बाबू.' -गय.

रेल (स्त्री.) रेल्वे. 'शेगावलोक **रेलनं** गेला अन् तथून येस्टी पकळी.' (इं.)

रेलचेल (स्त्री.) भरपूर, तृप्त. 'लग्नप्रसंगी वऱ्ह्याव्यापासून न्हाव्यापर्यंत सारे **रेलचेल** होत.' -मोती.

रेलवाई (स्त्री.) रेल्वे. 'एसटीपक्षे **रेलवाई** सोयीची रायते.'

रेव (स्त्री.) रेती. 'थळीतली **रेव** थंडीगार रायते.'

रेव(वू) (स्त्री.) वाळू. 'बांधकामाले काटेपुर्नाची **रेवू** आनली टरकभर.' (का.)

रेवट (स्त्री.) रेती. 'हप्ताभर रातंदिवस नदीच्या **रेवटात** तो रायला व्हता.' -सित.५०.

रेवडी (स्त्री.) गूळ किंवा साखर तिळात घोळून केलेला पदार्थ. 'काही दाळ्या नाही, **रेवड्या** नाही तसेच घरी आलो.' -फीर.७५.

रेस (स्त्री.) १. शर्यत. 'पट म्हन्जे सोप्या भासेत सांगू काय? हंऽऽ बैलाची **रेस**.' २. वेग. 'येवळ्या अरामानं, गाळी होय काय बंडी होय बावा तुई, **रेस** वाळो.' ३. रेषा. 'फळ्यावर खळूनं एक **रेस** ओहोळली.'

रेसम (स्त्री.) रेशीम. '**रेसमबिसम** मोठ्याईचंच काम रायते. गरीब काय घीन बापा?' (का.)

रेहपाट (स्त्री.) हाताने दिलेला मार, चापट. 'दोन हानल्या असत्या **रेहपाटा** त पानीच पाजलं असतं सायाले.' -पोळा.

रेहमान किडा (पु.) गोष्टीची उबळ. 'लय फुरकफुरक करते. त्याचा **रेहमान** किडा कांडाच लागते.' -पोळा.

रेंग (न.) १. लहान मुलाचे सतत रडणे. २. दृष्ट. 'बुढी सकाळ संध्याकाळ त्याची दीठ काढायची. दिवा घेऊन **रेंग** काढायची.' -ना.१५३.

रेंगरेंग (क्रिवि.) कुरकूर, रडगाणे. 'आखीन वाढली माह्या मांगची डेंगडेंग/ आर्थिक परिस्थिती करत होती **रेंगरेंग**.' -मिर्झा.११०.

रेंगाटनं (क्रि.) मार देणे, हाकलणे. 'मजमा जमवासाठी फक्त नाव घेतो/ **रेंगाटलं** कोनी तुमच्याकडं धाव घेतो.' -मिए.४८.

रेंगाटरुंगाट (क्रिवि.) ढकलाढकली. '**रेंगाटरुंगाट** करो चलो रेटराट/ हा थ्याले तो थ्याले करे खेटखाट.' -मिर्झा.४६.

रेंगाटलं (क्रि.रूप.) मार दिला. 'झिपोट्या धरून **रेंगाटलं** रांडीले, पाठीले ओरपलं डसली मांडीले.' -मिए.७५.

रेंगी (स्त्री.) शंकर पटात वापरली जाणारी छोटी बैलगाडी. 'पट म्हनला की त्यासाठी **रेंगी** लागतेच लागते.' -धग.१९. 'पयल्यांदाच जुतून शायन्या बैलावानी दुळूदुळू धायाले लागला तो **रेंगीले**.' -सित.१२२.

रेंदकाळनं (क्रि.) आदळणे. 'दारूचा भपका आमच्यावर **रेंदकाळला** होता.' -ल.६३.

रेंदा(धा) (पु.) मळलेले, घाण पाणी. 'हरेकाच्या दारासमोर कायाशार **रेंधा** भरेल सार्वभौम डायरे.' -मे.३५.

रेंदागढूळ (वि.) घाणेरडे, अतिशय गढूळ. 'पुरानं नदीचं पाणी **रेंदागढूळ** व्हायचं.' -पख.८५.

रेंदाचेंदा (वि.) निकस, हलक्या प्रतीचे. 'महात्मेनि नीरसे वीरसे अन्ने सेवीजेतिः **रेंदेयाचेंदेया** दरू भरीजेः' -ली.७.

रेंदाड (वि.) चिखलाने भरलेले, धुळमिश्रित पाणी. 'पानी प्याच्या कामाचं नाई निऱ्हा **रेंदाड** आये.'

रेंपूट (न.) १. लहान काठी. 'चुलीत घाल्याले येक **रेंपूट** नाई बुव्हारेईच्या घरी.' २. अति कष्ट होणे. 'बायतपन झालं. पोरगं झालं. त्याले पायाले सगेसोयरे आले त्यानं तिचं **रेंपूट** पळूं.' -लेक.३०.

रोक(ख) (पु.) कल. 'ना तरि अंधाराचेनि **रोखे**। जैसा डोळा रोविजती नखे।' -ज्ञा.१९.१७८. (का.)

रोक(ख)ठोक (वि.) निर्भीड, स्पष्ट, जे असेल ते. 'गुंगलीगुंगली नाई ठुलं पायजे मान्सानं **रोकठोक** बोल्याले पायजे का नाई?' (का.फा.)

रोकड (वि.) नगदी रुपये. 'आठ दामांचा वेचु आणिलाः आठ दाम **रोकडे** आणिलेः' -ली.१७२. (का.)

रोक(ख)न (क्रि.) १. रोखून पाहणे. 'आणि ऐसा **रोहकेः** दृष्टी तेयांकडे पाहेः' -ली.३१., 'दादूंमाये म्हणीतलेः **रोहकुंनि** पाहता? काइ तुमचे वाढीले खाताए?' २. थांबणे, अडविणे. 'तव पुढा म्हैसा **रोखेसी** आलाः' -ली.५८., 'धरुनि **रोख** गावाचा अचालि पावला.' -भीक.४८. (फा.)

रोकू(खू)न (क्रि.रूप.) १. रोखून पाहणे. 'मायाआंगं काहून **रोखून** पायतं तू?' २. थांबवणे. 'त्याले मंधातच **रोकून** मी बोलतो मंग.' 'घराचं काम सध्यासीक **रोखून** ठेवेल आये.'

रोखत (क्रि.रूप.) थांबवित. 'मी कूप ठोको. गन्या मले **रोखत** जाय. त्यानं भांडन पेटलं.'

रोखानं (क्रिवि.) दिशेने, कलाने. 'गाय धुऱ्याच्या **रोखानं** निंघाली.' (फा.)

रोखी (वि.) प्रत्यक्ष. '**रोखीं** रहावें समोर। पुढें मागें चाले भार॥' -तुका.३४८५.

रोखीनं (क्रिवि.) नगदी रुपयाने. 'येव्हार **रोखीनं** बरा. उधारी ना पायजे.'

रोखेल (वि.) थांबवलेले. 'घराचं काम सध्या **रोखेल** आये म्या.'

रोग (पु.) बिमारी. 'घरी खायापेयाले भेट्टे तं पोटाचा **रोग** लागला राजा.'

रोग(गी)ट (वि.) सतत आजारी असणारा. 'तो कोंबड्यापारखी असल्याने **रोगट** कोंबडी अचूक ओळखे.' -काळी.३०.

रोगर (न.) कीटकनाशक औषधी. 'पऱ्हाटीवर रोग पडला की तिच्यावर **रोगरचे** स्प्रे करून रोग हटवतात.' -अंधा.

रोज (पु.) १. दिवस, दिन. 'उठसूट, **रोजरोज** जाऊ नाई कोनाच्या घरी.' २. एक दिवसाची मजुरी. 'अवघेचि वाण आले तुम्हा घरा। मजुरी मजुरा **रोज** कीर्दी॥' -तुका.८५०. 'निंदनाचा पन्नास रुपये **रोज** आये.' (फा.)

रोजंदार (पु.) रोजीवर काम करणारा. 'गावात कामाले येक **रोजंदारबी** भेटत नाई.' (फा.)

रोजंदारी (स्त्री.) रोजची मजुरी. 'गावात साठ रुपये **रोजंदारी** पळते.' (फा.)

रोजगार (पु.) उद्योग, कमाई. 'आपून गावाकडे त चाल्लो पण तिथं **रोजगाराचं** कसं?' -धग.१८. (फा.)

रोजमुरा (पु.) दिवसाची कमाई, मजुरी. 'झडीपाणी असलं तरी त्या सालदाराचा **रोजमुरा** डुबत नसे.' -गा.२९. 'गोरगरिबांना भरपूर **रोजमुरा** मिळत असल्याने त्यांना दुष्काळ भासत नव्हता.' -कात.१८१. (फा.)

रोजरोज (अ.) प्रत्येक दिवशी. '**रोजरोजची** हे कीटकीट काय कामाची रे?' (फा.)

रोजा (पु.) मुस्लिमांचा उपास. 'मुसलमान **रोजा** असला तं पानीबी पेत नाईत.' (फा.)

रोजाना (अ.) प्रत्येक दिवशी. 'भाजीपाला **रोजाना** येते आमच्या गावात बंडी घेऊन.' (फा.)

रोजारोजी (स्त्री.) एका दिवसाच्या मजुरीच्या बोलीने. 'ज्यांच्याकडे शेती नाही असे तिफणीवर, वखरावर **रोजारोजी** जाणारे मजूर बसून गप्पा करत होते.' -खुं.५७.

रोजी (स्त्री.) उपजीविका, रोजगार. 'कास्तकारी म्हन्जे आपली **रोजी** हाय.' (फा.)

रोजीरोटी (स्त्री.) मजुरी व अन्न. 'वावराच्या माथं तं आपली **रोजीरोटी** आये.'

रोटी (स्त्री.) पोळी. 'मग ते **रोटी** तुप आणीतिः आरोगणा करीतिः' -गोवि.१६१. 'एकु दी तीही सोनेसळेया गहुवांचीया **रोटीया** केलीया होतीयाः' -गोवि.२९०. 'भाऊ म्हने बयनीले करा **रोटी/** बोलली भावजय गहू जमिनीच्या पोटी.' (का.)

रोठ (पु.) कणकेचा जाड पदार्थ. 'मग बाइसे दोन्ही **रोट** ठेविलेः वाटीचे तुप ठेविलेः' -ली.३३९.

रोडगा (पु.) कणकेचा पदार्थ. 'दुसरीकडे गोवऱ्यावर **रोडगे** भाजले जातात.' -ना.१. 'गूळ दूध आणलं. खिचड्याच्या पिठाचे **रोडगे** झाले.' -धग.८४.

रोनक (स्त्री.) शोभा. 'गोरीपान सुनबाई भेटल्यानं घरात **रोनक** आली माय बयना.'

रोन्या स्त्री.अने. अळ्या. 'जुन्याले पळल्या **रोन्या**, नव्याले फुटल्या पारंब्या.'

रोब (पु.) दरारा, धाक. 'मायावर तू **रोब** कसू नको.' (फा.)

रोयनं (क्रि.) रोवणे. 'कोठं तयार कऱ्याले खांब **रोयनं** सुरू केलं कालपासून.'

रोयनी (स्त्री.) रोहिणी नक्षत्र. 'कव्हाकव्हा **रोयणी** पडतात तिथूनच बरसात सुरू होते.' -रा.५७.

रोयलं (क्रि.रूप.) रोवले. 'अर्ध लाकूड जमिनीत **रोयलं** अन् अर्ध वर ठुलं गव्हान कऱ्याले.'

रोयाले (क्रि.रूप.) रोवण्याकरिता. 'खुटा **रोयाले** पार नोती माया घरी.'

रोयेल (क्रि.रूप.) रोवलेले. 'ठुन्या **रोयेल** होत्या फक्त वरतून सावलीसाठी पराट्या टाकाच्या होत्या.'

रोळी (स्त्री.) जाड वाळू. 'चिखोल झाला तथी इटकरं अन् **रोळी** आनून टाक गाळंभर.'

रोवून (क्रि.रूप.) जमिनीत दडवून, लपवून. 'कृपण चित्तवृत्ती जैसी। **रोवोनि** घाली ठेवयापासीं।' - ज्ञा.११.६३३.

रोशन (न.) प्रकाशात आणणे. 'अंधारातल्या खेळ्याचं नाव येसोंतानं **रोशन** केलं.' -सित.३९.

रोस (पु.) राग. 'बंडी नाई देली तं मायावर **रोस** आये मन्याचा.'

रोसनाई (स्त्री.) झगमगाट. 'दिवाईची **रोसनाई** डोयाचं पारनं फेळून जाते.' (फा.)

रोहकनं (क्रि.) रोखून पाहणे. 'आणि ऐसा **रोहके** दृष्टी तेयांकडे पाहेः दुसरी एकडुनि जरि हाणे तरि तेउताही **रोहंके** पाहेः' -ली.३१.

रोहिला (पु.) मोगलाईतील शिपाई. हे शिपाई गावात घुसून लुटमार करीत जवान पोरीबाळींची अब्रू घेत. निरपराध्यांवर गोळ्या झाडीत. घरे पेटवून देत. नाना प्रकारे जुलूम करीत.

रोही (पु.) काळवीट. 'हाका मारूनही नामाचा आवाज नाही. तिला वाटलं पसरला वाटते **रोही**.' -धग.४८. २. एक शिवी. 'पसरला का थो **रोही**.' -धग.४८.

रोहोकून (क्रि.रूप.) नेम धरून. 'मी का चोर हाव, माह्याकळे असा **रोहोकून** पायतं तं?'

रोहोथ ? 'गावकरी **रोहोथ** करीत होते. ' -पख.९३.

रोळा (पु.) अडथळा, बाधा. 'कोनाच्या बनत्या कामात **रोळा** घालू नये आपून.'

रोंगनं (क्रि.) पटाच्या **रेंगीच्या** आखीला ताग गुंडाळून गुळगुळीत करणे.

रोंदय(ळ) (पु.) धिंगाणा. 'सकाऊनपासून लेकराईनं निऱ्हा **रोंदय** घातला.'

रोंभा (पु.) व्याप, पसारा, काम. 'जावयाले बोलायचं पण ह्यो **रोंभा** आटपल्या बिगर जाताबी येते?' -रा.१२९.

रौशनाई (स्त्री.) प्रकाश, उजेड. 'हनुमान जयंती असली का मंदिरावर लायटींग लावून **रौशनाई** करतात.' (फा.)

रौशनी (स्त्री.) प्रकाश, तेज. 'तेल सरत येते तसी दिव्याची **रोशनी** कमी होत जाते.' (फा.)

रौनक (स्त्री.) कांती, तेज. 'कुठून **रौनक** येईल तोंडावर?' - त.१३९. 'तिच्या सुरकुतल्या मुखोट्यावर आज न्यारीच **रौनक** दिसून रायली व्हती.' -सित.१७. (फा.)

रौंदळनं (क्रि.) तुडवणे, धिंगाणा घालणे. 'मनाच्या सुतानं पोट्ट्याईचं **रौंदळनं** सुरू आये मंघापासून.'

ल

लईन (स्त्री.) रांग, ओळ. 'नळावर तं बायकाची लय लंबी **लईन** लागेल आये.' (इं.)

लऊ (स्त्री.) पाण्यातील गवत. 'लवकुशापैकी येकाच जलम **लऊ** गवतापासून झाल्ता म्हन्तात.'

लऊलऊ (क्रिवि.) १. वाकूनवाकून. 'घरात घुसून दाराआडून पोरं **लऊलऊ** पहायची.' -डेबू.४१. २. थोडेथोडे. 'भाजी थोळसीक हाय. **लऊलऊ** जेव.'

लकब (स्त्री.) शैली, सवय, लहर. 'काशाची बोल्याची **लकबच** असी आये की तो तोतराच वाटते.' (फा.अर.)

लकळा (पु.) तगादा. 'सायेबा मांगं **लकळा** लावला सारखा ताहा कुठी काम झालं.'

लकीर (स्त्री.) रेष. 'लक्शीमनानं लकीर मारून ठुल्यावरबी सितेनं त्या **लकीराले** ओलांडाले नोतं पायजे महाराज.' 'बरेच लोकं **लकीरचे** फकीर असतात.'

लक्शिमन (पु.) लक्ष्मण. 'रामाच्या लायन्या भावाचं नाव **लक्शिमन** होतं अन् बायकोचं सीता होतं.'

लक्शिमी (स्त्री.) लक्ष्मी. '**लक्शिमी** परसन झाली तं फक्त पैसा येते, सरसोती परसंन झाली तं ग्यान अन् त्या संगं पैसाबी येतेच ना.'

लक्षमी (स्त्री.) लक्ष्मी, पैसा. 'बंबईमधे जास्त **लक्षमी** कोना जवळ आहे? मारवाडी, गुजराथी, भाटे.' -अखे.

लखपती (वि.) लक्षाधीश. 'कास्तकारबी आता **लखपती** होऊन रायले राजा.'

लखलख (स्त्री.) त्वरा, घाई. 'सकाळपासून जीजीच्या भोवती नवीच **लखलख** दिसत होती.' -ना.१३८. 'सगाईच्या नाजूक कामात **लखलख** करू नोये इनाकारन.'

लखलख (क्रिवि.) जोरजोरात- हालणे. 'माहात्मा एकु उघडाचि उभा असेः **लखलख** करीत हीव वाजत असेः' -ली.३६८.

लखंलखं (क्रिवि.) झगमग, चमचम. 'म्होटाले ते घरंदारं **लखंलखं** करतात, नाई उजिळाची वान झोपळीले खिजोतात.' -सित.१७.

लखवा (पु.) अर्धांगवायू. 'मिसूर फुटेल सरप उळते म्हन्तात अन् तो आंगावरून गेला तं **लखवा** जाते म्हनतात.'

लख्ख (वि.) चक्क. 'कसा रातचा निघाला हाती मशाल म्हाल्याच्या, **लख्ख** उजेड पडला.' -लोक.३१. 'पोरगी अशी गोरीपान का अंधारातबी **लख्ख** उजीळ पळते.'

लगट(ळ) (स्त्री.) जवळीक. 'वारं हे **लागट**, करते **लगट**.' 'तरन्याताठ्या पोरीसंगं **लगट** कऱ्याले सांगावं संपत बुढ्याले.'

लगड (न.) कांब. 'करूनि कडविड। जमा घडिली **लगड**॥' -तुका.३६००.

लगडनं (क्रि.) रगडणे, चेचणे, ठेचणे. 'चारसाहा मिर्च्या घे अन् पाट्यावर नेऊन **लगड**.'

लगडा (पु.) मध्ये सापडल्याने चुराडा. 'कुठं होता सुरू दोघा जनाचा झगडा/ जो गेला सोडाले त्याचाच झाला **लगडा**.' -ऊ.१९.

लगदा (पु.) बारीक कण. 'तो मशीनचे हॅण्डल फिरवून बर्फाचा **लगदा** पाडत होता.' -झेल.४६.

लगन (न.) लग्न. 'रोज घरी घिणघिण कोण्या ब्राह्मणानं वेड्या, असं लावलं **लगन**.' -लोक.४४. 'सोम्मारी पोरीचं **लगन** आये, येजा बरं यादीनं.'

लगनगाठ (स्त्री.) लग्नाचा योग. 'लेकीची सोयरिक पाऊपाऊ येनाटून रायला मानूस काय सांगावं सायाचं **लगनगाठ** कोनासंगं बांधेल हाय तं?'

लगनघाई (स्त्री.) अतिशय घाई. 'बापा लयच धावतीवर दिसून रायले. काहाची येवळी **लगनघाई** हाय बिडीमिडी तं द्या?'

लगनपाटी (स्त्री.) लग्नातील एक विधी. 'ढपळं वाजलं का सांगजो. **लगनपाटी** मांगं जा लागीन ना?'

लगनमोळ्या (वि.) लग्न मोडणारा, विघ्न आणणारा. 'चांगलं काम असलं का **लगनमोळ्या** रमश्या संगं नाई पायजत.'

लग(गी)नसराई (स्त्री.) लग्नाचा काळ, विवाह मोसम. 'वसंतऋतुची सुटे हवाई/ वैशाखाची **लगीनसराई'** - भीक.३४. 'जेष्ठाच्या अल्याळपल्याळ **लगनसराईची** धुमधुम.' -मे.१४.

लगभग (क्रिवि.) जवळजवळ, अंदाजे. 'बलावले तेवढे **लगभग** सगळेच पावने आल्ते कार्यकरमाले.'

लगबग (स्त्री.) घाई, गडबड. 'अवकानी पानी आल्याच्यानं दोनदोन हरबऱ्याच्या गंज्या झाकाची येकच **लगबग** झाली.'

लगरलगर (क्रिवि.) घाईघाई. 'पुंजी **लगरलगर** पुळे गेली. पाया लागतो आबाजी.' -लेक.८१.

लगळनं (क्रि.) रगडणे. 'आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटोनि होय खंडखंडा। का आड जालियातें रगडा। करी जैसा॥' -ज्ञा.१७.२६०. 'खाली पोतं आथरून इटकरानं हुळळ्याचे कन्सं **लगळाव** मस्त.'

लगळेल (क्रि.रूप.) रगडलेले. 'हुळ्ळ्याचे काई कन्सं **लगळेल** हायत.'

लगा (पु.) पानळीचा लहान तुकडा. 'वालंबी एकेक पानळी घेऊन फड्याच्या लांबीच्या **लगा** करीत बसली.' -रा. 'फड्याच्या मुठीसाठी **लगा** पाडीत बसली.' -ऊन.१५६. (अर.)

लगार (स्त्री.) ओळ, रांग. 'माय पुढेपुढे अन् तिच्या मांग साताठ लेकराईची **लगार** लागेल.'

लगालगा (क्रिवि.) लगेच, त्वरित, घाईत. '**लगालगा** चालत तो पुढे गेला.' -सेल.१४६. 'गोपिकाची किंकाळी ऐकून शेजारची बुढी **लगालगा** आली.' -काळी.३३.

लगाव (पु.) ओढ, आत्मीयता, स्नेह. 'कामाधंद्याचा **लगाव** असन ताहाच ते साजरं होते.'

लगाव (क्रि.रूप.) लावावे. 'दारू पेऊनसन्या लेक आला का **लगाव** दोनतीन झोळपे.'

लगावनं (क्रि.) मारणे. 'भादरभादर करे दिन्या तं दोन **लगावून** देल्या होतकाळीत भळव्याच्या.'

लगी (वि.) अल्पस्वल्प सांगण्यासाठी हा शब्द वापरतात. 'आपला का **लगी** मोठा कारभार हाये?.' -खुं.२०८.

लगोलग (क्रिवि.) लगेच, ताबडतोब. 'कामठ्यावर काम नसल्याने तो **लगोलग** आला.' -सेल.३२४.

लग्गा (पु.) वशिला. 'आमदाराच्या **लग्यानं** तुले नवकरीवरतं चिकटून देतो.' -जटा.६५.

लग्गी (स्त्री.) १. घर बांधकामाचा जुना प्रकार. २. लघवी. 'त्याची बायको दारका उठून बसली होती. काऊन उठली? **लग्गीले** जातो. जातं एकटी का येऊ संग बाहीर.' -वा.५०.

लग्गी (वि.) अधिक, पुरेपूर. 'रात **लग्गीत** झाल्यानं सर्वी निजानीज झाली.' -दि.१७.

लच (अ.) अधिक्यासाठी वापरावयाचे शब्दयोगी अव्यय. 'वाऊक **कव्वंलच** आये.'

लचक (स्त्री.) मुरड. 'वाई करताना पाय बुडाईत गेल्यानं **लचक** आली.' 'नाचतानाचता बाईची कंबर **लचकली**.'

लचकनं (क्रि.) मोच पडणे, मुरडणे. 'तेवीं **लचकलिया** दिठी। देखणें जें जें उठीं।' -ज्ञा.१४.८४.

लचका (पु.) तुकडा. 'कुतळ्ळ्यानं पायाचा **लचकाच** तोळ्ळा.'

लचकेल (वि.) मुरडलेला. '**लचकेल** पाय असल्यानं बैल बंडीले लचकत चाले.'

लचपच (वि.) खूप. 'भाजीत एवढं **लचपच** तेल टाकतेत काय?'

लचलच (वि.) मुसमुसलेली. 'साखरीच्या पुरनासारखी **लचलच** पोरगी घरात आली.' -मोती.

लचांड (न.) नको ती भानगड, नसते काम. 'कायच्यासाठी ठेवाव मांगं हे **लचांड** / सोळून टाक म्हनलं मांगचं पिचकांड.' -मिर्झा.१४५. (का.विचाट)

लजीतफजीत (क्रिवि.) कसेबसे, सन्मानाशिवाय, कसेतरी. 'दोन वर्स कसेबी **लजीतफजीत** निंघून जातीन.' -फीर.११९. '**लजीतफजीत** करून मी दाहावी पास झालो.' -सित.११६.

लज्जत (स्त्री.) खुमारी, गोडी. 'या पापळ, रायत्याची **लज्जत** काई न्यारीच आये गळ्या.' (अर.)

लट (स्त्री.) केसांची बट. 'तिच्या कपायावरची **लट** डोयाले भीन करून सोळते.'

लट (वि.) १. मोठे. 'कणगच मोठं **लट** दिसते तसं. पंधरासोळा पोत्याचं तर असनच.' -ऊन.१५७. २. फार, खूप. 'आन्याजीले सारं गाव **लट** कापे.'

लटक (स्त्री.) लहर. 'तिला त्याची गंमत करायची **लटक** आली.' -ना.१४४.

लटकं (वि.) खोटे. 'सर्वज्ञ म्हणीतलेः तुम्ही एथ सदा **लटके** बोलता गाः एथ हासताही लटीके न बोलिजे होः' -ली.३८. 'रामरावच्या कोन्त्या गोठी खऱ्या रायतेत, **लटक्या** अस्तेत साऱ्या.'

लटपट (वि.) १. खूप, मोठ्या प्रमाणात. 'पऱ्हा टीच्या डांगोडांगी **लटपट** फुलं लागली.' २. गडबड, धाई. '**लटपट लटपट** तुजं चालनं मोठ्या नखऱ्याचं.'

लटपटनं (क्रि.) १. चपापणे, चाचरणे, घाबरणे. 'पोलीस दिसले तसा वामन्या **लटपटला**.' २. मोठ्या प्रमाणात लागणे. 'पऱ्हाटी बोंड्याईनं **लटपटून** गेली.'

लटलट (क्रिवि.) सारखे हलणे. 'मान हालो डगडग, पाय कापो **लटलट**/ तरी करा लागते काम त्याले पटपट.' -जांग.५९.

लटलटी (स्त्री.) थरथरी, कांपरे. 'तिले पायलं का मले सुट्टे **लटलटी**/ बोलाले जातो तं तोंडाची होते फटफटी.'

लटांबर (वि.) मोठा खटला, अधिक संख्या. 'दोन बायकांचे **लटांबर** घेऊन देशमुखानं सप्तर्षी केले.' -सेल.११०.

लट्टावनं (क्रि.) घाबरणे, भीती वाटणे. 'त्याचे तांबारलेले डोळे पाहून गाववाल्यांची **लट्टावली**.' -पख.१४६.

लट्टू (वि.) फिदा. 'लयच नट्टापट्टा करून रायली वऽऽ कोनावर **लट्टू** झाली वाट्टे बॉ.'

लठगोनी (वि.) स्थूल. '**लठगोनी** तठ झाली, आयजी मले दीठ झाली.'

लठ्ठमलठ्ठी (स्त्री.) लाठीकाठीची हाणामारी. 'गावात राती दोन पाटर्याईत **लठ्ठमलठ्ठी** झाली म्हंतात बॉ.'

लठ्ठावनं (क्रि.) वृद्धी, वाढ होणे. 'भांडणाभोवतीचं गर्दीचं वर्तुळ **लठ्ठावत** होतं.' -धग.३२.

लडलड (स्त्री.) रडारड, टाळाटाळ. 'लग्नाच्या देवकाची, दिवाळीच्या पूंजेची सोय पाहाव तरी बलुत्याले **लडलडच**.' -सेल.३२८.

लडापडा (पु.) रडारड. 'पोरगी मेली आताच. समदा **लडापडा** उठला तिच्या घरात.' -वा.६९.

लडायली (क्रि.रूप.) रडून राहिली. 'आली तशी ढोरावाणी गळ्यात पडून **लडायली**.' -पख.११७.

लडायलीस (क्रि.रूप.) रडू लागलीस. 'काऊन इतली **लडायलीस**? असं खोदूखोदू विचारलं.' -पख.११७.

लड्डा (वि.) स्थूल, पुष्ट. 'मनीराम मारवाळी पाय कसा **लड्डाच्या** लड्डा आये.' (का.)

लढं (न.) बैलगाडी. 'अगं जन्माला येऊन काय केलं तू हेंगाडे, तुझ्यापरीस बरे **लढ्याचे** शेंगाडे.' -रुक्मि.९२.

लत (स्त्री.) सवय, व्यसन. 'कव्हाबोव्हा दारू घेतल्यानं **लत** कशी लागन?' -सेल.२९६.

लती (वि.) १. लहरी. '**लती** मान्साचं काय सांगता येते. आज अठी तं सकाय कुठी.' २. शौकीन, व्यसनी. 'दोन येक्कर कमी असलं तं चालते तरमा पोरगं **लती** नाई पायजे.'

लदबद (वि.) खूप. 'तरोळांची झुडूपं पिवळ्या फुलांनी **लदबदली** होती.' -सि.७८. 'चिचीले चिचा **लदबद** लागल्या.'

लदलद (वि.) मांसल, धष्टपुष्ट. 'जुंपलेल्या बैलांच्या अंगावर **लदलद** मास होतं.' -त.१. 'तिचे भरदार खांदे, छाती, **लदलद** दंड किती नितळ रूप आहे तिचं.' -पाटी.८५.

लपकनं (क्रि.) १. मागे हटणे. 'अंतरी भुलली **लपकली** नार/ डोई झाला भार जोखिमीचा.' -भू.४५. 'तिच्या एका वाक्यानंच तो **लपकला**.' -ना.१६२. २. झुकणे, वाकणे. 'डांग खाली **लपकली** तं चिचा तोळता येतीन.'

लपका (पु.) घाबरणे, पाणीपाणी होणे. 'चिंता जणू शिंग काढून टवकारून पुढ्यात उभी राहते आणि काळजाचा **लपका** होतो.' -खुं.२७.

लपट (क्रि.रूप.) गुंडाळ. 'हीव वाजते तं हे शाल **लपट** आंगाभवती.'

लपटनं (क्रि.) गुंळाडणे. 'पैसे वाल्याले **लपटनं** नाचगान्या वालीले बराबर ठाऊक रायते.'

लपथप (वि.) तुडुंब. 'धर्मायाच्या हौदात पानी **लपथप** भरेल आये आता बैलं पाज्याले.'

लपन (स्त्री.) लपण्याचे ठिकाण, आडोसा. 'मानसं **लपण** शोधून घरातल्या कणग्यांशी दडून बसले होते.' -त.१२५.

लपनं (क्रि.) दडणे, लपणे. 'आपण तरी **लपती**। सर्वस्वें पाप चुकविती॥' -ज्ञा.३.२३६. 'आतां जेथें तेथें येइन सांगातें। **लपाया** पुरतें उरों नेदीं॥' -तुका.३४८६. 'कोनाले दिसू नोये तं जाऊन **लपनं** मंग कुठतरी.'

लपनाछपनी (पु.) लपण्याचा एक खेळ. 'तुका म्हणे **लपणी चपणी**। एका हानि पाठिवरी॥' -तुका.४३६५.३.

लपलप (क्रिवि.) १. वेगाने हालचाल करणे. 'मार बसल्यानं कमरेतून खलास झाला. कंबर **लपलप** करू लागली.' -अंधा. 'ह्या मोठ्ठा जातवान अन् कावाकावाभोर सरप निंगाला जसा **लपलप** करे.' -लेक.२६. 'डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन **लपलप** घराकडे जाणाऱ्या कष्टाळू बायका दिसल्या.' -गय. २. भयाने थरकापणे. 'माहा जीव **लपलप** करते घराची आठवण आली की.' -मे.७६.

लपाछपी (पु.) एक खेळ. 'भाईर ऊन असल्यानं पोरी घरातच **लपाछपी** खेयेतात.'

लपालप (स्त्री.) लपण्याची धांदल, घाई. 'आबा दिसले तसी पोराईची **लपालप** सुरू झाली.'

लपालपी (स्त्री.) दडून बसण्याची क्रिया. '**लपालपी** खेयासाठी घर मोठंधाटं पायजे.'

लपाले (क्रि.रूप.) लपायला, दडायला. 'मले **लपाले** कुठी जागाच सापळे ना.'

लपून (क्रि.रूप.) लपवून, दडवून. 'मिठमिरची काय अशी **लपून** ठुतात काय राजा?'

लपेट (स्त्री.) झुळूक. 'वाऱ्याची थंडीगार **लपेट** आली तं जीवाले बरं वाटू लागलं.'

लपेटनं (क्रि.) गुंडाळणे. 'पतंग कटल्यानं धागा भरभर **लपेटनं** लावला.' (का.लपआईसु)

लपेट्या (वि.) लबाड, दिखाऊ, बेगडी. 'अशा **लपेट्या** बोलापाई आबाच्या कायजाले भोकं पळले.' -सित.२६.

लपेल (क्रि.रूप.) लपलेले. 'त्या खांडामांगच तं पोट्टं **लपेल** होतं ना दिसून नाई रायलं?'

लपोनं (क्रि.) लपविणे. 'नवऱ्यापासून काई **लपोनं** चांगलं अस्ते काय बयना?' (का.चपाईसु)

लपोयेल (वि.) लपविलेला. 'लय जुना पैसा अळका **लपोयेल** हाय माया आजीनं.'

लप्पक (पु.) एक लोकनाट्य. 'गावात **लप्पक** होये तं मान्सच बाईचं सोंग घेत.'

लफंगा (वि.) लुच्चा, ठक. 'मायबाई पायनं कसा पायते वऽऽ **लफंगा** हाय वाट्टे माय.' (फा.)

लफंटूर (वि.) लोफर, रिकामटवळे. 'शेजारपाजारची कुठली तरी **लफंटूर** पोरं टेपरेकॉर्ड वाजवत बसले होते.' -खुं.१७३.

लफंडर (वि.) घोटाळेबाज, लोफर. 'ज्यानं गहान खत लिहलं तो आमच्या गावचा पांड्या **लफंडर** होता.' -कात.५५८.

लफळं (न.) १. प्रेम प्रकरण. 'बुवा तुमी बायकांच्या गराड्यात असता मंग **लफडबिफडं** झालं नाई काय एखादं?' -काळी.८७. २. भानगड. 'आपून इनाकारन कोनाच्या **लफळ्यात** पळू नाई बाबू, सांगून ठुतो तुले.'

लफळेल (वि.) भानगडी करणारा. 'मन्यावानी **लफळेल** सातागावात नाई. येक पोरगी झाली का दुसरी पटोलीच होय.'

लफाटनं (क्रि.) झंझट, भानगड. 'खुशालच्या विधवेला क्षिर दिला पोलिसाचं **लफाटणं** परतवून लावलं.' -पोळा.१६.

लफाड(ळ) (न.) मोकळी जागा, पटांगण. 'वढा लेकाले बाहीर, घ्या **लफाडात** घ्या. हाणा लेकाले.' -सेल.११९.

लफाडी (वि.) समतल, सपाट असलेला भूभाग. 'धड डोंगरी नाई, धड **लफाडी** नाई असा हा परिसर.' -खुं.१४७.

लफूट (वि.) लोफर. '**लफूट** पोरं वावरातबी जात नाई अन् घरचं कामबी करत नाईत निऱ्हा पारापुळे माजेल गोठी करत बसतात.'

लबाड(ळ) (वि.) खोटे बोलणारा. '**लबाडा**, थेई तुनं ध्यानात ठेवलंपन नाई.' -धग.१७. (फा.)

लबाडाच्या पोटचा (वि.) खोटा बोलणारा. 'कसा **लबाडाच्या पोटचा** आहे.' -पख.७२.

लबाडी (स्त्री.) खोटे बोलून फसविणे. 'काय वैनी अशी करतात काय **लबाडी**? बयनीची वयख करून देता म्हना अन् नखबी नाई दाखोलं?'

लबाळधनीक (वि.) खोटारडे श्रीमंत. 'कोनी नागऊनी **लबाळधनीके** व्याजे अढीच्या दिढी.' -भीक.२९.

लब्बर (न.) रबर. 'कोनी तरमा माहा पेन्सीलचं **लब्बर** चोरते रोजरोज.'

लभानी (पु.) एक जात. 'कानडीले **लभानेईचे** घर हायत.

तेईची भाशा तं काईच समजत नाई.'

लमकनं (क्रि.) लटकणे. 'पोट्टं डुंमनं होते काय लेक? झाळाच्या डांगीले **लमकनं** चालू करा लागते वाट्टे त्याचं.'

लमकोया (पु.) जमिनीकडे झुकलेल्या झाडाच्या फांद्या. 'रस्त्यावर येल **लमकोया** छाटा लागतात.'

लमची (वि.) एक शिवी. 'ह्ये **लमची** कशी नाही आली आजून?' -पोळा.

लमसम (वि.) १. लांब, ऐसपैस. 'ज्यालेत्याले पत्रिका दिली तं **लमसम** मंडपबी टाका लागीन.' २. खूप, जास्त. 'नदीले तं **लमसम** पानी येल आये.'

लमान(नी) (पु.) लमाण, एक जमात. 'गावातल्या गावात लग्न झालं तरी **लमाणी** तिचं तोंड पाहात नाही.' -मोती. (का.लंबाडी/णी)

लय (वि.) खूप, पुष्कळ. 'आपून मोटारीत किती खेप फुकट गेलो बे? **लय** खेप नामा म्हणाला.' -धग.६८. 'लयलय मास, वंगळ वास.' 'काटा मुळ्ळा त्याचा **लय** तरास हून रायला मले.'

लयदी (अ.) खूप दिवस. 'पाहू मंग पुळे पन आता जाऊ द्या. **लयदी** झाले आता.' -पोर.६७.

लयदीसा - खूप दिवसाचे. '**लयदिसाचा** कोन्या गावाले आलोगेलो नाई एवढ्यात.'

लयन (स्त्री.) १. रांग, ओळ. 'भटजीची एक **लयन** आहे. तांब्याभर पान्याचे पंधरा रुपये.' -अखे. २. वीज. '**लयन** नोती आपल्या घरी तं शंबर रुपये महन्यानं घेतली.' 'खेळ्यात तं **लयन** येते कमी, जातेच जादा.'

लयलूट (वि.) पुष्कळ. 'मामाच्या गावाले आंब्याची **लयलूट** असते.'

लयशी (वि.) खूप, फार. 'हेत लेका यवंदा जेवारीच कुठी झाली बे **लयशी**?' -रा.७.

लयशीक (वि.) अधिक, जास्त. 'मी **लयशिक** बोलत नसतो याबाबत कोणा जवळ.' -पाटी.१२४.

लया(ह्या)ळी (स्त्री.) मुळाला गाठी असलेले एक गवत. 'वावरात **लयाळी** भलकशी झाली तीन फाळानं नांगरा लागते लेक.'

लल्लावनं (क्रि.) लाडावणे. 'आपून काई नाई म्हनत तं तू लयच **लल्लावून** रायला राजा.'

लवकांड (न.) टोळकं, लच्यांड. आता मले काय माईत इथं कुत्र्याचं **लवकांड** येईल म्हणून.' -बा.३१.

लवकी (स्त्री.) १. एक भाजी. '**लवकी** काय पाव देली? येक पाव द्या मंग.' २. खोल भाग. 'रस्त्यात **लवकी** पळेल असल्यानं बंडी उलट्याचा भेव लागे.'

लवंडनं (क्रि.) १. इकडेतिकडे तोल जाणे. 'केशव बडबडत होता **लवंडत** चाल्ला होता. एवढ्या सकाळी त्यानं दारू घेतली होती.' -वा.४०७. २. खाली टाकणे. 'जेवण झालं मंग? बसा.' परभूनं बाज **लवंडली**.' -वा.१९१. ३. आडवेहून पडणे. 'आजी खन्नावून जेवली अन् जागीच वाकय टाकून **लवंडली**.'

लवडसवड (क्रिवि.) शिघ्र, जलदी. '**लवडसवड** घराच्या भाईर निंगलो.'

लवंडी (वि.) एक शिवी. 'नवरा मरेल हाय तिचा ते तशीई रांड हाय **लवंडी**.' -पोर.६९. (का.लवऊडी)

लवणं (न.) खाली वाकणे. 'मातीतली सोन्याची गिन्नी **लवणं** पडून तो उचलायचा.' -खुं.१९८.

लवती (वि.) झुकाव, झुकलेली. 'तागळ्याची एक दांडी तं लयच **लवती** दिसून रायली.'

लवन (स्त्री.) शेतातील खोल जागा, पाण्याचा छोटासा ओहळ, नाला. 'कोणी एकु माळेकारु माळेयावरि उभा असेः तेयाचिए सेताचिए **लवणि** चोरु एकु असेः' -ली.१७७. 'पुढातेः मागा गोसावीः ते सौंदरासंग माचीए **लवणीसी** होतेः' -ली.१००. 'तहान नसताना महादेव वावराकाडच्या **लवणात** जाऊन येई.' -धग.२९.

लवनं (क्रि.) वाकणे, झुकणे. 'तुका म्हणे उंच वाढे उंच पणे। ठेंगणी **लवनं** जैशी तैशी॥' -तुका.६५. 'डावा डोळा **लवे**। उजवी स्फुरती बाहे।' -तुका.४६९.

लवनी(न्या) (क्रिवि.) झुकून, वाकून. 'घराचा दरोजा ठेंगना असल्यानं **लवनी** पळूनच जा लागते अंद्रे.' 'लवन्या पडता येत नव्हतं. धुणं आपटता येत नव्हतं.' -ना.१४०. '**लवन्या** पळता बरोबर भोंड येऊन पळ्ळी.' -ना.११.

लवरलवर (क्रिवि.) थरथरणे. 'काओ माह्यंवालं आंग काबा **लवरलवर** कापत असन मनाव?' -धग.१००.

लवलं (क्रि.रूप.) खाली झुकले. 'छप्पर **लवलं** कारे हे? ठुनी लावा लागते एखांदी.'

लवलव (क्रिवि.) वाकण्याचे आधिक्य. 'पुंजी बिचारी त्या धाकाच्या मारं **लवलव** लवे.' -लेक.३०.

लवलाट (वि.) खूप, भरपूर. 'औंदा सोयाबीनचं अन् कापसाचं **लवलाट** पीक झालं.'

लवलेस (पु.) सहभाग. 'चोरीचपाटीत आपला तं **लवलेसच** नस्ते.'

लवळा (पु.) शिश्न. 'ज्याचं गाव जवळा, त्यानं धरावा **लवळा**.' 'कामकाज करत नाई. याचा त्याचा **लवळा** धरत हिंडते गावभर.'

लवाजमा (पु.) सर्व साहित्य आणि लोकांचा समूदाय. 'वरात पठारावरच पोचली आन **लवाजमा** पावून

बोरगाववाले हैरानीत पल्ले.' -दि.१८. 'डफडे, बेंड, मधे हाल्या, मागे मांगाचा जत्था असा **लवाजमा** निघाला.' -रा.१३१. (अर.)

लवाद (पु.) मध्यस्थ. 'डेबू कर्जबाजारी झिंगराजी अन् चंद्रभानजी यांच्यासाठी **लवाद** नेमणार होता.' -संगा.४१.

लस (स्त्री.) औषधी द्रव्य. 'पोलिओची **लस** टोचली नाई तं आयुक्शाचं पोट्टं लंगळं होईल माय.'

लसन (पु.) लसूण. '**लसणाते** हा सांडी गंधी। का अपथ्यशीळा ते व्याधी॥' -ज्ञा.१८.७५७. 'खाते **लसन**, करते ठसन.' (हिं.लहसून)

लसन्या (वि.) १. नाजूक. 'येवळ्या उनीत **लसन्या** संत्याले नेलं तं मानगीच पळील लेकाचा.' २. बायकी. 'या **लसन्या** उत्तम्याले कोनच दीन पोरगी?'

लसलस (वि.) टरारणे, रसरसणे, भरात येणे. 'जमीन काळी रेशमी मऊ/ लसलसला हिरवा गहू.' -भीक.९९.

लस्टान (न.) व्याप, पसारा, गोतावळा. 'गावातला कोनी नाई आला तुह्या मदतीले ताहा कुठी गेल्तं तुह्य हे **लस्टान**.' -पोळा.

लस्तर (वि.) क्षुद्र, कुचकामी. 'या अशा **लस्तर** मान्साले काय काम सांगता हो?'

लहान जेबोरा (पु.) सोन्याचे तार तयार करण्याचे सोनाराजवळील एक साधन. '**लहान** जेबोरा दिसला काय रे तुले? सोन्याचे तारबी तयार कऱ्याचे रायले ना?'

लहानू (पु.) लहान ह्या अर्थी संबोधन. 'कामदार म्हणून **लहानूनं** पाटलापुढे पड खाल्ली.' -काळी.५३.

लहालहा (क्रिवि.) उष्णता ओकणे. 'मृगजळाच्या लाटा **लहालहा** करत धावत होत्या.' -त.१.

लहू (वि.) प्रिय. 'लाडकी सून माही भ्रताराची मोठी **लहू**/ कशी माहेरा पाठवू.' -लोक.५४.

लहेर (स्त्री.) लहर, उर्मी. 'रुपचंदची **लहेर** फिरली तं दीनई हजारक रुपये, सांगता येत नाई.'

लहेरी (वि.) मनस्वी, मनात येईल तसे वागणारा. 'वाटलं तं येईल जेवाले नाई तं नाई लय **लहेरी** मानूस हाय गंग्या.'

लळ (पु.) रडू. 'सासरी लय तरास हाय वाट्टे पोरीले. मले पायल्या बरोबर **लळ** आला तिले.'

लळ(कुं)कोंडी (वि.) रडायला येणे. '**लळकोंडी** आन्लं या बावल्या थुतराच्यानं मले.' -सित.१२७. 'दोनखेप वावर उलटलं तरमा पानीच नाई. वावरात गेलं का मानूस **लळकुंडीच** येते राजा.'

लळबोंबल (स्त्री.) रडारड. 'मायले लेकरू पारखं असी गत्या झाल्ती. सबन **लळबोंबल** चाल्ली व्हती.' -सित.५२.

लळकं (वि.) सतत रडणारे. 'हे असं **लळकं** पोट्टं घेऊन कुठी येतं माय जागरनात?'

लळतपळत (क्रिवि.) रडतपडत. 'बकाबुडी **लळतपळत**, अळखळत, धळपळत येकटीच निराधार जगत व्हती.' -सित.४९.

लळनं (क्रि.) रडणे. 'मान्साईनं किळी उचल्ली तसं बायाईचं **लळनं** चालू झालं.'

लळापळ(ळी) (स्त्री.) रडण्याची क्रिया, रडारड. 'नापिकीनं तरन्याताठ्या लेकानं फाशी घेतली. घरात निऱ्हा मायबापाची **लळापळ** सुरू झाली.'

लळीस (क्रिवि.) रडकुंडीस येणे. 'हातभर दिवस वर नाई येत त **लळीस** हुवून सबन पोरं वाळ्यावर हाजिर.' -सित.१२४.

लळोनं (क्रि.) रडविणे. 'थेळ्ळीले लेकरू वागोनं जमत नाई, **लळोनं** तेवढं जमते तिले.'

लव्ह (पु.) बैलगाडी. 'कापसाचे गाठोळे **लव्ह्यात** टाकून, बायका गावाकळे निंगल्या.'

लव्हाई (स्त्री.) लढाई. 'कोन्ती **लव्हाई** जिकून आला तू एवढा फुसांडून रायला तईचा.'

लंगडगधी (पु.) लगडीचा खेळ. 'पाय दुखे दोन्ही **लंगडगधी** करता.' -मिर्झा.४४.

लंगळं (वि.) पंगू, लंगडा. '**लंगळंच** लंगळं गावखुरी चरेना.' (फा.)

लंगळगद्धी (पु.) खेळ. 'आता ना खेये कोनी आट्यापाट्या, ना ये कोनाले **लंगळीगद्धी**.' -कावू.

लंगळी (पु.) एका पायावर उभे राहून खेळावयाचा मुलींचा खेळ. 'लानपनी **लंगळी** खेळो आमी दोगी.' (फा.)

लंघन (पु.) निराहारी उपवास. 'कमळ नायकाचीय स्त्रीयासि ज्वरू होताः सात **लंघने** पडीलीः मगते सरलीः' -गोवि.२४५.

लंड (न.) १. शिश्न. 'वर्गनी मांगाले जावं तं भाईजी **लंड** घे म्हंते, असा खराब आये सायाचा.' २. ठक, धूर्त. 'तुका म्हणे दंड। कैसा न पवे तो **लंड**।' -तुका.३५०.

लंडपणा (पु.) उन्मत्तपणा. 'कोनासंगंबी मारामारी करते सायाचं. असा **लंडपना** काहून करतं म्हना बाबू.' (फा.)

लंपास (न.) गळप. 'माया वखराची पासच कोनं **लंपास** केली हातोहात.'

लंबं (वि.) लांब. 'दोन येक्कराची लंबीच्या **लंबी** पट्टी हाय आठदा मुळ्ळनात वावर बसते.'

लंबाचौडा (वि.) प्रदीर्घ, लांबलचक. 'बायका लावून दे

दोघात झगडा, सादासुदा नाही **लंबाचौडा** तगडा.' -मिए.१००. 'हेडमास्तरांनी सगळ्या विद्यार्थ्यांसाठी फार मोठं **लंबंचौडं** भाषण दिलं.' -खुं.१६६.

लंबेलाट (वि.) १. खूप लांब. 'काई सांगू राजा असा कसा सरप **लंबेलाट** बास्या येवळा.' २. पराभूत होणे. 'एवढा खर्चा करून निवडणुकीत आखरशेवटी **लंबेलाट** झोपलोच.' -खुं.७५.

लंबा (वि.) लांब. 'खुट्याचा दोर येवळा **लंबा** ना पायजे, आखूळच ठुला पायजे जरा.'

लंबासाट (वि.) लांब, उंच. 'मानूस पाय रे केवळा **लंबासाट** आहे. उच्चापुरा लंबा की इलक्टरीचा खंबा.'

लाई (स्त्री.) फुटाण्याची, ज्वारीची लाही. 'बीज भाजुनी केली **लाई**। आम्हा जन्म मरण नाही॥' -तुका.४२८३.

लाईलोन (क्रिवि.) करपणे, विर्घळणे. 'भरोशाच्या मान्सानं घात केला का जीव **लाईलोन** होते.' -लेक.७२.

लाऊलाऊ (क्रिवि.) थोडेथोडे. 'पोट मारून साठविलेले पन्नास रुपये तिने **लाऊलाऊ** पुरविले.' -रा.२२०. 'भाजी उलसीकच असल्यानं आमी **लाऊलाऊ** खावून पुरोली.'

लाकळी (वि.) लाकडापासून तयार केलेला. '**लाकळी** वखरापेक्शा लेखंडी पुरते. सुताराचा खर्च नाई. कसतेबी मस्त.'

लाकुळखाना (पु.) अनेक लाकडांचा ढीग. 'आपल्या वाळग्यात **लाकुळखाना** पळेल आये, त्यात पाय एखांदी दांडी सापळते का तं?'

लाकुळफाटा (पु.) लाकडी साहित्य. 'घर बांध्याले **लाकुळफाटा** आनला इकत.'

लाकूळ (न.) लाकूड. 'अबे! झाळंच नाई ठुले तं मान्साले जायालेबी **लाकूळ** भेटनार नाई.'

लाख (पु.) १. लक्ष. 'येक लाख रुपयालेबी लाज नाई रायली. कोनीबी खिशातून काहाळते **लाख** दोन लाख.' २. एक धान्य. 'तेळीणीचे लेकरु **लांकाची** भाकरि खात होतेः ' -गोवि.२९२/८. ३. ज्वालाग्राही पदार्थ. 'पेपरचे गठ्ठे बांधले, **लाख** गरम करून त्यावर शिक्का मारला, पेकबंद काम हून गेलं.'

लाखळ (स्त्री.) राख. 'इटाईच्या भट्ट्यावर **लाखळ** पायजे इटा बनोताखेपी.'

लाखा (वि.) लाल तांबड्या रंगाचा. 'बैलई किती रंगाचे, एक कबरा, एक सोनारा, एक **लाखा**, तं एक कोयशा.'

लाखी (स्त्री.) राखी. '**लाखी** बांधली हाताले भाऊबीज ओवायली.' -धों.३३.

लाखो (वि.) लक्षलक्ष. 'पंढरपुरच्या वारी **लाखो** वारकरी येतात हरसाल.'

लाखोली (स्त्री.) शिवीगाळ. 'शामराव पाटलाच्या मायची... अशी कासाबुढी **लाखोली** वाहाची.'

लाखोली (स्त्री.) लाख बेलांनी केलेले पूजन. 'भरोनिया लिंबका। **लाखोली** वाहे॥' -ज्ञा.१३.३८७. 'श्रावणातील शेवटच्या सोमवारी होणारी गावपंगत **लाखोलीची** पंगत.' -रा.१७.

लाख्या (स्त्री.अने.) राख्या. 'हातात एवढ्या मोठ्या **लाख्या**? किती बयनी आयेत बापा तुले भाऊराव?'

लाग (पु.) १. सापाची कामक्रिडा. 'सरपाचा **लाग** लागेल दिसला की दुपट्टा टाकाव अन् त्यावर येक रुपया टाकाव.' २. सोय स्थिती. 'लोकायले खरा सल्ला द्यायचाबी **लाग** राह्यला नाई या दुनियेत.' -खुं.१२७. ३. लागवण, बहर. 'तरबूस खरबूस अन् काकळ्याईचा अवंदा साजरा **लाग** लागला व्हता.' -सित.५६.

लागट (वि.) जिद्दी. 'या बोला श्री अनंतें। लागट देखिलें तयातें॥' -ज्ञा.९.२३१. 'देव **लागट** देव **लागट**। लाविलिया चट जीवी जडे॥' -तुका.१८५९.

लागत (स्त्री.) लागलेला खर्च. 'औंदा वावरात लावेल **लागतई** निंगते का नाई देव जानो.'

लागन (स्त्री.) रोगाची साथ. 'चिकनगुनियाची **लागन** आली तं लय मजा वाट्टे बायामान्साले हाग्याचं टमरेटबी उचलता ना ये.'

लागन (क्रि.रूप.) लागणार. 'तुमालेबी अशानं लवकर **लागन** गिरान/ माय सारखे एक दिवस भीक मांगत फिरानं.' -जांग.३८.

लागपाठी (क्रिवि.) पाठोपाठ. 'लागपाठी चांगले सालमान काई आपल्या नशिबात येतच नाईत.' -बा.१८९.

लागलती (क्रि.रूप.) लागली होती. 'मी रानावनात जा **लागलती**, न जाऊन का करता?' -ऊन.७५.

लागवळ (स्त्री.) शेतातील लावणी. 'कांद्याचं रोप टाकेल होतं. हरबरा निंगताबरोबर **लागवळ** केली.' (त. शाकुपडी)

लागाई (क्रि.रूप.) लागलेली. 'आपली भागाई म्हंत का तू? ते पाटलासी आये **लागाई**. कायले आता चांगली आये काय वांगली आये तं?'

लागाबांधा (पु.) वशिला. 'असेल काही **लागाबांधा** पूर्व जन्मिचा कुणी.' -भीक.८.

लागायला (क्रि.रूप.) लागत आहे. 'कारे तुले लयच मान **लागायला**? सरपंचीननं जवळ येऊन म्हटलं.' -पख.२४.

लागी (क्रिवि.) १. मार्गी. 'पैशाची देणगी मिळताच काम **लागी** लागले.' -कात.३७९. २. मार्गावर, वठणीवर. 'पोलिसाच्या हिसक्याबिगर नाहीत **लागी** येत हे लोकं.'

-पख. ९९.

लागी (अ.) लागे- एक शब्दयोगी अव्यय. 'घरी गेल्यावर तुमी लिवेल पुस्तक **वाचालागी**.'

लागीन (क्रि.रूप.) लागेल, लागणार. 'मरन माझ्या पुढं उभं आहे आता एथून जावं **लागीन**.' -अखे.

लागू (क्रिवि.) संबंधित, लागलेली, भिडलेली. 'कारकुंडी असून चोरेबाई सायेबासी **लागू** आये.' 'तुमचा हा कायदा मले **लागू** पळत नाही.'

लागून (अ.) खेटून, जुळून. '**शाळेलागूनच** माहा घर आये.' 'हद्यापासून मले बरं **लागून** नाई रायलं.' 'कालपासून पानी **लागून** पळेल आये.' 'निंबाचं रोपई पानी आलं तं **लागून** गेलं मस्तं.'

लागे (क्रि.रूप.) लागतात. 'नका नेऊ बाई गावा/ उन्हाच्या **लागे** झावा.' -लोक.७५.

लागे (अ.) ही, सुद्धा. '**तुलागे** गेलता का लांडगा म्हनून?'

लागेल (वि.) दारू प्यालेला. 'नाचनारे पोट्टेच म्हंता काय अहो नवरदेवई **लागेल** आय मस्त.' -धुम्म.

लागेल (क्रि.रूप.) लागलेले. 'घसरल्यानं कंबरीले भल्लं **लागेल** आये मावाल्या.'

लागो (क्रि.रूप.) लागावे. 'मायले मांग **लागो** लेकाच्या.' -पख.९९.

लागोन (न.) शेत कुळाला कसण्यासाठी देणे. 'देवस्थानचं वावर **लागोननं** करत अन् आता पचोलं सायाचेईनं.'

लागोनदार (वि.) कूळ. 'या साली रमेश दिवानजी **लागोनदार** हाय तं वावर पाय कसं निप्पक ठेवलं.'

लागोळ (पु.) १. लागलेला खर्च. 'जमिनीच्या **लावलागोळालेच** तं लय पैसा लागते भाऊ.' २. फुला, फळांचा बहर, परिमाण. 'उळदाले **लागोळ** चांगलं होतं म्हनून येकरी दोन पोते झाले.'

लाच (स्त्री.) रिश्वत. 'तुका म्हणे जैसी। **लांचासाठी** ग्वाही।' -तुका.२९३. (का.)

लाज (स्त्री.) लज्जा, शरम. 'कैसा करू घात आपुला आपण। धरूनि गुमान **लोकलाज**॥' -तुका.२४३. 'जानजवान लेकराले उघडं आंग ठुवाची **लाज** वाटते.' -रा.४३.

लाजबाब (वि.) अनुपम. 'पोरीले काय पाहा लागते, **लाजबाब** आये बापा.' (अर.)

लाजमोळी (वि.) लाजलज्या न बाळगणारी. 'तुले काई शरम **लाजमोळे**, का इकून खाल्ली वरतून तोंड काढून सांगते हलकटवानाची.' -दि.३५

लाजीकाजी (क्रिवि.) मनात नसून इभ्रत ठेवण्याचा प्रयत्न. 'हे वाक्य बंडोजी **लाजीकाजीनं** बोलला होता.' -मोती.

लाजी(जे)म (वि.) मिंधा. 'ती यापूर्वी कुणाच्या सुतळीच्या तोड्यालाही **लाजीम** नव्हती.' -कात.१८२. 'कोन्त्या लेकराले बोटभऱ्याच्या चिंधीनं का **लाजेम** केलं असन त नाव नको घेऊ.' -धग.९४. 'भिक्यानं कसं मले चहा पाजूपाजू **लाजिम** केलं.' -एक.

लाजिरवाना (वि.) शरमिंदा. 'चोरी करताखेपी मले पायलं अन् शाम्या लयच **लाजिरवाना** झाला.'

लाट (स्त्री.) प्रवाह, आधिक्य. 'आठ दिवसापासून थंडीची **लाट** आली सायची.'

लाटनं (क्रि.) पोळ्या करण्याचे गोलाकार साधन. 'जो **लाटणे** ऐसा न लवे॥' -ज्ञा.१३.७२५. '**लाटनं** नाई दिसलं तं पोया काहानं **लाटू** आता?' (का.लट्टनिगे) २. दाबणे. (का.लट्टीसु) ३. लुबाडणे. 'त्यानं माहा दोन एक्कर वावर **लाटलं**.'

लाटी (स्त्री.) १. हातात बांधण्याचा दोरा. 'बांगळीबिल्लोर चोई **लाटी** सारं मनानं होऊ दे. घरात नशीन लुगळं त आकोटातून आनू.' -पाहु. २. पापडाच्या उंड्याचा लहान गोळा.

लाटे (क्रि.रूप.) लाठी, मानवणारे. 'तुका म्हणे बहुं **लाटे** हे भोजन। नाही रिता कोण राहत राहो॥' -तुका.४४.

लाठी (स्त्री.) काठी. 'बाबाचि पासौनि गोमटे आणि बाबावरि कैसा **लाठी** घालु आला?' -ली.३५३. 'तेलीया एकाची **लाठी** खांदावरी घालुनि... आलेः' -ली.३५३. 'आखरात आमी **लाठीकाठी** खेयाले शिकलो.'

लाठी(ठे) (न.) मानविणारे, फायद्याचे, लाभदायी. 'द्वैत जेथें उठी। अविद्या जेणें **लाठी**॥' -ज्ञा.१३.११३. 'हे शहर काही **लाठी** नाही आपल्याले.' -मे.४७. 'वाकडं बोट घालणारांनाच **लाठे** असतात लोकं.' -पख.१२५. (का.लट्ठु)

लाड (पु.) कौतुक, प्रेम, स्नेह. 'तुका म्हणे **लाड**। विठोबा पुरविल कोड॥' -तुका.३१६२.

लाडकी (वि.) आवडती. 'कन्या राजाची **लाडकी** बोले त्यास जाता शाही, ठेवा हाताची मुद्रिका निशाणी खूण काही.' -लोक.३९.

लाडाकोडाचा (वि.) प्रेमाचे, आत्मीय. 'मायसाठी लेकरू **लाडाकोडाचं** रायतेच.'

लाडिगोळी (स्त्री.) गोडीगुलाबी. 'भाचे बॉ कितीबी **लाडिगोळी** लावा तरमा पोरगी नाई भेटत आपली तुमाले.'

लाडू (पु.) रवी, बुन्दीचा गोल गोड खाद्य पदार्थ. 'गोड **लाडवाचं** खाजं, झालं गाडीवर ओझं.' -लोक.७५. (का. लाडू)

लातऱ्या (वि.) लाथा मारणारा. 'त्या **लातऱ्या** बैलामांगून

नको जाऊ.'

लाथाळनं (क्रि.) मारणे. 'पायापायानं **लाथाळनं** चालू केलं काय दारू पेऊन बायकोले.'

लादनं (क्रि.) ओझे देणे, भार टाकणे. 'आपलं काम दुसऱ्यावर **लादनं** चांगलं नाई.'

लादनी (स्त्री.) रुंद भिंतीत धान्य साठविण्यासाठी केलेली जागा. '**लादनीचं** घर, तेच्यानं भीतीयायनं वारं घेतल्यानं भेगा रुंद झाल्या हाय.' -दि.७७. 'एकदा खळे आटोपले, ज्वारी बाजरी घरात आली की **लादणी** कणगीची झाळी.' -सेल.४१.

लादळ (वि.) पावसामुळे जमिनीत आलेला ओलसरपणा. यामुळे शेतात औत नीट चालत नाही. 'वावर **लादळ** आल्यानं वखर कचून नाई रायला.'

लान (वि.) १. लहान. '**लानलान** गोठीपायी डोक्सं खराब करू नाई.' २. पाणी सोडणे, खर्च होणे. 'कोशाला जोड म्हणजे पैशांची होड, वीसपंचवीस हजारांवर **लान**.' -पोळा.

लानत (स्त्री.) धिक्कार, निर्भत्सना. 'पोरीची खोळी करतं लेका, **लानत** आये तुया जिनगानीवर, थू तुया मायपनी तं.' (अर.)

लानसुकलं (वि.) लहान. '**लानसुकलं** गाव व गावाची किरत दूरलोक पसरली व्हती.' -सित.३२.

लापटनं (क्रि.) लाटणे, लुबाडणे. 'भांडेकुंडे तं काईच वाट्यावर नाई आले. आता का बैल **लापटता**?' -ल.६३.

लापता (वि.) बेपत्ता, नाहीसा. 'मोतीराम मयन्यापासून गावात नाई. **लापता** आये.' (अर.फा.)

लापर्वा (वि.) बेफिकीर, निष्काळजी. '**लापर्वाइनच** असी नुसकानी होते. खयात झोपला असता त जवारी नोती जात.' (अर.फा.)

लाभी (वि.) फायदेशीर. 'मिस्तरीचं काम हाती घेतलं अन् येका सालात **लाभी** लागलं.'

लामकानी (वि.) लांब कान असलेले. '**लामकानी** गाय केवळ्याची इकत घेतली गळ्या तुवा.'

लामट (न.) शेवया. 'निवदासाठी **लामट्याचा** भात शिजवतात.' -पख.१२४.

लामन (स्त्री.) लांबण. 'दोन शेंड्या बामन, देव पुजेची **लामन**.'

लामनी (वि.) गुरांना चारा खाणे सोयीचे व्हावे व ते पिकातही न जावे यासाठी लांब दोराने बांधणे. 'पळीतात बैल **लामनी** घाल अन् बायाई मांगचे पुंजे उचल.'

लाय (स्त्री.) लाळ. 'जेथ आशेचिये लाळे। आंतू हिंसा जीभ लोळे॥' -ज्ञा.९.१८१. 'कुत्र्यावानी **लायच** गायते माय पोरगं.'

लायकनं (क्रि.) लाळ गाळणे. 'पान्यासाठी चिळीचं **लायकनं** तिले सोसत नाई.' -डेबू.१९. 'उनात म्हैस **लायकून** रायली ना बे, कोठ्यात बांध नं का मीच बांधू?' (का.लोळे)

लायकी (स्त्री.) योग्यता. 'अशी अलबांड जोळी इकत घ्याची तुमची **लायकी** नाई.' (फा.)

लायघो(चा)ट्या (वि.) हाजीहाजी करणारा. 'मोतीराम तं लयच **लायचाट्या** हाय. नाई म्हटलं तरमा मांगंमांगं फिरत रायते.'

लायना (वि.) लहान. '**लायना** हुशार आय आन थो मोठा इदूर? तो कसा निंघाला पाहा.' -धग.१२१.

लायभर (क्रिवि.) घाईत. 'बायका मवरे गेल्याच्यानं त्यायले सित्याम्हून ते **लायभरलायभर** चाल्ली.' -सित.६२.

लायसन (न.) जन्मतः शरीरावरील डाग. 'मुरद्याची हातावर **लायसन** असल्यानं ओयख पटली.'

लायसेंबूळ (न.) लाळ आणि शेंबूड एकत्र. 'पाटाउवाचेनि पालवे **लाळसेंबुड** पुसोनिः कडीए घेउनि स्तनपान देः' ली.६०८.

लाया (स्त्री.अने.) मुरमुरे, लाह्या. 'फराळासी पीठ **लाह्या**।' -नाथ.८३१.

लालगांडी (स्त्री.) गवती प्रकार. 'वावरात **लालगांडी** माजली. बाया सांगतो निंदाले नाई तं तननाशक मारतो.'

लालजरद (वि.) अती लाल, गर्द. 'दोन्ही तळहातावर **लालजरद** चट्टे पडले होते.' -पख.१००.

लालट (स्त्री.) लालिमा. 'हुक्क्यातील निखाऱ्याची **लालट** फुलली होती.' -कात.१६.

लालतंबा(बो)र (वि.) अती लाल. 'कुणब्याच्या पोरांनी रतन्याला मारोतीसारखा **लालतंबार** होईपर्यंत बजाडलं.' -पख.६९.

लालतोंड्या (वि.) लाल तोंड असलेला, वानराचा एक प्रकार. 'सातपुळ्यात **लालतोंडे** वान्नेरं लयच हायत.'

लालपत्ती (स्त्री.) उच्च प्रतीचा तंबाखू. 'तोंडात चालू मालसुद्धा नाही मग **लालपत्तीचा** कोठून?' -मोती.

लालपरी (स्त्री.) एक मादक पदार्थ. '**लालपरी** गिळण्याची लत गावात वाढत चालली होती.' -झेल.५३. '**लालपरी** नारंगी मोसंबी या गोष्टी कोरकूच्या जिवावर उठल्या आहेत.' -झेल.३६.

लालबुंद (वि.) पुष्ट, लठ्ठ, मासल. 'खाऊनपिऊन गाई मस्त **लालबुंद** झाल्या मोकया मनानं त्याबी धमधम दूध देत आल्या.' -रूख.

लालभळक (वि.) अतिशय लाल. 'सूर्यातय अभाय पाय केवढं **लालभळक** होयेल आये.'

लालमुंगी (स्त्री.) चावरीमुंगी. 'घळ्ळीच्या ओलोस्यानं **लालमुंग्या** लयच झाल्या माय.'

लालसा (स्त्री.) इच्छा, आसक्ती. 'जेवाची कवा राहे नाही **लालसा**.' -मिर्झा.१०९.

लालसी (वि.) हव्यास, हाव असलेला. '**लालसी** मान्साची नजर दुसऱ्याच्या वसदवरच रायते.'

लालुस(च)नं (क्रि.) लालचावणे, हपापणे. 'परी मी आजि तुझां गुणीं। **लाचावलों** अपराधु न गणीं।' -ज्ञा.१६.३०. '**लाचावले** मन लागिलेसी गोडी। ते जेवे न सोडी ऐसे जाले॥' -तुका.४०२६. 'पिकेल चीच पायली का मन **लालुसते** सायाचं.'

लालूस (स्त्री.) आसक्ती, हव्यास, इच्छा. '**लाचावला** तुका मारितसे झड।' -तुका.३९. 'गरमगरम भजे पायले अन् मले खाची **लालूस** सुटली.' (का.लालुची)

लाव (स्त्री.) रूप असलेली हडळ, राक्षसी. 'खाइन रेः खाइन रेः म्हणौनि धावीनलीतिः तुम्ही काइ **लाव**?' -ली.९. 'तें वाचा नव्हे सुंदर। लांवचि पां॥' -ज्ञा.१६.१२२. '**लाव** बसली लपाले, भूत बसलं हेपाले.' 'बायको झाली **लाव** तं नवऱ्याचं कसं व्हाव.'

लावगन (क्रि.) रोप लावण्याची क्रिया. 'मिरचीची **लावगन** केली. पान्याची येक पाळी देतो उद्यापासून.'

लावडीन (स्त्री.) अदृश्य राक्षसी. 'हे लाईन त एवढ्यात **लावडीनवानी** दिवसाच गायब व्हाले लागली.' -पोळा.२३.

लावणीचा - लावलेला. 'महालात दिवा जळतो **लावणीचा**, घेते दत्तक लोकाचा.' -लोक.६३.

लावतोड (स्त्री.) आटापिटा. '**लावतोड** करुकरू आपली सम्दी जिंदगी मायनस.' -बा.११८.

लावनं (क्रि.) १. लावणे. 'कुकू **लावनं** माय कपायाले.' २. पाजळणे, टेकविणे. 'कुऱ्हाळ तं लयच बोचर झाली खरपावर **लावनं** पळते लेक.' ३. फळणे. 'म्हसीले एकखेप हेला **लावनं**, मंग पाय फयते का नाई तं?'

लावनी (स्त्री.) १. लावलगाई, चुगली. 'नाही म्हणावा आपला शेजीच्या **लावणीनं** लाल इंगुळ तापला.' -लोक.९१. २. एक लोकगीत प्रकार. 'तमाशात जाऊन **लावनी** ऐकाची सव होती बुढ्याले.' (का.लावणि)

लावनीचा (वि.) लावलेल्या नात्याचा. 'बापा, पोरीले तं **लावनीचे** भाऊ तं डजनभर आयत.'

लावरा (वि.) हावरेपणाने, गडबडीने काम करणारा. 'निस्ताईनं करावं तं लावरलावर काम करत रायते **लावरा**.'

लावलगाई (स्त्री.) चुगली, कळ. 'कुटन्या हायस का बे? चांगलीच **लावलगाई** करता येते तुले. काई काम येकाचे दोन सांगाचे?'

लावलागवड (स्त्री.) पेरणी. 'ह्या वर्षी **लावलागवडीची** तं मोठी आफतच झाली.' -अंधा.

लावल्ते (क्रि.रूप.) लावले होते. 'म्या कानचं **लावल्ते** पन काई आयकू नाई आलं.' -गा.१०३.

लावार(री)स (वि.) बेवारशी. 'मायबाप नसल्यावर पोरं **लावारीसच** असतात ना?' (अर.)

लावाय (क्रि.रूप.) लावायला. 'सुनाईले कामाले **लावाय** सासरा टपेलच अस्ते माय.'

लावालाव (स्त्री.) सामान व्यवस्थित लावणे. 'सामानाची **लावालाव** करताना मचाल बोलत होती.' -सि.५४.

लावालावी (स्त्री.) कळ लावणे. 'ना कोणाची चुगली केली गावी/ उणिउपरी **लावालावी**.' -भीक.१०६. 'सारी गंडार सांगून टाक त्याले तो काई **लावालावी** करनार नाई.' -झेल.२७.

लावाव (क्रि.रूप.) लावायचे. 'त्याच्यापेक्षा आपलं **लावाव** होले हो/ अंगाई म्हनत राहाव झो बाळा झो.' -जांग.१६.

लावू (क्रि.रूप.) लावावयाला. 'इळा **लाउ** बैसलाः तंव इळा वांकलाः ऐसा नीधावलाः' -ली.४७७. 'म्हटलं इवा, कुराळ **लावू** तं खाती घरी नोता.'

लाव्यादिव्या (स्त्री.) कळ लावणे, इकडची गोष्ट तिकडे करणे. 'गावतलं राजकारण उचापती **लाव्यादिव्या** पण हे सारं काळजीपूर्वक करायचं.' -पाटी.४७. 'अशा **लाव्यादिव्या** करून पोरीबाळीचे संसार मोडते.' -झि.१५.

लाश(स) (स्त्री.) प्रेत. 'कोपऱ्यातल्या पडीतात त्याची **लाश** टाकली.' -खुं.५८. 'कुठी आहे तो पुऱ्या? त्याची आज **लासच** पाडतो.' -पाटी. 'गाव झालं गा मसान अशी आली अवदसा/ पूर्णामायचे रेतीत आता पडतेत **लासा**.' -नोका. (तु.)

लाहाकनं (क्रि.) लाळ गाळणे. 'दिवसा उनीच्यानं बैल **लाहाकते**, लवकर थकते मनून राच्च्यानं नांगरतो.' -दि.६७.

लाही (स्त्री.) चणा, तांदूळ वाळूत भाजून होणारा पदार्थ. 'जत्रीतून लेवळ्या **लाह्या** फुटाने आनजा लेकराईसाठी.'

लाहीलाही (स्त्री.) उष्म्याने हैराण. 'उनापायी जीव कसा **लाहीलाही** हून गेला.'

लाळ (पु.) लाड. 'लान लेकराचा **लाळ** येतेच मान्साले.'

लाळकी (वि.) लाडाची, आवडीची. 'बायको जरी **लाळकी/**

खिशात बेज्या कळकी.' -धों.४०.

लाळानवसाचं (वि.) देवधर्माच्या कृपेने झालेले अपत्य. '**लाळानवसाचा** पोरगा असून तिले पोटाच्या कमाईले कामावर जावा लागे.' -लेक.४६.

लाळावनं (क्रि.) लाडाविणे. 'तंव तो डोल्हारेयावरि बैसोनि आपुली लेकरुवे **लाडवीत** होताः' -ली.२०२. 'इंद्रिये **लाळिली** जरी कौतुके॥' -ज्ञा.२.३५०. 'तैसें संत माहेर माझे। तुम्ही मिनलिया मी लाडैजे॥' -ज्ञा.१५.५९६.

लाळीगोळी (स्त्री.) प्रेमळ वर्तन. 'बायको करते **लाळीगोळी/** मोरपिसाची मांगते साळी.'

लाळू (पु.) लाडू. 'ह्याऽऽ पंगतीत बुंदीचे **लाळू**. भल्लेच झोळ्ळे ईसईस.'

लाळोनं (क्रि.) लाडावणे. 'श्या देल्ल्या पोट्ट्यानं. घेना बापा तुमचंच त त्या पोट्ट्याईले **लाळोनं** चालू होतं.'

लांक (पु.) लाख, एक धान्य प्रकार. 'तेळीणी म्हणीतले, राउळो हे भाकरी तेलीयांचीः गोसावी म्हणीतलेः आवो मेली जाएः तेलीयाची नव्हे म्हणेः हे **लांकाची** भाकरिः' -गोवि.२९.

लांग(घ) (स्त्री.) मातीचा बांध. 'माह्या ढोराईनं बाखड्याची **लांग** खसवली.' -धग.४५.

लांडं (वि.) आखूड. '**लांडी** इजार नेसता येईना तेव्हा मायीनं ठिगळ लावलं.' -हा.२४. '**लांडा** शर्ट आणि आखूड धोतर हा त्याचा जन्मदत्त अधिकार.' -काळी.१७.

लांडगा (पु.) १. खळ्यातील ज्वारीच्या पिशा वेगळे काढण्यासाठी केलेले झाडणे. २. नवरदेवाचा सोबती. 'तिफन म्हनजे नवरी भाऊ तिचा डवरा/ वखर असते **लांडगा** नांगर असते नवरा.' -मिए.७६. 'नवरदेच्यापुढचे ताट **लांडग्यांनी** पळविले.' -रा.६१. ३. एक हिंस्त्र प्राणी.

लांडगेतोड (स्त्री.) अतिशय, धावपळ, धांदल. 'नेरले आल्यावर सुरू **लांडगेतोड/** गाडी पहासाठी करा तंगडे मोड.' -मिर्झा.१६५.

लांडीस (पु.) पत्त्यातील एक खेळ. 'तीनपानी खेळाले पैसे नाई आपल्याजोळ. **लांडीस** खेळतं काय?'

लांडोर (पु.) नर मोरपक्षी. '**लांडोर** नाई बे ते फकाचा पिसारा त मोरच करते ना लेका.'

लांबजाना (पु.) कोरकू ह्या आदिवासी जमातीत मुलीला हुंडा न देता येणाऱ्या मुलाला मुलीच्या घरी राहून काम करावे लागते तो **लामजाना**. 'नवरीचा हुंडा फिटेपर्यंत सासऱ्याच्या घरी कष्ट करून राबणारा घरजावई तो **लांबजाना**.' -झेल.११.

लांबट (वि.) लांब. 'गारा कुस्करून माय त्याचा **लांबट** पेंड करायची.' -फीर.८०.

लांबन (स्त्री.) अधिक वेळ, विलंब लावणे. 'तुका म्हणे होईं लवकरि उदार। **लांबणीचें** फार काम नाहीं॥' -तुका.३५८७.

लांबलेखा (पु.) लांबण, गोष्टीचे चऱ्हाट. 'तीही अधिक **लांबलेखा** न लावता घराबाहेर पडली.' -पख.१०८.

लांबोता (क्रि.रूप.) घेऊन जाता. 'गनपती बसोता. उठोता. मंग कुकळे **लांबोता**? एवढ्या पान्यात...मोरया.' -अखे.

लिखाई (स्त्री.) लिहिण्याची क्रिया. '**लिखाई** पळाई पोरीनं केली की नाई? का नुसत्याच भाकरी थापते?'

लिखानकाम (न.) लिहिण्याची क्रिया, लेखन. 'आतालोक शेहेरवालेच **लिखानकाम** करत, आता खेळ्यातलेई करतेत.'

लिखापढी(ळी) (स्त्री.) लेखनवाचन. 'सर्व कारभाराची **लिखापढी** करण्यासाठी रामभाऊ दिवाणजी.' -जटा.१०. 'दोघायच्या हिस्सावाटी बद्दलची **लिखापळी** पाटील बुवानं करून घेतली.' -सित.६७.

लिखावट (स्त्री.) लिहिलेले. '**लिखावट** सांगते ना कोनाचं अक्शर हाय तं.'

लिगटली (क्रि.रूप.) चिपकली, एकरूप. 'केवळ शरीरानेच नव्हे तर मनानेही ती त्यांच्याशी चांगलीच **लिगटली** होती.' -कात.२१४.

लिगाड (न.) झंझट, जंजाळ, ब्याद. 'परमार्थात बिघाड पडू नये म्हणून संसाराचे **लिगाड** तोडावयास हवे.' -कात.२०

लिगाडा (पु.) घाण. '**लिगाडाच्या** गुणे। खोळंबला राहिलो॥' -तुका.८६६. 'गोडपणे मासी गुंतली **लिगाडीं**। सापडे फडफडी अधिकाअधिक।' -तुका.१०८७.४.

लिचड (वि.) गुंतागुंतीचा, कटकटीचा अवघड. 'सुरू झालं वधू संशोधनाचं काम/ **लिचड** धंदा सारा असे रामराम.' -मिर्झा.१८१.

लिचुं(चों)डा (पु.) चिमटा. 'कुणी **लिचुंडा** घेतला तं हा भोया सांब थयथयाट करते.' -दि.१७.

लिचोळ (पु.) गोचीड. 'बैलाच्या आंगावर **लिचोळ** झाल्याच्यानं विश्यारी पावडर लावली.'

लितापोती (स्त्री.) १. वरून सारवणे. 'पोपळे निंघेल भिताळाची मायनं **लितापोती** सुरू केली.' २. आवरण घालणे, सारवासारव. 'पयले बोलून तं बसला, आता **लितापोती** करून रायला मोठा.'

लिपछाप (स्त्री.) लिंपण्याची क्रिया. 'लोकाईनं भितायची **लिपछाप** थांबोली.' -झेल.८५.

लिपनं (क्रि.) लिंपणे, लेप देणे. 'सेनीचा कलवडु होता तो सरीसा **लींपिलाः** तेयावरि इलरे घातलेः' -ली.३३. 'पाणिये माती कालवीलीः आणि **लिंपीलाः**' -गोवि.६१.

'ऋतू येतां आकाशें। **लिंपिजेचि** ना जैसें।' -ज्ञा.१४.३६४.

लिपलाप (न.) लिंपण्याची क्रिया. 'खंडारं रायलं घराचं, **लिपलाप** करून ठीकठाक करा लागते.'

लिपून (क्रि.रूप.) लिंपून. 'माय आणि शांताने **लिपूनलापून**, सारवून घराला घरपण आणलं.' -फीर.१७६.

लिबास (पु.) पोषाख, पेहराव. 'आपल्याले दंडते असाच **लिबास** करावं पोरीसोरीनं.' (अर.)

लिवनं (क्रि.) लिहिणे. 'पोरगी लय अभ्यास करते. सकाऊनलोक **लिवनं** चालू रायते माय.'

लिवलं (क्रि.रूप.) लिहिले. 'भाऊजीले म्या कालच पत्र **लिवलं** आये.'

लिवलिवत (क्रिवि.) घुटमळत, रेंगाळत. 'येसोंतीभवती गुळाभोवतीच्या मुंगळ्यासारखी काही पोरं **लिवलिवत** होती.' -धग.११९.

लिहाज (पु.) आदर, भीड. 'थोरामोठ्याचा **लिहाज** ठेवाले पायजे लायन्यासाईन्याईनं.' (अर.)

लिंग (न.) १. महादेवाची पिंड. 'आवंढा नागनाथु, परळीएवैजनाथुः से लिंगाः सहस्त्रु **लींगा**, कोडि **लिंगा**ः' 'आणि तैसीचि दुडुदुडु करि नागनाथाचीया देउळासि धांव घेतलीः लींगासीबीजे केले **लींग** श्रीकरे स्परीसीलेः' -गोवि.२२८. 'समुद्र नदी नव्हे पैं गा। पाषाण म्हणो नये **लिंगा**॥' -तुका.४५४. २. शिश्न. 'वानी पावशेर, **लिंग** सवाशेर.' 'वाण्याच्या ढेरीवरून जसा **लिंग** कधी उतरत नाही.' -पख.६८.

लिंगायत (पु.) एक शिवभक्त जमात. 'लातूरात मामुली म्हंजे मारवाळी, मुसलमान अन् **लिंगायताईची** एकजूटच निवळनूक जिकत असते.'

लिंबलोन (न.) ? 'येशोदेच्या करीं **लिंबलोण**।' -नाथ.२-२३१.

लीद (न.) घोड्याची, गाढवाची विष्ठा. 'गाढवं **लीद** टाकत उधळावी तशा शिव्याशाप बरसात करू लागले.' -डेबू.१२. 'माती आण, पाणी आण, **लीद** चोळ, गवत आण, कचरं आण असं सारखं मला सांगायचे.' -फीर.२८. (फा.पलीद,का.)

लीबलीब (वि.) अती पक्वता. 'लय पकल्यानं आंबा पाय केवढा **लीबलीब** झाला.'

लीला (स्त्री.) क्रीडा, लीळा. 'जवाई बॉ काई बरोबर नाई वाटून रायलं राजा. तुमच्या शिरीकिस्नाच्या **लीला** कानावर येऊन रायल्या अंऽऽ?' 'परमेसराची **लीला** अगाध रायते भाऊजी.'

लुकलूक (क्रिवि.) अधूनमधून लकाकणे. 'दिवा **लुकलूक** करून रायला.'

लुकळं (वि.) हडकुळा, अशक्त. '**लुकळं** तं लुकळं तोंडाय पाय किती हायं.'

लुकूलुकू (क्रिवि.) टुकूटुकू. 'मायच्या स्पर्शानं लेकराचं रडणं थांबलं. **लुकूलुकू** पाहू लागलं.' -सि.२६.

लुखूलुखू (वि.) अशक्त. 'बाबाराव मुसळे असं लेखकाचं नाव हाय अन् पुस्तकाचं नाव हाय 'झिंगू **लुखूलुखू**'.

लुगळं (न.) लुगडे, मराठी स्त्रीचे नेसू. 'जालासि **लुगडीं** तया द्रोपदीचीं। न ये कां आमुची कृपा कांही॥' -तुका.४४०८. 'पदर फाटक्या या **लुगड्याचा** ढळू न देते खाली वरचा.' -भीक.१४५. '**लुगळं** भिजते आंगाले झोंबते/ उघळ्या डोयाले सपन पळते.' -वि.

लुगाई (स्त्री.) पत्नी. 'रामकिसन सांगे त्याची **लुगाई** तिकळे मारवाळात रायते मून.'

लुगुलुगु (क्रिवि.) हळूहळू पण गतीने. 'म्यॅं म्यॅं असा आवाज काढत बकरी **लुगूलुगू** धावत त्याच्या मागे येत होती.' -खुं.२३१.

लुचनं (क्रि.) १. केस उपटणे. 'आव तू काय कयदाशीन हायस काय? लेकीचे केसं धरूधरू **लुचनं** चालू केलं कईचं?' २. ओरपणे. 'दूध नव्हतं तरीबी पिलं थानं **लुचत** होते.'

लुचाट (वि.) लुबाडणारा. 'कलीचे साधू **लुचाटच** असतात.'

लुचून (क्रि.रूप.) उपटून. 'मंजे माह्या झिंज्या **लुचून** घ्यायच्या का काय या बाईच्या हातानं.' -पख.६.

लुच्चा (वि.) लुबाडणारा. 'कुठी हाये तो **लुच्चा**, तंगळी तोडून हाती देतो त्याच्या.' -सील.१५९. (का.)

लुच्चेगिरी (स्त्री.) फसवूणक. '**लुच्चेगिरी** करून भल्या लोकाईले लुबाळाचं तुमचं काम हाय राजा.'

लुटनं (क्रि.) लुबाडणे. 'देखरेख कऱ्याले मानूस नाई, मजूर गळी **लुटून** खातात.' -फीर.१७२.

लुटमार (स्त्री.) लुटणे, मारणे. 'वाल्या रस्त्यावर **लुटमार** करे मंग त्याचाच वाल्मिकी झाला.'

लुटेल (वि.) लुटलेले. 'बेपारी, अळत्याईयाकून कास्तकार **लुटेल** हाय.' 'डाकूनं रेलवाईच **लुटेल** आये सबन.'

लुथरी (वि.) एक शिवी. 'रडत राह्यती बकरीच्या पिल्लावाणी. **लुथरी** साली.' -ल.११४.

लुब(भ)रा (वि.) लोचट. 'बिनबोलवाचा जेवाले येते **लुबरा** सोप्या.'

लुबूलुबू (क्रिवि.) हळुवार. 'कोवळी पाने **लुबूलुबू** खाणारे चिमुकले ससे कान टवकारून पाहत होते.' -कात.६३५.

लुला (वि.) पांगळा. 'पायानं **लुला** असल्यानं तीन चाकी

गाळी घेतली.' (अर.)

लुळूमुळू (वि.) कणाहीन, शक्तिहीन. 'तिने बलात्कार म्हटलं की आपण **लुळूमुळू** होतो.' -बा.१०२.

लुसनं (क्रि.) केस उपटणे. 'भांडनतंट्यात बायका बायकाईचं केसं लुसनंबी चालत रायते.'

लुसलास (न.) लुचणे, प्रेमाने चिमटे घेणे. 'तोही पलंगाखाली घुसला. तिला **लुसलास** करू लागला.' -ना.१४४.

लुसलुस (न.) अधाशीपणा. 'कसा मानूस मानूस, एका एका पैशासाठी, कसा करते **लुसलुस**.' -पाव.

लुंगळनं (क्रि.) लाळ घोटणे, लाचारी ने वागणे. 'कुत्र्यासारखं शेपूट हलवीत कुणाच्या दारी **लुंगळणं** आपल्याला जमणार नाही.' -पाटी.

लुंगसं (पु.) १. कापडाचे तंतू. 'मनिल्याचे **लुंगसं** निंगले तं इस्तरी करून आना लागते.' २. एका गवताचे काटेरी कणीस. 'धुऱ्यानं गेलो तं प्यान्डाले **लुंगसं** चिटकले लेकाचे.'

लुंगासुंगा (वि.) क्षुद्र, क्षुल्लक, शक्तिहीन. 'मले का **लुंगासुंगा** समजतं का तू? दाखू काय हात?'

लुंगी (स्त्री.) पुरुषांचा नेसू. 'फाटक्या **लुंगीचा** डोक्यास धाटा बांधलेला.' -काळी.२४.

लुंगुरलुंगुर (क्रिवि.) घुटमळणे. 'बाजारहाटातून घरी आला की तो वहिनीपुढं **लुंगूरलुंगूर** करायचा.' -काळी.७२.

लुंगूलुंगू (क्रिवि.) रुंगळणे. 'आज चंपी कुत्री आयतीच सापडली म्हणून झाबऱ्या तिच्या भवताल **लुंगूलुंगू** करू लागला.' -तित.१५.

लुंघळनं (क्रि.) लुडबूड, घुटमळणे. 'घरी येऊन कुत्र्यासारखा **लुंघळतं**?' -पख.७५. 'थोड्यावेळानं ते कुत्र शंकरजवळ **लुंघळू** लागलं.' -मा.२२.

लुंघळू (क्रि.रूप.) घुटमळू. 'तो तिच्याभोवती हिरोसारखा शिटी वाजवत **लुंघळू** लागला.' -सि.१२२.

लुंजी (स्त्री.) कैरीगूळ शिजवून केलेला आंबटगोड पदार्थ. 'काय पंगत होती राजा. मस्त बुंदी, जिलेबी तोंडी लाव्याले आंब्याची **लुंजी**.'

लुंढकनं (क्रि.) १. आडवे होणे, झोपणे. 'धसाळा बसला तसा भान्या मांगं **लुंढकला**.' -डेबू.१२. 'बस्ताबस्ता तथीच तळवावर वऱ्हाड लुंढकलं.' २. गडबडत जाणे. 'नदी पार करता करता म्हतारा मंधातच **लुंढकला**.'

लूट (स्त्री.) बाळाचा एक विधी. 'तिसक्रातीले गांजरंबोरानं लेकराची **लूट** करत असतात. बाया बलावून आन जाय.'

ले (क्रि.) घालणे, परिधान करी. 'पोरगी अशी मस्त राये अन् सोनंलानंबी **ले**.'

लेक (स्त्री.) मुलगी. 'जी जी मज थोरू सासुरेवासुः सांघीतलाः सात **लेकीचे** जालीयाः' -ली.४७८. 'वैजाचे परळियेचि वाणीन लेकीसुना समधीः' 'सोन्याचं पंचीपात्र उटून चकचक/ जावया बापूजीला देते पाणी माही **लेक**.' -लोक.५९. 'माय तसी **लेक** अन् खानोटा एक.'

लेक (पु.) मुलगा. 'जैसें बापें जोडिलें **लेंकां**। वांटिलें सूर्ये मार्ग पांथिका।' -ज्ञा.१८.८२६. '**लेक** झाला तं वाजली गुढी, सुनीचं गऱ्हानं लोकापुढी.'

लेक (क्रिवि.) आश्चर्यकारक उद्गार. 'हा तर **लेक** भलकाईच आरोप झाला.' -फीर.१६९. 'हे तं **लेक** काई गोठ झाली म्हनावं!'

लेकजवाई (पु.) मुलीचा पती ह्या नात्याने. '**लेकजवाई** आला माय लेकीले न्याले.'

लेकबाय (स्त्री.) मुलगी. '**लेकबाय** सर्वांचीच तिथं लग्नाचं कायले पायजे आवतन.' -मोती. '**लोकाची** असो **लेकबाय**, तेबी अस्ते कोनाची माय.'

लेकरू (न.) अपत्य, लहान मूल. 'अंगे तो **लेकरु** काई। नव्हेचि नंदाचे॥' -ज्ञा.१०.२०७. 'ते वांझेचीं घरभरीं। **लेंकुरें** जैशी॥' -ज्ञा.१५.२१७. 'मामाच्या धाब्यात जवन. गवतात आंबे. जसे तालगुलीत **लेकरं** झपले आंग टाकून.' -डेबू.५५.

लेकवायरी (स्त्री.) मुलगी आणि सून. '**लेकवायऱ्या** बिच्याऱ्या बुढ्याले इच्यारत नसतीन.' -लेक.८१.

लेका (संबो.) एक संबोधन. '**लेका** बसल्या बसल्या फोकनाळ्या तानत जाय फक्त.' -काळी.८. 'अशानं तुले कोनी आपल्या दाढ्यात नाई उभं करनार **लेका**.' -धग.८९.

लेकुरवाई (वि.) अपत्य असलेली. 'कव्हणी एकी **लेकुरवाळी** माता असेः ते कव्हणी लेकरू काइसेनि बुझाविः' -ली.६०८.

लेख (पु.) लिखित मजकूर. 'एक वावर चंद्रभानजी **लेख** न होताच वाहत होता.' -संगा.३४.

लेखन (स्त्री.) लेखणी. 'पाटी घेऊन **लेखनीनं** अ, आ, इ, ई काळे मायं पोरगं.' (का.लेक्कणि)

लेखा (पु.) लिखित मजकूर. 'सटवीचा **लेखा** ना चुके बरमादिका.'

लेखाजोखा (पु.) लिखित हिशेब. 'कर्जयाजाचा सबन **लेखाजोखा** दिवानजीनं शामजी मवरे ठुला.'

लेचंपेचं (वि.) अशक्त, कमकुवत. 'आपलं जितराब का असं **लेचंपेचं** हाये?' -त.२८. 'चौकेछक्के मारतो **लेचापेचा** नाही

असा कसा हारतो.' -मिर्झा.१६.

लेटलाट (स्त्री.) आरामात पहुडणे. 'जेवनंखावनं मस्त झाल्यानं पावने **लेटलाट** करत बैठकीत पळ्ळे.'

लेड(ळ) (न.) १. वीर्य. 'फोसळीचे हो जा अन् त्या भंटोलाचं **लेळ** खात बसा.' २. अडाणी. 'ह्ये खेड्यातले **लेडे** भोस्सडीचे असे आडवे तिडवे चालतात सडकीनं.' -पोळा.

लेनं (क्रि.) १. लेणे, परिधान करणे. 'जैसे वज्रकवच **लेइजे**। मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे।' -ज्ञा.२.२३२. '**लेली** कपाळी बिजुला तिचा शाही झब्बेवाला.' -लोक.४२. २. दागिना. 'जैसें अंगाचेनि सुंदरपणें। लेणियासी आंगचि होय **लेणें**।' -ज्ञा.१०.४४. 'लेणें सोनेंचि जो जाणे। तो **लेणेपण** तें वावो म्हणे।' -ज्ञा.१५.५६१.

लेनदेन (न.) घेणेदेणे. 'घरचाच मानूस म्हटल्यावर **लेनदेनीत** काही ना काही फरक पळतेच.' -मे.४५.

लेप (पु.) थर, गिलावा. 'आकाशा न लगे। **लेपु** जैसा॥' -ज्ञा.१२.२०७. 'हात कापला इव्यानं तं हयदीचा **लेप** लावला वधरून.' (का.लेप्प)

लेपनं (क्रि.) गिलावा करणे. 'कुळाचं घर शेनामातीनं **लेपलं/** नवऱ्याच्या नावानं कुकू मेनावर लेवलं.'

लेपसट (वि.) बुळा, नामर्द. 'मानसासारखा मानूस मी तरी लोक **लेपसट** मनते.' -पोळा.

लेमळा (वि.) क्षुद्र, कमकुवत, भित्रा. 'शिकारीले जाचं तं **लेमळालामळा** सोबती घेऊन नाई चालत.'

लेलं (क्रि.रूप.) ल्याले, परिधान केले. '**लेवविली** अंगी आपुली भुषणे। अळंकार लेणे सकळ ही॥' -तुका.३४९०.३. 'काजय **लेली** कुकू लेली, भिंगाऱ्याच्या-संगं गेली.'

लेलशा (वि.) कमी खाणारा. 'गनशा **लेलशाले** येका पोईच्या वर धकतबी नाई.'

लेली (क्रि.रूप.) परिधान केली. 'हिऱ्या मोत्याची **लेली** दागिणे.' -भीक.३७.

लेल्यांड (वि.) श्रीमंत. 'आपून कुठी काळ्ळो बे कीस गल्ली मे खसखस लय लोकं **लेल्यांड** हायत.'

लेवनं (क्रि.) परिधाण करणे. 'गोसावी आंगीटोपरे **लेउनि** आंगणी उभे ठेलेः' -ली.४२३. 'ए दसे एही खावेः जेवावेः **लेयावेः** नेसावेः' -ली.३९७. 'आनंदाचे लेणें लेवविलें।' -नाथ.१३५०. '**लेवविलीं** अंगीं आपुलीं भूषणें। अळंकार लेणें सकळ ही॥' -तुका.३४९०.

लेवळी (स्त्री.) तीळ साखरेची गोळी, रेवड्या. 'जत्रीत दोनी खिसे भरून खायेल गुयाच्या **लेवळ्या**.' -मे.५३.

लेवा (पु.) नांदुरामलकापूर, खान्देशातील **लेवा** पाटीदार समाज. '**लेवा** म्हनला का केईचं पीक घेनारच.'

लेवाल (पु.) खरीददार. 'मुंगाले **लेवाल** नाई म्हने, उळीद सळेल हाय म्हने बुवारा अळत्या.'

लेवाव (क्रि.रूप.) परिधान करावे. 'तरन्याताठ्या पोरीनं चांगलं **लेवाव** अन् चांगलं खावाव बयना.'

लेव्ही (स्त्री.) सरकारला द्यावयाचे सक्तीचे धान्य. 'अन्नाचा तुटवडा असल्याने सरकारने शेतकऱ्यावर विनामूल्य **लेव्ही** लादली.' -फीर.१९३.

लेहा (क्रि.रूप.) लिहा. 'अशी कडक कैफियत **लेहा** की तडक चिपसायेब आला पाह्यजे.' -भं.५१.

लेळकाव्हा (पु.) पोरवळा. 'कामंधंदे पळ्ळे तसेच अन् हा **लेळकाव्हाई** काई सुसू देत नाही.'

लेळखाना (पु.) पोरवळा. 'याचं करा तं त्याचं निंघते. काय **लेळखाना** असीन तं असो माय हा.'

लेळपाप (वि.) लेकरांसाठी लाडीक शिवी. 'नदीवर पान्याले जाव तरमा हे **लेळपाप** मांगंमांगं येतेच.'

लेंझ (स्त्री.) भानगड, झंझट. 'म्या तुले या पखालीच्या **लेंझात** अटकवून ठेवलं.' -पख.१६७.

लेंड (स्त्री.) विष्टा- बकरीची वगैरे. 'काका दिसला का पोट्टे **लेंड** टाकतच पयेत.' 'हागणाराचं **लेंड** मोठं, बोलनाराचं तोंड मोठं.'

लेंडा (पु.) शेतातील एक वनस्पती. 'अगाईतात निऱ्हा **लेंडाच** वाहाळला.'

लेंडार (न.) पोरवडा. 'पंगत असली का सुरशाची बायको अन् त्याचं **लेंडार** हजर अस्ते.'

लेंडी (स्त्री.) १. लहान नाला. 'गावच्या मधो मध **लेंडी** वाहते.' -ना. २. विष्टा- बकरीची वगैरे. 'मग तेथ साधी **लेंडी** होतीः तीये वेचलीः पासवडी कुसकरिलीः' -ली.३१५.

लेंडीपिपळी (स्त्री.) एक आर्युवेदिक औषधी. 'गन्या अरबळ्या जोळ **लेंडीपिपळी** सापळीन.'

लेंडूक (न.) विष्ठा. 'हवा भरेल पोटात अन्नाचा कन धकोल्या जात नाई/ कुथाव तं कितीक कुथाव **लेंडूक** पळ्याचं नाव घेत नाई.'

लेंढार (न.) पोरवडा, समूह, गर्दी, कळप. 'लेखनाईसाठी पोराईचं **लेंढारच्या** लेंढार फिरत जाये माह्या मांगं.' -अंधा.

लोई (स्त्री.) मातीचे थर. 'घाम आल्यानं आजा आंगावरची **लोई** लगळून काळत होता.'

लोक (अ.) पर्यंत. 'गोपाळराव लगेच म्हणाला- घरालोक चालानं' -ऊन.९. 'काय **लेका** भावळ्या, आतालोक किती वाट पायली तुई.'

लोकवन (वि.) गव्हाचा प्रकार. 'शरबती नाई पिकत येवळा **लोकवन** गहू वट्टे काईना काई.'

लोग (अ.) पर्यंत. 'माय मी **आजलोग** चांगल्या मार्कानंच पास व्हत आलो.' -फीर.९५.

लोचा (पु.) १. कामाचा व्याप, नसती भानगड. 'मास्तरच्या मांगं काय कमी **लोचे** हायेत काय?' -धुम्म. २. फजिती. 'चारचौघात लेकानं माहा **लोचा** केला.'

लोट (पु.) ओघ. 'जैसा पर्जन्योदकाचा **लोटु**। विपायें धरी साळीचा पाटु॥' -ज्ञा.१८.३६८. 'बयरम देवापासून तं टेकळीच्या खालीपर्यंत बळी जानाऱ्या बकऱ्याईच्या रक्ताचा **लोट** ये. गाडगे बॉनं बंद केलं.'

लोटनं (क्रि.) ढकलणे. 'आडळला चिंतामणि पायें **लोटी**। आंधळेपणें॥' -ज्ञा.९.३०४.

लोटपा(ला)ट (स्त्री.) ढकलाढकली. 'कशीतरी **लोटपाट** करून तो गाडीत चढला.' -गय.

लोटपोट (न.) यथेच्छ. 'नाना हासोयाले लागला की मी तं **लोटपोट** हासत रायतो.'

लोटा (पु.) गडवा. 'पान्यानं भरेल बकेट अन् येक **लोटा** ठूई पावनेईले पाय धुयाले.' (अर.)

लोटांगन (न.) जमिनीवर आडवे पडून गोलाकार फिरत पुढे जाणे. 'खेळू केलं बाई, काट्यावर **लोटांगन**.' -लोक.४९.

लोटापरेड (स्त्री.) सारखे शौच्यास जाणे. 'जास्त खालं तर दिवसरात्र **लोटापरेड** करावं लागन म्हंतो.' -कावू.

लोटालोटी (स्त्री.) ढकलाढकली. 'देवाच्या देऊळात पुत्रांची **लोटालोटी**/ मागा कृष्ण लाल पोटी.' -लोक.१९.

लोण (पु.) प्रतिस्पर्ध्यावर चढवलेला डाव. कबड्डीत चारचार गड्यांची लॉबी मारून **लोण** बसवणारा.' -पोळा.१५.

लोणा(ना) (पु.) १. एक गवत. 'गाईसाठी येक पेंडी **लोनाच** आनला कापूनसन्या.' २. भिंतीने धरलेली ओल. '**लोणा** लागला भीतीले पेंड गेले खसून.' -ऊ.२३. 'खालून **लोण्या** लागलेल्या भिंतीचं, सादळ फुटलेलं घर.' -बा.११०. 'घराच्या भिंतीना **लोणा** चढल्यानं त्या झरत होत्या.' -सि.३३.

लोणार (न.) बुलाढण्यातील तीर्थक्षेत्र. उल्कापाताने झालेले जगातील दोन क्रमांकाचे सरोवर तेथे आहे. '**लोणार** तीर्थी घागरि भरिलीः गुडघेयावरि ठेविलीः' -ली.३२९. '**लोणार** गाव दूरवर नाव तिथं जागा तीर्थाची/ सीताबाईची न्हाणी साता सरोवराची.'

लोतरा (वि.) लठ्ठ, पुष्ठ. 'आंगाचा झाला **लोतरा**, हातपाय तानून पसरा.'

लोथ (स्त्री.) कापसाची फारी, गाठोडे. 'रातभरि आंबे तोडिलेः एकी वासनाः **लोथ** भरि तोडीलेः **लोथ** बांधलीः' -गोवि.२०७.५७. 'तैं गगनाची बांधावी। **लोथ** जेवीं॥' -ज्ञा.१०.२५९. 'म्हणोनि तमाचिये **लोथे**। बांधोनियां संकल्पातें।' -ज्ञा.१४.२५८. 'बापा बापा हे बाई म्हनावं का कापसाची **लोथ** टपोरीच्या टपोरी.'

लोदा(धा) (पु.) औतावरचे ओझे, वजन म्हणून वापरलेली माती. '**लोधा** बांधुनिया दोरीनं, बहुत नजरीनं.' -व.८४. 'तिफनीवर **लोधा** बांधला की फाये खोल घुसतात जमिनीत.'

लोन (न.) १. कर्ज. 'बॅकेतून येकरी दा हजार **लोन** भेटलं.' २. टूम. 'बगलीत टांजीस्टर घालून फिऱ्याचच **लोन** पसरलं होतं मंधामंधी.' ३. मीठ. 'बाइ आणि मीठ घालाः पूर्ण **लोण** करा मग बाइसि आणिक मीठ घातलेः' -ली.१०५. 'मग भटी म्हणीतलेः **लोण** नाही जे चींचेसी खाइजेः' -गोवि.१२२. 'तरीं नुरोनि वेगळेपण। सरी भजिन्नलें **लवण**।' -ज्ञा.१७.१८. 'कां लवणाची कुंजरी। सूदलिया **लवणसागरीं**॥' -ज्ञा.१५.३१८. 'रुची नेदी अन्न। ज्यात नसता **लवण**॥' -तुका.१४७४. 'नव्हे सारिता निराळें। **लवण** मिळविता जळे।' -तुका.३८३२. 'पतरवाईवर **लोन** वाढा रे आंदी.'

लोनकळी (स्त्री.) थाप. 'संत्या काय खरं बोलते काय, काईबी **लोनकळी** देते ठून.'

लोनचं (न.) लोणचे. 'उमाए तुमते काही सीदोरी असे तरि घालाः तेही दहीभातु घातलाः **लोणिचे** घातलेः' -ली.४५९.

लोनारी (पु.) एक जात. 'आपल्या आंगं **लोनारी** जातीचे लोकं नाईत खरी.'

लोनी (न.) ताकातून निघतो तो स्निग्ध पदार्थ. 'उठा रे उठाः आम्ही **लोणीए** न्हाउनि आलो असाः तेयाचा पासु गोसावीयासि जातु असेः' -ली.३३३. 'तरी ताकाचे अंश फेडणें। याचि नांव **लोणी** काढणें।' -ज्ञा.१५.४६४.

लोन्यापान्यावानी (वि.) थकलेली, गलितगात्र. '**लोन्यापान्यावानी** व्हयेल माय दिनाले दिसत व्हती.' -सित.४५.

लोभी (वि.) हाव असलेला. 'मधुविषीं मधुमक्षिका। **लोभिणी** जैसी॥' -ज्ञा.१३.५०२. 'पाणी वरून पडते पहा म्हशी डोबोडोबी गवळी उभा **लोभी**.' -लोक.२२.

लोमळं (वि.) मध्येमध्ये करणारे. 'असा कसा **लोमळा** हाय वऽऽ बायातचं रुंगयरांगय करत रायते.'

लोये (न.) गोळे. लोये तोळनं - झुरनी लागणे, लालची पडणे. 'लेकराचई किती मन मोळू/ अंदरल्या अंदर **लोये** तोळू.' -भू.७४.

लोयन (न.) लोळण. 'घातली **लोळणी** चरणांवरी गाथा।' -तीर्थ. 'गोया खायाले पैसे नाई देल्लं तं पोट्टं गल्लीवर **लोयन** घेऊन रायलं.'

लोयनं (क्रि.) लोळणे. 'पवित्र व्हावया घालीन **लोळणी**।

ठेवीन चरणी मस्तक हे॥' -तुका.१९६३. 'मातीत **लोयनं** म्हंजे आंग खराब करून घेनं, ऊठ माया राजा ऊठ.'

लोयलाय (स्त्री.) लोळणे. 'दुपारून घंटाकभर **लोयलाय** करावं अन् निंगावं पालव्या तोळ्याले.'

लोहार (पु.) लोखंडी औजार, हत्यार करणारी जमात. 'आमच्या गावात ना **लोहार** ना सुतार. नाचुकला इवा पाजवाले अकोल्याले जा लागते.'

लोळ (पु.) तक्या, तकीया. 'बलतकारी जरी आणिला कथेसी। निंद्रा घे **लोडेसी** टेकुनिया॥' -तुका.४१४४. (का.लोळु)

लोळका (वि.) रोडेला. 'खातपेत नस्तं का बे? किती **लोळका** दिसून रायला वसू तू?'

लोळगा (पु.) गोळा. 'भुऱ्या कुत्र्यानं त्याच्या पोटरीचा **लोळगाच** तोडला होता.' -झि.१५.

लोळनं (न.) जनावर पळू नये म्हणून त्याच्या गळ्यात बांधलेले लाकूड. 'गळा **लोढणे** बांधते तरि काइ करितासि?' -ली.३३२.

लोळ्या (स्त्री.अने.) मळीची शेवई. 'पाटावरून शेवया सुटाव्यात तशा अंगावरून मळाच्या काळपट **लोळ्या** हातावर यायच्या.' -त.१७६. 'कणेरीच्या पानावर जाडजूड **लोळ्या** असतो.' -सेल.१५४.

लोंग (स्त्री.) लवंग. '**लोंगादोळ्यानं** भरलं पान ठेवलं तोंडात/ पन तीभर रंगला नाही कानपुरी काथ.' -वि.

लोंगर (न.) घड. 'कधीही ताठ न होता **लोंगर** आलेल्या केळीप्रमाणे तिची वागणूक शालीन झाली' -कात.६७४.

लोंडकं (न.) लोंढा. 'धरणाचं गेटबीट खोललं आसंल तर येईल पाण्याचं **लोंडकं**.' -खुं.१६०. 'पाण्याच्या लोंडक्यानं आपून पुलाखाली पडलो.' -ऊन.६४.

लोंदा (पु.) मिष्ठान्न. 'न करवे धंदा। आइता तोंडी पडे **लोंदा**॥' -तुका.५७१.

लोंबकळनं (क्रि.) व्यायला येणे, दिवस भरणे. 'म्हैसही आता खूप **लोंबकळली** होती. गाभ जाऊन तिले सातआठ महिने होतात' -पख.३२.

लोंबतझोंबत (क्रिवि.) झटापट करीत. 'दीनानं कसंतरी **लोंबतझोंबत** दोन गोदळ्या मायच्या आंगावर टाकल्या.' -सित.४७.

लोंबनं (क्रि.) लटकणे. 'वगाराचं म्हैशीच्या थानाले **लोंबनं** चालूच रायते.'

लोंबरे (न.अने.) कणसे. 'धानाची पिवळी **लोंबरे** निसवून वाऱ्यानं डौलात डोलत होती.' -कात.६३४.

लोंबावनं (क्रि.) लोंबकळणे. 'कव्व्या हाताच्या येलाले जशा **लोंबावल्या** शेंगा.' -वि.

लौंडा (पु.) पोरगा (उपहासाने). 'कोन्या **लौंडीची** उपज असन म्हनून त त्याले लौंडा म्हन्तात सारे.'

लौंडी(ढी) (वि.) वाईट चालीची, वेश्या. 'लेकरु ना होये म्हनून असे धंदे करे **लौंढी**.' -ना.५८. 'आज इले दोखोतोच. खोळच मोळतो **लौंडीची**.' -डेबू.१३. (फा.)

ल्याव (क्रि.रूप.) लिहावे. 'कागद पेन घ्यावं अन् एकांती बसून चार ओया **ल्यावं**.' -पाव.

ल्हान (वि.) लहान. '**ल्हानपन** देगा देवा.'

ल्हानचुकलं (वि.) लहान, छोटे. 'काटा मुळला पायात **ल्हानचुकला** तं केवढी अंगार होते आपली.' -डेबू.३९.

व

वं (संबो.) 'गाव पंगतीसाठी किती घेता **वं** वर्गणी मंग.' -रा.७५. 'काय म्हंतं **व** शांते तू?'

वई (स्त्री.) १. ओवी. 'पहिली माही **वई** व इठोबा रायाले.' २. ओळ. 'तुरीच्या **वईत** पान्याची घळ्ळी ठुली.'

वइ(ह)दवाणी (स्त्री.) वैद्या जवळील उपचार. 'म्हतारीसाठी देवधरम केले. **वइदवाणी** करून धागेदोरे देऊन पाह्यले.' -ऊन.५८.

वईद (पु.) वैद्य. '**वैद** वाचविती जीवा। तरी कोण ध्यातें देवा॥' -तुका.३२९. 'तुका म्हणे केला पाहिजे निवाड। **वइदासी** भीड मरणें रोग्या॥' -तुका.३५५३. 'आला ग माहेरचा **वईद**, डोक्स्यात टोपी भरजरी.'

वक (क्रि.रूप.) वांती कर. 'अतीच खाय अन् अतीसाच **वक** तू.' 'कुतळ्ळं दारातच **वक वक** वकलं पाय.'

वकट (वि.) एक या अर्थी खेळातील गणसंख्या. विटी किंवा चेंडूदांडूच्या खेळात अंतर मोजतात ते असे- **वकट**, लेंड, मुंड, नाल, आबीत, आहार, टेक्या..(ते.)

वकटं (वि.) वाईट. 'देराचं जर काही सांगतलं त लोक आपल्यालेच **वकटं** म्हणतील.' -अंधा.

वकडक (स्त्री.) वांती करणे, ओकारी करणे. 'दारू ढोसली अरमाननं आता करते **वकडक**.'

वकते (क्रि.रूप.) ओकते. 'दूध पचत नाई वं लेकराले, पाजलं की वकते, पाजलं की **वकते**.'

वकनं (क्रि.) ओकारी करणे. 'अजिरनं झालं वाट्टे. लेकाचं **वकनं** अन् हागनं चालू हाय सकाऊनपासून.'

वकारी (स्त्री.) वांती. 'मोठ्या गाळीत बसोला का मले **वकारीच** येते राजा.'

वकालत (स्त्री.) वकिली, पेशा. 'पोरगा वकील झाला अन् आता अकोल्याच्या कोर्टात **वकालत** करून रायला.' (अर.)

वकून (क्रि.रूप.) वांती करून. 'घासु घेतला : आणि उलळलेः आणि नीगालेः ते पैऱ्हा जाउनि **ओकुनि** आलेः' -ली.८. (अर.)

वकूब (वि.) योग्यता, शक्ती. 'ना **वकूब** अंगी परी किती तो ताठा.' -भीक.५३. (अर.वकूफ)

वकेल (क्रि.रूप.) वांती केलेला. 'अती **वकेल** हाय वाट्टे कुनी तरी लय वास येऊन रायला.'

वक्कल (न.) गट, समूह, मेळा. 'शंकररावाच्या **वक्कलातून** आमाले आखीन आठ रोज बाहीर पडता येत नाई.' -दि.३२.

वक्टंसक्टं (वि.) वाईटसाईट. 'आवं येडे शिकल्यानं ग्यान वाढते. चांगले इच्यार येतात. माणसा हातून **वक्टंसक्टं** काहीबी घडत नाही.' -वा.४५३.

वक्टसली (वि.) एक शिवी. 'मायची मी **वक्टसली** रांड तं. इसरली समदं मांगचं.' -पख.१५४.

वक्टा (वि.) वाईट. 'पोरीची आग लय **वक्टी**.' -रा.१२.

वक्टीगांढी (वि.) वाकडी, वाईट. 'नशीबच मारते टिकली. सुदीसर्की. नाही तर **वक्टीगांढी**.' -ऊन.७४.

वक्त (पु.) वेळ, प्रसंग, खडतर प्रसंग. 'खराब **वक्तावर** कोनी कामात येत नाही.' (अर.)

वक्तशीर (वि.) वेळेचे पालन करणारा. 'लय **वक्तशीर** मानूस हाय. मास्तरची नोकरी सुटली तरमा सवय नाई गेली.'

वक्ती (अ.) वेळी. 'मी म्हनो बापा नाहक आलो अन् तेही पेरन्याच्या **वक्ती**.' -ना.६७. 'गवत चोरले का लोकं शिव्या देतात. एखांद्या **वक्ती** मारतीनबी.' -फीर.१३८. (अर.)

वक्साबोक्सी (क्रिवि.) आक्रोश करून. 'येवळी मोठी कापसाची गंजी पेटल्यावर तं तालेवारबी **वक्साबोक्सी** लळते राजा.'

वखट (वि.) एक विटीदांडूच्या खेळातील गणतीची संख्या. '**वखट**, लेंड, मुंड, नाल, अभीत, आहार, टेक्या असं मोजत पोट्टे खेळत.' (ते.)

वखत (पु.) प्रसंग, काळ, वेळ. 'मग रोजचा येण्याचा तुझा **वखत** आजच कसा टळला?' -कात.५. '**वखत** पळ्ळा बाका तो क्या करेगा काका.' (फा.वख्त-अर.)

वखर (पु.) कोळपे. 'सराडेयाचा **वखरु** केलाः दोरियाचे नाडे केलेः आउत बरवे वाहिलेः' -ली.३२०. 'तो ब्राह्मणु सेतासि गेलाः...**वखरु** जुंतलाः तंव पासु वाकलीः' -ली.४७७.

वखरन (न.) कोळपणे. 'नांगरनं सरत नाई तं **वखरन** सुरू करतो.'

वखरनं (क्रि.) कोळपणी करणे. 'पऱ्हाटी पाळ्ळ्या बरोबर वावर **वखरनं** चालू केलं.'

वखरेल (क्रि.रूप.) कोळपणी केलेले. '**वखरेल** वावर असलं का फन भरभर येचता येतात.'

वखऱ्या (पु.) शेतातील वखर वाहणारा मजूर. '**वखऱ्या** सकाऊनच तं येते आज काय झालं लेक येवळं भो भो झालं तरमा पत्ता नाई.'

वखवख (न.) १. चीडचीड. 'डोक्सं शाबूत नसलं तं मानूस लय **वखवख** करत रायते.' २. हपापलेपणा. 'खायाले पाय कसा **वखवख** करून रायला.'

वखवखनं (क्रि.) खाखा सुटणे. 'लेकराले कितीबी खाऊ घातलं तरमा त्याचं **वखवखनं** नाई जात.'

वखार (स्त्री.) कोठार, गोदाम. 'कधीकाळी **वखारीतले** रुपये उपसण्यास चांदीची खोरी लागत होती.' -कात.३००.

वगराय(ळं) (पु.) वरण वाढण्याचे साधन, **ओगराळे**, चाटू. 'कोनी **वगरायभर** शिरा खाऊन दाखोला त म्हनू बॉ बहाद्दर.' -भं.७८. (का.ओगर)

वगार (स्त्री.) म्हशीचे स्त्रीलिंगी पिल्लू. 'म्हशीचं सहा महिन्याचं **वगार** डोक्यावर आणायचं म्हणजे कठीणच.' -मोती.

वगारू (न.) म्हशीचे पिल्लू. 'ताक करून काकळ्यानं **वगारू** पाजलं.'

वघय (पु.) ओघ, ओहळ. 'भाजी सांडली तं मनिल्यावर **वघय** उमटला.'

वघयनं (क्रि.) ओघळणे. 'उतरले उदक पर्वत **वघळे**।' -ज्ञा.१०.६९. 'पाय केवढं रगत **वघयनं** चालू झालं.'

वघयलं (क्रि.रूप.) ओघळले. 'खालतल्ल्या धुऱ्याकून पानी **वघयल्यानं** नाली पळ्ळी.'

वचक (पु.) दबदबा, दरारा, धास्ती. 'कॉलऱ्यानं माणसं नेली, त्याची रीत नेली. सारा **वचकच** नेला.' -मोती.३२.

वचकन (क्रिवि.) एकदम. 'आपून काई सांग्याले जावं तं सून निऱ्हा **वचकन** आंगावर धावते.'

वचकनं (न.) आठवण करूण देणे उपहासाने, टोमणा. 'सुनेचं **वचकनं** ऐकून बुढा खाटेवरून उठला.' -ए.१८.

वचकवाचक (क्रिवि.) अति, जास्त, सतत बोलणे. 'अंधामंधात **वचकवाचक** कराची बनीले आदत पळेल आये.'

वचकवानी (वि.) भलतेच, काही बोलणारी. 'हे बुडी भलतीच **वचकवानी** हाय. तुमी वाईट वाटून घिऊ नोका.' -फीर.१०७.

वचका (वि.) मधेच बोलणारा. 'चूप राहावं तं मधात बोल्लाच हा **वचका**.'

वचपा (पु.) सूड, बदला. 'पुढं दोन वर्षांनी भिकानं या गोष्टीचा **वचपा** घेतला.' -पख.३. (अर.वझा)

वचवच (क्रिवि.) सतत बोलणे, करणे. 'खरूजाच्या कुत्र्याची दोन दिवस **वचवच**, म्हणवाच ह्ये न.' -ऊन.३५.

वचवांगं (वि.) मधेच बोलून विचका करणारा. 'हे **वचवांगं** सोंगाळ संगं घेसान तं झाली मंग सगाई!'

वचवांगेपना (पु.) बावळट, वेंधळेपणा. 'पार्वतीच्या पोराचं नावं सदाशीव-निर्रा **वचवांगेपणा**.' -काळी.४३.

वचवांग्या (वि.) विचका करणारा. '**वचवांग्याले** कोन्ती वसद देनं काई सुकाचं नाई.'

वच्छी (स्त्री.) वत्सला. 'पातोळीची भाजी करावं तं **वच्छीनंच**.' '**वच्छी** का म्हंतं व साजरं **वच्छला** म्हनावं.'

वज (स्त्री.) काळजी, ओज. 'वसद **वजीनं** वापरली तं टिकते नाई तं दरसाल इकत आना लागते.'

वजन (न.) १. माप. 'किलोचं **वजन** नाई तं अर्धा किलोनं मोजू का दोनडाव?' २. ओझे, भार. 'बंडी धुरजळ झाली लेकाची. मांगल्या खुटाळावर **वजन** द्या बरं.' ३. मान, प्रतिष्ठा. 'बाबुरावचं समाजात चांगलं **वजन** आय.' (अर. वझ्न)

वजरीटीक (स्त्री.) वज्रटिक, गळ्यातील स्त्री आभूषण. 'बाइः हे **वजीरी घडीत** असीजेः' 'मले तं जोंधयवरनी पोथ अन् कुळ्या केल्या होत्या बसं. कबूल मातर केलं होतं **वजरीटीक** आनू.' -हज.४४.

वर्ज (न.) पथ्य, टाळणे. 'उणे. तेलः तुपः दहीः दुध **वर्जीलेः**' -ली.३८३. (फा.)

वजह (स्त्री.) कारण, हेतू. 'बिना **वजह** तो मले ताडताड बोल्ला राजा.' (अर.)

वजात्रं (न.) वाद्य. 'सतरा हजाराचं त निरा **वजात्रच** होतं लग्नात.' -धुम्म.

वजानं (क्रिवि.) हळू, हळुवार. 'बाईमानूस **वजानं** चालत रायते.' 'ते भरनी **वजानं** ठेव खाल्तं.'

वजीचं (वि.) शांततेचे, नीट निटके. 'भावजईचं कोन्तबी काम मोठं **वजीचं** रायते.'

वजीनं (क्रिवि.) हळूहळू. 'आमासाक **वजीनं** चालाना वंऽऽ जसं वारं लागलं माय तुमाले.' -ना.६५.

वजेर (वि.) अतिशय, खूप. 'गर्दी **वजेर** दाटली अशी सुयलगनाले/ माह्या नावाचा टिक्का तुह्या चंद्र कपायाले.' -नांबै.

वजेवजे (क्रिवि.) हळूहळू. 'कावंभोर अभाय वाकुयल्या दाखोत गावाकून **वजेवजे** शहराकळे सरकत गेलं.' -वि. 'हळूहळू डेबू उठून बसला. **वजेवजे** बोलू चालू लागला.' -डेबू.७.

वज्जर (न.) खूप, अति, जास्त. 'एवढं लागलं तुले. **वज्जर** दुखते का रे बाबू?'

वझं (न.) वजन, भार, ओझे. 'देखें पुढिलाचे **वोझें**। जरी आपुलां माथां घेईजे॥' -ज्ञा.३.१७७. 'अधिकार तैसा करू उपदेश। साहें **ओझें** त्यास तें चि द्यावें॥' -तुका.३३०५. 'बैलगाडीच्या पुढच्या भागात ज्यास्तं **वझं** टाकलं त गाडी धुरजड व्हते.' -पाटी.

वझरतं (क्रिवि.) अर्धवट, निसटता. 'जाताखेपी तो **वझरता** दिसला मले.'

वट (वि.) युक्त- कडवट, रानवट. 'च्या निऱ्हानाम **कडवट** केला व बाई तुया.'

वटनं (क्रि.) पैशाचा मोबदला घेणे. 'बँकीत चेक **वटन** ताहा पैसे भेटतीन.'

वटभरन (पु.) मधुचंद्र, पहिली रात्र, ओटी भरणे. '**वटभरनाच्या** राती नाही केसात हुंगला/ जीवा भुलोनारा वास कसा धानातून आला.' -वि. 'जवायाले घरीच ठेवून घेतलं सत्यनारायन केला. **वटभरनाचा** थाटमाट केला.' -पोर.६६.

वटवट (स्त्री.) बडबड. '**वटवट** केली। विचारिता मना आली॥' -तुका.१८०९. 'आमुच्या भाळी कटकट लिहिली **वटवट** करण्याची.' -केशवसुत.

वटवाघुई (स्त्री.) झाडाला उलटा टांगून घेणारा पक्षी, वटवाघूळ. 'नवऱ्या अगुदर जेवसीन तं **वटवाघूई** होसीन्ना बैना.'

वटा(ट्टा) (पु.) ओटा. 'मातीचा पल्हो केलाः इटांचा **ओटा** केलाः वरि कोरडी माती घातलीः' -ली.५५७. 'लेंकरूवे चींचोरां खेळतें होतींः वीनाएकाचेया **ओटेयावरिः**' -गोवि.१३. 'आवो राउळांचीया **वोटेयावरि** जेउं नकाः बैसोनकाः' -गोवि.१६. 'उंबरीखालच्या **वट्ट्यावरच** सर्वे बसले' -दि.७.

वटाई (स्त्री.) १. कापसातून रूई व सरकी वेगळी करणे. 'गाद्या तके करासाठी कापूस **वटून** आनला.' २. सरकी काढण्याची क्रिया, मजुरी. 'कापसाच्या **वटाईचेच** तं शेदोनशे जातीन.'

वटाना (पु.) वाटाणा. 'एकी दोणा **वाटाणेयाचे** सोलेः' -ली.३९.

वटा(ट्टा)रनं (क्रि.) डोळे विस्फारून पाहणे. 'लेकराले खाऊ देनं वऽऽ अशी **वटारून** काहून पायतं?' 'कन्नोराचे केले गोये भल्ला **वट्टारून** पाये एक घास बी ना खाये तसाच उठून जाये.' -रूख.३५.

वटाव (स्त्री.) नाण्याचा मोबदला, मोड. 'कानातल्या

टापसाचा **वटाव** दोन हजार आले.'

वटी (स्त्री.) १. ओटी. '**ओटीच्या** परिस मुठीचे ते वाढें। यापरि कैवाडे स्वहिताचें॥' -तुका.८१७. २. बेंबी व गुह्यांगामधील शरीराचा भाग. 'सळीच्या सळीच हाय ती. **ओटीपोटी** काई नाई आजून तिच्या.' ३. बिबीयान्याची पोटावर बांधलेली पिशवी. 'नंदी बैलाच्या जोडीले सदाशीव हकालते/ **वटी** बांधून पोटाले पाराबती उनारते.' -वि.

वटेखोसी (स्त्री.) भांडण. 'घरापुळच्या सरकारी जागेसाठी **वटेखोसी** झाली.'

वटोनं (क्रि.) कापसातून सरकी काढणे. 'दुसऱ्याचा कापूस **वटोनं** चालू हाय.'

वठनं (क्रि.) १. नरम होणे. 'मारूमारू पोट्टं **वठनीवर** आनलं.' २. उठावदार दिसणे. 'हिर्व लुगळं तुले साजरं **वठलं** वऽऽ लीले.'

वठम (पु.) उरक, खटपट, उल्हास. 'तुमच्या भावाले तं असा काहीच **वठम** नाई. बायकोले हे आनाव का ते आनाव.' -तित.३२.

वठमी (वि.) आवडीने कामे करणारा, उल्हासी. 'फार **वठमी** होता बापा बुढा.' -ए.६१.

वठीनं (क्रिवि.) ऐटीत, प्रतिष्ठेने. 'सबन पोराय मंदी मी **वठीनं** राहो- तठ राहो.' -सित.१२८.

वठोनं (क्रि.) वठविणे. 'रावनाचं सोंग **वठोनं** जानरावलेच मस्त साधेल होतं.'

वठोयाले (क्रि.रूप.) वठवायला. 'बाईचं सोंग **वठोयाले** कोनीच मानूस तयार होये ना.'

वठोयेल (क्रि.रूप.) वठवलेल्या. 'गावात सोंगं करत ताहा लय पार्ट **वठोयेल** आयेत म्या.'

वट्ठी (पु.) परीट, धोबी. '**वट्ठ्याच्या** जातीत हा रिवाज आहे. लगन असो मरण, कोंबडं कापणार.' -डेबू.१.

वट्ठीन (स्त्री.) परीट स्त्री. '**वट्ठीन** धुनं धुते नदीच्या पेंडावर, वाटसराची नजर तिच्या गोंड्यावर.'

वडगन (न.) वोटांगण, टेकण, आश्रय. 'आम्ही ननुमनु जीवे। तुझिया बोला **वोडंगावे**॥' -ज्ञा.१४.१८८. 'दाय पतली झाली तं **वडगन** लावनं ताटाले.'

वडबय ? 'जानूच्या येणूनं इचारलं काय हये **वडबय**?' -सेल.१५.

वडरणी (स्त्री.) वडार समाजाची स्त्री. 'वनवासात सिताले चोळी नव्हती म्हणून **वडरणी** चोळी घालत नाहीत.' -ऊन.१७५.

वडलापारजीत (वि.) पूर्वजांपासून चाललेला. 'आता आमी थळ्या पेराव नाई तं काय कराव बापा तो तं आमचा **वडलापारजीतचा** धंदा.' -लेक.६४.

वडा (पु.) बेसनाचा तळीव गोल पदार्थ. 'मग तीही **वडेः** मांडेः अमृतफळेः खीरिः घारीयाः पुरीयाः उंबरेः फेणियाः साकरमांडे खीरि ऐसा बरवा पदार्थु उत्तमु नीफजवीलाः' -गोवि.२४६. '**वडे** मांडे केलेः भातु वेळीलाः वळिवट वेहीलेः तुपाचे सांगड आणीलेः' -गोवि.२२४.

वडार (पु.) एक जात, दगड फोडणारी एक जमात. 'जातेपाटे लागतीन तं **वडार** वस्तीत जावाव.'

वडिलधारे (वि.) वयस्कर. '**वडिलधारे** मान्स पायजात सोयरिक संबंधात.'

वडीतवड (क्रिवि.) अडचणीत अडचण सोसून. 'मांगलं वर्षी **वडीतवड** क्रापलोन भरलं असतं त यावर्षी कर्ज भेटलं तरी असतं.' -अंधा.

वड्डुर (पु.) एक जमात. 'गावात चोऱ्या होत म्हून वावराचं राखन कऱ्याले **वड्डुर** बोलावले धोत्रे सायबानं.'

वढ (स्त्री.) ओढ. 'माउलीची चाली लेकराचे **ओढी**। तयालागीं काढी प्राणें प्रीती॥' -तुका.३६७१.१.

वढत (क्रि.रूप.) ओढत. 'आपून ह्या धांदीनं याचे पाय बांधू अन् **वढत** गावात नेऊ.'

वढनं (क्रि.) ओढणे. 'फाटका संसार कसाबसा **वढनं** चालू हाय.'

वढा (पु.) स्वाद, मौज, गंमत. 'नयतुरनी बायको आबा करून आनते/ शिया भाकरीच्यासंगं **वढा** चटनी आनते.'

वढातान (स्त्री.) त्राण पडणे, ओढाताण. 'दोनदोन लेकी उजवायाचा टाईम आला लय **वढातान** होऊन रायली.'

वढाय (क्रि.रूप.) ओढायला. 'तुमी मले कोतवाल करसाल अन् लोकं मेलेले ढोरं **वढाय** लावतीन.' -पाटी.

वढाय(ळ) (वि.) उनाड, खोडकर. '**ओढाळु** गुरु असेः ते थैक थैक म्हणता एः घांसु घेउनि जाएः' -ली.४१६. 'मन **वढाय वढाय/** उभ्या पिकातलं ढोरं.' -बहिणाबाई चौधरी.

वढाळपणा (पु.) खोडकरपणा. 'ती नजरे आड होइपर्यंत पाहात राहण्याचा **वढाळपणा** त्याच्या मनान केला.'

वढाळू (वि.) ओढाळ. 'हे वासरू **वढाळू**, दोर लावून पछाळू.'

वढूनतानून (क्रिवि.) कसेबसे, कसेतरी, जबरीने. '**वढूनतानून** कोनी नवरदेव होत नस्ते भाऊ, मनातून पायजे?'

वणिजारे (पु.) व्यापारी, वंजारी. 'लोणारखांडीपासी **वणिजारे** उतरले होतेः' -ली.३३१.

वत (क्रि.रूप.) ओत. 'तू **वत** वऽऽ शिनाल आमच्या भांडनात तेल.'

वतन (न.) १. स्वदेश, मातृभूमी. २. रोजीचे साधन. 'शिंदीचं हे रान मनजे आपल्या मातंग मंडळीचं पिढ्यापिढ्याहेचं **वतनच** हाय का नाही?' -वा.४१४. (अर.)

वतनं (क्रि.) ओतणे, खाली सांडणे, साच्यात घालणे. 'बाल्टी भर पानी माया डोक्स्यावरच **वतलं** पिसाट्यानं.'

वतनदार (वि.) वतन असलेला. '**वतनदार** वतनाची जागा सोळून जाते एकाच जागी फक्त म्हसनखाईत.' -भं.१४४. (फा.)

वतनी (वि.) वतनातून मिळालेले. 'आमी काई भाईरचे नाई. **वतनी** हो या गावचे.'

वतर (पु.) पाळी, क्रम. 'कास्तकारीत सर्व्या कामाचा सर्व्याचा **वतर** एक येते.' -दि.३२.

वतरी (क्रिवि.) लागोपाठ, क्रमाने. 'पेरणीपासून डवरणीपर्यंत सारं **वतरीवर** आटोपलं होतं.' -पोळा.१६.

वतला (क्रि.रूप.) ओतला. 'नाकन तुटेल सिंगल आन टिचरेल बशीत बिन दुदाचा च्याहा तिनं **वतला**.' -सित.३३.

वतीनं (अ.) कडून. '**तुयावतीनं** देनं मले कर्जानं पैसे काळून.'

वतीव (वि.) ओतलेले. 'तिये गर्भमेद मुसे। रक्तमूत्र रसे। **वोतीव** होउनि असे ते लजिरवाणे॥' -ज्ञा.१६.१८०.

वतून क्रि.रूप. ओतून. 'या घळ्ळीतलं पानी राजनात **वतून** रिकामी कर ते.'

वतेल (क्रि.रूप.) ओतलेले. 'गंगायात पानी **वतेल** आये, आंग धून घ्या.'

वत्तर (पु.) पुन्हा आलेली वेळ. 'काही लोकाले नव्या शास्त्रीय शेतीची **वत्तरच** साधता आली नाही.' -जटा.१५.

वत्याले (क्रि.रूप.) ओतायला. 'उठसूट मलेच पानी **वत्याले** लावतात माठात.'

वथारा (पु.) हुंगणे, वाकडीनजर, मारण्यापूर्वीची नजर. 'माणसासारखेच डोळे लाल करून बैल **वथारा** धरायचे.' -खुं.४७.

वदरं (अ.) वर. '**वोदरे** तेथ टेका सुतिः' -ली.५८९. 'पावने **वदरं** माळीवर बसेल आयेत.'

वदरून (क्रि.रूप.) वरून. 'भल्लं **वदरून** राजा इमान गेलं/ कोनी तरमा डोक्स काळून पायलं/ म्याबी खालूनच इमानातल्या बॉले/ वयखल्यावानी केलं.'

वधर (अ.) वर. 'खणताखणता खांब राखतिः वोदरे तेथ टेका सुतिः' -ली.५८९. 'हात **वधर** करून म्हन्तं केले केले/ आजलोक गावासाठी सांग काय केले?' -नांबै. 'अभाय चार बोटं **वधर** सरकलं जसं इतकं भेलं.' -डेबू.१८.

वधरलं (वि.) वरचा. 'आमी **वधरल्या** वाड्यात खिऊन रायलो होतो.' -लेक.४५.

वधारनं (क्रि.) वृद्धी होणे, वाढणे. 'निंदणीला जोमाने सुरूवात झाली रोजंदारीचा भाव **वधारला**.' -फीर.१७९.

वधारू (क्रि.रूप.) वाढू. 'पानी पळते तसीतसी मजुरी **वधारू** लागते.'

वन (न.) १. रान. 'लेकीले सासरी पाठवताखेपी असं वाटे का वाघाच्या **वनातच** तिले पाठून रायलो आपून.' २. जखमेचा व्रण. 'फोळं बसला ना त्याचा **वन** होय तो.'

वनज (स्त्री.) व्यापार, उदीम. 'इतले रोज कुठी **वनजीले** गेल्ता बापा तू.' (सं.वाणिज्य)

वनवन (स्त्री.) दमणूक, व्यर्थ श्रम, त्रास. 'बहु केली **वणवण**। पायपिटी झाला सिण।' -तुका.१९९. 'आपलं गाव सोडून असी **वनवन** फिराची गरज नोती.' -धग.१५.

वनवा (पु.) ओणवा, रानात लागणारी आग. 'देवते पुर्वे उभे राहीलेः मग **वोनवौनि** श्रीकरू घालुनि स्परीसीलेः' -गोवि.६६. 'जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु। **वणवला** का॥' -ज्ञा.२.७६. '**वणवा** मियां आघवा। पांखेंचि पुसोनि घेयावा।' -ज्ञा.१४.१९१. 'पहाळात **वनवा** लागला का जनवारं धूम पयतात.'

वनवा (क्रिवि.) वाकून. 'दरवाजा लानचुकला हाय **वनवा** होऊनच जा लागते अंदर.'

वन्नीस (वि.) तुलनेने कमी. 'त्या अमक्याची पोर्गी पाह्यली पन **वन्नीसी** वाटली.' -मे.३४.

वन्नीसबीस (वि.) कमीजास्त. 'शेवटीशेवटी **वन्नीसबीस** करून उजवून टाकावं पोरीले.'

वपनं (क्रि.) मारणे. 'लेकरू चोरी करताखेपी दिसलं का **वपनं** सुरू होते आपलं.'

वफय (वि.) पोकळ, दाणे नसलेले. 'जवारीचे कन्सं **वफय** निंगल्यानं झळती कमी लागली.'

वफादार (वि.) एकनिष्ठ. 'मान्सापक्षे कुत्रं बरं धन्याले **वफादार** तरी रायते.' (फा.)

वय (पु.) वळ. 'ओल्या फोकाट्याचा उघळ्या पाठीवर रट्टा मारला तं त्याचा **वय** दोन रोज नाई गेला.'

वय (स्त्री.) १. कामासाठी घेतलेले तास. 'एक **वय** वेचून झाली. पंचवीस किलो कापूस निघाला.' -ना.१३५. २. **वय**, उमर, आयुष्याची गेलेली वर्ष. 'सत्तर वर्षाची **वय** झाली. तरीबी कामाले काकट हाव.' ३. ओळ. 'तो तुरीचा **वय** दिसते ना, त्याच्या सावलीत निजो लेकराले.'

वयख (स्त्री.) ओळख, परिचय. 'जे चावळले **वोळखी**।

शास्त्रांचिया॥' -ज्ञा.१७.३५६. 'सात गावात आपली **वयख** हाय.'

वयखनं (क्रि.) ओळखणे. 'तो पावना कोन हाय तं **वयखनं**?'

वयखपायख (स्त्री.) ओळखपाळख. 'सोयऱ्याधायऱ्याईची **वयखपायख** ठुवा लागते.'

वयखी (स्त्री.) ओळखी. 'राजकारनात असल्यानं जतीतती **वयखी** हाय आपली.'

वयखीपायखी (स्त्री.) ओळखीपाळखी. 'रावजी मामाजीच्या गावोगाई **वयखीपायखी** आयेत.' -सित.५५.

वयखून (क्रि.रूप.) ओळखून. 'तुये भाऊ किती तिताल हायेत हे मी **वयखून** हावो.' -सित.२२.

वयखेल (क्रि.रूप.) ओळखून असलेला. 'कोन कितीक पान्यात हाय आपून **वयखेल** हाय भाऊ.'

वयचन (स्त्री.) वळचण. '**वयचनीचा** बासा, लागे ठसाठसा.' (त.वळवी)

वयचनं (क्रि.) वेचणे, खर्चणे. 'यकदार गेल्तो ता पायलं पान्यासार्का पैसा **वयचते** हा.' -सित.४६.

वयचून (क्रि.रूप.) जतावून. 'जीजीनं **वयचून** देलं होतं.' -ना.७२.

वयतं (क्रि.रूप.) वळतं. 'मोठं आलं सावकाराच्या पोटचं? म्हनूनच ढोरं **वयतं** वाट्टे?' -डेबू.२४.

वयन (न.) १. छप्परीच्या उताराचा शेवटचा भाग. २. बांध. 'वावरात खालत्तल्या भागात धुऱ्याकून **वयन** टाकलं.' ३. वळण. 'बयकेल पोऱ्याले **वयन** कोनं लावावं आता.'

वयनं (क्रि.) १. ओवणे. 'मगं तेणें तों वविजें। तरीचं लेणे पाविजें॥' -ज्ञा.१७.२५. 'रत्नाच्या **ओवणी** कांचे ऐशा घरी। **आव्हेरुनी** दुरली अधिकारें॥' -तुका.३७९१.१. २. वळणे. '**वळी** गाई धावे घरा। आमच्या करी येरझारा।' -तुका.१८५.

वयनसार (वि.) वहिताची उत्पादित जमीन, वहिवटीची. '**वयनसार** जमीन असली तं पिकाले काय पाहा लागते बापा.'

वयनाट (स्त्री.) वळचण, भिंतीपुढील छप्पराचा भाग. 'पोळले सुने असे तयासि कण्हणे ठाइ सुखासि नैएः वळणी खाली रीगे परि सुखासि नैएः' -ली.६१०. 'लाखाच्या नोटा **वयनाटीवर** भिजते/ चाराने आठाने तिजोरीत निजते.' -मिए.१२१. '**वयनाटीवर** पडलेले सरते खाली काढण्यात आले.' -भं.१०६.

वयनी (स्त्री.) भावाची पत्नी, भावजय. 'लहान माहादेव हाका मारते **वयनी**/ खांद्यावर सेव सजतो भाऊ **वयनी**.'

वयंबा (पु.) ओळंबा. 'भीत सरकी चाल्ली का तिरपी हे **वयंबा** लावूनच कयते राजाले.'

वयरी (पु.) वैरी. 'सख्खा भाऊ पक्का **वैरी** अस्ते म्हनतात.'

वयलं (क्रि.रूप.) ओवले. 'तुटलं होतं तं पोथीत डोरलं **वयलं** म्या.'

वयलं (न.) मटन. '**वयल्या** दुतल का म्हणजे मटन खाल्लं का?' -वा.७४. (माबो.)

वयवय (स्त्री.) वळवळ. 'बायको म्हने काल निरा **वयवय** करत होते/ मले सोळूनशिन्या तुमी साईले धरत होते.' -चंच.

वयसनी (स्त्री.) आढ्या. 'वावरात जाचं तं वक्तावर जाव. फालतूच घरधन्याच्या नाकाडोयाईवर काहाले **वयसन्या** पाळाव.' -लेक.८०.

वयस्कर (वि.) भरपूर वय असलेला. 'शिकल्याच्यानं पोरंपोरी लय **वयस्कर** होतात.'

वया (पु.) स्तन व स्तनावरील मांसल भाग, ओवा, कास. 'होय वोहाहूनि वत्स काढितां। नव्हे भणंगु दवडितां। भाणयावरुनी॥' -ज्ञा.१८.७८५. 'म्हसीले लागनारा हिर्वाहिर्वा चारा गावरानात असते/ तिचा **वया** मातर शहराशहरातून मस्त दूध देत असते.' -वि.

वयाजाती (स्त्री.) १. वय आणि कूळ, जात. 'ओढणी लपेटून बानो आपल्या **वयाजातीला** सावरण्याची धडपड करीत होती.' -धग.१३७.

वयी (स्त्री.) १. ओळ, रांग. 'चार तासं पऱ्हाटीचे एक **वयी** जवारीची टाकली.' २. चार चरणाचा एक, पद्य प्रकार. 'ज्ञानेश्वरीच्या **वया** पाठ करनं लावल्या महाराज बुवानं.'

वर (पु.) १. नवरामुलगा. 'ओसरीएसि वऱ्हाडीए अवघीः आणि **वौहर** बउलेयावरि बैसले असेः' -६९. 'तंव तेलीणी वोहरासी बासींगे नेत होतीः' -गोवि.२२४. 'लांडगे धूम नाचल्यानं मंडपात याले **वराले** उशीर लागला.' २. बाळंपणात बाहेर पडणारा स्त्री देहातील पातळ अंश, जार, वार. 'व्याली कुऱ्हाडीचा दांडा। **वर** न घली च तोंडा॥' -तुका.३५२.

वरई (स्त्री.) ओरळी, बांध, मातीचा लांबोळा ढिगारा. 'माणिकराव धुऱ्याजवळ गेला. वयन पायलं तेथून **वरळ्या** पाहिल्या.' -भं.३५. 'वावराच्या वरया, धुरे, खुनगोटे, रुमनधुरे येची सर्वी बारीकसुरीक माईती तेले होती.' -दि.४५.

वरक (अ.) पर्यंत. खांद्यावरचं पोर खाली ठेवत विचारलं **तिठ्ठावरक** पाई चालतं?' -धग.१९.

वरकड (वि.) उपरे. '**वरकड** देव येती जाती। हा देव जन्माचा सांगाती॥' -तुका.४१६८.

वरखंडनं (क्रि.) ओरखडणे. 'बालीनं पायनं नखानं केवढं **वरखंडलं** मले.'

वरखंडा (पु.) ओरखडा. 'गोसावीयांचा बाहेप्रदेसी कांटीयाचे **ओरखंडे** जातिः' -ली.२१.

वरखडा(ळा) (पु.) ओरखडा. 'घेतसे **वरखडे**। शिव्या देऊनियां रडे।' -नाथ.२९.

वरखाल (स्त्री.) बडदास्त. 'तुमी फक्त म्हसाळाईचीच **वरखाल** करा दूध देतात म्हनून.' -मे.२०.

वरंडा (पु.) छपरी ओसरीचा पुढील जागा. 'घरापुढे **वरंडा** असला का बसाउठाले मोकया रायते.'

वरंडी (स्त्री.) घरापुढील छप्परी. 'डोक्यावरचं भाकरीचं टोपलं तिनं झोपळीच्या **वरंडीवर** ठेवलं.' -पोर.९.

वरत (न.) १. नवरा नवरी दुसऱ्याच्या घरी जेवायला जातात ते ठिकाण. २. व्रत. 'मनातलं मनात दाबून त्याबद्दल मौन **वरत** धारन केलं व्हतं.' -सित.१६.

वरतं (अ.) वर, पश्चिमेकडे. 'कशाचा कलमा हलमा चालू हाय म्हणाव **वरतल्लंच्या** गल्लीत?' -खुं.१३९.

वरताट्या (वि.) श्रेष्ठ कुळाचा. 'खालताट्या तू का **वरताट्या** हाय/ हुतूतू हाय का आट्यापाट्या हाय.' -मिए.१०७.

वरताळा (पु.) वर, आणखी. '**वरताळा** म्हणून शेतकऱ्यानी दहा पोते ज्वारी द्यावी असं ठरलं.' -ल.३०.

वरती(ते) (अ.) आणावी, वरून. 'माहे मातीचे ढबरं गेलें फुटून/ **वरते** सासूने काढले कुटून.' -लोक.९९.

वरदान (पु.) इश्वरी कृपा. 'वरु दीधलाः इतुकेनि तया **वरदान** जालेः' -ली.४००.

वरन (न.) दाळीचा पातळ पदार्थ. 'बाइसी पोळीया केलीयाः गोसावी चणेयांचीये **वरण** करवीलेः' -ली.४८. 'मग तेही **वर्णभातु**-आधिकु- घातलाः तेयाचा धोत्राचा पदरी बांधिलाः' -ली.८९. 'मग मांडे आणि चवळेयाचे **वरण**ः तुपः सेवटी दुधभाताची आरोगणा जालीः' -गोवि.२०१. 'उडदाचं **वरण** अन् पानगे पोटात रिचवून तो निंघाला. ' -मोती.

वरनं (न.) चारा. 'हाताले कुर्हाळ लागली...**वरनं** तोळतातोळता.' -ना.९५. 'आसळकाचं पेर्न, बैलाचं **वर्न**.'

वरनं (क्रि.) शिजविणे. 'दुधाचे आंधणी वैरिले पाषाण। कदा काळी जाणं पाक नव्हे॥' -तुका.४१०३. 'चुलीवर तिनं **वरल्या** शेवया.' -भू.२५.

वरनभात (पु.) वरण, भात वगैरे. 'जेवीत जेवीता **वर्णभातु** रुचलाः' -ली..१७८.

वरन्या (स्त्री.अने.) लग्नाचा योग. 'बाप मांगं राह्यला अन् पोराच्याच **वरन्या** उभ्या राह्यल्या.' -ना.३४. 'संबंदं पक्का झाला. माल्या **वरन्या** उब्या राह्यल्या.' -सित.११८.

वरप (क्रिवि.) १. खळ्यावर मळणी करून त्यातून पिश्या वेगळ्या करणे. २. ओरपणे. 'बकरी झाळ दिसलं का **वरपते**.'

वरपक्ष (पु.) नवरदेवाची बाजू. '**वरपक्षानं** लग्न दोन्हीपरती केल्यासारखं झालं.' -मोती.३६.

वरपनं (क्रि.) १. ओरपणे. 'सकाऊनपासून सोसूसोसू जीव **वरपला** अन् राऊराऊ गयाशी हुंबळ्ळा दाटू लागला.' -लेक.६८. २. फुरकी मारणे. 'जीजीः हा गोडू असे माः अवघेयाचि भगतिजनी **ओरपोओरपो** खादलीयाः' -ली.३१२. 'आंणि ताक आंबील **ओरपतिः**' -गोवि.२९६. '**वोरपिली** कांटिया। कमळे जैसी।' -ज्ञा.१६.३६७. 'रस्सेदार भाजी **वरपू वरपू** खाल्ली दोईदोई हातानं.'

वरपाटं (न.) जोडप्यांसाठीचे पिढे. 'मंदात चौरंग, त्याच्या बाजूले पाच जोडप्यासाठी सालईचे **वरपाटं** ठिवले.' -दि.८.

वरपाटी (स्त्री.) लवकर कडक नरम होणारी. 'जिमीन **वरपाटी** हाय पानी आला का चिपचिप आन गेला का गोटा हुते त्याच्यानं मालाची वाढ होत नायी.' -दि.५५.

वरबळनं (क्रि.) ओरबाडणे. 'पाहुनिया झाडें। ओरबडुनी पाला। खाऊनी विठ्ठला आडवावे॥' -तुका.२४८१.

वरंबा (पु.) मातीचा लांबोळी ढिगारा. 'मग भटोवासी नागरू धरीलाः नेलाः आणिला...**वरंबा** फुटेचिनाः' -ली.१७३.

वरम (पु.) दोन वाफ्यांमधील उंचवटा. 'बापाला वाटलं मळ्यात वाफ्याचे **वरम** गुडघ्यापर्यंत उंच करावित.' -गाआ.२०.

वरमनं (क्रि.) १. नमणे. 'झाले सगळे गूपचूप पथप्रकाश **वरमला**.' -अ.५७. २. खजिल होणे. 'मी साजरा बोल्लो तं हरदास **वरमला** मंग.'

वरमान्या (वि.) वर मान करून चालणारा. '**वरमान्या** बैलाले खालमान्या जोड/ असा दिसे जोडा लोकशाहीचा इजोड.' -मिए.१५१.

वरमाय (स्त्री.) वधूवराची आई. 'त्यांची अर्धांगी तर नवरदेवाची संपूर्ण **वरमाय** बनली होती.' -भं.७३.

वरलं (क्रि.रूप.) गरम पाण्यात टाकून ढवळणे. 'चवथी माझी ओवी **वैरिलें** दळण। गाईन निदान पांडुरंग॥' -तुका.४३३४.३. 'जरा भरली कनगी, तिच्या पायी बारा वाटा, लक्ष्मी दिवाईच्या रोजी **वरे** जवारीचा घाटा.' 'भाकरी थापल्या मंग जरासक चून **वरलं**.'

वरलीमटका (पु.) एक जुगाराचा प्रकार. '**वरलीमटक्यात** मोहाला बळी पडून अनेकांचे संसार बेचिराख झाले.' -फीर.११२.

वरवर (स्त्री.) हाजीहाजी, मानपान. 'मी त्याची भल्लीच **वरवर** करो. मांगाच्या अगुदरच त्याले वस्तू निऊन देवो.' -हज.१०.

वरसडा (पु.) तुषार. 'वयनाटीवरून पळनाऱ्या पान्याचा **वरसडा** वसरीत येऊन रायला.'

वरात (स्त्री.) लग्नाची मिरवणूक. 'सयसंध्याकाईच नवरदेवाची **वरात** पारापुळून निंगली.'

वरातजेवन (स्त्री.) वरातीतील लोकांसाठीचे भोजन. 'संध्याकाळचे **वरातजेवण** असल्याने माणसं कामाला लागली.' -सेल.३२९.

वरातपंगत (स्त्री.) लग्न लागल्यानंतर मुलीला घ्यायला येणाऱ्या पाहुण्यांसाठी दिलेली पंगत. 'आजकाल नानमुख नस्ते ना **वरातपंगत**. रिसपसेन अस्ते उभ्यानं जेवाचं अन् हातानं घ्याचं.'

वरी (अ.) १. पर्यंत. 'आतावरी शाळेत नाव काऊन नाई टाकलं? झपा काहाळल्या काय?' -धग.६१. 'साजऱ्या माह्या वावरातल्या **आठवरी** तासातला कापूस चोट्ट्याईनं येचून नेला.' -जटा.६८. २. वर. 'जैसा पाणियांतुल गुंडाः **वरि** पाणिये भीजलाः वोला दीसे फोडौनि पाहीजे तव आतु कोरडा असेः' -ली.६३१. '**वरि** दिव्यांजन होय डोळा॥' -ज्ञा.६.४५८.

वरीस (न.) वर्ष. 'मले तुमच्या वाळग्यात फक्त **वरीसभर** राऊ द्या.' -फीर.१७१.

वरे (अ.) वर. 'हे असेच जा **वरे** सरळ, बुडीचा वाडा कोणीही सांगेल.' -गय.

वरोटा (पु.) पाट्यावरील लांबोळी गोल दगड. '**पाटावरोटा** असीन ताहाच मिरच्या लगळून चटनी करता ईन.'

वर्जीकवार (पु.) पथ्य पाळावयाचा दिवस. 'जेवाचा आग्रो नका करू माहा **वर्जीकवार** आय.'

वर्ज्य (वि.) पथ्य, अस्वीकारणीय. 'माथाचे न्हाण **वर्जिले** तेल, तूपः दहीः दूध वर्जिलेः' -ली.३८३. 'म्हणउनी खेळ मांडियेला ऐसा। नाहीं कोणी दिशा **वर्जीयेली**॥' -तुका.३६५.

वर्ण (न.) चारा. 'एकंदर गवत, कडबा असं **वर्ण** न देण्याकडे लोकांचा जास्त कल आहे.' -पख.१२५. 'सुपेवरी **वयरन** घातले। तातडीने जाते ओढीले॥' -दास.१८.५.८.२. २. शिजण्यासाठी भांड्यात धान्य पीठ घालणे. 'येवळी भाकर थापली की मंग चून **वरतो**.' ३. दळण्यासाठी जात्याच्या पाळीत एकवेळ घालतात तेवढे धान्य. 'दळण मी दळते गीत गायन देवाला/ **वरण्यापरत** माझ्या हर्ष या जीवाला.' -रुक्मि.२०.

वर्त (न.) व्रत. 'तिचे **वर्त** सुफळ होईलः' -ली.७७. '**वर्त** केलेया पुण्य होएः' -ली.३३०. 'तुम्हीं **व्रतें** नियमु न करावें। शरीरातें न पीडावें।' -ज्ञा.३.८९. 'तू काहून मुकी? मुकी राह्याचं **वर्त** धरलं का काय?' -झि.२.

वर्तावळा (पु.) अधिक, वर, जास्तीचा पैसा. 'बाजारात नुसता नाण्याचा मोबदला करावयाचा झाला तरी वरती **वर्तावळा** द्यावा लागतो.' -कात.४४६.

वर्दी (वि.) आज्ञा, हुकूम, आगाऊ जाणीव. 'संस्थानिक येण्या आधी फर्मान येई नि तलाठ्याला वाडा सफाईची **वर्दी** मिळे.' -काळी.६४. (अर.)

वर्धावनं (क्रि.) वाढणे. 'सध्या मुंगाचे भाव **वर्धायेल** आहेत.'

वराळ (न.) १. वऱ्हाड, विदर्भातील काही भाग. 'जीः जीः आमचे वराडीचे दैवत सीवनदेसा न वचावे जीः ए सीवनीये नेति तरी वराटु पोरटे हाइल जीः' -गोवि.२३५. '**वराळ** अन् सोन्याची कुराळ.' २. लग्नातील पाहुणे मंडळी. 'दोही कडुनि **वऱ्हाड** आम्हीचि करुनिः..मा द्रव्य लागेल ते आम्ही वेचुनिः' -ली.३२. 'ऐसे च्याऱ्ही दीस उभयांचे **वऱ्हाड** जालेः' -ली.६८. 'ऐसा वऱ्हाडी केसि आवघा गाउ जेवीलाः बेलौरे जेवळीलेः' -गोवि.२२४. 'इसवरनायकाचे **वऱ्हाड** जालेः मग घरासि वरातवरात आलीः मग वौहर गोसावियासि दंडवता आणि लेः' -गोवि.२८९. 'अहो वधुवरांचिये मिळणीं। जैशीं **वराडियांही** लुगडीं लेणीं।' -ज्ञा.११.३.

वऱ्हाडभेट (स्त्री.) वधूवर पक्षाची गाठभेट. 'लग्न घराच्या मंडळीची **वऱ्हाडभेटीसाठी** वाट पाहणं सुरू झालं पुन्हापुन्हा निरोप गेले.' -वा.७३.

वऱ्ही (अ.) १. वर. 'तुम्ही या पोराचं नाव शाळंत घेतलं नाही तर मी तुमची **वऱ्ही** तक्रार करीन.' -वा.८. २. '**वऱ्ही** आली पोरगी. नाक कापलं पोरीनं जसं.' -सेल.६९.

वऱ्हून (अ.) वरतून. '**वऱ्हून** काहून टेंबलून रायला बे? खाली येऊन बोल बरं.'

वर्स (न.) वर्ष. 'पोरीचं लगन कऱ्यासाठी सीरघर दोनतीन **वर्सापासून** तायफटक करून राह्यला व्हता.' -सित.२२.

वल (स्त्री.) ओलावा, ओले. 'खालीं पडे **ओली** बीज। तरीं च हाता लागे निज॥' -तुका.३११५.२. 'असा वाढला मानूस वयीतल्या भळावानी/ **वल** जरा ना वसान रानातल्या अळावानी.' -वि.

वलं (वि.) १. ओले. 'भूमी लोळोनी गेलिया अंबु। **वोल** थारे॥' -ज्ञा.१८.४२४. '**वल्या** चिकन मातीहून म्हैस सरली तर मोठी आफत होते.' -पख.४६. '**ओल्या** कापळ्यानं हे डाग निंगून जातीन.' २. थंड, सुस्त. 'रामरावात जरा चयतन नाई, निरा **वला** मानूस हाय.'

वलंकाचं (वि.) ओलसर. 'इंदनाच्या काळ्या **वल्याकाच्या** असल्याच्यानं चुंलीत इजान पळलं.' -सित.३३.

वलंगट (वि.) अतिशय ओले. 'सारं आंग **वलंगट** झालं. तिनं तारावरची साडी अन् झांपर उचललं.' -ना.६०.

वलवनं (क्रि.) ओलवणे, ओले करणे. 'तीन येक्कर वावर **वलवनं** चालू केलं लाईन नसली का आराम अस्ते.'

वलवल (क्रिवि.) वळवळ, हालचाल. 'जास्तीची **वलवल** करू नको रे पोरा. अदमुसा हू नको.' -डेबू.८.

वलवली (वि.) चलबिचल. 'हे पोट्टी लानपनापासूनच **वलवली**. कायलेच गावभर हिंडते काय मालूम?' -अक.७२.

वलसर (वि.) थोडे ओले. 'लाकळं **वलसर** हायत ना? धळ पेटूनबी नाई रायले चुलखंडात.'

वलंसुकं (वि.) ओल असलेली किंवा नसलेली. 'या जमान्यात भॉऊ शिरमंताचं **वलंसुकंई** जयते.'

वला (पु.) हात खाली पायवर अशा गोलाकर उड्या टाकणे. 'माळीभेळनीच्या राती **वला** दोघीनं टाकल्या.' -वि. 'भिंगरीच्यावानी आमी किती फुगळ्या घेतल्या.'

वलांडनं (क्रि.) ओलांडणे, स्पर्श न करता पलीकडे जाणे. 'रस्त्यात फेकेल निंबू **वलांडनं** चागलं नाई.'

वलांडा (पु.) भक्तांनी पूजाअर्चा करून ओलांडून जाण्यासाठी केलेला लांबाळा उंच ओटा. 'अमावश्या-पौणिमेला भाविक भक्त **ओलांड्यावर** येतात.' -सेल.२१२. २. थोडे लांब अंतरावर.

वलीत (न.) ओलीत, बागाईत. 'ज्यो पहाव त्यो **वलिती** करायची म्हंते, इहिरी खंदते.' -त.१५.

वलून (क्रि.रूप.) ओलवून. 'गहू **वलून** ठेवले, सकाऊन दऊन काढीन.'

वलोनं (क्रि.) ओलवणे, ओले करणे. 'पानी सोळून वावर **वलोनं** झालं का मंग भाकर खाऊ.'

वलोयाले (क्रि.रूप.) ओलवायला. 'वावर **वलोयाले** इरीत पानी तं पायजे ना दादा.'

वलोलं (वि.) भिजवलेले, ओलविलेले. 'जीजीच्या जात्यावर **वलोलं** दळलं होतं.' -ना.७२.

वलोसा (पु.) ओलावा. 'त्याच्या हिरदातला मानुसकीचा **वलोसा** ताजा झाला.' -सित.१५९.

वल्द (पु.) पती. 'मंजुराबाई **वल्द** सेसराव गायतोंडे असं नाव लेहा बाईचं.' (अर.)

वल्लं (वि.) ओले. '**वल्ल्या** चिचिच्या चटनीवरती तिनं पान्याची धार सोडली.' -जटा.४१.

वल्ला (वि.) ओला. 'डारं मांडवावरच पल्ले आन् हैदीचा **वल्ला** मांडव तय्यार झाला.' -दि.७.

वल्ली (वि.) १. विक्षिप्त. 'गनोजी म्हंजी गावातली एक अजाब **वल्लीच** आये.' २. ओली. 'वावरात गेल्ली तं पानी आलं अन् पार **वल्ली** हून गेली मी.' (फा.)

ववनं (क्रि.) ओवणे. 'तुयशीची माळ सुताच्या धाग्यात **ववनं** आजीनं सकाऊनच चालू केलं.'

ववा (पु.) अजवान. 'पानपुळ्यात सुपारी, सोप, चेमनबार, **ओवा**, खोबऱ्याचा कीस असं काईबाई ठुयेल होतं.'

ववानी (स्त्री.) औत चालेल एवढे शेत कोरडे असणे. 'पोया झाला का वाईवखरन करताखेपी **ववानी** पा लागते नाई तं कळक पळ्ते.'

ववायनं (क्रि.) ओवाळणे. 'आरतीचं ताट घे अन् **ववायनं** नवरदेवाले.'

ववायनी (स्त्री.) ओवाळण्याची क्रिया. 'बंद्या रुपायाची **ववायनी** घलत नस्तात वऽऽ सुनबाई.'

ववी (स्त्री.) एक वृत्त प्रकार. 'जात्यावर बसलं का **ववी** सुसते बाईले.'

वशाट (न.) पावसाचे तुषार. 'खिळकी लावून घेरे सबन **वशाट** येते घराम्दी.'

वशिला (पु.) शिफारस. 'डिगऱ्याफिगऱ्या कोनी पायत नाई **वशिला** पायजे जोरदार.' (फा.)

वस (वि.) उजाळ. 'तुजवीण वन **ओस** वाटे।' -गाथा. (शाप्रत बालक्रीडा विभाग २-११६.)

वसंवसं (क्रिवि.) सारखे अंगावर धावणे, बोलणे. 'काशीरामबुवाचा कारभारी बायकाईले निऱ्हा **वसंवसंच** करते काय?'

वसकन (क्रिवि.) एकदम. 'तशी पुरषाची सासू **वसकन** अंगावर येत ओरडली.' -ना.४४.

वसकनं (क्रि.) रागाने बोलणे. 'सून अंद्रे गेली तरी सासूचं **वसकनं** सुरूच होतं.'

वसकवसक (क्रिवि.) चिडून, तक्रारीच्या सुरात बोलणे. 'जाहा पाहावं ताहा बुडगी लेकराईले **वसकवसकच** करत रायते.'

वसकाऊन (क्रिवि.) चिडून, रागाने, मोठ्या आवाजात बोलणे. 'पमीची सासू निव्वळ **वसकाऊनच** बोलत रायते.'

वसकावनं (क्रि.) रागाने मोठ्या आवाजात बोलणे. 'तरन्या लेकीले असं **वसकावूनं** धावनं चागलं हाय काय?'

वसद (स्त्री.) वस्तू. 'कोनी **वसद** मांग्याले आलं का उभे ना करत राजा तुमी.'

वसनावनं (क्रि.) झोपेत बरळणे. 'तैसे देवाचा गुणी **विसवताः** मि बियाळ बाले उसणताः' -नरू.३७. 'हां गा **वोसणतयाचां** ग्रंथीं। काइ तुटती संसारगुंती॥' -ज्ञा.१५.३९४. 'हे चि **वोसनावोनी** उठी। देव साठविला

पोटी॥' -तुका.३०६९. 'मायाच नावानं **वसनावत** रायते बापराजा.'

वसरनं (क्रि.) कमी होणे, आहोटी लागणे. 'मेघ उदार परी वोसरे। म्हणऊनि उपमेसी न पुरे॥' -ज्ञा.९.२०५. 'पाऊस बंद झाल्यानं नदीचं पानी **वसरनं** चालू झालं आता.'

वसराई (वि.) मोत्यांचा एक प्रकार. 'बैठकीत **वसराई** मोत्यांनी मढविलेला गालीचा झयकत होता.' -कात.२८२.

वसरी (स्त्री.) ओसरी, छपरी. '**ओसरीएवरि** बैसो घातलेः पाए धुतलेः तांबीया भरुनि दीधलाः' -ली.४७७. 'नीघरा जाले घरः घरीचीयास गोसाविया जाली **वोसरीः**' -गोवि.१६. 'ओसरीएवरि रीगतां डावेया भीतीसीं उकड आसनः' -गोवि.९१. 'थकलेले औत भांडे **वसरीत** सांडतात/ गोठ्यातले जनावर बसूनच भांडतात.' -नांबै. 'राहात असान त आमची **वसरी** रिकामी करून देतो.' -धग.१३३.

वसवस (क्रिवि.) चिडून बोलणे. 'बुडगं कुत्र्यावानी **वसवसच** करत रायते कोनालेई.'

वसाड (न.) पावसाचे तुषार. 'पावसात दार उघडलं तशी साऱ्या घरात **वसाड** आली.' -अंधा.

वसांडनं (क्रि.) भरून वाहणे, ओसंडणे. 'ते कृष्ण वचनामृत। पार्थी भरोनि **वोसंडत**॥' -ज्ञा.१५.५८८. 'नाला तं बम वसांडून वाहून रायला.'

वसाणवाडा (पु.) ओस पडलेले. 'कोणतेबी कुठे पाहा कसे **वसाणवाडे** झाले गोकुळाचे.' -खुं.२३८.

वसान (न.) १. पुरात वाहून आलेला केरकचरा. 'वरी तरताती **वोसाणे**। सुखदुःखाची॥' -ज्ञा.७.७३. २. वखराच्या पासीला लागलेला गवत काडी कचरा. 'आता **वसाण** काढून कस काढवू पासीचा.' -गाक.५०.

वसान (वि.) उजाड, निर्जन. 'परिमळु निघालिया पवनापाठीं। मागें **वोस** फुल देठीं।' -ज्ञा.९.४१३. 'गावात अजून **वसान** गोठा/ आहे टुकनी लागेल खुटा.' -काया.३४.

वसारा (पु.) अति राग. 'पवाराच्या सुनीनं **वसाऱ्यानं** शेवंतीकडे पाह्यलं.' -अंधा.

वसाळ (न.) छप्परातून आत येणारे तुषार. 'वसरीत **वसाळ** येऊन रायलं वऽऽ पोत्याईवर झाकन ठुई नाई तं ओले होतीन.'

वसियत (स्त्री.) वारसा. 'मायाजोळ तुया बापाची **वसियत** आये का, तं तुले पैसे देऊ मी.' (अर.)

वसिला (पु.) लागाबांधा. 'नवकरीसाठी पैसाअदला नाई तं **वसिला** तरी पायजे.' (त.शेलावनी)

वसुली (स्त्री.) प्राप्ती, घ्यावयाची रक्कम. 'दोनशे रुपये **वसुली** झाली काई उधारी बाकी हाय.' (अर.वुसुली)

वसूनकोसून (वि.) अशक्त, दुबळा. 'काय तब्बेत झाली लेकराची **वसूनकोसून** गेला जणू.' -ऊन.१३३.

वसूल (न.) प्राप्ती, मिळणे. 'एका साली डेबूनं पावतीशिवाय **वसूल** द्यायचा नाकारला.' -गा.३४. (अर.वुसूल)

वस्कावनं (क्रि.) खेकसणे. 'कौतिक भीमाच्या मदतीला धावली तसं महादेव तिच्यावर **वस्कावला**.' -धग.९०.

वस्तभाव (स्त्री.) चीजवस्तू. 'बाहेरची पत मोडली व घरातली **वस्तभाव** गहान पडली.' -कात.५७०.

वस्तरा (पु.) न्हाव्याचे अवजार. 'खरपाच्या चकतीवर पाणी टाकून **वस्तरा** चटपट करायला लागला.' -काळी.५. (फा.अर.)

वस्ताद (पु.) गुरू, कावेबाज. 'एखाद्या वेळेला मला चांगलाच **वस्ताद** भेटायचा तो भारी पडायचा.' -फीर.५१. (अर.फा.)

वस्ताद (वि.) हुशार, चलाख. 'बोलणारा **वस्ताद** असला म्हणजे त्याची येरंडी देखील फुर्र उडते.' -कात.४३.

वस्ती (स्त्री.) लोकांची राहण्याची जागा. 'व्याघ्रविवरा न वचवे। **वस्ती** जेवी॥' -ज्ञा.१३.५१४.

वस्रावनं (क्रि.) झोपेत बडबडणे. 'तरी **वोसणाही** बोलु तयाचा। परी सोपु न वचे॥' -ज्ञा.८.६.

वहळताहळ (न.) ओढाताण. 'याची जे लत हाये **वहळताहळ** कऱ्याची ते सुटत नाई.' -सित.१३०.

वही (स्त्री.) एक छंद. '**वही** हा ग्रामीण भागात लोकप्रिय असणारा लोकगीतांचा प्रकार.' -फीर.३१. 'काहीकाही कवी आजकाल **वही** छंदातच कविता करतात.' (का. वहि)

वहीत (वि.) पिकाऊ जमीन. 'आता एका जोडीचं **वहीत** हये त्याचं.' -सेल.११६.

वहीम (पु.) संशय. 'पोलिसाचा **वहीम** शंकऱ्यावरच होता म्हनून धरलं त्याले.' (अर.)

वहिती (वि.) पीक घेण्यासाठी जमीन कसणे. 'सर्वांनी मोठ्या मेहनतीने जमिनी **वहितीवर** आणल्या तेव्हापासून मांग स्वतःच्या जमिनीतलं पिकणारं धान्य खातात.' -वा.१७६.

वहिदा (पु.) हक्क, रीत. 'तुमी मायवर श्या देता. मंग **वहिदाच** हये त्यो माहा.' -ऊन.२५१. 'मायवदाचं खायचा **वहिदा** नाही का आमचा?' -रा.१८.

वहिमी (वि.) संशयीत. 'पांडेबुवा वाड्यावर पोहोचण्यापूर्वीच **वहिमी** मंडळी पायरीवर जमलेली असत.' -काळी.६१.

वहिवाट (स्त्री.) रीत, रूढी. 'ते तातलिया लोहे पाणीचि पा

गिळाले। **वहिवटीही** पुसिले। नामरूप तयाचे॥' -ज्ञा.९.३२६. 'ढोराईची हे **वहिवाट** हाय, घरून सोडले का गोठाणावरच येतात.' -सि.३०. (फा.)

वहूत - ? 'लोधा बांधुनिया दोरीनं, **वहूत** नजरीनं.' -लोक.८४.

वळ (पु.) १. वट. 'वटबीजामध्ये साकोपसाकी पानीफळीसी आवघा **वट** सामावला असेः' -ली.१३३. 'गोसावी वडातळी पांरबी धरुनि उभे होतेः' '**वळ** कलंडती असे कुठी गेले झंझावात.' २. इभ्रत, दरारा. 'दाहा कोसात **वट** आये आन्याजीची.'

वळका (पु.) वळणे, गिरकी. 'काही बी मनता जा.' **वळका** मारून ती पुढं धकली.' -पख.७.

वळत (क्रि.रूप.) ओढत. 'मले कुठी **वळत** नेता राजा? मले जाऊ द्या घरी.'

वळनी (स्त्री.) वळचण. 'घराच्या **वळणीत** उभी राहिली बहीण म्हणे दादा या भेटून.' -लोक.४७.

वळणी - वळचणीला. 'आम्ही चाटणी करुनि **वळणी** हात पुसिलेः तेथ भडक करौनि उबाळ उठिलाः' -ली.३६.

वळलोपार्जित (वि.) पूर्वापार, वंशपरंपरेने चालत आलेली. '**वळलोपार्जित** जागा हाय ते दुसऱ्याच्या ताब्यात गेली ना पायजे.' -फीर.१६९.

वळा (पु.) १. ओढा. 'बुडीचा भावाभासीचा **वळा** करनं चाल्ला व्हता मनातून.' -सित.२३. २. स्वाद. 'उळदाची भाकर, हिरव्या मिरच्याची चटनी अन् रायतं असल्यानं न्यारीचा लय **वळा** आला.'

वळाणी (स्त्री.) जमिनीचे सोकणे. 'धोधो पावसानं वावरातल्या **वळाण्या** मोडल्या.' -अंधा. 'अशा बरसाती व्हायच्या की पंधरापंधरा दिवस **वळाण्या** व्हत नव्हत्या.' -त.१५.

वळीतवळ (स्त्री.) ओढाताणीत. 'बाप राजा लगन जुळून ठू नाई. **वळीतवळ** उरकून टाकाव लागन तं कर्ज काळाव.' -लेक.२.

वळे (पु.) उडीद मुगाचे वडे. 'मग ते मागौते **वडे** तुप जेविलेः तृप्तपर्यंत जेविलेः' -ली.४४०. 'मग मांगेः पुरीयाः घारीयाः वडेः उंबरेः ऐसे आघवे उलथउलथु अवलोकिलेः' -गोवि.२२४. (का.)

वव्हा (पु.) रुची, स्वाद, आनंद. 'शियी भाकर, दही अन् चटनी असली का जेवाचा भल्ला मस्त **वव्हा** येते.'

वव्हातान स्त्री. ओढाताण, खेचाखेची. 'नापिकीच्यानं लय **वव्हातान** झाली.'

वंकार (न.) ओंकार. 'छातीतून हवा काळून **वंकार** म्हना लागते.'

वंगन (न.) बैलगाडीच्या चाकात घालावयाचे तेल. 'चाक कुरकुरते ताहा **वंगन** घालनं पळते.'

वंगय (वि.) ओंगळ, मळलेले. 'ते अशीच रायते सदानकदा **वंगयल्यावानाची**.'

वंगयलं (वि.) मळलेला. 'डबरातल्या **वंगयल्या** पान्यानं कपळे भरले सायाचे.'

वंगारी (स्त्री.) वंगण काढण्याची काडी. 'नळ्यातली वंगारी एकदा **वंगणात** चांगली घोळसून घेतली.' -त.३८.

वंज (न.) मजुरीचा धान्यरूपातील वाटा. 'खुडाले जाऊ पन **वंज** कोनाच्या पाटीनं देते तो?' -धग.४०.

वंजारा (पु.) धान्याचे व्यापारी, लमाण. 'अबे तं चिवत्या **वंजारी** न्यारे अन् बंजारी लोकं न्यारे रातेत ना.'

वंजारी (पु.) वणिज, व्यापार करणारे. 'प्रसरामा इसान्ये वडा समीप **वनींजारयाची** पेठः तेथ **वनींजार** उभेमार्गि उतरेतिः' -गोवि.१६०.

वंजूळ (स्त्री.) ओंजळ. '**वंजूळभर** जेवारी तरी देनं. दुकानातून च्यागुळ आणतो.' -रा.१३.

वंड (स्त्री.) एक भाजी. 'रोजरोज **वंडाची** भाजी काय करून रायली वऽऽ?'

वंदा(धा) (पु.) गुफणी, विशिष्ट प्रकारचे विणणे. 'बैलाईच्या येसना तं कितीक ढिल्ल्या हाय, **वंद्यातून** आडसून घे.' -दि.११.

वाई (स्त्री.) वाही, कोळपणी. 'तिया नांगरीजतिः **वाहीजतिः** दुणीजतिः' -ली.४७२. 'सरता उनार **वाई** तन पावसात वाढे.' -भीक.४९.

वाई (न.) कच्छपी. 'आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं। साधनाचा **वांही** पडों नयें॥' -तुका.१८२०.२. 'काय भलकोन्या मानसाच्या **वाई** लागता हो.' -ना.१३१.

वाईल (क्रि.रूप.) अर्पण करीन. 'मग माझी माता गोसावीयाचेया श्रीचरणा तुळसी **वाइलः** तीचे वर्त सुफळ होईलः' -ली.७७.

वाऊक (न.) वाळूक. 'एकीदोणा कोवळीकोवळी **वाळुकेः**' -ली.३९. 'दोनि **वाळुके** हाती होतीः दोन्ही वाळुके गोसावीचा श्रीकरी ओळगविलीः' -ली.८४. 'वैजोबाए पुरी आपुलीए सेतीची **वाळुके** तोडिलीः' -ली.४९९. 'वाऊक का **वाळूक** कुणा म्हणुनि चिरुनी दाऊ कसे या मनी?' -भीक.४१.

वाक(ख) (पु.) अंबाडी, बोरूपासून काढलेला ताग. 'डिवरेने कोण्या झाडाच्या फांदीचा **वाक** काढला. करकचून ओझं बांधलं.' -फीर.२३६. २. बाक, वळण. 'या काळीले **वाक** आये, दुसरी आन सरकीसुदी.'

वाकनं (क्रि.) वाकणे, तिरपे होणे. 'इळा लाउ बैसलाः तंव

इळा **वांकला**ः ऐसा नीधावलाः' -ली.४७७. 'कुऱ्हाडी पालवीया फेडू बैसला तवं कुऱ्हाडि **वांकली**ः' -गोवि.४७७.

वाकनार (क्रि.रूप.) लवणार. 'मोडून जाईन नाही **वाकनार** काया' -ऊ.६९.

वाकय(ळ) (स्त्री.) जुन्या कपड्यापासून तयार केलेली गोधडी. 'नव्हती ते संत धरितां भोंपळा। करितां **वाकळा** प्रावरण॥' -तुका.२२९५.२. 'घेऊनिया गेले जनीची **वाकळ**।' -जनाबाई. 'गाद्यागिरद्यांचा चोचला घाम काढणारा. **वाकळगोधडी** परवडली.' -डेबू.४५. 'बायकोच्या **वाकळीच्या** मेहतान्यावर त्याचं निभलं.' -काळी.२५.

वाकस (न.) वासला. 'कुऱ्हाड, **वाकस**, करवत किकरे, पातळी इत्यादी अवजारे आणून कामठ्यावर ठेवली.' -सेल.१४४.

वाकसनी (स्त्री.) वाकाची भांडे घासणी, नारळाच्या केसांची घासणी. 'खरकटे भांडे **वाकसनीची** वाट पाहात होते.' -ना.१२. 'पारावर नारळांचा काथ्या सोलला. **वाकसण्यांचा** ढीग तयार झाला.' -काळी.५२.

वाकसाल (क्रि.रूप.) वाकाल. 'पायजा, नाई तं मोठा मानूस म्हनून **वाकसाल** त्याच्या मवरे.'

वाकी (स्त्री.) वाकी अलंकार, स्त्रीच्या दंडातील आभूषण. 'बाइसा करवी **वांकिये** वस्त्र घेवविले होतेः' -ली.१६७. 'गोसावी श्रीप्रभुलागि बाइसां करवि **वांकिये** वस्त्र घेवाविले होतेः' -ली.१६७. 'मग श्रीचरणी **वाकिं** वोळगवीतिः ते **वांकि** वाजेः' -गोवि.२५८. 'हातात चांदीच्या पाटल्या, दंडात **वाक्या**, कानात झुंबरासारखे चांदीचे झुमके.' -झेल.२०. (का.ओंकि)

वाकीफ (वि.) जाणून, ज्ञात. 'मी साऱ्या गोठीपासून **वाकीफ** आवो, असं म्हनून नाई चालत.' (अर.)

वाकुयली (स्त्री.) वाकुली, वेंगाडण्याची रीत. 'मा वं ते शकुनी कानी तं मले **वाकुयल्या** दाखोते.'

वाकुली (स्त्री.) चीड येईल असे हावभाव. 'दावी **वाकुलिया**। देउनिया मिठी॥' -तुका.१४८. '**वाकुली** दाखोसीन तं झोळपीन तुले आता.'

वाकेल (वि.) वाकलेले. '**वाकेल** बासा नको देऊ. कवलाचा ढाय निंगत नाई.'

वाकोनं (क्रि.) वाकविणे. 'ते डांग **वाकोनं** खाली, मंग हात पुरते चिचाईले.'

वाकोली (स्त्री.) चीड येईल असे हावभाव. 'वान्नेरावानी इऽऽ करून मले **वाकोली** दाखून रायलं ना तुमचं पोरगं, मी मारीन बरं.'

वाक्ती (अ.) वेळी. 'बी सरत आलं त्याच **वाक्ती** सांगाव ना? धुऱ्याजोळ उभी करता आली अस्ती तिफन.'

वाखपट्टा (पु.) वाखाची दोरी. 'बसव्याच्या नाकात पळसाच्या झाडाच्या मुळाचा **वाकपट्टा** घातला. हीच आताची आपली येसन.' -वा.४२.

वाखा (पु.) हाल, नाश. 'शरणागता देव राखे। येरा **वाखे** विघ्नाचे॥' -तुका.३९९९.२. 'देविदासचे पुढे मंग सुरू झाले **वाखे/** कराले ने तं कोनी पडाले लागले फाके.' -मिए.१६५. (फा.)

वागत (वि.) मासिक पाळीमुळे स्त्रीचे कशालाही स्पर्श न करणे. 'मले नाही घागरी आणायच्या. माहा हात **वागत** नाही. तूच आण अन् तूच रिचव.' -पख.२०.

वागदोर (पु.) वाकाचे दोर. '**वागदोरापक्षे** तागाचा दोर मजबूत रायते.'

वागवनं (क्रि.) सांभाळणे. 'खेळ्यात असलं का लेकराले **वागवनं** पळत नाई कोनीबी भाईर नेते.'

वागायलो (क्रि.रूप.) वागून राहिलो. 'नळयोजनेची बातमी ऐकल्यापासून आपण कसे भ्रमिष्टासारखे **वागायलो**?' -पख.९.

वागूर (न.) फासणारे जाळे. 'तो आवघेयाते (पारधीची) बुधि सीकवीः ऐसी **वागुर** चीरिजेः ऐसी मांडिजे अळीः' -ली.४४. 'तेथ नातुडे तो **वागुरे**। वारा जैसा॥' -ज्ञा.१८.९५६.

वागोत (क्रि.रूप.) सांभाळत असत. 'लेकरं मायबापाले **वागोत**. आता कोनी कोनाले नाई पुसत राजा.'

वागोते (क्रि.रूप.) वागविते. सांभाळत आहे. 'सून चांगली **वागोते** वऽऽ कस्तुरी तुले?'

वागोनं (क्रि.) सांभाळणे. 'मायबाप बुढे झाल्यावर काय भीक मांगतील आपल्यालेच **वागोनं** पळते ना तेईले.'

वागोयाले (क्रि.रूप.) सांभाळायला. 'आमाले **वागोयाले** तू काहाले तुई नवकरी सोळून येतं आमी रायतो गावातच.'

वागोयेल (वि.) पाळलेले, सांभाळलेले. 'झिपरं कुत्रं नको घेऊ रे नांग्याफांग्या. म्या **वागोयेल** हाय ना ते.'

वागोलं (क्रि.रूप.) वागविले, सांभाळले. 'दुसऱ्याचं लेकरू कितीबी उरापोटावर घेऊनसन्या **वागोलं** तं काय आपलं होते?'

वागोवा (क्रि.रूप.) सांभाळावे. 'तितलं लेकरू **वागोवा** लागते तेई जीवावर येते. बरं झालं धंदा तं कराच नाई लागत.' -लेक.४६.

वाघ (पु.) १. रानटी प्राणी. '**वाघाले** पुरं गाव भे, वाघाचे बायको **वाघाच्या** आंगावर खे.' २. विशिष्ट गाठ. 'कळब्याचा भर चांगला कस्याले **वाघ** पाळून दोर ओळा लागते.'

वाघनखं (पु.) १. वाघाचे नख. 'शिवाजीनं **वाघनखं** खुपूसनच शत्रूले मारलं.' २. **वाघ नखाच्या** आकाराचे एक जंगली वनस्पतीचे बोंड. 'वावरात गेल्तो तं धोतराले **वाघनखं** चिकटले लेकाचे.'

वाघबकरी (पु.) लहान मुलांचा एक खेळ. 'पारावर कोयस्यानं घट आखो अन् **वाघबकरी** खेओ आमी.'

वाघरू (न.) वाघाचे लहान पिलू. 'अंधारात **वाघरू** वाटलतं ते तळस निंगलं लेकाचं.'

वाघाटे (न.अने.) भाजी करतात ते जंगली फळ, झाड. 'अखाळी एकादस इठ्ठुलानं केली रुक्मीनी **वाघोट्याले** गेली.' -लोक.२१६. '**वाघाटे** तोडायच्या मिषानं मालायला घेऊन शेंबालूच्या झुडूपाआत तिचा नवरा गेला.' -झेल.३३.

वाघाळं (न.) वाघाचे रंगाचे. 'त्या **वाघाळ्या** कुत्र्याचं भल्लं भेव लागते लेका.'

वाघीनशा - ? 'बाहेरून पाहणाराला हा **वाघीनशाचाच** कार्यक्रम वाटला असता.' -निशा.२६९.

वाघूळ(र) (न.) सावज पकडण्याचे जाळे. 'हा विनाशाची **वागुर**। प्राणियासी॥' -ज्ञा.४.२०३. 'एकीकडे त्याणें चिरिल्या **वाघुरा**। ठेविलें श्वानपुत्रा एकीकडे॥' -तुका.६७४. 'पारधी **वाघुळा** लावून हरनं पकळतात.' -डेबू.५०.

वाघोळ (न.) जाळे. 'रानडुक्कर पळत आला व तो **वाघोळीत** अडकणार तर त्यानं बाजूला मुसंडी मारली.' -भं.४४.

वाचा (स्त्री.) जबान. 'सासरी येवळा तरसा सहन करता करता पोरीची **वाचाच** गेला राजा काई बोलतच नाई.'

वाचेल (वि.) बचावलेला. 'काल सकाऊन सरपावर पाय पळ्ळा थोळस्याकनं **वाचेल** हाव मी.'

वाचोनं (क्रि.) वाचविणे. 'मुक्या जनावराले खाटक्याच्या दाळीतून **वाचोनं** पळते राजा.'

वाचोयाले (क्रि.रूप.) वाचवायला. 'आजकाल लोकं **वाचोयाले** कमी अन् माऱ्यालेच जास्त टपनी हायत.'

वाचोयेल (वि.) वाचवलेले. 'लय सरपं **वाचोयेल** हायत आपून. शेपूट धरून जंगलात सोळतो.'

वाचोलं (क्रि.रूप.) वाचविले. 'आता मोठं नाकानं गोठी करते. म्याचं **वाचोलं** ना त्याले नदीत चाल्लं होतं वाहून.'

वाजवी (वि.) योग्य. '**वाजवी** भावात जती भेट्टे तथूनच वसद इकत घ्याले पुरते.' (फा.अर.)

वाजा (पु.) वाद्य, वाजंत्रे. 'कसा वाटेनं चालला डोलत हा गणराजा/ **वाजते** पैजणाचा मंजुळ पायी **वाजा**.' -लोक.९९.

वाजागाजा (पु.) प्रसिद्धी. 'भिमराव भाऊ तं उलच्या गोठीचा लयच **वाजागाजा** करतात.'

वाजीब (वि.) रास्त, योग्य. 'जास्त नफा ना घेता सय्यद **वाजीब** भावानं इकते माल.'

वाजून (क्रि.रूप.) मारून. 'सकाऊन पोट्टं भल्लं **वाजून** काहाळलं म्या.'

वाजे (क्रि.रूप.) वाजत असे. 'मंदिराचा खंटा रोज राती **वाजे**.'

वाजो (क्रि.रूप.) वाजव. 'तुहे ढोल तूच **वाजो** कोनाले नाई फुरसत.' -नांबै.

वाजोत (क्रि.रूप.) वाजवीत. 'मांग **वाजोत** वजीनं पोट्टे नाचत खुशीनं/ गेली माहेरची शीव कसं सासर अशीनं?' -नांबै.

वाजोनं (क्रि.) १. वाजविणे. 'ढोलं मांगाले वाजो म्हटलं तं त्याले **वाजोनं** पळतेच.' २. मारणे. 'गंजिपत्त्याच्या ढावापुळे लेकरू उभं दिसलं का त्याले **वाजोनं** पळतेच.'

वाजोयाले (क्रि.रूप.) वाजवायला. 'आमी मांग हो का राजे हो डफळं **वाजोयाले**.'

वाजोलं (क्रि.रूप.) १. वाजविले. 'कोनं तोंड वाजोलं रे मंधात. चंपतनं जोऱ्यात डफळं **वाजोलं**.' २. मारले. 'डिग्यानं दिन्याले काळीनच **वाजोलं** साजरं.'

वाज्या (पु.) वाजंत्रे. 'लग्नाम्दी साजरा **वाज्या** आनजा बापा. असातसा नोका आनजा.'

वाट (स्त्री.) १. रस्ता. 'ना या **वाटा** जासि तरि चोरी नागवीजसिः का वाघे खाइजासिः' -ली.२१३. 'गोसावी रामदरेहुनि बीजे केलेः तव मार्गी **वाट** फांकलीः' -ली.३४२. 'तसेचि ते नीगालेः दोघासि **वाटे** भेटि जालीः' -ली.४१४. 'प्रथम ज्ञानेश्वरें काढियेली **वाट**।' -नाथ. 'सुखाचा संसार करोनी बारा **वाटे**।' -नाथ.१३०१. २. चाकाची लोखंडी धाव. '**वाट** तपोल्या बिगर नाही बसत चाकाले.' -वि. 'एका चाकाची त अशी **वाट** उतरली.' -डेबू.३०. (का.) ३. प्रतिक्षा. 'ते लगीन सराई लाग्याची **वाट** पाऊ लागली.' -सित.८५.

वाट मोकई (स्त्री.) नवरी दुसऱ्याच्या घरी पाठवून आपल्या घरी घेऊन येणे.

वाटघाट (स्त्री.) पाट्यावर बारीक करणे. 'पावने येनार असल्यानं सकाऊनच **वाटघाट** केली.'

वाटजोळं (न.) बैलगाडीची वाट. 'दोन चाकाच्या **वाटजोळाले** भक्कम पैसा लागते.'

वाटनं (क्रि.) पाट्यावर बारीक करणे. 'डाळी भिजो घातलीः **वाटिलीः**' -ली.४११. 'मिर्च्या घे अन् **वाटनं** पाट्यावर.'

वाटनी (स्त्री.) विभागणी. 'तुका खळे दाणीं। करे बैसोनी **वांटणी**॥' -तुका.१३३५.

वाटप (न.) वाटण्याची क्रिया. 'कंटोलात तांदुळाचं **पाटप** चालू झालं कालपासून.'

वाटपट्टा (पु.) चाकाची लोखंडी धाव. '**वाटपट्टा** उतरल्यानं खात्याच्या जोळ न्या लागते लेक.'

वाट्याले (क्रि.रूप.) १. वाटायला. 'तुले चोरीचपाटीची लाज **वाट्याले** पायजे.' २. रगडायला. 'पाट्यावर संबार बारीक **वाट्याले** पायजे अस्ते.' ३. हिश्श्यावर. 'मोठ्याले सुपिक अन् माया **वाट्याले** बरळ असं काहून बॉ?'

वाटंलतं (क्रि.रूप.) वाटले होते. 'पण **वाटंलतं** लेकरं येवोस्तोर काय तरी जमवून ठू घरात.' -ऊन.१७५. 'बाईले बिगीनं येताईन **वाटलतं**. पन न्यारंच झालं हे.' -ऊन.६२.

वाटलं (क्रि.रूप.) वाटले. 'नाही रातचं तर नाही. उंद्या बोल **वाटलं** तं.' -रा.१२३. 'तुले वाटलं तं जाय ना **वाटलं** तं नको जाऊ.'

वाटवाट (स्त्री.) वाटून देण्याचा सपाटा. 'जवनीतले आंबे मामा गावभर **वाटवाट** वाटून दे.'

वाटवारा (पु.) वाटेचा वारा. 'आधीच कुंडामुळे गार **वाटवारा** तो परिसर गर्द झाडीमुळे अधिकच गारीगार होतो.' -सेल.१०३.

वाटवे (पु.) वाटे. 'हा आमच्या जवळून एकएक दाणा वसूल करते अन तुह्यासारख्या संगं **वाटवे** मोजते.' -पख.७२.

वाटा (पु.) १. हिस्सा. 'मग आवघेया **वांटे** केलेः मां गोसावीयासंचा ताटी अर्धा वाटा ओळगविलाः' -ली.५७१. 'ऐसी तयाचेया **वाट्याची** आरोगणा करीतिः आपुलेया **वाट्याचा** प्रसादु करीतिः' -गोवि.५. २. द्यावयाचे पुंज. 'कांदे, आलू, अद्रक, उसाची पेरं यांचे **वाटे** बेपाऱ्यांनी मांडले.' -झेल.४६.

वाटावाट(टी) (स्त्री.) १. वाटण्याचे काम. 'मामा काय आंब्याची गावभर **वाटावाट** करतो.' -डेबू.६३. २. पाट्यावर ठेवून वाटण्याची क्रिया. 'मसाल्याची **वाटावाटी** केली.'

वाटी (स्त्री.) लहान कटोरी. 'देमाइसे आणि एकाइसे दोघी जेविलीयाः देमाइसे तेयाची **वाटी** धूआविया घेउनि नीगो बैसलीः' -ली.४३५. 'हे काइ वो जालेः मातेचि मारिलेः...मीया काइ याची **वाटी** चोरिली?' -गोवि.१३३. 'केले देऊ **वाटी** ताट/ काय मनातली गाठ नाही उकलत आट.' -लोक.७४. 'सासू, बायको गेली त्याहीले **वाटी** लावायले गेला असन हा.' -सेल.१६. (का.वटलु)

वाटीवडगन (न.) वाटी आणि वटगण. 'काय कारभार आय मावलीचा वक्तावर **वाटी वडगन** तं सापळत नाई.'

वाटुळखुरी (वि.) वाटोळे करणारी. 'घराचा सत्यानास केला, असी **वाटुळखुरी** सून भेटली पाय.'

वाटू (क्रि.रूप.) १. भावणे, वाटणे. 'लगन सराईचा हंगाम म्हणजे बरकतीचा काळ **वाटू** लागला.' -सि.१०८. २. रडगडणे. 'कुंता पाट्यावरतं मिर्च्या **वाटू** लागली.' ३. वाटणे, देणे. 'आजी दोघाले सारखे भांडे **वाटू** लागली.'

वाटेल (क्रि.रूप.) वाटलेले. 'संध्याकाई म्याच तं संबार **वाटेल** होता.'

वाटोई (स्त्री.) वाटोळी. 'ताट, वाटी कसी **वाटोई** साजरी दिसते. चिपेलचापेल ना पायजे.'

वाटोया (पु.) वाटोळी. 'आवळा पाय कसा मस्त **वाटोया** आये.' (त.वट्टम)

वाटोळखोरी (वि.) नाश, वाईट करणारी. 'सून पाहान तं साजरी पायजा, **वाटोळखोरी** नका आनजा.'

वाट्टे (क्रि.) वाटते. 'मनाले तं गू खावं **वाट्टे** मंग मानूस खाते थोळीच.'

वाडगं (न.) गोठा, कुटारासाठीचा चौक, गुरांसाठी केलेला कुंपण वजा गोठा. 'तो त्याच्या कोठ्यात कुटाराच्या **वाडग्यात** लपला होता.' -पख.८९. 'कास्तकार कास्तकार शेन भरलेली पाटी/ झाला जिवाचा उकंडा नाई **वाडग्याले** काटी' -नोका.

वाडबैल (पु.अने) मातीचे बैल. 'सण पोळ्याचे दिवशी मातीचे **वाडबैल** बांध कागदी वाशिंग गुंफ बनातीचे चौर.' -लोक.२४.

वाडा (पु.) १. मोठी इमारत. '**वाडा** म्हटला की त्यातून तालेवारपणा दिसून येतो. जमीन जुमला, पैसाअडका, रुबाब, इज्जत ह्या सगळ्या गोष्टी **वाड्यामांग** येतात.' -वा.३३. २. गायवाडा. 'मग गोसावी **वाडा** गाइ घातलीयाः मग गोसावीयासि ओटेया वरि आसन जालेः' -ली.६०. (का.वाडे)

वाढ (पु.) वाढावयाचे पदार्थ. 'मांगाच्या पंगती अलग महारांच्या अलग मांगांचे वाढे अलग, महरांचे **वाढे** अलग.' -वा.७७.

वाढन (न.) वाढून आणलेले अन्न. 'पाहीजो जीः ऐसे काई **वाढणे** होई? म्हणौनि थाळाचे उचलौनि दाखवीलाः' -ली.३२७. 'आता हिंगं हे घरपोच **वाढण** आलं घे मनाव आता आदान्या.' -पाटी. (का.)

वाढनी (स्त्री.) वृद्धी, वाढीव. 'सहदेवची परत दैना सुरू झाली आणि भागीची तडफड **वाढणी** लागली.'

वाढप (पु.) वाढणे. 'पहिलं वाढप संपत आल्यावर कौतिकनं भाकर **वाढायला** आणली?' -धग.२५.

वाढपे (पु.अने.) वाढ करणारे. '**वाढपे** जेऊन उठले. नंतर मांग बसले.' -रा.१८.

वाढवा (पु.) आहे त्यात वाढ करणे. 'लोक **वाढवा** करणं तर

दूरच राहिलं, सध्याचं बलुतंही देत नव्हते.' -पख.३७.

वाढी(ळी) (पु.) सुतार. 'म्हणौनि **वाढै** बोलाउनि तेयाची खीळी खांडविलीः' -ली.५७. '**वाढ्याचा** वासला अन् चोराचे हातपाय.' -भं.३६.

वाढे (क्रि.रूप.) वाढ होत राहणे. 'पऱ्हाटीचा शेंडा रोज कांढभर **वाढे**.'

वाढोळ (पु.) वेळ. 'किती **वाढोळचा** उभा होतो इरीच्या वाटीनं.'

वाणी (पु.) १. एक पावसाळी कृमी. 'रस्त्यानं धक्का लागून, पैसा हून निचीत होऊन **वाण्यासारखी** आमची मनं मुकी झाली होती.' -सुखो.५३. २. एक जात.

वाणीतिणी (वि.) ओढाताण. 'बायको पंदरा दिवस इकडी पंदरा दिवस माहेरी सगळा **वाणीतिणीचा** संसार सुरू आहे.' -खुं.१५१.

वात (पु.) एक व्याधी. 'टोंगळे सुजले, कशानं? वांबळीचं **वातानं** व्हत आसन.' -सेल.१९.

वात (स्त्री.) बत्ती. 'दिव्याची वात जयली तं तुयामायाले कराले लावनं **वाता**.' (सं.वर्ति)

वातडलेले (वि.) कृश, हडकुळे. 'गळण धावून **वाताडलेले** बैल जाते खाटक घेऊन.' -गाक.४७.

वातरनं (क्रि.) वायफळ बोलणे. 'किती खेप मार खाल्ला पन सायबूचं **वातरनं** काई गेलं नाई.'

वातरवातर (क्रिवि.) अवास्तव बडबडणे. 'गुलब्या-पुंज्या चला घरी इकडंतिकडं **वातरवातर** करू नका.' -खुं.४७.

वातरेल (वि.) अकारण, जास्तीचे, सतत बोलणारा. 'जानरववानी **वातरेल** मानूस नाई पायला आपून. मार खाचीच पायी आनते भळवा.'

वातल्डं (वि.) हडकुळा ह्या अर्थी एक शिवी. 'पानी नेऊ नको म्हन्लं तं रागारागानं टमरेल फेकलं **वातल्ड्यानं**.' -त.१६.

वातळली (वि.) चिवट. '**वातळली** पोयी मले होये नाही खाऊन.' -मिर्झा.१५४.

वातायला (स्त्री.) वाताने सुजलेला. 'नांगो **वातायला** भलकसा, धळ चालनई होत नाई त्याकून.'

वाद (पु.) शाब्दिक भांडण. 'तव गोसावीयांपासी कव्हणी एक भक्तिजने **वाद** करीत होतेः' -ली.२०८.

वादा (पु.) निश्चय, निर्धार. 'एकखेप **वादा** केला तं निभोला पायजे मान्सानं.'

वादावादी (स्त्री.) बोलचाल. 'सरकारी जागेसाठी **वादावादी** झाली.'

वादी(धी) (स्त्री.) १. चामड्याची दोरी, पट्टी. 'भूत वादीला भिते म्हणतात.' -गय.११. 'चांभाराचा धंदाही बसला. **वाध्या**, वारत्या ऐवजी नायलॉनची दोरी वापरतात लोक.' -पख.१०१. २. बारीक शेंग. 'या बैलांच्या मेहनतीवरच हिरवी पिकं उगवतात. फुलं झोंबतात, **वाद्या** झोंबतात.' -खुं.४४.

वान (पु.) वर्ण, रंग. 'मानसाले पोरीचा **वानच** दिस्ते ना राजा. मंग तेबी नाई पावाव काय?' 'ढवळ्याशेजी पोवळ्या बांधला, **वान** नाई पन गून लागला.'

वान (न.) पेरण्याचे बी, जात, प्रकार. 'पयले पऱ्हाटीचा एखांदाच वान राहे आता **वानावानाचे** बियाणे आले.'

वान (स्त्री.) नुपर, उणीव. 'चोराचपाट्यांना तर **वानच** नव्हती.' -पख.२३. 'देवा या जीवायले कोन्या गोठीची **वान** पळू नको दिऊ.' -सित.५९.

वान (न.) स्त्रियांचे ओटी भरणे. 'माथा बांधलाः खीरि रांधलीः **वाण** दीधलेः' -ली.९५.

वानगी (स्त्री.) मासला, नमुना. '**वानगी** दाखल मयातले शेंगाभेंडं घेऊन गेलो मास्तरले.'

वाननं (क्रि.) प्रशंसा करणे. 'वानोता वानोता वानगावाले नको जाऊ. हिनोन्यापक्षे कोनाले **वानोनं** पुरते.'

वानमारं (वि.) चेहरामोहरा नसलेले. 'शहर म्हनतात ते असंच असते का **वानमारं**. तिथल्या मान्साईनं मानुसकी काय इकली अस्ते.' -लेक.५६.

वानऱ्या (वि.) माकडासारखा. 'हा असा **वानऱ्या** पोरगा पसन केला का तुमी?'

वानी (पु.) १. व्यापारी जमात. 'सोळे दामी पाफळफोडणा **वाणीयापासी** गहाणु ठेविलाः' -ली.१७३. '**वाणी** भाऊ आली पाहुणीण जाऊ.' २. एक पावसाळी किडा. 'वाण्याच्या पैसा बनवून तो तळहातावर मिरवायचा. खिशात टाकायचा.' -गाआ.४०.

वानी (स्त्री.) ज्वारीचा प्रकार. 'ताव्यावर भाजून मस्त **वानीचा** हड्डा खाल्ला.'

वानी (अ.) प्रमाणे, सारखे. 'तुमी **मांघल्यावानी** आजूक एकदा मले पेटी भारून द्या.' -पाटी. 'माणूसकी जसा **बास्यावानी** फडकवते.' -मिए.५६.

वानीचिनी (वि.) नवसाचे, लाडाचे. 'आमाले **वानीचिनीचे** दोनच लेकरं हाय सोन्या सारके.' -फीर.१०५.

वानोनं (क्रि.) वानविणे, प्रशंसा करणे. 'दोघे जोगी आणि जोगीणि गोसावीयाते **वानितेवानिते** जातातिः' -ली.३८१. 'हे बहु असो एकैक। **वानिसी** काई॥' -ज्ञा.५.१४०. 'कां वांझेची संतती। **वानणें** जैशी॥' -ज्ञा.१५.८०. '**वानितील** थोरी वैकुंठिचीं परी। न पवे पंएरीची सरी रे।' -तुका.१९५.५.

वानोयेल (क्रि.रूप.) प्रशंसा केलेले. 'तुमची तं बापा सून भल्ली **वानोयेल** होती. आता तुमीच पाहा तिचे ढंगरे.'

वानोलं (क्रि.रूप.) प्रशंसा, तारीफ केली. 'असं साजरं सनक भेटलं म्हनून अवघ्याईनं **वानोलं** पोरीले.'

वानोळा (पु.) नमुना, मासला. 'मयातला **वानोळा** घेऊन आलो बाबूच्या खोलीवर.'

वान्ती (स्त्री.) ओकारी. 'खाल्लेलं अन्न मले नाही पचे/ **वान्ती** व्हाची जीव मचमचे.' -मिर्झा.११२.

वान्नेर (न.) माकड. 'पोरं **वान्नेरागत** डांगोडांगी बसली.' -डेबू.३.

वान्नेरतोंडाचा(ची) (वि.) एक शिवी. 'ये **वान्नेरतोंडाचे** काऊन खावखाव करत हाय वं? कंधी न भेटल्यावानी का करतं?' -दि.७९.

वान्नेरी (स्त्री.) माकड मादी. '**वानरी** असेः ते ऐल खांदीवरुनि पैल खांदीए जाएः' -दृ.५५.२९. 'तुका म्हणे धरी। बाळ टाकीले **वानरी**॥' -तुका.३९८३. 'एका झाडावरून दिसेल त्या झाडाकडे रखवाली पाठी लागताच **वान्नेरी** छलांग मारतात.' -काळी.३९.

वापरले (क्रि.रूप.) वागले, वावरले. 'खाजगी उपाय केले ज्यानं जे टापरले जसं सांगतलं तसे **वापरले**.' -मिर्झा.११५.

वापर (पु.) १. उपयोग. 'लोकं आपला **वापर** करतात तं आपल्याले माईतबी होत नाई.' २. राहण्याची पद्धत. 'काय सुनीचा **वापर** हाय लेक येकदम चकचाक.'

वापरेल (क्रि.रूप.) उपयोग केलेले. 'असे कपळे तं म्या कैकदा **वापरेल** आयेत.'

वापऱ्याले (क्रि.रूप.) वापरायला. 'काचेचे भांडे जपून, वजीनं **वापऱ्याले** पायजत.'

वापशा (पु.) उन्हामुळे जमिनीची वाफ निघेल असा ऋतू. 'जीव झाला **वापस्या** तरी खिजोते वारा/ ढगा देवाच्या दुता अशा बरसू दे धारा.' -नोका. 'कच्चा पापड टाकला तर सहज भाजून निघेल असे ते **वापशाचे** ऊन तापले होते.' -कात.५४२. '**वापस्याचा** महिना असल्यामुळे दिवसभर ऊन चटकत होतं.' -ना.१००.

वापशी(स/सी) (क्रिवि.) परत. 'पोरगी दोन रोज रायली सासरी अन् **वापशी** आली तं पाठोलीच नाई.' 'तुह्या कुकात लय ताकद होती म्हून आलो **वापस** लढाई करून.' -कावू. (फा.)

वापीस (क्रिवि.) परत. 'कबज्या करेल चवक्या भायतीय सैनिकाईनं **वापिस** घेतल्या.' -सित.३९. 'गावा जाचं होतं पन मंधातूनच वापीस आलो.'

वापून (क्रि.रूप.) निघून, उगवून. 'सरत्यानं भरभर पेरली का सरकी तिसऱ्या रोजी टराटरा **वापून** आलीच हो.' -जटा.३४.

वाफ (स्त्री.) रबीच्या पेरणी नंतरचे गोडधोड जेवण. 'आमची **वाप** धाइलः मा तुम्हासि वस्त्र घेउनिः मग बोळवीत घालुनिः' -ली.२१७. '**वाफ** निंघाली तेथून, शिंग डफळे लावून **वाफ** निंघाली.' -लोक.

वाफसा (पु.) जमिनीतून वाफ निघेल असा उष्णकाळ. 'वरी अवधानाचा **वाफसा**। लाभला सोनया ऐसा। म्हणोनि पेरावया धिंवसा। निवृत्तींसी॥' -ज्ञा.६.४९१.

वाफा (पु.) पाणी देण्यासाठी केलेले आळे. 'मोहरी कांदा ऊस। एक **वाफा** भिन्न रस॥' -तुका.१८७४.

वाफारा (पु.) वाफेचा लोट. 'त्याच्या डोयाले बसला **वाफारा**, त्याचे डोये आंधये झाले.' -लोक.३७. 'गुदस्ता चांगलं जमलं होतं पण आमदा सारा **वाफाराच** हाती लागलेला.' -पोळा.१६.

वाफोनं (क्रि.) वाफेवर ठेवून शिजविणे, पक्व करणे. 'पिठाचे गोल, खोलगट फये करून **वाफोनं** पळतात.'

वायकं (न.अने.) वाळूक. 'जवारीतले **वायकं** तोळून आन भाकरीसंगं खायाले.'

वायकारनी (क्रिवि.) विनाकारण. 'मी जातो मजुरीले, तू **वायकारनी** जीवाले घोर लाऊन घीऊ नोको.' -सित.४६. 'काहाले माया जीवाचा धोंगया करता **वायकरनी** - दुखावली मामी बोल्ली.' -सित.७०.

वायगोया(ळा) (पु.) भीती, धास्ती. 'शाळा सोळून पोरगं आल्यानं मायबापाच्या पोटात झानू **वायगोया** उठला.' -सित.१६.

वायचोदं (वि.) वात्रट, विक्षिप्त. 'कसं **वायचोदं** पोरगं हाय. ढासंभर कुटार पेटून देलं लेकानं.'

वायटुळी (स्त्री.) वावटळ. '**वायटुळीत** उडालेले पान आल्हादी तरंगत आभाळात फिरावं तसं सुमनचं झालं.' -पख.५४.

वायढंग्या (वि.) ढंग, रीत, चाल नसलेला. 'त्या सिरीरंग्याले, **वायढंग्याले** म्हादेवाची निस्टूक कायजी नाई.' -सित.११६.

वायतं (वि.) धार असलेले, धारदार. 'इव्याचं पातं **वायतं** असलं का भरभर सोंगता येते.'

वायती (स्त्री.) वखर, नागर इत्यादी ओढण्या, वाहण्याची क्रिया. 'हा पांढरा गोरा **वायतीले** चांगला होईन पन हा कबरा फार वांढाय दिसते.' -काळी.१४.

वायते (क्रि.रूप.) वाहते. 'नदी उनायातबी खळखळ **वायते**.'

वायतोनी (वि.) पाणी वाहून जाईल येवढा पाऊस. 'राती मस्त **वायतोनी** पानी पळ्ळं. त्यानं वावरातला गाय वाहून गेला.'

वायदन (न.) वेगाने वाहणारे हवापाणी, वादळ. 'आणि वारा सुटलाः ते थोर **वावधण** सुटलेः' -ली.३/१४.

वायदनी (स्त्री.) वादळ आणि पावसाचा संयोग. '**वाउधाणाचिया** परी। जो आश्रो केहीचि न धरी॥' -ज्ञा.१३.६८. 'पानी पळ्ळं खरं पन **वायदनी** पळ्ळं. त्यात झाळंबी मुळून पळ्ळे.'

वायदा (पु.) १. शेतसारा. 'सरकारी **वायद्याचे** हजार रुपये नादापायी खर्चून टाकले.' -कात.५२९. 'पांडेबॉनं इचारलं, वावराचा **वायदा** भरत ना काय पमाबाई?' -सित.७६. २. कबुली, ठराव, निर्धार. 'हटे त्याची नाक कटे असा तुहा **वायदा'** -ऊ.३५. 'पोयालोक रक्कम द्याचा **वायदा** करून आलो मी.' (अर.)

वायधळी (स्त्री.) एका पारड्यात वजनी माप, दुसऱ्या भांड्याचे वजन करून त्यात घालून दोन्ही पारडी समतोल करणे. 'मोठ्या कॅटलीची **वायधळी** करून मंग तेल टाकून माप केलं.'

वायनं (क्रि.) वाहणे. 'बडुवाः वोटा उदके सींपीलाः तुळसी **वाइलीः**' -ली.४५. 'पै प्रतिवर्षी क्षेत्र पेरिजे। पीके तरी वाहो नुबगिजे॥' -ज्ञा.१०.५५. 'मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार। पृथिवीचा भार **वाहावया**॥' -तुका.३०१८.१. 'काय जाहले न वाहता भुई पेरिजे। तरी तो वेळु विलया जाईजे॥' 'उनायाभर त्या बैलाले सुतासुतानं **वायलं** म्या.' -सित.१३३. 'सपाटून पानी पळ्ळं तं नदी भरून **वायनं** आयेच.'

वायना (स्त्री.) वाहना, चप्पल. 'गोसावीया कारणे पाइ चींधीया बांधलीयाः **वाहाणा** वर्जिलीयाः माथाचे न्हाण वर्जिले तेलः तुपः दहीः दुध वर्जीलेः' -ली.३८३. 'जो नीगे तो डांग घेः कांबळी घेः मोट घेः मोहरि पावा घेः **वाहाणा** घेः' 'ऐसे भट पटिसाळेवरि आलेः तव बाहीरि **वाहणा** देखिलीयाः' -ली.१३८. 'मज पामरा हें काय थोरपण। पायींची **वाहण** पायीं बरी॥' -तुका.२३२३. 'घमील डोक्स्यावर घिऊन घरी आली. **वायना** काढल्या.' -लेक.४०.

वायफूल (न.) एकदम सुरवातीला लागणारे फूल. या फुलापासून पिकाची वाढ होते. 'सोयाबीन **वायफुलावर** आलं. आता होते टोंगयाटोंगया.'

वायरी (स्त्री.) १. सून. 'सुभान्याची **वायरी** त्याले मामाजी मामाजी करत जाय अन् हा सासरा अजूनबी भांडते. २. पत्नी. 'भागे लगन करून दे पोराचं, त्याची **वायरी** निदान घरातला धंदा त अटपत जाईन तितलाच तुले आसरा व्हईन.'

वायलं (वि.) १. वाळलेले. 'दोन दिवसानं सोयाबीन **वायलं** का काळा लागते मशीन सांगून.' २. अशक्त. 'हे **वायलं** कसं काय एवढं खोळ उचलीन बापा.' ३. वेगळे.

वायल (वि.) कापडाचा प्रकार. 'श्रीपतीच्या कमरेला पांढऱ्या **वायलच्या** कोऱ्या कापडाची लंगोटी होती.' -एक.

वायला (पु.) वेगळा, अलग. '**वायला** निंघल्यापासून त्याची बोटभर चिंधी तरी पाह्यली का म्या?' -ऊन.१८०.

वायला (क्रि.रूप.) सुकला, वाळला. 'आंगरखा धुऊन वाऊ घातला पन **वायला** नाई आजून.'

वायवाय (स्त्री.) हाल, दुर्दैशा. 'जीवाची अशी **वायवाय** काहून करून घेता.' -भं.६६.

वायशी (वि.) वाह्यात, वाया गेलेली. 'जे होते गावात खरोखरच **वायशी/** त्याहीनं सुरू केली घोयसमघोयसी.' -मिर्झा.१०५. 'याहीच्यासाठी भांडून आपून होतो **वायशी/** संसाराची आपल्या होते ऐशीच्या तैशी.' -मिए.१३५.

वायसं (वि.) वात्रट. 'एखांदं **वायसं** पोट्टं सगळ्याईच्या नाकीनऊ आनते.'

वायसी (स्त्री.) फजिती, हसे. 'अथी बुढी नाराज, तथी ईन नाराज भलं हुवाव तं पुरी **वायसी** झाली व्हती.' -लेक.३४.

वाया (क्रिवि.) व्यर्थ जाणे. 'जीः जीः माते द्रव्य अपार असेः परि **वाया** जात असेः ते भोगी ऐसा पुरुखू नाही जीः' -ली.९७. 'धालिया दिव्यान्न सुवावें। मग जें **वायां** धाडावें॥' -ज्ञा.१८.१४९३. 'देखें शवाचां हातीं दिधलें। जैसें कां रत्न **वायां** गेलें।' -ज्ञा.३.१९७. 'म्हणोनि जन्म वायां गेले होते।' -नाथ. '**वांया** एक क्षण जाऊं न द्या।' -नाथ.१९०३. 'अवघा ताव **वाया** गेला सायाचा.' -डेबू.१२. (अर.झाया)

वाया (पु.) एक गवती प्रकार. 'घळ्ळीत टाक्याले **वाया** इकत आनला. आता पान्याले मस्त वासई येते.'

वायान (न.) वाळणे, सुकण्याची स्थिती. 'जिमिनीले कट्टे फुटल्याच्यानं **वायान** याचं नायी.' -जटा.३५.

वायेल (वि.) वाळलेले. 'वायेल गवत ढोर नाई खात. मस्त हिरवा चारा पायजे.' 'इंधनासाठी **वायेल** लाकळंच पायजात.'

वायेल (क्रि.रूप.) वाहिलेले. 'म्या तं वखरई **वायेल** आये.' 'गनपतीले हराय **वायेल** हाय.'

वार (वि.) कापड मोजण्याचे माप. 'गोरगरिबाले **वार** दोन **वार** कपडा द्या. अस्तेर पावशेर चावल द्या.' -अखे.

वार (पु.) १. आघात. 'कुऱ्हाडीचा **वार** भावावर केला.' (फा.) २. दिवस. 'का जीए दीसीवार नाही तीए दीसी एतिः तया सात **वार** एतिः' -ली.२००. 'गेले वारी तुम्ही आणिली साकर।' -तुका.३६.

वारं (न.) वारे. 'बहुत कायि बोलिजे। व्योम **वारेनि** न वचिजे।' -ज्ञा.१४.३४१/४७.

वारंउधान (न.) मोठे वादळ. 'बाबू, **वारंउधान** सुट्याआंदी घराक्ळे वापस येजो.'

वारखोळ (पु.) वाढवेळ, वेळ. 'बाबाः वाडुवेळु पांडा उदकाआंतु बैसला असेः तरि आता बोलाविलो नाः' -ली.१०२. 'उशिर काहून तुमी आले इतक्या **वारखोळान/** वाट पायतापायता डोये गेले व थकून.' -चंच. 'किती **वारखोळचं** झामझाम करून राह्यलो आपून, फतरं हाती लागत नाही.' -डेबू.३५.

वारगट (न.) वारे, वादळ. 'उनाचा तडाखा लय भयानक पुन्ना **वारगटबी** सुटते.' -त.१५८.

वारचं (वि.) बदल्यात. 'तू गोवींदाची दंडवते इछितासिः तरि तेयाचीया **वारीया** मी घालीतसेः' -ली.६६. 'माझिया **वारचे** काही जडभारी। तुजविण वारी कोण एक॥' -तुका.१२४१. 'निंदान **गाईवारचे** पैसे तरी देयाचे आसते.' -रा.२०८.

वारती (स्त्री.) चामड्याची दोरी. 'कव्हणी एकि **वर्तेवरि** चालेः ते डावेयाकडे न पाहेः उजवीया कडे न पाहेः' 'अगा स्वर्गाची उर्वशी। ऐकोनि जे माणुसी। **वारत्या** लावीजती आकाशी। आंगाचिया॥' -ज्ञा.१८.४८२. 'आता वाध्या **वारत्या** ऐवजी नायलॉनची दोरी वापरू लागले.' -पख.१०१.

वारदात (स्त्री.) घटित. 'रायखेळच्या मारामारीची **वारदात** समजली का तुमाले?'

वारनं (क्रि.) १. बाजूला करणे. २. मरणे. 'आबाजी तं आताच **वारले**. सराद झालं मांगल्या सोमवारी.'

वारमाप (वि.) अमाप. '**वारमाप** पिकलं का शेतकऱ्याची टाक जमिनीले नाई टेकत.'

वारलं (क्रि.रूप.) संपले, थांबले. 'तव्वा माया बावानं वारं **वारल्या** वरतं पेंड्या झाडल्या.' -दि.७९. 'सागाच्या सर्व्या पानाची चायनी झाली. झाडं **वारल्यावानी** दिसत हाय.' -जटा.३६.

वारंवाईधन (न.) हवापाणी, वादळ. '**वारंवाईधन** सुटलं अन् गारगोंडबी पळूं राजा.'

वारंवायदन (न.) वादळ. 'उनायात भलकसं **वारंवायदन** सुटल्यानं कोठ्यावरचे टिनबी उळाले.'

वारसार (स्त्री.) निरवानिरव. 'आपलं घर होतं. तिथंच बुडा **वारसार** करून तिथंच झोपायचा.' -खुं.१७२.

वारसाळ - ? 'गावातली **वारसाळ** शयरात नेनं हा काई थट्ट्याबाजीचा खे नोता.' -सित.१३६.

वारांगनं (क्रि.) फटकून राहणे. 'काळवीट **वारांगल्या वारांगल्यासारखे** राह्यतात. माजावर आले की शिंग घासून कंड जिरवतात.' -खुं.६६.

वारानी (क्रिवि.) वारा लागेल अशा ठिकाणी. 'मग ते कवाडे न घलीतिः मग तीया नावेक **वाराणी** बैसतिः' -ली.१२३.

वारापानी (न.) वादळ, पाऊस. '**वारापानी** सुटल्याच्यानं हरबऱ्याच्या गंज्या झाकून ठुल्या.'

वारावार (न.) आवरणे, गुंडाळणे. 'परमार्थ साधायाचा तर संसाराची अंगे **वारावार** करून ठेवली पाहिजे.' -कात.२०.

वारासार (क्रिवि.) पांगापांग होणे, निघून जाणे. 'काही लोक तिला एकदाच बघून **वारासार** झाले.' -ए.३२. 'सबन बाया मंगन **वारासार** झाल्या.' -सित.११४.

वाराहुरा (वि.) व्याकूळ, उद्विग्न, उदास. 'गावातील काही उडत्या मैना गंगाराम गेल्यानं **वाराहुरा** झाल्या.' -काळी.८०. 'पोरीसोरीच **वाराहुरी** झाल्या नव्हत्या तर पोक्त बायांच्याही डोळ्यात पाणी तरारलं.' -झेल.११.

वारी (स्त्री.) फेरी. 'सारितसे **वारी**। संसाराची॥' -ज्ञा.१५.४२. 'पंढरीचा वारकरी। **वारी** चुको नेदी हरि॥' -तुका.४१७६.

वारीक (पु.) न्हावी. 'गोसावीयांचे क्षेउर जालेः साधे पाहो लागलीः जी जी **वारिके** केले ते पाहीजताए जी जीः' -ली.३३६. 'एकु दी गोसाविया श्रीचरणी काटा मोडला होताः ...**वारीकु** बोलावीलाः कांटा फेडीलाः' -गोवि.३३. 'म्हाइंभटी वारीकु वोलावीलाः तेणे बरवी नखे चोखी फेडीलेः' -गोवि.२९४. 'त्यायचाबी आपला **वारीकाचा** धंदा चालू हाय रिवाजापरमानं.' -सित.१३५.

वारीस (पु.) वारसदार. 'बुढा गचकला. त्याले **वारीसई** नाई कोनी.' (अर.)

वारू (न.) वारूळ. 'मुंग्या बिच्याऱ्या **वारू** करतात अन् सरप त्याच्यात येटोई करूनसन्या ठान मांडते.'

वाऱ्यावाऱ्या (वि.) दुःखद, खिन्नावस्था. 'लेकरू नसल्यानंच बायकोचा जीव **वाऱ्यावाऱ्या** करत आसन.' -सेल.१३१.

वाल (पु.) १. एक भाजी. 'पोळया केलीयाः **वालाचे** वरण रांधिलेः मदु काढीलाः' -गोवि.३१८. २. वजन करण्याचे माप. 'गुंजः **वाल**ः जडः तोळीः दुतोळीः मासाः ऐसा खेळु करीतिः' -गोवि.३०६. 'येथूनिया धना खाती बहु जन। **वाल** गुंज उणें जालें नाहीं॥' -तुका.४३५३.

वालं (वि.) वेगळे. 'सवसंज झाली ढोरावासराची वेळ/ बाया माह्या राजसा रस्त्याच्या **वाला** खेळ.' 'नातू खटल्यातून **वाला** झाला अन् आज्याच्या सपनाचा इचकाइंदाना झाला.' -सित.१२०.

वालं (अ.) शब्दाला जोडून येणारे एक अव्यय. 'साखरीच्या 'च्या'नं तल्लफच जात नाई माह्यावाली.' -गय. '**ढोरावाल्याले** अन् पोराबाळ्याले आईकनच पळते.' -फीर.१३८. '**वांजंत्रीवाल्याच्या** बाजूला दोन चाकाचं

झोपडीवजी लोटगाडं.' -सि.८३. '**मायावालं** पोरगं दिसलं का या आंग.'

वालंवालं (क्रिवि.) वेगळेवेगळे. 'भांडनाच्या मंथनात सारं घर घुसयलं, **वालंवालं** निंघायचं इसत्यात मिसयलं.' -धों.३४.

वालावाला (वि.) अलिप्त. 'भाद्रे शायने झाले सदा म्हनत फिरते/ सोता चिनकी टाकून **वालावाल** रायते.' -रूख.

वाली (पु.) सरक्षणकर्ता, मदतगार. 'ज्यानं शितली खुर्ची तो काई सोळत नाई/ खरं सांगतो भारताचा **वाली** खरा दिसत नाई.' -चंच. (अर.फा.)

वाली (अ.) एक शब्दयोगी अव्यय. माह्यावाली, **तुह्यावाली**, **त्याच्यावाली** अशा शब्दात येत.

वाव (वि.) दोन हातातील अंतराचे माप. 'ऐसा भटाचा गुंडा **वावा** दो आरुता पडेः **वावा** एका आरुता पडेः' -ली.२२६.

वावगं (क्रिवि.) १. वाईट. २. वेगळे. 'मी मंधातनी बोल्लो तं एवढं काय **वावगं** बोल्लो.'

वावटई (स्त्री.) वावटळ. 'तंव **वाहुटुळि** आलीः तो नाकी रजु रीगालाः ते सींक आलीः' -ली.६६. 'वारा वाजतु होताः तंव पैलाकडौनि **वाहाटुळि** भंवतभवंत एत होतीः' -ली.५८५. 'मग थावली ते **वाहटुळी**। सैंघ घेऊनि घरडहुळि॥' -ज्ञा.६.२१६. '**वावटई** वाहुटोळीचेनि बळे। पृथ्वी जैसीन ढळे॥' -ज्ञा.१३.४९१. 'पांजरली **वाहटुळी**। करी वेगळ वेंटाळी।' -ज्ञा.१४.२२८. 'चळला वायू **वाहटुळी**। चेष्टे तैसा॥' -ज्ञा.१८.६६६.

वावडं (वि.) पथ्य असलेले. 'बुवांना कोणत्याही गोष्टीचं **वावडं** नव्हतं. **वावडे** होते ते शारीरिक श्रम.' -काळी.८६. 'शेंगदाणे, वांगे तिनं **वावड्याचिवड्याची** लांबलचक यादीच सांगितली.' -झिं.५४.

वावडे (वि.) वांझ, कुचकामी. 'निरर्थक आपले मंतर झाले **वावडे** आता दुसरंच काही करा लागीन.' -एक.

वावद(ध)न (न.) वादळ. 'काहोके पातलेः आणि वारा सुटलाः ते थोर **वावधण** सुटलेः' -ली.१४. 'मग तमाचे तें दारुण। स्थिरावलेया वाउधाण। सत्त्वाची सुटे सत्राण। वाहुटळी॥' -ज्ञा.१५.१८३. 'केळी केळी वेदना अन् घाव तिथं **वावधना**.'

वावविचार (पु.) विचारविनिमय. 'घरात काही सोय आहे नाही याचा काही **वावविचार** नको का करायला?' -कात.१४५.

वावभर (वि.) दोन हातातील अंतराएवढे. 'हातात म्हशीला हाकलण्यासाठी **वावभर** लांबीचं चऱ्हाट.' -पख.१०.

वावर (न.) शेत. 'तुले एक आठ एकर वावर बटाईनं दियाले लावतो.' -फीर.१७२. 'गोत आलं खाऊन गेलं, **वावराले** खत झालं.'

वावरधनी (पु.) शेतमालक. 'पिकाशी जीवघेणी मस्करी करणारा वारा **वावरधन्यांना** भिववित होता.' -धग.४७.

वावळं (न.) पथ्य. 'परउपकार पुण्य त्या **वावडें**। विषाचें तें कीडें दुग्धीं मरे॥' -तुका.७५.४.

वावळी (स्त्री.) पतंग. '**वावडी** उडाली अंबरी। हाती धरुनिया दोरी।' -तुका.४२९४.

वावळींग (स्त्री.) एक भाजी, औषधी वनस्पती. '**वावळींगाचे** पान घेऊन जानं तुया घरी भाजी कऱ्याले.'

वावू (पु.) वाळू. 'माय तुहं गोतं नदीतली **वावू**/ माया बावाजीचं गोत चुलते मयावू.' -लोक.९४.

वाव्हटं (न.) घोड्याच्या शेपटीचे केस. 'तुमच्या घोड्याचे **वाव्हटं** काढाले गेलो त उलशेकच निंघाले.' -भं.१५.

वासकोट (पु.) चाट, गुंगारा, हानी करणे. 'पण पुंजा मात्र विचारणाराला **वासकोट** द्यायचा.' -पख.६७.

वासन (स्त्री.) शेतातील लांब वेल. 'दोर न्याचं भुल्लो तं **वासनचा** येट केला अन् भारा आनला.'

वासनं (क्रि.) फाकविणे. 'कितीकई खाल्लं कुंभकरनावानी तरमा तोंड **वासनं** चालूच रायते.'

वासना (स्त्री.) इच्छा, लालसा. 'वाहाडतं काय? माही त जेवनावर **वासनाई** नाई.' -धग.१०३.

वासपूस (स्त्री.) विचारपूस, क्षेमकुशल. 'कधि काळी का केली **वासपूस** येवोनी.' -भीक.२६.

वासम (न.) वाशीम. '**वासमात** जाऊन दुकान थाटलं सोयऱ्यानं.'

वासरी (स्त्री.) कालवड. '**वासरीच्या** कायजीनं घास टाकतात गाई.' -वि.

वासरू (न.) गायीचे बछडे. 'एकी गाए होतीः तीचे **वासरू** सरलेः' -गोवि.५८.

वासला (पु.) सुताराचे अवजार. 'शिऱ्याचा बाप **वासला** चालोते. वाळकाम करते.' -डेबू.१. 'माहा सारं लक्ष राहे माह्या धंद्यावर, वाड्यासारखं **वासल्यावर**, रंध्यावर.' -मिर्झा.११६.

वासवनं (क्रि.) फाकविणे. 'जायनं लोंडे तिकळे जाऊन तंगळ्या **वासवनं** कोना मवरे.'

वासाळ (वि.) वास मारणारा. 'अशा **वासाळ** जागी नाक धरून बसतं काय, ऊठ अथून.'

वासुदेव (पु.) १. श्रीकृष्ण, मोरांच्या पिसांची उंच टोपी घालून भिक्षा मागणारी एक जात. (सं.) २. ताटाभोवत पाणी फिरविण्याचा विधी. 'नैवेद्याभवती पाण्याची बारीक धार सोडून **वासुदेव** केला.' -रा.३२.

वासेल (क्रि.रूप.) फाकविलेले. 'मजुरीचे पैसे देले तरी जवारीसाठी तोंड **वासेलच** रायते मजुराचं.'

वासोनं (क्रि.) फाकविणे. 'याच्या त्याच्या पुढे तोंड **वासोनं** सोभते का राजा तुमाले.'

वासोयेल (क्रि.रूप.) फाकविलेले. 'हा **वासोयेल** बासळा फेक तिकळे, साजरा आन.'

वासोलं (क्रि.रूप.) फाकविले. 'हुंड्यासाठी सायाच्याईनं लय तोंड **वासोलं**.'

वास्तपुस्त (न.) विचारपूस. 'ओळखणारा चेहरा त्यांची **वास्तुपुस्त** करीत होता.' -धग.१९.

वास्ता (क्रिवि.) वाजता. 'आज मस्त इकरा झाला. दोन **वास्तालोक** सबन माल खलास.' -सित.५६.

वास्याले (क्रि.रूप.) वासावयाला. 'हे पोरगी काहून मले तोंड **वास्याले** लावत असीन काजनं.'

वाहनं (न.) कसणे, हाकलणे. 'एणे खोडेसी झोंबताः परि ऐसे आउत **वाहो** कोण्हीचि नेणेः' -ली.३७३.

वाहवाही (स्त्री.) वाहवा, प्रशंसा. 'घेवंदे मचकूमचकू सायबाची **वाहवाही** सांगत होता.' -खुं.६७.

वाहाडली (क्रि.रूप.) वाढली. 'पोट दुखनं बसलं, भूकसुद्धा **वाहाडली**, आतली सारी बिमारी बाहेर काहाडली.' -मिर्झा.११४

वाहारी (स्त्री.) १. पत्नी. 'हे माही साई नाई भाऊ, **वाहारीच** होय लग्नाची. २. सून. 'लेकबी गुनाचा अन् **वायरी** मस्त भेटली आपल्या नशिबानं. बाबा बाबा म्हनत रायते.'

वाहाळ (पु.) वाढण्याची रीती. 'लेक असा **वाहाळ** आमी कुठी पायला नाही पंक्तीत.' -भं.६९.

वाहाळत (क्रि.रूप.) वाढत, वृद्धी. 'सालानं सालं मांगे पळत डिगूची उंबर **वाहाळत** चाल्ली व्हती.' -सित.१७.

वाहाळनं (क्रि.) वाढणे. 'लेकरू कापलं शिजोलं. अतिथी पुढे **वाहाळलं**.' -डेबू.२१.

वाहावळांचा ? 'हे गोसावी आवघेया **वाहावळांचा** बापुः जन्म गेले आमुचेः' -ली.१७३.

वाहिती (स्त्री.) दरवर्षी कसणे, पेरणे. 'अनेक वर्षाच्या **वाहितीमुळे** काळ्या जमिनीचा मगदूर कमी झाला.' -कात.३०१.

वाही (स्त्री.) कोळपणी. '**उन्हायावाही** ठोकर लागे गोट्याची/ मनसा पुरी होये उभ्या पिकाची.'

वाही (वि.) वाह्यात, गैर. 'तुम्हीच सांगा मी काही **वाही** बोलली?' -पख.

वाहीपेंडी (पु.) संपुष्टात येणे. 'पाटलासोबतच कालपर्यंतचा जमानाही कुठं **वाहीपेंडी** लागला.' -मोती.३१.

वाहो (क्रि.रूप.) वाहीत करी असे. 'पिके तरी **वाहो** नुबगिजे। पिकासी निवाडु देखिजे।' -ज्ञा.१०.५५. 'मीबी पयले तीन तिफना जमीन **वाहो**.'

वाह्यलता (क्रि.रूप.) वाहिला होता. 'तुव्हा चुलता **वाह्यलता** पुरात. लोकाईनच वाचोलं तव्हा.' -ऊन.१४९.

वाह्यात (वि.) वाहियात, निरर्थक, बाष्कळ, बिघडलेले, दुराचारी. 'राधीगोदीनं मले फसवलं. लयचं **वाह्यात** हाये दोघीबी.' -त.३४. (फा.अर.)

वाळकाम (न.) सुताराचे काम. 'शिवऱ्याचा बाप वासला चालोते. **वाळकाम** करते.' -डेबू.१.

वाळखोळचा (क्रिवि.) वेळेचा. 'लय **वाळखोळचा** वखर घेऊन आलो आता आपला न्यायरीचा टाईम झाला राजा.'

वाळगं (न.) गोठा. 'शेनपानी करून **वाळगं** झाळून काहाळलं.'

वाळनं (क्रि.) १. वाढणे. 'मग ते उठीलीः थाळा धुतलाः मग ताक आंबीलि **वाढीलि**.' -गोवि.२४५. 'आवं पटकन ताट **वाळनं**. भूक लागली जमके.' २. सुकणे, कृश होणे. 'येणें शोकें रे **वाळलों** शरीरीं।' -नाथ.१५३४.

वाळलं (क्रि.रूप.) १. वाढले. २. सकुले. 'गोरं लयच **वाळलं** रे एका वर्सात. निन्हा हाळकच दिसून रायले.'

वाळवन (क्रि.रूप.) १. उन्हात वाळवल्या. २. गत, दुरावस्था. 'जिवंतपणी झाली तशीच देहाची मेल्यावरही **वाळवण** होईल.' -ल.२७.

वाळसाळ (स्त्री.) ? 'माहा लगन होयेल आये **वाळसाळ**, पंदरा दिसात बायकोले घिऊन येतो.' -सित.१५१.

वाळा (पु.) १. मोठे घर. 'आबाचा **वाळा** अवघ्या गावाचा अधार आये.' २. गारवा देणारे गवत. 'खिडकीले गरमीत **वाळ्याच्या** ताट्या लावल्या तं थंड रायते घर.'

वाळाणी (स्त्री.) ओली जमीन सुकणे. 'पडलेले पाणी जमिनीत मुरून **वाळाणी** यावयास उघाळीची आवश्यकता होती.' -कात.१८९.

वाळी (पु.) सुतार. 'थो होता कामठ्यावर जानराव **वाळ्याच्या**.' -मिए.१२४.

वाळूक (न.) गोडसर लांबाळे फळ. 'गोसावीयां पुढा वाकुळे पुंजा केलीः बाइसी कोवळीकोवळी **वाळुके** नीवडू आदरिलीः' -ली.४९९.

वाळे (क्रि.रूप.) वाढे. 'पळे झळे, लेकरू **वाळे**.'

वांग (पु.) चेहऱ्यावरील डाग, त्वचा रोग. 'तोंडावर **वांगाचा** गोल कायासर चट्टा पळ्ळा माय.'

वांगं (न.) १. वांगे. 'भटोबासी **वांगेयाचा** देटु ऐसाऐसा धरिलाः' -ली.१२९. 'मग तेथे गेलेः **वांगे** घेउनि आलेः

हींगे मीरीये सांबारे रांधीलेः' -गोवि.२२२.

वांगली (वि.) वाईट वर्तनाची. 'कर बरं म्हना बदनामी? मी काय वांगली **वागली**? सि.१४२.

वांजा (स्त्री.) गवार. 'शेंगदाने टाकूनसन्या **वांजाची** भाजी केली भाकरसंगं.'

वांझ (वि.) मूल नसलेली. 'ते **वांझेचि** घरभरी। लेकरे जैसी॥' -ज्ञा.१५.२१७.

वांझोटी (वि.) मूल, लेकरू नसलेली. 'ते **वांझोटी** ...मुक्याची बायको. एकडाव त मी लय भांडली तिच्याशी.' -ना.५८. 'काय माय बाई असीन व ते **वांझोट्याथुतराची**.' -सित.७३.

वांड(ढ) (वि.) बदमाश. '**वांड** वाटेची चवचाल बिजली.' -भीक.३८.

वांढाय(ळ) (वि.) १. ओढाळ, बदमाश. 'चिंतामणीची खाणी लागली। तेणेवरी **वोढले** वोल्हारिली॥' -ज्ञा.११.५४०. 'हा पांढरा गोरा वायतीले चांगला होईन पन हा कबरा फार **वांढाय** दिसते.' -काळी.१४. २. चाकोली सोडून चालणारे. 'तुहं नशीब फुटकं चाक गाडीचं **वांढाय/** पुढं चालता व बाई मांग पाटीवर वय' -रुक्मि.८४. 'गाडीवाट सोडून चालणाऱ्या **वांढाळ** चाकाला चाकोलीनं चालण्यास भाग पाडतोस.' - हा.६१.

वांदाड (वि.) वाट सोडून चालणारे. 'एखादं खासर **वांदाड** आसान तं करांगड्या, मानकं, दाबकुटातून सरकं कर.' -दि.१२.

वांदे (पु.अने.) कटकटी, वाद, भांडण. 'भाईजीच्या बैठकीत सुटे गावचे **वांदे**.' -मिर्झा.१९५. 'रोज बाळाला सुखाची लागते झप मोठी/ **वांदे** वाड्यात लखपती.' -लोक.९९.

वांधा (पु.) फाट, नवरा बायको मधील इपट, भानगड. 'सोयरिकीधायरिकी करणं, सुनवायऱ्याचे **वांधे** असले तर त्यात समेट घडवणं हे सारं यात्रेत घडतं.' -पख.६२.

वांधेल (वि.) भानगडीचे. 'कोनाच्या **वांधेल** कामात तोंड घालू नाई आपून.'

वांबलं (क्रि.रूप.) दुखावले, अगतिक. 'उभ्या धसकटावाणी मन माहंबी **वांबलं**.' -गाक.३४.

वांबळी (वि.) एक शिवी. 'टोंगळे सुजले, कशानं? **वांबळीचं** वातानं व्हत आसन.' -' -सेल.१९.

विटाकौलं (न.अने.) विटा आणि कवेलू. 'पजावावर **विटाकौलं** करणारे कारागीर असत.' -फीर.१६८.

विलाज (पु.) इलाज. 'आता एकच **विलाज** राह्यला या भळमुंज्याची थंडी कऱ्याचा.' -सित.१३१. (अर.)

विसन (न.) पाण्याची उष्णता कमी होण्यासाठी घालावयाचे थंड पाणी. 'बोलावली बायको **विसन** टाकाच्या बहान्यानं/ लाजली न्हानी थंड झाल्या पान्यानं.'

विसननं (क्रि.) गरम पाण्यात थंड पाणी टाकणे. 'वालंबीने पाणी तापवले. न्हाणीच्या दगडवर नेऊन **विसणले**.' -ऊन.९७. 'चुलीवरची पाण्याची गुंडी तिने न्हाणीवर नेऊन **विसणली**.' -सेल.१५७.

विस्तारी (स्त्री.) पत्रावळी. 'ताटं काहाले पायजात येवळ्या मोठ्या पावनेईले **विस्तारी** वाहाळली का झालं.'

विहिरा (स्त्री.) पाण्याची लहान विहीर. 'दरवर्षी **विहिरा** पावसाळ्यात वाहून, मातीनं गाळल्या जातो.' -पख.३३.

वीर (न.) वीरश्रीचे गीत. 'चौकाचौकात **वीर** मनत खापरी मारुतीच्या देवयात आली.' -दि.९.

वून - पंचमीचा प्रत्यय. 'हून', 'ऊन' ह्या प्रत्ययाचा वऱ्हाडातील काही भागात '**वून**' असा उच्चार होतो. 'खे अर्ध्यामंदात थांबोवून पोर घराआंगे चाल्ले गेले.' -सित. १३.

वेट (पु.) चाकाची लोखंडी धाव. 'जाता बहिणीच्या गावी **वेट** पडता गाडीचा/ चाक टाकून रस्त्यात जीन सवारे घोडीचा.' -लोक.५०.

वेटाळनं (क्रि.) आड्या पडणे. 'सरळ रस्त्यानं चालतांनाही तो वाकडातिकडा **वेटाळत** चालतो.' -ल.८.

वेनीफनी (स्त्री.) वेणी घालणे, केस विंचरणे. 'सयंसंध्याकाई पोरीच्या जातीनं झाळझूळ करावं अन् मस्त **वेनीफनीबी** करावं.'

वेस (स्त्री.) गावाची हद्द. '**वेसीच्या** भाईर जाच्या आंधी **वेसीवर** नारय फाळजो.'

वेळणी (स्त्री.) मातीची कटोरी. 'कुंभाराच्या घरून विड्याच्या पानांची **वेळणी** विकत घेतली होती.' -सेल.१८५. 'मूठभर भाजीचा गोळा मातीच्या **वेळणीत** ठेवला.' -रा.५.

वैरागर (वि.) उदार, मोठ्या मनाचा. '**वैरागरापाशीं** रत्नाचिया खाणी। हे चि घ्यावी धणी फावेल तों॥' -तुका.३६७७. 'आपला हा वऱ्हाड मोडला तरी **वैरागर** आहे, भरल्या समुद्राचं मन आहे त्याचं.' -कात.५५४.

वैरान (वि.) पडिक, उध्वस्त. 'गावात ढोरं चाऱ्यालेबी **वैरान** जमीन नाई रायली राजा.'

वो (संबो.) एक संबाधेन. '**वो** डुकराऽ उठरे भोसडीच्या सुमतानं रोजची भूपाळी म्हटली.' -सि.४५.

वोकनं (क्रि.) ओकणे. 'भान्या **वोकला**. अवघ्याईचं जेवण मातीत गेलं. जीव खिजरू आला.' -डेबू.१२.

वोघ (पु.) प्रवाह. 'जरी सरिता **वोघ** समस्त। परिपूर्ण होऊ निमिळ॥' -ज्ञा.२.३५८. 'वोघावोघानं गोठं निंगली म्हून म्या सांगली.'

वोपनं (क्रि.) मारणे. 'माहं सगळं बोलनं बुढ्यानं फुलटॉससारखं **वोपलं**.' -मे.३.

वोफय (वि.) पोकळ. 'मोठ्ठीच्या मोठी कन्साची गंजी होती. **वोफय** कन्सं निंगल्यानं झळती नाई लागली.'

वोम (स्त्री.) खूण. 'हे हरनाच्या पायाची **वोम** दिसते गळ्या.' २. मनातील भाव. 'गन्याची **वोम** तं मी बराबर वयखतो.'

वोम्फस (वि.) निष्फळ, पोकळ, व्यर्थ. 'लय धळपळ केली पन काम सायाचं **वोम्फस** झालं.'

वोलोनं (क्रि.) ओलवणे. '**वोल्हावेल** तनु होईल शीतळ। जाली हळहळ बहुतापें' -तुका.३६५५.

वोवभर (वि.) तसूभर, अल्प. 'पोटी पोटजात देयेना, पोट भरायले **वोवभर** रानबी देयेना.' -सेल.११६.

वोवर (पु.) वधूवर. 'आणि **वौहार** बउलेयावरि बैसले असेः' -ली.६९

वोस (वि.) उजाळ. 'त्याचा गांव केला **वोस**।' -नाथ.१२७६. 'दाही दिशा **वोस** वाटती उदास।' -नाथ.

वोसान (न.) पुरातील कचरा. 'वरी **वोसाण** तरत सात्त्विकाचें। ते संवादचतुष्पथींचें।' -ज्ञा.१०.१२४.

वोळल्या (क्रि.रूप.) ओढल्या. 'गायी म्हैशीही हिरव्या चाऱ्यावर **वोळल्या** होत्या.' -कात.१९०.

व्हईन (क्रि.रूप.) होईल, होणार. 'त्याले गावातून नाही पळवून लावलं त मी डक्कलवाराच्या पोटचा **व्हईन**.' -पख.५६.

व्हऊन (क्रि.रूप.) होऊन. 'आमच्या अध्यक्षानं तर गावात कोणाचंच भलं केलं नाही निसता शाखेचा अध्यक्ष **व्हऊन** बसला.' -वा.४०२.

व्हगाडे (वि.) रडणारे. 'अव काय झालं ते सांग त खरी **व्हगाडे**?' -पख.११७.

व्हट (पु.) ओठ. 'चेंडू लागल्यानं **व्हट** फुटला लेकाचा.'

व्हटाळी (स्त्री.) ओठ. '**व्हाटाळीनं** हुंगून खायचं आये की सोडाचं जनावरं बरोबर ओळखतात.' -खुं.१८३.

व्हतं (क्रि.) होते. 'तुम्ही **व्हते** म्हनून एवढी तकलिफ घेतली म्या.' -पख.१०३. 'आजीचा कातोळा चाल्ला **व्हता** पन नात बस्सर जात नोती.' -सित.१४७. 'बकाबुडी दुखन्यानं बेज्या गयाठली **व्हती**.' -सित.४७.

व्हनार (क्रि.रूप.) होणार, व्हायचे. तू सरकारी नोकर हाय, लोकाचा तरास तुले **व्हनार** न्हाय.' -पाटी.

व्हय (क्रि.) १. आहे. 'ते काय **व्हय** रे तिकळे उभं दिसते ते?' २. व्हावे. '**व्हय** तिकळे, अथी नको बसू तू.'

व्हयसेना (क्रि.रूप.) होत नसे, होईना. 'तव्हा नाही आलं ध्यानात पण उसीरा का **व्हयसेना** आता एकजूट झाली.' -वा.२४०.

व्हयाला (क्रि.रूप.) होऊन राहिला. 'जातो मी, उशीर **व्हयाला**, असं म्हणून ती लाजतच तेथून निघाली.' -पख.५३.

व्हयेल (क्रि.रूप.) झालेले. 'चहुबाजूनी याजायाचे सबन रस्तेबी बंद **व्हयेल** व्हते.' -सित.५३.

व्हर्का (पु.) भारा, पेंढी. 'डाळण डाळण्यासाठी गायरानातून पळसाच्या डहाळांचा **व्हर्का** आणावा लागत होता.' -पख.७९.

व्हवस्तोर (क्रिवि.) होईपर्यंत. 'मायाकून **व्हवस्तोर** तं करीनच तुहं काम.'

व्हाचं (क्रि.) व्हायचे. 'काम **व्हाचं** आये मून तं चकरा मारून रायलो एवढ्या.'

व्हायली (क्रि.रूप.) होऊन राहिली. 'पोराची वाट पाहतांना एकएक जास्तीची पोरगीच **व्हायली**.' -पख.१७.

व्हाळ (न.) लांबट हौद. 'गावात सात ठिकाणी गुराढोरांना पाणी पिण्यासाठी **व्हाळ** बांधलेले होते.' -मामा.४२.

श

शक (पु.) संशय, शंका. 'माया लेकीवर काहले **शक** घेता तुमी ते काय शिनाल दिसून रायली?' (अर.शक्क)

शकल (स्त्री.) बुद्धी, युक्ती. 'चाणाक्ष माणूस **शकल** बरोबर ओळखतो.' -फीर.२३९.

शकलसुरत (स्त्री.) तोंडवळा, चेहरा. 'आंगापिंडानं तगळा, **शकलसुरत** तशीच साजरीगोजरी.' -सित.१३९.

शकळं (न.) लहान बैलगाडी, छकडा. 'वावरात येवळी मोठ्ठी बंडी नेल्यापेक्शा **शकळं** बरं रायते बसलं का निंगले.'

शकी (वि.) संशयी. 'नवरा **शकी** नाई पायजे माय, कोनाशी बोलाचा धर्म नाई रायत.' (अर.)

शकून (पु.) चिन्ह, शुभदर्शक खूण. '**शकून** नाई चांगला/ लग्नाचा मुरत नाई निंगला.'

शक्कर (स्त्री.) साखर. 'घीशक्कर खाले द्या त्याले, काम नका सांगू भळव्याले.' (फा.)

शक्कल (स्त्री.) १. चेहरा. 'राती झोप नोती लागली वाट्टे **शक्कल** पाय कशी दिसून रायली.' (फा.) २. युक्ती. 'पैसे उकळण्यासाठी घरमालक काय **शक्कल** काढतील विचारू नका.' -गय. (अर.शकल्ल)

शटका (पु.) चाबूक. 'पुरान्यापक्षे **शटका** माराव एखांदा बैलाले.' (फा.)

शत्री (स्त्री.) छत्री. 'पावसायात **शत्रीफत्री** पायजे संगं.'

शनी (पु.) एक ग्रह. 'गुरू अन् **शनी** दोन्हीबी हायत वाट्टे लेक आपल्याले.'

शप्पथ (स्त्री.) आण, वचन. 'तुमची **शप्पथ** राजा म्या नाई चोरी केली.'

शबिना (पु.) तंबू. 'लगनासाठी लागे **शबिनानतन** सांगून ठुला.' (फा.शाबियाना)

शमनं (न.) शिश्न. 'फुकटची मजुरी पायजे काय तुले. धर मायं **शमनं** मंग देतो.'

शयरीक (पु.) सहभागी. 'भलत्या भानगळीत आपून काले **शयरीक** व्हावं.'

शरनी (स्त्री.) १. त्वचा रोग. 'मानीवर **शरनीचे** डाग पळ्ळे वाट्टे लेक.' २. एक जंगली फळ. 'पिकेल **शरनी** वाळू घालून त्याचीबी भाजी करत.' ३. प्रसाद. 'नारळं फोळून सगळ्या लोकाईले **शरनी** वाटली.'

शरमनं (क्रि.) लाजणे. 'आता काहून **शरमतं**? लगनाले तं मोठी हरिकली होती.'

शरमिंदा(धा) (वि.) लज्जित. 'लबाळी उघळ झाल्यानं वंकाऱ्या भल्ला **शरमिंदा** झाला.' (फा.)

शराब (स्त्री.) दारू, मद्य. 'दोन घोट **शराब** पेल्यावर रस्ताबी कमी पळते शामरावले.' (अर.)

शरारत (स्त्री.) खोडी. 'बाजाचं पोरगं **शरारत** कऱ्याले एक नंबर.' (फा.)

शरारती (वि.) खोडकर. 'भल्लंच **शरारती** आये पोट्टं.'

शरीक (क्रिवि.) सहभागी, वाटेकरी. 'कार्यक्रमात तुमी **शरीक** झालेतठ्ठ बरं वाटीन लोकाईले.' (फा.अर.)

शरीफ (वि.) सज्जन. 'महेबुबखाँ म्हंजे एकदम **शरीफ** मानसू.' (अर.)

शरीरबावळी (स्त्री.) शरीर प्रकृती. 'येसोंता **शरीरबावळीनं** चांगला भरेल आन कचेल व्हता.' -सित.३१.

शरीरयष्टी (स्त्री.) शरीरकाठी, ठेवण. 'पोरीची **शरीरयष्टी** चांगली खात्यापेत्या घरची हाय.'

शर्त(र्थ) (स्त्री.) अट, करार. 'मी **शर्तीवर** सांगतो आज काम होनं नाई आपलं.' (अर.फा.)

शर्मिंदा (वि.) लज्जित, खजील. 'नाही म्हटलं तरी मी ही **शर्मिंदा** झालो होतो.' -फीर.९४.

शर्यत (स्त्री.) पैज, होड. 'दामूशी **शर्यत** लावलती पन मीच हारलो.' (अर.शर्त)

शहर (पु.) नगर. '**शहर** फुगत चाल्ले अन् गावबी फुगत चाल्ले जमिनाच लोळ होऊन रायल्या.' (फा.)

शहाजीरं (पु.) तिखट मसाल्यातील एक जिरे. 'आचारी बॉ **शहाजीराबी** पायजे काय भाजीले?' (फा. शाहजिरंह्)

शहाजोग (वि.) उजागर, उघडउघड. 'महादेव तरी कोणता **शहाजोग** आहे? कोळ्याच्या परक्या पोरीवर भाळला.' -पख.५१.

शहाडा (पु.) ? 'रात्रीचे मांगांना गोडधोड जेवू घातले. सकाळचा **शहाडा** झाला.' -रा.२०८.

शहाणेसुरते (वि.) सूज्ञ. 'भलेभले **शहाणेसुरते** मधे पडले. भांडण सावरत गेलं.' -डेबू.११.

शहानिशा (पु.) चौकशी, तपास. 'बारीक चौकशी सुरू. जाबजबाब, पुरावे. **शहानिशा**.' -डेबू.६६. (फा.)

शहामत (स्त्री.) दुर्गती, वाईट, बिकट प्रसंग. 'तुई **शहामत** आली काय बाबू, देऊ का दोनचार खपके.' (अर.)

शहामेंढा (पु.) लालपांढरी कणसासारखी फुले येणारे गवत. 'धुऱ्यानं **शहामेंढा** निंगला औंदा.'

शहाळा (पु.) एक गवत. 'पायजो बाई. **शहाळा** काहाले सोळ्ळा. निंदून काळा सगळ गवत.'

शंकरपाळे (पु.अने.) पक्वान्न. 'दिवाईले **शंकरपाळे** केल्ते, कानोले केल्ते.' (फा.सरकारा)

शंभरी (स्त्री.) शंभर रुपयाची नोट. '**शंभरी** तं फरायालेबी पुरत नाई.'

शा (स्त्री.) शिवी. 'साधी म्हणीतलेः ''काइ आलीएः सवीया **कैसीयास** देत अससी?'' -गोवि.६.

शाक (स्त्री.) १. भाजी. 'भाकरीसंगं काई तं **शाकभाजी** पायजे राजा.' २. झाडावर पिकलेला आंबा. 'झाळावर कितीकई आंबे असले तं, मिठ्ठू **शाकीलेच** चोच लावीन.' -ए.८७.

शाकटा (वि.) चतुर, हुशार. 'आपण **शाकटे** त्यांना खरी माहिती कुठे सांगितली?' -गय.१२.

शाकभाजी (स्त्री.) भाजी. 'आंधी ती सैपाक करती तं **शाकभाजी** नेता आली असती.' -अंधा.

शाकारनं (क्रि.) छप्परावर आच्छादन घालणे, घरावर कवेलू व्यवस्थित लावणे. 'पावसाया सुरू व्हाच्या आदुगर घरावरची कौलं **शाकारतात**.' -धग.१००.

शाक्टे (वि.) छाकटे, चतुर. 'मालक म्हंतात तुमाले **शाक्टे** बोके झाले गबर.'

शाख (स्त्री.) फांदी, डहाळी. 'पाय झाळाले पानी देलं तं कशा कवळ्या **शाखा** फुटल्या.' (फा.)

शागलोत (स्त्री.) शिवीगाळ. 'कच्च्या कैऱ्याईले गोटे मारनाऱ्या पोट्ट्याईले आबा **शागलोत** करत.' -एक.

शागीर्द (पु.) विद्यार्थी, शिष्य, उमेदवार. 'वामन्या गंगुपैलवानाचाच **शागीर्द** आय.' (फा.)

शानिशा (पु.) चौकशी. 'पोलीस काय झालं त्याची **शानिशा** करत होते.' (अर.)

शाजोग (वि.) उजागर. 'मोठा **शाजोग** आला कुठोलचा, गोष्टी सांगते मानुसकीच्या हरामखोर.'

शाट (पु.) १. चाबूक. 'बैलं हाकल्याले **शाट** नाई पायला बॉ. घोड्याले तरी पायजे.' २. झाडांच्या फांद्या तोडणे. 'औत काटी खालून जात नोतं तं **शाट** काढला.' ३. विजेचा करंट. 'वायर कटेल असल्यानं **शाट** लाग्याचा भेवच होता.' ४. 'अंगठी मागीतली तेव्हा मात्र पुंजानं इव्हायाचा **शाट** काढला.' -पख.१६२.

शाटी(पी) (स्त्री.) १. दुपट्टा. 'उनायात कानाले येखादी **शाटी** पायजे बांध्याले.' २. संन्याशाचे वस्त्र.

शातळक - घोड्याची एक चाल. 'घोळमं मस्त पयते **शातळक शातळक**.'

शादत (क्रिवि.) शिव्या देत. 'नाई नाई तुले नाई. या घेवंदेले **शादत** होतो.' -खुं.६७.

शादी (स्त्री.) लग्न. 'सून नाई पोरगी होय माही आजून **शादी** व्हाची आये.' -धग.१३३. (फा.)

शादीशुदा (वि.) लग्न झालेला. '**शादीशुदा** हो ना मी. आता डबल कोन करीन लगन.'

शादोते (क्रि.रूप.) शिव्या देते. 'बायकोले कोनी बोललं त तोच मायबयनीवर **शादोते** लोकाईले.' -धुम्म.

शादोनं (क्रि.) शिव्या देणे. 'किती खराब असते **शादोनं**. काटे टोचते, मनाले घरं पळतात.' -डेबू.१३.

शान (स्त्री.) थाट, डौल, रुबाब, शोक. '**शान** पाटलाची मिशी टपराची.' (फा.अर.शअन)

शानदार (वि.) सुंदर. 'गावात **शानदार** घर बांधलं.' (फा. अर.)

शानशौकी (वि.) मिरवण्याची, नटण्याची आवड. 'वच्छीले असंतसं नाई चालत. लय **शानशौकी** आये ते.' (फा.)

शानशौकीन (वि.) डौल, थाटमाट, छंद, व्यसन. 'मोठ्याईचे कित्येक पैसे **शानशौकीत** खर्च होत असतील.' -फीर.११२.

शानशौखत (स्त्री.) रुबाब, वजन, ऐट. 'दिवानजीची वस्त्रं अंगावर चढल्यामुळे त्याची **शानशौखत** वाढली.' -कात.३८७.

शान्नू (वि.) शहाण्णव. 'आपूण बसता धागेदोरे चिवळत हा **शान्नूव** कुळी, हा पाटील, हा तिरळा, हा घाटेकुणबी अरे अरे.' -खुं.७७.

शाबाश (न.) वाहवा, छान, भले. 'पयला नंबर आला म्हंत काय तुया- **शाबास** रे पठठ्!' (अर.फा.)

शाबासकी (स्त्री.) प्रशंसा. 'चिळीचा जीव वाचोला. मायनई **शाबासकी** देली.' -डेबू.५०.

शाबासी (स्त्री.) प्रशंसा. 'चांगला पास झालो तं मास्तरनंबी **शाबासी** देली.'

शाबीत (वि.) सिद्ध, प्रस्थापित. 'या इस्टेटीवर तुझे स्वामित्व **शाबीत** करणारी कायदेशीर कागदपत्रं मी केली आहेत.' -कात.४१६. (अर.साबीत)

शाबुदाना (पु.) फराळाचा एक पदार्थ. 'येकादशी होती तं **शाबुदान्याची** उसळ केली.'

शाबूत (वि.) सुस्थितीत, चांगले. 'आता जमाना बदलला. लोकांचे मनं **शाबूत** राहिले नाहीत.' -पख.२. (फा. अर. साबीत)

शाबेशोक (क्रिवि.) ठासून, निश्चित. 'गोपाले आपून पसन हाओ असं हे नाना **शाबेशोक** सांगतात कसे?' -सित.८५.

शामत (स्त्री.) अहित, दुर्दशा. 'मान्साची **शामत** आली की काईतरमा भलकाई घळतेच.' (अर.)

शामदान - ? 'चांदीच्या **शामदानातून** जळणाऱ्या दिव्यातून घर उजळत होते.' -कात.३००. (अर.)

शामियाना (पु.) मोठा तंबू, डेरा. 'पावन्यारावन्याईसाठी आंगनात **शामियाना** टाकला.' (फा.)

शामीराज (पु.) पतीचे नाव, पती. 'जीव गेला टाका वसरीत बाज/ करतील **शामीराज** मातीची माह्या वज.' -लोक.६७.

शामील (वि.) समाविष्ट. 'गोप्या कोन्त्याच भानगडीत **शामील** नस्तो.' (अर.)

शायद (क्रिवि.) कदाचित. 'पावने आले तं सकायपर्वा येतील **शायद**.' (फा.)

शायना (वि.) शाहणा. 'बाइ एथची बुधि होइलः मग सहजचि **सेहाणा** होइलः' -ली.२६९. (त.शानम)

शायनी (वि.) १. सज्ञान, हुशार. 'एवढी **शायनी** सुरती हायस माय तू जरा आमचई आईका लागते.' -लेक.६२. २. वयात आलेली. 'पोरगी दोन वर्षापासून **शायनी** झाली लगन जुटा लागत होतं आतालोक.'

शायनेसुरते (वि.) शहाणे, सूज्ञ. '**शायनेसुरते** लोकं कोन्या भानगळीत पळत नाईत.'

शार (अ.) अतिशय. '**कायाशार** पोरगा आल्ता पायाले. गावातले पोट्टे म्हनत क्रॉस म्याचींग जमलं.'

शार (पु.) १. नदीतील गवत. बकऱ्या खातात. २. एक झाड. ३. सुताराचे छिद्र पाडण्याचे अवजार. 'बापाले रंधा, **शार** वढायले आधार झाला त्याचा.' -सेल.३८.

शालबुट्टा (पु.) कलाकुसर केलेली शाल. 'हाती चुळा साज गळा **शालबुट्ट्याचा** हिरवा.' -भीक.७९.

शालमुंदी (स्त्री.) लग्नाआधी दोन महिने अगोदर नवरीच्या बापाने केलेला नवऱ्यामुलाला मुंदी देण्याचा विधी. 'बायाची **शालामुंदी**, सुपारी सव्वाखंडी.' -लोक.२४. 'खेयता खेपी सासऱ्यानं मले **शालमुंदीची** देयेल होती ते मुंदी सटकून हारोली.' -हज.३६.

शाव (वि.) शहाजोग, उजागर. 'खोळंखाळं पुजून म्हतारपनी **शाव** होतात लोकं.'

शावकार (पु.) व्याजाने पैसे देणारा. 'डेबूच्या बंडीत **शावकाराच्या** घरच्या नोटाईचा भर.' -डेबू.६९.

शावनी (स्त्री.) ताटी, छप्पर. 'ढोराच्या सावलीसाठी **शावनी** केली आखरात.'

शाहमत (स्त्री.) धडगत. 'कुठे बबरा न होता काम उरकले तरच तुझी **शाहमत**.' -कात.२३१.

शाहानिशा (स्त्री.) चौकशी, खातरजमा. 'चोर कोन याचा शेवटी **शाहानिशा** झालाच नाई.'

शाहामेंढा (पु.) एक गवत विशेष. 'सोयाबीनात **शाहामेंढा** काप्याले बाया सांगल्या दाबारा.'

शाही (वि.) राजेशाही, थाटाचा. 'जीवन काय बारबार भेटत नाई. मान्सानं **शाही** जीवन जगाव.' (फा.)

शांती (स्त्री.) अरिष्ट टाळण्यासाठीचा विधी. 'गावासि अरिष्ट म्हणौनि **सांति** करितातिः' -ली.७०.

शांतिका (स्त्री.) मुलीचे वयात आल्यावर केला जाणारा विधी. '**शांतिकाच्या** दिवशी काकीनं तिला हिरवं लुगडं नेसवलं.' -मोती.३८.

शिकं (न.) शिंके, भांडे टांगते ठेवणारी दोरीची जाळी. '**शिक्यातली** भाकर काळ्ळी. चटनी घेतली अन् जेवलो.' (त.शिमीळ्ळी,का.सिक्किसु)

शिकंजा (पु.) सुताराची मोठी पकड. 'बबन्या कसा काय अजाबूच्या **शिकंजात** सापळ्ळा म्हनाव?'

शिकंदर (वि.) भाग्यवान. 'नसीब **शिकंदर** असलं का बिलंदरबी राज भोगतात.'

शिकउनारे (वि.) शिंक पाहून भविष्य सांगणारे. 'पाटील शिकउनारे होते. कोणी **शिंकले** की त्यावरून पुढचे भविष्य सांगत.' -भं.९६.

शिकनं (क्रि.) शिंकणे. 'उंबरठ्यावर **शिकनं** चांगलं नस्ते.'

शिकरन (न.) केळ दूध साखरेचा पदार्थ. 'मामाची बायको सुगरन, रोजरोज करते **शिकरन**.' (का. शिकरणे)

शिकरी (स्त्री.) हौस, उत्कंठा. 'तिची बाळासाहेबांशी बोलण्याशी **शिकरी** थोडीफार फिटली होती.' -कात.१७५.

शिकलसोट(ठ) (वि.) रिकामटवळी. तोंडाचा खेळ हये का सप्तर्षी करणं? **शिकलसोट** माणसं कर्तातबी.' -सेल.१०६. 'रामाचं एक ठीक ह्ये त्यो **शिकलसोठ**. एकटाजीव सदाशिव.' -सेल.१९३.

शिकाई(यी) (स्त्री.) विहिरीतून पाणी काढण्यासाठीची बारीक दोरी. 'तांब्या विहिरीपाशी बादली दोर, **शिकाईतांब्या** पडला होता.' -धग.३१.

शिकाकई (स्त्री.) केस स्वच्छ करण्यासाठी वापरतात ती शेंगांची पूड. 'मायनं तिले न्हानीत ठेवलं न्हानलं. **शिकाकईचं** पाणी ओतलं.' -डेबू.२२. (का.शेंग)

शिकायत (स्त्री.) तक्रार. 'गावात हागवणीची **शिकायत** पहिल्यांदा तिलाच सुरू झाली.' -पाटी. (अर.)

शिकायली (क्रि.रूप.) शिकत आहे, शिकू लागली. 'आता सरकारी शाळा सुरू झाल्या तर महारमांगांची पोरं **शिकायली**.' -वा.३२.

शिकार (स्त्री.) १. मृगया. २. पारध. 'सादली तं **शिकार** नाई तं भिकार.' (फा.)

शिकारखाना (पु.) जनावरांची बंदिस्त जागा. 'सर्कसचा तंबू पाह्यला. **शिकारखाना** पाह्यला.' -धग.१०३.

शिकून (वि.) शिकवून. 'नर्मदी पोरीले भलकाईच **शिकून** ठेवते.' 'बाळ्या आजून **शिकून** रायला कामकाज.'

शिकोनं (क्रि.) शिकविणे. 'लेकराले चांगल्या शाळेत **शिकोनं** पळते.'

शिकोनी (स्त्री.) शिकविणे. 'श्या काहून देतं बे तुया मायची **शिकोनी** चांगली नाई वाट्टे गळ्या.'

शिकोयाले (क्रि.रूप.) शिकवायला. 'पोरगं **शिकोयाले** बराबरी तं करा लागील पैशाधेल्याची.' -सित.१४.

शिकोरी (स्त्री.) खापरी. 'मडक्यावरच्या **शिकोरीतून** गुळाचा खडा काढला.' -धग.८०.

शिगावनं (क्रि.) शिग भरणे, भरपूर. 'पण फुकटखाऊची मग **शिगावली** हाव.' -गाक.२८.

शिगोर (वि.) भरून, काठोकाठ भरलेले. 'ताज्या ताकाचे **शिगोर** भरलेले पेले आमच्या समोर आणून ठेवले गेले.' -कावू. 'तनानं दबलेल्या वावरातल्या पिकासारखं आतालोग दबेल सपन आता **शिगोर** झालं.' -लेक.४.

शिजनं (क्रि.) उकळून मऊ होणे. 'इकळे चुलीवर मटन **शिजनं** चालू होतं अन् तिकळे दारू पेनं चालू झालं.'

शिजवो (क्रि.रूप.) शिजवीत असे. 'पोळ्यासाठी कणीक भिजवो/ भाजी वरन मीच **शिजवो**.' -जांग.२१.

शिजोनं (क्रि.) शिजविणे. 'फनस पयले **शिजोनं** पळते मंगसन्या फोळनी द्या लागते.'

शिट्टी (स्त्री.) शीळ. 'पोरीपारी पाहून बुडं **शिट्टी** वाजोत रायते.' (त.शिळकैई)

शिडकनं (क्रि.) शिंपडणे. 'पानी **शिडकलं** ता धुळ्ळा तरी खाली बसीन.'

शिणशिणा (स्त्री.) व्यथा, राग. 'पण मायले बयवर श्या देल्याचा **शिणशिणा** तुम्हाले काय म्हून?' -ऊन.२५१.

शिणारली (क्रि.रूप.) ठोकली जाणे. 'जमीन पाण्याने ओली होऊन चांगलीच **शिणारली** होती.' -कात.११३.

शितनं (क्रि.) पकडणे, स्पर्शकरणे. 'गोसावी खडेन **सीतीलाः**' -ली.१०. 'पोरासोरांची फौज बंडीकडे जागा **शितण्यासाठी** धावत सुटली.' -काळी.४६. 'वला टाकती तिफन **शितू** वखर पाहेते.' -काया.१.

शितनाबातनी (पु.) एक खेळ. 'कांच्या, **शितनाबातनी** असे लानपनी खेळ खेळत जाव पोट्टेईसंगं.'

शितमभातम (पु.) एक खेळ, शिवाशिवीचा खेळ. '**शितमभातमीच्या** खेळात तुले **शित्ताच** आलं नाई.'

शिताफी (स्त्री.) कौशल्य, चपलाई. 'डागदर सुई टोच्याले आला आपून **शिताफिनं** शाळेतून निसटलो.' -मोती. (फा.)

शितोडा(ळा) (पु.) शिंतोडा, पाण्यापावसाचा थेंब. 'कां तुळशीचिया झाडा। दुरूनि न घापे **सिंतोडा**॥' -ज्ञा.१८.५९६. 'उपाधीच्या नांवें घेतला **सिंतोडा**। नेदूं आतां पीडा आतळों ते॥' -तुका.८०.१. 'घरात पाण्याचा **शितोडा** नाई आमच्या.' -खुं.१९९.

शिदा (वि.) सरळ. 'असा **शिदा** जाय. पुळे मंदिर लागलं का खालतं जाजो.'

शिदा(धा)आटा (पु.) स्वयंपाकाचे साहित्य. 'दमनीत दळपा तो केला, **शिदाआटा** दमनी टाकला.' -लोक.४२. 'बामना गोसाव्यांना मिळतो तसा **शिधाआटाही** धवस द्यायचा.' -मोती.

शिदोरी (स्त्री.) शेतात कामावर जाताना पालवात भाकरीभाजी बांधून नेतात ती. 'लग्नविधीतही वधूची पाठवणी करताना गोडधोडाची **शिदोरी**, नारळ बांधले सोळा.'

शिदोळ (पु.) गांडूळ. 'खतात गांडूळ असतात ना ते म्हनजे आपले **शिदोळच** हायत.'

शिनगार (पु.) शृंगार, साज. '**शिनगार** केला, साज केला/ राया तुयासाठी दाठा सोन्यानं मळोला.'

शिनठोक (वि.) स्पष्ट. 'रामभाऊ लय **शिनठोक** हाय. पाटलाच्या तोंडावर म्हने लोकाईच्या गांडीत काळ्या करनं बदं करा.'

शिननं (क्रि.) कंटाळणे, थकणे. 'काम करून आंग **शिनलं**.'

शिनभाग (पु.) थकवा. 'कामाचा **शिनभाग** जाव म्हून घोटभर घेतली तं काय होते?'

शिना (पु.) छाती, ऊर. '**शिना** ताठ करून पोट्टे म्हनत जय शिवाजी जय भवानी.'

शिनाजोरी (स्त्री.) मजोरी, वरचढपणा. 'मोठ्यासंगं **शिनाजोरी** करू नाई. आयकून घ्यावं आपून.' 'चोरी तं चोरी वर **शिनाजोरी**.' (फा.)

शिनारनं (क्रि.) १. ठोकणे, दाबणे, पहारीने ठोकून मजबूत करणे. 'सगळं अंग आतल्या आत **शिणारल्यासरखं** ठणकू लागलं.' -पख.२५. २. मारणे. 'ऐदी चुकार पोराला बापानं पायतानानं **शिणारलं**.' -मोती.३२.

शिनाल (वि.) वेश्या, वाईट चालीची, बाहेरख्याली. 'मोठी पतीवरता झाली **शिनाल**.' -ना.५७.

शिनालचं (वि.) एक शिवी. 'आता खना मनावं **शिनालीच्याह्याईले** कशी खनता विहीर तं?' -पख.८६.

शिनोटा (पु.) थकवा, दमणूक. 'दोन दिवस अराम करूनई कामाचा **शिनोटा** गेला नाई आजून.'

शिन्या (अ.) सुद्धा. 'जखमीवरची खिपली काळून अल्लदच रायता/ खुर्चीत **बसूनशिन्या** आमचे येले पायता' -नोका.

शिपका (पु.) हबका, तडाखा. 'सकाऊन उठलं. तोंडाले फरका मारला. पान्याचा **शिपका** मारला का निंगले कुन्हाळ घेऊनसन्या.'

शिपतर (न.) उथळ टोपली. 'मोपानं डोक्यावरील टोपीचं **शिपतर** काढून गुडघ्यावर ठेवलं.' -झेल.५.

शिपतल्डं (वि.) शिपाई, फास्तू, क्षुद्र. 'कोण्या गावातून आलं कान्नू **शिपतल्डं** हे?' -खुं.३०.

शिपनं (क्रि.) शिंपणे. 'उनायात सकाउनसंध्याकाई पानी **शिपनं** चालू रायते आपलं आंगनात.'

शिपलं (क्रि.रूप.) शिंपले. 'पिंपरुवाचिया आशा। न **शिंपिजे** पिंपळु जैसा॥' -ज्ञा.१८.८४२.

शिपली (स्त्री.) लहान शिंप. 'बनीनं तं बैना नदीतल्या **शिपल्याईची** माय वयली मोठीधाटी.'

शिपळनं (क्रि.) शिंपणे, सडा टाकणे. 'कावं येवळ्या सकाऊन सळा **शिपळनं** चालूबी झाला तुया.' (का. शिंपळीसु)

शिपाई (पु.) १. घराच्या आड्याला लावलेला टेकू. 'सुतारानं नाटीवर **शिपाई** करून बसोला.' २. सैनीक चाकर (फा.)

शिपी (पु.) शिंपी. '**शिंपियाचे** कुळीं जन्म मज झाला।' -नाथ.१२३२. '**सिंपियाचा** पोर एक खेळिया नामा।' -तुका.१९०. (का.शिंपीगं)

शिपी (स्त्री.) एक गवत. 'भरभर **शिपी** कापली अन् येक भारा आनला बैलाईसाठी.'

शिप्पत (न.) शिप्तर, डाले, पाटी. 'डोक्यावरच्या ढवळ्या

शिप्पत झालेल्या बटा.' -शि.११५. (का.चिब्बल)

शिमगा (पु.) होळीचा सण. '**शिमग्याची** बोंब चार दिवस.' -पख.११.

शियंपातं (वि.) शिळे. 'कायीतरी **शियंपातं** खाल्ल्यानं पोट बिघळलं.' -धुम्म.

शिया (स्त्री.अने.) शिव्या. 'पोरायच्या मायबापाले लाग्गट गावरान **शिया**, गाया दिऊन ते भांडन उकरे.' -सित.८५.

शियान (न.) शितळान, **शीतळाई**, ऊन कमी होणे, सावली, ढगामुळे पडलेली सावली. '**शियानचं** गेलं तं गाळ्याले बैलई थकत नाहीत.'

शिरका(वा) (पु.) मुख्य पिकात अनुषंगिक पिकाचे तुरळक बी टाकणे. 'सोयाबीनात तिळाचा **शिरका** टाकला तं यकरी एक पोतं पिकलं.' (फा.)

शिरकाटनं (क्रि.) चटक, सवय लागणे. 'हे माजर दूध प्याले लयच **शिकाटली** जशी.'

शिरगोया (पु.) ठिसूळ गारगोटी. याची रांगोळी करतात. 'हिरयासारिका दिसे **शिरगोळा**। पारखी ते डोळां न पाहाती॥' -तुका.४०८१.२. 'ते आपली **शिरगोयासारखी** चमचम बायको तू कोयसा करसीन.' -मोती.

शिरजोर (क्रिवि.) अंगावर धाऊन जाणे, डोक्यावर बसणे. 'मानपान ठेवावं पोराच्या जातीनं असं **शिरजोर** होऊ नाई बापावर.' (फा.सर्झोर)

शिरनं (क्रि.) प्रवेश करणे. 'सगळं पुराचं पाणी विहरीत **शिरून** ती डाबडूब भरली होती.' -पख.८६.

शिरनी (स्त्री.) प्रसाद. 'दर शेनीवारी नारळ फोळून **शिरनी** वाटतात.' (फा.)

शिरमंती (स्त्री.) श्रीमंती. 'पोरं शिकूनसन्या मोठी झाली अन् **शिरमंती** आली आमच्या घरीदारी.'

शिरवा (पु.) १. पावसाचे तुषार. 'शेतमाऊलीचा थाट पाहे **शिरव्याची** वाट/ कोनी लावू नोका नाट आज पावसाची भेट.' -नोका. 'बादली भरून हातपाय धुतले थंड पाण्याचा **शिरवा** तोंडावर मारला.' -सुखो.८. २. मुख्य पिकात अनुषंगिक पिकाचे तुरळक बी टाकणे. 'मुंगाच्या तासात तीयाचा **शिरवा** टाकला.'

शिरवाळ (वि.) शिव- एक देवता. 'गहू पुढे पाहते तर काळ्या मातीच्या चिखलाचा **शिरवाळ** केलेला.' -सेल.२२८. 'देवा **शिरवाळा** मले पावशीन तर तीन वर्स तुही मांडणूक करीन.' -सेल.२३२.

शिरस्ता (पु.) चाल रीत, पद्धत, प्रथा, चाल. 'आम्हीही घरी जुणापुराणा **शिरस्ता** कायम ठुला.' -कात.२९६. 'संकुचा अटाला **शिरस्त्याप्रमाणे** नखेगावच्या गावणावर थडकला.' -सि.२७. (फा०सरिस्ता)

शिरी दोडका (पु.) जाड रेषा असतात तो दोडका. '**शिरी** दोडक्याची भाजी केलती सकाऊन.'

शिरोनं (क्रि.) विसर्जित करणे. 'गनपतीले आज सयसंध्याकाई **शिरोनं** पळते.'

शिर्काटनं (क्रि.) उत्साहात येणे. 'नऊचं लगन दोन वाजता लागलं नाचनारे पोट्टे **शिर्काटले** होते ना.' -धुम्म.

शिर्पत (पु.) श्रीपत- एक नाव. 'मंधात तोंड माऱ्याची **शिर्पत** बॉले आदतच हाय.' -धुम्म.

शिलक (स्त्री.) १. बांबूची शिळक. 'बासा फाकोतानी **शिलकच** हातात घुसली.' २. कळा, चमक, लचक. 'भरल्या बजारात बाबाजी देशमुख त्याईच्या कमरीले सोन्याची **शिलक**.' -लोक.९४. ३. बारीक काडी.

शिलकी (वि.) जमा, राखीव. 'कमाई लय करते बाबू पन **शिलकीत** काई पळत नाई.'

शिलगनं (क्रि.) पेट घेणे. 'चिनकी पळ्ळी अन् पायतापायता गवताची अख्खी गंजी **शिलगली**.' (अर. शल्क)

शिलगाले (क्रि.रूप.) पेटविण्यासाठी, सुरू व्हायला. 'चिलमीच्या जागी शिग्रेट आली पोट्टे **शिलगाले** कमालच झाली.' -रूख.३५.

शिलगावतो (क्रि.रूप.) पेटवितो. 'तो औत थांबवितो. बैलाच्या सावलीत बसून बिडी **शिलगावतो**.' -गाआ.४३.

शिलगावनं (क्रि.) पेटविणे. 'बुवानं तोंडात चिलम कोंबली अन् अंगारडब्बीनं **शिलगावली**.' -काळी.८२.

शिलगावली(ल्या) (क्रि.रूप.) पेटविली. 'एकाच काडीवर दोन्ही सिगारेटी **शिलगावल्या**.' -झेल.६०.

शिलशिला (पु.) सतत वावर, उठबस. 'बापुसाहेबांचा चौहीकडे **शिलशिला** त्यामुळे सर्वत्र गोत्र परिवार जमा झाला होता.' -कात.३५७. २. रुनानुबंध (अर.)

शिलाई (स्त्री.) शिवण्याची मजुरी. 'कपळ्यापेक्शा **शिलाई** जास्त झाली.

शिलाजित ? 'आला उन्हाया माहा नांगर चालला/ आंग लाहीलाही किती घाम **शिलाजित** झाला.'

शिळापाता (वि.) शिळा, कालचा. '**शिळापाता** होता तोच भात फोळनी देऊन खाल्ला.'

शिलेल (वि.) चालू, बदमाश. 'या दंतकथेवर **शिलेल** गावानं सपनातही भरोसा ठेवला नाही.' -मे.९७.

शिल्लक (वि.) बाकी, उरलेली रक्कम. 'कितीबी पिकलं ना तं कास्तकाराचा पैसा **शिल्लक** नाई रायत.' (का.शिलकु)

शिल्ली (स्त्री.) धार लाववयाचा दगड. 'म्हैस भादरताभादरता मंधातच वस्तरा **शिल्लीवर** लावनं चालू अस्ते.'

शिवटी (स्त्री.) उसाची, धांड्याची किलची. 'धांडा तिकळे

खानं. अती **शिवट्या** होतात ना.'

शिवनं (क्रि.) १. दोरा घालून जोडणे, सांधणे. 'चोळी शिवरे शिप्या, मोती लाव **शिवणीले**/ चोळी जाते बहिणीले.' (का.सिवनं,सं.सीव्) २. स्पर्श करणे.

शिवनापाणी (पु.) पकडापकडीचा खेळ. 'जोत्यावर लेकरं हुंदडत, **शिवनापाणी** खेळत होती.' -धग.२३.

शिवंपातं (वि.) शिळे वगैरे. 'रोजाराजी धंदा करूकरू पोटाले घातलं पन वाड्यातलं **शिवंपातंई** भेटलं नोतं.' -लेक.३३.

शिवभर (वि.) थोडे. 'टाकी बदबद गळू लागली. तिच्यात **शिवभर** पाणी राहिना.' -पख.१५१.

शिवभाऊ (पु.) लगतच्या गावचा. 'दोघांचेही गावं जवळजवळ तो **शिवभाऊच** निघाला.' -गय.१८.

शिवय(ळ/ळी) (स्त्री.) जुवाडाच्या बैलाच्या मानेजवळ येणारी खुंटी, शिवड. 'बुढा लय सोनहरक्या होता. **शिवईबेळ्ळी** लावली का निंगला जत्रेत.'

शिवळं (न.) जुवाची खुंटी. 'केली मानेतली गाडी उलटीपालटी. टाकली **शिवळ** मोडून आणि उधळला रानोमाळ.' -खुं.४९.

शिवळाटे(रं) (न.) जू. 'नांगराच्या आगुलीला बैल जुंपायचे म्हणल्यावर त्यां **शिवळाटे** लागणारच.' -सेल.४३. 'त्याने बैलांच्या खांद्यावरचं **शिवळारं** उतरलं व पाटातलं पाणी पाजलं.' -कात.५.

शिवाई (स्त्री.) शिवड. '**शिवाईबेळ्ळी** वजीनं ठेवाव. वक्तावर सापळाले पायजे.'

शिवाई (वि.) १. सरस. 'हे सूनवायरी तं बापा सासूहूनही **शिवाई** निंगली.' २. जास्ती. 'गजा फाल्तूचाच **शिवाई** बोलत रायते.'

शिवाशीव (स्त्री.) स्पृश्यास्पृश्यता, विटाळ. 'जुने म्हतारे लय **शिवाशीव** पाळतात बापा.'

शिवार (न.) गावशिवेच्या आतील सर्व क्षेत्र. '**शेतशिवारा** बिगर कुनब्याले गमतच नाई.'

शिवाळनं (क्रि.) चिथावणे. 'पाटील बॉ भले, कुत्रे **शिवाळून** देले.'

शिवाळून (क्रि.रूप.) चिथावणी देऊन. 'त्यातच चुलत्याचे नातू कुत्र्याला **शिवाळून** द्यायचे. मांजरा मांगे छु म्हनून सोडायचे.' -सुखो.३९.

शिवी-गलोती (स्त्री.) शिवीगाळ. 'मेलेला बैल वढत नाही मनलं, तं संबाजीदादानं त्याले **शिवी-गलोती** का मारहाण केली असती.' -वा.३३२. (मही.)

शिवेल (वि.) शिवलेले. 'तो नवीन **शिवेल** फुलपँड अन् मनिला घालून जाये.' -खुं.३८.

शिशी (स्त्री.) १. अर्धे डोके, दुखणे. २. काचेची कुप्पी. '**शिशीबाई** शिशी दारूची शिशी, नवऱ्यानं मारलं तंबाखूसाठी.' (फा.)

शिसा (पु.) मोठी काचेची बाटली. 'येक **शिसाभरून** दारू ढोसली लेकानं.' (फा.शिशा)

शिसारी (स्त्री.) तिटकारा, कंटाळा, दुर्गंधी, हुली. 'लागता वास गरिबीचा पाहता दुरून **शिसारी**.' -भीक.७३. 'कुणाकुणाच्या रात्री आपण सजविल्या...तिला स्वतःची **शिसारी** आली.' -झेल.४१.

शिळाणं (स्त्री.) ढगाळ, सावलीची स्थिती. 'राशी निंघाला **शिळाणी**, रुपया ओवाळणी, हाती घालती बहिणी.' -लोक.३१. 'दुपारचं ऊन कलून सायंकालीन शांत **शिळाण** सर्वत्र पसरली होती.' -कात.४१.

शिळाणीच्या (वि.) इकडल्यातिकडल्या, रिकाम्या वेळातील गप्पा. 'आम्ही दोघंच खरपावर बसून **शिळाणीच्या** गप्पा मारीत बसलो होतो.' -खुं.१३.

शिळापाका (वि.) आदल्या दिवशीचे उरलेले अन्न. 'रातचाच तं **शिळापाका** सयपाक लय उरेल आय.'

शिळी (स्त्री.) पायऱ्या लावलेल्या बांबूची चौकट, शिडी. 'छपरावर चळ्याले **शिळी** लावली अन् चळ्ळो.'

शिंकंदर (वि.) जगज्जेता, विजयी. 'यंदा नशीब **शिंकदर** भरल्या गंजीवर.' -भीक.११२.

शिंगशिंगोटी (स्त्री.) शिंगाची ठेवण. 'भोऱ्या बैलाची **शिंगशिंगोटी** मोठी नखरेबाज हाय रे.'

शिंगरू (न.) घोड्याचे पिल्लू. 'इंग्रजीचं **शिंगरू** मराठी पुढं चाल्लं/ गाजर गवतानं जसं हरायीले खाल्लं.' -मिए.११७. 'थकलेला नामा घोडीमागच्या शिंगरासारखा त्याच्यासोबत चालत होता.' -धग.१९. 'घोळ्या मांग **शिंगरू**.'

शिंगलबशी (स्त्री.) कप आणि बशी. 'पावन्यारावन्यासाठी नयाकोर **शिंगलबशा** आनल्या काल.'

शिंगाडं (न.) शिंगं. 'जुंपलेले बैल जोखडाला **शिंगाडं** माराया लागले.' -खुं.५.

शिंगाडे (न.अने.) खाण्याचा पाण्यातील कंद. 'पेंड खजूर अन् **शिंगाडे** खाण्यासाठी तमाशाचा फड हवाच.' -मोती.

शिंगार (पु.) शृंगार. '**शिंगार** कुरून अंगनी/ वाट पाहते सजनी.' (का.शेंगुदल)

शिंगाळं (न.) बैलगाडीचे जास्तीचे खूट. 'अंगणात बासाच्या तट्ट्यांची बाज आणि समोर सोडलेल्या **शिंगाड्या** फटाड्या बंड्या.' -झेल.४.

शिंगाळा (पु.) संपूर्ण बैलगाडीचे खूट. '**शिदोरीची** थैली **शिंगाळ्याला** अडकवली. बंडी जुतली.' -ना.१३५.

शिंगी (स्त्री.) मादा पिलू. 'गधी व्याली एक **शिंगी** तिने दिली.' -फीर.७७.

शिंगुस्त (न.) सिंहस्त. 'यंदा **सिंगुस्त** पळीन तं नाशीकले जाऊ आपून.'

शिंगोया (स्त्री.) होळीच्या वेळेस शेणापासून तयार केलेल्या चकल्या. 'होळीसाठी **शिंगोया** तयार करून देत जाव अन् लायना भाऊ वाऊ घाले.'

शिंदनं (क्रि.) जाऊन धडकणे, स्पर्श होणे, टेकणे. 'तो भेलिकांडत भिंतीला **शिंदला**.' -झेल.३१. 'चाक वट्याले **शिंदल्यानं** वटा खचला.'

शिंदय (स्त्री.) शिंदळ स्त्री. 'टवाळो जन मज म्हणोत **शिंदळी**। परि हा वनमाळी न विसंबें॥' -तुका.७.१.

शिंदी (स्त्री.) १. खजूर जातीचे झाड. '**शिंदीची** कुर्रेबाज झाडं छत्री घेतलेल्या गोऱ्या साहेबासारखी दिसत होती.' -सि.७७. (त.शेंदी) २. एक मद्य.

शिंदेशाही (स्त्री.) पायातील मूल्यवान अलंकार. 'रूळ तोडे **शिंदेशाही**, माह्या सीतेच्या पायात, पडे जावई रामाच्या उजेड महालात.' -लोक.५९.

शिंदोई (स्त्री.) एक झाड- शिंदी. 'जंगलात जाऊन पिकेल **शिंदोया** खावो. मस्त गोळ लागत.'

शी (स्त्री.) शीव, सीमा. '**शी** हुनजाती, देरा माया राजोट्या, धरा बयलाच्या नाथी.' -लोक.८९.

शी (वि.) शिळी. '**शी** भाकर अन् हिरव्या मिरचीचा ठेसा मस्त झोळ्ळा.'

शीक (स्त्री.) १. शिंक. 'माया आंगावर नको शिकू. तिकळे तोंड करून **शिकनं**.' (का.शिनिके) २. शिकवण. 'सांडिता मारग पाळीती पाईक। आणिकासी **शीक** लागावया।' -तुका.१०५९.

शीक (क्रि.रूप.) शिकावे. 'तू शहरात जाऊन आखीन **शीक** बाबू लयमोठा.'

शीत (न.) शिजलेल्या तांदुळाचा दाणा. '**शितावरून** भाताची परीक्शा होते राजा.'

शीन (पु.) १. थकवा. 'सकाऊनच आंग धुवावं रे पोरा संमदा आंगातला **शीन** निंगून जाते.' (त.शिनीतल्) २. तापामुळे ओठावर येणारा फोड.

शीप (स्त्री.) १. शिंपला. 'तुका म्हणे मुक्ताफळ **शिंपीपोटीं**। नाहीं त्याची भेटी भोग तिये।' -तुका.५३३. २. पाण्याची पाळी. 'हरबऱ्यात दुसरी पान्याची **शीप** लावली.' (का. शिंपू)

शीप (क्रि.रूप.) शिंपड. 'आंगनात बाटलीभर पानी **शीप** बरं बाई.'

शीव (स्त्री.) मर्यादा, हद्द, सीमा. 'नवरदेव आला **शीवेपाशी**, **शीव** नारळ देईन नवरी जितून नेईन.'

शुकर (न.) आभार. 'दोन अधल्या जवारी देली यातच **शुकर** मान.' -अंधा. (फा.)

शेक (पु.) धग, ऊब, आस. 'चुलीच्या दूर बसनं, बुव्हाऱ्या **शेक** लागील ना आंगाले.'

शेकनं (क्रि.) ऊब घेणे, देणे. 'पाय सुजला तं **शेकनं** चालू हाय.' (का.)

शेकळं (न.) छकडे. 'आतावानी काय वरात न्याले गाळ्याघोळे होते काय बाप्पा. आपआपलं **शेकळं** जुतलं का निंगले.'

शेकारनं (क्रि.) घराचे छतावर गवत, कवेलू व्यवस्थित टाकणे. 'पावसाळ्याला अवकाश असल्यानं घराचं छत **शाकारायचं** टाळलं.' -अंधा.

शेजं (न.) तुकडे. 'कडब्याची पेंढी काढली. कुऱ्हाडीनं तीन **शेजं** करून बैलापुढे टाकली.' -भं.३७.

शेजबाज (पु.) बिछाना, शय्या. '**सेजबाज** विलास भोग। करी कामिनीशी संग॥' -तुका.३१२.

शेजलचं (वि.) जवळचे, शेजारी असलेले. 'डाखोऱ्या पायानं सुपारी लोटून मी गनाबुड्याच्या **शेजलच्या** पिळ्यावर बसली.' -सित.६८.

शेजी (अ.) जवळ. 'माया **शेजी** बसं मी तुले येक गोठ सांगतो.'

शेजोशेजी (अ.) जवळजवळ. '**शेजोशेजी** आमी दोघं बसलो तं सारे लोकं म्हनत लक्शुमीनारायनाचा जोळा दिसते.' -हज.१०.

शेट (वि.) १. कःपदार्थ, तिरस्कार दर्शक. 'तुले या गोठीतलं काय **शेट** समजते बे?' २. सावकार. 'व्याजानं पैसे वाट्टे. लय मोठा **शेट** हाय राजा तो मानूस.'

शेट (न.) गुप्त अंगावरील केस. 'माया नवरा तुमच्या सारखेईले **शेटावर** बांधते.' (का.शेट्टी)

शेटमारी (क्रिवि.) न जुमानणे. 'नापिकीचे पैसे नाई भेटले तं **शेटमारी** नाई भेटले.'

शेटमेहो (न.अने.) १. लहान मुले. 'जाना बे **शेटमेहो** म्हणून त्याले पोरांवर दांडू उगारला.' -सि.३१. २. सेठ, मारवाडी. '**शेटम्याईनं** लय जमिना दाबल्या लोकाईच्या.'

शेटाड्या (पु.) शेटजी नावाचे संबोधन. 'हरदास झाला पण त्या लफंग्या **शेटाड्यास** तरी तो पचला नाही, हे बरंच झालं.' -कात.६८२.

शेठानी (स्त्री.) शेठजीची पत्नी. 'शेठजी चिकटभोक्या असला तरी **शेठानी** मोठ्या मनाची आये.'

शेण्या (स्त्री.अने.) रान गवऱ्या. 'रानात **शेण्या** वेचणाऱ्या बायांना आपल्या वेण्या विंचरण्याची आवड नसते का?'

-कात.६४९.

शेतकरी (पु.) शेती करून उपजीविका करणारा. 'ते तेया **सेतकरीयापासि** गेलेः तेयास ते म्हणीतले आम्हासि काही चणा देयावाः' -ली.४११. (का.शद्यगार)

शेतखाना (पु.) शौचाची जागा, शौचकूप. 'तोंड होय का **शेतखाना** हाय लेकाचा, पयले कबुललं ते आता नाही म्हंते.' -एक. (फा.शिह्हतखाना)

शेतशेजारी (वि.) लगत शेती असलेले लोक. 'जयंता आल्यानं जिवातजीव आला. **शेतशेजारी** जमा झाले.' -खुं.६१.

शेतजमीन (स्त्री.) शेत व इतर संपत्ती. 'नोकरी तं हायच म्हना अन् **शेतजमीनबी** लय हाय.'

शेतीवाळी (स्त्री.) शेती, वाडा इ.साठी व्यापक अर्थ. '**शेतीवाळी** भरपूर असली का पैस्याअदल्याची काई कमी पडत नाई.'

शेन (न.) बैल, गायीची विष्ठा. 'सकाऊनच **शेन** काळून कोठं झाळून काहाळा लागते.' (का.शगनी)

शेनशेणोटा (पु.) शेण इत्यादी. 'गवळ्यांना **शेणशेणोटा**, वैरण खानोट्यातून फुर्सत मिळत नव्हती.' -झेल.९०.

शेनामेनाचं (वि.) अशक्त, हलका. 'मीबी लय पक्का आओ, **शेनामेनाचा** समजतं का मले तू?'

शेप (स्त्री.) १. शेपूट. 'बैलाची **शेप** वाळ्ळी होती. त्याले कोकनं, माती चिपके तं कापली कैचीनं.' (त.शप्पट्टै) २. आकार. 'देखनी आये पन पोरीचा **शेप** बरोबर नाई.'

शेपटनं (क्रि.) पकडणे (-शेपूट धरून). 'ही केस म्हने मी एकदाच निपटतो/ थ्या पोट्ट्याले त्याच्या घरी **शेपटतो**.' -जांग.१५९.

शेपरूट (न.) पिकातील एक गवत. 'वावरात **शेपरूट** रन्नावू लागलं. गोंड्यावर येऊयेऊ वावराले लाल करू लागलं.' -लेक.३.

शेपाटनं (क्रि.) १. पकडणे. 'जोराने पळविणे, शेपटी पिळणे.' २. शेपूट पिरगाळून पळवणे. 'गुलाबराव बैलायले **शेपाटतच** व्हता.' -अंधा.

शेपाळे (वि.) शेळपट, कमकुवत. 'या लोकांनी निमुटपणे कसं ऐकून घेतलं त्याला मारलं कसं नाही. कसे काय हे गाववाले एवढे **शेपाळे** झाले.' -वा.१०४.

शेपी (वि.) कुचकामी, पोचट. 'डिग्रीं इतकी **शेपी** की भेटून न भेटून सार्खीच.' -मे.४७.

शेपू (स्त्री.) एक भाजी. 'मुंगाची दाय टाकून **शेपूची** भाजी केली तं माया लेकाले त्याचा वासच येते.'

शेपूट (न.) पुच्छ. 'आवो मेला जाएः चाल चाले ना म्हणेः म्हणौनि **सींपुटीया** हाणतिः' -गोवि.१८.

शेप्रूट (न.) शेतीतील तणाची एक जात. 'टक्कल करणं सोडल्यापासून त्याचे केस **शेप्रूट** गवतासारखे वाढले.' -मोती.

शेफारनं (क्रि.) चढणे, लाडावणे, मिजास करणे. 'एखांद्याले वाजोतो सायाच्याले लय **शेफारले** भोसळीचे. एखांद्याची खोयमोळी केली तहा समजील.' -तित.३३.

शेमनं (न.) लिंग, शिश्न. 'म्हातारेकोतारेबी **शेमनं** हाती धरून उभ्यानंच मुत्तात भोसळीचे.'

शेमला (पु.) पगडी, फेट्याचा सोडलेला पदर. '**शेमला** जरी पटक्याचा लांब झोकदार.' -भीक.७५. (अर.शमलाः)

शेर (पु.) वाघ. 'तोताराम म्हने माया आबानं **शेर** मारला.' (फा.का.)

शेर (वि.) १. एक वजन, माप- शेर, पावशेर, सव्वाशेर इ. 'पाव्हणाराव्हणा आला तर कधी **शेर** आदसेर गव्हाचं दळण आणायचं.' -पख.८५. 'देर तं लयच हितावर लागला. **शेरभर** जेवारीबी नाई देत उसनी.' २. हिंमती.

शेरकीन (स्त्री.) स्त्री मजुरांची प्रमुख. 'लेखन पाटी टाकून नशिबानं मले हातात काठी देऊन **शेरकीन** केलं.' -दि.४३.

शेरनी (स्त्री.) १. प्रसाद. 'नारळ फोडा. **शेरनी** वाटा. आता बाकरू आना.' -डेबू.३. (फा.शेरणी) २. एक फळ. 'स्वभावाने जर रायली कळू **शेरनी**, जाशील कसी तू मग देवाच्या चरनी.' -रुक्मि.९२. (फा.शिरीनि)

शेरी (स्त्री.) गल्ली. 'कावरलं कुत्रं ज्या **शेरीत** घुसे त्या **शेरीतून** कुत्रेईचे भुकनं ऐकू ये.'

शेल अ. शेवट. 'लाल झलमाची गाडी पाहता का दारी सोडा, माह्या बांधवाचे कोणी **शेल्यानं** जा बैल झाडा.' -लोक.९७. '**येलशेल** सोयाबीनचं पिकच दिसले पावने बॉ.'

शेलकान्या (पु.अने.) दोराची पुरवणी. 'अरे लचमा, तू सर्व्या कासऱ्याच्या **शेलकान्या** पाऊन घे.' -दि.११.

शेलकी (वि.) निवडक, शिल्लक राहिलेली. 'घरी जावाव तं एकादशी गायीची **शेलकी** वंशावळ हंबरत जवळ येती.' -खुं.२४२.

शेलके (वि.) वेचक. 'सगरात सगाईत बजार ना पायजे, **शेलकेच** लोक न्यावं.'

शेलपान (न.) धाटाच्या टोकावरील पान. 'हिरवी पिकं उगवतात. **शेलपानातून** कणसं डोलतात.' -खुं.४४.

शेला (पु.) एक उंची वस्त्र. 'का हा **शेला** कोरा आता पांघरता, मेल्यावर मला का रे लाजवता.' -भीक.१०३. (का.शेले)

शेलाण (वि.) परिपूर्ण. 'आता गोऱ्हा माजावर आला,

शेलाण दात झाला, आता याचे आंडं ठेसायले हरकत नाई.' -खुं.४५.

शेलारी (स्त्री.) स्त्रीचे उंच नेसू. 'मोलामाहागाची भरजरी **शेलारी** तिने संदुकात जपून ठेवली.' -कात.८.

शेल्यालोक (क्रिवि.) शेवटपर्यंत. 'येकडाव इपट पळ्ळा का **शेल्यालोक** बोलावं नाई वाटत.'

शेल्यावर (क्रिवि.) शेवटावर. 'पण पुंजाची ही टेक **शेल्यावर** गेली नाही.' -पख.७७.

शेव (पु.) १. लुगड्याचा डोक्याहून घेतलेला पदर. 'भाईरून आली रे आली की मायनं **शेवाच्या** पदरानं माई दीठ काहाळलीच समजा.' -हज.२०. २. बेसणाचा पदार्थ. 'पोह्यावर मस्त **शेव**, संबार टाकून पावनेईत पिलेट नेली.'

शेव (वि.) उभट नसलेला, वाकलेला. 'डवरा करय नाई पायजे चांगला **शेव** पायजे. हातनेट्यानं मंगसन्या कसते.'

शेवडी(ळी) (स्त्री.) पाण्याची अरुंद लहान विहीर. 'वरी चोखट मृगसेवडी। माजी धूतवस्त्रची घाडी।' -ज्ञा.६.१८२. '**शेवडीचं** पाणी आठ दिवसांच्या वर वापरायला मिळत नव्हतं.' -त.३३.

शेवंती (स्त्री.) १. एक फुलझाड. 'तुया सुगंधानं पोरी, दारी **सेवंती** लाजली.' २. नवरदेवाचे सीमेवर करावयाचे पूजन. 'तव एका गावीचे वऱ्हाड मुहूर्ताची वेळ होए तव **सेवतीए** सि बैसले होते.' -ली.६८. 'नवरदेवाला मारुतीच्या देवळाजवळ वाजत नेऊन केलेली **शेवंती**. परत मांडवादारी आणण मग लग्न. असं दिवसभर वाजोनं.' -वा.७३.

शेवपदर (पु.) लुगड्याचा अंगाखांद्याडोक्याहून घेतलेला पदर. '**शेवपदरात** बाई भारदस्त दिसते.'

शेवरनं (क्रि.) लाल, संतप्त होणे. 'लोहाराच्या भट्टीतून काढलेल्या कुऱ्हाडीसारखा तो **शेवरला** गेला.' -अंधा.

शेवरा (पु.) शेतात तरोट्यासारखे वाढणारे झाड. 'पैशा अभावी निंदण न झाल्यानं पऱ्हाटीत माणूस माणूस **शेवरा** फोपावला.' -कात.५६९. 'हिरव्या गायवनी गाई खातील **शेवरा**.' -लोक.८०.

शेवाय (पु.) शेवाळ. 'गार **शेवाळे** गुंडाळली।' -ज्ञा. १३.६७०. 'नको पाहू हिर्वा रंग बरा दिसते **शेवाय/** अवचित बाई जाते घसरून पाय.' -वि.

शेवायनं (क्रि.) शेवाळ साचणे, घाण होणे. 'झाळपूस नाई तं घर निऱ्हा **शेवायलं**.'

शेव्व्या (स्त्री.अने.) शेवया, शेवळ्या. '**शेव्व्या** सरगुंड्याच्या ढिगावर दूधतूप अन् आमरस ओतला जाई.' -मोती. (का.)

शेळकी - ? 'दोन बांजूंनी धोतराची टोकं धरून **शेळकी** मासे पकडत होते.' -कात.७९.

शेंका (स्त्री.) संशय. 'मायावर **शेंका** घेता राजा तुमी तं? जमलं काय हे?'

शेंगाळनं (क्रि.) भरपूर शेंगा येणे. 'निब्बर झालेला तरोटा **शेंगाळला** होता.' -सि.२२.

शेंगूट (न.) शेंगांचा पसारा. 'मजुरांच्या आंगणात मुगामोटेचे **शेंगूट** सोकत होते.' -धग.४७.

शेंगोट (न.) शेंगांसगट झालेले कुटार. 'ढोरावासरापुढें टाक्याले **शेंगोट** बरं रायते.'

शेगोये (पु.अने.) चणादाडीचे मुटके, कणकेचा तिखट पदार्थ. '**सेंगुळे** आरोगु सरले होतेः' -ली.२०. 'माई आजी मस्त **शेंगोये** करते खायाले.' (त.तेगुल्ळ)

शेंगोळ (न.) १. शेंगाचे प्रमाण. २. **शेंगेसारखा** केलेला डाळीच्या इ. पिठाचा भुरका.

शेंडा (पु.) टोक, अग्रभाग. 'तिकून दोराचा **शेंडा** धर मी गुंडावत आन्तो'

शेंडाबुडूख (न.) वरचा आणि खालचा भाग. 'बाबू **शेंडाबुळूक** माईत नाई तं मंधात ना बोलावं.'

शेंडेखुडी (स्त्री.) वरचा भाग कापणे, खुडणे. 'झाडाची **शेंडेखुडी** होते त्यामुळे पणपत नाहीत.' -खुं.१८३.

शेंदनं (क्रि.) टेकणे, लागणे. 'बैलगाळं वट्याले **शेंदलं** लेकाचं.'

शेंदरं (वि.) शेंदुराच्या रंगाचे. '**शेंदऱ्या** रंगाची साळी दंडत नाई बैना.' (का.चेंदीर)

शेंदऱ्या (वि.) १. शेंदुराच्या रंगाचा. २. लुगड्याचा प्रकार. 'दोह्या नारीचा पुरुष नारी हौसीगुणं केल्या **शेंदऱ्या** जड गेल्या.' -लोक.३४.

शेंदाड (न.) कच्चे वाळूक. 'त्याचं मन **शेंदाडासारखं** उलून गेलं त्याच्या दोन खापा झाल्या.' -अंधा.

शेंदायची (क्रि.रूप.) पाणी काढायची. 'बुद्ध, मांग मंडळीला विहरीवर चढून पाणी **शेंदायची** मुभा नव्हती.' -पख.१२.

शेंदी (स्त्री.) स्त्रीचे नेसू. 'ही मैना जी एक लाल **शेंदी** नेसते आहे ती अजून मात्र काही केल्या टाकत नाही.' -कात.८०.

शेंदूर (पु.) विशिष्ट रंगाची पूड. 'शनवारी मारोतीले **शेंदूर** लावा लागते.' (त.शेंदुरम)

शेंबळं (वि.) शेंबूड नाकात असलेले. '**शेंबुळई** नाई पुसत लेकाचं **शेंबळं** काट्टं तं.'

शेंबालू (पु.) वृक्षविशेष. 'वाघाटे तोडायच्या मिषानं मालायला घेऊन **शेंबालूच्या** झुडूपाआत तिचा नवरा

गेला.' -झेल.३३. (को.)

शेंबी (स्त्री.) छब्बी, झिंम्बी- बैलाच्या शिंगाचे, पुराणीचे पितळी नक्षीदार कवच. 'पांढीबक खिल्लारी जोळी, हाती नक्शिदार **शेंबीचं** पुरानं, हातमुंडा दळपा टाकेल डमनी घेऊन बुढा निंगे बुढीच्या भेटीले.'

शोक (पु.) छंद, नाद. 'खायाप्याचा **शोक** पायजे मान्साले भल्ताचं नाई पायजे.'

शोकीन (वि.) रंगेल, रसिक. 'पानानं तोंड तं रंगेल रायते पावना तं मले भल्लाच **शोकीन** दिसून रायला.'

शोरशराबा (पु.) ओरडा. '**शोरशराबा** करत पोट्टे खेळत.'

शौक (पु.) छंद, चैन, हौस, आवड, व्यसन. 'दोन वेळा चहा बन्सी बुढ्याच्या **शौकाखातर** चौघांना मिळत असे.' -काळी.८५. 'दारूचा **शौक** चांगला नाई. मानपान नाई रायत मान्साले.' (अर.)

शौकी (वि.) हौशी, लत असलेला. 'गोट्या तं निर्‌हा मुलखाचा **शौकी** हाय राज्या. त्याले दारू चालते अन् गांजाबी चालते.'

श्यागलोची (स्त्री.) शिव्या. 'काई काई तं बाई निर्‌हा काईच्या काईच **श्यागलोची** देतात.'

स

सई (वि.) योग्य, खरे. 'गोपायखेळची पोरगी तं येते आपल्या घरात, तेच **सई**.' -ना.३४. (फा.)

सई (स्त्री.) १. सापाचे पिल्लू. 'लाल जरद सरपाची **सई** निंगली.' २. सही. 'माई **सई** काहाले घेता राजा. का घेता इस्टेट लिऊनसन्या मायावाली.'

सईगई (स्त्री.) शहानिशा. 'म्या काहाले तुयाबाऱ्यात सुमनजोळ म्हटलं वंऽऽ चाल बरं **सईगई** कऱ्याले.'

सईन (न.) सहन. 'मिलातल्या सेठचं वायफळ बोलनं त्याले **सईन** झालं नाही.' -धुम्म. 'थोळसकबी **सईन** करत नाही लगे.' -फीर.२२.

सईरभईर (वि.) अस्ताव्यस्त. 'फटाक्याचा आवाज होता बरोबर पाखरं **सईरभईर** पयाले लागले.'

सईशिक्का (पु.) सही करून कागदावर शिक्का मारणे. 'सायबानं **सईशिक्का** मारला का झालं समजा आपलं काम.'

सईस (क्रि.) सहज. 'रघूचीच काय, कोणाचीबी अडिअडचण तर राजाराम **सईसच** निभावून नेते' -ऊन.४. '**सईसच** पावला आस्ता देव तर काय पाहा लागत व्हतं मंग?' -सेल.१०९.

सकट (वि.) सर्व, सगळे, एकंदर. 'फनाई **सकट** काळ्या येचाचे किती रुपये लागतीन ते सांगा.'

सकत (वि.) टणक, कडक. 'हे काळी नरम आये, **सकत** पायजे व्हती.' (अर.सख्त,फा.)

सकवार (वि.) सुकुमार, नाजूक, सुंदर. 'गोकुळाची सवत म्हणून **सकवार** मालू आली अन् पुसारामच्या संसाराचा सगळा तितंबा झाला.' -सेल.७०.

सकाऊन (स्त्री.) सकाळी. '**सकाऊनच** वाई कऱ्याले वावरानं निंगा लागते.'

सकाटं (न.) वृक्षविशेष. 'येवढी वाहाळली पोर्गी एखांद्या **सकाट्यावानी**-कोंच्या कामाची?' -पोळा.

सकाय (स्त्री.) १. उद्या. 'रायलं ते करीन **सकाय**. नाई त नाई करनार.' -धग.३७. २. सकाळ, पहाट. 'तुझ्याशी बोलत झोपून जातो. **सकाय** झाली की, पुन्हा च्याहा पेतो.' -मा.१७.

सकायवकाय (क्रिवि.) लवकर. 'बायकोले म्हने भाकरीसंगं ठेचा आन **सकायवकाय**.' -मिए.११४.

सकायसंध्याकाय (स्त्री.) सकाळ-संध्याकाळ. 'चतकोर अर्धी भेटते ना **सकायसंध्याकाय**, मंग मुकाट्यानं गप बसावं बुढ्यानं.'

सकाळवकाळ (क्रिवि.) पहाटे, लवकर. 'म्हैसा दा इतक्या **सकाळवकाळ** कसा कायस आला.' -सि.१३८.

सकी (स्त्री.) सखी. 'दापुऱ्याले माई **सकी** देल हाय. आमी लानपनी लय लंगळी खेळो.'

सक्काई (स्त्री.) सकाळी. 'बाबू आता लवकर नीज उद्या तुले **सक्काई** ढोरा मांगं जायचं आहे.' -संगा.२६.

सक्त (वि.) कडक. 'नामाला यसोदीपासून न हलण्याची **सक्त** ताकीद दिली.' -धग.७६. (फा.सख्त)

सक्ती (स्त्री.) जुलूम, बळजोरी. 'कोनाची कोनावर **सक्ती** काहाले पायजे राजा.' (फा.सख्ती)

सक्रात (स्त्री.) १. एका राशीतून (स्थितीतून) दुसऱ्या राशीत जाणे, स्थित्यंतर. **संक्रात** एक दिशेने येते व दुसऱ्या दिशेस जाते व तिसऱ्या दिशेकडे पाहते. ही अशुभ अनिष्ट फलदायी असते.

सखा (पु.) मित्र, सोबती. 'सकाऊनच आपला **सखा** येऊन खेळू लागते.'

सख्खा (वि.) अगदी जवळच्या नात्याचा. 'म्हणायले **सख्खी** जाऊ हये पण तिनंच माह्यावर झोलांड घेतलं.' -सेल.१८७.

सगई (वि.) संपूर्ण. '**सगई** पोई वाढं. पावना जेवाले मांगं नाई सरनार.'

सगट (अ.) मिळून, सह, च्या बरोबर. 'शेजी देगं दही, घराला पाव्हने **बंधुसगट** भावजई.'

सगटमगट (वि.) संपूर्ण. 'काळ्या फनं सगळ्याचा **सगट-मगट** भाव सांगा.'

सगबग (वि.) जवळचे, नात्यातील. 'त्याईले का आखिन **सगबग** गणगोत हाय. का तेईच्या लगनात आंदन, अईर नेवा लागन?' -लेक.१२.

सगय (वि.) पूर्ण. 'कावो **सगय** त बेस झालं पन आता खायाची सोय का?' -धग.१३.

सगर (पु.) पायवाट. 'मोडूनिया वाटा सूक्ष्म सगर। केला राज्यभार चाले ऐसा।' -तुका.१७७२. '**सगर** सोडून कवा धरली नाही पांदन.' -मिर्झा.१८०. 'करू नोका हो गुमान नोका बनू शिरजोर/ **सगराचे** नगरं झाले नगराचेही **सगर**.' -नांबै.

सगळं (वि.) सर्व, सगळे. 'जाय आण तुझ्या जातीवाल्या **सगळ्याह्यले** सांग म्या बलावलं मनावं.' -पाटी.

सगा (वि.) स्वकीय, सख्खा. 'आपला **सगा** सोयरा होय रामभाऊ.'

सगाई (स्त्री.) सोयरीक, आप्तसंबंध. 'सासऱ्या जावयात **सगाई** होऊनही सलोखा अंतरला होता.' -कात.५७२.

सगारत (स्त्री.) सोयरीक. 'लग्नाच्या चाललेल्या गोष्टी ऐकूणच वाटलं ही **सगारत** पक्की होते.' -कात.८४.

सगासोयरा (पु.) स्नेही, सोबती, नातेवाईक. 'सुहृज्जन सासरे। आणीकही **सखेसोइरे**।' -ज्ञा.१.१८२.

सगून (न.) शकून, भविष्यसूचक, शुभाशुभ चिन्ह. '**सगून** पायला कोपरावर तं महादेवाचं निंगलं पाय.'

सग्गं (वि.) सख्खे. 'पुर्षा **सग्गं** पोरगं होय ना रामाचं, सावतर थोळच आये?'

सग्यातला (वि.) सोयऱ्यातील. '**सग्यासोयऱ्यातील** पोरगी असली तं संबंध पटकन जुळते.'

सच्छेल (वि.) खरा. 'काशिराम **सच्छेल** मानूस आये खोटं नाई बोलनार.'

सज (क्रिवि.) सहज. 'सखाराम बापूची बायको काय **सज** म्हणून बोलली होती काऱ्ह.' -खुं.१४०.

सजन (पु.) मित्र, सखा. 'बाले तुलेकाई लाजगीज हाय का नाई? खुलेआम **सजन** घेऊन फिरतं.'

सजनी (स्त्री.) सखी. 'मालनी व मालनी माया जीवाच्या **सजनी/** तुले कसं सांगू बैना...' -वि.

सजा (स्त्री.) शिक्षा. 'नानाजी गावलोकांचं कौतुक करीत, प्रसंगी योग्य तशी **सजाही** देत.' -कावू. (फा.)

सजेल (क्रि.रूप.) सजलेला. '**सजेलधजेल** नवरी रूपवान दिसनारच.'

सजोनं (क्रि.) सजविणे. 'आरतीच्या पयले विठोबाले **सजोनं** चालू होतं.'

सजोयाले (क्रि.रूप.) सजवायला. 'पोयाच्या रोजी सकाऊनच येजा बैलं **सजोयाले**.'

सजोयेल (क्रि.रूप.) सजविलेले. '**सजोयेल** बैल पोया भरला का येकानं येक येतात.'

सट (वि.) १. मासाळलेली, लठ्ठ. 'बापा लयच **सट** पळ्ळे राजा. खानं अन् आराम करनंच हाय वाट्टे.' २. भरपूर. 'उधारित भेटला त हत्ती घेऊन घे/ फुकटाची भेटली त **सट** पिऊन घे.' -नांबै. ३. सारख्या वस्तूंचा समूह. 'आवळला तं कपबशाईचा हा **सटच्या सटच** घेऊन आलो.'

सटकन (वि.) लवकर, घाईने. 'असा हेत मनात धरून आबा **सटकन** उठून उभे रायले.' -सित.१४.

सटकनं (क्रि.) निसटून जाणे. 'बसा बसा' सरपंचानं म्हटलं पण बाई हळूच **सटकली**.' -झेल.८४.

सटकपुंजा (स्त्री.) खरडपट्टी. 'सटवी मले म्हने तुया धंदा गयाठा हाय म्हनून. मंग भल्लीच **सटकपुंजा** काहाळली लौंडीची.'

सटकर (वि.) मोठे. 'आठदहा बकळल्या होत्या. त्यातले दोन **सटकर** बोकळे इकून खाल्ले व्हते.' -सित.४४.

सटकला (क्रि.) निघून जाणे. 'घरात कोंडून ठेवलेल्या मांजरीसारखा तो घराबाहेर **सटकला**.' -पख.५१. २. निसटणे. 'पाय माय, दोर हातातून **सटकल्यानं** बाल्टी इरीतच पळ्ळी.'

सटका (पु.) झटका, फटका, तडाखा. 'येक काळीचा **सटका** देला ठून जोऱ्याचा.'

सटकाऊन (क्रिवि.) जोरात, भरपूर. '**सटकाऊन** जेवन केलं अन् देल्ली तन्नाऊन.'

सटकारनं (क्रि.) ठोकणे, खरडपट्टी काढणे. 'लेकरावर पिरेम करावं अन् टाइमा टाइमानं **सटकारनं** चालू ठेवावं.'

सटकावनं (क्रि.) मारणे. 'बेताबेतानं नांग्या भल्ला **सटकावला** मंग.'

सटकून (क्रिवि.) भरपूर. 'पातोळी तं मी **सटकून** जेवलो गळ्या.'

सटकून (क्रि.रूप.) निसटून. 'हातातून आठानी कुठी तरमा **सटकून** गेली.'

सटकेल (क्रि.रूप.) मार दिलेला. 'गन्या भल्ला **सटकेल** आये म्या एकडाव.'

सटकोनं (क्रि.रूप.) मार देणे. 'आयकत नसीन तं **सटकोन** लौंडीले साजरं.'

सटपट (क्रिवि.) घाईने. 'पावना काहून एवढ्या **सटपट**

उठून गेला म्हनावं?'

सटपटनं (क्रि.) धांदरणे. 'म्या तासला तं गंग्याची **सटपटली** मंग.'

सटपटली (स्त्री.) भांबावणे, धांदरणे. 'तो एकाएकी ओरडल्यानं परभीची **सटपटली**.' -पख.१५४.

सटमासी (वि.) सहा महिने. 'लेकबाय का रोजरोज येते माहेरी, **सटमासी** येते जाते.'

सटरप(फ)टर (वि.) काहीही, किरकोळ, बारीकसारीक, लहान जिन्नस. 'कसई **सटरफटर** खान्यात काय मतलब हाय.' (फा.)

सटरली (स्त्री.) घाबरली. 'कुपातून आवाज आला तं भल्ली **सटरली** माही.'

सटवट (वि.) १. तुडुंब, भरपूर. 'अवघे राजन पान्यानं **सटवट** भरेल आयेत.' २. लठ्ठ. 'पोरगी तं बाप्पा हाळहड्डीनं मस्त **सटवट** पायली.'

सटवी (स्त्री.) देवीचा प्रकार. 'तेवीचि **सटवीचिये** राती। न विसंबिजे जेवी वाती।' -ज्ञा.१८.८३७. 'माय त्यासि व्याली जेव्हां। रांड **सटवी** नव्हती तेव्हां॥' -तुका.५९९. '**सटवीचा** लेखा टयत नाई.'

सटवी (वि.) खाष्ट स्त्री. 'यखादा सेनाचा पवटा सारोयासाठी घिवून ये **सटवेऽऽ** गनाबुडा तावात आला.' 'सासू नटवी, सून **सटवी**.'

सटवी सोबणी (स्त्री.) सटवी देवीची लागण. 'दारकीची पोरगी कशी कांन्नू करायली? तिले जलमताच **सटवी** सोबणी झाली होती.' -वा.६४.

सटसट (क्रिवि.) बलबल. 'टिव्हीवरच्या गोऱ्यापान काट्ट्या पाह्येतात अन् तरनेताठे पोट्टे ते पाहून **सटसट** करतात.' -खुं.११७.

सटारनं (क्रि.) घाबरणे. 'सरप दिसला तसी माही भलती **सटारली**.'

सटारना (वि.) अवाढव्य, प्रचंड, भव्य. 'सरप पायला तं लहान नोता, है सटारन्याचा **सटारना**.'

सटाल (क्रिवि.) १. जोरात. '**सटाल** तुत्याचे झोळपे बैलावर मारले तरमा बैल काई उठे ना.' २. भरपूर. 'बाजार भाज्याईनं **सटाल** भरेल आयेत.'

सटालकन (क्रिवि.) चटकन निसटणे. 'लावता लावता हातातला साबन **सटालकन** सुटकला.' -मे.२.

सटाली (स्त्री.) चालढकल. 'पोरगीई गोरीभराळ मनलं आता काहून रिकामीच **सटाली** कराव?' -भं.३५.

सटासट (क्रिवि.) लवकर लवकर, भराभर. 'माहा चुलत भाऊ घरी आल्यावर **सटासट** शिक्याले लागला.' -मे.११८.

सटी (वि.) सटवी, वेश्या. 'अवं **सटवे** म्हना, माया नवऱ्याले नांदी लावशीन ना तं याद राख.' (अर.)

सटीसामासी (स्त्री.) कधीतरी, क्वचित. 'सहा महिने आणि **सामासामाजि** मासु। उत्तरायण॥' -ज्ञा.८.२२०.

सट्ट (वि.) भरपूर, पुरेपूर. 'जेवन तं **सट्ट** झालं गळ्या. जेवलो तसाच **सट्ट** झपलो.'

सट्टक (स्त्री.) खरडपट्टी. 'आता काई खैर नाई तुमची हेडमास्तर चांगली **सट्टक** काढतात तुमची.' -खुं.१७५. 'त्याच्या ध्यानात हे गोठ आली तं तो माही **सट्टकच** काहाळीन.' -सित.१३२.

सट्टा (पु.) एक जुगार. 'जमीन करनं म्हन्जे **सट्टाच** लावनं हाय राजा.'

सट्टावून (क्रिवि.) भरपूर, पोटभर. 'लांडगा आला **सट्टावून** पेला/ अन् चौकात तमाशा झाला रे झाला.' -नांबै.

सट्टासट (क्रिवि.) काठोकाठ. 'घान जगाची पूर्णा घेवून चालली, **सट्टासट्ट** दोन्ही कुसा भरून पवून रायली.' -पाहु.१०.

सट्टेबाज (वि.) सट्टा लावण्याचे व्यसन असलेला. '**सट्टेबाज** मान्साले घरीदारी गमतच नाई. रोज सट्टा लाव्याले पायजेच.'

सडकनं (क्रि.) मारणे, धोपटणे. 'कर्मचाऱ्यानं झोडलं, जनतेनं **सडकलं/** फेडरेशन सरकारच्या नको तिथं अडकलं.' -जांग.१६०.

सडका (वि.) नासका, कुजलेला. '**सडका** कांदा काई टिकत नाई. बेभाव इका लागते वाट्टे.'

सडकून (क्रिवि.) जोरदार. 'मे महिन्यात **सडकून** तपनाऱ्या जमिनीची आग कमी झाला नव्हती.' -मा.१८.

सडनं (क्रि.) उखळात कांडण करणे. 'मुक्ती पंडितरावच्या वाड्यावर डाळ **सडायला** गेली.' -रा.१७३.

सडा (पु.) १. शेणपाण्याचे मिश्रण शिंपडणे. 'साधी **सडा** घातलाः मग आंगणि रंगमाळिका भरिते असतिः' -ली.१८९. २. नाडा, दोरी, रस्सी. 'सुतईच्या **सड्यालेबी** उभं करत नाईत गावातले.'

सडा (वि.) एकटा, स्वतंत्र, रिकामा. 'देवाच्या देउळात नको जाऊ कधी **सडी/** भावाचा घे बाळ कडी.' -लोक.१९. '**सड्या** फटिंगाले कोनी नाई पुसत.'

सडीसाट (वि.) केवळ दोघे. 'नवरा जाईल तिथं तिला न्यायचा दोघं **सडीसाट**.' -पाटी.

सडेल (वि.) सडलेले. 'जवन पायली. **सडेल** आंबे फेकून देल्ले.' (त.शेडि)

सड्याफटिंग (वि.) बायको पोरे इत्यादी. काहीही व्याप नसलेला एकटा. '**सड्याफटिंग** गणपत गावात आला की

लोकांना आपोआप कळत असे.' -काळी.१९.

सणंग (न.) कापड. 'कुठले नवे **सणंग**, मुरडावयास अंग.' -भीक.६५.

सणतिवार (पु.) सण. 'तूर येईल, कठाण येईल, तेवढ्यात चिल्लर खर्च, येणार जाणार, **सणतिवार** भागला तरीबी व्हते.' -सेल.१२१.

सणसण (क्रिवि.) जोरात. 'वाऱ्याच्या वाफा अंगाला **सणसण** झोंबत होत्या.' -कात.१.

सणसणनं (क्रि.) आग ओकणे. 'कौतिकचे डोळे रागानं **सणसणत** होते.' -धग.६६.

सत (वि.) १. चांगले, खरे, सर्वकाळ, असणारे. २. सत्त्व. 'देव कोन्त्याई रूपात येते अन् मानसाचं **सत** पायते.' -डेबू.२१.

सतरंजी (स्त्री.) सुती बैठक. 'घरात **सतरंजी** टाक पावने येऊन रायले.' (अर.)

सता (स्त्री.) सत्ता, अस्तित्व, प्रभुत्व, अंमल. 'एथयेयाचि सता ते बाईसासिः तैसेचि तेथेचेयाचि **सता** ते तेयासिः' -उली.९३.

सताला (पु.) रुंद तोंडाचे खोलगट मोठे भांडे. 'पंगतीले दोन **सताले** शिराई अपुरा पळला.'

सताळा (वि.) १. बिनधास्त- मोकळे सोडणे. 'दरोजा पायला तं **सताळ** उघळा.'

सतावत (क्रि.रूप.) त्रास देत. 'डोक्यावरचं ओझं जाणवत नव्हतं पण पोटातली भूक मात्र **सतावत** होती.' -झेल.४.

सतावनं (क्रि.) त्रास देणे, दुखः देणे. 'दिवसभर लक्ष्मीची आठवण त्याला **सतावत** राहिली. ' -मोती.३२.

सती (स्त्री.) मृत पतीच्या सरणावर झोकून देणारी स्त्री, पतिव्रता, साध्वी. 'अग्नि रीगेः तरि तीएसि **सतीयांचे** लोक होतिः' -ली.६३१.

सतीसायत्री (वि.) चरित्र्यवान स्त्री. 'बाप्पा! एवढी **सतीसायत्री** हायेस काय लागे.' -ना.५६.

सतोनं (क्रि.) सताविणे. 'मजुरीसाठी गरिबाले **सतोनं** बरं नसते.'

सतोयाले (क्रि.रूप.) त्रास द्यायला. 'तू माया पोटी आला तो का मले **सतोयाले** आला का बाबू.'

सतोयेल (क्रि.रूप.) त्रस्त केलेले. 'मामीनं सुनीले लय **सतोयेल** आये.'

सतोलं (क्रि.रूप.) त्रास दिला. 'या काट्ट्यानं लानपनी मले भल्लं **सतोलं** माय.'

सत्तलावनी (पु.) गंजिफ्याचा एक खेळ. 'परेल खेळाले पैसे नाईत बे मायाजोळ. **सत्तलावनी** खेळतं काय?'

सत्ता (स्त्री.) १. हक्क, अधिकार, मालकी. 'घरादारात अन्नाची **सत्ता** असल्यानं कोनाचं काईच चालत नोतं.' २. पत्त्यातील सात क्रमांकाचे पान. 'त्यानं **सत्ता** टाकल्यानं माया उतार लागला.'

सत्ती (स्त्री.) पत्त्यातील सात ठिपक्यांचे पान. 'किटी खेळताना पंजी, छेक्की अन् **सत्ती** असे पत्ते लावून उतार लावला.'

सत्तू (स्त्री.) गहू हरभरे यांचे भाजून केलेले पीठ. 'काठी ह्मणों नये वेतु। अन्न ह्मणों नये **सांतु**।' -तुका.४५४.

सत्यनारायन (पु.) एक देव, पहिल्या रात्रीची पूर्व तयारी. 'आताचे नवरदेव त इकडं हळद फिटली की तिकडं **सत्यनारायण** करा मनतेत.' -पख.५२.

सदगरम (वि.) समशीतोष्ण, कोमट. 'आंग धुयाले जास्त गरम नाई पानी लागत **सदगरम** असलं का झालं.'

सदमा (पु.) वेदना, धक्का. 'मायबाप येकादमानं मेल्यावर लेकराले **सदमा** पोहचला.' (फा.)

सदर (वि.) सर्व. 'लग्नाले पन **सदर** सोयरे आल्ते.' (अर. सद्र)

सदरा (पु.) कुडत, शर्ट, कोपरी, बंडी. 'अंगात **सदरा** नव्हता. कोपरी ठिकठिकाणी फाटली होती.' -फीर.४२. (का.,अर.सुद्रा)

सदसद (न.) खराब होणे. 'फोळात पानी गेल्यानं **सदसद** झालं.'

सदा (अ.) नेहमी, निरंतर. 'तरि तो सर्वभूती **सदा** सरिसा।' -ज्ञा.९.४०७.

सदाई (अ.) नेहमी. 'त्याच्या पायाले भवरा हाये म्हनून तो **सदाई** हिंडत राह्यते.' -भं.३७.

सदानकदा (क्रिवि.) नेहमी, निरंतर. 'कैसा हा नागदेवोः **सदाकदा** गोसावीया पुढा माझा घालु घालीः' -ली.१८९. '**सदानकदा** पाहावं तं दारू ढोसून येते.'

सदानिभे(बी) (वि.) भागवणारे, निभाऊन नेणारे. 'पण आपण **सदानिभे** कडकीत!' -ल.९.

सदानी (अ.) नेहमी. '**सदानी** नादारी असल्यानं हौसमौस फिटलीच नाई.'

सदोनी (वि.) नेहमी. 'काकी **सदोनी** याले त्याले शादोत रायते.'

सद्रा (पु.) छाती, झाकणारी बंडी. 'आबाले येकच **सद्रा** होता. गावाले जाच असलं का तोच धुये अन् घाले.' (अर.)

सन (न.) सण, सहन. 'तुम्हा गावा जाणे असेः गावा जाः **सणु** करुनी याः' -ली.१३८. 'बाईची जात कितीबी हेडणा **सन** करती.' -खुं.१६५. 'असं तसं बोलनं **सन**

नाई होत मले.' (अर.)

सनंग (वि.) सुंदर. 'पोरगी म्हणाल तर एकदम देखणी. चवथी शिकेल पण **सनंग**.' -काळी.८२.

सनक (स्त्री.) १. कळ, वेदना, तिडीक. 'घागर घेऊन उठाले गेली तं पाठीत **सनक** निंगली वऽऽ बयना.' २. लहर, राग. 'बायका त्याच्याकडे पाहात हासल्यानं पुंजाला याची **सनक** आली.' -पख.११७.

सनक (वि.) खानदानी, सुंदर. 'गणपत पाटलाची मुलगी **सनक** हाय सनक.' -हज.२०.

सनकनं (क्रि.) तापणे. 'ऐकून माहेवालं डोक्सच **सनकलं/** केवढ्याची आली भलतंच भनकलं.' -मिर्झा.११७. 'डोक्सं त भोसडीचं असं **सनकलं** होतं, दोन हानून द्याव वाटे.' -पोळा.

सनकली (क्रि.रूप.) राग येणे. 'पुरषा वरमला, पण आतून त्याची चांगलीच **सनकली** होती.' -ना.४३.

सनकले (क्रि.रूप.) तापले, रागाविले. 'हा वस्तरा की ढोर कापायचा सुरा रे गधड्या? माधवराव **सनकले**.' -काळी.५९.

सनकाडी (स्त्री.) ठिसूळ काटकी. 'संघटित कर्मचारी घेऊन फिरते गाड्या/ शेतकऱ्याचे हातपाय झाले **सनकाड्या**.' -मिए.६६.

सनकाढी(ळी) (पु.) १. एक खेळ, लवकर पेट घेणारी गवताची काडी. '**सनकाळ्यावानी** त्याच्या भावना गेल्या पेटत.' -मिए.१३५. २. ताग, अंबाडी, भेंडीचा वाक काढल्यावर राहिलेली काडी.

सनकी (स्त्री.) रागीट, लहरी. 'सिगारेट फेकावी तशी या **सणकी** माणसानं बायको माहेरच्या कोपऱ्यात फेकली.' -काळी.६१.

सनकून (क्रिवि.) जोरात. 'नानमुखाच्या रोजी अभाय आलं **सनकून/** पाह्यता राजा पानी आलं दनकून.' -मिए.१४७.

सनतिवार (पु.) सण, सणाचे दिवस. 'चार दोन पैशाची मजुरी हातात येईन...**सनतिवार** होतील.' -ए.७२.

सनवार (पु.) शनिवार. 'आवो **सनिवारी** न्हावे म्हणेः आवो बुधवारी न्हावे म्हणेः' -गोवि.९१.

सनसन (क्रिवि.) जोरजोरात. '**सनसन** करत इमान डोक्स्यावरून गेलं.'

सनहरक्या (वि.) उतावळा. 'कारे काई **सनहरक्या** हायरे नवरदेव? केसाईले रंग लावला म्हन्ते.' -लेक.४१.

सनान (क्रिवि.) १. अतिशय वेगाने. 'एकामांगं एक कार्यक्रम दनान/ व्हाले लागली गाडी माही **सनान**.' -मिर्झा.१६३. २. भरभाट असल्याप्रमाणे. 'महादेवचा कारभार अपके **सनान** आये बापा.'

सनान (वि.) खूप सुंदर, भरपूर. 'असी **सनान** सावली पळते झाळाईची की उठ्यालेच मन होत नाई तथून.' -धुम्म.

सनासुदीचे दिवस (पु.) सनाचे दिवस. '**सनासुदीच्या दिसी** असा तमाशा करनं बरं दिसत नाई.'

सनी (अ.) ही, सुद्धा. 'लात मारनं दूर, सादी मान **हालूनसनी** कदी कोनाच्या आंगावर तो डुकावला नाई.' -सित. १२१.

सन्न (क्रिवि.) जास्त तापणे. 'कोपरातल्या पिठाच्या भाकरी थापा, तावा **सन्न** झाला हाय.' -काळी.३६.

सन्नक (स्त्री.) राग, तिडिक. 'हलकट बोलनं आयकून तं लय **सन्नक** आली आपल्याले.'

सन्नकाऊन (क्रिवि.) जोरात मारलेली थापड. 'मले राग आला तं एक **सन्नकाऊन** देल्ली चंद्याच्या होपकाळीत.'

सन्नाटा (पु.) नीरव शांतता, सामसूम. 'थोडावेळ **सन्नाटा** पसरला. कुणीच काही बोलेना.' -सि.११६.

सन्नावून (क्रिवि.) खूप, जोरात. 'वाढ पटकन **सन्नाऊन** भूक लागेल आये मले.'

सन्या (अ.) सुद्धा. 'पावने आले **म्हणूनसन्या** सुट्टीच घेते काय काय आज?' -अंधा. 'तुमीनं त केला चतरेपना-सुयके बैल **सितुनसन्या**.' -सित.१२५.

सपकन (क्रिवि.) एकदम जोरात. 'दाम्याच्या होबाळ्ळ्यात **सपकन** ठेवून देली एक.'

सपकनं (क्रि.) खुंटणे, रोडावणे. 'इचाराइचारात फूट पल्डी की संघटना **सपकलीच** समजा.'

सपका (पु.) हबका, झोडपा. 'गिरजा त्याच्या पाठीवर, पोटावर फोकाचे **सपके** मारत होती.' -पख.४४.

सपन (न.) स्वप्न. 'गोसावी बीजे केलेयावरि तेही एसे **सपन** देखिलेः' -ली.२०९.

सपरी (स्त्री.) पडवी, ओसरी. '**सपरीवरी** आरोगण जालीः गुळुळा जालाः वीडा जालाः' -ली.१६४. 'समोरच्या **सपरीत** चक्की सुरू झाली तसी भराभर दळणं येऊ लागली.'

सपलाई (स्त्री.) सफाई. 'हाय व कांगरी बया काय **सपलाई** करती पाह्यनं बातच.' -अंधा.

सपशेल (वि.) सर्वच, पूर्णपणे, निखालस, एकदम. 'सोयरिक संबंधात काई लोकं **सपशेल** खोटे बोलत रायतात.' (अर.)

सपसप (क्रिवि.) लवकर, जोराने. 'हातातला तुत्या कोपऱ्यात ठेवला/ माझ्या म्होरं बसून **सपसप** जेवला.' -मिए.१५६.

सपस्ट (वि.) स्पष्ट. 'कोळल्या दुकायाचे सास्टोके **सपस्ट**

दिसत व्हते.' -सित.४६.

सपाट (वि.) समतल. 'आणि उदक सहज **सपाट** जाहले॥' -ज्ञा.२.१०७. 'कोणी मांडवाची जागा खाचखड्डे बुजवून **सपाट** करू लागले.'

सपाटपावल्या (वि.) अभद्र, अशुभ. '**सपाटपावल्याचा** पाय पळू देऊ नाई घरात.'

सपाटा (पु.) १. त्वरा. 'सागाच्या बल्ल्या गार्डाची नजर चुकवून गावात विकण्याचा **सपाटा** लावला.' -झेल.५३. 'अस्पृश्ता निवरण्याचा कार्यक्रम अनपळ डेबूनं **सपाट्यानं** सुरू केला होता.' -संगा.६४. 'दात ना दाढा, **सपाटा** गाढा.' २. झोडपा. 'बैलाच्या पाठीवर दोनचार **सपाटे** बसले.' -ना.३४.

सपाटा (वि.) मोठा, अवाढव्य. 'सरप तं लय **सपाटाच्या सपाटा** होता कोनाची माऱ्याची हिंमत ना होये.'

सपाटी (वि.) समतोल असलेली. '**सपाटी** जमीन असली तं पेरनं पटकन उरकते.' (त.शप्पटै)

सपाटून (क्रिवि.) जोराने, वेगाने. 'त्यानं **सपाटून** पायडल मारून रिक्षा रस्त्यावर आणली होती.' -मा.१९.

सपादनं (क्रि.) सामावणे. 'माणसाच्या पोटात तर काहीच **सपादत** नाही बापा.' -सेल.३०८. 'जे काय मुठपसा **सपादलं** ते वटीत टाका.' -लेक.३१.

सपादेल (क्रि.रूप.) सामावलेले. 'नईनवाळी पोरगी पन **सपादेल** आये आमच्या घरात.'

सपासप (क्रिवि.) एकसारखे, सतत. 'बैलाच्या पाठीवर **सपासप** तुत्या हानत बसला.'

सपासपा (वि.) स्पष्ट. 'तुया मनात काय हाय ते **सपासपा** सांग येकडावचं.'

सपूत (पु.) चांगला मुलगा. 'एक **सपूत** पुरला, पन्नास कपूत काय कामाचे हो?'

सप्ता (पु.) सात दिवस चालणारा धार्मिक विधी. 'भजनासाठी एक्क्या, **सप्त्याची** आमंत्रणं यायला लागली.' -मोती.४०.

सप्पा(फ्फा) (अ.) पूर्णतः, संपूर्ण. 'साफ फाटक उघडच. बगिच्यात गाय घुसली. घासा मांगून घास तिनं तुयीबी **सप्पा** केली.' -पाहु.

सप्पाई (स्त्री.) १. स्वच्छता. 'दिवाई जोळ आल्याच्यानं घरादाराची **सप्पाई** केली.' २. चलाखी. (अर.फा.)

सप्ली (स्त्री.) पुरवणी (परीक्षा). 'आमी नापास झाल्यानं **सप्लीले** बस्याची तायफटक करत व्हतो.' -सित.८५. (इं.)

सफर (पु.) प्रवास. 'संसाराच्या **सफरीतला** सरदार मला मधेच सोडून चालता झाला.' -कात.५१२. (अर.)

सफाई (स्त्री.) स्वच्छता. 'ढोमनाभर सयपाक करतो अन् येवळ्या मोठ्या घरादाराची **सफाई** मीच करतो.'

सफाचक (वि.) स्पष्ट. 'गाडगेबाबा **सफाचक** सांगतलं देवपन येनं नाई मान्साले, मानूसपन आलं तरी लय कमावलं.' -धुम्म.

सफाचट (वि.) साफसाफ, स्पष्ट. 'आपून त्या संबंधाले **सफाचट** नाई म्हनलं.'

सफेत(द) (वि.) पांढरा, शुभ्र. '**सफेत** रंगाचा मनिला नाई तरमा लवकर मयते ना.' (फा.)

सफेदी (स्त्री.) शुभ्रता. 'घराले **सफेदी** द्या लागते, लय खदकलं दिसून रायलं.' (फा.)

सफ्फा (वि.) पूर्णपणे, समूळ, अगदी. 'मले इचारलं तं म्या **सफ्फा** नाई म्हनलं.' (अर.)

सबक (पु.) धळा, अद्दल. 'मायसंगं हिडगावते भोसळीचा असा **सबक** दाखोईल म्हना बाप जलमात भुलशील नाई.' (अर.)

सबजी (स्त्री.) भाजी. '**सबजी** नोती तं वरनच टाकलं.'

सबन (वि.) सगळे, सर्व. 'बाबू **सबनझनं** आले अन् तुहा काय लयच दुस्मानदावा हाये काय?' -भं.७०. 'भाऊ बयनी, म्हतारे मायबाप **सबनायची** छबी त्याच्या डोयामवरे आली.' -सित.१५.

सबनसबन (वि.) सर्व, सगळे. 'आमचे **सबनसबन** जातभाई तुमच्या मांगं उभे करतो.' -मे.२७.

सबशिळी(सिडी) (स्त्री.) मूळ किंमतीतील सूट, सवलत. 'सासूच्या मालावर जवाई उदार/ देतो म्हंते तुले **सबशिळी** अधार.' -नांबै. 'फळबाग लावा **सबसिडी** कमवा.' -गाक.५२.

सबर (पु.) अवकाश, सबुरी, धीर. 'एवढी काय घाई आली, **सबर** धरनं आमासक.' (अर.)

सबागत (क्रिवि.) सहज, नुकताच. 'गावा गेला बाई माया मोरनीचा मोती/ म्हुन लागे **सबागती**.' -वलो.२३८. 'कदी आला न्यानू शाम **सबागत** बोल्ला...नेमस्ताच आलो न्यानू.' -सित.५७. 'म्या **सबागत** मनानं सांगतलं, पोरीची लईन चांगली आये.' -ए.८४.

सबाव (पु.) स्वभाव. 'सून चांगल्या **सबाबाची** निंगली.'

सबूत (पु.) पुरावा. 'कोनं कळब्याची चोरी केली याचा **सबूत** भेटला राजा आपल्याले.' (अर.)

सबूर(री) (स्त्री.) धीर, दम, शांती. 'झाले गाल लाल लाल आसू हासले डोयात/ नाई जीवाले **सबुरी** कई निंगीन वरात.' -नांबै. 'भानगडीनंतर पाटलानं त्याला **सबुरीचा** सल्ला दिला.' -पख.३९. 'पेरन्या घाती काहाचीच **सबुरी** नस्ते.' (फा.सऊर,अर.)

सब्बर (वि.) गर्भार. 'काठेवाडी घोडी **सब्बर** झाली होती.' -

भं.९६.

सब्बल (पु.) मोठी पहार. 'वावदळं पाडुनि ठाये। **साबळु** दाहारला आहे। तैसें तिखं तो खायें जें खायवीण रुके।' -ज्ञा.१७.१४३. 'मातीची भीत कुदयीनं नाही खसे दगडावानी टनक/ **सब्बल** नाही धसे.' -मिर्झा.१९.

सभागी (वि.) समाविष्ट. 'नामदेव त्या झमेल्यात **सभागी** नोता.'

सभाव (पु.) स्वभाव. 'चांगल्या मान्साचा **सभाव** पट्टेच पट्टे.'

समज (स्त्री.) १. ज्ञान, आकलन, शहाणपण, बुद्धी. 'पोराले **समज** नाई आली आजून.' २. इशारा. 'म्या त्याले **समज** देली चांगली.'

समजदार (वि.) सूज्ञ. 'भलतीच चूक **समजदाराकून** होनार नाई.'

समजनं (क्रि.) आकलन होणे, जाणणे. 'लोकाईचे वरमच **समजनं** पळतात.'

समजावनं (क्रि.) स्पष्ट करून सांगणे. 'आपून **समजावाले** जावं तं तोच आपल्याले ग्यान शिकोते.'

समजावेल (क्रि.रूप.) समजून सांगितले आहे. 'पोरली **समजावेल** हाय सासूसासऱ्याच्या तोंडोतोंडी लागू नये म्हनून.'

समजोनं (क्रि.) समजावणे. 'रागं भरलं कोनी तं त्याले **समजोनं** आपलं कामच अस्ते.'

समजोलं (क्रि.रूप.) समजाविले. 'सारजानं भोवाचं दुख जानलं. त्याले **समजोलं**.' -सित.१८.

समदं (वि.) सर्व, सगळा. 'तुमी मनान त **समदे** गाठोडे एकटाच नेतो पठ्ठ्या.' -धग.१८.

समन (पु.) समन्स. 'कोर्टाचा कालच **समन** आला मले.' (इं.)

समय (पु.) वेळ, काळ, प्रसंग. 'येवळं शिकूनबी आपल्यावर तं लयच वाईट **समय** आला राजे हो.'

समरत (वि.) श्रीमंत. '**समरत** सोयरा पाहूनच पोरीचा संबंध पक्का करीन मी.'

समशान (न.) स्मशान. 'रात्रिसमयीं **स्मशानातें**। भूतें जैशीं॥' -ज्ञा.३.११३. 'तुयं मळ्ळं डंगडंग करत **समशानात** जावो.'

समाईक (वि.) एकत्र, सर्वांचे स्वामित्व असलेले. '**समाईक** शेती करा अन् वाटनीच्या टाईमाले तुत्यातुत्यानं भांडन करा.'

समागम (पु.) १. सोबत, सहवास. 'नाम तुझे वाचेसि आतुडे। **समागम** घडे संतांचा।' -तुका.६३३. २. संभोग. 'सांडुनिया शाळिग्राम। नित्य वेश्येचा **समागम**॥' -तुका.३९४८.२.

समावनं (क्रि.) समाविष्ट होणे, आत घेणे, व्यापणे, मावणे. 'बीज मोडे झाड होणे। झाड मोडे बीजी **सामाये**॥' -ज्ञा.१७.५९.

समुतपसारा - 'दोन बायकांचा **समुतपसारा** सोळून बुडा चालता झाला.' -सित.७८.

समेट (पु.) तडजोड. 'जादूच्या कांडीनं घडवला **समेट**/ बापूजीची भाईजीसंगं केली भेटमेट.' -मिर्झा.१९९.

समेटनं (क्रि.) एकत्र करणे. 'गव्हानीतले पसरेल धांडे **समेटनं** जाऊन.'

समेत (वि.) बरोबर, सह. 'सदा **समेत** आमी चौघं गेल्तो जत्रीत.'

समोती (स्त्री.) अमवश्या असलेला सोमवार. या दिवशी स्त्रिया नदीवर जाऊन स्नान करतात, त्या दिवशीचा एक विधी. '**समोतीला** पूर्णावर खूप गर्दी असते.' -ना.१.

समोसा (पु.) त्रिकोणी पक्वान्न. 'लय भूक लागली तं हाटेलात जाऊन येक **समोसा** खाल्ला.' (फा.)

सम्द (वि.) सर्व. 'मुक्कामी पाव्हने राह्यले तं आपली तडनड कुठी हाये हे **सम्दं** समजणार.' -खुं.११५.

सम्रित (वि.) समृद्ध. 'जवाई सम्रितानं येऊ केलं काल/ आंबीयाचं डालं पिकून झालं लाल.' -लोक.१४०. '**सम्रीत** सोयरा करणी नाई याच्यापासी/ काय करायचे याचे बारा बैल बारा म्हसी.'

सय (स्त्री.) १. आठवण. 'तोंडात चिवळ्याचा एक घास टाकला आन् मले लेकराईची **सय** आली.' -दि.८०.

सयका (पु.) १. शिश्न ताठ होणे, माज येणे. 'हेला सायाचा **सयक्यावर** येते तरमा म्हशीवर उळत नाई.' २. उर्मी, हुक्की. 'मले पाहून त्याहीले गमतीचा आला **सयका**.' -मिर्झा.१७७.

सयशी (स्त्री.) - 'लोफा **सयशी** पोटुशी रायली.' -सेल.२९.

सयतान (पु.) सैतान, राक्षस. 'चालताना कुस्मे त्या **सयतानाच्या** तोंडाकडे काय पायतं?' -हज.१३.

सय(ह)द (न.) मध. 'काय सांगता गोळाई इच्यामंदी **सहेदाची**.'

सयन (वि.) एक कापडाचा प्रकार. 'हालत बरी असती तं काले **सयनचे** कपळे शिवले अस्ते?'

सयनं (क्रि.) सहन करणे. 'आता कोनाच्यानं नाई पायल्या जात/ ना कोनाच्यानं काई **सयल्या** जात.' -झाली.९.

सयनय (वि.) येथून तेथपर्यंत. 'अथूनतथून **सयनय** आपल्याच वावराचे नंबरं आयेत.'

सयनाट्या (वि.) भव्य, प्रचंड, मोठा. 'सरप पाय केवळा

सयनाट्या निंघेल आये.'

सयपाक (पु.) स्वयंपाक. 'रंधावनात **सयपाक** चालू होता इकळे गप्पाईले ऊत आल्ता.'

सयपाकी (पु.) स्वयंपाक करणारा आचारी. 'येवळ्या मोठ्या पावनेईचं बाईमान्साकून नाई होत **सयपाकी** पायजे.'

सयसय (क्रिवि.) शीवशीवने, कंडू सुटणे, सळसळ, अति उत्साह. 'जवानखून रिकामा रायला त **सयसय** कराले पायते.' -धग.१५०.

सयेद (न.) मध. '**सयेद** रोज सकाऊन चाटलं तं तोतरेपना कमी होते म्हनतात.' (फा.सहद)

सर (पु.) १. गुराचे शिश्न. 'गायीगवारातल्या गायीला किंवा कालवडीला एखाद दोन वेळा **सर** लावून गोऱ्हे संभोगाचा आनंद घेतात.' -खुं.४५.

सर (स्त्री.) बरोबरी. 'ते द्रव्यादियागु कीर होती। परी ज्ञानयज्ञाची **सरी** न पावती।' -ज्ञा.४.१५९. 'याच्या जोळीनं किती बैल फेरले असतीन पन याची **सर** कोनालेच नाई.' -सित.१२१. 'चिचीची सावली चिचीच्या पुरती/ मायबाईची **सर** काय करीन चुलती?' 'या बोटाची सर त्या बोटाले येत नाई.' -लोक.१४९. 'माय बहिनीची **सर** नाही करत सावतर.' -लोक. १४९. 'शंभर नंबरी अस्सल सोन्याची **सर** आजकालच्या नकली सोनपितळाला कशी हो करता येईल.' -कात.४६५.

सर (अ.) १. दूर, बाजूला. 'क्षयरोगी ह्मणे परता। **सर** रोगिया तूं आतां॥ -तुका.३८१०. 'आता धरीन पदरी। करीन तुजमज **सरी**।' -तुका.३७१७. 'मांगं सर नाई तं बैल लात मारीन.' २. सादृश्यदर्शक प्रत्यय. 'मनीले **लालसर** रंगच लय आवळते.'

सरंजाम (पु.) बरोबरीचे सामानसुमान, व्यवस्था. 'पावन्याचा **सरंजाम** चांगला ठुजा.' (फा.)

सरकं (वि.) सरळ. 'बिघडल्या भीमाला **सरकं** करण्याचा निश्चय मनाशी करीत होती.' -धग.१०५.

सरकंसुदीक (वि.) सरळ. '**सरकंसुदीक** मले म्हन, आस्स आडूनलपून काह्यले तीर मारतं रे.' -सि.११३.

सरकत (क्रिवि.) अंतर कापीत, कमी करीत. 'तिकळे बसेल होता तं काशा **सरकत - सरकत** मायाजोळ आला.' (अर.)

सरकन (क्रिवि.) जोरात. 'हात धरून **सरकन** ओळूं बव्हाऱ्यानं.'

सरकनं (क्रि.) बाजूला होणे, पुढे जाणे. 'गाळं येऊन रायलं, बाजूले **सरकनं** जरासक.' (का.सरि, सरिकिसु)

सरकफासा (पु.) विशिष्ट गाठ. 'शेत निंदायचे म्हणून बापूजीनं पैशाच्या पिशवीचा **सरकफास** सैल सोडला.' -कात.१५७.

सरकसुरक (क्रिवि.) मागेपुढे करीत. 'तारखेवर तारखा करून **सरकसुरक/** पदरात पाडले कार्यक्रम झरकझुरक.' -मिर्झा.१६४.

सरकंसुरकं (वि.) सरळ. 'मध्यानं **सरकंसुरकं** काम वांध्यात टाकलं इनाकारन.'

सरका (वि.) सरळ. 'रंगराव उघड्या दाठ्यातून **सरका** अंद्र शिरे.' -मिए.१३६.

सरकातीर (वि.) अगदी सरळ. 'भीमा बानोच्या छातीकडे **सरकातीर** बघत होता.' -धग.१३७.

सरकार (स्त्री.) राज्य, शासक. '**सरकारनंबी** कास्तकाराईले कितीक द्यावं?' (फा.)

सरकी (स्त्री.) कापसाचे बी. 'कापूस वटून आनला अन् घरचीच **सरकी** वावरात पेरली.'

सरके (वि.) चाल करणे, अंगावर जाणे. 'आजकालचे पोरं आंगावरच **सरके** होतात मायबापाच्या.'

सरकेल (वि.) डोक्यात बिघाड, फरक असलेला. 'बुढं जरासा **सरकेल** दिसते काऊन का मंगापासून फालतूचाच कीस पाळून रायला.' -लेक.८३.

सरकोनं (क्रि.) बाजूला सारणे. 'बंडी काहाळताना रस्त्यात जे येईल ते **सरकोनं** पळे.'

सरकोयाले (क्रि.रूप.) बाजूला सारायला. 'पहाळ **सरकोयाले** आपून काय शिरीकुस्न हाव.'

सरकोयेल (क्रि.रूप.) बाजूला सारलेले. 'पोतं बाजूले **सरकोयेल** असल्यानं बचावलं.'

सरगत (स्त्री.) मिरवणूक. 'नवरदेव नवरीची पुऱ्या गावातून डमनीत **सरगत** निंगे आता नाई काळत कोनी.'

सरगुंडे (पु.अने.) सपटाच्या बोटव्यांचा, गव्हल्यांचा एक प्रकार. 'शेवया **सरगुंड्याच्या** ढिगावर दूधतूप अन् आमरस ओतला जाई.' -मोती.

सरघसरनं (क्रि.) खाली कोसळणे, घसरणे. 'शिखरावरून कोसळून खाली झुळझुळ वाहणारे **सरघसरणारे** झरे ओढ्यांना मिळाले होते.' -कात.५४३.

सरजा (पु.) नथीतील टिकेभोवतीचा मोत्यांचा घेर. 'सोळ किस्नदेवा नथ **सरज्याची** मोळ्ळी.' -लोक.१०२. 'पिंजेची नथ नाकी, सरजे खुलविति शोभा.' -भीक.७९. (फा.)

सरत (क्रिवि.) संपत. 'उनायाच्या सुट्ट्या **सरत** चालल्या व्हत्या.' -सित.१३.

सरतं (न.) धान्य पेरण्याचे बांबूचे नळकांडे, मोघण. 'शेवटचे आडतास मंग कसेबसे पेरते/ काही काहीचे तं

म्हणान **सरतेच** बेरते.' -मिए.७७. 'आयुष्याच्या **सरत्यातून** साधली मायची पेरणी.' -गागा.

सरतंपुरतं (वि.) पुरून सरणारा, सरणारा पुरणारा. 'लक्षिमन खाऊनिऊन **सरतापुरता** झाला व्हता.' -सित.८५. 'लग्नाचा सयपाकई बराबर **सरतापुरता** झाला. काहीच कमी पळ्ळं नाई.'

सरतगरम (वि.) समशीतोष्ण. 'पावसानं अंग भिजलं घरी आल्यावर गरम पाण्यानं आंघोळ करसाल म्हणजे असं दुहेरी **सरतगरमानं** ताप वाढवून घेसाल.' -वा.९१.

सरता (क्रि.रूप.) संपता. '**सरता** उनारवाई नत पावसात वाढे' -भीक.४९.

सरतेशेवटी - शेवटी. '**सरतेशवटी** तं मान्साले कायच्यातबी बसा लागते.' '**सरतेशेवटी** किनई दिवा इजूनच गेला.' -वि.

सरतेपुरते (वि.) श्रीमंत. 'आपलं पोट कसं भरीन? आपून काय घरचे **सरते पुरते** हावोत?' -फीर.२२.

सरदगरम (वि.) थंडउष्ण. 'का काही हाये माय तुमचं दोघाचं आदुगर ठरलेलं **सरदगरम**.' -पाटी.

सरदावा (पु.) ओलावा, गारवा, थंडावा, ओल. 'भितीले टेकून नाली असल्यानं **सरदावा** भितीत धावला.'

सरन (न.) सरण. 'लाकूडे आनीलिः **सरण** देईलेः कीड्डी केलीः चौघ खांदी रीगालेः' -ली.३१३. 'एकु दी परसनायकाचा पुत्रू सरलाः...**सरण** रचीलेः वरि घातलाः पाइंती अग्नि पेटवीलाः' -गोवि.२००.

सरनं (क्रि.) १. संपणे. 'आयुष्य सरलें दुणावेल।' -नाथ.८६७. 'तुका म्हणे एका मरणें चि सरें। उत्तम चि उरे कीर्ति मागें॥' -तुका.३१३९.३. 'येवळी वाई झाली का **सरलं** मायं काम.' २. मरण पावणे. 'तव तयाचीए घरीचे एकाधे **सरेः** तयाते गोसावी बोळवीत जातिः' -गोवि.४१. 'राउळा। जिया लेकरूवाते तुम्ही खेळवा ते आजि **सरलेः**' गोवि.८.

सरनं (क्रि.) मागे, बाजूला सरकणे. 'थोळसाक मांग **सरनं** बे. मले बस्ता नाई येऊन रायलं ना.'

सरनाट (क्रिवि.) वेगात, जोरात. 'गोऱ्हे अरकाट, सुटले **सरनाट** नवे दमदार.' -भीक.६९.

सरनी (स्त्री.) वाट, पद्धती, धाटणी. 'मान्साची **इचारसरनी** ठाकठीक असली पायजे.'

सरप (पु.) सर्प. 'तंव सर्पु कुंपावरि तैसाचि असेः' -ली.५६२. '**सरप** काहाचा कन्या होयना माय.'

सरप पावडर (स्त्री.) कपडे धुण्याची पावडर. '**सरप** पावडर नाई तं कपडे कायनं धुवू?'

सरमिसळ (स्त्री.) एकत्रित केलेले. 'बाळापुरात **सरमिसळ** वस्ती हाय.'

सरबराई (स्त्री.) पाहुणचार, आदरातिथ्य. 'साहेबाच्या **सरबराईसाठी** सुका मेवा, फळफळावळं आनले.' -भं.१२७. 'रामराम गुरजी या बसा' त्याइची **सरबराई** करत नाना बोल्ले.' -सित.८५. (फा.सरबराः)

सरबांड (पु.) शेतात घातलेला बांध. 'पानी अळोयाले अथी **सरबांड** टाका लागते.'

सरबांध (पु.) पाणी अडवणारा मातीचा बंधारा. 'त्याने वखर उभा केला. लक्षपूर्वक **सरबांध** पाहिला.' -भं.३५.

सरम (स्त्री.) लज्जित, शरमिंद्या. 'भगत बुवा डाफरे वाटे नाही **सरम**.' -मिर्झा.४६. '**सरम** ठिवाव चोरीछिनालीची, पोटाच्या कामाची नाई.' -धग.४१.

सरमनं (क्रि.) लाज वाटणे. 'असं काई दिसलं तं बाईमान्साले **सरमनं** आलंच.'

सरमसांड्या (स्त्री.) लाज. 'न्हाणीत त्यानं तिचा हात धरला. भिंती **सरमसांड्या** झाल्या.' -डेबू.३२.

सरली (क्रि.रूप.) संपली. 'म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी तेथ **सरली** वारी क्रोधाचीही॥' -ज्ञा.१८.१०६१.

सरवत्ती (स्त्री.) भडीमार, लाखोली. 'तोंडातून शिव्याची **सरवत्ती** सुरू झाली.' -ना.१५.

सरवा (पु.) कापणी नंतर राहिलेले पीक वेचण्याची क्रिया. 'पोरांकडून **सरवा** वेचवायची पऱ्हाट्या गोळा करवायची.' -धग.५२.

सरशी (स्त्री.) यशस्वी. 'पाहतापाहता बायकांच्या मनाची **सरशी** होऊ लागली होती.' -झेल.८२.

सरस (वि.) श्रेष्ठ, उत्कृष्ट. 'लाल्या पांढऱ्या बैलाऊन **सरस** आये कामाले.'

सरसर (क्रिवि.) भरभर. 'गवतातून सरप **सरसर** निंगून गेला.'

सरसरून (क्रिवि.) भरभरून. 'तिच्या आंगावर **सरसरून** भीतीनं काटा उभा राहिला.' -पख.५४.

सरसा (वि.) १. अधिक, च्यापेक्षा चांगला. 'ऐसिये **सरिसिये** भूमिके। समाधि राहे॥' -ज्ञा.६.६. 'हातात, ताब्यात कई येईल घरचा वाटा होईल **सरसा**.' २. बरोबरीचा, सारखा. 'इये तिन्ही तयापरी। **सरसींच** सदा अवधारी।' -ज्ञा.२.१५५. ३. जय.

सरसा (अ.) १. सोबत. 'एकी सामान्य स्त्री असेः एकाचे कवडे खायेः तो मरे तेया **सरीसि** अग्नि रिगेः' -ली.६३१. 'गूई आन अन् हाता **सरसा** च्याबी आन.' २. पुढे. 'आता दळभार आपुलाले। **सरसे** करा॥' -ज्ञा.१.१२१.

सरसावनं (क्रि.) पुढे जाणे, वाढणे. '**सरसावले** सुख कैसा चाळा एके ठायी।' -तुका.४५९.

सरा (क्रि.रूप.) सरकावे. 'तव एकाइसे म्हणीतलेः ''**सरा** ओ परतीः पंडित भूकाळूः पीत करपैलः' -ली.१९१. 'मांगं **सरा** पोरं हो, म्हैस बोकांडली आये.'

सराईत (वि.) निपुण. 'हे आंधळे अगदी डोळस माणसासारखे **सराईतपणे** कसे व्यवहार करतात?' -फीर.१३२.

सराऊ (न.) मडके झाकून ठेवण्याचे मातीचे पसरट भांडे. 'नवे **सराउ** सगडे वरि ठेवीलेः' -गोविं.८९/२२.

सराटा (पु.) १. काटेरी झुडुपी गवत. 'आंब्याचे डाखोये, **सराट्याचे** काटे पाट्या जवळ मांडले.' -ना.१५३. २. उलथणं. 'तव्यावरची भाकर उलथविताना... माय हातात **सराटा** घेई.' -गाआ.३४. 'पोया लाट, **सराट्यानं** त्यांचे बारीक तुकडे कर.' -धग.३७.

सराद (न.) श्राद्ध. 'आता तीर्था जाओः मग तीर्थी **श्राध** करूः' -गोवि.८२. 'लक्ष्मीचं वरीस **सराद** झालं. घर एकदम सुनंसुनं वाटू लागलं.' -मोती.

सराप (पु.) शाप. 'आपल्या कुळाला कोण्या दैवताचा... पितराचा **सराप** लागला असीन.' -एक.

सराय (स्त्री.) धर्मशाळा. '**वंकारेसराले** सरायमंदीच उतरतो आमी.' (फा.)

सरावन (पु.) श्रावण. 'त्याचा भाव ऐकून **सरावननं** त्याला तटकतोड नकार दिला घ्यायला.' -पाटी. '**सरावन** मयन्यात सारं कसं हिरवगार असते.'

सरावनं (क्रि). सवय होणे. 'पऱ्हाटीच्या बोंड्या खाले बैल लयच **सरावला** आये बेटा.'

सरासरी (स्त्री.) साधारण प्रमाण. '**सरासरी** आठ पोते सोयाबीन झालं.' (फा.सरासरी)

सरी (स्त्री.) स्त्रियांचा दागिना. 'दिसे सोनियाची जैशी **सरी**। नातरी प्रकाशजळाची झरी।' -ज्ञा.६.२८६. '**सरीसाठी** गावभर फिरी.' (का.सरिगे,फा.)

सरी (वि.) सर्व. 'लेक गरिबाची मायी होती देली मोठ्या घरी/ नोती कायचीच कमी होती **सरी** बरोबरी.'

सरुधरू (क्रिवि.) अस्थिर, खालीवर. 'तिला आपल्या बापाची शरम वाटून मन **सरुधरू** होत असे.' -कात.२१३.

सरे (क्रि.रूप.) संपणे, शेवट होणे. 'आणि समुद्रीं वोघाचें जाणें। **सरे** लाणीपासीं धावणें।' -ज्ञा.१८.४७५. 'चातकाची चिंता हरली जळधरें। काय त्याचें **सरे** थोरपण॥' -तुका.४०१७.२.

सरेआम (वि.) सर्वत्र, खुलेपणाने. '**सरेआम** जो तो कास्तकाराचीच थट्टा करते.'

सरोता (पु.) अडकित्ता. 'सुपारी फोळाची असन तं **सरोता** लागते.'

सरोदी (पु.) भविष्य सांगणारी जमात. '**सरोदी** भईष्य सांगते ते का खोटं ठरते का बाई?'

सर्क (वि.) सरळ. 'आळवंतेळवं करू नाई काम **सर्कसुर्क** केलं पायजे.'

सर्कवर्क (न.) सरळसरळ. '**सर्कवर्क** सांगनं मंग काहाले गेली ते?' -पख.२९.

सर्कसुदं (वि.) साधेसरळ. '**सर्कसुदं** सांगावं बापा, असं आडवंतेडवं बोलून काय फायदा.'

सर्द (वि.) थंडगार. 'कळबा पेटल्याचं आयकून तं मी **सर्दच** झालो.' (फा.)

सर्दी (स्त्री.) १. थंडी. २. पडसे. 'नाक धरलं लय **सर्दी** झाली. आंगबी कनकन करून रायलं.' (फा.)

सर्रकन (क्रि.) झटकन, एकदम, सर्रकन आवाज करीत. '**सर्रकन** पोतं ओळ्याले मी काय जवान रायलो आता.' 'सरप **सर्रकन** या भगदाळात जायेल आये.'

सर्रावनं (क्रि.) पुढे होणे, सवयीचे होणे. 'चोरी कऱ्याले चोर तं **सर्रावलाच** असते.'

सर्रास (अ.) सदैव, नेहमी. 'पेट्रोलमध्ये रॉकेलची **सर्रास** भेसळ केली जाते खुलेआम.' -गय. 'नाही वाट कोणा, बंद झोपा उघडा **सर्रास**.' -भीक.७१. (फा०)

सर्वसाधारन (वि.) सर्वांसारखा लागू होणारा असा. '**सर्वसाधारन** पोरगं पाव अन् उजवून टाकावं लेकीले.'

सर्वा (पु.) वेचा झाल्यानंतर राहिलेले कणसे, घाटे इ. वेचणे. 'येतीन नं **सर्व्याचे** उडीद. करू कोरुडे थोडेथोटुके तरी.' -रा.२५.

सर्वासापा (पु.) - ? 'लोकायच्याचसाठी बुडल्यावर कुठला आला **सर्वासापा**.' -ऊन.१७३.

सर्व्याईपक्षी - सर्वांपेक्षा. 'भगतसिंग, राजगुरूनं **सर्व्याईपेक्षी** तो मोठाच मानला.' -धुम्म.

सल (न.) शल्य, काटा. 'बहूला अनंद झाला. तिचे दुसरे **सलही** जागे झाले.' -सेल.१८७.

सलग (वि.) सरळ, अखंड, बिनजोड. '**सलग** सोयाबीन पेरलं. मंदात तुरीचं तासबी नाई टाकलं.'

सलगी (स्त्री.) दाट परिचय, मैत्री. 'हे **सलगी** म्यां म्हणितलें। चरणां लागोनि॥' -ज्ञा.१.६३. (का.सतिगे,त.शलिगै)

सलटवनं (क्रि.) मार्गी लावणे, ठाकठीक करणे. 'भास्करराव नानाच हायेत आपले वकील **सलटवतात** ते बरोबर.'

सलदी (वि.) लुगड्याचा एक प्रकार. 'अहुळी मरणाची जन करिती **जलदी**/ बाई पातळ पिवळे आणा म्हणती **सलदी**.' -लोक.८३.

सलनं (क्रि.) बोचणे, टोचणे, खुपणे. 'अशा गोठी आपल्याले **सलतातच** राजा. इज्जतीनं राव मान्सानं.'

सलसल (क्रिवि.) मस्तावणे. 'पह्यले त भल्लं **सलसल** कराचं/ खुर्ची भेटली का पलपल कराचं.' -मिए.५९.

सलाई (स्त्री.) नक्षी नसलेली काचेची साधी बांगडी. 'पुढच्या वेळेस तुमच्यासाठी **सलाई** आनीन मी. ज्या रंगाची साळी त्याच रंगाची **सलाई** बांगळी.' -तित.३२.

सलाख (स्त्री.) लोखंडी बार. 'बंडीच्या खुटाळाईत **सलाखच** ठोकेल रायते काईकाई गावईनं.'

सलाम (पु.) प्रणाम. 'रुसला गुलाम। धणी करीतो **सलाम**॥' -तुका.४३५५. (अर.)

सलामत (वि.) सुस्थितीत, सुरक्षित. 'या तुफानातून **सलामत** तरून जाण्यास त्यास काडीचाही आधार नव्हता.' -कात.६२२. (अर.)

सलामती (स्त्री.) सुरक्षितता, सुखरूपता. 'पोरीची **सलामती** कयली की जीवाले बरं वाटते.'

सलामी (स्त्री.) प्रथम सामना, वंदन, नमस्कार. 'ती नणंदेचे दर्शन घ्यायला आली. **सलामीलाच** कौशीने तिला चिडविले.' -ऊन.७०.

सलायलं (क्रि.रूप.) सलू लागले. 'येस्यानं अंगावर घेतलेलं गावकामदारकीचं काम तुया डोयात **सलायलं**.' -वा.६०.

सलायली (क्रि.रूप.) सलू लागली. 'रमीची साळी तुया डोयात काबा **सलायली** राधे?'

सल्याच्या लेंड्या (पु.) सरड्याची विष्ठा. बैलाचे पोट फुगल्यास **सल्याच्या** लेंड्या आणि हिंगणाच्या मुया शनिवारी, रविवारी देतात.

सल्लामसलत (स्त्री.) विचारविनिमय. 'तीन भाऊ एकत्र बसून खेळीमेळीने **सल्लामसलत** कधी झाली नाई.' -फीर.१६८.

सल्ला (पु.) १. मार्गदर्शन, उपदेश, विचारविनिमय. 'आपून लोकाईले **सल्ला** द्याले जावं तं लोक आपल्यालेच वकील म्हनतात राजा.' २. मोठी आंगठी. श्रीमंती डोली, करि सोनेरी **सल्ले**.' -भीक.५३. (अर.)

सल्लावान (वि.) १. रागीट, भांडखोर. २. सुंदर, आकर्षक. 'काजनं कोन व्हय?..बाकी दिसते **सल्लावानच**.' -ना.१२३.

सल्ले (पु.) १. मुद्रिका, अंगठी. 'म्हणे भाऊ सोनाराला **सल्ले** घडव सोनेरी/ बोले रागात वयनी करा लेकरे भिकारी.' -लोक.३०.

सल्लं (वि.) सडलेले, क्षुद्र. 'काहाचा व भाऊ, **सल्लं** लुगळं तं नाई घेत दिवाईले.' (फा.)

सव (स्त्री.) संवय. 'कोण्ही म्हणेः मज काइसेयाची **सवेः** कोण्ही म्हणेः मज काइसेयाची **सवेः**' -ली.७४. 'तुमची मज लागली **सवे**। ठायींचे नवे नव्हों गडी॥' -तुका.२३५. 'त्याइले उपाशी रायाची **सवच** आय.' -खुं. 'अन **सवच** असा वरतून बघतसे सखा निरखून गं.' -अ.८४.

सवंगडी (पु.) जोडीदार, सोबती. 'भिमा माया **सवंगडी** असूनबी माई बदनामी केली लेकानं.' (का.संगडि)

सवंगले (क्रि.रूप.) कापलेल्या. 'जवळच **सवंगलेल्या** शेतात उगवलेल्या हरळीत इजारदाराची तट्टे चरत होती.' -कात.५०२.

सवंगीन (क्रि.रूप.) खुडून, कापून काढीन. 'घेईन हाती गळे मी विळा **सवंगीन** हा होता पिवळा.' -भीक.१००.

सवकनं (क्रि.) चट, सवय, गोडी लागणे. 'चोरून दूध प्याले माजर लय **सवकली** आये.' (फा.)

सवकले (क्रि.रूप.) चट लागणे. 'तिच्या नाजूक ओठांची गोड कलमी फोड चाखावयास तेही **सवकले** होते.' -कात.१९३.

सवखुसी (स्त्री.) स्वखुशी. 'थंडागार वारा **सवखुसीनं** आंगाले गुदगुल्या करत व्हता.' -सित.६०.

सवच (अ.) काही, लगेच दिवसात. 'नागानं लावला डोया, **सवच** आला पोया.' -लोक.१५२.

सवड (स्त्री.) फुरसत, मोकळा वेळ, विश्रांती. 'जीव द्याले **सवड** नसते बगाईतदाराले.' (का.सवडु)

सवत (स्त्री.) सपत्नी. 'वेदांत म्हणे मज हे। **सवती** जाली॥' -ज्ञा.१६.२३५. '**सवतीचे** चाळे खोटे। म्यां जावेंसें इला वाटे॥' -तुका.४१९८.११. 'फुगडी फू **सवती** माझे तू।' -तुका.१५१. '**सवतीसवतीचं** भांडनं अन् राहून गेलं कांडन.' (का.सवति)

सवतयनं (क्रि.) चटणी तेलात गरम करणे. 'भाजी नोती तं मायनं चुलीवर चटनीच **सवतयनं** चालू केलं.'

सवतसळ (स्त्री.) सवतीमत्सर. 'दोघीतील पहिल्या बहिणीच्या नात्यावर **सवतसळाने** मात केली.' -सेल.५३.

सवता (वि.) निराळा, स्वतंत्र, स्वतः. 'म्या **सवता** डोयानं पायलं ना भाऊ दोघाले.'

सवदा (पु.) किराणा. 'चारान्याचा **सवदा**, येरझारा चवदा.'

सवय (स्त्री.) सराव, राबता. 'ऐशी मज **संवई** लावी निरंतरी।' -नाथ.१६२३. 'अबोल्याची **सवे** लावुनिया मना। फाको नेदी गुणा ऐले करू॥' -तुका.७९९.

सवरात(द) (स्त्री.) चोचला, हौस. 'बाप म्हणते परातीत चहा पियाव. कपबशाचा **सवरात** करू नयेः' -खुं.१२८.

सवलत (स्त्री.) सवड, सूट. 'दोन मयन्याची **सवलत** द्या, मी तुमचे समदे पैसे देतो.'

सवळं (न.) सोहोळे, उत्सव. 'पंधराव्या दिसी बामनाले देली

गाय, गोऱ्या राधिकेच्या घरी रानीचे **सवळे** हाय.' -लोक.१७५.

सवस (क्रिवि.) लगेच, त्वरित. 'शेजीचं देनं अन् **सवस** घेनं.'

सवसांज (स्त्री.) संध्याकाळ. 'तू झाकड पडल्या पडल्या **सव सांजीच** शाळेत दाखल होतू.' -निशा.२३.

सवा (पु.) सोया, कपाशी, तूर, कडब्याच्या दोन ओळीतील अंतर. 'तीन हाताच्या **सव्यावर** कपाशीची झाडं कंबरेएवढी वाढली होती.' -अंधा.

सवाई (स्त्री.) सव्वापट, जास्तीचे. 'तेही गाई दोहिलियाः **सवाया** दुध दोहिलेः' -ली.६०. 'चांभाराचं धोरण त्याच्या बापापेक्षाही **सवाई** वरचढ होतं.' -पख.१०१.

सवागज (वि.) सव्वा गजाचे मोजमाप. 'लागता तहान नाही पाण्याचा कुठं खोज/ वाटेत बहिणीसाठी खोदे झरा **सवागज**.' -लोक.५१.

सवागत (न.) स्वागत. 'नवरानवरीचं **सवागत** कऱ्याम्हून झानू आज्याच्या सपनाचा इचकइंदाना झाला.' -सित.१२०.

सवाद (पु.) स्वाद, चव. 'अभुकेचे अंगी चवी ना **सवाद**। मिथ्या ऐसा वाद दुराग्रह।' -तुका.३२२३.२. 'सारं पुसतापुसता तिनं चंचोई सोळली, इळा **सवादाचा** केला चोच राघोची रंगली.' -पाहु.१६. 'धळ बोला चालाचा तं **सवाद** नाई अन् गोठी करते मोठा.'

सवान (वि.) समतल, समस्थल. 'उकरडा खणीतलाः अवघा फेडिलाः **सवानु** केलाः झाडिलाः' -ली.७०. 'वखरवाही केल्यानं ढेकलं फुटून माती **सवान** झाली होती.' -कात.९५. 'कसारीण बाई आंथर **सवाण** गोणा लेती चुडा लेकी सुना.' -लोक.४४.

सवायेक (वि.) एक, सव्वा इ.. 'तरी किती रोटी?ः **सवाएकी**ः' -ली.१८५.

सवार (पु.) स्वार, आरूढ. 'सारे झाले मंग घोड्यावर **सवार**/ श्रीमंताचे पोरं मीच होतो खवार.' -मिर्झा.१७३.

सवारनं (क्रि.) १. सुशोभित करणे, शृंगारणे. 'राहण्याची नाही गोडी **सवारली** आता गाडी.' -भीक.१०८. २. **सावरणे**. 'आकोडे झाले ढिले, बाईच्या मामानं **सवारले**.' -लोक.५०.

सवारात - ? 'गुंडाचा **सवारात** पुरवे चंबुला हात/आवड.' -लोक.७५.

सवारी (स्त्री.) १. अश्वारोहण, वाहनात बसलेला. 'पाऊसपानी उतरलं तं दोनचार **सवाऱ्या** भेट्टे.' (फा.) २. अंगात येण्याची क्रिया. 'बारकूच्या आंगात चंदनशेषाची **सवारी** आली होती.' -सेल.२२२.

सवाल (पु.) प्रश्न, समस्या, विचारणा. 'आपून भोळ्या मनानं इच्याराले जावं तं तेच आपल्याले **सवाल** करत रायते.' (अर.सुआल)

सवालजबाब (पु.) प्रश्नोत्तर. '**सवालजबाबाची** लावनी असली का मले लय मजा वाटे.'

सवासीन (वि.) सुवासिनी, सौभाग्यवती स्त्री. 'बाईल **सवासिण** आई। आपण पितरांचे ठायी।' -तुका.८३.

सवी (स्त्री.) शिवी. 'एकु दी तिचेनि भ्रातारे मारीलीः आणि **सवी** दीधलीः जाय नीदैवाचे नीदैवेः' -गोवि.१५६.

ससं (न.) ससा. '**ससं** झुडुपातून निघून जीव घेऊन चिंगाट पळायचं.' -झि.९७.

ससना (पु.) - ? 'कोंबड्यासाठी घरातल्या खांबाला **ससना** करावयाचा होता.' -झेल.१५.

ससरा (पु.) एक शिवी. 'कोन बोलला रे तो **ससरा** असं?'

ससरीचा (वि.) व्यभिच्यारी स्त्रीच्या मुलासाठी वापरलेले शिवराळ संबोधन. 'नोका करू भारतमायची येवळी मोठी हानी/ **ससरीचे** हो मरान तं भेटनार नाई पानी.' -नोका.

सस्ता (वि.) स्वस्त. 'माहा बाप मोठा **सस्ता** झाला उठल्यासुटल्या तोंडी लावाले.' -मा.१८. 'कापूस झाला **सस्ता** वाळले कपळ्याचे भाव/ लोक करतेत कावकाव.' -नांबै.

सहान (स्त्री.) एक दगड. '**साहानेवरि** चंदन होतेः तेयाचा गोसावी आपणेयासि आडा रेखवीलाः' -ली.४४६. 'कुऱ्हाडीले धार लावासाठी **सहानीवर** घासा लागते.' (का.सनि)

सहायता (स्त्री.) मदत. 'पोरीच्या लग्नात तुमची **सहायता** लागीन पाहा.'

सहारा (पु.) आधार. 'आमी तं काकाच्या **सहाऱ्यानच** लानाचे मोठे झालो.'

सही (स्त्री.) १. बरोबर, मान्य. 'आज त्याने जे केले ते सारे मालकाला **सही** आहे.' -कात.५०६. (हिं.) २. स्वाक्षरी. 'हिसावाटीच्या कागदावर म्या **सही** केली.'

सहीसलामत (वि.) सुस्थितीत. 'येवळ्या मोठ्या भांडनातून आपून **सहीसलामत** सुटलो लेक.'

सहेद (न.) मध. 'नाही कयेत **सहेद** असते सर्पाच्या होटाले.' -काया.. 'माय बोलते त कानात कसं **सहेद** झरते.' -डेबू.१३.

सळक (स्त्री.) १. शिलक. 'बोटात धांड्याची **सळक** घुसली.' २. सडक, मार्ग. 'गावची **सळक** रातंदिवस वायतीच रायते.' (का. सुळुक, अर. शरक)

सळघान (स्त्री.) अस्ताव्यस्त होईल एवढे पुष्कळ. 'आंबेच

आंबे **सळघान** आंबे. कितीही खा चोखा चाखा.' - डेबू.५५.

सळवा (पु.) मोहाची फुले सडविणे. 'दारू काढण्यासाठी मोहाचा **सळवा** घाला लागते.'

सळा (पु.) १. सडा. '**सडा** घालीः चौकरंगमाळिका भरीः' - ली.५८५. 'घागरी भरूनि आणीतलीः सेन आणिलेः मग कोण कोणटे चौक झाडीलाः मग **सडा** घातलाः' - गोवि.१९३. '**सडे** संमार्जन हें माझें कारणें।' -नाथ.१२४५. २. दोरीचा तुकडा. 'अशी कास्तकारी करून काय फायदा लेका, धळ सुतईचा **सळाबी** सापळत नाई.'

सळा (वि.) १. एकटा. 'माता म्हणीतलेः **सडीए** आइतीसी पाठवाः' -ली.२०. 'लगन झालेल्या मान्सानं असं **सळ्यासारखं** ना फिरावं.' २. विपुल, खच. 'आकाश असे आसुडत। तेथ **सडा** होत। नक्षत्रांचा॥' -ज्ञा.१.१५६. 'कां मोतियांची जैसी जाती। सोनयाही मान देती। नातरी मानवती। अंगेंचि **सडी**॥' -ज्ञा.१८.१७३९.

सळेल (वि.) कुजलेला. 'डब्ब्याच्या मांगं काईतरी सळ्ळे वाट्टे. निऱ्हा **सळेल** वास येऊन रायला.' (त.शेडी)

सळ्ळा (पु.) सरडा. 'बुढईची भूक तुमची, अख्खा मिरूग रिचोते/ रंग **सळ्ळ्याचा** घिऊन चोर शावात फिरते.' - नांबै.

सळ्ळी - १. सडलेली. २. कपदार्थ. '**सळ्ळी** नारयाची दोरी मले राहे हिनावत/ राती खिनभर तिले नाई अंतरलं गात.' - वि.

सळ्ळ्या - थुतराचं वि. एक शिवी. 'लात मारतं तू **सळ्ळ्या** थुतराचे.' -ना.५७.

संग (न.) युद्ध. 'बसं झालं असतं जर मेलो असतो **संगात**.'

संगं (पु.) समागम. 'नारीनं केला **संगं** नाही पाहेला जातीचा/ कुंभाराच्या दारी दिवा जळतो मातीचा.'

संगं (अ.) सोबत. 'ऐसे केतुले एक दीस गोसावी तया सांघाते बीजे केलेः' -ली.३६. 'तंव गोसावी बीजे करीतिः लेकरुवां सांघाते खेळतिः लपेतिः' -गोवि.१२. 'म्हणती भलाभला हरी। तुझी **संगती** बरी।' -तुका.१४८. 'एकदा जीव वाचवल्यावर **तुह्यासंगं** दुस्मानदावा थोडाच करीन तो?' -पाटी. '**त्याच्यासंगं** शिकाले, पोरगा हाय मापला.' -मिए.२७.

संगंमंगं(घं) (क्रिवि.) सोबत, एकत्र, मित्रत्वाने, स्नेहाने. 'नाही काय मंत? येनं दोन घास **संगंमंगं** खाले.' -धग.२५. '**संगमंग** भिजल्यानं पाय घसरला होता.' -वि. 'रघूले नेवाव म्हणलं **संगंमंघं** म्हैस वढ्याले.' -रा.१५.

संगजीरं (वि.) मऊ, पांढरा- दगळ. 'सहज कारण्यास सोपा असा फक्त **संगजीऱ्याच्या** दगड असतो.' -कात.११५.

संगट (स्त्री.) सोबत. 'आपल्या **संगट** बुढ्यानं घासलेटची डबकीई नेली.

संगत (स्त्री.) सोबत. 'तुझे **सांघाती** तुझी वाट पाहत असतिः' -ली.१८४. 'तुका म्हणे लावीं संताचा **सांगात**। जेथें न पवे हात कळिकाळाचा॥' -तुका.९३०.४.

संगतगून (पु.) सहवासाने येणारा गुणदोष. '**संगतगून** मान्साले लागतातच राजा.'

संगतीसोबती (पु.) दोस्त, मित्र. '**संगतीसोबती** दोस्तमित्र असले का पितात लेकाचे बिळीमिळी.'

संगनमत (न.) परस्पर साहाय्याने केलेला बेत. 'दोगातिघाईच्या **संगनमतानं** काम काहाळलं आपलं.'

संगभरं (पु.) सोबत. '**संगभरं** पूल वलांडत व्हतो आम्ही.' - ऊन.६५.

संगमंगं (वि.) सोबत. 'रोज जावो शाळेत आमी **संगमंगं**.' - मिर्झा.४९.

संगय(ळ)नं (क्रि.) सांचणे, एकत्र येणे. 'बैलायच्या ढोपराजवळ पाहय किती शेण **संगळलं**?' -पख.९५. 'थोळसकथोळसक करूनकरून सोनं लय **संगयलं**.'

संगळला (क्रि.रूप.) साठला. 'दोनतीन वर्सातच तर **संगळला** गेला. आता एका जोडीचं वहीत हये त्याचं.' - सेल.११६.

संगळले (क्रि.रूप.) साठविले. 'जीव मारूनमारून जोळ किती पैसे **संगळले** आसतीन असे?'

संगळा (पु.) गोळा, जमा. 'बखाड पडती तव्हा आपून कसंबी **संगळा** होयेल पाणी पाजून पिकं तगवतो.' -खुं.६२.

संगात (स्त्री.) सोबत. 'बरं झालं जर मेलो असतो **संगात**.' - मिर्झा.१९७.

संगीन (वि.) १. बंदुकीचा एक प्रकार. २. मजबूत. 'तुमची जोळी काय **संगीन** आये हो!' ३. भयंकर. 'खुनाचा **संगीन** आरोप आय गनशावर.' (फा.)

संघीन (वि.) सुंदर. 'दांडी भारुनिया नंगीन/ तिफन दिसे **संघीन**.' -लोक.८४.

संटे (वि.) एक एकटे. 'मी अन् हा नानू राहू दोघंऽऽ **संटेऽऽसंटे**, पहा एखादे घर.' -झेल.७३.

संट्या (वि.) पत्नी, मुलाबाळांचा व्याप नसलेला. 'बुढाबुढी मेलती एकटाच होता **संट्या/** गावात फिरे डरकत जसा भिलाचा तंट्या.' -मिए.१५१.

संड (वि.) लठ्ठ. 'अंगात मावत नाही एवढं तर **संड** बोकड्यासारखं अंगावर मास आहे.' -कात.८५.

संडमं(वं)ड (वि.) लठ्ठ. 'बापा केवळ्याची आनली जोळी लयच **संडमंड** दिसून रायली?'

संडाल (वि.) पुरेपूर, काठोकाठ. 'पान्याचा हौद **संडाल** भरेल आये. पाजून घ्या ढोरं.'

संततीबिंतती (स्त्री.) अपत्य, पोरवळा. 'बुवा गेला ते काही **संततीबिंतती** मागे ठेवून गेले नाहीत.' -काळी.८१.

संतरगुल्ल्या (वि.) रंगेल, मौजमजा करणारा. '**संतरगुल्ल्या** जीवाले संसाराचं काय घेनंदेनं असते?'

संतान (न.) अपत्य, मुलेबाळे. '**संतान** चांगली निंगली का पालट्टे भाऊ मान्साचं.'

संदल (न.) पिराचा उरूस. 'समोर चालते मुस्लिमाच्या **संदलाची** घोडी.' -मिर्झा.१९. (अर.)

संदुरी (स्त्री.) मीठ. 'इकळे पतरवाई टाक. **संदुरी** वाढ. कोनी उदक आना बे.' -डेबू.४३. (सं.सामुद्रम)

संदूक (स्त्री.) पेटी, पेटारा. 'म्हातारा ताणंताणं **संदूकावरून** उठला अन् तरातरा चालू लागला.' -धग.९४. (अर.)

संदूर (न.) मोटेच्या पलीच्यावरील मोठे चऱ्हाट. संदोर.

संदेसा (पु.) निरोप, बातमी. 'बुढ्याच्या बिमारीचा कालच **संदेसा** आल्ता.'

संधान (न.) योजना, उपाय योजना, तरतूद, वशिला. 'मांडिले विंदान ख्याल सुखाचे **संधान**।' -तुका.३९४.

संधी (पु.) योग्य वेळ, अवसर, अवकाश. 'पान्यावर पानी चालू होतं ना पेऱ्याचीबी **संधी** नाई भेटली औंदा.'

संपत (स्त्री.) संपत्ती. '**संपत** थोडी, बहू पोटी पुत्र, पाठी भाऊ.' -लोक.३२.

संबंध (पु.) १. नाते. 'तैहूनि तुज मज तुटला **संबंधु**।' -नाथ.१२५४. २. सोयरीक. 'किस्नाच्या पोरीचा **संबंध** काल पक्का झाला.'

संबंधी (वि.) जोडून, नात्याचे. 'सावरकर आमचे **संबंधीच** हायत राजा. सख्खी मावशीच हाय सावरकराले देल.'

संबर (अ.) समोर, पुढ्यात. 'देव कोन्या रूपानं आपल्या **संबर** येईन काही सांगोत नाई.' -डेबू.२१.

संबार (पु.) कोथिंबिरी. 'ते बाइसालागि **सांबारु** आणितिः' 'बटिकाः जाए पाः तेल घेउनि एः **सांबारू** घेउनि ए होः' -ली.२०८. 'वावरात धने पेरा लागतीन. बरा **संबार** होते घरचाच.'

संबुडेरा (पु.) फुगोरा. 'हातापायाच्या काळ्या पोटाचा **संबुडेरा**.'

संमंध (पु.) नाते संबंध. 'आपून मऱ्यात ना जित्यात हा काय म्हनून आपल्याले संमंधात घालते **मंधात**?' -सित.८५.

संवरनं (क्रि.) नटणे, शृंगारणे. 'लताले **सजनंसवरनं** तेवढं आवळते.' (का.)

संवसारिक (वि.) प्रापंचिक. '**संवसारिक** मान्साले कुठी शौकपानी करता येते?'

सा (वि.) सहा. 'मग ते वस्त्र गोसावी **सा** मास पांगुरलेः मग आंगी केलीः' -ली.४००. 'कई करान? मन नाई लागलं **सा** मयने तं?' -धग.३.

साई (स्त्री.) बायकोची बहीण, मेहुणी. '**साईचं** अन् जवायाचं नातं चोखट असते/ बायको असते रुकमीनी त **साई** राधा दिसते.' -चंच.

साईभोई (वि.) साधीभोळी. 'तू मातर **सोईभोईनं** काम कर.' -ऊन.२१५.

साईल (क्रिवि.) सहन, पचेल असे. 'त्याले का मी म्हणली हामंधुमं काम कर म्हून जीवाले **साईल** तसं करावं.' -ऊन.२१३.

साकई (स्त्री.) दार बंद करण्याची साखळी. 'अवघेया ग्रहाचा मुक्ष नाएकुः तो खांबी **सांकळी** आळिला असेः' -ली.३५. 'दरवाजा लावून **साकई** लावजो, कुत्रे लोट्टात दार.'

साकईकोंडा (पु.) दरवाजाची साखळी. 'चारशे रुपये दरोजा तयार कऱ्याले लागतीन अन् **साकईकोंडा** तुमाले इकत आनून द्या लागीन.'

साकर (स्त्री.) साखर. 'बाइ **साकर** होइजे ते निके की **साकर** अनुभविजे ते नीके?' 'गोसावी भातावरि **साकर** घालुनि आरोगण करू लागलेः' -ली.१२५. (अर. सुक्करे, फा.शकर,का.सक्करे)

साकरपट्टी (स्त्री.) साखरेची वडी. '**साकरपट्टीपेक्शा** गुळपट्टी चांगली लागते.'

साकरपुळा (पु.) लग्नाचा एक विधी. '**साकरपुळा** झाला अन् पोरगी दुसऱ्याच संगं पऊन गेली राजा.'

साकळं (न.) संकट, कोडे. '**संकट** जरी चिंतामणी हाता चढे। तरी वांछेचे कवण सांकडे॥' -ज्ञा.१७.५९. 'घरोघर धोंडी मांगत पोट्टेसोट्टे देवाले **साकळं** घालत व्हते.' -सित.४७.

साकसुरत (वि.) सहज. 'काळ्या अंधारात जल्मलेले पाप काही दिवस **साकसुरत** पचल्यासारखे वाटले तरी पुढे ते उजीळात येतेच.' -कात.२१७.

सागबन (न.) सागाचे वन. 'पहाडी वारा मोहफुलांचा गंध सावटून **सागबनात** उधळत होता.' -झेल.११.

सागरगोटा (पु.) काटेरी पिवळ्या फुलाची औषधी वेल. '**सागरगोट्याच्या** शेंगा तोळून त्यातल्या **सागरगोटी** काहळल्ली खेळाले.'

सागरगोटी (स्त्री.) आग तयार करू शकेल अशा गोट्या. या गोट्या मुली खेळतात. 'झिंगाभोयनीचा झोळणा **सागरगोट्या** सुयाबिब्यांनी गच्च भरलेला.' -सि.१९.

सागळ (न.) भोपळ्याचे उदक पात्र. 'पाणी पेयावेया **सागळ** घेतलिः तंव **सागळे** पाणी नाहीः' -ली.२५६. '**सागळ** भरुनि उसीसेयाकडे खुंटियेसि घातलीः' -ली.२६. '**सागळेचेनि** उदके नेत्र पुसिलेः' -ली.३२. 'पाट मोट कळा। भरित पखाळा **सागळा**॥' -तुका.१८७१. (अर.)

सागवान (वि.) साग ह्या जातीचे- लाकूड. 'लाकूड **सागवानच** पायजे दरोज्याले.'

सागुती (स्त्री.) भाजी, मांस. '**सागुती** घ्यावं म्हून ते खाटीकपुऱ्याकडे वळली.' -रा.५१.

साचलं (क्रि.रूप.) एकत्र साठणे, जमणे. 'झळी लागल्यानं तयात पानी लय **साचलं**.'

साचेल (क्रि.रूप.) साचलेले. 'किती दिवसाचं **साचेल** पानी हाय. निऱ्हा मचलं.'

साचोनं (क्रि.) साचविणे. 'आला पैसा तो **साचोनं** चालू केला.'

साचोयेल (क्रि.रूप.) साचविलेले. 'तयात **साचोयेल** पानी किती दिवस पुरीन?'

साच्या (पु.) १. चौकट, पद्धत. 'हे गोठ आपल्या **साच्यात** बसत नाई.' २. एकसारख्या वस्तू बनवणारे साधन. 'चकल्या कराच्या तं शेजून **साच्या** आना लागीन.'

साज (पु.) १. शृंगार, वाद्य. २. शोभा आणण्याचे साहित्य. 'पोळ्यासाठी माया घरी मस्त बैलचा **साज** हाय.' (फा. साझ)

साजरं (वि.) अलंकृत, मंडित, सुंदर, चांगले. '**साजरं** काम करसान तं तुमाले कुडतं आनीन बजारातून.' -धग.२९. 'असा गॅस **साजरा** माय लवकर रांधन होते/ बिना पोपळ्याची भाकर खिचळी **साजरी** होते.' '**साजरा** उच्चा दिगळा, भोरा असल्याच्यानं त्याचं लोकायवर वजन पळे.' -सित.५५. 'आमराई तशी **साजरी**. सळघान आंबे लटकलेले.' -डेबू.६४. 'पोरगी **साजरी** वाटल्यानं पसन केली.'

साजरागोजरा (वि.) सुंदर वगैरे. 'पोरगाऽऽ राजा. साता गावात येक. लयच **साजरागोजराबी** हाय.'

साजूक (वि.) चवदार, ताजा, मऊ, टवटवीत. 'ते तैसेचि सुख **साजुक**। सप्रेमळालागी देख॥' -ज्ञा.१०.१३९. 'वरनावर माय **साजूक** तूप वाहाळे.'

साजे (क्रि.रूप.) सुंदर दिसे, शोभे. '**साजे** ना वजे, ते पागोटी लाललाल जरदऽऽ, हे घ्या टोपी घाला.' -सित.७३.

साजेल (क्रि.रूप.) शोभलेले. 'पोरगी पोराले मस्त **साजेल** हाय.'

साजोनं (क्रि.) सजवणे. 'पोयाले बैलं सकाऊनपासून **साजोनं** चालू होतात.'

साजोयाले (क्रि.रूप.) सजवायला. 'घर **साजोयाले** बाईमानूस घरात पायजे.'

साझेदार (वि.) भागीदार. 'रामरावच्या **साझेदारीनं** दुकान टाकेल आये म्या.'

साटंलोटं (न.) एकमेकांच्या बहिणीशी विवाह करणे. 'रंगारेईत आता पोरी भेटत नाईत. बईन असली का **साटंलोटं** करावं.' (का.साट-टि)

साटी (स्त्री.) तोरड्या, पायातील एक दागिना. 'तुया **साटीचं** घुंगरू कसं बोले रूमझुम/ कवलाच्या घरावर पानी पळे रिमझिम.' -वि.

साठगाठ (स्त्री.) बंधन. 'बाईच्या जल्मासोबत दुखाची **साठगाठ** बांधून देल्ली असन देवानं.' -एक.

साठणी (स्त्री.) स्त्रीचे नेसू. 'नेसलेल्या **साठणीची** चमचमणारी भिंगी आकर्षक दिसत होती.' -कात.३१४.

साठा (पु.) वयाची साठ वर्षे. '**साठा** गेला तरमा काटा नाई गेला.'

साठी (अ.) च्याकरिता. '**घरच्यासाठी** अर्धा येक्कर जेवारी पेरली तेबी डुकराईनं मोळ्ली.'

साठीश्राप (पु.) शिव्याशाप देणे. 'आजी दारुड्या नवऱ्याच्या नावनं **साठीश्राप** करीत होती.'

साठून (क्रि.रूप.) साठवून. 'उनायाम्दी पानी **साठूनच** ठेवा लागते.'

साठेल (वि.) साठलेले. '**साठेल** पान्यावर येक्करकभर गहू पिकोला.'

साठोनं (क्रि.) साठविणे. 'वैनी, तुमचा तं मस्त मुक्यामुक्या माल **साठोनं** चालू हाय.'

साठोयाले (क्रि.रूप.) साठवायला. 'त्याले रुपये **साठोयाले** सांगा फक्त, खर्साले नोका सांगू.'

साठोयेल (क्रि.रूप.) साठवलेले. 'म्हताऱ्यानं लय माल **साठोयेल** आये आजलोक.'

साठोलं (क्रि.रूप.) साठविले. 'हांडाभर सोनं **साठोलं** म्हन्तात माया पंजानं.'

साडभाऊ (पु.) मेहुणीचा पती. 'वासमाले कोनी हये का तुहे? हो **साडभाऊ** ऱ्हायते तिथं.' -सेल.३२९.

साडसूड (वि.) सरळ, बिनधास्त. 'सीट एक धरली जाऊन **साडसूड**/ बसली होती बाई तिथं **जाडजूड**.' -जांग.६७. 'नवरा बसला. कौतिक **साडसूड** आत गेली.' -धग.१५. 'शिवराम झोपेतून **साडसूड** उठला.' -मिए.११४.

साडे (पु.) लग्नातील विधी. 'लग्न लागलं. **साडे** झाले. वऱ्हाडाची घाई सुरू झाली.' -झि.१९.

साडेसाती (स्त्री.) संकटपरंपरा, शनीचा क्रमणकाल- तीन राशीतून. एखाद्या माणसाच्या जन्माराशीपासून १२, १ व २ ह्या राशीत शनी. 'येकयेक ढोर मेलं गोठा भयासला/ **साडीसातीनं** भिमाराव पाटीलं गयाठला.'

सात (स्त्री.) १. लहान बाजार. 'पिठाचा विकरा। तिये सांते।' -ज्ञा.१३.३२०. 'कापुराचे **साते** आणिला लसूण। वागवितां सीण दुःख होय॥' -तुका.३८२६. 'सायंकाळी भागी **सातीत** बसायची, नांगीलची पानं, भाजी पाला विकायची.' २. लागण, संसर्ग. 'गावात काल्ल्याची **सातच** आल्ती.'

सातभाकऱ्या (पु.) एक वऱ्हाडातील खेळ. 'ह्या खेळात फेकलेला दगड न बुडता पाण्याहून तरंग उठवीत जातो. पोरं **सातभाकऱ्या** खेळतात.' -डेबू.१४.

सातरी (स्त्री.) अंथरूण, बिछाना. 'मंडळीकाः तुम्ही येथ **सातरा** पसराः' -ली.२४९. 'आणि गोसावी पसाभरि धुळि **सातरां** घातलीः' -गोवि.१६. 'डेबू जेवला खावला. **सातरीवर** जाऊन पडला.' -डेबू.५६. 'रात झाली का **सातरी**, दिवस निंघला की भाकरी.' (अर.सातिर)

सातहात्या (वि.) सात हात मोजल्या जाणार एवढा. 'इरीतलं पानी ओळ्याले **सातहात्या** दोर पायजे.'

साताखळे (पु.) एक खेळ. 'कमली वाळग्यात गेली तं पोट्टीची **साताखळी** आपली सुरूच.' -अक.३२.

साताठ (वि.) सात किंवा आठ. 'धोबल्याच्या मापाच्या **साताठ** दोऱ्या ओळखताना कधी आफत झाली नाही.' -मोती. '**साताठ** रोज नेतो म्हणून भावजय सुगंधाला घेऊन गेली.' -पाटी.

साताय (वि.) चारित्र्यहीन. 'गवतासाठी खाली पळे **साताय**.' -ना.५७. 'साताय म्हनाले दिसते उठूउठू बसते.'

सातायबोळ्याचे (वि.) एक शिवी. 'कावं **सातायबोळ्याचे**. यासाठी आली काय व तू भांडनं लावतं उबारे.' -ना. १३९.

सातू (स्त्री.) तीन चार कडधान्याचे पीठ. 'गुयाबिगर ना गोळ होत गवाची रं **सातू**.' -मा.३१. 'वाटीभर **सातू** दपाटलं का दिवसभर जेवाचं काम नाई.'

सातोळा (पु.) सात दिवसाचा काळ. 'आवजी देव दिसले, **सातोळा** लोटला मांगं.' -लोक.३७.

साथ (स्त्री.) १. बरोबर असणे, संगत. 'मले रामरावची चांगली **साथ** आये म्हनून बरं आय.' २. मदत. 'मायाजोळ पैसा नोता तं भावरावनं मले लय **साथ** दिल्ली.' ३. लहान बाजार. 'मागें काय जाणों आइकिली वार्त्ता। कबिर **सातें जातां** घडिया वांटी॥' -तुका.९२.

सादगी (स्त्री.) साधेपणा. 'एवढा रईस बाप्पू पन **सादगीनं** रायते भाऊ.' (फा.)

सादय (वि.) आर्द्र, ओलसर. 'पानी मुरल्यानं भीत **सादयते**.'

सादयनं (क्रि.) आर्द्रता पसरणे. 'बरसकाला आला का भीतीचं **सादयनं** सुरू व्हते.' (सं.)

सादरीसुदरी (वि.) सुंदर. 'देवा काऊन असं दुस्चीत दाखोतं? **सादरी सुदरी** माह्यी पोर्गी माह्य लेकरू.' -पोळा.

सादळनं (क्रि.) ओलसर होणे, ओलावा धरणे. 'बुढीचं ऐकून सुमन पावसात भिजल्यासारखी **सादळून** गेली.' -अंधा.

सादासुदा (वि.) साधा, सरळ. 'बायका लावून दे दोघात झगडा/ **सादासुदा** नाही लंबा चौडा तगडा.' -मिए.१००.

सादी (वि.) नुसती, केवळ. 'लात मारनं दूर, **सादी** मान हालूनसनी कदी कोनाच्या आंगावर तो डुकावला नाई.' -सित.१२१.

सादीभादी (वि.) भोळी. '**सादीभादी** सजना आजी, सारजा आजी संगं मस्करी करत बोल्ली.' -सित.२१.

साधन (न.) १. तूप. 'वरनाच्या मांगच गोप्या तू **साधन** घेऊन जाय.' २. साहित्य. 'गावा जाचं होतं पन काही **साधनच** नोतं.'

साधनं (क्रि.) सिद्धीस नेणे, मिळविणे. 'कैसा तो **साधावा** सांग भजनविधि।' -नाथ. 'भंगलिया चित्ता। न ये काशानें **सांदितां**॥' -तुका.९५.२. 'तुका म्हणे घडी। **साधिलिया** एक थोडी।' -तुका.३६४.

साधनी (स्त्री.) साधलेली सवय. 'मेंढ्याईमंदी जप्याची **साधनी** आये त्याले.' -सित.१०७.

साधारन (वि.) फार उच्चकनिष्ट नव्हे, मध्यमप्रतीचे. 'परिस्थिती बेताची अशीच **साधारन** हाय.'

साधासुधा (वि.) सरळ, निष्पाप. 'दिस्याले **साधासुधा** दिसते तरमा अंदरून चिमटे घेते राजा.'

साधी (वि.) कपाशीची एक जात. 'मी **साधीच्या** कापसाला एचफोर आणि एचफोरच्या कापसाला **साधीचा** कापूस नाई म्हनू शकत सायेब.' -लेक.६२.

साधीसुधी (वि.) भोळी. 'पोरं वरून **साधीसुधी** असली तरी आतून बिलंदरच असतात.' -सि.११९.

सानसून (स्त्री.) सामसूम. 'गावात कोनी मेलं का **सानसून** वाट्टे अन् गमतबी नाई राजा.'

सानी (स्त्री.) स्त्री. 'परतणारी प्रत्येक कोरकू **सानी** खुषीत होती.' -झेल.२७. (को.)

सापटी (स्त्री.) १. लहान गल्ली. 'तो मागं राहिला की म्हैस एखाद्या **सापटीत** घालून देतात.' -पख.९८. २. फट.

'त्यानं खालचा ओठ अन् दाताच्या **सापटीत** तंबाखाची चिमूट टाकली.' -काळी.११.

सापडाव (क्रि.रूप.) सापडणे, दिसणे. 'ही खज्जाळीची हाती **सापडाव** मंग दावतो तिले.' -सेल.४.

सापता (वि.) संपूर्ण. 'शाईतून आलो ताहा तंबू **सापता** उखडून झाला होता व मा.' -धग.८३.

सापसूई (स्त्री.) सापाचे लहान पिल्लू. 'तुरीच्या गंजीत **सापसूई** निंगली तं बाया पयतच निंगल्या.'

साफ (वि.) १. स्वच्छ. 'जागा **साफ** करून बसा.' २. नष्ट, नाहिशा. 'गावोगावच्या गढ्या **साफ** झाल्याने बेलदारांचे धंदे बसले.' -पख.३४. (अर.)

साफसुदरा (वि.) स्वच्छ, साफ असलेला. 'गहू **साफसुदरा** हाय ना, नाई तं निऱ्हा खळेईचेच देसानं.'

साफा (पु.) डोक्याचा रूमाल, पागोटे, फेटा. (अर.साफः)

साबन (न.) साबण. 'नाही निर्मळ जीवन। काय करील **साबण**।' -तुका.७५९. (अर.साबुन)

साबळ (न.) कमचीचे टोपले. 'इरीतून गाय काढ्याले **साबळ** तं पायजेच राजा.'

साबळी (स्त्री.) मोठे घमिले. याचा उपयोग विहिरीतून गाळ, माती काढण्यासाठी तर आंब्याच्या झाडावरून आंबे उतरविताना होते. 'कधीकधी पाडव्याची गुळी होनं चांगलं/ इरीसाठी निर्गुळीची **साबळी** होनं चांगलं.' -पाव.

साबीत (वि.) चांगले, शाबूत, अखंड. '**साबीत साबीत** आंबे न्यारे काढून ठेवा.' (अर.)

साबू (पु.) साबण. 'गंगीले तं अर्ध **साबू** लागते आंगधुयाले रोज.' (अर.साबुन)

साबूत (वि.) शाबूत. 'अर्धी भीत खसली अर्धी **साबूत** आये.'

सामट (स्त्री.) लहान बोळ, गल्ली. 'शेंगा तोडल्या मुंगाच्या थ्या होत्या चामट/ आथरल्या खाली भरून गेली **सामट**.' -मिए.१२४. 'त्याच्या समोरून न जाता ती मनाबुढीच्या **सामटीतून** निघाली.' -ना.११०.

सामना (पु.) विरोध, लढाई, चुरस. 'कवा ना कवा हऱ्याचा अन् माहा **सामना** तं होईनच.'

सामने (अ.) समोर. 'आता येणं म्हणा **सामने** अन् दाखवनं फरस पुंजून. खांडच करतो त्याचे.' -गय.

सामरा (पु.) १. गोळा करणे, सावरणे. 'काय बिगर बलावल्या त्याच्या गवानीतले धांडे **सामरा** करू?' -सित.२३. २. सामोरे जाणे. 'दिंडी पह्यले वाड्यापाशी येईल अन् आबा **सामरा** करतील.' -ना.१५. 'बुढा बैठकीत बूड टेकोनार तसा जानराव म्हनाला, 'अथी कायले बस्ता वट्यावर बसा ना. पाहुन्याईल **सामरा** करजा.' -तित.३.

सामसूम (वि.) शांत. 'राती नऊ वाजताच आमचं गाव **सामसूम** होते.'

सामा (न.) माल, सामुग्री, सामान. 'आधी घे रे रामनाम। **सामा** भरीं हा उत्तम।' -तुका.८६. 'काशीरावच्या घरी किस्नानं लग्नाचा **सामा** पोचता केला.' -काळी.९८. (फा.)

सामाई(य)न (न.) सामान. 'राती सपनात परमात्मा दिसले शंख चक्रगदा सर्व **सामाईन** घेऊन.' -अखे. 'पोट्टेहो उचला थे **सामायन** अन् चाला माया मांगून.' -धग.१३.

सामाईक (वि.) दोघांची सारखी मालकी असणे. '**मुसाभाई**, त्याच्या आणि माझ्या शेताच्या सामाईक धुऱ्यावर उभा होता.' -खुं.५१.

सामान (न.) साहित्य, चिजवस्तू. '**सामान** पायजे उधार? पन पैसे कधी देसानं?' -फीर.१८४. (का.फा.)

सामानसुमान (न.) साहित्य. 'पेरन्यापारन्याचं फटकनं होत नाई तं पयलेच **सामानसुमान** आनून ठुलं.'

सामानिमा (पु.) साहित्य. 'बामनाले **सामानिमा** देऊन मोकयं करा, आपच रांधत बसते तो त्याचं.'

सामावनं (क्रि.) समावेश करणे, मावणे. 'तंव प्रकास उतरत उतरत श्रीमुर्तिमाजि **सामावलाः**' -गोवि.३२.

सामासी (वि.) सहा महिने घेणारी. 'मास्तरीन निऱ्हा **सामासीच** निंगाली बातच तिले आखीन दिवस रायले.' -लेक.७६.

सामासुमा (पु.) सामान, साहित्य. 'बापुसाहेबांनी लग्नाचा **सामासुमा** करण्याच्या झटून तयारीस लागल्या बद्दल हुकूम सोडला.' -कात.३५६.

सामील (वि.) समाविष्ट, सहभागी. 'मी त्या भानगळीत **सामील** नोतो रे बावा.' (अर.शामिल)

सामुरी (वि.) समोर. 'हा मराठमोळा, अम्हास नडला निघू ग कशि **सामुरी**.' -भीक.५८.

साय (स्त्री.) दुधावरची मलाई. 'दुधीं जैसी **साय**। दुधाची ते।' -ज्ञा.१४.७३. 'गोठ्यात गाय दाठ्यात माय दुधात **साय** दिसत नाई.' -मा.३०.

सायंकी (स्त्री.) साळुंकी, एक पक्षी. 'तेया पिंपळासि **साळोंकी** गूपली होतीः' -ली.२८१. 'एथ एकु पींपळु होताः तेया पींपळासि **साळोंकी** गूपलीः' -ली.२८१.

सायत्री (स्त्री.) सावित्री. 'मोठी **सतीसायत्री** म्हनोते लौंडी अन् उरावर तं घेते.'

सायनासंगीत (वि.) स्पष्ट, ठळक. 'मायबाई **सायनासंगीत** शिरवाळाचं देऊळ दिसते.' -सेल.२२८.

सायळ (पु.) अंगावर दाभणासारखे काटे असलेला पक्षी.

'याच्या आंगाआंगावर ऊभे **सायळीचे** काटे.' -वि. 'त्याचे घारससाण्यासारखे डोळे एकदम **सायळच्या** काट्यासारखे काळजात घुसायचे.' -काळी.७०.

सायळ (स्त्री.) पेरणीच्या वेळेस लावलेली बैलांची सोबत. 'पिकल्या पानाची बंधवाले आवळ/ लावते बाऱ्याची **सायळ**.' -लोक.२५५. 'ज्याच्याजवळ दोनच बैल आहेत त्यानं दुसऱ्याशी **सायेळ** लावली.' -भं.१०६.

साया (पु.) मेहुणा, साळा. 'एथ **शालक** सासरे मातुळ। आणि वधु कीं हे सकळ॥' -ज्ञा.१.२२३. 'कुड पाहून मातर, पोट पाहून पातर, जावयाले सतरंजी, **सायाले** पोतं आथर.' -मिए.४८.

सायाचा (वि.) १. एक शिवी. 'पन **सायाच्यानं** आईकलं नाई लायन्याले पाहून मारत बसला.' -धग.४६. २. संबोधन. 'लगन म्हणजे कटकट हाये **सायाची**, रजीस्टर पुरलं.' -ना.४१.

सायास (पु.) प्रयत्न. 'देवकीच्या मायनं इतका **सायास** केला.' -झि.१९.

सायेब (पु.) साहेब. 'कुठी अस्तात **सायेब** नोकरीवर?'

सार (पु.) सारांश, अर्क. 'तैसें गीतार्थाचे **सार**। जें विवेकसिंधूचें पार॥' -ज्ञा.६.११. 'मथूनि काढिलें आयितें। **सार** आम्ही॥' -ज्ञा.१५.५७१. (फा.)

सार (न.) पाठवणी. '**सार** कराच्या वक्ती हिचा पाय लागे अडू.' -मा.५३. 'ज्याची होती त्यानं नेली अशी मनात संमजूत घालून भाऊंनी नवरी **सार** केली.' -कात.३६७. (का.)

सार (पु.) मसाल्याची पातळ भाजी. 'पुरनपोईसंग **सारच** पायजे मस्त.' (का.फा.)

सारं (वि.) सर्व. 'नवरी सार होताना **साऱ्याईच्या** डोळ्यात पाणी आलं.' -ना.३९.

सारकी (वि.) सारखी. 'आइक वं काय दळभदऱ्या **सारकी** बोलतं वं!' -अक.६५.

सारनं (क्रि.) १. एकलणे, लोटणे, मागे ओढणे, बाजूला करणे. 'त्या कळब्याच्या पेंड्या मांग **सार** अन् बंडी लाव अथी.' २. टाकणे. 'ब्राम्हणी भांडारेकरालागि आंघोळी पाणी **सारिले** होतेः' -ली.४६. 'घरच्या बुवाले पानी **साऱ्याले** गेली तं तो आंदीच न्हानीत उभा.' -हज.२३.

सारपा (पु.) व्याप, खाण. 'आता काय करतं लय मोठे लेकरं? निस्ता गांधारीचा **सारपा**. बरा आपला एकच.' -वा.१२८.

सारवनं (क्रि.) गिलावा करणे. 'वर रांगोळी काढोनि **सारवीत** होती सदना.' -भीक.५५.

सारा (पु.) १. शेतीवरील कर, खंड. 'अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन। **सारा** देइल कोण काका त्याचा॥' -तुका.३९१२.२. २. डोळ्यावरचे पटल.

साराई (अ.) नेहमी, सर्व काळ. '**सारईचं** काईना काई मांगाले येते सायाचं.'

सारानी (क्रिवि.) सदैव. 'नर्मदीचं लेळगऱ्हानं **सारानी** सुरूच असते.'

सारासापा (पु.) लुबाडणे, फस्त करणे. 'आल्या बरूबर लावला का **सारासापा** करणं?' -रा.२३९.

सारी (वि.) सर्व. 'कुठी गेली आस्तीन **सारीच्या** सारी.' -रा.८.

सारोन (न.) गिलावा करण्याची क्रिया. 'सकाऊनचं **सारोन** तसंच रायलं वं माय कचकच वाटून रायलं.'

सारोनं (क्रि.) शेणामातीने सारविणे. '**सारविला** उंबरा देखौनि साउमेया न वचावेः' -ली.३/२. 'मग बाइसे गेलीः गुंफा झाडिलीः **सारविलीः** रंग माळिका भरिलीयाः' 'कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर। **सारावया** ढोर शेण नाहीं॥' -तुका.५६६.४. 'बाईले ढेकलं गळीचे **सारोयाले** पायजे होते/ कुदईनं खंडत बसलो फोळ हाती येत होते.' -रूख.

सारोनंतन (न.) सारवणेदेखील. 'त्या साली मायनं दिवाईले उभं **सारोनंतन** घातलं व्हतं.' -अक.४७.

सारोयनं (क्रि.) सारवणे. 'जाय येखांदा सेनाचा पवटा **सारोयासाठी** ये घिऊन.' -सित.३०.

सारोयाले (क्रि.रूप.) सारवायला. 'उनायात लोकं इव्यानं खोदूखोदू गढीची माती उकरून **सारोयाले** नेतच होते.' -अक.४२.

सारोली (क्रि.रूप.) सारवली. 'झिंगरीनं मूठभर तांदूय कुकू घेतले. जागा **सारोली**.'

सार्का (वि.) सम, सारखा. 'हावऱ्या **सार्का** तो त्या कुटारावर तुटून पळला.' -सित.१३३.

साऱ्या (वि.) सर्व. 'पजावा निघाला तेव्हा **साऱ्या** विटांचे तुकडे झालेले दिसले.' -फीर.२५.

साल (स्त्री.) फळाची, झाडाची साल. 'गोसावीयासि कव्हणे केळे ओळगवीलिः ते नेणीलेः तीया **साली** ओटेया खाली सांडीलिया असतिः' -ली.४३७.

साल (न.) वर्ष. 'मांगलं **साल** पिकपान्याले बरं होतं औंदा काय होते काय सांगावं.' (फा.)

सालआयंदा (न.) आगामी वर्ष. 'हे असं गेलं, **सालआयंदा** काय सांगावं कसं जाईन बापा.'

सालई (स्त्री.) वृषविशेष. 'वाजत गाजत **सालईचा** मुंडा अन् डाराचे खासरं वाड्यापुडी आले.' -दि.७.

सालखत (न.) वर्षाचा करारनामा. 'तसं जमत नसीन तर

सालानं ठुवा. मी **सालखत** लिहून देतो.' -फीर.२२७.

सालगडी (पु.) वर्षभर कामला असलेला. 'हिरासिंग साहेबरावचा **सालगडी**.' -सेल.२६०.

सालगुदस्ता (अ.) गेले, मागील वर्षी. '**सालगुदस्ताची** गोठ हाय आपल्या पमीच्या लगनाच्या टाईमीची.'

सालचंदी (स्त्री.) वर्षभराची तरतूद. 'एक म्हैस घेतली त्या बदल्यात **सालचंदी/** जेवारी देणारं वावर गमवावं लाग्नार?' -अंधा. 'हंगामाचा दाणादाणा साठवून **सालचंदी** जवारी करायचा विचार आहे.' -ल. १४१.

सालच्यासाल (क्रिवि.) वर्षानुवर्षे. 'किस्तकाळी भक्तीसारखी, निंघून गेले **सालच्या सालं/** भल्ल पिके तरी एकादसी रोजचे सारे बुरे हाल.' -पाहु.२०.

सालटं (न.) साल, त्वचेचा थर. 'नारू अरे सबन **सालटं** तूच नोको काढू इव्हाई बोवाचे.' -भं.६४.

सालतिगस्ता (अ.) दोन वर्षींपूर्वी. '**सालतिगस्ता** तं झालं वऽऽ तुयं लगनं दोनदोन लेकरबी झाले लागे?'

सालदार (पु.) वर्षाच्या करारावरील नोकरदार. 'हे खूप धनाढे ग्रहस्थ. घरी शेती, गाई, म्हशी, पडद्याच्या दोनतीन दमण्या, **सालदार**-कामदार असं सारं वैभव.' -फीर.२३. 'तुहं माहे नातं काय मी तुया **सालदाराची** माय.'

सालपट (न.) साल. 'झाळाऊन घसरलो तं सारे **सालपटं** निंगले आंगाचे.'

सालमान (न.) चालू वर्ष. '**सालमानच** आसं इरवाच्या पोटचं आलं त्याले काय करावं.' -अंधा.

सालस (वि.) सज्जन, इमानी, गरीब. 'खावरी ना डिवरी, **सालस** निंगली नवरी.' (अर.सलिस)

साला (पु.) साळा. 'शिंदळा **साल्याचा** नाहीं हा विश्वास। बाईल तो त्यास न विसंभे॥' -तुका.१३८.

सालाना (क्रिवि.) प्रत्येक वर्षी, दरसालचा वार्षिक. 'पोराचा शिकाचा खर्चच **सालाना** लाखाच्या वधर जाते.' (फा.)

सालाबाद (अ.) दरवर्षी प्रमाणे. '**सालाबाद** परमाने येक पोतं जेवारीचं येवळीच वर्गनी देता काय औंदाई.'

सालिना (वि.) वर्षाकाठी. '**सालिना** कास्तकारीतबी दोनयेक लाख मांगे पळतात.' (फा.सालियाना)

साली (वि.) १. वार्षिक. २. मेहुणी. 'घरी पावनीन आली **साली/** बायको वाटे कधी होईल वाली.' ३. एक शिवी. '**साली** आधी उमरकी हुई लेकीन कवडीकी अक्कल नई शिकी.' -धग.१७१.

सालीम (वि.) सगळे, संपूर्ण, अखंड. 'कार्याले घरातले **सालीम** लोकं येजा बरं.' (अर.सालीम)

सालुनी (क्रिवि.) प्रत्येक वर्षी. 'असाच **सालुनी** पास होत जाय बाप्पा.' -धग.१२१.

सालोगिनती (क्रिवि.) कितीतरी वर्षे. 'बिल नाही पाठवे माहा **सालोगिनती**.' -मिर्झा.१८१.

सालोसाल (अ.) वर्षानुवर्षे. '**सालोसाल** अशी गत हाय कास्तकाराची.'

साल्या (वि.) साला या अर्थी एक शिवी. 'काय भयानक मारामाऱ्या करतात **साल्या** पोट्ट्याईबी.' -त.२०. 'राग येणार नाई तं काय **साल्यायहो**! सम्दं गाव मपल्या नावानं बोंबलते.' -त.७०.

साव (वि.) उजागर, सभ्य. 'चोऱ्या करते त करते मोठा **सावपणाचा** आव आणते.' -धग. ६०.

सावकार (पु.) व्याजाने पैसे देणारा. '**सावकाराशी** एखाद्या वेळी हुज्जत घालणंही घडलं होतं.' -गा.३५. '**सावकारा** जोळून पैसे आनले का ते जलमात फिटत नाई.'

सावचित (वि.) सावध असलेला. 'नव्हतो **सावचित** तेणे अंतरले हित।' -तुका.३४१. '**सावचित** असे खरा। लाभ घेऊन जाय घरा।' -तुका.४१२५.

सावटनं (क्रि.) १. प्रेत जाळल्यानंतर तिसऱ्या दिवशी राख गोळा करण्याचा विधी. 'सरण रचून प्रेत जाळतो. त्याची राख **सावटून** पूर्णेच्या पाण्यात सोडून देतो.' -डेबू.६२. 'मंग तिसऱ्या दिवशी मले **सावटाचा** कार्यक्रम होईल.' -मे.१५२. २. जमा करणे. 'सकाऊनच खयातलं मातेरं **सावटनं** चालू केलं.'

सावठनी (स्त्री.) साठवण. 'धानाचे मातेरे काढून मांगाच्या बायका **सावठणी** करू लागल्या.' -रा.३६.

सावड (स्त्री.) सहकार्यासाठी सोबत, मैत्री. 'बालेणीच्या कवळीदार फुलाच्या आवडीमुळे तिच्या शेजारणीची **सावड** करावी लागते.' -कात.१२३.

सावडनं (क्रि.) १. गोळा करणे, सारखे करणे, सांचविणे. 'घरातलं **सावडून** लोकाईच्या कामाले जातात.' -धग.२६. २. प्रेत. 'गयाबुढीच्या दहाव्या दिवसी दसरा होता म्हनून दसऱ्याच्या आधीच्या दिवशी, नव्व्या दिवशी **सावडण्याचा** कार्यक्रम ठेवला.' -वा.४०६.

सावतर (वि.) सावत्र. 'तू काय माया **सावतर** लेक हास बापा तुले हिडीसफिडीस कऱ्याले.'

सावर(री) (न.) एक वृक्ष. 'जैसे **सावरी** फळ आले घेपे ना दिजे।' -ज्ञा.९.१७५.

सावरनं (क्रि.) आटोपणे, सांभाळणे, आवरणे. 'देखें खेळतां अग्नि लागला। मग तो न **सांवरे** जैसा उधवला।' -ज्ञा.३.२०४. 'तें सांवरावयालागीं गंवसणी। धैर्याची करितसें॥' -ज्ञा.११.३७१. 'नवरीन सार झाली का मंडपातलं सामानसुमान **सावरनं** सुरू होते.' (का. सावगि / रिसु)

सावरासावर (स्त्री.) एकत्र करणे, आवराआवर करणे. 'घरातल्या पसाऱ्याची **सावरासावर** करून आलीच मी.'

सावला (वि.) माशाची एक जात. 'तापी नदीतील सर्वांचा आवडता **सावला** मासा, कोरकू घेत होते.' -झेल.४७.

सावळ (स्त्री.) जोडी लावणे. 'एकच बैल असल्यानं सदाच्या बैलाची **सावळ** लावून जोडी तयार केली.'

सावळनं (क्रि.) सावडणे. 'आवघा गुळु **सावडीला**ः पाखुडीलाः मग वीकीलाः' -गोवि.१७३.

सावळा गोंधळ (पु.) गुप्त अनाचार. 'शहराईनं निऱ्हा **सावळा** गोंधय चालू रायते राजा.'

सावळा (वि.) कृष्णवर्ण. 'पोरगा **सावळा** असला तरी चालते तरमा नाकाडोयानं चरचर पायजे.'

सावसीद (वि.) सावधचित्ताने. 'गर्दीत चोराचा भेव असते. **सावसीद** राहावं आपून.'

सावसूद (वि.) सावध. 'गना खयात झपला तरी तो **सावसूद** आसते बरं.'

सावा (पु.) रानातील एक धान्य. 'कोदो, कुटकी, **सावा** ही गवती धान्ये दळायला मातीची घट्टी!' -झेल.९. (का.फा.)

सासरा (पु.) पतीचे, पत्नीचे वडील. 'माया नवरा काई म्हनत नाई अन् **सासराच** टेंबलत रायते माय.'

सासुरवाडी (स्त्री.) पतीचे किंवा पत्नीचे गाव. 'कारे बाबू **सासुरवाडीले** दोनदोन रोज रायाले टाईम हाय तुया जोळ अन् मले दवाखान्यात न्याले नाई.'

सासुरवास (पु.) **सासूपासून** होणारा त्रास. 'बाई पोरीया एका कारणे साता पाचाचा **सासुरवासु** साहीजेः' -ली.४७१. 'अखंड मुडतर। **सासुरवास** करकर॥' -तुका.३१५८. 'एवढा **सासुरवास** झाला रामाचे सीतेला/ तेथून परिपाठ लागला दुनियेला.' -लोक.९४.

सासुरवासीन (स्त्री.) सासरी छळली जाणारी स्त्री. 'बहुतांची दासी। तये घरीं **सासुरवासी**॥' -तुका.३१५८.

सासू (स्त्री.) १. पतीची, पत्नीची आई. 'स्त्रीये पाच गुरूः माताः पिताः **सासु**ः सासरूः भ्रतारूः' -ली.४३२. २. शेकोटीसाठी जळण, काडीकचरा. 'कोनीसांगते कचरं कोनी इस्तोच जरासा/ म्हनतात पोराई हो आना आपआपल्या **सासा**.' -वि.

सास्टोके (पु.अने.) लक्षण. 'कोळ्ळ्या दुकायाचे **सास्टोके** सपस्ट दिसत व्हते.' -सित.४६.

साहेबजादा (पु.) साहेबाचा मुलगा. 'कास्तकाराचं असून पोट्टं सोताले **साहेबजादं** समजते.'

साहेबीन (स्त्री.) अधिकारी स्त्री, अधिकाऱ्याची बायको. 'बंगईवर झोके घ्याले तू का **साहेबीन** होस व?'

साळकाई (स्त्री.) स्त्रियांसंबंधी निन्दार्थी शब्द. 'दोयपारच्या अवघ्या **साळकायामाळकाया** जमा होतात वाळ्यात.'

साळनं (क्रि.) सोलणे. 'कुऱ्हाडीने वखराचे लाकूड नीट **साळीत** बसला.' -सेल.१४४. 'काही जणी निर्गुडी, गोचीडीचे फोक असले की ते **साळायच्या**.' -वा.२६७.

साळसूद (वि.) चांगले, भला. 'कोणाला समजणार नाही असं बोलून **साळसूद** होऊन ती निघून गेली.' -त.१४६.

साळसूळ (क्रिवि.) छाटछूट करून. 'त्याने स्वतःच्या हाताने **साळसूळ** करून सरळसोट आकार दिलेली ती तेली बाभूळ.'

साळी (स्त्री.) १. मेहुणी. 'ज्याले असते **साळी**, त्याच्यावानी नशिबवान कोनी नाई.' २. साडी. 'दिवाळीलेबी बायकोले **साळी** घेनं नाई होत राजा.' ३. कोष्टी. (का.सालिग,साले) ४. तांदुळाची एक जात. 'दीहेचि **साळि** पेरीः दीहेचि सावंगीः मळीः देहेचि आणीः' -ली.२५४. '**साळीच्या** लाट्या व बत्ताशाचा प्रसाद वाटा.' -धग.३९.

साळीकेळी (स्त्री.) पिकाचे प्रकार. 'तियें दिठी दुरूनिचि न्याहाळीं। वांचूनि तेणें पाणियें **साळी केळी**। लाविसी काई॥' -ज्ञा.१५.२२२.

साळू (क्रि.रूप.) सोलू. 'सुपानं त्याच्या हातची काठी घेतली न बोलता तिला **साळू** लागला.' -सेल.३४.

साळू (पु.) पत्नीच्या बहिणीचा पती. 'पंगतीत **लाळू**, पावने **साळू**.'

सांगजो (क्रि.रूप.) सांगशील. 'तया सत्त्व रज तमामाजी कोण पुरुषोत्तमा गती होय ते आम्हा। **सांगिजो** जी॥' -ज्ञा.१७.४५.

सांगड (स्त्री.) नदीतील पोहण्यासाठी केलेले भोपळ्याचे साधन. 'बांधूं **विठ्ठलसांगडी**। पोहुनि जाऊं पैल थडी॥' -तुका.६९५. 'मोठा गोल भोपळा बोरूच्या दोरीने गुंफुन **सांगडी** केल्या होत्या.' -ऊन.६७.

सांगडजुगाड (पु.) एकदुसऱ्याचा सहकार. 'पह्यल्यावानी **सांगडजुगाड** आता गावगाड्यात राह्यला नाही.' -पोळा.

सांगडा (वि.) सारखा. 'तुमच्या सांगड्या तिऱ्हाईतासंग तरी बरा वागते तो.' -धग.१५. 'नामा शायना आये तो कायी भीमा **सांगडा** गधा नाई.' -धग.१९.

सांगड्यासांगड्या - सोबतसोबत. 'पाण्याला जाऊ गड्या बाई **सांगड्यासांगड्या**.' -लोक.३.

सांगतलं (क्रि.रूप.) सांगितले. 'यकडाव गुरजीनं **सांगतलं** रे सांगतलं की याचं पाठ झालच ते!' -सित.८५.

सांगतसवरत (क्रिवि.) सांगून टाकणे, ज्ञात करणे. 'तुवा भाऊ मले काई पुसत नाई, **सांगतसवरत** नाई.' -

सित.२३.

सांगते (क्रि.रूप.) बोलून दाखवते. 'ते कानाले तरी मनातलं **सांगते** का माय?'

सांगनं (क्रि.) कथन करणे. 'काय दुखते तं मले **सांगनं** तू.'

सांगनी (स्त्री.) सांगितलेली बाब, विचार. 'आपली तं लेकाईले **सांगनीच** हाय कोनाच्या लेन्यातदेन्यात पळ्याचं नाई.'

सांगलं (क्रि.) सांगितले. 'मंग गाववाल्याईले गावातच त्या वावरातून येनाऱ्या रस्त्यावर बसून राहाले **सांगलं**.' -अक.२९.

सांगळ (स्त्री.) जोडी, सोबत, मैत्री. 'रामानामाची **सांगळच** हे काम करू शकते पाय.'

सांगळा (पु.) सारखा, सम. 'तैसे सोकासना **सांगडे**। सोहपे होय॥' -ज्ञा.५.८. 'जयाचें **सांगडें**। जयासीचि॥' -ज्ञा.१५.५५५.

सांगसान (क्रि.रूप.) सांगाल. 'नटी **सांगसान** तं शंभर रुपये एकटाच देतो.' संत्या तडकन उडत म्हणाला.' -तित.७१.

सांगाडा (पु.) सापळा. 'मान्साचा **सांगाडा** दिसून रायला वाट्टे, चल बापा अतून.'

सांगाती (क्रिवि.) सोबती. 'जी जीः तो **सांगाती** के? गोसावी म्हणीतलेः तो तेधवाचि गेलाः' -ली.५७. 'तु जाएः तुझे **सांघाती** तुझी वाट पाहात असतिः' -ली.१८४. 'कैवल्यमार्गीचा अभिज्ञु। **सांगाती** हा॥' -ज्ञा.१६.९९.

सांगायला (क्रि.रूप.) सांगत आहे. 'कुणब्यांना अडचणीत आणण्यासाठीच हा आपल्याला पटवून **सांगायला**.' -वा.१४.

सांगी (स्त्री.) शिकवण, सांगणे. 'एकांती तुजं माझी **सांगी**.' -भीक.८७. 'बोरांचे ते मिष वरपांगी.'

सांगीवरून (क्रि.रूप.) सांगितल्यावरून. 'पुंजाचा विरोध होता तरी बापाच्या **सांगीवरून** तिनं राजूला शाळेत घातलं.' -पख.६६.

सांगी(गो)वांगी (स्त्री.) सांगण्यावरून. 'राणीला देती सजा/ लोकाच्या **सांगोवांगी** बाई बिघडला राजा.' -लोक.९१. 'रंगरावच्या **सांगोवांगीवर** बाळासाहेबांचा भरोसा आहे.' -कात.५१३.

सांगूनसवरून (न.) समजूतीने बोलून. 'आपून साध्या मनानं **सांगूनसवरून** बसलो तरमा त्याचा नांद काई सुटत नाई.'

सांगेल (क्रि.रूप.) सांगितलेले. 'कांदा निस्याकरता बोरगावच्याच बाया **सांगेल** व्हत्या मजुरीनं.' -सित.८५.

सांगो (क्रि.रूप.) सांगत असो. 'कर्नाटकी आहे तिथं एकमेकाले **सांगो/** दिसलं मिसलं काई तं दूम दबाके भागो.' -मिर्झा.५०.

सांगोल्या (क्रि.रूप.) सांगितल्या. 'गारगोंडानं येवळं नुकसानं केलं का कोनाले **सांगोल्याबी** ना जाये राजा निऱ्हा हुंबळ्ळाचं फोळाव वाटे.'

सांग्याले (क्रि.रूप.) सांगायला. 'कर्माची कथा **सांग्यालेबी** पुरत नाई. पण गोष्ट निंगाली म्हून सांगतो.'

सांचा (पु.) चौकट, मूस, ठसा. 'शेव्व्या कऱ्याचा **सांचा** आन बरं शेजून.' (का.संग्चु)

सांज (स्त्री.) संध्याकाळ. 'ना राती ना तेज। ते संधि जेवीं सांज।' -ज्ञा.१४.७८. 'सकाळी दाय भाकर. **सांजची** चून भाकर.' -डेबू.२. (फा.का.संजे)

सांड (पु.) वळू. 'सग्या मायची कदर नाई रे रांडायचे **सांडे** झाले बुहारे.' -सित.४६.

सांडं (वि.) अभागी. 'आपलं नसीबचं **सांडं**. दुसऱ्याले काय दोस देवाव?' -झि.५५.

सांडउबळ (स्त्री.) सांडविणे वगैरे. 'अथवा माझारी। **सांडीविखुरी**।' -ज्ञा.१८.१५४२. 'तैसी होते **सांडउलंडी**। निजनिजांची मुर्कंडी॥' -तुका.२४६६. 'शेंगदान्याची पुडी खोबऱ्याचे कुटके. पोरांनी केलेली ही **सांडउबळ** पाहून कमला कातवली.' -तित.११.

सांडउभळ (न.) सांडणे, उलथणे. 'मावद माळी करे सदा, **सांडउभळ** तुपाशी/ इथं नवलाई असे सना पानचटल्या ताटाची.' -अप्र.

सांडकोळ (वि.) रीतभात नसलेली. 'माह्यासारक्या म्हताऱ्याशी झटापट खेळती **सांडकोळ**, वागणंबी समजत नाई.' -ली.१३०.

सांडवलंड (क्रि.) सांडणे, वाया घालविणे. 'पाणी म्हणजे बिनकामाचं समजून **सांडलवंड** करतात सम्दे.' -त.५.

सांडवा (पु.) १. जास्त पाणी काढून देण्याची वाट, जेथे पाणी पाझरते ते, पाणी अडविण्यासाठी बांधलेला बांध. 'गोसावी जळात पाणि तेथ **सांडोवा** बांधवीतातिः तुम्ही आघवे दगड आणाः मी **सांडोवा** बांधैनः' -ली.१८. 'ह्या बुद्धि पोडवा। जन्माचा **सांडोवा**। टाकित जे॥' -ज्ञा.१३.१६७. 'तुका म्हणे आलें मोड्यासी कोंपट। **सांडव्याची** वाट विसरावी॥' -तुका.२५२७. २. सडा, आच्छादन. 'मांडवाच्या दारी हळद कुकाचा **सांडवा**, नवरी उचल पांडवा.'

सांडशी(स) (स्त्री.) पकड. 'घणवरि पीटिता परि मरे नाः **सांडसवरि** तोडिता परि तुटेनाः' -ली.५८९., 'गरम गंज धऱ्याले **सांडशीच** पायजे पालवातून चटका लागते.' (का.तंडसि)

सांडोई (स्त्री.) तांदुळाच्या पिठाचे कुरडईप्रमाणे केलेले खाद्य

पदार्थ. '**सांडोया** कुडर्या, भात लाडू उद्या. आज एकादशी करू.' -अ.११७.

सांड्या (वि.) सांड, लठ्ठ. 'बम खाते अन् पसरते **सांड्या** निस्ता.'

सांद(ध) (पु.) जोड, मिळणी. 'हे दोराचे दोन तुकळे **सांद** बरं तू.'

सांदनं (क्रि.) १. विहिरीतून पाणी काढणे. २. शिवणे, फाटलेले जोडणे. 'पखाल **सांदायसाठी** वाधी आणायले गेलो व्हतो.' -पख.१०४.

सांदल्या (क्रि.रूप.) जोडल्या. 'रंगारंगाच्या रांगोया थेंबाथेंबानं **सांदल्या**.' -रूख.

सांदवनं (क्रि.) शिवणे, सांधणे. 'चंभारानं पोथ्या वाचल्या असत्या अन् बामानानं **सांदवनाचं** काम केलं असतं तर?' -पाटी. 'आता पखाल **सांदवायला** किती पैसे लागतील?' -पख.९९.

सांदी (स्त्री.) दोन घरातील मोकळी जागा, बोळ. 'श्रीप्रभू दोही मढीचीए **सांदीसि** बीजे केलेः' -ली.१६६.

सांधा (पु.) जोडणी. 'आणि शुक्रशोणिताचा **सांधा**। मिळता पाचाचा बांधा॥' -ज्ञा.१३.१०६., 'जैशा वारयाचां झुळकां। **सांदा** ठाउवा नव्हे देखा।' -ज्ञा.१५.१३१.

सांदिकोंटा (पु.) कानाकोपरा. 'झाळते अन् पुंजा **सांदीकोपऱ्यात** लावते बोहारी.'

सिकं (न.) शिंकाळे. 'मग **सींकाचे** दही काढीलेः भातु कालवीलाः' -गोवि.८३. 'तो माहारीसीं वीटाळेः तयाचे म्हणीयें करीः **सींकेः** नाडेः तुते करीः' -दृ.४८.

सिकायत (स्त्री.) तक्रार. 'झालं ते झालं. आपली कोनाईषई काईच **सिकायत** नाई बॉ.' (अर.)

सिकेलसवरेल (वि.) शिकलेली, शिक्षित. '**सिकेलसवरेल** पोरंबी रूमने दाबून रायलेत वावरामंदी.' -सित.३३.

सिक्कलसोट (वि.) रिकामचोट. '**बायासिक्कल** पाहण्यासाठी गावातील सिक्कलसोट जमा झाले होते.' -भं.५३.

सितनं (क्रि.) स्पर्श करणे, शिवणे. 'गोसावी खडेन **सीतीलाः** आणि तो उठीलाः' -ली.१०. 'वला टाकती तिफन, **सितू** वखर पाहेते.' -वि. 'तुमीनं त केला चतरेपना- सुयके बैल **सितुनसन्या**.' -सित.१२५. 'बायका मवरे गेल्याच्यानं त्यायले **सित्याम्हून** ते लायभरलायभर चाल्ली.' -सित.६२.

सितनालपनी (स्त्री.) मुलांचा लपणाछिपणीचा एक खेळ. 'खियाबागळ्याच्या उंबरीतली ते **सितनालपनी** आता सरली व्हती.' -सित.१७.

सितादई(ही) (स्त्री.) कापूस वेचण्यास शुभारंभ करताना करावयाचा विधी. 'आली **सितादही** तिचे येचे येच्यावर/ कवा जाईन मंदा कापूस आपला रेच्यावर.'

सितोळा (पु.) थेंब, शिंतोडा. 'ते पाणी उसळलेः तेणे गोसावी यांची श्रीमुर्ति **सींतोडलीः**' -ली.२४२. 'गोसावी तया पासि बीजे केलेः आणि हरळे **सिंतोडीलेः** आणि जीयालेः' -गोवि.५७.

सिदा(धा) (वि.) सरळ. 'मुका बसते का तो? **सिदा** आपल्या घरी येऊन आपल्याले कुथाळाचा होय.' -सुखो.५२.

सिदा(दी)साट (वि.) अगदी सरळ. 'मागं उलटून पाह्याचं नाई. **सिदेसाट** मसनटीत या.' -गा.२२. 'पुर्नाच्या थळ्यानं धार फोळली ते **सिदीसाट** गावातच घुसली.' -सित.५४.

सिदोरी (स्त्री.) शेतात, प्रवासात, सोबत न्यावयाचे अन्न. 'बहीणेते म्हणीतलेः ''**सीदौरि** कहि होः मी गावा एका जाइनः' -ली.२९. 'खेडीचा ब्राह्मण तो हाटासि आला होताः **सीदोरी** घेउनिः' -गोवि.५५. 'आतां हें चि जेऊं। सवें घेऊं **सिदोरी**॥ - तुका.२३०.

सिद्धे (वि.) सरळ. 'पावने दमनीतून उतरले का **सिद्धे** वाड्यात धसे.' -दि.१.

सिधा (पु.) आटा, पीठ. 'अल्लक ठोकला. चांगुण **सिधा** घेऊन दारात आली.' -सेल.२३०.

सिधासाधा (वि.) साधाभोळा. 'किस्ना डावपेच जानत नाई. **सिधासाधा** मानूस आय तो.'

सिनकरी (वि.) ? 'तिच्या **सिनकरी** पोरी तिला खोदूखोदू विचारायच्या.' -पख.४८.

सिनगार (पु.) साज. 'कानी बुगळ्या चारी, पाइ पैंजन, सारा **सिनगारलेली**.' -लोक.३४.

सिनलं (क्रि.) विटले. '**सिणलें** माझें मन। वाट पाहतां लोचन॥' -तुका.३५५६.

सिना (पु.) वक्षस्थळ, छाती. 'आजकाल मधू लयच **सिना** तानून चालते जसा.' (फा.)

सिनाजोरी (स्त्री.) बळ, धाडस, बळजबरी. 'सोता गुना करून वधर **सिनाजोरी** करते भळवीचा.' (फा.)

सिनारनं (क्रि.) ठोकणे. 'खुटा तं डुलूडुलू हालून रायला डबल **सिनारनं** पळते वाट्टे.'

सिनि(ने)मा (पु.) चित्रपट. 'हिरो हिरोईनचा **सिनिमा** पा लागते गळ्या येखादा.'

सिपनं (क्रि.) शिंपणे. 'राख माती चिखलुः ऐसा पाहारु एकु **शिंपणे** जाहलेः' -ली.२४.

सिपी (पु.) शिंपी. 'गोसावी **सिंपा** बोलावीलाः बाहीरवासाचीया दोनि चोळीया आणि महेस्वर पंडिता आंगी कापवीलिः' -ली.३२.

सिमगा (पु.) होळीचा सण. '**सीमुगेयाचा** दिसी गावीचे महाजन टीळे तांबोळे ऐसे गोसावीयाचेया दरीसना आलेः' -ली.२७.

सियक (स्त्री.) १. तिडीक. 'मोळेल पायाले थोळसाक झेटका बसला का लय **सियक** निंगते.' २. बांबूची बारीक सुयटी. 'बोटातली **सियक** निंगून नाई रायली अन् सलूनबी रायली.'

सियान (न.) शिळान, कुठे ऊन कुठे सावली. 'सरावनाचा मयना चालू व्हता घळीत ऊन तं घळीत **सियान**.' -लेक.७२०

सियानी (वि.) कोरडा. 'मिरूग **सियानी** गेला व्हता.' -सित.४४.

सिरजोर (वि.) शब्दाला शब्द देणारा, बळजबरी. 'काय व्यालीस पोर, चोरटे **सिरजोर** जना वेगळेची कैसे।' -तुका.३९१.

सिरानी (स्त्री.) पद्धत, रीत. 'संजेवरती झोपायची **सिरानी** होती.' -लोक.९८.

सिरिंज (स्त्री.) गाणे. 'केरूनं छेडलेल्या पहाडी ढोलावर फुलयनं शिमगा **सिरिंज** म्हटली.' -झेल.४९. (को.)

सिरीगनेशा (पु.) आरंभ, सुरवात. 'असा झाला पह्यल्याच रोजी **सिरीगनेशा** या बैलाच्या कळोतेपनापाई.' -सित.१२५.

सिलक (स्त्री.) १. तिडीक. 'गुंड उचलाले गेली तं पाठीत **सिलकच** निंगली माय.' २. सुयटी. 'बास्याची **सिलक** पायात घुसली तं त्याचंबी बेंड झालं.'

सिलगनं (क्रि.) पेटणे. 'उलच्याक ठिनगीनं कापूस **सिलंगनं** हायच.'

सिलगलो (क्रि.रूप.) पेटलो. 'गवताच्या गंजीवानी भक्कन **सिलगलो**.' -मिर्झा.१९९.

सिलगावनं (क्रि.) पेटविणे. 'येवळा मोठ्ठा कळब्याचा गूळ **सिलगावनं** म्हंजे केवळं पाप म्हनावं!'

सिलसिला (पु.) परंपरा. 'त्यानं मागावं, आपून देत राहावं हा **सिलसिला** असाच सुरू आये.'

सिलेल (वि.) अरकाट, बदमाश माणूस. 'नांगो लय **सिलेल** मानूस आये, जरा काठावर लागू नाई देत.'

सिलोक (पु.) श्लोक. 'वदनी कवळ घेता. हा **सिलोक** झाला अन् पंगत जेयाले बसली.' -सित.६०.

सिल्पर (स्त्री.) पायातील चप्पल, स्लिपर. 'काय व माय **सिल्पर** आनली माया नवऱ्यानं, चालतो तं फटकफटक आवाज करत रायते.' (इं.)

सिवटी (स्त्री.) सुईटी. 'धांड्याच्या **शिवटीनं** कचकन बोटच कापलं पाय.'

सिवनं (क्रि.) स्पर्श करणे, धरणे. 'एरा खांबाहुनि एरु खांब **सीवितीः**' -ली.१५८.

सिवाई (वि.) सरस. 'थो हेक्कड आये त मीई त्याच्या परस दोन काकनं **सिवाई** आये मनाव?' -धग.९५.

सिवायमिवाया (स्त्री.) शिवळ. '**सिवायमिवाया**, बेळल्या-मेळल्या, जुपनेगिकने, कोंडकेमोंडके सबन टाका गाळ्यात.' -सित.१२४.

सिवार (न.) शेत. 'गोरूवे **सीवार** भरतिः माणुसे राने भरतिः' -ली.२८२.

सिसारी (स्त्री.) तिटकारा, वीट. 'काईकाई मान्साईची तं **सिसारीच** येते राजा कसेच्या कसे वागतात.'

सिसी (न.) शीर्ष, कपाळी. 'कथापुराण म्हणता **सिरी**। तिडीक उठी न कऱ्याचे।' -तुका.३०२५.

सिहंस्त (पु.) बारा वर्षांतून येणारा धार्मिक उत्सव. '**सींहस्तु** आलाः तो अवघा लोकु त्रीयेंबका **सीहंस्त** यात्रेसि नीगालाः' -ली.१०१.

सिळक (स्त्री.) काडी, सुईटी. 'बाइः एकि **सीळीकि** आणा ओली म्हणौनि तोडि मोडि करितीः' -ली.२६१. 'गोसावी बाइसाकरवी **सीळिका** आणवीलीयाः... गोसावी दंतध्वन केलेः' -ली.१४१.

सिंगरू (न.) घोडीचे पिल्लू. 'आमचे हे ऐसेचिः घोडीया पुसवतिः ते सींगेचि होतीः' -ली.५०७. 'घोडं मेलं वझ्यानं, **सिंगरू** मेलं येरझारीनं.' २. लहान मूल.

सिंगल (पु.) १. कप. 'भौ, **सिंगलकभर** देना हो असं संपतनही टुमणं लावलं होतं.' -झेल.७. २. सिग्नल. '**सिंगल** पळीन ताहाच रेलवाई पुढे धकीन.'

सिंगल (वि.) १. एकटा. '**सिंगल** सीट असल्यानं सायकलं हलकी गेली राजा.' २. रोड, अशक्त. '**सिंगल** हड्डीचा मानूस काय कामाचा.' (इं.)

सिंदोई (स्त्री.) एक झाड, फळ. 'ताज्या **सिंदोया** खाल्ल्या तं गोळ लागतात.'

स्पिंकर (पु.) स्प्रिंकलर. 'हिर्वा नजरभर मया **स्पिंकर** फव्वारा वावरात/ वाही वर्पन झोकात सोता पावनाबी मजूरात.' -पाहु.१९. (इं.)

स्लिपर (स्त्री.) एक चप्पलीचा प्रकार. 'तुटकी **स्लिपर** हातात घेऊन तो पटपट चालू लागला.' -गय.५. (इं.)

सीक (स्त्री.) लोखंडी सळई. 'मग गोसावी **सीक** लावीलीः माझी खोडी सांडवीलीः' -गोवि.१०९.

सीग (स्त्री.) माप भरल्यावर वर आलेला भाग. 'वाफेचिया **शिगें** वातिही लाविल्या लागे।' -ज्ञा.१७.१४२. 'तुका म्हणे भरली **सीग**। वरी मग वोसंडे।' -तुका.३४४४. 'माप भरून देल ना तुमीनं तरमा **सीग** नाई टाकली?'

सीत (न.) कण. 'मग उमाईसी उसिटे सांडिले होते तेथिची **सीते** वेचिलीः' -ली.११५. 'पायेटपासून भाताचं **सीत** पळूं नाई पोटात.'

सीतादई (स्त्री.) पहिला कापूस वेचण्याचा विधी. 'चंद्रानं **सीतादईची** तयारी केली. सात गोटे पाण्यातं धुऊन हारीतं मांडले.' -ना.१३५.

सीन (पु.) कंटाळा. 'मज कांहीं सीण न व्हावा यासाटीं। कृपा तुह्मां पोटीं उपजलीं॥' -तुका.३६८३. 'देवदेव म्हनून मी खूप फिरलो मले **सीन** आला पन देव नाही दिसला.'

सीव (स्त्री.) गावाची सीमा. '**सीव** वाटे परी न खंडे पृथिवी।'

सुईलगन (न.) सुलग्न. '**सुईलगन** लावताना लोकं बामनाच्या गंगायात अदला नाई तर एक ढब्बू पैसा टाकते.' -मोती.

सुकं (वि.) कोरडे. 'जळते ओले **सुक्याबरोबर'** -भीक.१२८.

सुकढाळ (स्त्री.) रजा, सुट्टी. 'तुमाले पटत असंल त या घरात राय नाईत **सुकढाळ** घ्या.' -बा.५३.

सुकनं (क्रि.) शुष्क होणे. 'उनात **सुकलं** का पोत्यात भरून काहाळता येते.' (त.शुक्कुदल्)

सुकर (पु.) आभार. 'मग भेटते ते तेढ्यात **सुकर** माना.' (फा. शुक्र)

सुकळा (वि.) वाडलेला, हडकुळा. 'त्या **सुकळ्या** पोराले पोरगी देता काय आपली?'

सुकाय (पु.) सुकाळ. 'सर्व धान्य होति ऐसा पाउस आलाः लोका **सुकाळु** जालाः' -उली.१. 'नीती गेली लुच्च्याचा **सुकाय** झाला म्हनते येचेल गाठोळं अलचूक घरात दाबून बसते.' -रूख.

सुकेल (वि.) कोरडे. '**सुकेल** भाजीपाली देता का राजा. माया नोटा तं असली हायत ना?'

सुक्करवार (पु.) शुक्रवार. '**सुक्करवारी** येजो बजाराच्या दिवसी.'

सुक्काळी (वि.) एक शिवी. 'घरात नाही घुसायो **सुक्काळीच्या**.' -सेल.३१७.

सुक्र (पु.) शुक्रतारा. 'तंव **सुक्र** नीगालाः बाइसी पुसीलेः बाबा हे कवण नक्षेत्रः' -ली.५५२.

सुखडी (स्त्री.) शाळेत मुलांना द्यावयाचे खाद्य. 'पोरांना बाईचा लळा नव्हता. लळा होता तो **सुखडीचा**, ब्रेडचा.' -झेल.२६. (को.)

सुखंढालं (न.) - ? 'माय मरीमाय आणलं तुह्याच **सुखंढालं**.' -ऊन.६८.

सुखापोटी (वि.) स्वस्थ, सुखरूप. 'त्याले कायजी लागली व्हती म्या **सुखापोटी** येवा म्हून.' -सित.११८.

सुखाशिरी (स्त्री.) सुखावस्था. '**सुखाशिरी** ना पुसाव पण दुखातबी आडूआडू घेतात का.' -सेल.१४०.

सुगरन (वि.) स्वयंपाकत पारंगत, तरबेज, सुगृहिणी. 'भाडळीची कामाक्षा ते **सुगरणीः**' -ली.१४. 'काउरळीची कामाक्षा ते **सुगरणीः** अळजपुरी वडे पूरीया तळीत होतीः' -ली.२०. '**सुगरणीबाई** थित्ता नास केला। गुळ तो घातला भाजींमध्यें॥' -तुका.३८२६.

सुगरन (स्त्री.) एक पक्षी. 'खोप्यामधी खोप **सुगरनीचा** खोपा.'

सुगरावा (पु.) उत्तम स्वयंपाक करणे. '**सुगरन** ही फक्त एक **सुगरावाच** जाणते पण जेवणाराची खूण वाढणारीच जाणते.' -कात.४२७.

सुगलात (क्रिवि.) विचारात. 'लेकरू चिरतानी आपल्या सुगलात आस्त. बाईबी आपल्या **सुगलात** र्‌हात आसन.' -सेल.३२. 'मरणाच्या वाटेनं निघालेला माणूस आपल्याच **सुगलात** असते.' -ऊन.७६.

सुगळं (न.) तिळसंक्रातच्या वेळस पूजेसाठी वापरावयाची घागर. 'संक्रातीचा सन आला ऐकाऐकी/ **सुगळ्याचं** वान देऊ माय लेकी.' -लोक.१५५. 'धोतर अन् लुगळं घागर अन् **सुगळं**. या तीसक्रातीचं **सुगळं** वो साजनी बाई.' -लोक.१५३. 'संक्रांतीला वान म्हनून मातीचं **सुगळंच** देत असतात बाई.' -सुखो.६.

सुगळंलुगळं (न.) पतीपत्नीचे प्रतीक. 'कुठं गावाबिवाला जायचं असंल तर आपलं **सुगळंलुगळं** संगच. म्हणजे नवराबायकोनी सोबतसोबत गावं फिरायची.' -वा.१४८.

सुगी (स्त्री.) हंगाम. 'पेरलेल्या वावरात **सुगी** होनारच नाई/ औंदाबी लेक उजवली जानरच नाई.' (फा.का.)

सुटकनं (क्रि.) चटकन निघून जाणे, सुटणे. 'पोलिसाची गाळी दिसल्याबरोबर येकायेकानं **सुटकनं** चालू केलं.'

सुटका (स्त्री.) मुक्तता, मोकळीक. 'सावकाराच्या फास्यातून कास्तकाराची काई **सुटका** नाई औंदा.' (हिं. छुटका)

सुटनं (क्रि.) सैल होणे. 'तब्येत **सुटत** चालली होती धाऱ्यावून' -मिर्झा.११०.

सुटला (वि.) आधाशा. 'कोनाच्याबी घरी खायाले भेटलं तं हा **सुटला** जातेच तथी.'

सुटी (स्त्री.) रजा, मोकळीक. 'पोयासाठी **सुटी** नोती तं म्याच मंग रजा टाकली.'

सुटेल (क्रि.रूप.) सुटलेले. 'कोन्यासकायचा बैल **सुटेल** हाय. लोकाईच्या वावरात गेलागिला अशीन ना.'

सुट्टे (पु.अने.) १. झुरके. 'च्याहा होयेलोक सखारामनं चिलम पेटोली. दोघायनं दोनदोन **सुट्टे** मारले.' -सित.३१. २. चिल्लर. 'धा रूपयाचे **सुट्टे** पायजे होते.'

सुट्टे (वि.) मोकळे. 'चिपकू नका बे **सुट्टे** चाला.'

सुट्टो (क्रि.रूप.) सुटत असतो. 'जमीनले पाय टेकतात ना टेकतात त आपून पयेत **सुट्टो**.' -सित.१२२.

सुडका (वि.) दरिद्री, गरीब. 'आम्ही सदैव **सुडके**। जवळी येता चोर धाके।' -तुका.६०. 'मिजास कराची त **सुडक्याच्या** पोटी का बा यावं?' -धग.५.

सुडके (न.अने.) फाटकेतुटके फडके, चिंधी, कपडे इ. 'अंगावरचे **सुडके** दोन लुगळ्याचे दोन धडप्यांचे दांड लावून नेसावयास तयार केले.' -कात.३७३.

सुडी (स्त्री.) ढीग, रास. 'भांबळ्याची आठागाड्यांची तुरीच्या पेंढ्याची **सुडीही** अशीच जळली.' -पख.२३. 'पाचसहा डवका उफणल्या की **सुडी** संपणार होती.' -ऊन.१७४. 'उडदाच्या दोनचार **सुड्या** उपनल्या तर व्हईन वाटते.' -ऊन.१७३.

सुतई(ळी) (स्त्री.) तागाची दोरी. 'जेवारी काहाळनं हाय तं **सुतई** तरमा आन इकत पोते शिव्याले.'

सुतक (न.) मरणाचा विटाळ. 'गोसांवी **सुतकेसि** बीजे करीतिः अर्ध वस्त्र नेसेतिः अर्ध धुतिः वाळवितीः' -गोवि.३६. 'फिटले **सुतक** जन्ममरणाचें। मी माझ्या संकोचें दुरी जालों।' -तुका.२६५९.३. 'तो मेलाई त आपल्याले काय **सुतक** धरा लागते?' -भं.८३.

सुतनं (क्रि.) मार देणे. 'सोसनारा मी नोहो, मी होय **सुतनारा**.' -पोळा.

सुतलं (क्रि.) तुडविले. 'तिचा पाय गोफावर पळ्ळा तसं मले वाटे का माया आजालेच कोनं लाथीखाली **सुतलं**.' -लेक.५०.

सुतवनं (क्रि.) सूत गुंडाळणे. 'पाचा जणांनी नवरदेवाचे सात नवरीचे पाच वेढे **सुतवले**.' -रा.६०.

सुताडेगोताडे (न.अने.) गुंतागुंत. 'दुसऱ्याचे **सुताडेगोताडे** आपण उगाच कशाला उकलत बसायचे.' -कात.४९.

सुतानं (क्रिवि.) मताने, रोखाने. 'थंड्या वाऱ्याच्या **सुतानं** दोरीले टांगेल कंदील जसे नाचत व्हते.' -सित.५८.

सुतार (पु.) लाकूड काम करणारा. 'गावात तसे मूळचे तीनच **सुतार**. तिघांचे तीन कामठे.' -सेल.७. (त.शुत्तिरन)

सुतासुतानं (क्रि.) कलाकलाने. 'पोराच्या **सुतासुतानं** घ्या लागते आजकाल.'

सुताळनं (क्रि.) मारणे. 'शेवटी सुताळी बरवी वाजवावी डांक।' -तुका.४२०. 'हे माजेल पोट्टं **सुताळनं** पळते गळ्या आता.'

सुताळली (क्रि.रूप.) मार दिला. 'मुकी **सुताळली** हाक ना बोब.' -काळी.७८.

सुताळू (न.) तढव. 'आना **सुताळू**, पावनं पछाळू.'

सुतावर (क्रिवि.) तालावर, मार्गावर. 'बयकेल हऱ्या आता **सुतावर** येल दिसून रायला.'

सुतासुतानं (क्रिवि.) पद्धतशीरपणे. 'उनायाभर त्या बैलाले **सुतासुतानं** वायलं म्या.' -सित.१३३.

सुती (वि.) १. सूता एवढ्या बारीक. '**सुती** बारीक सेवया आधणी झाल्या लाह्या केले ताट गुरू राया.' -लोक.१७. २. सूत्र, रीतभात असलेला. 'अवधुतरावचे सारेच लेकरं **सुती** आयेत. बेसत कोनीच नाई.'

सुती लावनं (क्रि.) मार्गी लावणे, शिकविणे. 'आजपासून हे गोरे **सुती** लावले.' -ए.३८.

सुतीपाती (वि.) मार्गस्थ लावणे. 'तासावर औतं झाले सुरू **सुतीपाती**.' -गाक.४१.

सुतून (क्रिवि.) ताकद, शक्ती लावून. 'आता कराव लागल खोल पेरणी **सुतून**.' -गाक.५०.

सुत्तर (न.) १. सूत्र. 'पोरीच्या वाग्याले काई सातसूत्तरच राहेलं नाई.' २. पतंगाची शेपटी. '**सुत्तर** तुटल्यानं पंतग उळून नाई रायली.'

सुत्तरशेवया (स्त्री.अने.) सूताएवढ्या बारीक शेवया. 'उडदाचे पापड अन् सुत्तर **शेवयाचं** गाठोडं त्याच्या हाती ठेवलं.' -मोती.

सुदं (वि.) चांगले, सरळ. 'अवगुणांच्या बाधें। दिसे **सुदें** विपरीत॥' -तुका.८२९. 'उफलानी इचार करनंबी तं **सुदं** नसते.' -ऊन.११२.

सुदंऊदं (वि.) साधेसरळ. 'कोनी कोनासी **सुदंऊदं** बोलंबीना.' -सित.४६.

सुदंमुदं (वि.) नीट, व्यवस्थित. 'पोरीचा हात द्याचा तं जरा तं काई **सुदंमुदं** पाहावं लागलं न?' -खुं.११९.

सुदबूद (स्त्री.) शुद्धी. 'मामा गेल्याचं कयलं तसी मायची **सुदबूद** गेली.'

सुदरनं (क्रि.) १. चांगल्या मार्गाला लागणे. 'मरीन पन **सुदरनार** नाई असा झानू त्यानं खाईम बाना धरेल व्हता.' -सित.१३२. २. सूचणे. 'आग लागली तरी झोपेपुढे याला काहीच **सुदरत** नाही.' -गय.

सुदा (वि.) चांगला, सज्जन, सरळ. 'आप्पाजी एकदम **सुदा** मानूस छक्केपंजे माईतच नाईत.'

सुदी (स्त्री.) विचारपूस. 'ज्याची त्यालेच पळली म्हतल्यावर बनाच्या **सुदीले** येते कोन?' -सित.५४.

सुदीक (अ.) सुद्धा, देखील. 'शिकनं अन् लिवनं कसं अस्ते? ते **सुदीक** शाळा नसल्यानं गावाले मालूम नवतं.' -लेक.५५.

सुदीसर्की (वि.) चांगली, सरळ. 'नशीबच मारते टिकली.

सुदीसर्की. नाही तर वक्टीगांढी.' -ऊन.७४.

सुधबूध (वि.) शुद्ध, भान. '**सुधसुध** हरवून बसल्यासारखी ती गौरीच्या खाटेवर टेकली.' -पोळा.

सुधरनं (क्रि.) प्रगत, दुरुस्त होणे. 'आता तरी **सुधरा**. आता तरी मुलाले शिक्षन द्या.' -अखे.

सुधारनं (क्रि.) लठ्ठ, तंदुरुस्त होणे. 'सठ खात जा. तब्येत **सुधरली** पायजे.' -ना.८५.

सुधारायले (क्रि.रूप.) सुधारत आहेत. 'या मातंग मंडळीतबी बदल व्हायला. आपण काय म्हणून अडथळा कराव ते **सुधारायलेत** तं काय गुन्हा कुरायलेत.' -वा.३९८.

सुनगटा (स्त्री.अने.) सुना. 'मोठी भाग्याची तुमची सून हाये माय? नाहीतर आमच्या **सुनगटा**?' -कावू.

सुनवायरी (स्त्री.) सून. 'पाहतापाहता तरण्या **सुनवायऱ्या** दोनचार वर्षांनी लेकरांना कडेवर मिरवीत.' -काळी.८९०.

सुनमुख (न.) नववधू कशी आहे ते प्रथमतः आप्तेष्ट स्त्रियांना दाखवली जाते. यावेळी आप्तेष्ट तिला यथाशक्ती खाऊ म्हणून काहीबाही देत असतात. '**सूनमुख** पाहू दे नंदाजावाच्या मेळ्यात/ सोन्याची सरी घालीन सुनंच्या गळ्यात.'

सुनसान (वि.) सामसूम, उजाड, कोणीच नसलेले. '**सुनसान** जंगल असल्यानं कोनीच दिसत नोतं.'

सुनावनं (क्रि.) ऐकवणे, खरडपट्टी काढणे. 'वच्छीच्या सासूले साजरं **सुनावूनच** आलो मी तरास द्याचा नाई.'

सुपडासाप (पु.) सर्वनाश. 'लोकांना अक्कल आली पन **सुपडासाप** झाल्यावर.' -खुं.१३५.

सुपळा (पु.) सूप. 'वळ्या **सुपळ्यात** वाऊ घालेल आयेत त्या डब्ब्यात भरून ठेव.'

सुपुर्द (न.) हवाली, ताब्यात, स्वाधीन. 'कौतिकनं टोपल्यातले कपडे शेषरावच्या **सुपूर्द** केले.' -धग.३६.

सुबाभूई (स्त्री.) वृक्ष विशेष. 'वनमंत्र्यानं **सुबाभुया** लाव्याचाच सपाटा सुरू केला म्हंतात.'

सुबाल्या (पु.) निघून, पळून जाणे. 'कसेबसे चार घास त्यांनी घेतले आणि फाट्याकडे **सुंबाल्या** केला.' -काळी.६४.

सुभा (पु.) मुलूख, प्रदेश. 'वऱ्हाडी **सुभा** निजामाच्याच ताब्यात होता.' (अर.)

सुमडं (वि.) कंजुष, कोत्या मनाचे. 'थ्या **सुमड्याच्या**? कौतिक तिरस्कारात म्हणाली, थो ओ काय वंज द्याले बसला?' -धग.४. 'वर्सातून एक डाव तं द्या लागते आन् त्यालेई असा **सुमडेपणा** करता?' -धग.१५३.

सुमळा(ळी) (वि.) कंजुष. 'आदोळ बसली खायाले, **सुमळी** बसली वाढ्याले.' -डेबू.११. (अर.शुमा)

सुमसाम (न.) निरव, शांत. 'सारं गाव **सुमसाम** झालं होतं मायाही डोया लागून राह्यला होता.' -एक.

सुमार (पु.) अंदाज, मर्यादा, प्रमाण. 'ढेरपोट्याले काई खायाचा **सुमार** नाई बापा.' (फा.का.त.सुमार)

सुम्मा (पु.) सपाटा. 'या झुडपीनं पंधरा दिवसातच तूपलोनी चोरून खायचा **सुम्मा** लावला नं.' -अंधा.

सुयकं (न.) चांगले, निवडलेले. 'तुमीनं तं केला चतरेपना- **सुयके** बैल सितुनसन्या.' -सित.१२५.

सुयकनं (क्रि.) सांडाचे माजावर आल्याचे लक्षण. 'गोऱ्हं हुंगा घेते अन् **सुयकते**.'

सुयटी (स्त्री.) धांड्याची किलची. 'धांडे अती खातात भोसळीचे निऱ्हा **सुयट्या** करून टाकतात.'

सुयी (स्त्री.) शिवण्याचे साधन. 'लुगडां गूंडुनि **सुयी** झांकुनि ठेविलीया होतीयाः' -गोवि.२९०.

सुरई (स्त्री.) चंबू, मातीचे लांबोडे भांडे. 'थंड पानी लागन तं **सुरईतलं** घे बाई.' (अर.सुराही)

सुरकाटनं (क्रि.) सुकणे. 'मन दुपारच्या उनातल्या फुलासारखं **सुरकाटून** जातं.' -खुं.१५९.

सुरकांड (न.) नांदा, घोशा. 'यात्रेला चलण्याविषयी त्याला किती वेळा म्हटलं पण त्याची आपली एकच **सुरकांड**.' -पख.६७.

सुरकावले (क्रि.रूप.) चटावले. 'मनाचा शिन घालवायला मद्य हवे म्हणून बाळासाहेब आता वरतोंडीलाही **सुरकावले** होते.' -कात.३९०.

सुरकुंडी (स्त्री.) अंग लांबवून पाण्यात मारतात ती उडी- मुसंडी. 'नदीच्या काठावरून भोंगये पोट्टे **सुरकुंड्या** माऱ्यात गुंग होती.'

सुरकुती (स्त्री.) कातड्यावरील वळी. 'म्हतारपन आल्याचं चेऱ्यावरच्या **सुरकुत्याच** सांगतात.' (का. सुक्कु)

सुरत (स्त्री.) तोंड, चेहरा, मुखडा, स्वरूप. 'कास्तकार कास्तकार दुखी डोयातला आसू/ सुख भऱ्या **सुरतीच्या** नाई होटातला हासू' -नोका. 'जावई पाटील शोभे **सुरत** सावळी/ मैना मोहोर पिवळी.' -लोक.१०४. 'तिच्या पाणीदार **सुरतेवर** लावण्याचे काही और तेज सांडत होते.' -कात.३३३. '**सुरतेला** तेज चमकती वीज ठरू न दे नजर.' -भीक.७०. (अर.)

सुरतं (वि.) सरळ, चांगलं. 'शेतीची वाही करायची म्हणजे दावणीची जोडी **सुरती** पाहिजे.' -पोळा.

सुरतीमोती (पु.) एक मूल्यवान रत्न. 'माझ्या हक्काचा असा **सुरतीमोती** कुडाच्या भिंती उजळत असता लटक्या

धनाचं काय करू.' -कात.११.

सुरते (वि.) सुज्ञ. 'भलेभले शहाणे **सुरते** मधे पडले. भांडण सावरत गेलं.' -डेबू.१२.

सुरपाटी (स्त्री.) एक खेळ. 'पाटील मंडळीची तर **सुरपाटीच्या** डावाप्रमाणे इकडूनतिकडे धावपळ सुरू होती.' -भं.७२.

सुरमा (पु.) १. एक अंजन. 'वय झालं जास्त तरी शामराव डोयात टाकते **सुरमा**.' -जांग.३२. २. मोठे, श्रेष्ठ, जहाँबाज. 'सोताले म्होट्टे **सुरमा** समजनारे धुरकरी त्याच्यापुळे हात टेकोतात.' -सित.१२१. (फा.सुर्मा)

सुरस (वि.) रसपूर्ण, चटकदार. 'ऐसी धगी **सुरस** कथा। जे जन्मभूमि परमार्था॥' -ज्ञा.१.४८. 'जाणों जगीं आप वोलें। तें तुझिया बोला **सुरस** जालें।' -ज्ञा.१४.७.

सुरसुरी (स्त्री.) स्फुर्ती. 'डेबुजीचं कीर्तन ऐकल्यानं त्याला दानधर्माची **सुरसुरी** येई.' -काळी.४३.

सुरसुरे (क्रिवि.) माजावर येणे. 'कोंबळा **सुरसुरे**, कोंबळी कुरकुरे.'

सुरळ (न.) गाडीच्या मागच्या बाजूने ओझे होणे. 'गाडी **सुरळ** झाली तर दांडीवर बसून धूर हाकण्याचं शहाणपणा तुझं.' -झा.६२.

सुराग (पु.) खूण, चिन्ह, शोध. 'चोरीचा काई कोनाले आजून **सुराग** लागला नाई.' (तु.फा.सुराघः)

सुराना (पु.) १. आगाऊ सूचना, माहिती देणे. 'पावनेई अमतीच आले. आगुदर **सुरान** करते तं मानूस तयारीत रायते.' -ना.३१. २. इशारा. 'आजचं राज काल घिऊ असा डिगुले **सुराना** पोरायनं केला.' -सित.१३.

सुरावनं (क्रि.) अधिक प्रमाण होणे. 'तण **सुरावलेलं**. निंदणाचा अद्याप साधा विळाही तणावर उतरला नाही.' -पोळा.

सुरी (स्त्री.) मोठा चाकू. 'पावशीनं केदलोक भाजी कापाव. लगनाचा सयपाक हाय ना **सुरी** आन मोठी.' (त. शूरि, हिं. छुरी)

सुरूस (वि.) चवदार, चविष्ट. 'तैसी वरीवरी पाहता उदासे। आंत तरी अति **सुरसे**।' -ज्ञा.२.८९. 'थुईथुई चाल तुई जशी लांडोर चालत/ कोकीळाचा बोल येते तुया **सुरूस** बोलीत' -नोका. 'सर अमृताची धार माया जीवाले भावली/ दूध **सुरुस** हे किती तान्ह्या पाजते मावली.' -पाहु.१०. 'बकरीच्या दुधात गुयाचा च्या **सुरूस** लागत असते.'

सुर्यातय (वि.) सूर्य उगवतो ती दिशा. 'गढीवर उभे राहिले असता **सुर्यातय** एक टेकडी दिसते.' -भं.१.

सुर्यासंबर (पु.) पूर्व दिशेला, सूर्यासमोर. 'भाऊ असे **सुर्यासंबर** जा. मंगसन्या मारोतीचं मंदिर लागीन तथीच हाय जानरावचं घर.'

सुलगन (न.) सुलग्न. 'पह्यलं तास पडलं शुभमंगल झालं/ नंतरचं पेरणं **सुलगन** लावनं झालं.' -मिए.७७.

सुलगनं (क्रि.) पेटणे. 'चिनकी पळ्ळी तसा गूळ **सुलगला**.'

सुलतानधावा (पु.) जबरी हल्ला. 'काय फायदा झाला **सुलतान धावा** करून?' -ल.८८.

सुलपावर (क्रिवि.) उतारावर. 'इकळच्या रस्त्याच्या **सुलपावर** येऊन ते उभे राहयलते.' -सित.५२.

सुला (पु.) समेट, तडजोड. 'दोघात **सुला** करून म्या भांडन मिटोलं.' (सुलह)

सुलाखून (क्रिवि.) निरखून. 'तिच्या चेहऱ्याकडे मंजुळेने पुन्हा एकदा नीट **निरखून** अगदी रोखून **सुलाखून** पाहिले.' -कात.३८२.

सुलायकी (स्त्री.) - समजुतीने. 'मी **सुलायकीनं** नाई बोल्लो म्हून तुले राग आलासीन त्यारोजी.' -सित.२५.

सुलूक(ख) (पु.) वागणूक, व्यवहार. 'घरादारातला पोरीचा **सुलूक** बरा नाई दिसत.' (अर.)

सुलूप (पु.) स्लोप, उतार. 'तो थोडं पुढे डांबरी सडकेच्या **सुलुपाने** पडायचा.' -खुं.९३. (इं.)

सुवरकी अवलाद (वि.) डुकराचे अपत्य, एक शिवी. 'कौतिकनं कुलूप ठोकलं तं सकीना म्हणाली किवू ओ **सुवरकी** अवल्याद चिल्लांयेंगा तो.' -धग.२०२.

सुवानपुळा (पु.) देवीला वाहण्याचे सामान. '**सुवानपुळा** घेऊन अंबादेवीले वायला.'

सुवासीन (वि.) सवाष्ण. 'तंव वरीखा सोळांची **सोवासीनि** एकि आलीः खोडसवारिखीः खळिचा साउलाः' -ली.१९०.

सुव्वा (पु.) दाभण, मोठी सूई. 'तळो शिवाले मोठा **सुव्वा** पायजे सुई तं कटकन मुळते.'

सुशीर (वि.) खूप सुस्त, बिनघोर. 'झप्याले तं नाम्या निऱ्हाच **सुशीर** आये.'

सुसत (क्रि.रूप.) सुचणे. 'मले काई **सुसत** नाई तू आता या घरगिरस्तीआंगे ध्यान देसीन तं बरं हुईन.' -सित.८५.

सुसनं (क्रि.) सुचणे. 'वाईट घळीघटका आली का चांगलं **सुसनंच** बंद होते मान्साले.'

सुसलिसीन (क्रिवि.) सुचली असेल. 'एवळ्या कवळी-चुंबकाले दत्तक घ्याची गोठ **सुसलिसीनच** कशी.' -सित.१८.

सुसरी (वि.) एक शिवी. 'माहेरी तसी सासरी, तसीच वापरते **सुसरी**.'

सुसे (क्रि.रूप.) सुचे. 'काम करनं नाई **सुसे**, पिवसी घेऊन बसे.'

सुस्कारा (पु.) श्वास टाकणे. 'शेतीचा आमच्या पाच कोसात अस्कारा जो पाहे तो टाके थंडा **सुस्कारा**.' -मिर्झा.१८९.

सुस्त (वि.) आळशी, मंद. 'बेंडकोई खायेल हाय वाट्टे सरपानं म्हनूनसन्या येवढा **सुस्त** पळेल हाय.' (फा.)

सुस्तावनं (क्रि.) थंड, अचपळ. 'नुकतच जेवण झाल्यामुळे शरीर थोडं **सुस्तावलं** होतं.' -मा.१७. 'चुलानाचं आवतन असल्यानं घरोघरच्या चुलाही **सुस्तावल्या** होत्या.' -काळी.९८.

सुस्तावा (पु.) सुस्ती, आळस. 'डोळ्यात मोहफुलांच्या पाण्याचा **सुस्तावा** वाढत होता.' -झेल.६.

सुस्ती (स्त्री.) दिरंगाई, विलंब, आळस, शैथिल्य. 'कास्तकारीत **सुस्ती** करून नाई चालत ज्या रोजचं काम त्याच रोजी करनं पळते.' (फा.)

सुळकन (क्रिवि.) एकदम आवाज होऊन. 'मामुजी **सुळकन** गेला माय पायाजोळून.'

सुळका (पु.) कापड. 'माझी मात्र मळकट **सुळक्यात** काळपट भाकरी असायची.' -फीर.५०.

सुळकाटा (पु.) मोठा काटा. 'प्रश्नाचा असा **सुळकाटा** होऊन काळजात सलाय लागला.' -खुं.१७. 'फुले गोंजारतागोंजारता तिच्या हाती कावऱ्या बाभळीचा **सुळकाटा** आला.'

सुळसुळनं (क्रि.) सळसळ आवाज करणे. 'मृदु मुलायम धोतर त्यांच्या उंचपुऱ्या शरीरयष्टीवर हवेनं **सुळसुळायचं**.' -काळी.५८.

सुळा (पु.) अडकित्ता. 'अन् इकळे दैवं **सुळा** जरा फोळतो सुपारी.' -धो.१६.

सुंगनं (क्रि.) हुंगणे, वास घेणे. 'गालीची परि **सुंगण्या** म्हदुकळी देशील तू लाजरे.' -भीक.६२.

सुंगनी (स्त्री.) हुंगण्याची क्रिया. 'बेहोस पळल्यावर कांद्याची, खेटराची **सुंगनी** द्या लागते.'

सुंगला (क्रि.रूप.) वास घेतला. 'माधवरावनं सिगारेट शिलगावली. धूर सोडला. नकळत पूर्णाजीनं तो **सुंगला**.' -काळी.५९.

सुंगलात - ? 'माणसं आपल्या **सुंगलात** गुंग होते.' -झि.८८.

सुंगूळमुंगूळ (क्रिवि.) कसेतरी थोडक्यात. 'दोन दिवसा आड आंगुळी, **सुंगूळमुंगूळ**, काटकसरीनं पाणी वापरतो.' -ल.१७४.

सुंटवडा (पु.) सुंठ-साखरेची पूड. 'लेकरू न झाल्याने घरात **सुंटवडा** कधी वाटला गेला नाही.' -कात.२८.

सुंदलनं (क्रि.) तुडविणे. 'भान्याले साजरा तुडवला. लाथाडला. **सुंदलन सुंदलन** केलं.' -डेबू.१२.

सूक (न.) सुख. 'लगन झालं तापासून तिभऱ्याचं **सूक** नाई माया जीवाले.'

सूट(ठ) (पु.) सुंठ. 'हिवायात च्याहा पायजे तो **सूट** टाकेलच मस्त लागते.'

सूड (पु.) मोळी, रास. 'घरची इंधनासाठी रडते दारचीच्या आंगणात चंदनाची **सूड** पडते.' -कात.३४३.

सूत (न.) धागा, दोरा. 'दुकानातून एक **सुताचं** बिंडल देतं रे आनून?' -धग.९४.

सूद(ध) (स्त्री.) शुद्धी, होश. 'गावभराचा अकात ही अकात. अशातच **सूद** जायेल आपली.' -मे.५३. 'बिमारीनं आपलीही **सूध** गेली असती.' -मोती.

सूप (न.) धान्य पाखडण्याचे साधन. 'कानु देखिला तो म्हणे हस्ति **सुपासारिखाः**' -ली.१३३. 'धिंगामस्ती करणाऱ्या उनाड दाण्यांना दयाळू **सुपानं** पोटाशी धरलं.' -डेबू.३३.

सूम (वि.) कंजुष, चिक्कू. 'पण हिचा नवरा पडला ना मूर्खाचा **सूम**. कंबरेची गाठ कधी म्हणून सुटणार नाही.' -कात.८०.

सेक (पु.) उबारा, आस. 'पाणी ठेविताः तेया पाणीयाचा **सेकु** घेतिः लेकरु न्हानितिः' -ली.१६९. 'गोसावियासि **सेकु** मानतु असेः तरी सगडी करूः' -गोवि.८७.

सेकाटं - ? 'आबा माया हाती **सेकाट्याच्या** जागी फोन्टोन आला.' -सित.११७.

सेजबाज (वि.) रेखीव, शोभेल असे. 'काय **सेजबाज** माकडा अळंकार नास करुनी टाकीः'

सेजलचं - शेजारचे. 'कुळा **सेजलचं** टोपलं कुठी गेलंसीन म्हनावं?'

सेजी (क्रिवि.) जवळ. 'जेवितां बोलतां **सेजेसी** पैं निजे।' -नाथ.१२.

सेजी (स्त्री.) शेजारीण. '**सेजीसाईले** बाई, कसी सांगू कोनाले?'

सेद (न.) छिद्र. 'लाकळाले किकऱ्यानं **सेद** केलं.'

सेदोनसे (वि.) दोनशे वगैरे. 'आमी खिसे कापू **सेदोनसेचा** फंदा मारू पन् लिडर तं निरा लाखानंच फंदा मारतात.' -काळी.२०.

सेन्द्रबेन्द्रं (वि.) चित्रचिचित्र. 'असं **सेन्द्रबेन्द्रं** घालून फक्त हिंडगोळी करा लागते.' -गागा.

सेन (न.) शेण. 'गोसावी नाथोबा करवि होळीयाकारणे **सेणी** वेचलियाः' 'सळा सारोनाले **सेन** तं लागतेच माय.'

सेनामाती (वि.) शेणाचे व मातीचे. 'जांबुळे देलेः तीये तोडौनि खाओ बैसे तव **सेणेमातीया** तोंड भरेः' -ली.३०९.

सेमला (पु.) दुपट्टा, शेल्याचे टोक. 'सखा चालला थाटात खाली **सेमला** लोंबते/ नार मोहना मागून कशी तुऱ्याला झोंबते.' -लोक.३९.

सेल (पु.) १. शेवट. 'गावाच्या **सेल्यावरून** मजूर पायला तरमा भेटला नाई.' २. टोक. 'पयल्या पयल्यांदार गोरे शिकतानी कदी **सेलं** पाळतात, कदी अळतात.' -सित.१२२. ३. मसाला. '**सेल** डाऊन झाले वाट्टे सायाचे. बॅटरीक उजीळ फेकून नाई रायली.'

सेलका (वि.) निवडक, उत्तम. 'सबन लोक काहाले पायजत संगं, **सेलके** घ्यावं निवळून.'

सेलझाडा (पु.) शेवटचा वेचा. 'कामच कुठी हये माय आता. कापसाचा **सेलझाडा** चालू हये.' -सेल.१५९.

सेलसांड (स्त्री.) उधळण. 'घराची अस्तुरी नाही सुपारीचं खांड/ रोज दासीच्या पलंगी दोड्याची **सेलसांड**.' -लोक.८९. 'बासुंदी जेलबी लाडू, पुरण पोया अशा कितीतरी पक्वानांची रोज **सेलसांड** होत होती.' -कात.३६७.

सेला (पु.) दुपट्टा. 'कबीराचे मागीं विणूं लागे **सेलें**। उठविलें मूल कुंभाराचें॥' -तुका.४२९८.

सेलारी - ? 'नेसावया साडी **सेलारी** चुनडी। अंगींचीं कांचोळी जाळिया फुलें॥' -तुका.४२२४.

सेल्यावर (अ.) शेवटी. 'तुवा काम उधळं घेतलं ना मंगसन्या ते **सेल्यावर** ने.'

सेल्यासेवटी (अ.) अखेरचे, अंतिम. 'तिचा देर सारेईत ल्हान त्यानं त्याईच्या घरचं हे **सेल्याशेवटचं** लगन.' -लेक.११.

सेव (पु.) १. बेसनाचा पदार्थ. 'मार्कंडे पोते सोडीतिः लाडु फोडीतिः **सेव** घेतिः' -.२४१., 'मग साधी सोजी काढीलीः **सेव** केलीः तळीलीः चुलीवरि पाकु ठेविलाः' -ली.४०३. २. डोक्यावरून घेतलेला लुगड्याचा, साडीचा पदर. 'मग गोसावी ऐसा **सेओ** धरीलाः मग म्हणीतले आवोः नेस नेस म्हणेः' -गोवि.१२२. 'ते उगीची आधातुरा **सेउ** करूनि तयाची ओसरीय नीजैलीः' -गोवि.१७४. 'पायघोळ चंद्रकळा काळी/ **सेव** पडू दे परी न खाली.' -भीक.११. 'कापसाचं गाठोळं मेरीवर टाकलं आन् **शेव** घियाले खंदाळी सोळ्ळी. लुगळं झटकून **सेव** डोक्स्यावर घेतला.' -अक.७२.

सेवंती (स्त्री.) १. एक फुलझाड. '**सेवंतीये** अरसिकांही। आंग पाहतां विशेषु तरी नाहीं।' -ज्ञा.१५.५९४. २. लग्नविधी. 'एकी गांवाचे वऱ्हाड महुर्ताची वेळ होएतव **सेवतीएसि** बैसले होतेः' -ली.६८.

सेवया (स्त्री.अने.) शेवळ्या. 'तूप पुरणाची पोळी दूध **सेवया** सुतळी.' -लोक.३५.

सेवागत (स्त्री.) सेवा. 'त्याईच्या खानगीची चांगली **सेवागत** कर अन् आजीले हिंमत दे.'

सेवायलं (वि.) शेवाळलेला. '**शेवळैले** खडक असेः तेयावरि पावो देवोची नैएः ऐसाहि दिजे तरि नीसरवोनि पडिः' -ली.१९३.

सेव्वी (स्त्री.) शेवयी. 'भटांचीये थाडा तुप वाडिलेः तेणे आघवि **सेवयी** सरवळी वरति आलिः' -ली.३२७.

सेस (पु.) शेतीचा कर. 'द्रव्य देउनि मागौता वज्र राज्यी बैसवीलाः राज्यासि **सेस** भरिलीः' -ली.४०३.

सेसावनं (क्रि). आतुरणे. 'माया घरी दुनिया आहे, पन मायबापाच्या भेटीले मन **सेसावतेच** ना.' -मे.७६.

सेसावून (क्रि.रूप.) आतुर होऊन. 'लेकरासाठी **सेसावून** गेलती जसी.' -सेल.९.

सेहत (स्त्री.) प्रकृती स्वास्थ्य. 'बोला रामभाऊ काय म्हन्ते **सेहत** ठीक हाय?' (अर.सिहत)

सेंगळे (पु.) शेंगोळे, खाद्यपदार्थ. 'श्रीप्रभूचा श्रीकरी सेंगळे बुड्डे होतेः **सेंगुळे** आरोगु सरले होतेः' -ली.२०.

सेंडी (स्त्री.) शेंडी, शिखा. 'डाइए धरि तरि **सेंडि** नाइः कासे धरि तरि कुपीनुः' -ली.४२. 'तीन **सेंड्या** बामन, देव पुजेची लामन.'

सेंदनं (क्रि.) स्पर्श होणे, लागणे. 'पायजो वट्याले गाळं **सेंदील**.'

सेंबळं (वि.) शेंबूड असलेले. 'बाळ **सेंबडे** मातेसि। काय नावडे तियेसि॥' -तुका.४४२२.२. 'आपलं ते बाब्या अन् दुसऱ्याचं **सेंबळं**.'

सेंबूळ (पु.) शेंबूड. 'बाइः ए नवद्वारेः जैसा नाकि **शेंबूड** येः' -ली.३८३. 'नाकी मोतीय होतीः मग गोसावी म्हणीतलेः आवो मेली जाएः **सेंबुडु** होय म्हणेः' -गोवि.२१७. 'काट्टीचा **सेंबूह** पूस बरं पदरानं.'

सैतान (पु.) राक्षस, क्रूर, वेताळ, झोटिंग. 'दारू पेल्यावर नवरा **सैतानच** हून जाते जसा.' (अर.शैतान)

सैतूत (न.) वृक्ष विशेष. 'हगवण थांबेना तेव्हा तिने **सैतुताचा** पाला चाऊन पाहिला.' -ऊन.१९५.

सैपाक (पु.) स्वयंपाक. 'आता **सैपाक** होते, दोनदोन घास खा अन् मंग निंघा.' -धग.१६.

सैल्या (वि.) सैल, नपुंसक. 'अबे वो **सैल्या** काहून हिजळ्यावानी हात फेकत चालतं बे?' -मोती.

सोईत (क्रिवि.) काळजीत, व्यवस्थित. 'फीचं म्हनलं त सांग आमी त्याच **सोईत** हाय म्हनून.' -फीर.११०.

सोक (स्त्री.) सुकण्याची क्रिया. 'पेरन्यावर पानी आलं नाई तं निंगालेल्या कोंबावर **सोक** गेली.'

सोकट (वि.) सुकलेले. 'कोळप्यानं वरची **सोकट** माती उलसून खाली दाबत होती, खालची काळीभोर नवार ओली माती वर येत होती.' -फीर.१८०.

सोकनं (क्रि.) शुष्क होणे. 'टाइमावर पान्याची पाळी नाई देली तं पिकाचं **सोकनं** चालू होते.' (का.सोक्कु)

सोकली (क्रि.रूप.) सुकली. 'पानी नाई तं पाय तुयसी कसी **सोकली**.'

सोकली (स्त्री.) एकाच गोष्टीचा पाठपुरावा. '**सोकली** मेंढी, तेरा रानं धुंडी.'

सोकाटनं (क्रि.) सुकणे. 'तासी लागलेलं पीक **सोकाटून** सपकू लागलं.'

सोकारी (पु.) जागल्या, राखणदार. 'गाव राखाया मारोती कोन बसोला **सोकारी**.'

सोकारी (स्त्री.) राखणी, रखवाली. 'रजोगुणपेरी। तेतुले सत्त्व **सोकरी**।' -ज्ञा.१३.३८. '**सोंकरिलियाविण** गमविलें पिक। रांडापोरें भिके लावियेलीं॥' -तुका.१२०२. 'पाळी नांगर पाभारीं। तन निवडूनि **सोंकरी**।' -तुका.३६६८. 'रात्रीच्या **सोकारीसाठी** लाकडी ठुण्याचं मचांग वावराच्या मध्यभागी उभारलं.' -झेल.६७.

सोकावनं (क्रि.) चट, नाद, आवड लागणे. 'बकरी लय **सोकावली** डुंग्यात चऱ्याले.'

सोकू (क्रिवि.) सुकणे. 'पानपुळ्यामंदी नव्या नवतीचा **सोकू** पाहे ईळा.' -काया.१४.

सोकेल (वि.) शुष्क झालेला, सुकलेले. '**सोकेल** हरीके झाळ, पाझरे मुयात पानी.' -वि.

सोक्षमोक्ष (पु.) बरावाईट, भलाबुरा निकाल. 'नवरा-बायकोचं पटत नसीन तं एकडावचा **सोक्षमोक्ष** लावून टाका.'

सोगा (पु.) धोतराचा पदर. 'धोतराचा **सोगा** तं खोसून घ्या, जमीन झाळून रायला ना तो.' (का. सोगिल, फा. त. शुंगु)

सोचनं (क्रि.) विचार करणे. 'काल **सोचलं** होतं आपन आमदार होऊ/ आज मले वाट्टे व्हाव इरप्पन भाऊ.' -नांबै.

सोजी (स्त्री.) तांदूळ परतून केलेला भात. 'तंव तेही **सोजी** काढिलीः **सोजीची** पोळी केलीः ऐसा चोखटु उपहारु नीफजीलाः' -ली.१०७. 'बाइः दुधातु **सोजी** आळाः गोसावीयासि तीनि दी **सोजीची** आरोगणा जालीः' -ली.२०३. 'मग दुधा आंतु **सोजी** घातलीः ते कालवीली भीडेयासी तुपाचा बोळा दीधलाः' -गोवि.८८. 'तुला ना येथे साखर **सोजी/** कशी ग होशील खाया राजी.' -भीक.१५०.

सोट (पु.) १. मारण्यासाठी वापरावयाची काठी. २. माजावर आलेल्या जनावरांच्या योनीतून वाहणारा द्रव. 'म्हैस **सोठ** गाऊन रायली रे. आज सर द्याले हेल्याजोळ नेजो.'

सोटगा (पु.) जाड काठी. 'काकाच्या हाती जाळाजुळा **सोटगा** राहे.'

सोटम्या (वि.) पुष्ट अंगकाठीचा. 'खाले पायजे, काम म्हटलं तं जीवार येते **सोटम्याच्या**.'

सोटा (पु.) मारण्यासाठी वापरावयाची काठी. 'ज्यास्त अगाऊपना करशीन तं लेका माऱ्याले **सोटाच** घेईन हाती.' (त.शोट्टै)

सोडगा (पु.) जोराचा झोडपा. 'दोर धरून **सोडगा** मारीन. त्याची हमाली करणारा तोही एक घाण्याचा बैल होता.' -कात.१२.

सोडसाल (क्रि.रूप.) सोडाल. 'तुम्ही असं बायांना **सोडसाल** तं आमी थांबनार नाही.' -निशा.१५.

सोडाची (क्रि.रूप.) सोडायची. 'ऑर्डर **सोडाची** नवऱ्यानं दाबून/ रातदिवस तिले घ्याचं राबून.' -जांग.१७१.

सोता (सर्व.) स्वतः. 'हिरिवरतं जाऊन तेनं **सोता** सोवळ्यात भरणंभर पानीभी आनलं.' -दि.७.

सोदा (वि.) लुच्चा, लबाड, बदमाश. 'त्या **सोद्यावर** काय भरोसा ठुता हो तुमी?' (फा.शोहदः)

सोनं (न.) मौल्यावान पिवळा घातू, कांचन. 'का मोतियांची जैसी जाती। **सोनयाही** मान देती। नातरी मानवती। अंगेचिसड॥' -ज्ञा.१८.१७३९.

सोनंनानं (न.) सोनं वगैरे, मौल्यवान वस्तू. 'काही घरात **सोनंनाणं**, खाण्यापिण्याची ददात नाही.' -फीर.१११.

सोनखत (न.) विष्ठा. 'गावाबाहेरचे उघड्यावरील सारे अमूल्य **सोनखत** अगदी वाया जाते.' -कात.६३६.

सोनचिळी (स्त्री.) चिमणीची एक जात. सुंदर, तरुण मुलीसाठीही हा शब्द वापरतात.

सोनताग (पु.) तागाचा एक प्रकार. 'हा दोर **सोनतागाचा** असल्यानं धटवट आय साजरा.'

सोनहरकं (वि.) अती उत्साही. 'पोराकळचे लोकंबी मले निखय **सोनहरके** दिसतात माय.' -सित.१४७.

सोनामुखी(मोकई) (स्त्री.) भूई तरवडीचा पाला. ढाळासाठी गुणकारी, रेचक वनस्पती.

सोनार (पु.) सोन्याचा व्यवसाय करणारी एक जात. 'सकळ यातींमध्ये ठक हा **सोनार**। त्याघरीं व्यापार झारियाचा॥' -तुका.२२९९.३.

सोप (स्त्री.) पिकांवरील एक रोग. 'पाऊस आला. ज्वारीवर

सोप देऊन गेला. अर्धीमुकी झाली ती.' -सेल.१२२.

सोपल (स्त्री.) पीळ देऊन तयार केलेला तागाचा दोर. 'आगूल लाव्याले जाळीच्याजाळी **सोपल** पायजे.'

सोपा (पु.) घरापुढील पडळी, ओसरी. 'बुढीचं खाटलं **सोप्यात** टाकेल राहे.' (अर.सुप्फा)

सोबल (क्रि.रूप.) शोभेल असे. 'आपल्याले **सोबल** असंच काम करावं मान्सानं.'

सोबाव (पु.) स्वभाव. 'आबा जसा **सोब्यानं** गरीब तसाच परीस्थितीनंबी गरीब.' -सित.१३. 'सुनीचा बर्ताव, **संबाव** एकदम साजरा आये.'

सोमल (न.) एक विष. 'कलावंतीनीची काया कोमल पण तिची माया जलाल, **सोमलासारखी** जहरी असते.' -कात.४१२.

सोम्यागोम्या (वि.) ऐरागैरा, दरिद्री. 'मी कोनी **सोम्यागोम्या** नाई. गोमाजी सोनाजी पाटील हावो.' -भं.१४.

सोय (स्त्री.) आदरातिथ्य. 'बापा बापा, काय **सोय** केली पोरीवालेईनं. लाडू काय, जिलेबी काय लयच लय!.' (का.सोयि)

सोयकं (न.) सोळका, लहान भारा, गठ्ठा. 'येक येक **सोयकं** आनून ढासंभर इंधन जमा केलं.'

सोयर (न.) नाते. 'त्या फाटक्या आंगळ्याशी त्या चिंधीचं **सोयर** जमून जाईन.' -संगा.४९.

सोयरपन (न.) नातेसंबंधी. 'पांडुचं आमचं **सोयरपन** लय जुनं आये.'

सोयरसुतक (न.) सुखदुःखं, घेणेदेणे. 'देशाचं कोनाले **सोयरसुतक** हाये/ आपलंच तं पोट राज्या लय मोठं हाये.'

सोयरा (पु.) नातेवाईक, नातलग. 'पैं स्वार्थी जें उपकरे। तयाचि नाम **सोयिरें**।' -ज्ञा.१८.५६२. 'ते सर्वाही सदा सज्जन। **सोयरे** होतु।' -ज्ञा.१८.१७९८. 'बाइलेचा भाऊ पिसुना **सोयरा**। ह्मणउनि करा तों चि आतां॥' -तुका.४००३.३. 'मायबाप जीवलग **सोईरा**।' -नाथ.१२७९.

सोयरिक (स्त्री.) नातेसंबंध. 'बैससी जिथे सभासदी। तेथे **सोयरीकीचिया** संबंधी। कही बोलो॥' -ज्ञा.९.५४४., 'रावो तेथें कटक। सौजन्य तेथें **सोइरीक**।' -ज्ञा.१८.१६३., 'मंगळदायक करिती कुमारी। काय त्यांची खरी **सोयरीक**॥' -तुका.३००.२., 'तुझी माझी आहे जुनी **सोयरीक**। आधीं बंधु लेंक मग जाले॥' -तुका.४००३.१.

सोयरेधायरे (पु.अने.) नातलग. 'ऐसा तेयाची **सोइरीधाइरी** म्हणतिः हे गोसावी धाकुटेः हे ही धाकुटीः' -ली.२९. 'आणिकही सखे सोईरे।' -ज्ञा.१.१८२. '**सोइरे धाइरे** दिल्याघेतल्याचे। अंत हें काळीचें नाही कोणी॥' -तुका.३९७४.

सोयसाय (स्त्री.) १. व्यवस्था, आदरातिथ्य. 'पावन्यारावन्याईची **सोयसाय** साजरी करा लागते.' २. स्थिती. 'औंदा लगन कराचं होतं पन काई **सोयसाय** नाई तसी.'

सोया (पु.) दोन तासातील अंतर. 'एरंडेल तेल परगोलक्सच्या गोया/ त्यानं व्हाचे ढाय मंग पंधराचा **सोया**.' -मिर्झा.११३. 'तिफनच्या **सोयात** डुब्बं.' 'पंधरा बोटाचा **सोया** ठुला तं पीक मोकयं वाहाळते.'

सोयाबीन (न.) एक तेल वाण. '**सोयाबीन** बोना, चैनसे सोना.'

सोयीसुंबार (पु.) विचार, कुल्पना, इरादा. 'तुंबून राहिलेला हिशोब त्यांनी अजून पुरा केला नाही, तूच सांग देण्याचा काही **सोयीसुंबार** तरी?' -कात.४३८.

सोरा (पु.) क्षार. 'पोट खरळते तं पान्यातून **सोरा** पेनं.' 'पान्यात खारा **सोरा** टाकला तं कपळे झक् निंघतात.'

सोलनं (क्रि.) टरफले काढणे. 'बाइः केळे आणाः मग एथ **सोलसोलु** देयाः' -गोवि.३०५. 'कुंडातलं कातळं **सोललं** रापीनं, सळेल वसाळ वास घुमला चारी दिशेनं.' -रूख. (का.सुलि,फा.)

सोला (पु.) पुरुषी लिंग. 'तिह्या मायचं डिंगरं तं. **सोल्याएवढं** नाही भोसोळीचं माहा बाप काढते.' -डेबू.११.

सोलून (क्रि.रूप.) साल, चमडी काढून. 'वाघाला मारण्याच्या चाबकानं धोंडबाला चांगलं **सोलून** काढलं.'

सोले (पु.) हरबरा, तुरीच्या दाण्याची भाजी. 'एकी दोना तुरीचे **सोलेः**' -ली.३९. 'भक्तीजने तुरीची पोपटि आणीति...पोपटीचे **सोले** करीतिः' -गोवि.२४२. 'भाजी तं अशी केली की नाव घेऊन मांग्याची सरम. **सोल्याची** भाजी वाळ माय.'

सोलेल (वि.) टरफल काढलेले. 'तुरीच्या शेंगा सोलेल हायत. **सोल्याची** भाजी फोळनी दे.'

सोल्डर (न.) खांद्याचा भाग. 'मापाचे कपडे अन काल्लर, **सोल्डर**, कप, बाटम ऐकायलाही भारी होते.' -मोती.

सोस (पु.) आवड, नाद. 'आता काही **सोस** न करी आणीक। धरीन ते एक हे चि दृढ।' -तुका. ९३२. 'दह्यादुधाचा लय **सोस** आये पोरीले.' (का.सोसु)

सोसनं (क्रि.) सहन करणे. '**सोसवेना** भार मज आतां।' -नाथ.७.

सोसला (क्रि.रूप.) सहन केला. 'जगण्याच्या संगसंग मायनं **सोसलाय** त्रास, जाई दुःखाच्या बुडाला माय वखराची पास.' -ठ.८८.

सोसारत (क्रि.रूप.) सोशित. 'पुराचं थैमान अंगभर पेलत

तो उठला आणि **सोसारत** चालायला लागला.' -लेक.४४.

सोसो (क्रि.रूप.) सहन करीत असू. 'कोंबड्या कापासाठी घरी आमी पोसो/ राती बेंडा सकायी सोडाचा त्रास **सोसो**.' -मिर्झा.११२.

सोहागरात (स्त्री.) मधुचंद्र. 'तो **सोहागरात** सोडून आल्याची कोणाला कल्पनाच नव्हती.' -मोती.३९.

सोहोलत (स्त्री.) सवलत. 'या हप्त्यात माहे पैसे दे, यापुढे आता **सोहोलत** नाई.' (अर.)

सोळकं (न.) बांबूचा गठ्ठा. 'दोरीनं बांधला जसा बांबूचा **सोळका**.' -मिर्झा.१५८. 'घरासाठी सागाच्या बल्ल्या, वेळूचे **सोळके** कोरकू हातून आणविले.' -झेल.८.

सोळचिठ्ठी (स्त्री.) घटस्फोट, फारकती. 'पटलं नाई ना तं लवकर **सोळचिठ्ठी** द्यावं अन् दुसरं लगन करावं.'

सोळता (क्रि.) सोडता. 'बैल **सोळता सोळता** मलेच टुंगल-लं लेकानं.'

सोळपिच्छा (न.) त्यागणे, सोडणे, टाकणे इ. क्रिया. 'नाही पटत एखांदी गोष्ट आपल्याले तं तिचा **सोळपिच्छा** करायचा.' -वा.३९७.

सोळबांध (क्रिवि.) सोडणे बांधणे. 'कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची **सोडीबांधी** करी।' -ज्ञा.१२.२२०. 'बारबार हे गाठोळं काहून **सोळबांध** करून रायला तू?'

सोळसाळ (स्त्री.) सोडण्याबांधण्याची क्रिया. 'शामाची पालाची **सोळसाळ** चाल्ली व्हती तेधवाच रावजी काका येऊन टेकले.' -सित.५६.

सोळा (क्रि.रूप.) सोडावा. 'काई गोठी **सोळा** अन् काई धरावं, त्याबास्ता संसार चालते.'

सोळून (क्रि.रूप.) सोडून. 'पायटीपायटीच आजीनं जीव **सोळून** देला.' 'ढोरं सोळून दे चऱ्याले.'

सोळो (क्रि.रूप.) सोडून द्यायचो. 'सारे कामं **साळो** मी टीवीपुळे बसो/ आपले हारले तं लळो जिकले त हासो.' -नांबै.

सोंग (न.) वठवलेले नाटक, ढोंग. 'तुका म्हणे भाव। शुद्ध बरा **सोंग** वाव॥' -तुका.४१.३.

सोंगण(न) (न.) कापणी. 'मंग **सोंगेल** फनाची अनी होते धारदार.' -वि. 'चार दिवसा पूर्वीच वाघामायच्या शेतातील जवारी **सोंगण्यात** आली होती.' -कात.५०२.

सोंगनं (क्रि.) पिकाच्या कापणीची क्रिया. 'तेथ चणा **सवंगतु** होताः' -ली.४११. 'आखरात कळबा **सोंगनं** सुरू आहे.'

सोंगून (क्रि.रूप.) कापून, कापणी करून. 'शेतातले धांडे **सोंगून** खळ्यासाठी जागा सवान करून घेतली.' -अंधा.

सोंड (स्त्री.) दाराच्या दोन्ही बाजूने केलेली उतारपाठी लहान भिंत. 'दरोजापुढची **सोंड** कोनंतरी राती खसोली वाट्टे.'

सोंडा (पु.) धान्यातील किडा. 'गव्हात लय **सोंडे** झाल्यानं दोन उना द्या लागल्या.'

सोंदळ (स्त्री.) शमी, एक वृक्ष विशेष. 'आपटा **संवदड** रानचारा। दसऱ्याचा होय तुरा॥' -तुका.४४४६.

सौंदड(ळ) (स्त्री.) एक वृक्ष विशेष. **सौंदड** आणि आपट्याची पाने दसऱ्याला सोनंचांदी म्हणून एकदुसऱ्याला देतात. 'आपटा **संवदड** रानचारा। दसऱ्याचा होय तुरा॥' -तुका.४४४६. 'उन्हाळ्या दिसाचा नाही **सौंदडीले** पाला/ झाडा देवक्यानं नेला.'

सौंदर (न.) मोटेचा जाड दोर. 'भरलेली मोट वर येताच त्याने **सौंदर** खेचून थायले भराभर भरले.' -कात.३.

सौदा (पु.) १. घेवदेवीचा व्यवहार. 'पान्यात म्हैस बाहीर शिंगाचा **सौदा**.' '**सौदा** व्हाच्या आधी जातभाईनही बापाला समजावलं. उपयोग झाला नाही.' -फीर.१७१. 'तीन पैशाचा **सौदा**, येरझारा चौदा.' २. किराणा, सामानसुमान. 'म्हन बरं चौदा. चौदा. तू होय बायतीन, मी आनतो **सौदा**.' (फा.तुर्की.सौदा)

स्तोर (अ.) पर्यंत. 'घरालोक **जावेस्तोर** धीर नाई निंगला तुले.'

स्या (स्त्री.) शिव्या. 'घालीं भलते ठायीं हात। होती **शिव्या** बैसे लात॥' -तुका.२२०४.२. 'महादेवचं काट्टं निन्हा माजेलमाजेल **स्या** देऊन रायलं.'

स्यादोनं (क्रि.) शिव्या देणे. 'तिचा नवरा आला म्हन्ते, धूम **स्यादूनंतन** रायला अन् गुदीले ओळतच नेतो म्हन्ते.' -अक.२५.

स्यादोयाले (क्रि.रूप.) शिव्या द्यायला. 'तुमी मले न्याले आले का अती **स्यादोयाले** आले.'

स्यादोलं (क्रि.रूप.) शिव्या दिल्या. 'पाटलाले **स्यादोलं** बुहाऱ्यानं. बाबू अद्दल घळोतोच तुले.'

ह

हक (पु.) अधिकार. 'दोन वर्स मातर त्याले गावकीचा **हक** भेटेना.' -सित.१३६. 'बईनीनं **हक** सांगला का भावाचे दा जातात अन् पाचच रायतात.' (अर.फा.)

हकडकनं (क्रि.) ओकारी, वांती करणे. 'पोरीचं **हकडकनं** काहानं थांबील व बाई?'

हकदार (वि.) हक्काचा मालक. 'बापाच्या इस्टेटीत मीबी **हकदार** हावोच का नाई?'

हकनाक (क्रिवि.) विनाकारण. 'शिव्या देऊ नका माह्या पोराले **हकनाक**.' -त.७. (फा.)

हकपकनं (क्रि.) बावरणे, घाबरणे, लटपटणे. 'म्हताऱ्यानं डोळे वासून इचारलं तसा नामा **हकपकला**.' -धग.६६.

हकलनं (क्रि.) १. हाकलणे. 'चळावर बैलाले **हकलनं** जोऱ्याचं पायजे नाई तं शेनाची ऊट भारी जाते.' २. काढून देणे. 'दारूळ्या मान्साईले **हकलनं** पळतेच भाऊ.'

हकाल (क्रि.रूप.) १. काढून द्यावे. 'तेवळी गाय **हकाल** बरं गाईगवारालोक.' २. हाकल. 'आता तू **हकाल** गळ्या छकळं.'

हकालनं (क्रि.) १. काढून लावणे. 'ते कुत्रं **हकालनं** बे घराभाईर.' २. हाकलणे. 'कई तं मले रेंगीबी **हकालनं** पळते.'

हकालपट्टी (स्त्री.) काढून देण्याची क्रिया. 'वशाची **हकालपट्टी** केली हफिसातून सायबानं.'

हकालून (क्रि.) काढून. 'चंपतच्या घरी गेलो तं त्यानं मलेच **हकालून** देलं.'

हकालेल (क्रि.) काढून दिलेला. 'म्याच वशाले **हकालेल** आय भाईर.'

हकिकत (स्त्री.) वृत्त, अहवाल. 'खरी **हकिकत** काई कोनी सांगत नसते.' (अर.)

हकीम (पु.) वैद्य. 'आजार लांबतच गेला तिचा. अनेक दवाखाने, **हकीम**, वैद्य पालथे घातले.' -फीर.८४. (अर.हाकीम)

हक्काबक्का (क्रिवि.) थक्क, आश्चर्यचकित. 'मननं ऐकून त्याचं झालो मी **हक्काबक्का/** येष्टी बंद पडली मारा म्हने धक्का.' -ऊ.२६.

हगनदारी (स्त्री.) शौच्यास बसण्याची गावालगतची मोकळी जागा. 'पिळ्यानंपिळ्याची **हगनदारी** हाय अन् तू मना करून रायला अथी बस्याले?'

हगाम (पु.) हंगाम. '**हगामात** दायदाना कमाऊन ठुला का सालभऱ्याची निस्ताई होते.' (फा.)

हजम (न.) गिळंकृत करणे, हडपणे. 'येवळा मोठ्ठा नंबर **हजम** केला लेकाच्या मारवाळ्यानं.'

हजर (वि.) उपस्थित, सिद्ध, तयार. 'कोनाच्याबी मरनातधरनात आपून **हजर** अस्तो राजा.' (अर. हाजिर)

हजरजबाबी (वि.) चातुर्याने शब्दास शब्द देणारा. 'सखाराम बोल खाली जाऊ देत नाई. लय **हजरजबाबी** मानूस आये.'

हजरत (पु.) मुस्लीम. 'गावात **हजरत** असला का रोज्याचा मयना माईत पळते.' (अर.)

हजा(ज्जा)म (पु.) न्हावी. '**हजाम** आला नाई गावात तं बोकळ्यावानी दाळी वाळते.' (अर.)

हजामत (स्त्री.) १. कटींग, केस कापणे. 'भाकरी नेत नाही **हजामतीपरत**?' -सेल.४१. 'दाढी ना मिशी **हजामतीची** खुशी.' २. खरडपट्टी. 'माया बापानं माही साजरी **हजामत** केली राती.' (अर.)

हजारी बेलपान (न.) बेलाचा प्रकार. 'येका बेलाच्या तिरगुनीले चार पानं दोन पानं न्यारे एक पानाच्या बुडात चवथं पान. तुया भागानं हे **हजारी बेलपान** भेटलं.' -हज.४०.

हट (संबो.) नकारार्थी संबोधन. '**हट** लेका, काईबी बोलतं काय तो शामराव तं देव मानूस हाय.'

हट (पु.) हेका, आग्रह. 'घेउनी धरणें बैसती उपवासी। **हट** आह्मांपासीं नाहीं तैसा॥' -तुका.४२४५. 'लेकराचं **हट** पुरवाच लागते बैना.'

हटकनं (क्रि.) आवाज देऊन व्यत्यय आणणे, थांबवणे. 'कोनी गावाले निंगलं का **हटकनं** चांगलं नस्ते.'

हटकर (पु.) एक जात, धनगर. 'झाम्या बनगीधनगर नाई, **हटकर** होय तो.'

हटकून (क्रि.रूप.) १. मुद्दाम. 'कमलाकर पावन्याय सामने **हटकूनच** येत नोता.' -सित.१४८. २. न चुकता. 'नाई म्हनलं तरमा **हटकून** मांगं लागते पोट्टं.'

हटकेल (वि.) १. हट्टी. 'रमी पुरी **हटकेल** पोट्टी आय. २. अडलेले. 'त्याच्या माथं माहा काय **हटकेल** आये का?'

हटकोर (वि.) हट्टी. 'पुरुख कैसा हटीया असेः' -ली.२५. 'आक्क्या लयच **हटकोर** हाय. जेवळा हाकलसाल तेवळा पिकात येतेच येते.'

हटकोरपणा (पु.) हट्ट, दुराग्रह, हट्टीपणा. 'थो नाई म्हंते त राहू द्या, कायले एवढा **हटकोरपना** करता काजीन?' -धग.१००.

हटनं (क्रि.) १. मागे जाणे, परतणे. २. माघार घेणे. 'मांगं **हटनं** जरा, लात झाळीन्ना बैल.'

हटे (क्रि.रूप.) मागे सरके. 'एक बैल पुढे चाले तं दुसरा मांगं **हटे**.'

हटेल (क्रि.रूप.) १. मागे सरलेला. 'टकरीत तं तुवा हेला **हटेल** आये लेका.' २. हरलेला, माघार घेतलेला. ३. हॉटेल. 'काल तं मी **हटेलातच** जेवलो बॉ.'

हटोईन (क्रि.रूप.) हटवणार. 'देवात लाईन भांडनं, त्यालेबी पटोईन/ पायतापायता इंद्रालेबी आसनाऊन **हटोईन**.' -मिर्झा.

हटोनं (क्रि.) बाजूला करणे. 'ते गाळं बाजूले **हटोनं** रस्त्याऊन.'

हटोयाले (क्रि.रूप.) बाजूला सारायला. 'हे लाकूळ मंधातून

तिकळे **हटोयाले** पायजे.'

हटोयेल (क्रि.रूप.) बाजूला, सारलेला. 'आपला कूप कोनं मांगं **हटोयेल** आय रे?'

हटोलं (क्रि.) बाजूला केले. 'बुढीले म्या **हटोलं** म्हून बरं नाई तं झोळपा लागत होता.'

हट्टाकट्टा (वि.) धडधाकड. '**हट्टाकट्टा** पोरगा लेका तू, दिवसभर झोपेल अस्तं. काई कामधाम कराव.'

हडपनं (क्रि.) फस्त करणे. 'दिसली ते वसद **हडपनं** बरं दिसते काय रे कोनाची?'

हडय (स्त्री.) स्त्रीपिशाच. 'माय होस का **हडय**, लेकराले पाजतई नाईस?'

हडवाय (स्त्री.) स्त्रीपिशाच. 'आमच्या घरात सुमित्री **हडवाय** हूनच आली जसी बोहारी.'

हडवायखाना (पु.) पोरवळा. 'या **हडवायखान्याले** तं जीव कावला बाई माहा.'

हडसूनखडसून (क्रिवि.) जीवाच्या संतापाने. 'उबाऱ्याखानीचा, बुवाऱ्याऽऽ माट्या वानाचाऽ मनकर्णीच्या तोंडाचा पट्टा सुरू. **हडसूनखडसून** शिव्या.'

हडहड (स्त्री.) झाडझाड, धिक्कार. 'रोज सरणाचे पुढे जळते ओले खोड, नशिबात **हडहड** कष्टाने नार गो' -लोक.५६. 'झिंगराजीची नुस्ती **हाडंहाडं** झाली होती. शिवाय परिस्थितीची **हडहड** होती.' -गा.२१.

हडेलहप्पा (पु.) १. व्यर्थ गोष्टी. 'माह्या अन् त्याच्या सुरू झाल्या गप्पा/ म्याबी सुरू केलं म्हनानं **हडेलहप्पा**.' -ऊ.४०. २. भलाबुरा काळ. 'बापुसाहेब हे जुन्या **हडेलहप्पी** जमान्यात मुरलेले असल्याने त्यांच्या पुढे येण्याची कोणाची टाप नव्हती.' -कात.१६.

हड्डी (न.) हाड, अस्थी. 'कस्टात जीवन गेलं आता येकनयेक **हड्डी** दुकते.'

हतोटी (स्त्री.) कौशल्य. 'कुठून कसं जमवाव याची **हतोटी** शिवाले गठेल आय.'

हतोळा (पु.) हातोडा, छोटा घण. 'खाती लायन्या **हतोळ्यानं** घाव मारे.'

हतोळी (स्त्री.) छोटा हातोडा. 'खिवा ठोक्याले का घन पायजे बे? **हतोळी** आन.'

हत्यार (न.) साधन, शस्त्र. 'पाठीं **हतियेरां** आपणयां। निदिध्यासें एक जालिया।' -ज्ञा.१५.२६१. 'धरितील पोटासाटीं **हतियेरें**। कळती तीं खरें वेठीचींसीं॥' -तुका.१०६६. (फा.)

हद (स्त्री.) मर्यादा, हद्द, पराकाष्ठा, अतिरेक. '**हद** झाली तुही आता पाऊ नको अन्त/ हरामाचं खातं पोटात होतीन जन्त.' -नांबै. (अर.)

हदन (न.) उष्टे. 'काहाले पाह्यजे च्या? चांगलं **हदन** पळेलोग खाल्ल्याघेतल्यावर.' -मे.७८.

हदन्या (वि.) उष्टे टाकणारा. '**हदन्यानं** पाय ताटात किती उस्टं टाकलं.'

हदहद (वि.) पुष्कळ. 'तिच्या आंगावर पाय केवळं **हदहद** मास आये.' '**हदहद** मासा, ओंगळ वास.'

हदालमावशी (वि.) पुष्ट, लठ्ठ स्त्री. 'नालकट सारजा **हदालमावशी** जरा गुलहौशीच दिसते.' -कात.१२३

हदुलेगदुले (न.) उनाडक्या, मौजमजा. 'तिथं कसं गमन तुले. गावातल्यावानी **हदुलेगदुले** थोडेच तिथं.' -धग.१०५.

हद्द (स्त्री.) सीमा, मर्यादा. 'वावराची **हद्द** काटीपावतर आये.' (अर.)

हनहन (न.) झिडकारण्याचा, धिक्कारण्याचा भाव. 'माया वऱ्हाडी बोलीले नका करू **हनहन**.' -भू.१९.

हनहनी (स्त्री.) अभावाची स्थिती. 'चार तिफनीचा कास्तकार असूनबी सदाई **हनहनीच** अस्ते माय.'

हनोटी (स्त्री.) हनुवटी. 'मग गोसावी एकु श्रीकरू खांदावरि ठेविलाः एके श्रीकरे **हनुवटीयेसि** धरिलाः' -ली.१२०. 'मग कंठनाळ आटे। **हनुवटी** हे हडौती दाटे।' -ज्ञा.६.२०७.

हन्डा (पु.) मोठे भांडे. 'पितईचा मोठ्ठा जुना **हंडा** आये मावदात.' (का.)

हन्यास (क्रिवि.) त्रास, वैताग. 'खरंच सांगतो भाऊ **हन्यास** आला बंदा/ या कुणबेकीचा हा बेभरोशाचाच धंदा.' -ऊ.५४. 'किस्नानं दहीदूध चोरून अख्या गौळनाईले **हन्यास** आनलं होतं.' (अर.)

हन्यासनं (क्रि.) त्रासणे, वैतागणे. 'रक्त ओकू ओकू केली किस्तकाळी/ ऋतू मारे आळी **हन्यासलो**.' -गागा.

हप (पु.) आश्चर्यचकित. 'शाळेत गेलो काल अन् झालो **हप**/ शिकवण्याचं सारं काम होतं ठप.' -मिए.१२९. 'असा करिस्मा करीन की लोकं **हप** हुऊन जातीन पोरीचं लगन पाऊन.' -सित.१४३.

हपचक (क्रिवि.) आश्चर्यचकित, हतबुद्ध. 'दारात एकाएकी किनखेडचा नातू...त्याला पाहून शेवंतामाय **हपचक**.' -बा.१४३.

हपापनं (क्रि.) हाव धरणे, लोभ करणे, सुटणे. 'कितीबी खायाले द्या लेकराईचं **हपापनं** चालूच रायते.'

हपापेल (वि.) प्राप्तीसाठी उतावीळ. 'निरुत्त्या फुकटचं खायाले निऱ्हा **हपापेल** हाय.'

हप्ता (पु.) १. सात, सप्ताह. २. पूजाविधी, जेवणावळी, उपास. 'पोरासाठी तिनं निऱ्हा कडक असे नांगोबाचे

एक नाई, दोन नाई तं नऊ **हप्ते** केले.' -लेक.४७. ३. किस्त, मुदतीत द्यावयाचा अंश. 'पुढच्या **हप्त्यात** काई पैसे देतो.' (फा.)

हबक (स्त्री.) तलफ, हुक्की. 'सरकारी टँकर सुरू झाल्यावर पाण्याची **हबक** मिटणार हाये.' -त.९१.

हबकनं (क्रि.) घाबरणे, जोरात धक्का बसणे. 'ती बाई सरळ अंगावर आली तेव्हा शंकर मनात **हबकलाच**.' -मा.३०. 'तुमच्या वावरात येणारे चोट्टे माह्या भुताले **हबकत** जातीन.' -खुं.१३.

हबकला (क्रि.रूप.) घाबरला, भ्याला. 'सावकाराचा विश्वास असला तरी चंद्रभानजी मरणा आधी जरासा **हबकला** होता.' -गा.३३.

हबका (पु.) तोंडावर पाण्याचा जोरात केलेला मारा. 'चुळा भरून तोंडावर थंडगार पाण्याचे **हबके** मारून चेहरा पुसला.' -एक. 'सुस्ती जाची तं पान्याचा **हबका** मारावं तोंडावर.'

हबचक (क्रिवि.) चकित. 'गावात शेवगाहून पुरा सजोयेल घोडा आला त्यानं लोकं आखीनच **हबचक** झाले.' -लेक.४२.

हबल्या (वि.) गुपित गोष्ट पचत नाही असा. 'त्या **हबल्याच्या** पोटात कोन्तीच गोठ ठयरत नाई पाय.'

हबेलंडी (स्त्री.) त्रेधा, भयाकुलता. 'कुणीच वाली नसल्याने त्या निराधार दोघींची काय **हबेलंडी** उडाली असेल त्यांनाच ठाऊक.' -कात.१५९

हमखास (क्रिवि.) खात्रीने. 'शाळेतून आल्यावर गाईला **हमखास** चारायला न्यावेच लागे.' -फीर.१३९.

हमरस्ता (पु.) सार्वजनिक मार्ग. 'या सगरानं जाऊन **हमरस्ता** लागला का गाळी भेटीन तुमाले.'

हमरीतुमरी (स्त्री.) भांडणातील बोलचाल, मीमीतूतू, वादविवाद. 'माहा मी मोठा, तुहा तू मोठा, **हरीतुमरी** येतात लोक.' -मा.३०. 'थोडी जरी आगळिक झाली तरी **हमरीतुमरीवर** यायचा.' -फीर.५३.

हमदर्द (वि.) सहानुभूती ठेवणारा. 'आपल्या जीवातला जीव द्यावा असा **हमदर्द** कुनी भेटलाच नाई.'

हमला (पु.) हल्ला. 'वाघानं **हमला** करू नोय म्हनूनसन्या कोरकू लोक उंच मचांग बांधतात.'

हमसत (क्रिवि.) हुंदके देत. 'तोंडावर हात ठेवून ती **हमसत** होती.' -गा.९६.

हमाल (पु.) मजूर, बोजा उचलणारा. 'मी तव **हामाल** भारवाही।' -तुका. ६९०. (अर.हम्मल)

हमाली (स्त्री.) ओझे उचलणे, कामाची मजुरी. 'दिवसभर जीनात **हमाली** करून पन्नास टिकल्या भेट्टेत.'

हमी (स्त्री.) जबाबदारी, खात्री, जिम्मा. 'आपून घेतो तुमच्या लेकीची **हमी**.' (अर.हामी)

हमेशा (अ.) नेहमी, सतत. '**हमेशा** असं कोनापुळे हात फैलवाचं काम पळते.' (अर.फा.हमिशहू)

हम्मल (पु.) एक दागिना. 'गळ्यात **हम्मल**, चांदीच्या साखळ्या, हातात चांदीची ठप्पी.' -झेल.११. (को.)

हयकुंड (न.) हळदीचे मूळ. '**हयकुंड** आनले. कांडले. दयले. अन् पिवळी जरद हयद तयार झाली.'

हयगय (स्त्री.) हेळसांड, दुर्लक्ष, ढिलाई. 'काई कामात **हयगय** करून नाई जमत.'

हयगाई (स्त्री.) चालढकल. 'दवापान्यात **हयगाई** केल्यानं बुढा कामातून गेला.'

हयद (स्त्री.) १. हळद. 'चांगदेओराउळाते जीया **हळदी** उटीले तीया हळदी माते उटावेः' -ली.१२४. '**हयद** लागली आंगाले नवरी निंघाली जावाले/ बासिंग बांधून डोक्स्याले धनी आला वो नेवाले.' -ल.हागे. २. लग्नातील एक विधी. विवाहापूर्वी नवरीला **हळद** लावण्याची प्रथा आहे. त्यासाठी पाच सवाष्णी बोलावतात. 'पाचसवासणी कंथाच्या पहिल्या/ मैनाच्या **हळदीले** बलावल्या.'

हयद्या (पु.) कावीळ. 'पिवळेजरद डोये दिसून रायले. **हयद्या** झाला वाट्टे.'

हयपय (वि.) उतावीळ, उत्सुक. 'कमली लयच **हयपय** आये, जरा धीर नस्ते तिले.'

हयरान (क्रिवि.) त्रस्त. 'हाळानं **हयरान** व्हयेल त्याचा अवतार आजून बुडीच्या नजरीत पळला नोता.' -सित.७७. 'शेजाऱ्याले **हयरान** झालो राजा सायाचा निऱ्हा धुराच कोरत रायते.'

हयली (स्त्री.) दुमजली घर. 'जुन्या काळावानी **हयल्या** दिसत नाईत आता.'

हयवान (पु.) राक्षस, दुष्ट माणूस. 'मानूस होस का **हयवान**, इतलं मारतात बायकोले.' (अर.)

हयशि(सि)यत (स्त्री.) क्षमता, लायकी. '**हयशियत** नाई तं भावबी विचारू नाई.'

हयसद (स्त्री.) ताकद, कुवत. 'तुई लेका कवळीची **हयसद** नाई अन् मुलखाच्या गोठी करत रायतं.'

हया (पु.) हौद. 'गाळं **हयापासी** आलं. बैल गटंगटं पानी पिऊन रायल्ते.' -सित.१३१.

हयाकया (पु.) शाप, बददुआ. 'मारू नोका आता मुक्याजीवाची **हयाकया** काई घिऊ नका.' -सित.१२९.

हयात (स्त्री.) आयुष्य, जीवन. 'सुखासाठी आपल्या गायीची जाते **हयात**/ मेल्यावर कातळ्याच्या चपला जोडे पायात.'

-जांग.५२. 'उभी **हयात** बैठक म्हणून पोटाची पृथ्वी झाली होती.' -काळी.८१. 'बापजाद्याईले उभ्या **हयातीतई** शिक्षनाचं मोल समजलं नाई.' -धुम्म. (अर.फा.)

हये (क्रि.रूप.) आहे. 'लिव्हणं वाघाचा डोळा **हये**. सईस कसा भेईन त्यो?' -रा.१३.

हयेत (क्रि.रूप.) आहेत. 'पावने घरी **हयेत** काय तुमच्या?'

हर (पु.) शीव, शंकर. '**हर हर** बोलाऽऽ महादेवऽऽ.'

हर (वि.) दरेक, प्रत्येक. '**हर** मालाची किंमत दोन रुपये.' (फा.)

हरए(ये)क - प्रत्येक. 'गावातल्या **हरएक** मान्साले आवतन देलं काल राती.'

हरक (वि.) कपडाचा एक प्रकार. 'गरिबाले **हरकच** परवळते, मलमल नाई दादा.'

हरकत (स्त्री.) आक्षेप, विरोध, अडथळा. 'मोजनीत वावर निंगूनबी **हरकत** घेतली सायाच्यानं.' (अर.फा.)

हरकनं (क्रि.) आनंदणे, सुख होणे, हुरळणे. 'काईबी इकत घ्याले **हरकनं** साजर असते काय?'

हरकाम्या (वि.) कोणतेही काम करणारा. 'चपराशी लागल्यापासून तो ग्रामपंचायतीचा **हरकाम्या** माणूस होता.' -काळी.२५.

हरकीजून (क्रि.रूप.) आनंदी होऊन. 'मले आंधी लयच **हरकीजून** देल्तं माय नेतो म्हून, आता एकलेच गेले पाय.' -कावू.

हरकीजेल (वि.) आनंद झालेला. 'लग्नासाठी **हरकीजेल** पोट्टे असतात. कोनालेबी होच म्हनतात.'

हरकून (क्रि.रूप.) आनंदित होऊन. '**हरकून** काम केलं का भारी जात नाई.'

हरकेजनं (क्रि.) आनंदी होणे. 'समद्या कामाचा लेकाले कटाळाच. कोणतच काम **हरकेजून** करणार नाही.' -वा.५०.

हरकेल (वि.) अति उत्साही. 'गावा जाले सुमी कालपासून **हरकेल** आये.'

हरको(खो)नं (क्रि.) हुरळून टाकणे, आनंदित करणे. 'फुलला पयस जसा येता जाता **हरखोते/** तसं तुहय भरलं रूप बिना बोलाचं बोलते.' -नांबै.

हरकोयेल (क्रि.रूप.) हुरळून दिलेले. 'जत्रीत जासाठी तुमीच **हरकोयेल** होतं मले.'

हरक्या (वि.) उत्साही. 'राजू लय **हरक्या**, कोन्तई काम सांगा, करतेच तो.'

हरघळी (क्रिवि.) नेहमी. '**हरघळीच** लेकाचा भांडन करत रायते.'

हरतऱ्हा (वि.) नाना प्रकारे. 'हा ना तो **हरतऱ्हनं** आटापिटा करून काम जमलं नाई बोहारं.'

हरदम (अ.) नेहमी, सदैव, सतत, नित्य. 'लानपनी आमी **हरदम** मामाच्या गावाले जावो.' (फा.)

हरन (न.) हरीण. 'तेथ **हरणे** चरते होतीः तीए श्रीकरेकरुनि दाखवीलीः' -ली.३४२.

हरनकाई(ळी)ज (वि.) संवेदनशील, नाजूक. 'काही **हरणकाळजी** झाडे तर आपधाकीच वाळून खंगर होतात.' -गाक.२०.

हरनखुरे (वि.) धावपळीत चरणे, लुबाडणे. 'सायंबाचई काम **हरनखुरेच** दिसते/ बसल्याबसल्या आळव्या हातानं खुळ्ळनं खुळ्ळन करते.'

हरनपाटली (स्त्री.) बैलगाडीचा एक लाकडी भाग. 'येक **हरनपाटली** बसोयाचे काय हजार रूपळ्ळे सांगता का मिस्तरी बॉ.'

हरनी (स्त्री.) बैलगाडीची एक फळी. 'बंडीची **हरनी** मुळ्ळ्याच्यानं पाय ठेवाले जागा नोती.'

हरने (संबो.) संबोधन. 'माय **हरने**, किती लोळ झाली वऽऽ तू. सासरवास हाय काय व तुले लय?'

हरपय (वि.) हुरूप असलेले. 'हरनाहून **हरपय** वासंरं उळ्या मारती.' -धों.२२. 'राजोसी पाह्यादेख्याले साजरी, कामधंद्यात खस्सर आन **हरपय** व्हती.' -सित.१८.

हरपळ (वि.) हुरळलेला. 'गाई निंघाल्या गोठाणी चाले गायकी मागोनी/ तानी **हरपळ** माही घरा पळाली मैदानी.' -लोक.८१.

हररोज (क्रिवि.) दररोज. 'बुढा **हररोज** कोनासी तरमा भांडन उकरून काहाळतेच काहाळते.'

हरवखत (क्रिवि.) नेहमी. 'तुवं तं गळ्या **हरवखत** निस्ताईचंच काम रायते.'

हरवाकरवा (पु.) देणे चुकते करणे. 'मेल्यावर तं देनच हाय त्यापरस जितेपनीच त्याईचा **हरवाकरवा** करावं.' -लेक.२१.

हरसाल (अ.) प्रत्येक वर्षी. 'सालच्यासाली नापिकी त्यात **हरसाली** पोरगीचं लगन.' -सित.१७. '**हरसाल** तेच बोंब मांगचं कर्ज फेळा अन् औंदाचं पीक कर्ज काळा.'

हरसुलं (न.) एक भाजी. 'म्या भाजी रांधली होती. हिर्व्याहिर्व्याकच्च **हरसुल्याची**, भेद्र्याची नाही.' -एक.

हरहमेश(शा) (अ.) नेहमी, प्रत्येक वेळेस. 'सरपंचाचं म्हणणं पडलं तो त्याच्यासोबत **हरहमेश** वाकडा चालतो.' -पख.५९. 'यवळं मोठं होऊनई तो **हरहमेस** सबनायले यादीनं कारड धाळे.' -सित.३७. 'दिवानजी

मात्र बापुसाहेबांशी **हरहमेश** आकडा जुळवून घेत.' -कात.१८. (फा.)

हरहुन्नरी (वि.) सर्व धंद्याचा कसबी. 'कौतुकाची लेकबाय **हरहुन्नरी** साजरी, आज माहेर सोळून कसी चालली सासरी.'

हरामखोर (वि.) स्वामीद्रोही, बदमाश. 'पण हे **हरामखोर** कधी येतात कोणाले माईत.' -त.१६३. (फा.)

हरामजादा (वि.) अनौरस, बेईमान, व्यभिचारी. 'कोन्या **हरामजाद्यानं** निंब तोळला धुऱ्यावरचा काजनं?' (फा.)

हराममौत (स्त्री.) वाईट रीतीचा मृत्यू, विनाकारण ओढवलेले मरण. 'दंग्यात जाचं काई कामच नाई. मेला शेवटी **हरममौतनं**.'

हरामाचा (वि.) अनुचित मार्गाने लाभलेला. 'काम करून खातो मी, **हरामाचं** नाइ खात.'

हरामी (वि.) नालायकी, बदमाशी. 'हातानं करून खायाचं आलं असील जिवावर म्हनून केलं लेकानं लगन **हराम्यानं**.' -हज.६९. (अर.)

हराम्या (वि.) बेमान, दुष्ट, वाईट, निंद्य. 'आरे आरे आरे किती तरास देतू बे **हराम्या** मुक्या जनावरायले.' -त.१००. (अर.)

हराय (स्त्री.) हरळी, एक गवत. 'किती तोळून तोळू मी तुह्या यादीची **हराय/** जिंदगीच्या पळीतात तुह्याविना हाय काय?' -नांबै. 'खाते पिकाले **हराय**, तनकट वावरात, नाई चेईन जीवाले बसे निंदत खुर्पत.' -पाहु.१३.

हरिकनं (क्रि.) आनंदणे, आनंदी होणे. 'आमचा सोमनाथूः म्हणौनि **हरीखैजतिः**' -ली.२६., देखोनि **हरखली** अंड। पुत्र जाला ह्मणे रांड।' -तुका.७७. 'उलीउली गोठीसाठी **हरिकनं** चांगलं नाई. लोकाईच्या नजरा लागतात.'

हरीक (पु.) हर्ष, आनंद. 'वासरू जीयाले म्हणौनि **हरिखैलीः**' -गोवि.५७. 'ऐसा **हरिख** शोक रहितु। जो आत्मबोध भरितु।' -ज्ञा.२.३००., 'तयाचा हिरख वाटे जीवा।' -तुका.३४., 'बाप होनार समजल्यानं बुड्याच्या **हरिकाले** पारावार उरला नोता.' -सित.७४. (सं.हर्ष)

हरीब (पु.) गरिबाचा सादशब्द. 'गाववाल्यांपुढे मग तो कुणबी असो, गरीब असो वा **हरीब** असो एवढी हिंमत ठेवून बोलणं साधी गोष्ट नाही.' -वा.१०४.

हरीला (पु.) काढा. 'थंडी वाजते त मंग जरासा **हरीला** देऊ काय करून सूठ मिऱ्याचा?' -एक.

हरेक (वि.) प्रत्येक. '**हरेकाले** समजाऊन सांगा लेकरं शिकवा. चांगल्या शाळेत टाका.'

हरेल (वि.) हारलेला. 'आयुक्शाले **हरेल** लोकाईले बिमाऱ्या लवकर लागतात.'

हर्कहर्क (क्रिवि.) आनंदाने, उत्साहाने. 'लेकराले येक रुपया देल्ला का **हर्कहर्क** काम करते.'

हर्रास (न.) लिलाव. 'तुह्या वावराची पाह्य कइत **हर्रासी** म्या केली' -गाक.३१. 'कुठल्या तरी बोलीवर वस्तू **हर्रास** व्हायची.' -रा.४५.

हर्राशी(सी) (स्त्री.) विक्री, लिलाव. 'नामदेवचं वावर **हर्रासीत** निंगालं म्हंतात बँकीकून.'

हल (पु.) नांगर. 'जनता पक्षाची निशानी **हलधरच** होती.'

हलकट (वि.) हीन वृत्तीचा. 'जिथं तिथं तुम्ही दाबता, त्याच्यानं हे **हलकट** लोकं असे माजल्यावानी करतेत.' -पख.५८. 'काय **हलकट** जातीचे लोकं हायेत व हे.' -पख.१५३. (फा.)

हलकंभारी (न.) नफानुकसान, कमीजास्त. 'तुह्याकून माहा काय **हलकंभारी** होईल ते करून घे.' -पख.३८.

हलकरे (पु.अने.) पाळणा लटकविण्यासाठीचा छताचा लोखंडी आकोडा. 'झुले पाट्याचा पाळणा लावा वर **हलकरे**.' -लोक.८१.

हलका (वि.) १. हळू. 'जाते सीताबाई वना सेवाभार वठ्ठिणीला/ धुजो **हलक्या** हातांनी रामाचा रेशमी शेला.' -लोक.१०. २. खालच्या जातीचा. 'शिकल्यानं **हलक्या** जातीचे लोकई पुढे चालले आता.'

हलगरजी (स्त्री.) निष्काळजीपणा. 'पेरन्यापारन्याची **हलगरजी** करून कसं चालीन.'

हलचल (स्त्री.) हालचाल, घडामोड. 'बुढ्याले न्याची आजून काई **हलचल** दिसून नाई रायली.'

हलाकी (स्त्री.) दुरावस्था. 'अपके माही परस्थिती लय **हलाकीची** आये भौ.' (अर.)

हलाल (न.) एका घावात कापणे. 'काही लोक इथं देवा तुझे दलाल/ मुर्दाड कोंबडीले करते **हलाल**.' -मिए.११८. 'भाऊबंदकीत हे स्वतःच्या रंगाने रंगले व अखेर **हलाल** झाले.' -कात.३०४. 'गुल्लरनं तो बगळा पाडायचा अन् चटकन **हलाल** करून घेऊन जायचा.' -काळी.२७. (अर.)

हलालखोर (वि.) एक शिवी. 'इकडे येरे **हलालखोरा** मी सांगतो चांगली समजाऊन.' -धग.६६.

हलूपलू (वि.) तकलादू, कमजोर. 'वारं गेल्यानं येशोदीचे पाय पंगू काडीमोडी. **हलूपलू** झालेले.' -डेबू.१९.

हल्या (पु.) हेला. 'म्हैस धनावली. **हल्याजोळ** न्या लागते.' 'भरोशाचा **हल्या** गामन, तेरावा मयना.'

हल्लक (वि.) हलका, शांत. 'जीव **हल्लक** झाला म्हणून त्यानं वडाखाली बूड टेकवलं.' -पख.१०४., 'तोंडावरची माशी उडविण्याचा जोर नाही एवढा तो **हल्लक** झाला.' -

कात.९२., 'डोंगरभर धंदा तर ते करून चुकली होती निऱ्हा **हल्लक** झाल्ती.' -लेक.३४. (अर.)

हल्लकनं (क्रिवि.) हळूच, सावधपणे. '**हल्लकनंच** ते खाटीऊन उठली.' -सित.१४४.

हल्लारनं (क्रि.) उडून जाणे. 'नाकातोंडाभोवती माशा घोंगावल्या काही चावे मारून **हल्लारल्या**.' -पोळा.

हल्ली (स्त्री.) १. लाकडाचा नांगर. 'नांगरल्या वावरात **हल्ली** वावून काशा मोकया केल्या.' २. सद्या, आता. '**हल्लीच** बुडी गुजरीत गेली भाजीपाला आन्याले.' -सित.१५९.

हव (स्त्री.) होय. 'काईबी पुसा, तिचं **हव** नाई ना नाई.'

हवलनं (क्रि.) धाप खाणे. 'लालजी मेल्यापासून सोनाबुढा लयच **हवलला**.' -ए.३७.

हवला (पु.) हळवा, संवेदनशील. 'गनपत लयच **हवला** आये, रगत पायलं का चक्कर येते त्याले.'

हवलेल (वि.) धाप खाल्लेला. '**हवलेल** बुढ्याले कितीकई धीर द्या, त्याची थरथरी जाची नाई.'

हवल्ली (क्रि.रूप.) धाप खाल्लेली. 'जे तिनं मनीमान्सी चितलं नोतं तेच तिच्या सामने आल्यानं ते लयच **हवल्ली** व्हती.' -लेक.७९.

हवस (स्त्री.) वासना, लोभ, हव्यास, अभिलाषा. 'भलकोन्या गोठीची **हवस** चांगली नस्ते पोरा.' (अर.)

हवसला (पु.) हौसला. 'येसोंता आपल्या सैनिकायचा **हवसला** बुलंद ठेवत व्हता.' -सित.३९.

हवाल (पु.) अवस्था, स्थिती, हकिकत. 'तिकळचे **हालहवाल** कसे काय आहेत अपके?' (अर.अहवाला)

हवाला (न.) स्वाधीन, ताब्यात देणे. 'तुका म्हणे संतीं घातला **हवाला**। न सोडी विठ्ठला पाय आतां॥' -तुका.३७१. 'जीवातला जीव केला तुमच्या **हवाली**/ आता तुमी मायबाप जीवाची सावली.' (अर.)

हवालात (स्त्री.) पोलीस काठडी. 'दोघं भाऊ होतो आमी **हवालातीत**/ मदत नाही केली कोनी नोतं जमानतीत.' -मिर्झा.१९७. (अर.)

हवाली (न.) स्वाधीन. 'पयस्याच्या सुंदुकाच्या अन् कपाटाच्या कुंज्या त्यानं पमीच्या **हवाली** केल्या.' -सित.७६. 'बाकरू वंक्याच्या हवाली केल्यानं त्याचाही घोर नाही.' -डेबू.६९. 'पखाल चांभारीनच्या **हवाली** करून तो निघाला.' -पख.१००. 'मुक्तीने लुगडे कौशीच्या **हवाली** केलं.' -ऊन.१७९.

हसडनं (क्रि.) जोरात ओढणे, हिसका देणे. 'माया हातातून त्यानं इवा घेतला **हसडून**.'

हसन्या (स्त्री.) विचारशक्ती. 'गरिबी मोठी वंगाय असते ते मान्साच्या **हसन्या** गुंग करते.' -लेक.५४.

हसीमजाक (स्त्री.) गंमतजम्मत, चेष्टा, विनोद. 'जास्त **हसीमजाक** करू नोये, नाई तं मंग भांडनावर येते.'

हस्त (पु.) एक नक्षत्र. 'पळला हस्त तं कुनबी **मस्त**.'

हस्ती (वि.) मोठी असामी. 'बॉम्बे दिल्लीच्या सुरू केल्या वाऱ्या/ मोठमोठ्या **हस्ती** पाहून घेतल्या साऱ्या.' -ऊ.४०.

हळ (पु.) हौद. 'वाफे ओलावले आता गुरांना पाणी पाजण्याचा **हळ** तेवढा भरावयाचा राहिला.' -कात.२.

हळकनं (क्रि.) सोकणे, वाळणे. 'तापलेले दगड... गरम झळा यांनी लुगडं **हळकलं**.' -झेल.४०.

हळदुलं (वि.) हळदीसारखे पिवळे. 'तिचं **हळदुलं** रूप त्याला आठवलं की तो अस्वस्थ व्हायचा.' -पाटी.

हळपनं (क्रि.) गिळंकृत करणे, लुबाडणे. 'कर्जापाई रामरावनं शामाचं वावर **हळपलं**.'

हळहळ (स्त्री.) काळजी दुःख, हुरहुर, खेद. 'रघूले मदत नाई करता आली, त्याचीच लय **हळहळ** वाटून रायली.'

हळाकळा (स्त्री.) शिव्याशाप. 'त्याचं कधी बरं व्हनार नाई. **हळाकळा** लागतील माह्या रंडक्या बाईच्या.' -बा.६९.

हळाळनं (क्रि.) तापणे, गरम होणे. 'बुडीचं आंग **हळाळून** आलं. कन्नाऊन ताप आंगात भरला.' -सित.४७.

हळुरत्या (वि.) हळुवार, मंद. 'वाऱ्याच्या **हळुरत्या** झुळका तिच्या अंगाशी मस्ती करू लागल्या.' -कात.१४.

हळ्या (पु.) १. कावळा. 'अथोल्ला **हळ्या** तथी गेला, भितीवर बसून कारभार केला.' २. गाडीच्या धुऱ्याचा लाकडी टेका देणारा दांडा. 'बंडीचा **हळ्या** धरून मवटी वर उचल्ली फकत यानं घातली जुवाखाली मान.' -सित.१३०.

हंगामा (पु.) दंगा, भांडण. 'दारू पिदाड्याईनं पंगतीत भलकसाच **हंगामा** केला.' (फा.)

हंगामी (वि.) तात्पुरता, अस्थायी. 'माही नवकरी **हंगामी** आये, तुयावानी कायम नाई.' (फा.)

हंडी (स्त्री.) मातीचे गाडगे, काचेचे भांडे. 'कां पाषाणाचिया माथा। **हांडी** फुटली पार्था॥' -ज्ञा.१६.३६८. 'हयलीत पाहावं तं काचेच्या **हंड्या**, झुंबरं काय अन् काय.'

हाऊस (स्त्री.) हौस, इच्छा. 'नादारीनं सोन्यालान्याची **हाऊस** नाई फिटली.'

हाऊसला (पु.) धीर, उत्साह. 'आता त्याहीले ते निमित्य सापडलं. त्याच्यानं सगळ्याहीले **हाऊसला** वाटला.' -वा.१३७.

हाऊळ (वि.) कडप, झुंड. 'पुंजाच्या मागून सुरक्षित अंतर ठेवून ही **हाऊळ** निघाली होती.' -पख.१४७.

हाक (स्त्री.) पुकारा. 'येती आइकतां **हाक**। दोन मिळोन

म्हणती एक॥' -तुका.३४९४.

हाकनं (क्रि.) कल्पित गोष्टी करणे. 'पुंडा बॉ काईच्या काई गोठी **हाकत** रायते लेकाचा.'

हाकबोंब (स्त्री.) बदनामी, वाजागाजा, माहीत होणे. 'शिरिमंतानं काईबी केलं तं **हाकनाबोंब**.'

हाकलनं (क्रि.) काढून देणे, घालवणे. 'कोनाले **हाकलू** कोनाले उचलू/ मंधांत आला त बुंदुकीनं कुचलू.' -नांबै.

हाकलायलं (क्रि.रूप.) ओरडले, म्हणाले. 'संमधं गाव **हाकलायलं** जेवारी जाते म्हून.' -सेल.१५०.

हाकाट्या (स्त्री.अने.) हूल, थापा. 'याच्या त्याच्या नुसत्या उठवत राहो **हाकाट्या**.' -मिर्झा.४६.

हाकारा (पु.) आरोळी, साद घालणे. '**हाकारा** करून तं बबन्या बकन्या कलवे.'

हागनं (क्रि.) शौचास करणे. '**हागों** जातां दगड सांची। अंतरीं ही संकल्प॥' -तुका.३६१०., 'तुहा सारा आट काढीन. तुमा लेकराचं **हागलं** मुतलं करीन.' -ना.१४६. '**हागनाऱ्याले** लाज नाई त बघानारानं लाजावं?'

हागनदारी (स्त्री.) मल विसर्जनाची जागा. 'नाहीं विचारीत। मेघ **हागनदारी** सेत।' -तुका.१८८१.

हागनंमुतनं (न.) हागणे वगैरे. 'बायतीनच तेलपानी करे. लेकराचं **हागनंमुतनं** करे तरी रनीचा ठकारा हायेच.' -लेक.२९.

हागरा (वि.) १. सतत शौचास करणारा. 'केवढा **हागरा** आय व लेक, बसा बावते धूत दिवसभर.' २. भित्रा. 'तो **हागरा** शालक्या काय जागलवर जाईन बे?'

हागलंमुतलं (वि.) बारीकसारीक. 'स्तुती करू कायची गुणगान सांगू तिचं/ कामी येते राजा **हागलंमुतलं** तिचं.' -जांग.५२. 'घरातलं **हागलंमुतलं** सांगू नाई कोनाबी जोळ.'

हागली (क्रि.रूप.) परसाकडे केली. 'नोहे इंद्राची कामधेनु...तंव ते **हागीली**ः मूतीलीः' -ली.१४६.

हागुटनं (क्रि.) वारंवार परसाकडे जाणे. 'ससा निघाला अन् कुत्र **हागुटलं**.'

हागू (स्त्री.) विष्ठा. 'खाटल्यावर पळेल बुढ्याचं **हागूई** मीच फेळतो माय.'

हागू(गो)न (स्त्री.) हागवण. 'तुका म्हणे काय वांयां चाळवणी। पिटपिटघाणी **हागवणेची**॥' -तुका.१२३४.३. 'हरामाचं खाल्यानं अशी **हागोन** लागन/ उठसूट तांब्या घेऊन भोऽऽ पया लागन.' -नांबै.

हागोनं (क्रि.) मार देणे (ल.). 'आयके ना तं पोट्टं भल्लं **हागोलं** आय.'

हागोयेल (क्रि.रूप.) मारलेले (ल.). 'संपत्याले म्याच लयखेप **हागोयेल** आय.'

हागोलं (क्रि.रूप.) मारले. 'तोंडोतोंडी आल्यानं गंग्याले भल्लं **हागोलं** टेंप्यानं.'

हागोळं (वि.) सतत शौचास जाणारा. 'कारे **हागोळ्या** आता गेल्ता रे टमरेट घेऊन अन् निंगलाई आखीन.'

हाग्यामार (पु.) खूप मार. 'सर्कसीत **हाग्यामार** बसल्यावर धोंडबा पडतझडत गावाकडे आला.'

हाग्याले (क्रि.रूप.) शौचास करायला. 'पावने बॉ पावनचार तं लय झोळ्ळा वाट्टे, सकाऊनच **हाग्याले** निंगले म्हनून म्हनलं.'

हाजर (पु.) हजर. 'संध्याकाई त्या केशाले माया सामने **हाजर** करा.'

हाजरहुजर (वि.) उघडपणे. 'आज आडून नव्हे तर **हाजरहुजर** पैशाचा डल्ला त्यानं मारला.' -कात.५१७.

हाजरी (स्त्री.) हजेरी, उपस्थिती. 'वडीलधाऱ्याची सर्व खेटरं त्याच्या डोक्यावर **हाजरी** लावीत.' -मोती.३२.

हाजारबिज्या (वि.) एक शिवी. 'हा केसाचा पुंजका दानात कोण्या **हाजारबिज्यानं** देला काय्रू?' -रा.५७.

हाजी (स्त्री.) खुशामत करण्याचा शब्द. 'उपासी राहू पन कोनाची **हाजीहाजी** नाई करनार आपून.' (अर.)

हाजीर (वि.) उपस्थित. 'मालक तुमचा निरूप भेटला तसा मी **हाजीर** झालोजी.' (अर.हाझिर)

हाजीहाजी (स्त्री.) खुशामत. 'तोंडावर **हाजीहाजी**, माघारी दगलबाजी.'

हाट (पु.) बाजार, व्यापाराचे स्थान. '**हाटा** आंतु बोरगाजरः उळिकांदाः माहणीची मुळेः पानेपोफळे ऐसी मागतातिः' -ली.२०१., 'तो पूजा द्रव्ये आणु **हाटासि** गेलाः' -ली.२६., 'जगती आंतु अडुः तया आडपुर्वे पांढरी **हटीयाळी** नीगाली होतीः' -गोवि.२५३., 'काशासाठी बैसो करूनिया **हाट**। वाऊगा बोभाट डांगोरा हा॥' -तुका.१०९.

हाटनं (क्रि.) वारणे, घोटणे. 'दोन तीन भाकरी थापावं, बेसन **हाटावं**.' -ल.८., 'वालंबीनं ज्वारीची आंबील **हाटली**. कौशीला खायला दिली.' -रा.२०८.

हाटहूट (न.) गोंधळ, ओरडा. 'सत्तेच्या बाजारात करत **हाटहूट/** डाकू आले मार्केटात सुरू झाली लूट.' -मिए.५४.

हाडंगला (क्रि.रूप.) कृश. 'पहात ना कसा **हाडंगला** कोकऱ्या.' -सेल.६२.

हाडकुळा (वि.) मास नसलेला रोड. 'माय सुमन तुयं पोरगं काई खातपेत नाई काय वऽऽ निऱ्हा **हाडकुळं** दिसते.'

हाडक्यावानाचं (वि.) हडकुळी, एक शिवी. 'पाह्य कशी चुरूचुरू बोलून राह्याली **हाडक्यावानाची**.' -एक.

हाडगीड (न.) हड्डी. 'बंडीऊन पळ्ळा तं **हाडगीड** मुळून जाईन एखांदं.'

हाडवैर (न.) कायमचे तीव्र शत्रुत्व. 'म्हणौनि समर्थेसि वैर। जया पडिले **हाडखाइर**।' -ज्ञा.१३.५५०. 'गावातनी दोन पाटर्या असल्या का तेईच्यात लय **हाडवैर** अस्ते.'

हाडहाड (वि.) कृश. 'डोळ्यापुढे देहाचा सांगाडा झालेले, चिपड्या डोळ्यांचे **हाडहाडलेले** बैल आले.' -त.९४.

हाडहूड करनं - घालवणे, धिःकारणे. 'बाजीराव बुढीलेच कुरकुर करे/ बुढीलेबी पोट्टे बेजा **हाडहुड** करे.'

हाडाड (वि.) हडकुळी. '**हाडाडलेल्या** गुराढोरांना ट्रकमध्ये टाकणाऱ्या कसायांचे फोटो.' -बा.३२९.

हाडाडनं (क्रि.) हडकुळे होणे. 'मासाळलेली शहरी आई, **हाडाडलेली** गावठी माय' -गाक.९२.

हाड्या (पु.) गाडीच्या धुऱ्याचा टेका. 'सतीश धुराखालचा **हाड्या** वेल्डिंग करत होता.' -त.६५.

हाण्डोर (पु.) एक पक्षी. 'हाती **हाण्डोर** घेतलेला केरू फुलयच्या अंगणात आला.' -झेल.१८. (का.)

हात (क्रि.) आहेत. 'तुमी गरीब माणसं **हात**.' -फीर.३०. '**हात** घरात रामभाऊ वैनी?'

हातउसने (वि.) लगेच देतो म्हणून उधार आणलेली रक्कम. 'लोकांकडून **हातउसने** म्हणून घेतलेले पैसेही बरेच झाले होते.' -अंधा.

हातगून (पु.) हाताचा गुण. 'लय डाक्टर जोरावर हाय. **हातगून** तं बेजाच हाय. बातन्याबात ताप पयते.'

हातघाई (स्त्री.) १. झोंबाझोंबी. 'आंधी बाचाबाची झाली मग ती बाचाबाची **हातघाईवर** आली.' -काळी.३१., २. तोंडावर, नजदीक आलेले. 'पाऊस आल्यानं जिकडे तिकडे पेरण्याची एकच **हातघाई** उडाली.' -कात.१५७. (का.हत्ताहत्ती)

हातधरनं (न.) गरम भांडे उचलण्याचे कापड. 'तो **हातधरणिया** शिवे। परतखाते।' -ज्ञा.१३.६३१. 'कढत पाण्याची बटलोई उचलताना मायच्या हातात **हातधरणं** असे.' -गाआ.३४.

हातधरनं (वि.) बायको म्हणेल तसे वागणारा. 'शिकोले, लगनं केले तेच बुहारे आता बायकाईचे **हातधरने** झाले.' -सित.४६.

हातनी (स्त्री.) मळलेल्या कणसांवरून फिरवला जाणारा खळ्यातील झाडू. 'बैलाची पाथ सुटली. लगळेल कन्साऊन हरी **हातनी** फिरवत बसला.'

हातनेटा (पु.) हाताचा आधार, थोडा आधार घेऊन ताठ होणे. 'बाळ रोपं मातीत पिवळे पडतात, सडून माती होतात म्हणून **हातनेटा** देत नाईत औतावर.' -खुं.५०.

हातबखं (न.अने.) हात आणि बगलेचा भाग, खांदा. 'चाकापायी कुंभाराचे **हातबखं** गेले किती चोपून चापून भांडे तयार झाले.' -रूख.३५.

हातबोट (पु.) १. विटाळशी स्त्रीचा स्पर्श. २. स्पर्श. 'जोड्यानं महादेवाच्या पाया पडून आल्याबिगर **हातबोट** लागू द्याले जमत नाही.' -पख.५०.

हातमजुरी (स्त्री.) कामाची रोजी, मजुरी. 'तिच्याजवळ काई पैशाची सोय नाई. तिचंच तं **हात मजुरीवरचं** पोट.'

हातमुंडा (वि.) हाताएवढे. 'सकाळच्या पाहरी सख्यानं का केली घाई? **हातमुंडा** शाल नवी, भरजरी लावे डोई.' -लोक.२३.

हातमेळा (पु.) सर्वांचे ऐक्य, एकोपा. 'तर गावगाड्याचं कसं असतं **हातमेळ्यानं** काम झालं तर गावगाडा टिकतो नाईतर भणकतो.' -खुं.८.

हातमोडी (स्त्री.) अडचण. 'सून घरात नसली त लयेच **हातमोडी** व्हती.' -बा.९४., 'रामा धनगर पखवाज वाजवायचा. तो पान लागून मेल्यान भजणी मंडळाची **हातमोडी** झाली.' -वा.८९.

हातरून (न.) अंथरूण. 'पुऱ्या मंडपीत गोने **हातरून** घ्या.' -दि.५३.

हातवा (पु.) कुंकू, अक्षद, दिवा असलेले लग्नातील पूजेचे ताट. 'उजळोनि दिव्यतेजा **हातिवा**। ते भक्तीचि पाहावी॥' -ज्ञा.१६.२३. 'तरी विश्वप्रगटितया गभस्ती। काय **हातिवेन** न कीजे आरती।' -ज्ञा.९.१३.

हातश्यार (पु.) हाताने दोरी पकडून छिंद्रं पाडण्याचे साधन. '**हातश्यार** बरा आपल्यालेच दोरीबी वळता येते अन् छिद्रबी पडते.'

हातसफाई (स्त्री.) चौर्यकर्म. 'म्हणून येतो जेलात **हातसफाई** करून, न्यायाधीशाले फुटला घाम दरदरून.' -मिए.१३२.

हातसोके (वि.) मिंधे. 'लोण्याचे लचके नळ्यात घालून सरकारी रानबोके त्यांनी सारे **हातसोके** करून घेतले होते.' -कात.२५.

हाताखाली (वि.) हाताशी, सांगेल ते करणाऱ्या. 'वीटा पाडणारा टापकरी **हाताखाली** एकदोन बायका ठेवायचा.' -रा.४७.

हातापाई(यी) (स्त्री.) मारामारी, भांडण. 'दोन रुपळ्ळ्यासाठी येवळी **हातापायी** कऱ्याचं काई कामचं नोतं.'

हातासरसं (क्रिवि.) अनुषंगाने, हातोहात लगेच. 'जेवणं होताच तो म्हणे चला **हातासरसे** भांडे घासून घेऊ.' -गय.१७., 'सुबूकसुबूक असा तिनं सळा टाकला, रंधावन झाळून टाकलं **हातासरसं** सारुनई टाकलं.' -अक.६१.

हातीपाई (न.) जवळ, हक्काचे, स्वाधीन. '**हातीपाई** काई तं

नाई आपल्या अन् इनाकारन उळ्या मारवं का?'

हातीमिठी (क्रिवि.) हातोहात. 'मामी, आणा तुमचं धुणं इकडे आम्ही **हातीमिठी** साऱ्या जणी धुऊन टाकू.' -कात.९४.

हातीमेटी (क्रिवि.) लगोलग. 'गेला दिन **हातीमेटी/** ना मचेल घरी हाकाटी.' -भीक.५०.

हातीमेळी क्रिवि. सर्वांनी मिळून. 'चारचौघींनी फनाचं वावर **हातीमेळी** वेचून आजच सारा गुत्ता उरकून टाकला.' -कात.५.

हातोई (स्त्री.) लग्नविधीतील अक्षदा टाकण्याचा क्षण. 'घरी बाई मानूस नाई धंदा करनं जिवावर आलं म्हनून घाईघाई लावली **हातोई**.' -हज.६९.

हातोटी (स्त्री.) कसब, कौशल्य. 'जै जाणिजे **हातवटी**। सांणवणीची॥' -ज्ञा.१८.१४८३. 'ऐसी हे **हातवटी**। घेऊनि जे क्रिया उठी।' -ज्ञा.१८.१७५

हातोळी (स्त्री.) लहान हतोडा. 'खिवा ठोक्याले **हातोळी** आन लक्शाच्या घरून.'

हातोहात (अ.) लगेच, लगोलग, त्वरित. 'हे **हातोहातीचे** न होये। ठाउके जया।' -ज्ञा.१३.७५०. 'जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें। **हातोहातीं** गेलें वेचुनि मग पडिलें ठावें॥' -तुका.१४४.५. 'अकोल्याले जाऊन तुमचं काम **हातोहात** करून टाकतो.'

हात्यार (न.) शस्त्र. 'पैं आघवेयां **हातियेरां**-। आंत वज्र तें मी धनुर्धरा।' -ज्ञा.१०.२४०.

हादन (न.) उष्टे, शिल्लक. 'तेव्हा दिसलं की वाटीत चुरलेल्या काल्याचं उष्ट **हादन** तसंच आहे.' -बा.९८.

हादरोनं (क्रि.) हादरून टाकणे. 'मानसाले **हादरोनारा** अवाज भेसूर एकाएकी दुरलोग धुमला.' -सित.५१.

हादळनं क्रि. खूप खाणे. 'माई सुनीचं तं बापा सकाऊनच **हादळनं** चालू होते.'

हादळहिदळ (न.) १. त्रास देण्याची क्रिया. 'नाग्या तुले **हादळहिदळ** करते तं मंग त्याच्या संगं काहाले खिळत रे बुहाऱ्या.' २. हसण्याचा जल्लोष. 'पोरीसोरीची **हादळहिदळ** सुरूच रायते हम्मेस.'

हादळून (क्रि.रूप.) खाऊन, जेवून. 'पोरगं **हादळून** गेलं खरं, शाळेत जाते का नाई माय?'

हादळेल (क्रि.रूप.) खूप खाल्लेले. 'म्या पंगतीत बुंदी लय **हादळेल** आये आज.'

हादळ्याले (क्रि.रूप.) खूप खायला. 'कामाची बोंब, **हादळ्याले** सांगा फकत.'

हादाहिदी (स्त्री.) हास्यविनोद. 'पोरीसोरीची **हादाहिदी** आबाचं माथं भळकोये.'

हादोळा (पु.) जास्त खाणारा. 'चारपाच भाकरी बिगर पोट भरते का त्या **हादोळ्याचं**?'

हाननं (क्रि.) १. मारणे. 'विंचु हाणे नांगी अग्न लावी आणिका अंगी।' -तुका.१९६९. 'लहानमोठे कोन पायते भांडनात? निऱ्हा **हान्याचीच** ठुतात भौ.' -धुम्म. 'लेकराले काय काळीनच हाननं लावलं काय बे?' २. हाकालणे. 'बैलाले बरोबर **हाननं**.' (का.हनी)

हानलं (क्रि.रूप.) मारले. 'नाएकाः हे सुने का हाणतीले? काली नागदेवांची झोळी नेलीः आजि पडकैले म्हणौनि हाणीतलेः' -ली.५०. 'त्यानं **हाणलं** मारलं तर कदोड व्हईल.' -सेल.१३.

हानामारी (स्त्री.) मारामारी. 'परवाच्या रोजी गावात भयंकर **हानामारी** झाली.' (का.हाणाहाणी)

हानून (क्रि.रूप.) हाकलून. 'बंडी हानून पायतं काय वावरालोक?' 'बापानं पोराले घराभाईर **हानून** द्यावं काय राजा?'

हानेल (वि.) हाकलललेला. 'कितीबी तापळ बैलं आपून **हानेल** हायत.'

हान्याले (क्रि.रूप.) हाकलायला. 'मीच काल धूर **हान्याले** बसलो होतो.'

हाप (वि.) अर्धा. '**हापकट** च्या द्या बरं.'

हापकनं (क्रि.) दम्मास येणे, दम लागणे. 'तू कशी काय लोटून राह्यला गाडी. बैल **हापकले** वाट्टे.' -त.१६४., 'चढ चढून तुहे बैलंच पाह्यनं कसे **हापकले** आता.' -त.६६.

हापकी (स्त्री.) हाय खाणे, धसका घेणे. 'आता नरुभाऊनं **हापकी** खाल्ली. कांदा गेला.' -बा.३२६.

हापकीनं (क्रि.) धक्का बसून, हबकून. 'कापसाचे भाव घसरले अन् कापूस उत्पादक शेतकरी मेला **हापकीनं**.' -बा.१९१.

हापटन (न.) अर्धाटन वजन वाहू शकणारी. '**हापटन** संड भरेल व्हती दाबूदाबू लोकं भरले व्हते.' -सित.५०.

हापनं (क्रि.) हिंमत खचणे. 'दोन तरनेताठे पोरं मेल्यावर त्र्यंबकरावले **हापनं** आलंच.'

हापहाप (क्रिवि.) बुडते वेळी तोंडातून निघणारा उद्गार, थकणे. 'डोहात पळेल मानूस निरा **हापहापचं** करत रायते.'

हापी(फी)स (न.) ऑफिस. '**हापिसात** उखारी करून रायले गधे/ बगिच्यात गधे साऱ्या सस्त्यावर गधे.' -नांबै., '**हापिसात** गेलो तरमा सायब नाई भेटला.' (इं.)

हाबेतोबे (पु.अने.) हाल, दुर्दशा. 'माहा गरिबाचा काही गुन्हा नाही मायबाप नहाक माया जीवाचे **हाबेतोबे** करसाल. तुम्ही मले मारून.' -वा.५८.

हामंधुमं (क्रिवि.) जीवापार कष्ट. 'एका जागी व्हतो तव्हार **हामंधुमं** कामं केले.' -सेल.१७., 'त्याले का मी म्हणली **हामंधुमं** काम कर म्हून जीवाले साईल तसं करावं.' -ऊन.२१३.

हामकोंडी (स्त्री.) दमकोंडी या शब्दाचा साद शब्द. 'पण आले लोकं **हामकोंडी** का दमकोंडी करायले.'

हामाधुमी (स्त्री.) घाईत. 'वावरातल्या लाख कामाच्या **हामाधुमीतई** तो मॅट्रीक झाला.' -सुखो.६१.

हामिशा (अ.) हमेशा, नेहमीचा. एसटीच्या **हामिशाच्या** हिशोबानं त गाडी याले पायजे व्हती.' -अंधा. (फा.)

हामी (स्त्री.) खात्री, भरवसा, शाश्वती. 'तो भल्तंसल्तं ना करीन याची **हामी** कोनी घ्याव.' (अर.)

हाय (स्त्री.) १. दुःख. 'उचले मुळी न पाय/ लागे जिवास **हाय'** -भीक.४२., २. धाप. 'बुढी मेल्यापासनं बुढ्यानं तं बेजा **हाय** खाल्ली.' (अर.)

हाय (क्रि.) आहे. 'लोकं म्हंतीन तवा हाच **हाय** दाता याले सोळून आता आपून कुठी जाता.' -नांबै., 'बायको घरी **हाय** तरीबी आपल्यालेच वाळून घ्या लागते.'

हायओढा (पु.) अपेक्षेने केलेले अतिशय कष्ट, श्रम. 'जिवाला रोज एवढा **हायओढा** करून गळ्याला फुटका मनी तरी मिळाला का कधी?' -कात.६.

हायतं (क्रि.) आहेत. 'येसाजीनं विचारलं कुठी गेला शाहादू? **हायतं** घरात.' -वा.३८. 'फडे आणले. गुरूजी **हायतं**? '**हायत** नाही, आहेत.' त्याची तिनं चूक दुरुस्तं केली.' -वा.२३.

हायतोबा (पु.) काहीतरी भयंकर. 'गणेश तं शिकेल हाय त्यानं असं **हायतोबा** करनं बरं हाय का?' -सुखो.७९.

हायदोसदुल्ला (पु.) १. मुसलमानी घोष, हसनहुसेन मेल्यानंतरचे दुःख प्रदर्शन. २. गोंधळ. 'मांडवात तं पोरंसोरं **हायदोसदुल्ला** करत असतेत.'

हायहाय (स्त्री.) निषेधार्थ वापरतात, अभाव, कमी. 'अमूकटमूक **हायहाय** हे आता रोजचंच सोंगाळ झालं.'

हाये (क्रि.रूप.) आहे. 'ते खाऊ घालते तिच्या माथं सारं **हाये**.' -ना.२५.

हायेत (क्रि.रूप.) आहेत. 'अबे ह्या गावचे लोकच दलिंदर **हायेत**. त्याहीले किंमत कळत नाही मान्साची.' -पख.३९.

हायेस (क्रि.रूप.) आहेस. 'कई आली व मयना कशी **हायेस** तू बाई/ कसा तुहा वं सासरा कशी तुही सासू बाई?' -चंच.३०.

हार (पु.) माळ. 'नवरदेव नवरीन येकमेकाच्या गयात **हार** टाकतात.' (फा.)

हार (स्त्री.) १. रांग. 'तुरीच्या दोन **हारी** उचलून गंजी लावली.' २. पराभव. 'मोठा काय गरिबाले **हार** जाते.' (अर.)

हारकंकारकं (वि.) हर्षभरीत. 'आमीबी कोंबळ्या घेतल्या असं बंड्याले **हारकंहारकं** सांगून टाकलं.' -अंधा.

हारचं (क्रिवि.) वतीने, कडून. 'दे बाई लोनचं बोलीन तुया **हारचं**.'

हारजीक (स्त्री.) यशअपयश. 'गंजिपत्यात **हारजीक** होतच रायते.'

हारती (स्त्री.) पडती, माघार. 'बस करा गळेहो आता नानानं **हारती** बाजू घेतली.' -सित.१२८.

हारनं (क्रि.) १. जुगारात द्रव्य गमावणे. 'तो पत्तेकुट्या राती पाचशे रुपये **हारला**.' २. पराभूत होणे. 'माहा तं जीव हारला बाई या पोराले.'

हारपनं (क्रि.) हरविणे. 'कां लखलखोनि **हारपली**। बीजु गगनीं॥' -ज्ञा.६.२८५.

हारपेलं (वि.) हरवलेले. 'कालपासून **हारपेल** चेंडू आज दिसला.'

हारपोनं (क्रि.) हरविणे. 'येवळ्या जोऱ्यानं चेंडू फेकून रायला. **हारपोनं** हाय वाट्टे तुया मनात.'

हारकिजनं (क्रि.) आनंदित होणे, हर्ष होणे, हुरळणे. 'जत्री जाले तं माहाबी जीव **हारकिजेला** व्हता.'

हारबळनं (क्रि.) बावरणे. 'पानी पानी करता **हारबळले** लोकं.' -लोक.७१.

हारमोर (न.) कामे कमी होणे, निस्तरणे. 'लोकाईचं निंदनाचं काम **हारमोर** झाल्यावर लावू आपल्या वावरात.'

हारा (पु.) १. मोठी पाटी. 'भरून दे हा हाती **हारा/** भूस उपणतो झाडुनि सारा.' -भीक.६८., 'कणसानं टोपली भरली की चार बाया मिळून एका मोठ्या हाऱ्यात टाकायच्या.' -फीर.१९२., 'कंणसाईचा **हारा** उचलून कोपऱ्यात येका आंगं ठुला.' २. कापूस मोजण्यासाठी बांबूपासून तयार केलेले पारडे. ३. दोघी मजूर.

हाराडेरा (पु.) वधू पाठविण्याचा विधी. 'नवरदेवाची माय **हाऱ्याडेऱ्याची** येल्हाळ, नवरीमायच्या डोळा कसे लागले पन्हाळ.' 'आता **हाराडेरा** झाला का निंगतेच नवरदेव नवरी.'

हारीनं (क्रिवि.) रांग, ओळीने. 'दोहीं **हारीं** आपण। हारपिजे जैसें॥' -ज्ञा.१८.१५८२. 'कणसासह कापून धांड्याचे पुंजके **हारीने** पडलेले असतात.' -फीर.२१. 'एका **हारीनं** उभे असलेले बैल हे त्या पोळ्यातलं विशेष होतं.' -धग.१५३.

हारीत (क्रिवि.) तोट्यात, हानीत. 'या वावराच्या सवद्यात

मी काई **हारीत** नाई रायलो गळ्या.'

हारीप (वि.) उतावीळ. 'आपूण **हारीप** नाही हे त्यालेबी ठावूक हये.' -ऊन.१७३.

हारेल (वि.) हारलेला. 'पयली निवळनूक बाप्पूजी **हारेल** हायत.'

हारो (क्रि.रूप.) हरत असे. 'बाकी सारे चिडवे मंग चिरान मारो/ जवातवा मीच **हारो**.' -मिर्झा.४५.

हारोनं (क्रि.रूप.) हरविणे. 'वायना असत्या तं पोराले कायले पाठीवर घ्या लागलं अस्तं? **हारोली** चप्पल जत्रीत.' -तित.५६.

हारोयाले (क्रि.रूप.) हरवायला. 'कोन्तीबी वसद **हारोयाले** कमळी पयला नंबर.'

हारोयेल (क्रि.रूप.) १. हारपलेली. '**हारोयेल** वसद सापळनं कठीनच असते.' २. हरविले. 'म्या त्याले येकडाव निवळनुकीत **हारोयेल** हाय.'

हारोलं (क्रि.रूप.) हरविले. '**हारोल्यानं** मी चंचई होती मोठ्या कायजीत/ एका पुळामंदी तिच्या होता दोनान्याचा काथ.' -चंच.२६.

हारोहारी (वि.) एका ओळीने सलग. 'पाट चंदनाचे घरी टाकले **हारोहारी**, गुरू बसले वसरी.' -लोक.१७.

हाल (पु.) १. स्थिती. 'तुमच्या इकळते काय **हाल** आयेत बापा, का तिकळेबी पानी नाई.' २. अपेष्टा, दुःख. 'डंगऱ्या गाईचे **हाल** होते पण गोविंदानं तिची वास्तपुस्त केली नाही.' -झेल.४१. (अर.)

हालअपेष्टा (स्त्री.) दुर्दशा. 'सासूच्या हाताखाली लय **हालअपेष्टा** सोसनं पळतेत माय.'

हालकंभारी (न.) नुकसान, वाईट. 'माणूस गंज कावते पण काय **हालकंभारी** करता येते देवाचं आपल्याले.' -सेल.२३५.

हालगोमालगो (क्रिवि.) हात हलवीत रिकामी ये जा, कांकू, टाळाटाळ, चालढकल, कसेतरी. 'अरे आमासक **हालगोमालगो** केलं का खसकन दा रुपये भेटतात.' -सुखो.५७.

हालझूल (न.) हालचाल. 'निस्त पाच वाजेवरी **हालझूल** न करता आमाले मोकाट ढोराईले खुटाले बांधून ठेवल्यावानी झाल्तं.' -दि.४५.

हालत (स्त्री.) १. परिस्थिती, स्थिती, दशा, अवस्था. 'काम असल्यामुळे कोणत्याही **हालतीत** मला आता निघालेच पाहिजे.' -कात.३०८. २. प्रकृती. 'दवापानी करूनई बुढीची **हालत** आजून ठीक नाई.' (अर.)

हालपे(फे)ल (स्त्री.) हालचाल. 'कर्जापायी घरं उघडी पडतात. काहीच **हालपेल** नाही करता येत त्याहीले.' -सेल.१८३., 'कोणाचे तरी पाय धरा. पेरून, डवरून, उन्हाळ्यात नांगरून, वखरून घ्या हेही काही **हालफेलीच** काम नव्हे.' -वा.१४८.

हालला (पु.) खचला. 'वय झालं. तब्येतीनं लय **हालला** आता बुढा. कष्टाचे हाडं आयेत म्हनूनसन्या जगला तरी.'

हालहवाल (पु.) वृतान्त, अवस्था. 'पत्रं आलं गेलं तं तिकळचे **हालहवाल** कयतात मान्साले.' (अर.)

हालहाल (स्त्री./पु.) दुरावस्था. 'अवंदा तं ह्या झळीपान्यानं **हालहाल** केले बाप्पा.'

हालाडुला (पु.) बरीवाईट दशा. 'प्रकृतीचा असा चाले **हालाडुला**/ कवा घाबरे जीव कालाबुला.' -मिर्झा.११३.

हालाडोला (पु.) रिकामपणा, मुक्त, मोकळेपणाने वावरणे. 'हे उरफाडे कामं करायचे आन मोठा भाऊ **हालाडोला** करायचा.' -सेल.१७.

हालून (क्रि.रूप.) हलवून. 'वारं सुटल्याच्यानं झाळं पाय केवळे **हालून** रायले.'

हाले (क्रि.रूप.) हालत असे. 'म्हने बुढा ऐसा **हालेडुले** कैसा/ घागरीत टाके सगुनाचा पैसा.' -वि.

हालो (क्रि.रूप.) १. हालवीत असो. 'मी डांग **हालो**, गळी पळेल आंबे येचे.' २. हालवावे, हालव. 'जोर लावून हा खंबा **हालो** बातच ढिला होते.'

हालोत (क्रि.रूप.) हालवीत. 'बजारात गेला मोठा. पयसे हारोले. बॉ हात **हालोत** घरी आला.'

हालोनं (क्रि.) हालविणे. 'डांग **हालोनं** जरासी बदबद तं बोरं पळतात.'

हालोयाले (क्रि.रूप.) हालविण्याकरिता. 'झाळ **हालोयाले** का राक्केस आयेस बावा तू?'

हालोयेल (क्रि.रूप.) हालविलेले. 'धुऱ्यावरला गोटा कुनीतरी मले **हालोयेल** दिसते.'

हालोलं (क्रि.रूप.) हालविले. 'रस्त्यावरचं गाळं आता गायवाळ्यात **हालोलं**.' 'बोरीचं झाळ **हालोलं** का टपटप बोर पळतात.'

हाल्या (पु.) हेला. 'जानू **हाल्याच्या** पोटाखाली मान घालायचा, हरहर महादेव म्हणून **हाल्या** उचलायचा.' -पख.३२.

हाव (क्रि.) होय. 'तुमच्या गावाले एक मोका आलता, आमचा येण्याचा **हाव**.' -गय.

हाव (स्त्री.) लोभ, लालसा, हव्यास. 'मग तया मार्गाची धांव। पुरेल प्रवृत्तीची **हांव**।' -ज्ञा.६.५९. 'एवढी **हांव** तो दैवाआगळा। म्हणऊनि करी॥' -ज्ञा.१०.३३२., 'तुका म्हणे धांव। घेतां न पुरे चि **हांव**॥' -तुका.३६३९., 'पोटा पुरतं कमवाव, जास्त **हाव** करू नाई.' (अर.)

हावई (वि.) हावरी. 'असी लेक **हावई**, घरोघर जवाई.'

हावरट (वि.) अतिशय लोभ असलेला, हाव असलेला. 'हुंड्याबाबत डिवचेल असशील. तुमची पुरषाची जातच मोठी **हावरट**.'

हावरा(री) (वि.) अतिशय लोभी. 'बाई येवळी **हावरी** हाय का येक्टीच चाळीस किलो कापूस येचते.' (का. हावर)

हावऱ्या (वि.) अधाशी, अति हाव, अपेक्षा ठेवणारा. '**हावऱ्या** सार्का तो त्या कुटारावर तुटून पळला.' -सित.१३३.

हावला (न.) स्वाधीन. 'यानं मव्हरल्या गावच्या माणसाच्या ढोरं **हावला** करायचे.' -पख.११२.

हावशा (वि.) उत्साही, हौशी. 'नवरा भेटला **हावशा** तं खुसाखुस आये उषा.'

हावसी (वि.) आनंदी, हौसी. 'रक्कम घिऊन जगदेव आबा **हावसीहावसीनंच** घरी गेले.' -सित.१५., '**हावसी** नवरा भेट्याले नशीब पायजे बयना.'

हावहाव (स्त्री.) लोभीपणा. 'भलकशी आपून **हावहाव** करतो तरमा लेकाले त्याचं काई सोयरसुतक नस्ते.'

हावी (वि.) स्वार, वरचढ होणे. 'वर्सभरातच तं बायको वसंतावर **हावी** झाली.' (अर.)

हावो (क्रि.) आहे. 'मी काय तुयासारखी शिकलेली थोडीच **हावो** बाप्पा.' -वा.७.

हाशी(सी)खुशी (वि.) प्रसन्न वृत्ती, आनंदित. 'होऊ दे सौदा **हाशीखुशी/** तळहाताच्या फोडापरि सुंदरी.' -भीक.८. 'जावाजावात मात्र मोकळेपणा होता. त्या **हाशीखुशीने** एकमेकीशी बोलत.' -फीर.१६८., 'माझ्या पाठीशी उभा राहून मला त्यानं **हासीखुशी** असं पदरात घेतलं.' -कात.१०.

हाशी(सी)ल (न.) प्राप्त. 'तंगळ्या तोळत गेलो खरा पन काही **हाशील** झालं नाई.' (अर.)

हास (क्रि.रूप.) आहात. 'पाव्हणे **हास** नाई तं काय तं? गेलो तं चाहाई नाई केला म्हणसान.' -गय.

हासळनं (क्रि.) जोराचा हिसका देणे. 'मांगून शिट्टी वाजोली कोनं तं सुमीनं मान **हासळून** मांगं पायलं रागानं.'

हासा (पु.) फजिती, नाचक्की. 'भलकाई केल्यानं लोकाईत **हासा** होते.'

हासीमजाक (स्त्री.) गमतीजमती, आनंद. 'जरा किरकिरत अन् कव्वा तं **हासीमजाकीत** माय्या संसाराचा गाडा सुरू हाये.' -दि.५२.

हासो (क्रि.रूप.) हासत असे. 'कोनं गुदगुदल्या केल्या तं मी भलकसा **हासो** पयले.'

हासोत (क्रि.रूप.) हसवत. 'बुढा गमताजमता सांगून लेकराईले **हासोत** जाय.'

हासोनं (क्रि.) हसविणे. 'नवरा रुसेल आये म्हंतं तं मजाकबाजी करून **हासोनं** त्याले.'

हासोयाले (क्रि.रूप.) हासवायला. 'नाऱ्याच्या गोठीमाठी तं अच्छेकाले **हासोयाले** लावतात.'

हासोयेल (क्रि.रूप.) हासवलेले. 'घुर्रट बुढ्याईले पमीनं **हासोयेल** आये गमता करून.'

हास्याले (क्रि.रूप.) हसायला. 'कोनी घसरून पळ्ळं तं आपून **हास्याले** ना पायजे.'

हाळ (न.) हाड. 'गयात माळ आय माया, **हाळ** बाटलं नाई आजून.'

हाळं (न.) कुत्र्याला हाकलण्यासाठी वापरावयाचे संबोधन. 'किती **हाळं** म्हना कुत्रं झाट हटत नाई.'

हाळकं (न.) हाड. 'बिमारीनं तं **हाळकंच** रायले वऽऽ माय.'

हाळका (वि.) अशक्त, बारीक. 'कसा **कळकावाळका** दिसतं बे तू रमशा, दुधगीध पेत जानं लेका.'

हाळंकाळं (न.अने.) हाडे इ. 'कुंदा खंदूखंदू सारे **हाळंकाळं** जमा झाले बावा माहे, कोनाले सांगतं?'

हाळकीहाडवली (वि.) अतिशय कृश. 'जवळ बसलेली मजूर वर्गीय हाडाळली, **हाळकीहाडवली** स्त्री आमचा संवाद ऐकत होती.' -खुं.८३.

हाळजनं (क्रि.) मोकळी होणे. 'त्या सायबाची बायको **हाळजली** आज. बटके भोसडीचे.' -पाटी. 'उतरंड फुटल्यावरच बाई **हाळजते**? काय सांगाव म्हून?'

हाळपक (पु.) भाद्रपद महिन्याचा दुसरा पक्ष त्यात कोणतेही शुभ कार्य करत नाहीत. गणपती उठल्याच्या दुसऱ्या दिवसापासून **हाळपक** चालू होतो, पितृपक्ष. '**हाळपकात** कुनी सोयरिक पायते का बह्याळ्या.'

हाळवैर (न.) कट्टर शत्रुत्व. 'गावातनी **हाळवैर** असल्यानं भांडनाले वान नोती.'

हाळसहिळस (न.) हिडीसफिडीस. '**हाळसहिळस** कोनं केलं बालकाले, पानी आलं नेतराले.' -लोक.५६.

हाळहाळ (न.) धिःकार, तिरस्कार उपेक्षा. 'जाय तिकडे **हाडहाडी**। गोऱ्हवाडी च सोइरीं॥' -तुका.२१९२.

हाळाकळा (पु.) शिव्याशाप. 'दे सोळून हा धंदा नको **हाळाकाळा** घेऊ मुक्या जनावरायच्या.' -त.१००.

हाळूक (न.) हड्डी. 'मटनातलं येक **हाळूक** फेकून नाई मारत माया मामा.'

हाळ्या (पु.) कावळा. 'घरावर **हाळ्या** बसेल पोट्ट्यानं पायलं का म्हने 'माय वऽऽ आज पावने येतात आपल्या घरी.'

हांगा (क्रि.रूप.) हे काय हो. '**हांगाः** तुम्हा धोत्रे धूआवेया काई काज? तुम्ही येथ यावे कीः' -गोवि.३११.

हांगाडेंगा (पु.) दुर्लक्ष. 'बैलाच्या चारापाण्याकडं **हांगाडेंगी** करणाऱ्या पोटच्या पोरालाही तू शिव्या द्यायचा.' -हा.४७.

हांजडहिंजड (न.) धरून हलविणे, अवमान करणारे बोलणे. 'रघ्या शिव्या देत आंगावर आला. पुंजाला त्यानं **हांजडहिंजड** केलं.' -पख.५८.

हांडकेमडके (पु.) घरातील मातीची भांडी. 'संसार काहाचा वं? चार दोन **हांडकेमडके**, गोधळ्या अन् डंगरी गाय झालं.'

हांडा (पु.) १. हंडा, पाणी भरण्याचे पितळी भांडे, गुंड. '**हांडा** भांडीं गुरें दाखवी ऐवज। मजघरीं बाजे बैसलासे॥' -तुका.१९७०. 'इरीवरून **हांडा** भरून आन्याले अशातशा बाईच्या आवन्या जातात.' २. खजिना. 'घराचा पाया खांदनं चालू होता. खळकनं वाजलं म्या म्हटलं हाय वाट्टे सोन्याचा **हांडा**.' (का.)

हांडादेरा (पु.) वधू पाठवण्याचा विधी. 'वावराबाहेर आले झाले तीनतेरा/ मंडपातून जसा काढला **हांडादेरा**.' -मिए.७७.

हांडी (स्त्री.) स्त्री योनी. 'चिननं विसवासघात केला अन् भारतासोबत युद्ध छेडलं. मायची **हांडी** त्या चिनच्या.' -वा.९९. 'ते ऐकून पुंजा नुसताच हसला अन् म्हणाला, जाऊ दे तिकडं **हांडीत** ती नळयोजना.' -पख.१०.

हांडीदवडी (वि.) गरिबीतील भांडी. 'आपला संसार असा क्षुद्र, **हांडीदवडीचा**.' -मोती.३७.

हिकडे (अ.) इकडे. 'ह्या **हिकडे** धावे तं थो तिकडे धावे.' -दि.१.

हिकमत (स्त्री.) युक्ती, कौशल्य. 'ही जोळी आपल्या दावणीस बांधायला काहीतरी **हिकमत** लढविली पाहिजे.' -कात.२३. (अर.)

हिकमती (वि.) हुन्नरी, लबाड. 'मोहोळ कसेही असो अनवरशा आपल्या खास **हिकमतीनं** झाडीत असे.' -काळी.२९. 'काना कैपती, लंगळा **हिकमती**, थोटा कुरापती.' (अर.)

हिकलली (अ.) इकडील. 'कोठीवान भायच इमानदार **हिकलली** सुतई तिकडं जाऊ देये नाई.' -दि.५

हिकाती (वि.) १. सबब सांगणारा. २. घासाघीस करणारा. '**हिकाती** मानूस भावात घासाघीस करतच रायते.'

हिकात्या (स्त्री.अने.) घेवदेवीतील घासाघीस, बोलणी. 'तुमच्यासारख्या बाया **हिकात्याच** मोठ्या करतात. यापरस लेकरं पुरले.' -हज.१०३., 'तूच तर म्हणला द्याचं ते द्या. आता **हिकात्या** नोको करू.' -सेल.१२४., 'देनं ना घेनं हिकात्या करनं.' (अर.हिकायत)

हिजडा(ळा) (वि.) षंढ, नपुंसक. 'तुका म्हणे वेषधारी। **हिजड्या** नारी नव्हेती।' -तुका.१५६०., '**हिजडा** ह्मणसी जोगी। तर सोळा सहस्त्र भोगी।' -तुका.४६४., 'तुमी का बांगळ्या भरल्या **हिजडेई** हो. तुमी बी द्याना चांगले कनके ठेऊन.' -त.१७७.

हिडकनं (क्रि.) नखरे करणे. 'मालीले **हिडकनं** सांगा चारचौघाईत, काम नोका सांगू.'

हिडगा (वि.) उनाड, फंदी, नखरे करणारा. 'हिडग्या **हिडग्या** लाज नाही, कालचा कोडगा आज नाही.' -सेल.१०८., 'तुमीच जात बसा **हिडग्यावानी** मी तं पयलेच येत नवती तिथून.' -धग.१३०.

हिडगावनं (क्रि.) मिरवणे, नखरे करणे. '**हिडगावत हिडगावत** साई खेटत होती/ आळून लपून सारं बायको पाहेत होती.' -चंच., 'अलमस्त खावटी असल्यानं बोकळ्या भल्ताच **हिडगावत** जाये.' -सित.११२., 'मिरोनुकीत बाज्यावाले **हिडगावत** होते. नाचनारे पोट्टे **हिडगावत** होते. नवरदेव तं बरं **हिडगावतच** होता.' -लेक.४३.

हिडगेपणा (क्रिवि.) ठाकणे. 'मले नाई येत तसा **हिडगेपना** सदाई माहा नवरा, माहा नवरा.' -गा.२९.

हिडसनं (क्रि.) अवमानणे, धिक्कारणे. 'ल्हान लेकरालं **हिडसफिडस** करू नाई.'

हिड्डुगनं (क्रि.) नखरे करणे, मनाप्रमाणे स्वैर वागणे. 'सरका व्हा मांघं, बस्स झालं तुमचं **हिड्डुगनं**. पुंजाला लोटत गिरजा म्हणाली.' -पख.७८.

हितोपिरती (वि.) प्रेमाचे, जवळचे. 'गावातल्या तुह्या **हितोपिरतीच्या** लोकायसाठी लगन केलं का म्या?' -रा.११४.

हित्ताळ (स्त्री.) वीत, हाताच्या बोटाचे माप. 'वखर कऱ्याले येक **हित्ताळ** लाकूळ कमी पळ्ळं लेकाचं.'

हिथ्थून (अ.) येथून. 'एकानं मरताना **हिथ्थून** चोरून नेलेला हार तेच्या गयात घातला.' -दि.७६.

हिनखुऱ्या (पु.) जनावराच्या खुराचा भाग, कच्च्या खुराचा. 'बैल **हिनखुरे** असल्यानं डांबरी रस्त्यानं घसरत जात.'

हिन(ना)वनं (क्रि.) व्यंग, दोष दाखवून मानखंडणा करणे. 'ते अगाधपण जाईल। मग **हिणावो** अंगा येईल।' -ज्ञा.२.२१७. 'आंगोळ फेरता फेरता **हिनाये** चबरा पलंग/ पानात टोचली सवत, रुतते मलेच लवंग.' -वि.

हिनावा (पु.) कमीपणा, दोषारोप. 'ते अगाधपण जाईल। मग **हिणावो** अंगा येईल॥' -ज्ञा.२.२१७. 'गवगवा होऊन ज्यामुळे **हिनावा** येईल असे काहीच त्यांनी लग्नात होऊ दिले नाही.' -कात.३६९.

हिनोनं (क्रि.) हिणविणे. 'तरि सत्कर्मे चांगे। चालिली अधिकरबगे। परि एकाधें का आंगे। **हिणावती** जैं।' -ज्ञा.१७.३८८. 'ज्याले त्याले **हिनोनं** म्हंजे मार खाचीच पायी समजा.'

हिफाजत (स्त्री.) काळजी. 'वांगे कितीकई पिकले साजरे दिसले तरी पूख लागला का त्याले भोक पळतेच. तुमी त्याची कितीई **हिफाजत** करा?' -सुखो.१८.

हिम्बटलं (वि.) तेज नसलेले, उदासवाणे. 'ते गट मुकी रायली आन् **हिम्बटलं** तोंड करून वापस आली.' -लेक.३४.

हिम्बुल्डा (वि.) हिरमोड, आंबट. 'चंपी फिरूफिरू **हिम्बुल्ड्यावाणी** झाली.' -झि.८८.

हिम्मट (वि.) आंबट, हिरमोड, निस्तेज, उदास. 'दही नाई भेटलं तं वसू **हिम्मटलं** तोंड घेऊन वापस आली.'

हिय्या (पु.) हिंमत, धीर. 'महादेव मोठ्या **हिय्या** करून साहेबाला आडवा होत बोलला.' -धग.११.

हिरकली (स्त्री.) लुगड्याचा एक प्रकार. 'मले वाटते तुह्या भांगाचा ढंग अन् **हिरकलीचा** सोगा आपुनई करून पाहावा.' -मोती.

हिरमुंजी (स्त्री.) तांबडी माती. 'घराले रंग द्याले दोन किलो **हिरमुंजी** आनली इकत.' (अर.हुरमुज)

हिरमुसा (वि.) नाराज झालेला, उत्साह निघून गेलेला. 'पोरीवालेईनं सोयरिक तोळ्यानं दिप्या लयच **हिरमुसला** झाला.'

हिरवट (वि.) साधारण हिरवा. '**हिरवट** तुरीच्या शेंगा खावा वाटतात.'

हिरस (पु.) असुया, मत्सर. 'शेजाऱ्याचा गॅस पाऊन इले **हिरस** आला/ आनाना वं आपल्या घरी नांदा सुरू झाला.' -रूख., 'कुनी दोन घास खाते तं त्याच्या नशिबानं खाते आपून काहाले त्याचा **हिरस** करावं.' -लेक.८. (अर.हिर्स)

हिरसंहिरसं (न.) मत्सर, असूया. 'शेजीच्या **हिरसंहिरसं** बायकोई पाटल्या करा म्हनून रायली आता.'

हिरसतुरस (स्त्री.) चिंता, काळजी. 'तुले मायची काही **हिरसतुरस** ह्ये का नाही?' -रा.११४.

हिरासी (क्रि.रूप.) हिरमुसणे. '**हिरासी** बैसल्या **हिरासी**/ गिरजा बसल्या हिरासी.' -भू.९.

हिलगनं (क्रि.) अडणे, थांबणे. 'सरकारी काम पोसीजर मंदी **हिलगते**.' -दि.६२.

हिलाट (पु.) आळ, आरोप. 'म्हंसान त्या पोरीसंगं गाठ बांधीनऽ पन हा **हिलाट** घेता तुमी मायावर.' -सित.८५.

हिलाल (स्त्री.) टेंभा, दिवटी, मशाल. 'बाहेर बुदलीने ओतल्या जाणाऱ्या तेलाने पेटविलेले **हिलालही** पाजळत होते.' -कात.३६५. (अर.)

हिवर (न.) एक काटेरी झाड. 'गोसावी प्रश्रेया गुंफेपुर्वे बीजे केलेः तव तेथ गांधीया **हिवरु** असेः' -ली.११६., 'पै **हिवराची** दाट साऊली। सज्जनी जैसी वाळिली।' -ज्ञा.९.४३७.

हिवसं (न.) गार, थंड. 'केली काया तनु **हिंवसी** शीतळ। चिंता तळमळ नाही ऐसी॥' -तुका.३०२०. 'तुले गरम पान्याचा उंडा येत नाही त **हिवशा** पान्याच्या भाकरी कशा करशीन?' -मोती.

हिवसी(शी) (स्त्री.) थंडी होणे, नरम पडणे. 'एवढी मोठी काळासारखी रात पडली ना तुले, तरी तुही **हिवसी** व्हत नाही?' -पख.७५., 'थांबा, करूद्या जरा त्याची **हिवसी** लोकाईले. मूत पिला भोसळीच्यानं अन् नसता धिंगाना घालायला.' -वा.४१०.

हिवादवात (क्रिवि.) थंडी वगैर असताना पहाटेच्या वेळी. 'भल्या पायटी **हिवादवात** जावं ताहा कुठी भाराभर गवत आनता येते चोरूनमारून.'

हिसडा (पु.) हिसका, झटका. 'घुश्शानं **हिसडा** देत. बंडोजीनं बैलांना पराणी टोचली.' -मोती.४१.

हिसडाहिसडी (स्त्री.) झटके मारण्याची क्रिया. 'पोरगं **हिसडाहिसडी** करून मायच्या हातातून सुटलं.' -त.१५.

हिसळा (पु.) झटका, हिसका. 'गाईन **हिसळा** मारून दोर तोळ्या अन् पयाली चलवादी.'

हिसळाहिसळी (स्त्री.) झटके, हिसके देणे. '**हिसडाहिसडी** करून पोरगं मायच्या हातातून सुटलं.' -त.१५.

हिसा(स्सा) (पु.) भाग, वाटा. 'भाव **हिस्सा** कोनाले सुट्टे का राजा.' (अर.)

हिसाब (पु.) हिशेब. 'देन्याघेन्याचा रामकिसन बराबर **हिसाब** ठेवत जाय.'

हिसाबानं (क्रिवि.) विचाराने. 'बुडा पोट भऱ्याच्या **हिसाबानं** अठी रायले आल्ता.' -सित.१३६.

हिसोब (पु.) जमाखर्चाचा मेळ. '**हिशोबें** तें आलें घ्यावें। हे तों ठावें सकळांसी॥' -तुका.९५६.

हिसोबी (वि.) व्यवहारात दक्ष असलेला. 'दोन रुपये डुबू नाई देत. शामराव बुढा लय **हिसोबी** हाय.'

हिस्सेराशी (स्त्री.) हिशोबाने काढलेला वाटा. 'मुंगाच्या शेंगाईची **हिस्सेरासी** करून बायाईले त्याईचे गंजुले देले.' (अर.)

हिस्सेवाटी (स्त्री.) सारखी वाटणी. 'बुढीनं तेजरावला चार एकर देऊन चार आपल्या जोळ ठेवलं. शेतीबरोबर दोन बैलांची **हिसेवाटी** झाली.' -तित.१९.

हिळसफिळस (न.) हिडीसफिडीस. 'लानचुकल्या लेकराले **हिळसफिळस** करते काय कोनी सांग माय?'

हिळुपना (पु.) बनाव, चतुराई. 'साऱ्याच मान्साईले कश्यी आवळली भाजी? एखांद्याले जरासा **हिळूपना** समजला नसनं?' -एक.

हिळूनमिळून (क्रिवि.) प्रेमाने, सोबत. 'सारे पोरंसोरं **हिळूनमिळून** शाळेत जात होते.' -धग.६६.

हिळ्ळा (पु.) वृक्ष, फळ. 'म्हणौनि ते माता लेकुरासि **हीरडेया** बेहाडेयाचा गुळुळा देः मग तेयासि भूक लागेः' -ली.४५४., 'निंब जिभे कडवटु। **हिरडा** पहिलें तुरटु।' -ज्ञा.१८.१८६.

हिळ्ळ्या (स्त्री.अने.) हिरडी. 'दूध ते हेः म्हणौनि पेवो लागलाः **हीरडीया** फुटतीः रगत नीगेः' -ली.३१०.

हिंग (पु.) मसाल्याचा उग्र वासाचा पदार्थ. 'तरवंटा उकडीलाः पीळीलाः मग **हींगे** फोडणीया रांधीलाः' -गोवि.२२१., '**हिंगु** त्रासिला घाणी। तरी कैचें सुगंधत्व आणी।' -ज्ञा.१८.२२१., 'कधी चावटीचे बोल। **हिंग** क्षीरी मिथ्या फोल।' -तुका.८४., 'मारवाळी लोकं पापळात लय **हिंग** टाकतात.'

हिंगं - हे काय तर. '**हिंगं** गेली आन् हिंगच तर आली.' -रा.८., 'पाह्यतापाहता दिस जातीन. **हिंग** म्हंता पोहा ईन. मग दिवाळी.' -ऊन.१६२. '**हिंगं**, हे काय तं टोपलं, अथीच तं आय.'

हिंगणघाटी (वि.) हिंगणघाट येथे तयार होणारे कापड, लुगडे, धोत्र. '**हिंगणघाटी** चौकडी कापडाच्या गाद्या तेथे टाकल्या होत्या.' -मोती.

हिंगणबेट (न.) हिंगणाच्या झाडाचे फळ. 'पयले गावात **हिंगनबेटानंच** कपळे धूत.'

हिंगंतिंगं (क्रिवि.) जेमतेम, यथावकाश. '**हिंगतिंग** हागाम सुरू व्हते आता. काय व्हते यवंदा त काय नाही.' -सेल.३९.

हिंगेतिंगे (क्रिवि.) बघताबघता, नाही म्हणता. '**हिंगेतिंगे** लगनाले मयना उलटला.' -गा.३२.

हिंगोळ (पु.) एक रंग. 'फाटकावर शाळेतल्या पोराच्या हाताने **हिंगोळाने** अक्षरे लिहिलेली पाटी लावली.' -खुं.११., 'पोळा आला. बैल धुतले. शिंगाना **हिंगोळ** लावला.' -सेल.११२., 'हाल्या स्वच्छ धुऊन त्याच्या शिंगांना **हिंगोळ** लावला.' -रा.१२९.

हिंजडा (पु.) झटका. 'त्यानं तिच्या मनगटाला धरून एक **हिंजडा** दिला.' -पख.४५.

हिंडगोळं (वि.) हिंडणारे. 'आपला एकुलता एक पोरगा तोच असा **हिंडगोळा** झाला तं घरचं कोनं पाव?' -हज.२२., 'अईन सयसंध्याकायची हिंडत बसते लेकाची, कुठी जाते कायजनं दिवा लावाले, **हिंडगोळी**.' -तित.८०.

हिंडनं (क्रि.) फिरणे. 'मी तीयाकारणे पाइ कापडे बांधौनि बहुत दीस **हींडीनला** जीः' -ली.३२. 'मिरूग लागतो बरुबर बियान्यासाठी हिंडनं सुरू करा लागते लेक.'

हिंडहिंड (क्रिवि.) अखंड फिरणे. 'बैल पाह्याले **हिंडहिंड हिंडलो** पन सापळला काई नाई.' '**हिंडहिंड** हिंडलो तरमा देव काई भेटला नाई.'

हिंडाफिरी (स्त्री.) सतत फिरणे. '**हिंडाफिरी** झाल्याशिवा का आता बरं वाटत नोतं? -सि.९९.

हिंडेल (क्रि.रूप.) हिंडलेला. 'नागोराव **हिंडेल** फिरेल मानूस असल्यानं जानकार आये.'

हिंडोनं (क्रि.) फिरविणे. 'लेकाले सकाऊनचं आजाआजीचं **हिंडोनं** चालू होतं.'

हिंदकळनं (क्रि.) उडणे, सांडणे. 'ताटलीतला रस्सा तिच्या लुगड्यावर **हिंदकळला**.' -त.९.

हिंदान (न.) नेम. 'सांगतो माया पंचफुलाचं **हिंदान**, तुयसलच बिंद्राबन.' -लोक.१९०., 'फाटक उघळून तीर्थरूप माह्याच **हिंदानानं** या लागले.' -मे.२.

हिंदून (क्रि.रूप.) वैतागून. 'काळजीनं काळजात घर बांधलं विचार करकरून डोकं **हिंदून** गेलं.' -कात.५८०.

हिंद्यान - नेम मारण्यासाठी केलेले चिन्ह, लक्ष्य, संधान. 'तिकीट नाई देल तं फारकती फाळीन/ दुसऱ्या पार्टीसी **हिंद्यान** मी जोळीन.', '**हिंद्यान** लावतात नेम धरतात. पाखरू मारतात.' -डेबू.५०., 'गोंडाचा भिम्या **हिंद्यान** धरून गोट्यानं कवठं पाडाचा.' -दि.४९.

हिंम्मट (क्रिवि.) हिरमोड होणे. 'तेवीचि कठिण बोले आसतुटी। अर्जुन होईल **हिंपुटी**।' -ज्ञा.११.४५३.

हीक (स्त्री.) वाचा. 'तिनई पोरी भोरीनं लुचल्यासारख्या दिसत होत्या निऱ्हा तेईची जशी **हीक** बसली होती.' -लेक.५४.

हीटहीट (न.) तिरस्कार. 'अन्नाले असं **हीटहीट** करतं लेका लोकाईले तं तेबी नाई सापळत.'

हीत (न.) वीत. '**हीतभर** लाकूळ, सात हात झिल्पी.'

हीनहीन (न.) कमी लेखण्याची क्रिया, नकार, नावड. 'भेंडाच्या भाजीले बॉ सदाई **हीनहीनच** करत रायते.'

हीर (स्त्री.) विहीर. 'औंदा **हीर** खानली तं हातचा पैसा निंगून गेला.'

हीव (न.) थंडी. 'जेविलेः आणि **हीव** वाजो लागलेः ते कांपत आलेः दांत खटखटो लागलेः' -ली.१६., 'कां वरिष आतप जैसें। जिणोनि शीतचि दिसे। तेव्हां होय **हिंव** ऐसें।' -ज्ञा.१४.१९७., 'मंग धुईन मी आंग. मले आता **हीव** लागते वो.' -धग.३८.

हीस (न.) १. आवाज. 'घोडीनं केला **हीस**, दणाणला दरवाजा, पाहुणा कोण राजा.' -लोक.५६. २. तोंडून शब्द न काढणे. 'खळ्ळून इचारून रायलो तरमा यादो **हीस** करत नाई.' (अर.हिस्स)

हुईन (क्रि.रूप.) होईन. 'जात बस्ते उरावर गच्चीले पकळून/ कसा **हुईन** मुर्दा हलका केसायले उपळून.' -नांबै.

हुकनं (क्रि.) चुकणे, न साधणे. 'हेंबाळ्यावानी काम केल्यावर तं ते **हुकनं** हायच.'

हुकमत (स्त्री.) अधिकार, अमल. 'तो आणि आपण एकाच **हुकमतीचे** बंदे गुलाम ना?.' -कात.५०७.

हुकमी (वि.) खात्रीचा. 'नारायण म्हंजे खुशालरावचा **हुकमी** एक्का. सांगलं ते करीनच तो.'

हु का चू (न.) अवाक्षर न बोलणे. 'सीतारामले बोला, ठोका, मारा **हु का चू** करत नाई हरामखोर.'

हुकात (स्त्री.) अफवा, बोलवा. 'ममीनं गावातून पोबारा केल्याची सबन गावामंदी **हुकात** उळली.' -सित.८३.

हुकुमत (स्त्री.) सत्ता, अधिकार. 'घरातल्या कोनावरच **हुकुमत** नाई. जो तो मनाचा राजा.' (अर.)

हुकून (क्रि.रूप.) चुकवून, टाळून. 'तुमचं घर **हुकून** कसं चालीन मामा.'

हुकेल (क्रि.रूप.) हुकलेले. 'चापलूस मानूस **हुकेल** सोयरिक जोळते.' 'पाच मिन्टानं गाळी **हुकेल** आये माई.'

हुकोनं (क्रि.) हुकविणे. 'बनतं काम **हुकोनं** शालक्याले बराबर जमते.'

हुक्की (स्त्री.) एकाएकी मनात आलेली अनावर इच्छा, लहर. 'आबाजीला पुन्हा थट्टा करायची **हुक्की** आली.' -मोती.

हुजर (पु.) अधिकार, संधी. 'सासूपुढे तं बोल्याचा **हुजर** नाई मले, बांगळ्या काहा माथं भरू?'

हुजरा (वि.) हांजी हांजी करणारा, लाचार. '**हुजरा** मानूस गोळ लागते कोनालेबी.'

हुजूर (पु.) स्वतः, धनी, मालक, राजा. 'पोटाच्या भाकरीसाठीही **हुजुराशी** हिम्मतीने हुज्जत घालता येत नाही.' -कात.५०७. (अर.)

हुज्जत (स्त्री.) झगडा, वादविवाद, मुजोरी. 'सर मला शांतपणे समजावत होते. मी **हुज्जत** घालतच राहिलो.' -फीर.१५१., 'भावरावनं 'भारा नेऊ नको' म्हणून गिरजाशी **हुज्जत** केली होती.' -पख.३९. (अर.)

हुडकहाडक (न.) शोध, तपास. 'धुरपदा संदुकात काही तरमा **हुडकहाडक** करून रायल्ती.' (का.हुडुकु)

हुडकी (स्त्री.) थंडीची थरथरी. 'माहा आला नंबर मले भरली धडकी/ एकदम आंगात भरून आली **हुडकी**.' -मिर्झा.१६७.

हुडहुडी (स्त्री.) थंडी, कापरे. 'काय भान्चोद हीव पळ्ळं. म्हताऱ्याच्या आंगात **हुडहुडी** भरली अवघी.'

हुडावनं (क्रि.) हुडहुडी भरणे, थंडी वाजणे. 'आधी तापाची कणकण आता थंडीनं तिचं शरीर जास्त **हुडावलेलं**.' -पोळा.

हुड्डा (पु.) हुरडा. 'दाने नाही कुबीरले **हुड्डा** लागला चोवू, खंदाळीत कन्सं मेळ कुठी रोवू.' -मिए.१६८.

हुतकाळ (न.) तोंड, मूख. 'आपून काई सांगावं तं शामा तिकळे **हुतकाळ** करते.'

हुतूहुतू (न.) एक खेळ, अंगात आणणे. 'त्यो मेला माजल्यावाणी **हुतूहुतू** करू लागला.' -पाटी.

हुदकनं (क्रि.) हुंदडणे, उड्या मारणे. 'लफाळात पोराईचं **हुदकनं** सुरू होतं बुढा डाफरला.'

हुदकनी (स्त्री.) ढुसणी. 'वासरू थानाला झोंबून **हुदकन्या** मारत होतं.' -गा.३२., 'डुकराच्या एका **हुदकनीत** लांबलाट पडशील.' -खुं.१०.

हुदहुद (न.) लहान उड्या मारणे. 'हरणं जिकडीतिकडी **हुदहुद** करत पळतात.' -खुं.५५.

हुनर (पु.) कला, कारागिरी. 'माया नाताले कोन्त्याई कामाचा **हुनर** हाय.' (फा.)

हुनसनी (क्रि.रूप.) होऊन. 'शाळा सुरू **हुनसनी** मयना उबार झाला व्हता.' -सित.६०., 'कुयात दीवा लायाचा हाय मले बुडा बेभान **हुनसनी** बोलत व्हता.' -सित.६५.

हुने(न्न)री (वि.) कौशल्य आत्मसात असलेला, कुशल, कल्पक. 'सून तं गळ्या **हरहुन्नेरी** निंगली. काई सांगा हव म्हनून करतेच ते.'

हुन्न(न्ने)र (पु.) कौशल्य, कसब, युक्ती. 'हाती कितीबी **हुन्नर** आस्ते काही उपेग ह्ये त्याचा.' -सेल.१९३., 'नवखी पोरं खेळाचा **हुन्नर** शिकण्यासाठी रेंगाळली.' -सि.३१. (फा.हुनर)

हुपचूप (क्रिवि.) चकीत. 'लंगळ्यानं डव्हात उळी मारली तं मी **हुपचूप** हून पायतच रायलो.'

हुपहुप (न.) माकडाचा आवाज. 'हे काट्टं तं माय वान्नेरावानी **हुपहुपच** करत रायते.'

हुपिजनं (क्रि.) होरपळणे, गर्मी होणे. 'हिरवीगार तुयसाबाई उन्हानं पाय केवढी **हुपिजली**.' -डेबू.४५.

हुप्प्या (पु.) मोठा वानर. 'एकच **हुप्प्या** अन् साऱ्या माद्या असतात वान्नेराईच्या कळपात.' -सि.३८.

हुबक (स्त्री.) १. तलफ. 'चालता चालता त्याले पावटीची **हुबक** आली.', २. लहर. 'तिनं गावच्या मान्साले पायलं आन तिले गावले जायची **हुब्बकच** आली.' -लेक.३०.

हुबकनं (पु.) झेंगट. 'आपण हे **हुबकनं** कशाला त्याच्या मागं लावा जास्तीचं.' -पख.१६३.

हुबेहूब (वि.) तंतोतंत सारखे, सादृश्य असलेले. 'आवळे-जावळे पोरं **हुबेहूब** येकसारखेच दिसतात.' (अर. हुबहु)

हुमकारा (पु.) हुंकार, होकार. 'तुले दहादा बोलावं त एकदा **हुमकारा** देती.' -बा.९६.

हुमनी (स्त्री.) वनस्पतीचा एक रोग. 'पोरगं काह्यले पाह्यजे? घरान्याच्या नावाले, येलीले **हुमनी** लाग्याले?' -एक.

हुमसनं (क्रि.) हुंदके देत रडणे. 'चित्री दोन्ही पायाच्यामधे चेहरा दुमडून **हुमसत** होती.' -ए.२४.

हुयं (क्रि.रूप.) असलेले. 'देर पायाले म्हनानं तं राजाचंच पोरगं जसं, त्यात चार बुकं शिकलं **हुयं**.' -हज.४३.

हुरपनं (क्रि.) १. भाजणे. 'तापाचा उभाय येकदम झाल्यानं पाय **हुरपला**.' २. उत्साहित होणे.

हुरपळी (स्त्री.) एक कीड. 'पेरेल कितीक बी तं **हुरपळीच** लंपास करते.'

हुरपावनं (क्रि.) हुरळणे, आनंदित होणे. 'किसना तिला दिसला तशी ती **हुरपावली**.' -पोळा.

हुरमयनं (क्रि.) १. वेदना होणे. 'त्याईनं उलट मलेच ठोकलं. त्यानं माई पाठ आजूनही **हुरमयते**.' -हज.५२. २. हुरळून जाणे. 'धाऊधाऊ तिले तिच्या मायचीच याद ये. भेटीले तिचा जीव **हुरमये**.' -लेक.९. 'आला दिवाईचा सन माहा **हुरमयलं** मन, माया भावाले म्हन, मले दिवाईले नेजो.' -नामदेव ठाकरे.

हुरयला (क्रि.रूप.) आनंदित झाला, हुरळला. 'सोयरिक पक्की झाली आन् माया जीव **हुरयला**. मले नाचाव वाटे. गान म्हनाव वाटे.' -हज.१०.

हुरळनं (क्रि.) आनंदित, अधीर, उत्साहित होणे. 'पोरगा पसन आये असा निरूप येताच सदा **हुरळून** गेला.'

हुरहुर (स्त्री.) रूखरूख, चिंता, काळजी. 'हे मघामधलं हीव थरकत अंगं/ **हुरहुर** वाटते कुणीच नाही संगं.' -शि.४३.

हुरूप (पु.) उत्साह, हुशारी. 'बाप तुडवितो काटे, टाचापंजाला कुरूप, कसा टिकावा **हुरूप**?', 'गाय चारताना मला खूप **हुरूप** आणि उत्साह वाटत असे.' -फीर.१३९. (का.हुरूप,अर.हुरीम)

हुर्द (न.) हृदय. 'कौसी टचंटचं बोल्ली तं माया **हुर्दाची** चायनीच झाली पाय.'

हुर्पाटा (क्रिवि.) चक्कर, फेरी. 'सारजाबुढी गावात **हुर्पाटा** करून आपल्या ओट्यावर आली.'

हुर्यो (स्त्री.) फजिती. 'आमी हारलो तं दुसरी टीम मोठ्यानं बोंबले '**हुर्यो**.'

हुलक (स्त्री.) कोरडी ओकारी. 'पयल्यानं गरवार तिले अन्नाची **हुलक**/ पुढे अमरावती मुलुक.' -लोक.१३८.

हुलकनी (स्त्री.) हुलकावणी. 'जठी नाई तठी पोट्टे लपत आन् **हुलकन्या** देत.' -सित.१३.

हुलकावणी (स्त्री.) भूल, चकवा. 'मधेच साऱ्या बायकांना **हुलकावणी** देऊन ती उठलीच.' -त.५०., 'मृग कोरडा जात होता पाऊस **हुलकावण्या** देत होता.' -सि.२०९.

हुलकावनं (क्रि.) झुकांडी देणे, फसविणे. 'नेट देऊन **हुलकावनं** बरं दिसत नसते. गेलं पायजे.'

हुलकी (स्त्री.) थंडीची हुडहुडी. 'मिरगाची धार बसरली. थंड्या पान्यानं **हुलकी** भरली.'

हुलगनं (क्रि.) १. उलगणे, नष्ट होणे. 'उजाड होईल उद्या सारं, हिर्वी पिकं जातील **हुलगून**.' -गाक.८७. २. उतरून, तोडून. 'झाडाचे आंबे **हुलगून** आणल्यावाणी आणले कधी एवढे पैसे?' -त.८.

हुलपडुब्या (वि.) शब्द न पाळणारा, झुकांडी देणारा. 'आता सासवा तं भायच **हुलपडुब्या**.' -दि.२२.

हुलवनं (क्रि.) उठविणे. 'शिंदीत मोहूळ हये. **हुलवू** का?' -रा.

हुलवून (क्रि.रूप.) लुटून, ओरबाडून. 'डोळ्यापुढचं पैशाचं झाड भगवानभुसारी **हुलवून** नेताना दिसला.' -त.६६.

हुला (वि.) बावळट, वेडसर. 'मानूस पायला तं **हुलाच** होता. आता लोकानं केला महाराज त्याले.'

हुली (स्त्री.) कोरडी ओकारी. 'डेबूला मळमळलं. **हुली** झाली.' -डेबू.५., 'आंगाचा सम्दा आंबटघामट वास. **हुली** यायचे धंदे.' -त.१३.

हुलूपुलू (वि.) हलके, थातुरमातुर. 'तुले खायाले गट्ठा पायजे अन् काम **हुलूपुलू** पायजे.'

हुल्ल(ड)ळ (वि.) गोंधळ, गडबड करणारा. 'मोत्या काय सुदा आये, निव्वळ **हुल्लळ** आये तो.' (का.हुल्लकड्डु)

हुल्लर (वि.) टवाळ. 'रस्त्यानं निन्हा **हुल्लर** पोट्टे बसेल असल्यानं पोरीले जाता येता येत नाई.'

हुवूनसनी - होऊन. 'गोपा पास **हुवूनसनी** घरी आला.' -सित.८५.

हुशार (वि.) १. शहाणा, चलाख, बुद्धिमान. 'शाळेत पोरापेक्शा पोरगी **हुशार** हाय पयल्या नंबरानं पास होते दरसाल.' २. वयात आलेली. 'पोरगी **हुशार** झाली लगनबी करा लागीन.' (फा.हुश्श्यार)

हुशारकी (स्त्री.) हुशारी, शहाणपणा. 'दारू पेता एवढे अन् मलेच **हुशारक्या** सांगता?' -धुम्म.

हुसकनं (क्रि.) शोधणे. 'काखे कडासन आड पडे। खडबड खडबडे **हुसकलें**॥' -तुका.२५०. 'कोन्तीबी वसद मांगल्ली का झालं चालू मायचं **हुसकनं**.'

हुसकली (क्रि.रूप.) उलटली. 'सरपंचाच्या खास विश्वासातली माणसं त्याच्यावर **हुसकली**. अविश्वासाच्या ठरावाची भाषा बोलू लागली.' -पख.१४.

हुसकवासक (क्रि.) शोधाशोध. 'मनकर्ना आलमारीत काहीतरी **हुसकवासक** करतानी दिसलती मले.'

हुसकहासक (क्रिवि.) शोधणे. 'भाकरतुकड्याचा झोरा **हुसकहासक** केला तर लोणच्याची फोड दिसली.' -सि.३२.

हुसकान्या (वि.) शोधणारा. 'त्या **हुसकान्याले** काय बटवा सापळीन तं सापळो बॉ.'

हुसकावा(हु)सक (न.) शोधाशोध. 'सारी **हुसकाहुसक** करूनही त्याला लपवलेली शिशी सापडली नाही.' -झेल.६.

हुसकाहून - काढून, हाकलून. 'तात्यानं वावरात घुसेल ढोरं भाईर **हुसकावून** लावले.'

हुसक्या (वि.) शोधाशोध करणारा. 'अरे **हुसक्या** तुले तं काईबी खायाचं दिस्तेच.'

हुसळनं (क्रि.) उसळणे. 'तुह्या मायचा चोट्टा दाखवू का तुले? भावराव **हुसळला**.' -पख.५८.

हुस्त्या (स्त्री.अने.) कुस्ती. 'एवढं शिकूनसवरून तू मातीशी **हुस्त्या** घेतू.' -बा.२२६.

हुळआगी (स्त्री.) तीव्र, आत्यंतिक गरज. 'पोटाच्या **हुळआगीपायी** लेकरासाठी करायले गेली काय अन् झालं काय.' -ऊन.१७५.

हुळकनं (क्रि.) शोधणे. 'मामी उतरंडीत काईबाई **हुळकहाळक** करत रायते.'

हुळ्ळा (पु.) भाजलेले ज्वारीचे हिरवे दाणे, हुरडा. 'एकी दोना **हुरुडाः** एकी दोना नीमरुः' -ली.३९., 'ऐसा माझारिलीं सांकडां। बापुड्या त्रैलोक्याचा होतसे **हुरडा**।' -ज्ञा.११.३२४., '**हुळ्ळा** भुजन्याची होते मले भलतीच घाई.' -वि.

हुंगनं (क्रि.) १. वास घेणे. 'डांगुरेस आलेः **हुंघीलेः** आणि जाउनि पैऱ्हा बैसलेः' -ली.३०५. २. चाहूल, अंदाज घेणे. 'तुका म्हणे म्या सांडिली आशा। **हुंगिला** फांसा येथुनिया।' -तुका.१०८१. ३. मन, भाव देणे, दखल घेणे. 'बा त आपल्याले **हुंगतई** नाई.' -डेबू.३९.

हुंगनारे (वि.) वास घेणारे. 'मातीतून पावसाचा उसयला गंध **हुंगनारे** होऊन गेले अलाधुंद.' -रूख.

हुंगनी (स्त्री.) कशाचा तरी वास घ्यायची क्रिया. 'बेसूद पळला तं खेटराची **हुंगनी** द्याव.'

हुंगा (पु.) वास घेणे, हुंगण्याची क्रिया. 'हेलगट सायाचं म्हशीच्या निरनाचा **हुंगाच** घेत रायते.'

हुंगाळत (क्रि.रूप.) विचारत, महत्त्व देत. 'आता बबनराव म्हणतात. इतक्या दिवस तं कोणी **हुंगाळत** नवतं आपल्याले.' -त.२९.

हुंगाळनं (क्रि.) विचारणे, दखल घेणे. 'आमदार असो का मंत्री, कोन **हुंगाळते** बे आपल्याले?'

हुंगेल (वि.) वास घेतलेले. '**हुंगेल** फुलं देवाले वायत नस्तात.'

हुंडा (पु.) वरदक्षिणा, वधुपित्याने वराला द्यावयाची रक्कम, सोनेनाणे. 'नवरीच्या बापा गुढा कशानं ढिला झाला/ **हुंडा** छातीच्या वर गेला.'

हुंदडनं (क्रि.) १. हंबरणे. 'घरासि **हुंबरत** गेलेः वासरु जीयालेः' -गोवि.५७/१४. २. उंडारणे. 'कसे पोरं हायत आजकालचे दिवसभर **हुंदडतात** गावभर भोसडीचे!' (का. हुडीद)

हुंबरनं (क्रि.) १. हंबरणे. 'गाय नाई तं वासरू केवढं **हुंबरून** रायलं कईचं.' २. बेचव होणे. 'सणाणून ताप भरला. सगळं तोंड **हुंबरून** आलं.' -पख.२५.

हुंबळ्ळा (पु.) हंबरडा. 'लंगळ्या पोराच्या जीवाचा तळफळा पाहून बुडीले **हुंबळ्ळा** फुटला.' -सित.४८., 'केसरले हुंबळ्ळ्यावर **हुंबळ्ळे** दाटून यायले लागले ते खोसाखोसा पान्यानं लडायले लागली.' -लेक.१६., 'तोंड मया करी, गांड **हुंबळ्ळे** देई.'

हू (न.) मान्यतादर्शक शब्द. 'काकानं **हू** म्हनलं तसा मी कामाले लागलो.'

हूक (स्त्री.) आकोडा. 'पोते उचल्याले **हूक** नसली का लय भारी जाते.'

हूड (वि.) खोडकर, उनाड, तापट. 'लानलान पोट्टे **हूड** असतातच. कोनाच्या बापाले आईकत नाईत.'

हून (क्रि.रूप.) होऊन. 'लय झाले येले अठूल्ल्याअठीच पावुलं/ कसायाच्या दावनीतले **हून** गेलो बैल.' -रूख.

हूप (वि.) थक्क, आश्चर्यचकित. 'बहिणीच्या गावचा इकास पाह्यला तं मी **हूप** झालो पाहून.' -त.५५.

हूल (स्त्री.) अफवा, आवयी. 'दिलीस फसवी **हूलच** तू/ पुरी पाडली भूलच तू.' -अ.१९. (का.)

हूळ (वि.) खोडकर, अविचारी, धसमुसळ्या. 'आला **हूळ**, पाळला कूळ.' 'नबीचं **हूळ** पोरगं खोळ्याच करत रायते.'

हे (संबो.) बैलांना चालण्यासाठी करावयाचा इशारा. 'हेऽऽ, तुया मायाच्या दुधात पानी पळो तं हे म्हन्तो ना तुले.'

हेकड(ळ) (वि.) सरळ नसलेली, हट्टी वाकडी. 'जीवींचें जाणावें या नांवें आवडी। **हेंकड** तें ओढी अमंगळ॥' -तुका.८३३. 'एकवेळ **हेकड** म्हैस ठोकूनठाकून जाग्यावर

आणता येईल, पण बायको?' -पख.४३.

हेकडं (वि.) वाकडे. 'हासू नका अन् तोंड करू नका **हेकडं**. थो होता कामठ्यावर जानराव वाळ्याच्या.' -मिए.१२४.

हेकना (वि.) तिरळा, चकणा, फुटका. 'आरतपिरत कोकना, डावा डोया **हेकना**.', 'एक डोया **हेकना**, किधरभी देखना.'

हेकन्याडोयाची (वि.) तिरळी. 'सरलाचा एक डोळा तिरपा असल्याने बुढी **हेकन्याडोयाची** म्हनून सदा तिचा उल्लेख करते.' -तित.२०.

हेकस (वि.) लंगडत चालणारा. 'दीळपायाचा मानूस **हेकसच** चालील ना.'

हेकसत (क्रिवि.) लंगडत. 'लंगड पोट्ट पाय कसं **हेकसत** चालून रायलं रे.'

हेकसतहेकसत (क्रिवि.) लंगडत. 'मी पटपट चालो, दामू **हेकसतहेकसत** माया मांगंमांगं.'

हेकाळ (वि.) हेकड, हट्टी. 'मा भेणें काय नेणों बोलसी। **हेकाडु** ऐसा।' -ज्ञा.११.६१०.

हेकोडं (वि.) वाकडे. 'लखव्यानं बुढ्याचं तोंड **हेकोडं** झालं.' -धग.१५.

हेकोडंतेकोडं (वि.) कसेतरी, वाकडेतिकडे. 'वाट **हेकोळीतेकोळी** त्यात काटेगोटे भारी, तुवा फुलावानी पाय, टाक जपून व पोरी.' -वि. 'दारू पिऊन शहाणीसुरती माणसं भुतासारखी **हेकोडंतेकोडं** वागतात.' -संगा.२३.

हेकोळ (वि.) वाकडे. '**हेकोळतेकोळ** बाभुई तिचा हिरवा हिरवा पाला.'

हेकोळतोंड्या (वि.) तोंड सरळ नसलेला. 'पायनं **हेकोळतोंड्याचं** बुढं कसं बसलं रागभरून.'

हेकोळा (वि.) वाकडा. 'कष्टा कबाळाची, **हेकोळ्या** तोंडाची.'

हेकोळाते(मे)कोळा (वि.) वाकडातिकडा. 'पोथ सरी पाटल्याचा जोळ तिरोत दाखोला/ नथनीचा दांडा आता झाला **हेकोळातेकोळा**.', 'मार बसल्यानं डेबू **हेकोळामेकोळा** झाला.' -डेबू.६६.

हेकोळी (वि.) वाकडी. 'उनातानात सर्व्याची येकयेक काडी येचा लागते. निऱ्हा कंबरन् कंबर **हेकोळी** होते.' -अक.३१.

हेकोळेतेकोळे (वि.) वेडेवाकडे. 'एवढे बोलून मी माहे सत्काराचे **हेकोळेतेकोळे** दोन शब्द संपवतो.' -ना.९७.

हेक्कड(ळ)तोंड्या (वि.) सुस्वभावी नसलेला, सरळ न वागणारा. 'उगा बस्तंऽ का नाई आता तू **हेक्कडतोंड्या**?' -धग.१२४.

हेक्कळ (वि.) अडून बसणारा. 'मा भेणे काय नेणो बोलसी। **हेकाडु** ऐसा॥' -ज्ञा.११.६१०. 'शामजी लयच **हेक्कळ** मानूस आये, आपलं म्हननं सोळतच नाई तो.'

हेचाळनं (क्रि.) स्तंभित होणे. 'मजूर माझ्याकडे क्षणभर **हेचाळल्यासारखे** पाहत होते.' -ल.१८.

हेटकत (क्रिवि.) लंगडत. 'कुबळीच्या टेक्याटेक्यानं दिना **हेटकत हेटकत** बकऱ्याई मांगे निंगाला.' -सित.४८.

हेटा (पु.) वृक्ष विशेष, हादगा. याच्या फुलांची भाजी करतात. '**हेट्याची** फुलं भाकरसंगं मस्त सुरूस लागतात.'

हेटी (स्त्री.) टेकडी. 'बंदीतून चरून येणाऱ्या **हेटीवरल्या** गवळ्याईच्या म्हशी बुजाळून सैरावैरा पयत होत्या.' -दि.१८.

हेड (पु.) १. पशूंचा समुदाय, विक्रीसाठी नेलेले गुरांचे खिल्लार, कळप. 'तवं **हेडाउ** तेलंग देसौंनि घोडेयांची **हेड** घेउनि वोरंगला जात होतेः' -ली.३१., २. गुरांची विक्री करणारा दलाल. 'गायी म्हसी **हेड**। तुप विकी महाव्दाड।' -तुका.४००२., '**हेडे** ढोरांचा कळप हाकलत पुढे जात होते.' -बा.२१९.

हेडग्यालेमेडगं (न.) कशाला काही लावणे. 'मले फुरसद नाई अन् मी बसतो **हेडग्याले मेडगं** पुसत?' -भं.१३२.

हेदोळा (पु.) दगदग, त्रास. 'गावातले लोकं दिवसभऱ्याच्या **हेदोळ्यानं** मुटूमुटू जपले व्हते.' -सित.१०७.

हेपलनं (क्रि.) १. पुढच्याला मागून संभोग केल्यासारखा धक्का देणे. 'आधी तुले **हेपलू** दे, मंग तुह्या कामावर येतो.' -बा.२७२. २. हानी करणे. 'रावजीनं या सौद्यात मले पाचशानं **हेपलंल** साजरं.' (का.हेप्पळिसु)

हेपली (स्त्री.) संभोग केल्यासारखा ढुंगणावर पुढून धक्का मारणे. 'मारली **हेपली** अन् सुजली बोपली.'

हेपलून (क्रि.रूप.) त्रास देऊन, राबवून. 'मालकानं मजुराईले संध्याकायलोक **हेपलून** सोळ्ळं.'

हेपलेल (क्रि.रूप.) लुबाडलेले. 'दिवानजीनं मालकाले आजलोक लय **हेपलेल** आये.'

हेपल्या (वि.) १. संभोग क्रिया करणारा. २. नुकसान करणारा. 'नाम्या पुरा **हेपल्या** आये, याले त्याले टोल देतच रायते.'

हेपायला (वि.) वाकड्या दाताचा. 'पोरीसाठी असा **हेपायला** पोरगा पायते का कोनी?'

हेपायले (वि.) वाकडे. 'भल्ली आली हिताची **हेपायल्या** दाताची.'

हेपूस (वि.) ढिल्लमढाला. 'तहान भटके, होऊन **हेपूस**, पडते टिपूस नभातून.' -हा.३३.

हेरनं (क्रि.) ताडणे, जाणणे. 'कोनाच्या मनात काय हाय ते बराबर **हेरनं** पळते राजा.'

हेरफेर (न.) अदलाबदल. 'रामा नामानं कागदपत्रात काईतरी **हेरफेर** करेल दिसते.'

हेराफेरी (स्त्री.) अफरातफर. 'जान्या आंब्यांची **हेराफेरी** करते म्हून राखायला दिली न्हाई.' -रा.

हेरून (क्रि.रूप.) लक्ष ठेवून. 'तुयासाठी म्या दहीगावले एक पोरगी **हेरून** ठेवेल आये.'

हेरेल (क्रि.रूप.) अंदाज, तर्क केलेल. 'म्या पयलेच **हेरेल** होतं. काशा आपल्या बाजूचा नाई म्हून.'

हेलं (न.) रेडा. 'कुठी गेल्ता इतले दिवस **हेलं** घाल्याले तुमीच सांगां.' -सित.३५.

हेलकावा (पु.) पाण्यावरील तरंगणाऱ्या वस्तूची हालचाल. '**हेलकावा** आला का नाव वरवर जाये अन् अजून खाली ये.'

हेलकून (क्रि.रूप.) हेलावणे. 'मैना निंघाली सासरी गेला मांडो **हेलकून**.' -धों.३३.

हेलकोई (स्त्री.) पाण्यावरील तरंग, लाटेची उसळी. 'घळ्ळीतल्या पान्याले **हेलकोई** बसली तं सांडते ना ते. अरामानं चाल बाई.'

हेलगट (न.) रेडा. 'आता पाय **हेलगट** आये, गारा तुळोते बेलदारा संगं.' -डेबू.३८.

हेलपाटत (क्रिवि.) जबरीने ओढत. 'मालायचं बखोट धरून जावयानं **हेलपाटत** आणलं.' -झेल.२१. 'बाहीर निंघाला तसा म्या त्याच्या हाताले धरून **हेलपाटलं**.' -अंधा.

हेलपाटनं (क्रि.) चकरा, फेऱ्या मारणे. 'मलेच **हेलपाटत** या लागलं आस्तं मांगुड्यालोक.' -रा.१४. 'सीपनाच्या काठानं मोराचा शोध घेत एक लांडोर **हेलपाटत** गेली.' -झेल.७६.

हेलपाटली (क्रि.रूप.) वाकडी झाली. 'केवढा लोंढा आला नाल्याले. आरे आरे गाडी **हेलपाटली**. वाहत चाल्ली.' -त.२३.

हेला (पु.) रेडा. 'रावनाची खाई **हेला** मारला तरी पुरत नाई.' '**हेल्यावरच्या** पखाली उपयल्या.' (का.हल्ल्या)

हेल्पाटा (पु.) विनाकारणचे कष्ट, निष्कारण जाणे-येणे. 'आज ये उद्या ये असा **हेल्पाटा** कऱ्याले नोका लावू.'

हेल्याचं मस्तक (वि.) निर्बुद्ध. 'गावाचा सरपंचबी आसा **हेल्याचं** मस्तक हाये.' -त.५३.

हेवळ (वि.) वाकडा, हेकोखोर. 'हा **हेवळ** बैल बंडी नख्खीच उलटीपालटी करीन गड्ड्यात नेऊन.'

हेवा (पु.) मत्सर, स्पर्धा. 'मान अपमान वाढविसी **हेवा**।' -नाथ.१३१८., 'आतां तुकयापांशीं **हेवा**। नाही देवा तांतडीं॥' -तुका.४८२. (का.हेवे)

हेवादावा (पु.) मत्सर. 'सासू ना नंदा, कोनाचा करू **हेवादावा**.' 'आपसी **हेवादाव्यानं** लय घरं बुळले बापा.'

हेस (क्रि.रूप.) आहेस. 'तू तरी सातआठ वर्षाचा **हेस**. हे तं पाचच वर्षाचं आहे. तरी तुयापरीस धीट हाये.' -वा.१५०.

हेळ (स्त्री.) पशूंच्या विक्रीतील दलाली. 'ढोराईच्या इकीटिकीतून **हेळ** भेट्टे त्यावर घर चालते आपलं कसंबसं.'

हेळ (न.) शरीरातील एक अवयव. 'म्हशीचे पोट फाडून त्यातील बोके, **हेळ**, फाशी चरबी अल्लाद बाजूला काढली.' -रा.१५.

हेळखाया (वि.) वेश्या व्यवसायातील दलाली खाणारा. '**हेळखायाची** कमाई सरकीसुरकी थोळीच होत असते?'

हेळंबा (स्त्री.) हिडिंबा. 'कुठी गेलीसीन माय हे **हेळंबा**.', 'घरची बायको **हेळंबी**, परनारी गोळंबी.'

हेळणा (स्त्री.) शिव्याशाप, उपेक्षा. 'आपूण लय हरामी हाय. मुक्या जनावराची **हेळणा** लागली.' -त.१०१.

हेळनंमेळनं (क्रि.) मिळणेमिसळणे. 'आजून नवऱ्याशी आपून **हेळलोमेळलोबी** नाई तं फारकतीची गोठ आली.' -अंधा.

हेळना (स्त्री.) उपेक्षा, दैना. 'दुबळा भर्तार नको करू ग **हेळना/** कपायाचं कुकू सोनं देऊन मिळेना.' -लोक.२००., 'दळणात कळना, गरिबाची **हेळना**.'

हेळली (क्रि.रूप.) सरावली. 'गजरे नवी पोर हये. एकदा **हेळली** की पाहय तुलेबी बोलू देणार नाही.' -रा.६७.

हेळसफेळस (न.) हिडीसफिडीस. 'सदा न कदा **हेळसफेळस** केलं त लेकरू कसं जोळ यीन?'

हेळा(ळ्या) (स्त्री.) १. पशुंच्या विक्रीतील दलाल. 'मा घोडेयाचीए **हेडे** हेचि समर्थः' -ली.३१. २. जोर, शक्ती. 'पह्यल्यापह्यल्यानं त आंगातही **हेळा** होता. आता दम लागते.' -मे.७५.

हेंगं - हे काय तर. 'इवा दिसत नाई म्हंते, **हेंगं** हा काय अथीच तं आय.'

हेंगडत (क्रिवि.) लंगडत. 'दडपा साजरा नसला तं ढुंगनं ठेसाचे. त्याच्यानं थे **हेंगडत** चालाचे.' -दि.१२.

हेंगणं (क्रि.) मागणे, तगादा. 'लग्न झाल्यापासून हे पायजे ते पायजे असं काही ना काही **हेंगणं** सुरूच असायचं.' -पख.१६२.

हेंगाड (वि.) रागट, ओबडधोबड, मूर्ख. 'अगऽऽ जन्माला येऊन काय केलं तं **हेंगाडे**, तुझ्या परीस बरे लढ्याचे

शिंगाडे.' -रुक्मि.९२. (का.हेंगसू)

हेंगाडेंगी (स्त्री.) टाळाटाळ, मागेपुढे. 'इतक्या रोज **हेंगाडेंगी** केली दवाखाण्यात जायाची अन् आता गेली.' -त.१८८.

हेंगाळं (वि.) वेंधळा, बावळट, मूर्ख. 'हे **हेंगाळ्यावानाचं** कसी काय उनारी करीन तं करो बापा.'

हेंगेतेंगे (क्रिवि.) बघताबघता. '**हेंगेतेंगे** कतारकतार दीळक वरीस राजीखुसीत भुर्रकन निंगून गेलं.' -सित.६८.

हेंगोळमेंगोळ (वि.) कसेतरी, वाकडेतिकडे. 'बंडीच्या धुऱ्याले **हेंगाळमेंगोळ** लाकूळ कसं काय चालीन बापराजा.'

हेंग्या (वि.) वेंधळा, मूर्ख. 'सखे पती **हेंग्या** बाई, माया संसाराची काई धळगत नाई.' -लोक.९८.

हेंड (वि.) हेकड. '**हेंडग्याच्या** आळा अवघी चिपाडे काय तेथे गोडे॥' -तुका.१५५९. 'तुका म्हणे **हेंड** ऐसे मानिती ते लंड।' -तुका.१३०३. 'असी बायको **हेंड**, भीतीले देते पेंड.'

हेंडगूळ (न.) श्वानाचे मैथुन. 'रस्त्यावर पायलं तं कुत्र्याईचं **हेंडगूळ** लागेल.'

हेंडूक (न.) १. कुत्र्यांचा प्रणय. २. दोघातील अतुट संबंध. 'किसना अन् झाबू वाले व्हाचे नाईत. त्याईचं लय रोजाचं **हेंडूक** लागेल आये.'

हेंदरा (वि.) काळा, अडाणी. 'तुमचे गुरू होतेः ते **हेंदरेः**' -ली.८१३., 'तेथ येर प्राकृत **हेंदरे** केवी जाणो लाहे' -ज्ञा.९.३८०.

हेंबा (पु.) मोठी कांचाळी. 'नेम धऱ्याले **हेंबा** देनं तुयावाला?'

हेंबाडथुतरे (वि.) वेंधळे. 'तुमी लोकायहो **हेंबाडथुतरे** हाये. हलगर्जीपना करून गमावला चांगला चान्स.'

हेंबाळं (वि.) बावळट, वेडगळ. 'त्याले नाही समजत बैल कसे चाराव, थ्या **हेंबाड्याले** कसं गृहमंत्री कराव?' -मिए.९१.

हेंबाळतोंड्या (वि.) बावळट, मूर्ख. 'त्या **हेंबाळतोंड्याले** काय म्हैस दोयता येईल तं येवो बापा.'

हेंबाळपंथी (वि.) १. हेमाडपंताच्या वास्तुकलेगत, बेढब, आखीवरेखीव नसलेले. 'गावात आहे एक मारोतीचं देऊळ, **हेंबाळपंथी**.' २. वेंधळी. 'पाटीलबॉची सून दिसते साजरी पन निरा **हेंबाळपंथीच** आये.'

हेंबाळमुसक्या (वि.) मूर्ख, गाढव. 'मंग **हेंबाळमुसक्या** इतक्या उसीरा सांगतं काय आता?' -काळी.१२.

हेंबाळी (वि.) वेडगळ. 'पोरगी पायादेख्याले माठी अन् बोल्याचाल्यातबी **हेंबाळी** व्हती.' -सित.२२., 'पमी असी **हेंबाळी**, दुसरपनी कोन लाईन तिच्यासी फुकाफुकी पाट.' -सित.६३.

हेंब्या (वि.) मूर्ख. 'कोन्या **हेंब्याले** काम सांगलं तुमीनं, सत्यानास!'

हेंमकाडनं (क्रि.) चोप देणे. 'शाबासकी देणं दूर पण मास्तरने बरंच **हेंमकाडलं** होतं धरून.' -खुं.४८.

हैट (संबो.) गुरांना हाकलण्याचा शब्द. '**हैट**...मारते काय? अजबच जनवार हाये सायाचं...**हैट**.' -ना.३४.

हैत (क्रि.) आहेत. 'आपले नांगरणी वखरणीचे काम नेहमीचेच **हैत**.' -खुं.७३.

हैदोस (पु.) गोंधळ, धुमाकूळ. 'बैठकीत पाहा वं तं लेकराईनं **हैदोस** घालेल.' (फा.)

हैदोसदुल्ला (पु.) १. धुमाकूळ. २. करबलाच्या मैदानावर हजरत अली साहेबाच्या हसन हुसेन या नातवांनी युद्ध करीत प्राण अर्पण केले त्याचा शोक. छात्या पिटून हाय दोस्त दूल्लाहचा घोष घुमवीत मनवला जातो. 'रजाकारांनी **हैदोसदुल्ला** सुरू केला होता.' -पख.३., 'मटण रस्सा खाण्याच्या कल्पनेनं पोरं **हैदोसधुल्ला** करीत होती.' -सि.७०.

हैरान (वि.) १. गांजलेला, त्रस्त, अस्वस्थ. 'बिमारीनं तं माहा जीव **हैरान** झाला लेक.' २. चकीत. 'सय्यदची कारागिरी पाहून तं मानसू **हैरान** होते.' (अर.)

हैली (स्त्री.) दुमजली घर, हवेली. 'गावात आप्पाजीची एकच मोठीधाटी **हैली**, बाकी समदे कौलरू घरं.'

हैवान (वि.) राक्षस, अमानुष. 'साली ही मूर्ती तोडणारी माणसं होती का **हैवान**.' -बा.१७५. (अर.)

हैसियत (स्त्री.) आर्थिकस्थिती, सामर्थ्य, दर्जा. 'आपली **हैसियत** नाई रे बापा.' (अर.)

हो (क्रि.रूप.) १. होवो. 'संप अन् बंद याचा खो पाटी खो/ आपलं जमलं बस देशाच काही **हो**.' -जांग.७०. २. होकारासाठी वापरावयाचे संबोधन, होय. 'त्यानं इचारलं तं मी **हो** म्हनीन.'

होई(ळी) (स्त्री.) होळी, होलिकोत्सव. 'गोसावी नाथोबाकरवि **होळीया** कारणे सेणी वेचलीयाः' -ली.२३. 'होईरे होई पुरनाची पोई, सायबाच्या गांडीवर बंदुकीची गोई. असं **होईच्या** दिवसी म्हनत.', 'चकमकच्या साह्याने गारेवर विस्तव पाडला व **होळी** पेटवून दिली.' -भं.८८.

होका (पु.) ठेका, कामाचा आगाऊ करार. 'दे शिदोरी बांधून. **होका** भेटला कामाचा जातो मी.' -धग.२६., 'चाल सोना येती का व माह्या घरी पेरनीले, कुठलचा **होका** आला आज सांग बाई तुले?'

होकागिका (पु.) ठेका वगैरे. 'कुतचा **होकागिका** नसन घेतला त पाटलाच्या वावरात जाऊ आपून.' -धग.२८.

होक्या (पु.) होका घेणारा. 'काम भेटावं मून **होक्याच्याबी** मिनता करनं पळतात.'

होट (पु.) ओठ. 'आपलेच दात अन् आपलेच **होट**.'

होटाई (स्त्री.) ओठाळी, घोड्याच्या ओठाला बांधावयाची दोरी. 'लगाम काहाचा बे, **होटाई** बांधूनच दामटलं घोळमं.'

होड (स्त्री.) पैज. 'वानरेयाः एथौनि **होडा** केळे केती एके खाल गा?' -ली.२३९., 'जेथ हटिये सांडिती **होडा**। कडेलग।' -ज्ञा.६.५६.

होडहुके (वि.) पैज हरलेले. 'संगंचे **होडहुके** म्हने सिनीमा पाहू/ देवदास पायल्याबिगर नाई राऊ.' -जांग.४२.

होडून (क्रि.रूप.) ओढून. 'हिले नख सापडाले उशीर, पुरा हात **होडून** घेते.' -दि.३६.

होतकरू (वि.) पुढे प्रगती करेल असा, आशादाई. 'तुयशाच्या पोरगा **होतकरू** निंगला.'

होतकाड(ळ) (न.) तोंड, चेहरा. 'कौतिक भीमावर ओरडली. देऊ काय एक **होतकाडीत** ठेवून?' -धग.१६.

होतरीत (क्रिवि.) मुस्काटीत. 'माया **होतरीत** ठेवून देली फोतरीच्यानं, काम ना धाम.'

होतेत (क्रि.रूप.) होतात. 'झोंबला गोचीळ तसे खुर्चीचे **होतेत/** मोकाटले बैल सारे गाव धुऊन नेतेत.' -नांबै.

होदाळ (न.) तोंड. 'चल निंग भाईर रिकामे अजिबात थांबू नका. नाई तं मी **होदाळीत** देईन येखांद्याच्या.' -तित.७७.

होनं (सं.क्रि.) हो ना. '**होनं**, तो तुरेरावबी असाच आरबळला व्हता तुमच्या सार्का.' -अंधा.

होपकाळ (न.) तोंड. 'गेंदान्या डसल्या तं हऽऽ **होपकाळ** सुजलं मायालं.'

होपकाळनं (क्रि.) तोंडात मारणे. 'जादा भादरशील तं **होपकाळीन** तुले आता.'

होपलेस (वि.) रद्दी, अत्यंत वाईट. 'करून तं केलं तुया पन **होपलेस** काम केलं गळ्या.' 'नान्या **होपलेस** हाय म्हनूनसन्या कोनी पोरगी नाई देऊन रायलं.'

होपाळनं (क्रि.) तोंडात मार देणे. 'हे माजेल काट्टं **होपाळनं** पळते साजरं एकडाव.'

होपाळलं (न.) तोंड, चेहरा. 'तुवालं हे कावं **होपाळलं** तिकळेच कावं कर कुठीसा.' -सित.१०३.

होबळीत (न.) कल्पित विवर. 'मालक अन् फालक गेले **होबळीत**.' -बा.१६९.

होबाशी (स्त्री.) जास्तीचे काम, हुशारीचे प्रदर्शन. 'समजे ना उमजे लय **होबाशी** चोदून रायला रे तू?'

होबाळ (न.) तोंड. 'गोर्‍ह्यानं लात मारली तं **होबाळच** फुटलं मायं.'

होबाळकं (न.) थोबाड, मुस्कट. 'दोघाईच्या गोठीत तू काले **होबाळकं** घालतं.' 'पळ्ळो तं **होबाळकच** फुटलं मायालं.'

होबास (न.) १. पोकळ मोठेपणा. '**होबासी** भारी, फुटकं जातं दारी.' २. लग्नापूर्वी नवरीच्या बापाने कपडेदागिने देण्याचा विधी.

होबासकी (स्त्री.) फुकट फुशारकी. 'करनंधरनं झाट नाई, पाहा केवढी **होबासकी** झऊन रायला महाद्या.'

होबासखोर (वि.) मोठेपणाचे प्रदर्शन करणारा. 'घरात दाना नाई, मोठेपणा केवढा सांगते पाहा **होबासखोर**.'

होबासेल (वि.) मोठेपणाचा आव आणणारा. 'तिरमक लय **होबासेल** आहे. त्याच्या मोठाल्या गोष्टीच आयका फकत.'

होयन (क्रि.) होईल. 'तुहा **होयन** चक्काजाम, जगाले भेटन गती.' -ऊ.१६.

होयेल (क्रि.रूप.) झालेले. 'एवढे लोकं जमा **होयेल** पाहून बुढीले वाटलं काय झालं न काय नाई?' -धुम्म.

होरा (पु.) भविष्य, अंदाज. 'आज पानी पळीन असा **होरा** होताच माहा.'

होऱ्या - ? 'ये पोट्टे काल माह्या वावराच्या धुऱ्यानं तुमी **होऱ्या** घातल्या काय व?' -दि.२५.

होलगी (स्त्री.) एक लहान पक्षी. 'माह्या **होलगीवानी** उलीसक थुत्तर झालं होतं' -अंधा.

होलचिकोऱ्या (वि.) चेष्टा करणारा. 'आज्याच्या **होलचिकोऱ्या** भांडनापायी माली सेंडी हितभर वाहाळली.' -सित.११२.

होले हो (न.) होला हो. 'गन्याचं काय **होले** हो अन् नाईले नाई.'

होवं(वो)स्तोर (क्रिवि.) होईपर्यंत. 'जमीन नावानं **होवंस्तोर** बुढी मरेस्तोर नखल्यावर करता येते.', 'पेपर वानं सुरूच राह्यते पाठ **होवोस्तर**.' -त.१७.

होश(स) (पु.) शुद्धी, भान. 'बंडीचं चाक आंगावरून गेल्यानं **होश** नाई आला पोट्ट्याले.' (फा.होष)

होसला (पु.) उत्साह, इच्छा. 'बांडी पळ्ळी तरमा कास्तकार **होसला** नाई सोळत.' (फा.अर.)

होळ (स्त्री.) १. शर्यत. 'दोहो पारधीची **होड** पडलीः जेयाची सुनी ससा टाकी तो होड जिंकेः' -ली.४२., 'जी जीः हा **होडेचा** ससा जीः' -ली.२३. 'तो वाचस्पतीशी करी। प्रबंधु **होडा**।' -ज्ञा.१०.८., 'परी दानीं जया **होड**। सुरतूसीं॥' -ज्ञा.१३.२१०., 'पंगतीत श्लोक सुरू झाले ह्याचा सरला की तो म्हने. जशी **होळ** लागली.' -डेबू.४३. २. ओढ. 'लेकराची मायले **होळ** अस्तेच पाय.'

होळगे (न.अने.) वाळलेली जाडसर फुले. 'सूर्यफुलाचे **होळगे**, धांडेधुडे जुळवून चुलीत धूर केला.' -बा.१४४.

होळामाळा (स्त्री.) स्त्रीच्या गळ्यातील माळ. 'पाठीवरी नाचते पुष्पवेणी/ गळा घातली **होळामाळा** वरी.' -अ.८३.

होंडकं (वि.) वाकल्या, खाली शिंगाचा. 'माया दावनीत येक बादशा अन् येक **होंडका** बैल होता.'

होंडकी (वि.) १. एक शिवी, विधवा या अर्थी. 'हज्जारदा माह्याजोळ ते **होंडकी** म्हनलींशीन की तू मरायले पाह्यजे.' -अंधा. २. शिंग वाकडी असलेली गाय, बैलजोळी. '**होंडकी** गाय बांधं त्या खुट्याले.'

होंडक्याबेंडक्या (वि.) विधवा स्त्रिया. 'एक पैसाबी ह्या **होंडक्याबेंडक्या** पाहून वसूल झाला नाई.'

होंडा (वि.) खाली वाकलेल्या शिंगाचा. '**होंडा** बैल बेळ्ळीतून बातच मान काढून घेते.'

हौनं बे - होय ना रे. '**हौन** बे, बोलू नको छिनालाच्या, नाई तं तुयासंगं आमालेई लाता खाची पाई आन्सीन.' - धग.११६.

हौशा (वि.) हौस, उत्साह असलेला. 'रंगपंचमीले मले लाव्याले रंग, गयात टाकाले हार आनला माया **हौशा** देरानं.'

हौशागवशा (वि.) हौस असणारा. 'यात्रेत लावणीची अपेक्षा ठेवूनच **हौशेगवशे** येतात.' -मोती.६८.

हौस (स्त्री.) आवड, इच्छा. 'कपळ्यालत्याचीबी **हौस** पुरत नाई माय या घरात.' (अर.हवस)

हौसला (पु.) धीर, त्वेष, उत्साह, कर्तब शक्ती. 'सरपंचानं वरकरणी का होईना हो म्हटलं, तेवढ्यानच तिला **हौसला** वाटला.' -पख.४. (अर.)

ह्यो - (पु.) हा. 'काय रे कशाचा विचार चालला. हूं. **ह्यो** आवाज? **ह्यो** अंहं हा. त्यानं चूक दुरुस्त केली.' -वा.२४.

◆◆◆

संदर्भ ग्रंथसूची

- अंधारे, रमेश, 'पागोरा', ग्रंथाली प्रकाशन, २००५.
- आपटे, वा. गो., 'विस्तारित शब्दरत्नाकर', वरदा प्रकाशन, पुणे, मार्च २०००.
- इंगळे, नरेंद्र, 'बारभाईचा खटला', शब्दसागर प्रकाशन, अकोट, २००७.
- इंगळे, नरेंद्र, 'जांगडगुत्ता'.
- इंगळे, नरेंद्र, 'नासोळा'
- इंगोले प्रतिमा, 'हजारीचे बेलपान', सोनल प्रकाशन, दर्यापूर, १९८६.
- इंगोले प्रतिमा, 'जवायाचा पोर', देशमुख आणि कंपनी, पुणे, डिसेंबर १९८९.
- इलामे, महादेव, 'सितलालपनी', अंकुर प्रकाशन, अकोला, २०११.
- काटेकर, शिवलिंग, 'पावसाचं पाणी', अंकुर प्रकाशन, अकोला, १९९९.
- कांबळे, नामदेव, 'ठणक', राजमुद्रा प्रकाशन, परभणी, ऑगस्ट १९८०.
- कांबळे, नामदेव, 'राघववेळ', देशमुख आणि कंपनी, १९९३.
- कांबळे, नामदेव, 'ऊनसावली', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९९७.
- कांबळे, नामदेव, 'सेलझाडा', देशमुख आणि कंपनी, पुणे, २००१.
- कांबळे, नामदेव, 'झाला हाडांचा सापळा', राजमुद्रा प्रकाशन, परभणी, २०१०.
- किनगावकर, प्रकाश, 'गावाच्या आकाभोवती', पॉप्युलर प्रकाशन, २००६.
- कुलकर्णी, कृ. पा., 'मराठी व्युत्पत्ती कोश', शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणे, २००४.
- कुलकर्णी, व. दि. (संपा.), श्री गोविंदप्रभु चरित्र, व्हीनस प्रा., १९८०.
- कुलट, विठ्ठल, 'गावगाळा', प्रतिभा साहित्य संघ, अकोट.
- केचे, मधुकर, 'श्री संत गाडेबाबा,' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९७९.
- केचे, मधुकर, 'मोती ज्याच्या पोटी', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर १९८२.
- केशव, बोबळे, 'एक दिवशी कावू आला'.
- कोलते, वि. भि. (संपा.). 'गोविंदप्रभु-चरित्र', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, मे २०००.
- काळे, रावसाहेब, 'वऱ्हाडी बोलीचा भाषाशास्त्र अभ्यास भाग एक', वऱ्हाड प्रकाशन, लोणी, २०२०.
- गावंडे, शैलजा. 'मोगरा', संघमित्रा प्रकाशन, नागपूर, मार्च १९९१.
- गोरे, पांडुरंग श्रावण, 'कात टाकलेली नागीन', प्रकाशक एम. जी. मानकर, यवतमाळ, १९६१.
- चवरे, रा. गो., 'आरंबळ', महाजन पब्लिशिंग हाऊस, पुणे, जानेवारी, २००६.
- जगद्गुरू संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा गाथा, श्रीसंत तुकाराम महाराज संस्थान श्रीक्षेत्र देहू, मार्च, २०१०.
- जोशी, श्रीपाद व गोरेकर एन. एस., 'उर्दू-मराठी शब्दकोश', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, जानेवारी, १९८६.
- तल्हार, मनोहर., 'माणूस',
- तुळपुळे, शं. गो., 'दृष्टांतपाठ', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, डिसेंबर १९६६.
- दाभाडे, दिनकर, 'गयपातं'
- देशमुख, सदानंद, 'अंधारबन', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, डिसेंबर १९८८.
- देशमुख, सदानंद, 'तहान.' कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे.
- देशमुख, सदानंद, 'गावकळा', सविधा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २००५.
- देशमुख, सदानंद, 'खुंदळघास', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१०.
- देशमुख, सदानंद, 'लचांड', शब्दालय, श्रीरामपूर.
- देशमुख, सदानंद, 'बारोमास', कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे.
- देशपांडे, ब्रह्मानंद, 'शब्दवेध', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, डिसेंबर २०११.

- देशपांडे, ब्रह्मानंद, 'बहादूर', साकेत प्रकाशन, पुणे, २०१२.
- धनभर, शालीग्राम, 'रूखत', १९९५.
- धनभर, शालीग्राम, 'पाहुणचार', मैफल प्रकाशन, भुसावळ, २००९.
- पठाण, यु. म., 'फार्सी मराठी व्युत्पत्ती कोश', राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.
- पाटील, अनिल, `बिजानं धरलाय कोंब', इंद्रायणी साहित्य, पुणे. (नोव्हें. १९९२)
- पाटील, अनिल, ` मातेरं', प्रतिभा साहित्य संघ, अचलपूर. (मार्च २००६)
- पाटील, अनिल, `चंद्रनभी गझतेचा (गझल)', संवेदना प्रकाशन, पुणे. (एप्रिल २०११)
- पाटील, बाजीराव, 'भंडारवाडी', रजधूळ प्रकाशन, अकोला, २०१०.
- पाटील, विजय, 'एक गाव सतरा लफळे', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, (ऑक्टोबर २००२)
- पाटील, विजय, 'गावचावळी', संवेदना प्रकाशन, पुणे, मार्च २००६.
- पुनसे, देवेन्द्र, 'पोळा आणि बाहुली', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०११.
- बळी किशोर, 'धुम्मस', दै. लोकमतमधील लेख.
- बेग, मिर्झा रफी अहमद, `मिर्झा एक्सप्रेस', लाखे प्रकाशन, नागपूर, (आक्टो. २००७)
- बेग, मिर्झा रफी अहमद, `मिर्झायन', लाखे प्रकाशन, नागपूर, (मे. २०१०)
- बेग, मिर्झा रफी अहमद, `ऊठ आता गणपत', लाखे प्रकाशन, नागपूर.
- बेग, मिर्झा रफी अहमद, `जांगळबुत्ता', लाखे प्रकाशन, नागपूर, २०१२.
- बोबडे, केशव, 'एक दिवशी कावू आला', सोनल प्रकाशन, दर्यापूर, २०११
- बोबडे, केशव, 'एक सावली कडुनिबांची' सोनल प्रकाशन, दर्यापूर, २००५.
- बोरकर, पुरुषोत्तम, 'मेड इन इंडिया', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९९५.
- बोरकर, पुरुषोत्तम, 'आमदार निवास रूम नं. १७५६', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९९९.
- बोरकर, हरिश्चंद्र, 'झाडी बोलीचा शब्दकोश', विजय प्रकाशन, नागपूर, २०००.
- महल्ले, रवींद्र. `धोंडी धोंडी पानी दे', प्रतिभा साहित्य प्रकाशन, अकोट, (मे. २००५)
- माळी, शिवहरी, 'चंचई', मराठा सेवा संघ प्रकाशन, अकोला, १९९८.
- मुसळे, बाबाराव, 'पाटीलकी', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २००५.
- मुसळे, बाबाराव, 'पखाल' बजाज प्रकाशन, अमरावती.
- मुसळे, बाबाराव, 'इथे पेटली माणूस-गात्रे', काव्याग्रह प्रकाशन, वाशीम, २०११.
- रामदास स्वामी दास. `दासबोध'.
- लाजूरकर, नारायण, 'नांगराचे बैल', सोनल प्रकाशन, दर्यापूर, २००२.
- वाकोडे, मधुकर, 'झेलझपाट', देशमुख आणि कंपणी, पुणे. १९९६.
- वाकोडे, मधुकर ,'काळी माती निळी माती', साहित्य प्रकाशन केंद्र, नागपूर, २००१.
- वाकोडे, मधुकर, 'सिलीपसेरा'
- वाघ, गणेश, 'पूर्णाकाठ', अजब पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, डिसेंबर २००९.
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'वैदर्भी, पूर्णा प्रकाशन, अकोला, (ऑक्टो. १९८२)
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'काया मातीत मतीत' (संपा. मधुकर वाकोडे) देशमुख आणि कंपनी, पुणे. (१९९१)
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'कपाशीची चंद्रफुले', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. (ऑग. २०००),
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'पाऊलपाणी', लोकवाङ्मय गृह, मुंबई, (ऑगस्ट २००२)
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'डेबू', देशमुख आणि कंपनी, पुणे, २००४.
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'वऱ्हाडः इतिहास आणि बोली', अक्षरभारती अकादमी, पुणे, २००७.
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'पारंपरिक वऱ्हाडी म्हणी', अक्षरभारती अकादमी, पुणे, २००७.
- वाघ, (डॉ.) विठ्ठल, 'वृषभसूक्त', सारांश प्रकाशन, नाशिकरोड, (जुलै २०११)
- वाघे, सुरेश पांडुरंग, 'संकल्पना कोश', ग्रंथाली प्रकाशन, २०१०.

• वाडे, शालीग्राम, ‘झाली बोंबाबोंब’, अंकुर प्रकाशन, अकोला, २०११.
• शेख, यास्मिन, ‘मराठी शब्दलेखन कोश’, मनोविकास प्रकाशन, मुंबई, २००७.
• शेळके, उद्धव, ‘धग’, पॉप्युलर प्रकाशन, २००९.
• संत तुकाराम महाराज. ‘जगदगुरू श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा गाथा’, श्री संत तुकाराम महा.संस्थान श्रीक्षेत्र देह, २०१०.
• संत गाडगेबाबांचे अखेरचे कीर्तन
• सूर्यवंशी, (डॉ.) रमेश, ‘अहिराणी शब्दकोश’, प्रकाशन, श्रीपाद देशमुख, पुणे, आक्टो. १९९७.
• सोसे, विजय. `नोका मारू पोटात’
• हागे, लक्ष्मण, ‘दंढार’, अभियान प्रकाशन, अकोला, डिंसेबर १९९०.
• हागे, लक्ष्मण, ‘इरिंग-मिरिंग’, सेवा प्रकाशन, अमरावती, डिंसेबर ६५.
• हिवरकर, निंबाजी., ‘फिरत्या चाकावरती’, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, मे २००७.

◆◆◆

व्यक्ती परिचय

प्रा. डॉ. विठ्ठल वाघ

इंदूर विद्यापीठातून एम. ए.-मराठी (१९६९), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामधून 'पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास' या विषयावर संशोधन करून ***आचार्य पदवी*** (१९८९). श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे मराठीचे प्राध्यापक (१९६९ ते १९९७) व प्राचार्य म्हणून कार्यरत (१९९७ ते २००४) होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे संशोधकांना मार्गदर्शन. त्याच्या मार्गदर्शन-अंतर्गत अकरा विद्यार्थ्यांना ***आचार्य पदवी*** प्राप्त. या कालावधीमध्ये विद्यापीठातील विविध पदांवर व अन्य समित्यांवर कार्यरत होते.

यांनी वऱ्हाडी बोलीत बरेच लेखन केलेले असून ते लोककवी म्हणून प्रसिद्ध आहेत. ***साय*** (१९७५), ***वैदर्भी*** (१९९०), ***काया मातीत मातीत*** (१९९१), ***कपाशीची चंद्रफुले*** (२०००), ***पाऊसपाणी*** (२००१), ***गावशिव*** (२००१), ***पंढरीच्या वाटेवर*** (२००१), ***वृषभसूक्त*** (२००२), ***मातीचा झरतो डोळा*** (२०१३), ***मायबाप*** (२०१९) इत्यादीं कवितासंग्रह प्रकाशित. ***काया मातीत*** इंग्रजीत व ***वृषभसूक्तचा*** हिंदीत अनुवाद प्रसिद्ध. संत गाडगेबाबांच्या जीवनावरील ***डेबू*** (१९९९) व ***डेबूजी (२००५)*** या दोन कादंबऱ्यांचे लेखन. वऱ्हाडी म्हणींचे संकलन व संशोधन त्यांच्या ***वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म*** (१९९७), ***वऱ्हाडी इतिहास व बोली*** (२००७), ***पारंपरिक वऱ्हाडी म्हणी*** (२००७), ***वऱ्हाडी म्हणींतील वाङ्मयीन सौंदर्य*** (२००७) या पुस्तकांद्वारे प्रकाशित. यांनी ज्ञानेश्वरीतील ओव्यांचे म्हणींत रूपांतर केले. याद्वारे ***म्हणी कांचन*** हा ग्रंथ प्रकाशित (२००८). अंधश्रद्धेवरील ***अंधारयात्रा*** या नाटकाचे लेखन. ***बोली*** या द्वैमासिकाचे संपादन. ***देवकीनंदन गोपाला*** (१९७८-७९) या चित्रपटासाठी पटकथा, संवाद, गीत व सह-दिग्दर्शन. ***गोट्या*** (१९९०) ही दूरदर्शन मालिका व ***काज*** (टेलिफिल्म) यांचे पटकथा व संवादलेखन.

साहित्य व चित्रपटांसाठी मिळालेले पुरस्कार : • महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार : वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म (१९९७-९८), • ***पाऊसपाणी*** - केशवसुत पुरस्कार, • ***म्हणी कांचन*** • म.रा. नाट्यमहोत्सव, संहिता, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट नाट्यलेखनाचा लोटू पाटील पुरस्कार : ***अंधारयात्रा*** (१९८९), • चित्रपटाकरिता - महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सव, उत्कृष्ट पटकथा पुरस्कार, ***देवकीनंदन गोपाला*** (१९७८-७९), • उत्कृष्ट गीत पुरस्कार, ***अरे संसार संसार*** चित्रपटासाठी गीतलेखन व ***राघू मैनासाठी*** (१९८१-८२) गीत लेखन व सह-दिग्दर्शन पुस्कार प्राप्त. ***सुरवंता, मोल*** (२०१८), ***वेगळी वाट*** (२०१९) व ***झरी*** (२०१८) या चित्रपटांसाठी गीतलेखन पुरस्कार प्राप्त.

काव्य पुरस्कार : प्रियदर्शिनी अकादमी, मुंबई (१९९१), • यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पुणे (१९९१), • ***कपाशीची चंद्रफुले*** - रा. ना. चव्हाण पुरस्कार, सोलापूर, • कृषिभूषण, डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार, लोकसेवा आणि विकास समिती, चंद्रपूर, • गदिमा काव्यप्रतिभा पुरस्कार, महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, पुणे, (२००४), • स्वामी विवेकानंद काव्य पुरस्कार, स्वामी विवेकानंद सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे (२००७), • पुणे ग्रंथालय संघ पुरस्कार, पुणे, • महाराष्ट्र साहित्य परिषदेचा वाङ्मयीन योगदानाबद्दल पुरस्कार, • कविवर्य दामोदर अच्युत कारे गोमंतदेवी पुरस्कार, गोमंत विद्या निकेतन (२०१७), • दमाणी पटेल प्रतिष्ठान कर्मयोगी पुरस्कार, सोलापूर (२०१९), डॉ. वाघ यांनी विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे साहित्य संमेलन, कारंजा येथील ४५ वे साहित्य संमेलन, अकोल्याचे ९ वे कामगार साहित्यक संमेलन, बार्शीचे महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथील विभागीय साहित्य संमेलन, कर्नाटकातील तीन मराठी साहित्य संमलने अशा विविध साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे भूषविलेली आहेत.

प्रा. डॉ. रावसाहेब मुरलीधर काळे

एम. ए. (मराठी, २००२), एस.इ.टी. (SET, दोनदा : २०१५, २०१६), एन.इ.टी.(NET, २०१६), पीएच. डी. (२०११) आहेत. ***वऱ्हाडी बोली व तिच्या स्वरूपाचा अभ्यास*** या विषयावरील संशोधनाबद्दल संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठाद्वारे ***आचार्य पदवी*** प्राप्त. यांनी वऱ्हाड शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था, लोणी या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून वऱ्हाडी बोली, वऱ्हाडी लोकसाहित्य व संस्कृती यांचे जतन करण्याचे काम करीत आहेत. आजपर्यंत वऱ्हाडी लोकगीत, लोककथा, लोककला यांचे संकलन. तसेच, यांनी वऱ्हाडी लोककलांचे जतन करण्यासाठी ***पहिले वऱ्हाड लोककला***

संमेलन व ***दुसरे वऱ्हाड लोककला संमेलन*** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित केले.

व्हिडिओ कॉलिंग, ***लांबजाना***, ***कुत्रीची हिसेवाटनी*** या तीन नाटकांचे वऱ्हाडी बोलीत लेखन व अभिनय. विविध मासिकांत वऱ्हाडी बोलीवर अनेक संशोधनात्मक लेख प्रकाशित झालेले आहेत. भाषा आणि जीवनमध्ये - ***स्वल्पविराम `की'च्या आधी की नंतर?***, ***घाटावरची वऱ्हाडी बोली***, ***वऱ्हाडी बोलीतील स्वरस्वनिम***, ***वऱ्हाडी आणि नागपुरी स्वनप्रक्रिया***, ***वऱ्हाडी आणि नागपुरी व्याकरणप्रक्रिया***. अक्षरगाथामध्ये ***दृष्टांत पाठात आढळणारे वऱ्हाडी बोलीतील शब्द***, ***लोप पावत चाललेल्या भारतीय भाषा, इंग्रजी***, ***वऱ्हाडी बोलींचे प्रमाण मराठीला योगदान***; तर युगवाणीमध्ये ***मराठी बोली : वास्तव आणि संवर्धन***, ***वऱ्हाडी लोकगीताची भाषा,*** इत्यादी लेख प्रकाशित. तसेच ***ललित मासिकात मुलाखती व*** कवितारतीमध्ये कविता प्रकाशित. ***वासनवेल***, ***विदर्भाचा वसा***, ***प्रसादेशिक बोलीचे भाषाविज्ञान*** या पुस्तकांमध्ये विविध लेख प्रकाशित, विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्रांत शोधनिबंध प्रकाशित. यांचे ***समकालीन ग्रामीण साहित्य : डॉ. विठ्ठल वाघ गौरव ग्रंथ***, ***भुलाबाईची गाणी***, ***वऱ्हाडी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास***, ***साहित्य पंढरीचा वारकरी*** इत्यादी ग्रंथ प्रकाशित. तसेच, ***चिरांगण*** या दिवाळी अंकाचे सहसंपादन.

यांनी महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांच्या सीमेवरील कोरकू जमातीचा सांस्कृतिक अभ्यास (साहाय्यक संशोधक, यु.जी.सी.), वऱ्हाडी बोलीतील लोककथा (सांस्कृतिक विभाग, भारत सरकार), लोककला माहिती संकलन व संशोधन प्रकल्प (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई) इत्यादी संशोधन-कार्य केलेले असून सध्या वऱ्हाडी लोकसाहित्य (सांस्कृतिक विभाग, भारत सरकार) यावर संशोधन चालू आहे. या सर्व कार्याबद्दल पुढील पुरस्कार प्राप्त. •***वऱ्हाडी साहित्यरत्न*** पुरस्कार (स्व. सुमनबाई कला, क्रिडा, आरोग्य, शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, बार्शीटाकळी). • उत्कृष्ट नाट्य लेखन पुरस्कार (महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ), उत्कृष्ट अभिनय पुरस्कार (सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई) इत्यादी.



श्री. विलास शिरसाट

आरेखक-यांत्रिकी या विषयात एन.सी.टी.व्ही.टी. (१९९०), एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई येथून पत्रकारीता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (१९९४), मुंबई विद्यापीठातून मराठी-सौंदर्यशास्त्र विषयासह एम.ए. (उच्च द्वितीय श्रेणी, १९९५), पुणे विद्यापीठातून एस.इ.टी. (SET, १९९७). विविध तांत्रिक कंपन्यांमध्ये आरेखक (यांत्रिकी) म्हणून पाच वर्षे कार्यरत. सिद्धार्थ महाविद्यालय (मुंबई) व जव्हार महाविद्यालय (जव्हार) येथे अधिव्याख्याता (१९९६-९७). १९९८ पासून राज्य मराठी विकास संस्थेच्या संशोधन विभागात कार्यरत आहेत. वस्त्रनिर्मिती माहितीकोश प्रकल्प-अंतर्गत खंड : १, २, ४, ५ यांमध्ये भाषिक संस्कारक, संशोधन साहाय्यक, अभियांत्रिकी आरेखक, छायाचित्रकार म्हणून काम. ***औद्योगिक छायाचित्रण, ऑटो कॅड आरेखन पद्धती*** व ***ट्रेसिंग आरेखन पद्धती*** या गोष्टी संस्थेत स्वतः सुरू केल्या (अनुक्रमे १९९९, २००५, २००९). यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, टी. के. टोपे, महाविद्यालय, परळ, जोशीज् कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट, दादर इत्यादी ठिकाणी अनुक्रमे बी. ए. प्रवेश-परीक्षा अभ्यासक्रम, सौंदर्यशास्त्र, छायाचित्रण या विषयांवर व्याख्याने दिली (१९९५-२००५). मराठी , हिंदी व इंग्रजी चित्रपटांची वृत्तपत्रीय समीक्षणे प्रसिद्ध (२००४). ***वाचनयात्रा प्रकल्प, गडकरी-गदिमा-पुल रंगमंच आविष्कार स्पर्धा*** (गगपु प्रकल्प, २०१८-१९), ***वाचनप्रेरणा दिन*** (२०१५ ते २०१८ व २०२०) या उपक्रमांचे प्रकल्पप्रमुख. सध्या ***वस्त्रनिर्मिती माहितीकोश, शिल्पकार चरित्रकोश, ऑलिम्पिक माहितीकोश, विधिशास्त्र संज्ञाकोश*** व **प्रस्तुत प्रकल्पाचे** प्रकल्पप्रमुख.

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी महासंघ (शासन मान्यताप्राप्त संघटनांचा समूह) या संस्थेचे ***सहसचिव. सर्द संध्याकाळ*** (कथासंग्रह), ***आमचं वाळूचं घर*** (कथासंग्रह), ***दरवीची गोष्ट*** (दीर्घकथा + क्रमागत कादंबरी), ***मराठी साहित्याचा परिचय, आई माझं नाव?*** (माहितीपर), ***तू गेल्यापासून*** (एकांकिका संग्रह), ***ट्रॅफिक जॅम*** (कविता संग्रह), ***शकुनी कंठा*** (कुमारकथा) इत्यादी पुस्तके प्रकाशित.

◆◆◆